"मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात वा. सी. बेंन्द्रे यांचे लिखाण - एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत
सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध

० संशोधक ०

श्री. ज्ञानेश्वर कचरू शिंदे

जिजामाता नगर, हिंगोली

० संशोधन मार्गदर्शक ०

डॉ. मुटकुळे रामभाऊ आर.

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत
ता. वसमत जि. हिंगोली

जानेवारी २०१७

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. ज्ञानेश्वर कचरू शिंदे** यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर केलेल्या **"मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात वा. सी. बेंन्द्रे यांचे लिखाण - एक अभ्यास"** या प्रबंधासाठी केलेले संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली केले आहे. प्रबंध लेखनात ज्या संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे, त्याचा आवश्यक त्या ठिकाणी यथोचित निर्देश केला आहे.

संशोधक **श्री. ज्ञानेश्वर कचरू शिंदे** यांनी हा प्रबंध स्वतंत्ररित्या लिहिला असून, तो इतर कोणत्याही विद्यापीठात कुठल्याही अन्य पदवी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण - वसमत **डॉ. मुटकुळे आर. आर**

दिनांक - __/__/२०१७ मार्गदर्शक

प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, **"मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात वा. सी. बेंन्द्रे यांचे लिखाण - एक अभ्यास"** या विषयावरील प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो **डॉ. मुटकुळे आर. आर.** यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही पदवी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण - हिंगोली

दिनांक - __/__/२०१७

श्री. ज्ञानेश्वर कचरू शिंदे

संशोधक

ऋणनिर्देश....

भारत देशाला पाच हजार वर्षाचा रोमहर्षक इतिहास लाभला आहे. भारत देशाचा विस्तीर्ण आणि रोमहर्षक इतिहास घडविण्यात विविध राज्यांबरोबरच महाराष्ट्र राज्यानेही महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. मध्ययुगीन काळात इस्लामी सत्तेच्या वर्चस्वापासून महाराष्ट्राला वाचविण्याचे काम शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याने केले. मराठ्यांचे कार्य हे तत्कालीन भारतीयांचे आशास्थान बनले. एखाद्या राज्याला किंवा देशाला केवळ विस्तीर्ण आणि रोमहर्षक इतिहास असून चालत नाही. तर हा इतिहास समाजासमोर मांडणाऱ्या थोर इतिहास संशोधक व अभ्यासकांचीही आवश्यकता असते. सुदैवाने महाराष्ट्राला थोर इतिहासकारांची परंपरा लाभली आहे. या इतिहासकारांमध्ये वा. सी. बेंद्रे यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी मराठ्यांच्या इतिहासासंदर्भात सखोल व विस्तृत लिखाण केलेले आहे. त्यांनी आपल्या लिखानातून मराठ्यांच्या इतिहासावर सर्वांगिण प्रकाश टाकला आहे.

मराठ्यांच्या इतिहासलेखनात खऱ्या साधनांचा आधार घेऊन मराठ्यांचा विशेषतः भोसले घराण्यातील राजांच्या कार्याचा खरा इतिहास त्यांनी समाजासमोर आणला. अशा इतिहासकाराच्या इतिहासलेखनाचा विस्तृत अभ्यास व्हावा या हेतूने "मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात वा. सी. बेंन्द्रे यांचे लिखाण - एक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी मान्यता मिळाली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. रामभाऊ आर. मुटकुळे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय प्रस्तुत शोध प्रबंधाचे कार्य पूर्णत्वास येऊ शकले नसते. म्हणून मी त्यांचा मनापासून ऋणी आहे.

माझ्या संशोधन कामी आवश्यक असणारे सर्व संदर्भग्रंथ व पुस्तके वेळोवेळी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई; भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई; देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद; विचार विकास मंदिर ग्रंथालय होळी, नांदेड यांचा आभारी आहे. तसेच वा. सी. बेंद्रे यांची महत्त्वाची कागदपत्रे व छायाचित्रे दिल्याबद्दल मी वा. सी. बेंद्रे यांची नात श्रीमती साधना बेंद्रे यांचा ऋणी आहे. तसेच डॉ. सौ. पुष्पा गायकवाड मॅडम, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद यांनीही मला वेळोवेळी अनमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचा मनापासून ऋणी आहे.

माझ्या मित्र परिवारामधील प्रा. अमित माळोदे, ग्रंथपाल, एन.एस.बी. महाविद्यालय, नांदेड; प्रा. राजू वाघमारे, ग्रंथपाल, ना.च.वि. महाविद्यालय, नांदेड; प्रा. प्रताप सुर्यवंशी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड; श्री. मारोती सुर्यवंशी, सुर्यवंशी कोचिंग क्लासेस, नांदेड; प्रा. अप्पाराव हिंगमिरे, सरस्वती अध्यापक महाविद्यालय, अंबेजोगाई; प्रा. शरद चव्हाण, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद; प्रा. प्रमोद इंगळे, प्रा. जेवे, प्रा. बबन राठोड, डॉ. प्रफुल्ल ठाकरे, डॉ. पुष्कर शास्त्री, डॉ. इंगोले, श्री दत्तात्र्यय तावरे, श्री किसन शिंदे, श्री आनंद जनार्धन, श्री पांडुरंग सोमटकर, श्री रवी धाबे, श्री सुनील कल्याणकर तसेच श्री सुरेश बन्शी पटेल, प्राचार्य, शास. माध्य. व उच्च माध्य. कन्या आश्रमशाळा, मांडवी; प्रा. प्रफुल्ल कापडणे, प्रा. मनीष वैद्य, प्रा. योगेश भावसार, प्रा. उमेश पाटील, श्री विश्वजीत आगळे, श्री हरीष साळुंखे, श्री देशमुख मामा व मामी, श्री संजय पाटील व बोधगिरे ताई व भावजी या सर्वांचे सहकार्य माझ्या या शोध कार्यात लाभल्यामुळे त्याचेंही मी ऋण व्यक्त करतो.

माझे वडील प्रा. कचरू साळूबा शिंदे व आई सौ. नर्मदाबाई कचरू शिंदे यांचे आशिर्वाद नेहमी माझ्या पाठीशी असल्यानेच मी शैक्षणिक क्षेत्रात आज इथपर्यंत प्रवास करू शकलो, या प्रसंगी त्यांचे कोटी-कोटी आभार मानतो. तसेच माझी पत्नी सौ. ज्योती शिंदे, मुलगी कु. कृतिका शिंदे, माझे भाऊ प्रा. रमेश शिंदे, श्री उमेश शिंदे, माझ्या बहिणी सौ. शुभांगी जाधव, सौ. रंजना गायकवाड, माझे भावजी श्री कृष्णा जाधव, श्री राम जाधव, श्री दिपक गायकवाड यांनी माझी संशोधनाची आवड लक्षात घेऊन मला वेळोवेळी मदत व सहकार्य केले. त्यांच्या प्रेम व जिव्हाळ्यामुळे मला माझ्या संशोधन कार्यात मानसिक बळ मिळाले. म्हणून मी त्यांचा सतत ऋणी राहिन.

माझे मित्र श्री जय राठोड, सॉफ्ट टेक अकॅडमी, वसमत यांनी निर्धारीत वेळेत सदर शोध प्रबंध सुबकरित्या टाईप करून दिल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. शेवटी या व्यतिरिक्त प्रस्तुत संशोधनासाठी ज्यांची ज्यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत झाली परंतु नामोल्लेख झाला नाही, त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार...!

धन्यवाद...!!!

ठिकाण - हिंगोली **श्री. ज्ञानेश्वर कचरू शिंदे**

दिनांक - __/__/२०१७ संशोधक

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले

प्रास्ताविक, भूमिका व संशोधन पद्धती

१.१ प्रास्ताविक

१.२ वा.सी. बेंद्रे यांचे चरित्रः

१. जन्म व बालपण

२. विविध नोकऱ्या व संशोधन कार्याला प्रारंभ

३. कौटुंबिक जीवन

४. मित्र परिवार

५. दृढनिश्चयी इतिहासकार

६. साहित्य निर्मितीच्या विपुलतेबरोबर वाङ्मयीन प्रकाराची विविधता

७. भारत इतिहास संशोधक मंडळातील कार्य

८. परदेश दौऱ्यातील वा.सी. बेंद्रे यांचे कार्य

९. महाराष्ट्रेतिहास परिषदेसंबंधी कार्ये

१०. वा.सी. बेंद्रे यांचा मृत्यु

१.३ वा.सी. बेंद्रेंच्या संदर्भात काही विचारवंताचे लेख व विचार

१. माधव गडकरी

२. लक्ष्मीदास बोरकर

क) दुर्मिळ छायाचित्र शोधून काढले

ख) रिसर्च स्कॉलरशिप

ग) पंडित नेहरुंशी परिचय

घ) बेंद्रे केवळ इतिहास संशोधक नाहीत तर चतुरस्त्र लेखक आहेत.

३. डॉ. वि. गो. खोबरेकर - "व्यासंगी इतिहाससंशोधक"
४. डॉ. चि. न. परचुरे - "एका परकीय व्यक्तीचे चित्र शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून..."
५. लक्ष्मणशास्त्री जोशी - "या संभाजीच्या चरित्राने एक प्रभावी व मंगल सत्य प्रकट केले आहे..."
६. रविंद्र बेंद्रे - "तुकारामांचे अप्रकाशित अभंग"
७. सदानंद मोरे - "शिवछत्रपतींच्या अस्सल चित्राची अतिशय महत्त्वाची उपलब्धी त्यांनी करून दिली"
८. डॉ. सौ. सुमित्रा कुलकर्णी
९. 'समाजसेवा' चे संपादक
१०. लोकसत्ता वृत्तपत्रातील श्री. वि. स. पांगे, प्राचार्य पी. टी. बोराळे, डॉ. विठ्ठलराव खोबरेकर, श्री माधवराव गडकरी यांची मते.
११. कायस्थ प्रबोधन मधील संपादकीय

१.४ संशोधनाचा दृष्टिकोन व संशोधन पद्धती

१.५ संशोधनाची गृहितके

१.६ संशोधनामागील उद्दिष्टे

१.७ प्रकरणांची ओळख

१.८ बेद्रेंची इतिहास संशोधनपद्धती

१.९ इतिहासाच्या संदर्भातून स्थळांची व काळांची झालेली गल्लत

१.१० मराठ्यांचे ऐतिहासिक कर्तृत्व

प्रकरण पहिले

प्रास्ताविक, भूमिका व संशोधन पद्धती

१.१ प्रास्ताविक :

जगाच्या पाठीवर आपल्या भारत देशाची ओळख ही संस्कृती प्रधान राष्ट्र अशी आहे. ज्या देशाला संस्कृती असते त्या देशाला इतिहास असतो आणि त्यामुळे आपल्या देशाला पाच हजार वर्षाचा रोमहर्षक इतिहास आहे. आपला विशाल देश हा खंडप्राय देश असून त्यामध्ये विभिन्न भाषा, जाती, धर्म, प्रांत इत्यादींचा समावेश होतो. भारताची ही विविधता आपल्या संस्कृतीची गुणवैशिष्ट्ये ठरलेली आहेत. या विस्तीर्ण व संस्कृतीप्रधान देशाच्या रोमहर्षक इतिहासात वेगवेगळ्या प्रांतानी फार मोठी कामगिरी बजावली आहे. किंबहुना या वेगवेगळ्या प्रांताच्या इतिहासाच्या जडणघडणीतूनच भारताचा इतिहास आकार घेत गेला असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

या विविध प्रांतामध्ये मराठी भाषिक महाराष्ट्राची संस्कृती व इतिहासाची परंपरासुद्धा बरीच प्राचीन आहे व या परंपरेने देशाच्या संस्कृती व इतिहासात मोलाची भर घातली आहे. प्राचीन काळात होऊन गेलेल्या सातवाहण, वाकाटक, राष्ट्रकूट आणि यादवांनी महाराष्ट्राचा जो इतिहास घडवीला त्याला देशाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

मध्यकाळात भारतावर इस्लामीयांचे आक्रमण झाले. ज्यांचे भारतावर व भारतातील विविध प्रांतावर चांगले व वाईट परिणाम झाले. महाराष्ट्रावर इस्लामी आक्रमण झाल्यावर महाराष्ट्रीयांना अनेक अडचणींना व त्रासाला सामोरे जावे लागले. मध्ययुगीन काळात इस्लामी आक्रमणाला बळी पडलेल्या संपूर्ण देशाची अस्मिता सुरक्षित ठेवण्यासाठी परकीय व इस्लामी सत्तेला प्रतिबंध घालण्यासाठी मराठ्यांनी जी प्रदीर्घ झुंज दिली तिला संपूर्ण देश कधीही विसरू शकणार नाही.

आधुनिक काळामध्ये संपूर्ण भारतात जी प्रबोधनाची लाट आली त्या प्रबोधनाच्या चळवळीतही महाराष्ट्रीयन विचारवंतानी, समाजसुधारकांनी आपले अनमोल असे योगदान दिले. ज्यामध्ये महात्मा ज्योतीबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, बाळ गंगाधर टिळक, गोपाळकृष्ण

गोखले, विनायक दामोधर सावरकर इत्यादींच्या कार्यांची छाप भारतातील जनजीवन व राजकारणावर पडल्याशिवाय राहिली नाही.

भारत देशाच्या संपूर्ण काळामध्ये मध्यकाळ हा देशाच्या दृष्टीने क्लेषदायक काळ समजला जातो. सततच्या इस्लामी आक्रमणामुळे देश हैराण झालेला होता. शांतता व सुव्यवस्था सुरक्षितता तर नव्हतीच पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे भारतीयांचा धर्म, संस्कृती व परंपरा नष्ट करून त्यांच्यावर सक्तीने इस्लाम धर्म लादण्याची मोहिमच सुरू केली. या मोहिमेस सुरुवातीला भरपूर विरोध झाला. संघर्षही झाले पण दुर्दैवाने भारतीयांचा राजकीय विरोध जास्त काळ टिकला नाही. इ.स. १६ व्या शतकात मोगल सत्तेच्या रुपाने परकीय इस्लामी सत्तेची पाळेमुळे भारतात खोलवर रुजण्यास प्रारंभ झाला. त्यामुळे भारतीयांचा धर्म आणि संस्कृती जास्तच धोक्यात आली.

इस्लामी सत्तेच्या ह्या धुडगूसाला रोखले गेले नाही तर १७ व्या शतकाच्या शेवटपर्यंत संपूर्ण देशच इस्लाममय होऊन भारतीय संस्कृतीचा मागमूसही शिल्लक राहणार नाही अशी चिन्हे दिसू लागली. सुदैवाने शिवाजी महाराजांच्या रुपाने या इस्लामी सत्तेला व त्यांच्या आक्रमणाला आव्हान देणारे एक तेजावलय महाराष्ट्रात उगमास आले. शिवाजी महाराजांच्या ध्येयधोरणाने व पराक्रमाने सबंध महाराष्ट्र पेटून उठला. महाराष्ट्रातील मराठ्यांच्या रुपाने नव्यानेच उगमास आलेल्या प्रचंड ताकदीने इस्लामी सत्ताधीशांना प्रखर विरोध करून हिंदवी स्वराज्याची मुहर्तमेढ रोवली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हे हिंदवी स्वराज्य तत्कालीन सर्व भारतीयांचे आशास्थान व नंतर प्रेरणास्थान बनले. भारतातील इस्लामी सत्ताधीश ज्यामध्ये आदिलशहा, कुतुबशहा व मोगल हादरून गेले आणि त्यांनी हिंदवी स्वराज्याचा नायनाट करण्याचा चंगच बांधला. पण मराठ्यांच्या ताकदीपुढे व ध्येयवादापुढे त्यांचे काहीच चालू शकले नाही. शिवाजी महाराजांच्या नंतर संभाजी, राजाराम व ताराबाई यांनी मोगलांशी प्रखर झुंज देऊन मोगलांचीच सत्ता खिळखिळी करून टाकली. इ.स. १७०७ साली मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगली सत्तेचा ऱ्हास गतीने सुरू झाला.

१८ व्या शतकात मराठ्यांनी जी झेप मारली तिला भारताच्या इतिहासात तोड नाही. तंजावरपासून ते अटकेपर्यंत आणि बंगालपासून ते गुजराथपर्यंत देशात सर्वत्र मराठ्यांचा मुक्त संचार सुरू होऊन इस्लामी आक्रमणाला बळी पडलेल्या भारतीयांची सुटका करण्याचे अत्यंत

मोलाचे कार्य मराठ्यांनी केले. मोगल बादशहालाच स्वतःच्या अंकीत करून घेतलेल्या मराठ्यांच्या हाती देशाच्या सत्तेची सुत्रे आली. स्वतःचा धर्म, संस्कृती व परंपरा यांच्या संरक्षणाची शाश्वती भारतीयांना लाभली. पुढे १९ व्या शतकात भारतात इंग्रजी राजवटीला सुरूवात होईपर्यंत मराठे हेच खऱ्या अर्थाने देशाचे रक्षक राहिले होते.

अशाप्रकारे मध्ययुगीन काळात संपूर्ण देशाला भयंकर संकटातून वाचवून भारतीय लोकांची संस्कृती, धर्म व परंपरा यांच्या रक्षणाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊन त्यासाठी स्वतःचे बलिदान देणाऱ्या मराठ्यांचे ऐतिहासिक कार्य भारताच्या इतिहासातील एक अविस्मरणीय प्रकरण बनले आहे. म्हणूनच मराठ्यांचा इतिहास भारतीय इतिहासाच्या आणि भारतीयांच्या दृष्टीने प्रेरणादाई व मोलाचा ठरला असल्यामुळे त्याचा अभ्यास आवश्यक ठरतो. मुळातच इतिहास लिखाणास भारतीयांना रूची नसल्यामुळे भारतीयांनी स्वतःचा समकालीन असा इतिहास लिहिलेला नाही. मराठ्यांच्या इतिहास लिखाणाची स्थिती सुद्धा अशीच आहे. मराठ्यांचाही समकालीन असा इतिहास लिहिलेला नाही. इतिहास घडविण्यात मग्न राहिलेल्या मराठ्यांना स्वतःचा समकालीन इतिहास लिहिण्यास वेळच मिळाला नाही.

भारताचा इतिहास आधुनिक काळात भारतात आलेल्या युरोपियनांनी लिहिण्यास सुरुवात केली. स्प्रिंगल, वेरिंग, ग्रॅट डफ, रॉलिन्सन, एल्फिस्टन, इलियट, डाऊसन इत्यादी इतिहासकारांनी आपल्या लिखाणातून मराठ्यांचा इतिहास पुढे आणण्याचा प्रयत्न केला. परंतु या युरोपियन इतिहासकारांच्या साम्राज्यवादी दृष्टीकोनातून बाहेर पडलेला मराठ्यांचा इतिहास पूर्वग्रहदूषित स्वरुपाचा ठरतो.

आधुनिक काळात पाश्चात्य शिक्षण घेऊन भारतात एक नविन भारतीय नाव शिक्षितांचा उदय झाला. ज्यांनी राष्ट्रवादी भावनेने प्रेरित होऊन भारताचा व महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील काही विद्वान मंडळी स्वप्रयत्नातून मराठ्यांच्या इतिहास संशोधनाचे कार्य करण्याकडे वळली, ज्यामध्ये साने, कीर्तने, पारसनीस, वासुदेवशास्त्री खरे, राजवाडे, टिळक, रानडे इत्यादी मराठी विद्वानांची श्रृंखलाच निर्माण झाली. उपरोक्त विद्वानांनी नवनवीन साधने एकत्र करुन स्थानिकांच्या दृष्टिकोनातून मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास आरंभ केला. काम अफाट झाले पण त्यांच्या या कार्याला (लिखाणाला) राष्ट्रवादाची झालर लागल्याशिवाय राहिली नाही. २० व्या शतकात वास्तववादी दृष्टिकोनातून इतिहास लिहिण्याचा प्रघात सुरू

झाला. असंख्य नवे इतिहास संशोधक मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले. परंतु नाव घेण्यासारखे संशोधन व लिखान क्वचितांकडूनच घडले. जदुनाथ सरकार, एस. पी. सेन, गो. स. सरदेसाई, ग. ह. खरे, दत्तो वामन पोतदार, शेजवलकर, न. र. फाटक, वा. सी. बेंद्रे इत्यादी इतिहास संशोधकांनी मराठ्यांचा इतिहास मोठ्या प्रमाणात प्रकाशात आणला.

उपरोक्त सर्व इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहास संशोधनासाठी मराठी, इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच, डच व पोर्तुगीज भाषांतील उपलब्ध साधनांचा वापर केलेला आहे. समकालीन फारसी, कानडी साधनांकडे त्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. फारसी भाषेचे अज्ञान किंवा फारसी भाषेतील साधने शत्रू पक्षातील असल्यामुळे त्यांच्याबद्दलची अविश्वसनीयतेची भावना यामुळे फारसी साधने दुर्लक्षित राहिली असावीत. फारसी साधने शत्रू पक्षातील असली तरी त्यांचा योग्य व सावध वापर केल्यास मराठ्यांच्या इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश टकता येतो याची प्रचीती जदुनाथ सरकार आणि ग. ह. खरे यांनी आणून दिली आहे. पण त्यासाठी फारसी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक ठरते आणि फारसी भाषा शिकण्याची विशेष उत्सुकता महाराष्ट्रात अलिकडे कोणात दिसून येत नाही. मराठ्यांच्या इतिहासावर भरपूर प्रकाश टाकू शकणारे मुबलक फारसी साहित्य उपलब्ध असूनही फारसी भाषेचे अज्ञान मराठ्यांच्या इतिहास संशोधनातील मोठा अडसर ठरला. हा अडसर दूर करण्याचे अत्यंत मोलाचे कार्य इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी केले आहे. या साधनांचे संकलन, भाषांतर करून आज संशोधकांपुढे आणण्यात बेंद्रेचे फार मोलाचे योगदान आहे.

इतिहास संशोधन आणि लेखण या क्षेत्रांमध्ये ज्यांनी अनन्य साधारण काम केले अशा दिग्गजांच्या यादितील एक क्रियाशील व्यक्ती म्हणजे वासुदेव सीताराम बेंद्रे होत. यांच्या नावांचा विशेष गवगवा झाला नाही, याची अनेक कारणे संभवत असली तरीही त्यांची स्वतःची प्रसिद्धी पराङमुखता आणि वितंड वाद टाळण्याची वृत्ती या गोष्टीही त्याला कारणीभूत होत्या यात संशय नाही. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्यांनी प्रचंड संशोधन केले आणि विपूल लिखाणही, पन्नासावर ग्रंथांची निर्मिती करण्याचे विलक्षण कार्य त्यांनी केले. संत वाङ्मय, शिवशाही, संभाजी महाराज यांसारख्या विषयापासून शीघ्र लिपी सारखे विषयही त्यांनी हाताळले. अव्वल इंग्रजी अंमल, भारतीय राष्ट्रीय आंदोलन, स्वातंत्र्य प्राप्ती, स्वातंत्र्योत्तर समाजवादी भारत, अशा भारतीय इतिहासाच्या विविध टप्प्यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. या प्रत्येक अनुभवाच्या संदर्भात

त्यांची मनोभूमिका तयार झाली होती. या मनोभूमिकेचे पडसाद त्यांच्या इतिहासलेखनात उमटलेले स्पष्ट दिसतात. महाराष्ट्रातील इतिहास लेखनाची वाटचाल ही नेहमीच द्वंद्वात्मकतेतून विकसित होत गेलेली आहे. ज्याला आज आपण इतिहास म्हणतो ह्या प्रकारच्या इतिहासाचे लेखन इंग्रजीपूर्व काळात नव्हतेच कदाचित आपली इतिहास विषयक कल्पना आजच्या कल्पनेपेक्षा वेगळी होती, हे त्याचे कारण असेल. काहीही असले तरी इंग्रजी अमलापूर्वी महाराष्ट्राच्या इतिहासाचे कालानुक्रमाने संघटन करण्याचे काम कोणी पंडिताने हाती घेतल्याचे माहित नाही.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात ग्रँट डफने केलेला तो मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न. त्यानंतर डफच्या अनुषंगाने मराठ्यांच्या इतिहासाचे लेखन सुरू झाले. डफच्या चुका मराठ्यांच्या इतिहासाचे त्याने लावलेले अन्वयार्थ, त्याने आधारभूत मानलेले कागदपत्र इत्यादी संदर्भात साधक-बाधक चर्चा एका वैचारिक आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. इतिहास विषयीएक प्रचंड आस्था महाराष्ट्रातील विद्वानांमध्ये नव्हे तर सर्वसामान्य व्यक्तीतही निर्माण झाली. तेव्हापासून 'इतिहास' हा मराठी मानसिकतेचा एक अविभाज्य घटक झाला. न्या. तेलंग आणि न्या. रानडे यांनी या मानसिकतेला एक व्यापक असे सांस्कृतिक परिणाम प्राप्त करून दिले. त्याचबरोबर वासुदेवशास्त्री खरे, वि. का. राजवाडे, प्रभूतींनी मराठ्यांच्या इतिहासाची अस्सल साधने गोळा करण्यास सुरुवात केली; परंतु या कागदपत्रांचा उपयोग कसा लावावा याविषयी सर्वसामान्य वाचक आणि इतिहासाचे अभ्यासक अनभिज्ञ होते. त्यामुळे त्यांच्या मराठी इतिहासाला भावनेपेक्षा वेगळे असे शास्त्रीय परिमाण आणि चिकित्सक बैठक नव्हती, ती बैठक निर्माण करण्याचे महत्त्वाचे आणि मूलगामी कार्य वासुदेव सिताराम बेंद्रे यांनी केले.[१]

१.२ वा. सी. बेंद्रे यांचे चरित्र - कार्ये

(१) जन्म व बालपण :

"The man decided not to live but to know!"[२] सुप्रसिद्ध इतिहासकार श्री. वा. सी. बेंद्रे यांचा जन्म दि. १३ फेब्रुवारी १८९४ रोजी रायगड जिल्ह्यातील पेण येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पेण येथे, इंग्रजी चौथी ते मॅट्रीक पर्यंत मुंबई येथील विल्सन हायस्कूल मध्ये झाले. त्या काळी परीक्षेसाठी सोळा वर्षे वयाची अट होती. त्यामुळे व घरच्या परिस्थितीमुळे

चौदाव्या वर्षीच त्यांना जी.आय.पी. ऑडिटमध्ये बिनपगारी उमेदवारी पत्करावी लागली. तेथे ३ महिन्यात ते टंकलेखन शिकले.

(२) विविध नोकऱ्या व संशोधनकार्याला प्रारंभ :

विविध नोकऱ्या : घरी लघुलेखन पद्धतीचा अभ्यास करून अलेन ब्रदर्स मध्ये नोकरीला लागले. काही महिने त्यांनी पोर्ट ट्रस्ट मध्येही काम केले. तेथे आलेल्या आजरीपणात ते हवा पालटासाठी साताऱ्याला गेले असता तेथील कलेक्टर ब्रानडन ह्यांनी त्यांना आपल्याकडे नोकरीस ठेवले. मध्यतंरी लघुलेखनाच्या प्रावीण्याबद्दल त्यांना सुवर्णपदक मिळाले होते. त्यावरून त्यावेळेचे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन "मि. जे. कॉव्हरटन ह्यांनी त्यांस आपले स्टेनोग्राफर म्हणून घेतले. तेथे ते सन १९५० पर्यंत होते. आपल्या कार्यक्षमतेने व निर्भीड स्वभावामुळे ते दुसऱ्या वर्गाच्या गॅझीटेड ऑफिसरच्या हुद्यापर्यंत वाढले. सन १९५० मध्ये श्री. वा. गं. खेर यांनी त्यांना पेशवे दप्तराकडे इतिहासाभ्यासूंना मार्गदर्शन व संशोधन कार्यासाठी नेमले; परंतु प्रकृतीच्या अस्वस्थामुळे ते सन १९५१ मध्ये निवृत्त झाले. नंतर सन १९५२ मध्ये मद्रास सरकारने श्री. बेंद्रे यांची तंजावर येथील दप्तरखान्याची तपासणी करून अहवाल करण्यासाठी नेमणूक केली. श्री. कॉव्हरटन यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने ते इतिहासाच्या अभ्यासाकडे वळले.

संशोधनाला प्रारंभ : सन १९१८ मध्ये ते भारत इतिहास संशोधक मंडळात काम करू लागले. तेथे त्यांस कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन हे फार मोठे सहाय्यक मिळाले.[३] सन १९२८ मध्ये शिवशाहीच्या इतिहासाच्या प्रास्ताविक खंड "साधन चिकित्सा" हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. शिवशाहीच्या इतिहासाचा हा प्रास्ताविक खंड असून इतिहास संशोधनांच्या साधनांची मार्मिक चिकित्सा त्यात करण्यात आली आहे. ह्या ग्रंथाद्वारे संशोधन इतिहास क्षेत्रात काम करताना जो काही स्वानुभव त्यांनी घेतला, व्यासंग करून जी माहिती मिळविली ती महाराष्ट्र इतिहास क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या नूतन संशोधकांना या ग्रंथाद्वारे सादर करून बेंद्रे यांनी १७ व्या शतकाच्या इतिहास संशोधनाची शास्त्रीय पार्श्वभूमी तयार केली, हे त्यांचे कार्य लोकोत्तरच होय.

बेंद्रे यांचा ऐतिहासिक कागदपत्रांचा गाढा अभ्यास त्या वेळच्या सरकारच्या लक्षात येऊन सरकारने त्यांना १९४८ मध्ये पेशवे दप्तरात संशोधन अधिकारी नेमले. पेशवे दप्तरात सुमारे चार कोटी मोडी कागदांचे कॅटलोगिंग करावयास हवे हे त्यांच्या ध्यानात येऊन ह्या सर्व कागदांची

विषयवारीने विभागणी करून त्याचा वन लाईन कॅटलॉग कसा तयार करावा त्याची विस्तृत माहिती इंग्रजीत लिहून काढली. सरकारने हे पुस्तक 'रिपोर्ट ऑन ऑलिनेशन ऑफीस रेकॉर्ड्स ॲण्ड पेशवे दप्तर' शीर्षकाखाली १९५० मध्ये प्रसिद्ध केले. तेव्हापासून मराठी इतिहासावर त्यांची एकंदर ५० वर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या "संभाजी" व "मालोजी आणि शहाजी" यांच्या चरित्रांना राज्यसरकार कडून पहिल्या प्रतीचा पुरस्कार मिळालेला असून पुणे, मुंबई, मराठवाडा, शिवाजी (कोल्हापूर) प्रभुर्ती विद्यापीठे, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रेन्स्लेशन सोसायटी यांचा आश्रयही लाभलेला आहे.[४]

मुंबईचे माजी गव्हर्नर लॉर्ड ब्रेबॉन यांच्या इच्छेवरून श्री. व. ग. खेर यांनी खास शिष्यवृत्ती देऊन वा. सी. बेंद्रे यांना सरकारी "हिस्टोरिकल रिसर्च स्कॉलर" म्हणून इतिहास संशोधनासाठी युरोपात व इंग्लंडला पाठविले. तेथे दोन वर्षे राहून श्री. बेंद्रे यांनी खूप उपयुक्त साधन-संग्रह जमवून व फोटोकॉपी करून आणला होता. इंडियन हिस्टोरिकल रेकॉर्ड्स कमिशन, ऑल इंडिया हिस्ट्री काँग्रेस यांच्या कामातही श्री. वा. सी. बेंद्रे यांनी महत्त्वाचे सहकार्य दिले आहे. सन १९६३ मध्ये मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे डायरेक्टर म्हणून ते मुंबईत आले. बरीच वर्षे त्यांनी या संस्थेची सूत्रे सांभाळली. "महाराष्ट्रेतिहास परिषद" या संस्थेचेही १९६५ पासून ते प्रमुख कार्यवाह होते. त्यांना संत वाङ्मयाचाही गाढा अभ्यास होता. संत तुकाराम महाराजांबद्दलही ह्यांनी केलेले संशोधन फार मोलाचे आहे. देहूदर्शन (१९५१), तुकाराम महाराज (१९५१), संत तुकाराम महाराज ह्यांचे संत सांगाती (१९५८), तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा (१९६०), आणि संत तुकाराम (१९६३) हे त्यांचे ग्रंथ संत तुकारामांच्या जीवनाबद्दल असलेल्या अनेक कल्पनांना ह्या ग्रंथामुळे धक्का बसला व तुकारामविषयक अभ्यासाला ह्या ग्रंथांनी एका शास्त्रशुद्ध बैठक प्रथमच दिली. शिवचरित्र पूवार्ध व उत्तरार्ध एकूण १२५० पृष्ठांचा हा ग्रंथ यशवंतरावजींच्या हस्ते इ. स. १९७२ मध्ये प्रकाशित झाला. शिवछत्रपतींच्या अस्सल चित्राची अतिशय महत्त्वाची उपलब्धी त्यांनी महाराष्ट्राला करून दिली. तसेच संभाजी महाराजांचे चरित्र प्रकाशित करून श्री. वा. सी. बेंद्रे यांनी महत्तम कामगिरी केली आहे. १९१८ साली ह्या ग्रंथाची सुरूवात त्यांनी केली आणि ग्रंथ पूर्ण व्हायला जवळ जवळ ४० वर्षे लागली. इ. स. १९६० मध्ये "संभाजी"चे खरे चरित्र आपणा सर्वांसमोर प्रसिद्ध झाले. ह्या ग्रंथाने समाजात विलक्षण खळबळ उडवून दिली. त्यातून संभाजी महाराजांची व्यक्तिरेखाच

बदलली. त्यामुळे संभाजी महाराजांची पराक्रमी, संकटाला धीरोदात्तपणे तोंड देणारी, धोरणी, मुत्सद्दी अशी तेजस्वी प्रतिमा उंचावली गेली. हे चरित्र खऱ्या अर्थाने गाजले. अभ्यासकांना पुर्नभ्यास करण्यास त्याने प्रवृत्त केले. ह्या ग्रंथास सुद्धा साहित्य अकादमीने पुरस्कृत केले आहे. श्री. बेंद्रे यांनी ऐतिहासिक संशोधना अंती संभाजी महाराजांची समाधी वदू-बद्रुक येथे असल्याचे सत्य शोधून काढले.[५]

(३) कौटुंबिक जीवन :

बेंद्रेच्या मुलाने म्हणजे रविंद्र बेंद्रे यांनी लिहून ठेवले आहे की, वा. सी. बेंद्रे कुटुंबवत्सल होते. मोठ्या मित्रपरिवाराप्रमाणेच त्यांचा मोठा परिवार होता. ७ मुली आणि ४ मुले असा मोठा घर परिवार होता. त्यांनी घरातही सर्वांना उत्तम शिक्षण दिले. त्यांनी त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या अतिशय कुशलतेने पार पाडल्या. त्यांना त्यांची मुले दादा म्हणत असत. रविंद्र बेंद्रे पुढे लिहितात की, दादांना इतिहासाचे भीष्माचार्य, इतिहासाच्या उद्यानातील वटवृक्षही म्हटल्या गेले. तसेच ते आम्हा ब्रेंद्रे कुटुंबाचे वटवृक्षही होते. त्यांची सावली आम्हा कुटुंबियांना सतत मिळत होती.[६]

(४) मित्र परिवार :

रविंद्र ब्रेंद्रे लिहितात, "वडिलांचा मित्र परिवारही मोठा होता. साहित्य सम्राट न. ची. केळकर, कॉम्रेड डांगे, प्रबोधनकार ठाकरे, इतिहासकार द. वा. पोतदार, कर्मवीर भाऊराव पाटील ह्या सर्वांचा त्याच्यात समावेश होता. माजी केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांना इतिहासाची अतिशय आवड होती. त्यामुळे दादा म्हणजे माझे वडिलांच्या ऐतिहासिक कार्यासाठी आर्थिक बळ देण्याच्या बाबतीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. ते फक्त इतिहासकारच नव्हते तर एक चतुरस्त्र लेखक होते हे त्यांच्या ग्रंथांच्या यादीवरूनच कळून येते. त्यांनी १९२० मध्ये हुंडा विरोधी मोहीम काढली होती. हिंदू समाज पद्धतीने लग्न, विद्यार्थी संघटना, बद्रहूड स्काऊट संघटना अशा विविध संघटना काढून त्यांनी सामाजिक कार्यातही सक्रिय भाग घेतला होता."[७]

(५) दृढनिश्चयी इतिहासकार :

वा. सी. ब्रेंद्रे हे फार दृढनिश्चयी होते. त्यांनी एखादे काम हातात घेतल्यानंतर ते पूर्ण होईपर्यंत करीत रहात. असाच एक अनुभव डॉ. वि. गो. खोबरेकर यांना आला होता तो असा, "इ. स. १९६५ मध्ये बेंद्रे यांना मालोजीरावराजे यांची इंदापूर येथील घुमटी पाहून त्या संबंधीची

ऐतिहासिक माहिती तहसील कचेरीच्या रेकॉर्डस् वरून मिळवायची होती. त्याकरिता माझी सोबत त्यांना हवी होती. मी बरोबर जाण्याचे कबुल केले. ऑगस्ट मध्ये भर पावसात इंदापूरला जायचा बेत ठरविला. दोघेही पुण्यास आलो. सकाळी एस.टी. बस स्टँडवर एकत्र भेटून ५.३० वाजता सुटणाऱ्या एस.टी. ने इंदापूरला जाण्याचे ठरले होते. सकाळी ४.३० वाजता जो पाऊस धो-धो कोसळत होता, रस्त्यावर पाणी झाले होते. प्रा. तात्या खरे यांना मी म्हटले की, 'अशा मुसळधार पावसात बेंद्रे काही येणार नाहीत ते आपला बेत रद्द करतील.' त्यावर तात्या म्हणाले, 'बेंद्रे यांनी एकदा ठरवले आहे ना, मग ते एस.टी. स्टँडवर कोणत्याही परिस्थितीत येणारच, यात शंका नको.' मी रिक्षा घेऊन पुणे स्टेशनजवळील एस.टी. स्टँडवर गेलो तर श्री. बेंद्रे माझ्या अगोदर पाच मिनिटे येऊन तेथे वाट बघत होते."[८] या उदाहरणावरून आपल्याला वा. सी. बेंद्रे किती दृढनिश्चयी होते हे समजते.

(६) साहित्य निर्मितीच्या विपुलतेबरोबर वाङ्‌मयीन प्रकारची विविधता :

वा. सी. ब्रेंद्रेंचे लिखाण सर्व प्रकारच्या साहित्याला स्पर्श करणारे होते. ही वासुदेवराव बेंद्रे यांच्या लेखनाची लक्षणीय गोष्ट आहे. (१) संशोधन क्षेत्र आणि साधन-पद्धती, (२) शिघ्र ध्वनीशोधन पद्धती, (३) भक्तितत्त्व, भागवत व संत सांगती आणि (४) इतिहास व संशोधन-साधने या चार प्रमुख प्रकारात त्यांच्या लेखणीचे मुक्त संचार केला आहे. त्यांच्या इतिहास लेखनाचे मुख्य विषय (अ) भोसले घराण्यातील राजपुरुषांची चरित्रे, (आ) आदिलशाही व कुतुबशाही, (इ) पोर्तुगीजांचे राजकारण, (ई) आंग्रे सरदार यांचे आरमार, (उ) केशव पंडितकृत दंडनीती प्रकरण, (ऊ) गडकोट-दुर्ग, (ए) मुस्लीम शिलालेख, (ऐ) पेशवे दप्तरातील इतिहासाची साधने, (ओ) भारतीय इतिहास आणि संस्कृती ह्या त्रैमासिकाच्या १७ पुस्तकांचे संपादन या छोट्या लेखात हे सर्व विविध विपुल व गुणसंपन्न साहित्यासेवेची सभ्यक समालोचन करणे अशक्यप्राय आणि अन्यायकारकही आहे. 'नामूलम लिख्यते किंचीतम' असा बेंद्रे यांचा बाणा आहे. पुरावे व आधार दिल्याशिवाय ते एकही विधान करत नाहीत. खरे तर वा. सी. बेंद्रे एक ग्रंथकाराभ्यास (ऑर्थर स्टडी) म्हणून पीएच.डी. ह्या विद्यापीठीय पदवीसाठी अभ्यास करावा, अशा तोला मोलाचा हा ग्रंथकार आहे. डॉ.हे. वि. इनामदार वा. सी. बेंद्रे यांच्या कार्याचा उल्लेख "This man decided not to live but to know" असा करतात.[९]

(७) भारत इतिहास संशोधन मंडळातील कार्य

इ. स. १९१८ मध्ये ते पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कार्या लक्ष घालू लागले होते. सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्याबरोबर त्यांनी प्रदर्शनी भरविलेल्याची माहिती मिळते. मंडळाचे एक सदस्य पांडुरंग नरसिंह पटवर्धन हे त्यांचे सहकारी होते. याकाळात त्यांचा अनेक संशोधक अभ्यासक यांच्याशी संबंध आला. इतिहास विषयक लहान मोठ्या विषयाकडे त्यांचे लक्ष वेधू लागले. मंडळाच्या पाक्षिक सभातून ते संशोधनात्मक विषय-निबंध मांडू लागले. यानंतर भारत इतिहास संशोधन मंडळाच्या पुढाकाराने इ. स. १९३५ मध्ये पुणे येथे 'Modern Indian History Congress' चे पहिले अधिवेशन भरले होते. या प्रसंगी मुंबई राज्याचे गव्हर्नर लॉर्ड बेबोर्न यांची विशेष उपस्थिती होती. श्री. बेंद्रे यांचा इतिहास विषयक अभ्यास, संशोधन कायातील त्यांची खटपट आणि त्यांची वैशिष्ट्ये यांची लॉर्ड ब्रेबोर्न यांनी माहिती करून घेतली आणि त्यावेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्याकडे इतिहास शास्त्राच्या अभ्यासासाठी बेंद्रे यांना युरोपात पाठवण्याची शिफारस केली.

पेशवे दप्तरखान्याचे अधिकारी असताना बेंद्रे यांनी ऐतिहासिक कागदपत्रांच्या दृष्टीने अत्यंत मोलाची कामगिरी केली. पेशवे दप्तरात सुमारे ४ कोटी ऐतिहासिक कागदपत्रांचे विस्कळीत संकलन होते. ह्या कागदपत्रांचे केटलॉगिंग करणे, विषयवार विभागणी करणे हे अभ्यासकाच्या उपयुक्तेचे कार्य श्री बेंद्रे यांनीच मार्गी लावले. या नोंदणीमध्ये शास्त्र शुद्धता आणि बिनचुकपणा येणे अत्यंत महत्त्वाचे होते. अनेक प्रकारच्या कागदपत्रांचा अभ्यास करून श्री. बेंद्रे यांनी 'वनलाईन' कॅटलोग कसा करावा यांच्या विस्तृत माहितीचे पुस्तक तयार केले. 'Alienation Office Records and Poona Dafter' हेच ते पुस्तक होय. इ. स. १९५० साली शासनाने प्रसिद्ध केलेले हे पुस्तक आजही वस्तुसंग्राहलय आणि अभ्यासक यांना उपयुक्त ठरत आहे. त्यांच्या "Report on the Peshwa dafter or Guide to the records" हा अहवालही उपयुक्त ठरला आहे.

दप्तरखान्याच्या दृष्टीने त्यांची आणखी एक महत्त्वाची कामगिरी येथेच नोंदवली पाहिजे. राजस्थानमधील बिकानेरच्या दप्तरखान्याप्रमाणे दक्षिणेकडे तंजावरच्या दप्तरखान्याचे विशेष महत्त्व आहे. त्याची व्यवस्था लावणे महत्त्वाचे होते. मद्रास सरकारने १९५२ मध्ये तंजावरचा दप्तरखाना तपासण्याची आणि आवश्यक ती व्यवस्था लावून देण्याची विशेष कामगिरी श्री. बेंद्रे

यांच्यावर सोपविली होती. आश्चर्य म्हणजे त्यांनी दिलेल्या वेळेपेक्षा कमी वेळेत हे काम पूर्ण करून दिले. पेशवे दप्तर किंवा तंजावरचे दप्तर येथील व्यवस्था लावणे हे केवळ तांत्रिक काम नव्हते. या कार्यामुळे, विशेषतः मराठ्यांच्या इतिहास संशोधनाकडे त्यांचे लक्ष अधिकच प्रमाणात वेधले गेले.

(८) परदेश दौऱ्यातील वा. सी. बेंद्रे यांचे कार्य

वा. सी. बेंद्रे यांना रिसर्च स्कॉलरशिप मिळाल्यावर बेंद्रे यांचे इंग्लंडला जायचे निश्चित झाले. ही शिष्यवृत्ती सुमारे दोन वर्षांची होती. तसे पाहिले तर हा कालावधी अल्पसाच होता हे ध्यानात घेऊन इतरत्र कोठेही वेळ वाया न जाऊ देता त्यांनी सर्व लक्ष साधनांच्या अभ्यासात आणि संकल्पनात खर्च केले. टंक लेखनासारख्या अनुभवाचा त्यांना याप्रसंगी खुप फायदा झाला. दोन वर्षात मराठ्यांच्या विशेतः संभाजी महाराजांच्या इतिहास विषयक साधनांचे संशोधन व त्याकरिता इंडिया हाऊस व ब्रिटीश म्युझियम मधील ऐतिहासिक साधनांची सुमारे २५ खंड होतील एवढी सामग्री परत आणली. इंग्लंडमधील वास्तव्यामुळे श्री. बेंद्रे यांचे संशोधन-संकलन क्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तारले. त्यामुळे त्यांच्या इतिहास विषयक संशोधन कार्यातील ही शिष्यवृत्ती आणि तेथील वास्तव्य हा महाराष्ट्रातील इतिहास संशोधनाचा महत्त्वाचा टप्पाच मानावा लागतो. लंडन मधील मराठ्यांच्या इतिहासाची साधने तपासण्याची आणि संकलित करण्याची श्री. बेंद्रे यांना संधी मिळाली होती. अशी साधने तपासतांना त्यांना मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने किंबहुना महाराष्ट्राच्या दृष्टीने एक बहुमोल ठेवा प्राप्त झाला. तोपर्यंत इब्राहीम खान नावाच्या एका परकीय व्यक्तीचे चित्र "शिवाजी महाराजांचे" चित्र म्हणून महाराष्ट्राच्या इतिहास विषयक पुस्तकातून छापलेले होते. हे चित्र मनुची ह्या चित्रकाराच्या संबंधात होते. या वरून त्याच आकृतीचे चेहरे रंगवून मुसलमान पेहराव चढवलेली तथाकथित शिवाजी महाराजांची बरीच चित्रे प्रसारात आली होती. संदर्भहीन असे महाराजांचे चित्र समाजात पूजिले जात होते. असे अनमोल कार्य बेंद्रेंनी इंग्लंड दौऱ्यात केले.

(९) महाराष्ट्रेतिहास परिषदेसंबंधी कार्ये :

बेंद्रे यांचा कुशल संघटक हा गुण त्यांनी महाराष्ट्रेतिहास परिषद इतिहास संशोधन मंडळातर्फे इ. स. १९३५ मध्ये सुरू केल्यावर दिसून आला. महाराष्ट्राच्या शास्त्रशुद्ध इतिहास संशोधनास व रचनेस अखिल महाराष्ट्रभर चालना मिळावी, साधन संग्रहाची चर्चा चिकित्सा

होऊन त्याचे मूल्यमापन व्हावे व त्याचा उपयोग महाराष्ट्राच्या इतिहास रचनेच्या कार्यास व्हावा या हेतूने इतिहास संशोधन मंडळातर्फे महाराष्ट्रेतिहास परिषद भरविली. ह्या त्यांच्या आव्हानास चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील विद्यापीठे इतिहास परिषद अधिवेशने बोलावण्यास पुढे सरसावली. इ. स. १९६६ पासून १९६८ अखेरपर्यंत त्यांनी महाराष्ट्रेतिहासिक परिषदेची तीन अधिवेशने भरवली.

मंडळातील आपल्या पाच वर्षाच्या कारकिर्दीत १४ ग्रंथ व भारतीय इतिहास आणि संस्कृती ह्या त्रैमासिकाचे १०० पृष्ठांचे १९ अंक प्रसिद्ध केले. वरील ग्रंथात त्यांचे मुख्य ग्रंथ 'गटकोटदुर्ग व त्याची वास्तू', 'राजा जयसिंग आणि शिवाजी', 'महाराष्ट्रेतिहासाची संशोधन क्षेत्र व साधन संपत्ती', 'पोर्तुगिजांच्या महाराष्ट्रातील हालचाली', 'विजापुरची आदिलशाही' हे होत. त्याशिवाय प्राध्यापक वर्गासाठी इतिहास सांशोधन व लेखन शास्त्रावर तीन अभ्यासवर्ग घेतले. त्याचप्रमाणे मराठवाड्यात व नागपूर विद्यापीठात दोन व्याख्यानमाला गुंफल्या. या व्यतिरिक्त त्यांनी आपला 'मालोजीराजे व शहाजीराजे' हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. इतिहास संशोधनासाठी अनेक नामवंताकडून ग्रंथ देणगी मिळवली. प्रबोधनकार ठाकरे ह्यांनी बेंद्रे यांच्या सांगण्यावरून आपल्या जवळील ऐतिहासिक ग्रंथ मंडळास दिले.

(१०) वा. सी. बेंद्रे यांचा मृत्यू :

श्री. वा. सी. बेंद्रे यांचे जीवनकार्ये पूर्णतः इतिहास संशोधन, वाङ्मयीन लिखाणाला अर्पण होते. संपूर्ण जीवनभर त्यांनी कोणत्या ना कोणत्या विषयावर, कोणाच्या आग्रहाने, स्वतःच्या प्रेरणेने, गरजेने, आव्हानाने, ज्ञान प्राप्तीच्या लालसेने लिखानकार्य व संशोधन चालू ठेवले. जेव्हा त्यांचा मृत्यू झाला तेव्हा देखील ते तुकारामांचे अलिखित अभंगासंदर्भात लिखाण करीत होते. अशा या विद्वानाचा वयाच्या ९१ व्या वर्षी वार्धक्यामुळे चेंबूर (मुंबई) येथील त्यांच्या रहात्या घरी १६ जुलै १९८६ रोजी दुःखद निधन झाले. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या परंपरेतील म. म. डॉ. द. वा. पोतदार, डॉ. ग. ह. खरे, श्री दतूपंत आपटे अशा इतिहास तज्ञांच्या साखळीतील एक महत्त्वाचा दुवा त्यांच्या निधनाने निखळला हेच खरे. अखेरचे काही दिवस ते आजारीच होते.

१.३ वा. सी. बेंद्रेंच्या संदर्भात काही विचारवंताचे लेख व विचार

(१) माधव गडकरी :

माधव गडकरी यांनी १९८६ मध्ये वा. सी. बेंद्रेंवर श्रद्धांजलीपर एक लेख लिहिला होता. त्यातील काही भाग एकता या मासिकात मे २००० मध्ये छापून आला. ज्यामध्ये चव्हाणामुळे मुद्याअंतर्गत ते लिहितात - १९३८ मध्ये मंजूर झालेली स्कॉलरशिप पुरेशी नव्हती म्हणून देणग्या गोळा करण्यात आल्या. श्रीमंत इचलकरंजीकर यांच्याकडून १२०० रुपये, अमळनेरचे श्रीमंत प्रतापशेठ यांच्याकडून १००० रुपये व श्रीमंत बिवलकरांकडून १००० रुपये आणि त्याशिवाय काही व्यक्ती व संस्थांनी मदत केली, तेव्हा बेंद्रे परदेशी गेले. दोन वर्षे त्यांनी तेथे संशोधन केले आणि त्यामधून संभाजी चरित्र लिहून पुरे केले. ६००-६५० पानांचा ग्रंथ तयार झाला; परंतु प्रकाशनाचा योग काही येईना. १९१८ पासून सुरू झालेल्या कामाची पूर्तता १९५८ पर्यंत झालेली नव्हती.

'तुकाराम' चरित्राच्या कामासाठी बेंद्रे त्यावेळेचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाणांकडे गेले. बेंद्रे तुकारामावर बोलत होते व चव्हाण संभाजी-चरित्राबद्दल सारखे विचारीत होते. छपाई खर्चासाठी संभाजी राजाचे चरित्र अडले आहे असे श्री चव्हाणांच्या लक्षात येताच त्यांनी सात हजार रुपये अनुदान दिले आणि १९६० मध्ये ते प्रसिद्ध झाले. संभाजी चरित्राची महनीय कामगिरी बेंद्रे यांनी केली, असे त्यांच्या निधन वार्तेत सर्वांनी प्रसिद्ध केले; परंतु या चरित्राचा प्रदीर्घ प्रवास व कै. यशवंतरावाचा त्यामधील वाटा याचेही स्मरण गडकरींनी करून दिले होते. त्याचबरोबर 'मालोजी राजे व शहाजी महाराज', 'शिवचरित्र' यासारख्या ग्रंथांच्या प्रकाशनात कै. यशवंतराव चव्हाणांनी मदत झालेली दिसते.[१०] यावरून आपल्याला समजते की वा. सी. बेंद्रेंच्या कार्याची ओळख व किंमत यशवंतराव चव्हाणांनी समजली होती.

(२) लक्ष्मीदास बोरकर :

लक्ष्मीदास बोरकरांनी श्री. वा. सी. बेंद्रे यांची भेट घेतली होती व ते बेंद्रेंच्या कार्यावर खुप प्रभावित झाले होते. त्यांनी १७ जुलै १९७७ रोजी वा. सी. बेंद्रेंच्या कार्याची ओळख करून देणारा एक लेख लिहिला होता. तो मे २००० मध्ये एकता मासिकात छापून आला होता. ज्यामध्ये बोरकरांनी वा. सी. बेंद्रेंना मराठी इतिहास लेखन क्षेत्रातील भीष्माचार्य"[११] असे संबोधले होते. तसेच यामध्ये दुर्मिळ छायाचित्रे, रिसर्च स्कॉलरशिप, विशाल ग्रंथसंपदा, पंडित नेहरुंशी परिचय

त्याचबरोबर बेंद्रे केवळ इतिहास संशोधक नाहीत तर एक चतुरस्त्र लेखक आहे अशा मुद्याखाली बेंद्रेंचे कार्य वर्णन केले.

क) दुर्मिळ छायाचित्रे शोधून काढले :

शिवाजी महाराजांची अधिकृत प्रतिमा म्हणून आज सर्वत्र ज्या छायाचित्राला मान्यता मिळाली आहे ते छायाचित्र इतिहासकार वासुदेवराव बेंद्रे यांनीच एकेकाळी आपल्या परदेश दौऱ्यात (१९३४) हस्तगत केले होते. स्वतःच्या नावाने प्रकाशित केले होते, ही गोष्ट किती लोकांना माहिती आहे? असा प्रश्न बोरकरांनी येथे विचारला होता.

हे छायाचित्र बेंद्रेंना कसे प्राप्त झाले या संदर्भात बोरकर पुढे लिहितात - १६८४ साली सुरतेवरील स्वारीनंतर सुरत स्वारीचा इतिहास स्वतंत्रपणे व्हॅलेंटाईनने नंतर लिहिला व तो ही प्रसिद्ध झाला. त्यातही हे चित्र त्याने छापले परंतु या सर्व गोष्टी महाराष्ट्राला अज्ञात होत्या. डच गव्हर्नर ग्रंथत करून ठेवलेली ही अमोल भेट इतिहाकार बेंद्रे यांनी महाराष्ट्राला मिळवून दिली.

श्री. बेंद्रे यांनी मूळ चित्राचे तितक्याच आकाराचे एक छायाचित्र काढून घेतले. शिवाजी राजांचे या चित्रातील कल्ले हे कोणत्याही चित्रात दिसणारे नाहीत. पांढऱ्या अंगरख्यावर शिवरायांनी चक्क उपरणे टाकलेले आहे. अंगावरील दागीने हे अस्सल मराठी पद्धतीचे आहेत. पुण्याच्या सरकारी मुद्रणालयात त्याच्या प्रती छापावयाचे ठरविले; परंतु त्याचे युरोपियन व्यवस्थापक श्री. ऑडी यांनी इंडिया हाऊसकडून लेखी परवानगी आल्याशिवाय या चित्राच्या प्रती छापण्यास नकार दिला. तेव्हा ही परवानगी श्री. बेंद्रे यांनी मिळविली. चित्राच्या प्रती छापून तयार झाल्या. साहित्य सम्राट न. चि. केळकरांना ही हकिगत समजली. शिवरायांचे हे खरेखुरे चित्र महाराष्ट्रापुढे समारंभाने आले पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला. शिवजयंतीचा दिवस त्यांनी निवडला व पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवाजी महाराजांचे सत्य चित्र श्री. तात्यासाहेब केळकरांनी प्रकाशित केले. श्री. बेंद्रे यांनी सर्व मराठीतील वृत्तपत्रांकडे शिवरायांचे हे चित्र पाठविले आणि सर्व भाषांतील वृत्तपत्रांनी व्हॅलेंटाईनच्या पत्रासह ते छापले. रायगडचा राजा तेव्हापासून खऱ्या रुपात घरोघरी गेला.

बोरकर पुढे लिहितात, अशा या व्यासंगी इतिहास संशोधकाच्या यशाचं रहस्य समजून घेण्यासाठी मी त्यांच्या चेंबूरच्या निवासस्थानी जाऊन भेटलो. कोणत्याही सरकारी वसाहतीत तीन

रुमचा ब्लॉक कसा असतो तसा त्यांचा टुमदार ब्लॉक होता. मी त्यांच्याकडे गेलो तेव्हा ते घरी नव्हते. काही वेळाने ते पावले टाकीत आले. शुभ्र सदरा व लेंगा, बस्स! अगदी साधा पेहराव, स्वभावही अगदी साधा निगर्वी. उभी हयात इतिहास संशोधन कार्यात घालविलेल्या त्या महान विभूतीसमोर नतमस्तक व्हावे असे ते प्रसन्न व्यक्तिमत्व होते.[१२]

ख) रिसर्च स्कॉलरशिप :

बेंद्रे बोरकरांना म्हणाले - १९३७ च्या अखेर मी इंग्लंडला रवाना झालो. युरोपमधील काही दप्तरखाने मला पाहायला मिळाले. त्यात विशेषतः लंडनमधील इंडिया हाऊस, ब्रिटीश म्युझियम, साऊदॅम्हन संग्रहालय, रॉयल एशियाटिक सोसायटी व इतर छोट्या संग्रहालयातील साधनांचा अभ्यास करून नोंदी घेण्यास अवसर लाभला. महाराष्ट्राच्या इतिहासाला उपयुक्त अशा सोळा, सतरा व अठराव्या शतकांतील नोंदी करून आणता आल्या. त्या नोंदीचे अनेक खंड पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळात अभ्यासूंच्या उपयोगासाठी ठेवले आहेत. फ्रान्समध्ये जाऊन दोन-तीन महत्त्वाचे रेकॉर्डस् पाहिले. त्यासाठी पाच-सहा महिने फ्रेंच भाषेचाही अभ्यास करावा लागला. रोम मधील पोपच्या संग्रहालयातील काही साधनांचा अभ्यास केला. जवळ-जवळ दोन वर्षे परदेशात मुक्काम करून नंतर मी स्वदेशी परतलो. या मुक्कामात शिवाजी महारांजाची अधिकृत प्रतिमा मी मिळविली.

ग) पंडित नेहरुंशी परिचय :

आपल्या इतिहास संशोधन कार्याच्या इतक्या प्रदीर्घ कालावधींतील एखादा संस्मरणी प्रसंग सांगाल काय? असा प्रश्न बोरकरांनी विचारल्यावर बेंद्रेंनी आठवून सांगितले - माझा पं. नेहरुंशी कसा परिचय झाला, मुंबईत कुठल्यातरी संस्थेतर्फे स्मरणिका निघणार होती. त्या स्मरणिकेत छत्रपतींच्या राज्यभिषेकासंबंधीचा एक लेख ऐनवेळी मिळू शकला नाही. पंडितजींनी यशवंतरावजींना विचारले त्यांनी लगेच मला निरोप पाठवला. बिकानेर संस्थानच्या लायब्ररीत राज्यभिषेकासंबंधी संस्कृत भाषेत माहिती होती. त्या माहित्याच्या आधारे मी एक व्यासंगपूर्ण लेख त्यांना लिहून दिला. पं. नेहरुंना तो लेख फार आवडला. त्या निमित्ताने त्यांच्याशी माझा परिचय झाला.[१३]

घ) बेंद्रे केवळ इतिहास संशोधक नाहीत तर एक चतुरस्त्र लेखक आहेत :

ऐतिहासिक विषयाबरोबर त्यांनी विविध विषयांवर लेखन केलेले आहे. शीघ्र ध्वनीलेखन पद्धती (मराठी-गुजराती), स्टेनोग्राफी ऑफ इंडिया (इंग्रजी) यासारखी पुस्तकेही लिहिलेली आहेत. भारतीय इतिहास व संस्कृती या त्रैमासिकाचे संपादन ते गेली काही वर्षे करीत आहेत. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांनी अनेक इतिहाससंग्रह इंग्रजी भाषेत लिहिलेले आहेत 'महाराष्ट्र ऑफ शिवशाही पिरियड', 'कॉरोनेशन ऑफ शिवाजी दि ग्रेट', 'स्टडी ऑफ इन्स्क्रिप्शन्स', 'डाऊन फॉल ऑफ आंग्रेज नेव्ही' वगैरे अनेक ग्रंथांचा निर्देश करता येईल. ते कुशल संघटक आहेत. एकेकाळी त्यांनी अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या अधिवेशनाची व्यवस्था कुशलतेने आयोजीत करून नामांकीत इतिहासकारांकडून शाबासकी मिळविलेली होती. त्यांनी विद्यार्थी संघटना वगैरे विविध स्वरुपाच्या संघटना काढून सामाजिक कार्यात भाग घेतला होता.[१४]

(३) डॉ. वि. गो. खोबरेकर :

खोबरेकर यांनी वा. सी. बेंद्रेंना 'व्यासंगी इतिहास संशोधक' म्हटले आहे. ते लिहितात की, इ. स. १९१८ मध्ये बेंद्रे पुण्यात भारत इतिहास संशोधक मंडळाचे, सरकारी नोकरी सांभाळून काम करू लागले. तिथे त्यांना गु. राजवाडे, पांडोबा पटवर्धन, म. म. दत्तोवामन पोतदार यांच्या सारख्या मातब्बर इतिहास संशोधकाचा सहवास लाभला. अभ्यास, लिहिण्याची जिद्द, व्यासंगीपणा व बुद्धिमत्ता या जोरावर त्यांनी १९२८ मध्ये "साधनचिकित्सा", १९३४ मध्ये दुसरा इंग्रजी मध्ये ग्रंथ लिहिला तो म्हणजे 'सतराव्या शतकातील गोवळकोंड्याची कुतुबशाही', 'Study of Muslim Inscription' हा त्यांनी १९४४ मध्ये प्रसिद्ध केला. १९४८ मध्ये सरकारने त्यांना पेशवे दप्तरात संशोधन अधिकारी नेमले. येथे त्यांनी 'रिपोर्ट ऑन ऑलीनेशन ऑफीस रेकॉर्डस् ॲण्ड पेशवे दप्तर' (१९५० मध्ये), इ. स. १९५२ मध्ये मद्रास सरकारने तंजावर येथील दप्तरखान्याची तपासणी करण्यासाठी त्यांची नियुक्ती केली. इ. स. १९६५ मध्ये महाराष्ट्रेतिहास परिषद सुरू केली. इ. स. १९६६ पासून इ. स. १९६८ अखेरपर्यंत त्यांनी महाराष्ट्रेतिहासिक परिषदेची तीन अधिवेशन भरवली.

इतिहास संशोधन मंडळातील आपल्या पाच वर्षाच्या कारकिर्दीत १४ ग्रंथ व भारतीय आणि संस्कृती ह्या त्रैमासिकाचे १०० पृष्ठांचे १९ अंक प्रसिद्ध केले. वरील ग्रंथात त्यांचे मुख्य

ग्रंथ 'गडकोटदुर्ग व त्यांची वास्तू', 'राजा जयसिंग आणि शिवाजी', 'महाराष्ट्रेतिहासाचे संशोधन क्षेत्र व साधनसंपत्ती', 'पोतुगिजांच्या महाराष्ट्रातील हालचाली', 'विजापूरची आदिलशाही' हे होत.

इतिहास क्षेत्रातील एक वडिलधारे माणूस गेले. अशा वृत्तीची माणसे आता दुर्मिळ होत चालली आहेत. याची खंत वाटते अशा शब्दात डॉ. वि. गो. खोबरेकर यांनी १९८६ मध्ये वा. सी. बेंद्रेंना श्रद्धांजली वाहिली.[१५]

(४) डॉ. चि. न. परचुरे :

"एका परकीय व्यक्तीचे चित्र शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून..."

"मंडळाला तरुण वयाचे चिटणीस मिळाले आहेत, हे वाचून विशेष आनंद झाला. प्रकृती साथ देत नसल्यामुळे तुम्हाला पुणे येथे येऊन भेटणे शक्य नाही. तुमची भेट व्हावी अशी इच्छा आहे. तरी शक्य तितक्या लवकर मुंबईस चेम्बुरला येऊन अवश्य भेटावे. केव्हा येणार ते कळवावे." जेष्ठ इतिहास संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांचे अशा अर्थाचे पत्र मंडळात माझे हाती पडले. त्यावेळेचे कार्याध्यक्ष प्रा. तात्यासाहेब खरे यांना मी ते दाखवले. मुंबईस एक-दोन चिटणीसांनी अवश्य जाऊन यावे, असे त्यांनी मला सुचवले. माझ्या आठवणी प्रमाणे मी आणि कारभारी सदस्य डॉ. म. श्री. माटे असे दोघे मुंबईस त्यांना भेटण्यास गेलो. त्यावेळी मुंबईच्या पावसास प्रारंभ होत होता. इ. स. १९७४-७५ चा हा प्रसंग परचुरे सांगत होते.

श्री. वा. सी. बेंद्रे यांना मी त्यांच्या घरी जाऊन प्रथमच ओळख करून दिली. ह्या प्रसंगी त्यांच्या बरोबर मनसोक्त बोलणे झाले आणि त्यांच्या बद्दल अतिशय आदराची भावना निर्माण झाली. मुंबईहून परततांना त्यांनी टंकलिखित केलेले मराठ्यांच्या इतिहासासंबंधीच्या विशेषतः संभाजी महाराजाबद्दलच्या साधनांचे सुमारे २५ वाईड ग्रंथ त्यांनी माझ्या ताब्यात दिले व ते मंडळात सुरक्षित ठेऊन अभ्यासकांना उपलब्ध करून देण्याबद्दल त्यांनी मला सूचनाही दिल्या. या ग्रंथामुळे मी दिग्मुद तर झालो होतोच, आणखी त्यांच्याबद्दलचा मनातील आदर द्विगुणीत झाला. तो आजही तसाच आहे. त्यांच्या पश्चात १३-१४ वर्षांनी त्यांच्या संबंधीच्या आठवणींना उजाळा मिळत आहे. त्यांचे चरित्र आणि इतिहासविषयक कार्य अभ्यासकांना निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहे.

बेंद्रेंना शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर ते लंडनला गेले व त्यांनी लंडनमधील मराठ्यांच्या इतिहासाची साधने तपासण्याची आणि ती संकलित करण्याची संधी सोडली नाही. अशी साधने

तपासतांना त्यांना मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने किंबहुना महाराष्ट्राच्या दृष्टीने एक बहुमोल ठेवा प्राप्त झाला तोपर्यंत 'इब्राहीम खान' नावाच्या एका परकीय व्यक्तीचे चित्र "शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून महाराष्ट्राच्या इतिहास विषयक पुस्तकातून छापलेले होते. ते त्यांनी रद्द करून संपूर्ण महाराष्ट्रीयांना शिवाजी महाराजांचे खरे चित्र प्राप्त करून देण्याचे अनमोल असे कार्य केले.[१६]

(५) लक्ष्मणशास्त्री जोशी :

"या संभाजीच्या चरित्राने एक प्रभावी व मंगल सत्य प्रकट केले आहे..."

इतिहास संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनी चार तपा पेक्षा अधिक काल पर्यंत जी तपश्चर्या केली आहे तीचे साफल्य म्हणजे त्यांनी लिहिलेले संभाजीवरील ग्रंथ होय. मराठ्यांच्या इतिहासाची साधने संग्रहीत व संपादित करणाऱ्या विद्वनांच्या चार पिढ्यांचे संशोधन विषयक परिश्रम सफल झाल्याची ग्वाही हे पुस्तक उच्च स्वराने निरंतर देत राहील. इतकी ह्या पुस्तकाची योग्यता आहे. गेल्या शंभर वर्षातील महाराष्ट्रीय मनाला मराठ्यांच्या इतिहासाचा ध्यास लागला होता व त्याकरिता अनेक प्रज्ञावंतानी त्या इतिहासाच्या अभ्यासाकरिता आवश्यक साधनांची जुळवाजुळव करण्याकरिता हव्यास केला होता. विष्णुशास्त्री चिपळुणकरांपासून तो श्री. बेंद्रे यांच्यापर्यंत दीर्घ कालावधीत मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित असे जे जे काही प्रयत्न झाले त्या सर्वांना या पुस्तकामुळे सार्थकता आली आहे.

या संभाजींच्या चरित्राने एक प्रभावी व मंगल सत्य प्रकट केले आहे. इतिहास संशोधक पुष्कळवेळा लोकप्रिय व पूज्य वाटणाऱ्या घटनांचे असत्यत्व दाखवून अप्रिय व अपूज्य अशा घटनांची त्या ठिकाणी स्थापना करतो. कारण इतिहास संशोधकाला सत्य हेच पूज्य व आनंददायक असते. वा. सी. बेंद्रे अशा सत्यनिष्ठ संशोधकापैकी आहेत. त्यांचा योगायोगच मोठा म्हटला पाहिजे की इतिहास साधनांच्या प्रचंड पर्वताच्या उत्खननाच्या उलाडालीत जुना लोकप्रसिद्ध धर्मवीर परंतु दुर्गुणी संभाजी न सापडता एक महान विभूती असलेला संभाजी गवसला. मराठ्यांच्या विषयी गैरसमज असलेला मुसलमान इतिहासकार काफिखान संभाजीस शिवाजीपेक्षा सवाई समजतो, याचा उलगडा या चरित्राने होतो. आता मराठ्यांच्या इतिहासांतील एका अभिमानास्पद कालखंडाच्या कार्यकारण भाव उघडकीस येतो व त्या इतिहासाची उपपति लागते. संभाजी नंतरचा औरंगजेबच्या निराशामय अंतापर्यंतचा मराठ्यांचा झुंजार व विजयी

इतिहास आता बोलू लागेल की, धर्मनिष्ठ राजकारण, धुरंदर मुत्सदी व सेनापती छत्रपती संभाजी महाराज हीच माझी प्रेरकशक्ती आहे!

बेंद्रे यांनी 'छत्रपती संभाजी महाराज' हे ऐतिहासिक चरित्र लिहून ऐतिहासिक चरित्र लेखनाचा एक उच्चतर मानदंडच निर्माण केला आहे. या पुस्तकाच्या अखेरची संदर्भग्रंथसुची त्यांच्या अध्ययनाच्या व व्यासंगाच्या विस्ताराची सूचक आहे व या ग्रंथातील प्रकरणवारी इतिहासाच्या अंगोपांगाचा केवढा व्याप लक्षात घ्यावा लागतो याची दर्शक आहे.

मराठ्यांच्या इतिहासाला या पुस्तकाने नवी दिशा मिळाली आहे व नवा प्रकाशही मिळाला आहे. संभाजी संबंधी यापूर्वी प्रसिद्ध झालेले अपवाद सूचक सर्व साहित्य आता बाधित झाले आहे. एक महान पुण्यश्लोक पुरुषाबद्दलचा अनेक शतके दृढ झालेला मिथ्यापवाद बाद झाला आहे. याची दखल यानंतर प्रसिद्ध होणाऱ्या सर्व साहित्याने जरूर घेतली पाहिजे. नाही तर सत्यापलापाचे पाप लागेल. विशेषतः क्रमिक पुस्तकाच्या व सुबोध वाङ्मयाच्या लेखकवर्गाने यापुढे सावध राहून संभाजीवरील मिथ्यावादापासून वाचक वर्गाला दूर ठेवले पाहिजे, हे त्यांचे कर्तव्य आहे.[१७] हा लेख शास्त्रींनी १७/०२/१९६० रोजी लिहिला होता.

(६) रविंद्र बेंद्रे :

"तुकारामाचे अप्रकाशित अभंग..."

मराठा इतिहासाचे समर्थ लेखक व संशोधक वा. सी. बेंद्रे हे इतिहासकार म्हणूनच जास्त प्रसिद्ध होते. प्रथम त्यांनी छत्रपती संभाजीवर अनेक वर्षे संशोधन केले आणि महाराजांची उज्ज्वल प्रतिमा लोकांच्या नजरेला आणून दिली. इंग्लंडच्या प्रधानमंत्रीनी त्यांना इतिहासासाठी लागणारे सर्व साहित्य मिळविण्याला (बेंद्रे इंग्लडला गेले असताना) पूर्ण मदत केली होती. त्यावेळी मराठेशाहीची बरीचशी अतिशय महत्त्वाची कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध झाली. त्याचवेळी मिळालेल्या काही कागदपत्रांवरून त्यांचे लक्ष तुकाराम महाराजांच्या लिखाणाकडे वेधले गेले आणि त्यानंतर तुकाराम महाराजांच्या अभंगाचा, त्यातील तत्त्वज्ञानाचा, तुकाराम विषयक वाङ्मयाचा सखोल अभ्यास केला. ३०-३५ वर्षे सतत अभ्यास करून संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे तत्त्वज्ञान, तुकाराम चरित्र, मंत्रागीता, तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा, तुकाराम महाराजांचे संतसांगती असे अनेक ग्रंथ लिहिले. तेव्हापासूनच तुकाराम महाराजांच्या

अभंगांचा, गाथांचा बारकाईने अभ्यास करून त्यातील अभंग विषयवार लावले. सर्वप्रथम हाती घेतलेल्या या ग्रंथाचे काम अनेक कारणांनी मागे पडत गले होते.

"श्री छत्रपती संभाजी" हा ग्रंथ वाचल्यानंतर दादासाहेब मावलणकर, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई या व अशाच काही मान्यवर लोकांच्या आग्रहाखातर आणि त्यांचा पिंड इतिहासकार असल्यामुळे त्यांनी प्रथम इतिहासाचे काम हाती घेतल्यामुळे गाथेच्या ह्या कामाकडे त्यांना जास्त लक्ष देता आले नाही. तरीही प्रत्येक अभंग तपासून विषयवारीने लावण्याचे काम त्यांचे सुरूच होते. त्यासाठी अनेक गावी जाऊन त्यांनी बहुसंख्य बाडे तपासली. महाराजांचे खरे अभंग शोधून काढण्याचे काम बरेच प्रसिद्ध केले होते, तर काही मंडळींनी आणि इतर मंडळींनी स्वतःच रचलेले अभंग महाराजांच्या नावावर प्रसिद्ध केले होते. त्या सर्वांची छाननी करण्यात बराच वेळ गेला. त्या मागे अभंगाची जास्तीत जास्त अचूक गाथा वाचकांच्या आणि अभ्यासुंच्या हाती द्यावी हीच इच्छा होती. वयाच्या ९१ व्या वर्षापासून ते ह्याच कामात मग्न होते. अखेर त्यांनी गाथा पूर्ण केली. अनुक्रमणिका करणे, प्रस्तावना लिहिणे ही कामे राहिली होती. त्यांनी प्रस्तावना लिहिण्यास सुरुवातही केली होती. प्रस्तावनेत तुकाराम महाराजांच्या शैलीचा, तत्त्वज्ञानाचा विचार मांडण्याचा त्यांचा मानस होता. परंतु ईश्वराची इच्छा वेगळीच होती. त्यांचे १६ जुलै १९८६ ला निधन झाले आणि ३००-३५० पानाची प्रस्तावना लिहिण्याचे त्यांचे स्वप्न अपूर्णच राहिले. वडिलांनी ४०-५० वर्षे सतत मेहनत करून तयार केलेला हा संग्रह तर वाचक आणि अभ्यासकांपर्यंत पोहोचवावा असे मी व माझ्या बंधूनी ठरवले तेव्हा प्रथम एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे त्यांनी टंकलिखित करून घेतलेली अंतिम प्रत टिपणासाहित कोणाला तरी दिलेली होती. शक्य तितक्या ठिकाणी ते शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्यात यश आले नाही. या संदर्भात ७/३/१९९२ च्या दै. महाराष्ट्र टाईम्स मध्येही वाचकांच्या पत्र व्यवहारात मी पत्र लिहिले होते पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे हिंमत न हारता त्यांच्या विस्कळीत पडलेला हस्तलिखित आणि प्रथम टंकलिखित केलेल्या प्रतीचे कागद एकत्र करून त्यावरून संग्रह तयार करण्याचे ठरवले. ते सर्व जीर्ण कागद व्यवस्थित लावण्यात जवळ-जवळ २ ते ३ वर्षे गेली व शेवटी "तुकारामांचे अप्रकाशित अभंग" प्रकाशित केले गेले.[१८]

(७) सदानंद मोरे :

"शिवछत्रपतींच्या अस्सल चित्रांची अतिशय महत्त्वाची उपलब्धी त्यांनी करून दिली..."

वेगवेगळ्या विषयांची हाताळणी सविस्तरपणे करण्यात म्हणजेच वैविध्य आणि वैपूल्य या दोन्ही आघाड्यांवर वा. सी. बेंद्रे यांची कामगिरी अतुलनीय आहे. सुदैवाने बेंद्रे यांना दीर्घायुष्य लाभले आणि त्यातील क्षण अन् क्षण सत्कारणी लावून त्यांनी त्याचे सोने केले. वस्तुतः उपजिविकेसाठी कारकूनी पेशा पत्करणारे बेंद्रे स्वतःच्या परिस्थितीने लावलेल्या मर्यादा ओलांडून इतिहास संशोधक होतात हाच एक चमत्कार मानावा लागेल. बेंद्रे या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या अखेरीस भारत इतिहास संशोधन मंडळात दाखल झाले यावेळी इतिहास संशोधक राजवाड्यांनी कायस्थ प्रभुविषयी विपर्यस्थ संशोधन करून वादळ उठविले होते. प्रबोधनकार के. सी. ठाकरे यांनी कोंदडाचा टणत्कार करीत भारत इतिहास संशोधन मंडळास सलामी दिली होती. या वातावरणात डोळे शांत ठेवून बेंद्रे मंडळाला चिटकून राहिले व संशोधनशास्त्रात पारंगता प्राप्त केली. तिचा परिणाम म्हणजेच संशोधनातील वैविध्य आणि वैपूल्य. बेंद्रे यांनी शिवशाहीच्या अंतरंगात प्रवेश केला आणि ते खोलवर गेलो. मालोजी, शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम ह्यांच्या संबंधीचे त्यांचे संशोधन त्यांचा आवाका दाखवून देते. ताराबाई व शाहू सोडले तर त्यांनी सारे घराणे आपल्या कक्षेत आणले आणि हे करतांना त्यांनी केवळ संकलन केले नाही.

मराठेशाहीचे निट आकलन व्हायचे असेल तर समकालीन इस्लामी सत्तांचाही निट अभ्यास व्हायला हवा, हे बेंद्रे यांनी ओळखले होते. त्यांचे कुतुबशाहीचे विवेचन ह्या दृष्टीने पाहायलाच हवे. इतिहास संशोधनाचा एवढा प्रपंच बेंद्रे उभा करतात याचे कारण शोध पद्धती आणि शोध सामग्री यांच्यावर त्यांची घट्ट पकड होती, अर्थात तो त्यांनी परिश्रमपूर्वक सिद्ध केली होती. साधन चिकित्सा कशी करावी हे त्यांच्याकडून शिकावे. या साधनात मराठी आणि विशेषकरून पाश्चात्य साधनांचा समावेश करणे अर्थातच त्यांना महत्त्वाचे वाटले. पेशवे दप्तर, तंजावर दप्तर यांच्याप्रमाणे त्यांनी ब्रिटीश दप्तराचाही मागोवा घेतला. शिवछत्रपतीच्या अस्सल चित्राची अतिशय महत्त्वाची उपलब्धी त्यांनी महाराष्ट्राला करून दिली.[११]

(८) डॉ. सौ. सुमित्रा कुलकर्णी :

महाराष्ट्र इतिहास संशोधन क्षेत्रात वा. सी. बेंद्रे यांचे नाव संभाजी महाराजांवरील त्यांचे प्रदीर्घ संशोधन व संभाजी महाराजांची पारंपारिक प्रतिमा बदलून नवी प्रतिमा उभे करणारे म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच त्यांचे संत तुकारामविषयीचे संशोधनही ज्ञात आहे. महाराष्ट्राचा १७ व्या शतकाचा इतिहास हे संशोधनाचे क्षेत्र बेंद्रे यांनी प्रामुख्याने निवडले आणि एक साधन संग्राहक, साधन संपादक, साधन चिकित्सक, संशोधक व इतिहासकार या विविध भूमिका समर्थपणे पार पाडल्या. 'साधनचिकित्सा' या पुस्तकाद्वारे १७ व्या शतकाच्या इतिहासाच्या संशोधनाची शास्त्रीय पार्श्वभूमी त्यांनी तयार केली. वि. का. राजवाडे यांच्यामुळे महाराष्ट्र इतिहास संशोधनामध्ये स्थित्यंतर घडून आले. राजवाडे यांच्या प्रभावामुळे २० व्या शतकाच्या प्रथमार्धात अनेक साधन संग्राहक सूक्ष्म चिकित्सा करणारे मर्मज्ञ इतिहास संशोधक निर्माण झाले. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या स्थापनेमुळे इतिहास संशोधनास संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. मंडळाच्या झेंड्याखाली इतिहासाचे अनेक अभ्यासक एकत्र आले त्यापैकी वा. सी. बेंद्रे हे एक सरकारी नोकरीत असून देखील जे. पी. कॉव्हरनटन यांच्या पाठिंब्यामुळे ते इतिहास क्षेत्रात आले. इतिहास संशोधनाची दीक्षा त्यांना श्री. पांडोबा पटवर्धन यांनी दिली. श्री. पांडोबा उर्फ आबा चांदोरकर यांचेही त्यांना या कामी साह्य झाले. श्री. दत्तोपंत आपटे यांची एखाद्या गोष्टीवर घंडण मंडणात्मक चर्चा करण्याची पद्धत, अतिशय बारकाईने प्रत्येक छोट्या गोष्टीची छाणणी करणे यासारख्या गोष्टींचा प्रभाव त्यांच्यावर पडला. "शक-सन-मिती-तिथी" यासंबंधीचे सखोल ज्ञान बेंद्रे यांनी आपटे यांच्याकडूनच मिळविले. या संदर्भात जे प्रदीर्घ विवेचन बेंद्रे यांनी पुढील काळात केले त्याचे मुळ आपणास येथे सापडते.

महाराष्ट्राच्या शास्त्रशुद्ध व वास्तवबोधी इतिहास रचनेसाठी इतिहासलेखन कलेची कोणतेही जुनी परंपरा स्विकारून चालणार नाही, तर नवीन परंपरा व पद्धती स्विकारावयास हवी. ही जाणीव बेंद्रे यांना होती यासाठी प्रथम साधने जुळवणे, साधन निष्पती होणे आवश्यक आहे, हे त्यांनी सांगितले. साधन निष्पतीनंतर उपलब्ध झालेल्या पुराव्यांची चिकित्सापूर्ण परिक्षण करून इतिहास रचनेचा पाया शुद्ध रचन्याकडे त्यांनी लक्ष दिले, असे कुलकर्णी येथे सांगतात.

इतिहास हे ज्ञानसंवर्धनाचे साधन आहे, असे बेंद्रे मानतात. इतिहास म्हणजे भूतकालीन शोध पुराव्यांच्या साहाय्याने सिद्ध झालेल्या मानवी हालचालींचे मंथन करून काढलेले सार याचे

ज्ञान विविध असते, असे बेंद्रे मानतात. हा ज्ञानसंग्रह सारखा वर्धमान होणारा असतो याला वेळोवेळी योग्य ती मर्यादा घालवून भूतकालीन पुराव्यांची एकत्रित व सुनियंत्रित अशी पद्धतशीर मांडणी करावी लागते, यालाच इतिहास रचना असे बेंद्रे म्हणतात. असे विचार बेंद्रे विषयक कुलकर्णी येथे नमुद करतांना आपल्याला दिसतात.[२०]

(१०) 'समाजसेवा'चे संपादक :

'समाजसेवा' या मासिकात श्री. वा. सी. बेंद्रे यांच्या कार्यासंदर्भात संपादकीय लेख लिहिण्यात आला होता. हा मार्च १९६० चा अंक होता यावेळी बेंद्रेंचा 'शिवराज्यभिषेक' हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झालेला होता. तेव्हा त्यांच्या अभिनंदनात्मक हे संपादकीय लिहिण्यात आले होते. यामध्ये त्यांनी बेंद्रेंच्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला व त्याचबरोबर काही प्रश्नही समोर ठेवले होते ज्यामध्ये समाजसेवा या मासिकेचा संपादक म्हणतो की, पाच पंचवीस कविता किंवा पाच पंचवीस लघुकथा लिहिल्या की आजकाल त्या कवींचा अथवा कथा लेखकाचा केवढा गौरव होतो! उपरोक्त व्यक्तीचा तसा गौरव झाल्याचे आमच्या ऐकिवात नाही. पण समाजाचे काही कर्तव्य म्हणून काही आहे की नाही? असा प्रश्न संपादक विचारून पुढे लिहितात - समाजाला आपल्या कर्तव्याचा विसर पडलेला आहे आणि त्याचे कारण आमच्या मते इतिहास विषयाची उपेक्षा. आज जो ललित साहित्य लिहितो तोच साहित्यिक असा समज रूढ झाला आहे. त्यामुळे कथा, कादंबऱ्या लिहिणारा साहित्यिक तिशी पसतीशीत महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होतो पण मराठी रियासतीचे व संतेतिहासाचे नवे व मौलिक दर्शन घडविणाऱ्या उपरोक्त तपस्व्यांची त्या पदासाठी आठवण होत नाही. समाजातील मूल्यांचा अभाव तो हाच. स्वातंत्र्य मिळून एक तप झाले तरी समाजात एकाही नव्या मूल्याची प्रस्थापना झाल्याचे दिसत नाही. माणसाचे मोठेपण मोजण्याचे आमचे माप म्हणजे त्याच्या जवळील पैसा अगर त्याला मिळालेली प्रसिद्धी नेमक्या याच गोष्टी श्री. बेंद्रे यांच्या सारख्या महर्षी जवळ नसतात आणि म्हणून समाजाला त्यांचे मोठेपण समजत नाही. या परिस्थितीचा सर्व समाजाने अंतर्मुख होऊन विचार करायला हवा, असे आव्हान यावेळी संपादक करतांना दिसतात.[२१]

(१०) लोकसत्ता वृत्तपत्र (दि. २६/०८/१९८६) :

लोकसत्ताच्या मुंबई आवृत्तीत दि. २६/०८/१९८६ रोजी श्री. वि. स. पागे यांनी दिवंगत श्री. वा. सी. बेंद्रे यांना आदरांजली वाहतांना लिहिले, "श्री. वासुदेवराव सीताराम बेंद्रे यांच्या

इतिहास विषयक ग्रंथांचा आणि प्रचंड कार्याचा विचार करता ते केवळ इतिहास संशोधक होते असे नव्हे; तर ते इतिहास लेखनाचे शास्त्रज्ञही होते." हे उद्गार मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय आणि इतिहास संशोधक मंडळ यांच्या वतीने श्री. बेंद्रे यांच्या निधनाबद्दल सभेत श्री. पागे अध्यक्षपदावरून बोलत होते. श्री. पागे पुढे म्हणले, बेंद्रे यांच्या मोलाच्या इतिहास संशोधनाबरोबर तुकाराम महाराजांविषयीचे त्यांचे संशोधनही महत्त्वाचे आहे. मी त्यांच्या भेटीला गेलो तेव्हा मी सांगितले तुकारामकालीन पाटील आणि महाजन वतनदार असत. तुकारामांचे घराणे महाजन होते त्यामुळे तुकाराम महाराज हे गरीब नसून श्रीमंत होते. या मताशी बेंद्रे सहमत झाले होते, असे पागेंनी आपल्या भाषणात सांगितले.

प्राचार्य पी. टी. बोराळे म्हणाले, बेंद्रे हे जागतिक कीर्तीचे इतिहास संशोधक होते. आपले कार्य निश्चित करण्यासाठी धडपड, निश्चय आणि मनाची एकाग्रता कशी करावयाची असते हे तरुण मंडळीने बेंद्रे यांच्यापासून शिकावे. त्यांच्या इतिहास संशोधनाने शिवाजी महाराजांची खरी मूर्ती आपल्याला लाभली. बेंद्रे यांनी आयुष्यभर खपून शिवशाहीचा इतिहास महाराष्ट्राला दिला. त्याबद्दल आपण त्यांचे ऋणी राहिले पाहिजे, असे बोराळे यावेळी म्हणाले.

इतिहास संशोधक मंडळाचे संचालक डॉ. विठ्ठलराव खोबरेकर यांनी, 'साधनचिकित्सा' हा ग्रंथ संशोधकाना मार्गदर्शपर आहे असे सांगून त्यांनी शेजवलकरांची प्रतिक्रिया दिली. शेजवलकर बेंद्रे संदर्भात म्हणतात, 'साधनचिकित्सा हा एकच ग्रंथ बेंद्रे यांनी लिहिला असता तरी ते इतिहास संशोधक म्हणून मान्यतेस पावले असते.'

श्री. माधव गडकरी कै. बेंद्रे यांना श्रद्धांजली वाहतांना म्हणाले, 'ज्या चार इतिहास संशोधकांशी माझा संबंध आला त्यापैकी पांडुरंगराव पिसुर्लेकर, पोतदार यांचा बराच सहवास घडला. बेंद्रे आणि खरे यांच्या गाठी-भेटी झाल्या, परंतु या सर्वांचे इतिहास संशोधनाचे प्रचंड कार्य पाहता त्यांची जागा घेणारी माणसे दिसत नाहीत.'

अशा शब्दांत विद्वानांनी आपल्या प्रतिक्रिया कै. वा. सी. बेंद्रेंच्या मृत्युनंतर दै. लोकसत्ताच्या अंकाल दिल्या. ज्यावरून आपल्याला बेंद्रेंच्या कार्याचा व कर्तृत्वाचा समज येईल.[२२]

(१२) 'कायस्थ प्रबोधन' मधील संपादकीय :

ऑगस्ट १९८६ च्या कायस्थ प्रबोधन मासिकात वा. सी. बेंद्रेंच्या मृत्युमुळे त्यांना संपादकीय मध्ये स्थान देण्यात आले होते. त्यात संपादक लिहितो की, श्री. वा. सी. बेंद्रे तथा बाप्पासाहेब बेंद्रे यांचे निधन हे काही आकस्मिक नव्हते. निधनसमयी त्यांचे वय ९२ वर्षाचे होते आणि गेले तीन-चार वर्षे ते आजारीच होते. त्यामुळे वृद्धापकाळामुळे त्यांचे निधन झाले हे जरी खरे असले तरी रुग्णपंजरी पडलेला हा भीष्माचार्य स्वस्थ बसला नव्हता. काही दिवसापूर्वी त्यांचे 'तुकाराम' यांचेवरील संशोधनात्मक कार्य चालू होते. असे सांगून यामध्ये त्यांच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंतच्या त्यांच्या मुख्य महत्त्वाच्या कार्याचा आढावा घेतला गेला होते.[२३]

या प्रकारे श्री. वा. सी. बेंद्रेंचे कार्ये आपल्याला विविध व्यक्तींच्या त्यांच्या संदर्भातील लिखाणातून समजते.

१.४ संशोधनाचा दृष्टिकोन, संशोधन पद्धती व संशोधन विषयाची निवड :

मराठ्यांच्या इतिहासावर आतापर्यंत विविध इतिहासकारांनी संशोधन व लिखाण केले आणि या इतिहासकारांवर अनेक संशोधकांनीही संशोधनपर लिखाण केले, पण वा. सी. बेंद्रे सारख्या इतिहासकारावर ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मराठ्यांच्या इतिहास लेखणासाठी अर्पण केले, भारतातच नव्हे तर विदेशात जाऊन मराठ्यांच्या इतिहासाला उपयोगी अशा साधनांची जमवाजमव केली, संभाजी राजांचे खरे चरित्र समजापुढे आणले, शिवाजी महाराजांचे खरे छायाचित्र प्रदर्शित केले इत्यादी आणि विविध कार्य करणाऱ्या या व्यक्तींवर अजून एकत्रितपणे लिखाण झालेले संशोधकाच्या पाहण्यात आले नाही. तेव्हा अशा या इतिहासकाराच्या लिखानाचा विस्तृत अभ्यास व्हावा व ते सर्व एकत्रितरित्या समाजासमोर आणावे या हेतूने **"मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात वा. सी. बेंन्द्रे यांचे लिखाण - एक अभ्यास"** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रस्तुत प्रबंधात मराठ्यांच्या इतिहास संशोधनाच्या निमित्ताने वा. सी. बेंद्रे नी बजावलेली भूमिका कोणती, त्यांची संशोधनाची पद्धत काय होती, त्यांनी कोणत्या ऐतिहासिक साधनांवर जास्त भर दिला आणि तो का दिला, त्यांनी काढलेले निष्कर्ष कोणते इत्यादींचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. बेंद्रेंनी मराठ्यांच्या इतिहासाच्या बाबतीत जे लिखाण केले त्यांचा एकत्रित परिचय या प्रबंधात दिला आहे. वा. सी. बेंद्रे यांनी केलेली मराठ्यांच्या विविध

साधनांची जमवाजमव व त्यांच्या आधारे केलेली नवीन मराठ्यांच्या इतिहासाची मांडणी तसेच त्यांचे राजकीय लिखाण हेच संशोधकाने संशोधनाचे पायाभूत साधन म्हणून ग्रहित धरले आहे. ज्या साधनांच्या आधारे वा. सी. बेंद्रेंनी इतिहास संशोधन केले त्या साधनांची चिकित्सा संशोधकाने अपेक्षित धरलेली नाही.

कोणत्याही इतिहासकारने किती प्रमाणात लिहिले त्यापेक्षा काय लिहिले व त्यांनी निष्कर्ष काय काढले हे महत्त्वाचे ठरते. याच दृष्टिकोनातून संशोधकाने बेंद्रेंच्या संशोधनाकडे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे व आवश्यक तेथे बेंद्रेंनी केलेले इतिहास संशोधन व त्यांनी काढलेले निष्कर्ष संशोधकाने या प्रबंधात देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठ्यांच्या इतिहासासंबंधी बेंद्रेंनी केलेल्या संशोधनाचे गुणात्मक विश्लेषण करण्यासाठी 'संदर्भ (विश्लेषण) पद्धतीचा वापर' हाच पर्याय संशोधकाला योग्य वाटला.

१.५ संशोधनाचे गृहितके :

१. वा. सी. बेंद्रे यांचा मराठ्यांच्या इतिहासासंबंधी विस्तृत अभ्यास होता.

२. वा. सी. बेंद्रे यांनी मराठ्यांच्या इतिहासासंबंधी विस्तृत प्रमाणात लिखाण केलेले आहे.

३. वा. सी. बेंद्रे यांनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनासंदर्भात विस्तृत लिखाण केलेले आहे.

४. वा. सी. बेंद्रे यांनी राजकीय बरोबरच अराजकीय क्षेत्रासंदर्भातही विस्तृत लिखाण केलेले आहे.

५. वा. सी. बेंद्रे यांनी शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज, तुकाराम महाराज यांच्या विशेष संदर्भात चरित्रात्मक लिखाण केले.

६. वा. सी. बेंद्रे यांनी महाराष्ट्राच्या व मराठ्यांच्या इतिहास संशोधनक्षेत्र व साधनसंपत्ती विषयी विपूल प्रमाणात लिखाण केले.

ऊ] संशोधनाची उद्दिष्टे :

वा. सी. बेंद्रे यांच्या मराठ्यांच्या इतिहाससंदर्भातील लिखाणाचा अभ्यास करण्यामागची उद्दिष्टे म्हणजे, मराठ्यांच्या इतिहासासंबंधी बेंद्रेंनी जे विस्तृत लिखाण केले त्यावर प्रकाश टाकणे. तसेच

१. मराठ्यांच्या इतिहासाविषयी वा. सी. बेंद्रे यांचा दृष्टीकोन स्पष्ट करणे.

२. वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण एकत्रितपणे समाजासमोर आणणे.

३. वा. सी. बेंद्रे यांच्या संशोधन कार्याची ओळख समाजाला करून देणे.

४. बेंद्रेंनी मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनातून कोणते वेगळे निष्कर्ष काढलेत ते सांगणे.

५. मराठ्यांच्या इतिहास संशोधनाच्या निमित्ताने वा. सी. बेंद्रे यांनी बजावलेली भूमिका कोणती ती सांगणे.

६. नवीन संशोधकांना मराठ्यांच्या इतिहास संशोधनासाठी वा. सी. बेंद्रे यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा व्हावा म्हणून त्यांच्या कार्याला एकत्रितपणे पुढे आणणे.

१.७ प्रकरणांची ओळख

प्रस्तुत प्रबंध एकूण सात प्रकरणामध्ये विभागला असून प्रत्येक प्रकरणातील आशय पुढील प्रमाणे आहे.

पहिले प्रकरण - प्रास्ताविक, भूमिका व संशोधन पद्धती

पहिल्या प्रकरणात संशोधनाच्या शीर्षकातील विषयाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन विषयाच्या संदर्भात संशोधकांची भूमिका विशद केलेली आहे. बेंद्रेंच्या इतिहास संशोधनाचा विस्तृत परिचय मराठ्यांच्या इतिहास अभ्यासकांना व्हावा की ज्यामुळे नवोदित इतिहास अभ्यासकांना बेंद्रेंच्या इतिहास संशोधनाचा उपयोग करून घेता येईल असा संशोधकाचा प्रमुख हेतू आहे. मराठ्यांच्या इतिहास संशोधनाच्या निमित्ताने आतापर्यंत जे वेगवेगळे प्रवाह निर्माण झालेले आहेत आणि त्यातून जे मराठ्यांचे इतिहास होत गेले त्यात बेंद्रेंचे काय स्थान आहे याचा परिचय इतरांना व्हावा हीच या संशोधनामागची प्रमुख भूमिका आहे.

श्री. बेंद्रे यांनी मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन करीत असतांना प्रस्थापीत व समकालीन मराठ्यांच्या इतिहासासंबंधी जी मते प्रतिपादित केली आहेत त्यांचे खंडन व मंडन करून जे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे त्याची सविस्तर चर्चा करण्याच्या पद्धतीचा येथे अवलंब केला गेला आहे. त्यासाठी विश्लेषण पद्धतीचा विशेत्वाने अवलंब केला आहे.

प्रकरण दुसरे - मराठ्यांच्या इतिहासाची साधने

दुसऱ्या प्रकरणात बेंद्रेंनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांसदर्भात जे काही लिखाण केले ज्यामध्ये 'साधनचिकित्सा' शिवशाहीच्या इतिहासाच्या साधनासंदर्भात लिहिलेल्या ग्रंथातील माहिती तसेच 'महाराष्ट्रेतिहासाचे संशोधन क्षेत्र व साधन संपत्ति', 'इतिहास संशोधन पद्धती',

'महाराष्ट्रेतिहासाची साधने (विभाग १, २, ३)', 'The Factory and company records - reports'] 'Alienation Office Records and Poona Daftar', 'Report on the Peshava Daftar or Guide to the Records', 'A study of Literature on Science and Technology of Olden Time', 'महाराष्ट्रेतिहास परिषद अधिवेशन १, २, ३, ४ मधील त्यांनी केलेले मराठ्यांच्या साधनांचे संकलन, संशोधनासाठी सांगितलेल्या बाबी, संशोधकांना केलेले मार्गदर्शन, संशोधन क्षेत्र, मराठ्यांच्या इतिहासाची साधनसंपत्ती, महाराष्ट्र इतिहासासाठी लिहिलेली व जमा केलेली साधने इत्यादी विषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

प्रकरण तिसरे - शिवपूर्वकालीन मराठ्यांच्या इतिहासाविषयीचे लिखाण

तिसरे प्रकरण हे शिवपूर्व काळाच्या संदर्भात म्हणजेच शिवाजी महाराजांच्या पूर्वजांच्या शोधाच्या बाबतीत वा. सी. बेंद्रेंने केलेल्या लिखाणाचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्यासाठी त्यांनी लिहिलेल्या दोन मुख्य ग्रंथांचा ज्यामध्ये 'मालोजी राजे व शहाजी महाराज', 'शिवाजी महाराजांचे धोरले बंधु संभाजी राजे भोसले' व इतर संबंधीत ग्रंथाचा आढावा घेण्यात ओलेला आहे. ज्यामध्ये आपल्याला हे स्पष्ट होते की, शिवाजी महाराजांचा व मराठ्यांचा संपूर्ण इतिहास माहित करून घ्यावयाचा असेल तर शिवशाहीच्या अंतरंगात प्रवेश करावा लागेल म्हणजे मालोजी, शहाजीपासूनचा इतिहास बघावा लागेल.

प्रकरण चौथे - छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचे लिखाण

चौथ्या प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रपर व त्यांच्या संशोधनाची ओळख करून देण्यात आलेली आहे. ही ओळख करून देत असतांना त्यांनी वापरलेल्या साधनांचा आवाका तसेच अशा बाबी ज्या फक्त बेंद्रेंना शिवाजी महाराजांमध्ये दिसल्या त्या देण्यात आल्या आहेत. या प्रकरणाच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांच्या 'Maharashtra of the Shvashahi Period', 'श्री छत्रपती शिवाजी महाराज - पूर्वाध व उत्तरार्ध', 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज', 'Coronation of Shivaji the Great', ग्रंथांचा उपयोग प्रामुख्याने करण्यात आलेला आहे.

प्रकरण पाचवे - छत्रपती संभाजी महाराजांविषयीचे लिखाण

प्रकरण पाचव्यामध्ये छत्रपती संभाजी महाराजांविषयीचे वा. सी. बेंद्रेचे लिखाण देण्यात आलेले आहे. ज्यामुळे वा. सी. बेंद्रेना संपूर्ण इतिहासकारांचा व संशोधकांचा वर्ग ओळखू लागला. वा. सी. बेंद्रेंनी जे संभाजींच्या चरित्राने एक प्रभावी व मंगल सत्य प्रकट केले आहे. त्यांनी जुना लोकप्रसिद्ध धर्मवीर; परंतु दुर्गुणी, दुर्व्यसनी संभाजी, खुनी व धर्मभोळा म्हणून आजपर्यंत इतिहास लेखकांनी व नाटककारांनी जी प्रतिमा संभाजीची दाखविली होती ती कशी चुकीची आहे पटवून देऊन जिवंतपणी शरीराचे तुकडे होत असता, डोळे काढले जात असता, शरीर सोलले जात असता, जो धर्मनिष्ठेने देहातीत रहातो व आपल्या धर्मनिष्ठेच्या अंतिम कसोटीस उतरतो तो आयुष्यभर देहधर्माचा दास म्हणून वागतो. ही घटना सुसंगत वाटत नाही, अतर्क वाटते. हे बेंद्रेंनी सिद्ध करून दाखविले. त्याचीच ओळख या प्रस्तुत प्रकरणात करून देण्यात आली आहे.

प्रकरण सहावे - छत्रपती राजाराम महाराजांविषयीचे लिखाण

प्रकरण साहाव्यामध्ये, वा. सी. बेंद्रे यांनी संभाजीच्या मृत्युनंतर राजारामांनी कशा प्रकारे मराठा साम्राज्याचे मोगली सत्तेपासून संरक्षण केले, त्याची माहिती देण्यात आलेली आहे. या संदर्भातील विस्तृत चर्चा त्यांनी आपल्या राजारामावरील लिहिलेल्या ग्रंथात म्हणजे 'श्री छत्रपती राजाराम आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा' या ग्रंथात केलेली आहे, त्याचाच येथे आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण सातवे - उपसंहार

सातवे प्रकरण उपसंहाराचे असून त्यात बेंद्रेंचे व्यक्तिमत्व व इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याचे स्वरूप व महत्त्व काय याचे थोडक्यात विवेचन करण्यात आले आहे.

सारांश, वा. सी. बेंद्रे यांचे इतिहास संशोधनातील महत्त्वाचे योगदान लक्षात घेता त्यांच्या एकूण जीवन व कार्याची आणि त्यांनी मराठ्यांच्या इतिहासात केलेल्या संशोधनाचा सखोल परिचय इतिहास अभ्यासकांना होणे गरजेचे आहे. या गरजेची पूर्तता करण्याचाच एक अल्पसा प्रयत्न संशोधकाने या प्रबंधाच्या माध्यमातून केलेला आहे.

१.८ बेंद्रेंची इतिहास-संशोधन पद्धती

'संशोधन, लेखन, विश्लेषण आणि त्यातील भाष्य अशा चार कार्य पद्धतींनी इतिहासाचे मंथन झाले तरच त्यांचे अंतरंग लक्षात येण्यास मदत होते.' इतिहास अभ्यासाचे हेच खरे गमक आहे आणि आज विकसीत झालेल्या "इतिहासलेखनशास्त्रात" सुद्धा हेच सुत्र प्रामुख्याने विकसीत झालेले आहे. बेंद्रेंचा इतिहास संशोधन इतिहासलेखनशास्त्राला अनुसरूनच आहे. जिज्ञासा, चिकित्सा व शिस्त या संशोधनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी बेंद्रेंच्या अंगी असल्यामुळे त्यांचे इतिहास संशोधन शास्त्रशुद्ध व सुत्रबद्धच ठरले आहे.

भारतीय तसेच मराठ्यांच्या इतिहासात निर्माण झालेल्या विनोदाची अनेक उदाहरणे बेंद्रे आपल्या लिखाणात देऊन इतिहास अभ्यासकांनी असे विनोद इतिहासातून नाहीसे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे आग्रहाने सांगितले. इतिहासातील हे विनोद व निर्माण झालेल्या गैरसमजूती संशोधनाच्या आधारे दूर करण्याचा प्रयत्न केला गेला नाही तर खोटा इतिहास समाजापुढे मांडला जाण्याचा मोठा धोका असतो. मराठी साहित्यिकांनी आपल्या कथा, कांदबऱ्या व नाटकातून कल्पनेच्या आधारे ज्या ऐतिहासिक घटना, व्यक्ती व प्रसंग रंगवून सांगितल्या आहेत. तोच खरा इतिहास समजण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रातील लोकांमध्ये जोपासली गेली आहे. त्यामुळे न घडलेल्या अनेक घटनांचा शिरकाव मराठ्यांच्या इतिहासातही झालेला आहे. ललित साहित्यातील कल्पना-विलासावर व पारंपारिक पद्धतीने चालत आलेल्या दंतकथांवर आधारित खोटा इतिहास लोकांच्या डोक्यातून पुसून टाकण्याचे आव्हान इतिहास संशोधकांनी स्वीकारले पाहिजे या मताचे बेंद्रे होते.

स्वतः हे आव्हान स्वीकारून स्वतःला इतिहास संशोधनाच्या कार्यात डुबवून घेतले. संशोधनाच्या आधारेच त्यांनी मराठ्यांच्या इतिहासातील गैरसमजूती, विनोद आणि खोटारडेपणा बेडरपणे, वेशीवर टांगण्याचे धाडस केले. त्यासाठी त्यांनी ज्या पद्धतीने इतिहास संशोधन केले ती पद्धत निश्चितच शास्त्रीय होती. संशोधनाच्या निमित्ताने इतिहासाचे ग्रंथ व इतर विविध प्रकारची ऐतिहासिक साधने हाताळतांना संशोधकांनी कोणती खबरदारी घ्यावी हे विस्तृतपणे सांगितले आहे.

१.९ इतिहासाच्या संदर्भातून स्थळांची व काळांची झालेली गल्लत

इतिहासाच्या संदर्भातून स्थळांची व काळांची झालेली गल्लत बेंद्रेंच्या नजरेतून सुटलेली नाही. मराठा इतिहासाशी संबंधीत बऱ्याच इतिहास ग्रंथातून स्थळ-काळाची गल्लत कशी झाली आहे हे त्यांनी आपल्या इतिहास संशोधनातून दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. विशेष म्हणजे इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात सैद्धांतिकरित्या ते स्वतःला कुठल्याही इतिहास परंपरेचे किंवा प्रवाहाचे पाईक समजत नाहीत. कोणत्याही इतिहास परंपरेचे दडपण मनावर न ठेवता निर्भेळ मनाने स्वतंत्ररित्या इतिहास संशोधनाचे कार्य ते अखंडपणे करीत राहिले.

१.१० मराठ्यांचे ऐतिहासिक कर्तृत्व

भारताच्या मध्ययुगीन काळात मराठ्यांनी जो काही इतिहास घडविला त्याबद्दल आजपर्यंत वेगवेगळ्या विद्वानांनी आपापल्या परीने चिकित्सा केलेली आहे. काहींनी मराठ्यांमधील दोष दाखविण्याचा प्रयत्न केला तर काहींनी मराठ्यांची तोंड भरून स्तुती केल्याचे दिसून येते.

एक इतिहास संशोधक म्हणून बेंद्रेंनी मराठ्यांच्या संपूर्ण इतिहासाची चिकित्सा करताना संतुलन ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठ्यांमधील दोषांकडे त्यांनी दुर्लक्ष केलेले नाही. दोष गृहित धरूनसुद्धा मराठ्यांची ऐतिहासिक कामगिरी कमी महत्त्वाची ठरत नाही, असे बेंद्रेंचे मत आहे. म्हणूनच ते संभाजी राजांच्या चरित्राला योग्य न्याय देऊ शकले.

केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर संबंध भारताच्या इतिहासाच्या दृष्टीने मराठ्यांची कामगिरी किती मोलाची आहे याचे साररुपी विवेचन बेंद्रेंनी आपल्या लिखानातून केले. या व इतर लिखाणाचा विचार प्रस्तुत प्रबंधात करण्यात आलेला आहे.

संदर्भग्रंथ सूची

१. http://historianbendrey.blogspot.in/2012/12/blog-post21.html, Date:16.03.2013

२. globalmarathi.blogspot.com, चि. न. परचुरेंचा लेख, Date: 16.03.2013

३. कित्ता

४. कित्ता

५. कित्ता

६. myvishwa.com/PublicBlogs/PublicBlogDetails.aspx?BlogPost=5395793991134275426&profileid=4818382155966403373&Groupid=0

७. कित्ता

८. anuradhavelankar.globalmarathi.com/BlogDetails.aspx?Blogid=4890173499203218134&old=4818382155966403373&TName=शिवाजी

९. myvishwa.com/PublicBlogDetails.aspx?BlogPostid=5472571416065664738&profileid=4818382155966403373&Groupid = 0, on 21 Oct. 2011, Date 18.01.2013

१०. एकता मासिक (मे 2000)- माधव गडकरी यांचा लेख, पृ. क्र. 22

११. एकता मासिक (मे 2000)- लक्ष्मीदास बोरकर यांचा लेख, पृ. क्र. 22

१२. कित्ता, पृ. क्र. 23

१३. कित्ता, पृ. क्र. 24

१४. कित्ता, पृ. क्र. 24

१५. anuradhavelankar.globalmarathi.com/BlogDetails.aspx?Blogid=4890173499203218134&old=4818382155966403373&TName=शिवाजी, By Sadhana da, on 01 Nov. 2011 Date 13.03.2013

१६. file:E:/Globalmarathi - एका परकीय व्यक्तीचे चित्र शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून, By Sadhana da, on 01 Nov. 2011 Date 13.03.2013

१७. historianbendrey.blogspot.com,myvishwa.com/PublicBlog Details.aspx?BlogPostid=5335195515112772650&profileid =4818382155966403373&Groupid=0

१८. myvishwa.com/PublicBlogDetails.aspx?BlogPostid=539579399 1134275426&profileid=4818382155966403373&Groupid=0, on 27 Oct. 2011, Date 15.03.2013

१९. http://globalmarathi.com, on 22 Oct. 2011, Date 15.03.2013

२०. historianbendrey.blogspot.in/2012/02/drsumitra-kulkarni university of pune.html, posted 24th Feb 2012 by Sadhana

२१. समाजसेवा (मासिक), वर्षे 14 वे, मार्च 1960, संपादकीय पृष्ठ

२२. दैनिक लोकसत्ता मधील दि. 26.08.1986 ची श्रद्धांजलीपी बातमी

२३. कायस्थ प्रबोधन (ऑगस्ट 1986) मधील संपादकीय, www.google.co.in/ search?a=vtctbendre&hl-en &source=Inms & tbm=isch & sa=x & ei=lbxOUY-fEaX.

प्रकरण दुसरे
मराठ्यांच्या इतिहासाची साधने

प्रकरण दुसरे

मराठ्यांच्या इतिहासाची साधने

प्रास्ताविक :

मराठ्यांच्या साधनांची जमवाजमव करण्यासंदर्भात तसेच त्या साधनांचा अर्थ लावून त्यांची मांडणी करण्याच्या संदर्भात वा. सी. बेंद्रेंचे योगदान अनमोल आहे. वा. सी. बेंद्रेंनी काही साधनांची भाषांतरेही केलेली आहेत. आपले संपूर्ण आयुष्य साधनांच्या जमवाजमवीमध्ये तसेच त्या साधनांचा योग्य तो अर्थ समाजापुढे आणण्यामध्ये खर्च केले. त्यांच्या या कार्याची प्रचिती आपल्याला जेव्हा ते शिक्षणखात्यात नोकरीला होते, त्यांना 'रिसर्च स्कॉलरशिप' मिळाली होती व ते युरोपमध्ये तेथील दप्तरखाने पाहावयास गेले ज्यात विशेषतः लंडनमधील इंडिया हाऊस, ब्रिटिश म्युझियम, साउदेम्हन संग्रहालय, रॉयल एशियाटिक सोसायटी व इतर छोट्या संग्रहालयाचा समावेश करता येईल. त्यावेळी त्यांनी या संग्रहालयांतील साधनांचा अभ्यास करून नोंदी घेतल्या व महाराष्ट्राच्या इतिहासास उपयुक्त अशा १६ व्या, १७ व्या व १८ व्या शतकांतील नोंदी करून आणल्या आणि या नोंदींचे जवळजवळ १००० व्हॅल्युम्स पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळात अभ्यासुंच्या उपयोगार्थ ठेवले.

पेशवे दप्तरखान्याचे अधिकारी असतांना बेंद्रे यांनी ऐतिहासिक कागदपत्रांच्या दृष्टिने अत्यंत मोलाची कामगिरी पार पाडली होती. पेशवे दप्तरात सुमारे ४ कोटी ऐतिहासिक कागदपत्रांचे विसकळीत संकलन होते. ह्या कागदपत्रांचे कॅटलॉगिन करणे, विषयवार विभागणी करणे हे अभ्यासकांच्या उपयुक्ततेचे कार्य श्री. बेंद्रे यांनीच मार्गी लावले. या नोंदणीमध्ये शास्त्रशुद्धता आणि बिनचुकपणा येणे अत्यंत महत्त्वाचे होते. अनेक प्रकारच्या कागदपत्रांचा अभ्यास करून श्री. बेंद्रे यांनी 'वन लाईन' कॅटलॉग कसा करावा याच्या विस्तृत माहितीचे पुस्तक तयार केले. 'Alienation office Records and Poona Dafter' हेच ते पुस्तक होय. इ. स. १९५० साली शासनाने प्रसिद्ध केलेले हे पुस्तक आजही वस्तुसंग्रहालय आणि अभ्यासक यांना उपयुक्त ठरत आहे. त्यांचा

'Report on the Peshwa Dafter or Guide to the Record' हा अहवालही उपयुक्त ठरला आहे. दप्तरखान्याप्रमाणे दक्षिणेकडे तंजावरच्या दप्तरखान्याचे विशेष महत्त्व आहे. त्याची व्यवस्था लावणे महत्त्वाचे होते. मद्रास सरकारने १९५२ मध्ये तंजावरचा दप्तरखाना तपासण्याची आणि आवश्यक ती व्यवस्था लावून देण्याची विशेष कामगिरी श्री. बेंद्रे यांच्यावर सोपविली होती. आश्चर्य म्हणजे त्यांनी दिलेल्या वेळेपेक्षा कमी वेळेत हे काम पूर्ण करून दिले.

भारत इतिहास संशोधन मंडळात ते सतत कार्यप्रवण होते. ते मंडळात अप्रकाशित साधने सादर करताना विशिष्ट घटनेकडे तात्त्विक दृष्टिकोनातून दृष्टिक्षेप टाकीत असत त्यामुळे 'इतिहासविषयक - तत्त्वचिंतक' अशी त्यांची नवी भूमिका अभ्यासकांसमोर येऊ लागली होती. अशाच मनःस्थितीत श्री. बेंद्रे यांचा 'साधन चिकित्सा' हा ग्रंथ पुण्यात प्रकाशित झाला. इतिहासाच्या चिंतनाच्या दृष्टिने त्यांचा हा पहिला ग्रंथ मानावा लागेल. हा ग्रंथ प्रसिद्ध करून विशेषतः नवीन अभ्यासक आणि संशोधक यांना त्यांनी बहुमोलाचे मार्गदर्शन केले.

महाराष्ट्रेतिहास परिषदांचे आयोजन करून त्यामध्ये वाचण्यात आलेल्या निबंधाचा संग्रहही त्यांनी केला व त्यांची ५ पुस्तके तयार केली आणि ती अभ्यासकांना उपलब्ध करून दिली. बेंद्रेंनी 'महाराष्ट्रेतिसाची साधने' नावाचे तीन ग्रंथ लिहिलेत ज्यामध्ये सर्व प्रकारच्या साधनांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. त्यांनी 'महाराष्ट्रेतिहासाचे संशोधनक्षेत्र व साधनसंपत्ति', 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रस्ताविक खंड) साधन चिकित्सा' या विविध ग्रंथांतून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या संदर्भात जे काही लिखाण केले त्यांचा विचार प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे.

[१] राष्ट्रीय इतिहासलेखनविषयक वा. सी. बेंद्रेंची भूमिका :

राष्ट्रीय इतिहासलेखनविषयक बेंद्रे आपली भूमिका स्पष्ट करतांना सांगतात की, "परकीयांनी लिहिलेला परकीय साम्राज्याच्या हालचालीचा इतिहास आणि राष्ट्रांचा स्थानिक लोकांच्या दृष्टिने लिहिलेला इतिहास यातील कमी अधिक भाव बराच जाणवतो. परकीय राजसत्ता असली तरी त्या सत्तेखाली वावरणाऱ्या स्थानिक समाजाचा बरावाईट इतिहास असतोच. राज्यक्रांतीमुळे त्यांच्या संस्कार-संस्कृतीला जरी उजाळा मिळाला असला तरी त्याबरोबर धक्काही बसलेला असतो. स्थानिक समाज जरी परकीयांच्या गुलामगिरीत राबण्यात समाधान माणून असला

तरी क्रांति उत्क्रांतीसाठी प्रयत्न करीत राहतोच. सुलतानांच्या राज्यांत अशा स्वातंत्र्याच्या भावना राजद्रोही ठरतात, तशाच त्या ब्रिटिश साम्राज्यातही राजद्रोहीच मानल्या जातात परंतु राष्ट्रीय इतिहासात हाच राजद्रोह स्वातंत्र्य संग्राम होतो."[१]

परकीय राज्यकर्त्यांनी लिहिलेला इतिहास आणि स्वकीयांनी लिहिलेला इतिहास अगदी जसा संबंधित परकीयांना उपकारक व स्फूर्तिदायक असेल तसा तो पारतंत्र्यांत वागणाऱ्या स्थानिक लोकांना वाटणार नाही. उलट स्थानिक समाजाच्या भूमिकेवरून लिहिलेला पारतंत्र्याचाही इतिहास स्थानिक लोकांना मार्गदर्शक व उपकारक होईल. दख्खनच्या इतिहासाची उभारणी जर मोगली, सुलतानी किंवा ब्रिटिश दृष्टिकोनातून केली तर तो महाराष्ट्राचा राष्ट्रीय इतिहास होणार नाही. अर्थात अशा इतिहासाच्या पुनर्रचनेत स्वकीयांच्या साधनसाहित्यात जो कार्यकारणभाव सापडतो त्यावरच प्रसंगांच्या तपशीलांची मांडणी होणे जरूरी आहे, अशी भूमिका वा. सी. बेंद्रे यांची असलेली आपल्याला दिसते.

[२] १९ व्या शतकातील ऐतिहासिक साधनसंपत्तीच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

ऐतिहासिक साधनसंपत्तीच्या संदर्भात मत प्रदर्शित करतांना वा. सी. बेंद्रे सांगतात, ऐतिहासिक साधनसंपत्ती जमा करून प्रकाशित केल्यावर जमा पुराणे-बखरीतील मजकुरावरील अभ्यासूंचा विश्वास उडू लागला होता. तसाच १९ व्या शतकात जे इतिहासग्रंथ निर्मित केले गेले त्यातील एकपक्षीय भूमिका व विपर्यस्तताही अधिकाधिक जाणवू लागली. ऐतिहासिक साधनसंपत्ती पुष्कळच उपलब्ध झालेली आहे. मात्र ज्या प्रकारे ही साधनसंपत्ती प्रकाशित केली गेली आहे ते प्रकार तितके शास्त्रशुद्ध नव्हते. त्याचे मुख्य कारण म्हणजे इतिहासशास्त्राचा अभाव हा विषय आपल्याकडे तितकासा अंगवळणी पडलेला नव्हता. इतिहास-संग्राहक-संशोधकांनी पुष्कळ मेहनतीने ही साधनसामग्री गोळा केली, परंतु ती ज्या वृत्तीने गोळा केली ती वृत्ती या साधनांच्या जोपासनेला तितकीशी पोषक झाली नाही. मिळालेला बराच संग्रह नाहीसा झाला. तो संग्रह नष्ट झाला, परंतु पूर्वी प्रकाशित केल्यामुळे आज छापील प्रतीत उपलब्ध आहे. तोही त्याच्या पार्श्वभूमीची माहिती न देताच छापला गेल्याने तितका बोलका राहीला नाही. इतकेच नव्हे तर त्यातील मजकुराचा कार्यकारणभाव

व राजकीय हालचालींशी असलेला संबंध जाणणे पुष्कळ वेळा कठीण होऊन बसते. त्यामुळे यांतील बरीच साधनसंपत्ती इतिहासरचनेत उपयोगात आणणे शक्य होत नाही.

ज्या घराण्यांतून कागदपत्रे मिळविली त्या घरण्याची जरूर ती माहिती व त्यांच्या कर्तृत्त्वाची पार्श्वभूमी मिळवून ठेवण्याची काळजी घेतली गेली नाही. तसेच ज्या संग्रहातून आपला भाग उचलला त्या संग्रहात काय आढळले वगैरे तपशील नोंदला न गेल्याने उपलब्ध केलेल्या साधनांचा उपयोग करतांना बऱ्याच अडचणी उपलब्ध होतात. काळाच्या ओघात व बदलाच्या परिस्थितीमुळे हे मूळ संग्रहच आता नष्ट झाल्याने प्रसिद्ध झालेल्या या थोडक्या साधनांचा उपयोग करणे तो फारच चिकित्सापूर्वक करणे भाग पडते. प्रसिद्ध झालेल्या साधनांच्या संपादनातही कालाची निश्चिती करणे, वाचनदोष होऊ न देणे वगैरे बाबींसाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन करून देणारे साहाय्यक ग्रंथ त्यावेळी उपलब्ध नव्हते. त्यामुळे या साधनांचा उपयोग करण्यापूर्वी या बाबींचाही पूर्ण विचार करणे जरूरी आहे. सरकारी संग्रह इतिहासाभ्यार्थ उघडे ठेवण्यात आले आहेत. परंतु नवीन मंडळींचा मोडीशी संबंधच तुटल्याने या संग्रहाचा जसा उपयोग व्हावा तसा होऊ शकत नाही.[२] असे बेंद्रे सांगतात.

[३] महाराष्ट्रेतिहासाच्या क्षेत्रासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

इतिहासदृष्ट्या महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र सारखे बदलत राहिलेले आढळते असे वा. सी. बेंद्रे सांगतात. महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाचे क्षेत्र गोदावरीच्या पूर्वेस असल्याचे आढळून येते. गोदावरीच्या पश्चिम भागांतील डोंगरी व जंगली प्रदेशात व कोकणच्या उत्तर भागांत वस्ती फारच विरळ होती. हा डोंगरी जंगली भाग जसा रहदारीस दुर्गम होता तशीच उत्तर कोकण भागात खाड्यांची पसरलेली खारटणे रहदारीस अवघड (दुर्घट) होती. त्यामुळे यादवांचा किंवा तत्पूर्वीच्या राजांचा अंमल या भागांत कधीच दूरवर पोहोचला नव्हता.

१७ व्या शतकात मराठ्यांनी या दुर्घट प्रदेशांत आपल्या हिंदवी स्वराज्याची मेढ प्रथम रोवली आणि या प्रदेशात नवीन नवीन गावे वसविण्यात आली. १७ व्या शतकांत याच भागाला मराठ्यांच्या इतिहासात महत्त्व आले आणि गोदावरीच्या पूर्वेकडील भाग मोगलांकडे गेल्याने त्यांचा संबंध काही काळ तरी तुटला. यादवांच्या पाडावानंतर बरेच महाराष्ट्रिक या बाजूस म्हणजे मावळ-कोकणात

येऊन राहिले होते. ते नागलोकात संमिश्र झाले. कारण हे महाराष्ट्रिक बहामनी राज्यांत नोकरीसाठी बेदरकल्याणीकडे गेले व तेथे वसाहत करून राहिले. तेंव्हा महाराष्ट्राच्या इतिहासाचे क्षेत्र दक्षिणेत दूरवर गेले. बहामनी राज्याची शकले पडल्यानंतर बरेच महाराष्ट्रिक पुन्हा निजामाबरोबर गोदावरीच्या पूर्वेस व अहमदनगर, जुन्नर या भागांत आले आणि त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. निजामशाहीत महाराष्ट्रिकांनी वऱ्हाड, खानदेश, औरंगाबाद, बेदर, कल्याणी, पुणे, सुपे या भागांत आपला बराच जम बसविला. मलिक अंबरच्या कारकीर्दित महाराष्ट्रिकांना वर डोकं काढण्यास बराच वाव मिळाला व त्यांनी पुणे, मावळ कोकण या भागांत वसाहती केल्या. १७ व्या शतकाच्या सुरुवातीस मोगल-निजमा यांच्या ३०-३५ वर्षाच्या अवधीत महाराष्ट्रिकांनी आपली बाजू बरीच सावरली आणि मोगली सरहद्दीवरील मोठा प्रदेश मराठा सरदारांकडे सरंजाम जहागिरीच्या रूपाने आला व निजमाशाहीतील भागावरही मराठ्यांचेच प्राबल्य वाढले. शाहाजीची महत्त्वाकांक्षा वाढली व त्याला बंगलूर कडील मोठी जहागिरी व फार मोठा सरंजाम व स्वातंत्र्य मिळाल्याने १७ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या सुरुवातीलाच 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापना झाली आणि त्यासाठी मावळ भागांपेक्षा कोकण भाग व रायगड अधिक सुरक्षिततेचा म्हणून 'हिंदवी स्वराज्या'ची राजधानी तिकडे गेली व नंतर या 'हिंदवी स्वराज्या'च्या अंमलाखाली फोंडा गोव्यापर्यंतचा भाग आला.

१७ व्या शतकाच्या अखेरीस या 'हिंदवी स्वराज्या'चे कार्यक्षेत्र उत्तरेस भडोच-बुंदेलखंड-बऱ्हाणपूर, पूर्वेस समुद्र किनाऱ्यापर्यंत व दक्षिणेस फोंडा-गोवा पर्यंत वाढले होते. त्याशिवाय कर्नाटकातील तंजावर-जिंजी वगैरे मोठा भाग संभाजीने जिंकला होता. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात शाहूने उत्तरेस आपले वर्चस्व अखिल भारतात पसरविले होते व राजक्षेत्र इंदूर, ग्वाल्हेर, नागपूर व्यापून राहिले. दक्षिणेतही हे क्षेत्र बरेच दूरवर नेले. नंतर मात्र कार्यक्षेत्र जरी दूरवर अखिल भारतभर पसरले होते तरी राज्यक्षेत्राचा भाग कमी कमी होत गेला. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटिशांचा अंमल आणि त्यामुळे वऱ्हाड, मराठवाडा, कर्नाटक, तंजावर येथे जरी मराठ्यांचा भरणा होता तरी महाराष्ट्राचे राज्यक्षेत्र जवळ संध्यापर्यंत राहिला.[३]

सारांश, महाराष्ट्राचे प्रत्यक्ष राज्यक्षेत्र व कार्यक्षेत्र यांच्या मर्यादा सारख्या बदलत राहिल्या असल्याने इतिहासाला आपला विस्तार त्या मर्यादेत बसविणे भाग पडते.

[४] वा. सी. बेंद्रे यांच्या मते महाराष्ट्राच्या इतिहासाचे विभाग :

इतिहासाचे स्थलनिर्देशाने, कालनिर्देशाने किंवा विषयावारी या तीन प्रकारांनी विभाग पाडले जातात असे बेंद्रे सांगतात.

महाराष्ट्र हा स्थळविभाग आपण इतिहासलेखनासाठी आखून घेतला व या महाराष्ट्राच्या इतिहास कालमर्यादेतप्रमाणे आणखी विभाग पाडू म्हटले तर (१) इ.स. ११ ते १४ व्या शतकाचा प्रथम विभाग, (२) १५ व १६ व्या शतकाचा द्वितीय विभाग, (३) १७ व्या शतकाचा तिसरा विभाग, (४) १८ व्या शतकाचा चौथा विभाग, आणि (५) १९ व्या शतकाचा पाचवा विभाग, असे ठोबळ मानाने पाच विभाग पाडता येतील. या पाच विभागांना यादवकाळ, मुसलमानी काळ, शिवशाहीचा काळ, पेशवाईचा काळ व इंग्रजी काळ अशी अनुक्रमे नावे देता येतील.[४]

स्थल व कालविभागानंतर विषयवारीतही तीन प्रकारचे पोटभाग पडतात असे बेंद्रे म्हणतात, (१) व्यक्तिविषयक म्हणजे चरित्रपर, (२) प्रसंगपर, (३) व्यवहारपर सांप्रत. पहिले दोनच विशेष रूढ आहेत. तिसरा विभाग फारच सूक्ष्म अभ्यासाचे द्योतक असून त्या अभ्यासास लागणारी आवश्यक साधने उपलब्ध नाहीत; परंतु हा तिसरा भागच विशेष महत्त्वाचा मानला जातो. कारण तो राष्ट्राला मार्गदर्शक असतो.[५]

महाराष्ट्राच्या इतिहासाचे जर विषयवारीचे विभाग पाडू लागलो तर कारकीर्दीच्या अगर चरित्रांच्या रूपाने बरेच भाग पाडले जातील. आदिलशाही, कुत्बशाही वगैरे स्थूल विभाग सोडले व नुसत्या शिवशाहीचे भाग पाडू लागलो तर शिवाजी, संभाजी, राजाराम, वेडा शिवाजी, संभाजी, ताराबाई वगैरेंच्या कारकीर्दी किंवा मोरोपंत, हंबीरराव, खंडो बल्लाळ वगैरे पुरुषांच्या चरित्रपर असे विविध भाग पाडता येतील. आणखीही त्या प्रसंगवर्णनाचे भाग पाडू म्हटले तरी अफझलवध, जयसिंगस्वारी, बाजीचा आत्मयज्ञ, राज्यरोहणादी प्रसंगवर्णने स्वतंत्रपणे लिहिता येतील. याहीपेक्षा तिसऱ्या म्हणजे व्यवहारपद्धतीने भाग पाडावयाचे असतील तर शिवाजीच्या किंवा इतर कोणाच्याही अंमलातील शासनपद्धती, आरमारी पद्धती, जमीनपद्धती, लष्करीपद्धती वगैरेंची तुलनात्मक इतिहासरचना करता येण्यासारखी आहे. जितकी बारीकसारीक विभागांवर इतिहासरचना होईल तितका स्वदेशाचा इतिहास पूर्णत्वास जाऊ लागला असे समजावे.

इतिहासाचे विभाग पाडतांनाही काही निर्बंध पाळावे लागातात असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. स्थल विभाग पाडताना आपण आपल्या स्थल विशेषाला मर्यादित करतो ते स्थल राजकीय, सामाजिक अगर धार्मिक बाबतीत तरी एक घटक असावे, किंवा ते स्थल राजकीय किंवा इतर सोईसाठी प्रांतवारीने घटक मानलेले असावे. कालविभागांसाठी कालमर्यादा ठरवायची ती त्या देशातील अगर स्थल विभागातील राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक प्रवृत्तीवरून ठरवावी. विषयवारीने भाग पाडताना स्थलकालाचे सर्वच निर्बंध पाळणे आपोआपच भाग पडत असते.

[५] वा. सी. बेंद्रे यांनी महाराष्ट्र इतिहासलेखनाच्या प्रयत्नांचा घेतलेला आढावा :

बेंद्रे म्हणतात, महाराष्ट्राच्या इतिहासाचे कसेही व कितीही खंड पाहिले तरी त्या इतिहासाच्या व्याप्तीच्या मानाने इतिहासलेखनाचे प्रयत्न फारच अल्पच प्रमाणात झालेले आहेत. इंग्रजीच्या पूर्वीची इतिहासरचना व्यक्तिविषयक, एकांगी व अतिशयोक्तिपूर्ण आहे. पौराणिक कालाचा इतिहास पुराणातून ग्रंथित केलेला आहे. परंतु त्यावरून खरा इतिहास ओळखणे फार जड जाते. यानंतरचा इतिहास विशेषतः फारसी व मराठी बखरी व काव्यातून लिहिला गेला आहे. इंग्रजांपूर्वी ऐतिहासिक टिपणे करण्याची आवड असे. त्यात जगाच्या सुरुवातीपासून तो टिपणकाराच्या काळापर्यंत कोण कोण राजे होऊन गेले त्यांची नावानिशी व राजवटींची वर्षे देण्याचा प्रयत्न होत असे. कधी कधी या राजांच्या कारकीर्दीतील एखाददुसरा निवडक प्रसंग देण्यात येतो.

मुसलमानी पातशाहीपासूनचे प्रसंग मात्र बरेच नोंदवलेले आढळतात. शिवशाही व पेशवाईच्या शकावल्याही तयार केल्या जात असत. काव्यरूपात इतिहास लिहिण्याकडे बराच कल असलेला दिसतो. "परंतु या सर्व इतिहासलेखनात चिकित्सक पद्धतीचा अवलंब न केल्यामुळे बऱ्याच चुका राहिल्या आहेत. या सर्व लेखनात सशास्त्र इतिहासलेखन करणे हा मुख्य उद्देश नव्हता."[६] अशी समीक्षा बेंद्रे येथे करतात.

(अ) इंग्रजांचे योगदान :

इतिहासलेखनाचा सशास्त्र मार्ग इंग्रजी काळात इंग्रज अभ्यासुंच्या सान्निध्याने अवलंबिला गेला. इंग्रजीतच इतिहासलेखनास सुरुवात झाली असे म्हटले तरी चालेल असे सांगतात व बेंद्रे पुढे लिहितात; परंतु इंग्रजी अभ्यासुंचे लक्ष केवळ संस्कृत, अरबी, फारशी यांसारख्याच भाषा

शिकण्याकडे व त्यांत प्रावीण्य मिळविण्याकडे राहिल्याने यांचा कल विशेषतः मुसलमानी व त्यापूर्वीचा इतिहास लिहिण्याकडे होता. हे इंग्रजी अभ्यासू भाषा शिकतानाच त्या भाषेत जी साधनसामुग्री त्यांना उपलब्ध होई तिचे संशोधन करीत असत. विशेषतः लष्करी अंमलदारांनीच इतिहासात बरेच लक्ष घातले होते.

रॉयल एशिॲटिक सोसाटीसारख्या संस्था स्थापन करण्यात आल्या व त्यांनी स्वतःची त्रैमासिकेही चालू केली. इंडिअन ॲंटिक्वेरी, एपिग्राफिका इंडिका वगैरे सारखी इतिहासाला वाहिलेली स्वतंत्र नियतकालिकेही काढण्यात आली. हे इंग्रज अभ्यासू विशेषकरून अधिकारीवर्गातील असल्याने त्यांना या कार्यासाठी सरकारी मदत सहज मिळविता आली. यांनी संस्कृत काव्यग्रंथ वगैरे जमविण्याचा सारखा तडाखा लाविला होता. निरनिराळ्या ठिकाणचे शिलालेख व ग्रंथसंग्रह वगैरेंची यादी करण्याकरिता सरकारी खर्चाने सरकारी अधिकारी नेमून घेतले होते. उपलब्ध झालेले ताम्रपटही छापून काढले. इ.स. १९०४ 'इंडिअन ओल्ड मॉन्युमेंट्स प्रोटेक्शन ॲक्ट' ही करून घेतला.[७]

मध्ययुगीन कालाच्या इतिहाससंशोधनात सर टेम्पल, फ्लीट, वर्डवुड, बर्जीस, सिवेल, वॉल्टर इलिअट, विल्सन, ब्राऊन, बर्नेल, राइस, यूल, कनिंगहॅम, हेग वगैरे युरोपीय पंडितांनी जी मदत केली ती फार महत्त्वाची आहे. परंतु या इतिहासलेखनात त्यांना फारसे यश आले नाही. इतिहासलेखनातील बराचसा प्रयत्न व्यक्तिशः झाल्या कारणाने त्याना जितके संघटित रूप यावे तितके आले नाही. उलट बरेचसे जुने ग्रंथ व्यक्तिगत झाल्याने व दूरदेशी जाऊन पडल्याने त्या ग्रंथाच्या साहाय्याने पुन्हा चर्चा करण्याइतकी सामुग्री नवीन चिकित्सक संशोधकास मिळणे सुसाध्य राहिले नाही.

युरोपीय पंडितांबरोबरच बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भांडारकर, सुखटणकर, छत्रे, भाऊ दाजी, कीर्तने, यझदिनी, कृष्णशास्त्री, बापट, गोपीनाथराव, रंगाचार्य, सुब्रम्हण्यम अय्यर, बी. सुर्यनारायणराव वगैरे मंडळींनीही श्रम घेतले, असे बेंद्रे म्हणतात व पुढे सांगतात, यांच्या आस्थापूर्वक श्रमामुळेच आपणाला आपला मध्ययुगीन काळाचा आपलेपणाने लिहिलेला इतिहास लाभत आहे. कॅपबेलच्या गॅझिटिअर रचनेच्यावेळी ही मंडळी सारखी परिश्रम घेत होती. म्हणून गॅझिटिअरमध्ये पुराणकालच्या व मध्ययुगीन कालाच्या इतिहासांनी बराच भाग व्यापला आहे.

गॅझेटिअर रचनेपूर्वी जी मुंबई व इतर प्रांतांची सरकारी 'सिलेक्शन'ची पुस्तके निघाली त्यावरूनही सरकार व सरकारी अधिकारी आणि विशेषत: लष्करी अधिकारी या इतिहासरचनेत मन घालून किती आस्थापूर्वक परिश्रम करीत असे हे दिसून येते. परंतु "या मध्ययुगीन कालाच्या इतिहासाला जितकी अभ्यासू मंडळी व सरकारी मदत मिळाली तिच्याकडे लक्ष दिले तर मुसलमानी व मराठीशाहीतील इतिहासाची हेळसांडच झाल्याचे दिसून येते."[८]

फारशी ग्रंथाच्या अभ्यासामुळे मोगली इतिहास बराच उपलब्ध होऊ शकला परंतु या इतिहासासाठी फारसे परिश्रम घेतल्याचे दिसून येत नाही. मराठ्यांच्या इतिहासाकडे या अभ्यासुंची दृष्टि न वळण्याची कारणे अनेक आहेत. मुख्य कारण म्हणजे साधनांचा अभाव, परंतु इतरही कारणे झाली. त्यांत प्रतापसिंहाच्या लंडनमधील कैफियतीने इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनात उत्पन्न झालेली तेढ, मराठे व इंग्रज यांच्यामधील हिताहित संबंधांबद्दलची जागृत असलेली जाणीव, इतिहासकालीन साधनांच्या चिकित्सेत व्याकरणासारख्या साधनाअभावी येणाऱ्या भाषेच्या व लिपीच्या अडचणी, साधनांच्या किंवा इतिहासाच्या लेखनाने प्रत्यक्ष खालसा जमिनीवर येणाऱ्या हक्काबद्दलची ब्याद, इनाम, रेकॉड्‌र्स, कमिशनची योजना व त्या कमिशनचा ढिलाई कारभार, इनाम रेकॉड्‌र्स कमिशनमुळे नंतरच्या अधिकाऱ्यांनी ऐतिहासिक साधनप्रकाशनाच्या बाबतीत स्वीरकारलेले दिरंगाईचे धोरण, शिवाजी उत्सव व राजकारण यांचा संबंध एकत्र जडविल्याने सरकारचे मनात उद्‌भवलेला किंतु अशी बारीकसारीक पुष्कळ कारणे झाली की, त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासरचनेकडे सामान्यजन किंचित साशंकतेने पाहू लागले.

साधनाभावाला मुख्य कारण म्हणजे इनाम-कमिशन होय. इनाम कमिशनसाठी बहुतेक सर्व खेड्यापाड्यांतून दफ्तरखाना गोळा करून आणला. त्यातील बराचसा दफ्तरखाना जप्त झाला व तो हल्ली 'एलिनिरशन दफ्तर' म्हणून पुण्यात ठेवला आहे. त्यातील रद्दी कागदांबरोबर मुद्यांचे कागदही नाश झाल्याचे दिसते. तसेच त्यांतील काही महत्त्वाचे कागद म्हणजे राजकीय स्वरूपाचे कागद मुंबई सरकारने आपल्या खास दफ्तरखान्यात ठेवल्याचे समजते.

आर्म, स्कॉट, वेअरिंग, डफ, एल्फिन्स्टन यांनी या इतिहासाच्या बाबतीत जी विशेष खटपट केली ती फार महत्त्वाची आहे. न्या. रानड्यांनी व चिपळुणकरांनी या इतिहासरचनेस निराळीच दृष्टि

देऊन देशात इतिहासरचनेची जागृती करून दिली. मोडक, केळुस्कर वगैरेनींही इतिहास रचले. सरदेसाई यांनी रियासती लिहिल्या. इतर मंडळींनीही शालोपयोगी इतिहासाची पुस्तकरचना केली. परंतु या सर्वात चिकित्सक दृष्टिने मराठ्यांचा इतिहास अभ्यासिला नाही. ही गोष्ट निर्विवाद आहे असे बेंद्रे म्हणतात. रा. ब. साने, राजवाडे, पांडोबा पटवर्धन, खरेशास्त्री वगैरे इतिहाससंशोधकांचीच विचारसरणी युक्त होती यात शंका नाही.[९]

[६] इतिहास संशोधनातील अडचणी संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

बेंद्रेंनी इतिहास संशोधनातील अडचणीसंदर्भात मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील इतिहासलेखन प्रगतीवर नसल्याचे कारण तत्कालीन राजकीय परिस्थितीला मानतात.[१०] प्राचीन इतिहासाला जितके प्रोत्साहन मिळत होते तितक्याच अविश्वासाने या मराठ्यांच्या इतिहास संशोधनाच्या हालचालीकडे इंग्रज सरकार पहात होते. कारण इंग्रज मराठ्यांच्या संघर्षाची आठवण जनतेत जागृत होती. मराठ्यांच्या मनात स्वराज्याविषयी आस्था खेळत होती. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाबाबतच्या जागृतीविषयी इंग्रज सरकार संशयाने बघत होते असे सांगितले आहे.

सरकारी विशेषतः पेशवे वगैरेचे मराठी-दफ्तरखाने व इंग्रज कंपनीचे दफ्तर इतिहासाभ्यासास मोकळे नव्हते. हीच दफ्तरे लंडनमध्ये सर्रास वापरू देत होते. परंतु त्याच पत्रांच्या मुंबईतील स्थळप्रती पाहणे दुष्कर झाले होते. 'आपल्या साम्राज्य सरकारच्या मनोगतानुसार राजे-रजवाडे आपल्या जुन्या संग्रहातील ऐतिहासिक साहित्य वापरू देण्यास नाखुश होते. मोठमोठ्या सरदार जहागिरदारात भाऊबंदकीची भांडणे चालू होती. आपले एखादे कागदपत्र प्रकाशित झाले तर त्यामुळे आपल्या प्रतिपक्षाला आपल्या विरूद्ध पुरावा सापडू नये म्हणून तोही आपला संग्रह गुप्त राखण्याचा प्रयत्न करित होते.'

संतसाधुंच्या घराण्यातील वाडे गुप्ततेच्या कारणासाठी मिळू शकत नव्हती. सरकारी पेशवे दप्तरांतून इतिहासार्थ कागदपत्रे दाखविण्याचा प्रश्न विशेष काळजीपूर्वक हाताळला जात होता. तेव्हा त्याच दप्तरांतील कागदपत्रांच्या नकला 'अस्सल' म्हणून कोर्टातील भाऊबंदकीच्या खटल्यांसाठी अगदी थोड्याच प्रयत्नाने मिळू शकत होत्या. नामशेष झालेल्या घराण्यांत कांही संग्रह होते ते

अस्ताव्यस्त - त्यांस उपयोग नसल्याने - पडलेले होते. काही काळांनी ते गहाळ होऊ लागले व नंतर चार दोन रुमालांतून मिळू लागले.[११]

१९३५ नंतर सरकारी दप्तरखाने इतिहासाभ्यासुंना मोकळे झाले. जहांगिरदार व संस्थानिक यांच्यातही आपल्या घराण्यांच्या इतिहासाबाबत जागृती झाली. आता प्रकाशित झालेल्या संग्रहापेक्षा सरकारी दप्तरखाने पुष्कळच महत्त्वाचे असल्याने अभ्यासुंपुढे साहजिकच या दप्तरखान्यांतील साधनांच्या उपयोगाकडे विशेष लक्ष लागले आहे. परंतु ह्या दप्तरखान्यांचा आपल्या विषयासाठी थोड्या अवकाशात उपयोग करिता येईल अशी संदर्भ-सूचि तयार नसल्याने ह्या अफाट संग्रहाचा उपयोग करणे जड जाते. या दप्तरखान्याची ठेवण दैनंदिन राजकारभाराकरिता केली गेली असल्याने ऐतिहासिक प्रसंगांच्या संदर्भात उपयुक्त किंवा तत्संबंधी सर्व पत्रव्यवहार एकत्रित मिळू शकत नाही.

या विविध इतिहास संशोधनातील अडचणींचा विचार करण्यात आलेला आहे.

[७] इतिहासलेखनासाठी पुराव्यांचा अभ्यास कसा करावा यासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

"कल्पकतेच्या जोरावर रचलेला इतिहास कादंबरीच्या जाती समाविष्ट होतो. ऐतिहासिक साधनांच्या आधारावर शास्त्रशुद्ध लिहिलेला इतिहास जातिवंत इतिहासात जमा होतो."[१२] म्हणजे काय तर कल्पक लिखाणाला इतिहासलेखनात वाव नसतो असे वा. सी. बेंद्रे सांगतांना दिसतात. ते पुढे म्हणतात, "शास्त्रीय किंवा इतिहाससंशोधकाला पुराव्यांच्या अभावी निर्णय थांबवावा लागतो. जर त्याला उपलब्ध पुरावा कोणत्याही निर्णयास पुरा न वाटेल, परंतु प्रकरणावरील निर्णय त्या पुराव्यावरून काढता येत असेल तर निर्णय संभवात्मक म्हणून द्यावा लागतो आणि अधिक पुराव्याची वाट पाहणे भाग पडते. संशोधनात हाच मार्ग उचित असतो परंतु जर काही मर्यादा या सत्यसंशोधनात कोणी घालून घेऊ म्हणेल तर मात्र ते त्याचे करणे ज्ञानार्जनाच्या दृष्टिने घात होईल."

न्यायदानाच्या व इतिहासलेखनाच्या संदर्भात बेंद्रे सांगतात की, न्यायदानात भांडणे त्वरित तोडण्याच्या मुख्य उद्देशामुळे कोणता पुरावा स्वीकारावयाचा व कोणता न स्वीकारावयाचा हे निर्बंध घालून ठरविणे भाग पडते, उलट शास्त्रात व इतिहासात निर्णयासाठी कायद्यातले निर्बंध घालण्याची जरूर नसते. त्यांना सर्व प्रकारचे पुरावे जमेस धरणे भाग असते, कायद्याने जे निर्बंध घातलेले

असतात तेच निर्बंध आपण इतर शास्त्रात किंवा इतिहासात घालू लागलो तर सर्वच उपलब्ध पुरावे सोडून द्यावे लागतील.

उदाहरण सांगतांना ते पुढे लिहितात, कोणत्याही लिखाणाची नक्कल काही अपवादाखेरीज पुराव्यास न धरणे, साक्षीदाराला दुसऱ्या माणसाच्या मताबद्दल वगैरे बोलू न देणे असले कायद्यातील निर्बंध जरी कितीही चांगले असले तरी ते इतिहासात स्वीकारता यायचे नाहीत, परंतु इतके मात्र खरे की, पुराव्याच्या कायद्यांत ग्रंथित केलेली कित्येक तत्त्वे फारच उपयुक्त असून ती संशोधनात मार्गदर्शक होतील. दुय्यम दर्जाच्या पुराव्यापेक्षा अव्वल पुरावा अधिक विश्वासार्ह मानावा हे तत्त्व सर्व परीक्षणात केव्हाही महत्त्वाचेच ठरेल. कारण त्यात हेतुपूर्वक किंवा सहज चुकीने होणारे दोष राहत नाहीत. इतिहास अगर साधनलेखक दुसऱ्यांनी सांगितलेला मजकूर मूळ पाहिल्याशिवाय लिहितांना बरोबर नक्कल करू शकेल असे नसते. त्यात त्यांची चुकीचीही समजूत झाली असण्याचा संभव असतो. कदाचित विस्मृतीही होणे साहजिक आहे. परंतु हे दोष न्यायदानात येऊ देणे योग्य नसते.

"इतर शाखांतील पुराव्यात फारसा सहेतुक विपर्यास आढळत नाही; परंतु इतिहासात मानवी हालचालींबद्दलच विशेष बोलावयाचे असल्यामुळे पुरावे देणाऱ्या साक्षीदारांच्या मनावर स्वार्थादी संबंधामुळे अनेक तऱ्हेचे परिणाम झालेले असतात. त्यामुळे इतर शास्त्रांतील पुराव्यात व इतिहासाच्या पुराव्यात गुणदोषाच्या बाबतीत बरीच भिन्नता आहे. इतिहास व इतर शास्त्रात पुराव्याच्या उपयोगाच्या बाबतीतही भिन्नता दृष्टिस पडते."[१३]

जे पुरावे उपलब्ध असतात ते सामान्य स्वरूपाचे व स्वभावधर्माचे असतात. ते व्यक्तिविशेष किंवा विवादीत स्वरूपाचे नसतात. म्हणून हे सृष्टिविषयक शास्त्रांतील पुरावे सिद्धांतरूप ठरतात. इतिहासात याचे उलट स्थिती आढळते. कारण त्यात मानवी हालचालींच्या वृत्तांताचीच जुळणी विशेष केली जाते. अशा हालचालीत कोणतीही एक हालचाल तपशीलाने व स्वरूपाने दुसरीशी साम्य असल्याचे अगदी क्वचितच संभवते. त्यामुळे स्वरूपाने व गुणाने असमान असलेल्या हालचालीवरून सामान्य सिद्धांत बसविता येणे शक्य नसते. फार तर एकाच जातीच्या अनेक हालचालींची तुलना करता येऊन त्यातून ठोकळ मानाने काही मर्यादेपर्यंत त्यांच्या कार्य-कारण-

भावाबद्दल थोडेसे अनुमान-सिद्धांत सांगता येतील. परंतु या सिद्धांताना सामान्य सिद्धांतासारखे निर्णयात्मक सिद्धांत म्हणता येणार नाही.[१४]

प्रत्यक्ष प्रयोग करून अनुभवलेले ज्ञान ते प्रत्यक्ष ज्ञान होय; आणि शास्त्रज्ञ बहुधा प्रत्यक्ष ज्ञानावरच विशेष जोर देत असतो; व पुराव्यांचे परीक्षण व एकीकरण ठरावीक अनुमान पद्धतीने करतो. इतिहासात यांच्या अगदी उलट स्थिती आढळते. ऐतिहासिक पुराव्यातून कारणात्मक मजकूर प्राप्त होईल म्हणावे तर ते सर्व पुरावे तपशीलात्मक असतात व कार्ये म्हणजे ऐतिहासिक प्रसंग अज्ञात असतात. त्यामुळे कार्ये व कारण यांतील संबंध दर्शविण्यास कोणतीच ठरावीक अनुमानपद्धती स्वीकारता येत नाही. फार तर असे तपशील एकत्र करून व त्यांचे परीक्षण करून ते सत्य आहेत काय, असल्यास कोठेपर्यंत त्यात सत्यत्त्व असू शकेल, याचा आपणाला अंदाज काढता येईल. असा अंदाज कदाचित खात्रीलायक असू शकेल व त्याबद्दल विचारी माणसाला संशयही वाटणार नाही; परंतु तो अंदाज एखादेवेळी संशायत्मक व संभवनीयही असू शकेल.[१५]

इतिहास-संशोधक आपल्या समजुतीप्रमाणे एखादा निर्णय देईल; परंतु तो निर्णय शास्त्रज्ञाप्रमाणे प्रत्यक्ष पडताळून पाहता येणे शक्य नसल्यामुळे त्या निर्णयाला निर्णायक स्वरूप राहणार नाही. इतिहास-संशोधक ज्यावेळी निर्णय हा शब्द वापरतो त्यावेळी त्या शब्दाचा अर्थ अधिक विश्वसनीय इतकाच असतो. शास्त्रज्ञ निर्णयात्मक बोलू शकेल. इतिहास-संशोधकाचे शोध नेहमी संभवात्मकच राहतील. सृष्टिशास्त्रातील परिणाम दृष्टिगोचर होणारे असून सामान्यत: सिद्धच असतात. इतिहासातील परिणाम म्हणजे ऐतिहासिक प्रसंग अज्ञात असून सिद्ध करण्यास कठीण असतात.

सारांश, पुराव्याचा उपयोग करताना इतिहासलेखकाला इतर शास्त्रांतील पुराव्यांच्या बाबतीतील निर्बंधांपेक्षा अगदी वेगळेच निर्बंध घालून घ्यावे लागतात व कायदेपंडित किंवा शास्त्रज्ञ यांच्या पुराव्यांच्या परीक्षणांपेक्षा त्याचेवर अधिक जबाबदारी येत असते. अर्थातच इतिहासासाठी पुराव्यांच्या परीक्षणाचे नियम बरेच भिन्न असावे लागतात. यामुळे इतिहास संशोधकाला या निर्बंधाच्या ज्ञानाची प्राप्ती केल्याशिवाय इतिहास संशोधनाचा कारभार बिनचूक आटोपता येत नाही. कोणत्याही शास्त्रांतील तत्त्वे नवीन शास्त्रीय पुस्तकाने निर्माण करण्यात येत नसतात, तर अस्तित्वात

असलेल्या तत्त्वांचे नियमीकरण करणे हेच शास्त्राची किंवा कलेची वाढ झपाट्याने होऊ लागते. जो इतिहासाभ्यासू या शास्त्रीय नियमानुसार आपला अभ्यास करून इतिहासातील सत्यशोधनाचा प्रयत्न करतो त्यालाच इतिहास संशोधक म्हणतात; आणि इतिहास संशोधक जो इतिहास तयार करतो त्याला संशोधकीय इतिहास म्हणतात. कोणत्याही अभ्यासात पूर्वग्रहावरून अनेक अडचणी येतात. इतिहासातही त्या येत असतात. त्या प्रथम दूर करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय अभ्यासात किंवा इतिहास संशोधनात प्रगती करून घेता येणे शक्य नसते. प्रथम आपण ज्ञानाच्या कोणत्या पायरीवर आहोत ते आपण ओळखले पाहिजे. नंतर आपण कोणत्या परिस्थितीत अभ्यास करू म्हणतो त्या परिस्थितीचे ज्ञान करून घेतले पाहिजे; म्हणजेच अभ्यास नीट करता येऊन यश संपादता येईल. कोणत्याही ज्ञानसंवर्धनाच्या मार्गात मनुष्याला जे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष ज्ञान झालेले असते; त्याचा त्याचेवर परिणाम झालेला असतो. या परिणामांना संस्कार असे म्हणतात. जेव्हा या संस्कारांविरूद्ध एखादी गोष्ट करावयाचा प्रसंग येतो तेव्हा मागील संस्कार झटकन विसरता येत नाहीत. अभ्यासुंची अशी स्थिती होते तर इतर जनांनी संस्कारास चिकटून राहून नवीन ज्ञानास विरोध केला तर नवल कसले? असा प्रश्न वा. सी. बेंद्रे विचारतात. इतिहासाचेबाबतीत या संस्काराचे परिणाम नेहमी पाहावयास सापडतात. म्हणून प्रथम मूळ साधनचिकित्सेच्या अभ्यासापूर्वी इतिहासलेखनात संशोधकाला वर्तमान परिस्थितीत कोणकोणत्या अडचणी येऊ पाहतात त्याचे प्रथम ज्ञान करून घेणे इष्ट आहे.

[८] ऐतिहासिक पुराव्यासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

ऐतिहासिक पुरावे विविध असून त्यांचे इतिहास रचनेतील महत्त्वही विविध आहे. ऐतिहासिक पुराव्यांचे मुख्यतः दोन भाग पडतात - (१) प्रत्यक्ष पुरावे, (२) अप्रत्यक्ष पुरावे.

प्रत्यक्ष पुराव्यात सर्व लेखसंग्रहांचा समावेश होतो. ज्या लेखात लिहिणारा काहीतरी ऐतिहासिक काळाविषयी सांगतो असे सर्वच लेख इतिहासाचे पुरावे म्हणून ठरतात. मग अशा लेखांत सत्यता असो वा नसो, त्यात सांगणारा जाणूनबुजून खोटे सांगत असो अगर अज्ञानाने लिहीत असो; परंतु तो काहीतरी सांगत असतो व त्यावर इच्छित वाचकांनी विश्वासावे अशी त्याची इच्छा असते. म्हणून या प्रत्यक्ष पुराव्याखाली सरकारी खास पत्रांपासून तो थेट खासगी सर्व प्रकारच्या कागदपत्रांचा

समावेश होतो. अप्रत्यक्ष पुराव्यात इतिहास सांगण्याचा आशय नसतो; परंतु अशा पुराव्यांवरून इतिहासातील प्रत्यक्ष पुरावे पडताळून पाहता येतात. यांत किल्ले, शहरे, गावांगावातील अंतर, डोंगरे, नद्या वगैरेचा समावेश होतो. तसेच यात दंतकथा, गोष्टी वगैरेंचाही समावेश करावा लागेल. मनुष्याच्या हातून अज्ञानाने अगर काही उद्दिष्ट साधण्याच्या हेतूने चुका होणे साहजिकच असते. त्यामुळे ऐतिहासिक पुराव्यातही खरेखोटेपणाबद्दल विशेष चौकशी करून घेणे भाग पडते.

कोणत्याही पुराव्यांचे परीक्षण करतांना मुख्य सहा प्रश्न आपणापुढे उभे राहतात असे बेंद्रे सांगतात. ते प्रश्न म्हणजे -

(१) आपला साक्षीदार ज्या विषयाबद्दल पुरावा सांगतो त्या विषयातील सत्य किंवा खरी परिस्थिती माहीत असण्याची संधी किंवा साधने त्याला प्राप्त होती किंवा कसे?

(२) जर त्यानेच ती माहिती प्रत्यक्ष पाहून दिली असेल तर ती त्याने पूर्णपणे बिनचूक व पूर्णपणे पाहिली आहे काय?

(३) माहिती देतांना जी गोष्ट पाहिली अगर ऐकली ती गोष्ट त्याला पूर्णपणे बिनचूक समजली आहे काय?

(४) साक्षीदार खरे सांगणारा आहे काय?

(५) साक्षीदार मुद्दाम खोटे सांगण्याचा संभव आहे काय?

(६) साक्षीदाराचा त्यात बरा-वाईट हितसंबंध आहे काय?

अशा तऱ्हेची आणखीही प्रश्नावली उभी राहून तिचे समाधानकारक उत्तर मिळाले की मग आपला त्या साक्षीदाराच्या सांगण्यावर विश्वास बसतो. लेखही प्रत्यक्ष साक्षीदाराचाच आहे किंवा नाही हेही तपासणे जरूर पडते. जर लेख अस्सल किंवा मूळ नसेल तर त्या लेखात नंतरही चुकीचा मजकूर शिरणे शक्य असते. त्यामुळे मूळ साधनांचे परीक्षण करणे जरूरी होते.

ऐतिहासिक प्रत्यक्ष पुरावा देणाऱ्या साधनांतही दोन विभाग पडतात - (१) प्रत्यक्ष पाहून अगर अनुभवून लिहिलेली साधने व (२) ऐकून अगर माहिती मिळवून प्रसंगाचा तपशील देणारी साधने.

पहिल्या साधनांचे परीक्षण फारसे कठीण जात नाही; परंतु दुसऱ्या प्रकारच्या साधनांच्या परीक्षणात बरीच खबरदारी घेणे जरूर पडते. कोणतेही साधन परीक्षणासाठी आपल्यापुढे येताच मुख्य

प्रश्न समोर उभा राहतो की, जे साधन आपल्यासमोर आहे ते मूळ लेखकांनी जे लिहिले तेच आहे काय? असे बेंद्रे म्हणतात. तेच असेल तर त्यातील लेखनपद्धती, भाषा, जुनेपणा सापडण्याचे ठिकाण, त्याठिकाणी का आले वगैरे प्रश्नांची आपणास आपोआपच समाधानकारक उत्तरे मिळू शकतात. एकदा का साधन मूळ आहे हे निश्चित झाले की मग साधनाच्या अंतर्रंग परीक्षणाकडे वळता येते आणि अंतर्रंग तपासू लागलो म्हणजे पुन्हा एक प्रश्नावली पुढे येते की, (१) लेखक सांगतो काय किंवा लेखकाचा सांगण्याचा हेतू कोणता आहे? (२) तो जे सांगतो त्यावर त्याचा विश्वास आहे काय? (३) विश्वास असल्यास तो त्यावर सकारण विश्वास ठेवीत आहे काय? हे व अशा तऱ्हेचे आपण शोधक प्रश्न केले म्हणजे आपण अगदी लिहिणाराच्या मनःस्थितीपासून तो थेट आपल्या हातात साधन येऊन पडेपर्यंतचा सर्व इतिहास आपल्या डोळ्यासमोर आणीत असतो.

परीक्षणास घेतलेला लेख जर मूळ लेख नसेल तर तो मूळ लेखाची बिनचूक नक्कल असू शकेल काय? तो मुळानंतर किती काळाने नक्कल केला गेला? हा दरम्यानचा काळ जितका अधिक तितका नकलेत दोष येण्याचा संभव अधिक असतो. म्हणून जर नक्कल कालावधीने केली गेली असेल तर त्यात कोणते दोष शिरले आहेत? नकलेत मूळ भाग राहिला आहे किंवा नाही? वगैरे अनेक तऱ्हेचे प्रश्न उपस्थित करून नक्कल तपासून घेतली म्हणजे मग अंतर्रंग परीक्षणाला सुरुवात करता येते. या अंतर्रंग-परीक्षणात वर दिलेली साक्षीदाराची पात्रता, इमान, बिनचूकता, खरे सांगण्याचा उद्योग वगैरे गोष्टी येतात.

जेथे एकापेक्षा अधिक साक्षीदार असतात त्याच्या प्रसंगनिवेदनात तीन प्रकारचा फरक असण्याची शक्यता असते -

(१) सर्वांची प्रत्येक तपशीलात अगदी एकवाक्यता असते.

(२) सर्वांची प्रत्येक तपशीलात मतैक्यता नसते, किंवा

(३) सामान्यतः जरी एकवाक्यता असली तरी कोठे कोठे मतभेद व तपशीलात भिन्नत्व असू शकते.

ज्या ठिकाणी सर्व साक्षीदार बिनचूक सारखाच तपशील देतात त्यावेळी ते सर्व साक्षीदार निरनिराळे आहेत का एकाचेच अनुवादक आहेत हे तपासावे. बहुधा ते सर्व एकाचेच अनुवादक

असल्याचे आढळून येईल. जेथे प्रत्येक तपशीलात मतैक्यता नसते तेथे कोण खरा व कोण खोटा हे शोधणे शोधकाच्या माहितीवर व निर्णायक शक्तीवर अवलंबून राहते. अशावेळी ज्या कारणाकरता एक तपशील मान्य होतो. त्याच कारणाकरता दुसरा नेहमीच अमान्य करण्यात येत असतो. कित्येक वेळा तसे करण्यास आणखी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पुरावाही लागतो. जेथे प्रसंगात सामान्यतः एकवाक्यता असून बारीकसारीक तपशीलात भिन्नता असते तेथे फारशी अडचण येत नसते असे बेंद्रे म्हणतात. नेहमीच कोणीही दोन प्रत्यक्ष साक्षीदार एकच प्रकाराने प्रसंग सांगताना क्वचितच आढळू शकता. प्रसंगातील एखादी बारीकसारीक बाब एक काळजीपूर्वक न्याहाळून पाहिलं तर दुसरा त्याकडे दुर्लक्ष करील. एखाद्याला एखाद्याबाबतीत विशेष महत्त्व वाटेल तर दुसऱ्याला त्यात वाटणार नाही असे बेंद्रे पुढे लिहितात.[१६]

[९] वा. सी. बेंद्रे यांनी इतिहास-रचनेतील सामान्यवादासंदर्भात मांडलेले विचार :

वा. सी. बेंद्रेंच्या मते सामान्य प्रवृत्तीशिवाय इतिहासात काही चर्चेच्या विशिष्ट प्रवृत्ती असल्याचे आढळते. या प्रवृत्तीवरून जे वाद उत्पन्न होतात त्यांतील मुख्य वाद - (अ) साधनाच्या प्रकाशनाची युक्तायुक्तता ठरविण्यात (ब) व्यक्तिविषयक प्रयत्नांतील व्यक्तिविशिष्ट गुणदोष विवेचनात (क) संग्राहक लेखक यांच्या परस्पर संबंधात उत्पन्न झालेले दिसतात, असे ते वाद आहेत.

(अ) साधनाच्या प्रकाशनाची युक्तायुक्तता ठरविण्यात :

ज्या देशाच्या इतिहासाचा नुसता सांगाडाही तत्कालीन लोकांनी तयार केलेला जेथे उपलब्ध नसतो व त्यानंतर सापडलेल्या अविशिष्ट पुराव्यांवरून रचलेला सांगाडाही शास्त्रशुद्ध तयार झालेला नसतो, तिथे मात्र संशोधकांनी कोणत्या मार्गाने आपले संशोधन करावे हे ठरवून घेणे फार कठीण जाते. ऐतिहासिक प्रसंगांचा नक्की कालनिर्देश केलेला नसतो म्हणून त्या प्रसंगांबद्दलचे संशोधन अमुक एका कालापुरते मर्यादित करता येत नाही. प्रसंगांची मांडणी संगतवार केलेली नसते; म्हणून साधनांतील गर्भितार्थ समजत नाही. कित्येक प्रसंगांचा अजूनही पत्ता लागलेला नाही म्हणून ऐतिहासिक उपलब्ध प्रसंगांवरून निश्चित अनुमाने काढणेही जड जाते. अशा स्थितीत तत्कालीन ऐतिहासिक कागदपत्रांची किंवा ऐतिहासिक साधनांची तपासणी करून त्यांच्या युक्तायुक्ततेबद्दलचा विचार ठाम करणे व त्यांची प्रसिद्धीसाठी निवड करणे फार कठीण जाते.

विशेषतः कित्येक प्रसिद्ध व्यक्तींची व स्थलांची आपणास नुसती ओळखही न झाल्याकारणाने व त्यांच्याबद्दलची पुरेशी माहिती उपलब्ध नसल्यामुळे तर ऐतिहासिक साधनांचा दर्जा ठरविणे मुश्किलीचे होऊन बसते. म्हणून अमुक एक प्रकारचीच साधने इतिहासास योग्य व बाकीची सर्व टाकाऊ अतएव प्रसिद्धीस अयोग्य असे म्हणणे रास्त/ योग्य होणार नाही. कारण जे साधन विवक्षित माणसाच्या मर्यादित दृष्टिला टाकाऊ वाटेल तेच साधन दुसऱ्या एखाद्या प्रसंगी दुसऱ्याला मोठे महत्त्वाचे असे वाटेल. कोणालाही प्रत्येक साधनाचे सर्वांगीण परीक्षण करणे शक्य नाही.[१७] कारण साधनांच्या परीक्षणास आवश्यक असणाऱ्या अनेक बाबींची महाराष्ट्राच्या इतिहासात वाण आहे व कोणालाही देशाचा सर्वांगीण इतिहास लिहिण्यासाठी आवश्यक तयारी करण्याइतकी फुरसत नाही.

सारांश, महाराष्ट्रीय मराठ्यांच्या इतिहासाचा सांगाडाच जेथे अगदी विकृत व त्रुटित अशा स्थितीत आहे तेथे साधनांच्या युक्तायुक्ततेबद्दलचे वाद निष्फळ आहेत यात शंका नाही.

(ब) व्यक्तिविषयक प्रयत्नातील व्यक्तिविशिष्ट गुणदोष विवेचनात :

कोणत्याही कार्याचा प्रारंभ एखाद्या व्यक्तीकडूनच होत असतो. नंतर एखाद दोन व्यक्ती ते कार्य काही कालापर्यंत नेटाने करू शकतात. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर दिसू लागताच जनतेचा त्या कार्याकडे ओढा लागतो व ते कार्य 'समाज' संस्थारूपाने लोककाज म्हणून हाती घेतो. अशा नवीन कार्यास हात घालणाऱ्या संस्थाही काही कालापर्यंत व्यक्तिभूत राहणे साहजिकच असते, परंतु लोकांत जसजशी त्या कार्याबद्दल अभिरूची उत्पन्न होत जाते तसतशा या संस्था सुधारण्याच्या मार्गाला लागतात.

जोपर्यंत एखादे कार्य व्यक्तिगत असते तोपर्यंत त्या कार्यात व्यक्तिश्रेष्ठत्व व व्यक्तिवैगुण्य शिरणे साहजिक असते. अशी अपूर्णतावस्था नसावी हे खरे; परंतु ती नसणे मात्र तितके शक्य नसते. संस्थांच्या बालदशेतही हाच अनुभव प्रत्ययास येतो. अशावेळी संस्थांचे कार्य व्यक्तिगत असते व ती संस्था दोषास पात्र होते. परंतु पूर्णतावस्था प्राप्त करून घेण्याच्या या पायऱ्या आहेत. अशावेळी व्यक्तिश्रेष्ठत्वाला विशेष महत्त्व देऊन किंवा व्यक्तिवैगुण्याकडे दुर्लक्ष न करिता त्यातच त्या कार्याचे सर्वस्व कल्पून मिथ्या वाद वाढविले जातात. त्यामुळे मुख्य कार्यावरील विश्वास उडतो व उडविला

जातो. अशा तऱ्हेने इतिहास-रचनेस व विशेषत: साधनसंचयाच्या कामात फार मोठे अडथळे येतात. तरी सुरुवातीस झालेल्या चुकांकडे दुर्लक्ष किंवा व्यक्तिदोषांकडे दुर्लक्ष करून मुख्य कार्यात येणारे अडथळे दूर केले पाहिजेत.[१८]

(क) संग्राहक लेखक यांच्या परस्परसंबंधात उत्पन्न झालेले वाद :

इतिहासक्षेत्रात काम करणाऱ्या अभ्यासकांत काही संग्राहक म्हणून ऐतिहासिक साधनांचा जमाव करीत असतात तर काही इतिहासलेखनाचे काम करीत राहतात. संग्राहकांच्या संपत्तीवरच लेखकांचा डोलारा सजावयाचा असतो; परंतु मानवप्राणी स्वभावत:च स्वार्थी असल्याने लेखकांचा व संग्राहकांचा नेहमीच बेबनाव होत असतो. लेखक स्वार्थपरायणता लपवून समाजाच्या सार्वत्रिक हक्काचा फायदा म्हणून किंवा सामाजिक कळवळ्याचा आव घालून संग्राहकांच्या संपत्तीचा वारसा आपल्याकडे घेऊ पाहतात. असला प्रयत्न स्वभावधर्मानुरूपच होत असतो. परंतु संग्राहकाला रास्त मोबदला मग त्याला तो द्रव्यरूपाने दिला जावो किंवा नावाच्या रूपाने मिळो- मिळाल्याशिवाय आपल्या संपत्तीचा वारसा दुसऱ्याकडे जाऊ देणे मानवत नाही. अशा परस्परविरोधी मनोभावनेमुळेच या इतिहासक्षेत्रात वावरणाऱ्या ज्ञात्यामध्येच सामान्य वाद माजता, असे बेंद्रे म्हणतात.

खरे म्हटले तर ज्याने परिश्रम केले त्याला त्याच्या परिश्रमाचा योग्य तो मोबदला देणे हेच प्रत्येक लोकाकरिता झटणाऱ्याचे ध्येय असावयास पाहिजे. परंतु लोकसमुहास चकित करून दाखविणारे कार्य आपल्याच हातून व्हावे ही जी बाल्यावस्थेतील वरवर काम करून महत्ती प्राप्त करून घेणाऱ्याच्या मनात नैसर्गिक आकांक्षा जडलेली असते. त्या आकांक्षेमुळे त्यांना त्या संग्राहाकांच्या परिश्रमाचे योग्य ते चीज करण्याची बुद्धी होत नाही. यामुळे मुख्य कार्याचे किती नुकसान होत असते हे पाहण्याइतकी त्यांच्यात दूरदृष्टिही राहू शकत नाही, असे बेंद्रे म्हणतात.

[१०] साधन मीमांसेसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

बहिरंग परीक्षण - साधनांना उपयोगात आणण्यासाठी त्यांचे परीक्षण करावे लागते. त्या साधनांत उपलब्ध झालेली माहिती नवीन आहे किंवा काय, त्या माहितीने एखादी अनिश्चित गोष्ट निश्चित होऊ शकेल किंवा कसे, उपलब्ध होणारी माहिती इतिहासकालातील कोणत्या विविक्षित स्थळी व प्रसंगी अधिष्ठित होणारी आहे वगैरे बाबींचे ज्ञान करून घेण्याकरिता संशोधकाला

करावयाचे त्या कालाच्या उपलब्ध इतिहासाचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक असते. ज्या देशाच्या इतिहासाचे संशोधन करावयाचे त्या देशाच्या भूगोलाचे व विशेषतः भूतकालीन भूगोलाचे ज्ञान करून घ्यावे लागते. ज्या लोकांचा इतिहास रचावयाचा त्या लोकांच्या भूतकालीन व वर्तमानकालीन रीति-रिवाजांचे, स्वभावांचे वगैरे उपलब्ध ज्ञान उत्तम असले पाहिजे. अशा तऱ्हेची सामान्य माहिती करून घेतल्यानंतर साधने ज्या लिपीत लिहिली गेली असतील त्या लिपींचे वर्तमानकालीन व भूतकालीन स्वरूप चांगले अभ्यासिले पाहिजे. तसेच ज्या भाषेत ती साधने लिहिली गेली असतील त्या भाषेचे वर्तमानकालीन व तसेच इतिहासकालीन स्वरूप जाणिले पाहिजे, तत्कालीन भाषेचे व्याकरण, संप्रदाय, लिहिण्यातील संक्षिप्तांचे वगैरे परिपाठ, लेखनपद्धती, लेखनप्रशस्ती वगैरेंचे ज्ञान प्रथम करून घेतले पाहिजे. सारांश, इतिहासकालीन सर्वांगीण परिस्थितीचे उत्तम ज्ञान करून घेतल्याशिवाय साधनांचा उपयोग करू म्हटले तर जमणार नाही. या पूर्वतयारीशिवाय केलेले साधनचिकित्सेचे प्रयत्न सदोष राहिले आहेत. या पूर्वतयारीने बहिरंग तपासता येते.

अंतरंग परीक्षण - संशोधनात असे पुष्कळ प्रसंग आढळतील की, एकाच गोष्टीची भिन्नभिन्न स्वरूपे वर्णिलेली असतील व त्यातील तपशील परस्परविरोधीही असतील अर्थात या दोन्हीही गोष्टी संभवणार नाहीत. त्यातील एक असत्य किंवा वस्तुस्थितीस सोडून अगर विपर्यस्त असली पाहिजे. म्हणून नुसती इतिहासकालीन माहिती मिळाली आहे तेव्हा ती ग्राह्य धरली पाहिजे असे नाही. अशा माहितीचे परीक्षण करून तिच्यातील सत्यासत्यतेचा निर्णय लावला पाहिजे. परंतु अमुक एका साधनातील मजकूर खरा अगर खोटा आहे हे सांगणारा दुसरा तत्कालीन तोंडी अगर लेखी साक्षीदार मिळणे कठीण असते. क्वचितप्रसंगी असा योग घडून येतो. परंतु नेहमीच साधनातील मजकूर तपासण्याचे प्रत्यक्ष साधन उपलब्ध नसते. म्हणून साधनांचे परीक्षण करण्याचे अन्य मार्ग स्वीकारावे लागतात. इतिहासातील कोणीही साक्षीदार निखालसपणे निर्भेळ व निर्लेप सत्यपरिस्थिती सांगणारा मिळेलच असे समजून चालत नाही. साक्षीदार किंवा विश्वासार्ह आहे याचेच परीक्षण करावयाचे असते. असे परीक्षण करताना साक्षीदाराची योग्यता, त्याला प्रत्यक्ष माहिती असल्याचा संभव, त्याची ते साधन लिहिण्यावेळेची मनःस्थिती वगैरेचा विचार करावा

लागतो. अशा तऱ्हेने साधनांची फेरतपासणी करणे याला अंतरंग परीक्षण असे म्हणतात, असे वा. सी. बेंद्रे नमूद करतात.[२०]

साधनांचे प्रकार - ऐतिहासिक साधनांत कित्येक समकालीन असतात व कित्येक असमकालीन असतात. त्या साधनातील उल्लेख तत्कालीन समजुतीचे निदर्शक असतात. एखाद्या असमकालीन साधनांत तत्पूर्वी घडलेल्या प्रसंगाचा चुकीचा उल्लेख त्यावेळच्या प्रचलित समजुतीप्रमाणे कदाचित बिनचूकही असेल; परंतु अशावेळी केवळ बहिरंग व अंतरंग तपासणीवर भागत नाही. असे बेंद्रे सांगून पुढे म्हणतात की, अशा प्रत्येक साधनाचा समाकालीन व असमकालीन यांसारखा दर्जा प्रथम ठरविणे भाग पडते. कारण इतिासरचनेत विशेषतः समकालीन समजुती एकत्रित करण्याचा मुख्य उद्देश्य असतो. परंतु समकालीन पुरेसे पुरावे उपलब्ध होणे शक्य नसते. म्हणून असमकालीन पुराव्यांचाही इतिहास उपयोग करावा लागतो. समकालीन पुरावा असमकालीन पुराव्यापेक्षा तत्कालीन परिस्थितीचे अधिक विश्वसनीय वर्णन देणारा असतो असा नियम आहे. म्हणून साधनांचे बहिरंग व अंतरंग तपासण्यापूर्वी संशोधकाला साधनांची विश्वसनीयता ओळखण्यासाठी त्यांचा दर्जा कोणता हे प्रथम जाणता आले पाहिजे.

अव्वल साधने - "इतिहासातील कोणत्याही प्रसंगाची तत्संबद्ध माणसांनी लिहून ठेवलेली समकालीन अस्सल साधने श्रेष्ठ होत. विशेषतः असल्या साधनांचे लिखाण जर राजकीय अगर सरकारी अधिकाऱ्यांच्या हातचे असेल किंवा त्यांच्या संमतीने केलेले असेल तर ते अव्वल दर्जाचे मानावे."[२१]

दुय्यम साधन - "दुय्यम प्रकारच्या साधनांत काही वर्षांनी तयार केलेल्या अस्सल लिखाणात ते अस्सल समकालीन पुराव्यांवरून भूतकालीन प्रसंगाचे उल्लेख केलेले असतात व ज्याला गौतमुखे किंवा सरकारी अधिकाऱ्यांकडून संमती मिळालेली असते अशा लेखांचा समावेश होतो."[२२]

[११] ऐतिहासिक वाङ्मयनिर्मितीसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

कादंबरीकार, नाटककार व अशाच प्रकारचे ललित वाङ्मयकार आपल्या कादंबऱ्या, नाटके वगैरेतील संविधानके पूर्ण ऐतिहासिक आहेत असे लिहितात. या लिहिण्याचा साधारण जनतेस व्हावा

तसा उलगडा होत नाही. मुळातच इतिहास वाचनाची गोडी फार थोडी त्यामुळे सामान्य जनतेला इतिहासाचे ज्ञान अगदीच अल्प असते. त्यांत जर एखाद्या शब्दचित्राने किंवा चित्रपटाच्या साहाय्याने कोणताही ऐतिहासिक प्रसंग नटविला गेला की ते शब्दचित्र किंवा तो चित्रपट इत्यंभूत इतिहास असाच मानला जातो. एक तर इतिहास ऐतिहिास म्हणून वाचण्याची आम्हास अजूनही सवय जडली नाही. 'अवता' व 'लीला' याबद्दलच्या कल्पना आम्हापुढे महाभारत-रामायणादी ग्रंथातून व कथा-पुराणांतून सारख्या ठेवल्या गेल्याने आम्हास मानवी कृत्याचे चिकित्सकपूर्ण परीक्षण केलेले खपत नाही. कथा-पुराणातील विवेचनपद्धती विशिष्ट प्रकारची असून तिचाच आमच्या मनावर पूर्ण पगडा बसला आहे. दोषादोषांचे विवेचन करिताना आम्हास एकात पूर्ण आभास व दुसऱ्यात पूर्ण विकास असेच पाहण्याची सवय जडलेली आहे. हीच अतिशयोक्ती आमच्या तुलनाशक्तीचा मूळ पाया आहे. मोगल म्हटले की मराठ्यांचे शत्रू, मराठे म्हटले की लुटारू बंडखोर, इंग्रज म्हटले की सदा सत्तावान वगैरे सारख्या कल्पनाही साधारण जनतेत अगदी रूढ होऊन गेल्या आहेत. याचाच पुरस्कार कादंबऱ्या व नाटकांत किंवा काव्यात केला जातो. इतकेच नव्हे तर खुद्द इतिहासकारांनाही एखाद्या नाटकांत उपस्थित झालेली 'तुळशी' एखाद्या कादंबरीतील 'गड आला पण सिंह गेला' ही उक्ती, मुसलमानाचा हिंदू बनविलेला एखाद्या नाटकातील 'दौलतराव' यासारखी अनैतिहासिक विधाने आपल्या इतिहासात इतिहास म्हणून नमूद करण्याचा मोह पाडतो. एखादा प्रसंग कमीजास्ती होतो त्यामुळे इतिहासाचे फारसे नुकसान होत नाही. परंतु एखाद्या कादंबरीकाराने किंवा नाटककाराने जेव्हा आपल्या शब्दचित्राने एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीच्या स्वभावचित्राचे विवेचन केलेले असते ते मात्र बरेच वेळा सामान्य जनतेत गैरसमज उत्पन्न करते. महाराष्ट्राचा इतिहास अपूर्ण असल्याने कोणाही ऐतिहासिक विभूतीचे अगर समाजाचे सर्वांगसुंदर स्वभावचित्र रेखाटण्याइतकी महाराष्ट्रात सामुग्री नाही. त्यामुळे आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील किंवा नाटकांतील स्वभावचित्रे पूर्ण विकृत अशी निपजल्यास नवल नाही.

संभाजीचेच स्वभावचित्र घ्या. अगदी वस्तुस्थितीला सोडून आहे. सूर्याजी पिसाळचेच उदाहरण घ्या त्याच्याबद्दल सर्व माहिती अगदी असत्य आहे; परंतु जनतेत रूढ झालेल्या कल्पना दूर करण्यास इतिहासास मात्र बरेच प्रयास पडतील यात शंका नाही.

सारांश, जनतेत इतिहास व ललित-वाङ्मयातील कथानके यातील सत्यासत्येतचा छडा लावण्याइतकी परीक्षकबुद्धी विकास पावलेली नाही. त्यामुळे जनतेतील गैरसमज घालविण्याकरिता शक्य तो प्रयत्न प्रथम झाला पाहिजे. इतिहासाचे वाचन व कादंबरी-नाटकांचे वाचन यांतील भेदाभेद त्यांना स्पष्ट करून दिला पाहिजे. स्वदेशाच्या इतिहासाची मुळातच म्हणजे बालवयातच शिकवण न दिली गेल्यामुळे ही परिस्थिती उत्पन्न झाली आहे, ती दूर करण्याचेही प्रयत्न प्रथम झाले पाहिजेत.[२३]

[१२] लेखनपद्धती व मेस्तकासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

पत्रे दोन प्रकारची असत खासगी व सरकारी. ही दोन्ही प्रकारची पत्रें कागदावर लिहावी लागतात आणि लिहितांना प्रथमारंभी रेघ काढावी लागते. मराठी मोडी लिहावयाचे म्हणजे प्रथम रेघ काढल्याशिवाय गत्यंतरच नसते. ती रेघ विविक्षित स्थळी कशी काढावी व विशेषत: मायन्यात कशी काढावी हे ह्या प्रशस्तीत सांगितले आहे. प्रशस्ती रचण्याचा मुख्य हेतू मायने कसे लिहावे हा आहे; तेव्हा निरिनिराळ्या मायन्यांच्या रेघा कशा काढाव्या ह्याचेच वर्ण प्रशस्तींत प्रथमत: येणे रास्त आहे.

मित्राणां त्रितया रेषा द्वे भृत्यस्य रिपोरपि।

षड्गुरोः स्वामिनः पंच एकैकं पुत्रकन्ययोः।।

शंकराचार्यदि गुरुंना सहा, राजाला पांच, मित्राला तीन, सेवक व शत्रू ह्यांना दोन आणि पुत्रकन्यादि मंडळीला एक रेषा द्यावी असा हेमांडपंथी निर्बंध होता.[२४] कागद मोडल्यावर श्रीकाराच्या खालील पहिली ओळ किती तऱ्हेने काढतां येते तें सांगताना लिहितात की, कागद उजव्या बाजूनें सोडून त्याचे चार रकाने पाडतात. रेघ चार रकाने ओढली म्हणजे तिला 'दफे' म्हणतात, दोन अक्षरांची ठेविली म्हणजे 'दफाने' म्हणतात. तीन अक्षरांची ठेविली म्हणजे 'कत' म्हणतात व चार अक्षरांची ठेविली म्हणजे 'महजर' म्हणतात.

पहिल्या दोन रकान्यापुरतीच तेवढी रेघ ओढली म्हणजे तीस 'पहिला जिल्हे' म्हणतात. नुसत्या तिसऱ्या व चवथ्या रकान्यापुरतीच रेघ ओढली व पहिले दोन रकाने मोकळे ठेविले म्हणजे त्या रेघेस 'दुसरी जिल्हे' म्हणतात. मधील दुसरा व तिसरा असे दोन्ही रकाने भरून शिवाय पहिल्या व चवथ्या रकान्यांतील दोन दोन अक्षरांची जागा घेऊन रेघ ओढली म्हणजे त्या रेषेला 'बीत' म्हणून संज्ञा आहे. ह्याच 'बीत' रेघेस अकार प्रारंभी लाविला म्हणजे त्या रेघेला 'अज्ञ' म्हणण्याची पद्धत

आहे. एकार लाविला म्हणजे 'एकूण हत्' म्हणतात. बाक देऊन बीत रेघेचा प्रारंभ केल्यास वास्लात् म्हणण्याचा परिपाठ आहे. मायन्याची पहिली रेघ ओढण्याचे कारणपरत्वें इतके प्रकार आहेत. ह्या सर्व प्रकारांहून आणखी तीन प्रकारची रेघ आहे. रेघेच्या प्रारंभी दकार काढला म्हणजे दकारी रेघ सिद्ध होते. कित्येक वेळां रेघेच्या प्रारंभी एक शून्य देतात व कित्येकदां दोन उभ्या रेघा देतात. ह्याविषयी हेमाडपंती श्लोक असा -

खं ब्रमृ निर्गुणं प्रोक्त रेषे हरिहरद्वयोः।

दकारेण स्नेहमाप्नोति तावल्लक्ष्मीः स्थिरा भवेत्।।[२५]

म्हणजे शून्य दिलें असतां ब्रम्हाचा निर्देश होतो, दोन उभ्या रेषा दिल्या असतां हरिहरांचा उल्लेख होतो व दुकार काढला असतां मित्रत्वाचा आविष्कार होतो. ह्या सर्व रेघा कशा काढावयाच्या ते खालील आकृतीवरून कळेल. पंधरा रेघांखाली सर्व प्रकारच्या मोठ्या रेघा पडतात. ह्या सर्व रेघा हेमाडपंताच्या वेळेपासून आहेत. कित्येकांची शुद्ध संस्कृत नांवे जशीची तशीच राहिली आहेत व कित्येकांची फारशीच नांवे तेवढी प्रचलित आहेत.[२६]

[१३] लेखणीच्या स्वरूपाविषयी व शाईसंदर्भात बेंद्रेंनी दिलेली माहिती :

नाचण्याचे शिरें करून व तें काळजानें घोटून काळी शाई करण्याचा परिपाठ महाराष्ट्रात फार पुरातनचा आहे. लाखी, लोखंडी वगैरे इतरही काही शाईंचे प्रकार आहेत. मोडी अक्षर लिहिण्याला बोरूखेरीज दुसऱ्या कोणत्याही लांकडाचा उपयोग करीत नसत. बोरुची लेखणी एक-मजली किंवा दोन-मजली करीत लेखणीच्या उतारांत खांचा, खोचा व मेहरपीही करणारे कित्येक कुशल कारकून असत. उतारावर आंतील भेडाचें टेंगूळ ठेवण्याचाही कोठे काठे प्रचार असे. बोरू दोन प्रकारचे असत. साधे व कळक्ये. कळक्या बोरुंना विस्तवावर भाजून काळे चट्टे पाडण्याचाही संप्रदाय कोठे कोठे असे. श्रीमंतांच्या मुलांना लिहिण्याकरितां ज्या लेखण्या करीत त्यांच्यावर सोन्याचा वर्क चढवीत. उत्तम लेखणी म्हटली म्हणजे तिचा उतार सरळ असावा, डावीकडे किंवा उजवीकडे झुलूं नये.

(अ) पत्रे दोन प्रकारची असत - खासगी व सरकारी. पैकी सरकारी पत्रे कोणत्या रेघांनी लिहावी ते प्रथम सांगितले पाहिजे. वर ज्या पंधरा प्रकारच्या रेघा सांगितल्या आहेत. त्यांतील सबंद

रेघ म्हणजे चार-रकानी रेघ काढून छत्रपतींचा शिक्का करण्याचें काम चिटणिसाचें असे. 'सुज्ञ असा' अशीं अक्षरे छत्रपतींच्या स्वदस्तुरची आज्ञापत्राच्या शेवटी असल्यास शिक्का करीत नसत.

खालील लहान अंमलदारांसहि छत्रपतींची आज्ञापत्रें शिक्क्याशिवाय चार रकानी जात-

१. जातपाटल यांस लिहिले ते 'ताा' म्हणोन.

२. खिजमतगारांस 'माा' म्हणोन.

३. कुलकर्णी, जकाते वगैरे तिरगुळ, गोळक यांस 'राा' म्हणोन.

(आ) दकारी तीन रकानी पत्रें छत्रपतींची जमीदार 'पोा' देशमुख, देशपांडे यांस मशरूल अनाम म्हणोन.

(इ) बीतरेघी पत्रें, ब्राम्हण गोसावी, बैरागी, भिक्षुक, पंडित वगैरेस.

(ई) पदाधिकारी संस्थानिकांस मथळ्यावरील श्रीच्या खाली बीतरेघ काढून 'संकलगुणालंकरण अखंछितलक्ष्मी अलंकृत राजमान्य' येथपर्यंत दकारपूर्वक लिहून, नंतर राजश्रीच्या पुढें जसे ज्याचे वैभव तशीं कमजास्त जागा सोडून, नांव, अडनांव, मरातब लेहून 'गोसावी यांसि' काढून पहिल्या किंवा दुसऱ्या जिल्हेत दुसरी ओळ पुरी करावी. तिसऱ्या तीन रकानी ओळींत 'स्नेाा' आपलें नांव रामरामपूर्वक घालावे. हेमाडपंताच्या वेळी जोहारपूर्वक आपले नांव घालीत असत.

(उ) १. शिलेदार, २. बारगीर नामधारक, ३. हषमलोक मानकरी, ४. सर्व शुद्र परस्परें, ५. किल्लेकरी, हवालदार, कारकून अखंडित पासून मायना काढून बीत रेघ व एक जिल्हा एवढ्यांत मायना आटपीत असत, ६. श्रीनजीक दोन-रकानी रेघेंत राजश्री आडनांव गोसावी यांसि येवढा मजकूर घालून, नंतर चार कोनींत स्नेहांकित म्हणोन मजकूर जमींदार, ठाणेदार वगैरे कनिष्ठ नोकरांना लिहित, ७. सामान्य शुद्रांस डावेकडील कागदाचा रकाना एक टाकून तीन रकाने योग्यतेनुरूप लिहित, ८. महजर, चकनामे, खरीदपत्रें वगैरे सर्व सरकारी कागद चार रकानी रेघेनें सुरू होत.[२७]

(ऊ) सरकारी कागद खालील प्रकारचे असत असे वा. सी. बेंद्रे सांगतात -

१. गावांवर किंवा महालवर मामलतदार किंवा कमावीसदार यांस लेहून देणे ती सनद.

२. गांवी एकमेकांस जामीन घेणें ती जामीनसाखळी.

३. ठराव करून लेहून घेणें ती कबुलात.

४. मुदत करणें ती मुदबंदी.

५. दरमुदत ऐवज घेणें त्याविषयी लिहून घेणे तीं हप्तेबंदी.

६. करारमाफक तगादा व वरात करणें तो रोखा.

७. तगादा मना करणें ती मनाचिट्टी.

८. पोत्यास ऐवज जमा केला त्याची पावती देणे ही हुज्जत.

९. परभरें ऐवज पावला ती पावती.

१०. अंमल सोडणें याबद्दल लेहून देणे ती सोडचिट्टी.

११. जमीदारापासून अगर कमाविसदारापासून ऐवजाची खातर घेणे ती निशाचिट्टी.

१२. लावणी करणे अगर वसाहत करणें त्यासाठी रयतेस लेहूण देणे तो कौलनामा.

१३. दहशतीमुळे रयत परागंदा जाली ती समजूत घालून आणणें ते अभयपत्रः

१४. जातीस जामीन मोकदमास घेणें ती मोकदजामीनकतबा व जातकतबा.

१५. अस्मानी म्हणजे पर्जन्य न पडता अथवा फार लागला व सुलतानी म्हणजे दग्यानी लुटले, त्याबद्दल सुट देणे ते माफीपत्र

१६. आपण लिहून देणे ते जातपत्र.

१७. अमलावरी गेल्यावर सकरारी बाबी माजी मामलदाराकडून तपासून घेणे ते मोदादपत्र.

१८. सरकत केली ती सरकतनामा.

१९. वादी यानी खुषीने लिहून दिला तो राजीनामा.

२०. हकीकत लिहिली तो करीना.

२१. एकमेकांची बोलणी विचारून लिहिणें ती पुरशिस.

२२. निरोप घेऊन जाणें ते लेहून देणे नेमोत्तरपत्र.

२३. वाद्याचा लेख वाद्यास दाखवून त्यावरून लिहूण घेणे ती तकरीर.

२४. वाद न करतां समजुतीस आले ते समजपत्र.

२५. तंटा लेहूण घेणे तो मुचलका.

२६. जातीने आंगवण नाही सबब भाऊ उभा करणे त्यास लेहूण देणें घेणे तो सामीलनामा.

२७. एकदिल सारे होणे त्याचा ठराव करणे तो केला ते सम....

२८. कलमाकलमास लबाडी दिसून आली म्हणून या पुढे असे बोलणे नाही म्हणून शेरा लिहून घेणे ते कुंठितपत्र.

२९. रुजवातीस खोटा झाला तेव्हां लिहून घेणे ते खोटपत्र.

३०. एक वादी भेगवटा करतो, दुसरा फिर्याद आला. सबबलीला ते अमानत पत्र व जप्ती पत्र.

३१. एक वादी भेगवटा करतो, दुसरा फिर्याद आला. सबबलीला ते अमानत पत्र व जप्ती पत्र.

३२. दर नांव लेहून पुरुषांची मागणे ती वंशावळ.

३३. न्यायात खरा जाला त्यापासोन त्यापासोन पैका घेणे त्याचे पत्र ते हरकीपत्र.

३४. न्यायी खोटा झाला त्यापासोन द्रव्य घेणे त्यांचे पत्र ते गुन्हेगारीपत्र किंवा दंडपत्र.

३५. जमीदार सामील करून कारकून कमाविसदारांनी द्रव्य खादलें त्याजपासोन धणी देणें, निशा घेणें ते निशापत्र.

३६. दाखला लेहून आणणें ते सडीपत्र.

३७. पांढरीवरी भोंवरगाव मेळवून पंचामते इनाम करवणें ती वदणूक.

३८. सर्वामतें खोटा झाला त्याच्यापासून लिहून घेणे ते यजितपत्र.

३९. दिव्य काढण्यास राजी जाला त्याचे मस्तकी बोलाचयाचे लिहिणें ते भाळपत्र.

४०. सरकारांत न्याय निवडला तें निवाडपत्र.

४१. महालांत पंचाईत जाली तो महजर.

४२. वाद्यावाद्याचा कयास निवडून संभाविताचें मत देणें तो सारांश.

४३. थळ नेमून दिल्हे, तेथे पंचाई जाली, तें थळपत्र.

४४. आपसांत समजुतीने वाटे जाले ते वाटेपत्र.

४५. रिणकोनाम लेहून घेणें तो कर्जरोखा.

४६. महाली कमाविसदारावरी पैका घेतल्याचा मुद्दा शाबीत करून तुफानदार आला, ज्याजपासोन निशा सरकारानें घेऊन कमाविसदार बोलावून आणोन रुजुवात करविली, सबब पत्र लेहून देणें तें तचकरेपत्र.

४७. धव्यांनी कृपेने दिल्ही जमीन तिचें पत्र घेणे ते इनामपत्र.

४८. नजर देऊन इनाम घेणें ते अर्जीइनाम.

४९. सनद गमावली नवीन करून घेणें त्यास हरदूमुसनाजुमला म्हणून लिहावें.

५०. ऐवज कुळाकडून येणें थकला, त्यास तगादा केला, सबब बोलावयास आला, तेव्हां त्यापासोन खात्री घेणे ती जमिनी. जमिनीला उगवणी ती निशेदारी. खताखाली 'यासि उगवणीस धणी अमुक' पुढें गुंतवणे तसें लिहिणे.

५१. खत गमावले त्याची फारखती.

५२. खरेदी जमीन वगैरे घेतले ते खरीदपत्र.

५३. ऐवज देऊन देशावरावरी घेणें ती हुंडी.

५४. हुंडी गमावली पुन्हां लेहून घेणें तो जाब.

५५. हुंडीवर भरपाई लेहून घेतली, ठिकाणीं हुंडीचा ऐवज पावला न पावला, चौकशी केली तरी दाखवणे, तो खोका.

५६. नवा अंमलदार आला, माजी अंमलदारापासोन इनामी वगैरे जाबसाल लेहून आणणें ते दुमालपत्र.

५७. हंशील माफ करणें जकातीचें तें दस्तक.

५८. लग्नमुंजीचें पत्र ते कुंकमपत्र.

५९. कामगारीवरी रवाना करणें ते हुकमीपत्र.

६०. मदतीस बोलावणें तें समलातीपत्र

६१. बखेडा जाला त्याविषयी लिहणें ते ताकीदपत्र.

६२. हुकूम मोडला अगर सालाबाद शिरस्त्याप्रमाणें न वर्तला तरी मसालापत्र लिहिणें तो हुकमीरोखा.

६३. छत्रपतीचें खुद्दपत्र ते आज्ञापत्र.

६४. बक्षिस दिल्हें तें बक्षिसपत्र किंवा बहालपत्र.

६५. कामावरून काढणें ते तगीरपत्र.

६६. वृति नेमून दिली ते वृतिपत्र.

६७. नव्या अंतलदाराच्या मदतीकरितां दिली पत्रें ती साहित्यपत्रें.

६८. सरकारनें कोणताहि जुजबी कायदा किंवा नियम केला तो तह.

६९. दोन राज्यांत नेमबंदी जाली तो तहनामा.

७०. जप्ती करविली ती जप्तीचिट्टी.

७१. सरंजाम दिल्हा ते सरंजामपत्र.

७२. कबजा दिल्हा ते कबाजपत्र.

७३. हजिरी घेणे ते हजिरीपत्रक.

७४. संस्थनिकांनी हुजूर अर्ज करणे ती यादी.

७५. मरणसमयी लिहिले ते मृत्युपत्र.

७६. जन्मता केले ते जन्मटिपण.

७७. लग्नाचे वेळीं लिहिली ती लग्नचिट्टी.

७८. दरबारास बोलावले ती आमंत्रणपत्रिका.

हे सर्व कागद चार रकानी किंवा पहिल्या दफ्याचे एक अक्षर सोडून लिहीत. वरील नावात कित्येक संस्कृत आहेत व कित्येक फारशी आहेत. सस्कृत नांवे हेमाडपंतापासूनची आहेत. फारशी नांवे संस्कृताचीच भाषांतरे आहेत. चकनामा, वतन वगैरे फारशी नावांनेही कित्येक संस्कृत नावाची पत्रे लिहिली जात.[२८]

[१४] लेखनाचा कालनिर्णय कसा करावा यासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

कोणत्याही लेखाची ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टिने किंमत ठरविणारे मुख्य साधन म्हणजे लेखन-काल होय, असे बेंद्रे सांगतात आणि साधने जितकी समकालीन असेल तितकी ती मान्य ठरतात. एखाद लेख जर तत्कालीन लिहिला गेला असेल तर त्यातील माहितीत सत्यता व पूर्णतत्व असते त्यामुळे त्यामध्ये गफलत होण्याचा फार कमी संभव असतो. त्यामुळे साधन हाती येताच त्याचा लेखनकाल शोधावा लागतो. लेखनकाळाचा उल्लेख साधनात असेल तर चांगले पण बऱ्याचवेळा त्यात लेखनकाल दिलेला नसतो.

काळ निश्चित करण्यासाठी (१) कागदाचा जुनेपणा, (२) शाईचा जुनेपणा, (३) लिपीच्या मोडीतील वैशिष्ट्याचा काल, (४) भाषा-प्रघात, (५) लेखकाचा काला, (६) मजकुरांतील निरनिराळ्या प्रसंगांचा इतर साधनांवरून ठरलेला काळा, (७) मजकुरांतील विविध परंपरेचा काल, वगैरे बाबी आवश्यक ठरतात. यातील पहिले तीन प्रकार म्हणजे कागदाचा व शाईचा जुनेपणा व लिपीचा मोड व त्यातील वैशिष्ट्ये वगैरे ही फक्त ज्याला मूळ साधने पाहवायास मिळते त्यालाच परीक्षता येतात, असे बेंद्रे म्हणतात.[२९] बखरी याद्या यांसारख्या साधनांत ठरावीक कालातील प्रसंगांचाच तपशील दिलेला असतो. असा तपशील केव्हा लिहिला गेला हे समजणे अगदी जरूरीचे असते. अशा साधनांत जर कालनिर्णयाला वरील कोणत्याही साधनातील साधन बाकी नसेल तर या कालनिर्णयाला मजकुरांचा तपशील साधनीभूत होऊ शकतो. "कोणत्याही प्रसंगवर्णनात जर अधिक बारकाईचे परंतु स्थलसूचक व व्यक्तिदर्शक तपशील दिलेले असतील तर ते साधन समकालाकडे अधिक झुकणारे आहे असे समजावे परंतु जेथे प्रसंगाचा तपशील कमी व पाल्हाळ जास्त तेथे ते साधन माहितीच्या अभावी म्हणजे बहुधा कालांतराने रचले गेले असावे असे समजण्यास हरकत नाही."[३०]

बेंद्रे म्हणतात, कोणत्याही साधनाचा लेखनकाल ठरला म्हणजे त्यापासून इतिहासरचनेस प्रत्यक्ष फायदा होत नसतो. साधनाच्या लेखनकालावरून त्यात वर्णिलेल्या प्रसंगाचा काल ठरवायचा असतो. जितके साधन समकाली लिहिले जाते तितके ते खरे वस्तुस्थिती निदर्शक असते आणि वस्तुस्थिती ज्याला माहीत असते ती नेहमीच दुसऱ्याला समजावून सांगतांना प्रसंगाचे परस्परसंबंध व क्रम ही दोन्हीही बिनचूक सांगण्याचा प्रयत्न करीत असतो.

बेंद्रेंनी प्रसंगाचा काल ठरवीत असतांना खालील काही गोष्टी लक्षात ठेवण्यास सांगितल्या आहेत.

(१) एखाद्या साधनात प्रसंगाचा काल दिलेला असेल तर तो कालनिर्देश त्या साधनातील इतर तपशीलावरून बरोबर आहे किंवा नाही हे तपासावे व तो त्यातील इतर लिहिण्याशी विसंगत नसेल तर त्या साधनलेखकाच्या पुराव्यापुरता त्या प्रसंगाचा कालनिर्णय स्वीकारावा.

(२) वरीलप्रमाणे काल ठरला असल्यास तो इतर साधनांतील पुराव्यांशी ताडून पाहावा. त्यात जर फरक दिसून आल्यास त्यातील अधिक समकालीन व बिनचूक पुरावा कोणता हे तपासून नंतर कालनिर्णय करावा.

(३) कालनिर्णय करिताना तिथी, वार, मिती वगैरे सर्व तपशील दिला असल्यास ज्या कालनिर्देशात असा अधिक तपशील असून गणिताने बिनचूक ठरेल तोच विशेषतः ग्राह्य धरल्यास हरकत नसते. अव्वल माहितीच्या अभावी तिथीमितीचा नक्की व बिनचूक तपशील देणे सहज शक्य नसते.

(४) एखाद्या साधनांत प्रसंगाचा कालनिर्देश दिलेला नसेल परंतु त्या प्रसंगाबरोबर इतरही प्रसंग सांगितलेले असतील व त्यांतील काही प्रसंगाचा इतर साधनावरून काल ठरला गेला असेल तर त्या प्रसंगातील परस्पर संबंधावरून व क्रमावरून कालनिर्णय करावा. अशावेळी अमुक एक प्रसंग अमुक एका कालापासून अमुक एका कालापर्यंत घडला इतकाच कालनिर्णय करता येतो. दुसऱ्या साधनांवरूनही याचप्रमाणे काल मर्यादित करीता नक्की काल ठरविता येतो.

(५) ज्यावेळी प्रसंगाच्या उल्लेखावरून कालमर्यादा ठरवावयाची असते त्यावेळी लेखक आपले लेखन विषयवारीने करीत आहे किंवा कालानुक्रमाने करीत आहे ते तपसावे.

(६) एखाद्या कालाचा मजकूर सांगताना त्यात जसा पूर्वेतिहास म्हणून तत्पूर्वी घडलेल्या मजकूर अनुसंधानाने निवेदन केला जातो त्याचप्रमाणे अनुषंगाने परिणामात्मक मजकूरही सांगण्याचा प्रघात आहे. अशा वेळी अनुषंगाने आलेल्या मजकुराची कालमर्यादा मुख्य तपशीलाच्या कालानंतरची आहे असे समजून ती लेखनकालापर्यंतही जाऊ शकते.

(७) कोणताही कालनिर्णय बहुमताने न करीता त्यातील बिनचूकतेवरून करावा.

(८) एखाद्या प्रसंगात ज्या माणसांचे कार्य केल्याचे उल्लेख असतात त्यांच्या उल्लेखांवरून त्या माणसांच्या हालचालीचा काल ठरला असल्यास त्या प्रसंगाची कालमर्यादा ठरविता येते.

(९) प्रसंगात वर्णन केलेल्या विशिष्ट प्रकाराच्या कालदर्शक व कालसूचक तपशीलांवरून कालमर्यादा ठरविता येते.

(१०) विषयावारीच्या व कालक्रमाच्या चुका होण्यामागचे एक कारण म्हणजे असमकालीन साधनांतील किंवा कालांतराने लिहिलेल्या मजुकरांतील विषयावरील अगर कालक्रम इतर समकालीन विश्वसनीय पुराव्यांच्या आधाराने बरोबर ठरल्याशिवाय त्याचा कालनिर्णयास उपयोग करणे होय, असे बेंद्रे सांगतात.

(११) अनुमानाने बसविलेल्या प्रसंगातील क्रमावरून त्यातील कोणत्याही प्रसंगाचा निश्चित कालनिर्णय करता येत नाही, असे बेंद्रे पुढे सांगतात.

(१२) अक्षयतृतीया, रामनवमी वगैरेसारख्या शुभतिथीने शुभप्रसंगाचा कालनिर्देश केलेला असल्यास त्या प्राणमतभिमान व श्रद्धा दृष्टिस पडते. परंतु खरी वस्तुस्थिती नसण्याचाच अधिक संभव असतो. म्हणून अशा नुसत्यास शुभतिथी दिल्या असल्यास इतर अव्वल आधाराशिवाय त्या मान्य धरू नयेत.

(१३) एखाद्या प्रसंगाच्या अगर कारकिर्दीच्या आरंभ व अंताच्या कालनिर्देशावरून मधल्या लहानसहान बाबींचे अनुमानाने जे एखाद्या साधनात कालनिर्देश केलेले असतात, ते इतर आधारांशिवाय खरे मानू नयेत.

(१४) एखाद्या अनिश्चित अगर चुकीच्या कालनिर्देशावरून काढलेले अगर बसविलेले सर्व कालनिर्देश ग्राह्य धरू नयेत.

(१५) सर्व अनिश्चित किंवा निर्णायक न ठरलेल्या कालनिर्देशांचा इतिहासरचनेत उपयोग करीताना ते अनिश्चित असल्याचे स्पष्टपणे सांगावे.

प्रसंगाचे व त्यातील तपशीलांचे कालनिर्णय हाच इतिहासाचा पाया असतो आणि हा जितका शुद्ध व भक्कम असतो तितकी त्यावर उभारली जाणारी इतिहासाची इमारत भक्कम व चिरायू होऊ शकते. कालनिर्णयाच्या बाबतीत केवळ परंपरेचे अगर लोकांच्या समजुतीचे हितसंबंध जोडणे अशास्त्रीय आहे. तसेच नक्की कालनिर्णय पटला नाही म्हणून चुकीचा ठरला गेलेला कालही मान्य करणे अगदीच अन्यायाचे व अशास्त्रीयेतेचे लक्षण ठरते असे बेंद्रे सांगतांना आपल्याला दिसतात.[३१]

[१५] अर्थबोध चिकित्सा :

अर्थबोधासाठी लेखाचे अंतरंग परीक्षण करणे आवश्यक असते व ते दोन प्रकारे केले जाऊ शकते - (१) लेखातील तपशीलांचे वर्गीकरण करून लेखकाचा सांगण्याचा आशय कोणता आहे हे शोधून काढणे (२) लेखकाने कोणत्या स्थितीत व मनोभूमिकेत तो लेख लिहिला आहे हे ओळखून नंतर त्या लेखकाने केलेल्या विधानांतील किंवा तपशीलातील सहेतुक किंवा संस्कारप्रणित चुकीच्या मजकुराला दूर करावयाचा किंवा त्यांतील असत्य मजकूर असण्याचा जो संभव त्या संभवावरून दिलेल्या मजकुराची फेरतपासणी करणे.

अर्थबोध चिकित्सा करण्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात असे बेंद्रे सांगतात -

(१) जर मूळ साधन वाचवयाचे असेल तर तत्कालीन लिपीचे ज्ञान करून घेतल्यास मूळ शब्दांचे बिनचूक स्वरूप समजून घेता येते.

(२) कालांतराने भाषेच्या प्रचारात फरक होत असतात. म्हणून तत्कालीन शब्दांचे अर्थ व योजनेचे स्वरूप शोधून काढले पाहिजे. तत्कालीन वाङ्मयात निरनिराळ्या ठिकाणी केलेल्या शब्दांच्या उपयोगावरून तत्कालीन शब्दांचे सामान्य अर्थ व योजनेचे स्वरूप जाणता येते.

(३) स्थलांतराने व्यवहारपद्धतीप्रमाणे वगैरे भाषेतील प्रचारात फरक पडतात. ते त्या स्थळाच्या भाषेच्या अभ्यासाने माहिती करून घेतले पाहिजेत.

(४) निरनिराळ्या वेळी परकीय अेर परभारूषेचा संबंध आल्याने भाषेत नवीन अपभ्रष्ट वगैरे शब्द येतात व जातात. अशा अपभ्रष्ट शब्दांचा अर्थ मूळ परभाषीय शब्दाला धरून असतोच असे नाही तर अशा शब्दांचे चांगले ज्ञान करून घेतले पाहिजे असे बेंद्रे सांगतात.

(५) लेखक बरेच वेळा विविक्षित शब्द विवक्षित अर्थाने योजित असतो. अशावेळी त्या लेखकाच्या लेखांचा अभ्यास करावा लागतो.

(६) बेंद्रे म्हणतात की, कित्येक वेळा शब्दांचा अर्थ संदर्भावरून घ्यावा लागतो. वाक्यातील शब्दांच्या विवक्षित योजनेने शब्दांचा सामान्य अर्थ लागू पडत नाही. एखादा शब्द सरळ वाक्यात जो अर्थबोध करील तोच अर्थबोध त्याच शब्दाचा उपयोग एखाद्या म्हणीत वगैरे केल्यास होणार नाही.

(७) क्वचितप्रसंगी शब्दांची योजना भ्रामक अर्थ कल्पून केली जाते. बहुधा असे प्रयोग लेखक लिहिण्याच्या भरात करून जातो. अशावेळी त्या शब्दांचे सूचित अर्थ व्यापकतेने द्यावे लागतात.

(८) शब्दावडंबराने मूळ अर्थबोध घालविलेला असतो अशाप्रसंगी आशयच ओळखून अर्थबोध करून घ्यावा लागतो.

(९) शब्दांची योजना द्व्यर्थी अगर गूढार्थाने केली जाते अशावेळी अधिक सावध राहावे लागते.

(१०) व्यंगार्थाने भाषाप्रयोग केले जातात तेथे प्रथम लेखकाची मन:स्थितीच जाणणे जरूर असते.

हे सर्व करतांना व्यंगार्थी शब्दयोजना किंवा उपरोधी भाषा वगैरे, लेखक प्रत्येक साधनात वापरतो असे नाही. जर आपण प्रत्येक वाक्य अशा दृष्टिने तपासू लागलो तर ते चुकीचे होईल. जितका आपण ह्या अर्थबोध-चिकित्सेत परिश्रम करू तितका आपल्याला ऐतिहासिक साधनांचा उपयोग संयुक्तिक व साधार करता येईल. त्याचप्रमाणे मूळ पाठही चांगल्याप्रकारे तपासता येऊन लेखकाच्या आशयाप्रमाणे सुधारता येईल किंवा बिनचूक मांडता येईल.[३२]

[१६] अंतरंग परीक्षणासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

अर्थबोधामुळे लेखकाचा मूळ आशय समजू शकतो; परंतु त्याने जे लिहिले ते लेखकाने जसे पाहिले तसे नमूद केले किंवा कसे, किंवा त्याला जे वाटले किंवा मनाला पटले तसेच लिहिले किंवा खोटे बणावून लिहिले याचा बोध होणार नाही. एकच प्रसंग निवेदन करणारी दोन साधने उपलब्ध झ ााली की त्यांच्यातील तपशीलात विरोध हा असणारच. अर्थात त्यातील कोणत्या तरी एका साधनातील माहितीबद्दल संशय घेणे क्रमप्राप्तच होते. म्हणून प्रत्येक साधन खरेपणानेच लिहिले गेलेले असते, हा भावच प्रथम मनातून दूर केला पाहिजे. अंतरंग परीक्षणात लेखकाच्या विश्वसनीयतेची चौकशी खालील मुद्यांच्या साह्याने करता येते असे बेंद्रे म्हणतात.[३३]

(१) लेखकाने वर्णन केलेल्या प्रसंगाच्या कालाशी तो समकालीन किंवा निदान जवळजवळ समकालीन आहे की नाही.

(२) तो त्या प्रसंगाला प्रत्यक्ष साक्षीदार आहे किंवा नाही.

(३) तो जे लिहितो ते श्रद्धेने लिहितो किंवा कसे.

(४) त्याला त्या प्रसंगाची तपशीलवार व क्रमवार माहिती आहे की नाही.

(५) त्याला त्या प्रसंगातील सत्य माहीत आहे का? असल्यास तसेच ते सांगत आहे का? किंवा सांगण्याची त्याची प्रवृत्ती आहे का? अथवा एकाच प्रश्नात तपासणी करावयाची तर

(६) तो विश्वसनीय आहे किंवा नाही.

परंतु एवढी परीक्षा झाली म्हणजे संपते असे नाही. कारण सशास्त्र शुद्धता जाणण्याइतकी परीक्षणाची ही चाळण बिनचूक नाही. जोपर्यंत एखाद्या प्रसंगाच्या तपशीलाची सत्यता किंवा संभाव्यता आपल्या चिकित्सक बुद्धीला पटली नाही किंवा पुराव्यांच्या साहाय्याने साबित करून घेता आली नाही तोपर्यंत कितीही समकालीन लेखक असला तरी त्याने लिहिलेला मजकूर निर्णायक न मानता तपासणीसाठी विचारात ठेवणे अगदी सशास्त्र व युक्त असते असे बेंद्रे म्हणतात.

[१७] दुय्यम साधनांचा ऐतिहासिक साधन म्हणून कसा उपयोग करावा यासंदर्भात वा. सी. बेंद्रेंचे लिखाण :

ऐतिहासिक साधनात प्रत्यक्ष पाहून लिहिलेली माहिती अगदीच विरळ असते. बहुतेक सर्व अप्रत्यक्ष अगर परंपरेचीच माहिती उपलब्ध असते. म्हणून इतिहासरचनेस अशा दुय्यम दर्जाची माहितीचाही उपयोग करणे भाग पडते. इतर कोणत्याही शास्त्रात अशी दुय्यम प्रकारची माहिती विचारात घेतली जात नाही. अशा दुय्यम प्रकारच्या साधनांची चिकित्सा करतांना लिहिणाराच्या मनोवृत्तीची वगैरे तपासणी करण्यापेक्षा लिहिणाराला ज्याने माहिती दिली त्याच्या मन:स्थितीची छाननी करणे जरूर पडते; परंतु लिहिणाराला जो माहिती देतो त्याचे नाव गाव समजू शकतेच असे नाही. तसेच निरनिराळा प्रसंग निरनिराळ्या एका अगर अधिक साक्षीदारांकडून घेतला असल्याचाही संभव असतो. अशावेळी साधनांच्या सामान्य स्थितीवरून प्रसंगांचे परीक्षण करावे लागते. या परीक्षणात पहिला प्रश्न असा उद्‌भवतो की, साधनात दिलेल्या प्रसंगात ठरावीक परंपरा दृष्टिस पडत आहे किंवा कसे? अशा परंपरेच्या माहितीत सहेतुक किंवा इतर काही कारणांनी फेरफार करण्यात आला आहे किंवा काय? अशा फेरफारास व्यक्तिविषयक, समाजविषयक, देश अगर धर्मविषयक स्वभावदोष आढळतात किंवा कसे? अशा प्रकारच्या परीक्षणाने मूळ परंपरेच्या माहितीवर चढलेली आवरणे दूर करता येतात. जर ही परंपरा लेखनाद्वारे मर्यादित केली गेली असेल तर तिच्यामध्ये

अफरातफर होण्याचे प्रमाण फारच लहान असू शकते. परंतु जेव्हा परंपरा दंतकथेचे स्वरूप घेते तेव्हा मात्र त्यातील मूळ पाठ शोधून काढणे जवळजवळ अशक्यच होऊन बसते असे बेंद्रे सांगतात.

अशा दंतकथांचा इतिहासातून होता होईल तो उपयोग करूच नये. इतिहासकार अशा दंतकथांचा आपल्या लिखाणात उपयोग केला असल्याचे स्पष्ट सांगत नसतो. अशावेळी लेखकाने ज्या कालचा प्रसंग वर्णीला असेल त्या काली प्रसंगवर्णनातील सर्वच गोष्टी लिहून ठेवण्याचा परिपाठ होता किंवा नाही हे तपासणे हा होय. जर तसा परिपाठ नसेल तर लेखकाला ती माहिती दंतकथांवरूनच मिळाली असे मानण्यास हरकत नाही. असे बेंद्रे सांगतांना आपल्याला दिसतात. तसेच पुढे ते नमूद करतात की, हिंदुस्थानच्या इतिहासातील बऱ्याच प्रसंगांची जोपासना दंतकथांतूनच होत आली आहे हेही तितकेच सत्य आहे.[३४]

[१८] लेखांच्या परीक्षणासंदर्भात वा.सी. बेंद्रे यांचे लिखाण :

हस्तदोषाच्या, वाचनाच्या वगैरे स्वाभाविक चुका नकलकाराच्याकडून होत असतात. मजकूर न लागल्यास तो सुधारून लिहिला जातो. एकच नकल उपलब्ध असेल तर फक्त काही वाचनाच्या अगर लेखनदोषाच्या बारीक-सारीक चुका सुधारता येणे शक्य असते. इतर दोष शोधून काढता येत नाहीत. वाचनाचे अगर लेखनाचे दोष शोधून काढण्यास (अ) तत्कालीन भाषेचा व भाषेतील विवक्षित प्रचारांचा चांगलाच अभ्यास झालेला असावा लागतो. (आ) तत्कालीन लिपीचे व वळणाचे चांगले ज्ञान झाले असावे लागते, व (इ) साधनांच्या नकला करताना कोणते हस्तदोष व वाचनदोष होऊ शकतात व कोणती वाक्यरचना नक्कलकारांना घोटाळ्यात टाकते यांचे आडाखे अवगत करून घ्यावे लागतात. नकलांचे वाचन सुधारून बसविले म्हणजे त्या छापताना सुधारलेल्या स्थितीत छापणे योग्य नसते, कारण कित्येक वेळी आपले अनुमानही चुकीचे असण्याचा संभव असतो. म्हणून मूळ नक्कल जशी उपलब्ध असेल तशीच घेऊन नंतर शेवटी आपल्या सुधारणा द्याव्यात.

ज्या लेखांचे मुळे हरवले आहे; परंतु नकला मात्र विविध आहेत असे लेख या लेखांचे मूळ शोधून काढण्याची बरीच आशा धरता येते. परंतु अशावेळी जी नक्कल प्रथम हाती येते ती खरी मानण्याचा एक स्वाभाविक ओढा असतो. जर निरनिराळ्या कालाच्या नकला असतील तर त्यात जी

कालाने जुनी तीच मान्य करण्याचा कधी कधी कल असतो किंवा सर्व नकला एकत्र करून त्यांतील जो पाठ बऱ्याच नकलांत आढळतो तो पाठ ग्राह्य मानला जातो. प्रथम हाती आली म्हणून ती नक्कल खरी मानणे काही प्रसंगी चुकीचे ठरते. जी नक्कल जुनी ती मुळाला धरून अधिन असावयाची हा सामान्य नियम आहे खरा; परंतु एखादी उशिरा केलेले नक्कल खास मुळावरून केली जाऊन अधिक शुद्ध व प्रमाणभूत असणेही शक्य असते. बहुमतांवर निर्णय देणे तर अगदीच चुकीचे असते. कारण हे बहुमत जमेला न धरिता ते एकच मताची नकल असते. अर्थात असले बहुमत जमेला न धरिता एकच मत जमेला धरून दुसऱ्या मताशी त्याची तुलना करावी व नंतर त्यातील त्याज्यात्याज्य कोणते हे त्यातील मजकुरावरून ठरवावे हीच खरी पद्धती होय.

ज्यावेळी विविध नकला उपलब्ध असतील त्यावेळी त्या नकलांचे परीक्षण करताना प्रथम एकाच जातीच्या नकला निरनिराळ्या कराव्यात नंतर नकलांतील माहितीच्या परंपरेवरून व मजकुराच्या लेखनशैलीवरून या निरनिराळ्या जाती कोणाकोणापासून उत्पन्न झाल्या ते तपासावे. यातील अधिक सप्रमाण व शुद्ध वाटेल त्या नकलेला पहिला क्रमांक द्यावा; परंतु कोणत्याही साधनाची नक्कल शुद्ध करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तिला मूक साधनाची जागा भरून काढता येत नाही. अशा शुद्धीकरणातही काही दोष शिरणे शक्य असते. शिवाय नक्कल तपासणी कितीही केली व मूळ पाठ शोधून काढण्याची कितीही खटपट केली तरी त्या तपासणीने अगर खटपटीने मूळ पाठ निश्चितपणे समजणे अगदी अशक्यच असते, असे बेंद्रे सांगतात.[३५]

[१९] तारीख-माहे-सनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

तारीख-माहे-सनाच्या संदर्भात वा. सी. बेंद्रेंनी सर्व बाजूचा अभ्यास केला व त्यातील कमतरता व अडचणी कशा पूर्ण कराव्यात यासंदर्भात संशोधकांना काही सूचनाही दिल्या आहेत.

साधारणतः बहामनी राजांचा अंमल बसल्यापासून दक्षिणेत हिजरी सन वापरण्यात येऊ लागला असे बेंद्रे सांगतात. चंद्र (छ) व माहे ही मुसलमानी पद्धतीचेच कागदपत्रांत येऊ लागले. तत्पूर्वी शक, माहे, तिथी - काही ठिकाणी वानामासहित व संवताच्या उल्लेखासहित देण्यात येत होत्या. शालिवाहन व विक्रमसंवातऐवजी राजशकही दिलेले आढळतात; परंतु यांना शिवाजी

महाराजांच्या राजशकाप्रमाणे राज्याभिषेक 'श' किंवा राज्यस्थाना 'शक' असे न म्हणता फक्त 'शक' असाच उल्लेख केला गेल्याने पुष्कळ वेळा हा 'शालिवाहन शक' असावा असे समजले जाते.[३६]

बृहस्पती संवत म्हणजे ६० संवतत्सरांची नावे जी जोडली जातात त्यात शक सनाचा मेळ चांगला बसवलेला असतो. परंतु नकलकार वाचनांतील दोषामुळे व या सामान्य व साध्या गणिताची माहिती नसल्याने त्यांत चुका करतात. शकाचा आकडा कविताबद्ध पत्रात अगर ग्रंथात देणे जड जाते. म्हणून तो 'सांकेतिक' पद्धतीने म्हणजे अंकातील प्रत्येक आंकड्यात विशिष्ट संख्यादर्शक नामाने दर्शविला जातो. ही विशिष्ट नामे सर्वसाधारण रूढ समजुतीलाच धरून असतात. या नामांचा उपयोग अर्थातच गणमात्रेला धरून केला जात असल्याने त्यांत विविधता येते. बऱ्याच ठिकाणी या कवितेखाली शकाचा आंकडाही लिहिला जातो.

पूर्वी लेखनप्रकार अगदी मर्यादित असल्याने राजाच्या पदरचे किंवा गावोगावचे जोशी ज्योतिषी आपापल्या ठरावीक गणितपद्धतीने हा तिथीचा निर्णय लोकासं दर आठवड्यास जाहीर करीत असल्याने क्वचितप्रसंगी एखादे तिथीत अंतर पडलेले आढळते. परंतु सरकारी कागदपत्रांत इस्लामी सुलतानांच्या राज्यापासून शकमाहेतिथीचा उपयोग होणे बंद झाले. ह्या ऐवजी विशेषतः आदिलशाहीच्या सुरुवातीपासून आरबी सन व मुसलमानी महिने व चंद्रतारखा लिहू लागले. पार्शियन अगर उर्दू ग्रंथात मात्र हिजरी सनाचाच उपयोग केलेला आढळतो. पुढे दक्षिणेत हाच प्रघात चालू राहिला.

इ. स. १६३८ च्या सुमारास दक्षिणेत फसली सन वापरण्यास सुरुवात झाली. मात्र दक्षिणेत आरबी व हिजरी सनालाच अधिक प्राधान्य दिले जात होते. १८ व्या शतकांत सर्व मुलकी कारभारात फसली व आरबी सनच लिहिले जात. कारण ते महसुलाच्या वार्षिक वसुलाच्या दृष्टिने उपयुक्त होते. दक्षिणेत हिजरी सनाला फारसा वाव राहिलेला नव्हता तरी मोगली सरदार हिजरीचाच अधिक वापर करीत. मोगली राज्य जरी अव्वल सरकारी पत्रांवर मुसलमानी महिना व तारीख देत असत तरी हिजरी सनाऐवजी राजशक म्हणजे जुलूस वर्ष दिले जाते. परंतु हा राजशक शिवाजी महाराजांच्या किंवा गुप्त वगैरेच्या राजशकासारखा नसे. हे हिंदू शक राज्याच्या मुळारंभापासून सुरू होत व नंतर ते पिढ्यांन्पिढ्या राज्याच्या नाशापर्यंत चालत. जुलूस सन हा त्या त्या राजाच्या अगर बादशाहाच्या

कारकिर्दीपुरताच मर्यादित राही. एका बादशाहाच्या तख्तनसीन होण्याच्या वेळेपासून ती सुरू होत असे व तो त्या राजाच्या मृत्युनंतर दुसरा राजा तख्तनसीन होईपर्यंत चाले. नंतर तो पुन्हा एकापासून मोजला जात असे. अर्थात या जुलूस सनाची सुरुवात राज्यारोहणाच्या तारीख महिन्यावर अवलंबून राहिल्याने हा जुलूस सन हिजरी सनासाखा ३५५ दिवसांचाच राहिला. मोगली साम्राज्यात या जुलूस जमीन महसुलाचे वर्ष आधारलेले नसे. त्यासाठी उत्तर हिंदुस्थानात फसलीसारख्या सनाचाच वापर केला जात होता व तो ज्या ज्या वर्षी निरनिराळ्या प्रदेशात चालू झाला त्या त्या देशात तो त्या त्या वर्षाच्या हिजरी सनाला जोडून त्या फसलीचा आकडा सुकर करण्यात आला. त्यामुळे त्यानंतर हिजरी व फसली सनांत दर ३१-३२ वर्षांनी एकेका आकड्यांनी फरक पडत गेला कारण हिजरी हे चांद्रमासपद्धतीचे वर्ष राहिले व फसली हे सौरपद्धतीचे म्हणजे ऋतुमानाला धरून वर्ष गणले गेले.[३७]

अकबरने जमीन महसुलादी कारभाराशी जुळते घेण्यासाठी हिजरी सन माहे चंद्रपद्धती ऐवजी सौरपद्धतीची कालगणना अमलात आणली. या पद्धतीचे नाव 'तारीखे इलाहि' असे ठेवले. ही कालगणना राज्यकारभारात अकबराच्या हयातीत बिनचूक चालू राहिली. परंतु मुसलमानांचा ओढा त्यांच्या मुसलमानी मास व तारीखेकडे, त्यांच्या सणादी धार्मिक आचारआचरणुकीकडे, राहिल्याने 'ईलाहि' वर्षाचा उल्लेख जुलूसने घेतल्यामुळे व महसुलास प्रादेशिक फसली वापरू लागल्याने या अकबराच्या कालगणनेकडे जहांगिरच्या कारकिर्दीपासूनच दुर्लक्ष होऊ लागले. त्यामुळे इलाही पद्धतीच्या तारखा जोड म्हणून जरी कांही दिवस उल्लेखल्या जात होत्या तरी महिन्याचा आद्यंताच्या गणनेत चूक येत असे व त्यामुळे या तारखा त्या इलाहि पद्धतीप्रमाणे साहजिकच चुकीच्या ठरतात. शहाजहानने मात्र इलाहि पद्धतीचा उपयोग राज्यात थांबविला व जुलूस-हिजरी-फसली हीच कालगणना चालू ठेवली. मुसलमानी महिने व तारखा गणनाचे कार्य पूर्वीप्रमाणेच पुढे चालविले. त्यामुळे साहजिकच मुलकी खात्यात फसलीला अधिक प्रामाण्य प्राप्त झाले. राज्यकारभारात जुलूसने मोगलाईच्या शेवटपर्यंत जागा घेतली. मुसलमानी महिने व तारखा मात्र सर्रास चालू राहिल्या.

शिवाजी महाराजांनी प्रथम आदिलशाहीच्याच तारखांच्या उल्लेखाचा प्रघात चालू ठेवला. राज्याभिषेकानंतर मात्र राज्याभिषेक शक व हिंदू मासतिथी पद्धती अंमलात आणली. त्यामुळे हिंदू पंचागपद्धतीचा बराच उपयोग होऊ लागला. कारण ही वर्षपद्धती जमीन महसुलालाही जुळती झाली

होती. परंतु ह्या राज्याभिषेक शकाचा उल्लेख फक्त राज्यपत्र व्यवहारातच विशेष करून आढळतो. इतर कारभारात मुसलमानी महिने व तारखा अरबी सनासह देण्यात येत असत. अरबी सन हा आकड्यात न लिहिता ठरावीक संख्यादर्शक शब्दांनीच अक्षरी लिहिला जात असे. हिजरी व फसली सन संख्येतच व्यक्त केले जात. हा क्रम शाहूच्या आगमनापर्यंत चालू होता. परंतु पेशव्यांचा उत्तर हिंदुस्थानाशी संबंध येऊ लागतांच फक्त छत्रपतीच्या खास पानांवर राज्याभिषेक शक व हिंदुपंचागाचा अवलंब केला गेला. मात्र इतरत्र महुसलाच्या काही बाबी सोडल्या तर अरबी सन व हिजरी सनही दिला जाई. हिंदूच्या ग्रंथांत मात्र शकमाहेतिथीचाच उपयोग केला जाई. इंग्रजांनी प्रथप जरी स्थानिक राजेरजवाड्यांस लिहिलेल्या कांही पत्रपांत जुलुस सन मुसलमानी महिना तारखेचा उपयोग केला असला तरी थोडेच दिवसांत त्यांनी आपला ख्रिस्ती शक व इंग्रजी (जॉर्निअन) कालगणना पद्धती सर्वत्र चालू ठेवली.[३८]

(अ) तारीख-माहे-सनांच्या संदर्भात घ्यावयाची काळजी :

हिजरी सनाच्या बाबतीत फारश्या अडचणी येत नाहीत. परंतु कोणी हिजरी सनाप्रमाणे एखाद्याचे वयोमान अगर कालावधीचे वर्णन केल्यास इतर कालगणनापद्धतीप्रमाणे येणाऱ्या वर्षसंख्येत व हिजरी सनाच्या वर्षसंख्येत प्रत्येक ३२ वर्षाच्या कालचक्राला एक वर्ष याप्रमाणे फरक येतो. म्हणजे हिजरी सनाप्रमाणे त्या कालचक्राच्या वर्षाची संख्या एक वर्षाने अधिक येते. शंभर वर्षांनंतर लिहिणारा हिजरी सनाप्रमाणे जे वयोमान सांगले त्यांत व इतर कालगणनेप्रमाणे मोजणारांत तीन वर्षांचे अंतर भासेल.

हिजरी महिन्याची सुरुवात प्रत्यक्ष चंद्रदर्शनावर आधारलेली असल्याने हा चंद्रदर्शनाचा कालही बरेच वेळा त्या त्या गावाच्या अक्षांशा-रेखांशाप्रमाणे बदलतो. त्यामुळे क्वचित ठिकाणी महिन्याचा प्रारंभकालही एका दिवसाच्या फरकाने मानला जातो. त्याचप्रमाणे हिजरी तारीख सायंकाळी सुरू होते. त्यामुळे इतर कालगणनेप्रमाणे तारीख काढतांना एका दिवसाचे अंतर येऊ शकते. परंतु या मुसलमानी महिन्यांच्या तारखेत फार मोठा घोटाळा उद्‌भवतो तो ही तारीख फसली अगर अरबी सनाच्या सुरुवातीची अगर अखेरच्या दहा दिवसांतील तारीख देतात. तेव्हा फसली अगर आरबी सन ३६५ दिवसांचा ऋतुमानाप्रमाणे असतो तर हिजरीचे बारा महिन्याचे दिवस फक्त ३५५

भरतात. त्यामुळे तोच तोच महिना व त्याच त्या तारखा सुरुवातीला व अखेरीस येतात. म्हणून फसली अगर आरबी सनाचा प्रारंभ १ रमजानने झाला असला तर शेवट १० रमजानने होतो. त्यामुळे एका वर्षात १ ते १० दिवसांच्या तारखा पुन्हा येतात. या तारखा देताना सुरुवातीच्या दहा तारखांना अव्वल असे विशेषण लावतात व शेवटच्या दहा तारखांना अखेर असे संबोधन जाते; परंतु पुष्कळवेळा अव्वल व अखेर असे न उल्लेखताच या तारखा मजकुरात येतात आणि मजकुरावरून अव्वल अगर अखेर जाणण्याची सोय नसेल तर पुष्कळ वेळा या तारखांच्या कालमानाचा अंदाज एका वर्षाने चुकीच्या ठरण्याचा संभव असतो. त्यामुळे अशावेळी थोडी काळजी घेणे भाग असते.[३९]

आरबी व फसली सनाचा प्रारंभ मृगदर्शनावर अवलंबून असतो. ही जी नक्षत्रमान पद्धती अवलंबली जाते व सौरमान पद्धतीच्या इंग्रजी तारखांत थोडा थोडा जो फरक पडतो त्यामुळे हे नक्षत्रमान पद्धतीचे वर्षारंभ ठरवतांना अडचण उपस्थित होते. शिवकाळी नक्षत्रमानपद्धतीप्रमाणे २४ मे हा फसली व आरबी सनाचा प्रारंभदिन येत होता तो ठरावीक कालांतराने बदलत बदलत जात तो आज ८ जूनपर्यंत येऊन ठेपला आहे.

कर्नाटक प्रांतात (तामिळनाडू) फसली सनाची सुरुवात इंग्रजांनी जुलै महिना ही ठरवून दिली होती. उलट उत्तर हिंदुस्थानात या फसली सनाच्या सुरुवातीला प्रादेशिक भेदाभेद असलेले दिसून येतात. सुहुरसन देताना कित्येक कागदांवर विशेषतः महसुलाबाबतच्या कागदांवर हा सन संपूर्णतः न देता त्यातील एकम वा फारतर एकम व दशम वाचक संख्यानामाने लिहिला जातो. एकम आकडाच दर्शविला असला तर त्या सनाचा दशम व शतम स्थानाचा आकडा तर्काने बसवितांना पुष्कळवेळा चूक होते. त्याशिवाय हे अंक शब्द वाचताना चुकीचे वाचन केले जाते ते वेगळेच.[४०]

सलासीन व खमसीन यांतील पहिल्या दोन मोडी अक्षरांत बरेच साम्य असल्याने पुष्कळ वेळा तीसीचा आंकडा पन्नासी म्हणून किंवा उलट मानला जातो आणि वीस वर्षाचे अंतर पडते. मजकुरांवरून जर ही चूक सुधारता आली तर ठीकच परंतु तसा पडताळा घ्यावयास नेहमी संधी मिळतेच असे नाही. खास शिवाजी महाराजांच्या शिक्क्याचे कागदपत्र वाचनाने नेत्याने शिवाजी महाराज किंवा त्यांच्या नावे त्यांच्या वयाच्या पहिल्या वर्षाच्या आंतच राज्यकारभार सुरू केल्याचे मानण्याकडे कल झाला.[४१]

शक माहे तिथी पद्धतीतही अशाच कांही अडचणी उभ्या राहतात. तिथीमानाचा उदयास्त इंग्री तारखांप्रमाणे ठरावीक घटकेला होत असतो. सूर्योदयाला जी तिथी असते तीच व्यवहाराला दुसऱ्या दिवसाच्या सूर्योदयाप्रमाणे धरिली जाते. त्यामुळे महिन्यांतून एखाद दोन तिथींचा लोप होतो किंवा एकच तिथी लागोपाठ दोन दिवस राहते. त्यामुळे तिथीपक्षाचा हिशेब इतर कालगणनापद्धतीप्रमाणे नियमित राहत नाही. वाराची योजना आपलेकडे जशी तिथीला धरून आहे तशीच इतरत्रही ती त्यांच्या तारखांना धरून असते. त्यामुळे तिथी-वार व त्याच तिथी-वाराची तारीखवार लिहिण्यात जी बारकाई असावी लागते ती बाळगली नसेल तर तिथिवार तारखेचा मेळ बसत नसल्याचा भास होतो; परंतु निश्चित वेळेचा उल्लेख मिळाला तर या तिथिवार तारखांचा मेळ बसवण्यात अडचण येत नाही. हा घोटाळा विशेषतः रात्रीचा प्रसंग निवेदनात होत असतो. हिंदू पद्धतीप्रमाणे सामान्यतः अडीच वर्षांत एकदा तरी अधिक मास म्हणजे त्या वर्षास तेरा महिने गणिले जातात. हे महिने सूर्याच्या राशीराशीतल्या भ्रमणावर ठरविले जातात. ज्या राशीत सूर्य एका चांद्रमासापेक्षा अधिक काल राहतो. तो राशी-महिना अधिक मास म्हणून गणला जातो. त्यामुळे हा अधिक महिना ठरीव महिन्यांत येतो असे नाही. त्याचप्रमाणे ज्या राशीत सूर्याचे भ्रमण एका चांद्रमासांत एका राशीतून तिसऱ्या राशीत होते त्यावेळी त्या भ्रमणकालांतील दुसरा महिना क्षयमास असतो.

सारांश या कालगणनेत सर्वस्वी जंत्रीवरच किंवा पंचागावरच विसंबून राहावे लागते. शिवाय तत्कालीन जोशींचे जोतिर्गणित व आजची जुनी पंचागे यांत सर्वत्र ऐक्य असेल असे नाही.[४२]

उपरनिर्दिष्ट अडचणीखेरीज धार्मिक भावनाही या तिथीनिर्णयांत प्रश्न उपस्थित करितात. संकष्टी चतुर्थी ही बहुधा व्यावहारिक तृतीयेलाच असते. कांही आमावस्या की ज्याचे महत्त्व सायंकाळचे पूजेत मानले जाते त्या बहुधा आमावस्येच्या आदल्या दिवशीच ह्या पूजा होतात. कारण आमावस्या त्या दिवशी सूर्योदयानंतर लागते व ती दुसरे दिवशी सूर्योदयालाच असते. त्याचप्रमाणे कांही विधिकर्मातीलही ह्या तिथीनिर्णयामुळे नंतर समजुतीत गोंधळ उडतो. विशेषतः श्राद्धपक्षासारख्या धार्मिक बाबतीत अपऱ्हाणकाली असलेली तिथी मान्य धरतात. त्यामुळे सूर्योदयाची तिथी पंचमी असली व षष्ठी दहा अकरानंतर लागत असली तर ते विधी अपऱ्हाणकाली असलेल्या षष्ठीला करितात. त्यामुळे श्राद्धतिथीवरून मृत्युतिथी बरोबर असेलच असे नाही. सारांश,

भारतात कालगणना पद्धतीत नुसती विविधता आहे म्हणूनच नव्हे तर त्या गणनेंतही कांही अनियमित प्रघात असल्याने इतिहासास आवश्यक असणाऱ्या कालनिर्णयाबाबत बरीच काळजी घेणे प्राप्त होते.[४३]

दक्षिणेतील इंग्रज, पोर्तुगीज, डच व फ्रेंच यांचा संबंध सतराव्या शतकात बराच आला. मूळ युरोपीय कालगणनेत सुधारणा झाली. या नवीन सुधारलेल्या पंचांगात इंग्रज, पोर्तुगीज, डच वगैरे राष्ट्रांनी निरनिराळ्या वेळी मान्यता दिली. त्यामुळे पोर्तुगीज नवीन पद्धती वापरतात तर इंग्रज जुन्या पद्धतीने बोलतात. म्हणजे ह्या नवीन जुन्या पद्धतीत दहा दिवसांचा फरक आहे तो तेथे लक्षात घ्यावा लागतो. जी गोष्ट १ ऑक्टोबरला घडली म्हणून ३ ऑक्टोबरला घडली म्हणून इंग्रज लिहितात तीच गोष्ट प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून सांगतांना ११ ऑक्टोबर अशी तारीख पोर्तुगीज देतील. तेव्हा युरापीय साधनसंग्रहाचा उपयोग करितांना हा भेदाभेद जुनी पद्धतीच वापरीत होते. इंग्रज पत्रव्यवहारात २५ डिसेंबर ते २५ मार्चपर्यंत पूर्वीचा व नवा असे जोड सन देतात. हा जोड सन देण्याचे राहून गेले की २५ मार्चपर्यंतच्या पत्रावर गतसालचा सनच येतो.[४४]

ताम्रपट व शिलालेखांत शक सन दिला जात असे. सोळा-सतरा-अठरा या शतकांत कालाचे निर्देश सर्व पत्रव्यवहारात आढळतात असे नाही. पुष्कळ पत्रे बिनतारीखीच आढळतात. पेशवेकालीन उत्तर हिंदुस्थानातून आलेल्या पत्रांत मुसलमानी महिना व तारीखेचाच उल्लेख असतो. सन दिलेला नसतो. त्यामुळे त्या पत्रांचा काल निश्चित करणे जड जाते. त्या काली पत्रें घेऊन येणारा खास जासूद पत्रांतील तपशीलाची तत्कालीन लोकांस फारशी अडचण भासण्याचे कारण नव्हते. उलट पत्रांतील मजकुरापेक्षा बरीच मोठी हकीकत जासुदाकरवी कळविली जात असे. दक्षिणेत जशी गत शक संवत देण्याची परंपरा होती तशीच महिनेही पौर्णिमात मानण्याची परंपरा होती. उत्तरेकडेही काही प्रातांत पौर्णिमांत महिने गणले जात.[४५]

कालांच्या उल्लेखामुळे आणि विशेषतः तशा उल्लेखांची त्याकाली अनावश्यकता भासल्यामुळे आता महाराष्ट्रांच्या इतिहास संशोधनात व लेखनात अनेक समस्या निर्माण होत आहेत. इतकेच नव्हे तर अशा कथालेखनामुळे इतिहासात बरीच अवास्तवता शिरली आहे. कालानुक्रम न समजल्यामुळे प्रसंगाप्रसंगांचे कार्यकारणभावात बराच विपर्यास केला गेला आहे आणि ही विपरित

रचना सुधारून इतिहासात वास्तवता निर्माण करणे फार मोठ्या प्रयासाचे काम होऊन बसले आहे. विपरित संस्कारांचा परिणाम सध्या जनमनावर इतका दृढतेने घर करून बसला आहे की सत्य वास्तवबोध पटण्यास सहज एक दोन पिढ्या जाव्या लागतील असा तर्क बेंद्रेंनी लावला आहे.[४६]

[२०] लेखकांच्या पात्रतेसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

कोणत्याही साधनांच्या सामान्य परीक्षणानंतर अंतरंग परीक्षणास सुरुवात करितांना जे साधन तपासावयाचे ते जर खरे असेल तर त्याचे अंतरंग शोधता येते. अंतरंग तपासणी करण्याच्या सुरुवातीस लेखाचे लेखन जो कोणी करितो त्याचे अंतरंग प्रथम तपासता आले पाहिजे. लेखकाच्या पात्रतापात्रतेवरच लेखाचे प्रामण्यप्रामण्य अवलंबून असते. एखादे साधन अस्सल असले; परंतु लेखक माहिती सांगण्याच्या दृष्टिने अपात्र किंवा गैरमाहितीगार असला तर त्या साधनाला मुळीच किंमत राहणार नाही. ज्याला एखादा प्रसंग माहीत नाही किंवा माहीत असण्याचा संभव नाही अशा माणसाने लिहिलेल्या माहितीवर विश्वास ठेवणे वेडेपणाचेच ठरते. म्हणून कोणतेही साधन हाती आले म्हणजे ते कोठे उपलब्ध झाले? त्याचा लेखक कोण? त्याचा लेखनकाल कोणता? लेखनकाने जी माहिती लिहिली ती त्याला समजण्याइतका त्याचा संबंध आहे काय? वगैरे गोष्टींचा आपण तपास लावून घेतला पाहिजे. लेखाचा लेखक कोण हे न समजले तर त्या साधनाला पुरावा म्हणून तेवढी किंमत देता येत नाही. फार तर त्याचा उपयोग उपकारक साधनांसारखा करिता येईल. सरकारी पत्रांतूनही जो अधिकारी पत्र लिहितो त्याचे नाव व पत्ता जर समजला तर त्या लेखात लिहिलेली माहिती मिळण्याचे त्याला मार्ग कोणते व ते मार्ग तितके अव्वल होते किंवा नाही हे त्याच्यावरून समजू शकते.

लेखकांचे नाव समजण्याचा मुख्य हेतु असा असतो की, त्याच्यावरून आपणास माहिती मिळविण्याच्या मार्गाचा बोध व्हावा व त्यायोगे माहिती किती अव्वल दर्जाची मानावी हे समजून यावे. विशेषतः बखरीसारख्या चरित्रग्रंथाचे प्रामाण्य तर केवळ लेखकाच्या पात्रतेवर व माहितीच्या साधनांवर अवलंबून असते.

माणसाच्या व्यक्तिविषयक नावापेक्षा जर त्याचा हुद्दा समजू शकेल तर ते अधिक श्रेयस्कर असते. हा मुद्दा कित्येक वेळा साधनाच्या प्रकारावरून ओळखता येतो. लेखकाची पात्रपात्रता जशी

त्याला माहिती मिळण्याच्या मार्गावरून ठरविता येते, त्याचप्रमाणे ती तो ज्या मनःस्थितीत ती माहिती लिहितो अगर मिळवितो त्यावरूनही कमी अधिक ठरते. म्हणून लेखकाची पात्रपात्रता ठरविताना जसा त्याचा सामान्य दर्जा व संबंध पाहण्यात येतो त्याचप्रमाणे त्याचे हितसंबंही विचारात घ्यावे लागतात.[४७]

[२१] लेखकाच्या सामान्य दोषसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

कोणी कसाही लेखक असो, त्याच्या लिहिण्यात काही स्वभावदोष व तसेच समजुतीचे दोष शिरणे अगदी स्वाभाविक असते. लेखक एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहून लिहिणारा असो किंवा ऐकून लिहिणारा असो, त्यात त्याचा स्वतःचा अभिप्राय म्हणा किंवा स्वतःची सुधारणा म्हणा तो घालीतच असतो. लेखक प्रत्यक्ष साक्षीदार असला तरी तो बिनचूक पाहून लिहिणारा आहे किंवा नाही हाही एक प्रश्नच असतो. कोणतीही गोष्ट बिनचूक व अगदी तपशीलवार पाहण्यास एक प्रकारची सवय लावून घ्यावी लागते. नुसती दृष्टि उत्तम असल्याने भागत नाही, असे बेंद्रे सांगतात.

लेखक पुरावा देताना काही वेळा सत्य लपवण्याचा अगर त्यावर काही तरी मल्लीनाथी करून विपरीत भासविण्याचा प्रयत्न करितो. अशावेळी तो एखाद्या तत्त्वाविरूद्ध असतो, अगर त्याचा त्यांत काहीतरी हितसंबंध असतो. लेखकाच्या आपलेपणाच्या वगैरे अभिप्रायाव्यतिरिक्त तत्त्वसिद्ध निःपक्षपाती लेख सापडणे अगदी विरळाच शक्य असते. कोणत्याही प्रसंगविवेचनात स्वभाव वर्णन किंवा कारण अगर फलनिष्पत्तीचे विवेचन केले जातेच. विशेषतः मोठ्या महत्त्वाच्या कालांनी मर्यादित अशा इतिहासांत जर असे विवेचन केले गेले नाही तर त्या इतिहासांत जिवंतपणाही राहणार नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात. जर एखाद्या गोष्टीतच पक्षपातीपणाचे विवेचन आढळून आले तर त्यामुळे सर्व तपशील अविश्वासार्ह ठरणार नाही; परंतु सर्वच तपशीलांत असा पक्षपातीपणा दिसून आला तर तो साधनलेखक सामान्यतः विश्वासार्ह नाही असेच ठरवावे लागते.

लेखकाला बऱ्याच वेळा तपशीलांत फरक न करिता त्यांतील महत्त्व कमीजास्त करिता येते. लेखक कित्येक वेळा आपल्या उपयोगी पडतील असेच पुरावे देतो व विरूद्ध असतील ते अजिबात सोडून देतो. एखाद्या घडलेल्या वाईटही गोष्टीच्या समर्थनार्थ अंगचेच उद्देश ठोकून देतात किंवा

कोणताही स्वभावदोष दाखवून सर्व नाशाला तोच दोष कारण झाला म्हणून सांगण्यात येते. परंतु अशा तऱ्हेचे एकपक्षीय अतिशयोक्ती केली गेली म्हणजे ती ओळखणेही बरेच कठीण जाते.

ऐतिहासिक साधनांच्या लेखकाचा लिखित बाबींत प्रत्यक्ष हितसंबंध नसेल तर तो तपशीलांत असत्य प्रकार घालण्याइतकी स्वार्थी प्रवृत्ती ठेवण्याचा उद्देश्य धरीत नसतो; परंतु कित्येक प्रसंगाची वर्णने देतांना त्यात भाग मात्र असणारी माणसे त्या प्रसंगाच्या वर्णनात त्या प्रसंगातील सर्व कर्तृत्व आपल्याकडेच ओढून घेताना दिसून येतात. अशावेळी या एका प्रवृत्तीखेरीज लेखक जरी अविश्वसनीय माहिती देणारा नसला तरी तो विश्वास घालवतो यांत शंका नाही.

क्वचितप्रसंगी असेही आढळून येते की, लेखकाला खरी परिस्थिती माहीत असली तरी तो ती न सांगताच दुसरीच एखादी बनावट आवृत्ती सांगत असतो. यात त्याचा मुख्य उद्देश्य मूळ पुरावा नाहिसा करण्याचा असतो. अशावेळी प्रत्येक प्रसंग निरनिराळ्या इतर उपकारक पुराव्यांच्या साहय्याने तपासावा लागतो असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

लेखकांच्या लिहिण्याला इतिहासाच्या पुराव्यात कमीपणा आणणारे आणखी एक मनोदौर्बल्य म्हणजे श्रद्धातत्त्व होय. बहुधा लोक श्रद्धाळूच अधिक असतात; परंतु ते श्रद्धाळू नसतात, ते संशयी व संदिग्ध असतात. या दोन्हीही स्वभावांमुळे ऐतिहासिक पुरावा या दृष्टीने त्यांच्या माहितीची तपासणी करताना त्यातील विश्वसनीयतेत कमीपणा येत असतो असे बेंद्रे सांगतांना आपल्याला दिसतात.

लेखकाच्या लेखावरून लेखकांची प्रवृत्ती समजते आणि अंतर्रंग परीक्षणास जी मन:स्थिती समजावी लागते तिचाही अंदाज येतो. लेखकाची प्रवृत्ती व मन:स्थिती या दोहोंचा बोध झाला म्हणजे लेखातील मजकुराच्या साह्यासाह्यातेबद्दलचा विचार करणे सोपे जाते नंतर तपशीलातील अधिक-उणेपणाचा छडा लावण्यास ठीक पडते. लेखकाचे विवक्षित दोष प्रथम शोधून न काढले तर पुराव्याची खरी कसोटी त्या लेखाला लागणार नाही व त्या लेखात जो काही ग्राह्यांश असू शकतो त्याचा इतिहास उपयोग करणे कठीण पडेल. मात्र लेखकाची प्रवृत्ती आहे अशी प्रथम खात्री करून घेतली पाहिजे. विशिष्ट प्रसंगातील एखाद्या बाबींच्याच तपशीलावरून अशी सामान्यप्रवृत्ती ठरविणे धोक्याचे व अयोग्य असते.[४८]

[२२] लेखकाचे लिखाण शास्त्रशुद्ध आहे किंवा नाही कसे ओळखावे? - वा. सी. बेंद्रे :

(अ) लेखक आपल्या लेखनाने इच्छित वाचणाराची मुद्दाम दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असून त्यापासून तो स्वतःचा काही फायदा करून घेऊ इच्छित आहे काय? असा प्रश्न मनाला विचारावा.

(आ) ज्यावेळी एखादी गोष्ट रीतिरिवाजाला सोडून अगर एखाद्याच्या चारित्र्याला कलंकित करणारी असते त्यावेळी तिला लेखक आपल्या लेखात गाळतो किंवा तिला दुसराच वेश देऊन समर्थन करण्याचा प्रयत्न करतो. तसेच लेखकाला सर्व माणसांची नावे किंवा त्यांची एकंदर तपशीलवार मोजदाद देणे शक्य नसते. नक्की काल-वेळही सांगता येतेच असे नाही. अशावेळी तो काहीतरी तपशील केवळ संभाव्यतेवरून देत असतो हे लक्षात ठेवले पाहिजे.

(इ) लेखक कित्येक वेळा आपल्या लेखात स्पष्टपणे पक्षपात दाखवीत नसला तरी त्याचे लिहिणे पक्षपातीपणाचे असण्याचा संभव असतो. असे बेंद्रे सांगून उदाहरण देतांना मुस्लीम लेखकांचे हिंदूच्या संदर्भात लिखाण व हिंदूचे मुस्लीम संदर्भातील लेखनाचे देतात.

(ई) लेखक जेव्हा आपल्या लेखात काही गर्वोक्तीने मजकूर सांगतो तेव्हा त्या गर्वोक्तीला दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या गर्वोक्तीला अनेक प्रकारची लहानमोठी कारणे असू शकतात. ज्यामध्ये कार्यकर्तृत्व, मत्सरग्रस्तता, मोठेपणा किंवा अहंभाव, सर्वतत्व हीच विशेषतः आढळून येतात असे बेंद्रे सांगतात.

(उ) लेखक नेहमी जनतेला, समाजाला अगर इच्छित वाचकाला आवडेल असेच लिहितो. ज्या लिहिण्याने लोकांना अगर दुसऱ्याला वाईट वाटेल असे लिहिण्याचे टाळतो. पहिल्या प्रकारच्या लिहिण्यात समाजातील नीती व समजुतीप्रमाणे जी विवेचनपद्धती रूढ झालेली असते तिचा अवलंब केला जातो.

(ऊ) लेखक प्रसंगातील वर्णनास काल्पनिक मजकुराने विशेष रहस्य आणण्याचा प्रयत्न करतो. असा मजकूर अर्थातच नवीन घुसडला जातो. म्हणून भाषाकौशल्य दाखविण्यासाठी घातलेला बराच मजकूर दूर करावा लागतो, असे बेंद्रे सुचवितात.

वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन एक प्रश्नावली तयार केली व तिच्यावरून जर साधनांचे परीक्षण केले तर तपशीलांत शिरलेला किंवा सहेतुक घातलेला अवास्तव व गफलतीचा मजकूर काढून टाकता येईल व बाकी राहिलेला मजकूर इतिहासारचनेत उपयोगास आणण्याच्या पायरीवर नेता येईल. याशिवाय आणखी खालील बाबींचाही विचार करणे आवश्यक ठरते. त्यात -

(ए) लेखकाने एखादा प्रसंग हजर राहून पाहिला, परंतु तो प्रसंग जेव्हा घडला तेव्हा त्या लेखकाला भीती अगर जयोत्सुकतेमुळे, मत्सर अगर प्रेमातिरेकामुळे किंवा याचसारख्या इतर मनोविकारांच्या परिणामांमुळे तो प्रसंग तपशीलवार पाहणे लेखकाकडून झाले नाही. अशावेळी मजकुरातील माहिती जरी प्रत्यक्ष पाहिलेली असली तरी त्यामध्ये अर्धवटपणा किंवा अपुरेपणा राहतोच असे बेंद्रे म्हणतात.

(ऐ) लेखक जो प्रसंगवर्णन करतो तो प्रत्यक्ष पाहण्यायोग्य अगर ऐकण्यायोग्य स्थितीत व जागी होता किंवा नाही, तसेच लेखकाने जे लिहिले ते पाहिल्या अगर ऐकिल्याबरोबर लिहिले की काही काळ लोटल्यानंतर लिहिले. कालांतराने लिहिले असल्यास प्रसंगांचा विसर पडणे शक्य आहे काय, तसेच लिहिण्यात लेखकाची मते व इतर गोष्टी त्यात घुसडल्या जाण्याचा संभव आहे काय, हे शोधावे. कालांतराने लिहिलेल्या आठवणीतील मजकुरात नेहमीच चुका व गफलती आढळतात. अशा आठवणींचा दुय्यम प्रकारच्या साधनांतच समावेश करावा असे बेंद्रे सांगतात.

(ओ) लेखकाला एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहण्याची शक्यता असते. परंतु तो तसे न करिता केवळ ऐकीव माहितीवर विश्वसतो किंवा कल्पनेने लिहून कळवितो. असले प्रसंग केवळ आळस व कुचराई यामुळेच घडून येत असतात.

(औ) एखादी गुप्त गोष्ट देणे, सैन्याची मोजदाद देणे, सैन्याच्या सर्व हालचाली व त्यांचे उद्देश देणे, ऐवजाचा आढावा देणे, लढाइतील मृत्युंची अगर जखमी लोकांची मोजदाद सांगणे यांसारख्सा गोष्टी प्रत्यक्ष पाहून सांगता येत नाहीत. त्या देण्यास अजमासे हिशेबच करावे लागतात. अशा तपशीलाची परीक्षा करताना लेखक अजमास काढण्यासइतका योग्य व अनुभवी आहे काय व असा अजमास देण्यायोग्य त्याने सर्व बाबींची पाहणी अगर तपासणी केली आहे किंवा काय? हे अवश्य शोधावे असे बेंद्रे सांगतात.

[२३] इतिहास लेखनासंदर्भात इतिहास संशोधकाची दृष्टि कशी असावी यासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांनी केलेले लिखाण :

इतिहासाची गणना शास्त्रात केली जाते. कारण तो ठरावीक पद्धतीने रचला जातो. तसेच त्यात ठरावीक मर्यादेपर्यंतच भूतकालीन मानवी हालचालींचे वर्णन केलेले असते. "इतिहास म्हणजे भूतकालीन शेष पुराव्यांच्या साहय्याने शाबीत झालेल्या मानवी हालचालींचे मंथन करून काढलेले सार."[४९] भूतकालीन ज्ञानसंग्रहाची इतिहासात निर्दोष व पद्धतीशीर मांडणी केली जाते, म्हणून इतिहासाची शास्त्रात गणना करणे संयुक्त ठरते. ज्ञानसंग्रह व त्याची पद्धतशीर मांडणी हे दोनच विषय इतिहासात आढळतात असे नाही; तर त्यांत आणखी एक विशेष दृष्टिस पडतो. हा विशेष म्हणजे भूतकालीन ज्ञानसंग्रहातून दोषादोष विवेचन पद्धतीने किंवा चिकित्सापूर्ण दृष्टिने काढलेले निर्णयसार हा होय. नुसत्या भूतकालीन पुराव्यांची रचना कितीही पद्धतशीर केली गेली व त्या पुराव्यांतून काढलेले सार किंवा महत्त्व जर जनतेस न पटविले गेले तर त्या ज्ञानाचा फारसा उपयोग होणार नाही.

महाराष्ट्रीय मराठ्यांच्या इतिहासाच्या बाबतीत तीन परंपरा रूढ आहेत. पहिली विभूतिपूजकांची किंवा हिंदू पौराणिक म्हणजे कथेकरी किंवा बखरकारांची परंपरा, दुसरी प्रतिपक्षीयांची परंपरा व तिसरी जेत्यांची इतिहास-लेखन परंपरा.[५०] पहिली परंपरा एकांगी असून फक्त भाविक जनांसच पटवून घेता येते. कार्यकारण-पद्धतीने भूतकालीन प्रसंगांचा विचार न केला असल्यामुळे ती पद्धती चिकित्सापूर्ण दृष्टिला दोषिक वाटते. दुसरी परंपरा प्रतिपक्षीयांची किंवा फारसी अगर मुसलमानी ग्रंथकारांची या परंपरेच्या इतिहासात ऐतिहासिक प्रसंगाचे विवेचन जरी समग्र असते तरी ते फक्त मुसलमानी सरदारांपुरतेच किंवा पातशाहीपुरतेच असते. त्यात मुसलमानांविरूद्ध असणाऱ्या सर्व राजांची व सरदारांची हकिगत विकृत स्थितीत व नाचक्की करणाऱ्या भाषेत दिलेली असते. त्यात त्यांच्या शत्रुपक्षीयांच्या विजयांची वगैरे माहिती दिलेली नसते. अगदी भागच पडले तर नाईलाज म्हणून शुल्लक उल्लेख करण्यात येतो.

तिसरी परंपरा जेत्यांची अगर इंग्रज इतिहासकारांची देश परतंत्र केला की जेत्यांनी प्रत्येक गोष्टींवर आपली छाप बसवून आपले श्रेष्ठत्व जितांना न पटविले तर जेत्यांना आपले अस्तित्व त्या

देशात अबाधित ठेवता येणेच शक्य नसते. अर्थात या परंपरेचे लोक जे देशाचा इतिहास जिताकरिता तयार करीत नसून जेत्यांकरिता प्रथम तयार करतात. किंबहुना असा इतिहास त्या देशाचा नसून किंवा जितांचाही नसून जेत्यांचा असतो.

स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा याला सोडून जो इतिहास रचला जातो त्याला स्वदेशाचा इतिहास म्हणता येणार नाही. तो स्वधर्माचा इतिहास होणार नाही व भाषेचाही इतिहास होणार नाही.[५१] वा. सी. बेंद्रे याचे स्पष्टीकरण देतांना सांगतात की, स्वकीयांचाही हा इतिहास असू शकणार नाही. या तिन्हीही परंपरांचे अनुकरण करून महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध राष्ट्रीय इतिहास करता येणार नाही यात शंका नाही.

इतिहासलेखनासाठी काही सूचना बेंद्रे येथे देतात. स्वदेशीय स्वकीयांच्या इतिहासाकडे आपलेपणाने पाहणे, स्वकीयांच्या गुणांची तारीफ करितांना दोषांवर पांघरून न घालणे, जगांतील इतर राष्ट्रांशी तुलना करून आपला दर्जा ठरवितांना वगैरे आपला देश इतिहासकालीन निर्भेळ कटू वा गोड सत्यातून कोणती शिकवणूक घेऊन राष्ट्र जिवंत ठेवू शकेल अशाच तऱ्हेचे विवेचन करणे व त्यायोगे जगातील इतर राष्ट्रांप्रमाणे इतिहासाचे मुख्य कार्य व ध्येय कायम राखणे हीच राष्ट्रीय इतिहासाची परंपरा होय.[५२]

[२४] शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या साधनक्षेत्राच्या व्याप्तीच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

बेंद्रे म्हणतात, "साधनांच्या व्याप्तीच्या क्षेत्राबद्दल निश्चित अनुमान बांधण्यास इतिहासाच्या प्रसंगांची निदान रूपरेषा तरी माहीत असावी लागते. इतिहासाचे तपशील जसजसे प्रयत्नाने समजू लागतात तसतशी साधनक्षेत्राची व्याप्ती वाढत जाते व क्षेत्रातील ठिकाणांच्या बारीकसारीक तपशीलांचाही बोध होत जातो. मराठ्यांच्या इतिहासातील काही प्रसंग अज्ञात आहेत ही गोष्ट खरी असली तरी मराठ्यांच्या इतिहासाची रूपरेषा ठरविण्याइतकी सामुग्री उपलब्ध झाली आहे. त्यावरून या क्षेत्राची व्याप्ती ठोकमानाने सांगता येईल."[५३]

शहाजी व शिवशाहीच्या पूर्वकालाची मराठी व फारसी ऐतिहासिक साधने विशेषतः विजापूर व पुणे-सुपे प्रांती मिळू शकतील. शहाजीच्या नंतरच्या हालचाली विजापूर, बंगलूर, मदुराई वगैरे

दक्षिण कर्नाटक प्रांतात झाल्याकारणाने त्यांची माहिती तिकडेच सापडेल. गोवेकर, पोर्तुगीज व कारोमांडल किनाऱ्यावरील परदेशीय (पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच) वखारवाल्यांकडेही शहाजीच्या हालचालींच्या नोंदी आढळतील. शिवशाहीच्या इतिहासाला मावळात पुणे-सुपे प्रांतात व विशेषतः मावळातच अधिक उपलब्ध होण्यासारखे आहेत, असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

शिवशाहीस सुरुवात झाली तेव्हाचे म्हणजे शिवाजी स्वतंत्र म्हणून हालचाली करू लागला त्यावेळेचे कागदपत्र मावळाबाहेर जुन्नर प्रांतात व विजापुरातही सापडणे साहजिक आहे. शिवाजीने स्वतंत्र म्हणवून घेऊन मुलुखगिरीस प्रारंभ केला त्यापासूनचे कागदपत्र दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, कोकण, गोवा, आग्रा, बऱ्हाणपूर, विजापूरकर व गोवळकोंडेकर यांच्या दरबारी दप्तरांत असावयास पाहिजेत.

पोर्तुगीजांकडे शिवाजीचा व शिवाजीच्या हालचालीबद्दल इतरांचा पत्रव्यवहार चालू होताच. इंग्रज व मराठे यांचा याचवेळी शत्रुत्वाचा व मित्रत्वाचा प्रथम प्रसंग घडल्यामुळे इंग्रजांच्या सुरतेच्या व लंडनमधील दप्तरात तत्कालीन साधने सापडली पाहिजेत. डच लोकांचीही कोकण किनाऱ्यावर व्यापार वाढविण्याची खटपट चालूच होती. त्यांनी वेंगुर्ल्यास वखारही काढली होती. त्यांच्याशीही मराठ्यांचा संबंध जडला होता. त्यामुळे बंटम, काखार, वेंगुर्ला, सुरत व मद्रास सेंट थॉमस येथील दप्तरात व तसेच ॲम्स्टरडम व मिडलबर्ग येथील दप्तरांत तत्कालीन साधने सापडतील.

मोगली दप्तरांतही शिवाजीच्या हालचाली नमूद होत होत्या. शिवाजीने अफजलखानला मारून विजापुरापर्यंतचा बराचसा मुलूख घेतला व सिद्दी जोहराला चकवून शाहिस्तेखानाला शिक्षा केली. म्हणून जयसिंगाला साधनक्षेत्राचा विस्तार फार वाढला. या वेळेपासूनची तत्कालीन मराठी व फारसी साधने सर्व दक्षिण हिंदुस्थानात व दिल्ली-आग्रा येथे उपलब्ध होण्याव संभव आहे. इंग्रज वखारवाले यावेळी दक्षिण हिंदुस्थानात व्यापारार्थ सर्वत्र वावरत होते. म्हणून सेंट थॉमस, मच्छलीपट्टणम्, हुगळी, बंटम, काखार, हुबळी, मुंबई व सुरत येथील इंग्रजी दप्तरांत व इग्लंड येथील इंग्रज कंपनीच्या दप्तरात इंग्रजी भाषेतील तत्कालीन वृत्ते, पत्रव्यहार, वगैरे सापडणे अगदी साहजिक आहे. गोवा व पश्चिम किनाऱ्यांवर पोर्तुगीजांचे प्राबल्य होते म्हणून गोवा, दमन, चौल व वसई

येथील पोर्तुगीज दप्तरांत व लिस्बनला पोर्तुगालच्या सरकारी दप्तरात पोर्तुगीज भाषेत मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त अशी विपुल सामग्री मिळेल, असे बेंद्रे सांगतात.

पश्चिम किनाऱ्यांवरील व्यापार मिळविण्यासाठी डच लोकांची बरीच धडपड चालली होती. त्यांचा व मराठ्यांचा पत्रव्यवहार त्यासंबंधात झालेला आहे. त्यामुळे डच लोकांच्या वेंगुर्ला, सुरत, मद्रास व हॉलंडमधील डच कंपनीच्या भाषेतच दप्तरांत बरीच डच माहिती मिळेल. याशिवाय फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज, इटालिअन, डच, चिनी, अरब वगैरे लोकांनी निरनिराळ्या वेळी हिंदुस्थानात प्रवास केला आहे. त्यांची प्रवासवृत्ते नुसत्याच राजकीय इतिहासास नव्हे तर सामाजिक व इतर इतिहासासही फार महत्त्वाची आहेत. संस्कृत व मराठी काव्ये, बखरी व फारसी अखबार हिंदुस्थानात सर्वत्र आढळतात. अवघ्या समकालीन साधनसामुग्रीच्या क्षेत्रात इतकी मोठी व्याप्ती आहे. दुय्यम प्रकारचे इतिहासग्रंथ वगैरे इतर सर्वत्र सापडतात.

असे विस्तृत साधनांचे विवेचन वा. सी. बेंद्रे यांनी आपल्या या ग्रंथात केले आहे.

[२५] शिवशाहीच्या इतिहासरचनेच्या स्वरूपासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा प्रथम प्रयत्न संस्कृतात झाल्याचे आज उपलब्ध झाले आहे. हा इतिहास समकालीन असल्याने महत्त्वाचा आहे; परंतु हा स्तुतिपर आहे. नंतर राजारामाच्या आज्ञेवरून मराठीत बखररूपांत इतिहासरचनेचा प्रयत्न झाल्याचे दिसते. परंतु तो बराच त्रोटक व एकांगी असून त्यांत प्रसंगवर्णनाचा क्रम कालानुरोधाने केलेला दिसत नाही.

ताराबाईने खंडो बल्लाळकडून बखर लिहिल्याचे समजते; परंतु ती बखर उपलब्ध नाही. नंतर पेशवाईत बखररूपाने शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला; परंतु यात समकालीन माहितीचा अभाव असून दंतकथेवर बराच भर दिलेला आढळतो. इतिहासलेखन सशास्त्र नसल्याने दोष फार आहेत. भाटांनीही बरीच कवने केलेली आहेत; परंतु प्रत्यक्ष माहिती नसल्याने या कवनात बखरीसारखेच दोष आहेत. फारसी ग्रंथकारांनी शिवशाहीची स्वतंत्र अशी ग्रंथरचना केल्याचे उपलब्ध नाही. मुसलमानी राजांच्या संबंधात ज्यावेळी या शिवशाहीची माहिती देणे जरूर पडे तेव्हा ती देण्यात येत असे. परंतु या लेखनात शिवशाहीचा शत्रुपक्ष असल्याने एकपक्षीयतेणे दुर्गुण शिरलेले आहेत.

युरोपीय भाषेतही या शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा १७ व्या व १८ व्या शतकांत उपक्रम झाला; परंतु या प्रवासी ग्रंथकारांची वृत्ती थोडीशी मोगलांकडे वळली असल्याकारणाने या लेखनातही खऱ्या वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला आढळतो. इंग्रजी आमदानी स्कॉट वेअरिंग, डफ, एल्फिन्स्टन, मिल, जोन्याथन डंकन विशेष राहिल्याने हे इतिहास फारसी ग्रंथाच्या वळणावरच गेले. यातील डफचा प्रयत्न किंचित बरा आहे; परंतु डफचा इतिहास व गॅझेटिअरमधील माहिती सोडली तर या इतिहासरचनेकडे फारसे कोणाचेच लक्ष वेधल्याचे दिसून येत नाही. म्हणून डफच्या इतिहासाला विशेष महत्त्व चढले. कारण तो सविस्तर व थोडाबहुत शास्त्रीय पद्धतीस अनुसरून लिहिला गेला होता. या महत्त्वामुळे मुसलमानी राजांची जितकी स्तुती केली जाई तितकाच मराठ्यांबद्दल तिटकारा उत्पन्न होत राही. शेवटी परिणाम असा झाला की, मराठ्यांच्या कामगिरीचा इतिहास मराठ्यांनाच विवक्षित साशंक दृष्टिने पाहणे भाग पडले व अंती तर तोच इतिहास चांगला रूढ झाला. इ. स. १८९६ पासून शिवाजी उत्सव सुरू झाल्याने या उत्सवाकडे अधिकारी वर्गाने आपली नाखुशी दाखविली. पुढे राजकीय चळवळींशी शिवोत्सवाचा संबंध जडल्याने व विशेषतः शिवाजीची इतिहासकारांनी बंडखोरांत गणती केल्याने मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे क्रांतिकारक चळवळीचा सहकार होऊन राहिला. सन्मान्य किंवा शिष्ट लोक या इतिहासास मदत करीतनासे झाले; व कांदबऱ्या, नाटके, संतचरित्रे यांसारख्याच ग्रंथरचनेकडे लेखाक व अभ्यासू लक्ष पुरवू लागले.[५४]

न्या. रानडे यांनी जरी असा ग्रह न घेण्यासाठी योग्य तो प्रयत्न वेळीच करून ठेवला होता. तरी या स्वदेशी चळवळीने या इतिहासाला थोडासा व्यत्यय आणला. परंतु बाह्यतः जरी सामान्य लोकांना या इतिहासाच्या अभ्यासाबद्दल एक प्रकारचा धाक वाटत होता तरी या भीतीमुळेच त्यांच्या मनात शिवाजी व मराठे यांच्या इतिहासाबद्दलचे प्रेम उत्कठतेने वाढू लागले होते.

विद्वान माणसे या इतिहासाकडे विशेषच आपलेपणाच्या भावनेने पाहू लागली होती. उपलब्ध इतिहासातही शिवशाहीबद्दल विपर्यास झाला असल्याचे त्यांच्या प्रत्ययाला येऊ लागले व कीर्तने यांनी फडच्या इतिहासाबद्दल प्रथम साशंकपणा व्यक्त केला; परंतु त्यांना व त्यांच्याबरोबरच्या विद्वानांना हा विपर्यस्त मजकूर खोडून टाकण्यासाठी ऐतिहासिक साधनसामुग्री जुळविली पाहिजे हा एकच मार्ग

राहिला असल्याचे वाटले व त्याप्रमाणे त्यांनी इतिहासाची साधनसामुग्री जुळविल्याचे प्रयत्न चालू केले. परंतु त्या सर्व प्रयत्नात साधने जुळविणे व जुळती इतिहासरचना करणे एवढेच काय ते कार्य होत होते. हे सर्व कार्य तितक्या जोमाने होत नव्हते. कारण, सामान्य जनतेला सरकारच्या या इतिहासाबाबतच्या धोरणाबद्दल थोडी भीतीच वाटत होती; परंतु गुरू राजवाडे यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेने जशी इतिहासलेखकांच्या विचारात भयंकर क्रांती घडवून आणली त्याचप्रमाणे कोल्हापूर संस्थानाधिपती कै. शाहू छत्रपती महाराज यांच्या अलौकिक चातुर्याने शिवाजीबद्दलची सरकारी अधिकारी व सामान्य लोकांच्या मनातील तेढ इ. स. १९२० मध्ये शिवाजी मेमोरिअलच्या कोनशिला समारंभाच्या वेळी खास युवराजांकडून कायमची काढून टाकविली. शिवशाहीच्या इतिहासाच्या क्रांतीचे श्रेय या दोघांनाच आहे याबद्दल शंका नाही, असे बेंद्रे सांगतात.[५५]

आता फक्त इतिहासात घुसडलेला विपर्यस्त व खोडसाळपणाचा मजकूर दूर करून त्यात भर टाकून इतिहास शास्त्रशुद्ध रचावयाचा आहे. मार्गातील अडचणी दूर झाल्या आहेत व परिश्रम करण्यास वाव मिळाला आहे; परंतु साधनप्राप्तीचे प्रयत्न जमेस न धरले तर इतिहासरचनेचे खास प्रयत्न आणखी १०-१५ वर्षापर्यंत तरी करता येतील किंवा नाही याची शंका वाटते व साधनपरीक्षेचे सशास्त्र निर्बंध अंगी आणण्यास थोडासा अवधी लागणे साहजिकच आहे, असे बेंद्रे म्हणतात.

[२६] वा. सी. बेंद्रेंनी शिवशाहीच्या साधनांचे केलेले प्रकार :

बेंद्रे म्हणतात शिवशाहीच्या साधनांचा तपशीलवार विचार करताना त्या साधनांचे भाषावर भाग पाडावे लागतात. कारण तसे भाग पाडणे लेखनपद्धतीच्या व राजकीय संबंधाच्या दृष्टिने फार सोईचे आहे. महाराष्ट्रीय साधनांचे भाषावर विभाग पुढीलप्रमाणे पाडले जातात -

(अ) परदेशीय साधने :

(१) इंग्रजी (२) डच (३) पोर्तुगीज (४) फ्रेंच व इतर युरोपीय साधने

(ब) स्वदेशीय साधने :

(१) संस्कृत (२) फारसी (३) हिन्दी व इतर स्वदेशीय साधने (४) मराठी

या विभागातील मराठी साधनांचे आणखीही पोटविभाग पाडणे अभ्यासाच्यादृष्टिने सोईचे आहे. (१) सनदा, पत्रे (२) जमाखर्च (३) मजहर, करीने, पुराशिसी वगैरे (४) शकावल्या

(५) कूळकटी, वंशवेल, टिपणे इत्यादी (६) बखरी (७) पोवाडे व काव्ये (८) ऐतिहासिक म्हणी व वाङ्मय.

याशिवाय नाणी, शिलालेख, चित्रे वगैरे साधनांचा स्वतंत्र विचार करावा लागेल. यावरून शिवशाहीचा इतिहास अभ्यासणाऱ्याला निदान चार परदेशीय चार स्वदेशीय म्हणजे आठ भाषांचे ज्ञान असले पाहिजे. शिवाय चार लिप्या माहिती असाव्या लागतात. याशिवाय उर्दू, कानडी वगैरे दक्षिण हिंदुस्थानातील भाषा, कोकणी, भिल्ली, गुजराती वगैरेंही स्वदेशीय भाषांत साधने उपलब्ध होत असल्याने त्याही भाषा जाणणे जरूर होते. महाराष्ट्राच्या इतिहासाला जी मोठी अडचण येते ती ही की, महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने विविध भाषेत विविध प्रवृत्तींच्या व संस्कृतींच्या माणसांनी लिहून ठेवलेली आहेत.

२६ (अ-१) इंग्रजी साधनांसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांनी केलेले संशोधन कार्य व साधने :

१६२८ नंतर इंग्रजांचा कोकणपट्टीत शिरकाव झाला. इ. स. १६५४ पर्यंत ते व्यापारी या नात्याने दाभोळ व राजापूर येथे राहात. यानंतर त्यांचा संबंध दक्षिणेतील शाह्यांशी आला. राजापूर, कोल्हापूर, हुबळी, अथणी, रायबाग, काखार वगैरे ठिकाणीही त्यांचा मुक्काम होऊ लागला. बऱ्हाणपूर, धरणगाव व चोपडा येथेही इंग्रजांनी आपल्या लहान लहान वखारी उघडल्या होत्या. त्यामुळे या सर्व ठिकाणांहून या व्यापाऱ्यांनी जी जी पत्रे आपल्या अध्यक्षाला अगर इतर मित्रमंडळींना लिहिली त्यांत ते स्थानिक माहिती देत; परंतु त्यातील बरीचशी माहिती केवळ ऐकीव अशीच असे.

प्रत्येक वखारीत बारनिशी व रोजनिशी ठेवली जात असे. तहनामा, याद्या, ठराव, मासिके, वार्षिक खर्चाचे आढावे, जाहीरनामे, प्रवासवृत्ते, दिनवृत्ते इत्यादी इंग्रजांचे अप्रकाशित साधनसंग्रह निरनिराळ्या ठिकाणी आहेत. या संग्रहात खाजगी पत्रव्यवहार फारसा नाही. जो संग्रह आहे तो कंपनीच्या कारभाऱ्यांचा आहे. म्हणून इंग्रजी संग्रहाला जगातील सर्वात मोठा इतिहासोपयोगी संग्रह असे मानले जाते. शिवशाहीच्या इतिहासास उपयुक्त असा साधनसंग्रह मुंबई सेक्रेटरीएट, पुणे एलिनिएशन दप्तर, मद्रास, कलकत्ता व पाटणा येथील दप्तरांत थोडाबहुत आहे. लंडन येथील वॉर ऑफिस, पब्लिक रेकॉर्डस् व ब्रिटिश म्युझिअममध्ये बराच आहे; परंतु सर्वात महत्त्वाचा व मोठा संग्रह इंडिया ऑफिसमध्ये आहे. पॅरिस म्युझिअम व फ्रेंच पब्लिक रेकॉर्डस्, ॲम्स्टरडम व मिड्लबर्ग

येथील डच कंपनीच्या पत्रव्यवहारात, पोर्तुगीजांच्या गोवा, लिस्बन व एव्होरा येथील दप्तरखान्यांतही इंग्रजी शिवकालीन पत्रव्यवहार आहे.

इंडिया ऑफिसमधील मूळ संग्रहाचे कालानुरोधाने तीन तीन भाग पाडले आहेत. (१) फॅक्टरी रेकॉर्डस् (१६०० ते १७०८), (२) टेरिटोरिअल रेकॉर्डस् (१७०८ ते १८५८), (३) इंपेरिअम रेकाफर्डस् (१८५८ ते तहहयात). यातील फॅक्टरी रेकॉर्डस्चे (१) मरिन रेकॉर्डस् (दर्यावर्दी लोकांचे दप्तर), (२) कोर्ट मिनिट्स (कार्यवाह मंडळींचे ठराव व चर्चा), (३) लेटर्स फ्रॉम इंडिया (हिंदुस्थानातून आलेला पत्रव्यवहार), (४) डिस्पॅचिस टू इंडिया (हिंदुस्थानात पाठविलेला पत्रव्यवहार), (५) फॅक्टरी रेकॉर्डस् (वखारवाल्यांची दप्तरे) वगैरे भाग पाडले आहेत.[५६]

हिंदुस्थानातून लंडनला गेलेली पत्रे १६०३ ते १७०८ पर्यंतची आहेत. हिंदुस्थानाला आलेली पत्रे १६२७ ते १६५२ पर्यंतची तुरळक पण १६५३ ते १७५३ पर्यंतचा बहुतेक सर्व संग्रह आहे. यातील १७०८ पर्यंतचा पत्रव्यवहार १३ दप्तरांत आहे. या संग्रहात निरनिराळ्या ठिकाणचा स्वतंत्र असा शिवशाहीस उपयुक्त होण्यासारखा पत्रव्यवहार आढळतो. मुंबई (१६९९ ते १७०८), कुडलूर आणि पोर्टो नाव्हो (१६८१ ते १६८७), क्रोनिमेर (१६८२ ते १६८५), फोर्ट सेंट डेव्हिड (१६९० ते १७५९), फोर्ट सेंट जॉर्ज (१६५५ ते १७०५), कारवार (१६६६ ते १७१७), मंडाळपोळम (१६७६ ते १६८६), मच्छलिपट्टण (१६७० ते १७००), राजापूर (१६५९ ते १६६०), सुरत (१६२० ते १८००) व विशाखापट्टण (१६९२ ते १६९५). याशिवाय मद्रास व मुंबईचा निराळा संग्रह आहे. याशिवाय पोर्तुगीज, डच, वगैरेंच्या दप्तरांमधून मुद्दाम तपासून या कालाचे इतिहासास उपयुक्त म्हणून आणलेले संग्रह इंग्रजीत भाषांतरीत करून ठेवलेले आहेत.[५७]

मुंबईकरांच्या मुख्य दप्तरात इ. स. १६७६ ते १७०४ पर्यंतची ७ जावकांची बांधीव पुस्तके आहेत. इ.स. १६४६ ते १७८६ पर्यंतच्या ३७ आवकांच्या पुस्तकांपैकी बरीच शिवशाहीला उपयोगी ठरतील. इंग्लंडहून आलेल्या पत्रांची इ.स. १६८१ ते १८२० पर्यंतची २४ पुस्तके आहेत. परंतु यांत इ.स. १६८५ ते १७४२ पर्यंत मोठा खंड असल्याने इ.स. १६८१ ते १६८५ पर्यंतची थोडीच पत्रे शिवशाहीस उपयोगी पडतील. सुरतेच्या दप्तरात ४ पुस्तके इ. स. १६५९ ते १७०४ च्या मुख्य कौन्सिलच्या दिनवृत्तांनी भरलेली आहेत. इ. स. १६४६ ते १७०७ पर्यंतचे आवकचे १ पुस्तक, इ.स.

१६२० ते १७०० च्या जावकाची ४ पुस्तके व डचांच्या माहितीची २९ पुस्तके आहेत. बंटमच्या आवकाचे इ.स. १६७१ ते १६८३ पर्यंतचेही एक पुस्तक या संग्रहात आहे.[५८]

इंग्रजी साधनांचा उपयोग करितांना घ्यावयाची सावधगिरी -

(१) इंग्रजी पत्रांतील माहिती समकालीन या दृष्टिने फार महत्त्वाची आहे; परंतु त्यात गावाच्या व नावाच्या बऱ्याच चुका झाल्या आहेत. कित्येक ठिकाणी तर त्यांचे लिहिणे अगदी दुर्बोध झाले आहे. इ.स. १६६१ च्या पूर्वीची पत्रे तर पूर्वीचे संदर्भ पूर्ण माहितीचे असतील तरच लागतात.

(२) ह्या तत्कालीन वर्णलेखन पद्धतींतील वैशिष्ट्यांशिवाय 'अ' चा उच्चार 'u' ने दर्शविलेला असतो. प्रथमारंभीचा 'अ' 'hu' ने लिहितात. 'g' चा उपयोग 'ज' चा उच्चार दर्शविण्यास करितात. कधी कधी 'स्ट' यासारख्या संयुक्त व्यंजनापूर्वी येणारा परंतु आद्याक्षर दीर्घोच्चारीत 'अ' 'e' ने लिहितात. 'rr' किंवा 'rh' यांनी 'ड' व्यक्त करिता. 'ड' किंवा 'c' चा उपयोग 'श' दर्शविण्यास करितात.

दीर्घ स्वरापुढे येणाऱ्या 'य' सारख्या अर्धस्वरांचा लोप करितात. कठीण उच्चारांच्या लांबलचक नावामागे 'in' किंवा 'en' जोडतात. स्वरापुढील 'ह' गाळतात. स्वरापुढे येणाऱ्या 'i' च्या जागी 'y' लिहितात. 'it' मधील 'i' 'y'ने दर्शवितात. द्वित्त 't' बऱ्याच ठिकाणी वापरतात. अंत्य 't' पुढे 'e' लिहितात. इंग्रती पत्रांत संक्षिप्त शब्द लिहिण्याचा बराच प्रचार होता. काही संक्षिप्ते तर विचित्र आहेत. 'y' चा उपयोग आद्य 'th' साठी करून शब्दांचे संक्षेप केलेले असतात.[५९]

इंग्रजी ही 'चित्र' लिपी असल्याने वाचनास फारसा त्रास पडत नाही; परंतु अशा प्रकारचे अनेक दोष इंग्रजांनी केलेल्या नामोच्चारात व लिखाणात असल्याकारणाने पत्रातील मजकुराचा संबंध चटकन लक्षात येत नाही, असे वा. सी. बेंद्रे इंग्रजी लिखाणाचे परीक्षण करतात.

२६ (अ-२) ख्रिस्ती पंचाग पद्धतीसंदर्भात वा. सी. बेंद्रेंनी केलेले विवेचन :

युरोपीय व ख्रिस्ती राष्ट्रात ख्रिस्ती शक चालू होता. ही ख्रिस्ती पंचागपद्धती सौरमानाची आहे. ह्या जुलिअन पद्धती रोममध्ये कित्येक शतके चालू होती. या पद्धतीच्या गणितात सौरमानाच्या सूक्ष्म गणिताने दर वर्षी अगदी थोडा फरक पडत असे. त्यामुळे कित्येक शतकांनी हा फरक बराच वाढला

व या ख्रिस्ती पंचांगाप्रमाणे येणारा क्रांती संपात व प्रत्यक्ष संपात यात दहा दिवसांचे अंतरअसलेले इ.स. १६ व्या शतकात लक्षात आले. यामध्ये १५८२ पर्यंत काहीच सुधारणा घडून आली नाही. इ.स. १५८२ च्या मार्च महिन्यात १३ वा पोप ग्रेगरी यांनी हुकूम काढून ग्रेगरी पद्धत किंवा नवीन ख्रिस्ती पंचागाची पद्धत सुरू केली.[६०]

इंग्रजी व परभाषीय साधने वाचताना निरनिराळ्या राष्ट्रांनी निरनिराळ्या वेळी नवीन पद्धती स्वीकारली हे सांप्रतही तेवढे विचारात घेतले जात नाही, तसेच इंग्रज आपले नवीन वर्ष २५ मार्चला सुरू झाल्याचे समजत. त्यामुळे नवीन सनाचे जानेवारी ते मार्च २४ तारखेपर्यंतच्या पत्रात इ.सन देतांना गत व चालू असा जोड सनांचा उल्लेख करून लिहीत; जसे १६६४/५. अशावेळी त्या पत्रांचा सन म्हणजे चालू म्हणजे दुसरा आकडा धरावा लागतो.[६१] परंतु ही चाल इंग्रजांनी ज्यावेळी ग्रेगोरिअन पद्धती स्वीकारली त्यावेळी म्हणजे इ.स. १७५२ मध्ये मोडली व इतर देशाप्रमाणे १ जानेवारला वर्षारंभ मानू लागले. तसेच पोर्तुगीजांचा मुख्यत: रोमन कॅथोलिक पंथ होता. ज्याप्रमाणे रामनवमी, हनुमान जयंती वगैरेंसारख्या नावांनी आपण ठरावीक दिवसांचा उल्लेख करतो त्याचप्रमाणे रोमन कॅथोलिक पंथाचे लोक वर्षाच्या ३६५ दिवसांचा ठरावीक 'सेंटा' च्या किंवा धर्मवीरांच्या नावाने उल्लेख करितात. या पद्धतीत प्रत्येक दिवसाला कोणाना कोणा तरी धर्मवीराचे नाव दिलेले असते.[६२]

२६ (अ-३) चालीरिती संदर्भात इंग्रजांकडून झालेल्या चुका :

इंग्रजांच्या हिंदू चालीरिती चांगल्याशा अंगवळणी न पडल्यामुळे त्यांच्या पत्रांतून साध्याही गोष्टींचा हास्यापद विपर्यास केलेला आढळतो. मुसलमानी-मोगली पद्धतीप्रमाणे प्रत्येक बादशहा आपला जुलूस सन सरकारी कागदापत्रावर लावतो. ही चाल मराठी राज्यातही चालू होती असे समजून मराठी पत्रांतील 'राजशका'चे भाषांतर किंवा रूपांतर देताना 'राजशक' हा 'जुलूस' असे समजून संभाजीच्या अगर राजारामाच्या राज्याभिषेकाचे अमके अमके वर्ष असे लिहितात. आणखी एक उदाहरण येथे बेंद्रे अफझलखानाशी शिवाजीचे बोलणे लावले. त्यावेळी हकीकत नंतर दोन महिन्यांच्या आतील एका पत्रात दिली आहे. त्यात 'शिवाजीने आपल्या मातेची शपथ घेऊन' बोलणे लाविले ही माहिती त्याने पुढील शब्दांत दिली आहे. "And (Shivaji) sent his mother as a hostage assuring him of his reality." हा रेफरंस बेंद्रेंनी The English Factories in

India - १६५५-६० by W. Faster मधून घेतला आहे. म्हणजेच (आणि शिवाजीने आपल्या आईला ओलीस पाठविले व आपल्या खरेपणाची साक्ष पाठविली.)[६३]

सारांश, हिंदुस्थानातील लोकांच्या चालीरितीबद्दलच्या इंग्रज लेखकांच्या अज्ञानामुळे अशा चुका होणे साहजिकच होते. शिवाय अशी माहिती लिहिणाराच्या मनातील हेतू जरी कितीही निर्भेळ असले तरी त्या लेखकास ज्या मार्गाने माहिती मिळते किंवा लिहिणारा ज्या परिस्थितीत असतो त्या परिस्थितीचे परिणाम त्याच्यावर घडणे व नंतर ते त्याच्या लिखाणात शिरणे साहजिक असते. परंतु बारकाईने माहिती मिळवून ती तपशीलवार व क्रमप्राप्त सांगण्याची इंग्रज लोकांची पद्धती शास्त्राशुद्ध आहे. जर एखादी माहिती दिली गेली व नंतर ती खोटी म्हणून खास बातमी मिळाली तर त्याबद्दलची ते दुरुस्ती करण्यास विसरत नसत. इंग्रजी दप्तरातील समकालीन साधने अस्सल व मसुदे अशी दोन प्रकारची आहेत. हे लक्षात घ्यायला हवे असे वा. सी. बेंद्रे लक्षात आणून देतात.

२६ (अ-४) बखरींच्या संदर्भात इंग्रजी ग्रंथकारांनी केलेल्या चुका :

इंग्रजी ग्रंथकारांचा भर विशेषतः मराठी व फारसी बखरीवरच होता. कागदपत्रांचा त्यांनी थोडाबहुत उपयोग केला असे मानले तरी त्यांना शिवशाहीच्या काळातील खास कागदपत्र उपलब्ध झाले होते असे मानण्यास फारसा पुरावा अंतर्गत मजकुरावरून दिसत नाही. डफच्या इतिहासातील शिवशाहीपुरत्याच भागाचा विचार केला तर असे स्पष्ट दिसते की, डफला ज्या मराठी बखरी उपलब्ध होत्या त्या बखरींतील माहिती जर फारसी ग्रंथात नसेल तरच ती घेतली आहे. नाही तर फारसी साधनांनाच प्रामाण्य दिले आहे. तसेच जे थोडेबहुत व्यक्तिशः काही घराण्यांचे कागद त्याला पाहावयास मिळाले, त्यावरूनही जेथे जेथे बखरीतील मजकूर सुधारता आला त्याने सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी इंग्रजी साधनांचाही थोडाबहुत उपयोग केलेला दिसतो. परंतु इंग्रजी साधने, फारसी व मराठी यांतील जी विसंगतता त्यास आढळून आली त्यामुळे बखरीतील सरळ मजकूर घेण्याकडे त्यांनी आपला कल ठेवलेला दिसतो तसेच ऐतिहासिक साधनांची परीक्षा व दर्जा ठरवून त्याप्रमाणे इतिहासलेखन करण्याइतका त्याचा व्यासंगही नसावा असे वाटते.

सारांश, डफचाच प्रयत्न सर्व इंग्रजी इतिहासकारात श्रेष्ठ आहे; परंतु माहितीच्या अभावी व फारसी ग्रंथावरच विशेष भर राहिल्यामुळे त्यात चुका झाल्या असून एकांगीपणाही शिरला आहे.

डफच्या चुका हेतुपूर्ण नसल्या तरी जसा त्याचा साधनाभावी नाईलाज होता, तसा त्यांच्यात मराठ्यांबद्दलचा इतिहास लिहिताना तितका आपलेपणाही असणे साहजिक नव्हते. त्यामुळे विचारसरणीला न पटणारा इतिहास आपल्या कृतीत गोवताना त्याला त्याबद्दलची सावधानता बाळगण्याची जरूर भासली नाही किंवा त्याप्रमाणे इशारतही देण्याची निकड नव्हती. निदान डफला आपल्या चुकांबद्दल जाणीव असल्याचे तरी स्पष्ट दिसते; परंतु विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याने एतद्देशीय ग्रंथातील ज्या अस्सल अगर समकालीन फारसी साधनांवरून निदान कालनिर्देशाच्या बाबीतील तरी ज्या अनेक चुका सुधारण्याचा प्रयत्न केला आहे तो प्रयत्न पुढे कित्येक अर्वाचिन ग्रंथकारांना न समजल्यामुळे मात्र त्यांचेकडून अगदी अक्षम्य अशा चुका झाल्या आहेत. हे वा. सी. बेंद्रे इतिहास अभ्यासकांच्या निदर्शनास आणून देतात.[६४]

२६ (अ-५) वा. सी. बेंद्रे यांनी डच साधनांचा घेतलेला आढावा :

डच कंपनीचा हिंदुस्थानाशी झालेला पत्रव्यवहार वगैरे ॲमस्टरडम, झीलंड, डेल्फ्ट, रोटरडम, हूर्न व एन्खुइझेन या ठिकाणाहून होत असे. या सर्व ठिकाणचे सतरा उपाध्यक्ष आमस्टरडम किंवा मिडलबर्गला जमत. या सर्व ठिकाणी निरनिराळा दप्तरखाना असे; परंतु सर्व पत्रव्यवहार वगैरेंच्या नकला आमस्टरडम व मिडलबर्गला जात. इ. स. १७९६ त कंपनी मोडून डच सरकारने सर्व कारभार आटोपला. इ.स. १८३२ त डचांनी कंपनीचा सर्व दप्तरखाना आमस्टरडमला 'वेस्ट इंडिअन स्कॉलर्स हाऊस' मध्ये जमा केला व इ.स. १८५१ त मिडलबर्गचा 'कलोनिअल रेकार्डर' मधी दप्तरखानाही त्यांत सामील केला. नंतर हा सर्व संग्रह इ.स. १८५६ मध्ये हेगला नेला. या संग्रहातील व्यापारविषयक बऱ्याच संग्रहाचा नाश केला. जमाखर्च वगैरे नीट जोपासले आहेत. हा रिज्करचीफ संग्रह इ.स. १६२३ पर्यंत तारीखवार लावला आहे. सन १६२४ नंतरचा स्थलवारीने म्हणजे सुरत, कारोमंडल, मलबार वगैरे स्थलांच्या नावाने लावला आहे. यात १६३४ इ.सनानंतर सामान्य हकिकतीने अहवाल राखिले आहेत. या संग्रहात एकंदर ५६४ बंडले किंवा दप्तरे हिंदुस्थानविषयक असून शिवशाहीकालीन आहेत. या संग्रहातून जवळजवळ २००० कागदांच्या नकला करून इंडिया ऑफिसमध्ये ठेवल्याचे समजते. परंतु या नकला हिंदुस्थानाच्या इतिहासासाठी म्हणून घेतलेल्या नसून ग्रेट ब्रिटनच्या इतिहासासाठी मिळविल्या आहेत.[६५]

डच भाषेतील प्रकाशित साधनांचा भरणाही बराच आहे. मुद्दाम लिहिलेल्या अहवालाचे प्रकाशन 'डाग रजिस्टर' या नावाखाली झाले आहे. या डाग रजिस्टरचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले असून त्यात इ.स. १६४० ते १८०७ पर्यंतचे अहवाल छापले आहेत. या ग्रंथात बरीच उपयुक्त माहिती मिळते. विशेषतः शहाजीच्या कर्नाटकातील हालचालींचे तर बरेच सविस्तर वर्णन आढळते. शिवाय ड जंग याने इ.स. १५९५ ते १६१० पर्यंतचा व नंतर एल व्हान डिवेंटर याने इ.स. १६१० ते १८२० पर्यंतचा डच लोकांचा हिंदुस्थानातील इतिहास गोवला आहे. त्यात बरीच डच साधने छापली आहेत. याशिवाय कित्येक प्रवाशांच्या प्रवासवृत्तांचे ग्रंथ आणि डच साधने छापली आहेत. याशिवाय कित्येक प्रवाशांच्या प्रवासवृत्तांचे ग्रंथ आणि डच ईस्ट इंडिया कंपनीच्या सफरीच्या वर्णनाची पुस्तके इंग्रजीत भाषांतरीत केलेली आढळतात. डचांनी बराच ग्रंथ-संग्रह प्रसिद्ध केल्याचे समजते; परंतु डच भाषेच्या अज्ञानामुळे आपणास शिवशाहीच्या उपयोगास योग्य असे ग्रंथ नेमके उचलता येत नाहीत. परंतु सर्व प्रकाशित ग्रंथात जो मजकूर दिला गेला आहे तो हिंदुस्थानच्या इतिहासास उपयोगी पडेलच असे नाही. त्यामुळे ग्रंथीत केल्या गेलेल्या माहितीत बरेच खंड-भेद आढळतील व शेवटी मूळ डच साधनांचा अभ्यास करावा लागेल यात शंका नाही.

डच साधनांतील तारखा केव्हा केव्हा नवीन पद्धतीप्रमाणे व क्वचितप्रसंगी जुन्या पद्धतीनेही दिल्या असण्याचा संभव आहे. डच ही केवळ चित्रभाषा नसल्याने यातील उच्चारभेद कमी प्रमाणात आढळतात. गावांच्या आणि नावांच्या चुका डचांच्या साधनात झाल्या नाहीत असे नाही; परंतु त्या अल्पप्रमाणात आहेत. तसेच इंग्रजी लिखाणात जे व्यक्ती अगर प्रकृतिदोष आढळून येतात त्याचप्रमाणे डच साधनांतही आढळतात. डच भाषेच्या अज्ञानामुळे व विशेषतः डच भाषेतील हस्तालिखित साधने प्रत्यक्ष परीक्षणास न मिळाल्यामुळे डच लेखनातील सामान्य प्रघाताबद्दल विवेचन करणे शक्य झाले नाही असे वा. सी. बेंद्रे मान्य करतात.[६६]

२६ (अ-६) पोर्तुगीज साधनांचा वा. सी. बेंद्रे यांनी घेतलेला आढावा :

गोवा दप्तर हे एक अत्यंत महत्त्वाचे असे ऐतिहासिक साधनांचे फार मोठे आगर आहे. विशेषतः आनंदाची गोष्ट ही की, ह्या दप्तराची व्यवस्था नीट ठेवण्यात आली असून त्यांचे फेरिस्त करण्याचा विचार चालू आहे. त्यातील महत्त्वाचा भाग छापून काढण्याकरिता तेथील सरकारनेच

खास खटपट चालू केली आहे. जवळ जवळ दीड दोन हजार रूमाल भरतील इतकी साधनसामुग्री आहे. या दप्तरातील कागदपत्रे वाचताना आपणाला नेहमी ही गोष्ट लक्षात ठेवावी लागते की, ती एकपक्षीय असतात किंवा प्रतिपक्षीयत्वाच्या भावाने लिहिलेली असण्याचा संभव आहे.

पोर्तुगीज संग्रह लिस्बन व एव्होरा येथे आहेत. एव्होराच्या 'पब्लिक लायब्ररी'त बराच संग्रह आहे. या संग्रहातूनच कुंज रिव्हारा याने आर्काइव्ह पोर्तुगीज ओरिएंटल या नावाने सहा साधनग्रंथ तयार केले आहेत. त्यात हिंदुस्थानविषयक माहिती आहे. लिस्बन येथील 'अक्यॉडेमिक रिअल देस सायन्सिस' या संस्थेच्या संग्रहातही काही इतिहासोपयोगी साधने आहेत. ही संस्था उपयुक्त साधनसंग्रह जशास तसा व संपूर्णच छापते. यातील इ.स. १६४९ ते १६७७ पर्यंतचे हिंदुस्थानची ऐतिहासिक माहिती देणाऱ्या साधनांचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. लिस्बनच्या सरकारी दप्तरखान्यात 'टार दो टामो' व 'बिब्लिओपथिक नॅशनल' हे दोन संग्रह फार जुने आहेत. 'टार दो टामो' या संग्रहात (१) डाक्युमेंट्स रेमिटिडो, (२) कार्पो क्रोनालॉजिको, (३) गव्हेटा अँटिगा, (४) कार्टा मिसिव्हा, (५) कार्टा डो विसरीस असे पाच भाग असून यातच बायकरने 'ट्राबोदा द इंडिआ' नावाचे ग्रंथ छापले त्यांचे मूळ साधनांचे वगैरे ८० ग्रंथ आहेत. या संग्रहातील 'डॉक्युमेंट्स रेमिटिडो' ची मूळ २०० बांधीव पुस्तके होती व त्यांत हिंदुस्थानला लिहिलेल्या व हिंदुस्थानातून लिस्बनला गेलेल्या पत्रांचा संग्रह होता. या २०० पुस्तकापैकी बहुतेक गोव्याला पाठविली व ६२ पुस्तके या संग्रहात ठेवलेली आहेत. या ६२ पुस्तकात इ.स. १६०५ ते १६९७ पर्यंत हिंदुस्थानाहून लिस्बनला गेलेल्या पत्रांचा संग्रह केलेला आहे. यात एकंदर १२,४६५ पत्रे असून त्यातील काही भाग 'अकॅडेमिक रिअल सायन्सिस' ने छापले आहेत. या संग्रहातील इंग्रजांना उपयुक्त अशा साधनांच्या नकला करून त्या भाषांतरीतही केलेल्या इंडिया ऑफिसमध्ये ठेवल्या आहेत; परंतु या नकलांचा शिवशाहीच्या इतिहासाला फारसा उपयोग होणार नाही. कारण या सर्व नकला इंग्रज कंपनीच्या इतिहासापुरत्याच केलेल्या आहेत. हा संग्रह हिंदुस्थानच्या इतिहासाला अत्यंत महत्त्वाचा आहे. 'कार्पो क्रॉनोलोजिको' च्या संग्रहात इ. सन ११३७ ते १६४८ पर्यंतची साधने आहेत. यात गोव्यातील व पोर्तुगीजांच्या इतर भागांतील लोकांस व अधिकाऱ्यास काढलेले काही थोडे जाहिरनामे वगैरे आहेत. याही भागातील काही साधनांच्या नकला

इंडिया ऑफिसमधून ठेवून त्या भाषांतरीत केलेल्या आहेत. 'गव्हेटा आँटिगा'चा संग्रह म्हणजे 'टार दो टामो'चा मूळचा जुना संग्रह यात शिवशाहीस उपयुक्त असे थोडेच कागद सापडू शकतील.

'कार्टा मिसिव्हा' व 'कार्टा दो बिस रिस'मध्ये जो संग्रह आहे तो किरकोळ स्वरूपाचा असून त्यातील थोडाच हिंदुस्थानच्या इतिहासाला उपयोगास येईल 'बिब्लिओथिका नॅशनल' च्या दुसऱ्या मुख्य संग्रहाचे दोन भाग आहेत. (१) आँटिगो कॉन्सेलो अल्ट्रामरिनो व (२) पोबल कलेक्शन. यातील पहिल्या भागाचे दोन पोट विभाग पाडले आहेत. त्यांतील दुसऱ्या उपविभागांत हिंदुस्थानविषयक बरीच माहिती सापडते.[६७]

२६ (अ-७) पोर्तुगीज साधनांच्या परीक्षणात घ्यावयाची सावधगीरी :

पोर्तुगीज साधनांच्या परीक्षणात बरीच सावधगिरी बाळगावी लागेल. पोर्तुगीज लोकांच्या साधनांत इंग्रजी साधनांतील इतर दोषांसारखे दोष आढळतील. यांच्या पंचाग पद्धतीच्या दहा दिवसांच्या फरकामुळे कधी कधी इंग्रजी व पोर्तुगीज साधनांच्या तारखांतील तफावत नजरेस पडेल; परंतु या सर्व फरकांपेक्षा पोर्तुगीज साधनांची विविधता मात्र साधन परीक्षणात बरीच सावधगिरी ठेवावी लागते. पोर्तुगीज हे राज्याधिकारी असल्याने त्यांची सनदापत्रे, कायदे वगैरे प्रकारची साधने उपलब्ध होतात. सनदापत्रे वगैरेंसारखी पत्रे आली की त्यात वाद आले, निकालातील एकपक्षीयता आली, नकालांतील दोष वगैरे व्यवहारातील अनेक लटपटी त्यात आल्या. या सर्वांचा समावेश जाणूनबुजून करण्यात येत असल्याने तो काढून टाकणेही तितकेच कठीण असते.[६८]

२६ (अ-८) फ्रेंच व इतर युरोपीय साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

१६ व्या शतकाच्या अखेरीपासूनच फ्रेंच फादर कर्नाटकात बरेच होते त्यांची आत्मवृत्ते किंवा इष्टमित्रांस धाडलेली स्थानिकवृत्ते बरीच सापडतील. फ्रेंच प्रवाशांचे वृत्तांतही बरेच सापडू शकतील. ट्राव्हर्निअर, बर्निअर, थेवनो, डेलन, करे, डिला व्हेल यांची व अशाच तऱ्हेची आणखीही प्रवासवृत्ते इंग्रजीतून आपल्या उपयोगात येत आहेत असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

२६ (ब) स्वदेशीय साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

आदिलशाही व कुत्बशाही दप्तर मोगली परचक्रात नाहिसे झाले. शिवशाहीतील खास शिवशाहीचा दप्तरखाना रायगडावर प्रथम नष्ट झाला. नंतरचा जिंजीत नष्ट झाला. इतकेच नव्हे तर मोरोपंतादी सरकारकून शिवाजीचे कोण अधिकार होते हे समजण्याइतकेही कागदपत्र खास

शिवाजीचे मुख्य दप्तरखाने सरकारकुनांचे घरी होते ही गोष्ट खरी आहे; परंतु राजधानी फस्त होताना किंवा शत्रूकडून लुटली जाताना अग्नीला अगर शत्रुला राजा व सरकारकून हा व्यक्तिशः भेदभाव बाळगण्याचे कारण नव्हते. हिंदुस्थानातील शिवकालीन युद्धनीतीच अशा प्रकारची होऊन राहिली होती की, प्रथम जाळपोळ व नंतर हातघाई. त्यामुळे नुसतीच राजकीय दप्तरे उद्ध्वस्त झाली इतकेच नाही, तर सर्व महत्त्वाच्या ठाण्याबरोबर तेथील ठाणेदारांची व देशमुखादी सर्व कर्त्या लोकांचीही दप्तरे नाहिशी झाली. परंतु ही परिस्थिती मराठेशाहीत किंवा पेशवाईत न राहिल्यामुळे किंवा शत्रुचे ठाणे घरातून किंवा महाराष्ट्रातून उठल्यामुळे पुढील म्हणजे शाहूपासूनचे दप्तरखाने सुरक्षित राहिले.

नाही म्हणण्यास महाराष्ट्रातील किंवा हिंदुस्थानातील ऐतिहासिक अस्सल व समकालीन साधनांचा अवशेष फक्त व्यक्तिगत परंतु कमी महत्त्वाचा किंवा संबंधाच्या घराण्यातील खाजगी दप्तरातील राजकीय सनदपत्रात उरला आहे. तो साध्य करून घेणे जरूरी आहे; परंतु अशा खासगत दप्तरातीलही महत्त्वाचा भाग इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हाती लागताच कोठे 'मॅकेन्झी कलेक्शन' तर कोठे 'आर्म कलेक्शन' या नावाखाली 'ब्रिटिश म्युझिअम' मध्ये अधिष्ठित झाला आहे. तसेच कोठे 'लेज कलेक्शन' यासारख्या नावांनी एडिन्बर्ग वगैरेच्या विश्वविद्यालयात आहे. पारिस म्युझिअममध्येही तो निरनिराळ्या नावाखाली प्रदर्शित होत आहे.[६९]

अशा तऱ्हेचे अनेक वीस पंचवीस वर्षात बरीच साधनसामुग्री नुसतीच संग्रहीत केली गेली इतकेच नसून, त्यातील बराच भाग छापून प्रसिद्धही झाला आहे. गुरू राजवाडे यांचे बावीस खंड, 'काव्येतिहास-संग्रह' यात रा. ब. साने यांनी ग्रंथीत केलेला साठा व विशेषतः 'पत्रे व याद्या' इतिहास संग्रहात छापून काढलेला पत्र व इतर संग्रह, वाडांच्या 'रोजनिश्या', 'प्रभात', 'कायस्थप्रभुंच्या इतिहासाची साधने', 'भारतवर्ष' वगैरे सारख्या व इतर मासिकात प्रकाशित झालेला संग्रह सत्कार्योत्तेजक सभेने प्रकाशित केलेले वाङ्मय व विशेषतः भारत-इतिहास संशोधक मंडळाने वेळोवेळी ग्रंथ व मासिकरूपाने वेळोवेळी प्रकाशित केलेली माहिती विपुल असली तरी फारच अपुरी आहे, असे म्हणणे प्राप्त आहे. 'बिल्बिओथिका इंडिका', 'मास्लोमिका इंडिका','इंडियन ॲटेक्वेरी','रॉयल एशियाटिक सोसायटी' सारख्या मासिकात फारसी व इतर साधने काही कमी प्रसिद्ध झाली नाही. 'डेक्कन क्वार्टर्ली','हिस्टॉरिकल रिव्ह्यू','मॉडर्न रिव्ह्यू','इंडियन रिव्ह्यू' यांतही वेळोवेळी

लखरूपाने साधनसामुग्री छापली जात आहे. तीही कमी महत्त्वाची आहे असे नाही. परंतु मासिकांत प्रकाशित झालेली माहिती इतिहासकाराला नेहमीच आठवण होऊन प्राप्त करून घेता येतेच असे नाही. त्यामुळे या मासिकांत येणाऱ्या माहितीचा कोठेतरी नियमाने आढावा छापून प्रसिद्ध होणे जरूर आहे आणि असा आढावा प्रत्येक स्थानिक सरकारनेच प्रसिद्ध केला पाहिजे.

सारांश, अशा तऱ्हेने बरीच साधन सामुग्रीप्रसिद्धीस येत आहे. परंतु मराठ्यांचा इतिहासवृक्ष तयार करतांना 'आधी कळस मग पाया रे' अशीच स्थिती होऊन राहिली आहे अशी चिंता वा. सी. बेंद्रे यांनी येथे व्यक्त केली आहे. जवळची सामुग्री तर इतकी अव्यवस्थित आहे की, त्यांतील कोणती पाने कोणत्या ठिकाणी बसतील हे समजण्याससुद्धा मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे या विखुरलेल्या पानांची निवडानिवड करून माहिती कशी शोधून काढावी हे एक कोडेच बनले आहे.

२६ (ब-१) संस्कृत साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

शिवशाहीची संस्कृत साधने फारच थोडी उपलब्ध झालेली आहेत. शहाजीचे तीन-चार ताम्रपट; शिवाजी, संभाजी व राजाराम यांची दहा-बारा दानपत्रे, तंजावरच्या राजघरण्यातील काही दानपत्रे; शिवकाव्य, राधा-माधव, विलास-चंपू, पर्णालपर्वत ग्रहणाख्यान, शिवभारत, भोसले वंशावली लहान व मोठी, शाहेंद्रविलासादी काही तंजावरच्या राजांची काव्यचरित्रे, व शिवाय तंजावरच्या कवींच्या निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथातील प्रशस्तीचा भाग इतकीच काय ती शिवकालीन संस्कृत साधने उपलब्ध आहेत. वरील काव्यग्रंथावरून आणखीही काव्यग्रंथ त्यावेळी लिहिले असून ते अगदी शिवाजी व शहाजी यांच्या चरित्रपर असावेत असे मानण्यास आधार सापडतो. वरील साधनांपैकी शिवकाव्य व भोसले वंशावळ्या व काही तंजावरची काव्ये समकालीन नाहीत किंवा शिवकालीन राधामाधव विलासचंपू, पर्वालपर्वतग्रहणाख्यान व शिवभारत ही काव्ये समकालीन असल्याने फार महत्त्वाची आहेत.

शिवकालीन संस्कृत काव्ये बरीच रचली गेली असावीत. हे संस्कृत ग्रंथ कोठे देवनागरी तर कोठे तामील किंवा कानडी लिपीत लिहिलेले आढळतात. खास संभाजीनेच काही काव्यग्रंथ लिहिल्याचा उल्लेख आहे पैकी 'बुधभूषणम्' हे काव्य नुकतेच प्रसिद्धही झाले आहे. तंजावरच्या राज्यात व खास शहाजी महाराजांकडे परमानंद व जयराम या कवींना समकालीन असे आणखीही

कवी होते. त्यांची बहुतेक जंत्री 'इंडियन ॲटिक्वेरी' मध्ये 'दक्षिणी कवी' या लेखात व गुरू राजवाडे यांच्या राधामाधव विलासचंपूच्या प्रस्तावनेत आलेली आहे. या कवींचेही शिवाजी व शहाजीच्या चरित्रांवर काव्यग्रंथ असून ते उपलब्ध होतील त्याच प्रमाो संभाजी व राजाराम यांच्याही कारकिर्दीचे काव्यग्रंथ मिळू शकतील.[७०]

काव्येतिहासग्रंथ किंवा चरित्रग्रंथ लिहिणाऱ्या या भाटांचा किंवा शाहिरांचा असा नेहमीच सांगण्याचा थाट असतो की, त्यांची ती चरित्रकाव्ये किंवा प्रसंगवर्णने प्रत्यक्ष पाहून किंवा माहिती मिळवून सविस्तर रचलेली आहेत. असली काव्ये जरी स्वतःच्या पोटाकरिता रचली असली तरी ती त्यास एखाद्या राजाच्या आग्रहामुळे रचावी लागली किंवा केवळ देवाची आज्ञा झाली म्हणून लिहिण्यास सुरुवात केली व ती देवानेच लिहवून घेतली असे नेहमी सांगितले जाते. या इशाऱ्यावरून काव्यात स्फूर्तीविषयक भाग घेण्याचा बराच संभव असतो. परंतु लिहिणाऱ्याच्या मनात काही इष्ट साधावयाचे असल्याने आपल्या काव्यात स्तुतीपर मजकुराशिवाय दोष राहू नये अशी नेहमीच काळजी बाळगावी लागते. विशेषतः ही चरित्रे किंवा शाहिरी काव्ये प्रत्यक्ष संबंधी माणसालाच म्हणून दाखवावयाची असतात ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे शाहिराच्या प्रसंगाच्या वस्तुस्थिती वर्णनाची जबाबदारी लक्षात येते. हा शाहीर जर समकालीन असेल तर त्याच्या वर्णनातील सत्यता पुष्कळच निर्भेळ असू शकते विशेषतः या भाटांची विवेचनपद्धती समयवृत्तांत देणारी असल्यामुळे असल्या वृत्तांतात बराचसा ऐतिहासिक सत्य भाग प्राप्त होतो. समकालीन शाहिरीची माहिती फार बारकाईची व जबाबदारीने मिळविलेली असते व ही शाहिरी काव्येसंबंधी व प्रत्यक्ष हजर असणाऱ्या माणसांसमोर गावयाची असल्या कारणाने प्रसंगाच्या तपशीलात चूक सहसा राहण्याचा संभव नसतो; परंतु ही काव्ये प्रशंसापर असतात. बक्षिशी मिळविण्याच्या उद्देशाने धन्यासाठी तयार केलेली असतात.[७१]

कोणत्याही भाषेतील लेखनात श्लोकबद्ध विवेचन करताना कालाच्या उल्लेखासाठी अंकलिपीचा उपयोग करता येत नाही. तसेच अक्षरी कालाच्या संख्येत उल्लेख करावयाचा तर वृत्तांतील गण, मात्रा व यमक यांना अनुरूप अशी शब्दयोजना ठरीव एका शब्दात करणे कठीण जाते. म्हणून संस्कृत, मराठी वगैरे काव्य वाङ्मय संख्यालेखनात ठरावीक पदार्थनामाने किंवा त्या

पदार्थवाचक शब्दाने संख्या लिहिण्यात येते. ज्योतिषात बहुतेक श्लोकबद्धच रचना असल्याने तर या तऱ्हेने संख्यावाचक उल्लेख बरेच आढळतात. ही संख्यालेखनाची 'वामगति' म्हणजे कोणत्याही संख्येतील उजवीकडील पहिला अंक म्हणजे एक स्थानी असलेला अंक प्रथम लिहावयाचा नंतर दशंस्थानाचा उल्लेख करावयाचा, त्यांनतर शतं, सहस्र, दशसहस्र वगैरेचा अनुक्रम निर्देश करण्याची पद्धती आहे. ह्या पद्धतीत संख्या सांगताना अंकाऐवजी जे विशिष्ट अर्थाचे किंवा पर्यायाचे शब्द योजण्यात येतात ते असे- ०= पूर्ण अभ्र, गगन; १ = पृथ्वी, चंद्र, रूप; २= आश्वि, पक्ष, आक्षि, दो, यम, कर, पाद, नेत्र; ३= क्रम, ग्राम, राम, पूर, लोक, गुण अग्नि; ४= समुद्र, वेद, युग, कृत; ५= बाण, वायू, भूत, अक्ष, प्राण; ६= रस, अंग, ऋतू, तर्क; ७= ऋषि, स्वर, तुरंग, पर्वत; ८= वसु, सर्प, मतगंज; ९= संख्या नंद, रंध्र, निधि, गो, अंक, नभश्वर (ग्रह); १०= आशा, दिशा; ११= महेश्वर; १२= अर्क; १३= विश्व; १४= मनु; १५=तिथि; १६= कला, अष्टि, राजा; १७= अत्याष्ठि, घन; १८= धृति; १९= अतिधृति; २०= कृति, नख, अंगुली; २१= प्रकृती, मूर्छना, स्व; २२= जाती; २३= आकृती, विकृती, संस्कृती, अर्हत्; २४= जिन, सिद्ध; २५= तत्व, अतिकृती; २६= अधेकृती; २७= नक्षत्र; ३२= दशन, द्विज, दंत; ३३= सूर; आणि ४९= ताण ही पद्धती समजण्यासाठी वा. सी. बेंद्रे एक उदाहरण देतात. ते उदाहरण म्हणजे - शिवजन्मकाळ-भूबाण-प्राणचन्द्राद्वैः सम्मिते शालिवाहने। = १५५१ शालीवाहन शक; अवरंगजेबाचा मृत्युकालां-शके रंध्रकरांगभूपरिमिते संवत्सरे व व्यर्थ। = शके १६२९ (८१) व्यय संवत्स; अनौळा किल्ला बांधल्याचा शक -अंकबाण रसचंद्र शकाते, ज्येष्ठ पिंगल सितें दिनातेंदु। पंचमी ध्रुव सुपुष्पहि जेव्हा, येशवंत बुरुजाकृति तेव्हा।। यांतील अंकबाण रसचंद्र शकातें म्हणजे १६५९ शतकांत असा अर्थ आहे. अंकलेखनाप्रमाणे वार व मास दर्शवितांना ठरावीक शब्दांची योजना केली जाते.

वर्षाचे मास, या मासाना जी निरनिराळी नावे दिली जातात ती अशी : (१) चैत्र = मधु, (२) वैशाख = माधव, (३) जेष्ठ = शुक्र, (४) आषाढ = शुचि, (५) श्रावण = नभस, (६) भाद्रपद = नभस्व, (७) आश्विनी = इष, (८) कार्तिक = ऊर्ज, (९) मार्गशीर्ष = सह किंवा आग्रहायणि, (१०) पौष =सहस्त्र, (११) मउघ = तप आणि (१२) फाल्गुन = तपस्य

मासाचे दोन पक्ष : पहिला - शुक्र, शुद्ध किंवा सित; दुसरा - कृष्ण, वद्य, असित अगर बहुल. वारांनासुद्धा स्वतंत्र नावांनी उल्लेखितात - (१) रविवार = आदितवार, (२) सोमवार = चंद्रवार किंवा इंदुबार, (३) मंगळवार = भौमवार, (४) बुधवार = सौम्यवार, (५) गुरुवार = बृहस्पतवार, (६) शुक्रवार = भृगवार किंवा भार्गववार आणि (७) शनिवार = मंदवार असे म्हणतात.[७२]

२६ (ब-२) फारसी साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांनी केलेले लिखाण :

शिवशाहीच्या इतिहासाला उपयुक्त अशी साधने फारसीतच मिळतील असे वा. सी. बेंद्रे सांगतांना याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देतात, या साधनांच्या संदर्भात औरंगजेबाची अनेक पत्रे उपलब्ध होऊ शकतील. परंतु विजापुर व गोवळकोंडा येथील दप्तर मात्र हाती लागणे कठीण आहे. या दोन्हीही शाह्यांचा शिवशाहीतच ऱ्हास झाला व सर्व खजिन्याबरोबर कागदपत्रांचा दप्तरखानाही नाहीसा झाला. फारशी साधनात इतिहासोपयोगी अशी प्रत्यक्ष राजकीय साधने जर काही उपलब्ध झालीच तर ती मोगली दप्तरातच उपलब्ध होतील. खासगत पत्रांचा व इतिहासग्रंथांचा साठा मात्र मराठीपेक्षा अधिक मिळण्याचा संभव आहे. फारसी साधनांचे स्थूलमानाने चार प्रकाराचे भाग पाडता येतील.

(१) फर्माने किंवा दरबारी हुकूम व कौलनामादी इतर सरकारी पत्रे.

(२) वाक्यांसारखी वाकेनिविसांनी किंवा इतर सुभेदारांनी आपापल्या हुजुरांत लिहिलेली पत्रे.

(३) तवरिखांसारखी नंतर जुळवून तयार केलेली टिपणे.

(४) नामे यांसारखी चरित्रकारांनी मुद्दाम तयार केली चरित्रे

महाराष्ट्रातील खाजगी पत्रव्यवहार मराठीत होत होता. राजकीय थाटांची व हवालदारांची पत्रे मात्र फारसीत होत होती. फारसी साधनांचा साठा बराच आहे. प्रत्येक इतिहासकालीन घराण्यात एखादी तरी फारसी सनद संग्रही असतेच. असल्या सनदा बहुधा शिवकालीन किंवा शिवपूर्वकालीन असतात, असे बेंद्रे सांगतात. शिवशाहीत व पेशवाईत मराठी सनदाच देण्याचा प्रघात असे. काही युरोपीय वगैरे लोकांशी व दिल्लीच्या नामधारी पादशहांची अगर त्यांच्या वजिरांशी जो पत्रव्यवहार होत असे तो फारसीत होत असे, असे बेंद्रे नमूद करतात. परंतु सर्व महत्त्वाचा व राजकीयविषयक

आंतर-राजकीय कारभार मराठीतूनच चाले. त्यामुळे ज्या काही फारसी सनदा आज महाराष्ट्रातील इतिहासकालीन घराण्यात सापडतात त्यांत मलिकंबरी सनदाच विशेष आहेत. त्यानंतर मोगलांच्या सनदांचा भरणा आहे.

आदिलशाही व कुत्बशाही सनदांची बऱ्याच खासगत संग्रहात आहेत. राजकीय कारभाराची कागदपत्रे व देशमुखी-देशपांडेपणाच्या वेगळ्या शिवशाहीच्या पूर्वीच्या कागदपत्रांच्या संग्रहाचा मात्र अद्यापही पत्ता नाही. बहुतेकांचा नाशच झाला असावा.

फारसी इतिहासग्रंथही कित्येक घराण्यांत जोपासली आहेत. हे खासगत (विशेष) संग्रह सोडले म्हणजे महाराष्ट्रातील मोठे संग्रह म्हणजे भारत-इतिहास-संशोधन-मंडळ, पारसनीस संग्रह व राजवाडे संग्रह. या तीन संग्रहात फारसी साधनांचा संग्रह आहे. यातील प्रो. पोतदार यांनी नुकताच प्रदर्शित केलेला आदिलशाही कागदपत्रांचा संग्रह बराच महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रातील एलिनिएशन दप्तरातील फारसी संग्रह अजूनपर्यंत चांगलासा तपासला गेला नाही; परंतु त्यातही बरीच साधने महत्त्वाची आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे, असे बेंद्रे सांगतात.

गोवा व मद्रास रेकॉर्डमध्येही फारसीत लिहिला गेलेला पत्रव्यवहारही संग्रहित केला आहे. उत्तर भारतातील निरनिराळ्या संग्रहात मोगली पत्रांचा संग्रह आहे. त्यांतील बहुतेक साधने उत्तर भारतातील राज्यकारभाराची आहेत. मोगलांच्या आणि विशेषतः औरंगजेबाच्या पत्रांत दक्षिणेतील कारभाराचा उल्लेख आढळतो. परंतु मोगलांचे दक्षिणेतील दप्तर उपलब्ध होण्याची फारशी आशा नाही.[७३]

इलिअड आणि डौसन यांनी काही शिवकालीन फारसी इतिहासग्रंथाची इंग्रजीत भाषांतरे प्रसिद्ध केली; परंतु ती संक्षिप्त स्वरूपात असून भाषांतर व रूपांतर ही दोन्हीही सदोष आहेत. इलिअट-डौसनमधील बादशाहीनामा, काफीखान व अलमगीरनामा हे ग्रंथ शिवशाहीस उपयुक्त आहेत. आयर्विन व प्रो. सरकार यांच्या परिश्रमाने फारसी साधनांतील बरीच उपयुक्त साधने आपल्या निदर्शनास आली आहेत. स्टोरिआ-द-मोगर या ग्रंथाच्या चौथ्या खंडाच्या शेवटी जी ग्रंथसूची दिली आहे. त्यावरून व प्रो. सरकार यांनी आपल्या औरंगजेबाच्या चरित्राच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडात जी ग्रंथसूची दिली आहे, त्यावरून दरबारी माणसांकडून लिहवलेले सय्यद अहमदचा तुझुक-इ-

जहांगिरी, अब्दुल हमीद लाहोरीचा व महमद वारीसचा पादशाहनामा, महंमद सालीह कंबूचा अमल-इ-सालीह असे चार शहाजहानच्या चरित्राचे ग्रंथ असून मिरझा महंमद कासीमचा अलमगिरनामा व महंमद साकी मुस्ताइद खानाचा मासिर-इ-अलमगिरी हे औरंगजेबाच्या चरित्राचे ग्रंथ उपलब्ध आहेत. यातील लाहोरीचा पातशाहनामा, अलमगिरनामा व माशिर-इ-अलमगिरी हे मूळ ग्रंथ बिब्लिओथिका इंडिकामध्ये छापले आहेत. खासगत लिहिलेल्या इतिहासग्रंथात अकिलखान रझी याचा झाफरनाम, बकिअत, हलत-इ-अलमगिरी किंवा औरंगजेबानामा या नावाने उपलब्ध असलेला छोटा इतिहास, मुंतखब-उल्-लुबाब नावाचे काफीखानाने लिहिलेले औरंगजेबाचे चरित्र; नश्ख-इ-दिलकश या नाचा भीमसेनाने लिहिलेला औरंगजेबाच्या चरित्राचा ग्रंथ व इशरदासचा फतूत-इ-अलमगिरी अशा चार ग्रंथांचा समावेश होतो. यांतील काफीखानाचा ग्रंथ बिब्लिओथिका इंडिकात छापलेला आहे. मराठी ९१ कलमी बखरीचे तारीख-इ-शिवाजी हे भाषांतर व मोगली सरदारांची हकीकत सांगणारा मासिर-उल्-अमारा हे दोन ग्रंथ शिवशाहीच्या फारसी साधनांत थोडेबहुत उपयुक्त ठरतील.[७४]

विजापूर व गोवळकोंडा यांच्या इतिहासाबाबतचे ग्रंथही उपलब्ध आहेत. त्यात मिरझा इब्राहिम झुबाइरीचा बसातिन-इ-सलातिन, तारीख-इहप्त-कुर्सी; सय्यद नुरुल्लाचा तारीख-इ-अलि आदिलशहा, तारीख-इ-कुत्बशाही व सय्यद महंमद मीर अबु तुरबचा कुत्बनामा-इ-आलम हे ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. सारांश फारसी साधनसंग्रह फार मोठा आहे; परंतु त्याच्या व्याप्तीच्या मानाने त्यांतील फारच थोडा भाग छापला गेला आहे.

फारसी लिखाणाचे परीक्षण :

शिवकालीन मुसलमानी शाहींच्या फारसी फर्मानात किंवा इतर कागदपत्रात मराठ्याबद्दलची तेढ आढळणे अगदी साहजिक आहे. केव्हा केव्हा असेही दृष्टिस पडते की, मुलूख शिवाजीच्या ताब्यात असला तरी दिल्लीच्या सम्राटाची फर्माने आणण्याची लोक खबरदारी घेत. यावरून जरी थोडाबहुत शिवशाहीच्या डळमळीत अंमलाचा बोध होऊ शकला तरी त्या फर्मानात निर्देशिलेला मुलूख खरोखर कोणाच्या ताब्यात होता याचा नेमका सुगावा लागत नाही. राज्याच्या विस्तृतेमुळे लोक गैरसमज करवूनही फर्माने आणून ठेवीत. अशा फर्मानांचा उपयोग करताना अर्थातच लिहिणाराने शत्रूपक्षास लावलेल्या अपमानकारक विशेषणापासून सावध राहावे लागते.

शिवकालात म्हणजे इ.सन १६७६ च्या पूर्वार्धात मोगलांच्या जुन्नर परगण्यात मित्रत्वाने जाऊन राहिलेला फ्रायर नावाचा एक इंग्रज प्रवासी या वाकेनिविसांच्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल लिहितांना म्हणतो, "ठरापेक्षा कमी सैन्य ठेवून राजाची या देशात सर्वत्र आढळतो. पातशहाने सरदारांच्या सैन्यावर व सरदारांच्या हालचालींवर नजर ठेवून बातमी वेळीच पोहचविण्यासाठी सरकारी अधिकारी नेमलेले असतात. यांनी या सरदारांच्या सैन्यांची वगैरे फार बारीकसारीक बातमी द्यावयाची असते परंतु हे बादशहातर्फेचेच अधिकारी प्राप्तीच्या आशेने या सरदारांचीच मेहेरनजर राहील असे काम करीत राहतात. पातशहाला खात्रीपूर्वक म्हणून अगदी खोटाच मजकूर समजावितात."[७५]

अशा प्रकारे जेथे वाकेच मुळात दोषपूर्ण किंवा एकपक्षीय व अतिशयोक्तीचे असत तेथे त्यावरून तयार केलेली तवारिखासारखी टिपणे तितकी निर्भेळ होणे शक्यच नव्हते. विशेषतः या अतिशयोक्तिपूर्ण वाक्यांवरून जे नामे किंवा चरित्रग्रंथ मुद्दाम तयार करविले किंवा केले गेले ते विपर्यस्त झाले असले तर नवल कसले!

सारांश, तवारिखांसारखी टिपणे किंवा नाम्यादी चरित्रग्रंथ खास मोगली किंवा मुसलमानी प्रवृत्तीपर असल्याकारणाने मराठ्यांच्या इतिहासाला ते पूर्ण प्रमाणभूत मानता येणार नाहीत. त्रयस्थ या नात्याने इंग्रज किंवा इतर परदेशीयांनी मराठ्यांविरूद्ध केलेला आरोप जितका तत्कालीन परिस्थितीचा किंवा तत्कालीन समजुतींचा निर्भेळ द्योतक ठरेल तितका तो शत्रुपक्षीय लिखाणातील खात्रीने मानता येणार नाही. फारसी साधनांचा उपयोग आदिलशाही, कुत्बशाही किंवा मोगली आंतरराजकीय चित्रे पाहण्यास अत्यंत योग्य होईल व त्यादृष्टिने ती साधने फार महत्त्वाची आहेत. परंतु मराठ्यांच्या इतिहासाला ती केव्हाही सदोष ठरतील यात शंका नाही.

तवारिखांत व पुष्कळवेळा नाम्यासारख्या चरित्रग्रंथातही जी हकीकत महिन्याखाली अगर वर्षाखाली एखाद्या प्रसंगाचे वर्णन केलेले असते तो सर्व प्रसंग त्या मर्यादित काळातच घडला असे मानणे अगदी चुकीचे असते. त्यातील मुख्य अगर शेवट त्या मर्यादित काळात घडला व बाकीचा सर्व प्रसंग अनुसंधानवाचक म्हणून प्रसंग स्पष्ट करण्याकरिता तेथे दिला गेलेला असतो.

समकालीन फारसी चरित्रग्रंथ बरेच उपलब्ध आहेत; परंतु त्यातील सर्व मजकूर मोगली किंवा आदिलशाहीच्या इतिहासाबाबतचाच असल्या कारणाने जेथे जेथे मराठ्यांचा या शाह्यांशी विशेष प्रामुख्याने संबंध आला तितक्यापुरतेच उल्लेख त्यात केलेले आढळतात. त्यामुळे शिवशाही व मोगल किंवा आदिलशाही व शिवशाही यांच्या परस्पर संबंधाच्या इतिहासापूर्तीच माहिती आपाणास या फारसी ग्रंथात मिळू शकते असे वा.सी. बेंद्रे आवर्जुन सांगतात.

सारांश, फारशी साधने केवळ शिवाजीच्या शत्रूपक्षाकडची असल्याने त्यांच्या मराठ्यांच्या इतिहासास उपयोग करतांना दृष्टिकोन बदलावा लागतो, हे स्पष्ट होईल. परंतु ही साधने कितीही सदोष असली तरीही सुदैवाने त्यातील बरीच व विशेषतः फारसी ग्रंथ समकालीन असून अस्तित्त्वात आहेत. असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, इतकेच नव्हे तर खास औरंगजेबाची पत्रेही बरीच उपलब्ध झाली आहेत व होत आहेत; परंतु यातील मुख्य भरणा उत्तर हिंदुस्थानातील असल्याने त्यांचा मराठी इतिहासाला उपयोग कितपत होईल ही गोष्ट वेगळी.[७६]

२६ (ब-३) हिंदी व इतर भाषांतील साधने :

भूषण कवीची ग्रंथावली हे शिवशाहीविषयक हिंदी काव्य उपलब्ध असून ते मित्रबंधुंनी काशीच्या नागरी प्रचारिणी सभेमार्फत इ.सन १९०७ मध्ये छापले आहे. हे एक स्तुतिपर काव्य आहे. यापेक्षा याला फारशी किंमत देण्यासारखे ते नाही. छत्रप्रकाश लाल नावाच्या कवीने लिहिलेला आणखी एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. हाही काशीच्या नागरी प्रचारिणी सभेने छापला आहे. या ग्रंथाचे पॉगसनने इंग्रजी भाषांतरे 'History of the Boondelas' (१८२६) या पुस्तकात केले आहे. भूषण कवीचा ग्रंथ समकालीन असल्याने महत्त्वाचा आहे, यांत शंका नाही. परंतु त्याचा उपयोग पॉगसनच्या इंग्रजी भाषांतरावरून इतिहास रचनेला व्हावयाचा नाही. पॉगसनच्या इंग्रजी भाषांतरावरून कै. पांडोबा पटवर्धन यांनी मराठीत अनुवाद करून 'बुंदेल्यांची बखर' या नावाचे लहानसे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. बसातिन-इ-सलातिनी या फारसी ग्रंथाचे उर्दू हिंदी भाषांतर बडोद्यात प्रसिद्ध झाले आहे. जयसिंगाचा मुलगा रामसिंग याचे हिंदीत लिहिलेले चरित्र उपलब्ध झालेले आहे. त्याचप्रमाणे आणखीही हिंदीत चरित्रग्रंथ असल्याची माहिती संशोधकांच्या हाती लागली आहे.

सारांश, आणखीही काही महत्त्वाची हिंदी साधने उपलब्ध होऊ शकतील यात शंका नाही. मराठीशिवाय इतर देशी भाषांतून लिहिणारे लोक शिवशाहीच्या कालात स्वतंत्र नव्हते, मुसलमानांचेच अंकित होते. त्यामुळे साधनांच्या परीक्षणाच्या वेळी साधन लेखक कोणाला जबाबदार किंवा अंकित आहे हे प्रथम जाणावे. म्हणजे त्याप्रमाणे त्याच्या मन:स्थितीचा बोध करून घेता येईल.[७७]

२६ (ब-४) साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

(अ) मराठी साधनांचा उपयोग करतेवेळी घ्यावयाची काळजी :

मराठी साधने खाजगी स्वरूपाची आहेत. ती राजकीय नाहीत. आठव्या खंडातील साधने मात्र राजकीय असून महत्त्वाची आहेत. प्रकाशित झालेला संग्रह चांगल्या स्थितीत न छापला गेल्यामुळे तो संग्रह वापरणे बरेच जड जाते. प्रत्येक ग्रंथ फेरिस्तवार लावल्याशिवाय इतिहास रचनाच होणे शक्य नाही. तरी हे संग्रह लावले गेले पाहिजेत. विशेषतः एलिनिएशन व इंडिया ऑफिस संग्रह ताबडतोब लावला गेला पाहिजे. मराठी साधन संग्रह फेरिस्त्याच्या अभावी जसा उपयोगात आणणे कठीण झाले आहे, त्याचप्रमाणे हा संग्रह छापताना प्रसंगवार किंवा सालवारीने लावता येणे शक्य नसल्यामुळे व विशेषतः हा अनेक ठिकाणी तुरळक तुरळक असा आल्यामुळे या साधनांचा उपयोग करणे जड जाते. प्रकाशित साधनांत राजवाडे वगैरे मंडळींनी जो संग्रह छापला आहे त्यात वाचनाच्या फारशा चुका नाहीत; परंतु कित्येक संपादकांनी वाचनाच्या अक्षम्य चुका आपल्या ग्रंथातून राहू दिल्या आहेत. कित्येक प्रकाशित साधनांचा कालनिर्णय झालेला नाही. त्यामुळे किंचित अडचण येते. तसेच ही साधने जशी सापडली तशीच छापण्यात आली असून त्यांचे अद्यापपावेतो परीक्षण व्हावयाचे आहे.[७८]

(ब) लेखनपद्धती :

मराठी साधने मोडी अगर बालबोधी लिपींत लिहिलेली असतात. दानपत्रे किंवा काव्ये यांसारखीच साधने बहुधा बालबोधीत लिहिली जात. इ.सन १४ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच मोडीलिपी प्रचारात असल्याचे दिसून येते. कालामानाने व देशाभिन्नत्वाप्रमाणे मात्र मोडी लिपीच्या वळणात व अक्षरसंकेतात फरक झालेले दिसून येतात. शिवशाहीच्या कालापुरताच विचार केला तर मावळांतील मोडीचे वळण व सातारा, बेळगाव, कर्नाटक वगैरे भागातील वळणांत बरेच भिन्नत्व

असल्याचे दिसून येईल असे बेंद्रे सांगतात. कोकणपट्टीतील मोडीचे वळण इतर सर्व भागांपेक्षा अधिक वळणदार व सुबोध आहे. शिवाजीच्या कारकिर्दीतील पूर्व भागापेक्षा उत्तर भागांतील वळण बरेच सुधारलेले व सुबोध असल्याचे आढळते. संभाजीकालीन वळण बरेच स्पष्ट आहे. राजारामाच्या कारकिर्दीत तर चिटणीशी सुबोध व गोंडस वळणाचा प्रसार झाला होता.

मराठीतील कोणताही लेख असो त्याचे माथ्यावर श्रीकार किंवा श्री घालून नंतर कुलदैवतेचे किंवा आराध्यदैवतेचे नाव लिहिले जात असे. कधी कधी अशी दोन दोन नावेही लिहिलेली आढळतात. लेख महत्त्वाचा असल्यास त्या लेखाच्या उजव्या बाजूच्या कोपऱ्यावर त्या लेखाच्या प्रती व प्रत्येक प्रतीस लागलेले बंद यांचा उल्लेख केला जातो. एखाद्या पत्राला अगर करीन्याला दहा बंद असेल तर त्या पत्राच्या अगर करीन्याच्या सुरुवातीस उजवीकडे १/१० असे लिहिले जाई. त्या करीन्याच्या चार प्रती असतील तर ४/१० असे लिहिण्याची पद्धत आहे. एकाच बंदाच्या लेखावर असा उल्लेख केला जात नसे. कोणत्याही पत्रात देवाचे अगर माणसाचे नाव आले व त्या देवाबद्दल अगर माणसाबद्दल बहुतच सन्मान व पूज्यभाव दाखवावयाचा असेल तर त्या देवाचे नाव अगर माणसाचे नाव मजकुरात न लिहिता त्या देवाच्या अगर माणसाच्या कमी अधिक मान्यतेप्रमाणे जेथे जेथे उल्लेख करणे जरूर तेथे तेथे कमीअधिक जागा रिकामी सोडली जाई व त्या देवाचे अगर माणसाचे नाव माथ्याला उजव्या कोपऱ्यावर स्वतंत्र लिहिले जाई. मोरापंत पिंगळे किंवा इतरांनी लिहिलेल्या पत्रांत जरी शिवाजीच्या उल्लेख करावयाचा असेल तर तो ते 'राजश्री....स्वामी' असे लिहीत. शिवाजीच्या पत्रांत जिजाऊसाहेबांचा उल्लेख आल्यास 'मातोश्री....साहेबांनी' वगैरे असे लिहीत. एखाद्या देवाला जहांगीर देताना 'श्री....देवाच्या' पूजेस वगैरे असे लिहीत. पत्रांतील मजकुरात जागा कोरी टाकतांना नेहमीच पत्राचे कोपऱ्यावर या गाळलेल्या नावांचे उल्लेख केलेले असतात असे नाही. बरेच वेळा थोरले स्वामींचा म्हणजे शिवाजी महाराजांच्या नावाचा वर नाव लिहून उल्लेख करण्याची जरूरत भासत नसे इतके ते त्यांना स्पष्ट वाटे. बहुधा देवाची ज्यांचेबद्दल देवासारखा पूज्यभाव वाटतो अशा साधुसंतांची वगैरे नावे बालबोधीत बहुमान दाखविण्यासाठी लिहीत. पत्राचे मायने ठरावीक असतात. बरेच मायने अद्यापही चालू असल्यामुळे त्यांचा उल्लेख येथे बेंद्रे करण्याचे टाळतात.

शिवाजी महाराज प्रथम सरकारकुनांना व सुभेदारांना बहुतेक 'मशहुरल हजरती राजश्री' व हवालदार, कारकून वगैरेंना 'मशहुरल अनाम राजश्री' असे लिहीत. राज्याभिषेकानंतर राजमान्य राजश्री वगैरे मायना लिहिला जाई. कचेरीतून सरकारी पत्रे रवाना होत, त्यावर 'रखतखाने' असे असे. मराठी लेखांत विशेषकरून त्या लेखाचे नाव हातरोखा, महजर, करीना किंवा इतर काही प्रकारचा आहे किंवा कसे हे ओळखणे सोपे जाते. पत्र कोणच्याही नावाचे असले तरी ते त्याचेच खस स्वदस्तुरचे आहे असे मानण्यास फारसे साधन नसते. पत्रावर सही अगर निशाणी केली जात नसे. महजर, गोही, संतपत्र यांसारख्याच लेखांवर सही अगर निशाणी होत असे. लेख लिहिणारा आपल्या हस्तकांकडून लेख लिहवून घेई अगर स्वतःही लिही. सरकारी कागदपत्रे सरकारकुनांचे कारकून अगर गुमास्तेच तयार करीत. मजकुरांत जी काही भिन्नता असेल तेवढाच काय तो निराळा मजकूर लिहिला जाई. खास पत्राचा मसुदा कारकुनास समजाविला जाई व पत्र लिहून झाल्यानंतर हे अधिकारी शोध अगर अधिक मजकूर घालून पत्र पुरे करीत. लेखांत प्रथम मायना व नंतर सुहुर सन किंवा राज्याभिषेक शक अगर तिथि मिति व शकाचा उल्लेख करून पत्रास सुरुवात होई. लेखाच्या पूर्व भागात पत्राचे कारण दिले जाई. या कारणात ज्या पत्राला उत्तर अगर विनंतीचा विचार करावयाचा ते पत्र अगर विनंती सविस्तर लिहून नंतर उत्तरभागास सुरुवात केली जाई. यात लिहिणाराचा मजकूर असतो. पत्राचे उत्तरार्धाचे शेवटी मुसलमानी तारीख व महिना दिला जाई. त्यानंतर मोर्तब सूद, बहुत काय लिहिणे, जाणिजे, वगैरेसारखी ठरावीक वचने किंवा दरख घालून लेख पुरे करीत. मोर्तब सूदच्या ऐवजी राज्याभिषेकानंतर मोरापंतादी सरकारकून लेखन सीमा, लेखनालंकार वगैरे असे कित्येक ठिकाणी उपयोगात आणीत असे दिसते. सरकारी कागदपत्रांवरील ही शेवटी लिहिली गेलेली वचने बहुधा त्या त्या कारखान्यांचे अगर खात्याचे अधिकारीच करीच. पत्रावर शिक्का करणे त्यालाही काहीतरी पद्धती असावी असे बेंद्रे सांगतांना आपल्याला दिसतात.[७९]

२६ (ब-५) सरकारी व खाजगी पत्र :

सर्व तऱ्हेच्या ऐतिहासिक साधनांत पत्रांना अव्वल दर्जा प्राप्त होतो. त्यांत लिहिणाराचा दुसऱ्याला काहीतरी कळविण्याचा हेतू असतो. अर्थात जी माहिती दुसऱ्याला सांगावयाची ती दुसऱ्याच्या अनुभवाप्रमाणे व वर्तमान परिस्थितीच्या ज्ञानाप्रमाणे त्याला पटणारी अशी असली

पाहिजे. सामान्यतः लिहिणाराचा ज्या गोष्टीवर विश्वास बसतो किंवा त्याला जी विश्वासार्ह वाटते अशीच गोष्ट तो दुसऱ्याला कळवीत असतो. अशा कळविण्यात दोघांचेही हितसंबंध असतात म्हणून त्याबद्दल चौकशी करणे, खरीखोटी तपासणे वगैरे क्रिया आपोआपच घडत असते. त्यामुळे पत्रातील मजकुराला प्रत्यक्ष साक्षीदाराइतके महत्त्व प्राप्त होते. अशा पत्रातील माहितीत चूक असण्याचा कमी संभव असतो. कारण माहिती देणारे एकापेक्षा अधिक साक्षीदार असून त्यांचे ती माहिती समकालीन नसेल तर मात्र वरील नियम लागू पडत नाही. पत्रांचे सामान्यतः तीन भाग पाडता येतील असे बेंद्रे म्हणतात. (१) राज्यकारभाराची सरकारी पत्रे, (२) व्यावहारिक सरकारी पत्रे, (३) खासगी पत्रे.

२६ (ब-६) जमाखर्च :

अस्सल कागदपत्रांइतकेच जमाखर्च अव्वल प्रकारची ऐतिहासिक साधने म्हणून मानली जातात. पुराव्याच्या दृष्टिने तर जमाखर्चानाच विशेष प्रामाण्य देतात. एक तर बिनचुकतेच्या दृष्टिने जमाखर्च अधिक प्रमाण असतात व यात कल्पनेचा किंवा हेतुप्रदर्शनाचा भाग नसतो. जी गोष्ट घडून गेली तिचाच उल्लेख करावयाचा असतो. जमाखर्च दोन प्रकारचे आहेत. (१) सरकारी व (२) खाजगी.

जमाखर्चाचे लेखन रोजवारीने व्हावयाचे असल्याने त्या जमाखर्चात जे तपशील दिले जात ते अगदी समकालीन व प्रत्यक्ष पुराव्यांच्याच आधारे दिले जात. शिवाय झाली ती गोष्ट नोंदतांना विशेष लक्ष पुरवावयाचे ते हिशेबाकडे पुरवावे लागे. एखादी गोष्ट अपमानकारक असेल तर ती लिहू नये वगैरे श्लेष त्यांचे मनात येत नसत. विशेषतः प्रत्येक वेळेचा सरंजाम वगैरेंचा तपशील फार बारकाईने या जमाखर्चाच्या कलमांवरून पत्ता लागतो. सामाजिक व आर्थिक इतिहासास तर या जमाखर्चाइतके महत्त्वाचे व सविस्तर साधन नसते. जमाखर्च मागाहून तयार करणे तेवढे सोपे नसते. तसेच जमाखर्चाच्या नकलाही करण्याची जरूरी नसते. म्हणून जमाखर्चाचे कागद बहुतेक अस्सलच असलेले आढळतात. शिवकालीन मराठी जमाखर्च अद्याप उपलब्ध झालेले नाहीत. उपलब्ध झाल्यास इतिहासात बरीच भर पडू शकेल यात शंका नाही. जमाखर्चाचे लिहिणे संवत्सर-प्रतिपदेपासून सुरू करण्याची पूर्वापार वहिवाट आहे. जमाखर्च तिथि व मितिवार लिहिला जाई. यात मुसलमानी तारखेचा उपयोग करीत नसत.[८०]

२६ (ब-७) महजर, करीने पुरशिसी वगैरे :

महजर, करीने, तकरीरा, पुरशिसी याद्या व यांसारखी इतर साधने न्याय मिळविण्याच्या अगर देण्याच्या उद्देश्याने तयार केलेली असतात. म्हणून ती दुय्यम प्रकारची मानली जातात. त्यात प्रत्यक्ष पुरावा असतोच असे नाही. मात्र मजकूर साधार लिहिण्याची खबरदारी घेतलेली असते. हेच या साधनास महत्त्व प्राप्त करून देणारे मुख्य कारण आहे. यातील मजकुराची कालमर्यादा कित्येक वर्षाची व केव्हा तर तपांची व पिढ्यांचीही असू शकते. या साधनांतून सामान्य इतिहासाला अव्वल दर्जाची पूर्ण व एकत्रित माहिती मिळत नाही ही गोष्ट खरी आहे. परंतु यांतून व्यक्तिशः घराण्यांनी कोणत्या ऐतिहासिक प्रसंगात किती भाग घेतला याचा अव्वल पुरावा गोळा करता येतो असे बेंद्रे सांगतात.

करीने तयार करिताना व्यक्तिशः घराण्यांनी ज्या विशिष्ट जमिनीच्या मालकीबद्दल अगर वतनाबाबत किंवा इतर काही हक्काबद्दल कथला मांडलेला असतो त्या बाबींचा इतिहासाशी फारसा संबंध नसतो म्हटले तरी चालेल. म्हणून त्या बाबींच्या खरेखोटेपणाबद्दल न्यायनिवाडा करण्याची आपणास जरूरी नसते. परंतु अशा निवाड्यासाठी किंवा पंचाइतीसाठी देण्यात येणाऱ्या कागदात त्या त्या घराण्यातील कर्तृत्वान व्यक्तींच्या पराक्रमाचा व विशेषतः सरकार कामाचा जो उल्लेख केलेला असतो तोच इतहासास महत्त्वाचा असतो. असा मजकूर प्रत्यक्ष पाहिलेला अगर पाहून नमूद केलेल्या किंवा सरकारी पंचांनी मान्य केलेल्या साधनांवरून घेतलेला असतो. त्यामुळे आपणाला त्या त्या घराण्याच्या सरकारकामावरून ऐतिहासिक प्रसंगाचा किंवा त्यातील कित्येक बाबींचा चांगलाच बोध होऊ शकतो. असा करीना सादर झाला की, सरकारी कामदार किंवा गोतपंचायत बसून चौकशी करतात व पुन्हा तकरीरा व पुरशिसा लिहून घेतात. यामुळे करिन्यात लिहिलेल्या वादाच्या मजकुराची छाननी होऊन तो सुधारला जाई. अशा रीतीने गोतमुखे चर्चा झाली की गोत व हवालदार महजर करून वाद तोडीत. या महजरांत पुन्हा दोन्ही बाजुंची म्हणणी नमूद होत व सादर केलेली कागदपत्रेही नकल होत. अशाप्रकारे ही साधने बऱ्याच माहितीगार व स्थानिक लोकांच्या तपासणीून जावयाची असल्याने फारच सावधगिरीने व पुराव्यानिशी लिहिली जात. शकावल्या व याद्या ह्या वादाच्या साहित्यासाठी माहिती मिळविण्याच्या उद्देश्याने नकला करून अगर माहिती मिळवून तयार करीत.

याद्या व टिपणे ही तकरीर अगरी करीना लिहिण्याची पूर्वतयारी असे की त्या सर्व साधनांत दोन विभाग पाडावे लागतात. पहिल्या ज्यांत नुसत्या शिवशाहीच्याच कालाचा उल्लेख असून ती शिवशाहीच्या प्रसंगाचा उल्लेख केलेला असतो ती या उत्तरकालीन साधनांत बहुधा जुन्या कागदपत्रांच्या अगर बखरी वगैरेवरून उपलब्ध असलेली अगर ऐकीव माहिती घेण्यात येते.[८१]

२६ (ब-८) तकरीरे, करीने, टिपणे व याद्या यातील माहिती इतिहासात वापरतांना घ्यावयाची काळजी :

तकरीर, करीने, टिपणे व याद्या इतिहासात वापरतांना खालील प्रकारे काळजी घ्यावी असे बेंद्रे सुचवितात.

(१) जर अशा उत्तरकालीन साधनांत पूर्वकालीन मजकूर खास पत्राची नक्कल देऊन दिलेला नसेल तर तो मजकूर बखरीप्रमाणेच चतुर्थ प्रकारचा मानावा. त्याला अव्वल पुराव्यांची जोड मिळेपर्यंत अव्वल मानू नये.

(२) शिवाय या साधनांत ऐतिहासिकदृष्ट्या एक वैगुण्य असते आणि ते ही की, कोणत्याही प्रसंगाचा उल्लेख करितांना त्या प्रसंगाचा पूर्णपणे उल्लेख न करिता तो फक्त त्या घराण्यातील व्यक्तिपुरताच मर्यादित व त्यातील वर्णन प्रामुख्याने त्या घराण्याकडेच विशेष कर्तृत्वाचा भाग देणारे असे असते. कित्येक वेळा या मजकुरावरून वाचणारांचा गैरसमज होण्याचा संभव असतो.

(३) यातील ऐतिहासिक प्रसंगाची माहिती संगतवार कालानुक्रमे दिलेली असते. परंतु यांतील सर्वच मजकूर कालनिर्देश करून दिलेला असतो असे नाही. कालानिर्देश केला असलाच तर तो बहुशः संवत्संरानी किंवा शकांनीच मर्यादित असतो. कोठे कोठे तुरळक तिथिमित्यांचाही उल्लेख सापडतो. जेथे असे उल्लेख केलेले असतात तेथे ते त्या मजकुराच्या मुख्य भागविषयीचे असतात.

(४) या साधनांतील प्रसंग जरी क्रमवार असतात तरी बरेच वेळा 'नंतर', 'मग', 'पुढे' वगैरे शब्दांनी वर्षेच्या वर्षे व्यापिली जातात. कित्येक घराण्यात विवक्षित वाद पिढ्यान्‌पिढ्या चालतात व दरपिढीत करिना, तकरीर, पुरशिस वगैरे देण्यात येते. अशा करिन्यांत वगैरे एक

विशेष लक्षात येते तो म्हणजे हे करीने आधीच्या पिढीने जसे सादर केलेले असतात. तसेच नकला करून त्यातील मजकूर थेट वाद सांगणाराच्या पिढीपर्यंत आणून पोहोचविण्यासाठी वाढविलेला असतो इतकेच. आतील मजकुराच्या लिखाणात किंवा वाक्यरचनेतही क्वचित ठिकाणीच फेरबदल केलेला आढळतो.

(५) तकरीरा, करीने, पुरशीसी हे कागद फक्त कथला सांगण्यापुरतेच तयार केले जात. ते सरकारी दप्तरात प्रविष्ट केले जात नसत. त्यामुळे त्यांचे अस्सल मसुदे व नकला एकाच ठिकाणी सापडू शकतात. सरकारात गुजरलेली कैफियत मात्र सरकारदप्तरी समाविष्ट केली जाई.

(६) महजरावर सर्व देसक व बलुते यांच्या याद्या किंवा साक्षी असत. ज्या मंडळींनी महजर केला त्या मंडळींची प्रथम यांत यादी दिलेली असते ही यादी देतांना प्रत्येक माणसाचा हुद्दा त्यांच्या नावापुढे लिहिला जाई. सर्व पाटील वगैरे मराठमंडळींना मोकदम म्हणून लिहिले जाई. जोशाच्या नावाच्या व बापाच्या नावापुढे 'भट' हे उपपद जोडण्यात येई. बलुते वगैरेंचीही नावे लिहितांना हजर माणसाच्या व त्यांच्या बापाच्या नावापुढे जातिवाचक शब्द घातले जात. हजाम-न्हावी यास महाला, भाट यास ठाकूर, परीठ यास बरठा, सुतार यास सुतार, कुंभार यास साळवी, गुरव यास दरणा, महार यास नाक, सोनार यास पोतदार, रामोशी यास नाईकवाडी व त्याचे त्यांच्या बापाच्या नावाला 'ई' हे उपपद जोडले जाई इत्यादी यासारखी स्वतंत्र जातिवाचक नावे दिली जात.

(७) महजर करण्यास बसलेल्या सर्वच मंडळींना लिहिता येत नसे. काही आपल्या सह्या व शिक्के करीत; परंतु काहींची निशाणी घेतली जाई. या निशाणीचेही प्रकार निरनिराळे आहेत. या निशाण्याही धंद्यारोजगाराप्रमाणे घातल्या जात. उदाहरणार्थ - मराठ्यांच्या निशाणीत मोकदमांचा नांगर व रावांची कट्यार अगर तरवार, सेठीयाची तागडी, हजामाचा आरसा, परिटाचे धोपटणे, मोगरी किंवा बडवणे, सुताराची वाकस किंवा किकर, कुंभाराचे चाक, गुरवाचे धुपाटण, महाराची काठी, रामोशाचा नांगर, मांगाचा विळा व दोर, चांभाराचा इंगा इत्यादी. महजर ज्या गावी केला जातो तेथील कुलकर्णीच लिहीत असे. जर कागदपत्रांच्या

आधारे निवाडा देता येत नसेल तर दिव्य देऊन त्यात जो खरा होई त्याचे बाजूला निवाडा होत असे.[८२]

२६ (ब-९) शकावल्या :

शकावल्यांचा उपयोग महाराष्ट्राच्या इतिहासाला फार होणार आहे. कारण मूळ चरित्रे लिहिण्याची प्रवृत्ती अशीच आहे की, त्यात तपशील असला व कालनिर्देश नसला तरी चालतो. त्यामुळे ऐतिहासिक साधनांतून कालनिर्देश फारसा आढळत नाही. म्हणून अशा माहितीला नियंत्रित करणारा हाच काय तो एक धागा साधनात प्राप्त आहे. याच धाग्याने इतिहासाची स्वतंत्र रचना करता येणे शक्य आहे, असे बेंद्रे येथे ठामपणे सांगतात.

"ज्यांना हल्ली आपण शकावल्या म्हणतो त्यांना क्वचितप्रसंगी शकसंवत्सरयुक्त याद्या अशीही संज्ञा दिलेली आढळते." "ज्या शकावल्या प्राप्त होतात या सर्व शकावल्या मूळ एकाच प्रतीच्या नकला असाव्यात असे वाटते."[८३]

या शकावल्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाने या शकावल्यात दोन तरी विभाग करावे लागतात असे बेंद्रे सांगतात. हे विभाग रचनाकालाचे द्योतक आहेत. (१) पहिला शिवशाहीचा किंवा राजाराम अखेरपर्यंतचा आणि (२) दुसरा विभाग शाहूपासूनचा.

दुसऱ्या विभागाखाली येणाऱ्या शकावल्या बऱ्याच उपलब्ध आहेत. यात जरी जगाच्या आरंभापासूनचा मजकूर ग्रंथित केलेला असतो तरी तो फार तर पाच-सहा बंदातच काही बखरीत दिल्याप्रमाणे आटोपलेला असतो. यांत चारी युगांच्या राजांची संख्या व वर्षे यांची बेरीज असते. ही पौराणिक थाटाची असते. तसेच यात शिवाजी महाराजांच्या महत्त्वाच्या तीस-चाळीस वर्षांच्या कारकिर्दीतील अधिकाधिक दहा-बारा प्रसंगाचाच उल्लेख असतो. शिवाय असे प्रसंगही क्वचितच तिथि-मासांनी मर्यादित असतात, असे बेंद्रे सांगतात.

संभाजी व राजाराम यांच्या कारकिर्दीतील घडामोंडीचा अवघ्या अर्ध्या बंदातच समाचार घेतलेला असतो. म्हणजे फार तर तीन-चार संभाजीच्या व दहा-बारा नंतरच्या प्रसंगाचे उल्लेख असतात. अशाप्रकारे या दुसऱ्या विभागात येणाऱ्या किंवा उत्तरकालीन शकावल्यांत शाहूपूर्वीचा मजकूर अगदीच त्रोटक. तिथि-मासांच्या उल्लेखाखेरीज व पौराणिक पद्धतीचा असा असतो. परंतु

यांत जेथपासून ताराबाईंची अगर शाहूची कारकिर्द चालू होते तेथेपासूनची माहिती सविस्तर व तिथि-मित्यांनी उल्लेखित अशी मिळते. प्रथम विभागांत येणाऱ्या शकावल्या राजाराम अखेरपर्यंतच्या असतात. त्यातही दुसऱ्या विभागातील शकावल्यांप्रमाणे क्वचित युगांची माहिती जोडलेली असते; परंतु यांची सुरुवात बहुधा औरंगजेबाच्या जन्मापासूनच झाल्याचे उपलब्ध प्रतीवरून दिसून येते. यात विशेषत: मराठ्यांच्या बाजूचाच निदर्शक आहे. या शकावल्यांना हिंदवी राज्याची शकावली असेही म्हणणे बरेच सार्थ ठरेल.[८४]

सारांश, दादाजी कोंडदेव व शहाजी यांच्या आमदानातील घडामोडींचा या शकावल्यात मुळीच विस्तार नाही. जशा दुसऱ्या प्रकारच्या किंवा उत्तरकालीन शकावल्या शाहू व पेशवे यांच्याच वर्णनात्मक असतात तशाच या प्रथम विभागांतील किंवा शिवशाहीच्या शकावल्या फक्त शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्या कारकिर्दीच्या आहेत. याप्रमाणे या शकावल्यांचे स्वरूप उपलब्ध शकावल्यांच्या नकलांवरून रूपष्ट दिसून येते.

(अ) शकावल्या संदर्भातील अडचणी :

(१) शिवशाहीच्या शकावलींच्या काही थोड्याच नकला उपलब्ध आहेत. त्यांचा आरंभ व अंत काहिंची पाने गहाळ झाल्यामुळे नक्की सांगता येणार नाही. ज्यांचा आरंभी भाग उपलब्ध आहे त्यावरून शकावलीचा प्रारंभ औरंजेबाच्या जन्मापासून करितात असे दिसते. उदा. शिवापूरकर देशपांड्यांच्या वहीतील शकावली.

(२) कोणत्याच शकावलीचा शेवट असे सुचवित नाही की, शकावली येथे पूर्ण झाली. काही शकावल्यांत राज्याभिषेकापर्यंतचा मजकूर आहे, काहीत राजाराम अखेरपर्यंतचा मजकूर आहे, तर काही शाहूच्या आगमनापर्यंतचा तपशील आहे, असे बेंद्रे सांगतात.

(३) शकावल्यात दिलेली माहिती त्या त्या घराण्याच्या करीन्यांत, तकरीरांत वगैरे घेतलेली असते. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे करीना, करीर वगैरे कागदपत्र व शकावल्या यांचा अन्योक्त संबंध आहे, असे स्पष्ट होते. शकावलीतील राजकीय मजकुरातील फक्त जरूर तितकाच नामनिर्देश करीन्यासारखा कागदपत्रात केलेला असतो. हीही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे शकावलीचा उपयोग करीना वगैरेंसारख्या कागदपत्रांच्या तयारीला होत असतो व

त्यामुळे असले कागदपत्र तयार करण्याची जरूर भासेल त्यावेळी प्रथम शकावली व कुळकट शोधावी लागते, असे बेंद्रे सांगतात.[८५]

"या शकावल्या स्वंतत्र नसून एकाच प्रतीच्या नकला आहेत."[८६]

प्रत्येक शकावलीची रचना स्वतंत्र असती तर त्यात बरेचसे असंबंधित उल्लेख व बारीकसारीक टिपणे येण्याइतकी घराण्यांना स्वतंत्रपणे माहिती मिळणे फार दुर्घट दिसते. कदाचित या सर्व शकावल्या कुळकटींच्याचप्रमाणे बनल्या असत्या. शिवाय या शकावल्यांतील प्रसंग एक राजवाडे शकावली तर अगदी एकाच साच्यातील असून शब्दयोजनेतही भयंकर साम्य आहे. शब्दयोजना, प्रसंगाचा लेखक्रम व माहितीतील न्यानाधिक्याबद्दलचे दोष यांतील साम्य लक्षात घेतले की, या सर्व एकाच प्रतीच्या नकला असाव्यात असे अगदी स्पष्ट होते. राजवाडे शकावलीच्या शेवटी दिलेल्या टिपेवरून शकावलीपेक्षाही अधिक तिथीवर व संवत्सरयुक्त माहितीच्या टिपणीवर त्या लेखकांची योजना झाली असून त्याने ती 'यादी' तयार केली हे स्पष्ट आहे. अर्थात या यादीचे शकावल्यांशी तितके साम्य मिळणार नाही, परंतु त्यातील कित्येक प्रसंग शकावलीतील विस्तारांचे त्रोटक पुनर्लेखन आहे ही गोष्ट कोणाच्याही लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. आणि याच साम्यतेमुळे राजवाड्यांच्या यादीचा शकावलीत समावेश सहज होऊ शकतो. यावरून या शकावल्या स्वतंत्र नसून एकाच प्रतीच्या नकला आहेत असे स्पष्ट होत आहे.

(ब) शकावलीची मूळप्रत कोणती, कोणत्या घराण्यात व कोण्या व्यक्तीने लिहिली?:

ज्या अर्थी शकावल्यांचा उपयोग संभाजी व राजाराम यांच्या कारकिर्दीतील करिन्यांतही किंवा इतर पत्रांतही केलेला आढळतो, त्या अर्थी मूळ शकावलीचा रचनाकाल विवक्षित महिन्यांनी अगर वर्षांनी दर्शविता येत नाही. तसेच ज्याप्रमाणे नकला करूनही कोणत्या घराण्यांतील नकल आहे हे त्यात घातलेल्या त्या त्या घराण्यांच्या व्यक्तींच्या नामनिर्देशावरून स्पष्ट होते, तसे मूळ प्रत कोणातरी घराण्यात तयार झाली असेल असे समजण्यास मुळीच धागा सापडत नाही. उलट कोणाही घराण्याला इतक्या पिढ्यांची बारीक-सारीक दरबारी बातमी सहज मिळू शकेल हेही संभवनीय दिसत नाही. विशेषतः मूळ शकावलीतील शिवाजी व भोसले घराण्याच्या खासगी प्रसंगांच्या उल्लेखाचा विचार केला तर दोनच अनुमानांना जाग राहाते. एकतर ही शकावली खास भोसले घराण्यांनी तयार

केली असावी किंवा खास दरबारी दप्तरातील हा एक भाग असावा.[८७] नकलकारांच्या घराण्यांचा उल्लेख सोडून दिला तर या शकावल्यात फक्त भोसले घराणे व दरबारी प्रसंग यांचेच उल्लेख आढळतात. यावरून ती अन्य घराण्यासाठी अगर घराण्यांतील माहितीवर रचली आहे असे खात्रीने म्हणता येणार नाही. जर शकावली एखाद्या व्यक्तीने रचली असे म्हटले तर त्यातील कालमानाप्रमाणे दुबार रकान्यांतील प्रसंगांच्या विसंगत मांडणीचा उलगडा होत नाही. या दोषामुळेच आपणाला असे स्पष्ट होत आहे की, लेखकाला प्रसंगांची माहिती जशी मिळाली तसतशी ती नोंदली गेली. यावरून शकावलीचा रचनाकाल मर्यादित नसून अमर्यादित आहे असे स्पष्ट होते.[८८]

(क) शकावली लिहिण्यामागील हेतू :

शकावल्यांतील शके १५७५ किंवा सन १६५४ च्या पूर्वी प्रसंग अगदीच तुरळक असून संवत्सर मर्यादित आहेत. यावरून शकावलीच्या मूळ प्रतीच्या रचनेस केव्हातरी शके १५७५ किंवा इ.स. १६५४ नंतर सुरुवात झाली असावी तेव्हा त्या मूळ प्रतीच्या रचनेचा प्रारंभकाळ इ.स. १६५५ नंतरचा धरला व ही शकावली भोसले घराण्यातील किंवा शिवदरबारात तयार होऊ लागली असे मानले तर प्रश्न असा उद्‌भवता की हा रचना प्रारंभाचा काल कोणता व शकावली रचनेचा हेतू तरी कोणता असावा.

मुसलमानी रियासतीपासून तो थेट इंग्रजी अमदानीपर्यंत सर्व आवक व जावक पत्रांची बारनिशी होत असे. त्याचप्रमाणे रोजच्या खर्चाचा आढावा घेणे हीही पद्धत चालू होती. मुसलमानी अमदानीत तवारिखांवरून आत्मचरित्रवजा रोजनिशी अगर पातशहाच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या हकिगतीची टिपणे वेळचेवेळी मिळवून स्वतंत्र नोंद करून ठेवण्याची वहिवाट त्यावेळी चांगली रूढ होती. पूर्वी शहाजी महाराजांच्या आमदानीतही तिचा स्वीकार केला गेला असावा; परंतु तसे मानण्यास आज काही साधन उपलब्ध नाही. मात्र ही पद्धती इतर राज्यव्यवस्थेप्रमाणे शिवाजीने आपली राज्यव्यवस्था मुक्रर केली त्यावेळी उचलली यात शंका नाही. अर्थात राजा या नात्याने आपल्या राज्यातील जमीन-महसुल वगैरे बाबींची व्यवस्था करणे जसे जरूरीचे होते, तसेच निरनिराळ्या भागांतील राजकीय उलथापालथीचे टिपण करून तदनुरोधे मुलुखाचा व नवीन राजकारणाचा बंदोबस्त लावणे तितकेच महत्त्वाचे होते. तेव्हा अशी टिपणे करून ठेवण्याची पद्धती

चालू करणे शिवाजीला आपली राज्याची मांडणी होताच इष्ट वाटल्यामुळे आज आपण जिला शकावली म्हणत आहोत त्या राजकीय घडामोडींच्या कीर्दीस सुरुवात झाली. अर्थात अशा टिपणांचा हेतू फक्त कारकिर्दीचा आढावा मिळावा इतकाच असावा व रचनाकालास प्रारंभही इ.सन १६६२ च्या नंतरचा असावा. कारण याच सुमारास शिवाजीची अंतर्गत राजव्यवस्था कायम झाली.[८९]

(ड) शकावलीचा प्रसार कसा व का झाला ? :

या शकावलींचा प्रसार कसा व का झाला हे याचा जर थोडासा विचार केला तर या शकावलीच्या नकलांचा लेखनकालही ठरविणे फारसे कठीण जाणार नाही.

(१) शिवकालीन नवीन राज्याचा आरंभ झाल्याने गोताच्या साक्षीने गावाशिवांचे खटले तोडताना ज्या राजकार्यांवरून अगर स्वामिकार्यावरून न्याय मिळविण्याची अपेक्षा करावयाची ती सर्व राज्यकार्ये किंवा स्वामिकार्ये केवळ एकाच पिढीच्या काळात मर्यादित असल्याने अशा प्रकारची माहिती मिळविण्यासाठी अन्य साधनांची मदत घेणे जरूरी नव्हते.

(२) तसेच राज्यसंस्थापनेत हजीर तो वजीर किंवा काम मग दाम हाच न्याय चालू राहणे शक्य असल्यामुळे परंपरेच्या हक्काची तक्रार सांगण्यात फारसे हाशील होत नव्हते.

(३) मुलुखातही तेवढी स्थिरस्थावरता नव्हती; परंतु शिवाजी महाराजांनी सिंहासनावर चढून राज्याभिषेक करून घेताच हा काळ बदलला. आपले हक्क किंवा अधिक पारितोषिके मिळविण्याची प्रत्येकाला आशा लागली. शिवाजीच्या मृत्युनंतर व विशेषतः औरंगजेबाच्या सवारीने महाराष्ट्रात कित्येक भागांत पुन्हा अनिश्चित परिस्थिती भासू लागली. सोयराबाई व अनाजीपंतांच्या कारस्थानामुळे कित्येक शिवकालीन घराण्यांत तेढ उत्पन्न झाली व अनेक खटली उत्पन्न झाली. तेव्हा न्याय आपल्या बाजूला लागण्यासाठी आपल्या घराण्यातील पुरुषांनी शिवशाहीस केलेल्या मदतीची व शौर्यपूर्ण स्वामिकार्याची जंत्री देणे जरूर पडे. अर्थात आपल्या तर्फेचे तकरीरा करीन्यादी कागद तयार करिताना आपल्या घराण्याची त्या कागदपत्रांत नोंद करण्यासाठी त्यांना राजकीय घडामोडींची माहिती बिनचूक मिळविणे इष्ट असे व अशी माहिती बिनचूक मिळविण्यास केव्हाही मुसलमानी राज्यांतील तवारिखांप्रमाणे काहीतरी योजना दरबारी असणे साहजिक असे म्हणून ते उपरिनिर्दिष्ट राजकीय घडामोडींच्या

खतावणीकडे धाव घेत. अर्थात ज्याकाळी अशी माहिती गोळा करावी लागे त्या कालापर्यंतचीच नक्कल ते करून घेत व आपली आजची ह्या घराण्यांतील शकावली तेथेच विराम पावे अर्थात या विरामावरून आपल्याला त्या शकावलीच्या नकलेच्या लेखनकालाचा निर्णय करिता येतो. प्रथम प्रथम जरी मूळ किर्दीवरून नकल करून घेण्याचा प्रयत्न झाला असला तरी नंतर नकलेवरून नकला होणे साहजिक आहे. यावरून या शकावल्यांची जोपासना कोणत्या हेतूने व सहेतूक कशी आली हे वा. सी. बेंद्रेंनी येथे स्पष्ट केले.[१०]

(इ) शकावलींचे परीक्षण करतेवेळी घ्यावयाची काळजी :

(१) माहिती कळविणाऱ्या अगर ती संकलित लिहून ठेवणाऱ्या माणसांकडून नावांतील वर्णनात वगैरे हस्तदोष इतर शब्दलोप अगर मुसलमानी वगैरे नावाबद्दलच्या अज्ञानामुळे त्या नावातील वर्णन्यासात काही दोष या शकावल्यात शिरले आहेत. तसेच एखाद्या सरदाराचे अगर राजाचे नाव देणे वगैरे ते टोपणनावाने देणे वगैरेही दोष दृष्टिस पडतात. परंतु हे दोष कोणत्याही काळी घडणारे व सामान्य असतात. अर्थात अशाप्रकारचे दोष दृष्टिस पडल्याने या किर्दीची बिनचूकपणाची योग्यता मात्र कमी होत नाही. हे जरी खरे असले तरी संशोधकाने असल्या चुका सुधारून शुद्ध प्रतच तयार केली पाहिजे, असे वा. सी. बेंद्रे सुचवितात.

(२) मूळ प्रतीत किंवा असल्या किर्दीच्या लेखनात एक चूक राहण्याचा संभव असतो. ती चूक म्हणजे एखाद्या शकाच्यानंतर त्या शकातील मजकूर लिहून आल्यास व असल्या मजकुराचा कालनिर्देश नंतर 'एका महिन्याने' वगैरेसारख्या मोघम शब्दांत लिहून आला असला व हे टाचण तितके नीट काळजीपूर्वक उतरून न घेतले गेले तर ती नोंद दुसऱ्या अगर नंतरच्या शकात जाणे साहजिक असते. अर्थातच असल्या दोषांमुळे त्यावरून नक्कल करणाराचा उद्देश न पटल्यामुळे ते दोष अधिकच विपर्यस्त झालेले आहे, असे वा. सी. बेंद्रे येथे नमूद करतात.

ज्या दोषांचा वर विचार केला ते मूळ प्रतीतील दोष आहे हे निश्चित म्हणता येणार नाही. मूळ प्रत पाहिल्याशिवाय असे म्हणताही येणार नाही, असे वा. सी. बेंद्रे सांगतात. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे शकावलीत सामान्यतेने आढळणारे गुणदोष कसोटी लावून कसे सुधारावयाचे याचे स्पष्टीकरण झाल्यानंतर प्रत्येक व्यक्तिशः नकलेत किंवा नकलेवरून केलेल्या नकलेत

कोणत्या रितीने चुका घडून येतात व शोधानंतर त्या कोणत्या मार्गांनी सुधारता येतात किंवा येणे शक्य असते. याचा विचार करतांना बेंद्रे पुढे लिहितात की, नकलाकारांचे हस्तदोष दोन प्रकारचे आहेत.

(१) मोडी लिपीचे वाचन चुकीचे केल्यामुळे किंवा दिलेल्या नोंदीचा मूळ अर्थ न समजल्यामुळ अर्थविपर्यासनाचे एखादे अक्षर अगर शब्द बदलल्याने दोष घडून येतात;

(२) दुसरे म्हणजे लिहितांना सहज अजाणतेपणी हस्तदोषाने एखादा शब्द, वाक्य अगर ओळ गाळण्याने अगर एखाद्या शब्दाबद्दल नजरचुकीने चुकीचा शब्द लिहिण्याने दोष घडून येतात. कित्येक आधुनिक नकलकारांनी जुनी भाषा काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळे असल्या नोंदीत बराच अर्थविपर्यास होऊन मजकूर लिहिलेला आढळतो.

सारांश, वर सांगितल्याप्रमाणे दोन्ही प्रकारच्या घडून येणाऱ्या चुकांचे शुद्धीकरण आपणाला आतील अनुमानिक अगर तदवलंबी मजकुरावरून करिता येण्यासारखे असते. 'व', 'द', 'ह', 'क', 'ल', 'व' इत्यादी समवळणी अक्षरवाचनाच्या चुका संदर्भावरून तेव्हाच शुद्ध करिता येतात. अक्षर, शब्द अगर संबंध ओळ अगर वाक्य गळले असेल तर ते दुसऱ्या नकलेवरून भरून काढता येते. तिथी, वार, पक्ष, मास, शक व संवत्सर यातील हस्तदोष गणिताच्या साह्याने दूर करिता येतात. एखाद्या शकातील प्रथम अगर शेवटचे कलम नजरचुकीने पूर्वीच्या अगर नंतरच्या शकांत घुसडले गेले असेल तर त्या नोंदीचा शक मागे अगर पुढे होतो तो गणिताच्या प्रमाणाने अगर प्रत्यंतर पुरावा पाहून सुधारता येतो. या चुका विशेषतः एखाद्या शकाच्या पौष-फाल्गुनादी एकदोन महिन्यांतील नोंदी प्रथम येऊन त्यानंतर प्रथमचे चैत्र वैशाखादी महिने आले असले तर होतात. नकल करताना हे या शकाचे शेवटचे महिने पूर्वील शतकातील असे समजून लेखन केले जाते किंवा एखाद्या शकाचे चैत्रादि प्रथम महिने शेवटी आले असले म्हणजे या प्रथम महिन्याच्या नोंदीनंतरच्या शकाखाली घालण्याचा नकलकारांना मोह पडतो. अशाप्रकारे नकलांतून वगैरे लेखदोष दृष्टिस पडतात.[११]

२० व्या शतकांतील माणसांना घोटाळ्यात घालणारे काही विशेष १६-१७ व्या शतकांतील लेखनात पाहावयास सापडतात. ह्या लेखनपद्धतीतील काही प्रकार बेंद्रेंनी पुढील प्रमाणे दिले आहेत.

एखाद्या बाबींची नोंद करताना जेव्हा तदनुषंगिक परंतु तत्पूर्वी घडलेल्या एका अगर अधि बाबींची नोंद करावयाची असते तेव्हा ती 'ऊन' प्रत्ययात धातुरूपी योजून नंतर या बाबींपुढे मुख्य बाब दिलेली असते. परंतु या सर्व बाबी एकाच कार्याच्या भागमात्र असतात. अर्थात ज्या तिथीपुढे अशी माहिती दिलेली असते त्यातील मुख्य बाबीचा त्या तिथीशी संबंध धरावयाचा असतो व 'ऊन' प्रत्ययान्त धातुरूपाने दर्शित केलेल्या बाबी तत्पूर्वी घडल्या असे समजावे. नोंद करताना ज्यावेळी दोन अगर अधिक बाबी स्वतंत्र परंतु एकमेकांशी संबंधित असून एकाच तिथीला अगर मितीला घडल्या असे दाखवायचे असते, तेव्हा 'ते समई', 'तेव्हा' यासारखी क्रियाविशेष योजून, संबोधित परंतु स्वतंत्र बाबी दर्शविल्या जातात. जर एखाद्या गोष्टीचे विवेचन करिताना नंतर घडलेल्या तत्कार्यासंबंधीही बाबी सांगणे जरूर किंवा इष्ट वाटल्यास 'मग', 'नंतर', 'उपरी' इत्यादी शब्दांचा उपयोग केला जातो. अर्थात ज्या तिथीला ही नोंद केलेली असते त्या तिथीशी मुख्य बाबीचा संबंध असून 'मग', 'नंतर' वगैरे पुढे येणारी कलमे त्या तिथी नंतरची आहेत असे समजावे. एकाच तिथी अगर मितीपुढे येणाऱ्या स्वतंत्र बाबींची नोंद करतांना या बाबींतील स्वतंत्रपणा दर्शविण्यासाठी या बाबतीतील प्रत्येकी पुढे '१' हा आकडा घातलेला असतो. तसेच एखाद्या नकलेत चूक अगर दुरुक्ती असेल तर या नकलेवरून दुसरी नक्कल करून घेताना नकलकार ती न सुधारता तशीच घेऊन तिच्यापुढे तो 'रुजू' हा शब्द लिहितो.

आणखीही शकावलींच्या पुष्कळ नकला मिळू शकतील या शकावल्यांचे लेखन तिथीवार केलेले नसते. प्रत्येक शकाखाली दिलेल्या मासाच्या संगतीतही अनुक्रम नसतो. त्यामुळे या शकावल्यांचा उपयोग इतिहासात जितका सहजपणे करता यावा तितका तो करिता येत नाही. म्हणून या सर्व शकावल्या मिळवून व नीट तपासून त्यातील सर्व नोंदी एकत्र जुळवून टीपांसह व इंग्रजी तारखांसह डापणे जरूरी आहे, असे वा. सी. बेंद्रे सुचवितात.[१२]

२६ (ब-१०) कुळकटी, वंशवेली व बाडे :

इतिहासप्रसिद्ध घराण्यांतून कुळकटी म्हणजे कुलेतिहासाची टिपणे करून ठेवलेली आढळतात. कुळकटी व वंशावल्या फक्त कुलेतिहास रचन्यांच्या व क्वचितप्रसंग अशा माहितीचा घरगुती कथल्यांत उपयोग करण्याच्या उद्देशाने लिहिल्या जातात. यातील हकीकत घराण्यापुरतीलच

मर्यादित असते. त्यात कर्तृत्ववान पूर्वजांनी काय केले हेच सांगितलेले असते. या कुळकटीत किंवा वंशवेलीत पिढी दर पिढीला भर पडत जाऊन यात अगदी हयात पिढीपर्यंतची हकीगत लिहून ठेवायचा प्रयत्न केला जातो. यातील काही माहिती अगदी अस्सल कागदपत्रांवरून अगर अव्वल पुराव्यांवरून घेतली जाते. परंतु त्यांतील बराच भाग कुलांतील परंपरेच्या माहितीवरूनच दिला जातो. वंशवेलीतून फारशी घालमेल होण्याचा संभव नसतो. कधी कधी शाखा तोडल्या जातात इतकेच. कित्येक वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याचा असतो. परंतु शिवकालीन बऱ्याच वंशवेली उजवीकडून डावीकडेच लिहिलेल्या आढळतात. विशेषतः हा क्रम मावळी भागात व देशावरचा आहे. वंशवेलीतील नांवे तीच तीच येत राहिल्याने क्वचितप्रसंगी नकल करतांना मधलाच भाग सुटून गेलेला असतो. मोठमोठ्या नामांकित घराण्यांच्या वंशावळींना अगदी ब्रम्हापासून सुरुवात झालेली आढळते. यांतील नावाचा पहिला क्रम पुराणांवरून घेतलेला असतो.

वंशवेलीतून बऱ्याच व्यक्तींची किंवा त्यांतील मुख्य व कर्तृत्ववान व्यक्तिचाही जन्म अगर मृत्यु तारीख देण्यात येत नसे. कित्येक वेळा या वंशवेली बऱ्याच अपूर्ण असतात. यातील सहवासात पिढ्यांची हकीगत बहुधा बरोबर असते. परंतु त्या पूर्वीची हकीगत जर मागील विश्वासार्ह टिपणावरून घेतली गेली नसेल तर बरीच नावे सुटली जातात व त्यामुळे बऱ्याच पिढ्या तुटतात.[१३]

कुळकटी वंशवेलीप्रमाणे घराण्यात तयार करीत नसत. तसे करण्याची जरूरही नसे. घराणे इतिहासप्रसिद्ध असेल तर घराण्यांत कुळकट तयार करण्यास येई. अशी कुळकट तयार करतांना परंपरेची व दप्तरांत असलेली सर्व माहिती जमेला धरली जाई. यामध्ये प्रत्येकाने राजकार्य अगर विशिष्ट कार्य कार्य केले, ते केव्हा व कसे केले वगैरे संदर्भात माहिती दिली जात असे; परंतु प्रसंगवर्णन करताना काळाचा निर्देश करण्याची त्यांना आवश्यकता वाटलेली नसावी असे वा. सी. बेंद्रे सांगतात. क्वचितप्रसंगी काळाचा उल्लेख केलाच तर मग तो तीर्थयात्रेचा किंवा जन्ममृत्युचा होय. म्हणून कुळकटी व बखरी प्रामाण्याच्या दृष्टिने जवळ जवळ एकाच दर्जात येतात.

कुळकटी एकाच घराण्याला मर्यादित असतात व त्यांचे लिखाण त्याच घराण्यात व परंपरेच्या माहितीवर केलेले असल्यामुळे त्यांत फारशी सरभेसळ होण्याचा संभव नसतो व त्यास कागदपत्रांतील माहितीही उपलब्ध असण्याचा संभव असतो. यामुळे या कुळकटींना बखरीपेक्षा

अधिक महत्त्वाच्या मानाव्या लागतात. कुळकटीचे लेखन बऱ्याचवेळा राजाच्या अगर एखाद्या सरदाराच्या कानावर हकीकत घालण्याच्या उद्देशाने केलेले असावे असे दिसते. केवळ कुळाची कथा लिहून ठेवणे इतकाच काय ती अशा लेखनात हेतू नसतो.[१४]

वरील सर्व साधनांतील माहिती तृतीय दर्जाची आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतांना लिहितात की, सर्व साधने प्रत्येकजन आपापल्या उपयोगासाठी करीत असल्याने त्यातील खरेखोटेपणा लिहिणाराच्या एकट्याच्याच साक्षीवर अवलंबून राहतो. त्याच्या लिहिण्यातील चुका दूर करण्याचे अगर त्यांचे लिहिणे तपासून दुरुस्त करण्याचा फारसा प्रसंग येत नाही. विशेषतः जे लिहिले जाते त्याला आधार दिलेला नसतो. त्यामुळे अशा माहितीवर सर्वस्वी अवलंबून तिचा इतिहास रचनेस उपयोग करणे तितके सुरक्षित नसते. शिवाय या साधनांचा नक्की लेखनकाल कोणता हेही सांगणे मोठे कठीण जाते. कारण त्या साधनांत पिढी दर पिढीस भरच पडत असते.[१५]

२६ (ब-११) बखरीच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

बखरीचे लेखन उत्तर काळात झालेले आहे. यात फक्त परंपरेने आलेली माहिती ग्रंथित करण्याचा प्रयत्न झाला आहे. अशा माहितीच्या परंपरा अनेक असून त्यांतील जी लेखकाला योग्य वाटली तिचाच त्याने स्वीकार केला आहे. बाकींच्याचा त्याने परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला नाही. कोणाही बखरकाराला अस्सल कागदपत्रांचा संग्रह पहावयास मिळाल्याचे दिसून येत नाही. क्वचितप्रसंगी खासगत-सरकारी नव्हे एखादे पत्र उपलब्ध झाले असले तरी त्याचा उपयोग परंपरेच्या माहितीपुढे करण्याचे धाडस त्याकाळातल्या लेखकाला नसणे साहजिकच होते. त्यांनी परंपरने आलेल्या माहितीलाच विशेष प्राधान्य दिलेले आहे. क्वचित ठिकाणी काही घराण्यातील कर्तृत्ववान व्यक्तींची माहिती असल्या तुटपुंज्या कागदाच्या आधाराने बखरीत देण्याचा मात्र प्रयत्न केलेला दिसतो.

बखरीतील जे काही कालनिर्देश आढळतात ते बहुधा अद्‌भुत अशा वाटणाऱ्या प्रसंगांचे किंवा जन्ममृत्युंचे परंतु अद्‌भुत माणसांचे जन्मही विशेषच दिवसाला झाले पाहिजेत हीही कल्पना रूढ असल्याने नक्की तिथी माहीत नसल्यास अक्षयतृतीया, रामनवमी, कृष्णाष्टमी अशा अवतारी पुरुषांच्या जन्मतिथीच देण्यात येत. म्हणून बखरीतील जे थोडे कालनिर्देश असतात ते चुकीचे

ठरतात. तसेच एखादी तिथी दिली व त्यानंतरची शेवटची मृत्युतिथी माहित असली म्हणजे मधातील संविधानकाला बेरीज-वजाबाकीने कालमर्यादा दिली जाते. जेव्हा अशी ताळेबंद कालमर्यादा देण्यात येते तेव्हा अशी ताळेबंदीचा प्रथम व शेवटचा तिथीचा पुरावा म्हणून केव्हाच सांगता येणार नाही. कारण मधली ताळेबंदी लेखकांनी बसविलेली असते. ती स्वतंत्र पुराव्यावरून दिलेली नसते. सारांश, बखरीचे लेखन जितके शास्त्रशुद्ध व साधार व्हावयास पाहिजे होते तितके ते झालेले नाही. म्हणून या बखरींना प्रामाण्याच्या दृष्टिने चतुर्थ म्हणजे शेवटच्या दर्जात टाकणे भाग आहे, असे बेंद्रे येथे आपल्याला आवर्जुन सांगतांना दिसतात.

सभासद बखर (इ.स. १६९७), चित्रगुप्त बखर (सभासदीचा अनुवाद) (इ.स.१७५९), रायरी बखर (इ.स. १७०२), ९१ कलमी बखर (इ.स. १७०२), ९० किंवा ९१ कलमी बखर (इ.स. १७०२), तारीख-इ-शिवाजी, चिटणिस बखर - शिवाजी किंवा सप्तकर्णात्मक चरित्र (इ.स. १८१०), चिटणिस बखर - संभाजी (इ.स. १८१०), चिटणिस बखर - राजाराम (इ.स. १८१०), मराठी साम्राज्याची छोटी बखर (इ.स. १८१७), शिवदिग्विजय (इ.स. १८१८), शिवाजीप्रताप (इ.स. १८२९), शेडगांवकर बखर (इ.स. १८५४), बुंदेल्याची बखर (इ.स. १९१८).

वरील बखरीतील सभासदी, चिटणिशी व कलमी बखरी बऱ्या आहेत. छोटी बखर माहितीपूर्ण आहे परंतु शेडगांवकर बखर व शिवदिग्विजय अगदीच टाकऊ असून बनावट भारुडांनी भरलेल्या आहेत, असे बेंद्रे सांगतात.[९६]

कोणत्याही बखरीची मूळप्रत मिळाली तरच तिच्यातील वैगुण्य लेखकाच्या माथी मारता येते. चिटणिशी बखरीखेरीज कोणत्याही बखरीची मूळप्रत उपलब्ध झालेली नाही. इतकेच नव्हे तर सभासदी व कलमी बखरीखेरीज इतर बखरींच्या एकापेक्षा अधिक नकलाही ताडून पाहण्यास अद्याप मिळालेल्या नाहीत. सभासदी बखरींच्या ३-४ प्रति रा. ब. साने यांनी तपासून त्यांतील स्पष्ट व चांगल्या प्रतीचांच स्वीकार केलेला आहे. रा.य.रा. गुप्ते यांनीही एक सभासदीची प्रत मिळविली आहे. त्या सर्वांच्या परीक्षणावरून असे स्पष्ट होत आहे की, या नकलांतून मूळ प्रतीच्या लेखनानुक्रमांतही बराच फेरबदल केलेला आहे. कित्येक प्रसंगांतील मजकूर अधिक वाटतो व तो देण्याचा क्रमही निराळा असलेला आढळतो. खरे म्हटले तर सभासदीच्या लेखनकाली प्रसंगाच्या

क्रमाबद्दल विस्मृती होण्याइतका काल लोटून गेला नव्हता; परंतु उपलब्ध प्रतीतील क्रम मात्र कालाच्या दृष्टिने चुकीचा आहे यात शंका नाही. परंतु या निरनिराळ्या प्रतींचे परीक्षण करितांना हा क्रम सुधारता येतो. त्या अर्थी असे अनुमान काढण्यास हरकत दिसत नाही की, कदाचित मूळ प्रतीची नकल जितकी बिनचूक व्हावी तितकी झालेली नसून आता ज्या प्रती उपलब्ध होत आहेत त्या तितक्या विश्वसनीय नाहीत. मूळ प्रतींच्या अभावी बऱ्याच नकला मिळवून त्यावरून मूळ पट शोधून काढण्याचा प्रयत्न करणे एवढाच काय तो राहिला आहे. असे झाल्यास ही सभासदी बखर तत्कालीन परिस्थितीची बरीच विश्वसनीय माहिती देऊ शकेल यात शंका नाही.

चित्रगुप्त बखर हा सभासदीचा अनुवाद असून तोही अर्ध्या शतकानंतरचा आहे. यावरूनही मूळ सभासदीचा क्रम त्यावेळी जो चित्रगुप्ताला उपलब्ध होता तो राहिला नसल्याचे काही ठिकाणी स्पष्ट होत आहे. रायरी बखर, ९१ व ९२ कलमी बखरी व तारीख इत्यादी शिवाजी ह्या एकाच बखरीच्या नकला आहेत. नकलेत मात्र थोडेबहुत फेरबदल आढळतात; परंतु ते फार क्षुल्लक आहेत. ह्या बखरीतील लेखनक्रम पुष्कळ अशी युक्त आहे. मात्र दोन तीन ठिकाणी क्रम सुटला आहे;परंतु ही चूक नकलकारंची आहे किंवा मूळ प्रतीतील आहे हा प्रश्न आहे. चिटणिस बखरीतील माहिती परंपरेवरून दिलेली असून बरीच अधिक आहे; परंतु बखरीच्या लेखकाला परंपरेच्या माहितीत बराच विपर्यास वगैरे येण्याइतका कालही लोटला होता व निरनिराळे प्रसंगही घडून गेले होते.

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत बरीच माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. शिवदिग्विजयात इतर बखरींना माहिती असलेले कित्येक प्रसंग दिलेले नसून काही गोष्टींचा पाल्हाळ लाविला असून बखरीची मांडणी अगदीच कथेकरी थाटाची आहे. शिवाजी प्रताप ही बखर उत्तरकालीन असल्याने त्यात पूर्वीच्या बखरीपेक्षा सुसंगतपणा असणे शक्य नव्हते. शेडगांवकर बखर लिहिणारा मनुष्य अगदीच अडाणी दिसतो. त्याला आपण काय लिहितो हेच समजत नाही. बुंदेल्यांच्या बखरीत मराठ्यांचा उल्लेख आला आहे इतकेच. ती बखर लिहिण्याचा उद्देश मराठ्यांचा इतिहास देण्याचा नाही. अर्थात यातील माहिती ऐकीव आहे व बरीच चुकीचीही आहे.

अशाप्रकारे वा. सी. बेंद्रे मराठ्यांच्या इतिहासाची संबंधित बखरींचे परीक्षण करतात.[१७]

शिवाजी महाराजांच्या इतिहासात बखरकारांची गडबड उडण्याची कारणे बेंद्रेंनी खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

(१) शिवाजी महाराजांनंतर लागलीच चरित्रलेखनास सुरुवात करता येण्याइतकी स्थिरता नव्हती.

(२) शिवाजी महाराजांच्या वेळची दप्तरे व घराणी यांचा नाश झाला होता.

(३) शिवाजीच्या हालचाली अत्यंत शीघ्रतेने झाल्या.

(४) एकाच ठिकाणी एकाच स्वरूपाचे एकापेक्षा अधिक प्रसंग घडल्यामुळे काहींनी तपशीलांत अदलाबदल केली. काहींनी तो सर्व एकच असे समजून चरित्ररचना केली.

(५) शिवाजीने लढाऊ हालचाली एकापेक्षा अधिक जागी व शत्रुंशी एकाच वेळी चालू ठेवल्याने एका बाजूच्या लढाईनंतर दुसऱ्या बाजूची लढाई वर्णन करण्याच्या क्रमांत कालनिर्देश न करता आल्यामुळे प्रसंगाच्या तपशीलांचा घोटाळा उडाला.

(६) कोणते सरदार कोठे होते हे नक्की माहीत नसतांना केवळ सरदारांच्या यादीवरून दर वेळी यादी देण्यात आली. मुसलमानी सरदारांची अधिकारपरत्वे एकच नावे राहिल्यामुळे कोणता प्रसंग बापाच्या व कोणता प्रसंग त्याच्या मुलांच्या आमदानीत घडला हे त्यांना समजले नाही.

(७) कोणता मुलूख कोणाकडे होता याचीही चांगली कल्पना त्यांना नव्हती.

(८) मोगल, आदिलशाह व कुत्बशाह यांचे शिवाजीची हितसंबंध कस कसे बदलत गेले हे न समजल्यामुळे कित्येक प्रसंगांची त्यांना समजूत पडली नाही.

(९) शिवशाहीकालीन राजकीय परिस्थितीत एकसारखा फरक होत गेल्याने त्यावेळच्या परिस्थितीची चांगलीशी कल्पना त्यांना नव्हती.

(१०) स्वतंत्रपणे हालचाली करणाऱ्या मोरोपंतादी सरदारांच्या कामगिरीची वगैरे हकिगत उपलब्ध नव्हती.

(११) चरित्र-लेखनात मुख्यत्वे करून प्रसंगवर्णन करण्याकडेच अधिक प्रवृत्ती होती.

(१२) दंतकथेच्या परंपरेत खंड पडण्यास राज्यांतील व राज्यपद्धतीत अनेक फरक झाले होते.

अशाच तऱ्हेची आणखीही काही बारीक-सारीक कारणे घडून आल्यामुळे बखरकारांना शिवाजीच्या चरित्राचे मर्म व वृत्त चांगलेसे अवगत करता आले नाही; परंतु जे काही प्रसंग वर्णन

केले गेले त्यांतही अधिक विसंगतपणा व कालानुक्रमाच्या चुका ह्या बखरीचे प्रकाशन करतांना शिरलेल्या आहेत, असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

प्रकाशनाच्या प्रसंगी ज्या चुका झाल्या आहेत त्यांची मुख्ये कारणे खालीलप्रमाणे वा. सी. बेंद्रे देतात.

(१) प्रकाशनाच्यावेळी एकच प्रत उपलब्ध असल्याने व प्रकाशसमयी शिवशाहीची तपशीलवार माहिती उपलब्ध नसल्याने शब्दांचे, वाक्यांचे व कलमांचे परिच्छेद चुकीचे पाडले गेले.

(२) कित्येक शब्दांचे वाचन चुकीचे केले गेले. त्यामुळेही काही शब्द परिच्छेद चुकीचे पाडले गेले.

(३) एकापेक्षा जेथे अधिक नकला उपलब्ध होत्या तेथे मूळ प्रतीचे वाचन शोधण्याचा प्रयत्न झाला नाही. ज्या प्रतीचा चांगला अर्थ लागला तोच पाठ गृहीत धरला गेला.

संभाजीच्या चरित्रात तर यांनी फार गोंधळ केला आहे. अगदी वस्तुस्थितीला सोडून मजकूर लिहिला गेला. याचे मुख्य कारण एकच होते ते हे की, शिवाजीनंतर राज्य गेले व राजारामांनी मिळविले ही कल्पना. परंतु राज्य संभाजी पकडल्यानंतर गेले याची कल्पनाच बखरकारांना नाही. त्यामुळे त्यांनी अगदीच विपर्यस्त तपशील देऊन संभाजीबद्दल फारच चुकीची अनुमाने काढली आहेत.[१८]

(अ) बखरी महत्त्व :

बखरीत जरी काही अतिशयोक्तीचा व अविश्वसनीय भाग शिरला असला तरी त्यांना साधन या दृष्टिने महत्त्व आहे. प्रामाण्याचा दर्जा मात्र शेवटचा लागतो हे खरे. या बखरीत आपलेपणाने लिहिलेला मजकूर आढळतो त्यामुळे फारसी ग्रंथकारांच्या विरुद्ध बाजूची मनोभूमिका काय होती हे यावरून चांगले समजते. शिवाय या बखरींचा उपयोग इतिहास रचनेला मार्गदर्शक किंवा पोषक करण्याइतका या बखरीतून इतिहासाचा परंपरेने आलेला धागा हाती लागू शकतो. परंतु बखरीचा उपयोग इतिहासात काही विवक्षित मर्यादेपुरताच करावा लागतो व यातील मजकुराला इतर साधनांपेक्षा पुरावा म्हणून बराच गौण समजावा लागतो. बखर जितकी समकालीन असेल तितके तिला प्रामाण्य अधिक प्राप्त होते आणि मूळ बखरीत तिच्या नकलेपेक्षा बरेच कमी दोष असू

शकतात. याकरिता मूळ प्रत शोधून काढणे इष्ट असते. मूळ प्रत न सापडल्यास जितक्या प्रती सापडतील त्यावरून मूळ पाठ शोधून काढण्याचा प्रयत्न करावा. मूळ पाठाचे वाचन करताना त्यातील लेख्काचा मुख्य हेतू कोणता, लेखकाचे लेखनाचे प्रघात, तत्कालीन भाषा, प्रचार, तत्कालीन वर्णन करण्याची शैली वगैरे सर्व लहान-सहान बाबी लक्षात घेऊन बखरींचे वाचन करावे व परिच्छेद पाडावेत. असे केल्यास तत्कालीन ऐतिहासिक प्रसंगांबद्दलच्या समजुतींची खरी कल्पना येऊ शकेल व बखरींचा साधन या दृष्टिने इतिहासरचनेत उपयोगही करणे सोपे जाईल. मात्र बखरीतील मजकुराला इतर अस्सल व अव्वल पुराव्याच्यापेक्षा अधिक किंवा बरोबरीनेही प्रामाण्य देता येणार नाही; परंतु बखरींसारख्या साधनांच्या आधारेच इतिहासाची संगती जुळविणे सोपे जाते हेही विसरून चालणार नाही, असे बेंद्रे निदर्शनास आणून देतात.[९९]

२६ (ब-१२) पोवाडे व काव्ये :

शिवशाहीकालीन पोवाडे फारच थोडे उपलब्ध आहेत. तशीच शिवाशहीवरील काव्येही फारच थोडी उपलब्ध आहेत. जे पोवाडे उपलब्ध झालेत ते शालीग्राम व आकर्थ यांनी छापून काढलेले आहेत. पोवाडे रचणारे स्वत:ला शाहीर म्हण्वीत व ठाकूर जातीचे भाट स्तुतिपर काव्ये रचने हाच आपला जातिधर्म आहे असे समजत. शाहीर बहुधा गोंधळी जातीतील असत. शहाजी, शिवाजी, संभाजी वगैरे पदरी बरेच कवी वगैरे होते. त्यातच काही भाट होते. परंतु हे भाट नेहमी हिंदी भाषेत काव्यरचना करीत. कित्येक भाट म्हण्जे ठाकूर इकडेच येऊन राहिल्याने ते मराठीच काव्य करू लागले होते. यांची कविता जितकी उपलब्ध व्हावी तितकी ती झाली नाही. ठाकूर जातीचे लोक आजही महाराष्ट्रात राहत असून त्यांच्याकडे शिव-संभाजीकालीन काव्ये सापडू शकतील असे बेंद्रे सांगतात; परंतु ह्या भाटांना लिहिता येत असल्याने यांची काव्ये सुरक्षित कोठे तरी जोपासली गेल्याची शक्यता वाटते.[१००]

शाहिरी पोवाड्यांची मात्र तशी स्थिती नाही. गोंधळी शाहीर बहुधा निरक्षर असल्याने त्यांची काव्यनिष्पती जी काही परंपरेने चालू राहिली तेवढीच. असे असतांना शिवशाहीत शाहिरकाव्येच निर्माण झाली नाहीत असे नाही. उलट अगदी एखादा शौर्याचा प्रसंग घडताच मजालसीत शाहिरांनी पोवाडा रचून म्हटल्याचे उल्लेख आहेत. यावरून असे अनुमान काढण्यास हरकत नाही की,

शिवकाळात पोवाडे बरेच रचले गेले असतील; परंतु ते पोवाडे म्हणून दाखविणारे परंपरेचे शाहीर आज आपणास मिळत नाहीत. कदाचित गोंधळी लोकांत तर अधिक प्रयत्न केला तर काहीतरी निष्पती होऊही शकेल. प्रयत्न झाला पाहिजे असे वा. सी. बेंद्रे येथे सुचवितात.[१०१]

पोवाड्यांची चिकित्सा करतांना बेंद्रे लिहितात की, पोवाड्यात पाठभेद सहज व चटकन होऊ शकतात. पोवाड्यांची चालच इतकी सुलभ आहे की, त्यात वाटेल तो शब्द घालता येतो. सारांश, संस्कृत व इतर काव्ये जितकी निर्भेळ राहू शकतात. तितके पोवाडे राहू शकत नाहीत. कित्येक चौक विसरले जातात व कित्येक नवे प्रचारात येतात. परंपरेचा अभिमान मात्र या शाहिरांत जागृत असल्याने पोवाडे परंपरेने म्हणण्याचा व कायम टिकविण्याकडे या शाहिरांचा नेहमी कल असे. त्यामुळे मूळ पोवाड्यात एकदम व सहज फरका घडवून आणला जात नसे इतकेच किंवा पाठभेद.

२६ (ब-१३) ऐतिहासिक म्हणी व वाङ्मयासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

एखादा विशिष्ट प्रसंग घडला आणि त्याचा लोकांवर चांगलाच परिणाम झाला की, त्या अनुरोधे एखादी तरी म्हण प्रचारात येते. तो प्रसंग जितका संस्मरणीय असतो तितकी ती म्हण प्रचारात अधिक कालपर्यंत टिकते. शिवकालीन प्रसंगांच्या काही म्हणी अद्यापही रूढ आहेत. जसे- गनिमी कावा, कल्याण, चतुर साबाजी, होता जिवा म्हणून वाचला शिवा इत्यादी परंतु जसजसा काल लोटतो तसतसा सामान्य जनांना त्या प्रसंगाबद्दल विसर होतो व म्हणी टिकविण्याची जी तोंडी परंपरा असते तिच्यातही खंड पडतो. पेशवेकालीन कित्येक म्हणी सध्या प्रचारात आहेत. त्यांचाही विचार केला तर पेशवे उत्तरकालीन म्हणीच अधिक उपयोगात आणल्या जात आहेत. ज्या ऐतिहासिक म्हणींचा प्रसार सर्वत्र झालेला असतो त्यांतील ऐतिहासिक अभिप्राय सर्वांनाच ठाऊक असतो. परंतु ज्या म्हणी एखाद्या गावात अगर लहानशा भागातच स्थानिक महत्त्वामुळे प्रचारात असतात, त्याचे मात्र शोधकार्य अधिक झाले पाहिजे असे बेंद्रे सांगतात.[१०२]

म्हणींच्या महत्त्वासंदर्भात बेंद्रे सांगतात की, म्हणींचा मूळ विषय नेहमीच दंतकथेवरून बरोबर समजतो असे नाही. परंतु शोधाअंती काही तरी नव्या प्रसंगाचा बोध होऊ शकतो. ऐतिहासिक म्हणींचा प्रचारातील भावार्थ कित्येक वेळा अगदी विरोधी स्वभावाचाही आढळून येणे शक्य असते. म्हणून ऐतिहासिक म्हणींचा उपयोग फक्त नवीन प्रसंगाचा छडा लावण्यापुरताच करावा लागतो. जे

प्रसंग ज्ञात झाले असतील त्या प्रसंगाचे म्हणींच्या रूढ अर्थावरून अधिक परीक्षण करण्याच्या योग्यतेचे ऐतिहासिक म्हणी हे ऐतिहासिक साधन महत्त्वाचे नसते. ऐतिहासिक म्हणींवरून एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचा परिणाम कोठपर्यंत झाला होता हे आजमावता येते. वाङ्मयाविषयी वा. सी. बेंद्रे लिहितात की, कोणत्याही काळात जे वाङ्मय निर्माण होते त्या वाङ्मयनिर्मितीत तत्कालीन सामाजिक सर्वांगीण परिस्थितीचा ठसा उमटलेला स्पष्ट दिसून येतो. तत्कालीन राजकीय परिस्थितीकडे सामान्य जनता कोणत्या सापेक्ष दृष्टिने पाहात होती याचा त्या वाङ्मयावरून छडा लावता येतो. तत्कालीन कर्तृत्ववान व्यक्तिंच्या हालचालीकडे स्थानिक सुज्ञ माणसांची कोणती प्रवृत्ती कलत होती याचा या वाङ्मयावरून कयास बांधता येतो. अधिष्ठीत राज्यसत्तेच्या विरूद्ध प्रजेचा बरावाईट झालेला गृह याच वाङ्मयावरून समजू शकतो.

सारांश, ऐतिहासिक प्रसंगाच्या बऱ्यावाईटपणाचा निर्णरू करण्यास जी मुख्य कसोटी म्हणजे जनतेची प्रवृत्ती समजावी लागते ती या सामान्य प्रकारच्या म्हणजे ऐतिहासिक वाङ्मयाव्यतिरिक्त वाङ्मयातच सापडू शकते; परंतु असले वाङ्मय म्हणजे ऐतिहासिक प्रसंगातील कोणत्याही तपशीलाचा अव्वल पुरावा म्हणून मानता येणार नाही, असे बेंद्रे म्हणतात.[१०३]

समकालीन वाङ्मयात प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी अप्रत्यक्षपणे उतरतात ही जरी गोष्ट खरी असली तरी त्याचवेळी त्यात प्रतिपाद्य विषयाच्या अनुरोधाने फेरबदल करण्यात येत असतो. हेही विसरता कामा नये. म्हणून सामान्य वाङ्मयाचा उपयोग करणे जरूर पडते हे फक्त राजकीय अगर इतर हालचाली स्थानिक व सामाजिक हिताच्या दृष्टिने कोठेपर्यंत समर्थनीय होत्या हे जाणण्यापुरते होय. या दृष्टिने वाङ्मयाचा उपयोग इतिहासरचनेस अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्याप्रमाणे तत्कालीन वाङ्मयावरून तत्कालीन मन:स्थितीचा बोध होतो त्याचप्रमाणे पश्चात वाङ्मयावरून परिणामाचा बोध होऊ शकतो. म्हणून प्रथम स्थानिक वाङ्मयाचा अभ्यास केल्याशिवाय इतिहासकालीन प्रसंगांकडे कोणत्या अभ्यासदृष्टिने पाहावयाचे हे समजणे शक्य नाही. या वाङ्मयाच्याच साहाय्याने ऐतिहासिक प्रसंगांच्या खऱ्या स्वरूपाचा बोध होऊ शकतो, असे बेंद्रे ठामपणे सांगतात.[१०४] शिवकालीन वाङ्मय काही उपलब्ध झाले आहे व होतही आहे. तुकाराम, दासोपंत व प्रसिद्ध रामदासी वाङ्मयात प्रत्येक ठिकाणी तत्कालीन लोकस्थितीची व राजकीय परिणामांची कल्पना करून देणारी

सूत्रे आढळतात. याच सुत्रांच्या आधाराने महाराष्ट्रीयांना अगदी छातीठोकपणे, निसर्गाच्या नियमाला अनुसरून व परमेश्वराच्या न्यायावर विश्वसून सांगता येते की, स्थानिक लोकांना केवळ बलाच्या जोरावर लुबाडून अधिष्ठित झालेल्या राजसत्तेने शिवाजीसारख्या पुण्यपुरुषाला स्वदेशीय बांधवांना गुलामगिरीतून मुक्त केल्याच्या प्रयत्नामुळे जरी बंडखोर म्हटले असले तरी त्याला महाराष्ट्रीय व इतर सर्व नि:पक्षपाती जनता व इतिहास लोकहितपालकांच्या अग्रस्थानी बसविण्यास मागे पाहणार नाहीत. ऐतिहासिक सरकारी साधनांतील प्रत्यक्ष पुरावा तपासण्यासाठी या सामान्य वाङ्मयात सुत्रीत केलेली तत्त्वे व तत्कालीन परिस्थिती या दोहोंचाच मुख्य उपयोग करावयाचा असतो. ज्या या दोन्हींही गोष्टींचा संसर्ग घडला नाही त्याच्या इतिहासरचनेत कोणते व कसे दोष घडून येतात हे महाराष्ट्राच्या इतिहास ग्रंथातून चांगलेच दिसून येते, असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

अशा वाङ्मयाच्या वापरासंदर्भात कोणती काळजी घ्यावी याविषयी लिहितांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, इतिहासकालीन बहुतेक सर्व वाङ्मय कवितांबद्दलच असलेले आढळते. पद्यात्मक रचना करण्याकडेच विद्वानांचा बराच कल होता. असल्या वाङ्मयास विषयाची निवड करतानाही बहुधा परमार्थाकडेच अधिक ओढा दिसतो. रामदासी खास वाङ्मय इतके महत्त्वाचे आहे की, रामदासाच्या व त्यांच्या शिष्यांच्या सर्व ग्रंथातून शिवशाहीकालीन परिस्थितीचा वेळोवेळी उल्लेख केलेला आहे. हे सर्वच वाङ्मय प्रवर्तक स्वरूपाचे असल्याने त्यावरून तत्कालीन क्रांतीला कोणते मार्ग स्वीकारणे जरूर होते, तसेच त्यापूर्वी जो ऱ्हास झाला तो कोणत्या कारणाने झाला वगैरे सर्व बाजू आपणास समजू शकतात. महानुभावीय व इतरही वाङ्मयात तत्कालीन परिस्थितीची द्योतक अशी बरीच माहिती मिळते; परंतु या स्थानिक वाङ्मयाचा उपयोग करितानासुद्धा वाङ्मयकार कोणत्या परिस्थितीतून वाङ्मय प्रसवीत आहे, त्याचा त्या वाङ्मय निर्मितीत कोणता हेतू आहे, तसेच तो कोणत्या प्ररेणेने लिहित आहे, वगैरे गोष्टींचा प्रथम विचार करून त्याचे लेखन तत्कालीन प्रघात, भाषाप्रचार वगैरे लक्षात घेऊन तपासले पाहिजे.

२६ (ब-१४) नाणी आणि शिलालेखासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

नाण्यांचा ऐतिहासिक साधन या दृष्टिने बराच उपयोग होतो. नाणी ही एक प्रकारच्या अविनाशी ऐतिहासिक साधनापैकी एक आहेत. परंतु या साधनांच्या साहाय्याने राजाच्या नावाचा व

नाण्यांच्या आणि त्याचबरोबर फक्त राजांच्या काळाचा बोध होऊ शकतो. फार तर जेथे नाणी सापडतात त्यावरून राज्याच्या मर्यादेचा किंवा राजाच्या संबंधाचा बोध करून घेता येतो इतकेच. त्यामुळे ज्याकाळाचा इतिहास अविनाशी साधनांवरून काढणे भाग झाले आहे. व इतर कोणतेही प्रत्यक्ष समकालीन साधन हयात नसते. अशाचवेळी नाण्यासारखी साधने विशेष महत्त्वाची असतात असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. शिवशाहीसारखा इतिहासात मात्र त्यांच्या शिवकालीन नाण्यांचा अगर चलनी इतिहासाच्या भागापुरताच उपयोग होतो. परंतु शिवशाहीत मराठ्यांनी नाणी पाडण्यासाठी टाकसाळी वगैरे स्थापण्याचा फारसा प्रयत्न केलेला दिसून येत नाही.

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या सुमारास एक टाकसाळ काढली होती. त्यात फक्त दोन होन व शिवराईच काढले असावेत. शिवशाहीची ही दोनच प्रकारची नाणी उपलब्ध झालेली आहेत. चांदीचे नाणे पाडल्याचे म्हणतात; परंतु ते उपलब्ध मात्र झाल्याचे ऐकिवात नाही. महाराष्ट्रात व इतरत्र बऱ्याच टाकसाळी होत्या. विशेषतः मोगली नाणीच चालत. इतरही आदिलशाही, पोर्तुगीज व इंग्रजी नाणी वापरण्यात येत. परंतु नाण्यांची कायद्याने ठरावीक किंमत ठरविलेली नव्हती. त्यांची किंमत मोगली नाण्यांच्या कसाला उतरली त्याप्रमाणे भाव लागून होत असे.

सारांश, अशा परिस्थितीत शिवशाहींच्या इतिहासाला या नाण्यांच्या साहाय्याने काही अधिक भर टाकता येईल असे नाही. नाणी बनावट आहे किंवा कसे हे ओळखण्याचे मुख्य मार्ग म्हणजे ती शुद्ध आहेत किंवा नाहीत व त्यावरील उल्लेख इतर ऐतिहासिक उपलब्ध माहितीला धरून आहेत किंवा नाही हे तपासणे हे होत. शिवशाहीकालीन नाण्यांना अशा प्रकारची तपासणी लावण्याचे फारसे प्रयोजनच पडणार नाही. कारण बनावट व खोटी नाणी पाडण्याइतका शिवशाहीचा विस्तार व देशातील चलनावर अंमल झाला नव्हता. नाणी, मापे, वजने वगैरे लिहिण्याची रेघी पद्धत अद्यापही चालू होती.[१०५]

शिलालेख हेही एक अविनाशी साधनांतील साधन असून त्यांच्याच साहाय्याने बराचसा पुरातन इतिहास उपलब्ध करून घेता आला आहे. पुरातन शिलालेखात जी प्रशस्ती दिली जाई ती ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाची असे. परंतु इतिहासकालीन लेखनाची साधने बरीच निर्माण झाल्याने हे शिलालेख फक्त इमारती, किल्ले, कबरी, वृंदावने वगैरे बांधकामांवर लावले जात व

असे. त्यामुळे या शिलालेखातून फारशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. या शिलालेखाचे पुरावा या दृष्टिने परीक्षण करावयाचे तेही इतिहासकालीन पत्रादी साधनांच्या परीक्षणासारखेच करावयाचे असते. एखादी गोष्ट जाहीर रीतीने मांडली गेली म्हणजे ती तत्कालीन समजुतीप्रमाणे सर्वांस मान्य होती असे मानण्यास हरकत नसते; परंतु या शिलालेखातील मजकुराचे परीक्षण करताना ज्यावेळी ती बाब लिहिली त्या वेळच्या समजुतीवरून करावयाचे नसते तर त्यात उल्लेखलेली बाब समकाळात लिहिली गेली असेल तर ती विश्वासार्ह व समकालीन लिहिली गेली नसेल तर तिची विश्वसनीयता ठरावीक नसते असेच समजून परीक्षण करणे जरूर आहे. शिलालेखात नकला व मसुदा असा भेद करण्याचे प्रयोजन नसते. शिवशाहीकाळात किल्ले वगैरे इमारत काही कमी बांधल्या किंवा दुरूस्त केलेल्या नाहीत. या प्रत्येक इमारतीवर एखादा तरी शिलालेख आढळतोच. या शिलालेखाचे वाचन व प्रसिद्धीकरण गॅझेटिअर्स व सिलेक्शनमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झालेलेच आहे. परंतु त्यातील काही वाचन बरेच सदोष आहे. या सर्व शिलालेखांचे व त्याचप्रमाणे देवळे, विहिरी वगैरेंवरील शिलालेखांचे वाचन केले तर बऱ्याच गोष्टींवर महत्त्वाचा उजेड पाडता येईल.[१०६]

शिलालेख, ताम्रपट लिहिण्यामागचे मुख्य कारण म्हणजे त्यावेळेला असलेली इतर साधनांचा अभाव होय असे बेंद्रे सांगतात. साधन असतांना लिहिलेल्या शिलालेखांची संख्या फार कमी आहे असे बेंद्रे पुढे स्पष्ट करतात. साहजिकच अशा शिलालेखांतील मजकूर तितका तपशीलवार नसतो. लेखकाचाही उल्लेख असतोच असे नाही. बहुतेक सर्व शिलालेख फार थोडे आढळतात; मराठी शिलालेख इ.स. १००० नंतरचेच आहेत. बरेचसे देवस्थानाच्या दानाबाबतचे आहेत. या सर्वांतील मराठी भाषेचे स्वरूप पुष्कळच प्राथमि स्वरूपाचेच दिसते, असे बेंद्रे म्हणतात.[१०७]

२६ (ब-१५) चित्रे, नकाशे, इमारती वगैरे संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

शिवकालीन मोगली, रजपूत वगैरे आदिलशाही व कुत्बशाही बऱ्याच सरदारांची चित्रे उपलब्ध झालेली आहेत. काही सामान्य माणसांचीही चित्रे सापडतात. मात्र शहाजी, शिवाजी, संभाजी वगैरे छत्रपती सोडले तर मराठी सरदारांची चित्रे उपलब्ध झालेली ऐकिवात नाहीत. मात्र यावरून

असे अनुमान करता येत नाही की, अशी चित्रे उपलब्ध होणारची नाही. सामान्य माणसाचेही चित्र काढून देण्याइतके चित्रकार मिळत असत, असे असताना मराठे सरदारांची चित्रे मिळणारच नाहीत असे नाही. उपलब्ध होणे आहे असा निष्कर्ष काढता येईल; परंतु चित्रांचा नाश कागदपत्रांच्या नाशापेक्षा अधिक जलदीने व सहज होणे शक्य असल्यामुळे ही साधने उपलब्ध होणे जरा जडच आहे म्हटले तरी चालेल. उपलब्ध चित्रांतही समकालीन किती चित्रे असू शकतील हे सांगणे फारच कठीण आहे. हल्ली जी चित्रे उपलब्ध आहेत ती बहुतेक नकलाच असून त्या पेशवेकालीन असाव्यात. फारच थोडी चित्रे अव्वल असण्याचा संभव आहे. या चित्रांवर काही ठिकाणी चित्रकारांचे नाव असते व काही ठिकाणी चित्राचेही नाव दिलेले असते. परंतु बहुधा चित्रावर नावगाव न देण्याचाच प्रघात विशेष दिसतो. संग्रहकारांनी मात्र अशा चित्रांच्या मागे किंवा खाली नावे दिलेली असतात. त्यामुळे कित्येक चित्रांच्या नावाचा बोध होत नाही; परंतु ही चित्रे नकला असतात. त्यामुळे इतरत्र तशाच प्रकारच्या नकला नावांसहित मिळाल्यास चित्रांची नावे समजून घ्यावी लागतात. चित्रांच्या नावांचा अशारीतीने बोध झाला तरी ती पडताळून पाहण्यास कोणत्याही साधनांत ऐतिहासिक पुरुषांचे रूपवर्णन दिलेले आढळत नाही. असे रूपवर्णन करण्याचा त्यावेळी रिवाजच नव्हता. रूपवर्णन केलेलेच आढळले तर ते अगदी अतिशयोक्तीचे व भारत-रामायणादी ग्रंथातील ठरावीक वाचनात केलेले असते. त्यामुळे चित्रांचा ताळा पाहण्यास फारसे साधन उपलब्ध नसते. चित्रांचे परीक्षण त्यांत असलेल्या रंगावरून करणे शक्य असते. काही रंगांची मिश्रणे शिवशाहीकाली परिचित नव्हती व काही रंग तत्पूर्वी ठाऊक नव्हते. परंतु असले बारीकसारीक तपशील देण्याची जरूरी दिसत नाही व ते शब्दांत देणे किंचित कठीणही आहे. म्हणून चित्र कोणत्या माणसाचे आहे हे ठरविण्यास निरनिराळ्या प्रतींवर संग्रहाकारांकडून जी नावे दिली जातात त्यावरूनच ठरविणे भाग पडते.[१०८]

नकाशे काढण्याची कला आजच्या इतकी जरी पूर्णतेप्रत गेली नव्हती तरी जमिनींचे नकाशे काढणे किंवा एखाद्या क्षेत्राचे नकाशाच्या रूपाने विवेचन करण्याची पद्धती शिवकालीही प्रचारात होती; परंतु हे नकाशे मोठमोठ्या देशाचे अगर प्रांताचे नसत लिहिणारा आपल्या कार्यक्षेत्रापुरताच विचार करी व त्याप्रमाणे टाचन करी. हिंदुस्थानाबाहेरून येणारे प्रवाशी नकाशे काढीत. परंतु तेही नकाशे काढतांना फक्त दिशेचा उल्लेख करीत. अंतराबद्दल फारसे बिनचूक नसत. अजमासे

काहीतरी वरखाली दुसरे गाव, नदी दाखवायची एवढा काय तो त्यांचा उद्देश असे. जे क्षेत्राचे नकाशे काढले जात त्यात काढणाराला बरीच माहिती असण्याचा संभव असतो. परंतु प्रवाशांच्या नकाशात ऐकीव माहितीवर बराच भर दिलेला असतो. नकाशात पूर्व, पश्चिम, दक्षिणोत्तर वगैरे दिशा दाखविल्या जातात; परंतु सांप्रत ज्याप्रमाणे आपण आपल्या नकाशात उत्तर वरचे बाजूस व पूर्व उजवे बाजूस नेहमी दाखवितो. त्याप्रमाणे ते दाखवीत नसत. अशा प्रकारचा ते निर्बंध पाळीत नसत. त्यास वाट्टेल त्या बाजूला घेत. काहीत दिशांचे उल्लेख करीत, काहींत केलेले नसत. हे नकाशे बहुधा प्रसंग वर्णनासाठीच वगैरे काढले जात. त्यामुळे ते फार महत्त्वाचे असतात.

शिवकालीन इमारती, किल्ले वगैरेही इतिहासाच्या दृष्टिने आपणास काही गोष्टी पडताळून पाहण्यास साधनीभूत होत आहेत. इतिहासातील बाबी अप्रत्यक्षपणे परंतु अगदी बिनचूकतेने पडताळून पाहण्याचे एवढेच साधन उपलब्ध असते. इतिहासकालीन साधनांत वर्णिलेली कित्येक गावे नाश होऊन त्यांचा सुगावासुद्धा लागत नाही, त्यामुळे एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाची जागा ठरविता येत नाही व जागा ठरविता न आली म्हणजे प्रसंगही अनिश्चित राहतो. कोणत्याही ऐतिहासिक प्रसंगाला तीन मुख्य गोष्टी पाळाव्या लागतात. व्यक्ती, जागा व काल. यापैकी दुसरीचा बोध होण्यास इतिहासकालीन या मुख्य स्थलविशेषांची माहिती असणे अवश्य असते. अजूनही कित्येक किल्ल्यांची माहिती नसल्यामुळे कित्येक साधनांतील पाठ लावता येत नाहीत. म्हणून इतिहासरचनेत विशिष्ट स्थलांची माहिती मिळविणे आवश्यक असते.

२६ (ब-१६) इतर अलिखित साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

इतर अलिखित साधनांमध्ये चार प्रकारच्या पुराव्यांचा समावेश होतो. (१) भौगोलिक माहिती, (२) अलिखित सामान्य वाङ्मय, (३) पुराणवस्तु आणि (४) दंतकथा.

भौगोलिक माहितीवरून शक्याशक्यता ओळखण्याचा मार्ग उपलब्ध असतो. अलिखित सामान्य वाङ्मयावरून इतिहासातील प्रसंगवर्णनांत उपयोग करण्याइतकी मुळीच विश्वसनीय नसतात. त्यांवरून इतिहासकाराला तत्कालीन परिस्थितीचे चित्र समजू शकते. पुराणवस्तुवरून काही तार्किक स्वरूप बसविता येते. परंतु यांत सर्व तर्काचेच भाग असतो. दंतकथेचा इतिहासास फारसा उपयोग करिता येत नाही. परंतु यावरून इतिहासरचनेसाठी रुपरेषा समजू शकते.

(१) भौगोलिक परिस्थितीत दोन-तीनशे वर्षात फारसा फरक होत नाही, ही जरी गोष्ट असली तरी गावाची वस्ती वगैरे बदलू शकते अशा बारीकसारीक फेरबदलीबद्दल काळजी घेतल्यास भौगोलिक माहितीवरून कित्येक ऐतिहासिक प्रसंग विवेचनातील सत्यता शोधणे फारसे कठीण जाणार नाही. उदाहरणार्थ - शिवाजी पन्हाळ्यावरून रांगण्यास गेला की विशाळगडास गेला, रांगण्यास गेला तर वर्णनाप्रमाणे इतर बाबी जुळतात का? जर रांगण्यास न जाता विशाळगडास गेला, म्हणावे तर अंतर व काळवेळ यांचा जम बसत आहे का? वगैरेंचा शोध घेणे या भौगोलिक परिस्थितीवरूनच विशेष बिनचूक करिता येते. सारांश जाण्याचे मार्ग, नद्यानाल्यामुळे पाण्याची सोय, डोंगरांची गर्दी, त्यामुळे लढाईच्या प्रगतीत येणारे व्यत्यय वगैरे गोष्टींचा उलगडा या भौगोलिक परिस्थितीवरून घेता येतो. परंतु एवढे मात्र लक्षात ठेवले पाहिजे की, या भौगोलिक परिस्थितीप्रमाणे एखादा प्रसंग बरोबर ठरला म्हणजे तो बिनचूक असतोच असे नाही. या अप्रत्यक्ष भौगोलिक पुराव्यावरून मजकुरातील चूक सापडते. त्याच्या खरेपणाची ग्वाही देता येत नाही.

(२) अशी कित्येक गाणी रूढ झालेली असतात व त्यांचा परंपरेने परिपोष झालेला असतो की, ती कित्येक शतकेच्या शतके जिवंत राहू शकतात. या वाङ्मयावरून आपल्याला तत्कालीन परिस्थिती समजू शकते. लिखित वाङ्मयाचा जो आपणास इतिहासातील दृष्टी समजून घेण्यास फायदा होतो. तोच या वाङ्मयापासूनही होतो. परंतु या अलिखित वाङ्मयात अडचण अशी असते की, असल्या वाङ्मयाचा नक्की रचनाकाल समजत नाही व त्यात बरेच फेरबदल होण्याचा संभव असल्याने त्या वाङ्मयात ग्रंथित केलेली परिस्थिती नक्की कोणत्या कालाची ते ठरविणेच अवघड असते. त्यामुळे या वाङ्मयाचा फक्त इतिहासकालीन अजमासाने परिस्थिती समजून घेण्यापुरताच उपयोग करावा लागतो. ज्या काळाचा इतिहास सांगणारी साधने उपलब्ध नसतात. त्या काळातील इतिहासाला अशा प्रकारच्या साधनांवर अवलंबून राहावे लागते; परंतु जेथे साधने उपलब्ध असतील तेथे अशा पुराव्यांचा फारसा उपयोग करून घेता येत नाही. परंतु ज्यावेळी लोकांच्या चालीरिती वगैरेचाच इतिहास लिहावयाचा प्रसंग

असतो त्यावेळी इतर उपयुक्त आधारभूत साधनांच्या अभावी ह्या साधनांचाच मुख्यतः उपयोग करणे भाग पडते.

(३) पुराण वस्तुसंशोधनाने अगदी पुराणकालाच्या इतिहासाचाच फायदा होऊ शकतो. ज्यावेळी इतर साधने उपलब्ध नसतात तेव्हा त्या वेळच्या इतिहासाबद्दल तर्क करण्यास या वस्तुंचा प्रत्यक्ष पुरावा असतो; परंतु ज्या काळचा इतिहास आपल्याला प्रत्यक्ष पुराव्यांनी उपलब्ध होत असतो, त्यावेळी त्या साधनांना फारसे महत्त्व राहात नाही. फक्त कला वगैरेच्या दृष्टिने किती प्रगती झाली ते ठरविण्यास ती साधने उपयुक्त असतात.

(४) परंपरेची माहिती प्रथम कितीही युक्त व खरी असली तरी ती कालांतराने बरीच बदलते व असे झाले म्हणजे तिला दंतकथेचे स्वरूप प्राप्त होते. काहीवेळा या दंतकथेतील मुख्य व्यक्तिंची नावेही बदलतात व दुसऱ्याच कोणाच्या तरी नावाने त्या चालू राहतात. केव्हा केव्हा तर या दंतकथांचे स्वरूप अगदी यक्षिणीच्या गोष्टींच्या स्वरूपात जाऊन दाखल होते. म्हणून जोपर्यंत एखाद्या घराण्यातील परंपरेच्या माहितीत विकृतावस्था प्राप्त झालेली नसते तोपर्यंत तिचा उपयोग निदान इतिहासाची रूपरेषा अजमावण्याकडे तरी करता येतो; परंतु या परंपरा दंतकथा होऊन त्याही विकृत अवस्थेप्रत जातात तेव्हा त्यांचा उपयोग करणे अनिष्ट असते.

सारांश, अप्रत्यक्ष पुराव्यांचा उपयोग फक्त उपकारक साधनासारखा करता येतो. त्यावरून शिकालीन इतिहासरचनेस प्रत्यक्ष मदत होऊ शकत नाही.[१०९]

२६ (ब-१७) पत्रव्यवहार पद्धती :

महाराष्ट्रात लेखन-वाचनाचा अभाव व पत्रव्यवहारातील कमीपणाची कारणे वा. सी. बेंद्रे खालीलप्रमाणे सांगतात.

(१) महाराष्ट्रातील आणि विशेषतः गोदावरीच्या पश्चिम भागाकडील महाराष्ट्रातील पत्रव्यवहारपद्धतीचा विचार केला तर या देशात सतराव्या शतकातही लेखी पत्रव्यवहारापेक्षा तोंडी निरोपांवरच अधिक भर होता असे दिसून येते. कागदाची दुष्प्राप्यता हेही त्यास कारण असणे साहजिक आहे.

(२) कागद करण्याचा धंदा अहिंदूचा असा मानल्याने सर्वत्र या कागद कमाईलाव वाव नव्हता.

(३) जुन्नर-कल्याण की तेथे मुसलमानांच्या मशिदी फार मोठ्या होत्या व त्यांची वस्तीही अधिक होती तेथेच कागद बनविण्यात येत असे. उत्तर पेशवाईत पुण्यास व इतर काही ठिकाणी असल्या कामगदारांचा त्यांच्या मशिदीजवळ कागदीपुराच बसविल्यानंतर ही कागदाची टंचाई बरीच दूर झाली.

(४) सुलतानांच्या राज्यांत मराठीतून राज्यपत्रव्यवहार करण्याची मुभा नव्हती. कारण वजिरी फक्त मुसलमानांनाच दिली जात होती.

(५) १६ व्या शतकाच्या सुरुवातीस मुलकी व्यवहारास देशी भाषा मराठी वापरण्यास परवानगी मिळाली. १७ व्या शतकात जशा हिंदूना वजिऱ्या व अधिकाऱ्यांच्या जागा मिळू लागल्या तसाच पत्रव्यवहार मराठीतूनच होऊ लागला. फर्मानांवरही मराठी गोषवारा येऊ लागला. मोगली राज्यात पर्शियनवरच सर्व भर होता.

(६) दख्खनमध्ये पर्शियनबरोबर दख्खनी हिंदीचा प्रचार बराच झाला. दख्खनमधील सुलतानांच्या गावांच्या कारभाराशी प्रत्यक्ष संबंध येत नव्हता. परगणेही देशमुख देशपांडेच सांभाळीत होत. सुभा हा ही आपल्या कारभाराला स्वतंत्र होता. त्याला सर्वाधिकार होते. निकालही तोडीच दिले जात होते आणि मृत्युच्या शिक्षा किंवा घरदार असल्याने विशेष लिखापटीची जरूरत भासत नव्हती. देशमुख किंवा सुभा वगैरेंनी ठरावीक महसूल व सैन्यभरती करून दिली म्हणजे झाले.

(७) हिंदू धर्माप्रमाणे अध्ययनाचा हक्क वरील अल्पसंख्यांक तीनच वर्णांना असल्याकारणाने साहजिकच सर्व कारभार तोंडातोंडीच करावा लागे.

(८) न्यायदानालाही लेखी कारवाईची अट निरक्षर जनतेला उपयोगी पडणारी नव्हती. जातिधर्माचे तंटे जातींच्या जमाती बहुमताने तोडीत. गावागावांमधील भांडणे सुभेदार, देशमुख, देशपांडे गावांचे लोकांचे मजलस करून निकालांत काढीत. त्यामुळे लिखापडीची फारशी जरूरत भासत नसे.

(९) जमीन महसुलाबाबतचे निर्णय सरकारने अंमलात आणावयाचे असल्याने महजराप्रमाणे सरकारी पत निघत.

(१०) खासगीसंबंधाचे व्यवहारी पत्रद्वारापेक्षा निरोपानेच उरकले जात.

(११) संस्कार म्हणून धूळपाटीवरील अक्षर ओळख झाली असली तरी त्रैवर्णियातील कारकून व नकलकार सोडले तर सर्वांनाच लेखनवाचनाचा सराव होता असे नाही. कित्येकांनी कारकुनीकरिता मोठी लेखन साधले परंतु त्यांनी मराठीच्या बाळबोधी लिपीचा अभ्यास केला नाही. ज्या शास्त्रीपंडितांनी बाळबोधीचा अभ्यास केला त्यांनी मोडी यावनी लिपी म्हणून निषिद्ध मानली.

सारांश, सामान्यतः बहुजन समाजास लेखनवाचनाचा सराव नसल्याने सरकारी कामदारांनाही आपल्या हुकुमांची बजावणी निरोपाने अगर प्रत्यक्ष बोलावून नेऊन करावी लागत असे व कित्येक मोकदम, हवालदार व वैध्यवर्णिय महाजनादिकांना खास दसकत करता येत नसल्याने नांगर तागडीसारख्या खुणा करून मजलसींतील आपल्या उपस्थितीची साक्ष घ्यावी लागे. मोगली प्रदेशात पर्शियनचा जसा प्रसार झाला होता तसा तो महाराष्ट्रात होऊ शकला नाही. कारण मुसलमान अधिकारी वगैरे येथील डोंगराळ व दळणवळणाचे मार्ग सुकर नसलेल्या प्रदेशात जात नसत. सारांश महाराष्ट्रात लेखनवाचनाचा सराव जनतेत सामान्यतः नसल्याने ऐतिहासिक साधने फारशी मिळू शकत नाहीत.

उत्तरेकडील मुसलमान सरदार सुभेदार ज्या राजकीय, नियंत्रणासाठी आपले ठिकठिकाणचे अहवाल पाठवीत त्या अहवालांवरून अथवा त्यानुसार मोगली राजांनी व सरदारांनी आपापली आत्मचरित्रे लिहिल्याने जशी ऐतिहासिक साधने तिकडे उपलब्ध होऊ शकतात तशी महाराष्ट्रांतील हालचालींची शब्दचित्रे उपलब्ध होत नाहीत. राज्यव्यवहार या ना त्या कारणाने आज जवळ जवळ निदान सोळाव्या व सतराव्या शतकांतला तरी दुर्मिळ होऊन बसला आहे. त्यामुळे आपणास आपल्या इतिहासाच्या पुनर्रचनेच्या कामात या जमीन महसुलाच्या बाबतच्या कागदपत्रांत काही कारणाने येणाऱ्या बारीक सारीक ऐतिहासिक तपशीलांवरच विसंबून रहावे लागत आहे. युरोपीय लोकांत साधी गोष्टही लेखांकित केलेली असल्याने ती सर्व साधने अधिक बोलकी आहेत.[११०]

बेंद्रे पुढे म्हणतात, नाही म्हणण्यास महाराष्ट्राच्या संस्कृतीचा व मराठी भाषेचा दर्जा टिकवण्यास महानुभाव, गोसावी, वारकरी, नाथादि पंचच कारणीभूत झाले. लेखनकला शिकण्यास

जरी अडथळा होता तरी विचारांची सामाजिक पातळी या पंथियांनी वर्णाश्रमधर्मियांशी फटकून वागून १८ व्या व १९ व्या शतकात बरीच वर नेली होती. तसे पाहिले तर इस्लामी राज्यांतही पूर्वापार आलेले वसाहतीचे सामाजिक व आर्थिक व्यवहार पूर्वील आर्याच्याच संस्कृतीप्रमाणे चालत होते. सराव सूल-खंडाचा भाग सोडला तर गाव पूर्णपणे स्वतंत्र होते. न्यायाचे सर्वाधिकार गावांना किंवा जमातींना होते. राज्यांतर्गत संरक्षणासाठी स्वतंत्र योजना होती असे नाही.

सारांश, महाराष्ट्रीय लोकांच्या वसाहत स्थानांच्या बदलाबदलीत पूर्वसंस्कार व संस्कृती यांची पुष्कळशी ओळख नाहीशी झाली होती आणि हे महाराष्ट्रीय जेव्हा गोदावरीच्या पूर्वभागांतून दक्षिणेतील कल्याणी बेदराकडून मावळ कोकणात आले तेव्हा त्याचे जवळ या आर्य संस्कृतींच्या ग्रंथाचा संग्रह नव्हताच असे म्हटले तरी चालेल. जो काही थोडा यादवकालीन ग्रंथसंग्रह गोदावरीच्या पूर्व भागांत होता त्याच्याशीही या नवीन वसाहतवाल्यांचा संबंध तुटला होता असे इतिहास सांगतो. साहजिकच दक्षिणेत यावनी परिभाषेचा उपयोग महाराष्ट्रीयांनी सुलतानांच्या राज्यात केला तो प्रघात.

संदर्भग्रंथ सूची

१. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. ५
२. कित्ता, पृ. ६
३. बेंद्रे वा. सी., 'महाराष्ट्रेतिहासाचे संशोधनक्षेत्र व साधनसंपत्ति', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९६६, पृ. १५,१६
४. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. ४, ५
५. कित्ता, पृ. ५
६. कित्ता, पृ. ६
७. कित्ता, पृ. ७
८. कित्ता, पृ. ७
९. कित्ता, पृ. ८,९
१०. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. १
११. कित्ता, पृ. २
१२. कित्ता, पृ. १२
१३. कित्ता, पृ. १५
१४. कित्ता, पृ. १५
१५. कित्ता, पृ. १६
१६. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. १६५, १६६
१७. कित्ता, पृ. २२
१८. कित्ता, पृ. २२, २३
१९. कित्ता, पृ. ३७, ३८
२०. कित्ता, पृ. ३८, ३९
२१. कित्ता, पृ. ३९
२२. कित्ता, पृ. ३९
२३. कित्ता, पृ. २५, २६
२४. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. १
२५. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. ९७
२६. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. २, ३

२७. कित्ता, पृ. ३, ४
२८. बेंद्रे वा. सी., 'महाराष्ट्रेतिहासाचे संशोधनक्षेत्र व साधनसंपत्ति', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९६६, पृ. ५७-६०
२९. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. १७४
३०. कित्ता, पृ. १७५
३१. कित्ता, पृ. १७६-१७८
३२. कित्ता, पृ. १८०, १८१
३३. कित्ता, पृ. १८१, १८२
३४. कित्ता, पृ. १८८, १८९
३५. कित्ता, पृ. १६७, १६८
३६. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. १०
३७. कित्ता, पृ. १०, ११
३८. कित्ता, पृ. ११, १२
३९. कित्ता, पृ. १२, १३
४०. कित्ता, पृ. १३
४१. कित्ता, पृ. १३
४२. कित्ता, पृ. १३, १४
४३. कित्ता, पृ. १४
४४. कित्ता, पृ. १४, १५
४५. कित्ता, पृ. १४, १५
४६. कित्ता, पृ. १५
४७. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. १६९, १७०
४८. कित्ता, पृ. १७०-१७३
४९. कित्ता, पृ. २७
५०. कित्ता, पृ. २८
५१. कित्ता, पृ. २९
५२. कित्ता, पृ. ३१
५३. कित्ता, पृ. ३३
५४. कित्ता, पृ. १०
५५. कित्ता, पृ. ११
५६. कित्ता, पृ. ४६
५७. कित्ता, पृ. ४६, ४७
५८. कित्ता, पृ. ४७

५९. कित्ता, पृ. ५०
६०. कित्ता, पृ. ५०, ५१
६१. कित्ता, पृ. ५१
६२. कित्ता, पृ. ५१, ५२
६३. कित्ता, पृ. ५२
६४. कित्ता, पृ. ५५, ५६
६५. कित्ता, पृ. ५८
६६. कित्ता, पृ. ५९, ६०
६७. कित्ता, पृ. ६१-६३
६८. कित्ता, पृ. ६४
६९. कित्ता, पृ. ६६, ६७
७०. कित्ता, पृ. ७१-७३
७१. कित्ता, पृ. ७४
७२. कित्ता, पृ. ७७-७८
७३. कित्ता, पृ. ७९-८०
७४. कित्ता, पृ. ८०-८१
७५. कित्ता, पृ. ८८-८९
७६. कित्ता, पृ. ९१, ९१
७७. कित्ता, पृ. ९१, ९२
७८. कित्ता, पृ. ९५
७९. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. १
८०. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. १३२, १३३
८१. कित्ता, पृ. १३३, १३४
८२. कित्ता, पृ. १३४,१३५
८३. कित्ता, पृ. १३६
८४. कित्ता, पृ. १३६,१३७
८५. कित्ता, पृ. १३७,१३८
८६. कित्ता, पृ. १३८
८७. कित्ता, पृ. १३८
८८. कित्ता, पृ. १३९
८९. कित्ता, पृ. १३९,१४०
९०. कित्ता, पृ. १४१
९१. कित्ता, पृ. १४२-१४४
९२. कित्ता, पृ. १४४

९३. कित्ता, पृ. १४६
९४. कित्ता, पृ. १४६
९५. कित्ता, पृ. १४६,१४७
९६. कित्ता, पृ. १४९
९७. कित्ता, पृ. १४९-१५०
९८. कित्ता, पृ. १५१
९९. कित्ता, पृ. १५२
१००. कित्ता, पृ. १५३
१०१. कित्ता, पृ. १५३
१०२. कित्ता, पृ. १५४
१०३. कित्ता, पृ. १५५
१०४. कित्ता, पृ. १५५-१५८
१०५. कित्ता, पृ. १५७-१५८
१०६. कित्ता, पृ. १५८
१०७. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. २०
१०८. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. १५९, १६०
१०९. कित्ता, पृ. १६२-१६३
११०. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ऑक्टोबर १९६७, पृ. १५-१७

प्रकरण तिसरे

शिवपूर्वकालीन मराठ्यांच्या इतिहासाविषयीचे लिखाण

३.१ प्रास्ताविक

३.२ शिवपूर्वकालीन परिस्थिती

३.३ 'मराठा' संदर्भात वा. सी. बेंद्रें यांनी दिलेली माहिती

३.४ भोसले वंशाच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

३.५ बाबाजी राजे भोसले संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

३.६ मालोजी राजांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

३.७ विठोजी भोसले संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

३.८ शहाजी राजांसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

प्रकरण तिसरे

शिवपूर्वकालीन मराठ्यांच्या इतिहासाविषयीचे लिखाण

३.१ प्रास्ताविक :

सामाजिक घटनेतील विषमता मग ती कोणत्याही क्षेत्रातील असो, जोपर्यंत आपल्या प्रभावाने मनुष्याच्या व्यक्तिमत्वावर बरावाईट परिणाम करू शकत नाही तोपर्यंत सामाजिक जीवनांतील मानवीप्रवृत्ती निरुपद्रवी व शांत राहू शकते; परंतु एकदा का ही विषमता व्यक्तिशः जाणवू लागली म्हणजे ती व्यक्ती किंवा तो समाज आपल्या स्वास्थ्याकरिता अभिमानाने धडपड करू लागतो. त्यातूनही या सामाजिक जीवनात जातिधर्मवर्णद्वेषाचे हेवेदावे सुरू झाले म्हणजे प्रत्येक माणूस क्रांतीचक्राच्या वातावरणांत खेळू लागतो. मानवात स्वाभिमानाची व स्वकर्तृत्वाची अधिकाधिक जागृती होऊ लागते व शत्रुमित्रांच्या व्यवहारात तो निग्रहाने आपली सर्व शक्ती पणाला लावतो. सामान्यतः नैतिक व सामाजिक मूल्यांचा हरघटकी विचार करण्याच्या पारंपरिक संस्काराने बनलेल्या मानवाच्या मनोवृत्तीची घडण अशा क्रांतीकाळात पुष्कळवेळा परिस्फोटीत होते. तो माणूस असुरीवृत्ती धारण करीतो आणि आपले पूर्वसंस्कार विसरून जाऊन अमानुषपणे अत्यंत हिडीस कर्मे करण्यासही प्रवृत्त होतो. कित्येक माणसें सामान्य व्यावहारिक भूमिकेचा निरनिराळ्या चाकोरीतून विचार करू लागतात, तर काही या क्रातिकाळातील विस्कटलेल्या जनसंघातून आपण कसे निभावून जाऊ याच काळजीने संकंटात अविवेकाने उडी घेतात. परंतु अशाच क्रांतीच्या कठीण परिस्थितीत समाज आपली घडी पुन्हा बसविण्याचा प्रयत्न करीतो. अशाच धकाधकीच्या काळात सामाजिक संघटनेला धीर व अचूक मार्गदर्शन करून ती जोमदार व कार्यशील बनविण्याचे काम करणारे नेतेही निर्माण होतात. असे नेते महाराष्ट्राच्या इतिहासात मध्यकाळात मराठा साम्राज्यात निर्माण झालेत ते म्हणजे मालोजी, शहाजी, जाधव कुटुंबीय, निंबाळकर इत्यादी यांची कामगिरी प्रस्तुत प्रकरणात सांगण्यात आली आहे. मूलतः मालोजी व शाहाजीच्या कार्यकर्तृत्वांचे धडे गिरवून शिवाजी महाराजांनी जी 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापन केली ती होऊ शकली केवळ शाहाजीने जो पाया रचून ठेवला होता त्यामुळेच या प्रकरणात शिवपूर्ण काळातील परिस्थिती व या नेत्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

३.२ शिवपूर्वकालीन परिस्थिती

[अ] राजकीय परिस्थिती :

वा. सी. बेंद्रे शहाजी पूर्वकालीन परिस्थिती संदर्भात गुरुवर्य कै. वि. का. राजवाडे यांनी जे काही संशोधन अभ्यासातून लिखाण केले त्याचा संदर्भ देतात. ज्यामध्ये महाराष्ट्रीकांचे गुरू त्यांनी मगध, कुरुपांचाल व उत्तरकुरू या नर्मदोत्तर देशात शोधले व हे नंतर दक्षिणेत आले असे सांगितले. हे दक्षिणेत आले तेव्हा ते वैदिकधर्मी होते म्हणून यज्ञयागार्थ त्यांनी आपल्या पुरोहितांना आपल्याबरोबर आणले.[१] राजवाडे यांच्या दक्षिणेत येण्यामागचे कारण सांगतात की, हे स्वधर्मरक्षणार्थ नवीन वसाहती करण्यासाठी आलेत. त्यांचे वसाहती करण्याचे काम खंड न पडता सोळाशे वर्षे सतत चालू होते. महाराष्ट्रीकांचे दक्षिणेत मोठे साम्राज्य म्हणजे पैठणास आंध्रभृत्यांचे त्याचप्रमाणे महाराष्ट्रीकांची पहिली मोठी भरभराटलेली वसाहत म्हणजे पैठण प्रांतातील गोदावरीच. त्याच सुमारास विद्याधरवंशीय शिलाहारांचे राज्य तुंगभद्रेच्या तिरी महाराष्ट्रीकांनी दक्षिणेकडून वसाहती केल्या. नंतर तगरच्या उत्तरेस महाराष्ट्रीकांनी आपल्या वसाहती वातापी उर्फ बादामी प्रांतात नेल्या. त्याबरोबर पूर्व चालुक्यांनी आपले साम्राज्य बादामीस स्थापिले. पुढे महाराष्ट्रीक मालखेडपर्यंत उत्तरेस चढले तेव्हा राष्ट्रकुटांनी आपल्या साम्राज्याची राजधानी मालखेडास नेली. कालांतराने महाराष्ट्रीक मालखेडाच्या उत्तरेस कल्याणी-गुलबर्गा प्रांतात शिरले. तो त्यांच्या पाठोपाठ उत्तरचालुक्यांनी कल्याणी शहराला आपल्या राजधानीचा मान दिला. शेवटी कल्याणी गुलबर्ग्यांच्या उत्तरेस देवगिरी प्रांत महाराष्ट्रीकांनी वसविल्यावर यादवांनी देवगिरीच्या अंजिक्य खडकावरून सर्व दक्षिणपथावर राज्य केले. इकडे तगराहून कांही महाराष्ट्रीक करवीर टापूत सरकले तेव्हा शिलाहारांनी करवीर कऱ्हाड ह्या जागी आपली मुख्य ठाणी उभारीली आणि तेथून खुद्द समुद्रतीरी विजयाचे बाहुटे रोविले. अशा तऱ्हेने सोळाशे वर्षे वसाहती करण्याच्या व देशमुख्या पटकाविण्याचा निरुपद्रवी उद्योग महाराष्ट्रीकांनी चालविला होता आणि उत्तरेकडील साहसी क्षत्रियांनी ह्या वसाहतींच्या पाठोपाठ साम्राज्ये उभारण्याचा खटाटोप अंगिकारला होता.[२] १५व्या व १६ व्या शतकातील राजकीय परिस्थिती व यापूर्वीच्या परिस्थितीत बदल झाला आणि या काळात दक्षिणेत ज्याच्या हाती चार पाच हजार सैन्य, तो कोणत्याही मुलुखावर आपली सत्ता गाजवू शकत असे. महाराष्ट्रातील लहानसहान गावें स्वतंत्रपणानेच वागत. सरदारही आपापल्या जहागिरीत जाऊन स्वस्थ राहात. सुलतानाने

पाचरलेच तर त्याच्या मदतीला जात असत. सुलतानाच्या मर्जीतील माणसाने वजिरी भोगावयाची व इतरांनी म्हणजे इतर समर्थ सरदारांनी त्या वजिराचा पाडाव कसा करितां येईल, आपणांस सत्ता कशी प्राप्त होईल याबाबत कारवाया करीत राहावयाचे. वजिरानेही आपली सत्ता कशी अबाधिक चालू शकेल याचा विचार डोक्यांत ठेवून जरूर पडल्यास धोका उत्पन्न करणाऱ्या सरदारांचा साध्या संशायानेही कांटा बऱ्या वाईट मार्गाने काढून टाकावयाचा आणि खास सुलतानाचीही मर्जी कमी झाली व तो त्या वजिराच्या सत्तेत काही अडवणूक करू लागला तर सुलतानाचा, कौटुंबिक भांडणे किंवा भाऊबंदकी वाढवून निकाल लावण्यास कमी करावयाचे नाही. त्याचप्रमाणे सुलतानही जर खंबीर असेल तर तोही असल्या महत्त्वाकांक्षी वजिरांचा मोड करण्यात दयामाया दाखवीत नसे आणि सुलतानाच्या पदाला धोका करणारा किंवा तसे करण्यास प्रवृत्त होणारा, मग तो बाप, भाऊ, बहीण किंवा खास पुत्र असो, त्याला अमानुषपणे अंध करणे, माया दाखवून खून करणे, विषप्रयोग करविणे अगर कोणाही सरदारला प्रोत्साहित करून त्याचेवर मारेकरी घालणे आदी मार्गाचा अवलंब केला जाई. इस्लामी राजकारभारांत हिंदुंना प्रथम लष्करांतून काढून टाकले किंवा वगळले जात होते. त्यांचा सैन्यभरतींत जरी उपयोग केला जाई तरी त्यांस अधिकार दिला जात नसे. त्यांना मुसलमान अधिकाऱ्यांच्या हाताखालीच आपली नोकरी करावी लागे.

परंतु जेव्हां या पांच सुलतानांतील आपापसांतील भांडणे वाढत चाललीं तेव्हा त्यांना बारगिरदार म्हणून घोडे ठेवून स्वार होऊन जमावाने जंगली व डोंगरी भागात भाला, तलवार व तिरंदाजीच्या साह्याने लढा देणाऱ्या लोकांची मदत घेणे प्राप्त झाले. ही भांडणे व मुसलमानांची चढाओढ शिगीला पोहोचू लागताच साहजिकच या बारगिरांचे प्राबल्य अधिकाधिक वाढत गेले; आणि १६ व्या शतकात तर याच लोकांच्या बळावर मुसलमान सरदार आपले दर्जे आणि दरबारांतील वर्चसव टिकवू लागले.[३]

[ब] धार्मिक परिस्थिती :

१५ व्या शतकाच्या शेवटीपासून इस्लामी सत्तेच्या एकजुटीला तडे जाऊ लागले. इतकेच नव्हे तर इस्लामी धर्मियात मूळ व बाटगे अशा दोन जमाती अस्तित्वात आलेल्या होत्या ह्या जमातींत धार्मिक ऐक्य व समानता असतांनासुद्धा केवळ स्वार्थासाठी आचारविचारांतील हेवेदावे वाढू लागले. इस्लामियांच्या धार्मिक संस्कारातही शिया, सुन्नी, मेध्वी असे गड पडून ते

निरनिराळ्या क्षेत्रात आणि विशेषतः राजकीय सत्तेच्या क्षेत्रात, आपापल्या सत्तासामर्थ्यासाठी आणि वर्चस्वासाठी वेडे होऊ लागले होते असे हे बेंद्रे सांगतात.[४]

इस्लामी राज्यकारभारांत हिंदुंना प्रथम लष्करातून काढून टाकले होते किंवा वगळले जात होते. त्यांचा सैन्य भरतीत जरी उपयोग केला जाई तरी त्यांस अधिकार दिला जात नसे. त्या सर्व कर्त्या व शूर लोकांना मुसलमान अधिकाऱ्यांच्या हाताखालीच आपली नोकरी करावी लागत असे. महाराष्ट्रातील धार्मिक परिस्थिती १७ व्या शतकाच्या सुरुवातीस फारच खालावली होती. याचे कारण म्हणजे चातुर्वर्णाश्रम धर्माची विधी आचारसंहिता फक्त त्रैवर्णियानांच लागू होती. हिंदुच्या मुख्य शिवाच्या देवालयात चतुर्थवर्णाला जाण्याची बंदी होती. तसेच आर्यसंस्कार, आचारधर्म आचरण्यास मज्जाव होता. अध्ययनास त्यांना अधिकार नव्हता. क्षत्रिय वैश्यास अध्यापनाची परवानगी नव्हती. रजपूत-क्षत्रिय-मराठा घराण्यांत पंडित, पुराणिक, उपाध्ये यांची कुटुंबे परंपरागत बाळगिली जात; परंतु इतर क्षत्रिय व वैश्य यांना वैदिक ब्राह्मणांचे साह्य न मिळाल्याने त्यांना आपले कार्य कसे तरी भागवून घ्यावे लागत. असे सांगून बेंद्रे म्हणतात की, इतकेच नव्हें तर कित्येक गृहस्थाश्रमी ब्राह्मणांनाही वैदिक ब्राह्मणांची मदत न मिळाल्याने त्यांना आपली लग्नकार्यादी विधिकर्मे तांत्रिक विधीनेच, विशेषतः गोदावरीच्या पश्चिम भागांत उरकून घेण्याची वेळ येत होती. गोदावरीच्या पूर्वेस जरी कांही धार्मिक ग्रंथांचे साठे होते तरी पश्चिम भागांत नवीन वसाहती होऊ लागल्यामुळे त्याप्रमाणांत ते तेथे नव्हते. १७ व्या शतकाच्या प्रथमार्धापर्यंत तरी पुष्कळ गांवांत विधिकर्मे करणे दुरापास्त झाले होते.[५]

धार्मिक उपासनेबाबत सर्वच क्षत्रियवैश्यांना शिवोपासनेच्या देवळांतील प्रत्यक्ष पूजेस प्रतिबंध होता. तसाच तो उपासनेबाबतही होता. योगमार्ग व संन्यास फक्त ब्राह्मणांनाच मर्यादित होता. सर्व त्रेवर्णिक स्त्रियांचीही शूद्रांतच गणना केली गेली होती. त्यामुळे शूद्रांनी अनार्य देवतांची उपासना घेतली. क्षत्रियांनी शिवाचीच दुसरी रूपे कल्पून उपासनेस सुरुवात केली व या धार्मिक बहिष्काराला कंटाळून क्षत्रियवैश्यांनी सुधारणावादी किंवा प्रगमनशील ब्राह्मणपंडितांच्या साह्याने नाथपंथ, महानुभावपंथ, भागवतधर्म, गोसावीपंथ, वारकरीपंथ आदि स्थापून सर्वही चार वर्णीय स्त्रीपुरूष जनतेला ईश्वरोपासनेंत तरी एका समान पातळीवर आणिले; परंतु या पंथियांचा प्रचार आडवळणी असलेल्या मावळकोकण भागांत १७ व्या शतकापर्यंत तरी फारसा झाला नव्हता. ब्राह्मणांतही अध्ययनास वाव न राहिलयाने व इस्लामी सलतनतींत उघड समारंभाने देवोपासना

करणे कठीण झाल्याने त्या जरा जपूनच कराव्या लागत असत असे वा. सी. बेंद्रे सांगतात. यामुळे महाराष्ट्रीकांत जी एकात्मतेची भावना निर्माण व्हावयास पाहिजे होती ती १७ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत तरी निर्माण झालेली नव्हती.[६]

[क] सामाजिक परिस्थिती :

१६ व्या १७ व्या शतकातील महाराष्ट्रीकांची सामाजिक परिस्थितीही तितकी संघटीत राहू शकली नव्हती. गोदावरीच्या पूर्व भागात राहणाऱ्या हिंदी धर्माच्या त्रैवर्णियांना बहामनी शाहीच्या चाकरीत इस्लामियांच्या सान्निध्यांत आपल्या आचारविचारात बराच बदल करावा लागता होता. ही सर्व मंडळी जातिनिष्ठ राहिल्याने यांचे सामाजिक गटही मर्यादित स्वरूपाचे राहिले होते. याशिवाय कामाची व व्यवसायाची वाटणीसुद्धा जातिनुसारच झालेली असल्याने हे सर्व गट एकमेकांपासून अलग अलग वागत होते. राजकारणात इस्लामी राज्यकर्ते स्थानिक लोकांना फारसा अवसर देत नव्हते आणि धर्मकारणांत त्रैवर्णिकाखेरीज म्हणजे महाराष्ट्रीकांच्या जवळ जवळ ९० टक्के जनसमूहाला धार्मिक गटापासून दूर ठेविलें जात होते. त्रैवर्णिकातील तिन्हीही वर्ण अलिप्ततेंतच वागत होते. त्यामुळें महाराष्ट्रीकांची सामाजिक संघटना होणें जरा कठीणच होते, असे बेंद्रे सांगतात.

राजधानीत किंवा मोठ्या बाजारपेठेत अशी परिस्थिती असली तरी ग्रामणी भागांत एक प्रकारची मग ती कितीही संकुचित प्रवृत्तीची असो, सामाजिक संघटना मात्र नांदत होती. बेंद्रे म्हणतात महाराष्ट्राच्या पश्चिम भागांत १६ व्या शतकापासून नवीन वासहतींची निर्मिती होऊ लागली होती. गावें वसवितांनाच ही संघटना अमलांत आणल्याने ही गावें स्वतंत्रपणे आपली स्वायत्तता भोगीत होते असें दिसते. सर्व गावकरी एकमेकांवर अवलंबून असल्याने ते परस्परांचे पुरस्कर्ते होत अशीच त्यांची समजूत होती. गांवकरी जशी आपापसांतील भांडणे तोझ्याची काळजी घेत तशीच निसर्ग अथवा मानवी कोपाने झालेल्या नुसकसानीचीही भरपाई सामाजिकपणें करून देण्यास तत्पर असत. राजखंड दिला की ते स्वतंत्र असत व एका विचाराने वागत. त्यांना मनमोकळेपणाने आपली घरें साध्या कुडाचीं का असेनात, गांवकऱ्यांच्या व जबाबदार लोकांच्या हवाली टाकून, शेतीच्या कामात दिवसभर जातां येत होतें. इतकेच काय पण संकटप्रसंगांत जरूर ती मदत गांवातून तात्काळ मिळत असे; परंतु ही गांवसंघटना महाराष्ट्रीकांच्या धार्मिक व सामाजिक म्हणजे आचारधर्माशी निगडित होती असें नाही. अखिल

महाराष्ट्रिकांच्या सामाजिक संघटनेसाठीं राजकीय व धार्मिक बाबतींत सामान्य जनतेंत जे आकर्षण किंवा ओढ असणें जरूर असते. ती ओढ तत्कालीन जनतेला, विशेषतः चतुर्थ वर्णाला दूर ठेवल्यानें राजकीय व धार्मिक क्षेत्रांशीं त्याचा थोडाही संबंध राहू न दिल्याने त्यांच्यांत निर्माण होणें कठीण होते. उलट या ग्रामीण भागांतील लोकांनी आपलीही परधर्माकडे वृत्ती राहावी म्हणून नाग व इतर लोकांच्या देवदेवता व चालीरीती यांचा पुरस्कार केला होता. त्रैवर्णिकांच्या देवांचा आसरा मिळत नसला तरी जरीआई, मरीआई, कालभैरवादींचा कौल त्यांना त्यांच्या संकटांतून मुक्त करण्यास कारण होत असल्याचें पाहून त्यांनी समाधान मानलें आणि हिंदू धर्मातील आचारविचारांची मुळीच पर्वा केली नाही.[७] असे सामाजिक परिस्थितीचे वर्णन वा. सी. बेंद्रे करतांना आपल्याला दिसतात.

[ड] भौगोलिक परिस्थिती :

१६ व्या १७ व्या शतकातील महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थिती संदर्भात सांगतांना वा. सी. बेंद्रे म्हणतात की, महाराष्ट्राचे दोन भाग पडतात. एक गोदावरीच्या पूर्वेचा व दुसरा गोदावरीच्या पश्चिमेचा. महाराष्ट्राचा हा पूर्व भाग राजमार्गावर म्हणजे उत्तर दक्षिण प्रदेशांच्या हमरस्त्यावर व नवीन वसाहतींना सोपा व समृद्ध होता, तर पश्चिम भाग डोंगरदरींचा असल्याने दळणवळणाला तितकासा दुर्घट व सुपीकही नव्हता. आरबी समुद्रकाठांचा भाग सपाट असला तरी नद्यांच्या दूरवर विस्तारामुळे वसाहतींना फायदेशीर किंवा योग्य नव्हता. डोंगरदरींच्या भागांत पावसाळ्यांत भरपूर पाणी असलें तरी नंतर नदी-नाले कोरडेच राहात. सह्याद्रीची रांग ओलांडून एका बाजूने दुसरे बाजूस जाण्यास वाटही तशाच फार नव्हत्या. एक वाट गोव्याच्या बाजूने कोकणांतून उत्तरेस जावयाची, दुसरी वाट पन्हाळ्यावरून आणि तिसरी कलखिंडीने पेण-उंबरखिंडी वरून कऱ्हाड-प्रतापगड ही वाट डोंगरातून होती. या वाटा इतक्या अवघड होत्या की, त्यांतून सेनासमूह दाणागोट्यासह नेऊन लढाईचा प्रयत्न करणे अवघड होते. बाजारपेठांचा अभाव व पाण्याची कमतरता सैन्याला अति-त्रासदायक होत होती. शिवाय डोंगरदरींतील युद्धाला स्थानिक लोकानांच अधिक सोईस्कर व थोड्या श्रमानें त्यांस यश मिळवून देणारे असे स्थान होते.

या प्रदेशा-विरोधात गोदावरीच्या पूर्वेकडील प्रांताची परिस्थिती होती. जमीन सपाट, त्यामुळे रहदारीचे मार्ग सुकर व नद्या समृद्ध त्यामुळें रहदारीचे मार्ग सुकर व नद्या समृद्ध त्यामुळें

पाण्याची अडचण कमी. शिवाय व्यापारी वाहतुकीचे मार्ग याच भागांतून जास्त असल्याने समाजाची रहाणी पुष्कळ सुधारलेली होती. महाराष्ट्राची आर्यसंस्कृती याच भागांत केंद्रीत होऊन राहिली होती. अर्थात या भागांतील वसाहती अधिक प्रगतिपथावर होत्या, उत्तर हिंदुस्थानातून दक्षिणेंत उतरण्याचे मुख्य मार्ग याच भागातून आलेले आहेत. गोदावरी ओलांडून पुण्यापर्यंत येण्यास इंदापूरावरून मार्ग मोकळा होता. जुन्नर-संगमनेर-नाशिक हा ही मार्ग सोपा होता. नगर-सोलापूर-विजापूर हाही मार्ग रहदारीचा होता; परंतु पुण्याच्या खाली मावळा प्रांतात किंवा कोकणांत जाणें अवघड होते, असे सांगून बेंद्रे पुढे सांगतात की, गोदावरीचा पूर्व भाग समृद्ध असल्याने रहदारीस व वसाहतीस चांगला होता. गोदावरीच्या पश्चिम भागांत सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंतचा भाग जरी रहदारीस तापदायक नव्हता तरी तो सुपीक नव्हता, रूक्ष होता. हा प्रदेश जरी दऱ्याखोऱ्यांचा नव्हता तरी टेकाड माळरान होतें आणि नद्यांना इतरवेळी उतार असला तरी पावळ्यांत सर्व नदी-नाले फार वेगाने वाहत. त्यामुळे या भागांतील वसाहती फार विरळ असत आणि त्याही अगदी ग्रामीण स्वरूपाच्या असत. या भागांत थोड्या बाजारपेठा वसविल्या गेल्या होत्या.[८]

३.३ 'मराठा' संदर्भात वा. सी. बेंद्रेंनी दिलेली माहिती

'मराठा' नावाची उत्पत्ती सांगतांना बेंद्रे राजवाड्यांचा संदर्भ देतात ज्यात "महाराष्ट्रिक लोक ज्या काळी दक्षिणाख्यांत वसाहती करण्यास उतरले त्या काळी त्यांना ह्या प्रदेशांत त्याच्याहूनही संस्कृतीनें कनिष्ठ असे दुसरे एक लोक भेटले. हे लोक म्हणजे नागलोक. हे नागलोक जनमेजयाच्या वेळची ही जुनाट संस्कृत म्हणजे वैदिक भाषा तिचा अपभ्रंश हे नाग लोक बोलत. या नाग लोकांची एकंदर संस्कृती महाराष्ट्रीकांच्या संस्कृतीहूनही खालच्या दर्जाची होती. ह्यांशी शरीरसंबंधादी मिलाफ महाराष्ट्रीकांचा होऊन हळूहळू महाराष्ट्रीक व नाग यांच्या मिश्रणापासून एक नवीन राष्ट्र उत्पन्न होत होते... नागांची मूळ भाषा अजिबात लोपून गेली व ते वैदिक भाषेचा अपभ्रष्ट उच्चार करून ती आर्यभाषा बोलूं लागले. महाराष्ट्रीकांचा व नागांचा जेव्हा दक्षिणेंत संगम, सहवास व शरीरसंबंध झाला, तेव्हां ह्या दोन अपभ्रष्ट आर्यभाषांचा मिलाफ होऊन दोन्हींच्या संगमातून मराठी भाषा जन्मास आली.... तात्पर्य, महाराष्ट्रिकांचा व नागांचा मिलाफ शकोत्त पांचशेंच्या सुमारास परिपूर्ण होऊन, केवळ महाराष्ट्री भाषा बोलणारे लोक महाराष्ट्रांत राहिले नाहीत. महाराष्ट्री भाषेला असा हा मृत्यु नागांच्या संमेलनाने आला.

महाराष्ट्रिकांची संस्कृती नाग लोकांच्या संस्कृतीहून किंचित श्रेष्ठ असल्यामुळें नाग-महाराष्ट्रिकोत्पन्न नव्या लोकांना मराठे हें नांव महाराष्ट्रिक ह्या नांवावरून प्रचलित झाले...."[९]

मराठ्यांच्या कलास्थापत्यासंदर्भात योगदानाबद्दल राजवाड्यांनी जे लिहिले त्याचा उल्लेख बेंद्रे करतांना दिसतात ज्यामध्ये "सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव इ. उत्तरेकडील साहसी राज्यकर्त्यांनी दक्षिणेत जी साम्राज्ये उभारली ती परकीय व अल्पसंख्याक परंतु संस्कृतीने वरचढ अशा लोकांनी कमतर संस्कृतीच्या महाराष्ट्रिकांवर उभारलेली अधिराज्ये हे लक्षात ठेविलें पाहिजे. सातवाहनांचे विहार, चालुक्यांची व यादवांची सुंदर देवालये व राष्ट्रकुटांची लेणी ह्या परकीय राजकर्त्यांच्या राशियतींतील स्थापत्यकला विषयक प्राविण्याची साक्ष देतात. फर्दापूर व दौलताबाद येथील मूर्तीकर्म ह्या राज्यकर्त्यांच्यावेळच्या अद्‌भूत कारागिरींची मूर्तिमंत स्मारके आहेत. पण ह्या परकीय स्थापत्यकलेचा, मूर्तीकर्माचा किंवा चित्रकलेचा गंधही महाराष्ट्रिकांना कधी शिवलेला दिसत नाही. हे परकीय राज्यकर्ते अस्तंगत झाल्याबरोबर त्यांच्या कलाही त्यांच्याबरोबर अस्तास गेल्या. ह्या कला जर महाराष्ट्रांतील मरहट लोकांच्या असत्या तर चालुक्य, राष्ट्रकुटादी राज्यकर्ते गेल्याबरोबर देशांतून त्या समूळ नाहीशा झाल्या नसत्या. पुढे मराठ्यांच्या अमलांत त्या पुन्हां उदयास आल्या असत्या म्हणावे तर दोन अडीचशें वर्षाच्या मराठ्यांच्या अमदानींत एकही देऊळ किंवा एकही मूर्ती किंवा एकही चित्र असें दाखवितां यावयाचे नाही की जे चालुक्यादींच्या देवालयाशी किंवा मूर्तीशी किंवा चित्रांशी दूरचीही बरोबरी करील...."[१०]

मराठा म्हणजे कोण? या संदर्भातही वा. सी. बेंद्रे, कै. वि. का. राजवाडे यांचाच संदर्भ देतात ज्यामध्ये "शहाजीकालीन मराठे म्हणजे... नाग-महाराष्ट्रिकोत्पन्न मऱ्हाटा आण जे लोक आपणास मराठा क्षत्रिय म्हणून म्हणविणारे, परंतु तत्संबंधक मराठा क्षत्रिय ह्या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र देशांत कांही शतकें राहिलेले उत्तर हिदुस्थानातील क्षत्रिय असा होता... ह्या महाराष्ट्रदेश निवासी मराठा क्षत्रियांत चालुक्य, यादव, पल्लव, भोज इत्यादी थोर राजघराण्यांतील क्षत्रियांच्या वंशजांचा समावेश होतो. चाळके, यादव, जाधव, पालवे, भोसले हे शब्द चालुक्य वगैरे संस्कृत शब्दांचे मराठी अपभ्रंश होत.... आणि ह्यांच्याच वंशांत शाहाजी व शिवाजी हे अवतारी पुरूष निपजले..."[११]

गुरू राजवाडे यांच्या चाळीस वर्षामागील मतप्रणालीत नवीन उत्खनन संशोधनानें काही थोडा फरक जरी झाला असला तरी महाराष्ट्र राज्याच्या सुरुवातीचा घटक प्रदेश राजकीय, सामाजिक व धार्मिक बंधारणेच्या बाबतीत तितकासा प्रगत नव्हता ही गोष्ट सर्वांनाच कबूल करणे प्राप्त होत आहे. बहामनी राजकारकिर्दीतील मावळ-कोंकण भागांतील लढायांची वर्णने पाहिली तर हा दाट जंगली विभाग थोड्याही सैन्याच्या संघटीत प्रवासाला फार दुस्तर होता. पुष्कळशा डोंगरी भागांत वसाहत झालेली नव्हती. वर्षाऋतू सोडला तर निर्भेळ पिण्याच्या पाण्याची बरीच दुर्भिक्ष्यता होती. दूरदूरच्या अंतरावर असलेल्या लहानशा खेड्यांतून धार्मिक रुढींचे पालन होऊ शकेल अशी उच्चवर्णीय कुटुंबांच्या अभावी परिस्थिती राहिली नव्हती. आर्यसंस्कृतीची प्रतीके म्हणजे शंकराची देवदेवळे दशक्रोशीतही मिळणे दुरापास्त होते. उलट जरीआई, मरीआई आदी ग्राम व कुलदेवाताचेंच गावोगावी फार बंड माजून राहिले होते. षोडश संस्कारांपैकी बरेचसे संस्कार योग्य मार्गदर्शनाच्या अभावीं आणि इतर कारणांमुळें लोप झाले होते. खेड्यांचा तर राजघटनेशी क्वचितच संबंध येई, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. खेड्यात देशमुख, देशपांडे हेच ग्रामीणांचे धनी होते. त्यांच्याशीही प्रत्यक्ष संबंध क्वचितच येत असे.

सारांश, खेडे ही एक घटकसंस्था जरी सामाजिक बाबतीत स्वयंपूर्ण व पूर्ण एकोप्याने नांदत होती तरी तिला बाहेरच्या जगाशी कोणताच शत्रुमित्रभाव अगर जिव्हाळा राखण्याची जरूरत भासत नसे.[१२]

३.४ भोसले वंशाच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

बखरकारांना राजकीय घटनेतील अनुवंशिक गुणपरंपरेपेक्षा जन्मजातिस्थानाचे महत्त्व अधिक भासत होते. त्यांना तो काळही तसाच होता. असे असूनही 'सभासदी' बखरींत फक्त मालोजीपासूनच सुरुवात केली आहे. इतकेच नव्हे तर त्याला 'बंदी'त राहूनही शाहाजीच्या इतर स्त्रियांची व मुलांची माहिती देतां आलेली नाही! केवळ अवास्तव त्यानें पूर्वीची काहीही माहिती देण्याचा प्रयत्न केला नाही असे दिसते, असे बेंद्रे म्हणतात.

चित्रगुप्ताला नवीन काहीच माहिती नव्हती त्याने 'सभासदी'चाच विस्तार केलेला आहे. तरीही त्याने शिवाजीच्या थोरला सख्खा भाऊ संभाजी याचा तरी उल्लेख केला आहे हे महत्त्वाचे, असे बेंद्रे म्हणतात. 'शिवदिग्विजयां'त बाबाजीपासून माहिती येते; परंतु बाबाजी हा भोसाजीऐवजी 'काकाजी' भोसिले याच्या वंशांतील असे म्हटलें आहे. 'एक्याण्णव कलमी', 'रायरी व मराठी

साम्राज्याची छोटी बखर' यांत बाबाजी भोसल्यापासूनच सुरुवात केलेली आहे. यांतील शेवटच्या बखरींत न. बा. मोडक यांनी जोडलेल्या परिशिष्ट नंबर १ मध्ये "भिमासिंग-विजयभान-खेळकर्ण (हा दक्षिणेस आला) -जयकर्ण-महाकर्ण-शिवबाबाजी (हा वेडा होता)" अशी माहिती दिली आहे. परंतु हे टिपण १८१७ चे आहे. 'तारिखे-इ-शिवाजी'त रामासिंगाचे पुत्र रामसिंघ व बाघसिंघ होते. त्यांतील बाघसिंघ म्हणजे इतर बखरींतील बाबाजी होय, असे बेंद्रे सांगतात. 'शेडगांवकर भोंसलें यांच्या बखरी'त "सजणसिंह-दिलीपसिंह-सिंव्हाजी भोसाजी (या देशी आले)-देवराज-इंद्रसेन-शुभकृष्ण-स्वरूपसिंह-भूमींद्र-यादजी-धापजी-बऱ्हाटजी-खेलकर्णजी व मालकर्णजी" अशी १४ नावें दिली आहेत. त्यानंतर मजकूर असा : "येकंदर पुरुष चौदा त्यांपैकी खेलकर्णजी महाराज व मालकर्णजी महाराज असे दोघे बंधू हे दक्षिण देशी आल. ते आमेदशा पातशाहा दौलताबादकर यांस येऊन भेटले... खेलकर्णजी महाराज हे लढाईत ठार जाहाले व मालकर्णजी महाराज या उभयतां बंधूंनी त्या लढाईत मोठी कीर्ति केली... कोणे एके दिवशी भीमा नदी... चासकमाण... गाव... तेथे डोहांत क्रीडा करावयास गेले असतां त्या डोहांत गायफ जाहाले... ते समई त्याचे पुत्र बाबाजी राजे हे लहान होते..."

मल्हार रामराव चिटणीस यांच्या 'सप्त प्रकरणात्मक शिवाजी महाराजांच्या चरित्रात' मागची कित्येक पिढ्यांची कुलकट पुराणांवरून दिली आहे. भोंसलेचा थेट सूर्यनारायणाशी संबंध जोडून दाखविला आहे. मात्र भोंसलेचा गुरू-उपाध्ये यांच्या घराण्यांतून चौकशी घेऊन निदान सात आठ पिढ्यांची तपशीलवार माहिती सत्य स्वरूपांत मिळविण्यासारखी असतांनासुद्धा ती मिळविण्याची चिटणिसांना बुद्धी झालेली नाही. पेशवाईअखेर १९ व्या शतकाच्या प्रारंभी प्रतापसिंहाच्या कारकिर्दीत भोसलेंच्या वंशवेलाबाबतच्या दंतकथांचा जो परिपाक केला गेला होता त्याचेंच प्रतिबिंब या बखरीत दिसत आहे, असे बेंद्रे म्हणतात.[१३] यानंतर बेंद्रेंनी प्रतापसिंह महाराजांनी भोसल्यांची जी वंशावळ निर्माण केली तिचा त्याचबरोबर उदेपूरच्या वंशावलीचा, बृहदेश्वराच्या देवळावरील शिलालेखात भोसले घराण्याच्या वंशवेलाबद्दल बरीच माहिती आली आहे. तिचा, तसेच 'संगीतमकरंद' या संस्कृत ग्रंथात सुरूवातीस शाहाजी महाराजांच्या वंशाचा थोडा विस्तार केला आहे. त्याचा, तसेच तंजावरच्या वेकंटभटाने दिलेल्या वंशावलीचा तसेच काही फर्मानांचा आणि पेडगांवच्या इनामतीबद्दल मिळालेल्या पत्रांचा बेंद्रेंनी अभ्यास केला आणि या वंशावलीसंदर्भातील विविध अडचणींची माहिती दिली.

भोसले वंशवेल :

[१] शुभकृष्ण (इ. १४२७ नंतर)

[२] रुपसिंहजी (इ. १४४६ नंतर)

[३] भूमींद्रसिंहजी (इ. १४६६ नंतर)

[४] धापजी (इ. १४८५ नंतर)

[५] बरहटजी वा बहिरवजी (इ. १५०४)

[६] (अ) खेलकर्ण ऊर्फ खेळोजी (१५२३-१५४५ इ.)

पुत्र परसोजी (१५४२-१६२१ इ.), पौत्र एकोजी (१५६३-१६२९ इ.)

(ब) मालकर्ण ऊर्फ मालोजी (१५२७-१५५५ इ.)

[७] बाबाजी (मालोजीचा पुत्र १५४८-१५९९ इ.)

[८] (अ) मालोजी (१५७०-१६०६ इ.)

(ब) विठोजी(१५७३-१६१० इ.)

पुत्र - (१) संभाजी, (२) खेळोजी, (३) परसोजी, (४)नागोजी,

(५) मयाजी, (६) त्रिंबकजी, (७) मकाजी, व (८) मालोजी

[९] (अ) शहाजी (मालोजीचा पुत्र) (१६०१-१६६४ इ.)

(ब) शरीफजी (१६०३-१६२४ इ.) - पुत्र - त्रिंबकजी

[१०] १. (अ) संभाजी (१६२०-१६८० इ.)

- उमाजी (१६५४ इ.)

(ब) शिवाजी (१६३०-१६८० इ.)

(क) एकोजी (१६३१-१६९४ इ.)

२. शभोजी व तुलजाजी

[११] (अ) संभाजी (शिवाजीचा पुत्र)(१६५७-१६८९ इ.)

पुत्र शाहू (१६८२-१७४९ इ.)

(आ) राजाराम (१६७१-१७०० इ.)

पुत्र - शिवाजी व संभाजी

वरील योजना अंदाजाने रचण्यात आलेली आहे. त्यांतील (१) शुभकृष्ण, (६) खेलोजी व मालजी, (७) बाबाजी, (८) मालोजी, (९) शाहाजी, (१०) शिवाजी आणि (११) संभाजी यांच्याविषयी निश्चित पुरावे आहेत. बाकींच्या बाबत नक्की कागदोपत्री पुरावे उपलब्ध होईपर्यंत त्यांचे तपशील अनिश्चितच राहणार असे बेंद्रे सांगतात व भोसले वंश फार पुरातन असून त्यास राणा ही पदवी पुरातन कालापासून चालत आलेली आहे. ती ते लावीत आले. बहामनी राज्यांतही त्या किताबाला मान्यता होती हें इ. स. १४७० च्या फर्मानावरून सिद्धच आहे. त्यानंतर ते आपणास राजे म्हणवूं लागले. राणा या शब्दाऐवजीं राजा हा मराठी शब्द त्यांना अधिक सोईस्कर वाटला. तसे पाहिलें तर मराठ्यांच्या ९६ कुळांपैकी ७-११ च कुलें राजघराणीं म्हणून मानलीं जात होती व तीच मंडळी आपल्या नांवापुढें क्षत्रियवंशाचा बोध करून देण्यासाठीं राजा हे उपपद जोडीत. त्या विशिष्ट कुळांपैकी भोसल्यांचे एक कुल होते. ज्या महाराष्ट्रीय क्षत्रियांनी आर्यसंस्कृतीचा व संस्कारांचा विसर पडू दिला नाही त्यापैकी हे एक आघाडीवरील घराणें होतें, असे बेंद्रे म्हणतात.[१४]

३.५ बाबाजी राजे भोसले संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

(क) बाबाजीचा जन्म व बालपण :

बाबाजीराजे व मालोजीराजां संदर्भात बखरकारांची फार गफलत झालेली आहे, असे वा. सी. बेंद्रे सांगून स्पष्ट करतात की, या बखरकारांना तत्कालीन परिस्थितीची निटशी कल्पना नव्हती. बेंद्रेंनी सभासद बखर, चित्रगुप्तारची बखर, एक्याण्णव कलमी बखर, शिवदिग्विजय, तंजावरचा शिलालेख, श्रीमंत महाराज भोसले अथवा शेडगांवकर भोसले बखर, विविध पत्रे यांचा अभ्यास करून बखरकारांनी भोसले घराण्यासंदर्भात घातलेला गोंधळ दूर केला. बेंद्रे लिहितात, "बाबाजी व परसोजी हे दोघे सख्खे चुलत भाऊ एकत्रित कुटुंबात राहत असत. पण या दोघांच्या कौटुंबिक संबंधाबाबत बखरकारांनी बराच गोंधळ घालून परसोजीस बाबाजीचा बाप दाखविले आहे. परंतु शेडगांवकर बखरींत बाबाजी हा मालकर्णचा पुत्र म्हणून लिहिले आहे ते वस्तुस्थिती निदर्शक आहे हें पैठणच्या राजोपाध्ये यांच्या खतावणींतील नोंदीवरून सिद्ध होते. बाबाजी हा मालोजीचा मुलगा ठरला तर साहजिकच परसोजी हा खेलोजीचाच मुलगा होता असें अनुमान करणें भागच होतें. काही बखरीत बाबाजीचा वंश हा काकाजीचा म्हणून म्हटले आहे,

तोही ह्या मुख्य शाखेतील परसोजीकाकाचा हेच दर्शवीत असले पाहिजे. कालबोध झाला नसल्यानें या काकाजीला वेगळे स्वरूप दिलें गेलें असावे इतकेच."

सारांश, वरील विवेचनावरून परसोजीचा जन्म इ.स. १५४५ ते १५४८ व बाबाजीचा जन्म १५४९ ते १५५१ मधील गृहीत धरावा लागतो आणि बखरकारांनी दिलेल सर्व जन्मकाल चुकीचे आहेत हे निःसंशय सिद्ध होते, असे वा. सी. बेंद्रे निर्दशनास आणून देतात.

बाबाजी व त्याचा चुलतभाऊ परसोजी यांस त्यांच्या मातांच्या मार्गदर्शनाखाली वाढावे लागलें. कारण बाबाजीचा पिता मालोजी इ.स. १५५० ते १५५२ दरम्यान चाकण परगण्यांतील चाकसमाण गांवी जलक्रीडा करीत असतांना बुडून मेला असावा तर खेलोजी इ.स. १५४६ च्या किंवा १५४८ च्या आदिलशाही बरोबरील लढ्यात मारला गेला असावा. असे मानावे लागते या दोघांचेही मृत्यू वयाच्या २५ ते ०२२ व्या वर्षी झाले असावेत. मालोजीच्या मरणानंतर बुऱ्हाण निजामशाहीनें त्यांचे संरजाम जप्त केले त्यावेळी खेलोजीच्या मुलांचे म्हणजे परसोजीचे वय पांच व मालोजीच्या मुलाचे म्हणजे बाबाजीचे वय दोन असावे, असे बेंद्रे सांगतात.[१५]

मोकदमी व पाटीलकीबाबतच्या सर्व इनाम जमिनी व हक्क हेच त्यांना आपल्या जीवनाचे विषय करावे लागले होते. त्याच व्यवसायांत त्यांचे सर्व बालपण गेले. त्यांच्या वडिलांनी जी एक मनुष्यबळ संपत्ती जोडली होती ती बाबाजी व परसोजी यांना टिकविणे शक्य झाले नाही. शिवाय त्यांच्या पित्यांच्या वेळचे बारगिरदार सैनिक दुसऱ्या सरदारांच्या नोकरींत शिरल्यानें त्या लोकांची परत जुळवाजुळव करण्याइतकी त्यांची परिस्थितीही राहिली नव्हती. त्यामुळे बाबाजीराजे प्रथम मातेबरोबर वेरूळ-घृष्णेश्वर येथे राहत होते.

(ब) बाबाजीचे लग्न :

बाबाजी मोठे झाल्यावर त्यांचे वेरूळ-घृष्णेश्वर येथेच मातोश्रीने लग्न लावून दिले. बाबाजीच्या बायकोचे नाव रेखाऊ होते, असे तंजावर लेखात म्हटले आहे; परंतु याबाबतीत सांगण्यासारखा कांही निर्णयात्मक पुरावा उपलब्ध झालेला नाही. बाबाजी स्वतःच्या हिंमतीवर कारभार पाहू लागेपर्यंत त्यांच्या मातोश्रीला गुमास्त्यांवरच विसंबून आपल्या मोकदम्या वगैरेंचा सांभाळ करावा लागला होता. बाबाजी मोठे होताच ते आपल्या भीमतीरावरील देऊळगाव ऊर्फ पाटस, खानवटे व कसबे जिंती येथील मोकदमी वा पाटीलकीचा बंदोबस्त करण्याकरितां गेले. बंदोबस्त होतांच ते परत वेरूळात आले.

(क) पुत्र प्राप्ती व बाबाजींचा मृत्यू :

बाबाजी राजे यांचा जन्म १५५० इ. चा असल्यानें बाबाजीराजे यांचे लग्न १५५२-५३ इ.स. नंतरचे व त्यांनी देऊळगांव बाजूची व्यवस्था जी मोडकळीस आली होती व उत्पन्न कारभारीत खात होते ती पुन्हा नवीन कराराने कामगारांकडे सोंपवून देण्याचा काल फार तर १५७५-७६ सुमारास व त्यानंतर त्यांस मालोजी इ.स. १५७६-७७ व विठोजी इ.स. १५७९-८० च्या सुमारास पुत्र झाले. नंतर "बाबाजी हे मातोश्री व आपल्या कुटुंबासह वेरूळाहून देऊळगांवास येऊन राहिले. पुढे कांही दिवसांनी बाबाजी राजे भोसले यांस देवाज्ञा जाहली आणि उभयंता बंधू सतरा अठरा वर्षेपर्यंत तितक्यात स्वास्तांत (म्हणजे शेतभाताच्या उत्पन्नावर) निर्वाह करून होते." असे शेडगांवकर बखर सांगते.

बाबाजी भोसले इ.स. १५९७ च्या ४ जानेवारीपर्यंत हयात होते हे त्यांच्याच पत्रांवरून सिद्ध आहे. अर्थात मालोजी राजे यांना निजामशाही सरंजाम बाबाजीराजे यांच्या मृत्युपूर्वीच मिळाला होता. तेव्हा शेडगांवकर बखरीतील 'उभयंता' बंधू सतरा अठरा वर्षेपर्यंत तितक्याच स्वास्तांत निर्वाह करून होते, याचा अर्थ ते त्यांच्या वयाच्या सतरा वर्षांपर्यंत घरींच शेतीवाडी वगैरे ग्रामकाज पाहून होते. सतराव्या वर्षांनंतर देऊळगांवांतील मुक्काम हालवून दौलताबादेस अहमदनगरास आपल्या चाकरीवर रुजू झाले असा घेतल्यास फारसा चुकीचा ठरणार नाही असे वा. सी. बेंद्रे म्हणतात व स्पष्ट करतात की, बाबाजीराजे यांचा मृत्यू १५९७ व १५९९ इ.स. दरम्यानच्या काळांतील आहे.[१६]

(ड) बाबाजीराजेंची संपत्ती (दौलत):

बाबाजी राजांच्या दौलतीचा स्पष्ट उल्लेख असा आढळला नाही; परंतु त्यांचे चुलते खेळोजीराजे व बाप मालोजीराजे यांच्या दौलतीच्या तपशिलांचे टिपण 'सनदापत्रांतील माहिती' या ग्रंथात आले आहे. त्यांत खानदेश प्रांतांतील परगणे बहाळ व भडगांव वऱ्हाड प्रांतांतील परगणे जळगांऊ येथील देशमुख्या व परगणे कनरड प्रांती देशमुखी व कसबे वेरूळ परगणे मजकूर प्रांत दौलताबाद येथील वंशपरंपरागत मोकदमी असल्याचे सांगितले आहे. पंत प्रतिनिधींच्या बखरीत बाबाजी भोसले पाटील मौजे हिंगणी, बेरडी व देऊळगाव वगैरे तर्फ पाटस प्रांत पुणें अशी माहिती आहे. शेडगांवकर बखरीप्रमाणे वेरूळ-घृष्णेश्वर, देऊळगांव, खानवट व जिंती येथील पाटिलक्या बाबाजी सांभाळून होते. उत्तरकालीन कागदपत्रांवरून वेरूळ, देऊळगांव, खानवट, जिंती व

कनरड या गावांच्या मोकदम्या या घराण्यांत मालोजीपूर्वी चालत होत्या याचा पुरावा मिळतो. सारांश, पांच गांवांच्याच मोकदम्या बाबाजीराजे यांच्याकडे होत्या. असें धरले तरी त्यांची सांपत्तिक स्थिती चांगली होती असेंच मानावे लागते. मालोजीला जाधवरावांच्या देवडीवर बारगिरी करण्याइतकी त्यांची परिस्थिती हीन नव्हती हें निश्चित[१७] जसे बखरकरांनी दाखविले आहे.

३.६ मालोजी राजांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

(क) जन्म :

केवळ बखरीवर अवलंबून राहिल्याने मालोजीचा जन्म सामान्यतः इ.स. १५५२ चा असावा असें मानण्यांत आले आहे. बखरकारांना मालोजी राजांच्या पूर्वीच्या पूर्वीच्या किती पिढ्या होऊन गेल्या आणि विशेषतः मालोजीराजे यांचे आजे व पणजे कोण होते हें निश्चित न समजल्यामुळें या बखरकारांच्या कालनोंदणींत एका पिढीचें अंतर पडलेले दिसून येते. हे मालोजी राजांचा आजा जो मालजी/मालोजी त्याच्या मृत्युकालावरून स्पष्ट झालेले आहे. बहिरवजीचा मुलगा खेळोजी यापासून त्यांच्या कारकिर्दीचा काळ पंचवीस-तीस वर्षांनी मागे नेलेले आहेत. बाबाजीचाच जन्म जर इ.स. १५४९ नंतरचा तर बाबाजीचा वडील मुलगा मालोजी याचा जन्म इ.स. १५५२ चा कसा येणार? असे बेंद्रे म्हणतात. याचे स्पष्टीकरण बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात - कदाचित वर दर्शविल्याप्रमाणें इ.स. १५५० ते १५५२ ही नोंद बाबाजीच्या जन्माची असण्याची शक्यता आहे. सारांश, मालोजीचा जन्म १५७० इ.स. च्या मागे नेणें वस्तुस्थितीला धरून होणार नाही. विठोजी अर्थात नंतर तीन वर्षांनी जन्मला असावा. मात्र मालोजी व विठोजी यांच्या जन्मामधील अंतर एक वर्षाचे असणे शक्य नाही.[१८]

(ख) विवाह :

शेडगांवकर बखरीप्रमाणे मालोजीच्या बायकोचें माहेरचें म्हणजे वणंगपाळ किंवा जगपाळ निंबाळकरांकडील नांव दीपाबाई व सासरचें नांव उमाबाई होतें यात शंका नाही, असे बेंद्रे म्हणतात. या संदर्भात बखरकारांची ही एकवाक्यता आहे. त्याकाळी साधारणतः मुलीचीं ८ वर्षाच्या आत व मुलांची १२-१६ व्या वर्षी लग्नें होत होती. मालोजीने प्रथम वणंगपाळ निंबाळकरांकडे नोकरीत जाऊन पराक्रम करून दाखविल्यावरून व त्यामुळें त्यास जो सन्मान

निजामशाहीत प्राप्त झाला त्यावरून लखुजी जाधवरावांच्या शिफारसीवरून वणंगपाळानें आपली मुलगी दिली असें शेडगांवकर बखरीत दिले आहे.

न्यायशास्त्री पंडितराव यांच्या बखरींत नाईक निंबाळकर फलटणचे देशमुख यांजकडे जाऊन सोयरीक "लक्ष्मणभट उपाध्ये हे जगपाळराव नाईक यांची बहिण दीपाबाई पाहून लग्न जाहलें." अर्थात या पुराव्यांवरून लग्नाची हकीकत बरीचशी वस्तुस्थितीला धरून आहे असें दिसते. परंतु ज्या पराक्रमावरून मालोजीची निवड केली तो निंबाळकर व आदिलशाही सैन्याशी कोल्हापूरजवळ झालेल्या लढाईचा संबंध होय.[१९] 'राधामाधवचिलासचंपू' या काव्यात जयराम लिहितो "तयाचे (बलीपाचे) कुळी माल भूपाल झाला। जयानेजलें शंभू संपूण केला।।८५।। तयाची असे मुख्य राणी उमाई। उमा तितें ऊपमा देऊं काई...।।८६।।" इ.स. १९७२ पूर्वीच्या 'संगीत मकरंदान्तर्गत श्रीशाहाजीयवंशावली'त उल्लेख की, "उमेति नाम्नां किल धर्मपत्नी, मल्लारिराजस्य सुतावसूतः। ....।।१३।।"[२०] सारांश वणगोजी नाईक निंबाळकरांनी आपली मुलगी देऊन मालोजीचा गौरव केला.

(ग) निजामशाहीत प्रवेश व पराक्रम :

मालोजी वणगोजी नाई निंबाळकराच्या पदरी असतांना आदिलशाही व निजामशाही यांच्यात संघर्ष झाला. परिणमी मालोजी १५८८-८९ इ. तील कोल्हापूर लढ्यांत पराक्रम दाखवून लौकिक मिळविला. यानंतर बुऱ्हाणशाहाला हे वीर आपल्या सरदारांचे म्हणजे बाबाजीचे वारस आहेत हे जाणून साहजिकच त्यांस कौतुकानें त्यांच्या आजोबांची दीड-दीड हजारी स्वारांची जी सरंजामी जप्त करून ठेविली होती ती परत देऊन त्यांचा गौरव केला. जाधवरावालाही ह्या घराण्याची पूर्वावार माहिती असल्यानें त्यांनाही या गौरवांत सहभागी होण्यांत आनंद झाला. मालोजी व विठोजी यांनतर दीड-दीड हजारी सरदार झाले. मागील सरंजमावरील नोकरांस पुन्हां अभय देऊन आपल्या पदरीं घेतेले व इ.स. १५८९-९० मध्ये परत आपल्या गांवीं मातापित्यांस भेटण्यास गेले. अर्थात यावेळी मालोजीचे वय १४-१५ वर्षांचे फार त असावें. या वयांत मालोजी-विठोजीकडे पंधरा-पंधराशे स्वारांच्या तैनातीबद्दल जुन्नर परगणा, शिवनेरी किल्ल्यासह, वहिवाटीस आला. त्याची व्यवस्था त्यांनी आपल्यातर्फे चालूं ठेविली व सरंजामी स्वारांचा ताबा घेतला.[२१] असे बेंद्रे सांगतात.

(घ) मालोजी राजेंचे कार्यक्षेत्र :

मालोजीच्या कार्यक्षेत्रांची व कर्तबगारीच्या कालखंडाची सुरुवात मालोजींने आपली दीड हजारी मनसब स्वीकारून दौलताबादेच्या आसमंतात म्हणजे खडकी शहरांतील मालोजीपुऱ्यात किंवा दौलताबादेजवळ वेरूळ घृष्णेश्वरी राहावयास आल्यापासून होते व शेवट तो भाग सोडून नवीन मोठ्या सरंजाम किंवा सुभ्यांच्या सरकारी व्यवस्थेसाठी श्रीगोंद्यास मकरंदपेठ किंवा पुरा बसवून तेथें आपले वास्तव्य हालवीपर्यंत होते, असे बेंद्रे सांगतात व पुढे लिहितात की, मालोजीराजे यांनी श्रीगोंद्यास मकरंदपुरा हा ६०० बिघे जमीन खरेदी करून बसविला व आपलेबरोबर शेख महंमदबाबास नेण्यासाठी त्यास त्या जमिनीतून १२ बिघे बागाईत जमीन दान इ.स. १५९५-९६ पूर्वी दिली व त्याबाबतचें दानपत्रही नंतर करून दिले. मकरंदपुऱ्याकरिता पाच चाहूर जमीन विकत घेतली. ती यापूर्वीच घेतली गेली पाहिजे, हे फारसी मजकुरावरून दिसतें.

शेडगांवकर बखरीप्रमाणे ३० सप्टेंबर १५९५ रोजी स्वप्न पडून द्रव्यप्राप्ती होऊन तें श्रीगोंद्यास शेषप्प नाईकाकडे नेऊन ठेविले असे आहे. त्याचप्रमाणे १२ डिसेंबर १५९६ च्या मालोजीच्या पत्रावरून मालोजीराजे पांडेपेडगांवच्या परगण्यांतील कारभार पाहात असल्याचे स्पष्ट आहे. उलट ४ जानेवारी १५९७ च्या बाबाजीच्या पत्रावरून तोच कारभार बाबाजीराजे व २९ नोव्हेंबर १५९९ पासून परसोजीराजे पाहूं लागले होते असे निश्चित अनुमान करण्यास जागा आहे. यावरून मालोजीराजे यांनी आपला वेरूळ घृष्णेश्वर-देऊळगांव वगैरे कडील कारभार आपल्या वडिलांकडे सोपवून मकरंदपुऱ्यांतील पेठ, वाडा वगैरेंची सोय झाल्यानंतरच बायकामंडळीस श्रीगोंद्यास आणली असावींत.

सारांश, इ.स. १५९७ च्या सुरुवातीपासून मालोजी आपल्या नवीन वाड्यांत येऊन राहिला. बुऱ्हाणनिजामशाहा १ एप्रिल १५९५ त वारला. पुढे चारच महिन्यांच्या कारकिर्दीनंतर इब्राहीम निजामशाहा सप्टेंबर १५९५ च्या सुरुवातीस युद्धांत मारला गेला व नंतर निजामशाही वारसाबाबत तंटा लागला. यावरून बुऱ्हाण निजामशाहानेंच, मालोजीनें इ.स. १५९१ ते १५९५ पर्यंत त्यास जें साह्य केलें, त्यावरून मालोजीला दीड हजारी सरंजामाऐवजी पंचहजारी दौलत करून दिली व त्यासाठी सुपा वगैरे परगणे देऊन अधिक सरंजाम मालोजीच्या हवाली केला.[२२]

(न) १५९१ नंतरच्या मालोजीच्या हालचाली :

१५९१ नंतर निजामशाहीत व आदिलशाहीत भांडणे निर्माण झाली. या आपापसांतील भांडणांत स्थानिक सरदारांस आणि विशेषतः मराठे सरदारांस निजामशाहाच्या नावांने कोणाची ना कोणाची बाजू उचलून धरणे प्राप्त होते. मिआन मंजूची सुरुवातीस अहमदनगकडून उचलबांगडी केल्याने त्यानें दौलताबादेचा आसरा घेतला होता. त्याच बाजूचा मुलूख आपणाकडे लावून घेतला होता. मालोजीची वावी, वेरूळ, घृष्णेश्वर आदि पाटिलकीचीं गांवे मिआन मंजूच्या भागांत असलीं तरी त्यास मिळालेला जुन्नर-चाकण भाग, इंदापूर-सुपा परगणा व बरीचशी मोकदमीचीं गांवे नगरच्या कक्षेतील होती. त्यामुळें हा भाग नेहंगखान व नंतर मलिक अंबरकडे गेल्यानें मालोजीला या कटात सामावून घेणें प्राप्त झालें व ही भांडणे निकरावर येतांच मालोजीला इ.स. १५९७ च्या सुरुवातीस श्रीगोंद्यास आपल्या पश्चिम भागांतील सुभ्याच्या व्यवस्थेसाठीं येऊन राहणें भाग पडले. मातापिता साहजिक पांडेपेडगांव परगण्याचा कारभार पाहून तेथेच राहिली. मात्र दोन्हीही गट निजामशाहाला मानीत असल्यानें मराठे सरदारांना त्यांचेकडून त्रास पोहचला नव्हता. कारण सत्तेसाठी भांडत असतांना परकीय सत्तेपासून निजाशाही वाचविणें प्राप्तच होतें आणि त्याकरितां ते एकजूटही करीत होते. अर्थात मराठे बारगिरांना दोन्ही गटांना सांभाळणें आवश्यक होते. तरीही दोघांच्या भांडणांत त्रास पाहोचूं नये म्हणून मराठे सरदार जरूर ती सर्व काळजी घेत होते. वेरूळ घृष्णेश्वर किंवा देऊळगांव दौलताबाद सोडून नवीनच मकरंदपुरा बसवून श्रीगोंद्यास वस्ती करून राहण्याचें कारण म्हणजे निजामशाहींतील एकंदर परिस्थितीच हे होय. विशेषतः मिआन मंजूचा पक्ष मालोजीला स्वागतार्ह वाटला नसावा, हे यावरून दिसून येते.[२३] असे बेंद्रे सांगतात.

येथपर्यंतच्या निजामशाहीच्या हालचालीत मालोजीनें कोणत्या लढ्यांत भाग घेतला व त्यांत त्यांचे विशेष कार्यकर्तृत्व कसें व कोणत्या प्रकारें दिसून आलें याचा तपशील मिळालेला नाही; परंतु मालोजी व विठोजी या बंधुद्वयांची कामगिरी निजामशाहीस पुष्कळ उपयुक्त झाली असली पाहिजे, यांत शंका नाही. शाहाजीकडे जी इनाम गावें होतीं व नंतर काही विठोजीराजे यांच्या शाखेत चाललीं होती त्यांचे नंतरच्या कागदोपत्री उल्लेख येतात. या व यानंतरच्या पत्रांवरून ही इनामगांवे मलिक अंबरच्या हाताखालील मुलुखांतील आहेत. अर्थात यावरून

मालोजी व विठोजीराजे यांनी मलिक अंबरचीच पाठीराखी शेवटपर्यंत केली असली पाहिजे यात शंका नाही.[२४] असे बेंद्रे म्हणतात.

इ.स. १६०६ च्या सुरुवातीपासून मूर्तझाचें मलिक अंबर विरोधात कारस्थान सुरू झालें व त्याला मे मध्ये बरेंच तीव्र स्वरूप येऊन मलिक अंबर व मिआम राजू यांच्यांत महिनाभर लढा चालू राहिला व मलिक अंबरला माघार घ्यावी लागत होती. याच लढ्यांत परेंड्यापासून जवळच इंदापूरच्या मलिक अंबराकडील मालोजीच्या तळावर हल्ला चढविला व त्यांत मालोजी मारला गेला. इंदापूर परगणा मालोजीकडे होता व तो इंदापूरच्या गढीत येऊन राहात असे.

(च) मृत्यू :

मालोजीच्या मृत्युबद्दल शेडगांवकर बखरींत उल्लेख येतो तो : "नंतर शके १५४२ रौद्रनाम संवत्सरे (१६२० इ.स.) फसली सन १०३१ (३०?) यासाली मालोजी राजे यास देवाज्ञा जाहाली. मुक्काम येरूळ घृष्णेश्वर येथें, त्याचें उत्तर कार्य धाकटे पुत्र शरीफजी राजे याचे हातून केले व शाहाजी राजे यांनी दानधर्म उदंड द्रव्य खर्च केलें." श्रीशिवाजीप्रतापाप्रमाणे "मालोजी यांस काही रोगाची व्यथा उठोन मासपक्ष हैराण राहून कैलासवास केला... नंतर तवाहिरी निजामशाहा पातशा दौलताबादकर.... मृत्युव्यथा उद्‌भव जाला." अहमदशाहा ताहिर इ.स. १५९६ पूर्वीच मेला होता. अर्थात मालोजीच्या मृत्युचा काल चुकीचा आहे. या दोन्हीही बखरकारांप्रमाणे मालोजी कांही आजारानंतर मेला असें होते. उलट कवींद्र परमानंद सांगतो की, तो लढाईत मेला. वेरूळ घृष्णेश्वरी मालोजीच्या मृत्यू झाला ही माहिती पूर्णपणे चुकीची आहे. मालोजी इंदापुरांत वारला हे आतां त्यांच्या घुमटीच्या उल्लेखांवरून सिद्ध होत आहे.[२५] असे बेंद्रे सांगतात.

२३ जुलै १६०७ च्या मलिक अंबराच्या पत्रांत 'मारहम मालोजी भोसले' म्हणजे 'कैलासवासी मालोजी भोसले' असा दोनदां उल्लेख आलेला आहे. अर्थात यापूर्वी मालोजी लढाईत पडला असावा असे बेंद्रे म्हणतात व पुढे शाहाजीच्या पत्राचा उल्लेख करतात हे पत्र २ ऑगष्ट १६०६ चें असून त्यावरून यापूर्वीच निजामशहानें शाहाजीकडे मालोजीच्या सरंजाम सुपुर्त केलेला होते असे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे २८ जुलै १६०६ च्या सरकारी पत्रांत "मवेजिक मालोजी व विठोजी भोसले यास सरगुऱ्होबाबत थल" वगैरे दिल्याचा उल्लेख आहे. त्याअर्थी यापूर्वीच थोडे दिवस मालोजी रणांत पडला असावा व ही माहिती पत्रलेखनात समजण्यापूर्वीची

ही पत्रें आहेत यांत शंका नाही. यावरून मालोजीच्या मृत्युबाबतचा शिवभारतांतील वृत्तांत की तो इंदापूर येथे लढाईत पडला हे फेरिस्ताच्या तत्कालीन तपशिलाला पूर्णपणे जुळतें आहे. त्याचप्रमाणे शाहाजी पाच वर्षांचा व शरीफजी तीन वर्षांचा असला तर साहजिकच मालोजीची उत्तरक्रिया 'धाकटा मुलगा शरीफजी' याचे हातून केली गेली हे ही उत्तरकालीन बखरकारांचे लिहिणें चुकीचें ठरते. त्यांच्या वयोमानाप्रमाणेंही धाकट्या मुलाकडून विशेषतः शाहाजी हजर असतांना, क्रिया करण्याचे कारण नव्हते. 'धाकटा भाऊ' म्हणण्याऐवजी भावानी क्रिया करण्याचे कारण न लक्षांत आल्याने, 'धाकट्या मुलानें' केली म्हणून लिहिले गेलें असावे.[२६] असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

सारांश, सांगतांना वा. सी. बेंद्रे उल्लेख करतात की, मालोजीच्या कार्यप्रवणतेच्या कालांत, निजामशाहीची घडी जी विस्कटून गेली होती ती मलिक अंबराने थोड्याच काळात बसविली. मालोजी मात्र त्यापूर्वीच वर्ष सव्वावर्ष स्वर्गस्थ झाला होता. मालोजीच्या कार्यतत्परतेचा जनमनावर बसलेल्या पगड्यामुळेंच शाहाजीच्या कर्तृत्वाला चांगलीच बैठक लाभली आणि स्थानिक मनुष्यबळ संपत्तीची त्याला पुढे कधीच कमतरता भासण्याचें कारण पडलें नाही.

(छ) मालोजी राजांच्या धार्मिक प्रवृत्तिसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

(१) दानधर्मासंदर्भात मालोजीचा संबंध : मालोजीराजांची आजी आपल्या पतीच्या अकाली मृत्युनंतर वेरूळ घृष्णेश्वरी येऊन राहिल्यानें आणि मालोजीराजांचा जन्मही त्या गांवींच झाल्यानें साहाजिकच घृष्णेश्वरावर त्यांच्या आजीची, मातेची, खास मालोजीची व त्यांच्या पत्नी उमाबाईची भक्ति जडली. मुलतःच हें घराणे शंकरभक्त असल्यानें या मंडळींचा ओढा तेथील २५-३० वर्षांच्या वास्तव्यामुळें प्रसिद्ध व पुरातन घृष्णेश्वराकडे राहिला असल्यास नवल नाही, असे वा. सी. बेंद्रे सांगतात. या घृष्णेश्वराच्या देवालयास व तेथील पुजाऱ्यास या मंडळींकडून बऱ्याच देणग्या मिळाल्या आहेत. मालोजी राजे व विठोजी राजे यांनी देवालयाचा जीर्णोद्धार केला असावा. त्याच्या तपशीलाचा पुरावा जरी उपलब्ध नसला तरी या देवालयांत जे मंदिराच्या प्रकारावर तीन शिलालेख आढळतात त्यातील पहिला : "सेबक येकोजी जैतोजि भोसला", दुसरा "दास मालोजी बाबाजी व विठोजी" व तिसरा "सेवक आऊजि गोविंद हणवत्या" असे आहेत. यावरून या देवालयाच्या जिर्णोद्धारांत या दास मालोजीचा भाग असावा असे अनुमान केल्यास

चूक ठरणार नाहीं, असे बेंद्रे दर्शवितात. उमाबाईनेही तिमणभट बिन दामोदभट यास घृष्णेश्वराच्या अभिषकार्थ दान दिले होते. त्याचा उल्लेख शाहाजी महाराजांच्या १२ डिसेंबर १६४४ पत्रांत आलेला आहे. त्याचाही पुरावा वा. सी. बेंद्रे देतात. त्याचप्रमाणे दि. १७ जानेवारी १६४६ च्या शाहाजींच्या पत्रांचा पुरावा देऊन बेंद्रे सांगतात की, ह्या घृष्णेश्वराच्या देवावर अभिषेक करण्याची वृत्ती वंशपरंपरेने इनाम करून दिली होती. शेडगांवकर बखरीत, एक्याणवकलमी बखरीत, शिवप्रताप, मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत तसेच चिटणीस बखरीत मालोजीला श्रीशंभू घृष्णेश्वर व श्री जगदंबा देवी यांनी स्वप्नात धनप्राप्तीचा दृष्टांत दिला व धनप्राप्ती झाल्याने त्या धनाचा उपयोग धर्मकार्यार्थ केला असा उल्लेख आला आहे. शिवदिग्विजयांतही अशीच कथा देण्यात आलेली आहे.

वा. सी. बेंद्रे - या द्रव्यप्राप्तीचा जो काल बखरकारांनी दिला आहे त्यात एकवाक्यता नाही. शिवाय त्या कालापूर्वीच मालोजीला सरदारी व निंबाळकराकडील मोठी देणगी मिळाली होती. त्याशिवाय मकरंदपुरा नवीनच बसविला असल्या कारणाने शेषाप्पा नाईकाचा वाडा त्यावेळी किंवा पूर्वी नसला पाहिजे. याचा उल्लेख किंवा साक्षही शेख महंमदाच्या दानपत्रांत आलेली नाही, असे बेंद्रे म्हणतात. एकंदरीत या द्रव्यसाठ्यांच्या कथेला विश्वसनीय असा पुरावा मिळालेला नाही. मात्र मालोजीनें या द्रव्यप्राप्तीवर आपले शक्तिसामर्थ्य वाढविलें अशी जी बखरकारांनी कल्पना रूढ केली आहे ती पूर्णपणें अवास्तव आहे, असे बेंद्रे स्पष्ट करतात.[२७]

शिखरशिंगणापूरला, दौलताबादला तळे बांधण्याचे पुरावे मिळतात. शिखरशिंगणापूचे तळे त्यांनी श्रीशंभूच्या चरणी केले होते व त्यानुसार ते बांधल्याचा उल्लेख शेडगांवकर बखरीत येतो. तसेच सभासद, चित्रगुप्त, मराठी साम्राज्याची छोटी बखर, एक्याण्णव कलमी बखर यामध्ये दौलताबादच्या तळ्यासंदर्भात माहिती आली आहे. हे तळे तेथे चैत्रमासी भरत असलेल्या यात्रेच्यावेळी पाण्याची सुविधा व्हावी म्हणून बांधल्याचे उल्लेख मिळतात. यावरून मालोजीनें केवळ धर्मार्थ म्हणून हे तळें बांधून यात्रेकरूंची सोय करून दिली होती यात शंका नाही, असे बेंद्रे सांगतात.

मालोजीने पेडगांवच्या देशमुखीच्या गांवी विठोबा देवाच्या बडव्यास १ चाहूर जमीन दिल्याचे उल्लेख आहेत. तसेच मालोजी राजांनी शेख महंमदबाबासही दान दिल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. मालोजीने शेख महंमदास त्यांच्या ३९-४० व्या वर्षी मकरंदपुरास

आपल्याबरोबर आणले व इ.स. १५९६ मध्ये त्यांना गुंफा वगैरे बांधून दिली. तसेच चाकणच्या ब्रम्हे घराण्यांत ब्रम्हत्वाचा अधिकार चालविला व त्याबाबत १०० होनांचे वर्षासन मालोजीने दिल्याचे उल्लेख आहे.

अशा प्रकारे मालोजींचा दानधर्मांशी संबंध होता.

(२) साधू-संताशी मालोजीचा संबंध : बखरकारांच्या लिहिण्यावरून मालोजी व उमाबाई यांना शाहशरीफ पीराची भक्ती होती असें दर्शविले जातें आणि शाहाजी व शरीफजी ही दोन मुलें म्हणजे पिर-दर्ग्याचा प्रसाद असें भासविलें जाते. कवींद्र परमानंदही म्हणतात, "तौ शाहश्च शरीफश्च सिद्धनामांकितावुभौ" (सिद्धांची नांवे धारण करणारे शाहाजी व शरीफजी हे दोघे)

बेंद्रे म्हणतात, श्री मिरीकरांनी दिलेली दर्ग्यातील दंतकथा जर खरी असेल तर मालोजीची भक्ती पीर-दर्ग्यावर नसून ज्वलंत योग शक्तिसामर्थ्य ज्यांचे अंगी मालोजीला दिसले अशा त्या शहाशरीफ सूफी अवलियावर त्याची निष्ठ बसली होती, असेच म्हणावे लागेल. शाहा शरीफच्या दर्ग्याला शाहाजीच्या कालापासून देणग्या मिळत गेलेल्या दिसतात. मालोजीच्या भेटीच्या वेळीं शाहा शरीफ पीर होऊन बसला असता तर त्या दर्ग्यालाही मालोजीकडून चांगलीच देणगी मिळाली असती; परंतु ती तशी मिळालेली दिसत नाही व तशा तऱ्हेचा उल्लेखही येत नाही. त्याचप्रमाणे आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे आणि ती म्हणजे शाहा व शरीफ असे दोन अवलिये नसून शाहाशरीफ हा एकच अवलिया आहे. शाहा हें त्याच्या गुरुपरंपरेचे द्योतक असे विशेषण असून तें आधी किंवा अंती जोडले जाते. अशा परिस्थितीत मालोजीने आपल्या पहिल्या मुलाचे नांव शरीफजी न ठेवता शाहाजी का ठेवले? सामान्य व्यवहारातही कुटुंबात आजोबा अगर वडील यांचे नांवे त्यांच्या मुलांना किंवा नातवांना त्यांच्या मृत्युनंतर ठेवतात. कदाचित शाहा शरीफ शाहाजीच्या जन्माचेवेळीं हयात असल्यामुळें शरीफ हे नांव न देता त्यास शाह हें परंपरेचे नांव दिले असल्यास थोडीशी या कथेंत उत्पन्न होणाऱ्या शंकेपासून सोडवणूक होऊ शकेल असे बेंद्रे म्हणतात व पुढे लिहितात की, शरीफजी हे नांव भोसले कुलांत शरीफजीच्या जन्मापूर्वी ६ वर्षे व मालोजीच्या जन्मापूर्वी ३० वर्षे म्हणजे मालोजीच्या आजाच्या वेळी प्रचारांत होते असे १४ मार्च १५६८ च्या पत्रावरून स्पष्ट होते. यावरून फार तर इतकें म्हणता येईल की, ही नावें सिद्धांचीही असू शकतील; परंतु या नावांवरून

उमाबाईला नगरच्या पिराच्या नवसाने मुलें झाली असे म्हणण्याला प्रत्यक्ष पुरावा नाही. प्रथम नवसाचे कारण नव्हते.[२८] शेख महंमदबाबास दिलेल्या दानपत्रात 'तुम्ही आमचे गुरू आहांत व आपण तुमचें शिष्य आहों' असा उल्लेख येतो. याचा अर्थ असा की, यांचे गुरुशिष्यांचें नातें पूर्वीच कांही वर्षे जुळलें होतें आणि मालोजीला आपले गुरू आपल्या संनिध राहावें अशीच प्रबल इच्छा असली पाहिजे आणि शेख महंमदास आपल्या शिष्यावरील प्रेमही तितकेंच दृढ झाल्याने आपल्या शिष्यांसाठी आपला मुक्कामही हलविणें भाग पडलें असले पाहिजे असे बेंद्रे म्हणतात.

(ज) मालोजी चरित्रासंदर्भात बेंद्रेंचे योगदान :

मालोजीराजांच्या चरित्रांत तत्कालीन वस्तुस्थितीच्या अज्ञानामळें जे विपर्यस्त मजकूर आले आहेत जे वा. सी. बेंद्रे यांनी खोडून काढले ते आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) मालोजीच्या वेळी दौलताबादेस निजामशाहीची राजधानी होती.

(२) मालोजीच्या कारकिर्दीत एकच निजामशाहा होऊन गेला.

(३) लखुजी जाधावरावाला निजामशाहींतील राज्यांत फार मोठे अग्रस्थान होते.

(४) मालोजी जाधवरावाकडे द्वारावरील बारगिरी करीत होता.

(५) मालोजीला द्रव्य भूमींत सापडलें म्हणून तो त्या जोरावर मोठा सरदार झाला.

(६) शाहाजी-जिजाबाईच्या लग्नावरून त्याने केलेले निजामशाहीवरील व जाधवांवारील अत्याचार.

या मुद्यांना जोडतांना बेंद्रे लिहितात बाबाजीने राजकारणांत भाग घेतला नसला तरी तो निदान ४-५ गावांचा मोकदम व दोन गावांचा देशमुख होता. मोकदमीची जमीन इतकी मोठी असते की, त्याकरितां व मोकदमीचे हक्क वसूल करण्याकरितां त्याला सर्व ठिकाणी आपले मुनीम व नोकर नेमावेच लागत होते. सारांश, बाबाजीची धनदौलत कांही सामान्य शेतकऱ्याप्रमाणे नव्हती की त्याच्या मुलांनी दरवाज्यावरील बारगिरी केवळ महिना पांच होनाच्या मजुऱ्यावर स्वीकारावी.

याशिवाय बखरकारांच्या लिहिण्यावरून शाहाजीचा जन्म इ.स. १५९४ तील व लग्नाचें भांडण त्याच्या ५ व्या वर्षानंतर म्हणजे इ.स.१५९९ तील धरले तर त्यास शेख महंमदाच्या दानपत्रावरून व इतर पत्रांवरून इ.स. १५९६ पूर्वीपासूनच मालोजी निजामशाहाचा मोठा सरदार व तो श्रीगोंद्यास आपल्या सुभ्यावर मकरंदपुरपेठेंस राहावयास गेलेला आहे. अर्थात ही सर्व

भाकडकथा अप्रस्तुत व विपर्यस्त आहे. अप्रस्तुत अशाकरिता की, शाहाजीचा लग्नसोहळा मालोजीच्या मृत्युनंतर ४-५ वर्षांनी झालेला आहे.

(७) जिजाबाईच्या आईने मालोजीच्या घराण्याबाबत आणि पर्यायाने आपल्या माहेरावर उडविलेले शिंतोडे.

बखरकारांच्या या मताचे खंडन करतांना बेंद्रे लिहितात की, "जाधवरावाच्या बायकोचें व मालोजीच्या बायकोचें माहेर एकच आहे व ज्यांचे नातें आत्या भाच्याचे आहे त्या जाधवरावाच्या बायकोच्या तोंडून मालोजीच्या घराण्याबद्दल म्हणजेच माहेरच्या लोकांबद्दल वाईट उद्‍गार येणे अशक्य होते."

(८) शाहशरीफ पिराच्या बाबतींतील 'प्रसाद ग्रहणा' ची किळसवाणी कथा व यासारख्या कथा असत्य कोटीतील किंवा काल्पनिक आहे हे आता सिद्ध झाले आहे, असे बेंद्रे सांगतात.

मालोजीच्या युद्धाविषयक हालचाली पुष्कळ असूनही त्याबाबतचा थोडाही तपशील अद्यापि उपलब्ध राहिला नाही. परंतु मालोजीला ज्या अर्थी दीड हजारीवरून अवघ्या ५-६ वर्षांत पंचहजारी सारख्या, तत्कालीन निजामशाहीच्या विशिष्ट परिस्थितींत फारच मोठ्या हुद्यावर चढविले त्याअर्थी त्यांची सर्व झगड्यांत उत्कृष्ट कर्तबगारी दिसून आली असली पाहिजे यात शंका नाही.

३.७ विठोजी भोसले संदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

मालोजीचा जन्म इ.स. १५७० च्या नंतर झाल्याचे वा. सी. बेंद्रे सांगतात व मालोजीनंतर तीन वर्षांनी विठोजी जन्मला असावा असे बेंद्रे सुचवितात. कारण मालोजी व विठोजी यांच्या जन्मतारिखे संदर्भात बखरकारांनी अनेक चुका करून त्यांची चुकीची जन्म तारिख दिली आहे.[२१]

विठोजी धारूरलाच बरेच वर्षे राहत होता. त्याला संभाजी, खेलोजी, मंबाजी, नागोजी, परसोजी, त्रिबंकजी, कक्काजी व मालोजी असे आठ पुत्र झाले. संभाजी इ.स. १६२३ च्या सुमारास खंडागळेच्या भांडणांत जाधवरावांकडून मारला गेला. २७ फेब्रुवारी १६२३ चीं दोन पावती पत्रें उपलब्ध आहेत. त्यांत ह्या सात पुत्रांनी "राजश्री ताराबाई आवानें राजश्री रामेशभट व चिंतामणीधर याजकडे ठेव २१०० होन व १०८ तोळे सोने ठेविली होती." ती त्यांस मिळाल्याचें लिहिले आहे. या पत्रांवारून मालोजी बाकीच्या सात भावांपासून वेगळा होता असे दिसते.

आर्वीकरांच्या २६ मार्च १६२१, २३ नोव्हेंबर १६२२, १८ फेब्रुवारी १६२३ वगैरे संभाजी राजांच्या पत्रांवरून विठोजी २६ मार्च १६२१ पूर्वीच व संभाजी १६२३ च्या १८ फेब्रुवारी व २७ फेब्रुवारीच्या दरम्यान वारले असले पाहिजेत असा समज करून घेणे रास्त होईल असे बेंद्रे सांगतात. शिवाय या पहिल्या पत्रांत "बा खुर्दखत राजश्री (थोरले राजे) दिधले आहे. तेणे प्रमाणें दुमाला किजे." यांतील थोरले राजे हा शब्द विठोजी, मालोजी की शाहाजी यांच्यासाठी वापरला आहे हे पाहिले पाहिजे. मृत माणसाचा उल्लेख नावानेच केला असता. तेव्हा हा उल्लेख शाहजीस उद्देशून असला पाहिजे कारण ही देणगी मुळांत मालोजी-विठोजीच्या नांवे होती. ती रीतसर चालविणे वडील घराण्यावर अवलंबून असते. परंतु ३० सप्टेंबर १६१८ च्या पत्रांतील मजकुरावरून विठोजी त्यापूर्वीच वारले असावेत असें वाटते. पण या पत्रावरून शंका अशी येते की २३ नोव्हेंबर १६१३ च्या पूर्वी विठोजी वारले किंवा कसे? आणि ही शंका १९ नोव्हेंबर १६११ व २० जुलै १६१२ च्या पत्रांतील मजकुरावरून दुणावते. पहिल्या १९ नोव्हें. १६११ च्या पत्रांत हैबतखान ही शिंगणापूरची मोकदमी विठोजीस दुबाला करतो, त्यानंतर २१ डिसेंबर १६११ च्या पत्रांत "मोकद... विठोजी भोसला आहे. याचा फरजंद... (यास) विठोजी मशारूनइलेचे दुंबाला केले असे" ... व तिसऱ्या पत्रांत वावीची "मुकादमी संभाजी बिन विठोजी भोसले यासि हुजरुन मऱ्हामती करून दिधली असे..." अशा व्यवहारांत जर कर्ता बाप जिवंत असेल तर त्याच्या मुलाच्या नांवाने सहसा इनामती बहाल केल्या जात नाहीत. कारण अशा सर्व चाकरीच्या देणग्या कुटुंबासच "अवलाद अफलादी"साठी दिलेल्या असतात. अशा परिस्थितीत विठोजीचा मृत्यू इ.स. १६११-१३ च्या दरम्यान झाला कीं काय याचा अधिक शोध घेणे भाग पडत आहे, असे बेंद्रे म्हणतात.

शेडगांवकर बखरींत विठोजीचा मृत्यू "शके १५४५ रुधिरोद्गारिनाम संवत्सरे फसली सन १०३३" (इ.स. १६२३-२४) दिलेला आहे. म्हणजे त्याच्याच माहितीप्रमाणे मालोजीच्या मृत्युनंतर विठोजी तीन वर्षांनी मेला. अर्थात हा मृत्युशक उपरिनिर्दिष्ट पत्रांवरून चूक ठरतो. विठोजी त्यापूर्वी वारला होता, निदान १६१ चे पूर्वी वारला होत हे निश्चित, फक्त प्रश्न आहे तो हा कीं हा मृत्यू संदर्भात करतात.[३०]

३.८ शाहाजी राजांसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

३.८.१ शाहाजीची जन्मतारिख :

शिवभारतकाराच्या लिहिण्याप्रमाणें कोण सिद्धाच्या सांगण्यावरून म्हणा दिलीं गेली असलीं तर शाहाजीचा जन्म इ.स. १६०२ पूर्वीचा व शरीफजीचा इ.स. १६०४-१६०५ तील असला पाहिजे आणि मालोजीच्या मृत्युवेळीं म्हणजे इ.स. १६०६ त शिवभारताप्रमाणें शाहाजीला ५ वर्षे पुरी झाली होती. ही महिती जर खरी असली तर शाहाजीचा जन्म इ.स. १६०१ तील व शरीफजीचा नंतर दोन वर्षांनी म्हणजे १६०३-०४ इ.स.तील येतो असे बेंद्रे म्हणतात.

मालोजी राजांच्या लग्नाच्या हकिकतीवरूनही दीपाबाई ही लग्नाला तत्कालीन रूढी प्रमाणेंही मोठी झालेली नव्हती. तशी ती असती तर मालोजीचा पराक्रम पाहूनच हे लग्न पूर्वीच घडून आले असते; परंतु ते लग्न केवळ मालोजीचा दर्जा दरबारांत अल्पवयांतच वाढला म्हणून जाधवरावांच्या सूचनेवरून होऊन आले. अर्थात मालोजी राजे व दीपाबाई यांच्या वयांत ३-४ वर्षापेक्षा जास्त म्हणजे मालोजीचें वय जर १५-१६ धरलें तर तिचे ७-८ वर्षांचे असावे. उलट विठोजीचें लग्न अनुरूप मूल पाहून केल्यानें हे अंतर फार तर नेहमीप्रमाणें ३-४ वर्षांचे असेल. यावरून विठोजीची बायको २-३ वर्षांनी मोठी असल्यानें तिला उमाबाईपेक्षा २-३ मुलें आधी जन्मणें शक्य आहे असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, या वयोमानांचा विचार करितां उमाबाईला १६-१७ व्या वर्षी शाहाजी झाला असें होतें. याही परिस्थितीला धरून शाहाजीचा जन्म १६०१ तील असावा असे दिसून येते.

शिवभारताप्रमाणें व इतर बखरींतील तपशिलाप्रमाणें लग्नाचे वेळी जिजाबाईचे वय ७-८ वर्षांचे व शाहाजीचे ११-१२ वर्षांचे धरलें जातें. जिजाबाईला पहिला मुलगा इ.स. १६२१ त झाला असा काल दिला जातो. यावरूनही पाहतां जिजाबाईचा जन्म इ.स. १६०४-०५ चा येतो आणि दोघांतील अंतर ३ वर्षांचेच असल्याबद्दल एकवाक्यता आहे. यावरूनही शाहाजी महाराजांचा जन्म इ.स. १६०१ तील असावा असे मानण्यास पुरावा मिळतो.[३१] असे वा. सी. बेंद्रे सिद्ध करतात.

३.८.२ शाहाजींच्या व शरीफजींच्या नावांसंदर्भातील मतमतांतरे :

सर्वप्रथम 'एक्याण्णव कलमी बखरीत' जन्मासंदर्भात मजकूर येतो की, "मालोजी भोसले त्यांस पुत्र झाले नाहीत. त्यांचे स्त्रीने नवस नगरच्या पीरास केला जे आपल्यास पुत्र जाले तर

तुमची नावें ठेवीन. शहाशरीफ पीर होते. त्याणीं नवस पुरविला. पुत्र दोघे जाले. वडिल शाहाजीराजे व शरफजीराजे भोसले. दोघे पुत्र होते. त्या मुलांमध्ये उत्तम स्वरूप शाहाजी. त्याची बहुत ख्याति होती. जाधवराऊ त्यांस पुत्र नव्हता (?) येक कन्या जिजावा होती. शाहाजीराजे त्यांचे उत्तम स्वरूप पाहून त्यांस वस्त्रें उत्तम अलंकार केले. महालांत नेऊन खेलऊ लागले." हाच मजकूर 'मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरी'त व 'श्रीशिवाजीप्रताप' व 'पंतप्रतिधिनीच्या बखरीं"त ही आला आहे. चिटणिसी बखरींत याच अर्थाचा मजकूर आहे. चिटणिसांप्रमाणें 'दीपाबाईनें आणखी' देवधर्म अनुष्ठाने केली होती व जन्मशक "शके १५१६ जयनाम सवंत्सरे" (१५९४ इ.स.) व जिजाबाई जन्मशक "शके १५१८ (१५९६ इ.स.) देऊन ते "बोलणार चतुर, घोड्यावर बसणें, शस्त्रविद्यादि सर्व करण्याचा हव्यास, याप्रमाणें गुणसंपन्न होतें", असे सांगितले आहे. कवींद्र परमानंदाने "आपल्याला पुत्र होऊन ह्या राजलक्ष्मीला शोभा येईल अशा आशेंत पत्नी समवेत त्याचे पुष्कळ दिवस लोटले. तेव्हां तो पुत्रेच्छु राजा आपल्या धर्मपत्नीसह मोठे व्रत आचरून शंकराची आराधना करुं लागला. नंतर पुष्कळ दिवस लोटल्यावर त्या महातेजरची मालोजीची पत्नी गर्भवती होऊन आपल्या पतीला आनंद देती झाली. दहाव्या महिन्यांत राजलक्षणांनी युक्त (झळकणारा), सुंदर व अलौकिक पुत्र तिला शुभवेळी झाला. ज्योतिषांनी सांगितलेल्या व धर्माला जुळणाऱ्या अशा शुभ दिवशीं मालोजीनें स्वतः आपल्या मुलाचें शाहाजी असें नांव ठेविलें. पुढे दोन वर्षांनी मूर्तिमंत आनंद असा दुसरा पुत्र तिच्या पोटी झाला. त्याचेही पंडितांच्या मदतीने यथाविधि संस्कार करून सिद्ध पुरुषानें सांगितल्याप्रमाणें शरीफजी हें नांव ठेविलें. सिद्धांचीं नावें धारण करणारे असे ते कुलदीपक पुत्र शाहाजी आणि शरीफजी वाढूं लागले आणि त्यांची त्यांच्याबरोबरच संपत्ति वाढत गेली."[३२]

येथपर्यंत या प्रसंगाला कथाथाटाचा रंग चढविण्याचा प्रयत्न झाला नव्हता. तो 'शिवदिग्विजय' व 'शेडगांवकर' यांच्या बखरीत झालेला आहे. शिवदिग्विजयातील मजकूर : "विठोजी राजे यांस पुत्र जहाले, त्यांचे अवलोकनेवरून मालोजी राजे संतोष मानून उत्साह चालीनुरूप करिते जहाले. लालन पालन यथायोग्यतेनें चालत असतां, राजे यांचे स्त्रीस पुत्र नाहीं म्हणोन राजपत्नी बहुत खिन्न असतां, देवधर्म, मंत्रनवस इत्यादि कृती करावयाची ती केली; परंतु संतान न होय. तेव्हा नगरच्या किल्ल्यांत शहाशरीफ पीर जागृतस्थान ऐकल्यावरून भावार्थे नवसून धर्म खैरात गुरुवारीं करावी असे षण्मास होतां दीपाबाई गरोदर जहाली. दिवसेंदिवस

गर्भछाया पडून स्वरूप कसें जाहले याविषयी प्रमाण..... सीमंतोनयन (?) पुसंवन करिता ईश्वरी कृती प्रासादिक ज्याचें उदरीं साक्षात शिव अवतार धारण करणार तो पुण्यश्लोक गर्भाचें ठायी पूर्ण दिवस भरताच शके १५१६ जयनाम संवत्सरीं चैत्र शुक्ल ५ इंदुवारीं (पंचमीला शनिवार, फार तर रविवार मानतां येईल सोमवार नाही.) (मार्च १५९४) जन्म जहाला. पुत्ररत्न होताच असंख्य गोदामें ब्राह्मणांस व बक्षिसें कित्येकांस दिली. सर्वोकृष्ट महोत्साह करून नगरचे पीराचें प्रसादें स्त्रियेचें विचारें पुत्र प्राप्त जाहला यास्तव त्याचेंच नामाभिधान ठेवावें त्यावरून शहाशरीफ पीर आहे म्हणोन शाहाजी असे बारावें दिवशीं नांव ठेविलें. जातकर्म व नामस्मरण विधानोक्त केले... वेरुळांत शाहाजीराजे जन्मले म्हणून तेथें ब्राह्मण संग्रह दाने व वर्षासनें कित्येकांस चालविली. दुसऱ्याने दीपाबाई गरोदर जहाली. यास्तव जागा सूतिकागृह उत्तमप्रकारें केलें. पूर्वादि अनुक्रमें उत्साहादि आनंदयुक्त राहिले. पुत्र जहाले. त्यांचे नांव शरीफजी ठेविलें. शके १५१९ दुर्मुखीनाम संवत्सरीं (इ.स. १५९७) जन्मले. कांही थोर होताच नगरचे पिरास नवस केल्याप्रमाणें कंदोरी, खैराती वगैरे पिरास अलंकार गलेफ समर्पून उभयतां पुत्रांच्या गुणें सर्वांसच अतिमुख वाटून सांठवण करावयास अंबरांत समावेश न होय असें अंतःकरणी मानिले."[३३]

शेडगांवकर बखरींत जरा वेगळीच माहिती येते. "नंतर मालोजीराजे व विठोजीराजे हे उभयंता वेरुळाहून निघोन दौलताबादेस आले आणि पादशाहाची भेट घेऊन आपले चाकरीवर राहिजे. तेव्हा मालोजीराजे भोंसले याची स्त्रीचे नाव दीपाबाईसाहेब ही वणगोजी नाईक निंबाळकर फलटणकर यांची कन्या या बाईनीं पूर्वी खुदस्ते बुनियाद सरकार सुभा आहमंदनगरच्या शहाशरीफ म्हणोन पीर आहेत त्या पिराजवळ अवलिया फकीर होता, तेथें बाईची स्वारी जाऊन त्या पिरास नवस केला. नंतर त्या अवलिया फकिराने बाईच्या गळ्यांत नाड्याचा धागा बांधिला. त्या पिरास बाईंनी नवस केला की, मजला पुत्र जाहले म्हणजे तुमची नावे ठेवीन. असा नवस अवलिया फकीर याचे हातून केला होता. पुढे बाईस दोन पुत्र जाहाले. त्या पुत्रांची नांवें शाहा शरीफ अशीं ठेविलीं. प्रथम पुत्र शाहाजीराजे जाहाले. त्याचा जन्म शके १५१६ जयनाम संवत्सरे फसली सन १००४ या सालीं वेरुळ घृष्णेश्वर मुकामी जन्म जाहला. पुढें एक वर्षाने धाकटे पुत्र शरीफजीराजे याचा जन्म शके १५१७ मन्मत नाम संवत्सरे फसली सन १००५ या साली वेरूळ घृष्णेश्वर येथें जन्म जाहला. तेव्हा शाहाशरीफ पिरास नवसाबद्दल मालोजीराजे भोसले याणी सुलतान बुराणनिज्याम पादशाहा यास अर्ज करून त्याजपासून एक गाव आपले नावें ईनाम

करून घेऊन तो गाव शहाशरीफ पिरास नवसाबद्दल इनाम आपण करून दिल्हा. तो गाव अहमदनगरानजीक आहे. तो आजपावेतो त्या पीराकडे चालत आहे."[३४]

यानंतर बेंद्रेंनी कै. श्री. ना. म. मिरीकर यांनी शहाशरीफबाबत त्यांच्या मठांत मिळालेल्या तीन दंतकथा सांगितल्या आहेत. त्यातील दुसरी शाहाजीच्या जन्माबाबतची आहे, ती : "....राजे मालोजी यांस पुसंतति मुळीच नव्हती. त्यामुळें त्यांनी त्यावेळीं शाहा शरीफ यांजजवळ सेवा करून पुत्राचा प्रसाद मागितला. शाहा शरीफ त्यांजवर प्रसन्न झाले व त्यानीं आपल्या बहिणीचीं दोन्ही मुलें आपल्या दोन्ही मांडीवर घेतलीं व विडा खाल्ला. तो विडा चावून त्यांनी राजे मालोजी यांच्या हातीं दिला व सांगितलें कीं, आपल्या दोन्ही राव्यांस (?) निमानिमा वांटून द्यावा. त्याप्रमाणे विड्याची वाटणी करून मालोजींनी आपल्या दोन्ही बायकास दिला. एकीने तो खाल्ला परंतु दुसरीस त्या मुसलमानाच्या तोडांतील विडा खाण्यास संकोच वाटूं लागला. परंतु तिनें तो फेकून न देतां आपल्या सवतीस दिला. तिनें तोहि खाल्ला. पुढें मालोजी राजे तेथून निघून गेले. पुढें कांही दिवसांनीं ज्या पत्नीने विडा खाल्ला होता तीस दोन मुले झाली. दुसरीस काही झाले नाही. प्रसाद देतीवेळी शहाशरीफ यांनी राजे मालोजी यांस मुलें वर्ष दोन वर्षांची झाल्यावर येऊन भेटण्यास सांगितले होते; परंतु राजे मालोजी यास मुलें झाली तरी राजे गेले नाहींत. पुढे एकाएकी पहिल्या मुलाची वाचा बंद होऊन तो मुका झाला व दुसरा पांगळा झाला; व शहा शरीफ हे राजे यांच्या स्वप्नांत आले व त्यांना मागील गोष्टीची स्मृति दिली. त्याबरोबर राजे यांस पश्चात्ताप झाला व ते लागलीच मुलांना बरोबर घेऊन शहा शरीफ यांच्या दर्शनास निघाले व दर्शन घेतल्यानंतर त्यांची नांवे ठेवली. पहिल्याचें नाव शाहा ठेवलें व दुसऱ्याचें शरीफ ठेवलें. त्यावरून त्यांना शाहाजी व सरफोजी असें म्हणतात. राजे मालोजी यांनी शाहा शरीफ यांना दोन गावें जहागीर व चार पांच गांवांत इनामी जमिनी दिल्या आहेत. त्याबद्दलची अस्सल सनद उपलब्ध नाही. वरील हकीकत इ.स. १५९३ च्या सुमारास घडली असावी."[३५]

३.८.३ शाहाजीच्या जन्माच्या संदर्भात वा. सी. बेंद्रेंनी केलेली चिकित्सा :

(१) मालोजी अहमदनगरास सहकुटुंब येऊन राहिला होता असे मानण्यास कोठेच आधार नाही असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. उलट मालोजी लढाईच्या निमित्तानें ससैन्य येऊन निजामशाहींतील संकटे दूर करण्याचे प्रयत्न करीत असणें साहजिकच होतें. अशा तऱ्हेने बारगिरी सैन्य मदतीस आल्याचे उल्लेखही आहेत. त्यामुळे मालोजीची पत्नी उमाबाई

हिची व शाहा शरीफची भेट झाली होती असें मानण्यास कोठेंच आधार नाहीं. शिवाय जरी महात्म्य ऐकून नवस केला म्हणावा तर शाहा शरीफची फार तर झाली (भाकली) असेल. त्याचेंच नांव देऊं म्हणून नवस विशेषतः त्यांच्या हयातींत तरी करणें हें हिंदुश्रेष्ठ संस्कृतीत वागणाऱ्या उमाबाईसारख्या स्त्रीच्या मनास शिवणें शक्य नाहीं. तसेच तिचें वयही तसे उद्विग्नतेनें मनुष्याला वेड लावण्यासारखे नव्हतें. त्याशिवाय तिची पर्यायाने जडलेली शंकराची भक्ति आणि शेख महंमदासारख्या स्वच्छ विचारपातळीवरून दैवी संपत्तीचा विचार करणाऱ्या मुसलमान साधुच्या निदान ७-८ वर्षांचा निकटचा सहवास, यांचा विचार केला तर 'पुत्र नाहीं म्हणून' वरील स्वरुपाचा ती नवस करील असा संभव फारच कमी.[३६] असे बेंद्रे स्पष्ट करतात.

(२) मालोजी जरी शिवभक्त होता तरी त्याचा ओढा अवलियांकडेही असावा असें मानण्यास जागा आहे.[३७] बेंद्रे दर्ग्यातील पहिल्या दंतकथेमध्ये आल्याप्रमाणे त्या अवलियानें आपल्या सिद्धीसामर्थ्यानें नाश न करितां क्षमा केली या उपकाराची फेड म्हणजे त्या अवलियाची स्मृति कायम राखण्याकरितां, आणि हा प्रसंग १५९९ त घडून येण्याचा संभव अधिक होता, म्हणून शरीफ जिवंत असल्यामुळें आद्य गुरूचें 'शाह' हें नाव शाहाजीस व शरीफजीच्या मृत्युनंतर दुसऱ्या मुलास 'शरीफ' हे नांव केवळ उपकाराची स्मृति म्हणून दिलें असणे जरी वस्तुस्थितीला धरून असलें तरी त्या दर्ग्यातील लोकांनी त्या प्रसंगावर केलेला विपर्यास मात्र गर्हणीय, पूर्णपणें असत्य व दर्गामठांतील उत्पन्नावर जगणाऱ्या क्षुद्र प्रवृत्तींची सतराव्या व अठराव्या शतकांत जी मनोवृत्ति बोकाळली होती तिचाच हा एक भाग आहे, असे बेंद्रे सांगतात.

(३) मालोजीला दोन स्त्रिया नव्हत्या. उदासीन वृत्तीनें राहणारे ते अवलिया विडे खात असतील असें मानण्यासारखी त्यांची आचारविचारसरणी दिसत नाही. शिवाय लढाईवर गुंतलेला मालोजी ताजा विडा घेण्यास व तो आपल्या दोन स्त्रियांना मकरंदपुऱ्यास नेऊन देण्यास मोकळा नव्हता.[३८] ह्या शिवाय मालोजीची दुसरी बायको आपल्या नवऱ्यानें आणलेल्या प्रसादाचा अव्हेर करून जहागिरीचा वारसा गमावण्याचें साधन स्वीकारील हे अशक्य आहे; परंतु मालोजीला दुसरी बायको नव्हती तें वेगळेच.

मात्र या दंतकथेतील शाहजीच्या बाबतींत आशर्वाद मिळाल्यानंतर मालोजी शेख शरीफना भेटला नसावा हें मात्र तत्कालीन घटनेला धरून दिसते. इ.स. १६०० पासून नगरचा किल्ला व १०-१२ मैलाचा परिसर मोगलांच्या ताब्यात गेल्याने व मोगल-निजामशाही वैमनस्य चालू राहिल्यानें मालोजीसारख्या पंचहजारी सरदाराला किल्ल्याच्या आसपास जाणें शक्य नव्हतें. ही परिस्थिती अवलिया जाणत असतां तो मालोजीवर कोप करील हे अशक्य आहे. मात्र नवसाच्या फेडींतील स्वार्थावरच लक्ष ठेवून कालक्षेप करणारे भोपे किंवा मुतावली असल्या घाणेरड्या कथा निर्माण करून आपल्या आदरणीय व मुख्य संतसाधूंच्या उज्ज्वल चारित्र्याला डाग लावतात हा नेहमीचाच अनुभव आहे. याही तपशिलांतील मालोजीच्या गैरहजेरीचा भाग शाहाजी शरीफजीच्या जन्मकाल निश्‍चितीला साह्यकच होतो.

(४) शाहजी व शरीफजी ही दोन्ही नावें शहशरीफ अवलियाचा प्रसाद म्हणून ठेविलीं. म्हणजे ही अर्थात नवीनच नावें उपयोजण्यांत आली असा अर्थ निघतो. परंतु तशी वस्तुस्थिती दिसत नाही. याचे बेंद्रे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देतात, एका १४ मार्च १५६८ च्या पत्रात साचारखेडले (प्रोपडिये पेडगांव) या गांवची मोकदमी "राजश्री शरीफजी राजे भोसलेकडे" असल्याचे लिहिलें आहे. त्यावरून "शरीफजी' हें नांव भोसले घराण्यांत निदान १५४० इ.स. पूर्वीपासूनच चालूं होतें असे दिसते.[३९]

त्याचप्रमाणें वेलवंडखोऱ्याच्या देशमुखाच्या वंशावलींत एक असा उल्लेख आढळतो की, ".....रतनोजी.... याची स्त्री जानकाई इणें आपलें वतन देशमुखीचे कानोजी बिन शाहाजी निंबालकर माहाले साकीन पाटील कऱ्हाउ यास विकत दिल्हे शके १२४९ (इ.स. १३२७) प्रभव संवत्सरी महजर ताम्रपत्र कान्होजी माहाले यांनी करून घेतले ते मूल पुरुष कान्होजी बिन शाहाजी माहाले यास पुत्र...." या उल्लेखकावरून "शाहाजी' हें ही नांव निंबाळकर घरण्यांत म्हणजे शाहाजीच्या मातुल घराण्यांत चालूं होतें असे दिसतें, असे बेंद्रे म्हणतात.[४०]

तसेच इ.स. १३३६ चा सिलिमकर देशमुख घराण्यांतील एक महजर रा. खं. १७ ले १ पृ. १-२ यावर आला आहे. हा जर महजर खरा असेल तर त्यांतही "कान्होजी वलद शाहाजीराव निंबालकर साा पाा कराड वासी जानकाई कोम रत्नोजी वाा शाहजी इबिन गोविंदराव देशमुख ताा

वेळवंडखोरें सुाा सन ७३७" असे उल्लेख आले आहेत. यावरून शाहाजी हे नांव मालोजीच्या आप्त निंबाळकर यांच्याच कुलांत रूढ होतें.

३.८.४ शहाजीचे बालपण व राज्यकारभाराचे प्रशिक्षण :

शाहाजीच्या बालपणांतील हालचालीबाबत फारसे उल्लेख उपलब्ध नाहीत; परंतु तो प्रथम आपल्या मातेजवळ श्रीगोंद्यास होता. नंतर आपला चुलता विठोजी याजकडे जाऊन राहिला. परंतु त्याच्या एकंदर नंतरच्या हालचालींवरून त्याला तत्कालीन रिवाजाप्रमाणें जसें क्षात्रवृत्तीचें शिक्षण दिलें गेलें तसेंच त्यास लेखन, वाचन व राज्यकारभारास आवश्यक असे सर्वसामान्य व्यवहारज्ञान देण्याची व्यवस्था झाली असली पाहिजे. जवळची उपाध्ये वगैरे मंडळीच सामान्यतः हे शिक्षण देत. महाभारत, रामायण व स्मृतिशास्त्रातील जरूर ती माहिती आणि विशेषतः घरातील सुभेदारी कारभार रोज चालतांना पाहावयास मिळाल्याने, त्याकाळी लहान मुलांना बापाबरोबर दरबार कचेरींत बसावयास लागल्याने, त्यांना मिळणारे हे अनुभवज्ञान त्यांच्या ज्ञानाचा पाया भक्कम करीत असे. शाहाजी काळाज शिक्षक जे काही सांगावयाचे ते संस्कृत पुस्तकांच्या आधारेंच सांगत असल्याने संस्कृत भाषाही आपोआपच या सरदार मंडळीतील मुलांस समजू लागत असे. त्याकाळी स्मरणशक्तीवरच बरीच मदार राहात असल्यानें पाठांतर व पाठांतरामुळें विषयांची तयारी चांगली होत असे.

सारांश तत्कालीन पद्धतीप्रमाणे आईबापांच्या धंद्यारोजगाराप्रमाणें व दानधर्मशील वर्तणुकीप्रमाणें त्यांच्या मुलांचे ज्ञान विकसित होत असे. त्यांतले त्यात मालोजीच्या अकाली मृत्युने व निजामशाहाने शाहाजीला त्याच्या बापाची सरंजामी वगैरे त्याच्या वयाच्या पांचव्या वर्षीच त्याच्या गळ्यांत घातल्यानें साहजिकच विठोजीनें जरी प्रत्यक्ष कारभार पाहिला असला तरी तो शाहाजीला साक्षी म्हणून तरी पाहणें प्राप्तच होतें.

दहाव्या वर्षानतर शाहजीचें लग्न झाल्यामुळें व जाधवरावासारख्या वजनदार सासरा असल्याने विठोजीनें शाहाजीला प्रत्यक्ष कारभार करावयास लावले व आपण त्या जबाबदारीतून अंशतः अलिप्त झाला. तरीदेखील विठोजीची जबाबदारी सुटली होती असें नाही. सुरुवातीस शाहाजीकडे प्रत्यक्ष राज्यकारभार नव्हता. सैन्यविषयक जाबादारी विठोजीकडे असावी. राज्यकारभारविषयक व्यवहार इतर व्यवहार सरदार सुभेदार किंवा खासा मलिकअंबर पाहात असावा असें कागदपत्रांवरूनही दिसते.

३.८.५ शाहाजी राजांच्या विवाहसंदर्भात माहिती :

बखरकार व इतर सांधनांनी शाहाजी-जिजाईच्या लग्नाबाबत फारच मोठा पाल्हाळ सजविला आहे. सभासद व चित्रगुप्त बखरीत हा प्रसंग आलेला नाही. शिवभारताप्रमाणें हा सोहळा लखुजीबाबानीं आपण होऊन जुळवून आणला व तो उत्तम रीतीने साजरा केला यांत निजामशाहाची लुडबूड आलेली नाही.

(१) कवींद्र परमानंदाने काल्पनिकतेत भर पाडली आहे.[४१]

(२) ९१ कलमी बखरीनुसार, "३ सिमघा सण : त्याउपर शाहाजी राजे त्यासं वर्षे पाच जाली. लुखजी जाधवराऊ त्यास कन्या जिजाऊ, तीन वर्षांची होती. सिमघा सन आला.... कुल मऱ्हाटे व सिपाई कचेरीस सभा केली. रागरंग कलावंत नाच मांडला. जाधवराऊ यांणी मुलास दोघांजणांस मांडीवर घेऊन गुलाल बुक्का पुढें ठेवून खेळूं लागलीं. तमासा कवतुक जाधवराऊ पाहूं लागले. मांडीवर मुलें दोघे आहेत तों चित्तामध्यें उद्‌गार आठवून सभेमध्ये बोलिले जे, 'जिजाऊसारिखे रत्न कन्या श्रीनें पैदा केली आहे. ईसवर चित्तायोग्य शाहाजी हे मूल उत्तम, ईजोगा होये तर बरें आहे.' स्वाभाविक सहजास्थितीनें सभेमध्ये सभानायक त्यापाशी बोलू लागले. तो पाठीशीं मालोजी व विठोजी भोसले बारगिर यांणी गोष्टी यैकिली. तेच समई उभे उभयेता राहून बोलिले जे, "आजीपासून जाधवराऊ आमचे व्याही जाले. थोर लोक सभेमध्यें बोलिल्याउपर मागें सरणार नाहींत. सभेमध्यें गोतगंगा सभानयेक आहेत. तुम्ही समस्त साक्ष असा याउपर आमचे व्याही जिजाऊ आमची सून जाली. यैसी गोष्टी नेटे बोलिले. मालोजी व विठोजी बोलोन गोही ठेऊन खाले बसले. जाधवराऊ त्यांणी उत्तर दिधले नाहीं. बोलोन विचारीं पडिलें."

"४ त्याग : त्याउपर सभाखेळ जाला. जाधवराऊ महालात गेले. शाहाजीस समागमें न्यावें ते नेले नाहीं. जिजाऊ मात्र घेऊन गेले. तें वर्तमान महालांत बाईकांस विदित जाले. लुखजी जाधव त्यासी बाईकांनी भांडण केले. जे, 'कुणबी पाटील, तुमचे बारगरी, देसनिकाले, पोटासाठी चाकरी कबूल करून राहिले. आमच्या हमतोल नव्हते. तुम्हांस बाणिखी मुलुखामध्यें साईरे देसमुख व मनसफदार हमतोल पाहून बोलावे. त्यांणी कचेरीस गोही ठेऊन गेले. तुम्ही त्यासी झाडून टाकिले नाहीं. उत्तर दिधले नाही.' यैसी बोली बाईकांनीं जाधवराऊ त्यांसी केली. जाधवराऊ त्याणी उत्तर दिधले जे, 'आम्ही स्वाभाविक बोलिलों. पानें खोबरे वाटिले नाहीं. त्याणी

लबाडी केली याउपर त्यांस चाकरीहून दूर करून.' यैसे बाईकांचे समाधान केलें. दुसरे दिवशी भोजनास मालोजी व विठोजीस बोलाविले. त्याणीं वोढून लाणिले. 'तुम्ही सोईरे जालेस, आम्ही लग्नसमयीं भोजनास येऊन.' यैसे उत्तर दिधलें. याउपरि जाधवराऊ भोजन करून कचेरीस येऊन बसले. कारकून बोलावून हिशेब करून मालोजी व विठोजी भोसले उभयेतांस चाकरीहून दूद केले. 'तुम्ही आम्ही सोईरे नाही. पानें वाटली नाहीत. गलां पडतां. तुफान करतां. याउपर तुम्ही येथून कबिला व मुलेंसह वर्तमान जाणें. येथे येक घडी न राहणें.'

याउपर मालोजी व विठोजी भोसले बाईका व मुलें घेऊन मागती वेलुरास आले. पाटिलास भेटोन धरवसे ते पूर्वील मागती करुं लागले."

"५ चमत्कार : त्या उपर सेतें तीन वर्शे केली..." (द्रव्याचे हंडे मिळतात त्या साह्याने भांडणास सिद्ध होतात.)

"६ दावा : जगपाल निंबालकर फलटणकर, बारा हजार फौजे त्यापासीं, पुंडावे करून मधेच होते.... त्याकडे.... मुदा..... जाहीर केला जे समागमें दोन हजार स्वार उत्तम देणे. आम्हांपासील हजार एकूण तीन हजार फौजेसह वर्तमान सडे जाऊन लुखजी जाधवराऊ सिंदखेडकर त्यांसी दावा सोठाईचा करून तुम्ही मतद करणें."

"७ त्रागा : याउपर व जगपाल निंबालकर त्यांची फौज घेऊन श्रीगोंदे येथे येऊन डेरा दांडा ठेऊन सडे तीन हजार फौजेनसी निमे देव्हारे घाट उतरोन नेवासेयावरून गंगातीरास (गोदावरीतीरास) आले. सिकार केली. रानडुकर दोन टाकिले. त्यांच्या गला चिठ्या निजामशहा पातशहा त्यासी अर्जी लिहिली जे, 'लुखजी जावधवराऊ देशमुख प्रांत मजकूर त्यांची कन्या जिजाऊ आमच्या पुत्रास शाहाजीस देऊं केली. सिमगा पोस्त हाजीर मजालसीमध्ये बोलिले. त्याउपर बायकाच्या बोले बेमानी करून आम्हास चाकरींहून रुकसत करून काबिलेसुद्धा बाहीर घातले. यास्तव आपण व जगपाल निंबालकर त्यांचा आसिरा करून मसीदीमध्यें डुक्कर मारिले. याउपर पातशहा आमची दाद देतील तर उत्तम आहे नाही तर तेथवर पादशाहीमध्ये मसीदी तेथे डुक्कर मारून.' यैशा चिठ्या लेहून डुक्कर टाकून रातोरात माघारे गंगा उतरोन फलटण देशास व जगपाल निंबालकर त्यांपाशी आले. प्रात:काली मुजावर मसीदीमधे निमाज पढावयास गेला. तो डुकर दोन गलां चिठ्या पाहिल्या. बहुत कष्टी होऊन डुकर उचलून दौलताबादेस पातशाहा तख्ती बसले होते ते समई पुढे आणून टाकिले. चिठ्या पातशाहानी वाचून पाहिल्या. बहुत क्रोधायमान

जाले. लुखजी जाधवराऊ देशमुख त्यास तलब स्वार आहदी (?) पाठविले जाधवराव जेवीत होते. ते समई तलब पोहोंचली. जेविता ते समई दोबीद्रुम (द्वाही देऊन) तैसेच उठविले. तेच क्षणीं पुढें घालून दौलताबादेस आणिले. पातशाहाचे भेटीस जाऊन कुरनिशी केली. उभे राहिले. पातशाहा बहु क्रोधायमान होऊन चिठ्या पुढे टाकल्या. डुकर दोन्ही दाखविले. पातशाहा बोलिले जे 'आणिक केव्हा उमराऊ असता तर हत्तीखाली घालून मारून टाकिला असता. याउपर मालोजी व विठोजी त्यांचा पुत्र शाहाजीस जिजाऊ देऊन लग्न करणे. त्यांचे समाधान करणे. या गोष्टीस ढील केले तर त्यांणी दावा आणीक केला तर तुमचा मुलाहिजा होणार नाही.' यैसे पातशाहानी ताकीद बहुत केली. जाधवराऊ बहुत घाबिरे होऊन अर्ज केला."

"८ उत्कर्ष : त्या उपर लुखजी जाधवराऊ देशमुख यांणी अर्ज पातशाहास केला जे, 'पातशाहा अभये देतील सिरीं हात ठेवितील तर अर्ज करीन.' ज्यावर पातशाहानीं उभय दिधले जे, 'जो मुदा तुमचा असेल तो कबूल केला.' त्यावरून कुरनिशाती करून अर्ज केला जे 'मालोजी व विठोजी त्यांचा पुत्र शाहाजीस आपली कन्या जिजाऊ पातशाहाच्या हुकुमावरून आपण देतो. यैसियास पातशाहा मेहेरबान होऊन त्यांस येक येकास तिघांस मनसफ दौलत बारा हजार घोडियाची दौलत आपल्याबरोबर देऊन यास कौल देऊन पातशाहांनी शरफराज केलें पाहिजे. त्यांच्या अर्जावरून पातशाहा मेहर्बान जाले. दौलत मनसफ कबूल केली. कौल तयार करून भले माणूस पातशाहानीं व जाधवराऊ त्यांणी पाठवून मालोजी व विठोजी व शाहाजी वर देखील दौलताबादेस जाणून भले माणूस व जाधवराऊ समोरे जाऊन आदरें घेऊन आले. पातशाहाची मुलाजमत जाली. शाहाजी वर सुरत पाहून पातशाहा खुशबक्त जाले."

"९ विवाह : त्याउपर पातशा मेहेरबान होऊन सिरपाव हत्ती घोडे दौलत बारा हजारांची तिघांस देएफन सरुराज केले. त्याप्रमाणें जाधवराऊ त्यांसी दौलत त्याहून विशेष दौलत दिधली. पातशाहानीं जाधवराऊ त्यास हुकुम केला जे, 'कबिलादेखील जिजाऊ नवरी सिंदखेडहून दौलताबादेस घेऊण येणें. येथे आपल्या रुबरू लग्न करून.' त्यावर तमाम लग्न वऱ्हाड जाधवराऊ याणीं आणून लग्न सिध पातशाहा खुद्द उभे राहून दौलताबादेस केले. मालोजी व विठोजी राजे यांणी कबिला कसबें वेलूरीहून आणिला. लग्न जालें. दौलत आली. मालोजीराजे यांचे दिवाण कदीम अऊजी गोविद हणमंते पेशवे आरंभापासून होते. जिजाऊचे जग जतन करावयास, जामदार आपण गोमाजी नाईक पासंबल जाधवराऊं त्याणीं दिधले होते."[४२]

(३) मराठी साम्राज्याची छोटी बखर - या बखरीत वरीलप्रमाणेच सर्व मजकूर आलेला आहे. अधिक मजकूर म्हणजे "शाहाजी राजे.... लुखजी जाधवराव सभेस खेळावयास आणीत होते. जाधवराव यास पुत्रसंतान नव्हते. एक कन्या होती ती बहुत स्वरुपवान जाहाली...."[४३]

(४) शेडगांवकर बखरीप्रमाणे - "नंतर शके १५२२ शार्वरीनाम संवत्सरे फसली सन १०१० (इ.स. १६००) या साली मालोजी राजे.... ताल बांधली. नंतर दौलताबादेस गेले. पुढें कांही दिवसांनी निजामशाहा पातशाहाचे कचेरीस मालोजी राजे व विठोजी राजे हे उभयता बंधू मालोजी राजे याचे वडील पुत्र शाहाजी राजे असे कचेरीत बसले होते... ते लुखजी जाधवराव वजीर हे कचेरीत आले होते ते समई त्याची कन्या जीजाबाई समागमे आली होती. तीनें शाहाजी राजे कचेरीस बसले होते त्याकडे पाहून विनोदानें आंगावर गुलाल रंगपंचमीच्या दिवशी टाकू लागली. तो जाधवराव वजीर याचे कन्येचे आंगावर शाहाजीराजे यांनींहि विनोदानें गुलाल टाकू लागले. हा विनोद उभयताचा पाहून जाधवराव खुष जाहाले. तेव्हा कचोरस आमीर उमराव निजामशाहा पादशाहाचे कचेरीस बसले होते, ते म्हणो लागले की, हा जोडा फार योग्य आहे. तेव्हा जाधवराव वजीर त्या कचेरीत बोलले कीं, ही आमची कन्या शाहाजीराजे यास आम्ही दिली. मग कचेरींतील आमीर उमराव व जाधवराव यास म्हणो लागले की, हे वचन थोराचे सिद्धीस जावे. मग जाधवराव यांनी मुलगी शाहाजीराजे यास दिल्ही म्हणोन स्वमुखी बोलले नंतर कचेरी बरखास्त जाली. आस्तमानी जाधवराव वजीर आपले महालांत गेले तो त्यांचे कुटुंबानी विचारले कीं आपण मुलीविसी कचेरीस मजकूर काय बोलला. आमची मुलगी शाहाजी राजे यास द्यावयाची सोय नाही. त्याची व आमची बराबरी नाही, सबब मुलगी द्यावयाची नाही, अशी जाधवराव यांची स्त्री बोलली. हे वर्तमान ऐकून जाधवराव मनात चकीत जाहाले आणि हे वर्तमान राजे यास समजले. नंतर उभयता राजे याचा मुल शाहाजीराजे यास मुलगी देऊन जाधवराव वजीर बेबदल जाहले. नंतर मालोजीराजे व विठोजीराजे भोसले यांनी दोन डुकरे मारून त्याच्या गळ्यांत दोन चिठ्या जाधवराव याच्या नांवाच्या बांधोन पादशाचे महजिदीत नेऊन गड्याहातीं तीं डुकरे टाविली. नंतर दुसरे दिवशी महजिदींतील मुजावर यांनी.... (बाकी मजकूर अगदी थोड्या फरकाने वरीलप्रमाणे)

...वजीर म्हणो लागले कीं, आम्ही विनोदाने... बोललो. परंतु त्याची व आमची बरोबरी नाही... तेव्हा पातशाहा यास राजे याचा अभिमान येऊन प्रात इंदापूर चौऱ्याशीं गांवची देशमुखीची वृत्तीपत्रे करून राजे यांचे नाव करून दिली आणि वजीर यास विचारले कीं, आता तुमची व राजे याची बरोबरी आहे किंवा नाही.... नंतर दौलताबादेस निजामशाहा पातशाहा यांनी मोठ्या समारंभाने शाहाजीराजे व जाधवराव यांची कन्या जिजाबाई या उभयाताचे लग्न मार्गशीर्ष शुद्ध ५ शके १५२७ विश्वावसुनाम संवत्सरे फसली सन १०१५ (५ नोव्हेंबर १६०५) या साली केले.[४४]

(५) मल्हार रामराव चिटणिसनुसार - यामधील तपशील ९१ कलमी बखरीलाच धरून आहे. यामध्ये विशेष मजकूर येतो तो, "......सिमघा ......कन्या एकच. तेही वय तीन वर्षांचे."

"२२. ....शके १५२५ शोभकृत नाम संवत्सरे माघ शुक्ल १५ पोर्णिमा (५ फेब्रुवारी १६०४) ....देवीनें यांत द्रव्य विपुल आहे ते घेणें. तुझे मनेच्छित प्राप्त होईल[४५] असे सांगून अदृश्य झाली. (डुकराचा वगैरे मजकूर नाही.)

"२५. त्यानंतर निंबाळकर अनुकूल साध्य करून वर्तमान पातशाहास श्रुत केले की, 'जाधवराव यांचे आमचें सर्व सभेंत या रीतीनें बोलणें जालें असतां, आग्रहास पडून, शरीरसंबंध करीत नाही म्हणतात.' तेव्हा पादशाहांनी जाधवराव यास आज्ञा सांगून पाठविली की, 'भोसले यांचा तुमचा करार शरीरसंबंधाचा जाला असतां आग्रह करितां तो करू नये. मूल द्यावी.' त्यावरून जाधवराव यांणी अनमान करून उत्तर पाठविलें. तेव्हां 'अनमान काय निर्मिते करतात. हें विचारावयास पाठविलें. त्या समयी 'यांचे भाग्य, वैभव आमचे बरोबरीचे नाही. वरकड शरीरसंबंधीच आहों. आमचे घरांत सर्वांचे विचारें समान स्थल पाहून कन्या द्यावी, ऐसे आहे.' ते समयी पादशाहाने.... पंचहजारी मनसब, 'राजे ऐसा किताब लिहून, शिवनेरी जुन्नर वगैरे तालुका सरंजाम व साहेबनौबत दिल्ही. जाधवराव याहून भाग्यवान केले आणि याउपरी यांचे पुत्रास कन्या द्यावी म्हणून आज्ञा केली..... शके १५२६ (१६०४ इ.) यांत लग्न केले. ....मुलीचें नाव जिजाबाईसाहेब ठेविले."[४६]

(६) शिवदिग्विजयांतील तपशील मालोजी व जाधवराव बरोबरीच्या नात्याने वागत होते या भूमिकेवरून सजविला आहे.[४७]

(७) 'श्रीशिवाजीप्रतापां'त शिवदिग्विजयाला धरूनच सारांशानें मजकूर आलेला आहे. मात्र लग्न "ज्येष्ठ शुद्ध दशमीस" झालें म्हटले आहे. शक दिलेला नाहीं. इतर मजकुरांत "त्यासमयी जाधवरावांकडील कामदार नारो त्रिंबक मजमदार हणमंते, व गोमाजी नाईक पानसंबल हवालदार, इतबारी, बायकां-मुलांस इतबारानीं वागणार,विश्वासू खातरजमेचे जाणून, जिजाऊसाहेबाबराबर दिल्हे...."[४८]

(ख) शहाजीचे इतर लग्न :

शाहाजी राजांच्या दुसऱ्या लग्नासंदर्भाची हकीकत शिवदिग्विजय पुढीलप्रमाणे देतो, "....जिजाईचे पोटी प्रथम दौलताबादेस असतां शके १५४५ मध्ये पुत्र (संभाजी) जाला.... ते पांचवार वर्षाचे समागमेंच विजापूरास आणिले... दुसरे लग्न विजापूरीं तुकाबाईशी १५४९ आनंदनाम संवत्सरी वैशाखमासी लग्न जहाले.... शिवनेरी येथे बाई एकटी.... स्वामीचा वियोग जाला...."[४९]

सभासद आपल्या बखरीच्या सुरवातीस शाहाजीचा वंशविस्तार सांगताना लिहितो, "शाहाजी राजियासी दोघी स्त्रिया, प्रथम स्त्री जिजाईआऊ दुसरी स्त्री तुकाबाई आऊ. तिचे पोटी एकोजी राजे पुत्र झाले...."[५०] यापुढे बेंद्रे सांगतात की, तुकाबाईचा एकोजी हा मुलगा तंजावराकडे आदिलशाहीच्या नोकरीत राहिला. शाहाजीची तिसरी बायको नरसांबा हिला संताजी नावाचा पुत्र झाला व चौथी एक दासी होती तिला कोयाजी नावाचा पुत्र झाला. जिजाबाईपासून शाहाजीला शिवाजीनंतर एक मुलगीही झाल्याचा उल्लेख येतो असे स्पष्ट करतात.[५१]

(ग) शाहाजी-जिजाईच्या लग्नासंदर्भातील वा. सी. बेंद्रेंची चिकित्सा :

(१) शाहाजी राजांचा जन्मच मुळी इ.स. १६०१ तील व मालोजीचा मृत्यू १६०६ तील धरला म्हणजे वरील लग्नासंदर्भात आलेली वर्णने म्हणजे काल्पनिक कथा होत हे स्पष्टच होते, असे बेंद्रे सांगतात.

(२) मालोजीला जाधवरावाजवळ दारावर बारगिरी करण्याचें प्रयोजन पडलेंच नव्हते कारण मालोजी शाहाजीच्या जन्मापूर्वी.... अगदी बखरकारांचा शाहाजी जन्मकाल धरला तरी.... उमराव होऊन मकरंदपुरा बसवून तेथे राहावयास आला होता. तेव्हा लग्नाच्या भांडणावरून मालोजीला जहागिरी दिली गेली असें होत नाही, असे बेंद्रे सिद्ध करतात.

(३) त्याचप्रमाणे निजामशाहीची राजधानी इ.स. १६०६ तील मालोजीच्या मृत्युपर्यंत तरी दौलताबादेला नव्हती हे ही ऐतिहासिक पुराव्यांवरून सिद्ध आहे. अर्थात बखरकारांच्या या दौलताबादेतील मालोजीच्या हयातींतील लग्नाशी निजामशाहाचा संबंध येणेच अशक्य आहे, असे बेंद्रे सांगतांना आपल्याला दिसतात.

(४) मालोजीकडे गोमाजी नाईक मकरंदपुरी १५९६ तच असल्याचें कागदोपत्री सिद्ध असल्यानें याला जिजाईबरोबर जाधवरावानें दिले असे ९१ कलमी बखरीसारखे जे इतर साधने सांगतात ते साफ चुकीचे आहे असे बेंद्रे सांगतात.

(५) मशिदींत डुकरे टाकल्याचा तपशील जो सर्वांनी घेतलेला नाही. निजामाने किंवा त्याच्या मुस्लीम सरदारांनी तो सहन केला असता असा तो कालही नव्हता. तसेच एकाच रात्रींत फलटण ते दौलताबाद मजल गाठणें व वाटेत यांच्या सैन्याला अटकाव न होणें वगैरे गोष्टी पूर्णपणे असंभाव्य आहेत, असे बेंद्रे स्पष्ट करतात.

(६) या बखरकरांनी दिलेल्या तारखा चुकीच्या दिलेल्या आहेत, त्याही वस्तुस्थितीला धरून नाहीत. ज्या बखरकारांना जिजाईचे माहेरचें नावही माहीत नाही, जिजाईला भाऊ नव्हतेच अशी माहिती जे सांगतात, ते बखरकार जाधवराव पतीपत्नींचे संवाद निजामशाहीचे संवाद वगैरे देतात!

अर्थात हे सर्व संवाद कांदबरीवजा आहेत, त्यांना इतिहासात कवडीचीही किंमत देतां येत नाही. असें काही विशिष्ट लग्नाचे समयीं घडले असतें तर कवींद्र परमानंदाला किंवा जिजाईबाचे हयातींत कामगार होते त्यांना सहजच समजले असते आणि त्यांना हे प्रकरण रंगवण्यास चांगलाच वाव मिळाला असता. म्हणून हे सर्व चुकीचे आहे, असे बेंद्रे सिद्ध करतात.[५२]

सत्यता :

सर्व साधनांचा विचार करितां एक गोष्ट सर्वांना समंत दिसते ती म्हणजे शाहाजीचे लग्न वयाच्या १० व्या वर्षानतर व जिजाईच्या सातव्या वर्षानंतर झाले.[५३] त्यावेळी पंचहजारीची देवघेव झाली व त्या लग्नाला निजामशाहा हजर होता किंवा त्या लग्नांत त्यानें बराच आपुलकीचा भाव दाखविला.

शाहाजीचा जन्म इ.स. १६०१ चा असावा, तत्पूर्वी नसावा हे तत्कालीन परिस्थितीवरून अनुमानण्यांत आलें. या अनुक्रमाने शाहाजीचे लग्न १६१०-११ तील धरावें लागते. शाहाजीकडे

मालोजीची संपत्ती इ.स. १६०६ अखेर आली होती, तरी सरंजामीचा कारभार त्याचेकडे आला नव्हता. विठोजी वगैरे सरदार तो पाहात असावेत. खासस पांडपेडगांव परगण्यातील खुर्दखतें वगैरे मलिक अंबरादि मुसलमान सरदारांची आहेत; परंतु विशेष महत्त्वाची पत्रें म्हणजे पूर्वीची चाल मोडून विठोजीराजे यांनी आपल्या एकट्याच्याच नावावर शिंगणापूरची मोकदमी घेणे व त्यानंतर ती मोकदमी विठोजीचा ज्येष्ठ पुत्र संभाजी याचे नांवावर करून देणें. ही पत्रें इ.स. १६११-१३ मधील आहेत. अर्थात, या सुमारास या दोन भावांच्या कुटुंबात वेगळेपणा आलेला दिसतो; आणि हा वेगळेपणा शाहाजीच्या लग्नानंतर येणे अधिक संभवनीय आहे. जर शाहाजीचे लग्न इ.स. १६१० त झाले असेल तर कदाचित जाधवरावांच्या इच्छेवरून किंवा खास निजामशाहा म्हणजे मलिकअंबराच्या इच्छेवरून लग्नप्रसंगी शाहाजीकडे त्याच्या वडिलांची सरदारी सोंपविणें साहजिक आहे आणि अशा नवरदेवाला की ,जो अव्वल क्षत्रिय कुळातील आहे, जो खास आपल्या पत्नीच्याच निकटच्या नात्यांतील आहे, ज्यांचे रूप व संस्कृती उच्च दर्जाची आहे. अशा मुलाला आपली मुलगी देण्यांत बापाच्या व मातेच्या कुटुंबाना विषाद मानण्याचें कांहीच कारण नव्हते. उलट त्या सर्वात संतोषाचेंच वातावरण त्यावेळी नांदत असले पाहिजे आणि जिजाबाईंशी प्रत्यक्ष संबंध आलेला कवींद्र परमानंदही हेंच सांगत आहे, असे बेंद्रे सांगतात. रूपगुणांचे वर्णन काव्य आहे असें मानले तरी प्रसंगवर्णन पूर्णपणें वास्तवबोधी आहे यांत शंका नाही. त्याने हे लग्न मालोनीच्या मृत्युनंतर झाले हे स्पष्टच केले आहे आणि ते तत्कालीन वस्तुस्थितीला धरून आहे. विठोजीच्या मृत्युनंतर, म्हणजे इ.स. १६११-१२ नंतर शाहाजीनें "राज्याचा मोठा भार आपल्या शिरावर घेतल्याचेंहि" परमानंदाने सांगितले आहे.

सारांश, शाहाजी-जिजाईच्या लग्नाची बखरकारांची कथा कितीही मन रंजित करीत असली तरी ती वस्तुस्थितीला धरून नाही, आणि या काल्पनिक कथेमुळे मालोजी-शाहाजीच्या चरित्रांना उठाव आणण्याचा प्रयत्न केला म्हणावे तर तसेही नाही. लखुजी जाधवराव व शाहाजी यांच्यात अप्रत्यक्षपणें वाकडे येण्याचे खरे कारण कोणाही बखरकारांना जाणतां आले नाही. त्यांनी या भांडणाचा संबंध केवळ तर्काने जिजाबाईंच्या लग्नाच्या काल्पनिक कथेशी जोडून दिला आहे. तो पूर्णतः असत्य कोटीतील व कथात्मक थाटाने दिलेला आहे, असे बेंद्रे स्पष्ट करतात.[५४]

३.८.६ शाहाजी राजे - लखुजी जाधव संबंध

(अ) शाहाजी-जिजाई लग्नानंतरच्या लखुजी जाधवरावाच्या हालचाली व शाहाजी राजे:

कवींद्र परमानंदनाने भोसले बंधूबद्दल "निजामस्य प्रियकरा:" व "परं न गणयामासुरंबरस्य मते स्थिता:" अशी विशेषणें जोडली आहेत. त्यात त्याचा गार्भितार्थ त्यांचे प्रतिस्पर्धी तसे नव्हते असे विशेषत्वाने सांगण्याचा मानस दिसतो. हे तत्कालीन वस्तुस्थितीला धरून आहेही असे बेंद्रे म्हणतात व ते खालीलप्रमाणे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

शाहाजीच्या लग्नानंतर जाधवराव पंचहजारीच असावा व त्यास मीर झामान म्हणत असावेत. इंग्रजांचा काफिला मलिक अंबरच्या सरदारांनी लुटला. इंग्रजांनी भरपाई मागितली ती नाकारली गेली. आग्रा येथील इंग्रजांनी सुरतकरांना २२ ऑगस्ट १६३१ ला व जेफ्रीने सुरतेला ३० ऑक्टोबर १६२१ दिलेल्या पत्रावरून[५५] कळते की, ह्या मीर झमानला फक्त (५०००) पांच हजारांचाच सरंजाम होता असे म्हणण्यास हरकत नाहीं. सारांश, जाधवरावावर तेवढी मेहरनजर नव्हती, हें बरोबर दिसतें. एकतर १६१५-१६ इ.स. मध्ये तो मोगलाकडे गेला होता व त्यानें मनसुरखानाला इंग्रजाचा काफिला लुटण्यास मलिक अंबराच्या हुकुमाविरूद्ध मदत केली असली पाहिजे. बेंद्रे पुढे म्हणतात, जावधराव इ.स. १६२१ च्या ऑक्टोबर मध्ये निजामशाही सोडून, बहुधा मलिक अंबराशी बिघडल्याने मोगलांकडे गेला. तो तेथें शहाजहानानें आपल्या बापाविरूद्ध जे बंड पुकारलें, त्या वेळेपर्यंत शहाजहानाकडे मोगली चाकर म्हणूनच राहिला होता. खुर्रमनें ज्यावेळीं बापाकडे न जातां मंडूंत राहण्याचा हट्ट (मार्च-एप्रिल १६२२) धरिला, तेव्हां खुर्रमच्या वागणुकीची ही बातमी जहांगीरला १२ एप्रिल १६२२ ला कळाली. तेव्हांच त्याचा संशय आला. अधिक माहिती आल्यावर म्हणजे १४ ऑक्टोबर १६२२ रोजी त्याची समजूत घालावी म्हणून त्यास गुजराथ, माळवा, दखखन व खानदेशा सुभा सांभाळून मनास येईल तेथे राहण्याचा परवाना पाठविला. त्यानंतर खुर्रम बंडास उद्युक्त झाला आणि ही बातमी लागताच जहांगीरनें मुसावीखानाबरोबर डिसेंबरमध्ये खुर्रम यांस तंबीचा निरोप पाठविला. परंतु खुर्रम आगऱ्याचा किल्ला घेण्यासाठी ९ फेब्रुवारी १६२३ पूर्वीच आगऱ्यावर चालून गेला.[५६]

शाहाजहानच्या बंडाच्या हालचालींचा विचार केला तर असें दिसते की, शहाजहानने बंड पुकारण्यापूर्वी निजामशाहा, आदिलशाह व कुत्बशाहा यांची मने आपल्याकडे वळवून घेतली होती. खुर्रमने आपले नवीन सरदार नेमणें वगैरे काम ऑक्टोबर १६२२ मध्ये केले आणि त्यानंतर

जाधवराव निजामशाहींत पुन्हा दाखल झाला. मात्र शहाजहानानें प्रत्यक्ष बंड पुकारीपर्यंत तो शहाजहानचा म्हणजे मोगलाचा चाकर म्हणूनच मानला गेला. जाधवराव इ.स. १६२१ पासून जो मोगली नोकरींत गेला तो पुन्हा मलिक अंबरच्यातर्फे शहाजहानाचा साथीदार म्हणून पुन्हां निजामशाहींत इ.स. १६२३ च्या सुरुवातीस आला.[५७]

१९-२७ फेब्रुवारी १६२३ च्या दरम्यान खंडागळ्याच्या हत्तीचे प्रकरणे घडले. भोसल्याशीं भांडण झाल्यानंतर जाधवराव मार्चच्या पहिल्याच आठवड्यात मंडूकडे रवाना झाला आणि त्याने मंडूहून २३ जूनपूर्वीच शहाजहानकरितां ४००० फौज व रसद घेऊन कुमकेस गेल्याचाही उल्लेख वर आला आहे. शहाजहाननें जाधवराव, उदाराम वगैरे मराठे सरदार एप्रिलपूर्वीच मोगली सेनेवर पाठविले होते. जाधवरावानें मनसुरखानाचा मोड केला. परंतु त्यानंतर आसिर, बऱ्हाणपुर, अहमदाबाद येथील लढ्यांत त्यास माघारच घ्यावयास लागली. जूननंतर ही खुर्रमची सेना जाधवरावाच्या प्रांतातून गेली; परंतु त्याच्या पराभवानंतर जाधवरावानें आपला काढताच पाय ठेवला होता.[५८]

जाधवरावाला परत निजामशाहींत तितका मानमरातब मिळण्यासारखा नव्हता. कारण एक तर सरदारांतील आपआपसांतील वाढलेली तेढ व जाधवराव मोगली सुभ्याची कारवाई जाचक होणारी असल्यानें मलिक अंबरलाही जाधवरावाला उघड आश्रय देणें जड जाणार होते. कारण शहाजहानला माघार घ्यावी लागतांच कुत्बशाहा, आदिलशाहा व निजमाशाहा यांना आपले वकील पाठवून मोगलांशी पूर्वीच मैत्री दृढ करण्याची खटपट सुरू करावी लागली होती.

जाधवरावाची अवस्था आता वाईट झालेली होती एक तर निजामशाहाचा आसरा मिळणें कठीण होते आणि निजामशाहालाही ही नसती पीडा अंगावर ओढून घ्यावयाची नव्हती. कदाचित निजामशाहानें जाधवरावाला पकडून मोगलांचे हाती देण्याचा घाट घातला असण्याचा संभव होता. अशा परिस्थितींत जाधवरावानें आपण होऊन महाबतखान व पर्वीज यांच्याशीं बोलणें लावून पुन्हा मोगली चाकरींत शिरण्याचा साहजिकच प्रयत्न केला; आणि शहजहानाची सर्व दौलत सहज साध्य होत आहे हें पाहून जाधवरावाला मोगली मनसबदारी पुन्हां मिळू शकली. जाधवराव अधिकाधिक इ. स. १६२४ च्या सुरवातीलाच मोगलाकडे पुन्हां रुजू झाला असावा. कारण १५ मार्च १६२४ च्या पूर्वीच जाधवरावांची नेमणूक बालाघाट प्रांताच्या बंदोबस्तासाठी केली असल्याचे जहांगीरनाम्या म्हटले आहे.

सारांश, १६२१ ते १६२४ च्या काळात जाधवरावांचा निजामशाहींत फारच थोडा म्हणजे २-३ महिन्यांचा फार तर मुष्काम झाला होता आणि त्या थोड्या अवधीत भोसले व जाधव यांचे भांडण जुंपले आणि त्यात संभाजी भोसले व दत्ताजी जाधव यांचा बळी गेला व शाहाजी आपल्या सासऱ्याच्या हातून घायाळ होऊन मूर्च्छित होऊन पडला, पण वाचला.

(ब) खंडागळे प्रकरण आणि जाधवराव-शाहाजी यांच्यात भांडण :

कवींद्र परमानंदाने सांगितल्याप्रमाणे "खंडागळ्यांच्या हत्तीने जेव्हा दंगल केली तेव्हा त्या हत्तीला थांबविण्यासाठी जाधवरावाचा मुलगा दत्ताजी पुढे आला व तो हत्तीला वठणीवर आणण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा संभाजीही खंडागळ्याच्या बाजूने हत्तीला वाचविण्यासाठी मैदानात उतरला, नंतर संभाजी व दत्ताजी यांच्यातच संघर्षाला सुरुवात झाली व संभाजीकडून दत्ताजी मारल्या गेला. ही बातमी जेव्हा जाधवरावाला कळाली तेव्हा तो संभाजीवर चालून आला व आपला सासरा संभाजीवर चालून येत आहे हे पाहून शाहाजीपण त्या संघर्षात उतरला तेव्हा जाधवरावाच्या वाराने शाहाजी काही वेळ बेशुद्ध पडला व नंतर संभाजी, जाधवराव यांच्यात युद्ध झाले ज्यात संभाजी ठार झाला. त्यानंतर निजामशाहाने हसतक्षेप करून त्यांना शांत केले.[५९]

बेंद्रेनुसार घटनाकाळ :

बेंद्रे म्हणतात, संभाजी राजे यांचे पांडेपेडगांव परगण्याचा अधिकारी म्हणून २५ मार्च १६२१ चें, दुसरे २३ नोव्हें. १६२२, तिसरें १९ फेब्रु. १६२३ अशीं तीन पत्रें उपलब्ध आहेत व ताबाईआवानें ठेवलेल्या २१०० होन व सोने १०८ तोळे यांची वाटणी सातच भावांत झालेली पत्रें २७ फेब्रु. १६२३ चीं आहेत. या शेवटच्या दोन पत्रांवरून त्यांत संभाजीचा उल्लेख नसल्याने तो या दिवशी हयात नसावा व मालोजी हा राहिलेल्या सहा भावांतून निराळा राहात असावा असा बोध होतो. उलट तिसरें पत्र १९ फेब्रु. असल्यानें संभाजी हयात होता असे मानणें प्राप्त आहे.

सारांश, संभाजीचा मृत्युकाळ २० ते २६ फेब्रुवारीमधील असल्याचे अनुमान सत्य परिस्थितीस धरूनच होईल आणि शिवभारतांत वर्णिलेला उपरनिर्देशित प्रसंगही यात ७ दिवसांतील मानावा लागेल असे बेंद्रे स्पष्ट करतात.

(क) भातवडीचे युद्ध (ऑक्टोबर १६२४):

जेधे शकावलीप्रमाणे ही "भातवडीची लढाई आक्टोबर १६२४ त झाली व मलिक अंबरनें मोगलांचा सुभेदार लस्करखान व येदीलशाही मुला महमद यैसी दोन कटकें मलिक अंबरें

बुडविली." ज्याअर्थी ही बातमी गोव्यास १६२४ च्या ३१ ऑक्टोबरला गेली त्याअर्थी ही लढाई त्या महिन्याच्या पहिल्या तीन आठवड्यांतच झाली असली पाहिजे. वरील तपशिलांत १०३३ हा सन व जहांगीरचा १९ वा जुलूस दिला आहे. अर्थात हा काल ९ मार्चनंतरचा असून गोव्याच्या पत्राप्रमाणें ३१ ऑक्टो. १६२४ पूर्वीचा आहे. जेधे शकावलीचा महिना बरोबर असण्याचा अधिक संभव आहे. कारण ही लढाई पावसाळ्यानंतर म्हणजे आश्विनानंतर म्हणजे सप्टेंबरनंतर झालेली असणार असे बेंद्रे सांगतात.

भातवाडीच्या लढाईत शाहाजी व शरीफजीच्या पराक्रमाविषयीची वरील तपशीलवार माहिती शिवभारतात आली आहे. ती अशी : " तेव्हा शाहाजीराजा, धनुर्धारी शरीफजी, शूर व गुणवान खेळकर्ण, बलवान मल्लराव, मंबाजीराजा, हत्तीप्रमाणें बल्लाढ्य असा नागोंजीराव, परसोजी, त्र्यंबकराज, आपल्या बाहुबलानें युद्धांत विख्यात असा कवक शत्रुजेता हंबीरराव चव्हाण.... सूर्याप्रमाणें प्रतापी मलिक अंबरखान बर्बर..... दुसरेहि मोठे सेनापती हे त्या निजामशाहाचें सर्व बाजूनीं रक्षण करीत होते. अशा स्थितींत तो शत्रूसमुहाचा विध्वंश करणारा, आपल्या बाहुबलाविषयीं दर्प बाळगणारा, अग्निप्रमाणें प्रखर असा निजामशाहा आपल्या शत्रूस खिजगणतीतहि मानीनासा झाला."[६०]

"परंतु आदिलशाहा हा दिल्लीच्या बादशाहाच्या मदतीस निजामशाहाशीं युद्ध करण्याची तयारी करू लागला. जलालखान, जहानखान, जहानखाल, खंजीरखान, सिकंदरखान, करमुल्ला खलेलखान, सुजानखान, सामदखान असे हे सर्व प्रतापी मुसलमान बहादुरखानासह आले. युद्धपरायण दुदराज, क्षात्रकर्मामुळें प्रख्यात असा उदाराम ब्राह्मण, युद्धामध्ये भारद्वानासारखा पराक्रमी दादाजी विश्वनाथ, राघव, अंचल, जसवंत आणि बहादुर हे जाधवरावांचे पुत्र आणि स्वत: बलाढ्य जाधवराव हे सर्व लष्करखान सेनापतीसह दिल्लीच्या बादशाहाच्या आज्ञेनें दक्षिणेत प्राप्त झाले. ज्याप्रमाणें अप्रतिहत आणि शीघ्रगति वायु आकाशाचें आक्रमण करतों त्याप्रमाणें त्या पराक्रमी सेनापतीनीं निजामाचा मुलूख पदाक्रांत केला."[६१]

नंतर उत्तरेकडून मोगलांचे व दक्षिणेकडून आदिलशाहाचें सैन्य चालून आलें असतां, त्यांच्यावर निजामशहानें पाठविलेला अंबर चालून गेला. तारकासुराशी झालेल्या युद्धात जसे देव कार्तिकेयाच्या सभोंवती जमले, त्याप्रमाणें शाहाजीप्रभृति राजे मलिंक अंबराभोवती जमले. नंतर मलिकंबराचे शत्रुशीं घनघोर युद्ध झाले; आणि त्यामुळे पिशाच्च, भुते, वेताळं, निशाचर यांची

चंगळ उडाली. माणसें, घोडे, हत्ती यांच्या रक्ताचा नदीच्या काठी मोठमोठे वीर जणू काय थकल्यामुळें महानिद्र घेऊं लागले. नेम मारण्यांत पटाईत असणाऱ्या आणि हातांत भाला धारण करणाऱ्या वीरांकडून स्वार मारले गेल्यामुळें घोडे क्रोधानें अत्यंत खवळून जाऊन इतस्ततः धावूं लागले. नंतर शाहाजी व शरीफजी, महाबलवान खेळोजी, मलिकंबराचें प्रिय करणारे कृष्णमुखी यवन (शिद्यी), त्याचप्रमाणें हंबरावप्रभृति इतर पराक्रमी वीर यांनी हातांत बाण, चक्रें, तरवारी, भाले, पट्टे घेऊन मोगलांच्या अफाट सैन्याची खूप कत्तल उडविली. तेव्हा ते भयभीत होऊन जीव बचावण्यासाठीं दाही दिशा पळूं लागले. ती मोगलांची सेना पसार झालेली पाहून इभ्रहिम आदिलशाहाच्या सैन्यासह पळतां भुई थोडी झाली."[६२]

"मस्त हत्तीच्या जोरावर गर्विष्ठ असा मनचेहर नांवाचा मोगल त्या सैरावैरा पळणाऱ्या सैन्याच्या पिछाडीचें रक्ष करुं लागला. गर्वाने मध्ये स्थिर राहिलेला, रस्ता अडवून पुढे जणू काय दुसरा विंध्यपर्वतच उभा राहिला आहे अशा त्या, आपल्या जयाच्या आड आलेल्या, मनचेहरास पाहून शाहाजी, शरीफजी आदिकरून सर्व पराक्रमी भोसल्यांनी कापाकापी करण्यास सुरुवात केली. महार्वताप्रमाणें भव्य अशा हत्तींच्या भिंतीच्या आश्रयाने उभ्यास राहिलेल्या त्या अत्यंत गर्विष्ठ मनचेंहरांशीं ते कवचधारी भोसले वीर लढूं लागले. तेव्हा न डगमगणाऱ्या व युद्धोन्मत शरीफजीनें निश्चल मनानें आपल्या तीव्र भाल्याच्या फेकींनी तें हत्तीचे सैन्य ठार केलें. त्रिशूळ, धनुष्य, बाण, गदा, परिघ (दंड) ही शस्त्रे धारण करणाऱ्या गजदळानें पुढें चालून येणाऱ्या त्या शरीफजीस अडविलें नंतर चौफेर लढणाऱ्या व खवळलेल्या त्या अभिमानी शरीफजीस त्यांनी आपल्या तीक्ष बाणांनी खालीं पाडलें."[६३]

"शत्रुंच्या हत्तीचा सप्पा उडवून, शत्रुंच्या बाणांनीं विद्ध झालेला आपला शूर, धाकटा भाऊ धारातीर्थी पडलेला पाहून खवळलेला शाहाजी आपल्या खेळकर्णप्रभृति बंधूंसह मनचेहर व त्याचें सैन्य यांच्यावर वेगानें चालून गेला तेव्हा तो प्रतापवान मोगल शत्रुच्या उत्कृष्ट भाल्यांच्या भीतीनें आपले मदोन्मत हत्ती मागें हटलेले पाहून स्वतः माघार घेतला झाला. सुरक्षित हत्तीसह तो युद्धांतून पळून जाऊं लागला असतां निजामाशहाचे सैन्य सिंहगर्जना करुं लागले. तेव्हा कोणी उत्तरेकडे, कोणी पश्चिमेकडे आणि कोझी पूर्वेकडे असे ते मोगल वेगानें पळू लागले. नंतर हर्षभरित होऊन शाहाजिप्रभृति राजांनी त्या पळणाऱ्या शत्रुंचा पाठलाग केला व त्यांस बळाने कैद केले. युद्धामध्ये भयंकर अशा पुष्कळ मोगलांच्या आणि इतर वीरांच्या दडांत जबरीनें बेड्या

अडकावून त्यांना मलिक अंबराच्या पुढे आणून उभे केलें. याप्रमाणे भोसल्यांच्या बाहुबलाच्या साहाय्याने शत्रूला जिंकून प्रतापी मलिक अंबर नगारे व शिंगे यांच्या जयघोषांत निजामशाहाच्या भेटीस त्वरित गेला."[६४]

यानंतर शाहाजीचें व मलिक अंबर यांचे वाकडे झाल्याने शाहाजी निजामशाही सोडून आदिलशाहाकडे सन्मानानें गेला, ही हकीकत सांगतांना कवीन्द्र परमानन्द लिहितो, "धृतराष्ट्राचे मुलगे शांतवृत्ति धर्मराजाचा ज्याप्रमाणें मत्सर करीत असत त्याप्रमाणें विठोजी राजाचे खेळकर्णप्रभृति पुत्र हे भाऊबंदकीमुळें शाहाजी राजाचा पदोपदीं शत्रुप्रमाणें अतिशय द्वेष करुं लागले. ज्याने आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें पृथ्वी वश केली आणि आश्रय करण्यास योग्य अशा जिनामशाहाच्या मलिक अंबर प्रधानाचा, आपणास वैभव प्राप्त व्हावें अशी सदोदित इच्छा करणाऱ्या, विठोजीच्या पुत्रांनी ज्याचा आश्रय केला, असा सूर्याप्रमाणें तेजस्वी शाहाजी त्यांच्या डोळ्यांत सलूं लागला. आपल्या कुलामध्यें फुट उत्पनन झाली आहे, हें त्या मनकवड्या आणि बुद्धिमान शाहाजीनें ओळखले आणि मलिकंबर निजामशाहा व आपल्या विरूद्ध कपट कारस्थान करणारे आपले दुष्ट चुलतभाऊ, याचा तिरस्कार करून अत्यंत उत्साह, मानी, गरुडाप्रमाणें पराक्रमी, विजश्रीचे माहेरघर व खांद्यावर भाला टाकलेल्या शाहाजीनें, आपले सैन्य आणि विपुल युद्धसामुग्री यासंह जलदीने आपल्या जहांगिरीस प्रयाण केलें. तेथून निघून जाऊन आपल्या जहागिरींत मोठ्या ऐश्वर्यानें राहिलेल्या त्या शाहाजीस निजामशाहाचा प्रधान मुळीच वश करुं शकला नाहीं. सूर्यावांचून आकाश जसें शोभत नाहीं, त्याप्रमाणें शाहाजी निघून गेल्यामुळें निजामाचें राज्य समृद्ध असतांही त्याची कळा गेली. भेट पाहण्याला ही संधि योग्य आहे असे पाहून त्या महामति व निजामशाहाशीं स्पर्धा करणाऱ्या आदिलशाहानें आपल्या सरदारांकरवीं त्या महाबाहु अतिशय उत्साही आणि थोर मनाच्या शाहाजीस साहाय्यार्थ आणवून तो आपणास अजिंक्य मानूं लागला."[६५]

अशाप्रकारे भातवडीच्या लढाईत शाहाजी, शरीफजी निजामशाहीकडून मलिक अंबरला मदत करीत होते तर जाधवराव व त्याचे पुत्र शाहाजीच्या विरोधात मोगली सैन्यांची मतद करीत होते. यामध्ये निजामशाहीचा विजय झाला आणि परिणामी जाधवरावाला अडचणीचा सामना करावा लागला.

भातवडीच्या युद्धानंतर परमानंद म्हणतो त्याप्रमाणे शाहाजीच्या चुलत भावांनी त्याच्या विरोधात कटकारस्थाने करण्यास सुरुवात केली. परिणामी मलिक अंबर व शाहाजीचे संबंध बिघडले व शाहाजी आदिलशाहाच्या आश्रयास गेला. म्हणजेच १६२५ च्या सुरुवातीस कदाचित मलिक अंबरने सोलापूरचा किल्ला घेतल्यानंतर निजामशाही चाकरीतून निवृत्त होऊन आपल्या जहागिरीत जाऊन राहिला. याचवेळीं आदिलशाहीचे चांगले सेनापती कैद झाले किंवा मारले गेल्यांने[६६] जी हलाखी आली होती ती शाहाजीला मिळवून त्यास सरलष्कर करून आदिलशाहानें भरून काढली.

३.८.७ शहाजी इब्राहिम आदिलशाहाच्या चाकरीत (इ.स. १६२४-१६२८)

भातवडीची लढाई झाली आणि शाहाजी राजे इ. स. १६२५ च्या जुलैचे पूर्वीच मलिक अंबरावर रागावून घरी बसले होते. त्यांना आदिलशाहाने मुल्ला महमदाची रिकामी झालेली सरलष्करी व मुल्ला महमदाचा पुणें-मावळ प्रांत सरंजामार्थ लावून दिला. त्याचबरोबर शाहाजीने शिरवळ परगण्याचा ताबा सोडला असला पाहिजे. तो शाहाजीचा सुभा व सरंजाम शाहाजीनंतर साबाजी अनंतास व विश्वासरावाचा हवाला गोविंद विश्वनाथाकडे आला असावा असे वा. सी. बेंद्रे तत्कालीन एक महजराचा हवाला देवून सांगतात.

(अ) साबाजी व मुधोजी सोबत संघर्ष :

आदिलशाहानें शाहजीस सरलष्कर म्हणून घेण्यांत दोन हेतू साधले. मारले गेलेल्या दोन सरदारांमुळे झालेली नुकसानी भरून काढली व त्याचबरोबर शाहाजीनें रायारावाला पराभूत करून (आदिलशाहीत येण्यापूर्वी मलिक अंबरच्या आदेशाने शिरवळ व कार्यातमावळचे परगणे मिळविण्यासंदर्भात) ताब्यात घेतलेले परगणेहि आदिलशाहाकडे परत राहू शकले. अर्थात ही फूट होत असल्याची बातमी कळतांच मलिक अंबरनें हे दोन्ही परगणे साबाजी अनंताकडे देऊन त्याला ते घेण्यासाठीं शाहाजीवर पाठविलें. शाहाजी आदिलशाहाकडे २८ जुलै १६२८ पूर्वीच गेला होता. साबाजी पंताने शाहाजीस गोसमाल देऊन आदिलशाही फौजेस सालपा घाटात कोंडून धरिले व शिरवळ परगण्यांतील कांही प्रदेशाचा ताबाही डिसेंबरपूर्वी ३-४ महिने घेतला होता. यावरून ही शाहाजी साबाजीपंतांची लढाई १६२५ त त्या वर्षाच्या जूनपूर्वीच झाली असावी असे बेंद्रे म्हणतात. तसेच यानंतरच कदाचित शाहाजी आणि मुधोजी फलटणकराची लढाई झाली असणे शक्य दिसते. मुधोजी हा आदिलशाहाच्या विरूद्ध होता आणि सालपा घाटांत शाहाजीला

कोंडण्यात उत्तरेकडून साबाजीपंत व दक्षिणेकडून मुधोजी फलटणकर यांच्याच हालचाली कारणी झाल्या. शाहाजीनें साबाजीपंत परततांच मुधोजीबरोबर लढाई करून त्यास पराभूत केल्यानें शाहाजीला आपला कार्यभाग साधतां आला असे बेंद्रे सांगतात.[६७]

सारांश, शाहाजी महाराज आदिलशाहींत सुमारें तीन वर्षे राहिले. या अवसरांत शाहाजीला साबाजीपंताच्या लढाईखेरीज मुधोजी फलटणकराचा पाडाव, केरळ व कर्नाटक प्रांतातील लढ्यात भाग घेऊन आदिलशाहीची झालेली नाचक्की सुधारण्यांत झगडावे लागले.

(ब) शाहाजीने आदिलशाहीत मराठा सरदारांना उत्तेजन दिले :

इब्राहिम आदिलशाहाची शाहाजीवर मर्जी होती. शाहाजीनें आदिलशाहीत आपले सामर्थ्य वाढावें म्हणून त्याचे सासरे मोहिते यांची दौलत १० जाने. १६२६ च्या फर्मानाने वाढवून घेतली. तुकाईचें लग्न याच शाहाजीच्या आदिलशाहींतील कारकिर्दीत शिरण्यापूर्वी म्हणजे इ.स. १६२१ त झालेसें दिसते. मोहित्याप्रमाणें आपले भाऊबंद बाजी घारेपडे यांनाही इब्राहिम आदिलशाहास भेटवून वजीरी देवविली होती. आदिलशाहीत सर्व मुख्याधिकारी शाहाजीला सरलष्करी मिळेपर्यंत वजिरींत नसत. सर्व मुसलमान वजिरांचे हाताखाली दुय्यम सरदार म्हणून वागत. शाहाजी महाराजांपासून हा रिवाज बदलला आणि शाहाजीनंतर मुरारावाला वजिरींत यावयास मिळालें. त्याचें मुख्य कारण म्हणजे मराठ्यांशीं तोंड देणे मुसलमान सरदारांना डोंगरी भागांत जड जात होते आणि निजामशाहींत त्यांना वाव मिळाल्याकारणानें आदिलशाहाला वारंवार अपयश स्वीकारून निजामशाहाच्या तंत्राने वागवें लागत असे. शाहाजीची आदिलशाहीतील उपस्थिती तेथील मराठे सरदारांना उत्तेजक झाली[६८] असे बेंद्रे सांगतात.

(क) निजामशाहा व शाहजी संघर्ष :

इब्राहिम आदिलशाहा १२ सप्टेंबर १६२७ रोजी वारला व सुलतान महमद गादीवर आला.[६९] यामुळे आदिलशाही वजिरांमध्ये चढाओढ निर्माण झाली. ज्यात कित्येकांना मृत्युमुखीं पडावें लागले, कांहीना घरी बसावें लागले व कांही आदिलशाही सोडून इतरत्र केले. या वातावरणामुळे निजामशाहाला आदिलशाही आक्रमण करण्यास चांगली संधी वाटली व त्याने खासा धारूरवर आक्रमण केले; परंतु निजामशाहाचा येथे पराभव झाला. मात्र थोड्याच दिवसांनी निजामशाहाने आदिलशाही सैन्य बेसावध आहे असे पाहून अचानक हल्ला चढविला व सादतखान व इतिमतखान यांस पकडून नेले; परंतु त्यांना चांगल्या रीतीने वागविले. बहुधा ही

लढाई ऑक्टोबर १६२७ त झाली असावी. त्यानंतर पुन्हा निजामशाहानें जोर धरून दुसरा लढा दिला. निजामशाहा आदिलशाही प्रांतात लुटालूट करीत विजापूरानजीक महमदपूरापर्यंत आला. कदरीकंदुरीनजीक लढाई झाली.[७०] यावेळी सरलष्कर या नात्याने शाहाजीने निजामाच्या स्वाऱ्या परत पाठविण्यात मदत केली असावी; परंतु आदिलशाहीतील नवीन वातावरण त्यास सहानुभूतीचें राहिले नव्हते.

३.८.८ शाहाजी निजामशाहीत व नंतर मोगलांकडे :

जहांगीर २८ ऑक्टोबर १६२७ रोजी वारला व शहाजहान ६ फेब्रुवारी १६२८ रोजी सिंहासनावर बसला. शहाजहान राज्यावर येतांच त्यानें निजामशाहास ताकीद करून मुलुख परत करण्यास सांगितलें. अर्थात मोगली आक्रमणाची भीती निर्माण झाली. याच काळात आदिलशाही भांडणात यश यावे ते आले नाही. उलट अधिक शत्रुत्व निर्माण झाले. साहजिकच शाहाजीशी बोलणें लावून त्याला परत मिळविण्याची तत्कालीन परिस्थिती होती हे जाणून शाहाजीला स्वतंत्र सरदार करून त्या प्रदेशांतील महत्त्वाचा किल्ला जो परेंडागड तोही त्यास इतर सरहद्दीवरील सुभ्यांबरोबर देण्याची तयारी दाखविली. साहजिकच निजामशाहीकडे ओढा असल्याने व ती टिकविण्यात मराठमोळ्यांचे हित पाहून शाहाजीनें निजामशाहींत येण्याचा निर्णय घेऊन फेब्रुवारी १६२८ पूर्वीच तो निजामशाहीत गेला.[७१] २२ फेब्रु. १६२८ पूर्वीच या सुपें-परेंडा परगण्याचा ताबा घेतला. १८ मे पूर्वी पुणे-कर्यात मावळाचा मोकासा घेतला. शहाजहाननें स्वाभाविकच निजामशाहीवर चालून जाण्याचा निश्चय केला आणि आदिलशाहालाही निजामशाही मुलुख घेण्यास प्रवृत्त केला. जाधवराव व इतर मराठा सरदारांनी एकत्रित येऊन निजामशाही राखण्याचा प्रयत्न केला परंतु निजामशाहानें कांहीतरी भीती मनांत बाळगून त्याचा व त्याच्याबरोबर आलेल्या त्याच्या मुलांचे व नातेवाईकांचे खून २५ ऑगष्ट १६२९ ला करविले. यामुळे नंतर शाहाजी मोगलांकडे निघून गेला.[७२]

निजामशाहीत आल्यावर शाहाजीला कोणकोणते परगणे मिळाले यासंदर्भात वा. सी. बेंद्रे लिहितात, शाहाजी राजे यांना १८ मे १६२८ पूर्वीच पुणे परगणा मिळाला होता. पुणे परगणा, कर्यात मावळ व कर्यात पाटस हे शाहाजीकडे असल्याचे दाखले ८ मार्च, २५ जुलै, १३, २० व २७ ऑगष्ट, ३० सप्टेंबर व ४ डिसेंबर १६२८, २७ जानेवारी, ९ऑगष्ट १६२९, ८ एप्रिल १६३३, २५ फेब्रंवारी १६३७ च्या पत्रांत मिळतात. तसेच ३० ऑगष्ट, १४ नोव्हेंबरच्या पत्रांवरून

शाहाजीराजे निजामशाहींत आले ते 'वजिरातमाब' म्हणजे वजीर म्हणूनच आले आणि ते आदिलशाहीतून निघून आल्यावर त्यांचेकडील परगणे वगैरे परत घेण्याकरीता आदिलशाही सैन्य आले असावे. या पुणे वगैरे प्रांताखेरीज शाहाजीचा १३ सप्टेंबर १६२८ च्या पत्रावरून (जिंती) सुभ्यावर अधिकार असल्याचा पुरावा सापडतो. ३१ डिसें. १६२९, ३१ जाने. १६३० च ७ जुलै १६३१ च्या पत्रांवरून शाहाजीला चांभारगोंदे व बल्लालपूर येथील मोकासे अर्जानी असल्याचे उल्लेख मिळतात. २७ जुलै १६३२ च्या पत्रावरून संभाजीच्या नावें गदग परगण्यांतील गावें इनाम होतीं असे दिसते. अर्थात या सुमारास शाहाजी-मुरारीत एकी असली पाहिजे. २९ सप्टें १६३२ व १६३३-३४ त नाशिक, संगमनेर व चाकण हे परगणे शाहाजीच्या ताब्यात असल्याचें ठरते. १२ जाने. १६३६ व १६३५-३६ त चौल व पाली येथे शाहाजीचा अधिकार होता. या पत्रांवरून शाहाजी कोणत्या भागावर कोणत्या कालांत सत्ताधारी होता याची कल्पना येते.[७३]

याच सुमारास आणखी एका हालचालीची हकीगत कसबे सोनई परगणें नेवासे या गावांबाबतच्या २१ ऑगष्ट १६२९ च्या पत्रांत येते, "सालगुदस्ते (मे १६२८ ते मे १६२९) अहमदनगरतर्फेने मोगल येऊनु जुजती सिवार उरला होता तो चोरिला. त्यावरी दक्षिणा गैरहंगामी पैके घेतले. तेन्हेकरून प्रजा बेमवसर जाल्या. म्हणुनु पैकियाचा झाला केला. याकरितां प्रजा लोक बेदील होऊनु परागंदा जाले...." तशीच २ जून १६२९ च्या पत्रांत याच स्वारींतील पारनेर परगण्याची अशीच माहिती आहे. ".....मौजे पिंपळगांऊ पिसा पाा पारनेग सरकार जुनेर लेहून दिल्हे यैसे जे. सालगुदस्त (मे १६२८ ते मे १६२९) मोगली गांवावरी धावणी करून गांव मारिला. वस्तभाऊ गुरे ढोरे बुडविली... माणसे दादले व बाईला व लेकरे सेदीडसे माणसे बंदी राहिली.... कित्येक माणसे बंदीखानी मेली. मग दरम्याने भले लोक होऊन खंडणी होनु २५०० अडीच हजार होन झाडा करणे...."[७४]

सारांश सांगताना बेंद्रे लिहितात की, मोगली सैन्याने म्हणजे अहमदनगरच्या सिपाहदारखानाने ही लुटालूट इ.स. १६२८ च्या पावसाळ्यानंतर म्हणजे नोव्हेंबरमध्ये केली असावी. शाहाजीला तिकडील बंदोबस्तास पाठविलें गेल्याने तिकडील कांही परगणे शाहाजीस निजामशाही तर्फेस अर्जानी आले असावेत. निजामशाही हद्दीत आल्यापासून शाहाजी परेंडा नजिकच येऊन राहिला होता आणि मोगलानें हालचाल सुरू केल्यावरून तो निजामशाहाच्या बाजूनें मोगली आक्रमणास तोंड देण्यासाठी पावसाळ्यांत निघाला आणि कांही मुलुख सोडविला.

३.८.९ लखुजी जाधव निजामशाहीत व खून :

जहांगीर २८ ऑक्टो. १६२७ ला वारला व त्यानंतर वारसदारांमध्ये गादीसाठी धावपळ सुरू झाली. यामध्ये शहाजहान दिल्लीकडे निघाला. शहाजहान जरी दिल्लीकडे तख्तावर बसण्याच्या इराद्याने चालूं लागला होता तरी त्याला सहजासहजी यश प्राप्ती होऊं शकेल असे त्यास वाटत नव्हते. म्हणून ही धांवपळ सुरू होतांच खानजहान लोदी व दर्याखान यांनी निजामाला आपल्या पाठीशी घालून माळवा वगैरे प्रांत जिंकण्याची त्याची आकांक्षा बळावली. निजामशाहाला बालाघाटाखालील ५५ कोटी किंमतीचा जमीनधाऱ्याचा प्रदेश देऊन तो आपल्या पाठीशी उभा राहील असे समजून त्यानें आपल्या सैन्यास जवळ बोलावून व एक तुकडी बऱ्हाणपुरीं ठेवून तो माळव्याकडे कूच करुन गेला. बालाघाटाबरोबर जाधवरावाची कांही जहांगीर निजामशाहीत येत होती. त्यामुळे जो जाधवराव पूर्वी शहाजहानाच्या बंडात सामील झाला होता तो ही खानजहानांशी संगनमत करण्याच्या तयारीत दिसतांच निजामशाही सरदारांनी लखुजी जाधवरावालाही आपल्याकडे मिळवून घेण्याची खटपट केली व तोही नंतर त्या कटात सामील झाला. निजामशाही इस्लामी सरदारांच्या वृत्ती सुधारल्यात असें समजून शाहाजीही पूर्वी येऊन मिळाला होता; परंतु शहाजहान बिनाविरोध २ फेब्रु. १६२८ रोजी तख्तनशीन झालेला पाहातांच खानजहानच्या हाताखालील सर्व रजपूत सरदार त्यास सोडून उत्तरेकडे गेले; तेव्हा खानजहानाने बादशाहसमोर पश्चाताप केला व शाहाजहाननेही त्याला माफ करून पूर्वीच्या सुभ्याचा अधिकार देऊन ताबडतोब बऱ्हापणुरास परतण्याविषयी फरमान काढलें. ज्याप्रमाणें शहानजहान राज्यावर आल्याने खानजहानच्या गोटांत घबराट उडाली त्याचप्रमाणें निजामशाहींतही घबराट उडाली. याच कारणाने हमीदखानाने बहुधा साबाजी अनंताच्या मध्यस्थीनें शाहाजीला परत निजामशाहींत आणण्याची खटपट केली. खानजहानही बादशाहाच्या आज्ञेप्रमाणे माळव्यातून परत बऱ्हापुरीं आला आणि आपल्या कामावर रुजू झाला. निजामास दिलेला मुलुख परत मिळविण्याची खटपट केली; बालाघाटाखालील प्रदेश खानजाहानला परत मिळूं शकला नाही. पावसाळ्यानंतरही दिलेला मुलुख परत करीत नाहींत हे पाहून दर्याखान रोहिल्याने तो परत घेण्याचा प्रयत्न केला. निजामशाहानें उलट शाहाजी भोसले यास दहा हजार स्वारानिशीं पाठवून खानदेशांतील मोगली मुलुखावर चाल करून जावयास सांगितले; पण दर्याखानाने त्यास माघारी लोटले. खानजाहानला

दिलेला मुलुख परत मिळवतां येत नाहीं म्हणून बादशाहांनी त्याला राजधानींत परत बोलाविलें व त्याच्या जागी महाबतखानची नेमणूका केली.

बादशाहाने खानजहानचा सुभा महाबतखानाला देऊन परत नेलें ते त्याला शासन करण्यासाठीच अशी सर्वांची समज झाली होती. जाधवरावाने खानजहानच्या कटांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहानुभूती राखली. त्यामुळें त्यालाही आपणांवर कांही तरी रोष होणार अशी चिंता प्राप्त झाली होती. निजामशाही सरदारांनाही पुन्हा मोगली मोठे परचक्र येणार तरी त्यास तोंड देण्याची तयारी केली पाहिजे म्हणून खटपट करणे भाग पडले. त्यांनी जाधवरावाला मिळविण्याचा प्रयत्न केला आणि जाधवरावानेही आपल्या नवीन परिस्थितींतील विवंचनेतून मुक्त होण्यासाठी मोगली चाकरी सोडून निजामशाहींत नोकरी करण्याचा निर्णय घेतला. मोगली साम्राज्यात जो सरंजाम व मान त्यास व त्यांचे मुलां वगैरेस मिळत होता त्यापेक्षा अधिक लालूच दाखवून जाधवरावाला निजामशाहींत चाकरीस आणलें; परंतु महाबतखान येतांच तो लखुजी जाधवरावाला पूर्वीप्रमाणेच परत नेईल व जाधवराव आपला विश्वासघात करून जाईल आणि सध्याची आपली हलाखीची परिस्थिती त्यास माहीत झाल्यानें महाबतखानाकडून आपली निजामशाही कायमची नष्ट करून टाकील अशी भीती वाटूं लागली. जाधवरावाला त्याच्या मुलांच्या वगैरे नावाने चोवीस हजारी मोगली सरंजाम होता. त्याशिवाय तनखा म्हणून दखखनमध्यें कांही जहांगीरीही होत्या. निजामशाहीत असाच मान व सरंजाम मिळणे जरूरी होते. त्याकरितां निजामशाहानें त्याला मान-सरंजाम देण्यासाठी दरबारांत बोलाविले. मात्र निजामाच्या मनात त्याला कैद करून ठेवावयाचे होते. लखुजी जाधवराव निजामशाहावर विश्वास ठेवून दरबारात आला. पूर्वी ठरवून ठेवल्याप्रमाणें लपवून ठेवलेल्या सशस्त्र लोकांकडून त्याच्यावर हल्ला करविला. त्यात जाधवराव, त्याचे दोन मुले अचलोजी व रघोजी, नातू बसवंत तेथेच मारले गेले. जाधवरावाचा भाऊ जगदेवराव, त्याची बायको व पुतण्या बहादुरजी हे इतर नोकरचाकरांसह तेथून निसटले व जालनापुराजवळील सिंधखेडास आपल्या घरीं गेले. जाधवरावाचा खून २५ जुलै १६२९ रोजी झाला.[७५]

३.८.१० मोगलाईतील शाहाजीच्या प्रारंभिक हालचाली :

जाधवरावाच्या मृत्युच्या घटनेनंतर निजामशाहावर विसंबून राहाणे योग्य होणार नाही हे जाणून देऊळगावीं पावसाळ्यासाठीं राहिलेला अझमखान यांच्यातर्फे बोलणी करून शाहाजीने

मोगली चाकर होण्याचे ठरविले. अझमखानानें शाहाजीच्या अटी बादशाहस कळविल्या. बादशाहानें त्या मान्य करून शाहाजीला पाच हजारी, संभाजीला (७ वर्षांच्या) दोन हजारी व त्याचा चुलतभाऊ मालोजी याला तीन हजारी (१५०० स्वार) मिळून दहा हजारांचा सरंजाम व दोन लाख रूपये रोख देण्याचे कबूल करून त्याप्रमाणे फर्मान, खिल-पोशाख वगैरे मानपानासह अझमखानाकडे पाठविले.[७६] ही बातमी अझमखानाने शाहाजीकडे नोव्हें. १६२९ मध्ये बीडहून बंडखोर लोदी व निजामशाहा यांच्या पारिपत्यार्थ निघतांना पाठविली. बादशाही फर्मान मिळतांच शाहाजी आपल्या दोन हजार स्वारांनिशी इ.स. १६२९ च्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवाड्यात अझमखान बीडहून संगमनेरकडे जात असतांना वाटेत जाऊन त्याला मिळाला. नंतर दोघांनी खानजहान व दर्याखानाचा पाठलाग केला. आपली दक्षिणेंत चाल नाहीं असे पाहून ते बंडखोर पठाण उत्तरेकडे गेले. पुढे दर्याखान ११ जानेवारी १६३० व खानजहान त्याच्या मुलासह २२ जानेवारी १६३० ला मारले गेले.

खान अझम पाठलाग करीत असतां त्याला बातमी लागली कीं, एक पठाण बंडखोर मुकर्रबखान बीडजवळील अंजनगडाला गेला आहे. तेव्हा अझमखानानें आपला मोर्चा बीडकडे वळविला आणि त्यानं शाहाजीला इ. स. १६३० च्या जानेवारीच्या पहिल्या पंधरवाड्यात स्वतंत्रपणे आदिलशाही सरहद्दीवरील निजामशाहाचे जुन्नर, संगमनेर, बैजापूर आणि भगोळ हे परगणे दिले होते. ते त्यांनी सोडवून घ्यावयाचे होते. नंतर पावसाळ्यापर्यंतचा सर्व काळ हे परगणे ताब्यात घेण्यातच खर्च झाला.

पावसाळ्यांत युद्धविषयक हालचाली थंडावताच शाहाजी शिवनेरीस गेला. इ.स. १६२९ च्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवाड्यापासून ते इ.स. १६३० च्या जानेवारीच्या मध्यापर्यंत शाहाजी प्रथम पठाण बंडखोरांविरद्ध गुंतला होता व नंतर जूनच्या सुरुवातीपर्यंत आपला सरंजामीचा प्रांत निजामशाहीकडून सोडवून घेण्याच्या खटपटींत होता. नंतर १६३० जूननंतर पावसाळा सुरू होताच शाहाजी शिवनेरीस आले. त्यावेळी जिजाबाई फार तर ४-६ महिन्यांची गरोदर असावी. जिजाबाईस तेथें शिवाजीराजे १९ फेब्रुवारी १६३० शुक्रवार रोजी झाले.

मोगलांनी यानंतर निजामशाही बळकाविण्याचा निर्धार केला. याचवेळी आदिलशाही वजिरांनीही मुस्तफाखानाला कैदेत टाकून खवासखानाकडे सर्व सत्ता दिली. त्यामुळे इ.स. १६२९ मार्च-एप्रिल पासूनच खवासखानाचा आदिलशाहींत वरचष्मा निर्माण झाला. त्याने मुरार

जगदेवाला आपला कारभारी करून व वजीरी देऊन निजामशाहनें जो मुलुख घेतला होता तो व शाहाजीबरोबर जे परगणे आदिलशाहींतून बाहेर गेले होते ते परत घेण्यास इ.स. १६२९ च्या पावसाळ्यांनतर रवाना केला. मुरार जगदेवाने शिरवळ-सिंहगड भागांत लढा चालू असतानाच शाहाजीच्या खास पुराव्यावरही हल्ला केला होता. इ.स. १६३१ च्या पावसाळ्यापूर्वीच "मुरार जगदेवराऊ इदलशाही फौजेनिसी निजामशाईवर चालोन आले. पुणा कसबा वस्ती जाळून गाढवाचा नांगर पांढरीवर धरिला सात आठ बरसें कसबा वोस पडला होता. पाहार रोविली होती."[७७] अशी शकावलीतील नोंदीचा संदर्भ बेंद्रे येथे देतात. या नोंदीला ४ जुलै १६३१ च्या पत्रांतही पुरावा मिळतो, असे बेंद्रे पुढे सांगतात. यावरून आदिलशाही फौज ज्यावेळी शाहाजी इभ्राहिमखान व नंतर मोगलाकडून मिळालेला सरंजाम ताब्यात घेण्याची खटपट करीत होता तेव्हा शाहाजीच्या मूळ जहागिरीत कशी धुमाकूळ घालीत होती ते लक्षात येते.

इ.स. १६३० च्या पावसाळ्यानंतर युद्धविषयक हालचाली फारशा होऊ शकल्या नाहींत. याचे कारण म्हणजे इ.स. १६३० अवर्षणामुळे अन्नधान्य, दाणागोटा दुर्मिळ झाला होता व पाण्याचीही सर्वत्र टंचाई भासत होती. शिवाय रोगाराईचा चांगलाच तडाखा बसत होता.[७८]

३.८.११ शाहाजीचे मोगलाई विरूद्ध बंड व निजामशाहीचे पुनर्रुज्जीवन :

इ. स. १६३१ च्या ऑक्टोबरपूर्वी फत्तेखानानें बुऱ्हाणनिजामशाहस मोगलांच्या आज्ञेवरून ठार मारल्याचे समजताच शाहाजीनें निजामशाही बुडूं न देण्यासाठीं कारस्थान करण्यास सुरुवात केली. कोंकण भागांतील सिघी व इतर मराठे व इस्लामी सरदार त्यांच्या या कारस्थानांत मिळाले. याचवेळी मोगलांनी आदिलशाहावर स्वारी केली होती. अशा संकटात शाहाजीला मुरारपंताची व त्यांच्यातर्फे खवासखान व इतर सरदारांची कारस्थानात मदत मिळाली.

शाहाजीने फत्तेखानाकडून दौलताबाद किल्ला घेऊन त्याच्या मदतीस मोगल येण्यापूर्वीच निजामशाही आपल्या वर्चस्वखाली आणयाची योजना आखली व आदिलशाहानें शक्य ती मदत देण्याचें कबूल केले. फत्तेखानाने शाहाजी चालून येत आहे हे पाहतांच मोगलाची मदत मागितली. त्यापूर्वीच शाहाजीने आपल्या हातीं असलेल्या प्रदेशाचे व सिघी वगैरेंच्या कोंकणातील जहागिरीचें स्वतंत्र राज्य पुकारलें व मुरारी व शाहाजी यांनी एका निजामशाही वारसाला सिघीच्या साहाय्याने कोंकणांत एका गडांत कैदेत असलेल्या वारसास आणून त्याच्यावर जुन्नरच्या बाजूला जाऊन १६३२ ऑगष्टमध्ये छत्र धरिले. पेमगिरींत (भीमगड) निजामशाही वारसास ठेवून शाहाजी

आदिलशाही फौजसह पावसाळा संपतांच निघण्याकरितां मुरारीकडे गेला. मुरारीला शाहाजी व कोकणांतील सिघी मिळाल्यानें ही युती आदिलशाहीस संकटप्रसंगी मोठी साहाय्यकारकच झाली. त्यामुळे त्याला मोगली सैन्यावर बराच दबाव ठेवता आला.[७९]

फत्तेखानास शाहाजीच्या हालचालीची बातमी लागताच त्याने मोगलाकडे बुऱ्हाणनिजामशाहाचे जडजवाहिर पाठविलें व आपल्या मुलालाही ओलीस दिले. बादशाहानें शाहाजीला पूर्वी सरंजामार्थ दिलेले प्रांत फत्तेखानाला जहागीर दिले. मात्र त्याने ते शाहाजीपासून सोडवून घ्यावयाचे होते. यासाठी फत्तेखानाला मोगलांची मदत हवी होती. यावेळी शाहाजी आदिलशाही सैन्यास घेऊन निघणार ही बातमी समजतांच फत्तेखानानें खानखानन यास कळविले की, मुरार जगदेव व अबदुल्लाखान यांच्या साहाय्याने शाहाजी त्याच्याकडून दौलताबादगड काबीज करण्यास निघाला आहे. जर रसद वगैरे मदत ताबडतोब मिळाली तर गड मोगलांच्या ताब्यात देईल. खानखानानें आपला मुलगा खानझमान यास ताबडतोब दौलताबादकडे रवाना केले. शाहाजी व रणदुल्लाखान हे त्याच्या पाठीवर गेले. रणदुल्लाखानाने फत्तेखानास मोगलांना दौलताबाद किल्ला न देण्याच्या मोबदल्यात सर्व ती मदत पुरविण्याचे आश्वासन दिले तेव्हा आपणांस आदिलशाही मदत येत आहे हे पाहतांच फत्तेखानाने आपला पूर्व बेत बदलून गड लढविण्याची तयारी ठेविली. ही फत्तेखानाची वृत्ती पाहून मोगली फौजेने दौलताबादेस वेढा देण्याचे ठरविले. हा वेढा चार महिने चालू होता. मुरारी सर्व मदत घेऊनही आला होता. मुरारीने दौलताबाद आपल्या ताब्यात दिल्यावर मदत पोहोंचती केली जाईल असा हट्ट धरिला. खानखानही दौलताबादेच्या वेढ्यात २ मार्च १६३३ ला सामील झाला. ९ एप्रिलला त्यानें पहिला सुरुंग उडविला. मोठी हातघाई झाली; परंतु मोगलास माघार घ्यावी लागली. अनेक लोकांचा मृत्यू झाला. मोगली सैन्याला गडावरून होणारा मारा व पाठीवर शाहाजी व बिजापूरी बारा हजार स्वारांच्या हल्ल्यास तोंड द्यावें लागत होते; परंतु मुरारीच्या हट्टामुळें आपली शिकार हुकणार हे पाहून आदिलशाही सरदार मुरारीवर बिनसले आणि खानखाननें त्या परिस्थितीचा फायदा घेतला. बिनसलेल्या लोकांस लाच देत राहून आपली पिडाडीची बाजू बरीचशी सुरक्षित राखली आणि मुरारीला जालनापर्यंत माघार घ्यावयास लाविली. १७ जून १६३३ रोजी फत्तेखानानें शरणागती स्वीकारून १८ जूनला किल्ला मोगलांच्या हवाली केला.[८०] नासिरखानास दौलताबाद सोपवून खानखानन परतला. अझमखानाबरोबर पाठविलेल्या निजामशाही वारसात

खानझमानच्या हवालीं केले व त्याने त्यास ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कैद करून ठेवलें. फत्तेखानाला माफी देऊन मोगली चाकरींत घेतले. शाहाजीला परत अहमदनगरच्या आसपास राहून निजामशाहीचा मुलुख सोडविण्याच्या खटपटीस लागावे लागले.

३.८.१२ मोगलांचा शाहाजीविरूद्ध आदिलशाहाशी करार :

इ. स. १६३५ मध्ये मोगलांनी आदिलशाहीशी शाहाजी विरूद्ध तह करण्याचा प्रयत्न केला पण आदिलशाहाने अमान्य केला तेव्हा शाहाजीच्या विरूद्ध शाहिस्तेखानाने केलेल्या स्वारींत अलीवर्दीखानानें रामसेज, गडदुर्ग, चांदोर, अंजराई, कांचन, मांचन, रवळा, जवळा, राजद्धेर, धोडप, अहिवंत, कोल, बुसा (?) अचलागड वगैरे किल्ले घेतले. खासा शाहिस्तेखान संगमनेरकडे शाहाजीचा पुत्र संभाजी याला घालवून देण्याकरितां कूच करून गेला. संभाजी तेथून निसटून चाकणला गेला, तेव्हा शाहिस्तेखानाने महंमद वाकरला जुन्नर सरकार काबीज करण्यासाठी रवाना केले. संभाजी आपल्या बापाकडे चांभारगोंद्यास गेला व तेथून उपराळा घेऊन जुन्नरला गेला. तेव्हा जुन्नर शहारांत राहिलेल्या मोगली सैन्यांत घबराट घडाली; परंतु शाहिस्तेखानाकडून मोगली सैन्यास मोठी मदत येत आहे व तो जवळ येत आहे असें पाहून संभाजीनें तेथून माघार घेतली. जुन्नरगड मात्र मोगलास मिळवितां आला नाही. अशा तऱ्हेनें जुन्नर व संगमनेर प्रांतांतील अठरा परगणे काबीज केल्यावर शाहिस्तेखान बादशाहाच्या भेटीस गेला. मोगली सरदारांना जुन्नरला बातमी लागली की, श्रीगोंदा हे तितकें भक्कम ठिकाण नसल्यानें शाहाजीने आपला चुलतभाऊ मालोजी याच्याकडून माहुलीगड आपल्या ताब्यात घेतला आणि तो मालोजीला बरोबर घेऊन जुन्नरकडे गेला असून पुढें तो परगावांवरून परेंड्याला जाण्याच्या तयारीत आहे. तेव्हां खानझमान शाहाजीच्या पाठीवर गेला; परंतु तितक्यात शाहाजी भीमा ओलांडून लोहगावी गेला. इ.स. १६३५ च्या पावसाळ्यापूर्वी शहाजहानाच्या अपेक्षेप्रमाणे आदिलशाहीची मतद तोडून मोगली सैन्याला शाहाजीचा नाश करता आला नाही, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[८१]

मोगलांनी आदिलशाहीवर आक्रमणे करण्यास सुरुवात केली आदिलशाहीने शेवटपर्यंत ही आक्रमणे परतविण्याचा प्रयत्न केला पण शेवटी आदिलशाहाला मोगलांशी तह करावा लागला. ज्यामधील एका अटीप्रमाणे शाहाजीनें आदिलशाहाच्या चाकरीत जाण्याचे व आपल्या हाती असलेले गड देण्याचे नाकारले. साहजिकच खानझमान शाहाजीच्या पाठलागार्थ गेला. भर

पावसाच्या समयी शाहाजी लोहगांवला व खानझमान भीमेच्या पलीकडे अशी परिस्थिती होती. पाऊस कमी होताच खानझमान यास रणदुल्लाखानाने मदत करावी म्हणून आदिलशाहानें हुकूम पाठविला. खानझमान जुन्नरकडे गेला व गडास वेढा दिला. वेढ्याचा नीट बंदोबस्त करून खानझमान शाहाजीच्या पाठलागार्थ पुण्याजवळ आला. पुन्हा वाटेतील नद्यांचे पाणी ओसरतांच इंद्रायणीवरील लोहगावाला आला. शाहाजी १७ कोसांवरील कोंडाणा व नुरंद डोंगरावर गेला. म्हणजे इंद्रायणी, मुळा व मुठा होत्या... तेव्हां खानझमान रणदुल्लाखानाच्या सल्ल्याने पुढे सरकला. तेव्हां शाहाजी कुंभारघाटानें कोंकणात शिरला. तेथे त्याला आसरा न मिळाल्याने तो त्याच घाटानें परतला, खानझमान व रणदुल्लाखान हे शाहाजीच्या अगदी जवळ आले; परंतु शाहाजी तेथून माहुलीस सटकला. नंतर तेथून डोंगरी भागांतील मुरंजनगडावर गेला. खानजहान पाठीवर गेला. पाठलाग करणारे सैन्य निकट आलेले पाहून शाहाजी घाईघाईने आपलें काही सामान पाठवून देऊन व काही तेथेंच टाकून गेला. पाठलाग करणाऱ्यांनी शाहाजीच्या काही लोकांना मारले. जोराने पाठलाग होत आहे असे पाहून शाहाजी तेथून त्रिबक-त्रिंगलवाडीला जाण्यासाठी माहुलीला आला व तेथून निसटणें जड जाईल हे जाणून शाहाजी माहुलीस जाऊन राहिला. नंतर शाहाजी व त्याचा मुलगा संभाजी थोडें सामासुमान घेऊन गडावर गेले आणि गड लढविण्याची तयारी केली आणि तहाच्या अटीची मागणी केली व त्या स्वीकारल्या. मात्र तत्पूर्वी शाहाजीने रणदुल्लाची भेट घेतली आणि निजामशाहाच्या वारसाला त्याच्या स्वाधीन केला, आदिलशाहीची चाकरी पत्करली व जुन्नरचा किल्ला मोगलास देण्याचे कबूल केले व खानझमानाने शाहाजीच्या सर्व मागण्यांस बादशाहाची मंजूरी आणून दिली. खानझमानाच्या हवाली निजामशाहास केलें नंतर शाहाजी रणदुल्लाखानाबरोबर विजापूरकडे गेला.[८२]

किल्ला जेर झाला तेव्हांच शाहाजींनी सल्ल्याची बोलणी घातली तेव्हा तह झाला की, गंगेपलीकडील मुलूक व पातशाही वारस मोगली सुभ्याकडे द्यावे, गंगेअलीकडील मुलूक आदिलशाहाकडे द्यावा. तो महाराजास जहागीर द्यावा. शाहाजींने बारा हजार स्वारांनिशीं चाकरी करून वजिरी करावी. शाहाजीस फर्जेद म्हणून आदिलशाहानें त्याचा दर्जा दाखावा. त्याप्रमाणे रणदुल्लाखानाने विजापूरी लिहून आदिलशाहाचा कौल व फर्मान आणविले. 'त्यावरी शाहाजीनी मुळ वारस राजापुरीस पाठविले व दुसरे मुसलमानाचें मूल वारस म्हणून मोगलांकडे दिले', असे बेंद्रे सांगतात.

३.८.१३ मोगल-आदिलशाहाची अंमलबजावणीं :

निजामशाहीच्या पुनरुज्जीवनाची आशा सोडतांना शाहाजी, आदिलशाही व मोगली सरदारांशी जी बोलणीं झाली त्यांत शहाजहान शाहाजीला आपल्या चाकरीत घेण्यास तयार नव्हता. कारण मोगली मुलुखांतील महाराष्ट्रीय भागांतील त्या वेळच्या राजव्यवस्थेप्रमाणे त्यास तेथील सत्ता देण्यांत बादशाहास धोका वाटत होता कारण सरहद्दीवरील जाधवरावादी सरदारांचा वेळ येताच मोगली सत्ता सोडून दक्षिणी सत्तेला मिळण्याचा ओढा त्याच्या गेल्या २५-३० वर्षांच्या अनुभवानें प्रत्ययास आला होता, असे बेंद्रे दर्शवितात. मात्र शाहाजीची पुणे-सुपें प्रांत नव्हते तर, पुणे-सुपें परगण्यातील जहागीर मोगली व आदिलशाही सत्तेबाहेर म्हणजे स्वतंत्र ठेवण्यास बादशाहा तयार होता. त्याप्रमाणे ही जहांगीर स्वतंत्र ठेवली गेली.

मोगली आदिलशाही कराराप्रमाणें शाहाजीला आदिलशाहानें आपल्या नोकरींत दक्षिणेतील बंदोबस्तासाठी घेण्यास मुभा ठेवली होती; परंतु शाहाजीकडे असलेला जवळजवळ सर्व प्रदेश मोगलांकडे गेल्याने शाहाजीला दहा-बारा हजारांची सरंजामी कोठची द्यावयाची हा साहजिकच आदिलशाहाला प्रश्न पडला; पण तो रणरदुल्लाखानच्या शाहाजीबाबतच्या आकांक्षेमुळे सुटला असे बेंद्रे म्हणतात. कारण रणदुल्लाखानाने आपल्या सुभ्यातील मावळांचे उत्पन्न शाहाजीराजांच्या सरंजामार्थ दिले आणि नंतर कर्नाटकांतील स्वयांनी त्याची सव्याज भरपाई करून घेऊ या महत्त्वाकांक्षेने शाहाजीची दुसरी अट पुरी केली.

यानंतर शाहाजीने आपल्या जहागिरींतील पुणे परगण्यातील प्रदेश दादाजी कोंडदेवाकडे व सुप्याचा प्रदेश आपला मेव्हणा संभाजी मोहिते याकडे मुतालिक म्हणून सोपवून शाहाजी महाराजांनी सहकुटुंब विजापूरी गमन केले. तिसरी अट याच कराराचे वेळी ठरली होती. ती म्हणजे आदिलशाहानें शाहाजीस आपला 'फर्जेद' म्हणावे व त्याप्रमाणें त्यांचा मानसन्मान राखावा. अर्थात ज्या सरदारांनी शाहाजीला निजामशाहीच्या पुनरुज्जीवनार्थ मदत केली ते पूर्वीचे सरदार आपापल्या सरंजामांच्या गांवाबरोबर मोगलाकडे गेले व शाहाजीला रणदुल्लाखानाकडील मावळी सरदारांचे आधिपत्य प्राप्त झाले.

बेंद्रे म्हणतात, मोगल आदिलशाही करारानें शाहाजीस सरदारी व मानमरातब या दृष्टीनें वैयक्तिक नुकसान न होता फायदाच झाला होता. मलिक अंबरी पद्धतींत सरंजाम-जहांगिरी तत्कालीन युद्धपरिस्थितीमुळे बंद करावी लागली होती; दुसरी म्हणजे इस्लामी शाह्यांकडून

मावळ भागाला विशेष महत्त्व दिले जात नव्हते. या भागांतील गडांचीही तितकीशी किंमत नव्हती. एक तर हा भाग डोंगर-जंगलाचा व आर्थिकदृष्ट्या सुसंपन्न नव्हता. त्यामुळे शत्रुसैन्य या प्रदेशाकडे वळत नसे व स्थानिक सत्ताही तो निवांत भाग आहे असे जाणून तिकडील बंदोबस्त नेहमी स्थानिक लोकांवरच अवलंबून ठेवीत आल्या होत्या. पुरंदरगडालाही असे महत्त्व नव्हते. त्यामुळे तो कोणत्याही शाहीच्या प्रदेशात सामील झाला तरी त्याचे भवितव्य तेथील हवालदारावरच सोपविले जात होते. साहजिकच पुरंदरचा किल्लेकरी, शाहाजीचा परगणा लागून राहिल्यानें, त्याच्याशी मैत्री राखण्याचा प्रयत्न करी आणि सभोवतालचे जहांगिरदार अडीअडचणीस उपयोगी पडणारी निवाऱ्याची जागा म्हणून किल्लेदाराशी सख्य ठेवीत. कोंढाणाही त्यावेळी केवळ सभोवतालील प्रदेशांतील वसुलीच्या कचेरीची जागा म्हणूनच उपयोगात आणला जात होता. अशा परिस्थितीत शाहाजीच्या नवीन राजकारणी कारभारास इ.स. १६३६ च्या अखेरपासून सुरुवात झाली.[८३]

शाहाजीनेही आपल्या काही अटी मोगल व आदिलशाहापुढे ठेवल्या इतर अटींबरोबर तीन अटी आदिलशाहाकडून मान्य करून घेतल्या. या कराराप्रमाणे (१) महंमद आदिलशाहानें आपणास फर्जंद म्हणून लेखावें ही एक अट होती. आदिलशाहानेही सर्व फर्मानात त्यास अनुसरून 'महाराज शाहाजी फर्जंद' किंवा 'फर्जंद शाहाजीराजे' असे उल्लेख केलेल आहेत. असे उल्लेख १६५८ पर्यंत आलेले आहे. अल्ली आदिशाहा लहान म्हणून कदाचित फर्जंद लिहिणे पुढें सोडिलें असेल असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[८४]

३.८.१४ शाहाजी कुटुंबीय खेडशिवापुरास :

मोगल-शाहाजी-आदिलशाही करारानंतर शाहाजीने पोर्तुगिजांच्या हद्दीत आपल्या बायकांमुलास आसरा मिळविण्याची खटपट केली होती. पण पोर्तुगिजांनी ज्याच्यावर मोगली व आदिलशाही आक्रमण झाले आहे त्याला स्पष्ट मदत करून आपल्या हद्दीतील चौलाच्या किल्ल्यात आश्रय देण्यास नकार दिला पण दंडा येथील तटबंदीच्या ठिकाणी शाहाजी किंवा त्याच्या बायका जाऊन राहतील तर चौलाहून दंडा येथे पोहोंचविण्यास त्यास गुप्त मदत करण्याची तयारी दर्शविली. गोवा येथील काऊन्सीलने शाहाजीचे कुटुंब चौल येथे आल्यास तेथे ठेवून न घेता दंडा येथे पोहचून द्यावे असा आदेश दिला होता. दंडा येथी किल्ला जरी शाहाजीने आपल्या हवाली केला तरीदेखील त्यास चौल येथे आश्रय देऊं नये असे स्पष्ट केल्याचा पुरावा[८५]

वा. सी. बेंद्रे देऊन सांगतात की, यावरून असे दिसतें की, इ. स. १६३६ चा बराच काळ कराराबाबतच्या व्यवस्थेतच गेला असावा आणि त्यामुळें इ.स. १६३६ च्या पावसाळ्यानंतर ते १६३७ अखेरपर्यंत म्हणजे जवळजवळ एक वर्ष तरी शाहाजीच्या कुटुंबीय मंडळींनी शिवनेरीवरून उतरविल्यानंतर खेडशिवापुरास येऊन राहावें लागले असावें. कारण पुणे कसब्यातींल वाडे बेचिराख झाले होते व गाढवाचा नांगर फिरविला गेल्याने[८६] तेथील शांति केल्याशिवाय तेथे वसाहात करणे धर्माशास्त्रबाहेर होतें.

२६ जानेवारी १६३८ चा खेडेबारे गुंजणमावळचा महजर उपलब्ध आहे. यावरून यापूर्वीच म्हणजे १६३७ च्या पावसाळ्यानंतर तरी हा कोंढाण्यास सुभा शाहाजीचा मुतालिक व आदिलशाहाचा सुभेदार दादाजी याने आपल्या ताब्यात घेतला असावा; परंतु शिवनेरीवरून उतरल्यानंतर शाहाजीनें आपली मुले-माणसें बापूजी मुग्दल याचेकडे पाठविलीं असावींत व महाराज रणदुल्लाखानाबरोबर इक्केरीकडे स्वारीवर गेले असावेत.

बेंद्रे या प्रत्यक्ष साक्षीदारांचे पुरावे देऊन शिवाजी महाराज व जिजाबाई ही शिवनेरीवरून उतरतांच खेडशिवापुरास बापूजी मुग्दल यांच्या वाड्यात इ.स. १६३७ च्या पूर्वी कांही दिवस येऊन राहिली व इ.स. १६३७ च्या पावसाळ्यानंतर विजापुकराकडे गेली. दादाजी कोंडदेव याच काळात शिवापुरास आले व शिवापूर पेठ वसविण्याची व्यवस्था लावून आपल्या सुभ्याच्या मुख्य जागी म्हणजे कोंडाण्यावर जाऊन राहिले.[८७]

शहाजीची कामगिरी (इ.स. १६३७-१६५६) :

कागदपत्रांवरून शाहाजी महाराजांच्या हालचालींचा विचार करू लागलों की, इ.स. १६३७ ते १६५६ अखेरपर्यंतच्या कारकिर्दीचे कांही खंड पडतात असे वा. सी. बेंद्रे सांगतात, ते पुढील प्रमाणे -

प्रथम खंड : शाहाजी-दादाजी कोंडदेवाचा इ.स. १६४१ अखेरपर्यंतचा व शाहाजी-दादाजी कोंडदेव यांचा १६४१ अखेरपर्यंतचा काळ; द्वितीय खंड : शाहाजी-जिजाबाई-दादाजीचा इ.स. १६४४ पर्यंतचा काळ; तिसरा खंड : शाहाजी-दादाजी इ.स. १६४६ जुलैपर्यंतचा व शिवाजी-शाहाजी यांचा १६४५-१६४९ पर्यंतचा काळ; चाथा खंड : इ.स. १६४९-५६ आदिलशाहा-शाहाजी-जिजाई पुण्यासुभ्यापुरता असे चार कालखंड पडतात. याचें मुख्य कारण म्हणजे महमुद आदिलशाहा व त्याच्या मुसलमान सरदारांच्या वागणुकींत फरक पडल्यानें शाहाजीला स्वयंपूर्ण

राहण्यासाठीं आपल्या जहांगिरीचा असें वाटल्यामुळे व नंतर इ.स. १६४८-४९ मध्ये शाहाजीस कैद भोगावी लागते व शिवाजीचा पुणे-सुपे जहांगिरीचा प्रत्यक्ष संबंध तोडावा लागतो हे होय.[८८]

३.८.१५ दादोजी कोंडदेव व शाहाजी राजांच्या संबंधासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण

(१) मावळचा प्रांत सांभाळण्यास दादाजी कोंडदेवाकडे केव्हा दिला? :

मोगली-आदिलशाही कराराप्रमाणें शाहाजीनें विजापूराकडे जाण्यापूर्वी म्हणजे इ.स. १६३६ नंतर आपली जहांगिरी व मावळचा सुभा आपला मुतालिक दादाजी कोंडदेव याकडे दिला होता. परंतु शिवचरित्र-साहित्याच्या दुसऱ्या खंडात लेखांक क्र. ९५ व ९६ हे प्रसिद्ध करताना मूळ कागदांतील तारीख, माहे, सन नीट पाहून वाचन केलें नसावेसें दिसते, असे सांगून बेंद्रे स्पष्ट करतात की, या मजालसिची तिथी "श्री शके १५५५ श्रीमुखनाम संवत्सरे मार्गशीर्ष वघ १ पाडवा वार बुधवार" अशी दिली आहे. यावरून ६ डिसें. १६३३ पूर्वीच दादाजीकडे कारभार आला होता असे होतें; परंतु आतील मजकूर पाहिला तर यांतील वर्षे चुकीचे असले पाहिजे यात शंका नाही. मजकूर असा : "बापूजी बिन देऊ-पाटील घुले हा आपला भाऊ दुकल काले (१६३०-३१ इ.स.) पडिला. पांढरी टाकून परमुलकास गेले. यावर वडील ते मेले. आतां आम्ही वाचलों. सुकाळ जाला." म्हणजे सहज दोन वर्षे तरी गेलीच पाहिजेत. त्यानंतर पुढील मजकूर : "यावरी राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार दिवाण जाले. याणी मुलुक लाविला." यासही काही काल गेला असणार! पुढे "यावरी देशमुख दो-कुलकर्णी यांस ताकिद केली कीं हा गांव पडिला. पाटिल आणऊंन गांव लावणें यैसे फर्माविले मग आपणास नुऊन कौल देऊन गाऊ लाविला, मग तूं आपला भाऊ मायेवाडीस होतास. त्यास तुज यंकदोनी वेला आणावयास आलों. यानंतर तो भाऊ तो भाऊ गोसामारे येऊन निकाल झाला." अर्थात या सर्व कार्यात सहज पांच-सहा वर्षे गेली असणार; परंतु हे कार्यात कऱ्हेपठार दौलतमंगलखान ३० एप्रिल १६३६ पर्यंत तरी होतेच आणि खास मायेवाडी कीं ज्या गावाचे मोकदमीच्या कारभाराबद्दल वरील मजालसी भरल्या होत्या त्या दौलतमंगलच्या सुभ्याकडेच होत्या हे खास पत्रांवरून सिद्ध आहे. म्हणजेच वा. सी. बेंद्रे सांगतात की, वर्षांचा आकडा चुकीने वाचला गेला आहे किंवा नकलला गेला आहे. "मार्गशीर्ष वद्य। पाडवा वार बुधवार" असा पूर्ण असल्यामुळे या उल्लेखांत चूक होण्याची शक्यता फारच थोडी; परंतु हा उल्लेख शके १५५५ श्रीमुखी संवत्सरी (१६३३-३४) ला जमत नाही. या तिथीला वार शुक्रवार येतो. या शकानंतर वद्य पाडव्यास "बुधवार" फक्त शके १५५९ ईश्वर संवत्सर व शके

१५६३ श्रीवृष संवत्सर या वर्षी येतो. म्हणजे तिथी वाराचा मेळ बसावयाचा तर हीं दोन्ही पत्रें (ले. ९५-९६) २२ नोव्हें. १६३७ किंवा ८ डिसें. १६४१ ची असली पाहिजेत. श्रीवृष याजागी श्रीमुख संवत्सर वाचणें अधिक संभवनीय आहे. एक तर दादोजी कोंडदेव कोंडाणाचे हवालदार व सुभेदार एकाच वर्षात झालेले आहेत आणि सिद्दी अंबर हा कोंडाण्याचा हवालदार १६३४ अखेरपर्यंत असल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट असून तो मुरार जगदेवानंतर वजिरीचा ताबा ज्या रणदुल्लाखानाने घेतला व दादाजी कोंदेवाच्या नेमणुकीस ज्या रणदुल्लाखानाने मंजुरी दिली त्याच्या हाताखाली कारभार देऊन पाहात होता.

वा. सी. बेंद्रे वरील सर्व संदर्भ देऊन सांगतात की, दादोजी कोंडदेवाचा कारभार इ.स. १६३३ पूर्वी सुरू होणे अशक्य आहे.[८९] नीट काळजीपूर्वक ही पत्रे तपासली गेली असती तर श्रीमुख जागी श्रीवृष व शके १५५५ जागी १५६३ वाचण्यांत अगर लिहिण्यात काही तरी दिशाभूल टाळता आली असती.

सहा कलमी शकावलीमधील "शके १५५७ युवनाम संत्वछरी (इ.स. १६२५-२६) शाहाजी राजे भोसले यासि बारा हजार फौजेची सरदारी इदलशाहीकडून आली. सरंजामास मुलूख दिल्हे त्यांत पुणे देश राजाकडे दिल्हा. राज्यांनी आपले तर्फेने दादाजी कोंडदेव मलठणकर यांसि सुभा सांगून पुणियासि ठाणे घातले. तेव्हा सोन्याचा नांगर पांढरीवर धरिला. शांति केली. मग सुभेदार यांनी करण्याची व गावगन्नाची प्रांतात वस्ती केली. ....शाहाजी राजे विजापूर प्रांती गेले." व उपलब्ध कागदपत्रातील "मसुरल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार नामजाद व कारकून किले कोंडाण व महालानिहाय" असा उल्लेख २६ जानेवारी १६३८ च्या ताा गुंजण मावळच्या महजरांत प्रथम आढळतो असे बेंद्रे संदर्भ देवून सांगतात. पुढे ते लिहितात की, ३० मे १६३८ चा मजहर मौजे कोढित प्राा पुणे (कसबा खेडेबारे येथील मजालस) च्या मोकदमीबाबतचा आहे. त्यांत मसुरल हजरती दादाजी कोंडदेव सुभेदार नामजाद किले कोंडाणा व महालानिहाये" ५ जुलै १६३८ चा महजर परगणे पुण्यांतील पिंगोरी गांवाच्या मोकादमीबाबत असल्यानें "येथे राजश्री दादाजि कोनुदेऊ शुभेदार नामजाद किले कोडाणा व पाा पुणा व माहालानिहाये" असा आला आहे. असाच उल्लेख मौजे रावेतच्या मोकदमीबाबत २६ ऑगष्ट १६३९ चा महजर उपलब्ध आहे. तसेच २८ सप्टें. १६३९ रोजी परिचेकर रतनोजी जाधवरावास दिलेल्या पावतीत

"राजश्री दादाजी कोंडदेव सुभेदार नामजाद किले कोडाण मालानिहये" असाच उल्लेख आला आहे.

यानंतर २७ नोव्हेंबर १६३९ चे पादशाही फर्मान उपलब्ध आहे. त्यामध्ये, "फर्मान हमायुन शर्फ सदूरयाफ्त बजानेब देसाई पाा गदग (ऊळी) सुाा सन अबैन आलफ दरीबिला मशुरल दौलत दादाजी पंडित हेजिब जमारिकाब चाकर यासि गला वाा अजनास लस्कर मनसुरासी चालवावयाबद्दल पाठविले असे में बायेद के फर्मान जाहामतां आलम मती पावताची बकालसी वा बाजे खुमासी ताकीद करणे.... सरजाम करीत जाणे.... तास्वीर कराल तरी नतीजा बरवे न होईल..." या फर्मानात दादाजी कोंडदेवाला 'हेजिब' असे म्हटले आहे आणि तो आदिलशाही नोकर आहे हे स्पष्ट होते. दादाजी कोंडदेवाची उल्लेख असलेली, त्यांना इ.स. १६३७ च्या अखेर सुभेदारीचा अधिकार मिळाल्यापासून १६३९ अखेरपर्यंतची पत्रें उपलब्ध आहेत; परंतु या फर्मानानंतर इ.स. १६४० च्या संबंध वर्षात उल्लेख नाही. उलट १६४० इ. चे एक पत्र "अजरख्तखाने खुदायेबंद खान अजम मोहमदखान काजी सैद साहेब" याचे खुर्दखत आहे. त्यांत त्यास "ताा नानेमावळ किले लोहगड अर्जानी" झाल्याचें म्हटले आहे. त्यावरून असें वाटतें की, दादाजी कोंडदेव "गला व लष्कर" घेऊन अर्थात विजापूरी गेले ते परत येईपर्यंत सुमारे एक वर्षाचा काल गेला. वरील उल्लेखावरून एक गोष्ट लक्षात येते की, ज्यावेळी ते शाहाजीच्या जहागिरीचा कारभार पाहात तितक्याच कागदपत्रांत कर्यात मवाळ किंवा परगणे पुणें असें आपल्या हुद्यात जोडीत. इतर वेळी म्हणजे आपल्या आदिलशाही सुभ्याच्या कामांत फक्त त्यांचा हुद्दाच लावीत[१०] असा निष्कर्ष वा. सी. बेंद्रे काढतात.

विजापूराहून परत आल्यानंतर दादाजी कोंडदेवांचा उल्लेख १४ जानेवारी १६४१ च्या महजरात आलेला आहे. तो महजर ताा खेडेबारेचाच असल्यानें त्यांत "मशरुल हजरत राजश्री दादाजी कोंडदेऊ नामजाद किले कोढाणा माहलानिहाय" एवढाच आला आहे. यावरून मोहमदखान दादाजींच्या गैरहजेरीत काम पाहात होता तो परत गेला असावा, असे बेंद्रे म्हणतात. मात्र महजरावरून बापूजी मुद्गल हा जो आपण हवालदार म्हणून लिहीत असे त्या जागीं भानजी कोंडो हा हवालदारीवर आलेला दिसतो व बापूजी मुद्गल फक्त देशकुलकर्णी म्हणूनच म्हणवितो. भाजी कोंडो हा दादाजी कोंडदेवाचा भाऊ आहे कीं कसे हे स्पष्ट झालेला नाही.

यानंतर २ मार्च १६४२ च्या सिद्दी अंबर यातुतखानाच्या पत्रवरून समजते की याची पुणे परगण्यावर अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. त्याने या पत्रात त्याच्या अधिकारातील पुणें येथील अमृतेश्वर देवळाचे पुजारी व गुजर यांच्यातील भांडणाचा निकाल लावला. यावरून असे स्पष्ट होते की, शाहाजीने आपल्या जहांगिरीचा तात्पुरता कारभार दादाजी पंताकडून काढून सिद्दी अंबरकडे दिला. यानंतर शाहाजीच्या पुणें जहांगिरींतील कोणत्याही कामाचे पत्र दादाजी कोंडदेवच्या नावाने निघालेले उपलब्ध नाही.[११] मात्र सुभेदारीच्या क्षेत्रांतील पत्रे उपलब्ध आहेत. त्यातील एक महजर मौजे मलेद या गांवासंबंधीचा असून तो ३० मे १६४२ चा आहे व जून १६४२ चा महजर कातरज ताा खेडेबारेचा असून १ जून १६४२ किंवा २१ मे १६४३ चा महजर खेडसंबंधी आहे. यानंतर एका २२ जून १६४२ च्या फर्मानाच्याखाली जे शिक्के दिले आहेत त्यांत "दादाजी कोंडा आदिलशाही बंदरगाई ईलाही" असा एक शिक्का आहे.

१ ऑगष्ट १६४४ (१३ ऑगष्ट १६४३?) रोजी आदिलशाहाकडून कान्होजी जेधेस आलेल्या फारसी पत्रावरून समजते की, खंडोजी राजे घोरपडे यानें या सुभ्याचा कारभार आपणाकडे घेतला असावा असे दिसते. कारण २ नोव्हेंबर १६४४ च्या पत्रांत त्याने मोरेश्वर गोसावीं यास मौजे लोणी पाा सुपे येथी कांही पट्ट्या माफ केल्या आहेत. यानंतर काही महिन्यातच आदिलशाहाची दादाजी कोंडदेवावरील गैरमर्जी दूर झाली व ते पुन्हा सुभेदारीवर इ.स. १६४५ च्या डिसेंबरपूर्वीच आले हे १२ डिसेंबर १६४५ च्या "अज दिवाण मसरुल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार नामजाद किले कोंढाणा व महालानिहाय" म्हणून बाबाजी झुझारराऊ देशमुख कानदखोरे यास लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट आहे.[१२] मौजे नाहवीबाबतचा उपलब्ध आहे. यानंतर दादाजी कोंडदेवासंबंधाचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने ते यानंतर केव्हा तरी वारले असावेत असा अनुमान काढावा लागतो.

(ब) दादोजी कोंडदेवांच्या मृत्युसंदर्भात वा. सी. बेंद्रेंनी केलेली चिकित्सा :

शिवाजी महाराजाचे तेरिख "२६ जमादिलाखर सहर सन समान आर्बेन अलफ (१९ जुलै १६४७) चे पत्रांत हाली साल माा कारणे माा दादाजी कोंडदेऊ सुभेदार त्यासी देवाज्ञा जाली म्हणौनु...." असे म्हटले आहे. यावरून २४ मे ते १९ जुलै १६४७ च्या काळामध्ये दादाजी वारले असा अर्थ होईल. नंतर १५ ऑक्टोबर १६४७ च्या शिवाजी महाराजांच्या पत्रातही "साल मजकुराप्रमाणे माा (मरहुम) दादाजी कोंडदेऊ सुभेदार यासी देवाज्ञा जाली म्हणऊनु...." म्हणजे

वरीलप्रमाणेच मजकूर आहे. या सर्वांचा निष्कर्ष इतकाच की, हा चालू सन सुरू होण्याच्या आसपास दादाजी वारले. वा. सी. बेंद्रे पुढे लिहितात १३ जुलै १६४६ नंतर म्हणजे पावसाळ्यानंतर (नोव्हेंबरनंतर) कर्नाटकात शाहाजी गेले एक दोन महिन्यात परत आले. नंतर काही दिवसांनी म्हणजे जानेवारी-फेब्रुवारीत दादाजी परत आले आणि 'वोंस तुकाराम नीरंजेन' या टिपणातील "दादो कोंडदेव नारायेणारूप फाल्गुन शुद्ध ११ निजधाम पावले" ह्या नोंदीप्रमाणे ९ मार्च १६४७ रोजी दादाजीचा मृत्यू झाला[१३] असणे अधिक शक्य आहे, असे बेंद्रे निष्कर्ष काढतात.

३.८.१६ शाहाजी-जिजाई-शिवाजी संबंध :

पुढील प्रकरणात शिवाजी-जिजाई-शाहाजींचे पुणे जहांगिरी संदर्भातील संबंधाचा विस्ताराने विचार करण्यात आल्याने येथे फक्त ओघनेच विचार करण्यात आला आहे. ३० मे १६३८ व ५ जुलै १६३८ आणि २६ ऑगष्ट १६३९, २७ सप्टेंबर १६३९, २८ सप्टेंबर १६३९ च्या महजर व पत्रांवरून असें दिसते की, दादाजींचा अधिकार मुतालिकाचा म्हणजे शेतधाऱ्याच्या वसुलीचा व मुलकी कारभारापुरताच मर्यादित असावा असे बेंद्रे म्हणतात. कारण या काळात बारा मावळांबाबत जे हुकूम निघाले ते सर्व आदिलशाहाकडून निघालेले आहेत. इतकेच नव्हे तर एक रणदुल्लाखानाच्या हेजीबाच्या सांगण्यावरून काढलेला आहे. या सर्व महजरांवरून बापुजीपंताना हवालदारी मिळालेली दिसते. पुणा कर्यातीतील खुर्दखतें बगैरे शाहाजीच्याच नावाने निघालेली आहेत. सुपे परगण्यातील या काळातील तीन खुर्दखतें उपलब्ध आहेत आणि त्यातील दोन इ.स. १६३६-३७ चे खेलोजी भोसलेच्या नावाचे व एक मे-जून १६३९ चे शाहाजी राजांच्या नावाचे आहे. यावरून कदाचित हा मोकासा इ.स. १६३९ अखेरपर्यंत तरी संभाजी मोहितेकडे गेला नसावा. २७ नोव्हेंबर १६३९ च्या फर्मानात दादाजी कोंडदेव वसूल व लष्कर घेऊन विजापूराकडे गेले असल्याचा उल्लेख आहे. याच काळातील एक ४ जुलै १६३९ च्या पत्रावर शिक्का आहे. त्यांत "दादाजी कोंडदेव आदिलशाही बंदरगाह इलाहि" असा मजकूर आहे.

दादाजी कोंडदेव विजापूराकडे बहुधा इ.स. १६४० पावसाळा संपेपर्यंत म्हणजे सप्टेंबर अखेरपर्यंत राहून कदाचित दसरा-दिपावलीनंतर पुण्याकडे परतले असावेत. दादाजीचा इ.स. १६४० तील कोणताही उल्लेख कागदपत्रांत आढळत नाही. त्यांचा १४ जानेवारी १६४१ महजर उपलब्ध असल्यानें ते त्यापूर्वी खेडेबारियांत होते यांत शंका नाही.[१४] दादाजींच्या कर्नाटकातील

मुक्कामात म्हणजे इ.स. १६४० मध्ये शाहाजीनें शिवाजीचें लग्न निंबाळकर पवारांच्या मुलीशी करून देऊन आपला आजोळचा संबंध कायम ठेवल्याचें दिसते.

दादाजी कोंडदेवाची १४ जानेवारी १६४१, ३० मे १६४२, १ जून १६४२, ९ जून १६४२ आणि २१ फेब्रुवारी १६४३ या तारखांची पत्रे-महजरे यांवरून दादाजी कोंडदेव हे आपल्या सुभ्याचे काम सुरळीत चालवीत होते यात संशय राहात नाही, असे सांगून वा. सी. बेंद्रे ३० जानेवारी १६४३ च्या फर्मानाचा मराठीत सारांश पुढीलप्रमाणे देतात "काजी सईद यानें जाणावें की, यावेळीं फर्जेंद शाहाजी भोसले यानें (मदुरेच्या) त्रिमल नायकाची राजनिष्ठा व सत्सेवा यांची हकीकत सांगितली म्हणून त्याचें उर्जित करून त्यास पंजाचें फर्मान पाठविले आहे. हें फर्मान शाहाजीकडे पाठवावें. आणखी असें कळलें की शाहाजीस त्याच बाजूस नियुक्त केलें आहे. फार चांगले केलें. तो मदतीबाबत जें लिहिल त्याप्रमाणें कुमक करीत जावी. म्हणजे तो त्या बाजूच्या गनीमांस नेस्तनाबूद करील.[९५]

शाहाजी महाराजांनी शिवाजी व जिजाबाई यांना शिवापुरी ठेवून इ. स. १६३७ मध्ये रणदुल्लाबरोबर कर्नाटकच्या स्वारीवर गेले. संभाजीला मात्र आपल्या बरोबर नेले. संभाजीकडे दोन हजारपेक्षा अधिक सरंजामी असावी असे बेंद्रे सांगतात. शाहाजीचे सर्व कुटुंब इ. स. १६२८ मध्ये जरी कंपिलीला एकत्रित होतें तरी संभाजीकडे बंगलोर व सरहद्द सांभाळण्याचें काम १६३८ अखेर आले. जिजाई व शिवाजी इ. स. १६४२ च्या पावसाळ्यानंतर पुण्यास गेली आणि संभाजीनें आपले ठाणें बंगलोरला नेलें. कंपिलीही घोरपडेच्या भांडणात इ. स. १६४३ मध्ये परत करावी लागली. इ. स. १६४४ च्या अखेरीस बंगलोरचा पांच लाखावरचा सुभा संभाजीकडे आला आणि बंगलोर हेच संभाजीचें मुख्य कार्यक्षेत्र झाले.[९६]

दादोजी कोंडदेव विजापूराकडे गेले तेव्हां शाहाजीच्या पुणे-सुपे जहांगिरीची व्यवस्था आदिलशाही सरदारांकडे दिली गेली असावी असे दिसते. ती तशीच शिवाजी महाराज इ.स. १६४२ च्या पावसाळ्यानंतर पुण्यास येईपर्यंत त्यांच्याकडेच राहिली असावी. मोहमंदखान याच्याकडे लोहगड भाग त्याच्या इहिदे आवैन अलफ (१६४०-४१ इ.) च्या पत्रावरून, सिद्दी अंबरकडे पुणे, कसबा[९७] व पुणे प्रांत २ मार्च १६४२ पत्रावरून, नीळकंठरावाकडे सुपे-जेजुरी ३ जुलै १६४२ च्या पत्रावरून असावे असे दिसते. शिवाजी, आपल्या मातुश्री व सामराज पेशवे वगैरेसह पुण्यास इ.स. १६४२ च्या अखेरीस आले असावेत. थोडेच दिवसांनी म्हणजे ११ मार्च

१६४३ ते २७ फेब्रुवारी १६४४ च्या दरम्यान (१६४३ इ.स. च्या पावसाळ्यापूर्वी म्हणजे मे-जुलै १६४३ त) रणदुल्लाखान वारला. त्यामुळे शाहाजीच्या सरंजामीबाबत प्रश्न उभा राहिला व त्याचा फायदा शिवाजीने घेण्यास सुरुवात केली.

३.८.१७ शाहाजी व आदिलशाहात वितुष्ट (१६४३ इ.स.) :

शिवाजी महाराजांनी पुण्यात स्थिरस्थावर होताच (१६४२) त्यांनी सहकारी वाढवून जवळजवळ स्वतंत्र राज्याच्या कल्पनेने आपल्या हालचाली करण्यास सुरूवात केली. शिवाजी महाराजांनी श्रीशंकररोहिरेश्वरास पहिल्याच बांधलेल्या पूजेनें महमंद आदिलशाहास आपले स्थान डळमळीत होण्याची धास्त खाऊन धावपळ करावी लागली. दादाजी नरस आदिलशाहाला भेटण्यापूर्वी आदिलशाहाचे १३ ऑगष्ट १६४५ ला दादाजी व शाहाजीच्या विरूद्ध हुकूम सुटले. शाहाजी व आदिलशाहा यांच्यांत वितुष्ट आल्याची बातमी २५ जून १६४४ च्या पत्रात आली आहे ती बेंद्रे देतात, "आदिलखानाचे (महंमद आदिलशाहाचे) खबरनिवासने सांगितले कीं, शाहाजी भोसले, सय्यद फरहाद आणि याकुतखान हे अल्ली आदिलखानाला सोडून गेलेत आणि सय्यद अब्दुल हुसेन हा त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करित होता." बेंद्रे म्हणतात, शाहाजी व आदिलशाहात वितुष्ट निर्माण होण्यास फक्त वर सांगितल्याप्रमाणेंच कारण कारणीभूत होते असे नाही तर अजून काही कारणे कारणीभूत होती, ती म्हणजे :

(१) रणदुल्लाखान मृत्यू पावल्याने शाहाजीचा द्वेष करणाऱ्यांना वाव मिळाला,

(२) याच सुमारास किंवा दादाजी कोंडदेवाबाबतचे फर्मान निघण्यापूर्वी शाहाजीला आपली जमात आदिलशाहाकडे हजर करण्याचा हुकूम गेला होता. अर्थातच या हुकूमामागील हेतूची कल्पना शाहाजीला असल्याने त्याने दिरंगाई केली, त्यामुळे आदिलशाहाचा डाव न साधल्यानें शाहाजीची गैरसमजूत दूर करण्याचा २० ऑगष्ट १६४३ च्या पत्रांत प्रयत्न केला; परंतु आदिलशाहाने यापूर्वी हुकूम काढून कोंडाण्याचा सुभा खंडोजी घोरपडेकडे[१८] व पुणें जहांगिरीचा हवाला शाहाजीनें सिद्दी अंबर याकुदखानाकडे दिला होता तो काढून त्रिंबकजी राजे यांचेकडे दिला. यामुळे साहाजिकच शाहाजी रागावला होता.

(३) शिवाय शाहाजीच्या वकीलाचा म्हणजे मुतालिकाचा अर्थात दादाजी कोंडदेवाचा एक हात कापविला असला तर दादाजी व शाहाजी हे दोघेही आदिलशाहाविरूद्ध होणे स्वाभविक होते.[१९]

(४) यावेळी शाहाजीला खरा विरोध अफझलखानाचाच होता. याने शाहाजी राजाबरोबर चंदीस वेढा दिला होता व नंतर आदिलशाहाला अफझलखानाने शाहाजीचा चंदीच्या राजांशी घरोबा आहे ते त्यांना सामान पुरवितात असे सांगितले होते.

२० ऑगष्ट १६४३ च्या पत्राने महंमद आदिलशाहाने गैरसमजूत दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर शाहाजीने आदिलशाहास पत्र पाठवून खरी स्थिती सांगितली. आदिशाहाने शाहाजीस २८ मार्च १६४४ ला पत्र लिहिले आहे. बेंद्रे म्हणतात त्या २८ मार्च १६४४ च्या पत्रावरून असे दिसते की, आदिलशाहाने पडते घेऊन पुन्हा मागीलप्रमाणे सर्व कारभार सुरळीत चालेल अशी व्यवस्था केली असली पाहिजे. २८ मार्च १६४४ च्या पत्रांतील मजकुराचा सारांश बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "महाराज फर्जंद शाहाजी भोसले यानें जाणावें की तूं पाठविलेला राजनिष्ठेविषयींचा अर्ज ध्यानात येऊन पसंतीस उतरला. नबाब खानबाबा शाहाणे आहेत व तू दूरदर्शी आहेस. म्हणून आम्ही नबाबास हुकुम केला आहे की, त्यानी राज्याचें हिताचें दिसेल ते करावे आणि सिवाप्पाच्या इतर कामांत गर्क असावें. तुला हिताचे वाटेल तें तूं नबाबाचे नजरेस आणावें म्हणजे ते निर्णय देतील. तिकडील हकीकत इकडे लिहून पाठवीत जावी."[१००]

शाहाजीला फारसे न दुखविण्याकडे आदिलशाहाचा कल होता; परंतु दादाजी कोंडदेवाकडे पुन्हां सुभ्याचें काम केव्हां दिले गेलें हे समजण्यास पत्रांचा आधार नाही. आदिलशाहा शाहाजीच्या विरोधात गेला असला तरी हा विरोध फार काळ राहिला नाही. कारण शाहाजीची पुणें-सुपा सुभ्याबाबत पत्रें आलेली आहेत. २८ फेब्रु. १६४४ पुणे परगण, १२ डिसें. १६४४ येलूर, १७ जाने. १६४६ येलूरच्या पत्रांवरून शाहाजीचा ताबा पुणे-सुपें यांवर चालूच राहिला होता असें म्हणण्यास हरकत नाही; परंतु दादाजीचें त्याला बडतर्फे केल्यानंतरचें उपलब्ध पत्र म्हणजे १६ डिसें. १६४५ हे होय. नंतरचे पत्र २ एप्रिल १६४६ चे कानदखोरेचेंच असून त्यात, "रामाजी विठल देशकुलकर्णी शिरवल हा पुण्यास येऊन सेवेसी मातुश्री जिजाआऊकडे जात", असें दिसतें. नंतर एक कौलनाम आहे तो १३ जुलै १६४६ चा नाहावीबाबत आहे. यानंतर दादोजी कोंडदेव विजापूराकडे व तेथून जानेवारी-फेब्रुवारींत (१६४७) परत आले व ९ मार्च १६४७ रोजीं मृत्यू पावले. ज्या खंडोजी घोरपडेनें दादाजीकडील आदिलशाही भाग ताब्यात घेतला त्या भागाला कारभारात पाहात असल्याचें त्याच्या २ नोव्हें. १६४४ च्या पत्रावरून स्पष्टच आहे. दादाजी कोंडदेव सुभेदार नामजाद किल्ले कोंडाणा व महालानिहाये म्हणून बापूजी मुग्दल हवालदार व

कारकून यास खमस अर्बैन अलफांत (२४ मे १६४४ ते २३ मे १६४५) लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की दादाजीस पुन्हा कारभार मिळाला.[१०१] तो २ नोव्हें. १६४४ ते २३ मे १६४५ च्या दरम्यान मिळाला असला पाहिजे, असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

३.८.१८ आदिलशाहाद्वारे २५ जुलै १६४८ ला शाहाजीस कैद करण्यासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

शाहाजींच्या कैदेसंदर्भातही अनेक चुकीच्या बाबी बखरकारांनी पसरविलेल्या दिसतात. त्यामध्ये शाहाजी महाराजांची कैद ही शिवाजीच्या कोंडाणा फितुरीने घेण्यासाठी झाली असा बखरकारांचा समज झाल्याकारणाने त्या अनुरोधाने कोंडाण्याला शाहाजी महाराजांच्या कैदेशी जोडले हा समज चुकीचा असला तरी शाहाजीच्या सुटकेत या गडाचा संबंध आल्याने राजाकारणातील भाग पुणा-मावळ भागांत रूढ झाल्याने या दंतकथांना महत्त्व प्राप्त झाल्यास त्यात नवल करण्यासारखे काही नाही, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

(१) कोंडाणा घेणे शाहाजी महाराजांच्या कैदेला कसा कारण ठरले नाही, हे स्पष्ट करतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, शिवापूरकडे देशपांडे यांच्या शकावलीत नोंद आहे की, "शके १५६९ (१६४७-४८ इ.स.) राजश्री बापूजीपंतानी किले सिव्हगड घेऊन दिन्हे" अर्थात ही गोष्ट दादाजी कोंडदेवांच्या मृत्यूनंतरही म्हणजे ९ मार्च १६४७ नंतर झाली असली पाहिजे. बापुजी मुग्दल हवालदार यानें दादाजीनंतर कोंडाण्याचा सुभा चालविणें साहजिक होते आणि याचा भोसले घरण्याकडे ओढा इ.स. १६३६ पासूनच असल्यानें कोंडाणा घेण्यांत अडचण अशी नव्हतीच. सहजासहजी ताबा हाती येण्यासारखा होता. जेधे लिहितात की, "बापूजी मुग्दल नऱ्हेकर देशपांडे ताा खेडेबारे यांच्या हातें राजकारण करून दग्यानें किल्ला कोंढाणा घेतला. याजकरिता माहाराजावरी पातशहा इतराज जाले. अटकेत ठेविले. कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण (लोहेकरे) हे उभयता कनकगिरी मध्ये अटकेंत ठेविले...."[१०२] या कोंडाण्याच्या बाबतीतले ८ ऑगष्ट १६४८ च्या आदिलशाहाच्या केदराज खोपडे देसाईश तर्फ भोर किले रोहिडा यास लिहिलेल्या फर्मानाचा बेंद्रे सारांश देतात तो असा, "फतहखान खुदावंदखान यास कोंडाणा किल्याच्या तर्फेस मसलत फर्माविली आहे. तरी हें फर्मान पोहोचतांच त्याने (केदराजीनें) स्वार व प्यादे यांसह उपरोक्त खानाच्या जवळ जाऊन त्याच्या आज्ञेंत राहून दिवाणाची

मसलत करावी. म्हणजे उपरोक्त खानाच्या लिहिल्यानुसार निष्ठा व्यक्त होऊन तीप्रमाणें उत्कर्ष होईल. या बाबतीत विसर (उशीर?) करण्याचा परिणाम चांगला होणार नाही. बरी ताकीद समजून फर्मानाप्रमाणें अमल करावा."[१०३]

आदिलशहा ही जी कारवाई करितो ती जवळजवळ १०-१२ महिन्यांनी करीत आहे. त्यावरून कोंडाणा शिवाजीनें दादाजीच्या मृत्यूनंतर घेण्यांत विशेष बेकायदेशीर वाटलें नसलें पाहिजे. शिवाजीनें दादाजी कोंडदेवाच्या ताब्यात असलेल्या पुणें प्रांतांतील खेडेबोर वगैरे भागांचा दादाजीच्या मृत्युनंतर लगेच ताबा घेऊन कारभार चालविला होता याची साक्ष त्याची पत्रेंच देत आहेत. ही पत्रे खेडेबारेबाबतची असून २८ जानेवारी १६४६ ते २ ऑगष्ट १६४८ पर्यंतची आहेत. सारांश, आदिलशाहाला ८ ऑगष्ट १६४८ ला खोपडेला पत्र लिहिण्याच्या फार तर कांही थोडे दिवस आधीं शिवाजीनें दादाजीच्या सुभ्याचा ताबा घेणे बेकायदेशीर वाटलें नव्हतें. शिवाय हे पत्र शाहाजीला २५ जुलै १६४८ रोजी अटक केली त्यानंतरचें आहे. यावरून असे दिसते की, शिवाजी-संभाजीने आपआपल्या किल्ल्यांचा आधार घेऊन बापाचा सूड घेण्यापूर्वीच त्यांचा बंदोबस्त ठायींच करण्याकरितां ही पत्रें गेली असली पाहिजेत. शिवाजीने कदाचित वादग्रस्त ताबा घेतला असेल; परंतु तशी परिस्थिती संभाजीची नव्हती यांत शंका नाही. तेव्हां कोंढाणा घेतल्यामुळें अटक झाली म्हणणे अवास्तव आहे.[१०४] कोंढाणा व बंगलूर समेटासाठी मागितले गेले म्हणून हा केवळ एक तर्क करण्यात आला इतकेच असे बेंद्रे स्पष्ट करतात.

कोंढाण्याबरोबरच शिवाजीने पुरंदरचा ताबा घेतला होता. राजगडावर तर शिवाजीने ६-७ वर्षापूर्वी आपले ठाणेच बसविले होतें. या दोन किल्ल्याबाबत ज्या अर्थी आदिलशाहानें सुटकेसाठी अट घातली नव्हती त्याअर्थी शाहाजीच्या कैदेचा संबंध शिवाजीच्या हालचालीशी फारसा जोडता येणार नाही. पुरंदर तर जबरदस्तीने घेतला होता आणि शाहाजीचे हातपाय या भागांत पसरुं न देण्याबद्दल शहाजहान तर फार दक्ष होता. शिवाजीनें भाऊबंदकीचा फायदा घेऊन पुरंदर १९ ऑक्टो. १६४७ ला आपल्या ताब्यात घेतला व तोही शाहाजी महाराजांच्या अटकेच्या ९-१० महिने पूर्वी. आदिलशाहाला यावेळी स्वारीच्यावेळी पावसाची अडचण नव्हती. याकाळात सहज पारिपत्यार्थ माणसें पाठवितां आली असती; परंतु त्यानें तसें न करिता पावसाळा सुरू होताच हा गडप्रांत परत घेण्याची आज्ञा केली आहे. याचाच अर्थ की ऑगष्ट १६४८ च्या पूर्वी थोडेच दिवस कांही तरी निराळी घटना घडली असावी की ज्यामुळे आदिलशाहाला शत्रुचे भय

अधिक वाटलें असावें. मुरुमगड, पुरंदर व कोंढाणा शिवाजीने घेतला म्हणून शाहाजीला कैद केले असे अनुमान तत्कालीन परिस्थितीवरून काढतां येत नाही[१०५] असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

३.८.१९ शाहाजीला कैद

२५ जुलै १६४८ रोजी मुस्तफाखानानें शाहाजीस चंदीनजीक कैद केले. लढाई झाली. त्यांत शाहाजीस जखमा लागून मूर्च्छित स्थितीत पकडलें. पावसाळ्याचे दिवस असल्यानें युद्धविषयक हालचाली साहजिकच थंडावल्या होत्या. शाहाजीला जखमी स्थितींत पूर्ण बंदोबस्तानें विजापूरी नेऊन सर्व मालमत्तेसह सुरक्षित पोहचविणें अवघड काम होतें. अर्थात शाहाजीला खानबाबाच्या गोटांत बंदोबस्तानें ठेवणें भाग झाले. शाहाजीबरोबरच्या कान्होजी जेध्याला कनकगिरीत "अदबखानांत" ठेवले होतें. यावरून आजारी शाहाजीची कैद अशाच प्रकारची असणे साहजिक आहे, असे बेंद्रे म्हणतात. जशी महामदनाम्यात सांगण्यात आली आहे.[१०६] खानबाबा ९ नोव्हें. १६४८ रोजी वारला. त्याच्या जागी खानखानन आला. पावसाळा संपत आलाच होता. खानखाननने २२ डिसें. १६४८ ला जिंजीवर चढाई केली. मीर जुमल्याला तंबी पोहोचविली. किल्ला घेतला. त्यानंतर तेथील मालमत्ता व शाहाजी व शाहाजीची सर्व मालमत्ता अफझलखानाबरोबर विजापूराकडे रवाना केली.[१०७] मार्च १६४९ च्या थोडे दिवसपूर्वी किंवा सुरुवातीस शाहाजी विजापूरी पोहचला.

महामदनाम्यात शाहाजीच्या कैदेबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आलेला आहे, "नबाबव हसनबादेहून (१२ जाने. १६४८) ला निघाला. आदिलशाहा महमदपूरास (१७ जानेवारीस) गेला. नबाब जिंजीजवळ जाऊन पोहोंचला. तेव्हा गडाशीं झगडण्याची खटपट करीत असलेल्या मीर जुमल्यानें खोडी करण्याचा थोडा प्रयत्न केला. विजापूराकडून खानखानन रुस्तुम झमान, अफझलखान वगैरे नबाबाच्या मदतीला येत होते; परंतु मीर जुमल्यानें नबाबाशी तह केल्याचें वृत्त कळतांच ते सर्व परत गेले. नबाबाने एका दिवसांत जंगम (कावेरी) आणि त्रिणामल हे किल्ले घेतले." "कुत्बशाही मिर जुमल्याची लढाई मारून काढून नबाब जिंजीला गेला. त्याला तो गड दुर्गट व अजिंक्य असा वाटला."

"जेव्हा जिंजीचा वेढा लावला तेव्हा दूत खेळणाऱ्याचे फासे जसे फिरतात त्याप्रमाणें मनाची नेहमीं चलबिचल पावणारा शाहाजी यानें आपल्या सैनिकांना विश्रांती मिळावी म्हणून

आपल्या जहांगिरींत परत जाण्यासाठी परवानगी मागितली. नबाबाने उत्तर पाठविलें की, अशा ऐन वेळीं जाणें म्हणजे गोंधळ निर्माण करण्यासारखें आहे; परंतु शाहाजी राजानें पुन्हां निरोप पाठविला की, या छावणीत धान्य फार महागलें आहे. त्यामुळे सैनिकांना जे हाल व ताप होत आहेत ते त्यांना यापुढे सहन होणे शक्य नाही. खरे म्हटले तर अशा परिस्थितीत परवानाही विचारण्याची आवश्यकता नव्हती. तो परवान्याच्या विनाच जाऊं शकतो."

"जेव्हां नबाबानें पाहिलें की शाहाजीच्या मनांत काही तरी गोंधळ निर्माण करून कांही लबाडीचा हेतू साधण्याचा विचार आहे तेव्हां त्यानें मोठ्या चातुर्याने व बुद्धिकौशल्यानें त्याला कैद करविले. तसे करण्यांत शाहाजीच्या सामानसुमानास एक तसूचीही झळ लागूंन देतां ते बादशाहाच्या खजिन्यात सुरक्षित ठेवले."

"नबाबानें महंमद आदिलशाहाच्या परवानगीनेंच शाहाजीला कैद करवलें आणि आपण वेढ्याच्या खटपटींत राहिला. नबाबाला लौकरच रागाने पछाडलें व तो थोड्याच दिवसांत (९ नोव्हें. १६४८) त्या रोगाने मृत्यू पावला. तेव्हा मुझफरउद्दीन खानखाननला ताडपत्री म्हणजे नंदेहालची स्वारी थांबवून नबाबाचें मुख्य वजिरीपदाचें काम पाहाण्यास आदिलशाहाने सांगितले. त्याप्रमाणे खानखानन जिंजीला पोहोंचला व २२ डिसें. १६४८ रोजी गडावर हल्ला चढविला. अफझलखानाने या जिंजीच्या वेढ्यात महत्त्वाचा भाग घेतला होता. खानखानाने जिंजीच्या नायकाची धनदौल्त ताब्यात घेऊन आदिलशाहाकडे पाठवून दिली."

"जिंजीला गड ताब्यात घेतल्यावर खानखानने अफझलखानाबरोबर ८९ हत्तीवर सर्व लूट लादून पाठविली. शाहाजी राजासाठी बेड्या घालून त्याचेबरोबर विजापूरास रवाना केले. .....शाहाजी राजांना झिंडन-इ-इकात मध्ये कैदेत ठेवलें. अशा तऱ्हेची शाहाजीस दिलेली वागणूक पाहून शहरांतील मोठे सरदार व लोक यांना आश्चर्य वाटले. कारण त्या सर्वांची कल्पना होती की, शाहाजीला ठार मारण्याची शिक्षा होईल. कोणत्याही प्रकारचा त्याच्यासाठीं इतर बंदोबस्त केला जाणार नाहीं. ज्याअर्थी त्यास साध्या कैदेत ठेवलें आहे त्याअर्थी त्याला क्षमा मिळून मुक्तही होईल, असे त्यांना वाटूं लागलें. काही सरदारांना शाहाजीची अशा तऱ्हेने सुटका होणें इष्ट वाटत नव्हते. कारण तो हुरहुन्नरी व लबाड आहे. असा दुसरा गट होता की, त्यांच्या मते त्या विश्वासघातकी आणि बेदरकार मनुष्याची सुटका करणें म्हणजे नागाच्या शेपटीवर पाय देण्यासारखें किंवा जाणूनबुजून विंचवाची नांगी हातात धरण्यासारखे आहे. साळूला चिखलाचा

ढीग मानणें किंवा मुंग्यांच्या वारूळाची उशी करणें शहाणपणाचें होणार नाही." "परंतु लौकरच सर्व प्राणिमात्रांचे अपराध पोटीं घालण्यांत सदा तत्पर असणाऱ्या आदिलशहानें शाहाजीला सर सरनौबत अहमदखान याच्या ताब्यात दिलें व त्यास कळविण्यास सांगितले की, जर कोंडाणा व बंगलोर हे किल्ले आदिलशाहाला दिले तर शाहाजीला त्याची पूर्वील वजीरी, सरंजाम वगैरे परत देण्यात येईल."

"खान अहमदखान शाहाजीला आपल्या घरी घेऊन गेला आणि नजरकैदेत ठेवलें. नंतर त्यानें आदिलशाहाच्या मेहरबानगीची गोष्ट शाहाजीजवळ काढली. शाहाजीने जेव्हां पाहिलें कीं आपल्या काळ्या कृत्यांतून पादशाही मेहरबानगीचीं स्वच्छ पांढरी फुले उमलत आहेत तेव्हा त्यानें त्या अटीला आपली मान्यता दिली. त्यानें आपल्या दोन्ही मुलांना पत्रें धाडली. त्याच्या मुलांनी या किल्ल्यांचा ताबा मजबुतीने राखला होता. शाहाजीनें आपल्या पत्रात लिहिले की, 'हा अगदीं त्रोटक असा हा खलिता तुमचे हातीं मिळताच कोंडाणा, कुंडरगी व बंगलोरचे गड आदिलशाहाच्या खासा अधिकाऱ्यांच्या ताब्यात द्या." त्यांनी ताबडतोब आपल्या पित्याची आज्ञा पाळली." "आदिलशाहानें शाहाजीला आपल्या दरबारांत बोलाविलें व वजिरातीची खिलत वगैरे देऊन त्याचेकडे पूर्वीचा सर्व प्रदेश पुन्हा सोपविला."[१०८]

(अ) महमदनाम्यातील मजकुराची बेंद्रेंनी केलेली चिकित्सा :

शाहाजीनें जशी पूर्वी हिंदू राज्यें कायम राखण्याची कारवाई चालू ठेविली होती, तशीच विजापूरकर व गोंवळकोंडेकर यांचे वांकडे येतांच शाहाजीने कुत्बशाहाच्या नोकरींत जाऊन आदिलशाहाने त्याच्या मूळ जहांगिरींत केलेल्या बदलाबद्दल चुणूक दाखवावयाची होती;[१०९] परंतु त्याचा हा बेत फसल्याचें २३ डिसें १६४७ च्या कुत्बशाही वकिलाच्या पत्रावरून स्पष्टच आहे. दरम्यान शाहाजीनें शिवाजी महाराजातर्फे मुरादबक्षाजवळ बोलणें लावलेसं दिसतें. शाहाजीला खानबाबाच्या कपटाचा संशय होताच. त्यामुळें तो खानबाबापासून दूर राहण्यासाठी कारण शोधीत होता. शिवभारतातही वरीलप्रमाणेच मजकूर येतो.

महमदनाम्यातील शाहाजीची विनंती अगदी सरळ व सहजमान्य होण्यासारखी होती. युद्धाला पावसामुळे विराम पावल्यानंतर कोठेंही मुक्काम करून सैन्याला दाणागोटा मिळविणे कठीण असल्यानें नेहमीच सैन्यें आपापल्या प्रदेशांत पावसाळ्यापुरतीं नेण्याचा परिपाठ असे बेंद्रे सांगतात. परंतु नबाब व आदिलशाहा यापूर्वीपासून संशयीत वृत्तीनें शाहाजीच्या हालचालीकडे

पाहात असल्यानें त्यांना शाहाजीला आपल्यापासून दूर ठेवणें परवडणारे नव्हते. शिवाजी-संभाजी जेथे त्यांच्या जहांगिरींत राहून आदिलशाही प्रतिकाराला सहज धुडकावून लावतात तेथे शाहाजी जर आपल्या १५-२० हजार लोकांनिशी तेथे जाऊन बसला तर तो कोणाचीही तमा धरणार नाही, ही खात्री होती. म्हणून यांनी इतर बंदोबस्त न करतांच घाईने निर्णय घेऊन त्याला पकडण्यास इतर सरदारांना तयार केले. कैद करतांच खुदावदखानाला संभाजी विरूद्ध व फत्तेखानाला शिवाजी विरूद्ध रवाना केले; परंतु या हालचाली होईपर्यंत ८ ऑगष्ट उजाडला. पुढे पावसाळा आला. ऑक्टोबरनंतर चाल करून गेले. या काळात खानखानने जिंजीचा किल्ला जिंकला; परंतु शिवाजी-संभाजीपुढे आदिलशाही सैन्याला पळ काढावा लागला.

(ब) शिवाजीचे प्रयत्न :

१४ मार्च १६४९ च्या पहिल्या फर्मानांत शिवाजीच्या लेखी अर्जाला उत्तर आहे शाहजाहादा मुरादबक्ष १० रबिलावल १०५९ हि. (१४ मार्च १६४९) ला लिहितो : "...शिवाजी भोसले यांणी बादशाही कृपेचे इच्छित होऊन जाणावे की, तुम्ही खातरजमेचे पत्र आल्यानंतर हुजुर येतो म्हणोन स्नेहयुक्त अर्जी पाठविली ती पाहिली. ऐशियास तुमचा इतबारी वकील अगोद पाठविणें, म्हणजे मजकूर समजून खातरजमेचे पत्र पंज्यासहित पाठविण्यात येईल." यानंतर साहजिकच शिवाजीनें कोणास तरी पाठवून बोलणीं केली असली पाहिजेत. त्यानंतर मुरादबक्षाचें १४ ऑगस्ट १६४९ चे खातरजमेचे फर्मान आहे. या पत्रांतील मागणीवरून शिवाजी हा शाहाजी-संभाजी इतर नातेवाईक यांच्या तर्फे बोलणी करीत आहे असे सिद्ध होते. अर्थात अशा बोलण्याला शाहाजीची संमती किंवा आदेश मिळावयाचा तो त्यांचे कैदेपूर्वीच मिळाला असला पाहिजे. यानंतर बादशाहाचे शिवाजीच्या नावे ३० नोहेंबर १६४९ ला फर्मान आले, त्यामध्ये "....शिवाजी भोसले याणी बादशाही कृपेचें इच्छित होऊन जाणावे कीं, तुमचे पत्र राघोपंत याजबरोबर पाठविलें तें पावलें आणि बादशाही कृपेस कारण जहाले. जुन्नर व अहमदनगर येथील देशमुखी विशई लिहिले त्यास आम्ही हुजूर गेल्यानंतर हा मजकूर घडोन येईल. खातरजाम ठेवावी; परंतु आपणाकडील एक वकील पाठवून द्यावा. म्हणजे मजकूर समजून घेऊन अमलांत येईल. वकिलास जो मजकूर विचारू त्याचें उत्तर द्यावें. म्हणजे काम होण्यास दिरंग लागणार नाही. जाणोन उद्योग करावा आणि इकडील लोभ पूर्ण जाणावा." याच प्रकरणांतील ३० डिसें. १६४९ चे फर्मान उपलब्ध आहे. ते तर खास शाहाजीराजे यांच्याच नांवाचे आहे. त्यातील मजकूर

बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "......शाहाजी भोसले याणी बादशाही कृपेचा आपला सत्कार जाणून जमजावें कीं, तुमचे पत्र शिवाजी यांनी अर्जदास्त हुजूर येण्याविशीची पाठविली ती पाऊन कृपेस कारण जाहाले. पेशजीच्या गोष्टी मनांत न आणितां तुमची मोकळीक करण्याविषयी लिहिले. त्यास हल्ली आम्ही दिल्लीकडेस जात आहों; परंतु तुम्हांस खुष खबर देतो की, तुम्ही सर्व प्रकारें खातरजमा ठेवावी जे आम्ही हुजूर पावलियावरी तुमचे मजकुराविषई अर्ज करून देऊं; परंतु तुम्हा आपला एक वकील इतवारी पाठवून द्यावा म्हणजे त्यासमागमें फरमान कौलाची पत्र्याचें निशाहणीचें सुा पाठविण्यांत येईल आणि तुमचे चिरंजीव संभाजी वगैरे कृपेस पात्र होऊन पेशजीप्रमाणे मनसबा व नुतन सरफराज्या पाठवतील. इकडील स्नेह लक्षांत ठेवून वागणें, हे सर्व आपले मनोरथ पूर्ण करून घेण्याचें कारण आहे. जाणोन तसें वागावें. खातरजमा ठेवावी आणि तुम्हांकरिता पोषाख पाठविला आहे हा घेऊन आपल्यावर पूर्ण लोभ आहे असे मनांत आणावें..."[११०]

शाहाजीनें कुत्बशाहाच्या म्हणजे मीर जुमल्याच्या राजकारणांत शिरण्याचा केलेला प्रयत्न व कुत्बशाहाने आदलिशाहाविरूद्ध तिन्ही शाह्यांच्या करान्वयें केलेल्या शाहाजहानाकडे तक्रारीचा परिणाम जसा शाहाजीला नेहमीच्या आदिलशाहीतील रूढ चालीं प्रमाणे वरकर्मी स्नेह दाखवून खून करून न मारितां फक्त कैदच करण्याचा आदेश आदिलशाहास मनाविरूद्ध द्यावा लागला होता. तसाच प्रकार या मोगल-शाहाजी-शिवाजी राजकारणाने घडवून आणला होता. ज्या आदिलशाहाने शाहाजीस कैद करविलें व त्याच्या पुत्राच्याही पारिपत्यार्थ आपले सरदार पाठविले त्याच आदिलशाहाला शाहाजीला इ.स. १६४९ च्या सुरुवातीलस केवळ साध्या नजरकैदेंत ठेवण्याचा बुद्धिपालट आणि तोही ज्या सरदारांनी त्याला कैद करण्यांत साह्य केले होते त्या सर्व लोकांच्या दृष्टीने अपमानित व कायमच्या संकटात टाकून घेण्यांत कोणती शक्ती घडवून जाणिव होती याचा उलगडा होतो, असे बेंद्रे सांगतात.

राजगड पुरंदारदी भाग शिवाजीस ठेवून नुसता कोंडाणा घेण्यांत कोणते राजकारण साधले. पुरंदर हा पुणे-सुपे शिरवळ या प्रदेशाच्या संरक्षणाच्या व मोगली सरहद्दीच्या दृष्टीनें महत्त्वाचा; परंतु त्याची मागणी करणें शिवाजीस मुरादबक्षाचा आसरा मिळत आहे हे जाणतांच, त्याच्यावरील पाठविलेल्या सैन्याला परत बोलाविण्याची बुद्धिही इ.स. १६४९ च्या सुरुवातीस सुचली. शाहाजीने बंगळू व कोंडाणा देण्याची कबुली देतांच शाहाजीला अहमदखानाच्या केवळ

जामिनकीवर १६ मे १६४९ ला मुक्त केले व त्याची सर्व मालमत्ता व सरंजामी त्याच्या हवाली केली आणि तीही सर्व संबंधित विरोधक सरदारांच्या विरोधाकडे पूर्ण दुर्लक्ष करून. याचाच अर्थ असा की, शिवाजीला खातरजमेचे १४ ऑगस्टचें पत्र येण्यापूर्वीच मुरादबक्षाने आदिलशाहाला त्यापूर्वी आदिलशाही वकिलामार्फत समज दिली असली पाहिजे असे ठाम मत वा. सी. बेंद्रे प्रदर्शित करतांना दिसतात.

मुरादबक्षानें प्रत्यक्ष शाहाजीला त्याच्या पूर्ण सुटकेनंतर जरी फर्मान व पोषाख पाठविला असला तरी त्यांत आपण त्यांच्या सुटकेचे प्रयत्न केले असे दर्शवून शाहाजीस व त्याच्या पुत्रादी नातेवाईकांस मोगली लोकांनिशी मोगलाकडे गेली की आदिलशाहीचे तीन तेरा वाजण्यास किंचितही अवधी लागणार नव्हता. ही आपत्ती टाळण्याकरितां आदिलशाहानें त्याचेकडे त्याची सेना वगैरे देऊन व अधिक सवलत दिली व शाहाजीला आपल्या विश्वासांत आणण्याचे प्रयत्न केले. ही स्वतंत्रता शाहाजीस मुरादने ३० डिसेंबर १६४९ चे फर्मान येण्यापूर्वीच मिळाली.

सारांश, शाहाजीची व त्याच्या सरदारांची केवळ कैदेतून सुटका केली नव्हती तर त्यांना जास्तीचे सरंजाम देऊन यापूर्वीच जेधे करिना व शकावलीप्रमाणें मावळांत ससैन्य रवाना केले होतें यात शंका नाही, असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

शाहाजी महाराजांची सुटका म्हणजे आदिलशाहाच्या कृपेचें किंवा दयेचें प्रतीक नसून ही सुटका मोगली व इतर दडपणामुळे झाली होती, असे बेंद्रे सांगतात व याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे ते देतात - जेव्हा दक्षिणेतील दोन्ही शाह्या काबीज करण्याच्या विचारात मोगल होता त्या काळी आणि मोगलाचे आश्वासनावर हिंदूराजेही एक होऊन आदिलशाहीबरोबर शत्रुत्व स्वीकारीत होते. अशावेळी शिवाजी, संभाजी व इतर शाहाजीचे गणगोत मोगली चाकरींत जाऊ देणें महंमद आदिलशाहाला मोठे धोक्याचे वाटणे साहजिकच होते. उलट या महान संकटाचे निवारण करणें यावेळी एकट्या शाहाजीच्याच हाती होते. शिवाजी-संभाजीची प्रत्यक्ष लढा देऊन पराजय स्वीकारावा लागला होता आणि शिवाजी मोगल-आदिलशाही सरहद्दीवरच असल्यानें ती सरहद्द अत्यंत धोक्याची झाली होती.

शाहाजीने ही सर्व परिस्थिती जाणून आपली सुटका करतांना काही अटीस मान्यता दिली होती. शाहाजीला मोगलाच्या पाठिंब्याखालीं जरी आदिलशाहाला वागवावयाचे होतें तरी त्याला मोगलाची प्रत्यक्ष सत्ता दक्षिणेत नको होती. मोगलाकडीलच मुलुख या ना त्या रीतीने

आपल्याकडे आणण्याचा त्याचा प्रयत्न चालूच होता. त्याच्या नंतरच्या व्यवस्थेवरून हें त्याचें धोरण स्पष्ट होत आहे. शाहाजीनें आपल्या पुणा-सुपा जहांगिरीचा भाग आपल्या ताब्यात घेतला. शिवाजीने घेतलेला भाग त्याच्या ताब्यात ठेवू दिला. त्यामुळें साहजिकच शिवाजीला मोगलाकडील देशमुखी-सरदेशमुखीचें कारण करून दिलें. कर्नाटकात आपलें व संभाजीचें स्थान व स्वतंत्रता अधिक वाढवून घेतली. फक्त सिंहगड दिला. तो ही केवळ आदिलशाहाचा बोज राहावा म्हणूनच.

सारांश, संकटकाळी साह्याच्या अटीवर स्वतंत्र हिंदवी जहागिरी अगर हिंदवी स्वराज्य स्थापण्याचाच बेत असल्याचें जेधे करिना व जेधे शकावलीतील मजकुरावरून सिद्ध होते[१११] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

३.८.२० शाहाजी राजांच्या इ.स. १६३७ ते १६५६ काळामधील सैन्याच्या हालचाली

इ.स. १६३७ तें १६५६ मध्ये शाहाजी राजांच्या सैन्याच्या हालचाली कशा होत्या हे वा. सी. बेंद्रे तत्कालीन विविध साधनांचा आधार घेऊन सांगतात व शेवटी या काळातील शाहाजीच्या हालचालीसंदर्भात काही निष्कर्ष काढतात.

शाहाजी रणदुल्लाखानाबरोबर आदिलशाहींत आल्यावर त्यांनी सर्वप्रथम आपली भाऊवाटणी मिळविण्याचा प्रयत्न केला. आदिलशाहाने घोरपडे अनुभवित असलेल्या वतन-इनामांची १५ नोव्हें. १६३७ ला वाटणी केली असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, यावरून सिसोदे किंवा भोसले घराण्यांत व सिसोदे किंवा घोरपडे घराण्यांत संबंध बिघडले ही भांडणे वाढलीं व त्यांत प्रतापराव घोरपडे त्यांच्याच भाऊबंदाकडून मारले गेले. आदिलशाहाने मध्यस्थी करून वाटणी करून दिली.[११२] ही व्यवस्था ९ सप्टें. १६४७ च्या फर्मानाने केली. दरम्यान शाहाजीला रणदुल्लाखानाचा मुलगा व अफझलखान यांच्या चढाओढीत इ.स. १६४३ मध्ये मावळभागाचा सरंजाम गमवावा लागला होता. त्याबद्दल शाहाजीला बंगलोरचा सुभा व इतर गावें दिली होती. इ.स. १६४३ मध्ये आदिलशाहाचा राग कमी झाल्यानंतर शाहाजीने इ.स. १६४४-४५ मध्ये काही मुद्दे आदिलशाहाला कळविले होते. ते असे, "....अनागोंदी पेश केली, पाचा महिना जाला.... अनेगोंदीयाच्या मुबादलिया सरंजाम केला पाहिजे.... पाा मुसलकल आपली जागीर पेशजी भिस्त रोजी रुस्तुमजमा (रणदुल्लाखान) बराबरी माहोलीहून हुजूर आलो ते बख्ती चौ लाखाची जागीर दिधली.... मुसलकलचा मुबादला पंधरा खेडी कर्याती कारवे आपली जागीर त्रिंबकजीस

द्यावयाची काय निसबत धरिते. हजरत साहेबाचा तरी कौल करारदाद आपल्यास आहे कीं, तुमचे जागीरपैकीं एक चावर कसीदगी करणें नाही.... पादशाहा खलेल करवितातीं. तरी आपण रजपूत लोक अजी तलग पेशजीही दोघा चौ पादशाहीत खिदमत केली. असा गैरहिसाबी जाजती सोसुनु कमइजतीनें व गैरमेहेबानीने पेशजीही खिदमत केली नाहीं व पुढेही न करू..... पाा कनकगीर व अनागोंदीही दरगाह बंदगीस पेश केली. येक कपली खेडे दिढा दो हजाराचे तेथे आपण राहिलो होतो. तेव्हडे आपल्यास असो दिधले पाहिजे. तेथे बाग आपण केले. हवासीर जागा आहे... यावरी आपल्यास रहावयास जागाहि नव्हती."[११३]

वा. सी. बेंद्रे :- शाहाजीला बंगलोरचा सुभा आधींच मिळाला होता. या पत्रांच्या पूर्वीच इ.स. १६४३ मध्ये बाजी व खंडोजी घोरपडे यांनी मावळचा सुभा दादाजीकडून जबरदस्तीने घेतला होता. या नाराजीनंतर शाहाजीला पहिल्यापेक्षा अधिक व चांगला सरंजाम मिळाला. घोरपडेंच्या पेक्षाही बराच अधिक होता.

(अ) वीरभद्र नायकाचा बंदोबस्त :

महंमदनाम्याचा संदर्भ देऊन वा. सी. बेंद्रे सांगतात की, बसवपट्टणचा नायक केंगनायक व इक्केरीचा वीरभद्र नायक यांच्यात भांडण झाले. केंगनायकाने आदिलशाहीची मदत मागितली. रणदुल्ला व शाहाजीला केंगनायकानें गुप्त वाटेने इक्केरीस नेलें. यांनी ३० डिसेंबर १६३७ ला वीरभद्रवर अचानक हल्ला केल्याने वीरभद्र कस्नुलदुर्गात (भुवनगिरीत) गेला. तेव्हां त्यांनी इक्केरीगड घेतला. मदतीबद्दल केंगनायकाला एक लाख होन दिले. हे आदिलशाही सैन्य नंतर कस्नुलदुर्गाला गेलें. वीरभद्राने अठरा लाख होन देऊन शरणागती दिली. आदिलशाही सैन्य इ.स. १६३७ च्या अखेर ही स्वारी करून इ.स. १६३८ च्या पावसाळ्यापूर्वी माघारी विजापूरी आले.[११४]

(ब) सेरागड व बेंगलोरवर ताबा :

इ.स. १६३८ च्या पावसाळ्यानंतर रणदुल्लाखान तुंगभद्रा उतरून ताडपत्रीगडावर हल्ला चढविण्याच्या उद्देश्याने निघाला. केंगनायकानें मदत करण्याचे कबूल केले होते; परंतु इतर मनेवारांनी आग्रह धरल्यानें केंगनायकानें दाट जंगल व डोंगराळ मार्गाचे कारण पुढे करून रणदुल्लाखानाला बंगलोरवर जाण्यास सुचविले व सेरागड घेऊन त्यास दिल्यास त्यानें साह्यार्थ बरोबर जाण्याचे कबूल केले. अफझलखानाला पुढे सेरागड घेण्यास पाठविले; परंतु कस्तुरीरंगास बोलणी करण्यास बोलाविण्यावरून तो येताच अफझलखानाने त्याचा खून केला. कस्तुरीरंगाचा

खून झालेला पाहून गडावरील लोकांनी गड लढविण्यास सुरुवात केली. रणदुल्लाखानादि सर्व सैन्य आले तेव्हा गड खाली करून दिला. ठरल्याप्रमाणे सेरागड केंगनायकाच्या हवाली केला. तेथून आदिलशाही सैन्य बेंगलोरला आले. लढाईनंतर शहर हाती आलें. केंगनायकाला कंपगौडानें आपल्या बाजूस वळविले. केंगनायकाचें बरेच सैन्य मेलें व जखमी झालें तेव्हा त्यांने जाऊन केंपगौंडाशी बोलणी करितों सांगून लढाई थांबविली. नंतर केंपगौंडाने आतील सर्व मालमत्तेसह गड रणदुल्लाच्या हवाली केला. रणदुल्लानें शाहाजीला तो गड वगैरे सांभाळण्यासाठी ठेवून तो पुढे गेला. नंतर रणदुल्लाखानानें श्रीरंगपट्टणच्या गडाला वेढा दिला. एक महिन्यानंतर कांतिरायानें ५ लाख खंडणी देऊन गडाचा वेढा काढविला. रणदुल्लाखान ससैन्य इ.स. १६२९ च्या पावसाळ्याच्या निवाऱ्यार्थ विजापूरी परत गेला. बेंद्रे म्हणतात की, 'कंठीरवनगरसराजविजयम्' प्रमाणें या स्वारींत शाहाजीचा जावई मारला गेल्याचें लिहिले आहे. तर 'कंकदीनृपविजयम्' नुसार वीरभद्रनायकाने इक्केरीहून आपली राजधानी नोव्हें.-डिसें. १६३९ मध्ये बिदरूर (बेदनूर) नेली.[११५]

(ग) केंगनायकाचे बंड :

केंगनायकाने बंड पुकारल्याची वार्ता येतांच आदिलशाहनें त्याच्या पारिपत्यार्थ फौज रवाना केली. रणदुल्लाने प्रथम इक्केरीच्या वीरभद्राशी बोलणें करून त्याचा प्रांत पूर्वी जों केंगनायकाला दिला होता तो परत करण्याच्या अटीवर वीरभद्राला सोबत मिळविलें व १६४० च्या पावसाळ्यानंतर बसवाट्टणगडाजवळ अर्ध्या लीगवर जाऊन तळ दिला. अफझलखान, शाहाजी ....मुख्य दरवाज्यावर ठेवले.... हल्ले करून कसबा घेतला. केंगनायकानें ४० लाख होन खंडणी देण्याचे कबूल करून माफी मिळविण्यासाठीं तो गडाखाली आला. त्यास कैद केलें. नंतर मालनाड व कर्नाटकाच्या नायक राजांनी मांडलिकत्व स्वीकारले. पुढे चिकनायकहकलीच्या राजाविरूद्ध आदिलशाही फौज चालून गेली. २० हजार होन खंडणी देऊन राजाने मांडलिकत्व स्वीकारलें.[११६]

(घ) वेलूरास व बाळापुरास वेढा :

यानंतर वेलूरला वेढा दिला.[११७] व्यंकटपतीने गड लढविला. शहाराचा विध्वंस केला. चार महिन्यांच्या वेढ्यानंतर व्यंकटपतीनें साक्रीपटण देऊन तह केला. नंतर टुमकूरवर सैन्य नेलें. लढाई होण्यापूर्वीच तेथील राजानें दौलत रणदुल्लाच्या स्वाधीन केली. या वेलूरच्या स्वारीबद्दल

डाग रजिस्टरमधीला नोंदी[११८] संदर्भात देतात. ह्या नोंदी ३१ मार्च १६४१ व २०/२३ मे १६४१ च्या आहेत.

यानंतर बेंद्रे याच संबंधात २७ डिसें. १६४१ च्या फर्मानाचा उल्लेख करतात. या फर्मानात, "कनकगिरीचा देसाई ऊडचप्पा नायक याज तर्फेचा नौसंचणीचे बाबतींतील परगणे मजकूर (गंगावटी) गुत्तल समतेचा देसाई हनुमंतगौडा याकडे सर्व बाबींसह मुकासा म्हणून दिला आहे. तरी वरील परगणा हनुमंतगौडाच्या ताब्यात द्यावा." "इ.स. १६४१ च्या पावसाळ्यानंतर रणदुल्लाखानानें वेलूरच्या रायलशीं संघनमत करून कर्नाटकांतील स्वारी चालविण्याचा बेत केला; परंतु ऐनवेळी रायलनें माघार घेतली. तेव्हा रणदुल्लानें एकट्यानेच मोहीम करण्याचें ठरविले. श्रीरंगरायाशी सख्य करून त्याचेवर छत्र धरिलें. वेलूरचा रायल ५० लाख होन देऊन पुन्हां सख्य करुं पहात होता. त्याच्या मागणीकडे रणदुल्लानें दुर्लक्ष केलें व पुढे चालून गेला. बाळापुरास वेढा दिला. एक महिन्याने तो गड हाती आला. नंतर कोयलीहाल चौदा दिवस लढवून गड घेतला. गडावरील सर्व मालमत्ता घेऊन गड श्रीरंगरायला दिला. पुष्कळ सोनेनाणें वगैरे विजापूरास पाठविले."[११९] आणि नंतर विजापूरी सैन्यही परत विजापूरास गेले.

(न) तेरिकेरिचा गड :

इ.स. १६४२ च्या पावसाळ्यानंतर आदिलशाहानें आपली फौज (तेरिकेरीचा) टिक्रीचा गड घेण्यासाठी रवाना केली रणदुल्लाखाननें केंगनायकाला जंगलाडोंगरातून मार्ग दर्शविण्यासाठी बरोबर घेतले. त्याच्या मार्गदर्शनामुळे रणदुल्ला अचानक गुप्तपणें जाऊन हमला करून तेरिकेरी गड घेऊं शकला; परंतु गडावर ठेवलेला मुसलमान (बेंद्रे - खूनजान) कांहीसा दुर्बल असल्यानें शिवप्पा नायकानें तेरकेरी गड त्यापासून इ.स. १६४३ च्या पावसाळ्यापूर्वीच हिरावून घेतला व त्याची मजबुती करून ठेवली. येथून रणदुल्ला इ.स. १६४३ च्या सुरुवातीला परतला व मे ते जुलै १६४३ च्या काळात रहिमतपूर येथे मृत्यू पावला.[१२०]

यानंतर शहाजीराजे व आदिलशाहा यांचे संबंध बिघडले. त्याची माहिती मागे आलेलीच असल्याने येथे पुन्हा त्याची पुनरावृत्ती टाळतो व शाहाजी व आदिलशाही संबंध २० ऑगष्ट १६४३ व २८ मार्च १६४४ च्या आदिलशाहाच्या फर्मानाने सुधारले व शाहाजी पुन्हा आदिलशाहाच्या सेवेत रुजू झाला व शिवाप्पा नायकाचे बंड मोडण्यासाठी आदिलशाहासोबत गेला.

(च) शिवाप्पा नायकाचे बंड कर्नाटकवर स्वारी :

शिवाप्पा नायकाने बंड केल्याने त्याच्या पारिपत्यार्थ खास महंमद आदिलशाहा निघाला व बंकापूरला ३ जाने. १६४४ रोजी येऊन बसला. शिवाप्पा गिरीजंगलांत पळाला. खानखानन तेरिकेरीपासून चार मैलावरील कसबा तगरला येऊन गडाभोवतीं खंदक भरून काढून लाकडी फळ्यांचा ढालीसारखा उपयोग करून गडावर हल्ला चढविला व गड मिळविला आणि खानबाबाच्या हातीं गडाच्या किल्ल्या देऊन खानखानन १० मार्च १६४४ रोजी बादशाहाचा तख्तनसीन दिन बंक्रापुरांत साजरा करून १३ मार्चला महंमदपुराकडे निघाला. तो व आदिलशाहा २५ मार्च १६४४ ला विजापूरास गेले. अर्थात या लढ्यात शाहाजीला भाग घेता आला नाही.

इ.स. १६४४ च्या पावसाळ्यानंतर पुनःस्वारीस सुरुवात झाली. इ.स. १६४५ अखेरपर्यंत खानखाननच्या नेतृत्वाखाली आदिलशाही सैन्याने नंदीहाल, शिवाल, कोपगोंडा, ओभाली, पोरलोर, परकनपुलस्त, कनकगिरी, कर्देलमस्त, छबकलमरबस्त असे दहा गड घेतले व सभोवतालील प्रदेश लुटला. इ.स. १६४५ मध्ये गोवळकोंडा व श्रीरंग यांच्यात लढाई चालू असल्यानें मदुरेच्या तिरुमल नायकाने विजापूरच्या सैन्यास बोलाविले.

इ.स. १६४६ च्या पावसाळ्यांतच मुस्तफाखानानें मालनाड व कर्नाटकच्या स्वारीवर कूच केलें. ५ जूनला विजापूराहून निघून कृष्णाकाठी काही दिवस मुक्काम केला. तेथून तो बकरकोंडावरून गदगलक्ष्मेश्वरला आला. गदगलक्ष्मेश्वरहून ३ ऑक्टो. १६४६ ला तळ हलविला. ४ ऑक्टोबरला मुस्तफा व शाहाजी यांची वाटेत भेट झाली. मालनाडचा नायक शिवाप्पा नबाबास भेटून आपले एक हजार स्वार व दोन हजार पायदळ कर्नाटकवरील स्वारीसाठी नंतर आदिलशाही सैन्यानें कावेरीपट्टणच्या जगदेवाचे वीरभद्रदुर्ग, देवदुर्ग, अमरावती, गुरियापटण, वारणचूर वगैरे ठाणी घेतली.[१२१]

नबाब वेलूरपासून चार मैलावर आला. दमलवार पुढे चालून आला. त्याला शाहाजी व इतर हिंदू वजिरांनी तोंड दिले. दमलवार जखमी होऊन पळून गेला. त्याचे ५८०० लोक मारले गेले. नंतर वेलूरगडावर हल्ला चडविला. रायलनें क्षमा मागून ५० लाख होन व १५० हत्ती दिले. नबाब तेथे एक महिना राहिला. एप्रिल १६४७ त नबाब आपल्या लोकांसह वारंणचूर, गुरियापाटणवरून येऊन राणपूरगड घेतला. नंतर तारणपूर, हसनरायदुर्ग, रायदुर्ग व वीरदुर्गाचा बंदोबस्त करून कनकगिरी व रतनगिरी घेवविले. शिवा मालगिरी, अर्जुनकोट, धलेणकोट घेतले.

येथे नबाबास आदिलशाहानें परत बोलविल्याचें फर्मान आले. तेव्हां असदखान व शाहाजीराजे यांच्या मदतीस इतर वजीर वगैरे ठेवून तो प्रदेश त्यांच्या ताब्यात दिला आणि नबाब विजापूरकडे गेला.[१२२]

या लढाईत मिळविलेल्या लुटीबाबात महंमद आदिलशाहाचे २३ मार्च १६४७ चे फर्मान वर आलेच आहे. त्याप्रमाणे शाहाजी व संभाजी यांनी ही सर्व लूट आदिलशाहाकडे पोहोंचविण्याची सर्व व्यवस्था केली. यानंतर २० एप्रिल १६४७ चे वेचप्पा रघुनाथ यास जे फर्मान आहे, त्यांत आदिलशाहतर्फे बोलणी करून करामदार ठरविण्याचा अधिकार शाहाजीकडे दिला आहे.[१२३]

शाहाजी व आदिलशाही सरदाराचे निदान पावसाळा लागेपर्यंत तरी संबंध बिघडले नव्हते. परंतु नंतर हे संबंध बिघडले. २५ जुलै १६४८ ला शाहाजी राजांना अटक करण्यात आली त्याची माहिती पुढे येईलच. त्यामुळे आलिशाही लढ्यात जुलै १६४८ ते १६४९ च्या पावसाळ्यपर्यंत शाहाजीचा सहभाग नाही.

मदतीस देऊन आपण एक हजार स्वार व तीन हजार पायदळासह श्रीरंगपट्टणच्या सरहद्दीवर तळ देऊन बसला. नंतर हरपनहल्ली, साक्रीपटण येथे इतर नायक मनेवार नबाबास येऊन मिळाले. वाटेंत मदुरा, जिंजी व तंजावरच्या नायकानें खंडणी दिली. हे अफाट सैन्य जवळ आलें आहे व आपले मांडलिक फुटलेत हे पाहून रायलनें वेंकप्पा सोमजी यास वकील म्हणून खानकडे पाठविलें आणि रायल यास जिंजी, तंजावर व मदुरेच्या नायकांवर चालून गेला. जिंजीच्या नायकास नमविलें.[१२४] दुसरे जोर धरून होते. नबाबाने हे पाहताच वकिलाकडे दुर्लक्ष करून रायलची राजधानी जी वेलूर त्या शहराजवळ गेला. रायलच्या वकिलास सांगून पाठविले की, इतर मनोवरांवरील लढाई थांबवून रायल जर ताबडतोब वेलूरला आला तरच बोलणी होऊ शकतील. त्याप्रमाणें रायल वेलूरला आला. वकेकप्पा मुल्ला अहमदास रायलजवळ बोलणी करण्यास नेऊं पाहात होता. नबाबाला तसे करणे फलप्रद होईल असे वाटत नव्हतें. "परंतु वकिलाने आणाशपथा घेऊन शाहाजीच्या तर्फे नबाबावर वजन आणले." व नंतर रायलच्या वकिलास मुल्लामहंमदासह जाऊं दिले.

रायलने आपली तयारी झाल्यावर मुल्ला महंमदला परत लावून दिले. तेव्हां नबाब ससैन्य जगदेवाच्या समृद्ध प्रदेशांतून कव्वी म्हणजे खिंडीशी आला. नबाब मास्तीला गेला व २९

डिसें. १६४६ ला आदिलशाही सरदारांनी लढून खिंड घेतली. रायल गुरियापाटणवरून जगदेवाच्या प्रांतात शिरून कृष्णदुर्गाजवळ आला. नंतर तयारी करून 'आपल्या बारा हजार स्वार व एक लाख पावलोकांसह आदिलशाही आघाडीपासून वीस मैलांवर गेला. शाहाजीराजा व आसदखान यांना ही बातमी लागताच त्यांनी नबाबाकडे उपराळा मागितला; परंतु सरखेल व खासा नबाब अर्ध्या वाटेवर येऊन पोहेंचण्यावूर्वीच जगदेव आणि शाहाजी यांची जोराची लढाई सुरू झाली. शाहाजीने जगदेवास पराभूत केले. जगदेव गडाच्या आसऱ्यास पळाला. इतक्यांत नबाबही येऊन दाखल झाला. अंकुशगिरीवरून जाऊन ३० जाने. १६४७ ला कृष्णगडाखालील शहर घेतले. दुसऱ्याच दिवशी जगदेवाने शरणागती स्वीकारून कृष्णगड नबाबाच्या हवाली केले.

(छ) शाहाजीच्या सुटकेनंतरच्या हालचाली :

यानंतर शाहाजीची सुटका होऊन शाहाजी पुन्हा आदिलशाही सेवेत रुजू झाला पण महंमद आदिलशाहाच्या दीर्घ आजारामुळें व इ.स. १६५६ पर्यंत फारसे आक्रमण झाले नाहीत. शिवाय आदिलशाहा व कुत्बशाहाचा मुख्य वजीर मीर जुमला यांच्यात चढाओढ लागल्यानें यांच्या लढ्यात प्रदेशाची जरी बरीच नुकसानी होत होती तरी हिंदू राज्यांना जरा विश्रांतीचा काळ लाभला व शिवाजीने मात्र याचा फायदा करून घेतला.

३.८.२१ इ.स. १६३७ ते १६५६ मधील प्रसंगासंदर्भात वा. सी. बेंद्रेंनी काढलेला निष्कर्ष

(१) शाहाजीने निजामशाही बाहुलें उभे करून स्वतंत्र राजसत्ता उभारण्याचा केलेला प्रयत्न शहाजहान व आदिलशाहा यांच्या युतीमुळे उधळला गेला. त्यात शहाजहानाला विजापूरकरांना निजामशाहीचा अर्धा मुलूख द्यावा लागला. शाहाजीनें करार करून मोगली चाकरीत जाऊन आपल्या मुलुखातच राहून सत्तेचे क्षेत्र वाढविण्याची योजना आखली.[१२५]

(२) आदिलशाहाला मोगली आक्रमणाची भीती होती. एकदा फायदेशीर तह घडून आला असला तरी मोगल तो मोडणार नाही असा विश्वास आदिलशाहाला नव्हता. त्यामुळे आदिलशाहाने मोगलांशी वरवर का होईना सख्य दाखविणें आवश्यक होते. कारण दोन्ही पादशाहांच्या सरहद्दी आता एकमेकांना भिडल्या होत्या. शाहाजहानच्या शाहाजीबद्दलच्या दुराग्रहामुळें शाहाजीला आदिलशाहींत सामावून घेण्याचे काम आदिलशाहाला सोपे झाले होते. शाहाजीबरोबर १०-१२ हजार प्रबळ सेना मोगलाकडील कमी होऊन

आपल्याकडील मनुष्यबळांत भर टाकते यात त्याला समाधान वाटले होते. त्याने शाहाजीच्या अटी तत्काळ मान्य केल्या त्यांतील मुख्य अटी म्हणजे शाहजीला 'फर्जंदा' प्रमाणे दरबारात वागणूक मिळावी, १० हजारी सेना त्याच्या हाताखाली असावी आणि ही सेना महाराष्ट्रीय म्हणजे मावळ, जुन्नर, पुणे, सुपे या भागातील असावी आणि मूळ पुणें-सुपे जहागीर पूर्वीप्रमाणे कायम राहावी आणि सेनेबरोबर सेनेसाठी सरंजामही साहजिकच सेनेच्या देशातून असावा. वजिरात ही मागली प्रमाणेंच मिळाली. आदिलशाहाने मात्र त्यास स्वतंत्र पण प्रत्यक्ष कारभार न देतां रणदुल्लाखानाचे मदतीस ठेवले. शाहाजीस नंतर त्याच्या भाऊ-वाटणी मिळाल्यानें वाई वगैरे बाजूची गावें व अधिक लष्कर सरंजाम मिळाला.[१२६]

(३) रणदुल्लाखानने शाहाजीशी बोलणी करून माहोलीगड मोगलांच्या ताब्यात दिला आणि शहाजहानास विनंती केली की, बादशाहांचा मुक्काम जोपर्यंत दक्षिणेत आहे तोपर्यंत प्रांताची लावणीसंचणी होत नाही. तेव्हां कराराप्रमाणें राहिलेले गडकोट सोडवून घेण्याची सर्व जबाबदारी त्यावर सोपवून बादशाहानें राजधानीकडे जावें. शाहाजहानला तेच पाहिजे होते. त्याने तात्काळ त्यास मान्यता देऊन आपला मुक्काम हलविला असे बेंद्रे सांगतात आणि शाहाजीनें आपली मुलें, माणसें इ.स. १६३७ मध्ये शिवनेरीवरून काढून आदिलशाही हद्दीतील व रणदुल्लाच्या सुभ्यांतील शिवापूर कसब्यात नेली. शाहाजीनें आपली चार लाख होनांची जहांगीर व सरंजाम हा रणदुल्लाच्या सुभ्यांतून म्हणजे मावळभागांतून मिळावयाचा असल्यामुळें त्याच्या व्यवस्थेसाठी इ.स. १६३७ च्या अखेरीस दादाजी कोंडदेव यास आपला हेजीब किंवा मुतालिक नेमला. रणदुल्लानेही दादाजी कोंडदेव यास कोंडणासुभ्याचा आपल्यातर्फे सुभेदार केलें. जिजाबाई व शिवाजी वगैरे शिवापूर कसब्यांत राहिली, शाहाजी रणदुल्लाबरोबर कर्नाटकच्या स्वारीवर गेला. दरम्यान भाऊ-वाटणी मिळताच शाहाजीनें आपले वसतिस्थान इ.स. १६३८ अखेर कंपिली केलें व तेथें मंडळी नेली. तेथे बाग वगैरे करून तें फारच रमणीय स्थान केले.[१२७]

(४) शाहाजीबरोबर संभाजी कर्नाटकांत आला होता. शाहाजीला इ.स. १६३८ च्या उत्तरार्धात बंगलूर शहर, किल्ला व आसपासचा प्रदेश ताब्यात मिळाला; परंतु कंपिली परत

घोरपडेकडे देण्याचा विचार निघाला. त्यापूर्वीच शाहाजीनें दादाजी कोंडदेवाकडून पुणे येथे शांति करून लाल महाल वगैरे बांधून घेऊन संभाजी व शिवाजी यांच्या राहाण्याची सोय केली होती. कंपिली सोडावी लागणार असे आदिलशाहाच्या फर्मानावरून दिसतांच शाहाजीनें जिजाबाई व शिवाजीची पुणें प्रांताच्या जहागिरीवर कारभारी वगैरे देऊन रवानगी केली. शाहाजी-संभाजी स्वारीवर राहिले. शाहाजीनें इ.स. १६४४ मध्ये सर्व स्थळी यांसह आदिलशाही सोडून इतरत्र म्हणजे मोगली चाकरीत जाण्याची धमकी देतांच शाहाजीला कंपिली, अनागोंदी वगैरे पांच लाखाच्या जाहागिरीच्या बदल्यात बंगलोर सुभा दिला.[१२८] शाहाजीने नोकर म्हणवून घ्यावयाचें नाही म्हणून प्रथमपासून ठरविले असल्यानें या बंगलोर सुभ्याचा कारभार संभाजीकडे सुपूर्त करविला. इ.स. १६४९ मधील २-३ महिने सोडले तर संभाजीचे मुख्य ठाणें बंगलोरच राहिले.[१२९] शाहाजी वारल्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे १६७४ च्या लढ्यांत एकोजीने तंजावर घेतले व तंजावर ही आपली राहण्याची जागा केली. तोपर्यंत तंजावर तेथील नायकाच्याच ताब्यात होते. शिवाजीने मात्र १६४४ नंतर पुण्याहून मुक्काम राजगड व पुरंदरास हलविला व पुढें १६६५ इ. नंतर कायमचा रायगडास सुरक्षित स्थळी नेला.

(५) शाहाजीराजांना बारा हजारी मूळ कराराप्रमाणें होती. त्यांत कौटुंबिक वाटणीमुळे पांच हजारीची भर पडली होती. साधारणतः शाहाजीची पंधरा हजारी व संभाजीची किमान दोन हजारी मिळवून १७-१८ हजाराचें मनुष्यबळ व त्याशिवाय कमीतकमी पांच लाखाचा तरी सरंजाम आदिलशाहाकडून मिळत होता असे दिसते. त्यातून बारगिरी सैन्याचा दबदबाट; परंतु शहाजी सर्वच सैन्य बरोबर बाळगीत होता असे नाही. या सैन्यात मावळ-देशभागाचाच भरणा प्रथम अधिक होता. इ.स. १६४९ पर्यंत हिंदुनायक आणि त्याची प्रजा यांचा शाहाजीवर विश्वास बसल्यानंतर या सैन्यात स्थानिक कर्नाटकातील मराठा व इतर लोकांचा भरणा वाढला आणि मावळ भागांतील सरदार व सैनिक यांना शिवाजीच्या 'हिंदवी स्वराज्या'च्या पायाभरणीस मावळांत रवाना केले. सेना परतल्यानंतर शाहाजीला नेहमी आघाडीवर किंवा जिंकलेल्या मुलुखाच्या संरक्षणार्थ रहावें लागे. बहुतेक सर्व स्वाऱ्यात शाहाजीची मदत मिळण्याची सर्व मुसलमानी वजिरांची अपेक्षा असे व त्यावर त्यांची भिस्त असे. आदिलशाहाला शाहाजीचा जितका

आधार वाटे तितकाच त्याच्या मनाविरूद्ध झाल्यास त्याच्यापासून उपाय वाटे. शाहाजीवर आदिलशाहाचा तिनदां रोष झाला व दोनदा त्याला कैदेत राहावे लागले; परंतु आदिलशाहाला पुन्हां-पुन्हां त्याची मनधरणी करणें प्राप्त होत असे, असे बेंद्रे सांगतात.

(६) रणदुल्लाखान व शाहाजी महाराज यांची मैत्री नीट व्यवस्थितपणे चालत होती. दोघांनी दक्षिणेतील सर्व नायक-मनेवारी यांना सहज शरणागतीस आणले होते. त्यामुळे त्यांचा सर्वत्र धाक बाळगला जात होता; परंतु हा बराच डोंगरजंगलाचा प्रांत असल्यामुळें या प्रदेशावर कायमचे राज्य साकारतां येईल किंवा नाही याची शंका राहिल्यानें या नायक-मनेवारीची राज्ये न घेतां त्यांस पुष्कळ खंडणी व लूट घेऊन मांडलिक म्हणून राहूं देण्याचा शाहाजीचा विचार रणदुल्लाखानाने मानल्यामुळे हिंदू राज्यांची वित्तहानीपेक्षा अधिक राज्यहानी झाली नाही. त्यामुळे नायकराजांनाही शाहाजीबद्दल थोडा आदर उत्पन्न झाला; परंतु नंतर या राजांचे पराभव होत आहेत हे पाहून ही राज्येच नष्ट करून टाकायचीं असा आदिलशाहा व कुत्बशाहा, विशेषतः मीर जुमला विचार करू लागले. तेव्हां साहजिकच शाहाजीला ते रुचणारे नव्हते. त्यांनी रणदुल्लाखानाच्या मृत्युनंतर मदतीस जरा ढिलाई करण्यास प्रारंभ केला. कारण रणदुल्लाचा मुलगा तितका कर्तबगार नव्हता व अफझलखान तर कट्टर इस्लामी होता. अफझलखानाने शाहाजी हिंदू नायकांना चोरून मदत करतो असे आदिलशाहला सांगण्यास सुरुवात केली. आदिलशाहने नाराजीबद्दल शाहाजीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या पूर्वीच्या सरंजामीची पुरेपूर भरपाई करून दिली. त्यात दादाजी कोंडदेवाचा हात मात्र तोडला गेला.[१३१] व त्याला एखाद वर्ष घरी बसून काढावे लागले. त्यामुळे १६४३-१६४५ च्या दरम्यानच्या काळांत शाहाजीला फारसा भाग घेता आला नाही. इ.स. १६४६-१६४८ पर्यंत शाहाजीची मदत घेऊन दक्षिणी नायकांकडून कांही गडकोट व खंडण्या घेतल्या. आदिलशाही-कुत्बशाहीच्या भांडणात शाहाजीला मात्र हिंदू राज्ये बुडूं देण्यांत त्याच्या महत्त्वाकांक्षी मनात धोका वाटत होता,[१३२] असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

(७) इ.स. १६४८ च्या सुरूवातीला जिंजी घेण्याच्या विचाराणे मुस्तफाखान निघाला. त्याला मदत म्हणून शाहाजीही आपल्या सैन्यासह वाटेत येऊन मिळाला. जिंजीत वेढा घातला;

परंतु गडावरील लोक वेढ्याला तोंड देत होते. शाहाजी कुत्बशाहकडे चाकरीस जाऊं पाहातो; कुत्बशाहा त्यास घेण्यास तयार नाहीं ही बातमी मुस्तफाखानाला कळली. वेढा रेंगाळला याचे कारण शाहाजी गडाला मदत पाठवितों असा गैरसमज करून घेतला होता. पावसाळा सुरू झाला सैन्य निवाऱ्यास गेले; परंतु तें वेढ्याच्याच जवळ आसपास राहिलें. अशा परिस्थितीत शाहाजीने मुस्तफाखानास कळविले की या दाणागोट्याच्या अभावी सैन्यास तेथे रणांत तग काढणे कठीण असल्याने तो आपल्या सैन्यासह दूर समृद्ध अशा ठिकाणी पावसाळ्याच्या निवाऱ्यार्थ जात आहे. याचा अर्थ मुस्तफाखानाने एवढाच घेतला की, ज्या सैन्यानें आपर्यंत वेढा लढविला त्या नायकांच्या हाती आपले सैन्य संकटग्रस्त स्थितींत जाणूनबजून टाकण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामागे आणिखीही कुटील हेतू असण्याचा संभव आहे असे वाटून शाहाजीला मुस्तफाखानाने नकार दिला. त्याचबरोबर आदिलशाहास लिहून शाहाजीला कैद करून सैन्य अटकावण्याबद्दलही आज्ञा आणविली. शाहाजीने हट्टाने आपला मुक्काम हलविला. तेव्हां मुस्तफाखानानें रात्रीच्या रात्री तयारी करून उजाडण्यापूर्वीच शाहाजीची छावणी वेढून त्यास पकडण्याचा बेत करून दुसऱ्या दिवशी एकदम शाहाजी असावध असतांना छावणीस वेढा दिला व शाहाजी जखमी होऊन बेशुद्ध पडला असतांना बाजी घोरपडेने त्याला कैद केले.

शाहाजीस २५ जुलै १६४८ रोजी कैद केले. मुस्तफाखान ९ नोव्हेंबर रोजी वारला व अफझलखानाने छावणीतून शाहाजीस त्याच्या दौलतीसह आदिलशाहाच्या दरबारात मार्च १६४९ च्या सुमारास किंवा थोडे पूर्वी आणिले. आदिलशाहाने त्याला प्रथम साध्या नजरकैदेत ठेवलें व नंतर १६ मे १६४९ पर्यंत खान अहमदखान याच्याकडे नजरकैदेत राखले. दरम्यान शिवाजी-संभाजी यशस्वी झगडा देऊन आदिलशाही सैन्यास नामोहरम करून आदिलशाही सरदारांना वळवून लावले होते.[१३३] त्यांनी आपल्या पित्याच्या आज्ञेवरून बंगलूर व कोंढाणा हे दोन किल्ले आदिलशाहास परत केले व शाहाजीराजांना पहिल्यापेक्षां अधिक मानमरातबानिशीं व सरंजामानिशीं मोठ्या सन्मानानें दरबारांतून निरोप देऊन स्वारीवर पाठविले. वा. सी. बेंद्रे येथे स्पष्ट करतात की, या कैदेच्या प्रसंगाने एका कोंढाणाखेरीज शाहाजीनें आपल्या जहागिरीचा कोणताच भाग गमावला नाहीं.[१३४] हे राजकारण महाराष्ट्राच्या 'हिंदवी स्वराज्या'च्या उत्स्फूर्त भावनेला फारच महत्त्वाचे ठरते, असाही निष्कर्ष वा. सी. बेंद्रे काढतात.

३.८.२२ इ.स. १६४९ ते १६५६ मधील शाहाजी राजांच्या हालचाली

शाहाजी राजांच्या सुटकेबरोबरच कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण लोहकरे यांचीही सुटका झाली होती. तेव्हां शाहाजी राजांनी या दोघांना बोलावून शिवाजीच्या मदतीसाठी पाठविले याचा उल्लेख जेधे शकावली पुढीलप्रमाणे देते - "शके १५७१ विरोधी संवत्सर जेष्ट शुध पुर्णिमा शाहाजी राजे कोंढाणास घेऊन सोडले ते समई कान्होजी नाई जेधे व दादाजी कृष्ण लोहकरे यांस सोडिले. महाराजांची व त्यांची भेटी जाली ते समई महाराज बोलिले की, तुम्ही आम्हामुले बंदीखानी श्रमी जालेत. याउपरी आम्ही पातशाहासी तह केला की बारा गावांतून मजुरा करून हुकुमाप्रमाणें कर्नाटक प्रांत मसलत करावी. त्यावरून बेंगरुल प्रांत पाचा लक्षा होनांचा जाहागीर दिला आहे. याकरिता आपणास कर्नाटकाची मसलत करावी लागली. तुमचे वतन मावळात आहे. चिरंजीव राजश्री सिऊबा खेडेबारियांत व पुणा आहेत. त्याजवल तुम्ही जमावानसी राहावे. तुमची जबरदस्ती त्या प्रांती आहे. अवघे मावळचे देशमुख देखील त्यासी रुजू होऊन त्याचे आज्ञेंत वर्तेत येसा विचार करून जबरदस्तीनें राहावे. येखादी मोगलाईकडील फौज आली तरी आपण इनाम राखावें. त्यासी लढाई करावी यैसी शफत इनामपुर:सर बेलरोटीवर हात ठेवून घेतली. तैसीच त्याणीहि कान्होती नाईकास शेपत दिल्ही. आणि कान्होजी नाईक यांस व दादाजी कृष्ण यांस वस्त्र देऊन बराबर हुजऱ्या व पत्रें देऊन राजश्री सिवजी राजे याजकडे पाठविले. तेथें इमाने शेवा करावी. काल कलला तरी जिवावरी श्रम करून त्यापुढें खस्त व्हावें. तुम्ही घरोबियांतील मायेचे लोक अहा. तुमचा भरोसा मानून रवाना करितो. इमानें वर्तावे यैसी शफत दिल्ही. महाराजहि बेलिले कींय आमच्या वंशाने चालवावे यैसे बोलोन महाराजांनी भाक दिल्ली, हुजरे व पत्रें देऊन पुण्यास पाठविले. महाराजांनी जबानी हुकूम सांगितला होता त्याप्रमाणें सांगितला. कान्होजी नाइक यांची भेट जाली. पुणे प्रांतीचे दोन्ही गांव दलिब सिंदवणे मुकासा दिल्हे. जमावानिसी पुणियात सेवेसी राहिले. त्यावरी दादाजी पंतास (लोहकरे) जमेतीनसी पुण्यांत ठेऊन आपण कारीस घरास आले. दादाजीपंत स्वारानिशी सेवेसी ठेविले."[१३५]

यावरून कर्नाटक प्रांतातील हिंदूराजांना कायम ठेवून आपली सत्ता वाढविण्याचा तह ठरला. तसेच शिवाजीनें खेडेवारियावर स्वस्थ न राहातां इतर सर्व मावळें हिकमतीनें किंवा हुकमतीनें आपल्या ताब्यात आणावी म्हणून त्यास जरूर तें खासें साह्य पाठवून दिलें. तसेच ही धामधूम करतांना मोगली संकट उद्‌भवण्याचा विशेष संभव असल्याचाही इशारा दिला. अर्थात हे

संकट जरा दूर राखण्यासाठीं शिवाजीनें कसे वागावें याबाबतही सूचना दिल्या गेल्या असणारच, असे वा. सी. बेंद्रे सांगतात. तसेच इ.स. १६४९ ते १६५६ मधील शिवाजी महाराजांनी सर्व पत्रे बघितली तर १६५६ च्या अखेरपर्यंत शिवाजी कसें आक्रमण करीत होता व हें आक्रमण मोठ्या लढाई वगैरे देऊन होत होते असेही नाही. एकामागून एक मावळांतील पुढारी शाहाजीने आदेश दिल्याप्रमाणें शिवाजीला येऊन मिळत होते. याचवेळीं याच भागांतील शाहाजीच्या पत्रांची चिकित्सा केली तर मूळ जहांगीर या हालचालीपासून कशी अलग ठेविली होती हे सहज दिसून येईल, असे बेंद्रे पुढे सांगतात.

३.८.२३ शाहाजी व मावळा विभाग

अफझलखानास वाई व चौल परगणे जुलै १६४९ पूर्वीच अर्जानी आले. ह्याची भरपाई शाहाजीस बंगळूर बाजुकडील प्रदेश दिल्याकारणानें झाली होती. शाहाजीची निभ्रांत सुटका झाल्यानंतर किंवा होतांना शिवाजीलाही कांही मावळातील भाग अजानी झाल्याचे उल्लेख आढळतात.

७ जून १६४९ व २१ जुलै १६४९ च्या पत्रांत शिवाजीराजे "साहेबास हाली परगणे मागें आलेल्या पत्रांप्रमाणे इ.स. १६५६-५७ पर्यंत चालला असल्याचे स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे सुपे परगणा २१ जुलै १६४९ च्या पत्रांत "हाली परगणा सुपें साहेबास अर्जानी जाला आहे." असा उल्लेख आला आहे. त्याच सुमारास सुपेंतील पणदरेच्या पत्रांतही तसाच उल्लेख आहे; परंतु हा सुप्याचा मामला परत शाहाजीकडे इ.स. १६५३ च्या पूर्वी गेला असावा. कारण १८ एप्रिल १६५१ च्या शाहाजीच्या पत्रांत हाली परगणे मजकूर साहेबास अर्जानी झाल्याचें म्हटल्यानें हा शाहाजीची जहागीर म्हणून शिवाजीने सोडला असावा असे बेंद्रे स्पष्ट करतात. व नंतर हा सुभा शाहाजीकडेच १६४५ च्या ७ डिसेंबरपर्यंत तरी होता. या सुभ्याला संभाजी मोहिते सरहवालदार केव्हां केला गेला हे ठरवतां येत नसलें तरी २६ ऑक्टों. १६५२ च्या त्याच्या पत्रांवरून तो तत्पूर्वी सरहवालदार झाला होता हे निश्चित. मात्र तत्पूर्वीच्या त्याच्या एका २६ जुलै १६५१ च्या घरगुती वाटणीपत्रांत त्याचा फक्त संभाजीराजे मोहिते इतकाच उल्लेख आला आहे. यानंतरच्या म्हणजे १४ ऑगष्ट १६५४ च्या पत्रांत तो सरहवालदारीवर असल्याचा उल्लेख आहे; परंतु शकावल्याप्रमाणें हा सुभा, शिवाजीनें २४ सप्टेंबर १६५६ रोजी संभाजी मोहित्यास धरेपर्यंत त्याचेकडेच शाहाजी तर्फे चालू होता असे मानण्यास हरकत नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१३६]

२६ नोव्हें. १६५३ च्या शिवाजीच्या पत्रांत इंदापूरचा 'हाली मुकासा' अर्जानी झाल्याचा उल्लेख आहे व १६५३-५४ च्या व १६५४ च्या पत्रांत इंदापूर शिवाजीकडेच चालू असल्याचे दिसते. पुणे प्रांतातील कर्यात मावळांतील पुणें परगणा जहागीर सिद्दी अंबरच्या ताब्यात असून त्याबाबतची पत्रें खास शाहाजी महाराज किंवा जिजाबाई काढत असत, असे बेंद्रे म्हणतात.

हिरडस मावळबाबत ४ नोव्हें. १६५० मध्ये महंमद आदिलशाहाचे फर्मान आले होते त्यावरून हिरडस मावळ शाहाजीतर्फे शिवाजीकडे आणि जेधे, दादाजी नरस प्रभु व बांदल हे शाहाजीच्या आज्ञेनें शिवाजीचे पुरस्कर्ते होते. अर्थात हे हिरडस मावळचें भांडण खाजगी होतें व त्यांत शिवाजीकडून खंडोजीस आश्रय देण्यापेक्षा काही अधिक वेगळा हेतू नव्हता. मात्र शिवाजी आपल्या आधारानें हिरडस मावळमधील आदिलशाही प्यादी उलथून पाडण्याची कारवाई खंडोजीकडून करून घेत होता. यावेळी ४ नोव्हें. १६५५ च्या पत्रांत केदारजी खोपड्यास दिलेली ताकीद व या पत्राचे उत्तर आणि केदारजीने खानसाहेबास लिहिलेले पत्रे महत्त्वाचे आहे. या पत्रावरून हा हिरडस मावळा भाग 'शिवाजी' आदिलशाही 'वजिराकडे' होता अशी तेथे समजूत होती यात शंका नाही, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[१३७]

गुंजणमावळ (किंवा मुरुमखोरें) प्रथम शिवाजीच्या ताब्यात होते आणि बहुधा सिलींबकर हे शाहाजीचे सरंजामींतले असल्याने शाहाजी महाराज कैद होताच त्यांनी खळदबेलसर-पुरंदरच्या लढाईत शिवाजीस मदत केली असली पाहिजे असे बेंद्रे सांगून पुढे स्पष्ट करतात की, मावळ भागांतील हे सर्व देशमुख शाहाजीच्या सेवेंत होते. त्यामुळे त्यांचा ओढा जरी भोसले घराण्याकडे असला तरी ते आपल्या देशमुख्या वगैरे गमावण्यास तयार नसल्यानें आदिलशाहाचे किंवा इस्लामी सत्तांची सोबत कायमची संपविण्याइतकी त्यांच्या मनाची तयारी झाली नव्हती. मरळ देशमुखानेंही खळदबेलसर पुरंदरच्या धामधुमीत शिवाजीलाच मदत केली होती.

भोर खेड्यातील जेधे-बांदलाचाही संबंध या काळात बराच आलेला आहे. कान्होजीचा मुलगा बाजी याने तर खळदबेलसरच्या लढाईत भाग घेऊन शिवाजी महाराजांकडून सर्जेराई मिळविली होती. कान्होजीची सुटका होतांच तो मावळचे देशमुख मिळवून शिवाजीला जमावानिशी मदत करण्याची शपथ देऊनच आला होता. त्याप्रमाणें त्यानें आपला जमाव शिवाजीजवळ ठेवून आपल्या वतनावर राहिला होता, असे बेंद्रे सांगतात.

यावरून आपल्याला दिसते की, शाहाजी राजांनी शिवाजी महाराजांना 'स्वराज्य' स्थापन्याच्या कार्यात मदत व्हावी म्हणून मावळ प्रांतातील सरदारांची व्यवस्था करून ठेवली होती.

३.८.२४ महंमद आदिलशाहाचा मृत्यू व शाहाजी अडचणीत

इ. स. १६४९ च्या सुटकेनंतर शाहाजीराजे हे महंमद आदिलशाहाच्या विश्वासांतील त्रिकुटापैकी एक होते; परंतु अल्लीच्या तक्तनशीन झाल्याने ते विरोधी त्रिकुटांत गेले. शिवाजीचे स्वतंत्रतेचे बंड पुण्यात चालू होते अशा परिस्थितीत शाहाजीशी मैत्री कायम ठेवण्याचाच प्रयत्न अल्ली आदिलशाहाने केला होता याची प्रचिती आपल्याला त्याच्याच १९ मार्च १६५८ च्या फर्मानांत येते तो या फर्मानात लिहितो की, "महाराज फर्जंद शाहाजी भोसले यांनी जाणावे की, तूं त्या मनुष्याची (नांवाचा उल्लेख नाही) राज्याविषयीची निष्ठा व शुद्ध हेतू सांगितलेस ते पटले. आता तूं त्याचेशी जो करार करशील त्याप्रमाणें व्यवस्था व उत्कर्ष फर्माविला जाईल. त्यानें राज्यनिष्ठेने तूं सांगशील त्याप्रमाणें सेवा बजावावी यांतच त्याचा उत्कर्ष आहे." तसेच शाहाजीकडील कामगाराला हलवून त्याला नाराज केले होतें; परंतु अल्ली आदिलशाहानें आपला हुकूम बदलला. शाहाजीच्या हेजीबालाच त्याच्या हालचालींतील हेतूची माहिती असावयाची. तेव्हा त्याला आपलेकडे नेण्याची कारवाई केली ती सोडून द्यावी लागली असे बेंद्रे म्हणतात. "महाराज फर्जंद शाहाजी भोसले यानें जाणावें की, सरकार चाकरींतील हेजीब नरहर तिमाजी यास हुजूर बोलाविले होतें. आतां त्यास तुजकडे परत पाठविलें आहे. तरी तुझ्या सुभ्यांतील हकीकत व बातमी त्याजकडून लिहवित जावी. सरकार चाकरीतील भानजी व्यंकटाद्रि अमिनरात यास हुजूर पाठवून द्यावें. तंबाकूच्या हांशिलापैकीं भानजीस द्यावा लागणारा अर्धा होन रोजमरा नरहर तिमाजीस देत जावा."[१३८]

शिवाजी औरंगजेबाशी सख्यत्व करून आदिलशाही मुलूख घेत आहे हे आदिलशाहनें पाहून खान महंमदाचा मुलगा इख्लासखान याला पारिपत्यार्थ पाठविले होतें. असल्या शिवाजीविरूद्ध चाललेल्या प्रयत्नामुळें शाहाजीला विशेष काळजी वाटण्यासारखें कांही नव्हते. परंतु जेव्हा अफझलखानाला दहा हजार स्वारानिशी इ. स. १६५८ च्या सुरुवातीस पाठविण्याचे ठरलें आणि विशेषतः अल्ली आदिलशाहाची पत्रें मावळ भागांतील देशमुखादींना जाऊं लागली[१३९] तेव्हां मात्र खास शिवाजीच्याच मावळी सरदारांत फाटाफुट होऊन अंकुरीत होणाऱ्या

'हिंदवी स्वराज्या'ला धक्का बसतो की काय याची काळजी वाटणें साहजिकच होतें. त्यातून अफझलखानाकडे खास वाईचाच सुभा असल्यानें ही फाटाफूट होणे साहजिकच होतें व ती तशी थोडीबहूत झालीही. याचा पुरावा अनेक प्रसिद्ध पत्रांवरून मिळतो. ही हालचाल पाहताच शाहाजीने मोगलांशी पुन्हा संधान बांधण्याचा प्रयत्न करून त्याप्रमाणें औरंगजेबाचें २४ फेब्रु. १६५८ चे फर्मान आणवलें. परंतु यापूर्वीच आदिलशाहाचें फर्मान ३० जाने. १६५८ चें शाहाजीला आले. त्यांतील मजकूराचा सारांश बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "महाराज फर्जंद शाहाजी भोसला यांनी जाणावें की, कर्नाटकांतील परिस्थिती बिघडली असून तेथें सुभेदार ताबडतोब नेमणें आवश्यक आहे असे वेळोवेळी समजाविल्यावरून अफझलखान महंमदशाही याला अखिल कर्नाटकाचा सुभा दिला आहे. तरी त्यानें खानाशी एकजुटीने वागावें. खानालाही दिलजमाईनें वागण्याबद्दल लिहिलें. यांतच तुझे फायद्याचें कलम आहे."

यानंतर १६ मे १६५८ च्या फर्मानांतही शाहाजीला आपला चांगला मित्र सांगितले आहे व याचवेळच्या एका पत्रात अल्ली आदिलशाहाने कांतिनायकाला अफझलखान व शाहाजी महाराज या दोघांच्याही आज्ञा पाळण्यास सांगितले होते.[१४०]

या हालचाली चालू असल्या तरी शिवाजीच्या विरूद्ध अफझलखानाची तयारी चालली असतां शाहाजीच्या मनाची चलबिचल, कर्नाटकाची सत्ता सोंपविली असतांनासुद्धा वाढतच होती आणि शाहाजीकडे असलेले बातमीदार वाके पाठवीत होते. आदिलशाहला शाहाजीच्या मनातील चलबिचलीची बातमी लागतांच अल्ली आदिलशाहानें शाहाजीची समजूत घालून खास आपल्या राज्यांत दक्षिणेतही बंड सुरू होऊ नये म्हणून प्रयत्न केला. अल्ली आदिलशाहाने २७ मे १६५८ ला फर्मान पाठविलें कीं, "महाराज फर्जंद शाहाजी भोसले यानें जाणावें कीं, शिवाजी भोसल्याचा राजद्रोह व उन्मतपणा यामुळें तुझे मनांत सध्या भय उत्पन्न झालें आहे कीं, कदाचित त्याचे कसूरीचा दोष आपल्या माथी लादला जाईल. तरी तूं असे समज कीं, शिवाजीचे अयोग्य आविष्कार व कार्य आम्हास पूर्ण माहीत आहेत. म्हणून शिवाजीच्या कसुरीशीं तुझा काहीही संबंध नाही. त्याची कसूर व गुन्हे याची जिम्मा त्याजवर आहे. एतदर्थी तुझे मनांस पूर्ण समाधान असूं द्यावे. तुजवर पूर्वीपेक्षाही अधिक कृपा आहे. याचे कमक गमक म्हणून पूर्वीची सर्व जागीर तुला बहाल करितो. तीमध्ये थोडाहि बदल होऊं नये. बंगलूर किल्ल्याच्या आसपासचे मनेवारांनी

तुजबरोबर संबंध ठेवावे असेंहि फर्मावितो. तुजविषयीं कोणी कमजास्त सांगेल त्यावर आमचा गजब होईल."

साहजिकच शाहाजीच्या भीतीने अफझलखानाची शिवाजीविरूद्ध आघाडी इ.स. १६५८ च्या पावसाळ्यापूर्वीच सुरू व्हावयास पाहिजे होती. ती १६५९ चा पावसाळा संपेपर्यंत उघडतां आली नाहीं आणि मावळचे देशमुख मिळविण्याचा प्रयत्न १६५९ च्या सुरुवातीपासून प्रत्यक्ष सुभ्यांतून केला तरी हाही प्रयत्न आदिलशाहाच्या आज्ञेप्रमाणें शिवाजीला मारण्याचा नव्हता; परंतु अफझलखानाच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे चोरून खून करून जय मिळविण्याच्या अंगवळणी पडलेल्या स्वभावामुळें या आघाडीला निराळेंच स्वरूप लाभले. परंतु आपल्या मुलांविरूद्ध असल्या दुष्ट हालचालीची वार्ता अचानक येताच शाहाजी अल्ली आदिशाहावरच चालून येऊं लागला असे बेंद्रे सांगून पुराव्याखातर तत्कालीन हेनरी रेव्हिंगटन राजापूराहून लंडनला १० डिसेंबर १६५९ ला लिहिलेल्या पत्रातील मजकूर देतात ज्यात लिहिले होते की, "...but some of the umbraws of this country, knowing him (All Adilshah) to be spuriously begotten, will not give him homage and refuse to go to Court; and these are Rustum Jamah, Ball (Bahlol Khan) Channa, Shawgee (Shahaji) and sevagy; which latter lyes with an army to the northward and commands all alongst whom the Queene this year sent Abdlo Ckaune with an army of 10,000 horse and foote; and because shee knew with that strength hee was not able to resit Sevagy, shee councelled him to pretend friendship with his enemy; which he did..."

यानंतर शाहाजीच्या हालचालीची बातमी याच पत्रांत देतांना लिहिले की, "....One months tyme more will, werr believe, put an end to this trouble: for Sevagees father, Shewajee that lyes to the southeard, is expected within eight days with his army, consisting of 17,000 men, and then they intend for vizapore, the King and Queenes residence, whose strength consists only in men, and they are not above 10,000 souldgers, so that in probability the kingdome wikk be lost."[१४१]

अफझलखानास शिवाजीवर पाठविण्यापूर्वी बेगमने शाहाजीशीं पत्रव्यवहार केला जात असे जे सभासद बखरीसारखे काही बखरी सांगतात त्याचे स्पष्टीकरण वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "तत्कालीन परिस्थितीचा विचार केला तर असे झाले असणे शक्य दिसत नाही. उलट शाहाजीला तो शिवाजी बंडाबाबत त्याच्याकडे काही दोष नसल्याची ग्वाही खास आदिलशाहानेंच आपल्या फर्मांनाने कळविली होती. महंमद आदिलशाहा १६५६ च्या नोव्हेंबरमध्ये वारला. त्यानंतर अली आदिलशाहा सलतनतीवर आल्यानें अंतस्थ गट पडले. शाहाजी व इतर बरेच मुसलमान सरदार व औरंगजेबाने बेदर घेतले. १० नोव्हें. १६५७ रोजी खान महंमद बडे साहेबिणीने मारिला नंतर जुलै १६५८ मध्ये बहलोलखान मारिला. जाने. १६५९ मध्ये फत्तेखान मारिला आणि १६५९ च्या एप्रिलपूर्वीच अफझलखानाच्या स्वारीचा पुकार करून सैन्याची जुळवाजुळव करण्यास प्रारंभ झाला. शिवाजी व शाहाजी हे या विरूद्ध गटात होते हे बेगमला माहीत होते. शिवाजीची लढाई ही याच गटांच्या राजकारणाचा भाग असे समजले जात होते. त्यामुळे शिवाजीवरून शाहाजीला पत्र लिहिण्याचे कारण नाही. शिवाय अफझलखानाच्या स्वारीची बातमी लागताच जो शाहाजी आपल्या सतरा हजार सैन्यानिशी विजापूर चालून येतो त्याला कांही कोकणांतील हालचालीवरून जर काही बखरी सूचवितात त्याप्रमाणें तसा पत्रव्यवहार झाला असता. तो अफझलखानाची स्वारी निघण्यापूर्वी विजापूरी दाखल झाला असता. शाहाजीचे अफझलखानाशीं पहिल्यापासूनच वाकडे होतें, परंतु शाहाजीला ह्या स्वारीची बातमी कळण्यास जरा उशीर झाला आणि तो वाट चालत असतांनाच आपल्या मुलानें अफझलखानाला कबरेंत ढकलल्याचे वृत्त कळताच त्याने विजापूराविरूद्ध टाकलेला पवित्रा मागे घेतला."[१४२] म्हणजेच यासंदर्भातील कथा केवळ काल्पनिक आहेत यात शंका नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात. अफझलखानाच्या मृत्युनंतर कर्नाटकाची 'सिपहसालारी' अंबरखानास देण्यात आली होती.

३.८.२५ अल्ली आदिलशाहाविरोधात दक्षिणेत बंडे व शाहाजी राजांचा मृत्यू

यावेळी आदिलशाहीतील सर्व मोठे मुसलमान सरदार विरूद्ध झाले किंवा मारले गेले त्यामुळे दक्षिणेंतील राजांनी बंडाचे निशाण फडकवण्यास सुरुवात केली.

त्रिचनापल्लीकडून प्रोइन्झोने इ.स. १६५९ मध्ये अहवाल पाठविला आहे त्यांत तो माहिती देतो, "...त्रिचनापल्लीच्या मुत्तु विरप्पा नायक यांनी आदिलशाहास खंडणी देण्याचें

नाकारले.... आदिलशाही सैन्य त्रिचनापल्लीवर चालून गेले; परंतु तेथील जय्यत तयारी पाहून तें पूर्वेकडे १९ मार्च १६५९ ला तंजावराच्या आसमंतात वळले. तेथील नायकाच्या जावयाने शरणागती स्वीकारून प्रदेश आदिलशाहाकडे दिला. आदिलशाही सैन्य तेथून मन्नारकोविलला गेले. ते शहर लुटून वल्लमकोटाईला गेले. जिंकले....." नंतर आदिलशाही फौजेने तेथेंच काही दिवस तळ दिला.

यानंतर डाग रजिस्टरांतील १६६१ इ.स. च्या डच अहवालांत कांही हालचालींचा उल्लेख आला आहे. तो असा : "नायक तंजावरात परत आला... बातमी आली की मदुरा व तंजावरचे नायक व लिंगमनायक यांनी विजापूरचे बंडखोर सरदार शाहाजी व अंतोजी पंत यांच्याशी तह करून परचक्र आल्यास एकमेकांनी एकमेकास साह्य करण्याचे ठरविले... वदंता आहे की, शाहाजीचा मुलगा शिवाजी यानें मुल्ला महंमद व त्याचे साहयक बहलोलखान व अजपानायक यांना त्यांच्या २०० स्वारांसह पकडले आहे... शाहाजीच्या लोकांनी २५ डिसेंबर १६६० रोजीं तेगनापटम शहरात वेढा दिला... अंतर्गत भांडणातून आदिलशाही अद्यापि मुक्त झाली नाही. आदिलशाहा पन्हाळ्यास आपल्या सैन्यासह आला. परंतु मोठ्या बंडखोर शिवाजीशी तह करून परत गेला... शाहाजीच्या लोकांनी कर्नूल लुटून तेथील रहिवाशांकडूनही १७०० परडो घेतले... तेगनापटमचा वेढा उठला. गड ४ फेब्रु. १६६१ ला शाहाजीच्या लोकांच्या ताब्यात दिला. कंपनीची घरे शहाजीने आपल्या ताब्यात घेतली आहेत... लिंगमनायक आपल्या ४० हजार पायदळ व २ हजार स्वारांनिशीं सिलेमब्रनला पोटों नोव्होपासून २ मैलावर गेला. शाहाजी पोटों नोव्हो येथे तळ ठोकून तंजावरच्या प्रदेशांत लुटालूट करीत आहे. लिंगमनायक शाहाजीची भेट घेऊ इच्छित होता; परंतु त्याला जेव्हा कळून आले कीं, शाहाजी पाण्याच्या वगैरे टंचाईमुळे त्रासला आहे. तेव्हां लिंगमनायकाने लढ्यास सुरुवात केली. शाहाजी अर्णीगडास जाऊन बसला. अंबरखान किंवा अंतोजी पंतलु जिंजीत आहे. त्यानें शाहाजीला जर काढून लावलें तर अर्णीचा गड मदुरेच्या नायकास देण्याचे कबूल केलें आहे. असे झाले तर आदिलशाही कक्षेतून जिंजीचा बराच भाग मुक्त होईल. तेगनापटमचा किल्ला अद्यापि शाहाजीच्या लोकांच्याच ताब्यात आहे. लिंगमनाईक शाहाजीशी तोंड देत असल्यानें तेगनापटमकडे येणे शक्य झाले नाही; परंतु त्याने गव्हर्नर पिटला कळविले आहे की, शाहाजीला या प्रदेशांतून बाहेर काढून लावतांच तो तेगनापटमला येईल आणि तंजावरच्या नायकाचा मुलगा वगैरे जे शाहाजीच्या लोकांनी ओलीस ठेवले आहेत त्यास

सोडवील... पुळीचेरीचा रामवेल कृष्णनायक शाहाजीस मिळाला; परंतु नंतर लौकरच जंगलांत पळून गेला... प्रथम वाटलें तशी प्रगती लिंगमनायकाला शाहाजीच्या विरूद्ध आली नाही. तो व त्याची सेना जिंजीच्या प्रदेशात धावपळ करित आहे; परंतु शाहाजीच्या चपळ घोडदळापुढें त्याला शाहाजीस गाठंतांच येत नाही. शेवटी तो कंटाळून तेगनापटमचा किल्ला घेण्यास आला; परंतु तो गडाच्या खंदकांशी येतो तोंच शाहाजी आपल्या ८ हजार घोडदळाशिंी आला व त्याचा दाणागोटा वगैरे तोडून टाकला. धैर्य न राहिल्यानें त्याला तेथून पळून जाणे भाग पडले... शेवटी २ सप्टेंबर १६६१ ला दोन्हीही पक्षात तह झाला. त्या तहाप्रमाणे शाहाजीने आदिलशाहाचा हुकूम येईपर्यंत सर्व जिंकलेला मुलूख ताब्यात ठेवावयाचा, त्यानें यानंतर तंजावर व मदुरा प्रदेशांत उपद्रव द्यावयाचा नाहीं आणि जर त्याच्या बापानें शाहाजीस ५० हजार रियल दिले तर तंजावरच्या नायकाच्या मुलाची सुटका करावयाची; परंतु या लिंगमनायकानें केलेल्या करारांशी तंजावर व मदुरेचे नायक सहमत नसल्यानें त्यांनी लिंगमनायकाला त्रिचनापल्लीच्या कोटांत कैदेत ठेवलें. त्यांचा उद्देश शाहाजीशी लढा चालविण्याचा होता. परंतु थोड्या अधिक विचारानंतर त्यांनीं लिंगम्मास सोडले व त्यास मानसमान दिला. तंजावरच्या नायकानें तहास मान्यता दिली. मदुरेच्या नायकाची संमती मिळवायची होती. दरम्यान तंजावरच्या नायकानें लिंगम्माच्या मुलीशीं व लिंगमनें तंजावरच्या नायकाच्या बहिणीशी लग्न केले. नंतर लिंगम्मा मदुरेच्या नायकाची संमती आणण्यास गेला व आपला कारभारी व तीन हजार लोक तंजावरच्या नायकाकडून ५० हजार रिअल्स मिळविण्याकरिंता ठेवले; परंतु थोड्यात दिवसांत अंतोजी पंतलूचें पत्र आले कीं शाहाजी पैशासाठीं अधिक काळ थांबण्यास तयार नसून त्यानें तह रद्दबातला केला आहे. याचा अर्थ म्हणजे पुन्हां लढा सुरू झाला. लिंगामा नायक तेगनापटमच्या किल्ल्याजवळ येण्यापूर्वीच किल्ल्यांतील लोकांनी पाटों नोव्होवर दोनदां धाड घातली व शहराची लूटमार करून तेथील लोकांस काढून लावले... हें २५ सप्टेंबर १६६१ पूर्वीच घडून आले.... आम्ही म्हणजे डच या लढ्यांत अलिप्त राहिलों त्याबद्दल शाहाजीनें समाधान व्यक्त केलें...."[१४३]

याच काळातील इंग्रज व्यापाऱ्यांच्या पत्रांतही जे १९ ऑक्टोबर १६६१ ला लिहिलेले आहे त्यात वरील माहितीस दुजोरा देणारा मजकूर येतो. प्रोएन्हो पॉल ऑलिव्हाला १६६२ इ. चा अहवाल देतांना लिहितो : "आदिलशाही सेनापती शाहाजी व मुल्ला यांच्या सैन्याने गेल्या दोन वर्षांपासून जिंजी व तंजावर राज्यांचा बराच भाग आक्रमिला असून तो त्याचे त्या बाजूस वर्चस्व

टिकविण्याकरितां ते आपलेकडेच ठेवितील. जनता या नेत्यांच्या हाताखाली राहाण्यास अनमान करीत नाही. उलट पूर्वीच्या जुलमी कारभारापेक्षा या नवीन राज्यांत न्याय मिळत आहे व जुलुमजबरदस्ती सहसा होत नाही, असे म्हणतात.... मुत्तुवीराप्पा मृत्यू पावला. चोकनाथ गादीवर आला... लिंगम्मा ४० हजार लोकांनिशी शाहाजीशी लढा देण्यास व जिंजीचा कोट घेण्यास आला.... स्वारीत यश लाभलें नाही. पुढे तो चोक्कनाथाला मारण्याच्या कटात सापडला.... चोक्कनाथाला लिंगम्माला शिक्षा देणें जड होते; परंतु त्याला पकडण्याचा घाट घातला.... तेव्हां तो पळून जाऊन शाहाजीला मिळाला... लवकरच तो शाहाजीचे १२ हजार पायदळ व ७ हजार घोडदळ घेऊन त्रिचनापल्लीला वेढा देण्यास आला.... चोक्कनाथानें आपल्या ५० हजार सैन्याचा खासा ताबा घेऊन लढा दिला.... लिंगम्मा नायक व शाहाजी तंजावरांत गेले. तंजावरचा नायक या लिंगम्माच्या कटांत सामील झाला होता.... नंतर चोक्कनाथ आपल्या ७० हजार लष्करासह तंजावरावर चालून गेला. शाहाजी व लिंगम्मा जिंजीकडे निसटले आणि तंजावरच्या नायकानें चोक्कनाथाला शरणागती दिली."

डाग रजिस्टरमधील इ. १६६३ च्या डायरींतीलही मजकूर महत्त्वाचा आहे. तो असा : "बहलोलखान यांनी तंजावरांत शिण्याकरितां व कोलेरुमची नदी पार पाडण्यासाठी आपली सेना तयार ठेवली आहे... परंतु सध्या तंजावरच्या नायकाच्या नोकरींत आलेल्या लिंगम नायकानें बहलालेखानी तह केला.... आदिलशाहा, त्याचा मुलगा व बेगम ही मोठ्या फौजेनिशीं कर्नाटकांत भद्रप्पाशीं लढा देण्यासाठी किंवा त्याचेकडून द्रव्य उकळविण्यासाठीं जात आहेत... मागें लिहिले आहे की, विजापूरचा सिपाहसालार व तंजावरचा नाईक यांत सख्य होऊन नायकांने सिपाहसालारला ३००० हजार परडो द्यावयाचे आहेत..... आणखी असे सांगितलें जाते की, विजापूरच्या सिपाहसालारनें नायकांकडून खंडणी बरीच विलंबानें मिळत आहे असें पाहून त्यानें तट मोडून शाहाजीशीं करार केला. त्यायोगें तेगनापटम, पोर्टो नोव्हो वगैरे शाहाजीच्या हवाली करण्यांत येतील आणि नंतर ते दोघे नायकांवर विशेषतः मदुरेच्या नायकावर उलटून, चालून येतील. अर्थात बहलोलने केलेला करार मोडला आणि मदुरेंतील मोठा गड जो त्रिचनापल्ली त्या गडास वेढा घातला आहे. मदुरेचा नायक या स्वारीला धैर्याने तोंड देत आहे; परंतु तंजावरचा नायक स्वस्थ राहून विजापूरी सैन्याला ४० ते ५० हजार परडो अधूनमधून देत आहे...."[१४४]

कारवार ते सुरतच्या २८ जानेवारी १६६३ च्या पत्रांत मजकूर असा : "सध्या सर्वत्र तंग वातावरण आहे. कारण आदिलशाहा व कानडाचा राजा यांच्यांत भांडण चालू आहे. आदिलशाहाने त्याच्यावर स्वारीसाठी १५०० स्वार व २०००० पायदळ बरोबर आणलें आहे. कानडाचा राजाही तयारीत आहे." फिलिफ गिफर्ड गोव्याहून सुरतला २० जुलै १६६३ ला पत्र लिहिले आहे. त्यांत इतर वर आलेल्या मजकूराबरोबर शिवाप्पाचा तह ७०००० परडोचा होऊन भांडण मिटलें असें आहे. डाग रजिस्टरमधील इ.स. १६६४ च्या डायरींत पुढील मजकूर आहे : "विजापूरचा राजा अल्ली आदिलशाहा यानें आपल्या सैन्यासह जाऊन कानडा (इकेरी) राजावर स्वारी केली. जवळजवळ सर्व राज्यच घेतलें; परंतु त्याचें मुलुखापेक्षा लुटीकडेच अधिक लक्ष असल्यानें त्यानें नायकाशीं असा करार केला की, जर नायकानें पाच पाच गिल्डरचे १५०० हजार पगोडे दिले तर त्याचें सर्वच राज्य त्यास परत केलें जाईल. अशा तऱ्हेने लढाईचा निकाल लावून आदिलशाहा यशस्वीपणें गेल्या जानेवारीत परत विजापूरांत आला."[१४५]

या इ.स. १६६३ च्या पावसाळ्यांतील शहाजी व बहलालेच्या भांडणात किंवा आदिलशाहाच्या मदतीस शाहाजीचें सैन्य पावसाळ्यानंतरच्या कोंयलदुर्गावरील स्वारींत गेले त्यावेळी (नोव्हेंबर १६६३) संभाजी मेला असावा. त्यानंतर आदिलशाहा डिसेंबरच्या अखेर बंकापुरहून परतला व १६६४ च्या जानेवारीच्या सुरुवातीस विजापूरी आला. शाहाजी महाराज २३ जानेवारी १६६४ रोजी घोड्यावरून पडून होद्दीगिरीत मरण पावले. तेथे त्यांची छत्री बांधली. ती अद्यापही पाहावयास मिळते असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१४६]

३.८.२६ शाहाजीची विद्वप्रवृत्ति :

वा. सी. बेंद्रे म्हणतात की, "शाहाजी महाराजांजवळ १५-२० हजार फौज, त्यावरील अधिकारी व व्यवस्थापक कारकून, बाजारपेठेचे लोक वगैरे फार मोठें मनुष्यबळ होतें आणि तेंही परदेशीय पठाणी मुसलमानी राज्यांत सांभाळून होते. आपल्या शब्दावर प्राणार्पण करण्याची तयारी असण्याइतका हा समाज एकनिष्ठ होता. एव्हढा मोठा समाज एकजुटीने सांभाळवायाचा तर त्यांच्या नेत्याला समाजशास्त्र व युद्धशास्त्र यांची चांगली माहिती असणें आवश्यक होतें. दुसरे असे की, शाहाजी महाराजांच्या आयुष्याचा तर सर्वच काळ निरनिराळ्या राजकीय वातावरणांत निरनिराळे राजकारणी डाव खेळण्यांत गेला होता. राजनीती व समाजशास्त्राची माहिती अनुभवज्ञानानें संपादन केल्याशिवाय हीं राजकारणें इतक्या यशस्वीपणें पार पाडणे शक्य

झाले नसते. धार्मिक बाबतींत त्याची दानविषयक पत्रें, क्षेत्रोपाध्यायांना दिलेली वृत्तिपत्रें, देवदेवळांच्या पूजाअर्चा इत्यादीसाठी दिलेल्या देणग्या वगैरेंचा विचार केला तर शाहाजीची चातुर्वर्ण्यधर्माच्या आचारविचारांतील तत्परता स्पष्ट दिसून येते."[१४७]

"राधामाधवविलासचंपु:" या काव्यग्रंथांत जयरामाने जी विविध माहिती दिली आहे त्यावरून शहाजी महाराजांच्या दिनचर्येचे स्वरूप समजता येतें. परंतु त्या सर्व आचारांतील बाबी जरूर तेव्हा पाळल्या जात होत्या यांत मात्र शंका नाही असे बेंद्रे सांगून 'चंपू:' काव्याचा सप्तमोल्लासांतील जयरामाच्या लिहिण्याचा भावार्थ गु. राजवाड्यांनी जो दिला आहे तो देवून सांगतात की, शाहाजीराजे व त्यांच्या कुटुंबांतील अनुवंशिक संस्कार व संस्कृति यांची थोडीबहूत कल्पना आल्याशिवाय राहणार नाही. साहजिकच यासाठी वंशपरंपरेचे कुलगुरू व कुलोपाध्याय यांची घराणीं यांच्या सेवेत राहात आलीच होती व पुढेही काही काळ याच कुटुंबांनी वैदिक रुढाचार पद्धतीप्रमाणें सर्व कार्यक्रम पार पाडीत आणले होते.[१४८]

यानंतर वा. सी. बेंद्रेंनी जयराम पिड्येंच्या 'राधामाधवविलासचंपू' मधील शास्त्री, पंडित, कवी वगैरेची नावे दिली व ती पच्याहत्तरपर्यंत जाते.[१४९] या यादीतील आश्रितांत कारभारी, राजनीतिशास्त्रज्ञ, कलाशास्त्रज्ञ वगैरे मंडळी असल्यानें शाहाजीला आपल्या कामकाजाबद्दल सल्ला घेणें व शास्त्राचार जाणणे फारसे कठीण जाण्याचे कारण नव्हतें, असे बेंद्रे सांगतात. हे सर्व राजसभेंतील लोक आहेत. युद्धकलाशास्त्रज्ञांची यात समावेश नाही. त्यातील बरेच लोक संस्कृतात परिपूर्ण होते. १०-१२ इतर भाषीय कवी होते. अशा या सभोवतालच्या वातावरणांत आणि विशेषत: ३-४ निष्णांत महाभारत रामायण सांगणाऱ्या पुराणिकांच्या दैनिक पुराणनिवेदनाचे वेळीं अगदी मर्यादित श्रोतृगणांत राहून भाषा व विषयांच्या ज्ञानार्जनांत सतत राहणाऱ्या शाहाजी व त्याच्या पुत्रांना संस्कृताचे भाषा जाणण्यापुरतें ज्ञान झालें असल्यास नवल काय? असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. तसेच राजनीती व राजव्यवहार यांचीही माहिती अगदी बाळपणापासून मिळण्याची सोय झाल्यानें त्यातही प्रावीण्य संपादले तर आश्चर्य कसले? शाहाजी व जयरामाची भेट होते तेव्हा जयराम आपले काव्य ऐकवतो. [१५०] यावरून असे स्पष्ट दिसते कीं नुसतेंच जयराम कवीचे 'राधामावधवविलासचंपूकाव्य' यांतील वर्णन समजण्यापुरतेंच संस्कृताचें ज्ञान शाहाजीला प्राप्त झालें होते असे नाहीं तर शाहाजीला समस्या घालण्याइतकें संस्कृतांत सामान्यत: बोलताही येत होतें यात शंका नाही.

अशा समस्या सर्व कवींनी जयरामाला घातल्या व शाहाजीने जयरामाला त्या समस्यांची चांगल्या रीतीनें पूर्ती केल्यावरून शाबासकी व बक्षीसही दिलें, असे बेंद्रे सांगतात.

सारांश शहाजी-संभाजी-कोयाजी हे तरी संस्कृत भाषेचे जाणकार होतेच. फार तर त्यास लेखनवाचनाची ग्रंथाभावी पुष्कळ सवय झाली नसेल. त्यांना आपल्या गुरुच्या पाठांतरित ज्ञानाचे श्रवण करून आपला वाङ्मयीन व इतर नीतिशास्त्राचा वगैरे अभ्यास पुरा करितां आला. ज्याप्रमाणे इतर कलाशास्त्रांत प्रत्यक्ष अनुभवानें ज्ञान संपादन करण्याचे प्रयत्न केले जात त्याचप्रमाणे वाङ्मयाच्या वाचन-लेखनाच्या साधनांच्या अभावी श्रवणावरच बरेंचसें विसंबणे भाग होतें. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतरही आज भाषाज्ञानासाठी 'संभाषणपद्धनिती'चा अवलंब करणें अधिक फलदायक होते असा ग्रह वर्तमान कालांत वृद्धी पावत आहे. मायभाषेचे ज्ञान या संभाषणपद्धतीनें विनासायास अगदी बाळपणांतही होतेंच ना, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

काही समकालीन संस्कृतग्रंथातून शाहाजीचें प्रशस्तिपर वर्ण आले आहे. त्यावरूनही शाहाजीच्या व्यक्तिमत्वाचा बोध होतो, असे सांगून बेंद्रे सर्वप्रथम गागाभट्टने आपल्या 'कायस्थधर्मदीप' ग्रंथाच्या प्रशस्तीत जे लिहिले त्याचा उल्लेख करतात.

"तत्राभावच्छाहनराधिराजः।
स क्षत्रधर्मस्य नरावतारः।।
सुरद्रुपुष्पोद्भवकामिनीभिः।
संगीयते यस्य यशः प्रशस्ति।।४।।
कसदंबिनीव जनजीवनदानहेतुः।
सौदामिनीव सकलारिविनाशनाय।।
आलंबिनी भवति राजगिरोरिदानीं।
जीवामिधा जयति शाहकुटूंबिनी सा।।५।।"[१५१]

संभाजी महाराजांनी आपल्या 'बुधभूषणम्' मध्ये आपले आजे शाहाजी महाराजा यांचा उल्लेख सुरुवातीच्या प्रशस्तींत केला आहे. तो असा :

"भृशबलान्वयसिन्धुसुधाकरः।
प्राथितकीर्तिरुदारपराक्रमः।।
अभवदर्थकलासु विशारदो।

जगति शाहनृपः क्षितिवासवः।।७।।[१५२]

वरील विवेचनावरून दिलेल्या काही समकालीन पुराव्यावरून शाहाजींची संस्कृती थोर होती. त्यांच्या मनावर झालेले लहानपणापासूनचे संस्कार त्यांना हिंदवी स्वराज्याच्याच उद्दिष्टाकडे नेत होते. तत्कालिक परिस्थितीचा वास्तवबोध करून घेतला तर या भोसले घरण्यांतील मंडळींत विद्वप्रवृत्ती चांगलीच जागृत असल्याचें आढळून येतें आणि शाहाजी महाराजांत तर ही प्रवृत्ति विशेषच दृढावलेली दिसते. त्यांनी विद्वान आणि युद्धनिष्णांत लोकांचा संग्रह केला होता. मराठी, फारसी, संस्कृत आणि कानडी अशा चार भाषांत ते बोलू-लिहूं शकत होते. त्यांनी धर्महीं फार मोठा केलेला होता. अशा या शाहाजीबद्दल बुसातिन-उस-सलानिच्या शत्रुपक्षाच्या लेखकानेही तारीफ केली आहे तो म्हणतो, "शाहाजीराजे मसलतीविषयी, दुरवर विचार करण्यामध्ये व हुशारीत सर्व संभावित मनुष्यांहून त्या काळांतील अद्वितीय होता. शाहाजीराजे भोसले यापरता कोणी अकलवान नव्हता."[१५३]

३.८.२७ सारांश :

अखिल भारतात कित्येक वर्षे दृढमूल होऊन बसलेली परदेशीय इस्लमी सत्ता प्रथम महाराष्ट्रान सतराव्या शतकांत उलथून पाडली व 'हिंदवी स्वराज्या'ची स्थापना केली, हा इतिहास अखंड भारताला महत्त्वाचा व अभिमानास्पद आहे यात शंका नाही. राज्यसंरक्षण व राज्यसंवर्धन ही जशी मनुष्यबळ आणि विशेषतः स्थानिक मनुष्यबळ आणि द्रव्यसंचयावर अवलंबून असतात तशींच राज्यक्रांती व राज्यसंस्थापना हीही विशिष्ट प्रवृत्तीचें मनुष्यबळ व धनसंचय यांच्याच साह्याने यशस्वी होऊं शकतात. पहिल्या राज्ययंत्रणेत साध्य असलेले मनुष्यबळ व द्रव्यसंचय टिकवून धरावयाचा असतो, तर दुसऱ्या प्रकारात केवळ ध्येयनिष्ठा व नेतृत्व यांतील गुणधर्मांचे जोरावर तसेंच मनुष्यबळ व द्रव्यसंचय शत्रुकडून, त्याच्याच आश्रयाने राहत असतां, हिरावून आपणाकडे मिळवून, त्यांचे तनमनधन आपल्या ध्येयप्राप्तीत गुंतेल अशा तऱ्हेने त्यास जोपासावे लागते. विशेषतः राज्यक्रांतीत तर जेव्हा स्थानिक जनतेची वृत्तिप्रवृत्ती द्विधा होत असते तेव्हां तर क्रांतिकारकांच्या ध्येयोद्दिष्टातील वैशिष्ट्यच सामान्य जनतेची प्रवृत्ती क्रांतिकार्याकडे वळवू शकते. जो नेता आचारविचाराने व राजधर्मनीतिप्रमाणे आपले सर्वस्व आपल्या अनुयायांवर खर्चण्यास तयार राहातो तोच खरा राष्ट्राचा नेता किंवा राजा व कुटुंबाचा पालक मानला जातो. आर्यसंस्कृतिप्रमाणें राजा म्हणजे इंद्र किंवा इंद्राचा प्रतिनिधी. हीच विशिष्ट विचारपद्धती मालोजी,

शाहाजी, शिवाजी व संभाजी यांच्या वागणुकीत वंशपरंपरेने, परंतु प्रामुख्याने बाणलेली दिसून येते.

परराज्यात राहून प्राणपणाच्या निष्ठेचे, आपल्या मागे एव्हढे मोठे मनुष्यबळ उभे करणे म्हणजे काही साधे काम नव्हते. त्यातल्या त्यात वैचारिक क्रांतिकाळात तर ते विशेषच अवघड होते. होता होईतो प्रबल शत्रुकडील आघात कसा कमीत कमी करतां येईल याचीच दक्षता घ्यावयाची असते. अनुयायांना अनावर परिस्थितीत लोटण्यांत कार्यहानीच होते. राजकारणातील शौर्य धैर्य, बुद्धिकौशल्य आणि विशेषतः पापपुण्याच्या भीतीने नव्हे तर केवळ राष्ट्रीय वा सामाजिक कर्तव्य म्हणून केलेले पालन व दान यांवरच एकनिष्ठ मनुष्यबळाची थोर संपत्ती प्राप्त करून घेता येते. अशा दानधर्मानें मालोजी, शहाजींनी स्वकीय जनेतवर कसा दृढ पगडा बसविला होता हे पाहिले तर त्यांनी वेळोवेळी दर्शविलेल्या जनतेबद्दलच्या त्यांच्या थोर आपुलकीची जाणीव होऊ शकते. ज्या परकीय इस्लामी सत्तांनी कित्येक शतके अखिल भारतवर्ष व्यापून आपली सत्ता सबल केली होती, त्या परकीय इस्लामी सत्तांना उलथून टाकलें, हिंदवी स्वराज्याच्या श्रेष्ठ ध्येयाची स्थानिक जनतेला तिच्या विचारांत पूर्ण क्रांती घडवून आणून तीव्र जाणीव करून दिली आणि 'हिंदवी स्वराज्या'चा राष्ट्रीय झेंडा फडकावण्यांत आपले सर्वस्व पणाला लाविलें त्या मालोजी राजे व शाहाजी महाराज यांस मानाचा मुजरा..!

संदर्भग्रंथ सूची

१. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ९
२. कित्ता, पृ. क्र. १०-११
३. कित्ता, पृ. क्र. ४९
४. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४९
५. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, पृ. क्र. ९-१०
६. कित्ता, पृ. क्र. १०
७. कित्ता, पृ. क्र. ९
८. कित्ता, पृ. क्र. ६-७
९. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ११
१०. कित्ता, पृ. क्र. १२
११. कित्ता, पृ. क्र. १३
१२. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ९ ते १६
१३. श्री. वा. सी. बेंद्रे, 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे', प्रथम आवृत्ती १९६७, पृ. क्र. २७-२८
१४. कित्ता, पृ. क्र. ४४-४७
१५. कित्ता, पृ. क्र. ७२
१६. कित्ता, पृ. क्र. ८२
१७. कित्ता, पृ. क्र. ८३
१८. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ७४
१९. कित्ता, पृ. क्र. ९५-९६
२०. कित्ता, पृ. क्र. १०७
२१. कित्ता, पृ. क्र. १०६
२२. कित्ता, पृ. क्र. १०९
२३. श्री. वा. सी. बेंद्रे, 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे', प्रथम आवृत्ती १९६७, पृ. क्र. ११२
२४. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ११२-११३
२५. कित्ता, पृ. क्र. ११७
२६. कित्ता, पृ. क्र. १२०
२७. कित्ता, पृ. क्र. १२५-१२६
२८. कित्ता, पृ. क्र. १३०
२९. कित्ता, पृ. क्र. ७४
३०. कित्ता, पृ. क्र. १५७-१५८

३१. कित्ता, पृ. क्र. १४८
३२. कित्ता, पृ. क्र. १३५-१३६
३३. कित्ता, पृ. क्र. १३६-१३७
३४. कित्ता, पृ. क्र. १३७
३५. कित्ता, पृ. क्र. १३८-१३९
३६. कित्ता, पृ. क्र. १४८
३७. कित्ता, पृ. क्र. १४८
३८. कित्ता, पृ. क्र. १४९
३९. कित्ता, पृ. क्र. १५१
४०. कित्ता, पृ. क्र. १५२
४१. कित्ता, पृ. क्र. १६१
४२. कित्ता, पृ. क्र. १६२-१६४
४३. कित्ता, पृ. क्र. १६४
४४. कित्ता, पृ. क्र. १६४-१६६
४५. कित्ता, पृ. क्र. १६६
४६. कित्ता, पृ. क्र. १६६-१६७
४७. कित्ता, पृ. क्र. १६७-१६९
४८. कित्ता, पृ. क्र. १७०
४९. श्री. छत्रपति शिवाजी महाराज (पू), पृ. क्र. २०
५०. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ७
५१. श्री. वा. सी. बेंद्रे, 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे', प्रथम आवृत्ती १९६७, पृ. क्र.५५१ किंवा संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ३७
५२. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. १७०-१७१
५३. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ६
५४. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. १७१-१७२
५५. कित्ता, पृ. क्र. १७६
५६. कित्ता, पृ. क्र. १७९
५७. कित्ता, पृ. क्र. १८१
५८. कित्ता, पृ. क्र. १८२
५९. कित्ता, पृ. क्र. १७३-१७
६०. कित्ता, पृ. क्र. २०५
६१. कित्ता, पृ. क्र. २०५
६२. कित्ता, पृ. क्र. २०६
६३. कित्ता, पृ. क्र. २०६

६४. कित्ता, पृ. क्र. २०६-२०७

६५. कित्ता, पृ. क्र. २०७

६६. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. २७८

६७. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. २५८-२५९

६८. कित्ता, पृ. क्र. २६०

६९. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. २९४

७०. कित्ता, पृ. क्र. २९५-२९६

७१. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. २६०-२६१

७२. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ७

७३. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ३४३

७४. कित्ता, पृ. क्र. ३४४

७५. श्री. बेंद्रे वा. सी. (संपा), 'विजापूरची आदिलशाही', बुसातिन-उल-सलातीन या फारसी ग्रंथाचे नरसिंहराव विठ्ठल पारसनीसकृत मराठी भाषांतर, मु. म. ग्र. सं. मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हें. १९६८, पृ. क्र. २९८

७६. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ३०

७७. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ३५०

७८. गोवळकोंड्याची कुतुबशाही, पृ. क्र. ७०/ पोर्तुगिजांच्या हालचाली, पृ. क्र. ८४

७९. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ४०

८०. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३१२-३१३

८१. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ४२

८२. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३३२-३३३

८३. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ४४-४५

८४. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४१७

८५. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४१८

८६. छ. शिवाजी महाराज, पृ. क्र. ८१

८७. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४२१

८८. कित्ता, पृ. क्र. ४१६

८९. कित्ता, पृ. क्र. ४०७

९०. कित्ता, पृ. क्र. ४०९

९१. कित्ता, पृ. क्र. ४०९

९२. कित्ता, पृ. क्र. ४१०

९३. श्री. छत्रपति शिवाजी महाराज (पू), पृ. क्र. ७८

९४. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४२२

९५. कित्ता, पृ. क्र. ४२३-४२४

९६. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ४५
९७. श्री. छत्रपति शिवाजी महाराज (पू), पृ. क्र. ८२
९८. कित्ता, पृ. क्र. ८१
९९. कित्ता, पृ. क्र. ८१
१००. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४३०
१०१. श्री. छत्रपति शिवाजी महाराज (पू), पृ. क्र. ८१
१०२. कित्ता, पृ. क्र. ८५-८६
१०३. कित्ता, पृ. क्र. १००
१०४. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४४४-४४५
१०५. कित्ता, पृ. क्र. ४४७
१०६. कित्ता, पृ. क्र. ४५२
१०७. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३४८
१०८. श्री. छत्रपति शिवाजी महाराज (पू), पृ. क्र. ९७-९८
१०९. गोवळकोंड्याची कुतुबशाही, पृ. क्र. ८८
११०. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४५६
१११. कित्ता, पृ. क्र. ४६०
११२. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४७१
११३. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, पृ. क्र. ७३
११४. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ३३५-३३६
११५. कित्ता, पृ. क्र. ४७२-४७३
११६. कित्ता, पृ. क्र. ४७३
११७. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३३९
११८. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४७४
११९. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३४१
१२०. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४७५
१२१. कित्ता, पृ. क्र. ४७७-४७८
१२२. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३३७
१२३. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४७८
१२४. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३४६
१२५. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४८२-४८३
१२६. कित्ता, पृ. क्र. ४८३-४८४
१२७. कित्ता, पृ. क्र. २८५
१२८. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, पृ. क्र. ७४
१२९. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ४५-४६

१३०. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४८५
१३१. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, पृ. क्र. ७३
१३२. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ४८६-४८७
१३३. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ४६
१३४. कित्ता, पृ. क्र. ४८८
१३५. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, पृ. क्र. १२६
१३६. मालोजी व शाहाजी महाराज, पृ. क्र. ४६५
१३७. कित्ता, पृ. क्र. ४६६-४६७
१३८. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ५१६
१३९. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ४०८
१४०. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ५१७
१४१. कित्ता, पृ. क्र. ५१८-५१९
१४२. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, पृ. क्र. १८५
१४३. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ५२२-५२४
१४४. कित्ता, पृ. क्र. ५२५-५२६
१४५. कित्ता, पृ. क्र. ५२७
१४६. संभाजी राजे भोसले, पृ. क्र. ३७७
१४७. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ५३२-५३३
१४८. कित्ता, पृ. क्र. ५३४
१४९. कित्ता, पृ. क्र. ५३५
१५०. छत्रपति संभाजी महाराज, पृ. क्र. ४०
१५१. मालोजी राजे आणि शाहाजी महाराज, पृ. क्र. ५३९
१५२. कित्ता, पृ. क्र. ५४१
१५३. विजापूरची आदिलशाही, पृ. क्र. ३२१

प्रकरण चौथे
छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचे लिखाण

प्रकरण चौथे

छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचे लिखाण

महाराष्ट्रीयन बखरकरांनी शिवाजी महाराजांना ईश्वरी अवतार मानून त्यांच्या हर एक प्रसंगाचे वर्णन करण्याचा जो दृष्टीकोन होता त्या संदर्भात वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतात की, "बखरकारांचा शिवाजी महाराजांना ईश्वरी अवतार मानण्यामागील दृष्टीकोन तो केवळ महान सामाजिक राष्ट्रीय क्रांतीयुगातील "तारक" किंवा "श्रेष्ठ देशसेवक" याच अर्थाने उपयोजिला गेला आहे, आणि तो तसा सार्थही आहे. तो उल्लेख प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार म्हणून सांगण्यासाठी नाही. १७ व्या शतकाच्या पूर्वीच्या महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर परकीय व परधर्मीयांच्या सतत तीन-चारशे वर्षांच्या सत्तेखाली महाराष्ट्रीयन होते. पारतंत्र्य व परावलंबी यंत्रणेंतून मोकळे होण्यासाठी क्रांती-उत्क्रांतीच्या लढ्यास सिद्ध होण्याखेरीज अन्य उपायच उरला नव्हता. अशा काळात जनहितावरच लक्ष केंद्रित करून सामाजिक व राजकीय क्रांतिउत्क्रांतीकरिता आपले सर्वस्व वेचणारा नेता जनतेला ईश्वरसमान भासत असला तर नवल कसले? जेव्हा स्थानिक जनतेला अनपेक्षितपणे असे सुस्वास्थ प्राप्त होते ते त्या नेत्याच्या प्रयत्नाने मिळते. त्या पुरुषांत ईश्वरी अंश मानणे अगदी साहजिकच असते. त्याकाळी त्यांच्या मतें ही क्रांती मानवी प्रयत्नाबाहेरची अशी भासत असते."[१]

मराठ्यांना स्थानिक राजकारणात का प्रवेश मिळाला याचे स्पष्टीकरण देतांना वा. सी. बेंद्रे लिहितात की, "दक्षिणेत बहामनी सुलतानांनी आपला बराचसा जम बसविलेला असतांना त्यांना विशेषतः महाराष्ट्रातील विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे आणि दळणवळणाच्या बाबतीत फारच कठीण व दुर्घट मार्गामुळें बहामनी राजांची किंवा सुलतानांची सत्ता फार खोलवर पोहचली नाही. भाषेच्या व इतर कारणांमुळे राज्यकारभारांत स्थानिक लोकांवर विसंबणे त्या परिस्थितींत इस्लामियांना रुचणारे नव्हते. त्यामुळे सर्व राज्यकारभार परदेशीय इस्लामियाकडे ठेविला जात होता. ते स्थानिक लोकांची आपल्या मर्जीनुरूप मदत घेत इतकेच; परंतु जेव्हा या बहामनी सलतनतीची शकलें पडली आणि विभाजित राज्यांचे पसारे वाढू लागले तेव्हा

साहजिकच कारभारासाठी परदेशीय इस्लामियांचा, म्हणजे पठाणांचा तुटवडा भासूं लागला. स्वाभाविकच त्यांनी हा तुटवडा स्वधर्मीय सिद्यींच्या सहकारित्वानें भरून काढण्याचा प्रथम प्रयत्न केला; परंतु मोगली साम्राज्याचा पसारा वाढूं लागताच ही परदेशीय पठाणांचा ओढा आदिलशाहीकडे पडल्यानें निजाम ज्यावेळी दक्षिणेतून अहमदनगर-औरंगाबाद परिसरांत नवीन राज्याची घडी बसवूं लागला, तेव्हा त्याची बरीच मदार त्याला मराठा बारगिरांवरच मर्यादित करावी लागली होती. प्रथम वजिरांच्या मालिकेंत पठाण व सिद्यी होते; परंतु १६ व्या शतकाच्या अखेरीस या दोन वजिरी जमातीत मिळून मिसळून वागत असत. त्यामुळे सिद्यींना मराठ्यांच्या साह्याने पठाणांची निजामशाहीतून पूर्णपणे हकालपट्टी करणे सोपे गेले. कित्येक पठाण मारले गेले, कित्येक परदेशी गेले आणि कित्येक आदिलशाही, कुतुबशाही व मोगली चाकरीत शिरले. त्यामुळे निजामशाही राज्य स्थानिक सिद्यी व मराठा यांचे हाती आले. यातच मोगली आक्रमणे दक्षिणेवर वाढली; पण दक्षिणेतील शाह्यात एकजूट नव्हती. मलिक अंबरला आपला सारा भार मराठा बारगिरांवर ठेवावा लागला. "[२]

४.१ शिवाजी महाराजांचा जन्म व बालपण :

शहाजी महाराज, शिवाजी महाराज याच्या निश्चित जन्मतिथी संदर्भात ज्या अडचणी येतात त्या अडचणींमागील कारण देतांना श्री. वा. सी. बेंद्रे सांगतात की, "पूर्वी राजेमहाराजांच्याही घराण्यांत 'वाढदिवस' साजरा करण्याचा प्रघात मुळीच नव्हता. कदाचित पुनर्जन्म हा तेवढासा पुण्यप्रद योग मानला नसल्याने ह्या जन्मतिथिला हिंदू लोकांनी महत्त्व दिले नसेल." याउलट श्राद्धपक्ष मात्र होत होते. त्यामुळे मृत्युतिथी जशा पाच सात पिढ्यापर्यंत तरी स्मरणांत ठेवणे आवश्यक होते तसे ते जन्मतिथीचे नव्हते. त्रैवर्णिकांना काही उपनयन-विवाहादी विधींच्या मुहुर्तासाठी जन्म कुंडलीची गरज भासे. मात्र या कुंडल्यांचा लग्नविधी नंतर धार्मिक व इतर व्यवहारांत फारसा उपयोग नसे. सारांश, जन्मतिथींची माहिती लोकांत सहजासहती रूढ राहण्यासारखी सतराव्या शतकात परिस्थिती नव्हती.

४.२ शहाजी महाराजांची जन्मतिथी :

सामान्यतः शाहाजीचा जन्म इ. स. १५९४ चा असे बखरकारांनी मानले आहे; परंतु परमानंदांच्या लिहिण्यावरून व त्या काळातील वास्तवबोधी कागदपत्रांतील तपशिलावरून ही जन्मतिथी इ. स. १६०० च्या सुमाराची असावी असा निष्कर्ष बेंद्रेंनी काढला होता. मालोजीचा

मृत्यू इ. स. १६०६ च्या पावसाळ्यापूर्वीचा. यावेळी शाहाजी ५ वर्षांचा होता असे परमानंदाने लिहिले आहे. 'पांच' वर्षांचा उल्लेख शाहाजीला ४ थे वर्षे पूर्ण होताच व सहावे वर्षे लागण्याच्या दरम्यानच्या सालाचा हाऊ शकतो. म्हणून जन्माचे वर्षे १६०० इ.स. सुचविले होते असे बेंद्रे सांगताना आपल्याला दिसतात; परंतु शाहाजी राजांची कुंडलीच आता मिळाल्याने उल्लेख "संवत १६५५ वर्षे फाल्गुन कृष्ण १४ गुरौ रात्रि घडी १७ पल ४७ समये मीनलग्ने शाहाजीराज जन्म" (३० मार्च १५९९ व शके १५२०) असा होय. ही तिथी मालोजी राजांच्या व शाहाजी महाराजांच्या कालवाचक तपशिलाला जुळती आहे असे बेंद्रे सांगतात.

४.३ शिवाजी महाराजांच्या जन्मासंदर्भात असलेल्या मतमतांतराचा बेंद्रेंनी घेतलेला आढावा :

अ] बखरीतींत नोंदी :

१. सतराव्या शतकाच्या अखेरीचा; परंतु सर्वात जुना बखरकार जो सभासद त्याने शिवाजी महाराजांची जन्मतिथी दिलीच नाही. इतकेच नाही तर त्याने शिवाजी महाराजांचा ज्येष्ठ बंधू संभाजी यांचाही जिजाईच्या पुत्रांत उल्लेख केला नाही. मात्र त्याच्या लिखाणात एक उल्लेख येतो जो जन्मतिथीच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो असे बेंद्रे म्हणतात. तो असा की, "शाहाजी राजे यांसि दौलतेमध्ये पुणें परगणा होता. तेथे दादाजी कोंडदेव शाहाणा चौकस ठेविला होता. तो बंगरुळास महाराजांचे भेटीस गेला. त्याबरोबर राजश्री राजे व जिजाबाई आऊ ऐशी गेली. ते समयी राजियास वर्षे बारा होती."[३]

२. चित्रगुप्तानेही महाराजांची जन्मतिथी दिलेली नाही. मात्र आयुष्यमानाच्या गणितास उपयुक्त असा एक उल्लेख केलेला आहे. त्यात "स्वामीस (शिवाजीस) बारा वर्षापर्यंत आपणासंनिध (शाहाजीजवळ) ठेवणे. तदनंतर पुढें न ठेवणें.", असे म्हटले आहे. हा उल्लेख सभासदाप्रमाणेच आहे; परंतु कालमानाचा संबंध तिकडे जाण्याकडे न लावतां येण्याकडे लावला आहे, असे बेंद्रे येथे नमूद करतात.[४]

३. ९१ कलमी बखर (लेखनकाल १७६० इ.स. नंतरचा) ह्या जन्मतिथीचा उल्लेख "वैशाख मास शुद्ध ४ चंद्रवारी १५५९ क्षयनाम संवत्सरी पुत्र जन्मला. त्याचे नाव शिवाजी" या शब्दात करीते. या उल्लेखांतील शकाचा आकडा चुकलेला आहे. तो १५४९ म्हणून वाचावयाचा मोह होतो. तसाच मोह १५५१ असाही वाचण्याकडे होतो. १५४९ शकाला प्रभव संवत्सर

होता व क्षय शके १५४८ ला होता. गत संवत्सर देण्याचा प्रघात महाराष्ट्रात नव्हता. १५५९ ला ईश्वर संवत्सर आहे व वैशाख शुद्ध ५ ला बुधवार आहे. १५४९ च्या वैशाख शुद्ध ५ ला मंगळवार आहे. क्षय संवत्सराच्या वैशाख शुद्ध ५ ला गरुवार आहे. सारांश, येथे तिथिवार शक संवताचा काहीच मेळ बसत नाही, असे बेंद्रे म्हणतात. याच बखरीतील कालदर्शक उल्लेख देतात -"जिजाऊ शिवाजीच्या खेपेने गरोदर असतांना जाधवरावानें शाहाजी-जिजाईचा पाठलाग केला. शाहाजी-जिजाईला टाकून पळाला. जाधवरावास लोकांनी फजित केल्यावरून त्याने जिजाईला शिवनेरीस पाठविली."[५] दुसरा उल्लेख, "....दादाजी कोंडदेव याचा मृत्यू झाला ते समई सोळा-सतरा वर्षाचे शिवाजी राजे होते... " याच बखरकाराने शिवाजीच्या राज्यभिषेकाची तिथी "चैत्र शुद्ध प्रतिपदा शुक्रवार" अशी चुकीचीच दिली आहे. ही तिथी तरी चुकण्याचे कारण नव्हते. कारण राज्यभिषेक शक त्यांचे कालांतील पत्रव्यवहारांत उपयोजितला जात होता. यावरून या बखरकाराच्या लेखनांतील अवास्तवतेचा सहज बोध होण्यासारखा आहे, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[६]

४. वा. सी. बेंद्रेंनी मल्हार रामराव चिटणिसांने दिलेल्या जन्मतिथीची सुद्धा चिकित्सा केली. चिटणिसाने "शके १५४९ प्रभव नाम संवत्सरे वैशाख शुद्ध २ गुरुवार" अशी दिली आहे. येथे शक संवत्सराचा जरी मेळ बसत असला तरी तिथिवाराचा मेळ बसत नाही. तसेच कालदर्शक उल्लेखामध्ये "(१) जाधवरावाचा जिजाईच्या गरोदरपणांतील पाठलाग हा एक आहे; (२) श्री शाहाजी महाराज (यांची) पूर्वी माहुली किल्याहून दौलताबादेचे पातशाहींतून (निजामशाहीतून) जो समयी जिजाऊ बाईसाहेब गरुदर निभावणार नाहींत म्हणून शिवनेरींत ठेविली (होती) तेथें (त्यास) शिवाजी राजे जाले. महाराज चंजाऊर प्रांती जहांगिरींत गेले, तिकडे राहिले. सात वर्षाचे वय जाले. त्यास अवलोकन करावें... म्हणून बोलावणे पाठवून घेऊन, येऊन... समागमें घेतेले." असा दुसरा उल्लेख चुकीचा आलेला आहे असे बेंद्रे सांगतात.[७]

५. मराठी साम्राज्याची छोटी बखरीप्रमाणे शिवाजी महाराजांचा जन्म "शके १५४९ क्षयनाम संवत्सरे माहे वैशाख शुद्ध ५ चंद्रवासरी झाला." शकाच्या आकड्याखेरीज तिथीचा तपशील ९१ कलमी बखरीसारखाच आहे. जाधवरावांचा पाठलाग व दादाजीपंत वारले त्यावेळी शिवाजीचे वय १७ वर्षाचे होते ह्याही दोन्ही गोष्टी तशाच आहेत. मात्र ही बखर शिवाजी

पुण्याकडेच होता व कर्नाटकात गेला नव्हता असे समजते व त्याचे कारण म्हणजे "शाहाजीनें जिजाबाई व पुत्र शिवाजी यांचा त्याग केला. मुख पाहाणार नाहीं म्हणून बोलले..." हे दिले आहे.[८] असे बेंद्रे सांगतात.

६. शिवदिग्विजय ही बखर इ.स. १८१८ ची आहे. यात जिजाईच्या पाठलागाचा मजकूर नाही; परंतु शाहाजी विजापुराकडे आपल्या नूतन जहागिरीवर गेला तेव्हा "समागमे जिजाऊ साहेब आणावी तरी सात आठ महिन्यांची गरोदर जाली. यामुळे शिवनेरीस दादाजी कोंडदेवाकडे पाठविली. विजापुरी सरदारीचा बंदोबस्त शके १५४८ प्रमाथी (१५४८ ला क्षय संवत्सर होता आणि प्रमाथिला शक १५६१ होता) नाम संवत्सरी जहाला. बाईजवळ बाळकृष्णपंत हणमंते, नारो त्रिमल याचे चुलतबंधु शंकराजी निळकंठ व रघुनाथ बल्लाळे कोर्डे....दिले." ही बखर पुढे सांगते, ".....जिजाईचे पोटी प्रथम दौलताबादेस असतां शके १५४५ मध्ये पुत्र (संभाजी) जाला.... ते पांचवार वर्षाचे समाबमेंच विजापुरास आणिले.... दुसरे लग्न विजापुरी तुकाबाईशीं १५४९ आनंदनाम संवत्सरी वैशाखमासी लग्न जहाले.... शिवनेरी येथें बाई एकटी.... स्वामीचा वियोग जाला (जन्मतिथी श्लोकांत दिली आहे) शके १५४९ प्रभव संवत्सर वैशाख शुद्ध २ गुरुवासरे शिवाजी राजे यांचा जन्म जाला...." यानंतर दादोजने शिवाजीचे पहिले लग्न शिर्क्यांच्या मुलीशी शके १५६२ विक्रम संवत्सरी वैशाख शुद्ध ५ स केल्याचे म्हटले आहे. येथें शकसंवत्सराचा मेळ आहे. इंग्रजी तारीख १६ एप्रिल १६४० येते. ही बखर शिवाजी-जिजाई कर्नाटकात न गेल्याचे मानते. शेवटी शिवाजीची आयुमर्यादा ५२ वर्षे १० महिने व १२ दिली आहे आणि त्यात १२ वर्षे राजकारण दिले आहे. या बखरकराने कालज्ञानाच्या अभावी त्यास मिळाल्या त्या सर्व दंतकथांची खिचडी करून आपली कथा रंगविली आहे, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[९]

७. शिवाजीप्रतापांत, शाहाजी-जिजाईचा पाठलाग झाला तेव्हां ती सहा सात महिन्याची गरोदर होती व तीस शके १५४९ रक्ताक्षि (१५४९ ला प्रभव संवत्सर व रक्ताक्षि संवत्सरला १५४+ हा शक होता) जाले, असे लिहिलें आहे. फक्त शकसंवत्सर दिला आहे, तो ही चुकीचा आहे. त्यानंतर मजकूर येतो, "....नंतर शिवाजी राजे सात आठ वर्षाचे जाले. जन्मापासून भेटी नाहीं.... तरी जाऊन भेटले...." यानंतर चार-साडेचार वर्षाची शिवाजीची यवनाविरूद्ध लीला व लग्न झाल्याचा पाल्हाळ येतो व नंतर जिजाई-शिवाजी पुण्यास येतात.

या लिहिण्यांतील तपशिलावरून शिवाजी बारा वर्षांनंतर पुण्यांत आला असे दिसते, असे बेंद्रे सांगतात.[१०]

८. शेडगांवकर भोसले, यांच्या बखरीत, "....चंदीचंदावराकडे राज्य करित आहेत तो इकडे सिवाजीराजे आपल्या वयांत सतरा अठरा वर्षांचे जाहाले. मग शके १५६६ तारणनाम संवत्सरे फसली सन १०५४ या सालापासून बंडावा करू लागले..." वरील मजकुरात शिवाजीच्या वयाचा उल्लेख आला आहे, असे बेंद्रे स्पष्ट करतात.

९. पंतप्रतिनिधी बखरीत, "....त्याउपर शिवाजी राजे जन्मले. ते शके १५४९ शके प्रभव नाम संवत्सर वैशाख शुद्ध १५ इंदुवारी....", असे आहे. यांतील तिथीवार अगदीच निराळे आहेत.

१०. न्यायशास्त्री पंडितराव, यांच्या बखरींत इतर माहिती नाही. मात्र शिवाजी राजे यांचा जन्म शालिवाहन शके १५४९ प्रभवनाम संवत्सरे, "....शिवनेरी किल्ल्यावर जाला..." इतकेच म्हटले आहे.

बखरींची चिकित्सा :

१. या मुख्य दहा बखरीतील सर्वात जुन्या अशा दोन्हीत शिवाजन्माची तिथी, वार, शक, संवत वगैरे माहिती काहीच दिलेली नाही. इतकेच नव्हे तर वयोमान दर्शविणारे इतरही उल्लेख नाहीत. यावरून इ.स. १७५० पर्यंत तरी या जन्मतिथीबद्दल सामान्य जनतेंत अज्ञान होतें, यात शंका नाही असे बेंद्रे म्हणतात. यानंतरच्या १००-१० वर्षांतील सात बखरीत मतभेद असलेले दिसतात. दोन बखरींत फक्त शक व संवतच दिलेले आहेत; परंतु शक १५४९ ला एकीत संवत तीन वर्षापूर्वीचा दिला आहे. ९१ कलमीत तर शके १५४९ ला संवत आणि इतर तपशील रूढ जन्मतिथीला धरून नाहितच, पण तिथी ५ व वार सोमवार दिले आहेत तेही जुळत नाहीत; फक्त मास व पक्ष जुळत आहे. मल्हारराव चिटणिसाने व शिवदिग्विजयकाराने "शके १५४९ प्रभव नाम संवत्सरे वैशाख शुद्ध २" अशी तिथी दिलेली आहे, ती रूढ तिथीला जुळत नाही; परंतु वारही चुकीचाच आहे. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत संवत चुकीचा दिला आहे व तिथी ५ सोमवार दिली आहे. येथेही तिथीवाराचा मेळ नाही. पंतप्रतिनिधींच्या बखरीत तिथी वार शुद्ध १५ इंदूवार दिला आहे. मात्र यात "दादाजी कोंडदेव शके १५५६ त मयत झाले त्यावेळी शिवाजी महाराज यांचे वय १७ वर्षांचे होते." असे म्हटले आहे. येथे मृत्युचा शक चुकीचा आहे. फक्त एकाच शेडगांवकर बखरीत

"शके १५४९ प्रभव संवत्सर वैशाख शुद्ध ३ रोजी शनवार रोहिणी नक्षत्र कर्क लग्न" असा विस्तृत उल्लेख आहे. तेथे तिथी २ असावयास पाहिजे होती. कदाचित द्वितीया ही रविउदयाची तिथी असली तरी तृतिया नंतर लागली असेल; परंतु या बखरीतील बहुतेक कालांचे उल्लेख नीट तिथी, वार, तपापासून म्हणजे जंत्रीसारख्या साधनांच्या साह्याने सुधारून दिलेली दिसतात; परंतु यांत जी इतर माहिती दिलेली आहे तिला मात्र ही जन्मतिथी जुळत नाही.

सारांश, हे सर्वच उल्लेख प्रत्यक्ष साक्षीदारांच्या पुराव्यांच्या साह्याने केले गेलेले नाहीत तर केवळ अर्धवट दंतकथांवर आधारलेले आहेत. यात मात्र शंका नाही. जनतेच्या माहितीवर आधारलेल्या दंतकथांत जरी थोडाबहुत वास्तवबोध असला तरी त्यांची सजावट नेहमीच अवास्तव होते, असे बेंद्रे नमूद करतात.[११]

२. बखरकरांनी दिलेली शक, तिथी, मास, वार जरी भिन्न व चुकीचे असले तरी त्यांनी केलेले शिवाजी महाराजांच्या वयोमानाचे इतर उल्लेख तसे चुकीचे नाहीत. ते त्यांनी दिलेल्या जन्मतिथीला मुळीच जमणारे नसले तरी ते सत्य वस्तुस्थितीचे निदर्शक असल्याचे चिकित्सेनंतर प्रत्ययास येते. या उल्लेखात बखरी-बखरीत एकवाक्यता आहे हे विशेष. शिवाजी महाराजांच्या जन्मतिथी सांगणाऱ्या सर्वच बखरी जिजाई सात-आठ महिन्याची गरोदर असतांना ती जाधवरावांच्या काही हालचालींमुळे शिवनेरीस येऊन राहिली असे लिहितात. जाधवराव इ.स. १६२१ ला निजामशाहीतून मोगलांकडे गेले. ते परत निजामशाहीत इ.स. १६२१ मध्ये चाकरीस आले. इ.स. १६२३ मध्ये ते शहाजहानच्या बंडात सामील झाले असतांना मलिक अंबरकडे काही दिवस खुर्रमचा हस्तक म्हणून आश्रयार्थ होते. त्या अवधित खंडागळेचे प्रकरण उद्धभवले. त्यात जाधवरावांचा मोठा मुलगा मारला गेला व शहाजीराजेचा सर्वात वडील चुलत भाऊ संभाजीही मारला गेला. शाहाजीराजे चुलत भावाच्या मदतीस गेले व जखमी होऊन पडले. त्यामुळे जाधवरावाला दौलताबादेचा आसरा सोडून परत खुर्रमच्या गोटांत जावें लागले. नंतर इ.स. १६२४-२५ च्या भातवाडीच्या लढ्यांत सासरा-जावयाची गाठ पडावयाची तर जाधवराव भातवाडीत युद्धांत सामील न होतां आधींच आपल्या जहांगिरीत जाऊन बसले होते. खुर्रम उत्तर हिंदुस्थानात जातांच जाधवराव पुन्हा मोगली चाकरींत शिरले. त्यानंतर जाधवराव इ.स. १६२९ च्या निजामशाही

वाचविण्याच्या शाहाजीराजांच्या कटात सामील होऊन मोगलाई सोडून दौलताबादेस निजामाच्या दरबारी प्रथम भेटीस आले. तेव्हा त्यांना व त्यांच्या मुलांना भर दरबारात प्रथम भेटीस आले. तेव्हा त्यांना व त्यांच्या मुलांना भर दरबारात निजामशाहानें दग्याने २५ ऑगष्ट १६२९ रोजी मरल्याचे पाहून, आपला कट फसला असून दौलाताबादकर निजामशाही मुसलमान आपल्यासाठी दग्याने मारतील असे समजून शाहाजी आपल्या कुटुंबासह परेंडा गडात राहत होते. ते तेथून पुणें जहांगिरींत गेले व तेथून मोगलांशी संधान बांधून मोगली चाकरीत शिरले. इ.स. १६२९ च्या नोव्हेंबराच्या पहिल्या पंधरवाड्यांत शिवनेरीस संभाजी राजांच्या जयंतीशी लग्न लावून मोगलांकडे जाऊन आपल्या पांच हजारीचा सरंजाम व शंभूजीस एक हजारी घेतली.

सारांश, शाहाजीराजांनी आपल्या पत्नीला शिवनेरीत नेऊन ठेवण्यांत जर कांही जाधवरावाचा संबंध जोडावयाचा असेल तर तो इ.स. १६२९ मधी त्यांच्या मृत्युचा तत्पूर्वीचा नाही असे बेंद्रे म्हणतात.[१२]

३. शाहाजी महाराजांच्या या सुमाराच्या हालचालींचा विचार केला तर भातवाडीची लढाई झाल्यानंतर भाऊबंदकीमुळे शाहाजी राजांनी इ.स. १६२५ च्या सुरवातीस निजामशाही सोडून इ.स. १६२५ अखेर इभ्राहिम आदिलशाहीत 'सरलष्करी' पत्करली. मात्र आपल्या पुणे जहागिरींतून आदिलशाहीत जातांना त्यांना साबाजी चतूर यांचेशी वाटेत संग्राम झाला व जहागिरी जप्त झाली. ही 'सरलष्करी' शाहाजी राजांनी इ.स. १६२८ च्या पावसाळ्यापर्यंत तरी केली असे कागदपत्रावरून सिद्ध होते. अर्थात अशा परिस्थितीत जिजाईला शत्रुच्या म्हणजे निजामाच्या शिवनेरी गडात ठेवणे व तिने तेथे राहाणे अशक्य होते. जिजाई व तिचा तीन-चार वर्षाचा मुलगा संभाजी राजा शाहाजी महाराजांबरोबर विजापुरी गेल्याचेही याच बखरी सांगतात. अर्थात शिवाजीचा जन्म जर इ.स. १६२७ तील धरला तर तो विजापुरी किंवा कर्नाटकातील धरावयास लागेल, शिवनेरीस नव्हे.[१३] उलट जिजाईला संभाजीराजानंतर चार मुलें अल्पजीवी निपजली. यातील दोन तरी इ.स. १६२५ ते १६२८ मधी विजापुरच्या मुक्कामांतील असली पाहिजेत. यावरून या काळात म्हणजे इ.स. १६२५-१६२८ मध्ये शाहाजीने जिजाईला शत्रू मुलखात न ठेवतां बरोबर नेले होते, असेच अनुमान काढणे प्राप्त होते. हे मान्य केले म्हणजे शिवनेरीस जन्मलेला शिवाजी इ.स. १६२८ च्या

पावसाळ्यानंतरचा असा निर्णय घ्यावा लागतो. शिवाय शाहाजीचा मुलगा संभाजी याला दुधभातासाठी आदिलशाहाने फर्मान दिले. तेव्हा तो ३-४ वर्षाचा संभाजी मातेला सोडून आदिलशाहींत नेणे शक्य ठरणार नाही. अर्थात या काळात म्हणजे १६२८ च्या पावसाळ्यापर्यंत जिजाई बरोबरच होती, शिवनेरीस नव्हती.[१४]

४. शाहाजीराजे निजामशाही बुडाल्यानंतर महंमद आदिलशाहाकडे बारा हजारी 'फर्जंद' वजीर म्हणून गेले व आपल्या मुलाला व पत्नीला त्यांनी बोलाविले. त्यावेळी शिवाजीला ७ वर्षे होऊन गेली होती असे बखरी लिहितात. मोगल-आदिलशाला यांचा तह व आदिलशाहा व शाहाजी यांचा करार हे इ.स. १६३६ च्या उत्तरार्धातील आहेत. तहाप्रमाणें शाहाजीला रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकामध्ये घाईने जावे लागले. तहाप्रमाणें गडकोटांचा ताबा मोगली सरदारांनी त्यांच्या पश्चात घेतला व बादशाहाच्या आज्ञेप्रमाणें जिजाई वगैरेंना शिवनेरीवरून आपल्या सर्व जिनगी वगैरेसह उतरू दिले. प्रथम जिजाबाईला चौलांत ठेवावयाचा शाहाजीचा प्रयत्न होता; परंतु पोर्तुगीजांनी तिला त्यांच्या हद्दीतून नेऊन इतरत्र ठेवण्याची सूचना केली तेव्हा शाहाजीराजांनी शिवाजी-जिजाईला खेड (शिवापूर) ला पाठविलें. ती तेथे वर्षभर होती. त्या अवकाशांत सुभेदार दादाजी कोंडदेव याने शिवापूर पेठ वसविली. नंतर इ.स. १६३७ अखेर जिजाई शिवाजीसह कर्नाटकात गेली असे कागदपत्रावरून स्पष्ट आहे. अर्थात बखरींनी दर्शविलेले ७ वर्षांचे वय १६२७ च्या जन्मतिथीला जुळत नाही. उलट ती इ.स. १६३० चीच तिथी सूचित करते.[१५]

बखरी सांगतात की, दादोजी कोंडदेव वारले त्यावेळी शिवाजी १७ वर्षाचा होता. ज्या अर्थी दादोजी कोंडदेवांच्या मृत्युचा काळ १६४७ च्या मार्चनंतर व जुलैपूर्वीचा आहे. त्या अर्थी शिवाजी महाराजांची ही १७ वर्षाची वयोमर्यादा इ.स. १६३० च्या जन्मतिथीनेच बरोबर ठरते. इ.स. १६२७ च्या तिथीला जमत नाही, असे बेंद्रे सांगतात.

कॉस्मा द गार्डा याने आपल्या माहितीत, "This (Solapur expedition) was in the year १६६०, the १०th quarter of his conquest, and he was २९ years of age...." यावरून शिवाजी महाराजांची जन्मतिथी तत्काली इ.स. १६२७ ची नसून १६३० चीच प्रचारांत होती असे मानावे लागते, असे बेंद्रे सांगतात.

ब] शकावलीतील नोंदी :

१. जेधे शकावलीत "शके १५५१ शुक्ल संवत्सर, फाल्गुण वद्य त्रितिया शुक्रवार (१६ फेब्रुवारी १६३०) नक्षत्र हस्त घटी १८ पळे ये दिवसी राजश्री शिवाजी राजे शिवनेरीस उपजले."[१६]

२. शिवापुरकर देशपांडे वहींतील शकावलीतील उल्लेख, "शके १५५१ शुक्लनाम संवत्सरी फाल्गुन वद्य ३ शुक्रवार ये दिवसी राजे उपजले."

३. फोर्बस कलेक्शनमधील शकावलींत जेधे शकावली सारखीच नोंद आहे. शकावल्यांचे मूळ सरकारी दप्तरांतील निरनिराळी कुटुंबे आपापल्यापुरत्या म्हणजे तकरीर-करीनें तयार करण्यास पुरेशा नोंदी घेतात व त्यांत आपल्या कुटुंबातील माहिती घालून या शकावल्या संदर्भात ठेवितात. त्यामुळे साहजिकच हा अव्वल दर्जाचा पुरावा असल्याची खात्री पटते. विशेषतः अशा शकावल्या पेशवाई कालाच्याही मिळाल्याने व अशाच प्रकारच्या नोंदी सलतनतींतही केल्याचे दृष्टीत्पत्तीस आल्याने या शकावल्यांचा अव्वल पुरावा म्हणून जो दर्जा होता तो नंतर अभ्यासूंच्या चांगलाच निदर्शनास आला, असे बेंद्रे सांगतात.[१७]

क] इतर नोंदी :

(१) कविंद्र परमानंदाने शिवजन्मकालाबाबतचे बरेच उल्लेख केले आहेत. त्याने 'अनुपुराण' तथा 'शिवभारत' यामध्ये तो लिहितो, "ज्याप्रमाणे पार्वतीने शंकराची सेवा केली, त्याप्रमाणे जाधव कुलात उत्पन्न झालेली, चंद्राप्रमाणे सुंदर मुख असलेली व सुंदर दांत असलेली जिजाई शाहाजी महाराजांची सेवा करी... त्याला तिच्यापासून सहा शुभलक्षणी पुत्र झाले. त्यांपैकी शंभू व शिवाजी हे दोघेच काय ते वंशवधक झाले."[१८] (२१ व २३ श्लोक) यावरून विचार करिता इ.स. १६२१ (संभाजीचा जन्म इ.स. १६९३ चा असे बखरकार सांगतात) ते १६३० मध्ये सहा मुलें झाली. त्यांतील इ.स. १६२५ ते १६२८ च्या दरम्यान तीन वर्षात एखाद दोन तरी विजापुरी 'सरलष्कर' असतांना होऊन गेलेली असली पाहिजेत. यावरून जिजाई शाहाजी महाराजांबरोबर आदिलशाहींत इ.स. १६२५ अखेर होती असे मानणें भाग पडते. त्यावेळी संभाजीची वयोमर्यादा दुधभात खाण्याइतकी म्हणजे ३-५ वर्षाची असली पाहिजे असे बेंद्रे सांगतात.

शिवाजीचा जन्म शिवनेरीवर का झाला? याचे कारण सांगताना परमानंदने जे लिहिले त्याचा उल्लेख बेंद्रे पुढे असा करतात, "सूर्याप्रमाणें प्रतापी असा मलिक अंकर बर्बर हा अस्तंगत

झाला आणि निजामशाहाला दुसरा चांगला प्रधान न मिळाल्यानें त्याचें राज्य कसे टिकतें याची शंका उपस्थित झाली. तसेच दैववंशात चतुर इब्राहीम आदिलशाहा हा दिवंगत होऊन त्याचा उन्मत्त मुलगा महंमदशाहा त्यांच्या गादीवर आला इकडे शहाजहान हा दिल्लीचा बादशाहा झाला आणि त्याचे सैन्य दक्षिण जिंकण्यासाठी मोठ्या घमेंडीने आले. अशावेळी आपला पुरातन संबंध ओळखून निजामशाहाचें कल्याण करण्याच्या इच्छेने बलाढ्य शाहाजी राजा विजापूर सोडून त्याचेकडे आला."[१९]

शाहाजीचे महंदमशाहाशी न पटल्यामुळे व विशेषतः निजामशाही मोगलाच्या घशांत जाऊ देऊ नये म्हणून शाहाजी व जाधवराव निजामशाहींत आल्यानंतर निजामाच्या मंत्र्यांनी जाधवरावाचा खून केला हे सांगतांना कवींद्र लिहितात-

"(अशा स्थितीत) अत्यंत तेजस्वी जाधवराव एकदा त्यास मुजरा करण्यास आला असता त्या दुर्बुद्धी निजमाशाहानें त्याचा अपमान केला. निजमाशाहाकडून असा अपमान झाला तेव्हा त्या महामानी व बाणेदार जाधवरावास फार संताप झाला. मग दमीदाहद दुष्ट बेत अगोदरच सांगून ठेविला होता. त्यांनी मस्त हसतीप्रमाणे संतापाने फिरणाऱ्या जाधवरावास सभागृहाच्याच द्वारापाशी घेरलें. आपले पुत्र, अमात्य, बांधव यांसह तेथें पुष्कळ लोकांशी लढतां लढतां त्याने स्वर्गलोकाची वाट धरिली." (श्लोक २६-३०)

अशा तऱ्हेने जाधवराचा खून भर दरबारांत केल्यामुळें शाहाजी महाराजांनी निजामास मदत करण्याचें सोडलें. त्यानंतरची परिस्थिती : "आपला सासरा जाधवराव याची झालेली दशा ऐकून कीर्तिशाली राजाने निजामास साह्य करण्याचें सोडून दिले." (श्लोक ३३)

"त्याच्या आणि दुष्ट हमीद खानच्या सल्याने जेव्हा निजामशाहाने जाधवरावास ठार मारविलें तेव्हापासून शाहाजीप्रभृति सर्व राजे व मुसलमान सरदार यांची मनें विटून गेली. विश्वास उडाल्याने, संताप आल्यानें व भीतीमुळें कित्येक आदिलशाहास जाऊन मिळाले, कित्येकांनी दिल्लीच्या बादशाहाचा आश्रय केला, कित्येक क्रूर मनाचे लोक विरोध करुं लागले आणि कित्येकांनी तर आपण तटस्थ आहोत असे दाखविले." (श्लोक ४८-५१)

अशा तऱ्हेने निजामशाहीची वाताहात झाली तेव्हा शाहाजी महाराज आपल्या पुणे जहागिरींत आले व मोगलांकडे चाकरीप्रित्यर्थ जाण्याच्या खटपटींत होते. त्या काळात संभाजीराजे व जयंती यांच्या लग्नाचा समारंभ व जिजाईस शिवनेरीवर ठेविल्याची हकीकत

सांगताना कवींद्र पुढीलप्रमाणे लिहितात असे बेंद्रे म्हणतात, "(याच्या) दरम्यान विश्वासरावाच्या कुळांतील सिद्धपालाचा मुलगा शंकरभक्त, कर्तृत्ववान, सुप्रसिद्ध व अत्यंत वैभवशाली विजयराजा हा निजामशाहाचा अत्यंत विश्वासू असून तो शिवनेरी किल्यावर राहात असे. त्यास आपली जयंती नावाची मुलगी शाहाजीचा पुत्र संभाजी यास अनुरुप आहे असे वाटलें. शाहाजी राजांस सुद्धा तो संबंध अत्यंत श्लाध्य वाटून त्याने आपल्या मुलासाठी जयंतीची मागणी त्याजपाशीं केली. पुढे विजयराजा अणि शाहाजी राजा या दोघांच्या संबंधास साजेसा मोठा समारंभ झाला." (श्लोक १०-१४)

"नंतर काही दिवसांनी तो समारंभ आटोपल्यावर व्याह्याच्या संमत्तीने आपल्या गरोदर पत्नीस स्वजनांसह त्याच किल्ल्यावर ठेवून शाहाजी राजे दर्याखानास जिंकण्यास निघाले." (श्लोक १७-१८)

इ.स. १६२९ च्या पावसाळ्यांत शाहाजी महाराज पुणे जहागिरींत आले. त्यावेळी चातुर्मास लागला होता. तो ऑक्टोबर अखेरीस संपला. दरम्यान शाहाजी महाराजांचे करामदार ठरले व ते मोगलांकडे नव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात गेले. यावरून जाधवराव पाठीशीं लागल्यामुळे नव्हे तर जाधवरावाचा खून झाल्यामुळे निजामी मंत्र्याच्या सूडार्थ त्यांनी मोगलाकडे जाण्यापूर्वी संभाजी-जयंतीच्या लग्नास जिजाईस शिवनेरीव वऱ्हाडियांसह म्हणजे स्वजनांसह नेली होती.[२०]

शिवजन्म वेळेसंदर्भात कवींद्र परमानंद लिहितो की, "शालीवाहन शके १५५१ शुल्कनाम संवत्सरी उत्तरायणांत शिशीर ऋतुमध्ये फाल्गुन वद्य तृतियेला रात्री शुभ लग्नावर, अखिल पृथ्वीचे साम्राज्यवैभव व्यक्त करणारे... तिनें अलौकिक पुत्ररत्नास जन्म दिला." (श्लोक २६-३१)

(२) शिवराम ज्योतिषी यांनी केलेली शिवाजी महाराजांची कुंडली सापडली आहे. शिवराम ज्योतिषी शिवाजी महाराजांना समकालीन होते. या कुंडलीमध्ये "संवत १६८६ (शके १५५१) फाल्गुन वद्य ३ शुक्र उ.घटी ३०।९ राजा शिवाजी जन्मः र. १०।३३ ल.४१२९" अशी माहिती दिली आहे. ही माहिती अनुपुराण तथा शिवभारतातील उल्लेखाला तंतोतंत जुळणारी आहे, असे बेंद्रे सांगतात. सारांश, हे समकालीन तीन्हीही साक्षीदार एकामताने "फाल्गुन वद्य ३" अशीच जन्मतिथी सांगतात. ही जन्मतिथी तत्कालीन वयोमानाच्या उल्लेखांना मिळती आहे.

(३) बेंद्रे पुढे लिहितात की, विशेषतः अव्वल पत्रांचा आणि तोही खास शाहाजी महाराजांच्या पत्रांचाच विचार केला तर शाहाजीराजे निजामशाही सोडून इ.स. १६२५ च्या जून पूर्वी आदिलशाहीस मिळाले. विजापुरकडे जात असल्याची बातमी लागताच निजामशहाकडून पाठलागार्थ साबाजी चतुर यांच्या नेतृत्वाखाली सैन्य गेले व फलटणजवळ लढाईही झाली. त्यानंतर शाहाजीने संभाजी व आपल्या सर्व कुटुंबासह आदिलशाहीत सरलष्करी गाजविली. ते तेथे १६२८ च्या पावसळ्यापर्यंत होते. जर शाहाजीबरोबर जिजाबाई गेली नसती तर तिला १६२६ सालामध्ये किंवा नंतरमूल होणे शक्य नव्हते. जर झालेच असेल तर ते आदिलशाहीत होणे रास्त होते. शिवनेरीवर मुल व्हावयाचे तर शाहाजी व जिजाई निजामशाहीत येणे जरूर होते. त्याप्रमाणे ती इ.स. १६२८ च्या पावसाळ्यांत निजामशाही पराड्यांत आली. मात्र पुणे जहागिरींत ती १६२९ च्या जुलैनंतर परत आली. जाधवरावाच्या मृत्युप्रसंगी ती दोन तीन महिन्यांची शिवाजीच्या खेपेने गरोदर असावी. इ.स. १६२९ च्या नोव्हेंबरमध्ये आपल्या मुलाच्या म्हणजे संभाजीच्या विवाहाच्या निमित्ताने ती शिवनेरीस गेली. त्यावेळी ती ७-८ महिन्याची गरोदर असावी. याचवेळी शाहाजी राजांनी खांदेपालट केली व ते मोगलांकडे गेले. त्यामुळे गरोदर स्त्रियां आपल्या भावाचा मेव्हणा व मुलाचा सासरा जो शिवनेरीचा सुभेदार याच्या संरक्षणाखालीं ठेवून शाहाजी महाराज स्वारीवर गेले. अशा वस्तुस्थितींत शाहाजीराजांच्या शिवजन्मापूर्वीच्या (१६२७ पूर्वीच्या) म्हणजे दोन वर्षाच्या गैरहजेरीत जिजाईला शिवनेरीवर मूल झाले अशी कल्पना करणे निषेधार्य ठरते. तेव्हा फाल्गुन वद्य ३, शके १५५१ (१९ फेब्रुवारी १६३०) शुक्रवार रोजींच शिवाजीचा शिवनेरीवर जन्म झाला. हीच घटना वास्तवबोधी ठरते, असे बेंद्रे ठामपणे सांगतात.[२१]

४.४ शिवाजी महाराजांचे बालपण

शिवाजी महाराजांच्या बालपणाविषयीची माहिती देतांना बेंद्रे सांगतात की, "शिवाजी महाराजांच्या बालपणाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी गडावर झाला. नंतर तीन-चार महिन्यांनी शाहाजी महाराजांनी बाल शिवाजीचे मुखावलोकन विधियुक्त केले. पुढे वर्षे दिड वर्षे हे सर्व कुटुंब शिवनेरीवरच एकत्रित होते; परंतु त्यानंतर शाहाजी महाराज व संभाजी मोगलांशी झगडा देण्यातच गुंतले होते. इ.स. १६३६ च्या अखेरीस ७ व्या वर्षी शाहाजी महाराजांनी त्यांना कंपिलीस नेले. अक्षरओळख व जुजबी गणित त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे शिकविले. त्याकाळी एवढेच काय ते शिक्षण 'अध्ययना'खाली त्रैवर्णिकांना दिले

जात होते; परंतु वडिलांच्या व्यावहारिक अनुभवाचा मुलांना पूर्ण वाटा घेता येत होता. इ.स. १६४० च्या अखेरीस शिवाजी महाराज यांचे लग्न निंबाळकर पवार यांच्या जिऊबाई नावाच्या मुलीशी झाले. तिचे सासरचे नाव सईबाई असे ठेविले. इ.स. १६४२ त शिवाजी महाराजांची खानगी पुणे-सुपें जहांगिरीवर, त्यांच्या १२ व्या वर्षी झाली. सईबाईला प्रथम तीन मुली झाल्या. त्यांची नावे सकवारबाई, राणुबाई व आमणिका किंवा अंबिकाबाई आणि सईबाईला चवथे व शेवटचे अपत्य म्हणजे युवराज संभाजी झाले.[२२] संभाजी व खासा शाहाजीराजेही आपल्या दहा वर्षाच्या सुमारास स्वतंत्रपणें युद्ध व कारभार करू लागले होते. शाहाजीस त्यांचा थोरला चुलत भाऊ संभाजीराजे भोसले याचा सुरुवातीस आधार होता.[२३]

शिवाजी महाराजांच्या बालपणातील ज्या एक दोन हकीकती बखरकारांनी सांगितल्या त्यांची चिकित्सा करून बेंद्रेंनी त्या खोडल्या आहेत. ज्यामध्ये दादोजी कोंडदेव हे शिवाजी महाराजांचा विद्याभ्यास घेत होते, विजापुरी गेल्यावर ३-४ वर्षात गोवधाबाबत त्यांचा कसायावरील रोष, यवनांचा द्वेष व आदिलशाहाचा अपमान या हकीकती होते. ह्या सर्व हकीकती अवास्तव केवळ काल्पनिक असल्यामुळे त्या देण्याचे बेंद्रेंनी आपल्या ग्रंथात टाळले आहे.

"दादोजी कोंडदेव शिवनेरीस नव्हते. त्यांची नेमणूक इ.स. १६३६ नंतर झाली. इ.स. १६३७ त शिवाजी महाराज खेडशिवापुराला होते; परंतु दादोजी कोंडदेव आदलिशाही तर्फे, शाहाजीराजांचे मुतालिक म्हणून आपल्या सुभ्यावर कोंडाण्यात राहत होते. इ.स. १६३८ ते १६४२ अखेरपर्यंत शिवाजीराजे कंपिलीला होते व तेथे शाहाजी महाराजांच्या पदरीं पंडित वगैरे होते. दादोजी कोंडदेव मावळांत होते. लावणी संचणीच्या कामात गुंतले होते." सारांश, दादोजी कोंडदेव हे शिवाजीच्या विद्याभ्यास घेणारे पंतोजी नव्हते.[२४] असे बेंद्रे सिद्ध करतात.

बाकींच्या हकीकती संदर्भात स्पष्टीकरण देतांना बेंद्रे लिहितात, "कंपिली हे गांवच शाहाजीराजांचे संभाजी पुढे पुष्कळ वर्षे कार्य करीत असल्याचे कागदोपत्रीं पुरावे असल्यानें शिवाजीला बादशाहाकडे नेण्याचे कारण नव्हतें. खासा शाहाजी महाराज रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकात सारखे गुंतले असल्यानें त्यांचीही महिनेच्या महिने बादशाहीची भेट घेण्याची शक्यता नव्हती. पावसाळ्यांत निवाऱ्यास आल्यावर बादशाहाच्या भेटीस जाणें तत्कालीन दळणवळणाच्या परिस्थितीत अपेक्षित असण्याचें कारण नाहीं." सारांश गोवध, विरोध व

मुसलमानांच्या द्वेषाला कंपिलीत तरी कारण मिळण्यासारखें नव्हते आणि आदिलशाहाच्या अपमानाला भेट होण्याचाच संभव नसल्यानें वाव नव्हता. या कथा कितीही पाल्हाळानें सजविलेल्या असल्या तरी त्या १९ व्या शतकांतील मनःस्थितीचा बोध करून देतात.

४.५ शिवाजी महाराजांचे शिक्षण

शिवाजी महाराजांच्या शिक्षणाविषयी सांगताना बेंद्रे लिहितात की, "शिवाजीस शिवापुरच्या कुलकर्ण्यांचे मावस चुलते राजश्री महादेवभट महाभास हे गुरू होते. शाहाजी, संभाजी व एकोजी संस्कृतात 'समस्या' घालण्याइतके संस्कृत भाषेचे जाणकार होते. अशा परिस्थितीत शिवाजीस अक्षरओळख झालेली नव्हती असे म्हणणें अवास्तवतेचे प्रतिकच समजलें जाईल. मात्र यावेळी एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे ती म्हणजे शिक्का मोर्तब किंवा ठराविक निशाणीला जी किंमत होती ती 'सही' ला नव्हती, असे बेंद्रे लिहितात. तरीही शिवाजीने आठवणीकरिता तळहातावर नाव गाव लिहून घेतल्याची साक्ष इंग्रजी पत्रव्यवहारात मिळते. ज्याअर्थी शिवाजीला हा संस्कार झाला होता, महादेवभट महाभास गुरूजी झालेले होते त्याअर्थी त्यांच्यावर निरक्षरतेचा शिक्का मारणे म्हणजे तत्कालीन वस्तुस्थितीचें अज्ञान प्रकट करणें होय. या विषयावर बराच वाद माजला होता. दादोजी कोंडदेव हे शिवाजीचे गुरू नव्हते. "शास्त्राप्रमाणे पिता म्हणजे शाहाजी, अक्षरओळख करून देणारे हे महादेवभट विद्यागुरू, गुरुमंत्र देणारे महाबळेश्वरचे प्रभाकरभट उपाध्याय हे मंत्रगुरू होते, याखेरीज राजाभिषेकाचा मंत्र देणारे गागाभट हे राजगुरू होते. बाकीचे साधुसंत वगैरे सामान्य उपदेशक होते."[२५]

पुण्यास परत येण्यापूर्वीच शिवाजींनी लिपिग्रहण केले होते. हे परमानंदाच्या पुढील उक्तीवरूनच स्पष्ट आहे. 'ततसतं तनयं वीक्ष्य सगुणं सप्तहायनम्। (१६३७ इ.) लिपिग्रहणयोग्योडयमिति भूपोव्यचिन्तयत्।।७०।।' पंतर प्रधानांच्या समवयस्क मुलांबरोबर शिवाजीला गुरूच्या मांडीवर बसवून अक्षरलेखनास सुरुवात केली व तो शीघ्रगतीने शिकला. पुढे शिवाजीस कोणत्या विद्या व कला शिकविल्या यांचे वर्णन येते. "श्रुतिस्मृतिपुराणेषु भारते दंडनीतिषु। समस्तेश्वपि शास्त्रेषु काव्ये रामायणे तथा।।३४।। व्यायामे वास्तुविद्यायां हेरासु गणितेश्वपि। धनुर्वेदचिकित्सायां मते सामुद्रिके पुनः।।३५।। तासु तासुच भाषासु छन्दसु च सुभाषिते। चर्यास्विभरथाश्वानां तल्लक्षणेश्वपि।।३६।। आरोहणे प्रतरणे चक्रमे च विलंघने। कृपाणचापलक्रेषु प्रासपट्टिशशक्तिषु।।३७।। युद्धे नियुद्धे दुर्गाणां दुर्गमीकरणेषु च।

दुर्लक्ष्यलक्ष्यवेधेषु दुर्ग माभिगमेश्वपि।।३८।। इंगितेषु च मायासु निषनिर्हरणादिषु। तत्तद्रत्नपरीचायामवधाने लिपिश्वपि।।३९।। प्रविणःस स्वयं तांस्तान् गुरून् गुरुयशोभरैः। अयोजयत् भृशं तत्तत् प्रत्यभिज्ञानवान् विभुः।।४०।।" ही सर्व शिक्षा अगदी आवश्यक व राजव्यहारोपयोगी होती यात शंका नाही, गागाभट्टांनी शिवाजी महाराजांच्या विद्याप्रचुरतेची साक्ष इ.स. १६६४ च्या सुरुवातीस दिली आहे. "विश्राणनेषु व्यसनं यदीयं। विद्याप्रसंगेषु विनोदसौख्यम्। यस्त्रावदातं व सशोवितानं। दिग्मंडलीमंडपमातनोति।।७।।" शिवाजीच्या अनेकविध शिक्षणात अनुभवपूर्ण ज्ञानप्राप्तीची सोय होती आणि हीच पद्धती परंपरागत चालत आली होती.[२६]

शिवाजी महाराज सात आठ वर्षाचे असताना त्याकाळी त्यांच्या आंगवळणी पडलेली वागणूक ताई अत्रेबरोबरीच्या संभाषणात दृष्टीत्पतीस येते. लहानपणी समजावयास लागल्यापासून घरकामांत लक्ष ठेवण्याची शिकवण अनुभवानें मिळविण्याची सोय होती. त्यामुळे शाहाजी, संभाजी, शिवाजी आणि संभाजी हे लहानपणापासून कारभारांत लक्ष घातल्याचे दिसून येते. त्यांना वळण लावण्यास उपाध्ये पंडित, पुराणिक परंपरेने सांभाळले जात होते आणि म्हणून ही मराठे-क्षत्रीय घराणीं सुसंस्कृत व राजकारभारात व युद्धशास्त्रांत सहजच तरबेज होती, असे बेंद्रे म्हणतात. जहांगिरीची सांभाळणूक वगैरेंतील शिक्षणानुभव शिवाजी महाराजास त्यांच्या मातेकडूनच मिळाले होते. मोठे झाल्यावरही शिवाजी महाराज आपल्या मातेच्या मार्गदर्शनाखाली अपेक्षा करीत होते.

शिवाजी महाराजांच्या बालपणांतील प्रसंगाची काही चित्रे सजविली आहेत ती पूर्णतः अवास्तव आहेत. शाहाजी महाराजांजवळ शिवाजी कर्नाटकात जाण्यापूर्वीपासूनच अनेक शास्त्री-पंडित दिमतीस होते. त्या विद्वानानी शिवापुरांत अक्षर ओळख झाल्यानंतर शिवाजीस उच्च शिकवण दिली असलीच पाहिजे. त्याचप्रमाणे इतर घोड्यावरील रपेट, तलवार, भाला मारणे वगैरेचेंही शिक्षण मिळालेंच होते. एका अर्धवट इतिहासकारानें शिवाजी राजे घोड्यावर बसत नसत असे विधान केले आहे. समकालीन व नंतरच्याही उल्लेखांत शिवाजी अश्वारूढ होऊन स्वारीस गेल्याचे वगैरे कितीतरी उल्लेख आहेत. त्याचप्रमाणे मुसलमान खाटिक गोहत्या करतात म्हणून दरबारांत अपमानास्पद वर्तन केले असे सांगतात. त्याकाळी दक्षिणेत दुधाचे साधन म्हणजे फक्त गाईच होत्या. म्हशीची आयात फार उशिरा होऊं लागली. इतकेच नव्हे तर मांस खाण्याची

फारशी सोय नव्हती. त्यांचा मुक्काम कंपिलीलाच होता. सरदार मुजऱ्यासाठीं आपल्या निवडक सैन्यानिशी ठराविक वेळी जात. राजधानीत सैन्य व सेनापती ठेवण्याइतकी सोय नव्हती. मुख्यतः पाण्याचाच अभाव असे. शाहाजीराजे अशा मुजऱ्याला गेले नव्हते म्हणून आदिलशाहाचा रोष इ.स. १६४४ पूर्वीच झाला होता. तो घालविण्याकरिता आदिलशाहाने खास लिहिले होते की, आम्ही जे तुम्हास बोलाविले ते इतरांप्रमाणे बोलाविले तरी संतोष ठेवावा. मनांत बाका धरू नये. त्यानंतरही असाच प्रसंग झाला होता. शाहाजीच्या सुटकेनंतर तर शाहाजीनें दहा मैलावरून मुजरा करावयाचा करार करून घेतला होता. सारांश, शाहाजीराजेच जर दरबारी विशेष कारणांखेरीज जात नव्हते तर शिवाजीला कंपिलाहून रोज दरबारांत कोण नेणार? सारांश जो काही अवास्तव मजकूर बखरकारांनी दिला आहे. त्याला थोडेसुद्धा ऐतिहासिक मूल्य नाही, असे बेंद्रे सांगतात.

४.६ शिवाजी महाराजांचे वैवाहिक जीवन :

वा. सी. बेंद्रे शिवाजी महाराजांच्या वैवाहिक जीवनाबद्दल माहिती सांगतात की, शिवाजी महाराजांचे पहिले लग्न निंबाळकर पवारांच्या कन्येशी झाले याबद्दल तत्कालीन पुरावे आहेत. तशाच शिवाजी महाराजांच्या गायकवाड, जाधवराव व इंगळे यांच्याशी सोयरिका याच अनुक्रमाने झाल्या याबद्दलही शकावल्यामध्ये विश्वसनीय नोंदी आहेत. मोहित्यांच्या सोयराबाईशी झालेल्या लग्नाबद्दलही वाद नाही; परंतु बाकी राहिलेले एक लग्न व दोन दासी यांच्याबद्दल विश्वसनीय पुरावा नाही.

शिवाजी महाराजांचे दुसरे लग्न पालकरांच्या कन्येशी म्हणजे सगुणाबाईशी झाले. हे लग्न शिवाजीराजांनी पुणे सुप्याचा कारभार हाती घेताच; परंतु दादाजी कोंडदेवांच्या संमतीनेच केलेले असावे. सगुणाबाईपासून झालेली मुलगी गणोजी शिर्केस इ.स. १६६१ च्या सुमारास दिली असणे स्वाभाविक आहे. हिचे सासरचे नाव 'राजकुंवरबाई' असे समजते.

शिवाजी महाराजांची तिसरी सोयरीक गायकवाडांशी केली. ही सोयरीक १५ ऑगस्ट १६५६ रोजी ठरली व १० जानेवारी १६५७ रोजी त्यांची कन्या सकवारबाई हिच्याशी लग्न झाले. हिला कमलाबाई नावाची मुलगी झाली. कमलाबाईला नेताजीच्या मुलास दिली व तिचे सासरचे नाव सकवारबाई असेच ठेवले असावे. शिवाजी महाराजांचे चौथे लग्न जाधवराव यांच्या कन्येशी ८ एप्रिल १६५७ रोजी झाले. हिचे नाव काशी असे असावे. बखरीत तसा उल्लेख आढळतो. काशीबाई ही ६ फेब्रुवारी १६७४ रोजी पाचाडात वारल्याचे उल्लेख आहेत. हिला मुलबाळ होते

की नव्हते हे नक्की समजत नाही. शिवाजी महाराजांचे पाचवे लग्न १५ एप्रिल १६५७ रोजी इंगळे यांच्या मुलीशी झाले. तिचे नाव पुतळाबाई असावे. 'पुतळाबाईने शिवाजीराजांच्या मृत्युनंतर २७ जून १६८० रोजी अग्निप्रवेश करून ती सती गेली'. हिला ही मुलबाळ नसावे. शिवाजी महाराजांचे सहावे लग्न मोहित्यांच्या मुलीशी झाले. हे लग्न केव्हा झाले हे समजत नाही. बहुधा सईबाईच्या मृत्युनंतर ते झाले असावे. हिचे नाव सोयराबाई असे होते. सोयराबाईला एक मुलगा व एक मुलगी झाली. पहिला मुलगा त्याचे नाव राजाराम, यांचा जन्म २४ फेब्रुवारी १६७० रोजी झाला. मुलीचे नाव दादुबाई किंवा याळीबाई होते असे सांगतात. हिची जन्मतिथी सापडत नाही.

शिवाजी महाराजांना सहा बायकाव्यतिरिक्त दोन उपस्त्रिया किंवा नाटकशाळा होत्या. कोणी त्यांचे नावे लक्ष्मीबाई व गुणवंतीबाई अशी देतात. या उपस्त्रियांबद्दल निश्चित अशी काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही.[२७]

४.७ शिवाजी महाराज व जिजाबाईच्या पुण्यात आगमनासंबंधी बेंद्रेंचे लिखाण

शिवाजी महाराज व जिजाबाई यांच्या पुणें जहांगिरीतील पुनरागमनाची कारणमीमांसा:

सभासद :

सभासदानुसार दादोजी कोंडदेव बेंगरुळला गेले. कारण यावेळी शाहाजी बेंगरुळला होते व दादाजी येतांना शिवाजी महाराज व जिजाबाईस सोबत घेऊन आले.[२८]

मीमांसा - बेंद्रेनुसार ही माहिती चुकीची आहे. कारण दादोजी कोंडदेव आदिलशहाचे सुभेदार म्हणून काम पाहात होते. त्यांच्याच पत्रांवरून दादाजी इ.स. १६४१-४२ त मावळांतच होते. त्याचप्रमाणे शाहाजीला बंगलूरचा सुभा इ.स. १६४४ नंतर मिळाला.

चित्रगुप्त :

(१) यांच्या नुसार शाहाजीचा भाऊ "शरीफजी मोगलाईत वजिरी करुं लागले" असे आहे.

मीमासा - बेंद्रेनुसार शरीफजी निजामशाहीत असतांना इ.स. १६२४ मध्ये भातवाडीच्या लढाईत मारला गेला होता.

(२) "शाहाजी राजे यांजकडे सरंजामांत पुणें व इंदापूर हे दोन परगणे असोन तेथे दादोजी कोंडदेव म्हणोन कारकून... ठेविले होते..."

बेंद्रे - हे परगणे शाहाजीकडे जहांगिर म्हणून होते, सरंजाम म्हणून नव्हते. शिवाय दादोजीकडे इंदापूर परगणा कधीच दिला गेला नव्हता. तो शाहाजीचा मेव्हणा संभाजी मोहिते याजकडेच होता. रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐवजी 'रघुनाथपंत बोकील सबनीस' असे लिहिले आहे.[२९]

शेडगांवकर भोसले बखर :

या बखरीनुसार शिवाजी महाराज पुण्यातच होते, कर्नाटकात गेले नव्हते. असा समज निर्माण करणारा मजकूर आहे.

बेंद्रे - शिवाजीच्या प्रत्यागमाबद्दल काहीच उल्लेख येत नाही.

मराठी साम्राज्याची छोटी बखर :

(१) शिवाजी कर्नाटकात गेलेच नव्हते असा अर्थ निघतो. तसेच तो पुढे लिहितो की, मुरार जगदेव विजापुरास गेले. त्यांच्यासोबत शाहाजीराजेही गेले. जातांना दादोजीपंताच्या स्वाधीन मुलुख दिला व सांगितले की, चिरंजीव व स्त्री शिवनेरीस आहेत तेव्हा आपल्यापाशी महाल बांधून त्यांना आणून अन्नवस्त्र देऊन शिवाजीस शाहाणे करावे.

दादोजीपंतानी शिवनेरीहून जिजाबाई व शिवबास आणून पुणे बसविले व लाल महाल बांधला आणि माता पुत्राला त्यात ठेविले.

बेंद्रे - या उल्लेखातील मुऱ्हार जगदेवाचा संबंध इ.स. १६३३ च्या सुमाराचा आहे. शाहाजी महाराज निजामशाहीची आशा सोडून रणदुल्लाखानाबरोबर इ.स. १६३६ अखेरीस गेले तेव्हा शाहाजीनें दादाजीस आपल्या सरंजामाच्या कारभारासाठी मुनिम व रणदुल्लाखानानें त्यास सरंजामी सुभ्याचा सुभेदार नेमले. नंतर शिवनेरीगड खाली करून दिला.

इ.स. १६३० त मुऱ्हार जगदेवानें पुणे लुटून जाळून कसब्यावर गाढवाचा नांगर फिरविला होता. त्यामुळे शिवाजी-जिजाईस त्या जमिनीची विधियुक्त शुद्धी झाल्याशिवाय तेथे जाऊन राहाणे अशक्य होते. म्हणून शिवाजी-जिजाईस खेडशिवापुरी पाठविले. त्यावेळी दादोजी कोंडदेव कोंडाणा गडावर राहात होते. यांची सुभेदार म्हणून दादोजीने व्यवस्था केली.

शाहाजीने कंपिलीस वाडा, बाग वगैरे केल्यावर एका वर्षात म्हणजे इ.स. १६३७ च्या उत्तरार्धात तिकडे नेले. त्यानंतर शाहाजी व मुहंमद आदिलशाहा यांच्यात वाकडेपणा येऊ लागताच इ.स. १६४० नंतर शाहाजीने दादोजीस पुण्यास शांती करून तेथे पुन्हा वस्ती व लाल

महाल वगैरे बांधावयास सांगितले. हे तयार होता इ.स. १६४२ च्या उत्तरार्धात शिवाजीला पुण्यास रवाना केले.

यावरून या बखरीच्या कालनिर्देशात विपर्यस्तता आली असल्याने या प्रसंगामागील कार्यकारणभाव सहज अवास्तव आला आहे.[३०]

(२) "जाधवरावावरचा राग काढून शाहाजीने दुसरे लग्न केले, त्यांनी मोहिते यांच्या कन्येशी लग्न करून शिवाजी व जिजाई यांचा त्याग केला. तोंड पाहणार नाही म्हणून बोलले. पुण्यामध्ये दादोजीपंतानी जिजाबाई व शिवबाचा सांभाळ करून राज्य चालविले..."

बेंद्रे - हे दुसरे लग्न इ.स. १६२६ पूर्वीच झाले होते. त्यानंतर जाधवराव इ.स. १६२९ मध्ये मारले गेले. त्यामुळे शाहाजी राजे आपल्या जिजाई-संभाजी-शिवाजीसह इ.स. १६३६ अखेरपर्यंत एकत्र होते. या लग्नानंतर एकटे शिवाजीच जन्माला आले असे नाहीं तर एक मुलगीही झाली. इ.स. १६३७ ते १६४२ पर्यंत पुन्हा कर्नाटकात एकत्र होते. इ.स. १६४१-४२ मध्ये शिवाजीचे फळटणकर नाईक निबांळकर पवारांच्या मुलींशी लग्न लावून देऊन सईबाईचें सुनसुखही पाहिले.[३१]

(३) "....दादोजीपंतानीं.... कसबे खेडेबारे येथे शिवापुर पेठ वसविली. पातशाही झाडें इरसाल शाहाजी राजे यांचे नावे लावून त्याचा एक आंबा घेतला होता म्हणून आपला हात तोडीत होते. मग लोकांनी अर्ज करून अस्तनी कमी केली. हे वर्तमान शाहाजी राजे यांस विदित झाले. त्याने शिरपाव पाठविलें तेव्हा अस्तनी दूर केली...."[३२]

बेंद्रे - दादोजीची बाही घोरपडे बंधूनी, ते शिवाजीला अप्रत्यक्षपणें बंडखोरीत साहायक झाले. म्हणून इ.स. १६४३ त कापली होती. आंब्याची बाग दादोजीच्या मृत्युनंतर लावण्यात आली. त्यावेळी खेड्यांत आंबे विक्री होत नव्हती आणि शिवापुरच्या आंब्याची बाग गावकऱ्यांना त्यावेळी मोकळी असतांना मूळ कारण सोडून दादोजींची नीतिमत्तेची कथा रचण्यांत वास्तवबोध कसा चालणार?

सारांश, या बखरकाराला शिवाजीच्या पुनरागमनाची यात्किंचितही कल्पना नसल्यानें त्याने भरमसाट व सामान्य व्यवहारालाही न पटणारा असा मजकूर दिला आहे.[३३]

९१ कलमी बखर :

९१ कलमी बखरीतील मजकूर अक्षरशः मराठा साम्राज्याची छोटी बखरी सारखाच आहे.

न्यायशास्त्री पंडितराव यांची बखर :

शिवाजी-जिजाई कर्नाटकांत जाऊन परत आल्याबाबतचा काहीच उल्लेख आलेला नाही.

मल्हार रमाराव चिटणीस (श्री शिवछत्रपतीचे सप्त प्रकरणात चरित्र)**:**

या ग्रंथात कालनिश्चितीच्या दृष्टीनें फारच गोंधळ केला आहे. शिवाजी बापाबरोबर विजापुरी राहात नव्हता तर कंपिलीत राहात होता, हे माहित नव्हते.[३४]

शिवदिग्विजय :

साबाजी अनंत, मलिक अंबर, मुरापंत, मीर जुमला वगैरेचे संबंध गुंतागुंतीचे करून ठेविले आहेत, की ज्यामुळे या लेखकाला कालनिश्चितीबद्दल पूर्ण अज्ञान असले पाहिजे व ऐकीव दंतकथांची जुळणी मन मानेल तशी करणे एवढाच याचा उद्देश असावा असे मानणे भाग पडते.

यात संभाजीराजे ८-९ वर्षांचे असतांनाच कनकगिरींत मारले गेले असे धरले आहे. त्याचप्रमाणे "...दौलताबादकर (मोगल) व विजापुरकरांचा सुलुखा जाला. साबाजीपंत कारभा करुं लागले."

बेंद्रे - साबाजीपंत केव्हाच वारले असतांना ते दौलताबाद व विजापुरकरांचा कारभार करू लागले असे चुकीचे विधान दिले आहे.[३५]

श्रीशिवाजी प्रतापांत :

श्रीशिवाजी प्रतापांत शिवदिग्विजयासारखाच तपशील आलेला आहे. यात मुरार जगदेवाऐवजी रणदुल्लाखानाचे नाव येते; परंतु सोनोपंताऐवजी निळोपंताचे नाव मात्र चुकीचे दिसते. तसेच आण्णाजी दत्तोचें नावही चुकीचे आले आहे. मूळ नावे मात्र विसरली गेली आहेत.

सारांश : बखरकरांना शिवाजीच्या कर्नाटकांत जाण्याच्या व परत पुण्यांत येण्याच्या कार्यकारणभावाबद्दल पूर्ण अज्ञान होते यात शंका नाही.[३६]

जेधे करिना[३७]:

जेधे करिन्यामध्ये जी माहिती येते त्यामधील लिखाण गैरसमज होऊन लिहिण्यात आलेले आहे, असे बेंद्रे सांगतात. कारण यामध्ये रणदुल्लाखानाला मुळबाळ नव्हते. म्हणून

त्याची सर्व मालमत्ता अफजलखानाला दिली अशी माहिती आली आहे. बेंद्रे लिहितात ही चूक नसून खोट्या भूमिकेचा परिणाम होता.

महजर व पत्रे :

दादोजी कोंडदेवांची महजर व पत्रे २६ जानेवारी १६३८ ते २८ सप्टेंबर १६३९ मधील यावरून दादोजी आपल्या सुभ्यावर मावळांतच होते असे समजते त्यानंतर २४ नोव्हेंबर १६३९ च्या एका फर्मानावरून[३८] खालील माहिती बेंद्रे देतात.

बेंद्रे - यावरून दादाजी कोंडदेव मोहसबा घेऊन इ.स. १६३९ च्या पावसाळ्यानंतर निघाले असावेत असे अनुमान काढणें भाग पडतें. त्यानंतर दादाजीचा पत्रव्यवहार वगैरे इ.स. १६४०तील अद्यापि आढळलेला नाही; परंतु ते १६४० च्या पावसाळ्यानंतर मावळांत आले असावेत. कारण पुन्हा इ.स. १६४१ च्या १४ जानेवारीपासून २१ मे १६४३ पर्यंतची पत्रे उपलब्ध आहेत. यावरून शिवाजी आपल्या बाराव्या वर्षापर्यंत कर्नाटकांत तरी खास आलेले नाहीत. तसेच ज्याअर्थी शिवाजीराजांबरोबर मोठमोठे कारकून सेनापती पाठविले होते. त्याअर्थी दादोजीपंताच्या सोबतीचीही जरूर नव्हती. अर्थात शिवाजी-जिजाई यांना दादाजी कोंडदेवाबरोबर पाठविलें ही केवळ काल्पनिक माहिती आहे. अर्थात ती चुकीची आहे.

शिवचरित्रसाहित्य खंड ३ मधील पत्र व दुसरें पत्र राजवाडे खंड १५ :

यामध्ये आलेल्या पत्रांच्या तारखा चुकीच्या वाचल्यामुळे पहिल्या पत्राची २ डिसेंबर १६३८ व दुसऱ्या पत्राची तारीख २४ सप्टेंबर १६३९ अशा दिल्या आहेत. या तारखा खऱ्या मानल्या तर शिवाजीचे इ.स. १६३८तच पुण्याकडे येणे झाले असे होईल. यांचे स्पष्टीकरण देताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, या पत्रांतील व महजरांतील ज्या तारखा आलेल्या आहेत त्यामध्ये खमसेनच्या ऐवजी सलातीन वाचल्याने ह्या चुका झाल्या व त्यामुळेच शिवाजी महाराजांच्या कर्नाटकातून स्वराज्यात वापस येणाऱ्या तारखात गडबड निर्माण झाली.[३९]

राजवाडे १५ मधील पत्र :

दुसरे पत्र राजवाडे खंड १५, ले. ४३७ वर आलेले आहे. पत्रावर शिवाजी महाराजांचा शिक्का आहे. पत्र अस्सल आहे. ज्यात "अज रख्तखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलतहू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व दुशमुखानी प्र।। आबैन आलफ बै बे।। कृष्णभट बिन

मुरारिभट ब्रम्हे से।। कसबे चाकण हुजुर येऊनु मालुम केले... सन तिस्सा तश्रफाती भोगवटा चालिले असेल... तेरीख ६ जमादिलाखर..."

बेंद्रे - या पत्राचा फोटो बेंद्रेंनी दिलेला आहे. त्याचा उल्लेख करून बेंद्रे म्हणतात की, या फोटोत पाहिले तर सु।। सन देताना "सु।। खमसैन आबैंन अलफ" असा दिला आहे. खमसेन शब्द पाहाता काही तरी तिस्सासारखी अक्षरें दिसतात ती खोडून त्यावर खमसेन असे केले आहे. पुढील आबैंन हा शब्द खोडलेला नाही. पूर्वी जादा शब्द न खोडता तसाच सोडण्याची प्रथा होती. सहसा खोडाखोडी करीत नसत.

ज्याअर्थी पत्राच्या सालामागील सालाचा उल्लेख तिस्साने केला आहे व हे पत्र ७ जून १६४९ म्हणजे नवें साल सुरू होऊन १४-१५ दिवसच झाले असल्याने सुरुवातीस तिस्सा व आबैंन अलफ असे चुकीनें पडले; परंतु शेवटील संदर्भ लक्षात येताच लेखकाने तिस्साचे वर नवीन साल खमसेन असे दुरुस्ती करण्याची कारवाई केली व नेहमीच्या प्रघाताप्रमाणे त्यापुढचा आबैंन शब्द तसाच राहू दिला.

सारांश, हेंही पत्र इ.स. १६४३ पूर्वीचे म्हणजे शिवाजीला १२ वे वर्षे पूर्ण होण्यापूर्वीचे नाही. आंतली मजकुरावरून तर ते शाहाजीची इ. स. १६४९ त सुटका झाल्यानंतर आदिलशाहीने मावळाचा हा भाग शिवाजीकडे राहूं दिला म्हणजे तो प्रदेश त्यास आर्जानी झाला त्यानंतरेच आहे.

इनाम तोपर्यंत इनामदारच खात होते. या पत्रांचा आधार घेऊन आणि नीट छाननी न करिता शिवाजीच्या पुनरागमनाच्या कालाबद्दल शंका निघू नये म्हणून येथे हा विस्तार करणे गरजेचे होते असे म्हणताना बेंद्रे पुढे सांगतात की, पुणें परगण्याची व्यवस्था १६४२ इ. स. पर्यंत तरी सिद्द अंबर याकुतखानाकडे होती. हे त्यांच्या १ मार्च १६४२ च्या पत्रावरून सिद्धच आहे.[४०]

बेंद्रेंचे शाहाजी महाराज व जिजाई-शिवाजी यांच्या संबंधासंदर्भात लिखाण :

(१) शिवाजी व जिजाई यांना परत पुणें जहांगिरीत पाठविली. याचे कारण म्हणजे शाहाजीनें त्यांचा त्याग केला व त्यांचे तोंड पाहण्याची शाहाजीची इच्छा नव्हती असें काही बखरकारांनी कल्पनेने सुचविले आहे, परंतु त्याच बखरकारांनी शिवाजी-जिजाई कर्नाटकात गेलीच नव्हती म्हणूनही लिहिले आहे. हे सांगून याचे स्पष्टीकरण देतांना बेंद्रे पुढे लिहितात, त्या काळी शिक्का वापरण्यास सरकारची परवानगी लागत होती व त्याअर्थी शिवाजी महाराजांची पत्रे

इ. स. १६४३ पासून त्यांच्या शिक्क्यानिशीं आहेत, त्याअर्थी तो शिक्का जहांगिरीवर नेमणूक करीत आहे. या सबबीवरच शिवाजीला मिळवून दिला असे होते. शिवाजी बरोबर पेशवे, मुजुमदार, सबनीस व सैन्य पाठविलें आहे. तेव्हा शाहाजीची भावना द्वेषपूर्ण होती असे म्हणण्यास वस्तुस्थितीचा आधार दिसत नाही. ज्याअर्थी शाहाजीने शिवाजीस दूर शत्रूच्या सीमेजवळील भागांत अवघ्या बाराव्या वर्षी सुनेसह पाठविले. त्याअर्थी त्यांची काळजी घेण्यास त्याच्या मातोश्रीस पाठविणे भाग पडले असेंच म्हणावे लागते.

दुसरी बायको तुकाई केली म्हणून जिजाईचा त्याग केला म्हणावे तर त्यास आणखीही दोन बायका होत्या. फक्त एकीचाच त्याग करण्याचे कारण नव्हते व केलाच असता तर तिचा जेष्ठ मुलगाही तिच्याबरोबर पाठविला असता; परंतु तसे झालेलें नाही. इतकेच नव्हे तर इ. स. १६४९ त शाहाजीने आपल्या जवळची खात्रीची व कर्ती माणसे शिवाजीच्या कार्यार्थ पाठविली तशी ती पाठविलीं गेली नसती. तसाच याच सुमारास मोगल-शिवाजीचा पत्रव्यवहार झालेला आहे. तो शाहाजी व शिवाजी एकाच राजकारणाचा पाठपुरावा करीत असतांना दिसतात. अशा परिस्थितीत जिजाईचा त्याग केला म्हणून तिला कर्नाटकांत नेले नाही किंवा कर्नाटकांतून परत रवाना केली असे म्हणणे वास्तवबोधाला धरूर होणार नाही.[४१]

(२) आदिलशाहाने शाहाजीला "फर्जंद" म्हणून बारा हजारी देऊन नेला होता. शिवाय २५ नवंबर १६३७ च्या फर्मानाने त्याला आपली भाऊवाटणी मिळवून देऊन अनागोंदी व कंपिला त्याचे हवाली केली होती. कंपिली येथे शाहाजीने राहण्यासाठी वाडा व बागही केला होता. हा वाडा तयार होईपर्यंत सर्व कुटुंबाला एकाजागी आणण्याइतकी स्थिरता आली नव्हती तसेच ३० जानेवारी १६४३ च्या आदिलशाहाच्या फर्मांनावरून असे दिसते की, शाहाजी आदिलशाहीच्या मर्जीत आहे.

(३) परंतु १३ ऑगष्ट १६४३ च्या फर्मांनावरून आदिलशाहाची मर्जी बिघडण्याचे स्पष्ट होते.[४२]

या दोन्ही फर्मांनाचा उल्लेख करून बेंद्रे सांगतात की, १६३७ ते १६४२ पर्यंतच्या महत्त्वाच्या हालचालीबाबत बराच उलगडा होतो. शाहाजीस आदिलशाहीत गेल्यावर सर्व कुटुंबास राहण्याची सोय नसल्याने ती व्यवस्था कंपिलीस वाडा बांधून व बाग वाढवून केल्यावर उत्तम हवेच्या गावीं जिजाई व शिवाजीस नेलें. जोपर्यंत रणदुल्लाखान चाकरीवर होता तोपर्यंत

शाहाजीला उत्तम वागणूक व मानसन्मान मिळत होता; परंतु रणदुल्लाखानामागे त्याचा मुलागा कार्यप्रवप नसल्यामुळे रणदुल्लाखानाचा सरंजाम वगैरे अफजलखानास आला. अफजलखानाचे शाहाजीचे पटत नव्हते. त्यामुळे प्रतापराव घरोपडे व त्यांच्या इतर शाखांशी भांडणे लागली. त्यामुळे प्रतापरावाचा खून पडला आणि आदिलशाहाने घारेपडेची बाजू घेतल्याने जी पूर्वी वाटणीमध्ये गावग वगैरे घोरपडेकडून त्याचे नातलगांस मिळाली होती ती त्यास परत दिली. शाहाजींची आदिलशाही इस्लामी वजीर व त्याचे कुलबंधू द्वेष करू लागल्याने मानहानीचे प्रसंग त्याला सहन होत नाहीसे झाले. त्यात कंपिली सोडावी लागल्याने कुटुंबास विनाकारण त्रास होऊ लागला. शाहाजीलाही आपले आदिलशाहींतील स्थान अस्थिर असल्याचे वाटू लागले. आदिलशाही सोडून दुसऱ्या पातशाहीत जाण्याचा प्रयत्न केला; परंतु मोगल व आदिलशाहा यांच्यात झालेल्या कराराप्रमाणे शहाजीला पुन्हा मावळ भागात जाणे धोक्याचे होते. चांगली तयारी करून या धोक्याला तोंड देण्याइतके सामर्थ्य असेपर्यंत आणि विशेषतः मोगली परचक्राला तोंड देण्याची शक्ती साध्य होईपर्यंत त्याला आदिलशाही सोडून जाता येत नव्हते. स्वतंत्र राज्य करून सुखाने राहावे अशी आकांक्षा फार वाढू लागली; परंतु त्याचा सरंजामाचा भाग घोरपडे यांस दिला तरी त्याचा मोबदला इतरत्र न मिळाल्याने त्याला खासाबाबत त्रागा व राहावयावची अडचण केल्याने काही कुटुंब आपल्या जहागिरीत पाठविण्यास सहजच सवड मिळाली. शाहाजीने या परिस्थितीचा फायदा घेऊन शिवाजीस व त्याचेबरोबर जिजाईस पाठविण्याचा मोका साधला व त्यांचे रक्षणार्थ कारकून वगैरे लोक दिले. आदिलशाहाला त्यात काही धोक्याची कारवाई आहे याची शंका घेण्याचे कारण नव्हते. शाहाजीला जी मानहानीची वागणूक आदिलशाहाकडून मिळाली त्याबद्दल शाहाजीने त्रागा करणे क्रमप्राप्तच होते. तेव्हा कराराप्रमाणे आदिलाशाहला शाहाजीस इतरत्र जाऊ देणे म्हणजे मोगलाला आदिलशाहावर स्वारी करण्यास अद्यक्त करण्यासारखे होते आणि अशा परिस्थितीत शाहाजी व त्याचे सर्व नातेवाईक यांनी आदिलशाही सोडली तर आदिलशाहीची फारच हलाखी होणार होती. हे जाणून शाहाजीने त्रागा म्हणून आदिलशाहला शह दिला. तो फळास आला आणि आदिलशाहाने शाहाजीची समजूत घालून त्याची सर्व भरपाई करून देऊन हे मोठे सैन्यदल आपल्याकडे राखले. त्यापूर्वी शिवाजी माळवात आला आणि आदेशानुसार आपल्या 'हिंदवी स्वाराज्या'च्या कारवाईस सुरूवात

केली. शाहाजीच्या आदेशानुसार रोहिरेश्वराचे देवालयास जमीन दान देवविली. त्यानंतर 'हिंदवी स्वराज्या'च्या शपथविधीचा गवगवा झाला.

वरील उद्देश्याचा विचार केला तर तो साधण्याची अपेक्षा जिजाईसाहेबांच्या मेहनतीवर अवलंबून होती. कर्त्या माणसांना आश्वासन देऊन एकत्रित आणणे हे बारा वर्षाच्या मुलाला कठीण गेले असते.[४३]

४.८ इ.स. १६४८ पर्यंतच्या शाहाजी व शिवाजी यांच्या हालचालीसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांचे लिखाण :

बखरकारांना शाहाजी महाराजांच्या इ. स. १६४८ पर्यंतच्या काळातील शाहाजी व शिवाजी यांच्या हालचालींची फारशी माहिती नसावी. हे बखरकार जी काही प्रसंगाची माहिती देतात त्या प्रसंगाची सरभेसळ केलेली आहे असे वा. सी. बेंद्रे सांगून चित्रगुप्ताने सभासदाचे अक्षरशः मजकूर दिले आहेत. मात्र शिवाजी महाराजांसोबत आलेल्या नावांमध्ये गोंधळ केला आहे. चित्रगुप्ताच्या मते, "जिजाऊसाहेब याजबरोबर" शामरावऐवजी संभाजीचे नाव देऊन नीळकंठ पेशवे व बाळकृष्णपंत हे नारोपंत दीक्षित यांचे चुलत भावाऐवजी 'चुलते' असे लिहिले आहे.[४४] बापूराव हे दोन शब्द मध्येच देतात असे वा. सी. बेंद्र स्पष्ट करतात.

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत शिवाजी महाराज व जिजाई कर्नाटकात गेलेच नव्हते या समजुतीने लिखाण करण्यात आल्याचे वा. सी. बेंद्रे सांगतात. यानंतर वा. सी. बेंद्रे शेडगांवकर भोसले, शिवदिग्विजय, चिटणीस बखरीतील माहिती देऊन सांगतात की, तीच ती माहिती देतो पण चिटणीस बखरीत थोडीफार संगती सापडते. यामध्ये तोरण किल्ला, प्रचंडगड, रायगड, चाकणचे ठाणे, कोंडाण्याच्या संदर्भात थोडी विस्तारित माहिती येते.

शिवाजी प्रताप बखरीत काल्पनिकच पाल्हाळ दिल्याचे सांगून न्यायशास्त्री पंडिताच्या बखरीत इ. स. १६४८ च्या पावसाळ्यापर्यंतच्या हालचालीची काहीच माहिती दिली नाही. जेधे शकावलीमध्येही इ. स. १६३८ ते १६४८ पर्यंतची काही माहिती येत नाही. शिवापूरकर देशपांडे यांच्या वहीतील शकावलीत "शके १५६९ (इ.स. १६४७) राजश्री पंतानी किल्हे सिंहगड दिल्हे" अशी एक नोंद येते. कवींद्र परमानंदाने फत्तेखान जेव्हा शिवाजी महाराजांवर चालून आला त्यावेळी शिवाजी महाराजांच्या तोंडी जी वाक्ये टाकली त्यावरून व नंतर शाहाजी राजांच कपट वर्तणाविषयी कवींद्रने आदिलशाहाच्या तोंडी जी वाक्ये टाकली त्यावरून शिवाजी महाराज व

शाहाजी महाराज यांच्या १६४३ ते १६४८ दरम्यानच्या हालचालींचा अंदाज येतो असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[४५]

पुरंदरगडाच्या संदर्भात बखरींनी जी माहिती दिली त्याची चिकित्सा वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे करतात. ते लिहितात की, "पुरंदरगड घेतल्याचे बातमींत बखरींनी अनेक काल्पनिक कारणे वगैरे दिली आहेत; परंतु त्याबाबत तत्कालीन व नंतरचे बरेच उल्लेख सापडतात. त्यातील काही महत्त्वाच्या उल्लेखांची नोंद घेऊ. पुरंदरगड शाहाजी महाराजास कैद होण्यापूर्वीच शिवाजीचे हाती आला होता. हे जरी खरे असले तरी तो कोणत्या तारखेला शिवाजी महाराजांचे हाती पडला. हे सांगता येण्यासारखा पुरावा अद्यापि मिळालेला नाही. याबाबत जे कागदपत्र मिळतात त्यात कोठेही दादाजी कोंडदेवांचा संबंध जोडलेला नाही. उलट गडासभोवतालील प्रदेशांतील शिवाजीच्या हालचालींचा संबंध आला आहे. त्यावरून असे अनुमान काढण्यास हरकत नाही की, तो गड इ. स. १६४७ च्या पावसाळ्यानंतर शिवाजीच्या ताब्यात आला."[४६] पुढे बेंद्रे इ. स. १७२६ मधील तकरीरींत शंकराजीपंताच्या मुलाने म्हणजे गणेशने जे लिहून ठेवले त्याचा पुरावा देऊन लिहितात की, "शिवाजीने पुरंदरगड मिळविण्याचा प्रयत्न आपल्या सासऱ्याकरवी १६४२ नंतर केला; परंतु त्यात त्याला यश आले नव्हते. अशा परिस्थितीत शिवाजीला १६४७ मध्ये केवळ भावाभावांच्या भांडणामुळे बोलाविले तो शंकराजी बरा होताच व आपली माणसें परत येताच सूड घेईल त्याच्या प्रतिकारार्थ बोलाविले. यावेळी दादाजी कोंडदेवाच्या कारभाराचा आवर शिवाजीने घेतला होता. त्यामुळे आदिलशाही कौल त्यास मिळावा म्हणून शिवाजी महाराजांनी पाहिले की, या भांडणात निलोजी दोषी आहे. तेव्हा त्यास कैद केले. त्याचप्रमाणे पुरंदरगड या भावांच्या भांडणात विजापुरी वजीर त्याचा ताबा घेतील. या अंदाजाने शिवाजी महाराजांनी या भांडणाची हकिकत विजापूरी येऊन पोहोचण्यापूर्वीच किल्ला घेऊन मोठ्या भावाच्या संमतीने व त्यास शाहाजी महाराजांकडे म्हणजे आदिलशाही चाकरीत पठविल्याने व इतर भावांसहित इनाम दिल्याने हे प्रकरण खासगी प्रकारांत बसविले आणि अशा भांडणांत शिवाजीने त्या गडाचा ताबा घेतल्याने तो गड मोगलांपासून सुरक्षित राहिला. अशा समजुतीने आदिलशाहने या प्रकरणास मूक संमती दिल्यासारखे झाले.[४७]

विविध बखरींनी दिलेले इ. स. १६४८ पर्यंतचे घटनाक्रम :

बेंद्रे लिहितात, बखरींत प्रसंगाचे उल्लेख केलेले नाहीत आणि प्रसंगाचा जो अनुक्रम दिला आहे त्यावरू त्या-त्या प्रसंगांच्या काळाचा विपर्यास आला आहे. त्यामुळे त्या प्रसंगातील मागील कार्यकारणभावही विपर्यस्त स्वरूपांत पाहिला जातो.

जेधे व शिवापूर शकावलींत फक्त कोंढाण्याची नोंद आहे. परमानंद काही तपशील देत नाही. मात्र घोरपडे व निंबाळकर यांचेशी संग्राम झाल्याचे सांगतो.

सारांश राजगड, सिंहगड, पुरंदरगड, मोरे-घोरपडे बंधू व निंबाळकर यांचेशही लढाईचे प्रसंग सोडले तर (१) संभाजी मोहिते कैद, (२) जुन्नर, अहमदनगर, कल्याण-भिवंडी, माहुली, चाकण व रूद्रमाळ हे गड घेणे व (३) विजापूरचा खजिना लुटणे, हे प्रसंग इ. स. १६४८ च्या पूर्वीच्या कालांत घडले हे सांगण्याचा जो बखरकारांनी प्रयत्न केला आहे तो चुकीचा आहे असे बेंद्रे सांगतात व पुढे लिहितात, "संभाजी मोहित्याची कैद व सुपें घेणे हा प्रसंग इ. स. १६५६ मधील आहे. शकावल्याप्रमाणे जुन्नर एप्रिल १६५७ मध्ये लुटले. मे १६५७ मध्ये नगरशी युद्ध केले. २४ ऑक्टोबर १६५७ ला कल्याण-भिवंडी राजांनी घेतली. चाकण... माहुली... रूद्रमाळ हे गडही शाहाजीच्या सुटकेनंतर घेतलेले आहेत."[४८]

शाहाजी महाराजांनी आदिलशाहीत जाण्याचे ठरविले तेव्हा त्यांनी आपणास बारा हजारी सरंजाम द्यावा व चाकर म्हणजे मागीलप्रमाणे 'सरलष्कर' किंवा 'वजीर' म्हणून न संबोधिता 'फर्जंद' म्हणावे असे कबुल करून घेतले होते. शहाजहानने थोडेच वर्षापूर्वी महंमद आदिलशाहाला 'फर्जंद' म्हणून मान व त्यास पातशाहा म्हणून मान्यता एका फर्मानाने दिली होती. अर्थात महम्मद पातशाहाला 'फर्जंद' या किताबातील स्वारस्य समजले होते. त्याचवेळी शाहाजीच्या मनांत कोणता विचार होता हे त्यांनी कान्होजी जेधेस आपलेकडे घेण्याबद्दल जी इच्छा दर्शविली त्यावरून लक्षात येण्यासारखे आहे असे बेंद्रे म्हणतात.

कान्होजीने मावळांतील लुटालूट व जबरदस्ती थांबवून बारा मावळांत एकी राखण्याच्या प्रयत्नांत दादाजीस शक्य तितके साह्य केले. जबरदस्तीने दाइते उकळणाऱ्या बांदल, खोपडे आदि लोकांवर जरब बसविली. आदिलशाहीने त्याला त्याबद्दल एक दोन गावेही इनाम दिली. अर्थात शाहाजीनेही जी एकजूट करण्याचा आदेश दिला होता. त्यामागे दोन्ही पातशाहांनी त्याचा पराभव करून त्याच्या महत्त्वाकांक्षेला जो जबरदस्त धोका दिला होता त्याबाबत त्याच्या मनात

जी सल बीजांकुरीत झाली ती सल दूर करण्याच्या उपाययोजनेकडेच त्याचे लक्ष लागून राहिले होते. एकट्या दादोजीला ही कामगिरी झेपण्यासारखी नव्हती असे तत्कालीन युद्ध प्रसंगावरून दिसून येते. या मावळांतील मुख्य काटा म्हणजे बांदलाची स्वैर वर्तुणूक. आदिलशाही इस्लामी सरदारांना त्याचा या डोंगरदऱ्यांच्या भागात बंदोबस्त करणे जड होते. अर्थात दादोजीच्या या कारस्थानाला आदिलशाहाने पाठिंबाच दिला. कारण आदिलशाहींतील मावळांतील लोकांचेच हातून हे कार्य पार पडणारे होते. उपलब्ध कागदपत्रावरून काही प्रसंगाची तपशीलवार माहिती उपलब्ध होत आहे असे बेंद्रे सांगतात.

शाहाजीने शिवाजी महाराजांना परत पुण्याकडे पाठविले त्यानंतरचा पत्रव्यवहार महत्त्वाचा आहे असे बेंद्रे सांगून काही पत्रव्यवहारातील मजकूर देतात, तो 'हिंदवी स्वराज्या'च्या सुरुवातीच्या हालचालींचा आहे. पहिले पत्र १६४३ मे १४ चे आहे. यानुसार १४ मे १६४३ चे पत्र आल्यानंतर दादानी नरसने काय केले हे समजण्यास पुरावा जेधेस पाठविलेल्या फर्मानावरून मध्यंतरीच्या काळांत शाहाजी अपमानित व दादाजी कोंडदेवाने मावळांत केलेल्या धामधुमीत साहाय्यक झाल्यावरून त्याच्यावर आदिलशाहाचा क्रोध झालेला दिसतो असे बेंद्रे त्या फर्मानाचा सारांश देऊन सांगतात की, येथपर्यंत रायेश्वराच्या व शिवाजीच्या पुराव्याचा विचार मंहमद आदिलशाहाच्या डोक्यावर नसावा. तसेच जे काही कारण असेल ते १३ ऑगस्ट १६४३ पूर्वीचे असावे. जेधे आपल्या करिन्यात माहिती देतात की, "...त्यावरी रणदुल्लाखान मृत्यू पावला. त्यास संतान नाहीं (हा समज चुकीचा आहे. त्याच्या मुलाला अफजलखानाने नादान ठरविले - वा. सी. बेंद्रे) म्हणून दौलत त्याचा खिदमतगार अफजलखान कर्ता देखोन त्याला दिली आणि चंदीस रवाना केले. बरोबर कान्होजी नाइकही जमेतनिसी गेले. चंदीस वेढा घातला. जेर केली. त्यास चंदीस राचेवार मऱ्हाटे होते. त्यांचा व महाराजांचा घरोबा आहे. सामान पुरविताती ऐसी बदगोह अफजलखान याणी विजापुरास पातशाहास मुस्तफाखानाकडून लिहिली. त्यावरून महाराजास धरून विजापुरास बोलावून नेले. बरोबर कान्होजी नाइक होते. बादशाहानी तहकीकत मनास आणितां तुफान गोष्टी ऐसे जाले. त्यावरी पातशाहानीं महाराजांचा सन्मान केला. सदर बक्सीस दिल्ही. सिरपाव दिल्हे. बेंगरूळ प्रांत पाचा लक्ष होणाची जहागीर देऊन वेगळी मसलत सांगितली बरोबर कान्होजी नाइकही जमावानसी होते..."[४९]

बेंद्रे लिहितात, याच कारणामुळे आदिलशाहने खंडोबा व बाजी घोरपडेंना मावळांत पाठविण्याच्या पूर्वी शाहाजीच्या जमियतीला अटकाव करण्याच्या उद्देशाने त्याला जमियतीसह बोलाविलें होते; परंतु तो तिकडे गेला नव्हता. शाहाजीला दरबारांतील सर्व बातमी असावी. तो व त्याचे साथीदार उलटलेले पाहातांच आदिलशाहाने आपल्या दुष्ट हेतूवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला. इतर सरदारांचाही त्याच्यावर दाब येतच होता.

"मोगलाचे सीमेवरील हद्दींत दादाजी कोंडदेवाने चालू केलेली दंगल व शाहाजीची सर्व भाऊबंदासह रजपूत म्हणून मोगलाकडे चाकरीस जाण्याची धमकी महंमद आदिलशाहाला नमते घेण्यास कारण झाली. सारांश शाहाजीपुरता तरी समजाविशीचा भाग आदिलशाहाने नमतें घेऊन पुरा केला व त्याच्या जहागिरीचा भाग जो दुसऱ्या भाऊबंदांना वगैरे देण्याचा क्रम सुरू करून त्याला कमीपणा आणण्याचा होता. त्यालाही पहिल्या चार लाखाच्या जहागिरीऐवजी बंगलोरचा पाच लाखाचा सुभा मानसन्मानाने दिला व शाहाजीचे निदान बाह्यात्कारीट किल्मिष दूर करण्यांत यश मिळविले. दूरदर्शित्वाने जहागिरीची वाढ करवून घेऊन अफझलखानाशी असलेला संबंध तोडला व खानबाबाच्या सानिध्यांत शाहाजी गेला; परंतु हे सर्व होऊन येण्यास इ. स. १६४४ चा पावसाळा गेला आणि या संधीच्या जो बाह्य जगावर परिणाम व्हावयाचा तोही दृग्गोचर होण्यास आणखी तीन चार महिले गेले." असे बेंद्र सांगतात.

दादोजी व शिवाजी महाराज यांना मावळ्यात पाठविणे म्हणजे आदिलशाहाच्या विरोधातील कार्यवाही :

बेंद्रे लिहितात, 'शाहाजीची अवहेलना सुरू झाल्यापासून म्हणजे इ. स. १६४२ च्या सुरुवातीपासून शाहाजीला फर्जंदाच्या दर्जाने व १५-२० हजारीचे सत्तासामर्थ्य असताना त्यास धक्का दिला जात आहे. हे पाहून त्याच्या विचारांत क्रांतीच्या बीजाचे पुन्हा आरोपण झाले असले तर नवल कसचे? वाढत्या अवहेलनामुळे त्याने ती कायमची दूर करण्याचे उपाय योजणे साहजिकच होते. आता मावळातच त्याला प्रतिष्ठा सांभाळण्याची आशा होती आणि इस्लामी गुलामगिरीतून मुक्त व्हावयाचे व आपल्या हिंदू बांधवांना दूर राखावयाचे तर एका 'हिंदवी स्वराज्या' शिवाय दुसरा तोडगा राहिलेला नव्हता. त्यासाठी मावळातील देशमुख, देशपांडे, पुंड पाळेगार यांची एकी व त्यांची असल्या महत्त्वाकांक्षी क्रांतीवर श्रद्धा असावयास पाहिजे होती. ती एकी व श्रद्धा संपादण्यासाठी दादोजी कोंडदेव व आपला चिरंजीव शिवाजी यांना आदेश दिला

असला तर त्यात विशेष नाही आणि असल्या हालचालींची वार्ता ऐकूण आदिलशाहाने धक्का खाऊन बंदोबस्ताची सिकस्त करण्याचे प्रयत्न करणे क्रमप्राप्तच होते. शाहाजीच्या किंवा भोसलेच्या घराण्याशी शत्रुत्व करणाऱ्या घोरपडे बंधूची- कारण कोणाही इस्लामी सरदाराला त्या डोंगराळ मुलाखात स्थानिक मदतीविना टिकाव काढणे मुष्किल होते. योजना करून दादाजीचा हात तोडणे यासारखी कृत्य करावयास लावल्याने व खासा शाहाजीला उघडपणे अपमानित केल्याचे ऐकूण मावळे यासारखी बंधुंच्या आणि विशेषतः शिवाजीच्या अनुयायांच्या सूडाच्या प्रवृत्ती उसळल्या व ते राजद्रोहास उद्यक्त झाले असले तर तो सहजधर्मच होता.'[५०] यातून वा. सी. बेंद्रेंनी शाहाजी राजांनी घेतलेला निर्णय कसा योग्य होता व शाहाजी राजे कसे दूरदर्शी होते हे सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

शिवाजीच्या राज्यकारभाराचे सुरुवातीचे स्वरूप :

वा. सी. बेंद्रे सांगतात की, शिवाजीचा राजकारणी पत्रव्यवहार इ. स. १६४६ च्या अगदी सुरुवातीपासूनचा आढळतो. जी काही पत्रे १६३० ते १६३९ या सालाची म्हणून छापली आहेत ती सर्व १६५० ते १६५९ ची आहेत. 'खमसैन' ऐवजी 'सलासीन वाचल्याने ही चूक झाली आहे.' इ.स. १६४६ च्या पत्रांपासून शिवाजीस शिक्का मिळालेला आहे. अर्थात ही परवानगी शाहाजीबरोबरील आदिलशाहीसारख्या कलमांचाच एक भाग असावा आणि ही मान्यता दादोजी महसुलाचा हिशोब द्यावयास निघाला, त्यापूर्वीच मिळाली असे कागदपत्रांवरून दिसते; परंतु बारा मावळांचा जो हा कारभार चालविला तो सुभेदार म्हणून न चालविता सरंजामदाराचा म्हणजे शाहाजीचा वारसदार प्रतिनिधी म्हणून आपल्या अधिकारांत चालविला असे बेंद्रे म्हणतात.

सारांश, राजयंत्रणा जरी मानली तरी त्या राजयंत्रणेचा नोकर म्हणून अनुमती देण्याची जरूरी भासली नाही. उलट पुणे-सुपें जहागिरीची राजकारणी पत्रें शाहाजीच्या नावानीच निघत. तक्रारी आल्या तर जिजाई निकाल देत असे. मात्र सुप्याची व्यवस्था संभाजी मोहिते पहात असे. कोंडण्याचा हवालदार सिद्दी अंबर याला पुण्याची हवालदारी दिली होती. बेंद्रे म्हणतात 'हिंदवी स्वराज्य' म्हणजे हिंदूचे राज्य न मानता स्थानिक राज्य असाच सर्वांचा समज होता.

४.९ शिवाजी महाराजांवर फत्तेखानाची स्वारी :

प्रस्तुत मुद्यात बेंद्रेंनी शिवाजी महाराजांनी आपला इ.स. १६४८ च्या पावसाळ्यापर्यंतचा टप्पा कसा यशस्वीपणे पार पाडला म्याची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

शिवाजी महाराजांनी कोंढाणा फितुरीने घेतल्यामुळे शाहाजी महाराजांची कैद झाली?

शाहाजी महाराजांची कैद ही शिवाजीच्या कोंढाणा फितुरीने घेतल्यामुळे झाली असा बखरकारांचा समझ झाल्याकारणाने त्या अनुरोधाने कोंढाण्याला शाहाजी महाराजांच्या कैदेशी जोडले हा समज चुकीचा असला तरी शाहाजीच्या सुटकेत या गडाचा संबंध आल्याने राजकारणांतील भाग पुणा-मावळ भागांत रूढ झाल्याने या दंतकथाना महत्त्व प्राप्त झाल्यास त्यात नवल करण्यासारखे काही नाही असे बेंद्रे म्हणतात.

शिवाजीकडे मुरुमदेवगड पूर्वीपासूनच होता. चाकणही दादाजीच्या ताब्यात होता. तो राजाकडे आला होता. इ.स. १६४७ उत्तरार्धात कोंढाणा व पुरंदर हे गड प्राप्त झाल्याने इ.स. १६४८ च्या पावसाळ्यापर्यंत मुहंमद आदिलशाहाने या गडाची फिकीर केली नव्हती.

तत्कालीन पुणें-मावळ प्रदेशातील शिवाजीचे प्रयत्न मुहंमद आदिलशाहाला जाचक वाटले नव्हते असे दिसते. तसे नसते तर जो आदेश इ.स. १६४८ च्या पावसाळ्यात वाईच्या सुबेदाराला दिला. तो इ.स. १६४७ च्या पावसाळ्यात किंवा पावसाळा संपताच दिला असता.[५१]

शाहाजी महाराजांना कैद करण्याची कारणे :

(१) मिर जुमला आदिलशाहीच्या विरूद्ध युद्ध व कारस्तान तीन वर्षे करीत होता. शाहाजीला दक्षिणेतून पुणे-मावळकडे जाऊ न देण्याचा करार शहाजहान व आदिलशाहा यांच्यात झाला होता तरीही शाहाजीने मिर जुमल्याच्या मार्फतीने बोलणे लावून पुन्हा मोगली नोकरीत आपल्या मूळ चळवळीच्या प्रदेशात जाण्याचा प्रयत्न चालविला होता. दक्षिणेत आलेला शाहजादाही शाहाजीची बाजू बादशाहाकडे मांडीत होता; परंतु शाहाजीच्या कारवाईने अद्दल घडवून घातलेला शहाजहान त्यास कर्नाटकांतच नीट सन्मानाने व त्यास बंडास प्रवृत्त न होऊ देता अडवून ठेवण्याची सक्ती करीत होता. त्याचबरोबर दक्षिणेतील शाह्या कशा नष्ट करून मोगली साम्राज्य आकाराला येईल याचीही विवेचना शहाजहानला व शहाजादा औरंबजेबाला लागून राहिली होती. त्यामुळे शहाजीने कुतुबशाहाकडे चाकरीसाठी विनंती केली व मिर जुमल्यातर्फे बोलनेही झाले होते. आदिलशाहाचा राग होईल म्हणून कुतुबशाहाने शाहाजीच्या या हालचालींची बातमी आदिलशाहाला देण्यासाठी खानबाबाला लिहिले. मिर जुमला हा आदिलशाहाचा शत्रू म्हणून राज्यद्रोहाबद्दल काहीही कारण शोधून शाहाजीस कैद करण्यासाठी

आदिलशाहाची परवानगी मागितली. आदिलशाहाची परवानगी येण्यापूर्वी आणखीही भांडणाचे कारण झाले ते कारण असे.

(२) शाहाजी राजांवर कर्नाटकातील हिंदू राजांचा इतका विश्वास बसला होता की, ते तहाचे बोलणे करावयाचे झाल्यास फक्त शाहाजीबरोबरच करण्यास तयार असत. शाहाजी सांगेल तसे वागू असा आग्रह धरीत असल्याचे आदिलशाही वकिलाने कळविल्यावरून खानखानाला संशय आला की, या राजांना शाहाजीचे साह्य आहे. तेव्हा शाहाजीस बरोबर घेऊन या राजांशी लढा देणे धोक्याचे ठरेल. इतकेच नव्हे तर या राजांच्या सरहद्दीवर पावसाळ्याचा निवारा घेणे घाताचे होईल. अशा परिस्थितीत शाहाजीला कैद धरून ठेवले तरच आपली मोहिम यशस्वी ठरेलं. असा निर्णय घेऊन आदिलशाहाची परवानगी आणली.

सारांश, शिवाजीने कोंडाणागड आपल्या ताब्यात विनापरवानगी घेतला. हे शाहाजीच्या कैदेचे खरे कारण नव्हते. मराठी बखरकारांनी तसा समज करून घेतला होता इतकेच; परंतु बखरकारांच्या म्हणण्याला पुरावा नाही.

"शिवाजीस कोंडाणा इ.स. १६४७ मध्ये (पावसाळ्यपूर्वी जून-जुलै दरम्यान) स्वाधीन झाला. तेथील हवालदार सिद्दी अंबर यास शिवाजीने आपले नोकरीत घेऊन त्यास पुणे जहांगिरीची हवालदारी दिली."[५२]

अर्थात स्थानिक लोकांचा या अदलाबदलीस पाठिंबा होता. आदिलशाहाने शाहाजीच्या कैदेनंतर म्हणजे जुलै १६४८ नंतर जी मसलत फर्मावली ती कोंडाणा शिवाजीने घेतला म्हणून नव्हती तर शाहाजीचे सर्व शक्ती सामर्थ्य खच्ची करण्याच्या उद्देशाने होती. कारण आदिलशाहाने खास संभाजीच्या ताब्यात बक्षीस म्हणून दिलेल्या बंगलूर येथे संभाजीवरही तशीच स्वारी करविली होती.

ज्यावेळी शिवाजीवर फत्तेखानास रवाना केले तेव्हा आदिलशाहा त्याच्या मदतीसाठी केदारजी खोपडे देसाई यास ८ ऑगस्ट १६४८ रोजी फर्मान पाठवितो[५३] यावरून मल्हारजी आपाजी येसवतराऊ देशमुख पाा शिखल यांच्या १० ऑगस्ट १६४९ च्या पत्रावरून[५४] असे अनुमान निघते की, शाहाजीच्या कैदेची बातमी शिवाजी व संभाजी यांना समजताच त्यांनी काही प्रतिकारात्मक हालचाली करण्यापूर्वीच आदिलशाहाने फरादखान व फत्तेखान यांना सैन्य देऊन युद्धार्थ पाठविले होते अर्थात या भांडणाचा दोष व सर्व जबाबदारी आदिलशहावरच येते.

त्याचबरोबर आदिलशाहाने शिवाजीस आपला रीतसर शत्रू केले आणि त्याचे राजकीय अस्तित्व मान्य केले. शिवाजीला आपल्या 'हिंदवी स्वराज्या'च्या कार्यक्रमाचा दुसरा अंक सुरू करण्यास उत्तेजन दिले.

फत्तेखानाबरोबरील सरदार :

फत्तेखानाबरोबरील सरदारांसदर्भात माहिती परमानंदाच्या लिखाणात सविस्तर आली आहे. याचा उल्लेख करून बेंद्रे लिहितात, 'फत्तेखानाबरोबर दिलेल्या सरदारांत मिनाद शेख, रतन शेख, अशरफ शहा, मताजी घाटगे, बयाजी नाईक फलटणकर व इतर मांडलिकांत हैबतराजाचा पुत्र बल्लाळ हे होते. बल्लाळाने धाऊन येऊन प्रतिकारास सवड न देताच अचानकपणे शिरवळ घेतले. जाळपोळ केली. ही बातमी कळताच शिवाजीने शिरवळ सोडविण्यास गोदाजी जगताप, भीमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, भैरव यास कावुकाचे सेनापतीच्याखाली सैन्य देऊन रवाना केले. शिवाजी खासे फत्तेखानास तोंड देण्याच्या तयारीला लागले. ही सेना तात्काळ पुरंदराहून निघाली व गडाखाली रात्र काढून दुसरे दिवशी शिरवळावर चालून गेली. यावरून आदिलशाही स्वारीची बातमी शिवाजीस उशिराच मिळाली असे दिसते.'

'शिवाजीची सेना जवळ आलेली पाहून बल्लाळानें शिरवळच्या टेकडीचा आधार घेऊन तो मुकाबला देण्यास सज्ज राहिला. कावुकानें जोशचा हल्ला चढवून त्या कोटाच्या भिंती पाडून व चर भरून कापाकापीस सुरवात केली. १००-१२५ योद्धे मारले. तेव्हा बल्लाळाचे सैन्य रण सोडून पळूं लागले. कवुकाने बल्लाळास मारले तेव्हा बरेच शत्रुसैनिक शरण आले. त्यास कावूकाने सोडून दिलें. नंतर कावुकादी सरदार शिवाजीस भेटण्याकरिता पुरंदरास परतले. फत्तेखानाच्या सैन्याने कावुकाचा बेलसरपर्यंत पाठालाग केला. कावुकाचे लोक पळाले व बाजी नाईकाच्या तुकडीवर शत्रुनीं हल्ला चढविला; परंतु त्यांत शत्रुचे पांच सात स्वार ठार केले.'[५५]

फत्तेखानाचा पराभव :

फत्तेखान आपल्या सर्व सैन्यानिशी आला व गडापासून थोड्या अंतरावर सेनेचा तळ दिला. नंतर गडावर चढू लागला. तेव्हा शिवाजीच्या सैनिकांनी गडावरून शत्रुवर तोफा, बंदुकी वगैरेचा अतिशय वर्षाव केला. तरीही त्यास तोंड देत फत्तेखानाची सेना वर चढू लागली. तेव्हा सदोजी व अशरफशहा लढ्यात रक्तबंबाळ झाले व अशरफशहा हतबल होऊन पळून गेला. घाटगेंने वाघास पळवून लावले. मिनाद व रतनु हेहि भैरवास तोंड देवू शकले नाही. तेव्हा

सैन्याची वाताहात झालेली पाहून फत्तेखानानेही पाय माघारी घेतले. शिवाजीने फत्तेखानाचा मोड झालेला पाहून तो विजापूरच्या सुलतानालाही जिंकण्यास उद्युक्त झाला. पराभव झालेला फत्तेखान विजापुरी परत गेला. त्याच्या पराभवाची हकीकत प्रत्यक्ष फत्तेखानाकडून ऐकल्यावर महंमद आदिलशाहाला फार मोठा धक्का बसला.

युद्धामागील शिवाजीची भूमिका :

याविषयी बेंद्रे लिहितात की, 'आदिलशाही आव्हानाला यशस्वीपणे तोंड देऊन त्याचा परिहार करिता आला तर शिवाजीवर बापाच्या कैदेनी ओढवलेली आपत्ति दूर होइल अशी तत्कालीन शिवाजीची भूमिका नव्हती. शिवाजीने आपल्या बापाच्या सुटकेसाठी व आपणास पाठिंबा राहावा म्हणून मोगली शहाजादा मुरादबक्ष यांच्याशी संधान इ.स. १६४९ च्या सुरुवातीस बांधण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शिवाजीने विनंती केल्यावरून शहाजादा मुरादबक्षाने आदिलशाहाला शाहाजीची सुटका करण्याविषयी लिहिल्याचा उल्लेख नंतर ३० नोव्हेंबर १६४९ च्या पत्रात येतो. इतकेच नव्हे तर शिवाजी, संभाजी व शाहाजी वगैरेस मोगली चाकरीत घेण्याविषयी बादशाहाकडे शिफारस करण्याबद्दल अभिवचन दिले होते. तसेच जुन्नर व अहमदनगर येथील देशमुखीबाबतही आश्वासन मिळाले होते असे एका पत्रावरून दिसून येते.'[५६]

शाहाजी महाराजांना का सोडले? :

मिर जुमला व आदिलशाहा यांच्यात भांडण चालूच होते. मिर जुमला हिंदू राजांना मदत देऊन आदिलशाहाच्या मुलुखगिरीत व्यत्यय आणित होता. शाहाजीच्या दोन्ही मुलांनी आदिलशाहाच्या सरदारांचा पराभव केल्याने आदिलशाहास मोठाच धक्का बसला. त्यात शिवाजीने आदिलशाहाविरूद्ध मोगली शाहांजहाशी मैत्री जोडल्याने मोगल आपल्या साम्राज्याचा नाश करण्यास प्रवृत्त झाल्यास आपण सर्वच गमावून बसू याचा आदिलशाहावर फार मोठा परिणाम झाला. त्याने आपल्या दरबारातील पठाण सरदारांच्या मनाविरूद्ध शाहाजींपुढे नमते घेण्यास सुरुवात केली.

शिवाजी-संभाजीवरील स्वाऱ्या केवळ गंड घेण्याबद्दल होत्या. त्यात इतर काही कारणे नव्हती. शाहीत अंतर्गत भांडणे नाहीत, एकीच आहे हे दाखविण्यासाठी गडाची मागणी केली आणि शाहाजीराजांनीही आपल्या आदिलशाहची केवळ बहिरदर्शनी अब्रू जाऊं नये म्हणून ती मागणी मान्य केली इतकेच.

शाहाजीच्या सुटकेनंतर बंगलोर व इतर ५ लाखाचे सुभे दिल्याने बंगलोरची मागणीही नाममात्रच झाली होती. शिवाजीस पुरंदर, राजगड वगैरे गड त्याचे म्हणून त्यांस स्वतंत्रता देण्यात आल्याने त्यालाही त्यात वैराग्य वाटण्याऐवजी आपल्या 'हिंदवी स्वराज्या'च्या वाटचालीत आपण एक टप्पा ओलांडून दुसऱ्या महत्त्वाच्या टप्प्यात पदासीन झाल्याचा आनंदच झाला असेन.[५७]

युद्धाचा शिवाजीस फायदा :

या फत्तेखानाच्या स्वारीने शिवाजीस एका शत्रुविरूद्ध दुसऱ्या मोठ्या साम्राज्याचा आधार मिळाला. शिवाजीला त्याने दादाजी कोंडदेवानंतर घेतलेला सर्व मुलूख त्याचा म्हणून आदिलशाहाने मान्यता दिली.

त्याशिवाय आणखी मोठा फायदा म्हणजे शाहाजीने आपले खास विश्वासू व शूर सेनापती त्यांच्या सैन्यांसह शिवाजीची पाठराखण करण्यास पाठविले. याच सेनानींनी शिवाजीस शेवटपर्यंत शपथेवर कबूल केल्याप्रमाणे (परमानंद-पृ.क्र.९४), प्राणपणाने साह्य केले. आदिलशाहाने शाहाजीस नोकर न मानता 'फर्जंद' म्हणून मान्यता दिली होतीच (जेधे शकावली, पृ.क्र. ८६).

शिवाजी महाराजांचे कौशल्य :

(१) आदिलशाहाकडून आलेल्या प्राणघाताच्या कार्यात थोडा अडथळा आला आणि मदतमागारांत भीती उत्पन्न झाली. हे पाहून शिवाजी महाराजांनी आपल्या राजकारणांतील हालचालींच्या योजनाबाबत गुप्तता राखली.

(२) दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शिवाजीची युद्धविषयक हालचाल करण्यापुरती तयारी झाली असतांनासुद्धा त्यांनी शत्रुपक्षीयांकडून आगळीक होईपर्यंत आपल्या शक्तिसामर्थ्यांचा उपयोग करून आपल्यावर बंडखोरीचा साधार आरोप येऊ न देण्यासाठी संयम राखला आणि पुढील युद्धविषयक हालचालींत त्याच राजनीतीला धरून असणारी वागणूक स्वीकारलेली दिसून येते.

(३) शिवाजी महाराजांनी इस्लामी अगर इतर धर्म किंवा पंथाबाबत जनतेंत द्वेषभाव वाढू दिला नाही. स्थानिक मुसलमानांना आपले व्यक्तिगत धर्माचरण आचरण्यास मुभा ठेविली होती. त्यामुळे खेडोपाड्यांतही अल्पसंख्य मुसलमान आपला आयु:क्रम विना त्रास घालवीत होते. नंतरही धर्मद्वेष नव्हता तरी इतर धर्मांनी अत्याचार केल्याने होणारी हानी भरून काढण्याकरिता

जबरदस्तीने बाटलेल्यांना हिंदू धर्मात घेण्याची सरकार तर्फे सोय करून हिंदू धर्मात घेतले जात होते. ही वृत्ती सुरुवातीपासूनच ठेवल्याने व स्थानिक मुसलमानांना घोडदळांत व आरमारांत प्रविष्ठ करून घेतले गेल्याने त्यांनीही निष्ठापूर्वक राज्याची सेवा केली व स्थानिक मुसलमानांनी धर्मविषयक कडव्या भावनांचा शेवटपर्यंत स्वीकार केला नाही.

(४) आपल्या धर्माची नीतिपूर्ण व सन्मानतेने पाळणूक करून स्वधर्माचा उत्कर्ष साधण्यांत जसा प्रयत्न केला तसाच परधर्मीयांच्या आक्रमक वृत्तीचा आळा घालण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे स्वराज्यासाठी तयार करण्यात येणारी संघटना अधिकाधिक बलशाही होत गेली.[५८] अशा प्रकारची शिवाजी महाराजांची यावेळी कौशल्य पाहायला मिळाली असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

४.१० 'हिंदवी स्वराज्याचा' विस्तार

हिंदवी स्वराज्याच्या विस्तारासंदर्भात बखरकारांनी जी क्रमवारी चुकविली आहे. त्याचा बेंद्रे चांगलाच समाचार घेतात व शिवाजीला परकीयांबरोबरच स्वकीयांशीही संघर्ष करावा लागला. बेंद्रेंनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांची चिकित्सा करून हिंदवी स्वराज्याच्या विस्ताराची कोणत्या घेटनेपासून सुरुवात होते. ते सांगून बखरकारांनी व इतर साधनांकारांनी घटनांच्या क्रमवारीत केलेली गडबड सांगून ती क्रमवारी खालीलप्रमाणे दिली व त्या घटनांची चिकित्सा केली.

बेंद्रे लिहितात शाहाजी महाराजांच्या कैदेपासून (१६४८ च्या पावसाळ्यापासून ते अफजलखानाची शिवाजीच्या पारिपत्यार्थ रवानगी) १६५९ चा पावसाळा संपेपर्यंतच्या हालचाली म्हणजे (१) फत्तेखानाशी लढाई (१६४८-४९); (२) चंद्रराव मोरे प्रकरण; (३) रायगड घेणे (१६५६ इ.स.); (४) मुहमंद आदिलशाहाचा मृत्यू (४ नोव्हेंबर १६५६); (५) सुपें घेणे-संभाजी मोहितेची कैद (१६५६ इ. स.); (६) शिवाजीची तीन लग्ने १६५७ इ. स. खान महंमदच्या मृत्युनंतर (१६५७ इ.स.); (७) जुन्नर शहर मारणे (१६५७ इ.स.); (८) अहमदनगर मारणे (१६५७ इ.स.); (९) कल्याण-भिवंडी मारणे (१६५७ इ.स.); (१०) माहुलीगड घेणे (१६५७ इ.स.); (११) संभाजी जन्म (१६५७ इ.स.) इतकेच सभासदी व इतर बखरीतील प्रसंग अफजलखान प्रकरणापूर्वीचे आहेत.

सभासदीतील (१) सुर्वे-श्रृंगारपूर पाडाव (१६६१ इ.स.); (२) शिर्केशी संबंध (१६६२ इ.स.); (३) मोरोपंत पेशवाई वगैरे (इ.स. १६६१) हे प्रसंग त्यानंतरचे आहेत.

इतर बखरीतील प्रसंग म्हणजे (१) सुरसगड बिरवाडी घेणे; (२) आदिलशाही ७०० पठाण बारगीर चाकरीत घेणे; (३) आवंढा व पट्टा गड घेणे; (४) वासोटा घेणे (१६६०); (५) हरिहरेश्वरों (बसनूर) जाणे (१६४८ इ.स.); (६) सावंतापासून भवानी तलवार घेणे (१६६५ इ.स.); (७) राजापूर मारणे (१६६१ इ.स.); (८) कुडाळफोंडा घेणे (१६६६ इ.स.); (९) कांगारी, तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची, कुचरी, कोरप, धनगड, केळंजा, रोहिडा, तळे घोसाळे, चंदनवंदन, पांडवगड, नांदगिरी, सातारा, परळी, पन्हाळा, वसंतगड, शिरोळ, पुरंदर, विशाळगड, बागडा, रांगणा, नाशिककडील किल्ले वगैरे घेणे.

हे सर्व प्रसंग १६५८ नंतरचे आहेत. या प्रसंगाचा कालक्रम विचारांत घेतला की, शिवाजीच्या राजकारणांत जाणवणारी अवास्तवता शाहाजी, शिवाजी व जिजाबाई यांच्या संबंधाबाबत शंका आणि तत्कालीन इस्लामी राज्य बांधणेविषयी भासणारी अपात्रता किंवा विवेचनांतील मराठ्यांस केवळ दैवी शक्तीमुळे मिळणाऱ्या यशाच्या कहाणीयुक्त असत्यतेचे निरसन होते.[५९]

१२ मावळे घेणे शिवाजी महाराजांचा अधिकार होता :

शिवाजी महाराज पुण्यास येताच १२ मावळे काबिज केले. आदिलशहाविरोधात बंड पुकारले असे बखरकार लिहितात. त्याला उत्तर देतांना वा. सी. बेंद्रे लिहितात की, "१६३६ च्या तहाने १२ मावळे रणदुल्लाखानास जहांगीर म्हणून मिळाली. शाहाजी महाराज त्याला सैन्यानिशी मदत करीत हाते. म्हणून त्यांच्या सैन्याच्या रोजच्या खर्चाकरिता म्हणून जो सरंजाम द्यावयाचा तो या बारा मावळांतील महसुलांतून द्यावयाचा होता. याकरिता सरंजाम वसूल करणारा शाहाजीचा मुखत्यार व रणदुल्लाखानाचा सुभेदार म्हणून दादोजी कोंडदेवांची नेमणूक झाली होती.[६०] यामुळे १२ मावळांचा ताबा शाहाजीकडे आला होता. वारस म्हणून शिवाजीही १६३६ मध्ये १२ मावळांचा ताबेदार अप्रत्यक्षपणे होताच १६४२ मध्ये महाराज पुण्यास आले तेव्हा शाहाजी महाराजांनी आपली जहांगीरी त्यांचेकडे सोपविली आणि १६४७ मध्ये दादाजीपंताचा मृत्यू होताच त्यांच्या सुभेदारीसह १२ मावळे शिवाजीच्या आपोआप ताब्यात आली, ती काबीज करावी लागली नव्हती. साहजिकच यामुळे आदिलशाहाच्या दृष्टीने काहीही गैरवाजवी फरक नव्हता. रीतसरच

व्यवस्था झाली होती. इतकेच नव्हे तर हा प्रत्यक्ष ताबा घेतल्याने शिवाजीराजे आदिलशाहाचे चाकरींत आल्याचे पातशाहाला समाधान वाटले असले पाहिजे व नंतर १६५६ च्या सुमारास जी काही पावले शिवाजीने या भागात उचलली ती बंडाचा भाग नव्हती. तो शिवाजीचा अधिकार होता असे बेंद्रे म्हणतात.

मोरे प्रकरण :

मोरे प्रकरणासंदर्भात बेंद्रे लिहितात की, "मोरे प्रकरणातही बखरकारांनी बराच विपर्यास केला आहे. मोरे यांच्या कुटुंबात भाऊबंदकीचे भांडण लागले होते. त्या भांडणात शिवाजी महाराजांनी सुभेदार या नात्याने चंद्रराव मोरेला पुन्हा रायरी गडावर १६५२ च्या सुमारास स्थापिले होते; परंतु त्यांच्या भाऊबंदानी त्याचा काही प्रदेश दाबलाच होता. चंद्ररावने नंतर काही जहांगिरदारांचा प्रदेश जबरदस्तीने घेतला. त्याबद्दल बऱ्याच तक्रारी आदिलशाहापर्यंत गेल्या होत्या. या तक्रारीच्या वेळी महंमद आदिलशाहा दीर्घ आजारी झाल्याने राज्यात अस्वस्थता माजली होती. खास आदिलशहास घ्यावयाचा महसुलही देण्यात कचराई केली गेली होती. अर्थात ह्या गुन्ह्यांचे शासन आदिलशाही सरदारांनीच करावयाचे होते. या आवश्यक गोष्टीपैकी काहीच तडीस नेले जात नाही. म्हणून या लोकांनी आपल्या तक्रारी दादोजी कोंडदेवाच्या मृत्युनंतर शिवाजी महाराजांकडे सुपूर्त केल्या. या तक्रारीत जेधेचीही तक्रार होती. तेव्हा गुन्हेगाराला शासन करण्याच्या उद्देशाने शिवाजी महाराजांनी आपला अधिकारी पाठविला. तो या तक्रारी बाबतच गेला होता. त्यामुळे मोरेंनी तक्रारीची भरपाई करून देण्याबाबतच बोलणे केले असले पाहिजे; परंतु त्याने हुकूम न मानण्याचा हट्ट धरल्याने त्याचे पारिपत्य करणे जरूर भोसले आणि त्याप्रमाणे मुलींच्या मागण्या नाकारल्यावरून हे शासन केले असे म्हणणे अवास्तव आहे. शिवाजीची योग्यता व दर्जा इतका मोठा होता व मोरेंच्या पुन:र्स्थापनेमुळे त्याचे जे उपकार झाले होते त्यांचा विचार केला तर त्यांनी तो व्यवहार इतक्या थराला जाऊ दिला असता असे वाटत नाही. बखरकारांना कारण शोधता आले नाही. म्हणून श्रोत्यांना खुलणारे असे स्त्रीजाती बाबत गाह्य काल्पनिक विवेचन कथेकरी जसे करितात तसे ते केलेले असावे."[६१]

सुपे प्रकरण :

सुपे प्रकरणासंदर्भात बेंद्रे लिहितात की, "सुपे प्रकरणात तत्कालीन साधनांनी कार्यकारण भावांत विपर्यास केल्याने गुन्हेगाराचीच बाजू उचलून धरिली गेली आहे. खरे पाहता सुप्याचा

कारभार गैरहिसाबी चालला होता. मोहितेच्या अन्यायी वर्तनाबाबत शाहाजी राजांकडे तक्रारी गेल्या. शिवाजीच्या आदेशांनाही उर्मटपणे झिडकारले. याबाबत बरीच पत्रे प्रसिद्ध झाली आहेत." त्या पत्रांतील मजकूर देऊन बेंद्रे सांगतात की, "संभाजी मोहित्याला आपले मेव्हणे शाहाजी महाराज यांच्या धाकट्या सावत्र मुलाचा हुकूम मानणे मानहानीचे वाटले. त्यामुळे शाहाजी सुप्यास फाल्गुन लागण्यापूर्वीच तीन चार महिने होळीचे पोस्त मागण्यास गेले होते. असा विपर्यास केल्याने या प्रसंगातील कार्यकारणभाव हीन दर्जा प्राप्त केला आहे. शिवाजी महाराज सुप्यास गेले. ते संभाजी मोहिते अन्यायी वर्तनावरून त्यास शाहाजीने बडतर्फ करून सुपे परगणा शिवाजीकडे सोपविला होता. त्या सुभ्याचा ताबा घेण्यास गेले होते व संभाजी मोहितेने तो निमुटपणे देण्याचे नाकारल्यामुळे त्यांना धरून कैद करून सक्तीने शाहाजीराजांकडे पाठविले असे स्पष्ट होते."[६२]

तळकोकण :

तळकोकणाची हकीकत वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे सांगतात, 'मोरेच्या कारवाईनंतर मात्र शिवाजीचा विचार स्वतंत्र स्वराज्याच्या पायाभरणीकडे वळला. इ. स. १६५६ मध्ये सुलतान महमंद पादशाहा वारला. त्यापूर्वी त्याने आपल्या पत्नीच्या आग्रहावरून अली आदिलशाहाला राज्यावर घेतले. त्यामुळे तो खरा वारस नसल्यामुळे आदिलशाहीत भांडणे लागली. दोन मोठे गट पडले. त्यातील शाहाजी महाराजांचा गट मोठ्या सरदारांचा होता. औरंगजेबाला अली आदिलशाहाला पादशाहा करावे हे रुचले नाही. शिवाय औरंगजेबाच्या मनात आदिलशाहीचे लचके तोडून मोगली साम्राज्यात भर घालावयाची होतीच. आदिलशाहींतील भांडणामुळे परिस्थिती बिघडली आहे असे पाहून त्याने बेदरावर हल्ला चढविला. यापूर्वी महमंद आदिलशाहा हयात असतांनाच त्याने इ. स. १६३५ च्या तहान्वये आदिलशहास मिळालेले निजामशाहीच्या तळकोकणावरील सुभेदार यास तातडीने राजधानीत बोलावून नेले. त्यामुळे तळकोकणचा सुभा मोकळा पडलेला पाहून शिवाजीने निजामशाहीचे तळकोकण आदिलशाहीत आले होते ते सोडवून आपल्या ताब्यात घ्यावयाचा प्रयत्न केला. तो बराच यशस्वीही झाला.'

"जो तळकोंकण मुलुखाबद्दल विविध हालचाली झाल्या तो मुलूख शाहाजीकडे निजामशाहीपासून सरदेशमुखी म्हणून होता. जेव्हा शाहाजीला कर्नाटकात स्वारीवर पाठविले तेव्हा हा मुलूख त्याच्या गैरहजेरीत मुल्ला महंमदच्या ताब्यात दिला होता. शिवाजीला हा मुलूख

पुणे सुपेसारखा आपलाच आहे व तो आपल्या ताब्यात घ्यावा असे वाटणे साहजिकच होते. विशेषतः मुल्ला महंमदास तेथून काढून नेल्यानंतर व तेथील व्यवस्था काही न केल्यामुळे तेथील लोकांनी तो शिवाजीच्या ताब्यात देण्यास थोडीही खंत केली नाही; परंतु जुन्नर-अहमदनगरकडील मुलूख मोगलाकडे असल्याने शिवाजीस लढा द्यावा लागला आणि औरंगजेबाने आपल्या अडचणींच्या काळात शिवाजीचा सरदेशमुखीचा हक्क मान्य करून सोन्याचे पत्रावर सनद बहाल केली. शिवाजीचा जुन्नर व अहमदनगरवरील सरदेशमुखी अधिकार मुरार बक्षानेही ३० नोव्हेंबर १६४९ लाच आपल्या फर्मानात मान्य केला होता. मात्र अंमलबजावणी झाली नव्हती. सारांश ह्या हालचाली शिवाजीने आपला हक्क वसूल करण्याकरिता केल्या होत्या, परराज्यांत आक्रमण म्हणून त्या नव्हत्या असे मानावे लागते."[६३]

४.११ आदिलशाही-अफजलखानाची स्वारी

शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाची घटना म्हणजे आदिलशाही अफजलखानाची झालेली त्यांच्यावरील स्वारी होय. या घटनेसंदर्भातही बखरकारांनी आपल्या कल्पनेच्या जोरावर अनेक बाबी जोडण्याचा प्रयत्न करून त्या घटनेला अतिरंजन स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. वा. सी. बेंद्रे त्या सर्व बाबींचा चांगलाच समाचार घेतात व या स्वारीमागील सत्यता प्रकाशात आणतात.

सुरुवातीला अफजलखानाची स्वारी का झाली? हे सांगताना ते बुसातिन-उस-सलातीनमधील संदर्भ देतात, "शिवा भोसला याजला फारच गर्व व अभिमान झाला. दिवसेंदिवस अधिकाधिकच दांडगेपणा करू लागला तेव्हा अली आदिलशाहा पादशाहा याणी जाणिले की, या महिन्यांत आता चालढकलीवर नेणे व गाफिलगिरी करणे हे पादशाही कायद्यास फार विरूद्ध आहे. आता शिवाचे पारपत्य करण्यास सुस्ती केली असता राज्य बुडण्याचे कारण आहे."[६४] म्हणून अफझलखानाला शिवाजीच्या मोहिमेवर पाठविण्यात आले.

अफजखानास पाठविण्यापूर्वी बेगम साहेबाने शाहाजींशी पत्रव्यवहार केला होता. असे सभासद बखरीप्रमाणे बाकी काही बखरीही सांगतात. त्याचे स्पष्टीकरण देताना वा. सी. बेंद्रे लिहितात की, "तत्कालीन परिस्थितीचा विचार केला तर असे झाले असणे शक्य दिसत नाही. उलट शाहाजीला तो शिवाजीच्या बंडाबाबत त्याच्याकडे काही दोष नसल्याची ग्वाही खास आदिलशाहानेच आपल्या फर्मानाने कळविली होती. महंमद आदिलशाहा १६५६ च्या

नोव्हेंबरमध्ये वारला. त्यानंतर अली आदिलशाहा सलतनतीवर आल्याने अंतस्थ गट पडले. शाहाजी व इतर बरेच मुसलमान सरदार व औरंगजेब अली आदिलशाहाविरूद्ध गटात होते. ४ जून १६५७ ला औरंगजेबाने बेदर घेतले. १० नोव्हेंबर १६५७ रोजी खान महंमद बडे साहेबिणीने मारिला. नंतर जुलै १६५८ मध्ये बहलोलखान मारिला. जानेवारी १६५९ मध्ये फत्तेखान मारिला आणि १६५९ च्या एप्रिल पूर्वीच अफजलखानाच्या स्वारीचा पुकार करून सैन्याची जुळवाजुळव करण्यास प्रारंभ झाला. शिवाजी व शाहाजी हे या विरूद्ध गटात होते. हे बेगमला माहित होते. शिवाजीची लढाई ही याच गटांच्या राजकारणाचा भाग असे समजले जात होते. त्यामुळे शिवाजीवरून शाहाजीला पत्र लिहिण्याचे कारण नाही. शिवाय अफजलखानाच्या स्वारीची बातमी लागताच जो शाहाजी आपल्या सतरा हजार सैन्यानिशी विजापुरवर चालून येतो त्याला काही कोकणांतील हालचालीवरून जर काही बखरी सूचवितात त्याप्रमाणे तसा पत्रव्यवहार झाला असतां तर तो अफजलखानाची स्वारी निघण्यापूर्वी विजापुरी दाखल झाला असता. शाहाजीचे अफजलखानाशी पहिलेपासूनच वाकडे होते, परंतु शहाजीला ह्या स्वारीची बातमी करण्यास जरा उशीर झाला आणि तो वाट चालत असतांनाच आपल्या मुलाने अफजलखानाला कबरेत ढकलल्याचे वृत्त कळताच त्याने विजापुरविरूद्ध टाकलेला पवित्रा मागे घेतला."[६५] म्हणजेच या पत्रव्यवहाराची कथा केवळ काल्पनिक आहे यात शंका नाही.

सभासद बखरीमध्ये सभासदाने अफजलखानाच्या वकिलाचे नाव कृष्णाजी भास्कर ऐवजी पंताजी गोपीनाथ असे दिले. या संदर्भात वा. सी. बेंद्रे लिहितात की, "कृष्णाजी भास्करबाबत सभासदाचा बराच गैरसमज झालेला दिसतो. एकंदर परिस्थितीचा विचार केल्यास बखरकारांनी कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपीनाथ याचा कथाभाग रंगविला आहे. तो जसा थोडाबहूत काल्पनिक आहे. तसाच तो विपर्यस्तही आहे. कृष्णाजी भास्कर हा मुलतःच आदिलशाही नोकर." पुढे अफजलखानाच्या मृत्युनंतर कृष्णाजी भास्करला ब्राह्मण म्हणून जिवंत ठेवले असे वर्णन ज्या बखरी करितात त्यांना बेंद्रे उत्तर देतात की, "कृष्णाजी भास्कर विशेषतः अफजलखानाचा मुर्दा पडल्यावर आपल्या स्वामीभक्तीच्या प्रदर्शनार्थ शिवाजीवर तलवार चालवील आणि जे पाठीराखे शिवाजीला न कळू देता सय्यद बंडाला चिरून अल्लाकडे पाठवितात ते कृष्णाजी भास्करला जिवंत ठेवतील असे माणने बरोबर नाही." सारांश, कृष्णाजी भास्कर हा आदिलशाही सुभेदार होता आणि त्या सुभेदाराने नोकर म्हणून अफजलखानाला मदत

करणे शक्य होते; परंतु शिवाजी महाराजांनी त्या बाजूचा भाग घेतला होता. त्यामुळे त्यांचे शिवाजीकडे लक्ष लागणेही शक्य होते. सहजच कृष्णाजी भास्करने शिवाजीची बाजू संभाळली आणि त्या कृष्णाजी भास्कराने महाराजावर तलवार उगारली. याबद्दल विशेष पुरावा नाही. कदाचित त्याने आपण शिवाजीच्या गटात नसल्याचा देखावा केला असावा. तसे जर नसते तर शिवाजीने त्याला पुढे सुभेदारीवर ठेवलेच नसते असे बेंद्रे म्हणतात.[६६]

चित्रगुप्त बखरीत सभासदीचाच पूर्णपणे अनुवाद आलेला आहे. मात्र चित्रगुप्ताने त्यात आपली काल्पनिक व कथाथाटाची भरमसाट भर घातली आहे. ती इतिहासाभ्यासांत विचारांत घेण्याबाहेरची आहे असे बेंद्रे म्हणतात व पुढे सांगतात की, चित्रगुप्ताने पंताजीपंत हा शब्द दत्ताजीपंत म्हणजे 'प' च्या जागी 'द' वाचून व सर्वत्र दत्ताजीपंत असा उल्लेख केला आहे. शिवाजीने प्रतापगडावरून खाली उतरतांना जिजाईचा आशिर्वाद घेत असल्याचे दोन उल्लेख केले आहे. मात्र जिजाई राजगडीच ठेवून शिवाजीराजे प्रतापगडास आल्याचे सुरुवातीला तो स्वतःच सांगतो असे बेंद्रे स्पष्ट करतात.[६७]

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत तुळजापूर व पंढरपूरच्या मूर्तीचे दळून पीठ करण्याचा जो उल्लेख आलेला आहे. त्यासंदर्भात वा. सी. बेंद्रे म्हणतात की, "दोन्ही ठिकाणचे कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यावरून तेथील गावकरी व पुढारी यांनी स्वारीची बातमी लागताच त्या मूर्ती वेळीच सुरक्षित जागी लपवून ठेवल्याचा अव्वल पुरावा मिळतो. या मूर्तीचे नंतर पुनर्स्थापन करण्यात आले. अफजलखानाला घाईत आपली मुख्य कारवाई उरकावयाची होती. त्यामुळे त्याला त्या मूर्तीच्या शोधात अधिक काळ घालविण्यास सवड नव्हती."[६८]

बखरकारांच्या मते शिवाजीने अफजलखानाला वाईवरून जावळीखोऱ्यात आणले. हे मत बेंद्रे खोडतात व सांगतात की, अफजलखान वाईवरून जावळीखोऱ्यातच जाण्यासाठी निघाला होता.[६९] कारण "शिवाजीवरील स्वारीबरोबर अफजलखानाने प्रतापराव मोरेंचे प्रकरण बरोबर आणले होते आणि या प्रकरणात यशस्वी साह्य झाले तर मोरेंची मदत व या दुर्घट जंगल डोंगराच्या क्षेत्रात चढाई करून शिवाजीला कैद अगर ठार करावयाचे होते."

बेंद्रे म्हणतात की, बखरकारांनी शिवाजी महाराज आपल्या वडील भावाचा सूड घेण्याच्याच तंद्रित होते असे वर्णन केले आहे. याला उत्तर देतांना बेंद्रे लिहितात, "बखरकारांची ही कल्पना पूर्णतः चुकीची आहे. कारण संभाजीराजे इ.स. १६६३ पर्यंत तरी सुखरूप हयात होते.

हे त्यांच्याच दानपत्रांवरून सिद्ध झाले आहे. तेव्हा संभाजीच्या मृत्युशी अफजलवधाचा संबंध जोडणे अवास्तव आहे. कारण अफजलवधानंतर संभाजी हा निदान तीन-चार वर्षे तरी जिवंत होता. अर्थात शिवाजी, जिजाबाई किंवा इतर कोणच्याही मनात अफजलवध प्रसंगी संभाजीच्या मृत्युबाबत सूड घेण्याची कल्पना उद्भवणे शक्य नव्हते."[७०]

शिवाजी महाराज अफजलखानाच्या भेटीच्या वेळी प्रतापगडावरच का येऊन राहिले होते? याचे स्पष्टीकरण वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "शिवाजी महाराजांच्या त्यावेळच्या महत्त्वाच्या प्रदेशांचा विचार करता इतरत्र चांगली सुरक्षित ठाणी टाकून प्रतापगडी येण्याचे कारण बखरकारांना माहित नव्हते. बखरकारांची समज की, शत्रूस डोंगरदरीत आणण्यासाठी हा डाव होता; परंतु जेधे शकावलीप्रमाणे राजे ११ जुले १६५९ रोजी जावळीस आले. मोरेंचा पाडाव करून प्रतापगड नुकताच पुन्हा बांधला होता. तेथे देवी भवानीची स्थापना केली होती. ही जागा उत्तम हवेशीर निंबाळकर पवारांची म्हणजे राणी सईबाईच्या भावाची पूर्वार्जित. तेव्हा ती आजारपणामुळे भावाकडे गेली होती. सईबाई ५ सप्टेंबर १६५९ ला वारली. साहजिकच शिवाजी व जिजाबाईला तत्पूर्वी तेथे जावे लागले. तीन लहान मुले त्यांची व्यवस्था आणि विशेषतः संभाजी लहान, त्यामुळे जिजाईला तेथे राहणे भागच होते. सईबाईचा आजार वाढल्याने राजे ११ जुलै १६५९ ला तेथे गेले होते. पत्नीला मृत्युनंतर अंत्यसंस्कार करण्याकरिता तेथे मुक्काम करून राहणे प्राप्तच होते. इतरत्र तयारी चालू ठेवलीच होती. मोठी सैन्ये अफजलच्या अवतीभोवती ठेविली होती. इतक्यात अफजलखान वाईला येऊन बसला. येताच जरब बसविण्याच्या उद्देशाने शिवाजीच्या हद्दीत घुसून चढाईचा पवित्रा उचलला होता. शिवाजी प्रतापगडी आहे असे समजताच त्याने आपले वकील राजाकडे पाठविले. शिवाजी तत्कालीन परिस्थितीत प्रतापगड सोडून जाणार नाही हे तो जाणत होता. वकीलाच्या बोलण्याप्रमाणे भेटीचा कार्यक्रम सहजच प्रतापगडाखाली ठरला. त्यात अफजलखानाला मुद्दाम या अडचणींच्या जागेत आणून दगा देण्याचा कट नव्हता, कारण ही जागा आदिलशाही सैन्य पारघाट चढतांनाच ठरविली गेली होती. सारांश, अफजलखान केवळ भेटीसाठी म्हणून या पारघाटी आला नव्हता तर जावळी घेण्यासाठी चालू असलेल्या वाटाघाटीत त्याने वाटेत शिवाजीस भेट घेण्याची कबुली दिली होती. त्याचप्रमाणे शिवाजीही अफजलखानाला डोंगरखिंडीत पकडून खून करण्याच्या कारस्थानासाठी प्रतापगडी

येऊन राहिला नव्हता तर आपल्या बायकोचा आजार व मृत्यू या आघातांना तोंड देण्यासाठी तेथे येऊन राहिला होता."[७१] अफजलखानाच्या भेटीची मीमांसा करतांना वा. सी. बेंद्रे लिहितात की,

(१) अफजलखानाच्या पोटात वार होतो त्याअर्थी शिवाजीचा खांद्यावरील भाग पकडीत असला पाहिजे यात शंका नाही. विशेषतः हा वार पोटाच्या खालच्या बाजूने झाल्याकारणाने कोथळा बाहेर लोंबू लागला. बेंद्रे म्हणतात, 'वाघनखांनी एवढी एव्हढी खोल व मोठी जखम होऊ शकणार नाही. कमरेला म्यानात ठेवलेली 'कृपाणिका' (म्हणजे एक धारी लहान व शेवटचा एकतृतियांशापर्यंत भाग चंद्रकोर असलेली तलवार) किंवा बिचवा उपसतांनाच असा वार होऊ शकेल. तत्कालीन कागदपत्रांत कृपाणिका किंवा बिचवा म्हणजे कृपाण असाच उल्लेख आढळतो. अफजलखान घायाळ झाल्याने गडबड उडाली व बरोबरील लोकांत झुंज होऊन आदलिशाहाकडील लोक मारले गेले. अफजलच्या सैन्यात बातमी पोहोचण्यापूर्वी शिवाजीच्या सैन्याने चारी बाजूंनी त्या सैन्यात शिरून धुमाकूळ उडवून दिला. आदिलशाही सैन्य बरेच धुळीस मिळाले व बरेच पळून गेले.'

(२) शिवाजीने राज्यांतील भागावर आक्रमण केले म्हणून मोगल व आदिलशाहा यांनी आपला राज्यभाग परत घेण्याचा व आक्रमकाचे पारिपत्य करण्याकरिता ही मोहिम आखली होती. उलट शिवाजीने आपल्या 'हिंदवी स्वराज्या'च्या विस्ताराकरिता किंवा संरक्षणासाठी जरूर तो लढा देणे राज्यनीतीला धरूनच होते. अफजलखानाने तत्कालीन प्रघाताप्रमाणे शिवाजीला पकडून कैद करण्याचा प्रयत्न केला आणि शिवाजीने आपली सुटका करून घेण्याकरितां एकाकी लढा दिला आणि शत्रूचा विध्वंस केला. प्रथम अफजलखानाने शिवाजीची मान काखेत धरून ठेवण्याचा प्रयत्न केला यांत शंका नाही. तसे नसते तर त्या पोटाच्या खालच्या भागावर घाव बसतांना अफजलखानाने जबरदस्तीने शिवाजीची किमान शरणागती तरी मिळविण्यासाठी प्रयत्न केला असता. तेव्हा या राजकारणांत खून, फसवणूकीने मृत्यू यासारखे आरोप करणे तितके राजनीतिशास्त्राला धरून होणार नाही असे बेंद्रे येथे स्पष्ट करतात.

(३) जेधे शकावली व अणुपुराणांत पुष्कळच वास्तवबोधी मजकूर आला आहे. लढाईचा मजकूरही विस्ताराने आला असल्याने शिवाजी महाराजांचे मनुष्यबळ कसे निष्ठापूर्व वागले. हे समजते व त्यावरून मावळी जनतेला महाराजांनी कसे आपल्या 'हिदवी स्वराज्या'च्या उद्दिष्टाकडे खेचून घेतले होते याचा बोध होतो. शिवाजीच्या पाठीराख्यात एक सिद्दी सरदारही

होता. ही बाब लक्षात घेतली तर शिवाजीच्या हालचाली, जातीय किंवा धार्मिक द्वेषाला धरून होत होत्या असे म्हणणे बरोबर ठरणार नाही असे बेंद्रे स्पष्ट करतात.[७२]

४.१२ शिवाजी महाराजांचे कोकणांत आक्रमण

कोकण प्रदेश मुलतः पूर्वेस न ओलांडता येणाऱ्या सह्याद्रीच्या कडाने संरक्षित व पश्चिमेस समुद्र किनाऱ्याने व्यापलेला, दक्षिणेस व उत्तरेस डोंगरदरीच्या वाटेने जोडलेला व नदी खाड्यांच्या दलदलीने व्यापलेला असा आहे. समुद्र किनारा सोडला तर दळणवळणाचे मार्ग अकुंचित व विरळ आणि खाड्यांच्या भरती आहोटीवर अवलंबून आहेत. येथील परिस्थितीमुळे बाजारपेठा नाहीत म्हटले तरी चालेल. त्यामुळे संपर्क काय तो समुद्रांतून प्रवास करून येणाऱ्या व्यापारी व इतर लोकांचा. स्थानिक लोकांना समुद्र प्रवास धर्मनिषिद्ध असल्याने परदेशीय लोक शक्तिबरोबर जमिनीचेही मालक झाले. सिद्दी आले त्यांनी आपले असान येथे कायम केले. पोर्तुगीज, डच व फ्रेंच आल व त्यांनी येथे आपले बस्तान कायमचे बसविले. इंग्रजांनीही आपला साम्राज्याचा ताबा या बंदराच्याच साह्याने मिळविला; पण भारतीयांना धार्मिक नियोजनामुळे ठराविक पूजाअर्चेच्या मर्यादेबाहेर जाण्याचा मज्जाव राहिल्याने समुद्र हा एक संकटाचा भाग होऊन राहिला होता. या विशिष्ट अडचणींना तोड देऊन आपला समाज पुरोगामी राखावयाचा व त्यासाठी समुद्रापासून देशास संरक्षण द्यावयाचा भाग पार पाडण्यास शिवाजी महाराजांना आचार धर्मातही क्रांती घडवून आणण्याचे बिकट काम करणे प्राप्त झाले. कारण त्यांना वाटत होते की, आपल्या मध्यभूमीत 'हिंदवी स्वराज्या'ची इमारत उभारावयाची तर आपल्या प्रयत्नांना सुरक्षितता देण्यास हाच प्रदेश अधिक उपकारक ठरेल.

जेव्हा कोकणात शिरण्याची संधी आली तेव्हा शिवाजीने कोकणातील प्रदेश आपल्या ताब्यात आणण्यासाठी कारवाई सुरू केली. तसेच या कोकण प्रांताची सुरक्षितता व जीवित्व उंचावण्यासाठी ज्यांना समुद्रपर्यटनाची कला अवगत होती त्यांच्याकडूनच म्हणजे सिद्दी मुसलमानांकडून (आपल्या भरवश्याच्या बाटलेल्या) करून घेतले. आपल्या लोकांना धर्माचाराविरूद्ध बंड करावयास उद्युक्त करणे फार कठीण काम होते. हे कार्य शिवाजी महराजांनी मोठ्या तत्परतेने व फारसे धार्मिक वाद उत्पन्न होऊ न देता केले.

सर्व देशी व विदेशी साधनांचा अभ्यास करून वा. सी. बेंद्रे सांगतात की, (१) आदिलशाही कोकणांतील आक्रमाणासंदर्भात तपशीलवार माहिती मिळत नाही.

(२) शिवाजी महाराजांनी आपल्या संकटग्रस्त परिस्थितीतून अगदी सिद्दी जोहराची भेट घेताच पन्हाळ्यावरून घाईने सुटका करून घेण्याचा प्रयत्न का व कोणत्या धोरणा अंतर्गत केला हे स्पष्ट होत नाही? (३) सिद्दी जोहरने आपण मोगली सरदार म्हणवून घेऊन जो आदिलशाहा त्याची बढती करीत होता त्याच्या विरोधात पन्हाळ्याचा तह होताच बंड का करण्यास प्रवृत्त झाला? याचीही कारणे आपणास सापडत नाहीत.

या प्रश्नाची उत्तरे वा. सी. बेंद्रे तत्कालीन जो पत्रव्यवहार झाला होता. त्या पत्रव्यवहाराची चिकित्सा करून काढण्याचा प्रयत्न करतात. तो आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येईल.[७३]

भर पावसाळ्यात व अमावस्याच्या गर्द अंधरातून २७ जुलै १६६० रोजी शिवाजीराजे पन्हाळ्यावरून उतरून खेळण्यास गेले. २२ सप्टेंबर १६६१ उंबरखिंडीची लढाई जिंकली व नंतर पंधरवाड्यात राजे यांनी निजामपूर लुटले आणि दाभोळ व प्रभावळी काबीज केली. याच काळातील सिद्दी जोहराच्या हालचाली आणि विशेषतः सिद्दी जोहर व शिवाजी यांच्या भेटीचा वृत्तांत ऐकून आदिलशाहाने सहलाबतखानाचा (सिद्दी जोहर) सूड घेण्यासाठी पाचारण केले; पण शिवाजीने सिद्दी जोहरला पन्हाळा दिला व पावसाळा सुरू झाल्याने आदिलशाहा परत गेला. शिवाजीने शास्ताखानाच्या कोकणांतील स्वारीचा उंबरखिंडीत फडशा पाडल्याने कारतलब खानाला शिवाजीच्या अटी मान्य करून आपल्या सैन्याची सुटका करून घ्यावी लागली. या फजितीमुळे मोगली सरदार आपले आक्रमण थांबवतील असा अंदाज बांधून शिवाजीने ताबडतोब आपला मोर्चा दक्षिणेस कोकणाकडे फिरविला असे वा. सी. बेंद्रे सांगतात. ज्यातून आतापर्यंत शिवाजी कोकणात का शिरला? असा जो प्रश्न निर्माण झालेला होता त्याची सोडवणूक होते.

यानंतर वरील निष्कर्षाबाबत बेंद्रे काही पत्रव्यवहाराचा संदर्भ देतात, "प्रथम ते गोव्याच्या व्हॉइसरॉयने जे ६ ऑगस्ट १६५९ ला लिहिले ते सांगतात हा व्हॉइसरॉय लिहितो की, 'शिवाजी (ने)... वसई व चौलकडील प्रदेश काबीज केला असून तो बलिष्ट झाला आहे. त्याने काही गलबतेही भिवंडी, कल्याण व पनवेल.... तालुक्यातील बांधी आहेत.' रेव्हिंग्टन राजापुरांत १४ जानेवारी १६६० ला लिहितो की, 'आता शिवाजीचे सैन्य राजापुरांत आहे. त्याच्या सेनापतीच्या मनांत काय आहे? हे काही समजले नाही.' शिवाजी २ फेब्रुवारी १६६० ला उंबरखिंडीत मोगली सैन्याचा फडशा पाडण्यात मग्न होता. नंतर रेव्हिंग्टन राजापुराहून ४ फेब्रुवारी १६६० ला लिहितो,

'शिवाजीच्या सैन्याच्या हालचाली आमचेपासून जवळच होत असल्यामुळे आम्हाला त्या समजतात. त्याला सारखे यशच येत असून किनाऱ्यावरील अनेक बंदर त्याच्या ताब्यात गेली आहेत. त्यापैकीच दाभोळ हे एक असून तेथील सुभेदार महमूद शरीफ त्या बंदरात आला.' शिवाजी उत्तरेचे बाजूला वावरत असून चौलपासून दाभोळपर्यंत सर्व किनाऱ्याचा स्वामी झाला असल्याचे रेव्हिंग्टनने आपल्या १० डिसेंबर १६६० च्या पत्रांत लिहिले आहे." या रेव्हिंग्टनच्या माहितीला गोवेकर व्हॉइसरॉयच्या १२ मार्च १६६० च्या पत्राने पुष्टीच मिळते. असे बेंद्रे सांगून तो काय म्हणतो ते लिहितो, "सरदार शाहाजीचा पुत्र शिवाजी हा सध्या विजापुराजवळ असून विजापुरकरांच्या सरदारांशी त्याचे युद्ध चालू आहे. त्यात त्याने काही सरदारांचा पराभव केला असून त्याचे शिपाई व घोडे ठार केले. चौलपासून बांद्यापर्यंत सर्व मुलूख शिवाजीच्या ताब्यात आहे. त्याने या मुलुखातील पुष्कळ शहरे व समुद्रकाठची बंदरे काबीज केली आहेत. तशीच बरीच संपत्तीही मिळविली आहे. कारण एक तर त्याच्या राज्याची अव्यवस्था व दुसरे शिवाजीने त्याचे वजनदार सेनापती सर्व मारले आहेत. हल्लीचा विजापुरचा राजा हा दासीपुत्र आहे. त्यामुळे शिवाजी विजापुरच्याच तख्तावर दुसरा एक राजपुत्र बसविणार आहे. याबद्दलची एक अफवा उठली आहे."

राजापुरवाले शिवाजीच्या हालचालीबाबत जे लिहितात ते बेंद्रेंनी येथे दिले ते १९ मार्च १६६० लिहितात, "...शिवाय शिवाजीचे ३-४ हजार लोक सर्व किनाऱ्याभर फिरत आहेत हे आम्ही पाहतो. शहरे घेणे हा उद्देश्य नसून केवळ सैन्याचे पोषणाकरिता हे सैन्य पैसा जमविते..." बेंगुर्ल्याहून डच १० जून १६६० ला जी बातमी देतात जी बेंद्रे सांगतात, "...विजापुरचे राज्यात परिस्थिती थोडी सुधारली आहे. बंडखोर शिवाजीने आपले सैन्य राजधानी नजीक व वेंगुर्ल्याजवळ (३ तासाच्या मुक्कामावर) आणिले होते; परंतु कुडाळाच्या देसायाने त्याला हाकलून लाविले आणि विजापुरकरांच्या आणि गोवळकोंडेकरांच्या संयुक्त भयंकर रक्तपात करून त्याचा पराभव केला. आता शांतता आहे." नंतर तेच ७ फेब्रुवारी १६६१ ला कळवितात, "आणखीही अशी बातमी आहे की... शिवाजी याने विजापुरचे आसमंतात सेनापती मुल्ला महमद व दोन सरदार बहलोलखान व अनाप्पा नायक यांचा पराजय करून निदान २००० घोडेसवार कैद केले."[७४] परमानंदाने दाभोळ, प्रभावळी, संगमेश्वर व पाली यावर स्वारी केली व काबीज केली.

चिपळून, राजापूर आदि पेठाही घेतल्या. बरीच संपत्ती मिळविली. श्रृंगारपूर आदि शहरें घेतली असे वर्णन केलेले आहे.

रॅडोल्फ टेलर राजापुरहून ६ फेब्रुवारी १६६३ ला लिहितो, "राजापूर आदिकडून जो मुलूख शिवाजीने युद्धांत घेतला आहे त्याचा उपभोग शिवाजीने घ्यावा. असा आदिलशाहाने शिवाजीला फर्मान दिला आहे." राजापुरकर ५ मे १६६३ ला सुरतकरांना लिहितात, "विजापुरचा राजा बंकापुरहून परत विजापुरास गेला. येण्यापूर्वी तेथील शिवाप्पा नायकाचा पराभव करून खंडणीचे एकदम ४० हजार पगोडे देण्याचा त्याच्याकडून करार करून घेतला आहे.... खाली गोव्याकडे जाण्याकरिता शिवाजी या मार्गाने येणार आहे अशी वदंता आहे."[७५] परंतु व्हॉइसरॉय शिवाजीला २३ मे १६६३ ला लिहितो, "आपण वेंगुर्ल्यास येऊन पोहोचला. अशी बातमी नुकतीच येथे गोव्यात येऊन पाहोचली... रामजी शेणव्यास आपल्याबरोबर दुसऱ्या गोष्टीबद्दल तह करण्यास अधिकार देऊन पाठविला आहे. आपण जर तह केला तर तो तह दोघांच्याही फायद्याचा होणार आहे." पुढे गिफर्ड कोल्हापुराहून २४ मे १६६३ ला लिहितो, "रावजी (शिवाजी) राजाबरोबर कुडाळा, वेंगुर्ल्याच्या बाजूकडे गेला होता. आपणाकडून किंवा आपल्या शिपायांकडून त्रास दिला जाणार नाही अशा तऱ्हेचा कौल सर्वांनाच शिवाजी देत आहे... त्याचे मनांत वेंगुर्ल्याचे पुढे जावायचे आहे किंवा कसे हाही प्रश्नच आहे. डच लोकांनी कोचीनहून पुष्कळ द्रव्य आणिले आहे असे त्याने ऐकलेच आहे. डचांना अद्यापपर्यंत कोणाताही उपद्रव दिला नसून वखार त्यांच्याच हाती आहे."[७६]

यानंतर बेंद्रे सांगतात डचांनी आपल्या गव्हर्नर जनरलला ११ जून १६६३ रोजी कळवितांना लिहिले की, "विजापुरच्या राज्यातील यादवी अद्याप बंद झाली नाही. वेंगुर्ल्याचा रक्षक लखम सावंत हा किनाऱ्यालगतच्या प्रदेशाचा राजा आहे. त्याने पोर्तुगीजांच्या काही खेड्यात जाळपोळ केली. शिवाजीही खाली उतरणार अशी वदंता असल्यामुळे.... लखम सावंताने त्या व्यापाऱ्यांना शिवाजीविरूद्ध बाजू स्वीकारण्याबाबत सांगितले..."

"वृद्ध राणी मावळेच्या यात्रेहून... वेंगुर्ल्याला २० ऑगस्ट १६६२ रोजी पोचली... विजापुरचा राजा आपल्या आईला घेऊन मोठ्या सैन्यासह भद्राप्पा नायकाकडून खंडणी उकलण्याकरिता म्हणून कानड्यावर स्वारी करण्याच्या तयारीत आहेत."

यानंतर बेंद्रे पुढील पत्रांचा संदर्भ देतात व कारवारकर सुरतेला १५ जून १६६३ ला लिहितात की, "काही दिवसांपूर्वी शिवाजी इकडे बांद्यापर्यंत आला आणि सुमारे मिर्जी (मिरजन) पर्यंतचा इकडील प्रदेश काबीज करण्याचा त्याचा विचार होता असे समजते. परंतु मोगलांकडून जोराचा शह बसल्यामुळे त्या बाजूचे सैन्य त्याने काढून नेले असावे असे दिसते." नंतर २२ जून १६६३ ला गिफर्ड गोव्याहून सुरतेला कळवितो की, "वेंगुर्ल्याला २०० सैन्य ठेऊन शिवाजी तेथून परत फिरला... एवढीच शिवाजीबद्दलची बातमी आहे. शास्ताखान नक्की जिवंत असून त्याने शिवाजीचे पुष्कळ लोक मारल्यामुळे शिवाजी एकाएकी परत गेला."

डच मच्छलीपट्टणहून २ जुलै १६६३ ला लिहितात की, "सुरत व मच्छलीपट्टणम या दोनही ठिकाणाहून अशी बातमी आली आहे की, आमची वेंगुर्ल्याची राहाती इमारत (वखार) बंडखोर शिवाजीने लुटली आणि लोक पळून गेले." वेंगुर्ल्याचे डच ४ नोव्हेंबर १६६३ ला लिहितात, "महा बंडखोर शिवाजी ह्या मुलुखांतील सर्व अस्वस्थतेच्या मुळाशी आहे. ४००० घोडदळ आणि १०००० पायदळ घेऊन तो २१ मे रोजी कुडाळ प्रांती आला. यामुळे वेंगुर्ल्याचे लोक भिऊन पळाले... ह्या कुडाळ प्रांती सुव्यवस्था करून शिवाजी आपल्या मुलुखात गेला. तेथून मोगली सेनापती शाइस्तेखान याच्यावर त्याने विश्वासघाताने छापा घातला... लखम सावंत वाडीतून ६०० शिपायानिशी बाहेर पडून बालघाटाच्या पायथ्याशी जंगलात राहातो..."

यानंतर बेंद्रे १७ नोवहेंबरचे डचाचे पत्र, नंतर कारवारकरनी इंग्रज सुरतेला १६ फेब्रुवारी १६६४ मध्ये लिहिलेले पत्र, नंतर १८ एप्रिल १६६४ चे कारवारकरांचे सुरतेला लिहिलेले पत्र, नंतर कारवारकर १४ मे १६६४ ला लिहितात ते पत्र, नंतर दिलेले १४ मे १६६४ च्या पत्रात कारवारकर सुरतेला कळवितात, "४००० घोडदळ व पायदळ एवढे सैन्य आदिलशाहाने शिवाजीवर पाठविले आहे. ते गोव्यापासून दोन दिवसांच्या प्रवासावर असलेल्या कडोली गावापर्यंत आले असून आपण आदिलशाहाच्या हुकुमाने चौलपर्यंतचा शिवाजीचा सर्व मुलूख घेण्याकरितां आलो आहोत असे ते म्हणतात." यापूर्वी ५ मे १६६४ ला वेंगुर्लेकरांना 'आदिलशाहा मोगलाचा मांडलीक झाला असल्याची' बातमी होती. २३ जुलै १६६४ च्या कारवारकरांच्या पत्रात बरीच माहिती आली आहे. त्यातील महत्त्वाची माहिती बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "रुस्तुमजमा विजापुरांत असून आतापर्यंत आदिलशाहीची त्याच्यावर बरी मर्जी आहे. कारवारचा सुभेदार महमदखान आणि अंकोला, शिवेश्वर, कडेरा वगैरे ठिकाणचे त्याचे दोस्त

सुभेदार हे सर्व कामावरून दूर केले आहेत. पैकी महमदखानाने आपल्या धन्याला (रुस्तुमजमा) सोडून आदिलशाहाचे पदरी सेनापत्य पत्करले. शिवाजीवर स्वारी करण्याकरिता कुडाळला येऊन राहिला. ४००० घोडेस्वारांचा सेनापती अझिजखान (मृत्यू १० जून) याला शिवाजीने विषप्रयोग केल्यामुळे रुस्तुमजमा आता त्याचे जागी नेमला गेला आहे..."[७७]

वेंगुर्ल्याहून डच ३ ऑगस्ट १६६४ ला लिहितात, "शिवाजीजवळ गलबतांची भरपूर संख्या असल्यामुळे तो सहज रात्री छापा घालून गलबत घेईल म्हणून जमिनीपेक्षा पाण्यावरच त्याचे भय बाळगिले पाहिजे. त्यातून वखारींतून माल हालवितांना तर लुटीचे भय फारच आहे. केवळ शिवाजीच नव्हे तर गरीब असल्यामुळे लखम सावंतही, असला डल्ला मरण्यास कमी करणार नाही... पूर्वी लखम सावंताला आता परत दिली आहेत (?) शाहिस्तेखानाला परत बोलून औरंगजेबाने आपला मुलगा सुलतान शहा याला शिवाजीवर पाठविले आहे..." कारवारचे ४ ऑगस्ट १६६४ च्या पत्रातील मजकुरात कारवार इंग्रज लिहितात की, "शिवाजीची इतकी दहशत बसली आहे हे वाचून खेद होतो. ही परिस्थिती केव्हा बदलेल कारण औरंगजेबाचे सैन्य आता परतले आहे. शिवाजीने अहमदनगरही लुटले; पण आपल्याला घाबरून जायायचे कारण नाही. कारण शिवाजीवर रुस्तुमजमा, फाजलखान आणि सादतखान चालून येत आहेत. गोव्याहून शिवाजीच्या बंदरांना वेढा घालण्याकरितां आरमार पाठविले जात आहे अशी बातमी आहे. विजापुरहूनही शिवाजीच्या पारिपत्याकरिता सैन्य जात आहे."[७८]

टेलर गोव्याहून सुरतेला १४ डिसेंबर १६६४ ला लिहितो, "...शिवाजीने हुबळी व इतर बरीच सधन शहरें लुटून बऱ्याच प्रमुख व्यापाऱ्यांना कैद केले. अशी खात्रीलायक बातमी आली... १७ दिवसांपूर्वी दिसलेल्या धुमकेतूचे परिणाम काय होतात..." सुरतकर लंडनला २ जानेवरी १६६५ ला कळवितात की, "शिवाजी आणि त्याचे टेहळचे सर्व देशभर जाळपोळ, कत्तल आणि लूट करीत फिरतात. पूर्वीच त्याने वेंगुर्ले आणि जवळचे दुसरे एक शहर लुटून अपार लूट नेली..."[७९]

इत्यादी पत्रांचा उल्लेख करून शिवाजी महाराजांच्या १६६५ पर्यंतच्या कोकण व सर्वदूर कशा प्रकारे हालचाली चालत होत्या. त्याची माहिती वा. सी. बेंद्रेंनी दिली आहे, वरून शिवाजी महाराजांची ह्या काळात भीती सर्व युरोपियनाना बसली होती तसे या काळात शिवाजीने

नाविकदलही बसवून त्यात प्रगती केल्याने युरोपियानांना आपले अस्तित्व धोक्यात दिसू लागले होते. तसेच शिवाजींना यावेळी एकाचवेळी मोगल व आदिलशाहीला तोंड द्यावे लागले होते.

४.१३ सिद्दी जोहरचा पन्हाळ्यास वेढा

अफझलखानाच्या वधानंतर आदिलशाही सैन्याला माघार घ्यावी लागली. शिवाजीने पाठलाग केला. आदिलशाहीने पुन्हा तयारी करून आपले सैन्य शिवाजीवर पाठविले परंतु त्याही सैन्यांचा टिकाव लागला नाही असे पाहून आदिलशाहाने सिद्दी जोहरास पाठविले. त्याने येऊन शिवाजी जेथे होता म्हणजे पन्हाळा गडावर त्या पन्हाळा गडाला वेढा दिला.[८०] या वेढ्यामध्ये शिवाजीला बराच काळ अडकवून राहावे लागले. जेव्हा शिवाजी महाराजांना पकडण्यात सिद्दी जोहरला यश येत नाही. हे पाहून आदिलशाहाने औरंगजेबाकडे मदतीसाठी विनंती करताच औरंगजेबाने मोठ्या सैन्यानिशी शाहिस्तेखानास पाठविले. थोड्या सैन्यानिशी नेताजी पालकराने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; परंतु शाहिस्तेखान चाकण-पुण्यापर्यंत येऊन धडकला. त्याने कोकणात शिरून शिवाजीच्या राजधानीस धक्का देण्याचा विचार केला. तेव्हा बेंद्रे म्हणतात, त्याप्रमाणे शिवाजीने सिद्दी जोहरशी मैत्री प्रस्थापित केली व पन्हाळ्यावरून आपली सुटका करून घेतली. हे आदिलशाहाला समजताच आदिलशाहा सहसैन्य घेऊन मिरजला पोहोचला तेव्हा शाहिस्तेखानाचा धोका ओळखून शिवाजीने मिरजला आदिलशाहासोबत तह करून आदिलशाहाला पन्हाळा दिला व शाहिस्तेखानाच्या मोहिमेला प्रतिबंध घालण्यासाठी गेला. यानंतर सिद्दी जोहरची व आदिलशाहाची भेट झाली व सिद्दी जोहरनेही तह मान्य केला. अशा प्रकारे सिद्दी जोहर आणि शिवाजी महाराज यांच्यात थोडक्यात संघर्ष झाल्याचे कळते.

मात्र शिवाजी आणि सिद्दी जोहर संघर्षासंदर्भातही विविध साधनांमध्ये विभिन्न माहिती आलेली आहे. त्यामध्ये अनेक चुकीचे मजकूर देण्यात आलेले आहेत. वा. सी. बेंद्रे त्या सर्व साधनांची चिकित्सा करून सिद्दी जोहरच्या पन्हाळ्यावरील वेढ्यासंदर्भातील सत्यता पुढे आणतात. ती सत्यता कोणती यासंदर्भात विवेचन पुढीलप्रमाणे -

बखरकारांच्या निवेदनात शत्रुपक्षीय दृष्टीने एकपक्षीय वर्णनात विपर्यास आलेले आहेत. सभासद बखरीत[८१] नेताजी पालकरांवर शिवाजी महाराज व जिजाबाई यांनी दोषारोप देऊन त्यांचे पद प्रतापराव गुजरला दिल्याची जी कथा रचली तिला मुळीच आधार नाही असे बेंद्रे सांगतात. पुढे बेंद्रे स्पष्टीकरण देतांना सांगतात की, शिवाजी महाराज पन्हाळ्यावरून मोकळे होईपर्यंत

शाहिस्तेखानाची आघाडी थोपवून धरण्याचे फार मोठे व महत्त्वाचे कार्य होते. त्या बंदोबस्तास शिवाजीने पन्हाळ्यावर येताच नेताजीला रवाना केले होते. ज्या मोठ्या व धोक्याच्या आपत्तीसाठी राजांनी आपला जीव धोक्यात टाकून पन्हाळ्यावरून प्रयाण केले ती आपत्ति नेताजीच्या सिद्दी जोहरवर येण्यानीं कशी तीव्रतर झाली असेल याचा अंदाज महाराजांनी घेतल्यानंतरच प्रयाणाचा निर्णय घेतला होता. ही गोष्ट विसरून चालणार नाही. सिद्दी जोहाराच्या वेढ्यापूर्वी फाजलखान व रुस्तुमखानाशी लढाई झाली होती व त्यात त्यांचा पराभव झाल्यावरून सिद्दी जोहरास पाठविले होते, ही गोष्ट बखरकारांना नीट समजली नसावी. त्यामुळे त्यांनी या प्रसंगाचा क्रम उलट लाविल्याने कार्यकारणभाव व परिणाम यांच्या वर्णनात विपर्यास आला आहे.

एक्याण्णव कलमी बखरीमध्ये शिवाजी महाराज पन्हाळगडावरून खाली उतरण्याचे कारण चुकीचे सांगितलेले आहे ते म्हणजे, "त्याउपर वेढियात शिवाजी राजेसाठी हजार मावले व नेताजी पालकर सरनौबत... सा महिने वेढा होता खाली येऊन आंगे रात्री मोरचा मारून वसते गडावर जा असत. यैसे नित्य भांडण होत असे. पावनगड खाली डोंगर होता. त्यावरी तोफा जोडून मार करू लागले. गोळे गडावर येऊ लागले. ते समई हवालदार व लोकांनी अर्ज केला जे साहेबी येथून जाणे म्हणीजे वेढा उठोन जाईल. बाहिरून उपराला होईल. हे मसलत ऐकून राजे तयार होऊन वीस हजार मावले गडी ठेऊन चालीस हजार मावले मोरच्या रात्रीं मारून चालिले."[८२] बेंद्रे म्हणतात ऊलट गडावरील लोकांना शिवाजी राजांनी संकटातून प्रवास करण्यात धोका पत्करू नये असे वाटणे साहजिक होते. त्यामुळे वरील प्रमाणे उद्गार काढणे शक्य नाही.

कवींद्र परमानंदाचे विवेचन पूर्णतः वास्तवबोधी व वस्तुस्थितीला धरून शिवाजीची बाजू सांगणारे आहे. त्यात पक्षीयतेचा दोष मजकुरात फारसा मिळणार नाही. तपशील बरोबर आहे. उलट बुसातनींत सर्व तपशील आलेला नाही. तसेच जिद्दी जोहराच्या हालचालीचे वर्णन देतांनाही पक्षपातीपणाच्या दृष्टिकोनातून पराभवाचे समर्थन वगैरे गोष्टी त्यात आल्या असल्याने त्या दोष प्राप्त आहे. मात्र बुसातनींत जो पत्रव्यवहार येतो त्यातून सर्व काही व्यवस्थित असताना आदिलशाहाने सिद्दी जोहरचा राग का धरीला. शिवाजीही सिद्दी जोहरची भेट घेऊन निश्चितपणे दुसऱ्या आघाडीच्याच बंदोबस्तामागे का लागला याचा धागादोरा नीट समजून येतो. शिवाजीच्या कारवाईने आदिलशाहास निमूटपणे माघारी जाण्याची बुद्धी का झाली. सिद्दीने केलेल्या भेटीत

खूश होऊन का राहावे लागले. या सर्व बाबींचा उलगडा होण्यास मदत होते असे. यामुळे बुसातीनमधील पूर्ण व तपशिलवार नसले तरी महत्त्वाची आहे असे बेंद्रे सांगतात.

खाकीखानाने दिलेली माहिती ही अपूर्णच आहे असे बेंद्रे सांगून नमूद करतात की, त्याने दिलेला शिवाजीच्या आचार-आचरणुकीचा तपशील शिवाजीवर पक्षीयतेने केलेले आरोप कसे काल्पनिक असले पाहिजेत याचा बोध होण्यास मदत करतात.

ज्या सेनेला अफझलखानासारख्या सेनापतीच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीविरूद्ध पाठविले होते. त्यातील दहा हजार सैनिकांची फौज पराभूत होऊन जेव्हा आदिलशाहाला भेटली तेव्हा आपल्या शाहीची व स्वतःची गेलेली इभ्रत पुन्हा मिळविण्यासाठी जी सेना पळून आली होती. त्यांचीच निवड करण्याची पाळी यावी. ही आदिलशाहासाठी दुर्दैवाची बाब होती असे बेंद्रे सांगतात. रुस्तुमजमाच्या नेतृत्वाखाली फाजलखान आदि सरदारांची रवानगी करून पुन्हा शिवाजीचा फडशा करण्याचा आदेश दिला; परंतु त्यातही मार खाऊन लोकांना पळून जावे लागले. रुस्तुमजमा हा रणदुल्लाखानाचा नातू... त्याच्या बापाला अफझलखानाच्या सांगण्यावरून सरंजामावरून दूर करून तो सरंजाम अफझलखान याने घेतला होता. त्यामुळे आपल्या बापाचा मित्र व साहायक शाहाजी व आपल्या बापाचे पाठीराखे जे शाहाजी महाराज त्यांच्या मुळलाशी सहानुभूती बाळगून राहणे त्याला योग्य वाटले. रुस्तुमजमा व शिवाजीला फितूर होऊन राहिला होता. म्हणून फाजलखानाला यश मिळविता आले नाही. अशी तक्रार फाजलखानाने आदिलशाहाकडे केली. बेंद्रे म्हणतात, रुस्तुमजमा शिवाजीला फितूर झाला होता यात शंका नाही; परंतु आदिलशाहाची बाजू घेऊन लढेल असा इतर सरदार आदिलशाहाच्या बाजूला राहिला नव्हता. याचवेळी सिद्दी जोहर याचना करून माफी माघण्यास आला. नाइलाजाने त्यालाच अधिक सरंजाम व सलाबतखान ही पदवी देऊन त्या बंडखोर सलाबतखानाला शिवाजीचा फडशा पाडण्याचा आदेश दिला. एका बंडखोराविरूद्ध दुसरा बंडखोर नियोजित करण्यात धोका आहे. याची आदिलशाहाला जाणीव होती. शिवाजीने पावसाळा जवळ आला आहे हे पाहून सिद्दी जोहरशी प्रत्यक्ष लढा न देता सिद्दी जोहरला पाठलाग करण्यास भाग पाडून पन्हाळ्याच्या आसपास आणिले. सिद्दी जोहर नेहमीप्रमाणे पावसाळा लागताच परतेल अशी शिवाजीची अपेक्षा होती; परंतु सिद्दी जोहरने वेढा चालूच ठेवल्याने शिवाजीला थोडे दिवस अडकून पडावे लागले. सिद्दी जोहरला शिवाजीचा पाडाव करणे मात्र शक्य झाले नाही.

शाहिस्तेखानाने आक्रमण जोराने सुरू केले असे समजताच शिवाजीला आपल्या साम्राज्याची चिंता लावली. गड गेला तरी सहज पुन्हा घेता येईल; परंतु मोगलासारख्या शत्रूने आपला प्रांत काबीज केला तर तो परत मिळविणे फार अवघड जाईल. इतकेच नव्हे तर फार प्रबल शत्रू आपल्या घरातच येऊन बसेल. त्याचे आक्रमण प्रथम थांबविणे पाहिजे. या उद्देशाने शिवाजीने प्रथम सिद्दीची भेट घेतली. त्यात सिद्दीशी मैत्री केली आणि बहुधा त्याचे मन आदिलशाही विरूद्ध आघाडी उघडण्याकडे वळविलेले दिसते असे बेंद्रे म्हणतात.[८३]

शिवाजी, सिद्दी जोहरच्या मैत्रीची बातमी समजताच आदिलशाहा बेचेन झाला. शिवाजी पन्हाळ्यावरून निसटला हे कळताच सलाबतखानाच्या (सिद्दी जोहर) बादशाहाविरूद्ध फितुरीचा त्याचा संशय दृढावला व बादशाहाच पन्हाळगड घेण्याकरिता निघाला. बादशाहा सैन्यानिशी मिरजला आला आणि तेथे शिवाजीशी तह होऊन पन्हाळा आदिलशाहाकडे १६५९-६० इ.स. ला दिला.[८४] नंतर आदिलशाहा व सिद्दी जोहरची भेट होऊन तह मान्य करण्यात आला; परंतु सिद्दी जोहरने पुन्हा बंडखोरीचा इशारा दिला व स्वतःला मोगली सरदार सांगू लागला आणि मोगली सैन्य तर जवळच येऊन ठेपले होते. त्यामुळे शिवाजीचा फडशा पाडण्याच्या कार्यक्रमाला सुरूवात न करिता आदिलशाहा परत विजापुरास गेला. आदिलशाहाला सिद्दी जोहरच्या बंडखोरीमुळे शिवाजीचा समाचार घेण्याची भाषा सोडून द्यावी लागली असे वा. सी. बेंद्रे सांगतात. शिवाजी आदिलशाहीच्या कटकटीतून काहीसा मुक्त झाला. शिवाजीने आता शाहिस्तेखानाच्याच आक्रमणाला पायबंद घालण्याचा निर्धार केला. दरम्यान शिवाजीला पन्हाळ्याखेरीज इतर सर्व मुलूख आपल्या राज्यात सामाविता आला.

आदिलशाहाने माघार का घेतली?

आदिलशाहा शिवाजीच्या पाठीस न लागता परत का गेला? याचे स्पष्टीकरण देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, शाहिस्तेखानाने जसा शिवाजीला नेस्तनाबूत करण्याचा मनसुबा करून दक्षिणेत उतरला तसाच तो आदिलशाहीलाही आपल्या तळकोकणातील प्रदेशाबाबत शासन करून तो प्रांत घेण्याचा त्याचा विचार होता. शाहिस्तेखानाने आदिलशाहाच्या सिद्दी जोहरला प्रथम फोडण्यात यश मिळविले; परंतु त्याच्या हातून तळकोकणाचा प्रांत घेऊन त्यालाच सुभेदार करून चांगला बंदोबस्त करण्याचा त्याचा प्रयत्न सिद्दी जोहरच्या मृत्यूने अयशस्वी झाला. मोगल व शिवाजी या दोघांचाही तळकोकणात हितसंबंध आल्याने आदिलशाहाला नमते घेऊन शिवाजी

व मोगलाच्या संकटापासून मुक्त होण्यासाठीच प्रयत्न करणे भाग पडले. आदिलशाहाने शिवाजीने केलेला तह मान्य केला. त्यामुळे शिवाजीला उंबरखिंडीची लढाई जिंकून मोगली सैन्याचा कायमचा कणा मोडता आला व तसे झाल्याने पुन्हा आदिलशाहीतील कारवाईला चालना देण्यास सुलभता प्राप्त झाली. असा निष्कर्ष चर्चा अंती वा. सी. बेंद्रे मांडतात.

शिवाजी महाराजांनी कोणती उद्दिष्टे साध्य केलीत?

सिद्दी जोहर व शाहिस्तेखानाच्या संघर्षात शिवाजीने जे काही निर्णय घेतले. यातून शिवाजी महाराजांनी खालील उद्दिष्टे साध्य केलीत असे बेंद्रे म्हणतात.

(१) अफझलखानाच्या वधामुळे आदिलशाहा काही तरी हालचाल करेल आणि त्या हालचालीचा सामना करावयाचा तर आघाडीवर असलेल्या शत्रू सैन्याची राज्य भागात धमाल उडवून दिल्यास शत्रूचे बल व प्रभाव यांना चांगला धक्का बसेल. म्हणून शिवाजीने रुस्तुमजमाला फोडले. त्यामुळे फाजलखानास आवश्यक ती मदत सेनापतीकडून न मिळाल्याने त्यास हताश होऊन परतावे लागले.

(२) पन्हाळ्याचा आधार न मिळू दिल्याने शत्रूला पिछाडीचा जसा बंदोबस्त ठेवता यावा किंवा आधार घेता यावा तसा तो त्यास मिळू दिला नाही.

(३) सिद्दी जोहर हा मुळचाच बंडखोर त्यामुळे त्याची वृत्ती पुन्हा बंडखोरीकडे खेचणे शक्य होण्यासारखे होते. त्याचा शिवाजीने फायदा घेतला. दोन शत्रूतील एकास अंतस्थ भांडणात गुंतवून दोन शत्रूंच्या सैन्यबळाला एकत्र घेऊन लढा देण्यापासून परावृत्त केले. त्याचबरोबर आपले विखुरले जाणारे सैन्य एकाच रणभूमीवर एकत्रित आणण्याची संधी प्राप्त करून घेतली.

(४) हिंदवी स्वराज्याचा विस्तार करिता आल्याने मनुष्यबळ आणि द्रव्यबलाची वाढ करिता आली. शत्रूच्या प्रदेशातील लोकांनी शिवाजीला उत्सुकतेने साहयक व्हावे हे जे खाफीखान सांगतो. ते त्याच्या वागणुकीचा परिणाम होता.[८५]

सारांश शिवाजीने या पहिल्या लढ्यात शक्तिसामर्थ्यापेक्षा बुद्धिबलानेच आपला विजय करून घेतल्याने 'हिंदवी स्वराज्या'वर आलेला प्राणसंकटाचा आघात दूर करिता आला.

४.१४ शाहिस्तेखानाची स्वारी - उंबरखिंडीची लढाई

वा. सी. बेंद्रे उंबरखिंडीच्या लढाई संदर्भात विविध साधनांचा आधार घेतात व त्यांची चिकित्सा करितात. सर्व प्रथम ते सभासद बखरी संदर्भात सांगतात की, सभासदी बखरीत

शाहिस्तेखानाच्या शिवाजी महाराजांविरूद्ध ज्या हालचाली झाल्या त्या सर्वांचा समावेश झालेला नाही. तसेच सभासदाने जी माहिती दिली आहे त्यावरून समजते की, त्याला शाहिस्तेखानाच्या सुरूवातीच्या म्हणजे शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर प्रत्यक्ष हल्ला चढविला. त्यापूर्वीची माहिती सभासदाला मुळीच नसल्याने त्याच्या या काल्पनिक कार्यकारणभावांतही बराच विपर्यास आला आहे.[८६] एक्याण्णव कलमी बखरीतील मजकुरही अर्धवट व अवास्तव आहे. शिवदिग्विजयातील मजकूर बराचसा काल्पनिक आहे. चिटणिस बखरीतही निरनिराळ्या प्रसंगाचा मजकूर एकत्रित गुंतागुंत करून दिल्याने त्यात बरीचशी अवास्तवता आली आहे. असे बेंद्रे सांगून परमानंदाचा मजकूर जसा विस्तारपूर्वक आहे तसाच तो तत्कालीन पुरावे व कागदपत्रे यांना जुळता आहे. परमानंदाचा मजकूर सर्वात अधिक ऐतिहासिक मुल्याला उतरणारा आहे असे स्पष्ट करतात. परमानंदाच्या अणुपुराणांत शाहिस्तेखानाच्या काही हालचालीबद्दल बरीच तपशीलवार माहिती आली आहे. मात्र हे अणुपुराण पहिल्या बत्तीस अध्यायापुरतेच हाती आले असल्याकारणाने शाहिस्तेखानाची माहिती अर्धवटच मिळते; परंतु जी माहिती उपलब्ध झाली आहे. ती फार महत्त्वाची व पूर्ण वास्तवबोधी आहे असे बेंद्रे सांगतात.

चित्रगुप्ताने सभादीचाच मजकूर थोडा काल्पनिक व विपर्यासयुक्त विस्तार करून दिला आहे. चित्रगुप्ताने कोणतीच जास्तीची माहिती दिलेली नाही. मूळ सभासदी मजकूर शब्दशः घेतला आहे. सैन्याचे वगैरे आकडे मात्र फुगवून सांगितले आहेत असे बेंद्रे स्पष्ट करतात.

मराठी साम्राज्याची छोटी बखर शाहिस्तेखानाच्या स्वारी संदर्भात सांगते की, "राजश्री दलपतराव पोतनीस सरदेशमुख मामल रायेरीस आले. ते चेऊलपर्यंत पोहचले, तो महाराजापुढे काही अवकल न चाले, जाणोन त्यांनी रायेबागीण कुमकेस आणविली. तो पेणचे मार्गे येणार हे वर्तमान महाराजांस जाहीर जाहाले. त्याजवर उमरखेडचे मार्गे पांच हजार बरकंदाज ठेवून मार्ग बंद केला. हाटेलकर (होलटकर) व राजगडकर पाटील व येशवंतराव व मानाजी व विश्वासराव हातुलकर व दिनकरराव यांस हुकूम केला की, उमरखेडचे मार्गे रायबागीण (माहूरच्या उदारामाची बायको) येत आहे. तिजला बुडविणे. तुमची सर्फराजी होईल. तो रायेबागीण उमरखेडास आली. पुढे सर्वत्रांनी मिळून भोवता वणवा लावून लष्कर सर्व बुडविले. रायेबागीण धरून आणिली. ती बायको. तिजला काय मारावी म्हणोन वस्त्रे जवाहिर देऊन औरंगबादेस पोहचून दिली. नामदारखान यानी पळून जावे असा विचार केला. तेव्हा महाराजांनी मिरा डोंगर धरून घाट बंद

केला. हे वर्तमान नामदारखान यासी दलपतरायांनी सांगितले. नागोठाणेंयाचे बंदरावरून पेणचे मार्गे खान कल्याणावरून पळून गेला. कुल दखणेस विजापुरी उमराव होते त्यासी दहशत पडली. महाराजांचे यश बहूत वाढेल."[८७]

शेडगांवकर भोसलेच्या बखरीत सभासदी बखरीतीलच मजकूर आलेला आहे असे म्हटले तरी चालेल असे वा. सी. बेंद्रे सांगून त्यात अधिक कमी माहिती नाही. मात्र शाहिस्तेखानाच्या स्वारीचा जो प्रथम मनसबा दिल्लीत ठरला तो शके १५८४ शुभ कृतनाम सवत्सरे (इ.स. १६६२-६३) फसली सन १०७२ साली ठरला असे म्हटले आहे.[८८]

शिवचरित्र प्रदीप या बखरीत शाहिस्तेखानाच्या स्वारीबद्दल अगदी थोडाच मजकूर आला आहे. तो असा, "यानंतर शास्ताखान ऐशी हजार स्वारांनिशी रवाना केला. तो मुलुख मारीत किल्ले घेत पुण्यास येऊन राजवाड्यात राहिला. महाराज गडास होते. तेथे खबर आली, मोगल येऊन राजवाड्यात राहिला. हें ऐकोन बहुत क्रोधाविष्ट जहाले."[८९]

या वरील बखरीपेक्षा एक्याण्णव कलमी बखर व शिवदिग्विजय यामध्ये शाहिस्तेखानाच्या तीन-साडेतीन वर्षाच्या हालचालींची अधिक कल्पना येते असे सांगून बेंद्रे एक्याण्णव कलमी बखरीतील मजकूर देतात, "४१: दिल्लीस औरंगशाहा तक्ती बसले. तेथील बंदोबस्तास दोन-तीन वर्षे लागली. तो इकडे शिवाजी राजे यांणी गड किल्ले किळविले. फौजशिबंदीही बहुत जमा केली. दिवसेंदिवस राजे जोरावर बहुत होत चालले. ही खबर दिल्लीस गेली. औरंशाहास कळली. औरंगबादेस दक्षणेस मोहकमसिंग रजपूत होता. त्यास हुकुम जाहला जो शिवाजीवर मोहिम करणे. असा हुकुम होतांच दहा हजार फौजेनिशीं नगराअलिकडेस चालून आले. त्याजवर प्रतापराव गुजर सरनोबत वीस हजार फौज देऊन रवाना केले. लढाई मातबर जाहली. मोहकमसिंग रणी पडला. फौज बुडविली... ४३: मोहकमसिंग रजपूत बुडविला असे समजोन औरंगशाहा यांणी शास्तीखान मामा खुद्द ऐंशी हजार फौज त्याचे तैनातेस रजपूत जैसिंग मिरजा राजा तमाम बावीस सुभे कुल अखत्यार देऊन दक्षणेस मोहिम शिवाजीराजे यांजवर करून किल्ले चाकणास येऊन वेढा घातला. किल्ल्यांत हवालदार फिरंगोजी नरसाळा होता. तो बहुत भांडला. नऊ महिने वेढा होता. उपाय न चाले तेव्हा ईशान्य कोनाचा बुरूज सुरुंग लावून उडविला. तेव्हा जेर होऊन कौल मागोन फिरंगोजी हवालदार शास्तीखानास भेटला. त्यासमयी चाकण किल्ला खानाने घेतला. शके १५७९ मन्मथ नाम संवत्से चैत्र शुद्ध १० दशमी गुरूवारी

फिरंगोजीस खान मनसबा देता होता. त्याने कबूल केले नाही. राजे स्वामीस येऊन भेटला. त्याणी सर्फराजी करून किल्ले भूपालगडाचा हवाला सांगितला. बाबाजी राम होनप देशपांडे पुणेकर अगोदर पुढे बऱ्हाणपुरानजीक भेटले होते. संभाजी कोंडजी याजवर इतराजी झाली. तो शास्तीखानास भेटला. बळवान होता. घोडा चौपायी धरून उचलिला, त्याजवरून मेहेरबान होऊन मनसबा देऊन मौजे मलकर गांव येथे ठाणे घालोन पांचशे स्वारानिशी ठेविला. त्याजवर राजे यांनी फौज पाठवून युद्ध करून ठाणे मारिले. तेथे संभाजी ठार पडला. शके १५९९ मन्मथ नाम संवत्सरे वैशाख शुद्ध १० दशमी सोमवारी प्रतापराव गुजर सरनोबत याणीं मारला. चाकण किल्ला खानानी घेऊन छावणीस बायका व पुत्रसहवर्तमान राहिला. कसबे पुणे येथे राजेस्वामीचे महालांत फौजसुद्धा राहिला. बाबाजी राम याजवर मेहेरबानी होती. ते राज्याचार सांगत होते."

एक्याण्णव कलमी बखरीतील औरंगजेबाने शाहिस्तेखानासोबत रजूपत जैसिंग मिरजा राजा पाठविला असे आले आहे. हे नाव चुकीचे असून त्याऐवजी जसवंतसिंग पाहिजे होते असे बेंद्रे सांगतात. "त्याबरोरबर शाहिस्तेखानाने जो चाकणचा किल्ला घेतला त्याची तारीख चुकीची सांगितली आहे. ती बखरीनुसार शके १५७९ मन्मथ नाम संवत्सरे चैत्र शुद्ध १० दशमी गुरूवारी अशी सांगितली आहे; परंतु बेंद्रे स्पष्ट करतात की, १५७९ ला मन्मथ संवत नसून १५७७ ला आहे. या शकाच्या चैत्र शुद्ध दशमीला गुरूवार व तारीख ५ एप्रिल १६५५ येते. १५७९ ला हेमलंबी संवत्सर असून सदर तिथीला रविवार येतो. त्याचप्रमाणे संभाजी कोंडजी ठार झाल्याची दिलेली तारीख चुकीची असल्याचे बेंद्रे सांगतात."[१०]

यानंतर वा. सी. बेंद्रे शिवदिग्विजयातील मजकूर देतात. ज्यामध्ये दौलताबाद मोगलांकडे होते व दौलताबादचा कारभार दौलतजी पाताणे पहात होता. याने मराठ्यांच्या हालचालीविषयी औरंगाबादच्या महकुमसिंग सुभेदाराला सांगितले व मदतीची याचना केली तेव्हा उदाराम देशमुख याची बायको रायबागीण पाठविली तो मजकूर येतो. त्यानंतर "औरंगजेबान महकुमसिंगाला पाठविले ज्याचा शिवाजीने पराभव केला तेव्हा आता शिवाजी शाहिस्तेखानाला पाठविण्याची सविस्तर माहिती शिवदिग्विजयात येते.

बेंद्रे सांगतात, परमानंद शाहिस्तेखान चाकणवरून पुण्याला शके १५७८ मन्मथ नाम संवत्सरी पोहचला अशी तारीख देतो. ती तारीख चुकीची आलेली आहे. तसेच यातील पत्रेही कथेच्या प्रकारची असून त्यात सत्यता नाही.

परमानंदाचे अनुपुराण अर्धवटच उपलब्ध झाल्याने चाकण वगैरे लढ्याची माहिती व शाहिस्तेखानाची विशेषतः माहिती अद्यापि उपलब्ध झालेली नाही. शेवटच्या मृत्युकाळाचे व नंतरचे अध्याय मिळाले आहेत, परंतु मधील भाग मिळालेला नाही असे बेंद्रे सांगतात. यानंतर फारसी लेखक व युरोपीय प्रवासी यांच्या वर्णनात काही तपशील येतो; परंतु त्यांनी कालनिर्देश तितका बारकाईने न दिल्यामुळे व गावांची नावे न देता आल्यामुळे त्या मजकुराची संगती जुळवितांना साशंकता वाढते असे वा. सी. बेंद्रे सांगतात. यानंतर बेंद्रेंनी बुसातिन-सलातील किंवा विजापुरची आदिलशाहीमधील मजकूर देतात.[९१]

यानंतर बेंद्रे मनुचीच्या प्रवास वर्णनातील माहिती देतात. "त्यामध्ये शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या संदर्भात उल्लेख येतो, पण शाहिस्तेखानाच्या पराभवाचा उल्लेख येत नाही."[९२] यानंतर बेंद्रे डचांच्या सुरतेच्या फॅक्टरीतून गेलेल्या अहवालाची माहिती देतात, "...We shall deal with the contents of the advices from Surat and shall first discuss the conditions at the court and after that business of the Company as well as foreign nations. Duke Saestachan who marched up against Siwasi has been defeated and has already escaped being taken prisoner..." "The King of Bijapur become Vassal of the Mogol..."[९३]

शाहिस्तेखान प्रथम कोकणात का आला?

शिवाजी महाराजांनी कल्याण-भिवंडी २४ ऑक्टोबर १६५७ मध्ये घेतली होती. १६६० च्या सुरूवातीस जोहारखोरे प्रतापगडासह त्यांच्याकडे आल्याने हा कुलाबा जिल्ह्यांतील कोकणी मुलूख महाराजांच्या ताब्यात आला होता म्हटले तरी चालेल; परंतु तोपर्यंत रायगड ही काही राजधानी झाली नव्हती. राजगडावरच महाराजांचे वास्तव्य होते. अशा परिस्थितीत शाहिस्तेखानाने आपले सैन्य प्रथम कोकणांत उतरविण्यास कोणती नवीन कारणे झाली. हे सांगण्यास काही आधार नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

कदाचित कल्याण-भिवंडी घेण्यास गेलेली सेना तेथील मराठी सैन्याच्या पाठलागार्थ गेली असेल. उंबरखिंड हे एक कल्याण-भिवंडीकडून पनवेल-पेण रस्ता अडविण्याचे महत्त्वाचे ठिकाण समजले जात असावे. कारण संभाजीच्या कारकीर्दीतही त्याने रातोरात जाऊन तेथूनच मोगली परचक्राला परतून लावले होते असे बेंद्रे म्हणतात.

शाहिस्तेखानाचा मोड :

सभासद बखरीमध्ये शाहिस्तेखानाच्या बिमोडा संदर्भात जी माहिती आली आहे त्या संदर्भात वा. सी. बेंद्रे म्हणतात की, सभासद बखरीत दिलेला कालक्रम चुकीचा असल्याने त्याच्या लिखाणात बराच विपर्यास आलेला आहे. त्याने केलेला शाहिस्तेखानाच्या परतीचा सर्व मजकूर चुकीचा आहे. कारण तो दख्खनमध्येच राहून सूड घेण्याचा प्रयत्न करीत होता. चित्रगुप्त व शेडगांवकर बखरीत, सभासद बखरीतीलच मजकूर देण्यात आला आहे. त्याचबरोबर श्री शिवाजीप्रतापमधील मजकूर विचारात घेण्यासारखा नाही. कारण तो सुसंगत नसून फारच अवास्तव देण्यात आल्याचे बेंद्रे सांगून ९१ कलमी बखरीमध्ये शिवाजीने पुण्याच्या एका माळ्याच्या मदतीने जो शाहिस्तेखानाला नित्य नियमाने फुलांचे हार देत होता त्याच्या मदतीने कसा लाल महालात प्रवेश केला ती माहिती आल्याचे सांगतात व लिहितात की, ९१ कलमी बखरीतील मजकूर हा शिवाजी शाहिस्तेखानाच्या घटनेशी थोडाबहूत सुसंगत आहे. मात्र यामध्ये दिलेला सैन्याचा आकडा विपर्यास्त आहे. यानंतर बेंद्रे शिवदिग्विजयातील मजकुरासंदर्भात सांगतात की, यातील सर्व माहिती केवळ कथेसारखी आहे व काल्पनिक आहे. यामध्ये कालदेश वगैरेची वास्तविकता न आल्याने माहितीत विसंगतता आली आहे. त्यामुळे या बखरीतील बऱ्याच तपशीलाला ऐतिहासिक मूल्य नाही. असे स्पष्ट होते असे बेंद्रे सांगतात.[९४]

यानंतर वा. सी. बेंद्रे मल्हार रामराव चिटणीस, पंतप्रतिनिधीच्या बखरीतील, जेधे करिन्यातील, बुसातिन-सलातीन व खाफीखानाच्या वृत्तांतातील तसेच मासिर-इ-अलमगिरीतील माहिती दिली आहे.[९५]

बेंद्रे यांनी अनुक्रमे बर्निअर, मनुची, कॉस्मा डा गार्डा, थिव्हेनोचा व अबे करे यांच्या मजकुराचा आढावा घेता. अबे कराच्या संदर्भात बेंद्रे असे म्हणतात की, त्याला शिवाजी महाराज विजापुरकांच्या दरबारांतील मुख्य वजीर असल्याची समज झोलेला होता. तरी त्याच्या लिखाणात काही मजकूर महत्त्वाचा आहे.[९६]

यानंतर वा. सी. बेंद्रे यांनी आलमगिरी संदर्भात माहिती दिली आहे. ते म्हणतात, "या लेखकाने आपल्या वर्णनात पराभवाचे तपशील जाणून-बुजून गाळलेले आहेत. कारण त्याच्या मजकूरावरून पातशाहाची मर्जी वा नामर्जी अवलंबून होती. अशा परिस्थितीत आलमगिरीनाम्यात उंबरखिंडी संदर्भात काहीही माहिती न येणे आश्चर्य वाटण्यासारखे नाही.

त्याचप्रमाणे शाहिस्तेखानाच्या गोटांत शिरून यशस्वी हल्ला झाल्याची माहिती नमूद करणे साहजिकच अपमानाचे ठरणारे झाले असते. त्या तपशिलालाही या आलमगिरीनाम्यांत जागा मिळाली नसती. हरएक हालचालींत मराठा सैन्याने सतावून दाणागोटा लुटून जेरीस आणले असतांना देखील ही वाटचाल यशस्वीपणे शाहिस्तेखानाने पार पाडली. असा शिताफिचा तपशील देऊन औरंगजेबाला खूशावख्त ठेवण्याचा नेहमीचा प्रयत्न केलेला दिसल्यास त्याबद्दल विशेष विचार करण्याचे कारण नाही. जो मजकूर इतरांनी वास्तवतेला धरून लिहिला आहे त्यांच्याशी तुलना करिता अलमगिरीनाम्यांतील माहिती सत्याला सोडून आहे. असे जरी असले तरी आपल्याला यांत कालानुक्रमाने इतर हालचालींचा बोध करून घेता येतो."[१७]

यानंतर बेंद्रेंनी विविध पत्रांची चिकित्सा करून आवश्यक तो मजकूर अभ्यासला व आपले विचार मांडले. ते म्हणतात, "या पत्रव्यवहारातसुद्धा शाहिस्तेखानाच्या सैन्याच्या आघाड्या कोठे धडाडल्या याचे उल्लेख येत नाहीत." उंबरखिंडीच्या लढाईत मोगली सैन्याची इतकी हलाखी झाली की, ते सैन्य शिवाजीच्या सैन्याशीं तोंड देण्यासाठी आघाडी उघडण्यास तयार झाले नाही. पुण्याभोवती ज्या काही हालचाली करण्याचे प्रयत्न केले त्यात पाठीमागून दाणागोटा लुटण्याचा मराठा सैन्याचा जो हल्ला होत होता त्याने मोगली सैन्य हताश होऊन परतत होते. जसवंतसिंग सैन्यासह आला; परंतु त्याला शिवाजीने 'हिंदवी स्वराज्या'ची दीक्षा दिल्याकारणाने त्याच्या हालचाली फारच जपून होत होत्या. शिवाय जसवंतसिंगाची मदत आल्यावर शिवाजीवर सूड घेण्याची भावना जरी उसळत होती तरी शाहिस्तेखानाच्या कमनशिबाने त्याला हालचाल करण्यास औरंगजेबाने मौका दिला नाही. त्यामुळे शाहिस्तेखानाला आपली आतापर्यंत मिळविलेली अब्रू गमावून व चारित्र्यावर डाग लावून घेऊन बंगालला जावे लागले असे बेंद्रे स्पष्ट करतात.

शाहिस्तेखानाच्या स्वारीसंदर्भात वा. सी. बेंद्रेंची चिकित्सा :

शाहिस्तेखान अहमदाबादेत सुभेदार होता. शिवाजीने आदिलशाही व मोगली सीमेत चालविलेल्या आक्रमणाबाबत आदिलशाहा व इतरांचे म्हणणे ऐकून त्याच्या पारिपत्यार्थ शाहिस्तेखानाला दख्खनचा सुभेदार करून ३ जुलै १६५९ ला दौलताबादकडे पाठविले. दौलताबादेस आल्यानंतर ७७ ते ८० हजार सैन्याची तयारी करून तो शिवाजीच्या विरूद्ध १६६० च्या जानेवारीत स्वारीवर निघाला. ३ मार्च १६६० ला त्याचा मोर्चा शेगावला आला. शिवाजी

यावेळी आदिलशाहाच्या स्वारीला तोंड देत होता. आदिलशाही सैन्यास सिद्दी जोहरची मदत आलेली पाहताच शिवाजीने आदिलशाही प्रदेशातून माघार घेऊन तो २ मार्च १६६० रोजी पन्हाळगडात आसरा घेण्यासाठी आला; परंतु सिद्दी जोहराने लगेच सक्त लढा दिला. शिवाजी पन्हाळ्यात १३ जूलै १६६० पर्यंत अडकून पडला होता. शाहिस्तेखानाने चाकणगड ९ ऑक्टोबर १६६० ला घेतला. नंतर शाहिस्तेखान भिवरा (भीमा नदी) उतरून पुण्यास आला. शाहिस्तेखानाकडून सोनाजीपंत परत येऊन शिवाजी महाराजास भेटले.

कोकणातील घडामोडी :

शाहिस्तेखानाने कारतलबखानाच्या नेतृत्वाखाली मोठमोठे हिंदू-मुसलमान सरदार देऊन कोंकण काबीज करण्यास रवाना केले. त्याने कल्याण, भिवंडी घेऊन नंतर सासवड, सुपे, इंदापूर घेतली. यापूर्वीही वाटचालीत काही चकमकी उडाल्या होत्या. या प्रसंगांची कालनिश्चिती करण्यास अद्याप साधने उपलब्ध झालेली नाहीत; परंतु थोडा तपशील कॉस्मा डा गार्डाच्या मजकुरांत आलेला आहे असे बेंद्रे सांगून त्या तपशीलात जी माहिती आलेली आहे ती पुढीलप्रमाणे देतात, "त्यामध्ये मोगली सैन्य पुरंदराकडे वाटचाल करीत एक लीग गेले असतांना शिवाजी महाराज दहा हजार स्वार घेऊन हल्ला चढविण्यास चार बाजुंनी चार कटकांत तयार आहे असे पाहिले. मोगली सेनाही सामान सरंजाम व बायका यांना मध्ये घेऊन गटागटाने चालू लागली. शिवाजीच्या स्वारांनी फार त्वरित गतीने येऊन एक गट लुटून फस्त केला. दुसरा गट पळून जात आहे. तोच शिवाजीच्या स्वारांची कटके नजरेआड झाली."

शिवाजी अशाच प्रकारे अचानक झडप घालावयाची, लूट मारावयाची आणि त्वरित दृष्टिआड व्हावयाचे हा क्रम ठेवून मोगली सैन्याची फार नासधूस केली. त्यामुळे शाहिस्तेखानाच्या सैन्याला एकेका फुटाच्या झुडुपाची नीट काळजी घेऊन आपले पाऊल पुढे टाकावे लागत होते. अशाच प्रकारे दुसऱ्या दिवशी सांयकाळच्या अंधाराचा फायदा घेऊन शिवाजीच्या लोकांनी लूट केली. आतोनात नुकसान झाल्याने मोगली सैन्याने माघार घेतली.[१८] परंतु ते सैन्य जेव्हा मागील तळावर आले तेव्हा त्यांना आढळून आले की, शिवाजीच्या लोकांनी सर्व सामान सरंजाम व दाणागोटा लांबविला होता. त्यामुळे सैन्याला ती रात्र उपवास करून काढावी लागली. नेताजीने मोगलाच्या वाटेत वरील शत्रूच्या दाट झाडींत २००० स्वार ठेविले होते. शाहिस्तेखान पुन्हा एकदा पुरंदरवर हल्ला करण्यासाठी येत होता. परंतु नेताजी पालकरने

वाटेत त्याचे इतके नुकसान केले की, त्याला ताबडतोब परतावे लागले. पुण्याच्या आसपास ज्या हालाचाली केल्या त्यांत जरी काही प्रांत मिळाल्याचे मोठेपण शाहिस्तेखान मिरवित असला तरी त्या हालचालींत मोगलांना द्रव्य व मनुष्यहानी मोठ्या प्रमाणात सहन करावी लागली होती असे बेंद्रे सांगतात.

उंबरखिंडीची लढाई :

पुण्याच्या मुक्कामात थोडीसी स्थिरता प्राप्त होतांच शाहिस्तेखानाने कोकणांत स्वारी करण्याचे ठरविले आणि वाटेवरील कल्याण व भिवंडी ही दोन महत्त्वाची ठाणी काबीज केली. तेथून मोगली सैन्य कारतलबखानाच्या नेतृत्वाखाली पार शिवाजीच्या रायगडापर्यंत जावयाचे होते; परंतु उंबरखिंडीत पोहोचेपर्यंत शिवाजीने त्या मोठ्या सैन्याला प्रतिकार केला नाही. याचा अर्थ शिवाजीची दुर्बलता असे समजून सैन्याच्या पिछाडीची काळजी न घेता मोठ्या इर्षेने आगेकूच करून उंबरखिंडीत आले. तेथे या मोगली सैन्यावर अचानक छापा घालून ते बुडवायाचा विचार करून सर्व तयारी शिवाजीने ठेविली होती. या लढ्याचा तपशील कविंद्र परमानंदाच्या लिखाणात आला आहे. या खिंडीत मोगली सैन्याचा इतका धुव्वा उडविला गेला की, सेनापती कारतलबखानाला शरणागती स्वीकारून व खंडणी भरून आपले व आपल्या सहकाऱ्यांचे प्राण वाचविण्याची खटपट करावी लागली. या २ फेब्रुवारी १६६१ च्या लढ्यांत बरेच मोगली सैन्य मृत्युमुखी पडले.[११] त्यामुळे शाहिस्तेखानाला आणखी मदतीची याचना करावी लागली आणि औरंगजेबाला आपल्या बादशाहीपदाला लागलेला डाग पुसून काढला जावा म्हणून जसवंतसिंगाला सैन्यासह मदतीस पाठवावा लागला. पुन्हा बादशाहाने या दोन्ही सरदारांस शिवाजीचा फडशा पाडण्याच्या कामगिरीची आठवण करून दिली. औरंगजेब उत्तरेकडे गेल्यामुळे ही मदत येण्यास उशीर लागला. त्यामुळे दरम्यान शाहिस्तेखानाच्या हालचाली बंद पडल्या गेल्या असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

जसवंतसिंग - शिवाजी मैत्री :

जसवंतसिंग जेव्हा पुण्यात येऊन पोहचला त्यानंतर शाहिस्तेखानाच्या हालचालींना सुरूवात झाली; परंतु त्याला जसवंतसिंगाची मदत अपेक्षेप्रमाणे उपयुक्त झाली नाही. उलट अपयशालाच कारणीभूत ठरली. याचे मुख्य कारण वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे सांगतात की, "जसवंतसिंह हिंदू म्हणून हिंदुत्वाच्या भावना त्याच्या ऱ्हदयांत शिवाजीने जागृत केल्या आणि

'हिंदवी स्वराज्य' स्थापनेत जरी अनेक कारणांनी प्रत्यक्ष भाग न घेता आला तरी ज्या शिवाजीने त्या उद्दिष्टासाठी आपले वर्चस्वपणाला लावले आहे. त्याच्या कार्यात अडथळा येऊ न देण्याची व जमलेच तर अप्रत्यक्षपणे साह्य करण्याची संमती शिवाजीने जसवंतसिंगाकडून मिळविली असावी. असा जो इतिहासकार संशय घेतात त्याप्रमाणे ती मिळविली होती. हे शिवाजीनेच जयसिंगाच्या पत्रात लिहिल्याने यात शंका रहात नाही. जसवंतसिंगाने प्रथम मोगली सैन्याची फाळणी केली. सैन्याचा एक भाग चौलात तर एक रहिमतपुरात तर तिसरा पुण्यात ठेवला. पुण्यांतील सेना फक्त शाहिस्तेखानाच्या संरक्षणार्थच होती म्हणून ती मोजकी होती. सर्व सेना एकत्रित राखणे, दाणागोटा व पाणी यांचे अभावी तितके युक्त नव्हते. शाहिस्तेखानावर खासा हल्ला आला तेव्हा त्या हालचालीकडे दुर्लक्ष करून शिवाजीस सुखरूप परत देशी जाण्यास सवड करून दिली अशी तक्रारही त्या काळी गेली होती. तसेच जसवंतसिंगाने कोंडाण्याचा वेढा फारच निर्जिवपणे लढविला होता.[१००]

शाहिस्तेखानावरील छापा :

वा. सी. बेंद्रे म्हणतात, "शाहिस्तेखानावरील छापा म्हणजे खास शिवाजी महाराजांच्या धाडसी प्रवृत्तीचे एक महत्त्वाचे दर्श होय." हा छापा युद्धाच्या पावित्र्यात उभ्या असलेल्या शाहिस्तेखानाच्या तळावरच होतो हे विशेष लक्षात घेण्यासारखी बाब होय." असे सांगून बेंद्रे पुढे म्हणतात, हा छापा म्हणजे एक डाव. हा छापा म्हणजे व्यक्तिगत सूडाच्या भावनेने व्यक्तीच्या खास प्रकल्पांतील बेसावधानावस्थेत गाठून खूनाच्या स्वरूपाचा घाला नव्हता. हा एक युद्धाचाच डाव होता असे बेंद्रे सांगतात. ज्यामध्ये आपल्याकडील कमी सैन्याच्या जोरावर शत्रूकडे असलेल्या मोठ्या सैन्याला तोंड देण्यास समर्थ नसल्यामुळे त्या मोठ्या शत्रुजमावाच्या नेत्यालाच दूर करून त्या सैन्याला दुर्बळ करून टाकण्याचा हा प्रयत्न होता. अशा प्रसंगी प्रत्यक्ष लढ्याची वेळ आली तर त्या संकटापासून यशस्वीपणे पार पाडण्याची आवश्यक ती योजना तयार ठेवणे हीच महत्त्वाची अंगे असतात. ही महत्त्वाची खबरदारी कशी घेतली गेली. यातच अशा युद्धविषयक हालचालीचे महत्त्व जाणले जाते असे बेंद्रे स्पष्ट करतात.

शिवाजीने जसवंतसिंगाला आपल्या ध्येयाकडे ओढल्याने शिवाजी राजावर लढाईला तोंड देण्याची वेळ यावयाची ती आली नाही. त्याचबरोबर जसवंतसिंगही या कटात सापडून त्याला अपाय होऊ नये म्हणून शिवाजीने आपला छापा सर्व दृष्टीने विचार करून घातला. काही

उत्तरकालीन लेखक शिवाजीबरोबर हजावर लोक होते म्हणून सांगतात; परंतु ते खरे नसून तत्कालीन आणि शिवाजीच्याच पत्रातील मजकुरावरून हे सैन्य फक्त ४०० च्या आतच होते हे सिद्ध होते असे बेंद्रे सांगतात. सिंहगडापासून पुण्यापर्यंत वाटेवर टेहळणी व जरूर पडल्यास मदत म्हणून त्यातील काही लहान लहान तुकड्या निरनिराळ्या जागी वाटेवर ठेवित आल्याने खास पुण्यापर्यंत शंभर-सवाशेपेक्षा अधिक लोक नसावेत. त्यातील बरेच नदीपलीकडे असावेत. खास महालांत शिरणारे ८-१० पेक्षा अधिक नसावेत. जागेची व महालाची पूर्ण माहिती असल्याने त्यांना योग्य असे ठिकाण व महालात जाण्याचा मार्ग त्वरित आक्रमिता आला. शाहिस्तेखानाने त्या महालात नवीनच फरक केला असल्यामुळे आणि हाही जनानखान्याच्या दालनांत केला असल्याने त्याची कल्पना नसल्यामुळे शिवाजीला आपले दोन सहकारी विहिरीत गमवावे लागले; परंतु लगेच भिंतीच्या पाडलेल्या झरोक्यातून उडी घेतांना अधिक हानी होऊ नये म्हणून त्याच्या सहकार्यानी विहिरीच्या मुखावर वाट करून दिली. हा छापा झटपट उरकणे जरूर होते. म्हणून काळोखांत जे सापडले त्यांवर हत्यार चालवून कार्यभाग उरकण्याकडे लक्ष्य दिले आणि शाहिस्तेखान मारला गेल्याचा भास स्थानिक मंडळीने करून दिला. त्यानुसार आपले कार्य उरकले गेले. या समजाने सुरक्षितपणे माघार घेऊन राजे आपल्या सिंहगडाच्या वाटेस लागले व वाटेत ठेवलेल्या तुकड्यासह दुसरे दिवशी सकाळी सिंहगडात गेले.

अशा छाप्यात निकटच्या पाठलागाची भीती असते. छाप्यांत प्रत्यक्ष भाग घेणारे उडालेल्या गोंधळात ते सहज मिसळले व नदी उतरून झाडी डोंगरातून वाट सुधारली. मोगली सैन्याला या उत्तरेकडील वाटेची कल्पना नसल्यामुळे त्यांचे लक्ष प्रथम नेहमीच्या वाटेकडे गेले आणि तिकडेच मशाली दिसल्याने हा पाठलाग भलत्याच मार्गाने झाल्याकारणाने निष्फळ ठरला. छाप्याचा दिवसही असा साधला की, रमजानच्या उपवासामुळे व बादशाहाच्या जन्मोत्सवामुळे तळावरील लोकजागृती व दर तीन तीन तासांनी वाजणाऱ्या वाद्यांच्या आवाजाने सैनिकांना संकटाची कल्पना येऊ नये व थोडासा ओरडा झालाच तर त्याकडे सैनिकांचे लक्ष वेधू नये याची काळजी घेता आली. त्यामुळे शाहिस्तेखानास सैनिकांची मदत शत्रूचे लोक निघून गेले तरी मिळू शकली नाही.

हा छापा ५ एप्रिल १६६३ रोजी रात्री घातला. त्यावेळी मोगली सर्व सैन्य पुण्यात होते असे मानने चुकीचे होईल. पाण्याच्या सोयीसाठी व इतर कारणांनी सैन्याच्या सर्व तुकड्या एकाच

गटांत राहू शकत नाहीत. छावणीसाठी आणि विशेषत: पावसाळ्यांत तर गवताच्या पेंढ्याच्या झोपड्या घालूनच काळ काढावा लागतो. याचा विचार केला तर जसवंतसिंगाला हे छाप्याचे दृश्य दिसण्याची शक्यता नव्हती व त्या उत्सव जन्मोत्सव दिवशी रणदुंदुभतीच्याही आवाजालाही नेहमीची भीषणता नव्हती. त्यामुळे असंबंधित लेखकांनी आपल्या काही कल्पनांना वाव दिला असला तरी खास शाहिस्तेखानाने किंवा औरंगजेबाने तसे मानलेले दिसत नाही, असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. तसे असले तरी शाहिस्तेखानाला परत बोलवितांना फुटीर जसवंतसिंगाकडे शाहिस्तेखानाचा मामला सोपविला नसता असे बेंद्रे म्हणतात. त्याच्यावर रोष झाला त्याचे कारण सिंहगडाच्या वेढ्यातील निष्क्रियता होय; परंतु ही सर्वच निष्क्रियता शिवाजी-जसवंतसिंगाच्या मैत्रीमुळे झाले असेही नाही तर त्याच्या जागी जयसिंगाची (यांचे राजकारणांत कधीच एकमत नव्हते) नेमणूक झाल्याने आपली मानहानी झाली. त्यामुळे आपले युद्धविषयक हालचाली स्थगित करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. म्हणून जसवंतसिंग परस्पर घरी गेला. दरबारात गेला नाही असे स्पष्टीकरण वा. सी. बेंद्रे देतात. यावरून जसवंतसिंगाने गुप्तपणे शिवाजीची साथ केली असल्यामुळे त्याचा झालेला अपमान त्यामुळे झाला नसून शाहिस्तेखानाच्या सांगण्यावरूनच झाला. अशा समजुतीनेच त्याने त्रागा केला. औरंगजेबालाही ही गुप्त मदत समजली असती तर पुन्हा जसवंतसिंगाची रवानगी शाहआलमच्या दख्खनमधील वास्तव्यात झाली नसती असे बेंद्रे स्पष्ट करताना आपल्याला दिसतात.

छाप्यानंतर लगेच पाठलागाबरोबर सिंहगडास वेढा दिला. तो ताबडतोब उठविणे आवश्यक होते. कारण नेहमीचा वळवाचा वाश पाऊस याच सुमाराच पुणे विभागात सुरू होत असतो व नंतर थोड्याच दिवसात पावसाळ्याला सुरूवात होते. पावसाळ्यानंतर नोव्हेंबरच्या अखेरीस जसवंतसिंगाने कोंडाणा किल्यास वेढा घातला; परंतु त्याचा सुभा बदलल्याने त्याने तो वेढा उठविला असे कारण वेढा उठविण्यामागचा बेंद्रे देतात.[१०१] काही बखरकारांनी लालमहालातील शिवाजीच्या शाहिस्तेखानावरील छाप्यानंतर शाहिस्तेखान वापस दिल्लीला गेला होता असे जे सांगितले होते ते खोटे असून तो शिवाजीच्या मागे जाऊन पन्हाळ्याला वेढा देऊन आपला सूड उगविण्याचा प्रयत्न करीत होता असे बेंद्रेंनी सत्य पुढे आणले.

सारांश, अफजलखानाच्या प्रतापगडाखाली झालेल्या मृत्युमुळे झालेली आदिलशाहीचे नुकसान नंतर पुन्हा फाझलखान, रुस्तुमखान आदिंचा झालेला पराभव, सिद्दी जोहरलाही करता

न आलेली शिवाजीवर मात आणि सिद्दी जोहर बंडास प्रवृत्त झाल्याने व रुस्तुमखानही अप्रत्यक्षपणे शिवाजीचाच साहाय्यक झाल्याने, आदिलशाहाने औरंगजेबाकडे मदतीसाठी याचना केली. औरंगजेबाने पूर्ण तयारीनिशी शाहिस्तेखानाला पाठविले. मोगली साम्राज्यात मिळालेले किल्ले वगैरे लुटून शिवाजीने घेतले होते; परंतु याचे कारण औरंगजेबानेच दिलेले वचन मोडले हे होते व शिवाजीस त्याची चौथाई मिळत नव्हती.

आदिलशाहितील गडकोट आपल्या राज्यात मिळविण्याची शिवाजीला मुभा औरंगजेबाने लेखी फर्मानाने दिली होती. त्यामुळे मोगलाला शिवाजीवर स्वारी करण्याचे कारण नव्हते; परंतु औरंगजेब आता बादशाह झाल्याने त्याला इतरांच्या मदतीची गरज राहिली नव्हती. उलट साम्राज्य विस्ताराच्याच आकांक्षेला अधिक तीव्रता येत होती. त्यामुळे औरंगजेबाने आदिलशाहिच्या तक्रारीचा फायदा घेऊन आपले सैन्य शिवाजीला नेस्तनाबूद करण्याकरितां पाठविले इतकेच नव्हे तर खास आदिलशाहीचाही लचका तोडण्याची आज्ञा दिली होती.

चाकणपर्यंतचा पल्ला गाठतांना शाहिस्तेखानाला नेताजी पालकराला तोंड देतांना पुष्कळ नुकसान मनुष्यबळाचे व संपत्तीचे सोसावे लागले. शिवाय त्याच्या मंदगती प्रवासामुळे तो चाकण कोट २ सप्टेंबरला सर केला; परंतु येथपर्यंत त्याला येऊन पुढे जाईपर्यंत तीन महिने गेले आणि वाटचालींत मनुष्यबलाचे व संपत्तीचे बरेच नुकसानही सोसावे लागले. त्यामुळे शिवाजीला आपला आदिलशाही बरोबरील तंटा मिटवून शाहिस्तेखानाच्या आघाडीला तोंड देण्यास मोकळीक मिळवता आली. शाहिस्तेखान चाकण घेऊन पुण्यास आला; परंतु वाटेत झालेली हलाखी त्याचे समोर होती. पुण्यात आल्यावर तेथे लुटालूट वगैरे करू लागला. त्यामुळे तेथील व आसपासचे लोक दूर निघून गेले; परंतु शिवाजीने सांगितल्यावरून ते शाहिस्तेखानाकडे येऊन कौल घेऊन परत वस्ती करून राहिले. ही मंडळी रोज तळावरील लोकांची लूटमार करीत परंतु ती गुप्तपणे करीत व ते तेथेच वस्ती करून राहात असल्याने मोगलाला लूटमार करणाऱ्यांना पकडून शिक्षा करणे जड जात असे.

शाहिस्तेखान कारतलबखानाकडे बरेच सैन्य पाठवून त्यास कोकणांत शिरून शिवाजीचा मोड करण्यास सांगितले. हे सैन्य ठराविक अडचणीच्या जागेत येताच मात्र वाट पाहत बसलेल्या शिवाजीच्या सैन्याने हल्ला चढवून पार मोड केला. तेव्हा कारतलबखानाने नमते घेऊन खंडणी देऊन आपण सैन्यानिशी परत गेला. बरीचशी मालमत्ता हत्ती घोडे मागे सोडून गेला.

याच सुमारास शाहिस्तेखानाने पुरंदरास वेढा घातला; परंतु तेथेही फार नुकसान सोसून परत फिरावे लागले. मोगलांच्या सैन्याची दाणादाण उडाली. म्हणून शिवाजीने अचानकपणे जाऊन सुरत लुटली. सारांश शाहिस्तेखानाच्या सर्वच चढाईच्या हालचाली अपयशी ठरल्या. त्यामुळे मोगली साम्राज्याला मोठा धक्का बसला.

४.१५ सुरतेची लूट

सतराव्या शतकात सुरत हीच भारतातील मोठी बाजारपेठ होती. अशा लुटीत तेथील देशीय व परदेशीय व्यापाऱ्यांशी असलेले राजकीय संबंध लक्षात घेऊन त्यास गरज असेल तर संरक्षण देण्याची तत्परता दाखविली जात असे. सुरतेची लूट ही एक महत्त्वाची घटना घडून आली होती. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या शक्तिसामर्थ्याचा लौकिक दूरवर पसरला आणि शिवाजी महाराजांना जे दोन मोठ्या शाह्यांना म्हणजे मोगल व आदिलशाहांचा सतत तीन-चार वर्षे जो सामना करावा लागला होता. त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी सहन करावी लागली होती. ती भरून निघाल्याने 'हिंदवी स्वराज्या'च्या पुढील प्रयत्नात ढिलाई येऊ शकली नाही. उलट ही घटना स्वराज्याच्या विस्तारास पोषक अशीच झाली. याशिवाय या स्वारीमुळे मोगली लष्कराला शिवाजीच्या प्रदेशात पाठविण्याबरोबर बरेच लष्कर स्वदेश संरक्षणासाठी ठिकठिकाणी ठेवावे लागल्याने मोगली आक्रमणाची आक्रमकता बरीच कमी झाली असे बेंद्रे सांगतात.

भारतीय साधनांची चिकित्सा :

वा. सी. बेंद्रे सुरुवातीला विविध भारतीय साधनाचा आढावा घेतात. यामध्ये सर्वप्रथम बेंद्रे सभासद बखरीतील माहिती संदर्भात सांगतात की, "सभासद बखरीतील सुरतेच्या लुटी संदर्भातील माहिती ही विसंगत अशी आहे. कारण सभासदाने सुरतेची लूट ही घटना शिवाजी महाराज आगऱ्याहून परत आल्यानंतरची सांगितली आहे. चित्रगुप्त बखरीने सभासद बखरीतीलच मजकूर जशास तसा दिला आहे."[१०२] मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत सुरतेच्या लुटीच्या प्रसंगाचा मजकूर अगदी थोडक्यात आलेला आहे तर शेडगांवकर भोसले यांच्या बखरीत सुरतेच्या लुटीची हकीकत येत नाही. चिटणीस बखरीत सुरतेच्या लुटीबद्दल मजकूर येतो. सुरतेवर दोनदा धाड घातली होती. प्रथम धाडीनंतरची रायबागीण वगैरेनी दिलेला लढा व दुसऱ्या धाडीनंतरचा लढा व महकुसिंगाची स्वारी या प्रसंगांच्या निवेदनात कालक्रमाबाबत

गोंधळ केला आहे असे बेंद्रे सांगतात व पुढे लिहितात, चिटणिसांना जवळ कागदपत्रे असून त्याचा काळ काढता आलेला नाही. दोन-तीन वर्षांपूर्वीच रायबागिणींचा उंबरखिंडीचा लढा सुरतेच्या लुटीनंतरचा म्हणून सांगितला त्यामुळे मूळ प्रसंगाचा कार्यकारणभाव चुकला आहे.

युरोपियन साधने :

सुरतेच्या लुटीची माहिती इंग्रज, डच वगैरेंच्या वर्णनात फार विस्ताराने आली आहे. यावरून बखरीतील माहिती कशी अगदी त्रोटक व कशी विपर्यस्तही आहे याचे आकलन होते.

वा. सी. बेंद्रे यांनी "मनुची, फ्रान्सिस व्हॅलेन्टीन, कॉस्मा डा गार्डा, ॲबे करे, मॉन्सिअर ड येवनो, जॉन फ्रायर, बर्निअर, फादर पाइरी जोसेफ ड ऑर्लिन्स, व्हॉलकार्ड इव्हरसेन यांच्या वर्णनाचा आढावा घेतला."[१०३] तसेच "डचांनी आपल्या पहिल्या अहवालात सुरतेच्या लुटीची सविस्तर माहिती दिली आहे. तिचाही बेंद्रेंनी आढावा घेतला आहे."[१०४] व सुरत लुटीविषयीची जास्तीतजास्त वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे आपल्याला त्याच्या लिखाणातून दिसून येते.

युरोपियन साधनांची चिकित्सा :

वा. सी. बेंद्रे यांनी युरोपियन साधनांचा चिकित्सकपणे अभ्यास केल्यानंतर सांगतात की, प्रवास वर्णनात आलेली माहिती नवीन नाही. ती इंग्रज वखारवाल्यांच्या वृत्तांतावरच आधारलेली आहे. प्रवास वर्णनांचे महत्त्व एव्हढेच की, यात कार्यकारणभाव, प्रवासात साधलेली गुप्तता आणि शिवाजीने स्थानिक लोकांना दिलेली वागणूक यांचा चांगला बोध करून दिला आहे; परंतु प्रसंगाबाबत तत्कालीन सुरतच्या युरोपीय वखारवाल्यांनी जो वृत्तांत आपल्या मालकांना कळविला त्यातील आपल्या शौर्यसामार्थ्याच्या ज्या पोकळ बढाया मारल्या म्हणजे ज्याप्रमाणे सुरतेहून हेन्री गॅरीनी मार्लबरोला लिहिलेल्या २५ जानेवारीच्या पत्रात मजकूर येतो, "...आमच्याकडून त्याने खंडणी मागितली; परंतु आम्ही ती न देता आमच्या जवळ मनुष्यबळ असल्यामुळे त्याचे लोकांवर दोन तीनदा चालून घेऊन काही लोक मारिले. यामुळे आमचे शेजारचे भाग सुरचित राहून औरंगजेबापर्यंत आमची वाहवा झाली..."[१०५] याप्रमाणे त्या सोडल्या तर बराच तपशील वास्तवबोधी आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

डचांच्या पत्रव्यवहाराची नोंद घेतांना बेंद्रे सांगतात की, शक्तिसामर्थ्याची बढाई मारणाऱ्या वेंगुर्लेकरांना अगदी थोड्याच महिन्यात वेंगुर्ले जाळून फस्त केल्यानंतर शिवाजी

महाराजांच्या शक्तिसामर्थ्याची भीती घ्यावी लागली होती. तेच डच आपली बढाई मारण्यात जरी कच खाऊ लागले असले तरी त्यांनी इंग्रज व फ्रेंचांच्या शक्तिसामर्थ्याबाबत वायफळ उद्‌गार काढले आहेत.

तसेच शिवाजीने इंग्रजांची नुकसान भरपाई का भरून दिली? याचे उत्तर बेंद्रे देता की, शिवाजी महाराजांना इंग्रजांची शत्रू म्हणून लुटलेल्या वखारीबद्दल ते व्यापारी म्हणून भरपाई करून देणे न्याय वाटले होते. कारण शिवाजीला इंग्रज, डच आपलेही व्यापारी आहेत याची कल्पना होती तेव्हा त्यांच्याकडे गुन्हा नसतांना लूट केली तर त्यांची भरपाई करण्याची वेळ येईल हे मागील राजापूर, कारवार, हुबळी, धरणगाव या प्रकरणांवरून स्पष्ट होते. इंग्रजांच्या तोफांना शिवाजी महाराज घाबरले असे म्हणजे स्वतःची शुष्क बढाई करणे होय. मोगली तोफांनी शहराचेच नुकसान केले तसे इंग्रज डचांच्या तोफांनी हे नुकसान अधिक झाले असते असे बेंद्रे म्हणतात.

शिवाजी महाराज युरोपियांना घाबरले नव्हते :

बेंद्रे पुढे लिहितात, "व्हॉन व्हॅलेनटिन व शिवाजी याची प्रत्यक्ष भेट सुरतेतच झाली होती. त्याच्या लिहिण्यात तसा विपर्यास फारसा आला नाही असे सांगून बेंद्रे म्हणतात "ही लूट होती आक्रमण नव्हे. हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे जी जागा लुटली जात होती ती शिवाजीच्या राज्यापासून फार दूर होती व दरम्यान पोर्तुगीजांचा प्रदेश होता. अर्थात शक्य होईल तितक्या थोड्या अवधित लूट संपवून पाठलाग करण्यास येणाऱ्या शत्रूच्या सैन्याच्या आघातापासून आपली सेना व लूट वाचविणे ही मुख्य गरज होती. त्याच दृष्टीने शिवाजीने सुरतेच्या किल्ल्यास वेढा घालणे, ज्यांचा संबंध आपल्याही राज्याशी आहे. त्यांना शत्रू समजून लुटालूट करणे, त्याच्या वधापासून किंवा ज्यांच्या घरांत गरीबीचा संसार चालत आहे. त्यास निष्कारण दुखवण्यात काहीच अर्थप्राप्ती होणार नसल्यामुळे त्यांना त्रास देण्यात आपली शक्ती खर्च करणे व आपला वेळ व्यर्थ खर्च करणे किंवा इतर रानटी मार्ग स्वीकारणे या विशिष्ट कारवाईत त्याकडे आपले मन जाऊ दिले नाही. म्हणून डच किंवा फुकट बढाई मारणाऱ्या इंग्रज नोकरांनी शिवाजी घाबरला असे मानले; परंतु ते त्यांच्या अज्ञानाचे प्रदर्शन होते." असे बेंद्रे म्हणतात.

युरोपियनांना शिवाजी महाराजांची शक्ती माहित होती. म्हणूनच शिवाजीने खंडणी मागताच आम्ही व्यापारी आमचे जवळ नख्त पैसा नाही; सुरतेच्या सुभेदारांनी संकटात साह्य

मागितले तेव्हा आम्ही व्यापारी आम्हांस त्रास दिला तर आमचे आम्ही उपाय योजू परंतु स्थानिक लोकांच्या भानगडीत आम्ही सहभागी आहोत असे दाखवून शत्रूत्व स्वीकारणार नाही असे सांगितले? जर इंग्रजांची तोफखान्याची शक्ती शिवाजीला पळवून लावणारी होती तर कस्टम्स हाऊसमध्ये जो त्यांचा माल होता त्याची लूट झाली तेव्हा प्रतिकार न करीता हजारों पौंडाचे नुकसान कां करून घेतले? इंग्रजांनी शिवाजीच्या एका लहान तुकडीचा प्रतिकार केला तर त्याचे तीन लोक बंदुकीने ठार मारले गेले आणि तेही त्यांच्या वखारी जवळ, तशीच आपल्या संरक्षणार्थ शेजारील हिंदूचे भक्कम देऊळ व मुसलमानांची मशीद तेथील लोकांना वाऱ्यावर हाकलून लावण्यात जी नीती स्वीकारली त्या इंग्रजांना सुरतेच्या सुभेदाराला दोष देण्याचा तरी काय हक्क पोहोचतो? असा प्रश्न बेंद्रे विचारतात. तसेच अँथनी स्मिथला कैद केले तर त्याला सोडण्यासाठी निदान एक तरी धमकी खलिता किंवा निरोप पाठविण्याचे धाडस झाले का?

सारांश, मोठ्या रकमेऐवजी नजराणा म्हणून वखारीतील वस्तू देण्यास तयार झालेले इंग्रज कितीही बढाया मारल्या तरी आपली कुवत जाणत होते. यात मात्र शंका नाही; परंतु नोकरीतील स्वार्थ साधण्याकरिता दुरवर राहणाऱ्या मालकांकडे बढाई मारण्यासाठी अशा तऱ्हेची मजकुरांत विकृती आणली गेली इतकेच.

औरंगजेबाच्या करासंदर्भातील सुटीच्या घोषणेसंदर्भात :

सुरतेहून कंपनीला आलेल्या ४ एप्रिल १६६४ च्या पत्रानुसार, "सुरतेच्या लुटीबद्दल औरंगजेबाने फार खंत बाळगून शिवाजीवर सूड घेण्याचा निश्चय केला आहे. आमचे अर्जावर व आमच्या बहादुरकीबद्दलच्या शिफारसीचा मोठ्या उदारपणे विचार करून एक वर्षभर इंग्रजांना व इतर सर्वच व्यापाऱ्यांना सर्व जकाती माफ करण्याचे हुकूम त्याने लिहिले आहेत. पुढेही जकात दरसाल माफ व्हावी असे कायमचे फर्मान मिळेल अशी बेरचजण आशा देत आहेत." यासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, औरंगजेबाने ही कस्टमच्या करात जी सूट दिली ती त्याच्याच कस्टम कचेरीत ठेवलेल्या व लुटीत नुकसान झालेल्यांची भरपाई म्हणून ठराविक थोड्याच काळापर्यंत आणि सर्व व्यापाऱ्यानां बहुधा त्यांच्या लुटीची नुकसान भरपाई काळात भरून काढण्याच्या दृष्टीने ही देणगी होती यात शंका नाही.

शिवाजी महाराजांच्या सुरत लुटीमागचा उद्देश्य :

वा. सी. बेंद्रे म्हणतात उद्देश्याच्या संदर्भात वरील पुराव्यांचा विचार केल्यास त्याच्यात मतभिन्नता दिसून येते. एक प्रवाद असा आहे की, ही लूट पैशांसाठी करण्यात आली. पोर्तुगीजांकडे लढाईच्या विविध घटनांमध्ये झालेल्या खर्चासाठी द्रव्यसाह्य मागितले होते. या प्रवादाला साक्षीदार म्हणून सभासदी व चिटणीस बखरीतील निवेदनाचा सांगता येईल.

उलट कॉस्मा डा गार्डाने "शाहिस्तेखान व त्याच्या मोठ्या सैन्याची आपण थोडीही तमा बाळगीत नाही हे त्यास दाखविण्याकरीता" असे सांगितले आहे. गार्डा लिहितो 'शिवाजीचा मुख्य उद्देश्य श्रीमंत व्यापारी वगैरेचेच फक्त धनद्रव्य लुटणे व शाहिस्तेखानाची व औरंगजेबाची तो यत्किंचितही तमा करीत नाही व त्याच्या सेनासामर्थांची भीती तो मुळीच बाळगीत नाही इतकेच दाखवावयाचे होते. त्याची खास तेथील अधिकाऱ्याबाबत किंवा लोकांबद्दल काही तेढ आलेली नव्हती. गरीब लोकाबद्दल त्याला पूर्ण सहानुभूती होती हे त्यांनी आपणास नको असलेले लुटीतील सामान गरीबांना वाटले आणि आगीमुळे त्याचे जे नुकसान झाले त्यापेक्षा अधिक किंमती ऐवज त्यांना मिळाला होता त्यावरून स्पष्ट होत आहे.'

तसे पाहिले तर असे छापे शत्रुशत्रूत युद्ध चालू असतांना शत्रूचे सैन्य आपल्या मुलुखाच्या रक्षणार्थ पांगेवण्याचा असतो. मोगली सैन्य उत्तरेकडे भांडत नसल्याने आपल्यावरच येऊन आदळेल तेव्हा औरंगजेबाला तितकीशी शिवाजीच्या शक्तिसामर्थ्याची कल्पना नसल्यास आपण त्याचे हद्दीत दूरवर छापे घालू तेव्हा त्यासाठी काही सैन्य बचावार्थ मागे राखून ठेवण्याची आवश्यकता तो आपल्या उत्तरेकडे गेलेल्या व याच सुमारास परतणाऱ्या सैन्याची नेमणूक 'हिंदवी स्वराज्या'वर करणार नाही व आपल्याला आलेल्या सैन्याशी तोंड देणे सोयीचे जाईल.

ज्याप्रमाणे उंबरखिंडीवर मोगली सैन्य खेचून तहास अडचणींत घातल्याने पाडाव केला व त्यामुळे काही काळ शाहिस्तेखानाच्या हालचाली थांबविल्या गेल्या तशीच सैन्याची पांगापांग करून ठेवल्यास दक्षिणेत आलेल्या सरदारांना सैन्याच्या अभावी आपल्या हालचालींना आवरून धरावे लागले असाही उद्देश या लुटीमागे असावा असे बेंद्रे सांगतात.

त्याचप्रमाणे शाहिस्तेखानाला बंगालच्या सुभेदारीवर जावे लागले तेव्हा जसवंतसिंगास दक्षिणेच्या सुभ्याची कामगीरी दिली. त्याने प्रथम सिंहगडास नोव्हेंबरच्या अखेरीस वेढा दिला. त्याचा बंदोबस्त करून शिवाजीने सुरतेची लूट केली. साहजिकच शिवाजीच्या या धाडसाचा

औरंगजेबाला व शाहिस्तेखानाच्या जागी नेमणूक झालेल्या जयसिंगाला आपल्या पुढील कार्याच्या महत्त्वाचा विचार करावा लागला व त्याने पूर्ण तयारीसाठी मार्च १६६५ पर्यंतचा वेळ घेतला. त्यामुळे ज्या विजापुरकरांनी मोगलास मदत म्हणून शिवाजीच्या राज्यात शिरून लढा सुरू केला होता त्यास शिवाजीला तोंड देण्यास वेळ मिळाला. त्याने आदिलशाही सैन्याला माघार घ्यावयास लावली असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करताना दिसतात.

सुरतेच्या लुटीच्या घडामोडीचा वा. सी. बेंद्रेंनी घेतलेला आढावा :

शिवाजी महाराजांच्या सुरतेवरील लुटीच्या घडामोडींच्या संदर्भात जो वरील साधनातील आपण मजकूर बघितला त्या सर्वांना सविस्तर चिकित्सकपणे अभ्यास करून वा. सी. बेंद्रे या लुटीची व्यवस्थित माहिती देतांना सांगतात की, शिवाजी महाराज आपले सैन्य घेऊन सर्वप्रथम दक्षिणेकडे वळले. मध्यंतरी आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या करून एक तुकडी चौलाकडे पाठविली व गुप्तपणे दुसरी तुकडी आपल्याबरोबर घेतली. यावेळी मोगली सैन्य शिवाजीच्या उत्तरेकडील मुलखात शिरून लुटालूट करीत होते. असे करितांना पोर्तुगीजांच्या हद्दीत गडबड करीत. पोर्तुगीजांकडे मोगलाबरोबर संघर्ष करून त्यांचा त्रास कमी करण्याइतकी शक्तिसामर्थ्य नव्हते. शिवाजीचे सैन्य वसईला गेल्यानंतर पोर्तुगीजांशी बोलणी केल्यावरून मोगली सैन्याचा पाडाव करण्यासाठी शिवाजीला त्यांनी आपल्या हद्दीतून ससैन्य जाण्यास सहजच परवानगी दिली. तेव्हा शिवाजी आपल्या सैन्यानिशी रामनगरच्या राजाच्या हद्दीतून पोर्तुगीज हद्दीत शिरला व तेथून गुप्तपणे मोगली हद्दीत शिरून सुरतेकडे वेगाने निघाला.

मोगली हद्दीत गेल्यावर शिवाजीने आपण बादशाहाच्याच आज्ञेवरून अहमदाबादेकडे तेथील पटणच बंडखोराच्या पारिपत्याच्या कामावर जात आहे असे सांगितले. अर्थात ते मोगली सैन्य म्हणून त्यांच्याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. नंतर हे सैन्य सुरतेपासून १२ मैलावर आले. तेथून ते सैन्य वेगान निघून तुटनी गावाला म्हणजे सुरतेपासून दिड मैलावर ४ जानेवारीला आले. येथे मात्र सुरतकर व शिवाजी यांचा प्रत्यक्ष संबंध आला.

सुरतेच्या सुभेदाराला ५ जानेवारीला बातमी लागताच निरोप पाठविला की, आपण ससैन्य शहरात येऊ नये. कारण रयत वगैरे घाबरून पळून जात आहे. निरोप घेऊन येणाऱ्या माणसाला शिवाजीने कैद केले व त्याच्याजवळील शस्त्रे जप्त केली. माणूस आला नाही हे पाहताच सुभेदारने आपले घोडस्वरांचे घोडे सरंजामासह किल्ल्याच्या आश्रयास गेला. काही श्रीमंत

व्यापारी वगैरे त्याचेबरोबर किल्यात आपल्या मालमत्ता व बायका-मुलांसह आश्रयास गेले. किल्याचे दरवाजे बंद करून तोफांची व्यवस्था लावली गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ९-१० वाजता शिवाजीने आपले काही सैन्य तुकड्या तुकड्याने नीट सूचना करून लुटालूट करण्यास पाठविले. सुभेदारने ज्या बाजूला गडबड उडे त्याबाजूला तोफा उडविण्यास प्रारंभ केला. गावकऱ्यांनी किंवा इतरांनी एकत्र येऊल लुटालूट करणारांशी युद्ध न केल्याने हे शिवाजीचे लोक लहान लहान गटानेच वावरत होते आणि त्यांना इमारतीचे संरक्षण मिळत होते. त्यामुळे सुभेदाराच्या तोफांच्या माऱ्यामुळे घरे पडत व लुटणारांचे पारिपत्य होण्याऐवजी त्यांना मदतच होत होती. ही लूट कोणाचाही विरोध न होता होत होती. लूट फार मोठी मिळू लागली. द्रव्य व जडजवाहिर इतके मिळू लागले की, शिवाजीला प्रथमच लुटलेली किंमती कपडे, भांडीकुंडी वगैरे नेण्यास जमणार नाही. म्हणून स्थानिक गरीब लोकांना वाटावी लागली. नेहमीच्या ठरावाप्रमाणे सैनिकांना आपापली लूट नेण्याची परवानगी होतीच. व्यापारी भाग संपूर्ण लुटला व जाळून टाकला. गरीबांच्या वस्तीकडे जाण्याची गरज नव्हती म्हणून ते दलित वर्गाच्या वस्तीचे भाग अग्निच्या तडाख्यापासून वाचले. सोन्याची तर पिपेंच्या पिपें व्यापाऱ्याकडून घेतली. त्याशिवाय मोहरा वगैरे सौन्याचांदीची नाणी व जवाहिर पुष्कळच मिळाले. ही लूट गलबतांतून आपल्या राज्यांत पाठविली व नंतर रायगडावर नेऊन ठेविली.

सुभेदाराने विरोध केला नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्याजवळ फारच थोडे मनुष्यबळ व स्थानिक लोक सैनिक नसल्यामुळे त्यांनी पलायन किंवा शरणागतीचाच अवलंब केला होता. या इनायतखान सुभेदाराला नंतर आपल्या व आपल्या बादशाहाच्या नामुष्कीवर पडदा टाकण्यासाठी अहमदाबादेहून सैन्याची मदत मागितली व त्याप्रमाणे मोहबतखान सुरतेस आला, पण शिवाजीने तीन दिवस लूट व जाळपोळ करून सुभेदाराच्या मदतीस मोहबतखान मोठ्या सैन्यानिशी येत आहे अशी बातमी लागताच आपल्या सैन्यास लुटीसह तीन मैलावरील जागी पाठविले व चार-पाचशे लोक पाठीमागे रक्षणास ठेवून निघून गेले.

चौथ्या दिवशी सकाळी ह्याही सैन्यास माघार घेण्याची सूचना केलेली होती. त्याप्रमाणे ते परतले. ९ तारखेस शिवाजी ससैन्य लूट घेऊन निघून गेला व १० तारखेस मोहबतखान सुरतेत आला; परंतु शिवाजीने तोपर्यंत फार मोठा प्रवास केल्याने व पोर्तुगीजांनी जाण्यास रस्ता

दिल्यामुळे मोगली सैन्याला शिवाजीच्या सैन्याचा पाठलाग करणे शक्य झाले नाही असे बेंद्रे सांगतात.

डचांच्या निवेदनात वास्तववाद आहे आणि त्यांनी आपली भीती व्यक्त करून आपली मालमत्ता वाचविण्याचे कसे प्रयत्न केले हे आपल्या वर्णनात सांगितले आहे. ज्या कस्टम हाऊसमध्ये इंग्रजांचा माल लुटला गेला त्याच ठिकाणांहून डचांनी आपला माल सुभेदारास न सांगता पळविला व तो शिवाजीने लुटला असे सांगून त्यावरील कस्टमचा करही वाचविला होता. असे डचांनी आपल्या वर्णनात लिहून ठेवले असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

शिवाजी महाराजांनी घेतलेली काळजी :

१. सुरतेतील इंग्रज व डच आपल्या राज्यांतील इंग्रज व डच हे एकाच संघटनेतील असल्यामुळे ते रीतसर आपल्या स्वराज्यांतील त्याच्या संघटनेला नुकसानीची भरपाई करून घेण्याचा रास्त हक्क बजावल्यास रीतसर न्याय मान्यता द्यावी लागेल. म्हणूनच त्या प्रसंगी शिवाजीने त्यांना त्रास पोचला जाणार नाही असा इशारा दिला होता.

२. बायका-मुलांना त्रास न देण्याचा शिवाजी महाराजांनी आपल्या सर्वच नोकरांना दंडक दिलेला होता.

३. व्यापाऱ्यांनी आपली संपत्ती मुकाट्याने दिली तर त्यांनाही त्रास न देण्याबद्दल हुकूम होता.

स्वारीचे महत्त्व :

शिवाजी महाराजांनी मिळालेला सर्व माल नेता येणार नाही. म्हणून त्याचा नाश न करिता गावांतील गोरगरीबांस, घाबरून शिवाजीच्या आश्रयास आले होते. त्यांना वाटला व त्याच्या समजुतीप्रमाणे आगीत जळालेल्या घरगुती मालापेक्षा जास्त भरपाई झाली हे पाहून आनंद व्यक्त केला. या बाबी शिवाजीच्या लौकिकास अधिक तेजस्वी आणखी झाल्या.

या लुटीचा शाहिस्तेखान व जसवंतसिंग यांना यत्किंचितही सुगावा लागला नसावा आणि राजधानीतून त्यांच्या असावधानतेबद्दल असमाधानाचे पत्र आल्यानंतर कळावे यात शिवाजीने दाखविलेली तत्परता, गुप्तता, सर्व बाजुंनी काळजी घेण्याची पद्धती अशा प्रसंगी स्वार्थासाठी नोकर-चाकरात दिसून येणारी चलबिचल शिस्तीत सरावलेल्या लोकात दिसली नसल्याचा पुरावा

इत्यादी गोष्टींचा विचार केला तर शिवाजीने 'हिंदवी स्वराज्या'च्या उभारणीसाठी महाराष्ट्रीकांच्या मनाची व शिस्तीची चांगली तयारी केली होती हेच दिसून येते, असे बेंद्रे सांगतात.

४.१६ शिवाजी महाराजांचे आदिलशाहीवर आक्रमण

"हिंदवी स्वाराज्यांसाठी आदिलशाहीवर केलेले आक्रमण हे वस्तुत: आक्रमण नसून आपल्या मायभूमी व देशबांधवास परकीय इस्लामी सत्तांच्या पारतंत्र्यांतून स्वातंत्र करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा असा प्रयत्न होता." असे वर्णन वा. सी. बेंद्रे आदिलशाहीवरील शिवाजी महाराजांच्या आक्रमणाचे वर्णन करतात. बेंद्रे पुढे सांगतात की, शिवाजी महाराजांना यावेळी दोन गोष्टी कराव्या लागल्या होत्या. एक तर आपल्या स्थानिक समाजाला आपल्या 'हिंदवी स्वराज्या'चे महत्त्व पटवून द्यावयाचे होते. कारण असे केले तरच आपल्या प्रयत्नातील यशाला स्थैर्य प्राप्त होणार होते आणि दुसरे म्हणजे असल्या प्रयत्नात सामील होणाऱ्या स्वकियांचा उत्साह कायम राखण्यासाठी, मानहानी होणारे अपयश येऊ न देण्यासाठी, शक्य तितकी काळजी घेऊन आपल्या साह्यकर्त्यांना आपल्या पराक्रमाबाबत अधिकाधिक आत्मविश्वास दृढ होईल अशी कार्यपद्धती राबविणे होय.

विविध साधनांची चिकित्सा :

बखरी वाङ्मयातील माहिती संदर्भात बेंद्रे सांगतात की, "यामध्ये तपशीलवार वर्णन आलेले नाही. सभासदी बखरीत आलेली माहितीच चित्रगुप्त बखर देते; परंतु यावेळी संपत्तीचा आकार दहा कोटी झाल्याचे सांगते तर सभासद बखर दोन कोटी सांगते. शेडगांवकर बखरीत सभासद बखरीप्रमाणेच मजकूर आलेला आहे; परंतु सरदाराचे नाव इभ्रामखान व सैन्य ३००० असल्याचे सांगितले आहे."[१०६]

यानंतर बेंद्रे ९१ कलमी बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर, शिवदिग्विजय, मल्हार रामराव चिटणीस यांनी दिलेल्या माहितीची चिकित्सा करतात व त्यानंतर शकावलीतील, युरोपियन साधनातील नोंदीचा आढावा घेऊन त्याची चिकित्सा पुढीलप्रमाणे करतात.

सभासद बखरीत व चित्रगुप्त बखरीत सारखीच माहिती आलेली आहे फक्त चित्रगुप्त बखरीत संपत्तीचा आकार दहा कोटी झाल्याचे सांगितले आहे. शेडगांवकर बखरीत सभासद बखरीप्रमाणेच माहिती दिलेली असून यामध्ये फक्त सरदारांचे नावे इभ्रामखान व सैन्य ३००० असल्याचे काय ती वेगळी माहिती आलेली आहे.[१०७]

यानंतर वा. सी. बेंद्रे यांनी ९१ कलमी बखरीतील, मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीतील व शिवदिग्विजयातील माहिती देवून सांगतात की, "शिवदिग्विजयामध्ये या आक्रमणाविषयीची सर्व माहिती ही शाहिस्तेखानाच्या मोहिमे अगोदर सांगून मोठी चूक केली आहे. मल्हार रामराव चिटणिसाने शिवदिग्विजयात आलेली माहिती सावंताच्या पारिपत्यानंतरच दिली आहे; परंतु त्या मोहिमेची हकीकत सुरतेच्या लुटीपूर्वी दिली आहे. ही घटना शके १५८३ (१६६१-१६६२ इ.स.) च्या सुमारास घडली असाही उल्लेख केला आहे जो की, चुकीचा आहे असे बेंद्रे सांगतात."[१०८]

यानंतर बेंद्रेंनी याद्या व शकावलीतील नोंदी घेतल्यावर महमद नुस्त्राच्या 'अलीनाम्या'तील माहिती घेतली. त्यातील खवासखानाच्या विजयाविषयी व शिवाजी महाराजांच्या विजयाविषयी बेंद्रे म्हणतात, "इतर पुराव्यावरून खवासखान पळून गेला हे स्पष्ट आहे. तत्कालीन पत्रव्यवहार हेच सांगतो. आपला पूर्ण पराजय झाला तरी विजय झाला हे सांगण्याची पार्शियन म्हणजे पठाणी लेखकांची प्रथाच होती. हे या व इतर वर्णनावरून समजून येते." बुसातीन सलातीनमध्येही खवासखानाचा विजय झाल्याचे म्हटले आहे.[१०९] पत्रव्यवहारातून अशीच माहिती आली आहे.[११०] तसेच इतरही महत्त्वपूर्ण माहिती येते.

शिवाजी महाराजांच्या आदिलशाहीवरील आक्रमणाचे बेंद्रेंनी काढलेले निष्कर्ष :

(१) वा. सी. बेंद्रे यांनी शिवाजी महाराजांनी आदिलशाहीवर आक्रमण का केले? या आक्रमणामागील त्याचे धोरण काय होते हे सांगितले. ते म्हणतात, आदिलशाहीवरील मोगली दडपणाला मुख्य कारण म्हणजे उत्तरेकडील सैन्य दूरवर पाठवावयाचे तर त्याची संघशक्ती बचावाच्या दृष्टीने संघटीतच राहिली पाहिजे आणि याकरिता आपले सैन्य शिवाजीला सर्व बाजुंनी घेरून नामोहरम करण्यास असमर्थ आहे. याची जाणीव झाल्याने औरंगजेबाने शिवाजीच्या सभोवती असणाऱ्या शक्तिाचाच वापर करणे जरूरी आहे. हे पाहून आदिलशाहाला व पोर्तुगीजांना काही सवलती देऊन मदतीस जवळ केले; परंतु आदिलशाहाच्या मनांत पूर्वीच्या मोगल हालचालीवरून मोगलास दख्खनमध्ये यशस्वी होऊ देणे आपल्याच ऱ्हासाला कारण होईल. हे आदिलशाहा व त्याचे सरदार जाणत होते. म्हणून आदिलशाहाला आपली बाजू अडचणीत सापडली आहे हे जाणून शिवाजीशी गुप्तपणे संघनमत ठेऊन वरकर्मी आपण मोगलांची बाजू उचलून धरीत आहोत हे दाखविण्याचा तो प्रयत्न करीत होता. शिवाजीने आदिलशाहाला जरी मोगली कटांतून फोडला असला तरी त्याच्या पुढे मुख्य समस्या होती, ती

म्हणजे मोगलांबरोबर आपल्या शेजारील शत्रूचीही शक्ती कशी मर्यादित करून ठेविता येईल याची काळजी घेऊन उपाय योजणे.

दख्खनमधील देसाई वगैरे मांडलिक म्हणून स्वतंत्रपणेच राहत असत. गरज पडल्यास आदिलशाहाच्या मदतीस येत. तेव्हा ही सभोवतालची लहान लहान राज्ये आपल्या ताब्यात आणली तर दक्षिणेत आदिलशाहाचे सामर्थ्य कमी होईल. उलटपक्षी ही राज्ये शिवाजीच्या हाती राहिली तर आदिलशाही हालचालींना तोंड देण्याचे मोठेच साधन हाती राहिल. शिवाजीने हे उद्दिष्ट बऱ्याच मोठ्या प्रमाणात साधल्याचे दिसून येते असे बेंद्रे येथे म्हणतात.

(२) आदिलशाही कोकणांत शिवाजी महाराजांनी आक्रमण केले त्याच काळात त्यांना आणखी खाली उतरून बार्सीलूरपर्यंत आपल्या आरमारासोबत जाऊन लढा द्यावा लागला. या लढ्यात शिवाजी महाराजांनी आपल्या आरमाराचा यशस्वीपणे उपयोग करून दाखविला व आरमारी सत्तांना जमिनीवरील शक्तिसामर्थ्याबरोबर आरमारी सामर्थ्यही त्यास धोका देण्याइतके तयार झाल्याचा पडताळा मिळाला आणि चिंतातूर व्हावे लागले. या प्रसंगाकडे बखरकारांचे लक्ष गेलेले नाही. शिवाय या लढ्याकडे पाहण्याच्या दृष्टितही बराच विपर्यास आला आहे.

(३) मराठी बखरकार बेदनूर व बसनूर अशी दोन शहरे वेगवेगळी असल्याचे दर्शवितात. जो छापा घालून लूट केली ती बसनूरची अशीच त्यांची समजूत आहे. काही बसनूरऐवजी हसनूर असेही वाचतात. ती थोडी वाचनाची चूक आहे. बसनूरचे तत्कालीन नाव मात्र जे बार्सिलोर होते. त्याचा उच्चार ते करीत नाहीत असे बेंद्रे म्हणतात. युरोपियन लेखक बासलूरचा बसरूर असाही उल्लेख करतात. मात्र पत्रांत बेदनूर, बार्सिलूर व बसरूर यामध्ये फरक करीत नाहीत. बेंद्रे म्हणतात, बार्सिलूर हे दक्षिण कानडा जिल्ह्यात समुद्र किनारी कुंदपुरापासून दक्षिणेस सुमारे ४ मैलावर आहे. बेदनूर हे बार्सिलूरच्या पूर्वेस अदमासे १२ मैलावर आहे. बेदनूर ही जरी शिवाप्पा नायकाची राजधानी होती तरी बार्सिलूर हे पूर्वी फार भरभराटीस आलेली व्यापारी बंदर व बाजारपेठेचे मोठे ठिकाण असल्याचे कित्येक तत्कालीन उल्लेखावरून दिसून येते असे बेंद्रे स्पष्ट करतात.

(४) बार्सिलूरची लूट नक्की कधी झाली याची निश्चित माहिती बखरकारांना नाही. असे बेंद्रे सांगून मल्हार रामराव चिटणीस बार्सिलूरची लूट शके १५८३ म्हणजे इ.स. १६६१-६२ मधील असल्याचे सांगतात, पण ही लूट सुरतेसारखीच झाल्याचेही सांगतो. अर्थात चिटणीस बखरीतील

हा कालनिर्देश चुकीचा आहे. जेधे शकावलीत शके १५८६ चा माघ हा बसनुरास जाण्याचा काळ म्हणून मोघमपणे सुचविला आहे. बेंद्रे लिहितात, १५८६ चा माघ मास म्हणजे इ.स. १६६५ च्या ४ जानेवारी ते ५ फेब्रुवारीपर्यंतचा काळ होय. शिवापुरकर शकावलीत फाल्गुन शुद्ध ३ येला म्हणजे ८ फेब्रुवारीला नावारोहण केल्याची नोंद आहे; परंतु हे नावारोहण जाण्याचे की परत येण्याचे हे स्पष्ट केलेले नाही. मालवण वरून बसनूरच्या मोहिमेस नावेत बसून निघाले असे सर्वच कच्चे-पक्के मराठी साक्षीदार सांगत आहेत असे बेंद्रे नमूद करून पुढे लिहितात की, या यादीत दिलेली तारीख ८ फेब्रुवारी १६६५ ही मालवणास परतीसाठी जहाजांत बसण्याचीही असण्याचा अधिक संभव आहे.

ग्रँट डफ इंग्रजी साधनांच्या आधारे शिवाजी मालवणाहून फेब्रुवारीत निघून मोहिम केली असे सांगतो. इतर इतिहासकारही डफचेच अनुकरण करतात. जदुनाथ सरकार मात्र त्यांच्या समजुतीप्रमाणे (म्हणजे एका इंग्रजी पत्रांतील शिवाजीच्या आगमनाविषयी दिलेल्या अंदाजाप्रमाणे) "शिवाजीने फेब्रुवारीत मालवण सोडले, बसरूर लुटले आणि गोकर्णास महाशिवरात्रीस म्हणजे ५ फेब्रुवारीस आले. नंतर अंकोल्यास आले व तेथून २२ फेब्रुवारीला कारवारांत आगमण आणि २३ ला निर्णय करून मार्चच्या सुरूवातीस वेंगुर्ल्यास पोहचले. मात्र महाशिवरात्र जदुनाथ सरकार मानतात त्याप्रमाणे ५ फेब्रुवारीस नसून २ फेब्रुवारीला होती"[१११] असे बेंद्रे स्पष्ट करून जदुनाथ सरकारचे म्हणणे खोडतात.

(५) बखरकार वगैरे बेदनूरच्या राजाला शिवाप्पा नाईक म्हणतात व ह्या इ.स. १६६५ च्या मोहिमेच्या वेळी तो जिवंत होता असे समजतात; परंतु हा समज चुकीचा असल्याचे तत्कालीन पुराव्यावरून दिसून येते असे बेंद्रे सांगून याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देतात, "बेदनूरकर शिवाप्पा नायक २० डिसेंबर १६६२ च्या पूर्वी मरण पावला होता व त्याच्या जागी त्याचा मुलगा भद्राप्पा नायक राज्यावर आला. यानेच विजापुरकरांशी सामना दिला व तो इ.स. १६६३ च्या सप्टेंबर नंतर मरण पावला. नंतर त्याचा बंधु सोमशंकर नायक हा राजा झाला" असे डॉ. पिसुर्लेकरांनी गोवा रेकॉर्ड्सच्या आधारे लिहिले आहे. सर जदुनाथांनी या भद्राप्पाला शिवाप्पा केले आहे, ते अर्थात चुकीचे आहे. फारसी इतिहासग्रंथात उल्लेखित केल्याप्रमाणे भद्राप्पाच आदिलशाही लढ्याचे वेळी राजा होता; परंतु इतर साधनांच्या अभावी जदुनाथ सरकारांना शिवाप्पानंतर रूद्राप्पा व त्यानंतर सोमशंकर ही संगती लावता आली नाही असे बेंद्रे सांगतात.

फ्रायरने इ.स. १६७५ मध्ये शामशंकर अथवा शामाशिखर नायक त्याच्या सरदारांकडून मारला गेला त्यावेळी बसाप्पा नावाचा बालराजा गादीवर आल्याचे आणि कारभार त्याची आई व एक तिमाप्पा नायक यांच्याकडे असल्याचे लिहिले आहे. इंग्रजी पत्रातून १६६३ च्या मेत स्नेप नायक व १५ जून १६६३ रोजी सुप्पेनागने असे लिहिले आहे; परंतु बुसातिन-उस-सलातिनमध्ये इ.स. १६६३ मध्ये विजापुरकरांनी पराभव केल्यामुळे "तब तो उनकी दहशत भद्रप नायके दिलपर ऐसी गालीब हुई के..." असे म्हटले आहे.

एका तत्कालीन संस्कृत ग्रंथाच्या आधारे सिद्धाप्पा याचे मुले शिवाप्पा व व्यंकटप्पा आणि शिवाप्पाची मुले भद्राप्पा व सोमशेखर असे देऊन भद्राप्पाला मुले नव्हती व सोम शेखरला चैन्नम अंबा इजपासून बसवाप्पा झाल्याचे लिहिले आहे. भद्राप्पा १६६३ च्या अखेरीस मारला गेला. सोमशेखरही त्यानंतर काही दिवस राज्य केल्यावर मारला गेला. त्याच्यानंतर बसवाप्पा गादीवर आला. सारांश नावाबद्दल बराच घोटाळा उडालेला आहे.[११२]

(६) बेदनूरची यावेळची परिस्थिती कशी होती यासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, यावेळी म्हणजे इ.स. १६६४ मधील आणि विशेषतः पावसाळ्यानंतरची बेदनूरच्या राज्याची परिस्थिती फारच हलाखीची होती. एका बाजूने अंतर्गत यादवीला तोड द्यावयाचे होत आणि दुसऱ्या बाजूला शत्रूना थोपवून ठेवावयाचे होते. भद्राप्पाला डचांनी दारूगोळा दिला नाही आणि पोर्तुगीजांनीही वेळ काढून रणनीती अवलंबिल्यामुळे भद्राप्पाला शरणागती स्वीकारावी लागली. आदिलशाहाने त्याचा सर्व प्रांत पादाक्रांत केला. शाहाजी महाराजांनी आपल्या मध्यस्थीने मोठ्या खंडणीवर भागविले व भद्रप्पाला राज्य परत देवविले; परंतु आदिलशाहाच्या आक्रमणांतून मुक्त होताच भाऊबंदकी सुरू झाली. एकदोन महिन्यातच भद्राप्पाला विष घालून मारिले आणि एका बालराजाचे बाहुले उभे करून राज्यांतील काही ब्राह्मण व इतरांनी आपापसांत यादवी सुरू केली. आदिलशाहाने संधी पाहून मोठे सैन्य परत पाठविले; परंतु आदिलशाहीवर औरंगजेबाचे आक्रमण होऊ लागल्याने बेदनूरकडील सैन्य आदिलशाहाला परत बोलवावे लागले. मोठ्या खंडणीच्या अटीवर बेदनूरचे राज्य वाचले गेले. अशा बिकट परिस्थितीतून बेदनूरचे राज्य यावेळी जात होते.

(७) बेदनूर व पोर्तुगीजांच्या संबंधासंदर्भात सांगतांना बेंद्रे सांगतात की, यांचे संबंध चांगले होते. तरी देखील काही अधिक बंदरांच्या हव्यासाने ते बेदनूरकरांच्या वकिलांशी वेळकाढूपणाचा डाव खेळत होते. त्यांना कबंली, बार्सीलूर व मंगळूर ही मुख्य बंदरे हवी होती.

होनावर ही पाहिजे होते; पण ते देण्यास बेदनूरकर तयार नव्हते. मंगलूरही डचांच्या विरोधामुळे पोर्तुगीजांना मिळू शकले नाही. ही बंदरे लढाई देऊन घ्यावयाचा पोर्तुगीजांनी निर्णय घेतला. मंगलूरच्या लढ्यांत पोर्तुगीजांना हार खावी लागली. बेदनूरकरांजवळ पोर्तुगीजांना तोंड देण्याइतका दारूगोळाही नव्हता व मनुष्यबळही नव्हते. अशा चिंतेत असतांना शिवाजी महाराजांची यशस्वी आघाडी हुबळीपर्यंत येऊन पोहोचली होती. आरमाराचीही तयारी असल्याची बातमी शिवाजीच्या व्यापारी जहाजांनी दिलीच होती. अशा अडचणीत असतांना बेदनूरकरांनी शिवाजीचे साह्य मिळविण्याचा प्रयत्न केला.[११३] असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

(८) यावेळी शिवाजी व पोर्तुगीजांच्या संबंधासंदर्भात माहिती देतांना बेंद्रे हे संबंध मैत्रीचे राहिल्याचे सांगतात. खास १६६४ च्या सुरूवातीस पोर्तुगीजांनी शिवाजीची धनाच्या मदतीची मागणी नाकारल्याने शिवाजीचा पोर्तुगीजांवर राग होताच. याविषयी कारवारकर इंग्रज यांच्या १६ फेब्रुवारी १६६४ च्या पत्रात या प्रसंगासंदर्भातील माहिती येते. असे सांगून बेंद्र शिवाजीची मागणी कशी योग्य होती ते सांगतांना म्हणतात की, पोर्तुगीज आतापर्यंत मोगलशाहीला दख्खनपासून दूर ठेवण्यासाठी स्थानिक शाह्यांना त्याच्या विरोध द्रव्याचे साह्य करीत असे. शिवाजीची मागणी त्याचाच एक भाग होता; परंतु या नवीन व्हॉइसरायने वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळे धुडकावली. मात्र त्यामुळे मोगल व शिवाजी या दोन शत्रूंशी त्यांचे संबंध बिघडले गेले. त्यामुळे पोर्तुगीजांचा स्थानिक आधार तुटला असे बेंद्रे म्हणतात.

(९) शिवाजी महाराजांनी यावेळी कोणत्या उद्देशाने आरमाराची तयारी चालविली होती याचा नक्की अंदाज कोणासच बांधता आला नाही. असे बेंद्रे सांगून त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देतात. कारवारकरांना जरी फार जागृत राहण्यासाठी सांगितले होते तरी त्यांना २९ ऑक्टोबरपर्यंत तरी शिवाजीच्या उद्दिष्टांची कल्पना नव्हती. ते २९ ऑक्टोबर १६६४ च्या पत्रावरून सिद्ध होते. तसेच शिवाजीचे आरमार वेंगुर्ल्यापर्यंत आले ते माहित होते तरी ते खाली उतरणार नाही. असा कारवारकरांप्रमाणे गोवेकरांचाही समज असला पाहिजे. नाही तर पावसाळ्यापूर्वी शिवाजीच्या वकिलाच्या पाणउताऱ्याची आठवण देऊन त्यांनी आपले आरमार बार्सिलूरकडे पाठविले नसते असे बेंद्रे म्हणतात.

डचांना शिवाजीच्या आरमाराचे भय वाटत होते हे त्यांच्या ३ ऑगस्टच्या नोंदीवरून दिसते. डच लिहितात, "शिवाजी जवळ गलबतांची संख्या भरपूर असल्यामुळे तो रात्री सहज

छापा घालून गलबत घेईल म्हणून जमिनीपेक्षा पाण्यावरच त्याचे भय अधिक बाळगले पाहिजे."[११४] तसेच डचांनी ऑक्टोबरच्या ९ तारखेस जी नोंद केली आहे ती नोंद बेंद्रे पुढीलप्रमाणे सांगतात, "शिवाजी मोठ्या परिश्रमाने किनाऱ्यावर ५० गलबतांचे आरमार तयार करीत आहे. पावसाळ्यानंतर ते बाहेर पडेल. शिवाजीचा उद्देश काय आहे हे समजत नाही. सुरतेच्या लोकांच्या मते मक्केकडे जाणाऱ्या मोगली गलबतांवर तो हल्ला करील; परंतु हे संभवनीय दिसत नाही."

बेंद्रे म्हणतात, डच व पोर्तुगीजांच्या १६६४ पर्यंतच्या हालचाली पाहिल्या तर हे कळून येते की, त्यांना डिसेंबर १६६४ अखेरपर्यंत शिवाजीच्या आरमारांच्या विशिष्ठ हालचाली बाबत माहिती नव्हती. तसेच आपण शिवाजीच्याही हालचाली ज्या ऑक्टोबर ते डिसेंबर अखेरपर्यंत झाल्या त्याचा अभ्यास केला तर असे दिसून येईल की, शिवाजीचे सर्व लक्ष आदिलशाही मुलुखावरच केंद्रित झालेले होते.

बेंद्रे शक्यता दर्शवितात की, पोर्तुगीजांनी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये जी बार्सिलूर वगैरे बंदरात स्वारी केली त्यावरून १६६५ च्या जानेवारीत बेदनूरकरांनी आपल्या वकिलामार्फत जो वकील त्यावेळी डचांची मदत मिळविण्यास वेंगुर्ल्यास आला होता. त्याच्या मार्फत बोलणे चालून तहाच्या अटी मान्य करून घेतल्या असाव्या असे दिसते. शिवाजीने आपला बेत गुप्त ठेऊन महाशिवरात्रीच्या यात्रेचा फायदा घेऊन आपण गोकर्णास यात्रेस जात आहोत अशी जानेवारीच्या शेवटी अफवा केली आणि साहजिकच ती सर्वांना खरी वाटली असे बेंद्रे सांगून निष्कर्ष काढतात की, शिवाजी महाराज गोकर्ण ओलांडून खाली उतरेल अशी कोणासच शंका आलेली नव्हती.

बेंद्रे सांगतात, मालवण ते कारवार समुद्रमार्गे सुमारे ११० मैल. गोकर्णाहून कारवार सुमारे २५ मैल आहे. शिवाजी गोकर्णास जाण्यासाठी निघणार ही बातमी समजताच कारवारकरांना वाटले की, तो गोकर्णाहून परत जातांना जर त्याने कारवारवर धाड घातली तर ती ५ फेब्रुवारीपर्यंतच घालील. कारण महाशिवरात्र २ फेब्रुवारीस होती व तो दर्शन वगैरे घेऊन परतला तर २५ मैलाच्या प्रवासाला २-३ दिवस पुरेसे होते; परंतु शिवाजीने जरी महाशिवरात्रीच्या यात्रेची बातमी पसरवली होती तरी ती केवळ फसवणूक होती. हे नंतर कारवारकरांना कळून आले. शिवाजीची चार व्यापारी जहाजे बार्सिलूरच्या उत्तरेस ३०-३४ मैलावर असलेल्या भाटकल या मोठ्या बाजारपेठेच्या बंदरात पूर्वीच गेली होती. शिवाजी गोकर्णास यात्रेऐवजी थेट बार्सिलूरवर छापा घालून सुरक्षित गोकर्णास आला तेव्हा कारवारकरांना ही हालचाल समजली.

बेंद्रे सारांश सांगतांना लिहितात की, या छाप्याचे कारण बखरकारांना समजले नसल्याने त्यांनी तर्काने आपला कल्पित कार्यकारणभाव निर्देशित केला आहे. त्यास अनुसरून आरमाराच्या हालचालीचेही वर्णन विपर्यस्त असेच केले आहे. शिवाजी महाराज कोकणात उतरले तेव्हा त्यांचा उद्देश्य फक्त आदिलशाही पठाणांकडून आपला प्रदेश परत घ्यावयाचा होता. तसे करितांना आदिलशहास मिळालेल्या सावंत आदिंचाही समाचार घेणे आवश्यक होते. बेदनूरकरांवर स्वारी करण्यात अडचणी आल्या असत्या. एक तर जलमार्गावर अवलंबून राहाणे धोक्याचे झाले असते आणि मध्यंतरी मोठा मुलूख शत्रुकडे ठेऊन पलीकडील मुलूख जिंकला तरी तो सांभाळणे कठीण होते. कुडाळाच्या स्वारीमध्ये आधी असाच अनुभव आलेला होता; परंतु गोव्यात खास हलाखीची परिस्थिती निर्माण झाल्याची बातमी होती व बेदनूरकरांनी बार्सिलूरादी बंदरे मुक्त करण्यासाठी मदत मागितल्याने शिवाजीला एक बेदनूरकरांकडून खंडणी मिळणे रास्त होते व स्थानिक लोकांच्या मदतीने पोर्तुगीजांचा पाडाव करून त्यांची व त्यांच्या व्यापाऱ्यांची लुटमार करून पूर्वी द्रव्य साह्यासाठी पाठविलेल्या वकिलाचा केलेल्या अपमानाचा सूड उगविणे व स्थानिक लोकांस मुक्त करणे आवश्यक होते. ही दोन्हीही उद्दिष्टे साधण्यासाठी शिवाजीने आरमारचा यशस्वी उपयोग केला. त्याबरोबर आपल्या एका हिंदू राजाचे राज्य राखण्यात शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्या'च्या उद्दिष्टाला पोषक असाच तो प्रयत्न झाला होता असे बेंद्रे सांगतात.

४.१७ शिवाजी महाराज व मोगल संबंध

राणा जयसिंगाची स्वारी -

(१) जयसिंगाची रवानगी :

आदिलशाहीतील अफजलखानाच्या वधाने व सिद्दी जोहारच्या परत फिरण्याने तसेच शाहिस्तेखानावर साम, दाम, दंड, भेद न्यायाने अचानक हल्ला चढवून त्याला नामोहरण केल्याने व औरंगजेबाने त्याला परत बोलाविले. असे असले तरी शिवाजीच्या बंदोबस्ताची गरज औरंगजेबाला जबरदस्त भासली व त्याने जयसिंगाबरोबर दिलेरखान, दाऊदखान यासारखे मोठमोठे सरदार देऊन त्यास ससैन्य दक्षिणेत इ.स. १६६४ च्या सप्टेंबर पूर्वीच पाठविण्याच्या हालचाली झाल्या होत्या असे 'मासिर-इ-अलमगिरी'[११५] मध्ये आलेल्या उल्लेखावरून समजते. शिवाय सुरतेच्या लुटीतही सुभेदाराने आपल्या लोकांनिशी शिवाजीला तोंड न देता किल्ल्यात

लपून बसून त्याच्यावर गुप्तपणे मारेकरी पाठवण्याचा भेकड प्रयत्न केल्याने मोगली सत्तेची पत बरीच खालावली गेली होती. त्यामुळे औरंगजेबाला श्रेष्ठ दर्जाच्या सेनापतीची विपूल सैन्य सामग्रीसह रवानगी करणे आवश्यक झाले होते. म्हणूनच मोठ्या सैन्यासह जयसिंगाला दक्षिणेत पाठविण्याचा निर्णय औरंगजेबाने घेतला. मात्र हे सैन्य आदिलशाहीविरूद्ध चालले आहे असेच दाखविण्यात आले असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

(२) जयसिंगासोबतची सेना :

जयसिंग शिवाजी महाराजाविरोधात दख्खनवर आक्रमण करण्यास निघाला तेव्हा त्याच्यासोबत व त्याच्या मदतीला एकूण सैन्य किती होते हे सांगताना बेंद्रे विविध साधनांचा संदर्भ देऊन सांगतात. ते सर्वप्रथम सभासद बखरीतील मजकूराचा उल्लेख करतात. सभासद सांगतो की, "...बरोबरी फौजा देतो. नाना हुन्नरे शिवाजी हस्तगत करून बरोबरी घेऊन येणे, म्हणोन हत्ती, घोडे, ढाला, फिरंगा, तर्कशमान, दौलत इजाफा देऊन, नवाजून तैसेच बरोबरी लढाईच्या ताफा देऊन रवाना केले. दिलेरखान पठाण उमराव वजीर मोठा जोरावर त्यास पातशाहांनी फुल फौजेची हरोली देऊन पांच हजार पठाण बरोबर दिले. याखेरीज जेजाला व तोफखाना असे नाना जातीचे दिले. स्वार पठाण उन्माद रजपूत रवाना केले. पादशाहाने दिलेरखानास वेगळे वाटेने अंतस्थ बोलावून आणून सांगितले की, 'मिरजा राजा रजपूत आहे व शिवाजी हा हिंदू आहे. काही फितवा करितील. त्यासी तुम्ही आपले इतबारी पातशाहाचे खनदाजाद आहा. आपला इतबार राखोन दंगा न खाणे.'[११६] शेडगांवकर भोसले यांच्या बखरीत ही सेना 'दोन गांव लांब व एक गांव रूंद' होती असे म्हटले असून दुसरीकडे 'मिरझा राजा हा हजार रोहिले व दिलेरखान पठाण पांच हजार स्वार अशी फौज येती.' असे लिहिले आहे.[११७] चित्रगुप्ताच्या बखरीमध्ये सभासदी बखरीमध्ये दिलेला मजकुरच अधिक विस्ताराने दिलेला आहे व त्यात पंडितरावाबरोबर दादाजी रघुनाथ बरोबर होता असे म्हटले आहे, असे बेंद्रे सांगतात.[११८]

मराठी सम्राज्याची छोटी बखर सांगते, "सेनासमुदाय अफाट होता." शिवप्रताप व शिवदिग्विजयामध्ये सैन्यसमुहाचा उल्लेख नाही. चिटणीस बखरीत फक्त "फौज, तोफखाना वगैरे सामान बहुत पोखर करून दिल्हे." इतकीच माहिती देतात असे बेंद्रे सांगतात. कॉस्मा-द-गार्डा प्रमाणे "जयसिंग अहमदाबादेला आला तेव्हा त्याच्याबरोबर 'चार लाख स्वार' होते. अर्थात हा आकडा अतिशयोक्तिपूर्ण आहे असे वा. सी. बेंद्रे येथे सांगतात.[११९] बर्निअर व अबे करे यांनीही

काही विशेष लिहिले नाही. हे चौघेही प्रवासी तत्कालीन होते; परंतु मनुची जयसिंगाबरोबर या स्वारीतच आला होता असे सांगून बेंद्रेंनी तो काय लिहितो ते पुढीलप्रमाणे दिले आहे - "(शिवाजीविरूद्ध स्वारीवर जाण्याबाबत जयसिंगाचा) त्याचा रूकार ऐकताच औरंगजेबाने आपल्या अंगावरील 'काबा' काढून राजाला पेहरण्यास दिला व आपल्या गळ्यातील मोत्याचा कंठा त्याच्या गळ्यात घातला आणि म्हणाला की, तुझ्या हाताखाली जे सरदार पाहिजे असतील घे, परंतु त्वरित स्वारीवर निघणे अगदी आवश्यक आहे. राजा बाहेर येताच त्याने आपल्या जहागिरीतून ताबडतोब खास स्वारांना व साठ लाख रूपयांचा खजिना घेऊन येण्यास निरोप पाठविला. ही रक्कम त्याला औरंगजेबाने दिलेल्या खजिन्याव्यतिरिक्त जादा पाहिजे होती. राजाने दिलेरखानास की ज्याने औरंगजेबाच्या सर्व महत्त्वाच्या लढ्यांत भाग घेतला होता त्यास आपला दुय्यम सेनापती केले. दाऊदखानही त्याच्याबरोबर गेला. त्याशिवाय आणखीही पुष्कळ राजे व शूर मुसलमान सरदार त्याच्याबरोबर गेले." खाफीखान लिहितो की, "दक्षिणेत शिवाजीविरूद्ध राजा जसवंतसिंग ह्याचा उपयोग होत नाही ही खबर येताच औरंगजेबाने राजा जयसिंग, दिलेरखान आणि दाऊदखान, राजा रायसिंग सिसोदिया, इतिमदखान, राजा सुभानसिंग बुंदेला, तिरूमल, झाबरदस्तखान, बरकंदाझखान व इतर सरदारांस ताबडतोब जाण्याची आज्ञा केली..." पुढे यांना अनेक बक्षीसे देऊन पाठविल्याचे खाफीखानाने सांगितले आहे व राजा जयसिंग ६ मार्च १६६५ पूर्वी औरंगाबादला येऊन मुहंमद मुआझमला भेटला व तेथून पुण्याकडे रवाना झाल्याचे म्हटले आहे. मासिर-इ-अलमगीरी जयसिंगाला ३० सप्टेंबर १६६४ पूर्वीच जयसिंग वगैरेंना शिवाजीवर जाण्याची आज्ञा झाली होती असे सांगितले आहे. 'मासिर-इ-अलमगीर' प्रमाणे जसवंतसिंग १३ मे १६६५ ला दिल्लीस जाऊन औरंगजेबास भेटलेला असून त्याने आपले अधिकार जयसिंग पुण्याला आल्यानंतरच सोडलेले असणार असे बेंद्रे सांगतात.[१२०]

कारवारकरांनी आपल्या २८ जानेवारी १६६५ च्या पत्रात राजा जयसिंग ३० हजार घोडदळासह बऱ्हाणपुरापर्यंत आल्याची बातमी उल्लेखली आहे आणि या सुमारास ती शिवाजीला कदाचित त्याच्या बसनूरच्या परतीच्या प्रवासात समजली असावी. जयसिंह बऱ्हाणपुराहून १० फेब्रुवारीला औरंगाबादला आला. त्याचवेळी ती बातमी इतरत्र फुटली असावी; परंतु जयसिंग १३ फेब्रुवारीलाच औरंगाबादेहून निघोन ३ मार्चला पुण्यात आला. अर्थात यानंतरच जसवंतसिंगाने आपला सुभा जयसिंगाच्या ताब्यात देऊन तो ५ मार्चला पुण्याहून निघोन

दिल्लीला गेला व 'मासिर-इ-अलमगीर' प्रमाणे तो १३ मे रोजी बादशाहास भेटला. बेंद्रे पुढे सांगतात की, वरील कालक्रम हा जरी कागदपत्रावरून स्पष्ट असला तरी जयसिंगाने सुभ्याचे निकाल वगैरे करण्याचे कार्य तो दख्खनमध्ये येण्यापूर्वीच सुरू केले होते. असे एक २३ नोव्हेंबर १६६४ च्या त्याच्या फर्मानावरून दिसून येते.

सारांश, शिवाजी महाराजांनी या नवीन संकटाला तोंड देण्याची तयारी जानेवारीनंतरच केली असली पाहिजे. जयसिंगाबरोबर असलेल्या सरदारांचा विचार केल्यास त्यांच्याबरोबर ३०-४० हजार सैन्य सहजच असले पाहिजे. त्याशिवाय दख्खनच्या सुभ्याचे सैन्य त्याच्या मदतीला होतेच असे बेंद्रे स्पष्ट करतात.

(३) जयसिंगाच्या स्वारीचे (मोहिमेचे) बेंद्रेंनी केलेले विभाजन :

जयसिंगाच्या शिवाजी विरूद्धच्या मोहिमेची चिकित्सा करतेवेळी वा. सी. बेंद्रे या मोहिमेची विभागणी तीन प्रसंगात करतात. पहिल्या प्रसंगात जयसिंग-शिवाजी यांचा संबंध, दुसऱ्या प्रसंगात शिवाजीची जयसिंग-आदिशाहा यांच्या लढाईतील भूमिका व कार्य आणि तिसऱ्या प्रसंगात शिवाजीचे आगऱ्याकडे आगमन व तेथून सुटका होय.

अ] जयसिंग - शिवाजी संबंध

(१) जयसिंगाची पुरंदरगडावरील चढाई :

जयसिंगाने सिंहगडचा वेढा इ.स. १६६४ चा पावसाळा लागताच उठविला होता. जयसिंगाकडे भरपूर सैन्य असल्याने कोंढाणा व पुरंदर गड असे दोन गड एकाचवेळी लढवावयाचे व त्याचबरोबर इतरही सभोवतालील प्रांतात धुमाकूळ घालावयाचा ठरविले. जेणेकरून शिवाजी महाराजांना एकाचवेळी सर्वत्र तोंड देणे जड जाऊन शरणागती स्वीकारावी लागेल असे जयसिंगाने ठरविले होते. याच उद्देशाने मोगली सैन्याच्या हालचाली प्रथमपासून चालू होत्या. त्यामध्ये पुरंदरचा वेढाही ही एक महत्त्वाची बाब होती.

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीतही[१२१] सभासदीतील अर्थाचा मजकूर आहे. मुरारबाजी पडल्यानंतर 'खानाने लगट करून रूद्रमाळेवर तोफा चढविल्या. मारगिरी करू लागला अशी अधिक माहिती आहे.' तर शेडगांवकर बखरीमध्ये अक्षरशः सभासद बखरीतीलच मजकूर घेतला आहे. फक्त काय तो दिलेरखानाच्या सैन्याची गणती देतांना थोडा फरक केलेला आहे तो : "खासा पांच हजार पठाणानिशी पायउतारा जाहला. सात आठ हजार रोहिले व बघेले व

तोफा आणि (?) पायउतारु जाहला व पेंढारी व आडाणी खलक वीस हजार लहानथोर पायउतारा होऊन गडासी लगट करीत चालिले."[१२२]

या लढ्याबाबतची माहिती मिरझा राजा जयसिंग याच्या पत्रातूनही समजते. जयसिंग औरंगजेबास मार्च १६६५ मध्ये लिहितो, "प्रथम तळकोकणच्या मार्गाने आपल्या तळाकडे जावे असा माझा बेत होता. परंतु या प्रांतात आल्यावर विजापुरकरांचे व शिवाजीचे आतून सख्य आहे असे समजले. तळकोकणच्या रस्त्याने गेले तर विजापुरकरांचा मुलूख लांब राहून, विजापुरकर आणि शिवाजी एकत्र मिळण्याचा संभव होता. तसे झाले तर सर्व सावधगिरी निरुपयोगी झाली असती. यामुळे सैन्य सासवडलाच ठेवण्याचे ठरवले. शिवाजीचा पुरंदरगड आणि इतर मुलूख याला हें ठिकाण जवळ असून शिवाय विजापूरकरांच्या मुलखालाही दूर नाही." जयसिंगच्या जूनच्या पत्रांत थोडीबहूत माहिती संदर्भाने आलेली आहे. "...पादशाही फौज पाबळजवळ होती तेव्हा शिवाजीचे वकील येऊन भेटूं लागले व नंतर पुण्यास मुक्काम आल्यानंतरही भेटले... शेवटी आपल्या सैन्याने रूद्रमाळगड घेतला. तेव्हा मी सैन्याचे विभाग पाडून एक दाऊदखान व राजा रायसिंग यांचेबरोबर शिवाजीचा प्रदेश लुटण्यास पाठविला. दुसरा भाग सैन्याच्या मुख्य तळाच्या संरक्षणार्थ व गस्तीसाठी ठेवला व तिसरा खंदकांत काम करणाऱ्या सैनिकांस सर्व तऱ्हेची मदत व विश्रांती मिळावी व त्यांचे काम रात्रंदिवस सतत चालू राहावे अशी व्यवस्था ठेवण्यास वेगळा केला. मी स्वतः सर्वत्र जातीने लक्षे ठेविले होते."

यापुढे वेढा कसा मजबूत होता हे सांगून मराठा सैन्य व शिवाजी वेढा तोडण्यास कसे अपयशी राहिले हेच सांगण्याचा प्रयत्न या पत्रात केलेला आहे. यात अतिशयोक्ती आहे असे बेंद्रे सांगून याच दाऊदखानाच्या पाहऱ्यातून शिवाजी महाराजाची सैन्याची एक तुकडी गडावर बिनविरोध गेली होती असे सांगतात.

यापुढे या पत्रात जयसिंग लिहितो, "मी खेळोजी भोसलेकडून पाचशे पावलोक जावळीहून बोलाविले व रोज शिवाजीचे सैन्य कसे फोडावे यांचेच माझे प्रयत्न चालले आहेत." बेंद्रे म्हणतात "शिवाजी १० मे ला जावळीवर गेला होता तो याच फौजेच्या अडवणुकीसाठी."[१२३]

बेंद्रे लिहितात की, या जयसिंगाच्या पत्राशिवाय या काळातील हालचालीची तत्कालीन कागदपत्रांवरून जी माहिती मिळते त्यावरून "महाराजा जयसिंग ३ मार्चला पुण्यास आला. जसवंतसिंगाने त्याचे स्वागत केले आणि जसवंतसिंग दरबारी जाण्यासाठी ५ मार्चला पुण्याहून

निघाला." दिलेरखानाने, "३१ मार्चला पुरंदरच्या वेढ्यास सुरूवात केली. (शिवापूरकर शकावलीत हीच तारीख दिल्याचे बेंद्रे सांगतात) जयसिंग १ एप्रिलला पुरंदरी येऊन डेरा दिला. ११ एप्रिलच्या सुमारास वेढ्याची आघाडी पायथ्याशी नेली व तेथे एक मोठी तोफ डागली. मोगली सैन्य पुण्याहून सासवडवरून पुरंदरच्या थेट पायथ्याशी जाऊन भिडले. एक सुरुंग खणला. रूद्रमाळ १४ एप्रिलला (शिवापूर शकावली हीच तारीख देते असे बेंद्रे दर्शवितात) मोगली सैन्याने घेतला आणि पुरंदरच्या एका बुरूजासही खिंडार पाडली; पण ते फार लहान आहे. २५ मे पूर्वीच पुरंदरचा पुढील तट व बुरूज तोफांनी उडवून दिला. गडातील लोक हिरिरीने प्रतिकार करीत आहेत. चार-पाच दिवसांत गड पडेल असा मोगली अंदाज होता. शिवाजीचा वकील रघुनाथ पंडित (रघुनाथ कोरडे नव्हे - बेंद्रे) (२० मे) येऊन बसल्याची बातमी होती."[१२४]

वा. सी. बेंद्रे यांनी यानंतर जयसिंगाच्या जून १६६५ च्या पत्रातील माहिती दिली आहे. ज्यामध्ये शिवाजी भेटीस आला व त्याने पुरंदरगड देऊ केला; पण जयसिंगाने इतर गडांचीही मागणी केली असे सांगून पुरंदरगड कसा ताब्यात घेतला त्याचे वर्णन आले आहे. जयसिंगाने या पत्रात औरंगजेबाला सांगण्याची भूमिका जरी तपशिलवार दिली असली तरी त्या लढाईची हकीकत एकांगी आहे असे बेंद्रे सांगतात.

बेंद्रे पुढे लिहितात की, जयसिंगाने आदिलशाही सरदार, कुतुबाशाहा, पोर्तुगीज व डच तसेच रामनगर, पेंट व चोचीया हे राजे यांची शिवाजी विरूद्ध उठण्याची अभिवचनें पुण्यास येण्यापूर्वीच मिळविली होती. तसेच जदुनाथ सरकारने उल्लेख केलेल्या पत्रातील माहिती पुढीलप्रमाणे, "शिवाप्पा नायक व बसवापट्टणचा नायक हे एप्रिल १६६५ मध्ये जयसिंगाच्या भुलावणीवरून मोगलांच्या नोकरीत शिरण्यासाठी आले होते.... निकोलाय मनुचीला युरोपियन तोफखान्याचा मुख्य केला होता... पुरंदरचे आत्माजी व कहार कोळी हे दोघे बंधु त्यांच्या तीन हजार स्वारासह जयसिंगाने फोडून आपले नोकरीत घेतले होते... सुप्याचे राम व हनुमंत यांना या प्रदेशाची चांगली माहिती होती म्हणून त्यांनाही नोकरीत घेतले होते... नंतर २३ मार्चला जयसिंगाचा मुक्काम हालला व लोणीस (काळभोर) गेला. येथे राम व हनुमंत यांना तीनशे स्वार व तीनशे बंदुकवाले पावलोक देऊन पुणा-पुरंदर मार्ग सुरक्षित राखण्यास ठेवले."

"३० मार्च रोजी दिलेरखान आघाडीची जागा मुकरर करण्यास गेला. माचीवरील बंदुखीनी हल्ला केला. ते लोक पळून गेले. दिलेरखानाने माची घेतली... जयसिंगाने दिलेरखानाचे

मदतीस राजा रायसिंग, किरातसिंग, कुबतखान, मित्रसेन, इंद्रामण बुंदेला व इतर सरदार आणि दाऊदखान यांस तात्काळ पाठविले... १३ एप्रिलला दिलेरखानाने बुरूजावरून हल्ला चढविला... १४ एप्रिलला मोगली सेनेने पुन्हा लढाई केली व गड घेतला..." "यानंतर जयसिंगाने आपल्या सैन्याचे विभाग पाडून शिवाजीच्या आसपासच्या मुलुखात पाठविले..." व सर्वत्र लुटालूट करण्यास सुरूवात केली त्याचा वृत्तांत येतो.[१२५]

बेंद्रे म्हणतात, हा सर्व मजकूर जो जदुनाथ सरकारने आपल्या 'शिवाजी'त वापरला तो जयसिंगाच्या बातमीपत्रातील आहे की, नाही याची शंका वाटते. कारण हा मजकूर देतांना इतर साधनांचाही निर्वाळा दिला आहे. एक गोष्ट निश्चितपणे दिसून येते की, मोगली सेनेला पुरंदरावरून जोराचा प्रतिकार होत असतांना हा लढा थांबविला गेला. पावसाळा सुरू होण्याचा सुमार होता. त्यामुळे कदाचित २ जून नंतर ११ जूनच्या सायंकाळपर्यंत हा लढा थांबविला गेला असावा व १२ जूनला जयसिंग लिहितो त्याप्रमाणे, लढ्याचे नाटक शिवाजीला दाखवावयाचे म्हणून हल्ला केला व मुरारबाजीने बरेच पठाण मारले. यावरून पाऊस सुरू झाला असला पाहिजे. जयसिंगाच्या मनाविरूद्ध वागून गड जिंकण्याच्या हाव्यासापोटी वागणाऱ्या दिलेरखानाने लढा थांबविण्यास तात्काळ संमती दिली. त्याचा अर्थ असा की, पावसामुळे हा लढा थांबविणे प्राप्तच झाले होते. जयसिंगाला पावसाळ्यात डोंगरावर जास्ती दिवस धीर काढणे शक्य नव्हते. असे असतांनासुद्धा शिवाजीने माघार घेतली. या भूमिकेमागील वस्तुस्थिती जाणणे आवश्यक आहे. यावेळी शिवाजी दक्षिणेतील मोहिमेत गुंतला होता असे स्पष्ट होते. ही मोहिम औरंगजेबाच्या सांगण्यावरूनच आदिलशाहाने हाती घेतली होती.[१२६]

(२) जयसिंग-शिवाजी महाराज भेट व तह :

सभासद बखर, मराठी साम्राज्याची बखर यामध्ये शिवाजी महाराज आपले नुकसान टाळण्यासाठी मिर्जा राजा जयसिंगाला भेटायला गेला आणि पुरंदरचा गड देऊन तह केल्याचे सांगतात. चिटणीस बखरीत पान्हाळागडाचा उल्लेख आला आहे. विशेष तपशील नाही, शिवाय विपर्यास झाला आहे. तो वेगळा असे वा. सी. बेंद्रे सांगून ९१ कलमी बखरीतही याबाबत विशेष मजकूर नसल्याचे सांगतात तर जेधे शकावलीत नोंद येते की, "आषाढ शुद्ध दशमी (१२ जून १६६५) राजश्री येऊन जयसिंगास भेठोन सला केला."

कास्मा-द-गार्डा लिहितो की, शिवाजी जयसिंगच्या छावणीत भेटायला आला. पण शिवाजी राजगडावरून आला असे न सांगता पुरंदरावरून आल्याचे चुकीचे सांगितले असल्याचे बेंद्रे सांगतात. शिवाजीने शरणागती स्वीकारली व दोघात तह झाला असे म्हटले आहे.

ॲबे करे लिहितो की, "गडावरून होणारा प्रतिकार एवढा जोराचा होता की, मोगली सेनापतीला गड जिंकण्याबाबत निराशा वाटू लागली. त्यामुळे त्यापुढे वेढा चालवित बसण्यापेक्षा शिवाजीजवळ तहाची बोलणी करणे त्यांनी पसंत केले. त्यांनी आपल्या धन्याच्या तर्फेने जर तो चाकरी घेऊं पाहील तर मोठा सन्मान सरंजाम व हुद्दा देण्याचे कबूल केले. शिवाजीने त्यास मान्यता दिली व त्याला मोगली सैन्याचा (दखखनचा) मुख्य करून आपले शौर्य व कर्तबगारी दाखविण्यास संधी देण्याचा करार केला.[१२७] मनुची सांगतो की, जयसिंगाच्या सांगण्यावरून शिवाजी तहास तयार झाला व त्यांच्यात तह होऊन पुरंदर जयसिंगास दिला गेला.

वरील तत्कालीन प्रवाशांची माहिती बरीच वस्तुस्थितीला धरून दिसते. पावसाळा जवळ आल्याने पुरंदरचा वेढा चालविणे अशक्य होणार होते व प्रत्येक एका किल्ल्याला दोन-दोन तीन-तीन महिन्यांचा अवधी लागणार असेल तर ती स्वारी यशस्वी होणे अशक्य होते. उलट शिवाजीचे त्यावेळेचे राज्य म्हणजे डोंगरी किल्लेच होते. अशा परिस्थितीत औरंगजेबाकडून ठपका येण्यापूर्वी साम-दाम-दंड-भेदाने राजकारण तडीस नेणे जयसिंगास आवश्यक वाटले असल्यास नवल नाही असे बेंद्रे सांगतात.

बेंद्रे पुढे लिहितात की, राजा जयसिंग आपल्या जूनच्या पत्रात औरंगजेबास लिहितो की, "जयसिंग पाबळजवळ आला असतां शिवाजीकडून त्याच्या वकिलाबरोबर दोनदा पत्रे आली." बेंद्रे त्या पत्रांतील माहिती देतात व सांगतात की, "हे पत्र पुण्यास आल्यानंतरचे असावे. पहिल्या दोन्ही पत्रांत, तत्कालीन बातमीप्रमाणे मोगली सेना आदिलशाहाविरूद्ध येत आहे यास अनुसरून, बहुधा शिवाजीने आदिलशाहाविरूद्ध काही मुलखाच्या प्राप्तीचा मोबदला, मदत करण्याची तयारी दाखविली असेल; परंतु जेव्हा ही स्वारी आपल्यावरच आहे अशी बातमी येताच आणि विशेषत: आदिलशाहा, कुत्बशाहा, पोर्तुगीज, डच, रामनगर, पेंट, चोथिया यांचे राजे यांस जयसिंगाने औरंगाबादला येता क्षणीच फोडण्याचे प्रयत्न केले होते व सर्वांची प्रचंड शक्ती पाहून मान झुकविली असे समजताच, हे पत्र व दुसरे पत्र कर्माजीबरोबर पाठविले असावे. अशा परिस्थितीत शिवाजीने जयसिंगालाच फोडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो; परंतु तो तितका यशस्वी झाला

नाही. त्यामुळे शिवाजीला नामोहरम होऊन राहण्यापेक्षा मैत्रीचा डाव टाकून जयसिंगाला दक्षिणी सलतनेत जिंकून देण्याचे आमिष दाखवून पाहिले. नंतर जयसिंगाचा आग्रह पाहून दख्खनची सुभेदारी दिल्यास मोगली प्रदेशही सोडण्याचे कबूल केले; परंतु जसजसी जयसिंगाच्या आक्रमणाची तीव्रता कमी होत गेली तसतसी शिवाजीनेही आपल्या अटीत पड घेण्यास सुरूवात केली.

वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात शिवाजी महाराजांनी दिलेरखानाशी मुळीच बोलणे केले नाही व जयसिंग मुख्य असल्याने त्याला तसे करण्याची गरजही नव्हती. उलट शिवाजीला मुसलमानासमोर मान झुकवावयाची नव्हती. अशा परिस्थितीत 'रियासती'त दिलेरखानाच्या नावाची पत्रे दिली आहेत. ती एक तर बनावट असावी किंवा त्यावर अज्ञानाने जयसिंगाच्या ऐवजी दिलेरखानांस लिहिले असावे. खास जयसिंगाच्या पत्रावरून या दोन्ही पत्रांचे मजकूर जयसिंगास आलेल्या व त्यांनी पाठविलेल्या पत्रांतील मजकुराला अगदी जुळते आहेत.[१२८]

जयसिंगाच्या खास पत्राच्याच मजकुरावरून शिवाजीला पूर्ण नामोहरण करून टाकण्याचा औरंगजेबाचा डाव फसला असे दिसते. जरी मोगली मुलूख सोडविला गेला तरी त्याचे राज्य कायम राहिले. शिवाजीला आपले स्वातंत्र्य व राज्यत्व न गमाविता तह करून मोठी आपत्ती टाळता आली. मोगलांनी केलेल्या सर्व राजांच्या व सुलतानांच्या एकजुटीला जबरदस्त धक्का बसला व जे सरदार पाळेगार शिवाजीविरूद्ध मोगली चाकरीत शिरले होते त्यांची स्थिती केविलवाणी होऊन बसली. एकुलत्या एक अल्पवयीन मुलाला म्हणजे संभाजीला धोक्यात घालण्याची पाळी आली. हे खरे परंतु जयसिंगाची स्वामिनिष्ठा सोडली तर त्याच्याकडून खास शिवाजीला मिळालेली वागणूक पहाता या धोक्याची तीव्रता फारशी काळजी करण्यासारखी नव्हती असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[१२९]

तहाच्या अटी :

यावेळी ज्या अटी ठरल्या त्यात मोगली २३ गडच परत करण्याचे ठरले. औरंगजेबास तहाच्या अटी तपशीलवार न कळविता जयसिंगाजवळ जे करार झाले ते बादशहास मान्य आहेत. म्हणून फर्मान देण्यास सांगितले असे बेंद्रे म्हणतात. त्या अटी खालीलप्रमाणे होत -

१. बारा किल्ले आणि पाच लाख रूपयाचा मुलूख घेऊन शिवाजीने संतुष्ट राहावे. बादशाहाची अवज्ञा अगर त्याच्या मुलुखांत लूट करू नये.

२. दख्खनच्या सुभ्यांत जरूर पडेल तेव्हा कामगिरीवर हजर राहावे.

३. पांच हजारी मनसब संभाजीस दिली आहे तरी त्याने नेताजी पालकरासह दख्खनच्या सुभेदाराबरोबर असावे.

४. तळकोकण व आदिलशहा यापुढे घेतला जाणारा नऊ लाखापर्यंतचा प्रदेश बादशाहाने फर्मान दिला तर तो घ्यावा व त्याबद्दल वार्षिक तीन लाखाच्या हप्त्याने चाळीस लाख खंडणी द्यावी.

५. पूर्वीचे निजामशाहीतले मोगली २३ किल्ले व त्याखालील चार लाखांचा मुलूख बादशाहास परत द्यावा.

या अटींचा विचार केला तर शिवाजी महाराज जातीने मोगलांच्या नोकरीत शिरले नव्हते असे स्पष्ट आहे असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे सांगतात की, नुसताच ओलीस द्यावयाचा त्याऐवजी मुलाला ५ हजारी घेऊन निजामशाहीतील दिलेल्या मुलुखाची भरपाई करून घेतली. खंडणीचे कलम नंतरच्या पाच लाखाच्या बोलघाटांतील मुलूख पदरात फर्मानाने पडल्यावर अंमलात यावयाचे होते. यात शिवाजीने किंवा संभाजीने उत्तर हिंदुस्थानात जाऊन मोगलाजवळ हजर होण्याची अट नव्हती व तशी असावयास पाहिजे होती. असे जरी धूर्त औरंगजेबास वाटले होते तरी जयसिंगाने लिहिल्यावरून त्यानेही तशा प्रकारचा हट्ट धरला नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

१२ जून १६६५ ला शिवाजीराजे यांनी राजे जयसिंगास भेटून तह केला. शिवाजीराजांनी आपण स्वतः यवनाचा नोकर होण्याचे टाळण्यासाठी संभाजीराजांच्या नावाचे पंचहजारी मनसब घेण्याचे कबूल केले. यावेळी संभाजीराजे अवघे आठ वर्षाचे होते. 'औरंगजेबनाम्यात' या प्रसंगाची नोंद केली आहे की, "औरंगजेब बादशाहाने राजा जयसिंगाच्या विनंतीवरून शिवाजीराजास माफीचे फर्मान पाठविले. त्यात बादशाहाने संभाजीस पाच हजार मनसब (पाच हजार स्वार, दोन-दोन तीन-तीन घोड्यांसह) बहाल केली." हा मनसब '१२ जून १६६५ ला शिवाजीराजांनी राजा जयसिंगाशी सल्ला केला' त्यावेळी ठरला. ३० सप्टेंबरला शिवाजीराजांस वस्त्रे मिळाली आणि संभाजीराजे बादशाही मनसबदार झाले. पुढे मोगलाची आदिलशाही मुलुखावर स्वारी झाली असे विवेचन वा. सी. बेंद्रे करतात.

आ] शिवाजीची जयसिंग-आदिलशाहा यांच्या लढाईतील भूमिका

शिवाजी आणि औरंगजेब यांच्यामध्ये झालेल्या नवीन तहाप्रमाणे शिवाजीने मोगलांना दख्खनमधील लढ्यांत मदत करण्याचे कलम होते. शिवाजीबरोबरील लढा संपुष्टांत येताच औरंगजेबाने राजा जयसिंगास आदिलशाहावर स्वारी करण्यास फर्माविले होते. जयसिंगाच्या लिहिण्याप्रमाणे शिवाजीनेही जयसिंगास संभाजीच्या सरंजामी पांच हजार स्वारांशिवाय अधिक मोठ्या फौजेनिशी मिळण्याचे आश्वासन दिले होते.

(१) बखरीतील माहिती संदर्भात वा. सी. बेंद्रेंची चिकित्सा :

या जयसिंग आदिलशाही प्रकरणांत शिवाजीने कितपत भाग घेतला होता. याचा शोध घेणे जरूर आहे. याबाबत बखरकार जवळजवळ काहींच माहिती देत नाहीत. असे म्हटले तरी चालेल असे वा. सी. बेंद्रे म्हणतात व पुढे सभासद बखरीतील मजकूर देतात, 'याउपर मिरजा राजियाबरोबर आपली फौज घेऊन राजे विजापुराकडे चालले. मार्ग चालतां मिरजाराजा व शिवाजीराजे एका हौदात बसले आणि चालिले. कुल वजीर येऊन सलाम करीत. दिलेरखान जोहार न करी निमित्य की, राजे व ते एक जागा आणि आपण जोहार कसा करावा? ये गोष्टीस सलाम न करी. पुढे विजापुरासही सला केला. उपरी उभयतांनी दिल्लीस जावे...' पुढे सांगतात की, '९१ कलमी बखरीत व त्याचप्रमाणे शिवप्रतापात काहीही मजकूर नाही. शिवदिग्विजयातही विजापूर स्वारीबाबत उल्लेख नाही.'

चिटणीस बखरीत पुढीलप्रमाणे थोडीच माहिती येते असे बेंद्रे सांगतात. चिटणीस लिहितो, 'जैसिंग राजे व दिलेरखान औरंगबादेस जावयाचा विचार ठरवून जातां विजापुर प्रांती खंडणी घ्यावयाची. महाराजबरोबर फौजसुद्धां यावी म्हणोन बोलोन, कूच करून निघाले. जैसिंग व महाराज एके अंबारीत बसावे, बहुत निखालसता, हे पाहून आपली अंबारी मागे चालविणे वगैरे (दिलेरखानास) असह्य वाटू लागले. तेव्हा पेडगावी आपले राहण्यास ठाणे बांधावयाचे म्हणून काम लावून तेथेच खान राहिले. महाराज व जयसिंग पुढे गेले. खंडणी जाली. नंतर महाराज निरोप घेऊन दिल्लीस जाब येताच जाणे पडेल, किल्ले-कोट वगैरेंचा बंदोबस्त जाला पाहिजे, म्हणून निरोप घेऊन निघाले. जैसिंग औरंगाबादेस आले.' बखरकार एव्हढीच माहिती देतात. कारण त्यांचा गृहच असा झालेला होता की, तहाच्या अटीत दिल्लीस जाण्याचे कलम होते. त्यामुळे तहानंतर इतर अशा हालचालींना वेग मिळाला नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१३०]

(२) शकावलीतील माहितीसंदर्भात बेंद्रेची चिकित्सा :

जेधे शकावलीत मात्र या हालचाली स्पष्ट असल्याचे वा. सी. बेंद्रे सांगून ती नोंद पुढीलप्रमाणे देतात,"येदिलशाहाचा व मोगलाचा सला जाला तुटोन जयेसिंग व राजश्री सिवाजी राजे व दिलेलखान विजापुरावरी मार्गशीर्ष मासी (२७ नोव्हें. ते २६ डिसें. १६६५) चालून गेले. तेथे इदलशाही फौज सर्ज्याखान वगैरे येऊन लढाई दिल्ही. मग अंत:स्ते द्रव्य देऊन विज्यापूरकरांनी निरोप घेऊन राजगडास आले."

(३) इस्लामी साधनातील माहिती संदर्भात बेंद्रेंची चिकित्सा :

बेंद्रे 'मासिर-इ-अलमगीरी' व 'बुसातिन-इ-सलातीन' मधील मजकूर देतात आणि सांगतात की, बुसातिन-इ-सलातीनमधील या लढाईविषयाचा लांबलचक मजकूर देण्यात आला आहे.[१३१] त्यामध्ये एकतर्फी आदिलशाहीची प्रशंसा करण्यात आलेली आहे.

मासिर-इ-अलमगीरीत असा उल्लेख येतो की, शिवाजीची उचलबांगडी होईपर्यंत जो लढा लढविला गेला होता तोच खरा लढा होता. नंतरचा लढा अपकीर्तीकारक म्हणून जयसिंगास परत औरंगाबादेस जाण्याचा हुकूम झाला. जयसिंगाला आपल्या याही राजकारणांत चांगलीच मानहानी सोसावी लागली असे दिसते असे बेंद्रे सांगतात. खाफीखानाच्या वर्णनाविषयी सांगतात की, खाफीखानाची माहिती मोगलांच्या बाजूने रंगविली गेली आहे. त्यामुळे त्याच्या वर्णनात मोगलांच्या पराजयाची हकीकत आलेली नाही. त्याप्रमाणे ही हकीकत फार विस्तृत दिलेली असली तरी ती मोगलांची बाजू सांगणारी आहे.[१३२]

(४) प्रवासवर्णनातील माहिती संदर्भात बेंद्रेंची चिकित्सा :

वा. सी. बेंद्रे यांनी कास्मा द गार्डा, अबे करे, बर्निअर या वृत्तांताची माहिती दिली ज्यामध्ये जयसिंगाला आदिलशाहीवरील लढाईत शिवाजी महाराजाची खूप मदत झाल्याचे सांगण्यात आले आहे. यानंतर बेंद्रे मनुचीने दिलेली माहिती देतात ज्यामध्ये जयसिंग आपल्या विजयाबद्दल अतिशय निश्चित असल्याचे सांगितलेले आहे व सर्जाखानाचा दिलेरखानासोबत जो पत्रव्यवहार केला होता व विजापूरवरील आक्रमण थांबविण्याची जी विनंती केली होती त्या संदर्भातील माहिती येते, पण नंतर सर्जाखानाने मोगली सैन्याला खूप परेशान केल्याने मोगलांची पिछेहाट झाल्याचे सांगितले आहे.[१३३]

(५) पत्रव्यहारातील माहितीची बेंद्रेनी केलेली चिकित्सा :

वा. सी. बेंद्रे या प्रवाशांच्या हकीकतीनंतर तत्कालीन पत्रव्यवहारावरून शिवाजी महाराजांचा संबंध विजापूरच्या स्वारींत केव्हा केव्हा व कोणत्या प्रकरणात आला याचा शोध घेतांना दिसतात. सर्वप्रथम बेंद्रे राजवाड्यांनी आपल्या आठव्या खंडात लेखांक १५ वर औरंगजेबाचे २५ डिसेंबर १६६५ चे शिवाजीच्या नावे निघालेले फर्मान दिले आहे. त्या संदर्भात सांगतात की, या प्रतीवर ७ रबिलोवल मुाा स. १०७७ हिजरी असे दिले आहे. ही २८ ऑगस्ट १६६६ ची तारीख पत्रांतील मजकुराला धरून होत नाही. हप्त अंजुमानची २७ जमादासानी जुलूस ८ (२५ डिसें. १६६५) ही तारीख बरोबर आहे आणि या पत्रात शिवाजीने जयसिंगासोबत युद्धामध्ये ताथवडा, फळटण, विजापुरी किल्ले घेऊन जी मोगली सैन्यास मदत केली होती. त्यावर खूश होऊन औरंगजेबाने शिवाजीस जो पोशाख व जडावाची कट्यार पाठविल्याचा उल्लेख आलेला आहे. हाच उल्लेख जयसिंगाच्या ११ (?) जानेवारी १६६६ च्या पत्रात आल्याचे वा. सी. बेंद्रे सांगतात. यानंतर बेंद्रे जयसिंगाचे फेब्रुवारी १६६६ चे पत्र देतात. ज्यामध्ये आदिलशाहा व कुतुबशाहा एकत्र आल्याने शिवाजीचे मन आपल्याकडे वळविणे आवश्यक असल्याचे जयसिंग लिहितो. यानंतर बल्लुदासाने कल्याणदासाला लिहिलेल्या पत्रातील मजकूर देतात. ज्यामध्ये दिलेरखान सर्जाखानात झालेल्या युद्धाचा तपशील देण्यात आलेला आहे.

यानंतर वा. सी. बेंद्रे युरोपीयन पत्रव्यवहारातील माहिती देतात त्यात सर्वप्रथम ते इंग्रजाच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन कारवारला २९ ऑगस्ट १६६५ ला जी आदिलशाहीशी जयसिंगाने ९ लाख पगोडे खंडणी घेऊन तह केल्याचे सांगण्यात आले आहे. बेंद्रेंनी कारवारकरांच्या २७ नोव्हेंबर १६६५, १ जानेवारी १६६६, १५ जानेवारी १६६६, २४ एप्रिल १६६६ व सुरतेवरून कारवारकरांना आलेले १७ फेब्रुवारी १६६६ च्या पत्रांचा संदर्भ देऊन त्यातील माहिती तपशीलवार देतात.[१३४] त्यातून शिवाजीला पकडल्यापासून ते आदिलशाहीवरील आक्रमणा संदर्भातील घडामोडींची माहिती येते. या संघर्षाकडे कारवारकर व सुरतचे इंग्रज कशा दृष्टीने पाहात होते याची कल्पना येते.

(६) आदिलशाहीवरील स्वारीसंदर्भातील घडामोडींचा बेंद्रेंनी दिलेला कालक्रम :

वरील सर्व साधनांचा विचार व चिकित्सा केल्यानंतर वा. सी. बेंद्रे आदिलशाहीवरी या स्वारीच्या घडामोडींचा कालक्रम पुढीलप्रमाणे देतात. बेंद्रे म्हणतात, औरंगजेबाने जयसिंगाकडून

करारांतील अटींची खात्री केल्यानंतर शिवाजीला ५ सप्टेंबर १६६५ रोजी फर्मान काढले. त्यात शिवाजी-संभाजी बादशाहास भेट द्यावयाची अशी अट नव्हती. हे फर्मान २७ सप्टेंबरला पुरंदरला आले व ३० सप्टेंबरला शिवाजीने जाऊन घेतले. नंतर जयसिंगाने या फर्मानाबाबत अधिक खुलासा केला; परंतु त्यातही औरंगजेबाच्या भेटीचा उल्लेख नव्हता.

२० नोव्हेंबरला जयसिंग आदिलशाहीवरील स्वारीस निघाला. बरोबर शिवाजी महाराज व त्यांचे निवडक सैन्य होते. शिवाजी व नेताजी यांच्या सैन्याने ७ ऑक्टोबरला फलटझ व ८ ला ताथवटे असे दोन गड घेऊन दिले. तेव्हा जयसिंगाने त्यांच्या कार्याबद्दल औरंगजेबास कळविले. औरंगजेबाने आपल्या २६ डिसेंबरच्या फर्मानाने हे दोन 'किल्ले घेऊन त्यांची फौज तळकोंकण प्रांती होती तेथे रात्री पोहोचविली.' म्हणोन जयसिंग याणें लिहिल्यावरून तुमचे शाबासकीस कारण जालें. सबब तुम्हाकरितां उत्तम पोषाख व जडावांची कट्यार पाठविली आहे. या लोभाचा संतोष मानून इतःपर या स्वारींत जितकी कोशीस कराल तितके पहिल्यापेक्षां अधिक लोभास कारण होईल असे कळविलें.

२४ डिसेंबरला विजापुरी सैन्याचा पहिला मुकाबला झाला; परंतु हा हल्ला वाटमारी चालीच्या पद्धतीचा होता. २५ डिसेंबरला शिवाजी व दिलेरखान आघाडीवर गेले. विजापुरपासून १० मैलाच्या टप्प्यावर पाहोंचले; परंतु येथे आदिलशाही फौजेने भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन त्यास घेरले. या लढ्यात मोगली सेनेला माघार घ्यावी लागली. २७ डिसेंबरला मोगली सेना पुढे चालून गेली. २३ डिसेंबरला विजापुरच्या अलिकडील १० मैलावर असलेल्या मखणापूरीस येऊन तळ दिला. ५ जानेवारीपर्यंत ती सेना सभोवताली होणाऱ्या हल्ल्यांना तोंड देत होती; परंतु दाणागोटा व पाणी यांच्या अभावी ही सेना उठली व माघारी जाऊं लागली. ११ जानेवारीपूर्वी बहुधा ५ तारखेपूर्वी शिवाजी आपल्या सैन्यासह पन्हाळा गडावर चालून गेला. २७ जानेवारीला मोगली सेना परेंडाजवळ १६ मैलावरी तळ देऊन राहिली. जयसिंगाने ११ जानेवारीला लिहिले की, "शिवाजी विजापुरला वेढा देण्यासाठी मदत करावयास तयार होता; परंतु... मलाच ते शक्य वाटले नाही. (तेव्हा) शिवाजी म्हणाला, पन्हाळ्याची मला वित्तंबातमी असल्यामुळे तिकडे मला पाठविल्यास शिबंदी गैरसावध असतांना मी तो किल्ला मोगलांना मिळवून देईन आणि त्या प्रांतात नंतर इतका धुमाकूळ घालीन की, माझे बंदोबस्ताकरितां त्यांना मोठे सैन्य पाठवावे लागेल. शिवाजी गेल्यानंतर जी मोगली सैन्याने माघार घेतली होती ती माघार

२० जानेवारीला भीमा उतरून २७ जानेवारीला परेंडापर्यंत गेली होती. या सुमारास पन्हाळा, रांगणा व फोंडा या बाजूस बऱ्याच हालचाली चालू होत्या. सुरूवातीलच्या पन्हाळ्याच्या वेढ्यात शिवाजीला नेताजी फुटून आदिलशाही नोकरीत गेल्याने यश आले नाही व आदिलशाहाने नेताजीस चांगल्या प्रकारे वागविले. त्याने मोगलाचा मुलूख घेतला तेव्हा जयसिंगाला शिवाजीला दूर राखणे धोक्याचे वाटले आणि त्याला जवळ बोलावून घेतले. त्याच समयी कुतुबशाहा व इतर दक्षिणेतील सैन्ये आदिलशाहाच्या मदतीस आले. शिवाजी त्यात सामील झाला तर झालेल्या हलाखीच्या परिस्थितीत ही घटना फारच तापदायक होईल म्हणून शिवाजीला मोठमोठी अभिवचने देऊन औरंगजेबाकडे सन्मानाने रवाना करण्याचे ठरविले. जयसिंग आपल्या फेब्रुवारीच्या पत्रात लिहितो, "आता आदिलशाहा व कुत्बशाहा आमच्या विरूद्ध एक झाले आहेत, तेव्हा कसेंही करून शिवाजीचे मन आपल्याकडे वळवून घेतले पाहिजे. बादशाहाची भेट घेण्याकरिता म्हणून त्यांस उत्तरेकडे पाठवून देणे जरूर आहे." त्याप्रमाणे पुढे शिवाजीने प्रयाण केले.[१३५]

इ] शिवाजी महाराजांचे आगऱ्याकडे आगमण व तेथून सुटका

(१) शिवाजी-औरंगजेब भेटीमागील राजकारण :

बेंद्रे म्हणतात, शिवाजीबरोबर जयसिंगाने ठरवून दिलेल्या तहाच्या अटीप्रमाणे औरंगजेबाने जरी आपले फर्मान ५ सप्टेंबरला काढले होते तरी या राजकारणांत आपल्या दक्षिण प दाक्रांत करण्याच्या मार्गांतील शिवाजीचा काटा दूर झाला नाही. हे शल्य त्याला टोचीत राहिले असले तर नवल नाही. शिवाय जयसिंगाने शिवाजीला नुसताच मोकळा ठेविला होतां असेही नव्हते तर त्यास त्याच्या खोल डोंगरदरीत जाऊ दिले होते. शिवाय शिवाजीच्या डोंगरदऱ्यात लढा देणेही जयसिंगाला आता सुकर वाटत नव्हते. इतकेच नाही तर जी बारा गडांची सूट दिली होती, त्यांतही ते धोका पाहात होते. मोगलांच्या ताब्यात आलेल्या गडांना या राहिलेल्या गडांपासून धोका असल्याचे कळून आले होते आणि अडचणींच्या जागेतील धोक्यांत त्यांना तितका धीर निघणे शक्य वाटत नव्हते. त्या परिस्थितीची बातमी औरंगजेबापर्यंत गेल्यावर त्याला त्यातील स्वारस्य सहजच कळून आले. त्याने जयसिंगास लिहून आपले असमाधान व्यक्त केले. इस्लामी सरदारांना औरंगजेबाच्या या असमाधानांत जयसिंग-शिवाजी समेटाबाबत आपल्या हिंदू-मुस्लीम द्वेषाच्या कारवाईला जोर मिळाला. जयसिंगाने आपल्या परीने पादशाहाच्या असमाधानांतील कारणाचे निरसन केले.

शिवाजीची समजूत घालून औरंगजेबाकडे पाठविले. म्हणजे आपण मुक्त झालो असा त्याने सरळ विचार केला असल्यास नवल नाही असे बेंद्रे सांगून हा विचारही जयसिंगाने नाइलाजाने केला असला पाहिजे. त्याला तशीच काही कारणेही झालेली होती असे बेंद्रे स्पष्ट करतात. शिवाजीचे मोठे संकट टाळण्यासाठी जयसिंगाने औरंगजेबास लिहितांना म्हटले होते की, 'शिवाजीचे मन वळवून घेतले पाहिजे. म्हणून त्याला तिकडे बोलावणे जरूर आहे.' बेंद्रे पुढे म्हणतात, यावरून स्पष्टच आहे की, जयसिंग बिथरला होता आणि त्याला शिवाजी आदिलशाही कुतुबशाही यांच्या युतीत मिळण्याची भीती वाटत होती. बेंद्रे स्पष्ट करतांना सांगतात की, "जयसिंगाला शिवाजीस दरबारी पाठविण्याची जी गरज वाटली ती केवळ इस्लामी दिलेरखानासारख्या सरदारांच्या दुष्कृत्याने आपली बदनामी होऊ नये व ही जी सर्व दक्षिण्यांची युती होत चालली होती त्यात शिवाजीसारखा जबरदस्त कलाहुनरी मोहरा मिळून आपली अब्रु जाऊं नये म्हणून होय."[१३६]

(२) शिवाजी-औरंगजेब भेट :

'सोमवार ५ मार्च १६६६ रोजी राजश्री शिवाजीराजे व राजश्री संभाजीराजे ऐसे औरंगजेबाचे भेटीस गेले.' पुढे '१५ मे १६६६ रोजी आगऱ्यास जाऊन औरंगजेबाची भेट घेतली.' 'सेवाने अपने नऊ बरस का बेटे संभा के साथ जमीन चूमकर डेढ हजार अशरफी नजर और ६ हजार रूपये (= ३१००० रूपये) निछापर किये.' असे औरंगजेबनामाही सांगतो. परंतु येथे शिवाजीराजांची दरबारातील वागणूक येथील शिष्टाचाराला धरून होऊ शकली नाही. यावनी सत्तेपुडे मान न वाकविण्याचा शिवाजीचा निग्रह होता. पारतंत्र्य स्वीकारणाऱ्या सरदारांच्या पंक्तीत राहून आपला आपण अवमान करून न घेण्याचा निश्चय त्यांनी केला होता. त्यांच्या दरबारी हालचालींचे पर्यवसान, रामसिंहाने समर्थन करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी औरंगजेबाशी बिघाड होण्यात होईल हे जाणूनही त्या तशा करण्याची शिवाजींनी आपल्या मनाची तयारी राखली होती. परिणाम व्हावयाचा तोच झाला व औरंगजेबाच्या मनात थोडी बिघाड झाली. तरीही औरंगजेब शिवाजीवर तितका नाखूश नव्हता. त्यांना बादशाहा परत पाठविण्याच्या तयारीत होता; परंतु दरम्यान राजा जयसिंहानी आदिलशाही सरदारांकडून मार खाल्ल्याने त्याला साहजिकच शिवाजीराजे दक्षिणेत येऊ नये असे वाटणे साहजिक होते. त्याप्रमाणे त्यांनी बादशाहस सांगून शिवाजी राजांस तेथेच अडकवून ठेवण्याचे आणखी एक कारस्थान केले.

त्याचप्रमाणे औरंगजेबाने रामसिंहास आगऱ्याचा फौजदार करून शिवाजी राजांस आगऱ्यातच राखण्याचे काम सांगितले. परंतु रामसिंह बादशाहापासून दूर राहिला तर इतर दरबारी त्याचा फायदा घेऊन आपल्याविरूद्ध बादशाहाचे मन बिघडवितील अशी राजा जयसिंहास भीती वाटत होती. म्हणून बादशाहानी रामसिंहास बरोबर ठेवावे व शिवाजी राजांस कैदेत ठेवावे असे सुचविले. 'बादशाहाने ते मानून राजश्रीस चौकिया दिल्या.' पाच हजारी मनसबदार संभाजीराजे मात्र रामसिंहाबरोबर दरबारी जात येत व आपला रूबाबही राखीत. या संकटात दोन-तीन महिने काढले. 'श्रावण वद्य द्वादशीस (१७ ऑगस्ट १६६६ शुक्रवार)[१३७] शिवाजी व संभाजी आगरियाहून पेटारियांत बैसोन पळाले.' औरंगजेबनामा पुढे सांगतो की, '....डेरेपर जावे और रामसिंह उसको अपने मकान के पास ठहराकर उसके बेटे संभा को अपने साथ मुजरा करने के लिये लाया करे. सेवा छल कपट से भाग न जावे... और कुंवर रामसिंहने भी खबदारीसे गफलत की इससे वह २७ सफर सन १०७७ को अपने बेटे समेत भेस बदलकर भाग गया.'

या सुटकेमुळे रामसिंहावर ठपका आला. राजा जयसिंहाचे शिवाजी महाराजांविरूद्धचे कारस्थान शिवाजीराजाच्या अनुयायांच्या नजरेस आले. ते त्याच्यावर सूड उगविण्याकरिता राजा जयसिंहाच्या विरूद्ध बाजूच्या मंडळींच्या मदतीने त्यांनी आपले रक्षण व सुटका करून घेतल्या. राजा जयसिंहाला आपल्या कारवाईचे फळ मिळाले व त्या पितापुत्रांना आपल्या सर्व मानमरातबाला मुकावे लागले. कदाचित राजा जयसिंहाला नंतर पश्चात्ताप होऊन त्यानेही या सुटकेत गुप्त मदत करण्याचे धाडस केले असावे असे वा. सी. बेंद्रे सांगतात. पुढे लिहितात की, 'ईश्वरविलास महाव्यात' श्रीकृष्ण भट्ट लिहितो: 'आबदाज्जलिराजगाम शरणं यस्य प्रतापांग्निमा। सभीतः शिवराजनामविदितो वीरः स दुर्गेश्वरः।। दिल्लीशेन च मेलित कृतरुषस्तस्यैव कारागृहे। रुद्धोऽप्येश दुरुद्धरे निजबलाद्भूयो विनिष्कासितः।।३३।।' हे खरे मानण्यास जरी जागा असली तरी राजा जयसिंगानेच शिवाजी व संभाजीराजे यांना अडकविले होते यात शंका नाही.

शिवाजीराजांनी आपली सुटका करून घेतल्यानंतर कोठे व कसे प्रयाण केले याबद्दल साधार माहिती मिळत नाही; परंतु तत्कालीन युरोपीय प्रवासी थेवेनो लिहितो की, "...मोगलांशी झालेल्या बोलण्यावरून शिवाजीराजाने उत्तर हिंदुस्थानातील लढ्यात भाग घेण्यासाठी आपले सैन्य कोकणातून आणण्याकरिता म्हणून पादशाही दस्तक देऊन खात्रीचे लोक रवाना केले होते. त्यांनाच गुप्तपणे टप्प्या-टप्प्यांवर घोडे आणून ठेवण्यास आज्ञा केली होती. त्यांनी त्याप्रमाणे सर्व

तयारी ठेवली. नंतर संकेत ठरल्याप्रमाणे शिवाजीराजे पेटाऱ्यात बसून गुप्तपणे नदी किनाऱ्यावर गेले. तेथे तरीने नदी ओलांडली... तरवाल्यास शिवाजीराजास आपण तरीतून नदीपार केले अशी खबर पादशाहास देण्यास सांगितले आणि आपण व संभाजीराजे घोड्यावर स्वार होऊन आपल्या निवडक लोकांनिशी निघून गेले. टप्प्या-टप्प्यांवर ठेवलेल्या ताज्या दमाच्या घोड्यांवर स्वार होऊन ते पादशाहाच्या दस्तकांच्याच जोरावर पुष्कळ दूरवर गेले; परंतु त्यांचा मुलगा व द्रुतगतीच्या कष्ट प्रवासाने थकला व मेला. शिवाजीराजांनी त्याच्या देहास अग्निसंस्कार देण्यासाठी पुष्कळ पैसा देऊन ते निघून गेले..." बेंद्रे सांगतात, लेखक समकालीन असला तरी त्याचे लेखन बाजारगप्पांवरच अवलंबून आहे.

दुसरा एक प्रवासी अबे करे हा आपल्या इ.स. १६७३ पूर्वीच्या वृत्तांतात या सुटकेची माहिती देतांना लिहितो: '...अशा तऱ्हेने दोन-तीन महिने कालक्रम चालू होता. मिठाईच्या टोपल्या दूरवर रवाना होत होत्या. चौकिदारही त्या तपाशीनासे झाले होते. हे पाहून शिवाजीराजाने तेथून निसटण्याचा दिवर मुक्रर केला व सर्व तयारी करविली. मुलासही तयारीस राहून वेळीच निघून त्यास ठरीव ठिकाणी भेटण्यास सांगितले. त्यापूर्वी त्यांनी काही एक दिवस तापाने फार आजारी असल्याचे सोंग घेतलते व ते बिछान्यात पडून राहिले होते. ठरीव वेळी ते एका टोपलीत बसून निसटले...'

यावर वा. सी. बेंद्रे म्हणतात, यावरून शिवाजीराजे टोपलीतून किंवा पेटाऱ्यातून एकटेच गेले. रामसिंगाजवळ असलेले संभाजीराजे ठरीव ठिकाणी जाऊन त्यांस मिळाले असे दिसते. ही हकीकत अधिक वास्तवतेला धरून असावी. नाहीतर शिवाजी राजाबरोबर असणाऱ्या संभाजी राजांच्या नाहीसे होण्याचा सुगावा पाहरेकऱ्यांस आधीच लागला असता. रामसिंहाजवळील संभाजीराजे गेल्यामुळे बादशाहला रामसिंगाचा संशय आला व त्याने तात्काळ त्याला बडतर्फ केले. ही घटनाही बरोबर दिसते. कारण शिवाजी राजांबरोबर त्यांचे काही खास लोकही मथुरेपर्यंतच्या प्रवासात होते. बहुतेक तेच संकेत ठरल्याप्रमाणे संभाजीराजांस बरोबर घेऊन शहराबाहेर येऊन शिवाजीराजांस मिळाले असावेत."[१३८]

शिवाजी १८ ऑगस्टला आगऱ्याहून निसटले ते मथुरा, अलाहाबाद, काशी करून पूर्वेकडील रस्त्याने दक्षिणेत आले. बेंद्रे सांगतात, काशी रामेश्वर करणाऱ्या गोसावी बैराग्यांच्या झुंडी याच रस्त्याने जात. शिवाजीचा हा प्रवास १२-१३ सप्टेंबरला संपला. नंतर संभाजीच्या

मृत्युची बातमी सर्वत्र मोगली प्रदेशांत जाहीर करविली व माणसे पाठविली आणि संभाजीस आणविले. नंतर २० नोव्हेंबर १६६६ रोजी ते दोघे बरोबर राजगडास आले. म्हणजे मधले दोन सव्वादोन महिने संभाजीला आणण्यांत गेले. २७ सप्टेंबरपासून शिवाजी घरी पोचल्याच्या बातम्या येऊं लागल्या. त्याअर्थी शिवाजी महाराज निघाल्यापासून २५ दिवसांत पोहोचले. ही बातमी बरोबर ठरते. ८ नोव्हेबरला दिल्लीला बातमी जाते की, संभाजी वाटेत मेला. अर्थात ही बातमी राजगडाहून निघण्यास व दिल्लीस पोचण्यास जो अवधी लागला त्या अवधित संभाजीला आणण्यासाठी जी माणसे गेली होती. ती ऑक्टोबरच्या मध्यावर पोहोंचली असावीत आणि संभाजी वारल्याचा प्रसार होतांच ऑक्टोबरच्या तिसऱ्याच आठवड्यात ही मंडळी निघाल्याने त्यांना पावासाचा वगैरे त्रास झाला नाही व ते २० नोव्हेंबर पूर्वीच कोकणात गेले असावेत.

संभाजीच्या संदर्भातील खाफीखानाची माहिती बरीच सत्याला धरून दिसते. असे सांगून बेंद्रे खाफीखानाने या संदर्भात जी माहिती दिली ती सांगतात की, खाफीखान सांगतो कवी कलशची ओळख ज्या ब्राह्मणांने करून दिली होती त्यास संभाजीस सांभाळण्याकरिता ठेवला. शिवाजीच्या ह्या ब्राह्मणावर तेवढा विश्वास नसावा. म्हणून कवी कलशकडे संभाजीसाठी द्रव्य वगैरे सरंजाम करून दिला होता. शिवाजी निसटल्यानंतर लगेच कवी कलशला कैद केल्याचे वृत्त २३ ऑगस्टच्याच पत्रात आले आहे व तो निदान २३ ऑगस्टपर्यंत तरी आगऱ्यात कैदेत होता. यावरून असे दिसते की, संभाजीला उत्तरेकडे मथुरेत त्या ब्राह्मणाकडे ठेवण्याचा बेत शिवाजी तेथून निघण्यापूर्वीच ठरला गेला असला पाहिजे. संभाजीला त्या ब्राह्मणाकडे पोहोंचविण्याचे काम गुप्तपणे कवी कलशनेच केले असावे. बहुधा शिवाजी मथुरेला माध्यान्ह रात्री पोहोचल्यानंतर कवी कलशसह निघाला. दुसऱ्या दिवशी अलाहाबादेस आला. तेथून निघण्यापूर्वी संभाजीची रवानगी परत मथुरेस काशीपंताच्या बायकोकडे केली व कवी कलश संभाजीला मथुरेत सोडून ताबडतोब तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशी परत आगऱ्यास आला; परंतु शिवाजी बरोबरच गडब झालेला नवीन नोकर कवी कलश व शिवाजीचा नवीन 'चाकर मुसाहिब' सक्सेना कायस्थ परत येताच त्यांचा संशय घेणे साहजिक होते व तसा संशय घेतल्यामुळेच त्यास कैदेत राहावे लागले.[१३९]

शिवाजीच्या हस्तकांनी जरी आजाराच्या सबबीखाली १८ तारखेच्या दुपारपर्यंत त्याच्या हालचालींबाबत भूरळ घातली असली तरी संभाजीच्या तेथील अस्तित्वाची त्यांच्या चौकशीत

काहीच हालचाल का दिसून येत नाही? असा प्रश्न विचारून बेंद्रे त्याचे स्पष्टीकरण देतात की, संभाजीला मोकळी होती व तो कदाचित लहान म्हणून रामसिंगाकडे किंवा रघुनाथपंतर कोरडे वकील यांचेकडेही राहात असेल. म्हणून रामसिंगाला वाटले असेल की, तो बापाकडे गेला व पहारेकऱ्यांचा समज असेल की, तो रामसिंग किंवा त्यांच्या बरोबर आलेल्या लोकांकडे असेल. तेव्हा अशा परिस्थितीत संभाजीला बुरडी टोपली किंवा पेटाऱ्यातून नेण्याची आवश्यकता नव्हती. त्याला कवी कलश व निराजीपंत व दत्ताजीपंताबरोबर ठरीव ठिकाणी नेले गेले असले पाहिजे व शिवाजी तेथे पोहोचताच मथुरेचा मार्ग धरून संभाजीसह कबजीने अलाहाबादपर्यंत त्याचेबरोबर वाटचाल करून तेथे काशीपंत व इतर माणसे देऊन तो घाईने परत संभाजीसह दोन दिवसांत मथुरेसच परत आला असला पाहिजे. म्हणजे कबजीच्या मध्यस्थीने केलेली ही व्यवस्था दिसते. शिवाजीशी त्याचा संबंध असल्याच्या संशयाला काही आधार असल्याशिवाय त्याला पकडणे संभवनीय नाही असे बेंद्रे सांगतात.[१४०]

संभाजीला वापस आणण्यासंदर्भात वा. सी. बेंद्रे माहिती देतात की, काशीपंत हा एक ओतुरचा केशव चैतन्यांचा पणतु मोगली चाकरीत होता. तो ज्या मोगली सरदाराचे हाताखाली होता त्याचेबरोबर तो निजामशाही मोगली लढा मिटल्यानंतर उत्तरेस गेला. काशी केशव हा मथुरेस होता. त्याचा मुलगा कृष्णाजी याला विश्वासराऊ कदाचित उपनाम असेल किंवा विश्वास हा त्याचा दुसरा मुला असेल. काशी त्रिमल यास शिवाजीने संभाजीस आणण्याकरिता पाठविले होते. ते याच ओळखीसाठी. काशी केशवने शिवाजीवर कवी कलशच्या सांगण्यावरून अलाहाबाद ते वाराणसीपर्यंत सोबत केली. नंतर संभाजीला राजगडी आणतांना काशीपंत, त्याची बायको लक्ष्मीबाई, कृष्णाजी व त्याची बायको पार्वतीबाई आणि मामा कासी त्रिमल हे बरोबर होते. काशी केशव हा वाटेचा माहितगार त्याने एका दिवशी संभाजीस वाटेत मोगलाचे हवाली करण्याचे मनात आणले; परंतु त्याच्या बायकोने व बायकोचा भाऊ काशी त्रिमलने त्याला विचारापासून परावृत्त केले. काशी व कृष्णाजी यांनी सह्याद्रीचे हद्दीत येताच संभाजीला काशी त्रिमल व शिवाजीच्या लोकांच्या ताब्यात देऊन राजाकडे पोहोचविले व ती मंडळी ओतूरला गेली. साहजिकच काशी व कृष्णाजीवर थोडा राग आला असावा असे बेंद्रे सांगतात. काशी लौकरच मेला नंतर १६७०-७१ मध्ये म्हणजे ३-४ वर्षांनी काशी त्रिमल व त्याची बहीण आईजी

की, जिने संभाजीचा पुत्रवत सांभाळ केला होता त्या दोघांनाच शिवाजीने प्रत्येकी २५००० रूपये मिळून ५०००० हजार बक्षीस दिले. कृष्णाजी व काशी या बापलेकास काहीही दिलेली नाही.

सारांश सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, संभाजीची व्यवस्था काय करावयाची ती कवी कलश कैद होण्याच्या व शिवाजी महाराज निसटण्याच्या पूर्वीच झालेली दिसते. तो दमला, फोड आले वगैरे जो तार्किक विस्तार केलेला आहे तो चुकीचा आहे. अनोळखी ठिकाणी संभाजीस सोडून शिवाजी जाईल हे शोधकांना असंभवनिय वाटणे साहाजिकच होते. शिवाय दक्षिणेत पळून जाणारा शिवाजी उत्तरेस जाऊन संभाजीस मथुरेत ठेवील ही कल्पनाही येण्यासारखी नव्हती आणि तो कवी कलशकडे अलाहाबादेत नसल्याने कवी कलश मोकळा होऊ शकला. शिवाजी आपल्या ओळखीच्या प्रदेशांत जातात संभाजीची चौकशी होणारच. अशाचवेळी त्याला वाटेत ठेवला ही खरी गोष्ट उघड करणे म्हणजे संभाजीबद्दल विचारणा होऊ लागल्यापासून तो वाटेत मेला हे सांगते राहाणे योग्यच होते असे बेंद्रे सांगून पुढे ५-६ वर्षांच्या संभाजीच्या बायकोने सती जाण्याचा वगैरे जो वर्णनांत उल्लेख केला तो बातमी पसरविणाऱ्यांचा किंवा लेखकांच्या तर्कातील तपशील दिसतो असे स्पष्ट करतात.

बेंद्रेंनी काढलेले निष्कर्ष :

(१) शिवाजी ५ मार्चला औरंगजेबाकडे जाण्यास निघाला व ११ मे ला आगऱ्याजवळ आले. या दरम्यानच्या काळात शिवाजीने २५ मार्च १६६६ पूर्वी वेदमूर्ती भैरवनाथ व गोकुळनाथ बिन बालकराम तिवारी गंगापुत्र, वास्तव्य क्षेत्र वाराणसी यास व ७ एप्रिल १६६६ ला वेदमूर्ती राजश्री गोवर्धन भट व मकरंद भट मथुरावासी यांस तीर्थाच्या पुरोहितपणाच्या सनदा दिल्या आहेत. अर्थात या सनदा शिवाजीने आगऱ्यास जात असतांना प्रवासांत दिल्या असल्या पाहिजेत. त्या मथुरा किंवा वाराणसीस जाण्यापूर्वीच्या आहेत. शिवाजी आगऱ्याहून निसटून मथुरेला गेले किंवा वाराणसीस गेले. तसेच पुरोहिताकडे गेला असल्याचा उल्लेख कोणी करीत नाही. गागाभट्ट व अनंतभट्ट हे शिवाजीच्या निदान १६६३ पासून तरी चांगले ओळखीचे झालेले होते; परंतु त्यांनाही तो काशीस गेला असतांना भेटला नाही. याचाही उल्लेख समकालीन अगर नंतरचे लेखक करीत नाहीत. असे वा. सी. बेंद्रे सांगून यावरून खाफीखान जे सांगतो की, शिवाजी पहाटेस स्नानाला आला व पाठलाग होत असल्याची बातमी लागतांच पळाला ते बरोबर दिसते. तो तेथे ओळखीच्या माणसांकडे जाण्यापूर्वीच त्याला पुढील वाट धरावी लागली. शिवाय तो २५

दिवसात कोकणात जाऊन पोहोचला असल्याने तो कोठेही मुक्काम करणाच्या भानगडीत पडला नसावा व साधारणतः तत्कालीक लेखकांच्या आधारे मथुरा-यमुना-अलाहाबाद-बनारस-चांदा-हैद्राबाद-राजगड असा प्रवास केला असावा असे स्पष्ट करतात आणि रोज ५० मैलापेक्षा अधिक प्रवास केल्याशिवाय २५ दिवसात हा प्रवास संपविणे शक्य दिसत नाही. बखरकारांचा शिवाजीच्या तीर्थप्रसादांचा विस्तार हा काल्पनिक आहे. असे सांगून शिवाजी महाराजांनी तीर्थाच्या ठिकाणी सर्व तऱ्हेच्या धार्मिक कृत्यांत वेळ घालविला हे सांगणेही विपर्यस्त आहे असे बेंद्रे सांगतात.

(२) बेंद्रे सांगतात शिवाजीच्या निसटण्याने रघुनाथ कोर्डे, त्र्यबंकपंत, त्यांचे दोन नोकर, बहुधा हिरोजी फर्जंद व मदारी मेहतर, कवींद्र परमानंद व कवी कलश आणि शिवाजीचा त्याचे लोक निघून गेल्यानंतर ठेवलेला, चाकर मुसाहिब सक्सेना कायस्थ इतक्यांना कैद केले गेले. जयसिंगाच्या पत्रावरून बळीराम पुरोहित, जीवा जोशी, श्री किशन व हरिकिशन हेही जरी जयसिंगाकडील मूळ असले तरी ते नंतर सक्सेनाबरोबर शिवाजीचे नोकर झालेले असावेत. यांनाही अटक झाली होती. या शेवटच्या चार नोकरांची सुटका केव्हा झाली ते सांगण्यास पुरावा नाही. मात्र त्यांनी मार सहन न झाल्याने शिवाजीच्या निसटण्यांत रामसिंगाचा हात होता. हे सांगून आपला मार चुकविला होता. रघुनाथपंत कोर्डे व त्र्यबंकपंत यांना नंतर दिल्लीस नेण्यात आले व त्यांची सुटका ३ एप्रिल १६६७ ला झाली. हिरोजी फर्जंद व मदारी मेहतरही त्याच सुमारास सोडले गेले असावेत. कवी कलशला केव्हा सोडले हे निश्चित सांगता येत नाही; परंतु खाफीखान सुरतला असतांना तो तेथे सुभेदाराकडे कामावर होता आणि नंतर राजाभिषेकाच्यावेळी सामवेदी म्हणून रायगडास आला होता. कवींद्र परमानंदाला प्रत्यक्ष कैद झालेली नसली तरी त्याला अडवून धरले होते. परमानंदाला एकदा अटक केले होते. नंतर हुकुमावरून सोडले; परंतु पुन्हा हुकूम फिरल्याने त्याला चंदनगावाजवळ पुन्हा कैद केले आणि त्याला पुन्हा परत आणले. त्यानंतर त्याने दिल्लीस नेण्याचा हट्ट धरला. नंतर त्याची सुटका कधी झाली ते कळण्यास पुरावा उपलब्ध नाही.[१४१]

(३) शिवाजीचा आगऱ्यांत बराच खर्च होता : बादशाहास नजरनजराणा झाला. तो व येण्याजाण्याचा खर्च सोडला तरी, नंतर अमीर उमरावांना दिलेली लाचवजा पेशकश वगैरेचा विचार करिता हा खर्च अपेक्षेच्या बाहेर होऊनही फलनिष्पत्ती काहीच झाली नव्हती. कवींद्र व

इतर लोकांस दानाच्या नावाखाली दिलेली धनदौलत व जे लोक प्रथम परत गेले त्यांच्याबरोबर पाठविली गेलेली संपत्ती तेव्हढी वाचली. कुमाराकडून ६६ हजार घेऊन त्याबाबतची हुंडी जयसिंगाच्यातर्फे वसूल करण्यास पाठविली होती. त्याशिवाय जडजवाहीर, हत्ती, घोडे, उंट मागे राहिले ते जप्त झाले आणि इतर सामान इतके होते की, काजी ते दिल्लीस नेण्यासाठी मजूर व साधने नाहीत म्हणून नेण्याबाबत कुरकूर करीत होता. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शिवाजी पुन्हा सुरतेवर धाड घालणार अशी अफवा पसरली यात नवल कसले! असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

(४) शिवाजी महाराज आपल्या स्वराज्यात केव्हा जाऊन पोहोचले याबद्दल निश्चित पुरवा नाही : बेंद्रे सांगतात, आपली व्यवस्था नीट लागेपर्यंत शिवाजी पोहोचल्याची बातमी बाहेर जाऊ नये म्हणून काळजी घेतली असणे शक्य आहे; परंतु स्थिरस्थावर झाल्यानंतर ही बातमी पसरणार आणि नंतर तशी पासरू देण्यात काहीच आडकाठी नव्हती. ही बातमी म्हणजे शिवाजीने आपला आग्रा ते राजगड प्रवास २५ दिवसांत आटोपला. यावरून शिवाजी महाराज स्वराज्यात सप्टेंबरला ११-१२ तारखेस आले असले पाहिजे. २७ सप्टेंबरच्या पार्शियन अखबारींत ही बातमी प्रथम आली आहे. अर्थात त्यापूर्वी काही दिवस तरी शिवाजीराजे पोहचले असले पाहिजेत. असे बेंद्रे सांगून संभाजी व शिवाजीराजे राजगडास २० नोव्हेंबरला आल्याचे शकावल्या सांगतात. शिवाजी महाराज आल्यानंतर संभाजीस आणण्याची व्यवस्था काशी त्रिमळला, कारण तो लख्मीबाईचा भाऊ असल्याने तिची खात्री पटविण्यास सोईचे म्हणून, पाठवून संभाजीस परत आणण्याला दोन सव्वादोन महिन्यांचा काल लागणे साहजिकच दिसते. त्याचप्रमाणे शकावल्यांच्या नोंदीवरून असे वाटते की, महाराजास संभाजी येत असल्याची बातमी आधीच लागताच व काशी केशवच्या बेइमानीमुळे ही मंडळी शिवाजीच्या हद्दीत येण्यास नाखूश असल्यामुळे शिवाजी महाराजांनी खास जाऊन पुण्याकडून संभाजीला राजगडास बरोबर आणले असावे असे दिसते. मात्र शिवाजी महाराजांच्या वेशावरून रचलेली बखरकारांची मायलेकांच्या भेटीची कथा काल्पनिक दिसते[१४२] असे बेंद्रे स्पष्ट करतांना दिसतात.

(५) शिवाजी महाराज यशस्वीपणे निसटल्यामुळे जयसिंगाला सर्वच बाजूने पराजित झाल्याचा झटका बसला : जयसिंग आपल्या शेवटच्या दोन पत्रात स्पष्ट करतो की, औरंगजेबाने त्याचा दख्खनचा सुभा तगीर केला. रामसिंगाला विनाकारण गोंधळात पाडून त्याची दरबारी

लोकांत मानखंडणा करविली म्हणून तो बिघडला. शिवाजीला जयसिंगाच्या माणुसकीबद्दल जी कल्पना होती ती बदलून त्याच्या संकुचित मनोवृत्तीची साक्ष पटल्याने शिवाजी दक्षिणेत आल्यावर आपली फजिती होईल म्हणून त्याला जोराचा धक्का बसला.

असे निष्कर्ष काढून जयसिंगाच्या स्वराज्यावरील स्वारीचा स्वारांश सांगतांना बेंद्रे म्हणतात, पावणेदोन-दोन वर्षातील संपूर्ण शिवाजीनेच खेळलेल्या या राजकारणातील आदर्श राजा इतिहासात क्वचितच सापडेल.

शिवाजी महाराज मोगल संबंध (इ.स. १६६९ ते १६७९) :

शिवाजी महाराजांचे मोगलांवर आक्रमण :

मोगलावरील शिवाजी महाराजांच्या आक्रमणांची चिकित्सा करतांना वा. सी. बेंद्रे प्रथम सर्व साधनांची चिकित्सा करतात व सांगतात की, मोगलांकडून जोपर्यंत तह मोडला गेला नव्हता तोपर्यंत शिवाजी महाराजांनी मोगलांवर आक्रमण केले नव्हते. याचे कारण सांगतांना ते म्हणतात की, तहाच्या काळात आदिलशाही व पोर्तुगीज यांनी शिवाजी महाराजांच्या गैरहजेरीत जे आक्रमण केले होते त्याचा त्यांनी परामर्श घेतला. त्याप्रमाणे दख्खन आपल्या साम्राज्याखाली आणण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे औरंगजेबालाही उत्तरेच्या परचक्राला तोंड देण्यासाठी शिवाजीसारख्या शत्रूशी तोंड देणे अशक्य होते. सारांश, जेव्हा शिवाजी व औरंगजेब हे आपल्या संकटातून मुक्त झाले तेव्हा त्यांना केलेल्या तहाला डावलून पुन्हा आपल्या राजवृद्धीच्या आकांक्षेला चालना देणे साहजिकच गरजेचे भासले. औरंगजेबाला परकीय देशात आक्रमण करावयाचे होते तर शिवाजीला आपला गेलेला प्रदेश मिळवायचा होता; परंतु त्याकरिता शिवाजीला आपल्या शेजारील संबंधित शत्रुंना आपल्या ताब्यात ठेवावयाचे होते आणि मोगली तहाने तसा वेळ मिळाला. शिवाय या दक्षिणेतील शत्रुंना मोगलाचा संपर्क नको होता. त्यामुळे ह्या शत्रुंनीही भीतीने मोगलांशी सख्य ठेवून वागण्याचा व वरवर देखाव्यासाठी तह केला होता. तरी हे मोगली आक्रमण थांबविण्यासाठी शिवाजीशी मैत्रत्वाचे संबंध ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे शिवाजीला गुप्तपणे आपले सामर्थ्य देण्याची तयारी आदिलशाहा व कुतुबशाहा ठेवत असे. औरंगजेबाला मात्र ज्याअर्थी जयसिंगाच्या नुसत्या पदार्पणाने शिवाजी नमला त्याअर्थी आपले सरदार व सैन्य शिवाजीचा यशस्वीपणे काटा काढून टाकतील असा भ्रम निर्माण झाला होता. याउलट शहा आलमला तत्कालीन परिस्थितीची जाणीव झाली असल्याने त्याला

शिवाजीशी संघर्ष नको होता; परंतु बादशाहाच्या हुकुमाने तह तुटला गेला आणि शिवाजीला मोगली परचक्रावर कुरघोडी करण्याची रीतसर संधी प्राप्त झाली. शिवाय औरंगजेबानेच मैत्री मोडून वैरत्त्वाचा पवित्रा टाकल्याने शिवाजी या लढ्याला जबाबदार राहिला नाही असे बेंद्रे स्पष्ट करतात.

शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या कारवाईचा प्रतिकार करण्याकरितां दक्षिणेतील मोगली युद्धकलेची अपरिपक्वता पाहून गेलेले म्हणण्यापेक्षा तहाने दिलेले गड पुन्हा परत घेण्याची आवश्यकता भासली व मोगली सैन्याला शिवाजीच्या या आक्रमणाला तोंड देणे जड गेले. शिवाजीने यशस्वीपणे आपल्या शक्तिसामर्थ्यांचा प्रभाव दाखवून मोगलाला पुन्हा तहाचा आधार घेऊन मिटते घ्यावे लागले; परंतु शिवाजीला अशा तहाची आवश्यकता नसल्याने त्याने वेळ काढूपणा करून शेवटी मोगल सूचनांना मान्यता दिली नाही.

बेंद्रे सांगतात की, औरंगजेबाने काहीतरी कारण शोधून शिवाजीच्या लोकांना पकडण्याचा हुकूम काढला होता असे म्हणण्यास पुरावा नाही. उलट शहा आलमच्या बंडाची धास्ती घेऊन शहाजादाजवळ असणाऱ्या व भेद पाडणाऱ्या सरकारकून-सेनापतींना पकडण्याचे फर्मान निघाले. त्याअर्थी शहा आलमच्या बंडाचे राजकारण औरंगजेबाच्या शिवाजीस पकडण्याच्या गुप्त बेतावरून चालू होते. हे मनुचीचे म्हणणे तितके संयुक्तिक दिसत नाही तर त्याने केवळ ही बतावणी करून शहा आलमची बाजू सांभाळण्याचा प्रयत्न केला असावा असे दिसते. बेंद्रे पुढे लिहितात की, "औरंगजेबाने शफतखानाला ससैन्य शिवाजीवर पाठविल्याची बातमी इंग्रजांच्या २५ एप्रिल १६६९ च्या पत्रांत मिळते. यावरून मोगलांनी केवळ तहच मोडला नव्हता तर शिवाजीच्या विरूद्ध लष्करी कारवाई करण्यास प्रथम सुरूवातही केली होती हे स्पष्ट आहे. शिवाजीनेही तह मोडल्याचे पाहताच आपली सरहद्द दूर नेण्याचा मामला आखून इ.स. १६६९ अखेरीस ही कारवाई शहाजादाकरवी न करिता स्वतःच केली. यावरून शहाजाद्याच्या बंडांचे स्वरूप स्वयंपूर्ण होते, फसवणुकीचे नव्हते यात शंका नाही."[१४३]

शिवाजीचे प्रत्यक्ष आक्रमण :

बेंद्रेंनी मोगलांना अंतर्गत पत्रव्यवहार, मुंबई इंग्रज, सुरत इंग्रजाचा पत्रव्यवहार, कारवारांचा पत्रव्यवहार, वेंगुर्लेकर-डचांचा पत्रव्यवहार व शकावल्या इत्यादींचा संदर्भ घेऊन शिवाजीचे मोगलांवर प्रत्यक्ष आक्रमण कसे झाले त्या घडामोडी पुढीलप्रमाणे सांगतात. इ.स.

१६६९ च्या अखेरीस शिवाजी वऱ्हाड प्रांतात घुसला व तेथून लुटमार करून वीस लाखाची रक्कम गोळा केली. किल्लेदार बरखुरदारखानाचा पराभव करून त्याच्या किल्ल्यापासून दोन कोसांवर शिवाजीने आपल्या सैन्याचा तळ दिला. बरखुरदाराच्या अदमासाप्रमाणे शिवाजीची ही सेना वीस हजार असावी. शिवाजी लुटून वसूल घेत आहे. तेव्हा बरखुरदारखानाने आपले नुकसान भरून काढण्यासाठी औरंगजेबाकडे मदत मागितली. तेव्हा औरंगजेब त्याला म्हणाला की, 'पुष्कळ लोक मराठ्यांनी लुटले म्हणून पैसे मागत येतील. आम्ही कित्येकांना कसे नुकसान भरून द्यावे?'

फेब्रुवारी १६७० च्या महिन्यात शिवाजीचे सैन्य सुरतेपासून ७ मैलापर्यंतच्या टापूत होते. त्यापूर्वी शिवाजीने मोगली सैन्यावर अनेकवेळा विजय मिळविले होते. ४ फेब्रुवारीला उदयभान किल्लेदाराला हल्यांत मारून सिंहगड जिंकला होता. ८ मार्चला पुरंदरगड सर केला होता. शिवाजीने मोगली सैन्य पांगविण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी हल्ले चढविले. माहुलीला शिवाजीच्या सैन्याची प्रथम पिछेहाट झाली. सुमारे १००० माणूस कामास आले; परंतु शिवाजीच्या सैन्याने मागे हटतांना मार्च अखेर कल्याण-भिवंडी घेतली. ७ एप्रिलपूर्वी चांदवड लुटले. तळकोकणचा फौजदार लुधीखान याचा पराभव केला. नांदेडचा फौजदार फत्तेजंगखान याला पळवून लावविले. १३ मे ला लोहगड घेतला. १५ जूनला हिंदोला घेतला आणि १६ जूनला पुन्हा माहोलीवर हल्ला चढवून तो गड सर केला. २२ जूनला कर्नाळा घेतला. २४ जूनला रोहिडा घेतला. कर्नाळा गडाला मार्चपासून वेढा चालू होता. शेवटी तो २२ जूनला घेतला गेला. यावेळी मोगलांचे मोठे सैन्य जुन्नरला होते. त्याची शिवाजीवर चाल करून येण्याची तयारी चालू होती; परंतु पावसाळ्यापर्यंत त्या सैन्याची रवानगी झाली नाही. बहादुरखानही सुरतेच्या बंदोबस्ताकरिता ५००० सैन्यानिशी आला होता. पावसाळा लागण्यापूर्वी शिवाजीने मुंबईच्या आसपासचे बरेच किल्ले मोगलांकडून परत मिळविले. या वर्षीचा सारांश सांगतांना बेंद्रे लिहितात की, शिवाजी स्वराज्यापासून लांब न जाता त्याच्यावर मोगलाचे सैन्य चालून येईपर्यंतच्या मधल्या वेळात आपले गेलेल किल्ले शक्य तितक्या लवकर परत मिळविण्यात खर्ची घातले. मोगली सैन्य पावसाळा संपेपर्यंत तरी येणे शक्य नव्हते आणि मुआझम आपल्या बापावर रूसल्याकारणाने त्याने शिवाजीच्या पारिपत्यार्थ काहीही प्रयत्न केले नसल्यामुळे तो शिवाजीला साहाय्यक होऊन मिळाला असा गैरसमज साहजिकच पसरला. ८ मे पूर्वी शिवाजीने अहमदनगर, जुन्नर आणि

परिंडा या महालातील ५१ गावे लुटली; परंतु मोगली सैन्य जुन्नरहून खाली उतरले नाही. मात्र पावसाळ्यात कुंद हवेतही माहुली घेतल्यावर तेथे संरक्षणाकरितां लोक ठेवून शिवाजीने आपले बाकीचे सैन्य काढून नेले.[१४४]

इ.स. १६७० चा पावसाळा संपल्यावर मोगली सैन्य काय करते इकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मोगलांनी आदिलशाहास धमकी देऊन १२ हजार घोडदळाची कुमक मागितली होती. ती देण्याचे आदिलशाहाने मान्यही केले होते. पावसाळ्यानंतर मोगलांच्या खास सेना शिवाजीच्या पारिपत्यार्थ येऊ लागल्या. बरेच मोठे संघर्षही झाले. शिवाजीही ऑगस्टमध्येच रायगडावरून मोगलाचे मुलुखावर चाल करून जाण्यास तयार झाला. त्याने जुन्नरास वेढा घातला. ३-४ ऑक्टोबला सुरत लुटली. १७ ऑक्टोबरला सुरतेहून परत येतांना दिंडोरीपाशी दाऊदखान व शिवाजी यांचा झगडा झाला. शिवाजीनंतर कुंजरगडास येऊन राहिला. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात मोरोपंताने त्र्यबंक गड घेतला. नोव्हेंबरमध्ये शिवाजी कारंज्यास गेले. जातांना अहिवंतगड, रवला, जवला व मारकडा हे गड काबीज केले; परंतु महाबतखानाने हे चारीही गड १६७१ च्या मे मध्ये परत घेतले.[१४५]

शिवाजी महाराजांशी मोगलांची तहाची बोलणी व आक्रमण कारवाया :

मोगल व शिवाजी महाराजांसंबंधाचा सर्व तपशील जरी तारीखवार जुळविता येत नसला तरी या पत्रव्यवहारातील नोंदीमुळे त्यांची कालक्रमानुसार मांडणी करणे फारसे अवघड जात नाही असे वा. सी. बेंद्रे सांगून पत्रव्यवहाराबरोबरच विविध फारसी साधने तसेच बखरींचा आधार घेतात.[१४६] शिवाजी महाराजांशी मोगलांनी तह करण्याचा का प्रयत्न केला? त्याचे काय परिणाम झालेत? याची तपशीलवार चर्चा वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे करतात. मोगल व शिवाजी यांच्या परस्परामधील हालचालींचा आढावा घ्यावयाचा तर पत्रव्यवहारातील मजकुराच्या कालक्रमाला इतर पुराव्यांतील तारखांची भर घालणे आवश्यक आहे.

१६७२ च्या पावसाळ्यानंतर मोगली सैन्य दिलेरखानाच्या नेतृत्वाखाली येत असल्याची बातमी लागताच महालांत शिवाजी राजांनी आपले सैन्य एकत्रित करण्याचा प्रयत्न १६७२ च्या जानेवारीच्या सुरुवातीला केला. सालेरीला वेढा घातला तेव्हा मोरोपंतांनी हशम बरोबर दिलेरखानाच्या सैन्याचा बिमोड केला. याच सुमारास बहलोलखानास मारीले व मुल्हेरचा किल्लाही घेतला. सालेर मुल्हेर गडाची योग्य ती व्यवस्था लावून शिवाजी महाराज रायगडाला

परतले. शिवाजीच्या सैन्याच्या मोरोपंताच्या हाताखालील दुसऱ्या तुकडीने ६ जून १६७३ ला जव्हार घेतले. तेथील विक्रमशा मोगलाईत पळाला. १७ लाखाचा खजिना घेतला. नंतर जून-जुलैत रामनगरचे राज्य काबीज केले. तेथील राजा दवनेस पळून गेला.[१४७] पावसाळ्यापूर्वीच मोरोपंताने नाशिक त्रिंबकला जाऊन तेथील मोगली सरदार जाधवराव यांच्याकडून तेथील ठाणी घेतली व जाधवरावाला कैद केले. त्यामुळे सिद्दी हिलाल, जाधवराव आणि दोन मोगली सरदार शिवाजीकडे आपल्या सैन्यासह जाऊन मिळाले.

१६७३ च्या सप्टेंबरपूर्वी मोगलांनी आदिलशाहा व कुतुबशाहा यांच्याशी तह केला व पठाणांचे बंड मोडले. औरंगजेबाला वेळ मिळताच त्याने बहादरखान, दिलेरखान व सिद्दी संबूल यांना मोठ्या सैन्यासह व विपूल सामग्री देऊन शिवाजीवर पाठविले. त्यामुळे आदिलशाहनेही शिवाजीवर बहलोलखानास रवाना केले; परंतु दरम्यान २७ जुलै १६७३ ला शिवाजी राजांनी सातारा घेऊन तेथून अमर्याद लूट रायगडावर नेली. त्यापूर्वी बहलोलखान व प्रतापराव यांचा बहलोलखानावर मोर्चा गेला. ६ मार्च १६७३ ला अण्णाजीपंताने भेद करून पन्हाळा घेतला आणि ९ मार्चला विजापुराजवळ बहलोलखान व प्रतापराव यांची लढाई झाली. ज्यामध्ये प्रतापरावाने विजय मिळविला. १ एप्रिल १६७३ ला परेलीचा किल्ला घेतला. याच सुमारास दिलेरखानासोबत संघर्ष झाला. ज्यामध्ये दिलेखानाचा पक्का बिमोड झाला व त्याचे या लढ्यात १००० पठाण व शिवाजीचे ४००-५०० लोक कामास आले. बहादूरखान याचवेळी कोकणात उतरणार होता; परंतु शिवाजीने ठिकठिकाणी पहारे ठेवल्यामुळे त्याला परत जावे लागले.

मोगलांची मोठी सेना दक्षिणेत येत आहे आणि तीने जर आपल्यावर आक्रमण केले तर आपले राज्य नष्ट होईल अशी भीती आदिलशाहा व कुतुबशाहा यांना वाटत होती. यामध्ये शिवाजी राजांचे राज्यच त्यांना वाचवेल असे वाटून त्यांनी जरी मोगलांशी तह केला होता तरी ते गुप्तपणे शिवाजीशी तह करून ही संरक्षणाची भली भक्कम फळी राखण्याकरिता शिवाजी महाराजांना मोठ्या रकमाही देऊ लागले. याउलट शिवाजी महाराजांनी आपले सैन्यबल वाढविले आणि हा गुप्तपणे झालेला तह गुप्तच ठेवण्याकरिता व विजापुरकरांच्या मैत्रीचा संशय येऊ नये म्हणून आदिलशाहीशी युद्धाचा खोटा प्रचार करण्यासाठी काही ठिकाणी लढाईचा देखावा केला. यावरून पठाणी सत्तांना स्थानिक सहकार नाहीसा झाला होता व त्यांची आपसांतील चढाओढ यामुळे त्यांच्या शाखेत एकवाक्यता राखण्यात मोठीच अडचण उत्पन्न झाली होती. त्यांचा

एकमेकांवर विश्वास नव्हता. उलट शिवाजी महाराजांच्या आश्वासनावर ते अवलंबून राहात हे लक्षात घेतले. म्हणजे हिंदवी स्वराज्यातील राजनीती शास्त्रशुद्ध व विश्वासार्ह झाली होती, असा निष्कर्ष वा. सी. बेंद्रे काढतात. अली आदिलशाहाच्या मृत्युनंतर खवासखानाने जरी शिवाजीशी मैत्रीने घेतले होते तरी बहलोलखान फुटून मोगलाच्याच साह्याला जात होता. प्रतापराव गुजर त्याच्या मागे लागला होता. प्रतापराव थोड्या लोकांसह जात असता अचानक बहलोलखानाच्या हाती सापडला व २४ फेब्रुवारी १६७४ रोजी झालेल्या संघर्षात मारला गेला.[१४८]

आनंदरावाने बहलोलखानाचा पाठलाग केला; परंतु त्याच्या मदतीस दिलेरखान आल्याचे पाहून आनंदराव परत फिरला. बहलोलखान त्याच्या पाठलागार्थ पळाला; परंतु कंटाळून पाठलाग सोडून तो व दिलेरखान परत फिरले. बहलोलखान नंतर कोल्हापूरला गेला. शिवाजी महाराजांनी १३ ऑक्टोबर १६७३ रोजी बंकापूर लुटले. आनंदरावाने बरेच आत जाऊन बहलोलखानाच्या जहागिरीपैकी बंकापुरापासून २५ मैलावरील पेंचगावची (संपगाव) लूट करून ३०० बैलावर ती लूट भरून नेली. बहलोलखान व खिदरखान यांनी प्रतिकार केला, २२ मार्च १६७४ ला लढाई झाली. खिदरखानाचा भाऊ व दिलेरखानाचा भाचा मारला गेला. आनंदरावाचा विजय होऊन ५०० घोडे आणि दोन हत्ती वगैरे लूट शिवाजीकडे पाठवून तो बालाघाटाकडे गेला व बहादरखानावरही बादशाहाची नाराजी होऊन त्यालाही परत दरबारी बोलाविले व रामसिंगला शिवाजी महाराजांशी तह करण्यासाठी पाठविले. या तहाचे मुख्य कारण म्हणजे मोगलशाहीतच पठाणांच्या बंडाचे संकट निर्माण झाले होते.

शिवाजी महाराजांनी २४ एप्रिल १६७४ रोजी कळंब घेतला नंतर राज्यभिषेकाच्या विधीत गुंतल्याने फारशी हालचाल झाली नाही; परंतु पावसाळ्याच्या छावणीसाठी बहादुरखान औरंगाबादेकडे जात असतांना वाटेत शिवाजी महाराजांनी त्याच्या लष्करावर छापा घालून त्याच्या छावणीची लुटमार केली.

शिवाजी महाराजांनी फोंड्याचा किल्ला सुरूंग लावून १७ एप्रिल १६७५ रोजी उडविला.[१४९] नंतर अंकोला, फडवाडी व सिवेश्वर घेतले. त्यानंतर ११ नोव्हेंबर १६७५ रोजी बहलोलखान खवासखानाने धरला. याचवेळी शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या तुकडीने आपला मोर्चा उत्तरेकडे वळविला. १६७४ च्या अखेरीस शिवाजी महाराजांचे सैन्य धरणगावाजवळ गेले.

यानंतर मोगलांनी शिवाजीशी तह घडवून विरोध शमवायचा प्रयत्न केला. ज्यानुसार शिवाजीने काही किल्ले द्यावे, मुलाला म्हणजे संभाजीला पाच-सहा हजारी मनसब घेऊन बादशाही नोकरीत पाठवावे आणि शिवाजीला औरंगाबादपासून भीमेपर्यंतचा सर्व प्रदेश मिळावा. या अटींवर शिवाजी मोगल तह ठरविणे चालू होते; परंतु औरंगजेबावर पक्का विश्वास नसल्यामुळे शिवाजी महाराज संभाजीला मोगली सेनापतीकडे पाठविण्यास तयार नव्हते.

मोगली सेनापती बहादुरखान विजापुरपासून अर्ध्या दिवसाच्या मुक्कामावर आला; परंतु तेथे युद्धात ४००० शिपायी पुष्कळ सामान व चार प्रसिद्ध सेनापती यांचा मृत्यू असे नुकसान झाल्याने तो सोलापूरकडे गेला. ही लढाई खवासखानाचा शत्रू बहलोलखानासोबत झाली. ही लढाई हलगीस झाली आणि यामध्ये इस्लामखान रूमी मारला गेला.

सारांश सांगताना बेंद्रे लिहितात की, मोगलांना दक्षिणेत साहाय्यक मिळविण्यात अपयश आल्याने आपला शत्रू जो शिवाजी त्याच्याशी तह करून आपल्या राज्यविस्ताराची सुरक्षितता राखण्याची पाळी आली. शिवाजीलाही मोगलांसारख्या कट्टर शत्रूशी तहाच्या बोलण्याला अर्धवट संमती देत वेळकाढूपणा करून आपले कर्नाटकचे राजकारण साधण्यास मोगली परचक्र आड येऊ न देण्याची काळजी घेणे जरूरी होते; परंतु हा तह कायम स्वरूपाचा असावा असे दोघांनाही बंधन नको होते आणि याचसाठी हा तह लोंबकळत ठेऊन औरंगजेबालाही दखनचे राजकारण साधावयाचे होते.[१५०]

१६७८ च्या सुरूवातीला बादशहाचे बोलावणे आल्यावरून बहादुरखान दिल्लीस गेला व बहलोलखानही वारला. कर्नाटकातील राजकारणांत कुतुबशाहाचा आदिलशाहाने घेतलेला प्रदेश कुतुबशाहाला कित्येक वर्षे परत घेता आला नव्हता. तो शिवाजीने घेतल्यामुळे व आदिलशाहीचे मांडलिक हिंदू राजेही आदिलशाहीपासून दूर केल्याने बहलोलखानानंतर विजापुरचा ताबा घेतलेले सर्जाखान व मसाऊदखान यांनी मोगली सेनापती दिलेरखान याला मिळून ८० हजार घोडदळासह शिवाजीविरूद्ध तयारी केली; परंतु गोवळकोंडेकरांशी संघनमत करून दखनच्या शाह्या व शिवाजी मिळून त्याला विजापुरच्या दक्षिणी पक्षांनीही संमती दिली. दिलेरखानाला दक्षिणेतून हाकलून काढण्याचे ठरविले. शिवाजी महाराज नंतर १० हजार स्वार त्याच्यावर पाठविणार होते; परंतु त्यापूर्वी शिवाजी कर्नाटकात असतांना १६७७ च्या जुलैत बहादुरखानाने आदिलशाहाचा लालदरगेचा किल्ला घेतला. ऑगस्टमध्ये रणमस्तखानाच्या विद्यमाने नळदूर्ग

घेतला. सप्टेंबरमध्ये मळेखिंडीस सर्जाखान, मसूदखान व भागानगरकर यांनी मिळून दिलेरखानाशी लढा दिला. मोगल निघून नळदुर्गाला गेले. नोव्हेंबरच्या अखेरीस मोरोपंत पेशवे यांनी नासिक लुटले.[१५१]

२५ फेब्रुवारी १६७९ रोजी शाहा आलम दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगाबादेत आला. दिलेरखानाने पावसाळा संपताच विजापुरच्या वजिरास शिवाजीवर चालून जाण्यासाठी आपल्याला साथ द्यावी म्हणून पन्हाळ्याखाली युद्ध देण्याची जोरदार तयारी केली. शिवाजी महाराजांनी आपल्या सरहद्दीवर १२००० घोडेस्वार आणून ठेविले. दिलेरखान, सर्जाखान इत्यादींनी अथणी लुटली. नोव्हेंबरच्या शेवटी शिवाजी महाराज पट्टागडावर होते. १६७९ च्या ऑक्टोबरमध्ये दिलेरखानाने विजापुरला वेढा दिला. तो १६८० च्या फेब्रुवारीत आदिलशाहा व मोगल यांचा सल्ला झाल्याने उठला. मोगलांनी विजापुरला वेढा दिला तेव्हा आदिलशाहाने जालनापुर जिंकले. दिलेरखानाच्या जहांगिरीत जाऊन लुटालूट, जाळपोळ चालविली. यामागचा शिवाजी महाराजांचा उद्देश सांगताना वा. सी. बेंद्रे म्हणतात की, दिलेरखानाच्या जहांगिरीच्या रक्षणार्थ येईल; परंतु दिलेरखान आला नाही व त्याने वेढा चालूच ठेविला. याठिकाणी शिवाजी महाराज व रणमस्तखान यांची लढाई झाली. या लढाईमध्ये सिदोजी निंबाळकर गोळी लागून ठार झाला. १६७९ च्या डिसेंबरमध्ये शिवाजी महाराजांनी धरणगाव, चोपडा व आसपासची महत्त्वाची गावे लुटली. या हल्ल्यात शिवाजीबरोबर १२००० स्वार होते. औरंगाबादमध्येही थोडी जाळपोळ केली. विजापुरचा वेढा उठल्यानंतर दिलेरखान पन्हाळ्यावर चालून येत होता. शिवाजीने आपल्या अनेक किल्ल्यावरून तोफा आणून त्या पन्हाळ्यावर सज्ज ठेवल्या होत्या. मोरोपंडिताच्या हाताखालचे सैन्य अद्यापही ह्याच सरहद्दीवर होती लागतील ते किल्ले घेण्यात गुंतले होते. त्यांनी हनुमंतगड घेतला व मुल्हेर घेण्याचे प्रयत्न चालू होते. या शेवटच्या धामधुमीची हकीकत शिवाजी महाराजांनी एंकोजीला लिहिलेल्या पत्रात विस्ताराने येते.[१५२]

संभाजी महाराज मोगलांकडे आपल्या पित्यावर नाराज होऊन गेले व नंतर पुन्हा परत आले. पिता-पुत्रांची भेट व संभाजीच्या मोगलांकडे जाण्यामागच्या कारणांची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणात 'छत्रपती संभाजजी महाराजांविषयीचे लिखाण' यात केली जाणार असल्याने येथे त्यावर विस्तारित माहिती दिलेली नाही.

४.१८ आदिलशाहीवर शिवाजी महाराजांचे पुन्हा आक्रमण :

आदिलशाहीवरील या आक्रमणाला आक्रमण म्हणण्यापेक्षा आदिलशाहीने मोगलांना जी शिवाजी विरूद्ध मदत करण्यास सुरूवात केली होती व त्यामुळे जी सरहद्दीवरील विशिष्ट स्थळांच्या संरक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला होता. त्या स्थळांच्या संरचणासाठी निवडलेला मार्ग होता असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

बहलोलखानाने मोगलांबरोबर मैत्री केल्यानंतर मोगलांनी कुतुबशाहा व शिवाजी यांच्या विरोधा मोहिम काढण्यासाठी बहलोलखानाला मदत करण्याचे ठरविले.[१५३] त्यामुळे आदिलशहीच्या शिवाजी राजांसोबत तह करण्याच्या ज्या वाटाघाटी चालू होत्या त्या फिसकटल्या. मोगलांनी कुतुबशाहीला आक्रमण करण्याची धमकी दिली. आदिलशाहाही त्याच्याबरोबर सामील झाला. आदिलशाहाने यापूर्वीच कुतुबशाहाच्या अधिकाराखालील बऱ्याच मांडलिकांची महत्त्वाची ठाणी जबरदस्तीने घेतली होती. त्यामुळे शिवाजी राजांची कुतुबशाहाने मदत मिळविण्यासाठी प्रयत्न केले आणि शिवाजी राजांना त्यांचे सैन्य व सरदार घेऊन आदिलशाहाने लुबाडलेला प्रदेश घेण्याबाबत करार केला. आपल्या हिंदवी स्वराज्याच्या सरहद्दीवरील संरक्षणाची व्यवस्था पेशवे व मंत्री यांच्यावर सोपवून शिवाजी राजांनी स्वतः जाऊन कुतुबशाहाची सन्मानाने मार्च १६७७ मध्ये भेट घेऊन कर्नाटकांत जाऊन आदिलशाही प्रदेशात आक्रमणास सुरूवात केली. याची माहिती पुढे शिवाजी महाराजांच्या दक्षिणदिग्विज किंवा कर्नाटकची स्वारी यामध्ये विस्ताराने येणार असल्याने येथे त्याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

जून-जुलै १६७७ मध्ये बहादरखानाने आदिलशाहाचा लाल दरगे कोट व जुलै-ऑगस्टात नळदुर्ग गड घेतला. दिलेरखानाला सुभा मिळाल्याने तो १६७७ च्या ऑगस्टमध्ये स्वारीसाठी दक्षिणेत उतरला; परंतु बहलोलखानाचे विरोधीपक्षीय सर्जाखान व मसुदखान हे देखिल कुतुबशाहास मिळून त्यांनी दिलेरखानाचा सप्टेंबरमध्ये पराभव केला. तेव्हा तो नळदुर्गास गेला. इ.स. १६७७ च्या अखेरीस बहलोलखान मरण पावला व त्याचा कारभार मसुदखानाच्या हाती आला. यामुळे साहजिकच दिलेरखान विजापुरावर स्वारी करण्याच्या मार्गाला लागला. शिवाजी महाराजांनी कर्नाटकातील बंदोबस्त हंबीररावाकडे सोपवून पावसाळ्यानंतर म्हणजे ऑक्टोबरमध्ये शिवाजी महाराज परत स्वराज्यात येण्यास निघाले व गदगला आले.[१५४] वलेबडीस वेढा घातला. देसाईणीबरोबर त्यांचे युद्ध झाले. नंतर इ.स. १६७८ च्या पावसाळ्यापूर्वी

म्हणजे जूनपूर्वी शिवाजी महाराज रायगडावर आले; परंतु दिलेरखान डिसेंबरमध्ये कूच करून आपल्या विजुरावरील स्वारीला निघाला होता.

३ एप्रिलला दिलेरखानाने भूपाळगड घेतला आणि ऑक्टोबरमध्ये त्याने विजापुरला वेढा घातला. जरी आदिलशाहीचा बराचसा प्रदेश कर्नाटकांतील लढ्यात शिवाजी महाराजांनी घेतला होता तरी आदिलशाही सरदारांनी मोगलांविरूद्ध शिवाजीच्या मदतीची अपेक्षा केली आणि त्यामुळे नोव्हेंबरमध्ये आदिलशाहा व शिवाजी महाराज यांच्यात तह झाला.

या तहानंतर दिलेरखानाला विजापुरचा वेढा उठवून परत आपल्या प्रदेशाच्या संरक्षणार्थ जावे लागावे म्हणून शिवाजी महाराजांनी दिलेरखानाच्या सुभ्यातील मोगली प्रदेशात जाऊन लूट व जाळपोळ करण्यासाठी आपली मोहिम सुरू केली. १६७९ च्या ऑक्टोबरमध्ये जालनापूर लुटले व इतर प्रदेशातही गोंधळ माजविला. रणमस्तखानाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात लढाई झाली; परंतु रणमस्तखानाचा पराभव झाला. संभाजी महाराजांच्या आदेशानुसार परत स्वराज्यात आले. हे समजताच महाराज प्रथम रायगडाला गेले व पन्हाळ्यास जाऊन पुत्राची भेट घेतली.[१५५]

शिवाजी महाराजांच्या आदिलशाहीवरील या आक्रमणाचे महत्त्व वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे सांगतात. या राजकीय घडामोडीत कुतुबशाहाने शिवाजीची मदत घेतल्याने गोवळकोंडेकरांच्या शत्रूला म्हणजे आदिलशाहाला त्यांच्या सरहद्दीपासून दूर केले व जिंजी व तंजावरच्या भागासाठी आदिलशाहाच्या शत्रुत्वाला वाव न देता त्याला दूर ठेवले गेले. मोगलही या काळातील लढ्यात एकट्याने मुकाबला करणे यशस्वी होणार नाही. म्हणून आदिलशाही सरदारांना बळजबरीने व त्यांच्या अडचणींचा फायदा घेऊन आपल्या बाजूला करून घेतले. यामध्ये त्यांना तात्पुरते यश मिळाले. कारण यामुळे मोगलांना बऱ्याच ठिकाणी अपयश मिळाले. याच काळात इंग्रजांचाही भ्रमनिरास होऊन शिवाजीच्या सामर्थ्याची जाणीव झाली व आरमारी शक्तीच्या श्रेष्ठत्वाचा आभास दूर झाला. शिवाजी महाराजांना यावेळी सर्वच शत्रुंशी लढावे लागले; परंतु शिवाजी महाराजांनी यावेळी दाखविलेले शौर्य आणि कार्यक्षमता यामुळे जवळ जवळ सर्वच शत्रुंना शिवाजीशी तह करण्याचाच मार्ग अधिक फायदेशीर व कमी भीतीचा किंवा नुकसानीचा वाटला. शिवाजी महाराजांनीही जेथे शांततेची खात्री पटली त्यांच्याशी तह करण्यास संमती दिली.

या काळातील लढ्यात पठाणांनी जातीयवादामुळे पुढे स्वामीभक्तीला विराम दिला. मात्र हिंदुस्थानातील मिश्र जाती समुहांनी वर्णविशेषाला महत्त्व न देता इस्लामी सत्ताच्या सैन्यांतील बिगर मुसलमानांनी जसा विशेष वर्णद्वेष भावना जागृत होऊ दिली नाही. शिवाजी महाराजांनी शहराच्या किंवा गावाच्या लुटीत जातीय दृष्टिकोनापासून आपली सेना दूर राखली हे विशेष लक्षात घेण्यासरखे आहे, असे वा. सी. बेंद्रे सांगतात. शिवाजी महाराजांच्या सैन्यात घोडेस्वरांमध्ये मुसलमान बरेच होते. असे तत्कालीन पत्रांत उल्लेख आलेले आहेत. असे असतांनाही शिवाजीच्या सैन्यांनी आपल्या एकीचे व निष्ठेचे दर्शन घडविले ही महत्त्वाची कामगिरी शिवाजी महाराजांच्या राजकारण पद्धतीमुळेच घडून आली यात थोडीसुद्धा शंका नाही असे बेंद्रे शेवटी स्पष्ट करतांना आपल्याला दिसतात.

४.१९ शिवजी महाराजांचा राज्याभिषेक

राज्याभिषेकपद्धती संदर्भात साधनांची चिकित्सा -

(१) गागाभट्ट व अनंतदेव भट्टाचे लिखाण :

बेंद्रे सर्वप्रथम गागाभट्ट व अनंतदेव भट्टांच्या लिखाणविषयी सांगतांना लिहितात की, या दोघांच्या प्रयोगातील तपशिलामध्ये बरेच साम्य आहे. कदाचित या गुरूबंधुनी हा प्रयोग एकत्र बसून तयार केला असावा असे भाषेच्या व प्रयोगाच्या सारखेपणावरून वाटते. मात्र अनंतदेव भट्टांनी हा विस्तार आपल्या 'राजधर्मकौस्तुभां'मध्ये प्रकरणात विभाजित केलेला असून त्याची विषयवारीने मांडणी केली आहे. याउलट गागाभट्टांनी त्यातील निरनिराळे विधी दिनवारीने सात दिवसात जसे करावयास पाहिजे होते तसे शिवाजी महाराजांच्या मुख्य पुरोहिताच्या मार्गदर्शनार्थ लिहून काढलेले आहेत. अनंतदेव भट्टांचे राजाभिषेकाच्या पौराणिक मंत्रांचे स्वतंत्र प्रकरण आहे; परंतु त्यातील काहीही गागाभट्टांनी न घेतल्यामुळे "शिवराजाभिषेक प्रयोग:" पूर्णपणे वैदिक आहे. गागाभट्टांनी आपल्या पोथीची रचना विशिष्ट प्रकारे केल्याने शिवराजाभिषेकांत कोणते विधी कोणत्या दिवशी झाले? हे सहज समजून येते. विधीच्या संपादनांचा कालनिर्णयही आपोआप होतो. या पोथीत प्रसंगानिमित्ते "शिववर्मण:' असा उल्लेख दोन ठिकाणी आला आहे. शिवाय छत्रपतींच्या या राजाभिषेक कार्यात 'नवमी मंगळवार' हा निषिद्ध दिवस येतो. तोही तसाच क्रमवारीने रिकामा सोडल्याचा पुरावा या पोथीत आहे. यावरून ही पोथी शिवाजी महाराजांच्या राजाभिषेक कार्यासाठी लिहिली हे उघड आहे.[१५६]

यानंतर पुढे वा. सी. बेंद्रे गागाभट्टांच्या 'राजाभिषकप्रयोग' ची पोथी कशी मिळाली हे सांगताना लिहितात की, त्यांना बिकानेर राज्याच्या 'राज्य हस्तलिखती-संग्रहात' आढळली. पण त्याची मूळप्रत त्यांना पाहावयास मिळाली नाही; परंतु श्री मनूभाई मेहता तेथे दिवाण असतांना त्यांच्या सौजन्याने तेथील पंडिताकडून नकल घेतलेली प्रत (१४ जून १९४३ ला) त्यांच्या हाती आली. तिच्यावरून मुख्य हस्तलिखितेबद्दल अधिक चिकित्सा करणे शक्य नाही असे ते सांगतात.[१५७]

(२) बखरी :

शिवराजाभिषेकासंदर्भात बखरींना या विधीचा तपशील मुळीच माहित नसावा असे सांगून बेंद्रे पुढे लिहितात की, इतर राज्याभिषेक उत्सावासारखा तो सामाजिक, केवळ दरबारी थाटाचा समारंभ नव्हता. शिवराजाभिषेक हा मुख्यत्त्वे धार्मिक विधी होता.

अ] सभासद बखर (कृष्णाजी अनंत सभासद) :

सभासदाने राजाभिषेक विधीच्या अनुक्रमांत व इतरही बऱ्याच चुका केल्या आहेत. अतिशयोक्तिने दानधर्म विधी सांगितला आहे. तसेच बेंद्रे पुढे म्हणतात की, त्याने लिहिल्याप्रमाणे राजाभिषेकाचा विधी चार मास चालने अशक्य होते. त्याने असे लिहिल्याने बेंद्रेना अशी शंका येते की, सभासदाने जिजाबाईच्या उत्तरक्रियेचा दानधर्मही राजाभिषेकातच धरला असावा.[१५८]

ब] चित्रगुप्त बखर :

चित्रगुप्ताने सभासद बखरीतील मजकुरच आणखी अतिरंजित केला आहे असे बेंद्रे सांगतात.

क] मल्हार रामराव चिटणीस :

मल्हार रामराव चिटणीसाने विधी विस्तारपूर्वक सांगण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु तो प्रतापसिंहाच्या वेळी जमविलेल्या माहितीवरून म्हणजे 'सिद्धांतविजय' व त्यातील परिशिष्टांत दिलेल्या राज्याभिषेक विधीस धरून आहे. मल्हार रामरावांनीच कोणत्या तरी जुन्या टिपणांवरून काही तिथ्या-मित्या दिल्या आहेत. तसेच त्याने ज्या सिंहासनाचे वर्णन केले हे वर्णन तत्कालीन वर्णनाची मुळीच जुळत नाही.[१५९]

यानंतर वा. सी. बेंद्रे यांनी मराठी साम्राज्याची छोटी बखर, एक्याण्णव कलमी बखर, शेडगांवकर भोसले यांची बखर, शिवदिग्विजयांतील आणि चिटणीस बखरीत राजाभिषेकासंबंधी

आलेल्या वर्णनांचा तपशील दिला.[१६०] या बखरकारांनी यावेळी घडलेल्या घटनांची कशी गल्लत केली ते दाखविले.

बखरीतील तपशलाची बेंद्रेंनी केलेली चिकित्सा :

(१) एकाच प्रकारच्या, पण निरनिराळ्या वेळी घडलेल्या प्रसंगाची गल्लत :

बेंद्रे लिहितात, बखरकारांच्या लिखाणात कालक्रमाच्या ज्ञानाभावी एकाच प्रकारच्या पण निरनिराळ्या वेळी घडलेल्या प्रसंगाची गल्लत आढळते. हे सर्व प्रसंग मिळून एकच घटना असे समजून वर्णन करतात. तसेच धर्मशास्त्राप्रमाणे राजाभिषेक करण्यात काही क्षुल्लक अडचणी आल्या. त्या अडचणींशी मागील व नंतरच्या यातायातींच्या तंट्यांचे प्रसंग जोडून त्या सर्व ग्रामण्यांच्या अनुषंगाने शिवाजी महाराजांविरूद्धही एक कल्पित फड उभा केला गेला आहे. काही बखरकार हा ग्रामण्यांचा घोळ वर्ष-सव्वावर्षे चालला होता असेही समजतात. आपण ज्या गोष्टी करावयाच्या त्यांचा बभ्रा होऊ द्यावयाचा नाही असा महाराजांचा स्वभाव होता.

इंग्लिश फॅक्ट्री रेकॉर्डमध्ये अशी कितीतरी बातमीपत्रें आहेत की रायगडावर गेलेल्या त्यांच्या मंडळींना असे दिसून आले की, शिवाजी महाराजांच्या सामान्यही हालचालीची नक्की बातमी सरकारकूनांनाही लागत नसे. मग इतरांची काय कथा? असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, याशिवाय रायगडावर केवळ कामापुरतेच लोक जात व परत पाचाडांस मुक्कामास येत. रायगडावर फक्त किल्लेकरी मंडळी व महाराज नसले तर संभाजी किंवा सरकारकून असे. ब्राह्मणभिक्षुकांची त्यावेळी गडावर किंवा पाचाडस वस्ती नव्हती. तेथे मंडळी राहात ती सर्व नोकनेशांतील मंडळींची कुटुंबे होती. ही नोकरपेशी माणसे महाराजांविरूद्ध बोलू शकतील अशी तत्कालीन परिस्थिती नव्हती. तेव्हा ब्राह्मणांनी जमावाने महाराजांस विरोध करणे शक्य नव्हते. सहस्त्र ब्राह्मणांनी जमावाने महाराजांस विरोध करणे शक्य नव्हते. सहस्त्र ब्राह्मणांचा भरणा कितीसा असेल? याची कल्पना करीता येईल. याकाळी ब्राह्मण मंडळी मुलकी नोकऱ्यांच्या मागे होती. सारांश, ग्रामण्याची भाषा बोलून विरोध करणे त्याकाळी ब्राह्मणांना शक्य नव्हते.[१६१]

(२) शिवाजी महाराज रजपूत कुळातील असण्याबद्दल स्थानिक लोकांत शंका वाटण्याचे कारण नव्हते :

शिवाजी महाराज रजपूत कुळातील होते याबद्दल स्थानिक लोकांत शंका वाटण्याचे कारण नव्हते, याचे स्पष्टीकरण देतांना बेंद्रे लिहितात, शाहाजी राजे 'आपण तो रजपूत' म्हणून

अभिमानाने लिहितच असत. हा उल्लेख करण्यात त्यांचा मुख्य आशय असा असे की, त्यांचे कुळे शहाण्णव कुळातील मराठ्यांत अस्सल क्षत्रीय रजपूत घराणी होती. त्यातील त्यांचे एक घराणे होते हे भोसले घराणे. मूळ शिसोदे घराण्याची शाखा होती. हेही इ.स. १६७३ पूर्वी सर्वत्र जाहीर होते. भूषण कवीने इ.स. १६७३ मध्ये पूर्ण केलेल्या व त्यापूर्वी दोन-तीन वर्षे प्रसंगानुरोधाने रचलेल्या 'शिवराजभूषण' काव्यात भोसले कूळ हे 'शिसोदिया'ची शाखा असल्याचे म्हटले आहे. ते पुढीलप्रमाणे -

"महा वीर ता बंस में भयो एक अवनीस।
बिरद "सिसौदिया" दियो ईस को सीस ।।५।।
ताते सरजा बिरद भो सोमित सिंह प्रमान।
रत्न भूसिलासु "भोसिला" आयुष्यमान खुमान।।८।।
साहस अपार हिदुवान को अधीर धीर।
सकल "सिसौदिया" सपूल कूल को दिया।।
लोण कहै शमि बच्छिन जेय सिसौदिया रावरे हाल ठये है।।३१५।।

कवी भूषणला सिसोदिया घराण्याची महती माहित असल्याशिवाय शिवरायाचे नाव त्याने सिसोदिया घराण्यात जोडले नसते. यामुळे बेंद्रे म्हणतात की, अशा परिस्थितीत या जगजाहीर गोष्टीचा शोध घेण्यास राजपुतान्यांत जाण्याची कांही एक आवश्यकता नव्हती.

गागाभट्टांना रजपूतांच्या आचारविचारांची माहिती होती. हे त्यांच्या "व्यवहारनिर्णया" ग्रंथांतील उल्लेखावरून स्पष्ट आहे. भोसले घराणे "सिसोदिया"चा वंश हे शिवाजीराजे पुण्यास येण्यापूर्वी जयराम कवीलाही माहित होते. जयराम कवी आपल्या "राधामाधवविलासचंपू" शाहाजी राजे यांना 'सिसोदिया अवतंस' म्हणतो. शिवाय शाहाजी राजे यांचा जेष्ठ मुलगा संभाजी याला "क्षत्रीय गोत्र" म्हटले असून दुसरे ठिकाणी त्याचे "यौवराजाभिषेकपवित्रगात्रो राजपुत्रः" असे त्याचे वर्णन केले आहे. "राधामाधव-विलासचंपू"तच प्रभाकरभट्टाचे घराणे पूर्वीवार भोसल्यांचे पौरोहित्य करणारे असे म्हटले आहे. व कागदपत्रांतही तसे उल्लेख आहेत. याच घराण्यांतील पुरोहिताने जिजाबाईचा "तुलादानविधी" सोनाजीपंताच्या तुलादानाबरोबर महाबळेश्वरी शाहाजी राजे वारल्यानंतर सुमारे एक वर्षाने म्हणजे पौष वद्य अमावाशा शके १५८६ रोजी केला होता. तिला क्षत्रीयांचे अधिकार आहेत. हे प्रभाकरभट्ट व त्याचा मुलगा

बाळभट्ट याला पूर्ण माहित होते. सारांश, फड पडलाच असेल तर तो फक्त सरकारकुनात; परंतु तोही भोसले (सिसोदिया रजपूत) क्षत्रीय घराण्यांतील आहेत किंवा नाहीत याबद्दल पडण्याचे कारण नव्हते, असे वा. सी. बेंद्रे ठामपणे सांगताना दिसतात.

गागाभट्टांचा राजाभिषेक निर्णय -

शिवाजी गागाभट्ट संबंध राजाभिषेकापूर्वीचे :

गागाभट्ट व शिवाजी महाराज यांचा राजाभिषेकापूर्वी जो संबंध आला त्याबद्दल काही विपर्यास केला गेला असल्याने त्याविषयी चर्चा करणे जरूरी आहे असे सांगून बेंद्रे लिहितात, या दोघांचे संबंध नीटसे माहित नसल्याने बखरकार शिवाजी व गागाभट्ट यांचा नवीनच संबंध आला असे समजून लिहितात. गागाभट्टास राजाभिषेकासाठी आणण्याचा आणि त्यांचे मन वळवून तो विधी साजरा करण्यास, उद्युक्त करण्याचा खटाटोप करण्यास, त्यास द्रव्य लालूचही दाखवावी लागली असे भासवितात. गागाभट्टाचे घराणे दक्षिणेतील असून पैठणचे अनंतदेव भट्ट हे त्यांचे गुरूबंधु होते. त्यामुळे ते अधुनमधून पैठणास येत असत. गागाभट्टाचा कोकणच्या सामाजिक वादांशीही पूर्वी बराच संबंध आला होता. शेंडे-गोळक यांच्यावरील ग्रामण्यानिर्णयांत त्यांचा प्रथम संबंध आढळतो. त्यानंतर गागाभट्ट कोकणात इ.स. १६६३ मध्ये आले तेव्हा इ.स. १६६४ च्या सुरूवातीलाच श्येनवी जातीच्या भांडणाचा निर्णय त्यांनी अनेक काशिस्थ व महराष्ट्रातील पंडित उपाध्याय इत्यादिकांची, शिवाजी महाराजांच्या विनंतीवरून राजापुरांत, सुभा करून दिला. तो देतांना इंदोरहून आधारग्रंथ येईपर्यंत तरी त्यांचे वास्तव्य इकडे झाले होते. बरोबर अनंतदेवभट्टही होते. त्यानंर कायस्थ प्रभूंबाबत निर्णय इ.स. १६६९ ते १६७२ मध्ये दिले. "कायस्थधर्मप्रदीप" ग्रंथ लिहून त्यांच्या शोडब संस्कारांच्या अधिकारांचे विस्तृत विवेचन केले. याही निर्णयात "सदगुरू अनंतदेवभट्ट स्वामी"चा संबंध असल्याचा रघुनाथ पंडितरावांनी उल्लेख केला आहे. या निर्णयावरून यातीयातींच्या धर्म व्यवहाराबद्दल त्यांची किती प्रागतिक प्रवृत्ती होती हे सुस्पष्ट होते असे सांगून गागाभट्ट व शिवाजी महाराज यांची इ.स. १६६३ मध्ये तरी चांगलीच ओळख झाली होती. त्यांच्या "श्येनवीजातिनिर्णया"स "शिवप्रशस्ती" जोडण्याइतका शिवाजी राजांविषयी त्यांना आदर वाटू लागला होता. यात शंका नाही असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. गागाभट्टांनी लिहिलेल्या प्रशस्तीचा उल्लेख करतात. ज्यामध्ये गागाभट्ट शाहाजी राजे यांची स्तुती करतांना त्याना राजकुलांतील व नृपती अशी विशेषणे लावतात.[१६२]

शिवस्तुतिविषयी बेंद्रे लिहितात, शिवस्तुतिचाही विचार केला तर या प्रशस्तीनंतर दहा वर्षांनी भोसले घराणे क्षत्रीय आहे. हे पटविण्यासाठी धावपळ करण्याची गागाभट्टांना खास गरज नव्हती. यानंतर शिवाजी महाराज आगऱ्याहून निसटून वाराणसीत गेले. तेव्हा दोनच वर्षांपूर्वी घनिष्ठ संबंध जडलेल्या गागाभट्टांची भेट शिवाजी महाराजांनी घेतली असणे पूर्णपणे संभवते. त्यानंतर पत्रव्यवहारही झालेला आहे. शिवाय इ.स. १६७३ अखेरपर्यंत शिवाजी राजांचा लौकिक सर्वतोमुखी झाला असता. हिंदुधर्माभिमानी गागाभट्टांना काशीस याची दखल नसेल असे म्हणता येणार नाही असे बेंद्रे म्हणतात. बेंद्रे पुढे सांगतात की, गागाभट्ट व शिवाजी महाराज यांना एकमेकाविषयी चांगलाच आदर होता आणि गागाभट्ट आपल्या गुरूबंधुकडे आल्यानंतर महाराजांची भेट घेतल्याशिवाय राहिले नसावेत. आपल्या दौऱ्यात राजेरजवाड्यादि यजमानांची भेट घेण्याचा शास्त्रीपंडितांचा त्यावेळी परिपाठ होता. गागाभट्ट सहज दक्षिणेत आले असे सभासद सांगतो. "शिवराज्याभिषेककल्पतरुं"तील निश्चळपुरीही तेच सांगतो. तसेच थोर पंडितांचे आगमण झाल्याचे कळताच त्यांना सन्मानाने निमंत्रण देऊन त्यांची पूजा करणे हा त्या काळी एक शिष्टाचार होता. गागाभट्ट नाशिकवरून पैठणला गेले. तेथे त्यांना शिवाजी महाराजांकडील निमंत्रण मिळाले. या गुरूबंधुच्या मनात तेथेच ही राजाभिषेकाची कल्पना आली. वा. सी. बेंद्रे सांगतात की, गागाभट्टाचे आगमण मात्र इ.स. १६७३ च्या अखेरीस झाले असावे. त्यानंतर सभासदकार लिहितो, त्याप्रमाणे गागाभट्टांनीच "मराठा राजा छत्रपती व्हावा असे चित्तांत आणिले" व त्यानुसार बोलणे झाले.

राजाभिषेकाला झालेल्या विरोधाची वा. सी. बेंद्रे यांनी केलेली चिकित्सा :

१] वा. सी. बेंद्रे म्हणतात आर्य संस्कृत्यनुरूप हिंदवी स्वराज्याची इमारत उभारिली गेलेली पाहून गागाभट्टांसारख्या विद्वान व अत्यंत प्रागतिक पंडिताला या मंदिरात राज्यसिंहासनाची न्याय व धर्मशास्त्राप्रमाणे सविद्य प्राणप्रतिष्ठा करण्याची गरज व महत्त्व पटल्यास व ती घडवून आणण्याची आतुरता वाटल्यास काही नवल नाही. त्यात त्यांना त्यांच्या गुरूबंधुचा म्हणजे अनंत देवभट्टांचाही पाठिंबा मिळाल्याचे दिसते. सभासद सांगतो, "गागाभट्टांनी आपला विचार सांगितला व तो राजियास मानवला" जे सरकारकून स्वराज्यनिष्ठ होते त्यांना या विचारांत श्रेष्ठ मानप्रतिष्ठेचे बीज दिसल्याचे आनंद झाला; परंतु स्वार्थनिष्ठ मंत्र्यांना मात्र जे वर्णाश्रमधर्माच्या नावाखाली आपण शासनात असल्याचे माणून स्वैराचार करीत होते. त्यांना

आपल्या जन्मजात स्वातंत्र्याला धोका उत्पन्न होत असल्याची जाणीव झाली. गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांच्याशी शास्त्रार्थाने वाद घालण्याइतकी त्यांच्याजवळ विद्याही नव्हती व बुद्धीही नव्हती. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारात आणखी एक मराठ्यांची जमात शह देणार याचीही त्यांना खात्री वाटू लागली. या भीतीने काही जातिनिष्ठ सरकारकुनांनी शिवाजी महाराजांच्या प्रचलित आचारधर्मातील वैगुण्यांवरून तांत्रिक अडचणी उभ्या करण्याचा प्रयत्न केला असणे संभवनीय आहे; परंतु राजाच्या मनात भरलेल्या गोष्टीस प्रत्यक्ष विरोध करणे व त्याचबरोबर गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांच्याशी तोंड देणे हेही तितकेच दुर्घट व अनर्थावह होते. हे जाणून त्यांनी जुळते घेण्याचा प्रयत्न केला असावा. असे सांगून बेंद्रे म्हणतात, "जो काही विरोध झाला असेल तो अप्रत्यक्ष किंवा वादविवादात्मक असावा."[१६३]

२] काही बखरकरांच्या मते परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली. त्यामुळे पृथ्वीवर क्षत्रीय वर्णच राहिला नाही. ज्याचे वीस प्रयत्न सर्वस्वी यशस्वी झाले नाहीत. त्याचा एकविसावा प्रयत्न तरी कितपत सफल झाला म्हणून समजावयाचे? असा प्रश्न बेंद्रे विचारतात व सांगतात ही विचारसरणी मुळीच तर्कशुद्ध नाही. इतिहासाला तर धरून नाहीच नाही. शिवाय बाल क्षत्रीय रामचंद्र की ज्याला सर्व भारतात पूर्वापार मान्यता आहे. त्याने धनुष्यबाण हिसकावून घेऊन परशुरामासच कायमचे नामोहरम करून टाकल्यानंतरही परशुरामाने पृथ्वीत एकही क्षत्रीय राहू दिला नाही हे म्हणणे हास्यस्पद होते. त्यामुळे त्यांना आपला विरोध इतक्या हीन पातळीवर नेण्याचे धैर्य झाले नाही. शिवकालीन कागदांमध्ये या मुद्यावंर कोठेच भर दिलेला नाही. उलट "दिनकरोद्योत" वगैरे शिवकालीन शास्त्रग्रंथात चार वर्णाचे अस्तित्व मानले आहे. प्रयोगादि वैदिक कर्मावरील पोथ्यांतूनही चारी वर्णांचा समावेश केलेला आहे. ही परशुरामाची भाकडकथा खरोखरच वादांत आली असती तर निदान तेथील लोकांच्या समाधानार्थ तरी परशुरामाची पूजा गागाभट्टांनी गाळली नसती. तसेच निश्चळपुरीला कुलदेवता, ग्रामदेवतांत परशुरामाचा समावेश न करिता शिवाजी महाराजांकडून पूजा करवून घेण्यात परशुरामाला मानणाऱ्या लोकांविरूद्ध वर्तन करण्याचे धैर्य झाले नसते. शिवाजी महाराजांनीही परशुराम क्षेत्रांतील या शत्रुदेवाच्या दर्शनाची यात्किंचितही अपेक्षा केली नसती असे सांगतात.[१६४]

३] सरकारकून मंडळींनी ज्या तांत्रिक अडचणी दाखविल्या त्यातील मुख्य म्हणजे -

(अ) संस्कारलोपाची ही बाब त्यावेळी सर्वच जातींच्या पुढे होती. शिवाजी महाराजांचा व्रतबंध झाला नव्हता. ज्याअर्थी हा मुख्य संस्कार झालेला नाही त्याअर्थी कूल क्षत्रीय असेल तरी आचाराने शूद्र झाले आहेत; परंतु महाराजांचे मौजिबंधन राजाभिषेकापूर्वी केल्यास 'देवकालविप्लवा'ने जडलेला हा दोष नाहीसा होऊन ते छत्रसिंहासनास अधिकारी असे शुद्ध क्षत्रीय होतील असा गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांचा अभिप्राय मान्य झाला.

(ब) दुसरी अडचण आली की, क्षत्रीयांच्या उपनयानसंस्काराची कमाल मर्यादा बावीस वर्षेच आहे आणि महाराजांचे वय अधिक झाले आहे. अर्थात यातींचेही लोप झालेले संस्कार पुन्हां सुरू करण्यास निर्णय देणारे गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांनी प्रायश्चिताची तोड काढून दिली आणि शास्त्रार्थही दिला असला पाहिजे.

(क) तिसरी अडचण म्हणजे छापे वगैरे घालतांना महाराजांकडून ब्रम्हहत्याही झाली असावी, त्यास शुद्धि नाही; परंतु गागाभट्टांनी 'मात्स्या'च्या आधाराने 'तूलादाना' व्यतिरिक्त 'तूलापुरूषदानाने' हा दोष नाहीसा होतो हे सिद्ध केले. गागाभट्टांचा आजा विख्यात नारायणभट्ट यांनी हा प्रयोग-ग्रंथ पूर्वी तयार केलेला होता. अर्थात या प्रायश्चितविधीची आयत्यावेळी सर्वसमाधानार्थ आवश्यकता भासल्याने राजाभिषेकाच्या महोत्सवविधीत या प्रायश्चित विधीचे गालबोट लावून घेण्यास गागाभट्टास तयार व्हावे लागले. या वादविवादाची माहिती एका डच पत्रात येते. हा वेंगुर्ल्याचा डच वाखारवाला आपल्या १३ ऑक्टोबर १६७४ च्या पत्रात लिहितो की, "...Susay (Shivaji).... said that he could not be crowned until he had abandoned his present caste of Bhosla and taken the caste of kettary (Kshatriya) and it was fitting that they should induct him into that caste. Thereupon the learned men answered that could hardly be as his ancesters had always been Bhnslas. Suasy (Shivaji) replied that the Bhonslas were descended from the kettary (Kahatriya) caste and that he wished could ceertainly be done. So the other party, taking into consideration that Suasy (Shivaji) could not be Crowned unless he first became a kettary (Kshatriya), and that he had promised

not to act or rule byrannically and badly as before, on the ८th June (New Style) last with grear ceremony, they granted him the caste of kettary (Kshatriya), and intended also to initiate him into the rules of the caste, but he demanded to be taught the Brahman rule. This however they refused, but on of the chief among them completed..."

शिवाजी महाराजांच्या दरबारात काही कऱ्हाडे व श्रृंगारपुरचे पंडित होते; परंतु ते सर्व शिवाजीचाच पुरस्कार करणारे होते. त्याच्याशिवाय तेथे कोणी विद्वान ब्राह्मण नव्हते की जे गागाभट्टांशी वाद करू शकतील. त्यामुळे विशेष भानगड न होता हा राजाभिषेक विधी गागाभट्टांनुसारच पार पडला असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१६५]

राजाभिषेकाची आवश्यकता का होती? याबद्दल वा. सी. बेंद्रे यांनी सांगितलेले मुद्दे-

(१) वा. सी. बेंद्रे राजाभिषेकाच्या आवशकतेसंदर्भातील कारणांचा शोध घेतांना पहिला मुद्दा सांगतात की, छत्रसिंहासनाच्या धर्मसिद्ध प्रतिष्ठेने हिंदवी राजसंस्थेला सांस्कृतिक, राजकीय आणि नैतिक अथवा सामाजिक श्रेष्ठ दर्जा व स्थैर्य प्राप्त करून देणे हे उद्दिष्ट या राजाभिषेकामागे होते.

(२) वर्णाश्रमर्धाच्या आचार वैशिष्ट्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या अडचणी दूर होणार होत्या. हा प्रत्यक्ष व फार महत्त्वाचा फायदा होता असे सांगून याचे स्पष्टीकरण बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात. ते सांगतात यावेळी राज्य म्हणजे संपादिलेली लहान मोठी जहांगीर म्हणून समजली जात होती असे लहान मोठे जहांगीरदार बरेच होते. महाराजांचे खास व्याही जावईही राजे म्हणवून घेणारे जहांगीरदार होते. राज्यांतील नियंत्रणाला ही परिस्थिती घातक होती. राजकारभारांत सुसूत्रता आली नसती. शिस्तीने कारभार चालण्यास अडचणी आल्या असत्या. त्या दूर करण्याची आवश्यकता पूर्वीच भासू लागली होती. राजा या शब्दाने राजसंस्थेचा प्रतिनिधी म्हणून जो सहज आदर किंवा पूज्यभाव उत्पन्न व्हावयास पाहिजे होता तो होत नसे. राजाभिषेकविधीने मात्र महाराजांना वर्णाश्रमधर्मपद्धती प्रमाणे आपोआपच श्रेष्ठ स्थान प्राप्त होऊन छत्रचाभरयुक्त अधिकाराने महाराजास वेगळं स्थान व निराळी कर्तबगारी व्यक्त होऊ लागली. सभासद लिहितो त्याप्रमाणे "मऱ्हाटा पातशाहा येवढा छत्रपती झाला ही गोष्ट काही सामान्य नाही." हीच

राजाभिषेकाची खरी कामगिरी. राजे म्हणविणाऱ्या मराठ्यांना आपल्या सारख्याच एका राजाचे नोकर होण्यात किल्मिष वाटत होते. ते दूर होणे हिंदवी स्वराज्याच्या संघटनेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक होते ते साधले.

(३) राजाभिषेकामुळे अजून एक अडचण दूर होणार होती. ती म्हणजे ब्राह्मण गुन्हेगारांच्या शासनाबाबतचे परावलंबित्व. कोणताही वाद ब्राह्मणांनी उपस्थित केला तर शिवाजी महाराजांना निर्णय घेण्याला रूढीने मान्यता नव्हती. ब्रम्हवृंदास जमवून किंवा काशीस्थ ब्राह्मणांकडून सर्व वाद तोडवावे लागत. तत्संबंधीची आज्ञा पंडितरावाच्याच नावाने काढणे भाग असे. इतर जमातींना त्यामुळे ताप होई. त्यांचेवर अन्यायही होत असे.

सारांश छत्रसिंहासनाची प्राणप्रतिष्ठा करून साधिकार राजपद मिळविण्याखेरीज श्रेष्ठ यातींतील गुन्हेगारांना शासन करण्याचा अन्य उपाय राहिला नव्हता. ही राजप्रतिष्ठा झाल्यानंतर मात्र शिवाजी-संभाजी राजांनी आपल्या न्यायाधिशांकडून किंवा कारकून-सरकारकूनांकडून चौकशी करवून अथवा जातीने चौकशी करून कडक शासन देण्यात मागे पुढे पाहिले नाही. राजाभिषेक होताच अगदी पंधरा दिवसातच शिवाजी महाराजांनी यातीधर्माच्या व्यवस्थेबद्दल आज्ञापत्रे आपल्या नावाने काढली आहेत. सारांश, गागाभट्टांची सूचना राजकारभाराच्या दृष्टीने अत्यावश्यक व महत्त्वाची असल्याने पत्नीविरह शोककालांतही शिवाजी राजांनी राजाभिषेकाच्या सांगतेची सिद्धता करविली.[१६६] असे बेंद्रे सांगताना आपल्याला दिसतात.

राजाभिषेकाची पूर्व तयारी :

गागाभट्ट दक्षिणेत आले तत्पूर्वी त्यांच्या मनात या राजाभिषेकाचा विचार आलेला नसावा. नाही तर ते प्रयोगाच्या तयारीने आले असते असे सांगून वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात, गागाभट्ट इ.स. १६७३ च्या पावसाळ्यानंतर प्रवासास निघाले असावेत. नाशिक त्र्यंबकेश्वरास इ.स. १६७४ च्या प्रारंभी पोहचून नंतर ते आपल्या गुरूबंधुकडे पैठणास गेले. तेथून रायगडास गेले. राजाभिषेकाचा निर्णय देऊन पुन्हा पैठणला परतले. तेथे पुरातन ग्रंथाधारे 'राजाभिषेक प्रयोगः' व 'तुलापुरूषदानविधि' या दोन पोथ्या तयार केल्या. परत रायगडावर विधिसाठी गेले.

निश्चळपुरीने या संदर्भात केलेल्या वर्णणाचा पुरावा बेंद्रे येथे देतात, तो म्हणजे -

"स तु पूर्वजकीर्त्याप्तमाकीर्तिः स्वतश्च हि।

तथैव तमपि ज्ञात्वा कारण कृतवान् शिवः ।।३५।।

आगते सविधे तस्मिनभिषेकाय उद्यतः।

राजराजः शिवः साक्षादादरं कृतवान्मुदा।।३६।।

गागाभट्टचे हे पुनरागमन महाराजांची स्त्री वारण्यापूर्वी महिना-दिडमहिना झाले असावे. म्हणजे गागाभट्ट प्रथम इ.स. १६७३ च्या शेवटी किंवा इ.स.१६७४ च्या आरंभी भेटेले व राजाभिषेक करण्याचे ठरवले. नंतर ग्रंथाधारे प्रयोग तयार करण्याकरिता अनंत देवभट्टांकडे गेले. पैठणहून रायगडास १६७४ च्या फेब्रुवारीत परतले. महाराजांची स्त्री काशीबाई १६ मार्च रोजी वारली, असे नारयण शेवण्याच्या रायगडाहून लिहिलेल्या पत्रावरून दिसते असे बेंद्रे सांगतात.

तसेच जरी ही आपत्ती येऊन मोठीच अडचण निर्माण झाली होती तरी राजाभिषेकाची तयारी मात्र चालूच होती. नारायण शेवणी रायगडावर २९ मार्चला आला व तो तिथे पाच दिवस राहिला होता. तेथे गेल्यावरच त्याला राजाभिषेकाची तयारी चालल्याची खबर लागली होती व त्याला जी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष माहिती मिळाली ती त्याने आपल्या पत्रात देली आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१६७]

राजाभिषेकावेळी जी गुप्तता राखली गेली त्याविषयी वा. सी. बेंद्रे म्हणतात की, ही गुप्तता राखणे राजकीयदृष्ट्या आणि विशेषतः इस्लामी सत्तांच्या या बाबतींतील हळुवारपणाचा विचार केल्यास आवश्यक होते. राजाभिषेकाची तयारी करण्यास मार्चपूर्वीच सुरूवात झाली होती. नद्यांचे व सागरांचे पाणी जमविण्यासाठी महाराजांनी आपले लोक रवाना केले. राज्यांतील दूरवरच्या ब्राह्मणांना निमंत्रणे देऊन निरनिराळ्य वेदांचे व शाखांचे निष्णांत पढिक ब्राह्मण मिळविण्याची खटपट सुरू झाली. कलाकुसरीचे सिंहासन घडविण्यास वेळ लागेल म्हणून ते काम आधी चालू केले. ह्या सर्व कामास कालावधी लागणारा होता; परंतु गागाभट्टांच्या प्रथम भेटीनंतर सर्व बेत ठरल्यामुळे आणि राजाभिषेकविधी चातुर्मासापूर्वीच उरकून घेणे आवश्यक झाल्यामुळे अगदी शेवटचे मुहूर्त धरणे प्राप्त झाले. त्यामुळे संभाजीच्या वृतबंधनाचा योग सहा महिने पुढे ढकलावा लागला. तसे पाहिले तर महाराजांचे वृतबंधन व पत्नीशी पुन्हा समंत्रक विवाह करणे ते मध्यंतरीच्या काळात उरकून घेता येण्यासारखे होते; परंतु कौटुंबिक व राजकीय अडचणी निर्माण झाल्याने ते विधी तहकूब ठेवून अगदी शेवटच्या दिवशी करवून घेतले.

२४ फेब्रुवारीला प्रतापराव मारले गेले. महाराजांचा एक हाथ मोडल्यासारखे झाले. ही वार्ता येते तोच महाराजांची पत्नी काशीबाई हिचा आजार वाढला. ती पुढे १६ मार्च रोजी वारली.

तेरावे होईपर्यंत म्हणजे २८ मार्चपर्यंत रायगडावर राहणे भाग पडले. नंतर त्यांना चिपळोणला जाऊन प्रतापरायाच्या सैन्याची व्यवस्था लावणे जरूरी होते. ५ एप्रिल नंतर महाराजांना रायगडाहून निघता आले. ८ एप्रिलला हंबरीरायास सरनोबतीची वस्त्रे दिली. २४ एप्रिलला केळंजाकोट स्वतः जाऊन घेतला. १५ मे रोजी शिवाजी राजे रायरीस असल्याचे ऑक्सिडन सांगतो; परंतु महाराज प्रतापगडावर भवानीच्या दर्शनार्थ १९ मे पूर्वीच निघून रायगड सोडून गेले होते, असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे सांगतात की, शिवाजी राजांनी राजाभिषेक लांबणीवर न टाकतां तो विष्णुसुशुप्तीच्यापूर्वी उरकून घेतला. त्यावेळी संभाजी २२ वर्षांच्या आंत असल्याने व्रतबंधाविना त्यास युवराज म्हणून पटबंधन करण्यात अडथळा आला नाही; परंतु हंबीररायाचे मौजीबंधन न झाल्यामुळे सेनापती म्हणून पटबंधनाचा सोहळा व्हावयाचा तो होऊ शकला नाही. ब्राह्मणांनाच मुख्यतः निमंत्रण असल्याने ते पुष्कळ आले होते. काहींनी बरोबर कुटुंबही आणिली होती. राजाभिषेकापूर्वी कुलदेवतेच्या मंदिरावर सव्वा मण सोन्याचा कळस चढवून तुळजाभवानीची साग्र पूजा बांधली.

बखरकार सांगतात त्याप्रमाणे गागाभट्टांना काशीसच गाठून याबाबत बोलाचाली झाली असती तर त्यांनी घाईगर्दीचा सुमुहूर्त ठरविला नसता; परंतु हा विधी गागाभट्टांच्याच हाताने उत्तमरीतीने पार पडेल, इतराची शाश्वती देता येणार नाही असे वाटून जेष्ठ शुद्ध १३ चा मुहूर्त निश्चित केला असे दिसते. शिवाय हिंदवी स्वराज्याच्या छत्रसिंहासनाची प्राणप्रतिष्ठा भारतीय कीर्तीच्या पंडिताकडून करवून घेण्यात अधिक औचित्य होते. अर्थात वैयक्तिक अडचणीपेक्षा सामाजिक महत्त्वाला आग्रस्थान देऊन महाराजांनी राजाभिषेक उरकून घेतला.

राजाभिषेक :

गागाभट्टांनी सर्व विधी भोसल्यांचे कुलोपाध्ये व पुरोहित प्रभारकभटाचे चिरंजीव बाळंभट यांच्या हाताने करविला व स्वतः जवळ मार्गदर्शन करीत बसले. बाळंभटाच्या साह्यास सर्व वेदांचे व शाखांचे पढिक ब्राह्मण दिले होते. दान व भोजनार्थ सहस्त्र ब्राह्मण आले होते. यज्ञशाळा व राजसभा यामध्ये लागणाऱ्या ब्राह्मणांसच फक्त रायगडावर नेले होते. बाकीचे पाचाडांत ठेविले होते. गागाभट्टांच्या पोथीवरून सर्व विधी मोठ्या समारंभाने, गांभीर्याने व वेदघोषांत यशस्वीपणे पार पाडला असावा. कारण या पोथीमध्ये मंत्राची वाटणी वगैरे माहिती तपशीलवार लिहून व

समजावून सांगितली आहे. यातील मुख्य कार्यांचा तपशील गागाभट्टांनी आखून दिला होता तो व तत्कालीन पत्रांत जे समारंभ झाल्याबद्दल उल्लेख आले आहेत ते बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात -

शुक्रवार, २९ मे १६७४ -

शकावलीत उल्लेख असा आहे की, "ज्येष्ठ शुद्ध ४ घटी ५ राजश्रीची मुंज झाली." काही उल्लेखाप्रमाणे हा मौजीबंधन विधी चतुर्थीस प्रारंभ होऊन पंचमीलाही चालला. हा विधी निव्वळ धर्मशास्त्रासाठी व्हावयाचा होता तर त्याला दोन दिवस का लागावे अशी शंका उत्पन्न होते; परंतु या उल्लेखात चूक नसून त्या दोन्हीही तिथी एकाच दिवशी आल्या होत्या. शुक्रवारी चतुर्थी सुर्योदयानंतर अवघी सहा घटिका होती व पाचव्या घटिकेला मुंज लागली व होमादि विधी पुढे तास दोन तास चालले. त्यामुळे साहजिकच मुख्य विधी पंचमीतच गेला. याच दिवशी अपराण्हकाली प्रायश्चित विधी म्हणजे "तुलापुरूषदान, सुवर्णादी तुलादान" आदि झाले असे सांगितल्यानंतर वा. सी. बेंद्रे ऑक्सिडन व वेंगुर्ल्यांच्या डच वखारवाल्यांनी केलेल्या तुलादान विधीचा उल्लेख करतो तर आब्राहमला तिथीची माहिती नीट समजली नसावी तसेच डचांच्या लिखाणातून शिवाजी महाराजांचे वजन १७००० पगोडे किंवा १६० पौंड व तुलापुरूषदानासाठी तयार केलेल्या सुवर्ण मूर्तीचे वजन ३२०० पगोडे म्हणजे ३२-३३ पौंड असावे.[१६८]

गागाभट्टांनी मौजीबंधन आणि तुलापुरूषदानादी विधी एकाच दिवशी केले यात शंका नाही. उशीरा मुंज झाल्यामुळे प्रायश्चित म्हणून तुलादाविधी आणि ब्रम्हहत्यादी महान पापांच्या क्षालनार्थ तुलापुरूषदान केले. गागाभट्टांनी या महादानाचे भागिदार फक्त ऋचिगांनाच केले आहे. त्यांच्याखेरीज इतर कोणालाही दान देऊ नये असा त्यांनी आदेश दिला असल्याने जापकादी ब्राह्मण नाखूश होण्यास एक कारण झाले. वरची दक्षिणा द्यावयाची त्यांतही जापकादी ब्राह्मणांची गणना द्वारपाळ, अंध वगैरे लोकांत केली आहे. हे जापकादीनां साहजिकच मानहानिकारक वाटले. उलट गागाभट्ट शास्त्री पंडित असल्याने त्यांना ही जापकतांत्रिकांची लुडबूड धर्मबाह्य वाटत होती. असे सांगून बेंद्रे पुढे स्पष्ट करतात की, व्रतबंध व दानविधी ह्यांचा राज्याभिषेकाशी प्रत्यक्ष संबंध नव्हता.[१६९]

शनिवार ३० मे (प्रथम दिन) -

३० मे ला झालेल्या समंत्रक विवाहाचे विविध संदर्भ देऊन बेंद्रे सांगतात की, 'ज्येष्ठ ६ शनिवार समंत्रक विवाह केला.' असे शकावल्या सांगतात. हेनरी ऑक्सिडनने, 'दोन... बायकांशी

लग्नविधी व्हावयाचा' असल्याचे २७ मे च्या पत्रात लिहिले आहे. बेंद्रे सांगतात मुख्य पत्नी किंवा राज्ञी आणि दोन स्त्रिया असा सांगण्याचा त्यांचा उद्देश असावा. कारण तो नंतर ८ जूनला 'चवथ्या' बायकोशी लग्न झाल्याचे लिहितो. निश्चळपुरीच्या लिखाणाचाही उल्लेख करून बेंद्रे सांगतात. निश्चळपूरी देखील दोनपेक्षा अधिक पत्निंचा उल्लेख करतो.[१७०]

प्रत्यक्ष राज्याभिषेकविधी प्रारंभ -

वा. सी. बेंद्रे लिहितात, लग्नविधी समंत्रक झाल्याने वैदिक पद्धतीप्रमाणे राजाभिषेकविधी सपत्निक करण्यास शास्त्रानुसार मोकळीक झाली व त्याप्रमाणे महाराजांनी प्रथम गणेशपुजन, कलश संस्थापन व नंतर पुण्याहवाचन, यजमानास अभिषिंचन, षोडशमातृकापूजन, नांदीश्राद्ध, पुरोहितरण (मधुपर्क), रक्तसूत्र कंकण व पट्टबंधन इत्यादी विधी झाले. नंतर ऋत्विगवरणाविना बिनायकशांती होमासहित झाली. बली दिला. शेवटी आचार्याला दान वस्त्रे व इतर ऋत्विगांना यथाशक्ति दक्षिणा दिल्यावर 'विनायकांगिकयोरुत्तरपूजा' झाली. आचार्यास नमस्कार करून विभूती लावल्यानंतर 'अग्नि विसृज्य' केला. पहिल्या दिवसाचा विधिसमारंभ संपला. प्रथम भागात माहराजांच्या नावाचा उल्लेख "विष्टर अर्चेत... अतिसृष्टो द्वेष्ट्यां योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्म:। शिववर्मण: च दातु:।।इति।।"

रविवार ३१ मे : द्वितीय दिन -

पूर्व रात्री महाराजांनी आवश्यक फलशाकाहार, भूशय्या व ब्रह्मचर्य पाळले. दुसऱ्या दिवशी ऐन्द्रीशांतीचे कार्य ठरले होते. त्याप्रमाणे 'करिष्यभाणराजाभिषेकांगत्वेन ऐन्द्रीशांति करिण्ये।।' असा संकल्प सोडून कार्यारंभ केला. ऋत्विगवरणविनाच हा ऐन्द्रीशांति विधी सुरू झाला. प्रथम कुंडांत अग्निप्रतिष्ठा झाली. इंद्राणीचे पूजन, चतुष्णुंभस्थापन व त्यात बलिदान होऊन ऐन्द्रिशांतिविधी पूर्ण झाला. आचार्य व ऋत्विग् यांना यथाशक्ति हिरण्य दक्षिणा दिली. "ब्रह्मचारिणे शिववर्मण: काममिमं राजा राजाभिषेक संवर्द्धय वैश्रवणाय राज्ञे नम:। या शांतिनंतर 'ऐन्द्रीशान्त्यग्ङत्वेन ऐशानयागं करिण्ये' असा संकल्प सोडून 'ऐशानयाग' झाल्यावर या दिवसाचा विधिकार्यासमारंभ संपला.[१७१]

सोमवार १ जून : तृतीय दिन -

तिसऱ्या दिवसाच्या कार्याला 'ऐन्द्रीशांत्यग्ङत्वेन ग्रहयंज्ञ करिण्ये' या संकल्पाने आरंभ झाला. ग्रहयज्ञानंतर नक्षत्रहोन केला. धेनुशंखादि दक्षिणा ग्रहयज्ञाबद्दल व घृतादि दक्षिणा नक्षत्रहोमाबद्दल दिल्यानंतर ब्राह्मणभोजन झाले.

मंगळवार २ जनू : चतुर्थ दिन -

मंगळवार व नवमी हे दोन्हीही योग राजाभिषेकाच्या कोणत्याही कार्यास निषिद्ध किंवा वर्ज असल्यामुळे हा दिवस जाऊ द्यावा लागला असे बेंद्रे सांगतात.

बुधवार ३ जून : पंचम दिन -

पाचव्या दिवसाचे कार्यही 'ऐन्द्रीशांत्यग्ङत्वेन नक्षत्रयज्ञ करिण्ये' यास संकल्पाने सुरू झाले. उत्तरपूजनानंतर आचार्याला 'प्रतिमा' द्यावयाच्या त्या दिल्या.

गुरूवार ४ जून : षष्ठम दिन -

रात्री निऋतियाग या यागांत इतर यागद्रव्यांत पक्व व अपक्व मांस, मत्स्य व सुरा यांचेही बलिदान झाले. कृष्णवस्त्र धारण करून हा विधी केला. कृष्णपुषगंधांनीच पूजा केली. हे कार्य झाल्यानंतर स्नान करून शुभ्र वस्त्र परिधान करून पुण्याहवाचन झाले. गाई दक्षिणा वगैरे देणे झाल्यावर या दिवसाचा कार्यक्रम संपला.

शुक्रवार ५ जून : सप्तम दिन -

प्रथम ऐन्द्रीयशांतीचे मुख्य कार्य संपविले. अयुत, सहस्त्र किंवा शत ब्राह्मण भोजन झाले व कर्मसंपूर्णता वाचली हे सर्व विधी सपत्नीकच झाले.

यानंतर मुख्य राजाभिषेक विधीस प्रारंभ झाला. शुक्रवारी २२ घटिका ३५ पळे द्वादशी होती. त्रयोदशीचा मुहूर्त असल्याने सायंकाळपासून पहाटेपर्यंत हा धार्मिक विधी चालला. राज्यभिषेक सिंहासनारोहण व राजदर्शन असे तीन समारंभ त्रयोदशीस झाले. त्रयोदशी शनिवारी १९ घटिका ४९ पळेपर्यंत होती असे गागाभट्टाच्या लिखाणाचा आधार घेऊन वा. सी. बेंद्रे सांगतात.

या संदर्भात ऑक्सिडनच्या लिखाणाचा आधार घेऊन वा. सी. बेंद्रे सांगतात की, राजदर्शनाच्या वेळी विशेष आमंत्रित पाहुणे नव्हते असे दिसते. हे आमंत्रण इंग्रज वकिलालाही असतांना ते खाजगी स्वरूपाचे होते हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

शकावलीतील नोंद ही सुर्योदयात तिथी गणनेने दिली आहे. शकावलीतील नोंद - "ज्येष्ठ शुद्ध १२ शुक्रवार घटी २१ पले ३४ विष्कंभ ३८ घटिका ४० पले सि.४२ तीन घटिका रात्री उरली (शनिवार सूर्योदयापूर्वी तास सव्वातास म्हणजे नेहमी ज्यावेळेला गर्गाचार्याचा मुहूर्त संबोधतात ती वेळ) तेव्हा शिवाजीराजे सिंहासनी बैसले. छ. १० रबिलावल (शुक्रवारी सायंकाळी सुरू होतो) सुा खमस सबैन अलफ (अरबी किंवा फसली सन १०८४).

यावरून राजाभिषेक विधी शुक्रवारी सकाळी व सायंकाळी झाला. खास राजाभिषेकाच्या विधीस शुक्रवारी सूर्यास्ताचे समयी प्रारंभ झाला व तो रात्रभर चालला. शनिवार पहाटे 'सिंहासनारोहण' विधी झाला. सकाळी ७-८ वाजता 'राजदर्शन' वगैरे दरबारी समारंभ झाला. वरील स्पष्टीकरणाने इतिहास लेखकांच्या लिहिण्यात द्वादशी आणि त्रयोदशी व शुक्रवार आणि शनिवार यांचा घोटाळा का झाला हे लक्षात येते. वास्तविक हा कालदर्शन पद्धतीचा फरक आहे. मूळ प्रसंगाच्या कालाचा नाही असे वा. सी. बेंद्रे येथे स्पष्ट करतात.

शनिवार ६ जून -

सकाळी ७-८ च्या सुमारास शिवाजी महाराजांनी पहिला दरबार भरवून व सिंहासनावर पुन्हा आरोहण करून सर्वास दर्शन दिले.

रवीवार ७ जून -

चतुर्दशी निषिद्ध दिवस किंवा तिथी; परंतु दानविधी उरकून टाकण्यात आला. तुलादान वगैरेची वाटणी राहिली होती ती केली. आब्राहम लिहितो - "....on the 17th (7th New Style) of June a grneral gift of largesses was began to all the assembled enveys and learned men: 3 or 4 rupees to each and 1 or 2 to women and children. This distribution continued for 12 days and every day Suasy feasted the people. It is said that the ceremony and distribution of largesses cost 1,50,000 pagodas."[१७२] बेंद्र म्हणतात, आब्राहम म्हणतो त्याप्रमाणे दानाचे काम १२ दिवस चालणे शक्य आहे. पुढेही काही दिवस चालले असते; परंतु मातुश्री जिजाबाईच्या मृत्युने थांबले.

सोमवार ८ जून -

शिवछत्रपतींचा चौथ्या बायकोशी पुन्हा समंत्रक विवाह झाला. हा विवाह काही अनपेक्षित व्यक्तिगत अडचणींमुळे लांबणीवर टाकावा लागला असावा असे सांगून वा. सी. बेंद्रे ऑक्सिडनचा संदर्भ देतात, "...The Rajah was married to a fourth wife without any state of ceremony and both every day distributes his alms to the Braminy..."

मंगळवार व बुधवार, ९ व १० जून -

बेंद्रे म्हणतात ऑक्सिडननुसार हे दोन दिवस ब्राह्मणांना दान देण्यातच गेले.

बुधवार १७ जून -

जेष्ठ वद्य ९ बुधवारी दो प्रहरां रात्री मातुश्री जिजाई आऊ पाचाडांत निवर्तली असे शकावलीत उल्लेख आला आहे.

ह्या सर्व राजाभिषेकाच्या धार्मिक विधी-आचारांचा सारांश देऊन वा. सी. बेंद्रे पुढे लिहितात की, या समारंभात इतिहासकालीन लेखकांच्या प्रमाणे दोन ते वीस हजार लोकांनी भाग घेतला होता. एका सहस्त्रापेक्षा थोडे अधिक ब्राह्मण असावेत. ब्राम्हण भोजनास दांपत्याची गरज लागते. म्हणून त्यांतील पुष्कळांनी बायकामुलेही बरोबर आणली होती. त्यांच्या राहण्याजेवणाची व्यवस्था पाचाडांत केली होती. ऋत्विग् व विधीच्या सांगतेस लागणारी ब्राह्मण व इतर नोकर मंडळी मात्र रायगडावर होती. तत्कालीन रिवाजाप्रमाणे भोजनाची सिद्धता आचारी पाणके यांच्यावर नसे. गावकरी व संबंधित लोक सहकार्याने आपआपल्या कसबाप्रमाणे सर्व कामे वाटून घेऊन करीत. ही चाल अगदी विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत गावांगावातील सर्व उत्सव-प्रसाद, व्रतबंध लग्नादी शुभप्रसंगी जी ग्रामभोजने होत असत त्यात पहावयास मिळे. त्यामुळे अशा सार्वजनिक कार्यात कधी बखेडा पडत नसे. दक्षिणाही देण्याचे काम शिवाजी महाराजांनी अगदी शिस्तवार केले असल्याचे दिसते. तुलादानाची वाटणी ठरीव होती. हे गागाभट्टांच्या प्रयोगपोथीवरून सिद्ध होते. इतकेच नव्हे तर मुरार जगदेव यांनी केलेल्या तुलादानाची वाटणी कशी केली होती त्याचाही पुरावा मुरार जगदेवांच्या अग्रहारपत्रातून पहावयास मिळतो. त्याशिवाय नीळो सोनदेव, जिजाबाई वगैरेंनी तुलादाने केल्याचे उल्लेख आहेत. त्यावरून शिवाजी महाराजांच्या तुलादानांत लुटालूट झाल्याने शेकडो माणसाची प्राणहानी झाली वगैरे माहिती काही

बखरकारांनी दिली आहे. ती सर्व त्यांच्या अज्ञानाचे द्योतक आहे किंवा त्यांच्या कथाप्रवृत्तीतील अतिशयोक्तीची बाष्फळ कल्पनाचित्रे होत असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करून पुढे लिहितात, 'इंग्रज, डच व तत्कालीन लेखकांच्या लिहिण्यात या सोहळ्यात काही विरोध अथवा अपघात झाल्याची वार्ता नाही. निश्चळपुरीच्या वतीने 'व्रणार्ध पशुच्या उभे' या उक्तीप्रमाणे टपून दुश्चिन्ह शोधणाऱ्या गोविंद वेलाही क्षूद्र व किरकोळ बाबींपेक्षा अधिक कमाई करिता आली नाही. यावरून हा राजाभिषेक समारंभ पूर्णपणे व्यवस्थित व गांभीर्यपणू असा झाला यात शंका नाही. त्याचप्रमाणे उत्तर पेशवेकालीन लेखन शिवराजाभिषेकाच्या प्रसंगात जे ग्रामण्याचे व धार्मिक विरोधाचे नाटक जोडतात ते सर्व अवास्तव व पेशवेकालीन परिस्थितीचे प्रतिबिंब आहे यात शंका नाही. तसेच शिवाजीच्या राजाभिषेकाला किंवा ऐन्द्रयाभिषेकाला अथवा महाराजाभिषेकाला 'राज्याभिषेक' हा प्रतिशब्द बरोबर नसून तो उत्तरकालीन राज्यारोहण पद्धतीला किंवा सांतत्सराभिषेकाला फक्त लागू पडतो असे स्पष्ट करून शिवाजी महाराजांना या राजाभिषेकानिमित्य जो खर्च झाला.' त्याचे स्पष्टीकरण देतांना म्हणतात की, त्यांनी 'महालोमहालांच्या वतनदारांवर सिंहासनपटी घातली. त्यावेळी आपणांवरी (दापोडेच्या देशमुखावर) होन १००० एक हजार होनपटी घातली...' यावरून राहिल्या साहिल्या देशमुखांकडून झालेला खर्च वसूल केला असेल असे दिसते.[१७३]

तांत्रिक सिंहासनारोहण विधी :

तात्रिक सिंहासनारोहणाची कारणमीमांसा करीत असतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, शिवाजी महाराजांनी राजाभिषेक विधीने 'छत्रपती पद' प्राप्त झाले. तेव्हा आपल्या अविरोध विक्रमाची आठवण म्हणून आपला राजशक चालू केला व आपल्या नावाची नाणी पाडली. शिवाजी महाराजांच्या कार्यात जरी विरोध झाला नसला तरी त्यांनी करून घेतलेल्या विधी संस्कारातील तपशिलाबाबत थोडा वादप्रवाद राजाभिषेक समयी उत्पन्न झाला होता. सामाजिकदृष्ट्या या किरकोळ प्रवादाची कोणीही दखल घेतली नाही. हा प्रवाद उत्पन्न करणाऱ्या जापक पक्षाचा अध्वर्यु निश्चळपुरी हा होता.

या निश्चळपुरी संदर्भात माहिती देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, "हा निश्चळपुरी वाराणसी क्षेत्रांतून दक्षिणेत आला होता. प्रथम तो नाशिकमध्ये थांबला होता. तेथे त्याने अनेक साक्षात्कार केले. येथे त्याने काही शिष्यही केले. ज्यांनी ज्यांनी त्याची सेवा केली त्यांच्यावर प्रसन्न

होऊन त्यांना वरदानही दिले. मात्र त्याचा फार लौकिक परसरला नव्हता; परंतु भगवद् भक्त ईश्वरी कृपा त्याच्या ठायी विशेष होती."

जापक वर्गाच्या नाराजीचे कारण सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, गागाभट्टांनी केलेल्या जापकांच्या अपमानामुळे विशेषतः तुलादानाच्या वाटणीत या जापकांना भागीदार होऊ न दिल्यामुळे आणि जापक मांत्रिकांना पौरोहित्यातून वगळल्यामुळे हा जापकवर्ग गागाभट्टांचा पाणउतारा करण्यासाठी उद्युक्त झाला होता. त्यांचा सारा रोष गागाभट्ट व त्यांचे साक्षीदार यांच्यावरच होता. सर्व बारिकसारीक अनिष्ट प्रथांचे खापर हा पक्ष गागाभट्टांच्या माथ्यावर फोडतो व ज्या काही चांगल्या गोष्टी घडून आल्या त्यांचे सर्व श्रेय शिवाजी महाराजांच्या पुण्याईला देतो.

गोविंद नारायण बर्वे याने निश्चळपुरीची बाजू आपल्या 'शिवराज्याभिषेककल्पतरु' या संस्कृत ग्रंथात मांडली आहे. बर्वे व निश्चपूरी हे पूर्णपणे आचाराने अनार्य दिसतात. कारण गागाभट्टांनी आणि अनंतदेवभट्टांनी राजाभिषेकाच्या मुहुर्ताबद्दल निरनिराळे आधार देऊन विधीही पुरातन ग्रंथांच्या आधारे पूर्ण वैदिक लिहिला आहे. आधारवचनेही दिली आहेत. गागाभट्ट व त्याचे कूल या प्रयोगाविधीच्या कामांत व शास्त्रार्थात संपूर्ण हिंदुस्थानांत विद्वन्मान्य होते. उलट बर्वे व निश्चळपूरी या बाबतीत पूर्ण अनभिज्ञ दिसतात असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१७४]

वा. सी. बेंद्रे यापुढे स्पष्ट करतात की, राजाभिषेक समारंभ आटोपतांच निश्चळपुरीने निरोप घेण्याच्या उद्देश्याने राजांची भेट घेतली. त्यावेळी बर्वे लिहितो की, राजाला निश्चळाने स्पष्ट सांगितले की, त्या दिवसापूसन तेराव्या, बाविसाव्या, पंचावन्नाव्या व पासष्टाव्या दिवशी आणखी भयसूचक उत्पात होतील.

यानंतर हा मांत्रिक तांत्रिक विधी लळितापंचमीला करण्याचे ठरवून निश्चळ तीर्थाटणास गेला. ज्या उत्पातांबद्दल गोविंदाने लिहिले ते अर्थात निश्चपुरीच्या डोक्यातही नसावेत. तसे त्याला वाटले असते तर त्याने पुन्हा हनुन्मंत्रासारखे आणखी काही उग्र जप करून आपले शक्तिसामर्थ्य दाखविण्याचा मोका जाऊ दिला नसता; परंतु हे विवरण प्रत्यक्ष उत्पात झाल्याचे जगजाहीर झाल्यानंतर लेखनाच्या वेळी स्मरणातून भविष्य म्हणून उपयोग करून आपली कथा रंगविली आहे इतकेच असे बेंद्रे सांगतात. तसेच तेराव्या दिवशी जिजाई आपल्या पुत्राचा हा अद्वितीय सोहळा पाहून परलोकवासी झाली. बाविसाव्या दिवशी प्रतापगडावरील पागा विजेच्या उत्पाताने जळाली. इतर दिवशी अश्व व गज मेले. असेच बारीक सारीक अपघात घडले; परंतु

या लेखकाने निश्चळपुरीचा शक्तिसंजीविनी जलाचा अभिषेक संपताच दुसऱ्याच दिवशी प्रतापगडावर देवीच्या मंदिरावर वीज पडून ते दुभंगले. त्याचा मात्र थांग लागू दिला नाही. विष्णुसुप्तींत भर पावसांत पुरातन शास्त्रांच्या विरूद्ध केलेला हा विधी या उत्पाताचे कारण मानणेही युक्त झाले असते; परंतु केवळ गागाभट्टांनी केलेले वाईट ठरविण्याकरिता शिवाजी महाराजांच्या देवी उपासनेचा फायदा घेऊन त्यांस आपल्या मदतीसाठी तांत्रिक विधीस प्रवृत्त केले. शिवाजी महाराजांस अश्वमेधाप्रमाणे येईल त्या शत्रूस जिंकून निरंकुश सत्ता मान्य करावयास लावण्याची आकांक्षा असल्याने त्यांनी निश्चळाचे म्हणणे मान्य केले.

वा. सी. बेंद्रे पुढे म्हणतात की, गोविंद बर्वेच्या लिहिण्यावरून हे सर्व विचार निश्चळपुरीचेच होते किंवा ते सर्व याच शब्दांत सांगण्यास नियचळपुरीने हिम्मत केली असे मानणे जरा धोक्याचे आहे. मांत्रिक विधीबरोबर तांत्रिक विधीही करण्यासाठी गागाभट्टाचे दोष न दाखविता महाराजांचे मन वळविणे शक्य होते आणि निश्चळपुरीने तसेच केले असले पाहिजे. शिवाजी महाराजांनी ज्या उद्देशाने एवढा समारंभ केला तो फोल होता हे जाहीर करून त्याचे मागील लोकांच्या भावनांना धक्का लागेल असे कोणतेही कृत्य करण्याचे त्यांनी मनातसुद्धा आणले नसते. तसे केले असते तर राजाभिषेकाचे स्वारस्यच नाहिसे झाले असते. तसेच केवळ काकतालीय न्यायाने घडलेल्या क्षूद्र गोष्टींवरून महाराज गागाभट्टांसारख्या पंडिताची विडंबना ऐकून घेतील काय, याची शंका आहे. बर्वेचा कथाथाट नेहमीच्या भरमसाट आख्यानाचाच भाग आहे. शिवाय जो विधी प्रत्यक्ष केला म्हटले आहे तो फक्त सिंहासनात व राजे यांच्या ठायी शक्ती संचार करण्यापुरताच आहे. गागाभट्टांच्या विधीत सिंहासनाच्या शक्तिची प्रतिष्ठा केली नव्हती. त्यांचा मुख्य भर राज्य देवांचे व राजा विष्णूचा अंश इतकीच श्रेष्ठ दर्जाची प्रतिष्ठा करण्याकडे होता. ज्या गागाभट्टांनुयायांनी ग्रामदेवता, गृहदेवता, मंडपदेवता, स्थानदेवता, स्तंभदेवता यांच्या पूजनाचा अशास्त्र प्रकार जाणूनबुजून गाळला त्यांना या आसन महात्म्यापेक्षा राजशक्तीचा देवांशच अधिक मान्य असल्याचे नवल नाही.

सारांश सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, शिवाजी महाराजांनी फक्त या मांत्रिक अभिषेकाशिवाय जापकांना छत्रपतीत राजशक्ती व सिंहासनात देवशक्ती प्रतिष्ठीत करण्याची मोकळीक दिली असती तर दुधात साखर पडेल एवढ्यापुरतीच निश्चळपुरीची विनंती असली पाहिजे. महाराजांनीही केवळ पूरक विधी म्हणून मान्यता दिली असली पाहिजे. राजराजेश्वरी मंत्र

घेण्यात त्यांनी प्रथम तयारी दाखविली नाही; परंतु तो विधीचाच भाग झाल्याने त्या मंत्राचाही स्वीकार केला इतकेच.[१७५]

तसेच जापक तंत्राने सिंहासनात व राजात शक्तिसामर्थ्य प्रतिष्ठीत करण्यापुरताच हा विधी होता. ह्या प्रसंगाचे वर्णन गोविंद बर्वेने इ.स. १७०० नंतर काही कालाने केले आहे. गोविंदाने जो गागाभट्टाच्या चुकीचा बाऊ केला आहे, त्या दृष्टीने पाहिले तर निश्चळाचा विधी म्हणजे थातूरमातूर करणाऱ्या मांत्रिकापेक्षा अधिक किंमतीचा दिसत नाही. एकंदरीत वैदिक व मांत्रिक विधीने शिवराजांस राजाभिषेक झाल्याने निरंकुश सत्ता प्राप्त झाली. पूर्वीच्या राजाभिषेकविधीचे निष्फलत्व भासेल असे वाचेने अगर कृतीने काहीही केलेले दिसत नाही. त्याच्या दृष्टीने शक्तीची पूर्तता बाकी राहिली होती. ती कुलस्वामिनीच्या नवरात्र महोत्सवांत निश्चळाला करू दिली इतकेच. मात्र या पूर्ती-कार्याने शिवराजाभिषेकाची पूर्तता झाली असे सर्व फडांना वाटले व यामुळे अविरोध राज्यसिंहासन आणि राजा यांना मान्यता मिळाली असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतांना दिसतात.

वा. सी. बेंद्रे शिवराजाभिषेकाचे महत्त्व सांगतात की, शिवाजी महाराजांच्या ज्या संघटनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक व परमार्थिक संस्कृतीची मूल्ये खोलवर रूजली गेली. त्याच महाराष्ट्राच्या ऱ्हत्पटलावर राजसंस्थेच्या उत्क्रांत संस्कृतीचे प्रतिबिंब चिरंजीव करण्याचे कार्य या शिवराजाभिषेक विधीत आहे. कारण त्या घटनेने राज्यव्यवहारात संपूर्ण समाजाला समानतेच्या पातळीवर आणले व धार्मिक आणि व्यावहारिक पारतंत्र्याला आळा घालण्याचे एक तंत्र निर्माण केले. काशीस्थ गागाभट्ट व पैठणचे अनंतदेवभट्ट यांचा निःस्वार्थ मानवतेचा जिव्हाळा शिवाजी महाराजांच्या सांस्कृतिक कार्यात सहजच साहाय्यक झाला आणि शिवराजाभिषेकाने १७ व्या शतकात राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि व्यावहारिक संघटनेचे एक उत्तम व प्रभावी साधन महाराष्ट्राच्या हाती आले. विधीच्या चिकित्सेपेक्षा त्या विधीमागील भावनांचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या इतिहासातील सांस्कृतिक उत्क्रांतीची ही एक महत्त्वाची घटना होती आणि त्या विधीतील ऐहिक तपशिलाचा जीव जरी विनाशी असला तरी त्या घटनेतील सांस्कृतिक तत्वांचा आत्मा अमर होता याची आजही प्रचिती येते.

४.२० शिवाजी महाराजांचा दक्षिणदिग्विजय किंवा कर्नाटकची स्वारी

शिवाजी महाराजांच्या कार्यातील व पराक्रमातील अतिउच्च यशाचा परमोच्च बिंदू म्हणजे शिवाजी महाराजांचा दक्षिणदिग्विजय किंवा कर्नाटकाची स्वारी होय. महाराजांनी राजाभिषेक किंवा ऐन्द्रयाभिषेक करून घेऊन छत्रपतीपद मिळविले; परंतु या छत्रपतीपदाचा महिमा याच कर्नाटकातील राजकारणामुळे जगाला पटविता आला. यावेळेला औरंगजेब काबुलकंदाहारकडे गुंतल्याने उत्तरेकडील मदत कमी झाल्याने शिवाजी महाराजांनी मोगलांविरूद्ध लढून बराच प्रदेश जिंकला होता, पण विजापुरची तशी स्थिती नव्हती. विजापुरकरांनी सर्व छोटीमोठी हिंदू राज्ये संपविल्यामुळे त्यांना दक्षिण कर्नाटकात त्यांना विरोध करेल असा एकही शत्रू राहिला नव्हता. कुतुबशाहाने आदिलशाहाच्या सरदारांनी बळकाविलेला प्रदेश परत मिळविण्यसाठी बरेच अयशस्वी प्रयत्न केले होते तेव्हा आदिलशाहाविरोधात असे प्रबळ शत्रू निर्माण करून त्याच्यावर उत्तरेकडून व दक्षिणेकडून एकाचवेळी हल्ले केल्यास आदिलशाही संपविण्यास वेळ लागणार नाही असे कुतुबशाही सरदारांचे मत बनले. शिवाय आदिलशाहाचे कर्नाटकातील सरदारही आदिलशाहाविरूद्ध बंड करीत होते. यामुळे कुतुबशाहाने आदिलशाही सैन्याला कायमचे दुर्बल करण्यासाठी हिंदवी स्वराज्याची व कर्नाटकातील हिंदू मांडलीक सरदारांची मदत अपेक्षीली व त्यात त्यांना यश आले. शिवाजी महाराजांनी या संधीचा योग्य उपयोग करून घेतला.

शिवाजी महाराजांच्या कर्नाटक स्वारीच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे सर्वप्रथम बखरीमध्ये यासंदर्भात आलेल्या माहितीची चिकित्सा करताना सांगतात की, सभासद बखरीत जी माहिती येते तीच माहिती चिटणीस बखरीतसुद्धा येते.[१७६] शेडगांवकर बखरीतील माहिती ही देखील सभासद बखरीतील माहितीसारखीच आहे. या बखरीत जी थोडी वेगळी माहिती येते त्यामध्ये "शके १५९१ राक्षस नाम संवत्सरे फसली सन १०८५ (इ.स. १६७५-७६) रा.श.२ या साली शिवाजी लष्कर घेऊन मजल दरमजल करून भागानगरास चालिले." हा शक चुकीचा दिल्याचे वा. सी. बेंद्रे सांगतात. तसेच या बखरींमध्ये चंदीचा उल्लेख करतांना नेहमीप्रमाणे चंदीचंदावर असा केल्याने मूळ माहितीबद्दल थोडा गैरसमज निर्माण होतो व शिवाजी महाराजांनी स्वतः चंदावर (तंजावर) घेतल्याचा रोष शिवाजी महाराजांवर विनाकारण येतो असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट

करतात. या उलट शिवाजीने चंदावरची मागणी, वाटणी नव्हे तर ती आपण मोठे असल्याने आपणास शहाजीची बिरूद्धे मिळवित म्हणून केली या बखरीतील मजकूर सुसंगत नाही.[१७७]

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीतील मजकूर कर्नाटकाच्या स्वारीचा कार्यकारणभाव मागतो. अवास्तव का असत नाही. त्याकडे अभ्यासकांचे लक्ष वळवितो. बखरकारांना तत्कालीन परिस्थितीची थोडीही कल्पना असल्याचे दिसून येत नाही. तसेच निरनिराळ्या प्रसंगाच्या व क्रमाबाबतही त्यांच्यात पूर्ण अज्ञान आहे असे म्हणण्यास हरकत नाही असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. ९१ कलमी बखरीतही बाकीच्या बखरीप्रमाणेच माहिती येते.

शिवदिग्विजयांतील माहिती संदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, यामध्ये नवीन अशी माहिती नाही. मात्र रघुनाथपंत हणमंतेबाबत इतका काल्पनिक पाल्हाळ आहे की, त्यामुळे यातील माहितीत विपर्यास निर्माण होतो. इतरही मजकुरात असाच काल्पनिक पाल्हाळ आहे. निराजीपंत वारल्याचे व जिजाबाईच्या राजाभिषेकानंतर मृत्युची माहिती पूर्वी लिहिलेली असतांनासुद्धा नंतर या कर्नाटकाच्या स्वारीच्या वेळी त्यांना जिवंत समजून माहिती दिली आहे. दिग्विजयातील कथाथाटी प्रत्यक्ष भाषणे व पत्रे सर्व बनावट व कालविपर्यास व वस्तुस्थितीला सोडून असल्याचे सर्वत्रच दिसून येते.[१७८]

यानंतर वा. सी. बेंद्रेंनी मनुची, फ्रांकाइन मार्टिन, कॉस्मा द गार्डा यांच्या वर्णनाचा सारांश देऊन यामध्ये बरीच विपर्यस्तता आली असल्याचे सांगितले आहे. कुतुबशाहा व शिवाजी यांच्या भेटीची कारणमीमांसा कल्पनेने सजविली गेल्यामुळे तत्कालीन परिस्थितीचा व्हावा तसा अर्थबोध होत नाही. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचा एकोजीबरोबर झालेला वाद कल्पनेने रचलेला आहे. जिंजीचा वाद आदिलशाहा व कुतुबशाहाने शिवाजी महाराजांची मदत का घेण्याचे ठरविले? तसेच ती कोणत्या अटीवर देण्याचे ठरले याचा तपशील मादण्णाबाबतच्या दुराग्रहामुळे अधिकच घोटाळा पाडण्यास कारण झालेला आहे. म्हणून हा तपशील सोडविण्यासाठी वा. सी. बेंद्रे पत्रव्यवहारांचा आधार घेतात. या दक्षिणदिग्विजय संबंधातील कार्यकारणभावात बराच विपर्यास आला आहे. याचे कारण तत्कालीन उल्लेखामध्ये बेंद्रे शोधतांना आपल्याला दिसतात. यामध्ये कुतुबशाहा व शिवाजी महाराज यांच्यात जे बोलणे झाले त्याबद्दल काहीच माहिती उपलब्ध नाही.

वा. सी. बेंद्रे शिवाजी व एंकोजी यांच्या संबंधासंदर्भात विपर्यास आल्याचे सांगतात. एंकोजी हा विजापुरच्या आदिलशाहाचा सरदार व जमीनदार असे मानण्यात आपली सुरक्षितता आहे. असे समजत होता आणि शिवाजी केवळ आपला भाऊ म्हणून एंकोजीचा मुलूख घेऊन त्याबद्दल ३ लाख होनाचा प्रदेश त्यांच्या राज्यातील किंवा कुतुबशाहीतून देण्यास तयार होता; परंतु एंकोजीला शिवाजीच्या परत गेल्यानंतर आपल्याला आदिलशाहाचाच सहारा मिळावयाचा तो जर न मिळाला तर आपले सर्वस्व जाणार या भीतीने तो शिवाजीच्या बोलण्याला तयार होत नव्हता. यात भाऊबंदगीचा प्रकार वस्तुतः नव्हता. शिवाजीला एंकोजी याची दौलत पारंपरिक नसून त्याने एकदोन वर्षातच मिळविलेली होती. ही वस्तुस्थिती माहित नव्हती असे म्हणणे वास्तवबोधी ठरणार नाही. सारांश एंकोजी आपल्या शिवाजीच्या पश्चात सुरक्षिततेचा विचार करीत होता तर शिवाजी आदिलशाही प्रदेश बुडविण्याच्या विचारात होता. या प्रकरणात बखरकारांनी जी लुडबूड सांगितली आहे ती अवास्तव आहे.[१७९] त्या काळी रघुनाथपंत एवढे सैन्य कर्नाटकातून बरोबर आणेल हे असंभवनिय आहे.

पत्रातील मजकुरावरून रघुनाथपंताला शिवाजी मजमूचा कारभार देण्यास तयार नव्हता. उलट त्याने कुटुंबातील परंपरेचा कारभार त्याचा भाऊ जनार्दनपंत यांच्या हवाली केला आणि रघुनाथपंताचा मुलगा गंगाधरपंताची मागणी केली आणि एंकोजीला जनार्दनपंताच्या मुलास मजमूस ठेवण्याचा सल्ला दिला असे सांगून वा. सी. बेंद्रे यापुढे लिहितात की, कर्नाटकातील हालचालीचे राजकारण पुष्कळ दिवसापासून चालू होते. मुख्यतः हे राजकारण निराजी रावजी, प्रल्हाद निराजी व शामजी नाईक पुंडे यांनीच मादण्णा आंकण्णा यांच्या साह्याने मिळविले. असे राजकारण करण्याइतकी पात्रता रघुनाथपंताकडे असेल असे वाटत नाही असे बेंद्रे म्हणतात.

शिवाजी मोठे सैन्य घेऊन इ.स. १६७६ च्या सप्टेंबरमध्ये ठरल्याप्रमाणे बार्सिलोन, होनावर न जाता तो बालाघाटला गेला. बंकापुरजवळील बेळगाव आणि तेथून पाच दिवसाच्या अंतरावर असलेला वायेम, रायिम (?) अशा दोन किल्ल्यांना त्याने ६ ऑक्टोबर १६७६ पूर्वी वेढे दिले. विजापूर प्रांतात खूप उपद्रव दिला; परंतु या कर्नाटकच्या स्वारीच्या मूळ उद्देशांत व स्वारीच्या हालचालीत नंतर बराच बदल झाला. विजापुरमध्ये उमरावात आपआपसात भांडणे असल्याने मोगली बहादरखान स्वारी करण्याच्या तयारीत होता. म्हणून गोवळकोंडेकरांच्या मदतीने शिवाजीचा आदिलशाहाची तह झाला. शिवाजीकडे कोल्हापूर पलिकडील

कृष्णातीरापर्यंत काही प्रदेश असावा आणि त्याने तीस लक्ष रूपये पेशकस व दरसाल एक लक्ष होनाची खंडणी द्यावी असे ठरले.[१८०] एकदोन महिन्यातच बहलोलखानाने हा तह मोडला. कारण बहलोलखानाने बहादूरखानाशी मैत्री प्रस्थापित केली होती. त्यामुळे शिवाजी महाराजांनी सप्टेंबरमध्ये विजापुरवर आक्रमण केले तेव्हा मोगल व बहलोलखान एक झाल्यास गोवळकोंडेकर पेचात येतील यासाठी बहलोलखानाच्या विश्वासघाताचे पारिपत्य करण्याच्या हालचाली नोव्हेंबर १६७६ नंतर सुरू झाल्या. शिवाजी महाराजांनी मध्यंतरी मोगलांशी तह करून टाकला व विजापुरवर हल्ला केला. हंबीरराव यास गदग प्रांतात रवाना केले. हुसेनखानाला धरले. दोन हजार घोडे व हत्ती मिळाले. यानंतर फेब्रुवारीमध्ये शिवाजी महाराज कर्नाटकच्या स्वारीवर निघाले.

शिवाजी महाराजांनी मार्च १६७७ मध्ये मालोजी घोरपडे यांना जे पत्र लिहिले त्यातून शिवाजी महाराजांना कर्नाटकच्या मोहिमेचा हेतू स्पष्ट होतो. हा हेतू वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे सांगतात- "कुतुबशाहीचे शक्तिसामर्थ्य मराठा सरदारांची मदत मिळवून वाढवावयाचे आणि शिवाजी व कुतुबशाहा यांनी पठाणी आदिलशाही बुडवायची आणि मोगलांना शह द्यावयाचा. कुतुबशाहाने आपली सत्ता मादण्ण आकण्णा यांच्या हाती देण्यामागील हेतू म्हणजे कुतुबशाहाची शक्ती हिंदू वजिरांकडे एकत्रित करावयाचा होता. म्हणजेच दक्षिणेतील हिंदू राजे मांडलीक म्हणून आपल्या 'हिंदवी स्वराज्या'च्या कल्पनेला जुळवावयाचे व राहिलेली कुतुबशाही हिंदूमय केला की, दक्षिणेत तरी हिंदवी स्वराज्याची मुहुर्तमेढ पक्की रोवली जाईल असे प्रयत्न व त्याबाबत सर्व हिंदू सरदारांची एकी राखावयाची हाच उद्देश होता."[१८१]

शिवाजी महाराज मादण्णाच्या बोलण्यावरून कर्नाटकात आले. गोवळकोंड्याच्या प्रदेशात त्यांचा इतका अंमल चालत होता की, राजाला मिळावयाचा कर तो सर्व आपल्या लोकांकडून वसूल करी आणि राजाचे हवालदार व इतर मोठे अधिकारी होते ते आपल्या मनाप्रमाणे शासन करी. जिंजी, वेलूर, यमनगोंडा आणि पोर्टो नोव्होच्या कर्नाटकचा भाग विजापुरकरांच्या ताब्यातून घेण्यासाठी त्यांनी शिवाजी महाराजांना सेनापतीपद दिल्यामुळे एका अर्थाने त्यांना ह्या प्रांताचे स्वामित्व दिल्यासारखे झाले होते असे बेंद्रे सांगतात.

गोवळकोंड्याचा सरलष्कर मिर्झा महमद अमीन एक हजार घोडदळ व एक हजार पायदळ घेऊन प्रथम शिवाजी बरोबरच होता. पुडे वेलूरचा वेढा चालू झाला. शेरखानाही

त्रिवादीला ठाणे देऊन बसला होता. त्यामुळे शिवाजी महाराजांना दक्षिणेतील नायकांवर चालून जाता आले नाही. म्हणून त्यांनी आपला तळ त्रिवादीजवळ दिला. २६ जूनच्या रात्री शेरखान त्रिवादीहून तेवनापट्टणकडे पळून जाऊ लागला. शिवाजीला हे कळताच शिवाजीकडील काही घोडेस्वार त्याच्या पाठलागावर निघाले. वाटेत अकलनायकाचे अरण्य होते त्यात शेरखान व त्याच्या पाठोपाठ मराठेही शिरले. रात्री दोन चार तास चांगले युद्ध झाले. तोच शेरखान काही घोडे हत्ती वगैरे घेऊन त्या अरण्यातून दक्षिणेकडे गेला. शिवाजी महाराजांच्या सैन्यानी पुन्हा पाठलाग केला. येथे संघर्ष होऊन शेरखानाची फार मोठी हानी झाली व तो बोनगिरीवर पळाला. शिवाजी महाराजाचे सैन्य शेरखानाचा पाठलाग करीत पुनामलीवरून बोनागिरीपटनला गेले व तेथून राजे तिरुमळवाड्यास जाऊन तळ देऊन राहिले.

यानंतर शिवाजी महाराजांनी प्रथम जिंजीस १५ हजार पायदळ व १६ हजार घोडेस्वार घेऊन वेढा दिला तेव्हा विजापुरी किल्लेदार नारीस महंमदखान याने ७-८ हजार सैन्यासह तो किल्ला चढविला. तथापि शेवटी त्यांनी तो व आसपासचा मुलुखही घेतला. शिवाजी महाराजांचा मुक्काम कावेरीतीरास आल्यानंतर त्यांनी एंकोजीस पत्रे लिहिली की, चांगली माणसे आमच्याकडे पाठविणे. तसे एंकोजीने केले. त्या लोकांमार्फत शिवाजीने अर्ध्या वाट्याची मागणी केली, पण एंकोजी स्वतः भेटायला आला. शिवाजी महाराजांचा मुक्काम तिरुमलवाड्यात असतांना जुलैच्या मध्यात एंकोजी २००० स्वार घेऊन भेटण्यासाठी आला. शिवाजी महाराज तैरूपतो गावापर्यंत सामोरे गेले. तेथे भेटी झाल्या. एंकोजीने शिवाजी महाराजांचे म्हणणे न ऐकल्याने त्यांनी लगेच जनार्दनपंत, शिवाजीपंत, कोनेरपंत व निळोजी नायक नावाचा एक व्यापारी यांना कैद केले. नंतर मुक्काम वलिगुंडपुरमूला केला. यानंतर रघुनाथपंताच्यामार्फत मदुरेच्या नायकासोबत तह केला. यानंतर शिवाजी राजांचा मुक्काम वलिगुंडपुराहून तुंदमगुर्तीला (तोरगलला) आला. ते शिवाजी राजांच्या सैन्यात व एंकोजीच्या सैन्यात संघर्ष झाला. त्यात एंकोजीच्या सैन्याची दाणादाण उडाली. यानंतर जनार्दनपंताने येलवनसरला वेढा दिला. वेलवनसोरचा किल्लाही शिवाजी महाराजांच्या हाती आला. शिवाजी महाराजांनी ऑगस्ट महिन्याखेर जिंजी, तंजावर, पिलकुंडा इत्यादी मजबूत किल्ले घेऊन आदिलशाही मुसलमानांचा मोठा पराभव केला. श्रीरंगपट्टणहून मोठी लूट नेली. कर्नाटकात शिवाजीची एकसारखी प्रगतीच होत होती. ऑक्टोबरच्या सुरुवातीला शिवाजी महाराजांनी रघुनाथ नारायण यांच्याकडे चंदीचा

सुभा व लाख होन बक्षिस दिले व जनार्दनपंतास घेऊन सैन्य परत फिरून त्यांनी ऑक्टोबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात ४००० घोडेस्वार घेऊन बंकारपूरला वेढा घातला व गदगलक्ष्मेश्वर लुटले. नंतर बेलवाडीस वेढा घातला; परंतु बाकीचे सैन्य हंबीररावाच्या स्वाधीन होते. ते कर्नाटकला ठेविले. जिंजीकडील प्रदेश ठेवलेला शिवाजीचा सेनापती व भाऊ संतोजी याचे ६००० स्वार व ६००० पायदळ एवढे सैन्य नोव्हेंबरच्या सुरूवातीस काही दिवस तंजावरच्या एंकोजीशी लढण्यात गुंतले होते. येथे झालेल्या युद्धात संतोजीचा एंकोजीने पराभव केला, पण नंतर एंकोजीचे सैन्य बेसावध असतांना संतोजीच्या सैन्याने एंकोजीच्या सैन्याची फार भयंकर कत्तल केली व मोठी लूट सोबत नेली. बाकीचे लोक कावेरी पलिकडे तंजावरला पळाले. शिवाजी महाराजांनी पुन्हा एकदा एंकोजीला मैत्री करण्यास सांगितले, पण त्याने ऐकले नाही. तेव्हा हंबीररावाने त्याचा पाठलाग केला. एंकोजीची एकंदर ३००० घोडी बरेच हत्ती पाडाव केले. तेव्हा एंकोजीने कोल्हारकोट हंबीररावास दिला व मैत्री केली.

दुसरीकडे शिवाजी महाराजंनी गदग प्रांतात बेलवाडीस वेढा घातला होता. तो ३-४ महिने चालू होता. येथे पराजय झाल्यानंतर शिवाजी महाराज बेलवाडीचा वेढा चालू असतानाच रागडी परत आले. त्यानंतर हंबीररावाने कर्नाटकात स्वारी चालूच ठेवली होती. २२ जुलैला बेलूरचा किल्ला शिवाजीच्या हाती आला. रघुनाथपंत व आनंदराव यांनी तो घेतला होता. चंदीचा किल्लाही शिवाजी महाराजांनी अगदी थोड्याच काळात घेतला होता.

या दक्षिणेतील विजयामुळे जे इंग्रज पूर्वी शिवाजीस चोरून हल्ले करतो, लुट-काट करतो, रणांगणातून पाठ दाखवून पळतो असे १४-१५ वर्षापूर्वी म्हणत असत. तेच इंग्रज आता त्याला या स्वारीची हकीकत सांगताना स्पेनमध्ये सीझर त्याप्रमाणे आला. त्याने पाहिले आणि जिंकले असे म्हणू लागले होते. किल्ल्यावरील हल्ले चढविण्याच्या बाबतीत अलेक्झांडर दि ग्रेट इतकाच त्याचा हातखंडा असल्याचे सांगू लागले. शिवाजी दुसरन सेंटोरिअस किंवा युद्ध कौशल्यामुळे प्रति हॅनिबाल असल्याचे प्रसिद्धपणे युरोपिअन लोक बोलत असत.[१८२]

शिवाजी महाराजांनी जो प्रदेश आक्रमिला त्याने त्याचा पूर्णपणे बंदोबस्त केला. जे त्याला मिळाले त्यांनाच त्यांनी तेथील अधिकार देऊन ठेविले. विशेषतः शाहाजी महाराजांची माणसे त्यांना या कर्नाटकच्या स्वारीत बरीच उपयोगी पडली. संताजी भोसले, रघुनाथपंत वगैरे

माणसांनी तिकडे आयुष्याच्या आयुष्य घालविले असल्याने तेथील लोकांना त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटला व सर्व कारभार सुरळीत चालू लागला.

राज्याभिषेकासाठी झालेला खर्च भरून काढण्यासाठी किंवा केवळ लूट मिळविण्यासाठी शिवाजी महाराजांनी ही कर्नाटकाची मोहिम केली असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही असे स्पष्ट होते. शिवाजी महाराजांना आदिलशाही आणि विशेषतः पठाणी मुसलमानांचे प्राबल्य मोडून टाकावयाचे होते व त्याला पठाणेत्तर सिद्दी वगैर मुसलमानांनी साहाय्यही केले. कर्नाटकात एक मोठी राज्यसंस्था स्थापन करून तिच्यामार्फत आदिलशाहीला पंगू करून ठेवायचे होते. तो हेतू यातून पूर्ण सफल झालेला दिसतो. कर्नाटकात शहाजीने जी मराठी राज्याची स्थापना केली हेती व एंकोजीने वृद्धीस नेली होती ती शिवाजीने इतकी प्रबळ ठेविली की, कोणतीही मुसलमानी सत्ता तिला सहज मोडू शकली नाही असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

४.२१ शिवाजी व जंजिऱ्याचा सिद्दी

शिवाजी महाराजांच्या काळात युसुफखानानंतर त्याचा मुलगा फत्तेखान दंडाराजपुरी प्रांताचा हवालदार झाला. त्याची कारकीर्द इ.स. १६५५ ते १६६७ पर्यंत होती. इ.स. १६५६ च्या एप्रिलमध्ये रायरीवरील मोहिम संपल्यानंतर इ.स. १६५७ च्या जुलैपर्यंत शिवाजीला कोकणपट्टीकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. असे सांगून बेंद्रे पुढे म्हणतात की, जुलै १६५७ च्या जुलैच्या ३१ तारखेस रघुनाथपंत रायपुरीस गेले. याच सुमारास आदिलशाहा व शहाजहान यांच्यामध्ये तह होऊन कोकणातील निजामशाही किल्ले आदिलशाहाकडे देण्याचे ठरले. अर्थात या अदलाबदलीच्या भानगडीत रघुनाथपंताकडून कोकणपट्टी काबीज करणे फार सोपे गेले. रघुनाथपंताची स्वारी कोकणात संपूर्ण हिवाळाभर चालली असावी म्हणजे इ.स. १६५८ च्या जानेवारीपर्यंत तरी रघुनाथपंत तेथे असावेत असे बेंद्रे म्हणतात. या स्वारीमुळेच पोर्तुगीजांना चौलच्या बंदोबस्तास ८० शिपाई ठेवावे लागले.[१८३]

कित्येक ठिकाणी रघुनाथपंताची स्वारी व शामराजपंतांची दंडाराजपुरीवरील स्वारी स्वतंत्र मानण्यात येते; परंतु रघुनाथपंताच्या मदतीस शामराज नीळकंठ व बाजी घोलप यांना पाठविण्यात आले होते. कोकणचा सुभा रघुनाथपंतास आला होता; परंतु इ.स. १६५९ च्या सुरूवातीस रघुनाथपंताची पाठ फिरताच सिद्दी पुन्हा कोकणात उपद्रव देऊ लागला आणि विशेषतः आदिलशाहाची शिवाजीवर स्वारी होत आहे हे पाहून त्याचा फायदा घेण्याकरिता प्रयत्न

करू लागला. खैरातखान आदिलशाहाशी सल्ला करण्याकरिता विजापुरी गेला. हे समजताच जंजिऱ्याच्या लागून असलेल्या प्रदेशात हजार लोक व स्वार पाठवून दंगा करू लागला. विजापुरहून परत येतांना मार्गात धरून कैद करण्यासाठी व्यंकोजी दत्तो यांची निवड केली व त्यास फौजेनिशी रवाना केले. यावेळी खैरातखान विजापुरास गेला होता. तो जानेवारीने बिरवाडीवरून तळे घोसाळावरून किल्ले जंजिऱ्यास गेला. पकडण्यासाठी महाराजांनी अत्यंत प्रयत्न केले; परंतु तो हातास आली नाही. त्याचा पाठलाग करीत व्यंकोजी दत्तो जंजिऱ्यास गेले. शह देऊन ठाण मारून बसले. प्रदेश जिंकला. यावेळी सिद्दी अब्दुलखान व शेख याकुबखान व व्यंकोजी यांचा संघर्ष झाला. सिद्दी अब्दुलखान व शेख याकुबखान हे पळून किल्ल्यावर आले. व्यंकोजीपंत त्यांचा पाठलाग करीत जंजिऱ्याच्या पायथ्याशी जाऊन पोहोचले. यावेळी युद्धासाठी परिस्थिती नसल्याने व्यंकोजीने सल्ल्याने घेण्याचे ठरविले, पण शिवाजी महाराजांची सल्ल्याला संमती नव्हती. त्यामुळे व्यंकोजीपंतानी वेढा घातला; परंतु हा वेढा काढून घेणे भाग पडले व अफजलखानाचे स्वारीमुळे घाटावर जाणे भाग पडले. त्यामुळे जंजिऱ्याचा किल्ला घेऊ शकले नाही. बेंद्रे लिहितात की, इ.स. १६६० च्या सुरूवातीच्या व्यंकोजीपंताच्या स्वारीचा उल्लेख अली आदिलशहाने आपल्या १६ जून १६५९ च्या फर्मानात केला असल्याने व्यंकोजीपंताची स्वारी तत्पूर्वी झाली असली पाहिजे. यानंतर आदिलशाहा व मोगल यांच्याशीच लढण्यात वेळ गेल्याने शिवाजीला कोकणाकडे लक्ष देणे शक्य नव्हते.

आदिलशाहने दंडराजपुरीवर घडलेल्या प्रसंगामुळेच ताबडतोब दंडराजपुरीच्या सिद्याचे सरंक्षण केले. याचाही उल्लेख परमानंदाच्या शिवभारतात किंवा अणुपुराणात आढळतो. असे सांगून बेंद्रे सारांश लिहितात, यावेळी शिवाजीला औरंगजेबाचा पाठिंबा असल्याकारणाने व्यंकोजीपंताना जंजिऱ्याचा वेढा उठवून वरघाटी यावे लागले; परंतु शिवाजी महाराजांच्या मनातून दंडराजपुरी प्रांत जंजिरे किल्ल्यासह आपल्या ताब्यात यावा ही इच्छा मात्र प्रबल होती. अफजलखान, शाहिस्तेखान, सिद्दी जोहर यांच्या मोहिमांना इ.स. १६६२ पर्यंत कोकणात सैन्य पाठवून नवा प्रदेश घेता येणे शक्य नव्हते. शिवाजीने दंडराजपुरीचा प्रदेश मिळविल्यानंतर जंजिऱ्यातील सिद्याना अन्न वगैरे मिळणे कठीण झाले. म्हणून त्यांनी दर्यातील चाचेगिरीस सुरूवात केली. सारांश सिद्दीने आदिलशहाच्या साह्याने चाचेगिरीस सुरूवात केली. तेव्हा

शिवाजी राजांनी इंग्रजांशी बोलून त्यांच्या जवळील आरमाराच्या साह्याने जंजिरा घ्यावयाची योजना आखली.

रेव्हिंग्टनने शिवाजीकडून जंजिरा घेण्याची योजना आखली, पण त्याची ही योजना फसली. याचवेळी सिद्दी जोहर व शाहिस्तेखान यांच्या स्वाऱ्यामुळे शिवाजीला जंजिऱ्याकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही. तरीही इ.स. १६६२-६३ मध्ये शिवाजीने आरमार तयार करण्याची खटपट केली व काही गलबते बांधली असे बेंद्रे स्पष्ट करतात. इ.स. १६६३ ते १६६४ मध्ये म्हणजे शाहिस्तेखानाचा बिमोड झाल्यावर तह या मोहिमेस बराच जोर आला व ती मोहिम १६६५ च्या मार्चपर्यंत पुरली. बसनूरची स्वारी आरमाराच्याच साह्याने झाली; परंतु इ.स. १६६५ च्या एप्रिलच्या सुरूवातीलाच जयसिंग पुरंदरी येऊन बसल्याने दक्षिण कोकण व कर्नाटकच्याही मोहिम थांबवून शिवाजी वरघाटी आला. इ.स. १६६३ च्या अखेरीस शिवाजीने दंडाराजपुरीच्या मदतीला डचांचीही बोलणे लावून पाहिले होते. इ.स. १६६५ च्या जून महिन्यात शिवाजी, औरंगजेब व जयसिंग यांच्यामध्ये तहाची बोलणी सुरू झाली. त्यामध्ये तळकोकणातील चार लक्ष होनाचा प्रदेश शिवाजीला देण्याचे ठरले होते; परंतु निजामशाही तळकोकण शिवाजीकडून घेऊन मोगली साम्राज्यास जोडण्यात आले.

इ.स. १६६५ च्या पुरंदरच्या तहात शिवाजीने मिर्झाराजास रेवदंडा, राजापुरी, ज्यावर निजामशाही किल्लेदाराचा कब्जा करून बसले होते. त्याची मागणी केली तेव्हा मिर्झाराजांनी सिद्दी खैरू, सिद्दी संबूल, सिद्दी याकुत यांना बोलाविले व जंजिरा खाली करून शिवाजीला देण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, किल्लेदार पादशाहा हुकुमाशिवाय जंजिरा देत नाही. त्यावर पादशाहाचा हुकूम आणण्यास सांगितले पण तसा हुकूम आला नाही. यानंतर शिवाजी महाराजांना आगऱ्याला औरंगजेबाच्या भेटीला जावे लागले व नंतर तेथे कैद झाल्याने व तेथून सुटका होईपर्यंत महाराष्ट्रातील सर्वच कारभार थांबून राहिला. नंतर इ.स. १६६७ च्या एप्रिलमध्ये मोगलांचे व शिवाजीची मैत्री झाली. शिवाजीने परत आल्यावर दंडाराजपुरीला वेढा घातला. वेढ्यात फत्तेखान अगदी जेरीस आला व जंजिरा देऊ केला; परंतु इतर सिद्दी एकत्र जमून एके रात्री फत्तेखानास ठार मारून किल्ला लढवू लागले. शिवाजीने बंडखोर सिद्दीशी मोहिम सुरू केली; परंतु इतरत्र राजकारण उद्‌भवल्याने ती मोहिम अर्धवट सोडून द्यावी लागली. शिवाजीला ही मोहिम करण्यास वेळ १६६८ मध्ये मोगलांशी तह झाल्याने मिळाला; परंतु दरम्यान

सिद्दीचा प्रदेश गेल्याने फक्त जंजिरा किल्यावरच त्यांची मदार राहिली. त्यामुळे सिद्दींना आपल्या किल्यांची गरज वाटली तेवढी डागडूजी करण्यास वेळ मिळाला आणि जंजिरा किल्ला फार अवघड करून ठेवला. त्यामुळे शिवाजीला आता हा किल्ला घेणे सुरूवातीला जितके सोपे झाले असते तितकेच ते आता अवघड होऊन बसले. जंजिरा युरोपिय राष्ट्रांच्या हाती जाऊ देण्यात हिंदवी स्वराज्याला धोक्याची बाब शक्यतो लवकर सुधारण्याचा प्रयत्न करणे जरूरी होते; परंतु हे प्रयत्न तितके यशस्वी होत नव्हते. सिद्दीही दुसऱ्याच्या हवाली किल्ला करणार नाही असाही शिवाजी महाराजांचा अंदाज होता.

इ.स. १६६९ नंतर एका वर्षानीच तो तह तुटला व इ.स. १६६९ च्या सुरूवातीला म्हणजेच १९ एप्रिलपूर्वी दंडाराजपुरीच्या सिद्दींनी शिवाजीच्या काही कोकणातील किल्ल्यांना वेढा घातला. यामध्ये शिवाजीकडील काही लोक फितूर होते; परंतु शिवाजीने त्या सर्वास संशयाने आधीच पकडून कैद केले व बाकी पळाले. शिवाजी महाराजांनी सिद्दींच्या प्रांतात धुमाकूळ घालून त्यांचा बिमोड करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सिद्यांनी मुंबईकर इंग्रजांशी मे च्या अखेरीस आपल्या लोकांना आश्रय मिळावा म्हणून बोलणे लावले. तेव्हा मुंबईकरांनी सुरतला ता. ९ जून १६६९ ला पत्र लिहून परवानगी विचारली. याला उत्तर देतांना सुरतकरांना २३ जूनच्या पत्रात असे करू नये असा सल्ला दिला. तसेच याच पत्रात ते सांगतात की, हल्ली शिवाजीशी भांडण्याची आपली ताकद नाही. दंडा व मुंबई ही दोन्हीही ठाणी सांभाळण्याइतके सैन्य व दारूगोळा जर आपल्याजवळ असता तर आपण सिद्दी व शिवाजी या दोघांचाही सूड घेतला असता.

शिवाजी व सिद्दीने एकमेकांच्या प्रदेशात लुटालूट सुरू केली होती. त्यामुळे व्यापाराला बराच फटका बसला होता. २२ ऑक्टोबर १६६९ च्या पत्रात सिद्दी मुंबईकरांना कळवितो की, शिवाजीने दंडाराजापुरीला वेढा दिला, पण शिवाजीला हा विजय मिळणार नाही. तो उपासमार करू पाहत आहे त्यामुळे वेळ पडलीच तर मोगली अधिकारी लोदीखानाला किल्ला देण्याची आपली तयारी आहे. सिद्दीने पोर्तुगीजांशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला; परंतु चौलच्या अधिकाऱ्याने त्याचे जहाज पकडले व फसविले. त्यामुळे सिद्दी आता इंग्रजांशी मैत्री करू पाहात होता. सिद्दीजवळ ४ चांगली जहाजे व १० इतर मोठी गलबते आहेत. १५-२० मचवे आहेत. त्यापैकी सिद्दी १५ मचवे आपल्या बंदरात पाठवू पहात ओ. त्याचप्रमाणे ३० घोडे व अन्नाचा साठा

अपुरा असल्यामुळे काही बायकामुले इकडे पाठविल्याबद्दल त्याचा विचार दिसतो. तरी आम्हास वाटते की, अशा तऱ्हेची मदत करण्यास काही हरकत नाही. आम्ही ठरविले आहे की फक्त २०० पर्यंत बिनहत्यारी माणूस येऊ द्यावयाचे. मुंबईकारांनी लिहिलेल्या १६ आक्टोबरच्या पत्रावरून सिद्दीची यावेळी स्थिती कशी होती हे कळते. याच सुमारास मोरोपंत वेढ्यासाठी गेले. याची माहिती दि. ६ नोव्हेंबरच्या पत्रामध्ये शिवाजीचा मुख्य प्रधान मुंबई नजीक पेण येथे आल्याची व शिवाजीही जवळपास असल्याची खास बातमी दिलेली आहे. सिद्दी अजुनही अडचणीतच असल्याचे लिहिले आहे; परंतु नोव्हेंबर नंतर वेढ्याचे काम शिथील होऊन शिवाजीचे लक्ष कोकणातील इतर मुलूख व किल्ले घेण्याकडे वेधले असे दिसते असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

सिद्दीची हलाखिची परिस्थिती व जंजिरा किल्याची मजबूती पाहून इंग्रजांना जंजिरा घेण्याचा मोह होऊ लागला होता. असे त्यांच्या १६ ऑक्टोबर १६६९ रोजीच्या मुंबईहून सुरतेला लिहिलेल्या पत्रातून समजते. या पत्राबरोबर हेनरीयंगचे खासगी पत्रही गेले. त्यात तर यामुळे शिवाजीचे सर्व आरमार नष्ट करता येईल असे म्हटले आहे, पण त्याला सुरतकरांनी मान्यता दिली नाही जर सिद्दी मुंबईस येऊ इच्छित असेल तर त्यांच्याशी बोलणे करण्यास फार सावधगिरी बाळगा. त्याला आमच्या हुकुमाची वाट पाहत आहोत म्हणून झुलवीत ठेवा. या अटीवर तर आपल्याला सिद्दीला मुंबई घेताच येणार नाही. त्याप्रमाणे त्याच्या लोकांनाही आश्रय देण्याची कारण नाही. असे केले तर आपला साहसी व महापराक्रमी शेजारी शिवाजी याला आपण खात्रीने चिडविण्यास कारण होऊ. त्याच्याशी लढण्याची आपली तयारी नाही; परंतु जर सिद्दीर किल्ला कंपनीला देत असेल तर तसे तुमच्याकडून समजल्यावर आम्ही जे काही ठरवावयाचे ते ठरवू असे ता. १ नोव्हेंबरचे पत्र मुंबईस १६ जुलै १६७० ला मिळाले. अर्थात तोपर्यंत जंजिऱ्याचा मोह त्यांना आवरून धरणे भागच होते, असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट दाखवितात.[१८४]

इ.स. १६७० च्या सुरूवातीस खांदेरी बसविण्याचा प्रयत्न मोगली सैन्य करू लागले; परंतु जो त्यांचा प्रयत्न फसलेला दिसतो. सिद्दींनी हा प्रयत्न केला होता, पण इंग्रजांनी तो सफल होऊ दिला नाही. कारण शिवाजी महाराजांनी हे बंदर ताब्यात घेतले तर बरे. कारण हे लोक शेजाराला तितके चांगले नाहीत. शिवाजीची स्वारी मोगलावर झाल्या कारणाने दंडाराजपुरीवर निकराने हल्ला चढवावा तर ते घडले नाही जर तो स्वतः या सैन्याला जाऊन मिळाला तर किल्ला शिवाजीच्या हातात पडण्याची भीती इंग्रजांना वाटत होती; परंतु ते घडून आले नाही

आणि हा वेढा पावसाळ्याच्या सुरूवातीला उठविला गेला. दंडाराजपुरीचा वेढा उठविला असला तरी शिवाजी महाराज दंडाराजपुरी घेण्याचा नाद सोडील हे शक्य नव्हते. इंग्रजांनी दंडाराजपुरीला गोळे, एक दोन जेजाला इतके गुप्तपणे पोचते करावे अशी त्याची अपेक्षा आहे. याबाबतीत आपला निकाल ताबडतोब कळवावा असे त्याचे म्हणणे आहे. अशा अर्थाचे बोलणे सप्टेंबर १६७० च्या सुरूवातीस सुरू झाले. इ.स. १६७१ मध्ये शिवाजी महाराजांची दंडाराजपुरीवरील स्वारी अगदीच मंदावली होती. सिद्दीने मात्र याचा फायदा घेऊन शिवाजीच्या प्रदेशात शिरून छळ वगैरे काही शहरात जाळपोळ केली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी त्याच्यावर ऑक्टोबरच्या सुरूवातीला पाठविले असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१८५]

१६७२ च्या सुरूवातीला इंग्रज व सिद्दी या दोघांसही चांगला पायबंद बसावा म्हणून शिवाजी महाराज योजना करू लागले. इ.स. १६७२ च्या सुरवातीस शिवाजी महाराजांची खांदेरी बांधण्याची योजना सुरत व मोगली दरबाराना समजली; परंतु १० मे पर्यंत तरी खास कामाला सुरूवात झाली नव्हती. २२ ऑगस्ट १६७२ च्या सुमारास उमर नाखवा १२ फ्रिगेटे व १००० दर्यावर्दी घेऊन दंडाराजपुरीचा प्रश्न सोडविण्यासाठी सुरतेच्या खाडीत शिरला व त्याने बादशाहाला आपणास १ लाख २० हजार दिल्यास आपण शिवाजीने सुरू केलेले खांदेरी-उंदेरीचे काम पूर्ण होण्यापूर्वीच बंद पाडतो असे कळविले. बादशाहाने तशी परवानगी देताच मोगली आरमार ३१ ऑक्टोबर १६७३ ला बंदरात आले. २० गलबते होती ती दंडाराजपुरीच्या मदतीला आली होती. त्यांनी मुंबईत शिरण्यासाठी परवानगी मागितली; परंतु मिळाली नाही. मोरोपंतानेही आपले आरमार मोगली आरमार जाळण्याच्या उद्देशाने पाठविले. मुंबईकर बंदरात शिरू देत नाहीत म्हणून मोगली आरमार सिद्दींच्या आरमाराच्या संरक्षणाखाली व जंजिरा किल्याच्या आश्रयाला गेले. मोरोपंताने किल्यास वेढा घालण्यास सांगितले; परंतु मोगली व सिद्दी दोघांनी मिळून शिवाजीचे ५० मचवे बुडविले व किनाऱ्यावर शिरून बरीच जाळपोळ व लुटालूट केली. सिद्दीचेही बरेच नुकसान झाले. मुंबई बंदरात यावेळी शिवाजीचे ६ मचवे होते ते इंग्रजांनी आम्ही पकडल्यापैकी आहे असे सांगितल्यावर वाचले. सिद्दी संबुळ हा या जोड आरमाराचा मुख्य अधिकारी होता. त्याने जंजिऱ्याचा वेढा अशा तऱ्हेने उधळून लाविल्यानंतर तो परत ३६ गलबतांचे आरमार घेऊन मुंबईत २५ डिसेंबरला आला. तेव्हा त्याचे इंग्रजांनी आदरातिथ्य केले. नंतर सिद्दीने इंग्रजांनी शिवाजीविरूद्ध लढण्यास मदत करण्याची मागणी केली. शिवाजी

महाराजांनीही सिद्दीच्या विरोधात मदत करण्याची मागणी केली. दि. १५ जानेवारी १६७३ रोजी सिद्दीला इंग्रजांनी मेजवानी दिली व सिद्दी मोगली आरमारासह दि. २१ जानेवारीला मुंबई शहर सोडून निघाला. ता. २८ मार्च १६७३ पर्यंत शिवाजीकडील १५००० माणसे व बराच पैसा या जंजिऱ्याच्या लढाईमुळे खर्च झाला असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

२० जानेवारी १६७३ ला सिद्दी संबुळ मुंबईवरून सुरतला गेला. त्याने सुरतवाल्यांशी मुंबईत राहावयास मिळावे म्हणून बोल लावले; परंतु मुंबईकरांनी त्यांना मुंबईत राहू देण्याचे नाकारले. त्यामुळे मोठ्या नाखुषीने २६ मे ला सिद्दीच्या आरमारासह सिद्दी संबळ दंडाराजपुरीला गेला. मोगली आरमार व त्यावरील मिर्झा महंमद हुसेन नावाचा अधिकारी मात्र माजगाव येथे राहिला. त्यामुळे शिवाजीला इंग्रजांविषयी थोडा संशय येऊ लागला; परंतु त्याने हुबळीत बरीच नुकसानी केल्याचे समजताच पुन्हा शिवाजीशी बोलणे लाविले व तहाच्या अटीबद्दल ज्या काही सूचना द्यावयाच्या त्या देऊन निकोलस याला रवाना करण्याचे ठरविले व शिवाजीची मनधरणी करण्यास सांगितले.[१८६]

इंग्रजांनी सिद्दीला फक्त मदत देण्याचे नाकारले; परंतु सिद्दीने मात्र शिवाजीच्या गलबतांवर हल्ले करून ती पकडणे वगैरे कामास सप्टेंबरपासून सुरूवात केली. सिद्दी परत १० ऑक्टोबर १६७३ ला मुंबईत शिरला तसेच त्याने करंज, नागोठाणे, पेण या बाजूकडे प्रवेश करून नाकेबंदी केली. त्यामुळे इंग्रजांचा अपमान झाला आहे. तसेच १० ऑक्टोबरला सिद्दीने शिवाजीच्या प्रदेशात लुटालूट जोराने करण्यास सुरूवात केली. ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवाड्याच्या सुरूवातीला सिद्दींनी काही लोक शिवाजीच्या प्रदेशातील भाताची उभी शेते कापून आणण्याकरितां पाठविले तेव्हा शिवाजीच्या सैनिकांनी त्याच्यावर अचानक छापा घालून सुमारे शंभरजणांचा नाश केला. नंतर शिवाजीने ३००० लोकांसह बंदोबस्त केल्याने सिद्दी संबुळची चांगलीच फजिती झाली व त्याने पुन्हा इंग्रजांशी मैत्रीचे बोलणे सुरू केले.

मोगली सैन्याचा पराभव होत आहे असे पाहून व सिद्दी अगदी जेरीस येऊन इंग्रजांशी मैत्री घडवून आणण्यासाठी इंग्रजांच्या मध्यस्थतीची अपेक्षा धरून त्यांच्याशी त्यांनी फेब्रुवारी १६७४ बोलणे केले. शेवटी ४ मार्च १६७४ ला मुंबईकरांनी ते मान्य करून तह करण्याचे कबूल केले, पण मार्च महिन्याच्या अखेरीस सातवळीच्या खाडीत सिद्दी संबुळ व दौलतखान यांची लढाई झाली. त्यामध्ये सिद्दी जखमी होऊन त्याचे १०० लोक मारले गेले व दौलतखानाकडील

४४ लोक मृत्यू पावले. दौलतखानही जखमी झाला होता, पण त्याचा विजय झाला. यानंतरचा काळ इंग्रजांचा सिद्दीशी किंवा मोगलांशी किंवा शिवाजीशी कोणाशी मैत्री संबंध ठेवावे यातच गेला. यातच सुरतकरांनी शिवाजीशी सलोख्याचे बोलणे करण्यास परवानगी दिली. या कामगिरीवर ऑक्सिडनला पाठविण्यात आले. ऑक्सिडनला १३ मे १६७४ ला रवाना केले. त्याला तहाबद्दल ज्या सूचना केल्या होत्या त्यामध्ये सिद्दी प्रकरणाविषयी पुढीलप्रमाणे सांगण्यात आले होती असे वा. सी. बेंद्रे सांतात. ते म्हणजे सिद्दीचे आरमार पावसाळ्यामध्ये मुंबईला राहिल्यामुळे शिवाजीला राग येणे साहजिक आहे. तेव्हा शिवाजी महाराजांना इंग्रजांनी आपली बाजू स्पष्ट करून सांगितली व आमचे काही चुकले नाही हे दाखविण्याचा प्रयत्न केला.[१८७] शिवाजी व सिद्दी यांच्या युद्धामुळे व्यापाराला अडथळा होतो आणि शिवाजीविरूद्ध सिद्दीला साह्य करणारा बादशाही आरमार किनाऱ्यावर उपद्रव देत. हे टाळण्यासाठी सिद्दीसोबत तह करण्यासाठी खटपट केली पाहिजे. या बाबतीत युद्धामुळे होणारी हानी व शांततेपासून होणारा लाभ याबद्दल निराजीशी चर्चा करून त्याचे मन वळवावे त्यांच्याशी चांगला शेजारी व मित्र या नात्याने संबंध ठेवण्याची प्रेसिडेंटची इच्छा आहे. यामुळे उभयतांनीही परस्परात सलोख्याने रहावे एवढेच बोलून ठेवावे; परंतु ऑक्सिडनने निराजीपंताजवळ गोष्ट काढताच त्यांनी नकारार्थी उत्तर दिले आणि सांगितले की, शिवाजीजवळ याबाबतीत मुळीच बोलू नये. ऑक्सिडन लिहितो की, सिद्दीच्या तहाविषयी बोललो त्याचा निराजीवर काहीच परिणाम झाला नाही. राज्याभिषेक होताच जोराचा हल्ला करून येत्या किंवा पुढच्या पावसाळ्यात दंडाराजपुरी घेण्याच्या विचाराने उत्तम सैन्याची तयारी चालू असून तोफखान्यामध्ये १५ तोफांची भर शिवाजीने नुकतीच घातली आहे. सिद्दीने किल्ला ताब्यात द्यावा आणि वाटेल तेवढी मनसब मागावी असे शिवाजीने कळविले. त्याला सिद्दीने नकार दिल्यामुळे सिद्दीने युद्धासाठी तयार रहावे असे निराजी बोलला.

मोरो पंडित याला ऑगस्ट १६७४ च्या सुरूवातीला १०००० फौजेसह सिद्दीच्या विरोधात पाठविले. मोरो पंडिताने येऊन इंग्रजांशी सिद्दीला बाहेर करण्यासंदर्भात तक्रार केली. दादाजीलाही महाडवरून दंडाराजपुरीला रवाना केले. शेवटी शिवाजी महाराजांनी एक ताकीदपत्र पाठविले आणि इंग्रजांना कळविले की, जर यापुढे सिद्दीला बंदरात राहू द्याल तर तुम्ही सिद्दीला विशेष सवलती व मदत करत असे समजून आपला तह तोडून लढाई सुरू झाली असे समजावे. इंग्रजांनी ताबडतोब २६ ऑगस्ट १६७४ रोजी कॅ. निकोलस याला सिद्दीकडे रवाना केले आणि

तुम्हाला आता जी दाणारसद जी द्यावयाची ती मिळालीच आहे तरी ताबडतोब तुम्ही बंदर सोडून गेलेच पाहिजे. असे बजावले व शिवाजीचे पत्रही दाखविले; परंतु सिद्दीस ताबडतोब बंदर सोडून जाणे शक्य नव्हते. त्यांनी पोर्तुगीज व इतर युरोपियन लोकांची शिवाजीविरूद्ध लढण्यातील सैन्यात भरती करण्यास सुरूवात केली. मुंबईतील रहिवाशीच जेव्हा त्याला मिळत आहेत असे मुंबईकरांना दिसून आले व शिवाजी या मदतीची बातमी ऐकेल तेव्हा फार रागावेल. ही भीती मनात धरून त्यांनी ताबडतोब हुकूम काढून जो जो कोणी सिद्दीस जाऊन मिळेल त्याची सर्व मालमत्ता जप्त केली जाईल असे जाहीर केले व अशांना शिक्षाही करून लागले; परंतु स्वतः शिवाजी महाराज मोठ्या सैन्यासह कल्याणकडे येत आहे हे ऐकून मात्र सिद्दीने मुंबईबाहेर जाण्याचे ठरवून तो बाहेर पडला आणि सुरतेकडे गेला. डचांच्या आरमारला पाहून भीतीने परत वळला. नंतर इकडे तिकडे लपून छपून त्याने काढले. शिवाजी महाराजांनी जंजिऱ्याचा वेढा अगदी सर्वशक्तिनिशी लढविण्याचा विचार करून दारूगोळा व मोठ्या तोफा पाठविल्या होत्या. त्यामुळे सिद्दीचा टिकाव लागत नव्हता. शिवाय शिवाजी महाराजांनी आणखी मोठ्या तोफा मिळविण्याचा प्रयत्न केला. मुंबईकरांनी काही सुरतकरांनी अशा तऱ्हेची मदत केल्यास औरंगजेबास राग येईल म्हणून अधिक मदत देण्याचे नाकारले. यामध्ये सिद्दी व संबुळचे बरेच लोक मारले गेले. पैसाही संपला, त्यामुळे एखाद्या महिन्यात जंजिरा शिवाजी महाराजांच्या हाती पडेल अशी अवस्था प्राप्त झाली. सिद्दी संबुळ राहिल्या लोकांसोबत पळून मुंबईस आला व सुरतेला पोहोचण्यापुरती रसद जमवून बाहेर जाण्याचे कबूल करून ताबडतोब सुरतेला इ.स. १६७५ च्या फेब्रुवारीत निघून गेला.[१८८]

मोगल आणि शिवाजी महाराज यांचा घाटामध्ये असलेला तह व मुंबईकरांनी शिवाजीराजांशी केलेला तह यांच्या प्रतिपालनार्थ चालविलेल्या खटपटीमुळे सिद्दीस शिवाजीराजांच्या हद्दीत शिरून जाळपोळ करण्याच्या प्रवृत्तीला आळा घालावा लागला असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, शिवाजीराजेही यावेळी फोंडा वगैरेकडे दक्षिणेत गुंतल्याने त्यांची दंडाराजपुरीची इ.स. १६७५ मधील स्वारी बरीच मंदावली होती म्हटले तरी चालेल. तरीही अधुनमधून शिवाजीराजांचा व सिद्दीचा किरकोळ आरमारी संघर्ष चालूच होता. इ.स. १६७५ च्या सुरूवातीस सिद्दी संबुल व जंजिऱ्यातील तुलीखान आदि इतर सिद्दी यांच्यात वैमनस्य झाले. सिद्दी संबुल एप्रिलमध्ये आरमारासह मुंबईला आला. मुंबईकरांनी त्याला मुंबईत राहण्यास

नाकारले. तरी तो जानेवारीत राहिला. सुरतेच्या सुभ्याने सिद्दी संबुल यास दूर करून सिद्दी कासम यास जंजिऱ्याचा हवालदार व मोगली आरमाराचा प्रमुख करून पाठविले. ते आपल्या १००-१२५ माणसांसह २६ जून १६७६ ला मुंबईत आले व पावसाळा संपेपर्यंत तेथेच राहिले. सिद्दी संबुलने आरामाराचा ताबा त्याला दिला नाही. ऑगस्टमध्ये मोरोपंतानी १०,००० सैन्यासह वेढ्याच्या तयारीने दंडाराजपुरी घेण्याच्या निर्धाराने कूच केली. सिद्दी कासम आपल्या ४००-५०० लोकांनिशी किल्ला लढविण्यासाठी गेला; परंतु शिवाजीराजांचे मुख्य लक्ष दक्षिणेतील स्वारीवर राहिल्याने जंजिऱ्याचा वेढा पुन्हा मागे पडला. मात्र सिद्दी संबूल व सिद्दी कासम यांचे भांडण विकोपास गेले. सिद्दी संबूल आपल्या आरामारानिशी बाहेर पडला व सिद्दी संबुलची बायकामुले जंजिऱ्यामध्ये अडवून धरिली. सारांश, फारशा हालचाली न होता सिद्यांच्या आपापसांतील भांडणात इ.स. १६७६ चे वर्ष गेले.

सिद्दी संबुलला जंजिऱ्यामध्ये राहता येत नसल्याने तो इ.स. १६७७ च्या एप्रिलच्या सुरूवातीस मुंबईमध्ये बळजबरीने येऊन आपल्या आरमारासह राहिला. इंग्रजांनी त्याची रसदपाणी बंद करून त्याला बाहेर घातले; परंतु तो तेथेच घुटमळत राहिला. सिद्दी कासमच्या तक्रारीवरून सुरतेच्या सुभेदाराने सुभानकुलीस १५० लोकांनिशी आरमाराचा ताबा घेण्यास पाठविले. तो सिद्दी संबुलकडून आरमाराचा ताबा घेण्यास २८ जुलैला मुंबईला आला. सुभानकुलीचा त्याच्याशी माजगावामध्ये संघर्ष झाला.[१८९] काही माणसे मारिली गेली; परंतु इंग्रजांनी ताबडतोब बंदोबस्त करून दोघांसही २१ ऑक्टोबरमध्ये मुंबई बाहेर काढून दिले. अशा पद्धतीने इ.स. १६७७ चे वर्षही विशेष काही न घडता गेले.

सिद्दी संबूल हा या ना त्या कारणाने इ.स. १६७८ च्या अखेरपर्यंत मुंबईतच राहिला आणि सिद्दी कासम पावसाळ्यासाठी इ.स. १६७८ च्या मार्चच्या अखेरीस मुंबईच्या असऱ्यास आला. सुरतकरांनी तेथील सुभेदाराच्या भितीने दोन्ही सिद्दीस मुंबईत राहू देण्यास लाविले. पावसाळा सुरू होताच सिद्दीचे आरमार समुद्रात जाऊ शकणार नाही असे पाहून शिवाजी महाराजांनी माजगावांमधील सिद्दीचे आरमार जाळून टाकण्यासाठी दौलतखानास हुकूम दिला. ही बातमी समजताच इंग्रजांनी व सिद्दीने आपल्या बचावाची तयारी केली. शिवाजीराजांचे सरदार दौलतखान, दर्यासारंग व त्याचा मुलगा यांना नावाजून व बक्षिसे देऊन आरमारासह पाठविले. ते ४०० लोकांसह जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात पनवेलला आले. तेथून ते सालसेतच्या हद्दीत

उतरण्याचा प्रयत्न करणार होते; परंतु पोर्तुगीजांनी त्यांना उडविले. शिवाजीराजांनी लढाई करण्याची धमकी देताच इंग्रजांनी मुंबई बंदरातील सर्व आरमार बाहेर काढण्यास लावले. अशाप्रकारे इंग्रजांनी आपल्यावरील शिवाजी राजांचा रोष चुकविण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीजांनी ठाणा खाडीमध्ये ४० मचवे भरून सशस्त्र लोक ठेऊन दौलतखानाचा प्रयत्न निष्फळ केल्याने शिवाजीराजे दौलतखानावर नाराज झाले. कल्याण भिवंडीच्या सुभेदारालाही पूर्व तयारी नीट न केल्यामुळे कडक शासन केले. जंजिऱ्यास लागून असलेल्या एका टेकडीवर तोफा डागण्याचा शिवाजीराजांनी हुकूम दिला. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात तोफा डागल्याही गेल्या. कारण त्यामुळे जंजिरा किल्ल्यात अचूक मारा करिता येईल अशी व्यवस्था केली गेली. जंजिऱ्याच्या सर्व बाजूनी वेढा देण्यास चौलच्या सुभेदाराला सांगितले. शिवाजी राजांची जंजिरा घेण्याची ही योजना अगदी बिनचुक अशी होती असे मुंबईकरांनी लिहिले आहे, असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. सिद्दीला आतापर्यंत काही हालचाल करावयास न मिळाल्याने त्याची सामग्री संपत आली. त्यामुळे त्यांनी लुटालूट करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यास इंग्रजांनी पायबंद घातला. चौलच्या सुभेदाराला चार महिन्यांत जंजिरा घेण्याचा हुकूम झाल्याने त्याने इंग्रज सिद्दीस दाणागोटा पुरवितात म्हणून त्यासच तो नेऊ देण्यास बंदी केली. दर्यासारंग व त्याचा मुलगा यास कैद करून त्यांचे घरदार लुटले. तसेच तो मुंबईच्या व्यापाऱ्यांची गलबतेही लुटू लागला. त्यामुळे मुंबईकरांनी सुरतेला सारख्या तक्रारी केल्या व शेवटी सुरतेच्या सुभेदाराने सिद्दी कासम यास मुंबई बंदरात न जाण्याविषयी हुकूम दिला. जंजिऱ्याचा वेढा चालूच होता. छापा घालण्याची तयारीही (डिसेंबर १६७८) झाली होती. आतील लोक किल्ला लढवीत होते. त्यांना मदत द्यावी ती पैशाच्या अभावी सिद्दीला देता येत नव्हती तरी १६७८ वर्षात किल्ला सिद्दीकडेच राहिला.

इ.स. १६७९ च्या सुरूवातीला पुन्हा दंडाराजपुरीच्या वेढ्याकडे शिवाजी महाराजांने दुर्लक्ष करणे भाग पडले. कारण मोगल व विजापुरकरांनी शिवाजी महाराजांच्या विरोधात मोहिम काढली होती. शिवाजी राजांना आपले काही लोक काढून घ्यावे लागले. सिद्दीचे आरमार पुन्हा येऊ देऊ नये असा सुरतेच्या सुभेदाराजवळ आग्रह धरल्यामुळे सिद्दी मुंबईस न येता सुरतेस गेला. इ.स. १६७९ च्या ऑगस्टमध्ये पावसाळ्याचा फायदा घेऊन शिवाजी राजांनी इंग्रज व सिद्दी यांच्या समुद्रातील हालचालींना पायबंद देण्याच्या विचाराने खांदेरीबेटावर कोट बांधण्याचे काम चालू केले. त्यास इंग्रजांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. सिद्दी व मोगल यांना ही बातमी

समजताच सुरतेहून निघण्याची तयारी केली. ऑक्टोबरच्या सुरूवातीस हे आरमार निघणार होते; परंतु सिद्दी ९ नोव्हेंबरपर्यंत तरी मुंबईस येऊ शकला नाही. नंतर आला व खांदेरीवर तोफांचा मारा करण्यास सुरूवात केली, पण कोणासही यश आले नाही. खांदेरी घेण्यासाठी या दोन आरमारामध्ये चढाओढ लागली. त्यामुळे साहजिकच इंग्रज व सिद्दी यांच्यात मत्सर उत्पन्न झाला. काही झाले तरी सिद्दीला आपले लोक प्रथम उतरू द्यावयाचे नाहीत यावरच इंग्रजांचे विशेष लक्ष राहिले. १९ नोव्हेंबरला शिवाजी राजांचे काही आरमार बाहेर पडले. सिद्दीने पाठलाग केला; परंतु त्यास अयशस्वी होऊन परतावे लागले. मोगली सत्तेच्या दडपणाखाली इंग्रज व सिद्दी यांचा मैत्रीचा देखावा चालू होता. ३ डिसेंबरला सिद्दीने इंग्रजांना एकत्रितपणे खांदेरीवर हल्ला करण्यास जाण्याचे सुचविले, पण इंग्रजांनी त्याला लवकर प्रतिसाद दिला नाही. सिद्दी किनाऱ्यावर अधिकाधिक लुटमार करू लागला. त्याचा शिवाजी राजांना राग येऊन मुंबईवरच तो स्वारी करेल अशी भीती वाटू लागली. सिद्दीने मात्र मोगली आरमाराच्या साह्याने उंदेरी बेटावर आपले लोक उतरविले. त्याने उंदेरीवर कोट उभारण्यास सुरूवात केली. तेथे तोफ डागून थळवर मारा करण्यास सुरूवात झाली. थळवरूनही त्यांच्यावर तोफांचा मारा होऊ लागला. इंग्रजांवर खांदेरीबरोबर सिद्दीच्या उंदेरीचे नवीन संकट इ.स. १६७९ च्या शेवटी येऊन ठेपले. शिवाजी राजे मोगलांवरील स्वारीत गुंतल्याने जी काही भीती थोडी कमी झाली ती राजे परत येताच वाढली व पावसाळ्यात आपला निभाव लागणे कठीण होईल असे इंग्रजांना वाटू लागले. जंजिऱ्याचे संकट जरी लहान होते तरी त्याने मोगलांचे लक्ष दक्षिणेत वेधले व त्याने उग्र स्वरूप धारण केले व त्यामुळे हिंदवी स्वराज्याच्या रक्षणांत शेवटपर्यंत बराच त्रास सहन करावा लागला.

४.२२ इंग्रज आणि शिवाजी संबंध

वा. सी. बेंद्रे इंग्रज व शिवाजी महाराज यांच्या संबंधासंदर्भात सांगतात की, सर थॉमस रो भारतात आल्यानंतर इंग्रजांनी सुरत व मोगली बंदरात आपले बस्तान बळकट केले होते. डिसेंबर १६३७ मध्ये आदिलशाहानेही गोवा घेण्यासाठी इंग्रजांची मदत घेतली होती. यावरून इंग्रजांना वखारी स्थापण्यास मोगल व आदिलशाहा यांनी शिवाजी महाराजांपूर्वीच परवानगी दिली होती. आदिलशाहीत राजापूर व कारवार येथे इंग्रजांनी आपल्या वखारी प्रथम उघडल्या होत्या. इंग्रजांचा शिवाजीशी संबंध आला तो त्यांनी सिद्दी जोहर यास जे ग्रेनेड्स विकले व आपणहून ते शिवाजीच्या विरोधात वापरले. त्या प्रसंगाच्या निमित्ताने हे ग्रेनेड्सखाली मरीनला ३० सप्टेंबर

१६५९ च्या पूर्वी काही दिवसपूर्वी युरोपवरून आले होते. त्यांची विक्री प्रथम रुस्तूमजमाला करण्याचा इंग्रजांचा विचार होता. याचा उल्लेख रेव्हिंग्टनच्या १० डिसेंबर १६५९ च्या लिखाणात येतो.[१९०]

गायफर्डने राजापुरमध्ये फाझलखानाच्या जंक शिवाजीच्या सरदारांना अडवू दिल्या नाहीत. म्हणून खारेपट्टणला त्याला कैदेत ठेविले होते. त्याच्या सुटकेसाठी इंग्रजांनी शिवाजीला व मध्यस्थीसाठी रुस्तुमजमाला पत्रे लिहिली होती असे सांगून वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात की, रेव्हिंग्टन व इतर इंग्रज यांनी शिवाजीच्या सामर्थ्याकडे केवळ अज्ञानाने क्षूद्र दृष्टीतून पाहिले आणि आपल्या उर्मट शब्दांत उत्तरे प्रत्युत्तरे करतो हे दाखविण्याचा प्रयत्नही केला. ज्या रुस्तुमजमाच्या मैत्रीचा त्यांना मोठा आधार वाटत होता. त्या रुस्तुमजमाचाही सिद्दी जोहरने ग्रेनेड्स दिल्याबद्दल राग धरला आणि त्यांच्या मध्यस्थीचे साधनही नाहिसे झाले. यानंतर शिवाजीने वखारवाल्यासह रेव्हिंग्टनलाही कैद केले. त्यांनी एक-दोन वर्षे सुटकेसाठी प्रयत्न केले, पण इतर कोणीही त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले नाहीत. रेव्हिग्टनने हवालदाराशी बोलणी केली. त्यात अशियोक्तिपूर्ण मजकूर घालून ती माहिती सुरतला कळविली. सुरतकरच रेव्हिंग्टनला १४ नोव्हेंबर १६६० ला लिहितात :"जर ग्रनेडची किंमतीची बाकी न भरली तर आम्ही कंपनीच्या हुकूमाप्रमाणे इंगर्ल बोटीत आलेल्या तुझ्या मालाची जप्ती करून वसूल करून घेतला जाईल. कारण रेव्हिंग्टनला त्या ग्रेनेडचे पैसे विजापुराकडून मिळण्याची आशाही राहिली नव्हती."

"रेव्हिंग्टनला ड्रॉप्सी झाल्यामुळे तो बराच आजारी झाला तेव्हा त्याला १७ ऑक्टोबर १६६१ रोजी कैदेतून मुक्त केला. इतर सर्व तसेच कैदेत रखडत ठेविले."[१९१]

सुरतकर इंग्रजांनी १७ मे १६६२ ला आज्ञा केली की, राजापुरच्या बाजूला शत्रूची एक जंक पकडावी म्हणजे त्या भीतीने सर्व कैद्यांची मुक्तता होईल अशी अपेक्षा आहे, म्हणून लिहिले आहे. यानंतर शिवाजी महाराजांचे गलबे लुटण्याचा आदेश दिला गेला, पण शिवाजीचे साम्राज्य किनाऱ्याच्या बाजूने अधिक वाढण्याची शक्यता असल्याने कॅप्टनने शिवाजीशी वैर घेतले नाही. गिफर्ड व त्याचे सहकारी राजापुराहून निसटून गोव्याकडे गेले. तेव्हा गिफर्ड व कोल्हापुराहून सरतेला कळवितो, "येथे राहण्यांत धोका असल्यामुळे गोव्याकडेच आम्ही जात आहोत. कोणाला संशय येऊ नये म्हणून गेल्या वर्षी शिवाजीने पकडलेल्या मुसलमानांपैकी आम्ही जात आहोत. असे सांगत व मुसलमानी पोषाख करून जात आहोत. संरक्षणासाठी चार शिपाईही

बरोबर घेतले आहेत... आम्ही सुरतेला कोणत्या मार्गाने यावे ते कळवावे." इंग्रजांचे सर्व वखारवाले शिवाजीच्या कैदेतून मुक्त झाल्याने सुरतकरांनी हे प्रकरण मिटते घेतले. फक्त राजापुरच्या वखारीच्या नुकसानीचा प्रश्न मात्र विचाराधीन राखला.[१९२]

यानंतर रावजी पंडिताच्या वतीने शिवाजीशी तह करण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच शिवाजीशी सलोख्याचे संबंध ठेवण्यासाठी प्रयत्न केला गेला. शिवाजीने सुरतेवर आक्रमण केले तेव्हा पहिला बहुतेक संपूर्ण दिवस शिवाजीने इंग्रजांच्या वखारीवर गोळी चालवून काही उपाय चालत नाही असे पाहून जुन्या तराईत तार्तरीचा राजा होता. त्याच्यावर हल्ला केला. जुन्या सराईतून इंग्रजांच्या वखारीवर सुरक्षितपणे हल्ला करण्याचा केलेला प्रयत्न तसाच फसल्यावर शिवाजीच्या लोकांनी इंग्रजांशी बोलणे लावावे असे सवालीवाल्याच्या १२ नोव्हेंबर १६७० च्या अहवालात आले आहे. यावर वा. सी. बेंद्रे म्हणतात की, इंग्रजांना शिवाजीशी तह करण्याची फार इच्छा होती. कारण त्यामुळे शिवाजीकडून नुकसान व लूट होण्याची भीती कमी झाली असती; परंतु त्यांना शक्य तितका पैसा उकळण्याचीही हाव होती हे शिवाजीबरोबर तहाच्या वाटाघाटीकरिता उष्टिकला पाठवितांना त्याला दिलेल्या सुचनांवरून इंग्रजांची बाजू नीट समजून येते. २५ सप्टेंबर १६७१ ला सूचना दिल्या होत्या. त्यात त्याला शिवाजीपासून काळजी व सावधगिरी ठेवण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. मित्रत्वाचा देखावा करण्यास सांगण्यात आले होते. झालेल्या नुकसानीची भरपाई, पुन्हा अत्याचार न करण्याची हमी, भरपाईची रक्कम ३२,००० होन, तसेच नुकसान भरपाईचा अनुकूल निकाल होईपर्यंत कंपनी राजापुरला पुन्हा वखार बांधणार नाही असे राम शेवण्यामार्फत सांगावे व याठिकाणी इंग्रजांचा शिवाजीशी कायमचा तह करण्याचा प्रयत्न होता. यानंतर स्वालीने १ नोव्हेंबर १६७१ ला पुढील वस्तू शिवाजीला नजराण्याकरिता पाठविल्या. २ भडक रंगाचे ताके, ५ लांब तलवारी, २ आरसे, १ पायजमा, ६ मूल्यवान व ६ साध्या पामऱ्या. यानंतर मुंबईकरांनी सुरतेला १५ मे १६७२ ला जे पत्र लिहिले त्यात उल्लेख येतो की, "काल उष्टिक शिवाजीकडून परत आला. बराच वेळ तिष्ठत राहिल्यावर त्याच्याशी व त्याच्या ब्राह्मणांशी फक्त अर्धा तास बोलणे झाले. ते निरर्थक झाले, पण अखेरीला नुकसान भरपाईबद्दल ५००० होन देण्यास तयार झाला. राजापुरला वखार उघडली तर सर्वप्रकारे सहानुभूती मिळेल. एवढे काय ते निष्पन्न झाले."[१९३]

२१ डिसेंबर १६७२ च्या मुंबईच्या इंग्रजाच्या पत्रातून कळते की, त्यांनी शिवाजीशी आपले मैत्रीपूर्ण संबंध आहेत हे मुगल बादशाहाला समजू नये म्हणून काळजी घेतलेली होती. शिवाजीने नंतर हुबळी लुटली तेव्हा देखील इंग्रजांनी शिवाजीशी मैत्रीपूर्ण तह करण्याचाच प्रयत्न केलेला आपल्याला दिसतो. ६ जानेवारी १६७३ च्या मुंबई प्रेसिडेंटच्या पत्रावरून समजते की, सिद्दी सरदाराने प्रेसिडेंटला शिवाजी राजांविरूद्ध व शिवाजी राजांच्या सरदाराने मोगलांविरूद्ध त्यांची मदत मागितली होती, पण त्यांनी नि:पक्षपातीपणाचे धोरण स्वीकारले. मुंबईकरांच्या १६ मे १६७५ च्या पत्रात शिवाजीची गलबते धरण्याचा विचार ठरला. त्याबाबत जो तपशील येतो तो बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात. "कारवारहून आलेल्या पत्रात त्या बाजूला किनाऱ्याच्या बाजूने जाणाऱ्या शिवाजीच्या सैन्याकडून झालेल्या उपद्रव्याबद्दल आणि शिवाजीने हुबळी लुटल्यामुळे तेथे असलेल्या कंपनीच्या बऱ्याच मालमत्तेशी संपर्क येऊन बहुधा ती लुटली गेली असेल याबद्दल लिहून आले. याच दिवशी राजापूर नावाच्या बंदरातील एक गलबत मस्कतहून भरून येत असतां वादळी हवेमुळे मुंबई बंदरात शिरले. तेव्हा शिवाजीकडे आपण मागणी केली आहे. त्याच्या हिशोबात म्हणून ते गलबत धरून ठेवावे किंवा कसे असा प्रश्न उपस्थित होऊन मालाची अफरातफर होऊ न देता शिवाजीकडून समाधानकारक भरपाई होईपर्यंत गलबत धरून ठेवावे असे ठरले." यानंतर राजापूरच्या गलबतासंदर्भात तसेच शिवाजीने हुबळी लुटली असेल त्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी निकोलस यांला शिवाजीकडे पाठविण्याचे ठरले असे मुंबईकरांच्या १६ मे १६७३ च्या पत्रावरून समजते.[१९४]

निकोलसने आपल्या प्रवासाचा अहवाल १७ जूनला सादर केला त्यात, "...ता. २ जूनला मी संभाजीकडे काही सामान्य बाबींबाबत हुकूम घेण्यास गेलो; परंतु शिवाजी आपल्या मातेच्या मंदिरात आल्याचे व नंतर गडावर आल्याचे समजले. शिवाजीशही ५ वाजता बोलणे झाले. हुबळीच्या लुटीबाबत त्याला काहीच अहवाल मिळाला नाही. त्यामुळे त्याबाबत काही उत्तर देता येत नाही म्हणून सांगितले. चौकशी नंतर विचार करीन. मीठ व लाकुडफाट्याबाबत पत्रे घेऊन जाण्यास शामजीला तेथे ठेवण्यास सांगितले. निरोप दिला..."[१९५]

शिवाजी राजांशी मैत्रीपूर्णच संबंध का ठेवावे या संदर्भात सुरतकरांच्या १० जुलै १६७३ च्या अहवालात नोंद येते की, (१) डचांशी हल्ली युद्ध चालू आहे. त्यांनी शिवाजीशी एकमत केले तर दोघे मिळून आपल्याला हाकलून लावतील. (२) मुंबईला बऱ्याच गोष्टींकरिता मुख्यत:

सर्पणाकरिता (सरपणाकरिता) शिवाजीच्या मुलुखावर अवलंबून राहावे लागते. (३) पोर्तुगीजांनी ठाण्याचा मार्ग बंद केल्यामुळे औरंगाबाद व बऱ्हाणपूर येथून माल मुंबईला यावा अशा सोईचे बंदर त्याच्या राज्यातील सल्याने त्याच्याकडूनच ते आपल्याला मिळविले पाहिजे... ठरलेली रक्कम हाती येईपर्यंत मस्कतचे (राजापूरचे) गलबत सोडू नये. शिवाजी शिवाय राजापूरच्या कित्येक व्यापाऱ्यांकडून कंपनीचे येणे आहे. त्यांचा काही संबंध या गलबतांत असेल तर बेशक भरपायी करून घ्यावी.

प्रेसिडेंट आंगियारने शिवाजी राजास ६ ऑक्टोबर १६७३ ला पत्र लिहिले. त्यातील मजकूर असा - "आपला वकील भिमाजी पंडित आज नारायण शेवण्याबरोबर तहाचा निकाल करण्याकरिता आला. जसे आमचे नुकसान पुष्कळ असले तरी मित्रत्वात व्यत्यय येऊ नये म्हणून ७५०० होन रोख आणि २५०० होन राजापूर जकातील फेडावयाचे अशी फक्त १०,००० होनावरच तोड करण्याविरूद्ध आम्ही जात नाही. भीमाजीने ठरविलेल्या इतर कलमांबद्दल आणि पुढे काम निघेल त्या बाबतीत उभयतांचा सलोखा राखण्यांत आमच्याकडून कसूर होणार नाही. नारायण शेणवी हे पत्र घेऊन जाईल त्याच्याबरोबर तुमच्याकरिता एक अरबी घोडा व इतर नोकरांकरिता वस्तू नजर पाठविल्या आहेत."[१९६] नारायण शेणव्याच्या ४ एप्रिल १६७४ च्या अहवालावरून कळते की, तो २४ मार्च रोजी रायरी गडावर पोहोचला पण यावेळी शिवाजी राजांच्या पत्नीचा मृत्यू झाल्याने त्याला शिवाजी राजांच्या भेटीसाठी १० दिवस थांबावे लागले. नंतर ३ एप्रिलला शिवाजीशी भेट झाली असता त्याने राजापूरच्या भरपाईचा विषय काढला तेव्हा शिवाजीने ताबडतोब कारकुणांना हिशोब लिहावयास सांगून तीन हप्त्यानंतर ही भरपाई होईल असे सांगून त्यामध्ये २५०० होन राजापूरच्या जकातीतून, २५००० होन येत्या १ सप्टेंबरला सुरू होणाऱ्या पहिल्या वर्षी आणि ५००० होन त्यानंतर दोन वर्षाने दिले जातील असे सांगितले. तसेच मुंबईकरांच्या सुरतेला पाठविलेल्या पत्रात उल्लेख येतो की, "....शिवाजीने असा खडखडीत निरोप पाठविला आहे की, सिद्याला बंदरात जागा दिल्यास मी तुमच्याशी युद्ध करून बादशाही आरमार जाळण्याचा शक्य तितका प्रयत्न करीन... आणि हे बेट घेण्यासाठी डचांना १०,००० सैन्याची मदत करील. याकरिता आपण सिद्दीला प्रवेश मुळीच देता कामा नये."

यानंतरच्या मुंबई-सुरतकर यांच्या आपसातील पत्रावरून कळते की, शिवाजीला आपल्या बाजूला घेण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजनाबद्दल विचार करण्यात आला. त्यातून

सुरतकरांनी सिद्दींचा त्रास कमी करण्याबद्दल मुंबईकरांना संमती दिली. मुंबईकरांच्या ४ मे १६७४ च्या नोंदीत उल्लेख येतो की, "शिवाजीचा राज्यभिषेक जवळ आला तरी त्याच्या आधी ऑक्सिडनने यावे असे नारायण शेणव्याचे पत्र आल्यामुळे आणि तहाच्या दृष्टीने सिद्दीचे आरमार या बंदरात राहिले. त्याचा योग्य खुलासा लवकर करण्याकरिता ऑक्सिडनने लवकर निघावे. चाइल्ड उष्टिक व ऑक्सिडन यांनी नजराण्याची व्यवस्था ठरवावी आणि जॉर्ज रॉबिन्सन व टॉमस मिचेल यांनी ऑक्सिडनच्या मदतीस म्हणून यावे असे ठरले."[१९७]

त्याप्रमाणे मे १६७४ जो शिवाजी-इंग्रज तह घेण्यासंदर्भात इंग्रजांनी सुचविलेली तहाची कलमे खालीलप्रमाणे होती असे बेंद्रे सांगतात.

१. उभयतांमध्ये आजपासून पक्क्या व अभंग सलोख्याचा तह असावा.

२. सर्व शत्रुत्व नष्ट व्हावे आणि उभयपक्षी कोठल्याही भागांत लूट करणे, छापे घालणे इत्यादी प्रकारे नुकसान करू नये.

३. शिवाजीच्या राज्यात संचार, रहिवास, व व्यापार याबाबतीत इंग्रजांना पूर्ण स्वातंत्र्य असावे. इंग्रजांनी नित्याच्या जकाती देऊन सरकारशी आज्ञाधारकपणे वागावे. शिवाजी राजांच्या जनतेला मुंबईत अशाच प्रकारच्या सवलती मिळाव्यात.

४. परस्परांच्या बंदरात आलेली परस्परांची जहाजे व्यापाराकरिता आली नसतां अडचणीमुळे आश्रयाला आली असतील ती जकात न घेता जाऊ द्यावी. दुर्दैवाने फुटून किनाऱ्याला लागलेल्या गलबतांची जप्ती न करता ती मालकाच्या हवाली करावी.

५. उभयपक्षीच्या जकातदारांनी वगैरे शिरस्त्याप्रमाणे बक्षिसे इत्यादी व्यापाऱ्यांकडून लुबाडून घेऊ नयेत.

६. शिवाजीच्या राज्यात इंग्रज व्यक्तीवर अन्याय झाला तर त्याला त्वरेने न्याय मिळावा.

७. कोणत्याही खाजगी व्यक्तिमुळे या तहावर परिणाम होऊ नये. गुन्हेगारालाच फक्त शिक्षा व्हावी. न्यायाला विरोध किंवा विनाकारण उशीर झाल्याशिवाय जप्तीसारखे प्रकार होऊ नयेत.

८. मोगलाच्या किंवा अन्य प्रदेशात इंग्रजांच्या वखारी स्वारीच्यावेळी शिवाजीच्या लोकांनी वाचवाव्यात. लूट झाल्यास शिवाजीने भरपाई करावी.

९. परस्परांनी परस्परांच्या समुद्रावर पकडलेला माल मालकीबद्दल पुरावा मिळाल्यावर सोडून द्यावा.

१०. इंग्रजांनी राजापुरास वाटेल तेव्हा रहावे. राजाने आपल्या खर्चाने घर द्यावे. आयात निर्यातीच्यावेळी फक्त एकदाच जकात देण्यास परवानगी द्यावी.

११. आयात निर्यातीच्या मालावर शेकडा अडीच टक्के जकात इंग्रजांनी द्यावी. माल विक्री न होता परत गेला तर त्यावर कोणत्याही प्रकारच्या लाकूड सामानावर जकात मुळीच भरू नये.

१२. इंग्रजांना खरेदी विक्रीचे पूर्ण स्वातंत्र्य असावे. सुभेदार जकातघराचे दरोग यांनी आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करू नये.

१३. देशी व्यापाऱ्यांना खरेदी विक्रीच्या बाबतीत इंग्रजांशी केलेले करार पाळण्यास शिवाजीच्या अधिकाऱ्यांनी भाग पाडावे. ती व्यवस्था न झाल्यास कर्जफेड किंवा कराराची पूर्ती होईपर्यंत इंग्रजांना अशा गुन्हेगारांस शिक्षा देण्याची परवानगी असावी.

१४. राजापुरची वखार मोडकळीस आल्यामुळे तिची दुरूस्ती इंग्रजांनी करून दुरूस्तीचा खर्च जकातीतून घ्यावा.

१५. इंग्रजांची डच, फ्रेंच, पोर्तुगीज व इतर कोणाशी लढाई झाल्यास शत्रूला शिवाजीने मदत करू नये आणि त्यांच्यापासून इंग्रजांच्या मालमत्तेचे व लोकांचे संरक्षण करावे. शिवाजीच्या साम्राज्यात कंपनीची इस्टेट कोणी जप्त केल्यास शिवाजीने भरपाई करावी.

१६. कोणत्याही दर्जाच्या माणसाने इंग्रजांच्या वखारीत जबदस्तीने प्रवेश करू नये. इंग्रजांच्या देशातील कोणाशी वितुष्ट झाल्यास ते समोपचाराने सोडवावे. रक्तपातापर्यंत गोळीबार विकोपास गेल्यास देशी माणसाचा गुन्हा असल्यास शिवाजीतर्फे शिक्षा देण्यात येईल त्याप्रमाणे इंग्रजांनी शिक्षा द्यावी. देशी व्यापाऱ्यांचा इंग्रज नोकरांशी हिशेबाच्याबाबतीत मतभेद झाल्यास वखरीच्या प्रमुखाकडे नेऊन त्याचा निकाल लावावा.

१७. इंग्रजांचा नोकर शिवाजीच्या मुलुखात गेल्यास तो इंग्रजांच्या हवाली परत करावा.

१८. मुंबईजवळच्या प्रदेशातून जकात न भरता बेटावर सर्पण (सरपण) आणण्याची परवानगी असावी.

१९. परस्परांची नाणी परस्परांच्या प्रदेशात मुक्तपणे चालावी.

२०. शिवाजी इंग्रजांच्या मुंबईच्या प्रजेला ज्या सवलती देईल त्याच सवलती इंग्रजांनी शिवाजीच्या सर्व प्रजेला द्याव्यात.[१९८]

या तहाच्या अटीचा मसुदा ठरल्यानंतर इंग्रजांनी आपल्या लोकांना पाठविण्याचे ठरविले. त्यांना जाण्यापूर्वी ज्या सूचना दिल्या होत्या त्या मुंबईकरांच्या ११ मे १६७४ च्या पत्रात वाचायला मिळतात. तहासाठी ऑक्सिडनला पाठविण्यात आले होते. तो शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक सोहळ्यातही हजर होता. ११ जूनला ऑक्सिडनने केलेल्या विविध मागण्यातील कलमापैकी नाण्याव्यतिरिक्त इतर सर्व कलमे मान्य करून राजाने सही केल्याची बातमी निराजीने सांगितली असे ऑक्सिडन लिहितो.

शिवाजी महाराजांनी मुंबईचे प्रेसिडेंट सिद्दीला आपल्यापेक्षा जास्त सवलती देतात म्हणून इशारा दिला होता व सिद्दीला जास्त सवलती देऊ नये नसता आपल्यात झालेला करार रद्द करून आक्रमण करण्यात येईल असे कळविले होते. हे आपल्याला मुंबईकरांनी सुरतेला लिहिलेल्या २२ ऑगस्ट १६७४ च्या पत्रावरून कळते.

इंग्रज शिवाजी महाराजांना यावेळी नाराज करून त्यांचा रोष ओढवून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हते. म्हणून इंग्रजांनी शिवाजीच्या मागण्या मान्य करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. हे मुंबईकरांच्या ६ नोव्हेंबर १६७४ च्या नोंदीवरून समजते. राजापुरला इंग्रजांच्या वखारीबाबतची अडचण इंग्रजांना अण्णाजी दत्तो यांच्या सांगण्यानुसारच सोडवावी लागली व अण्णाजीचे त्यांना स्वत:ची इच्छा नसतांनाही ऐकावे लागले. हे राजापुरच्या इंग्रजांनी मुंबईच्या प्रेसिडेंटला दि. ६ फेब्रुवारी १६७५ ला लिहिलेल्या पत्रावरून समजते. इंग्रजांच्या १२ मे १६७५, ७ जुलै १६७५, १५ जुलै १६७५ च्या पत्रव्यवहार व नोंदीवरून कळते की इंग्रजांना शिवाजी राजांची मर्जी सांभाळावी लागत होती. मग त्यांची इच्छा असो अथवा नसो. तसेच वेळोवेळी शिवाजी राजांना नजराणे पाठवीत असत. अशाच एका ऑप्टिनने नेलेल्या नजराण्याविषयी माहिती[१९९] -

लहान पितळी तोफ गाड्यासह शिवाजीकरिता	किंमत रू.	३००
१२ वार कापड मोरोपंत पंडितासाठी		१५०
६ वार कापड अण्णाजी पंडितासाठी		८७-१६
१ आरसा व १ तोहा कस्तुरी		२५

३ यार्ड कापडे सेनापती		२७-१६
इतर किरकोळ वस्तू		१४०
	एकूण रूपये	७४०.००

वरील शिवाजी महाराजासंबंधी माहिती देणारी इंग्रजांची पत्रे देऊन वा. सी. बेंद्रे सांगतात की, इंग्रज व शिवाजी यांच्या संबंधाची माहिती देणाऱ्या वरील पुराव्यावरून इंग्रजांची वागणूक आणि बाजू स्पष्ट होते. इंग्रजांच्या लिहिण्यात एक गोष्ट स्पष्ट होते आणि ती म्हणजे शिवाजीच्या सामर्थ्याकडे इंग्रज विरूद्ध दृष्टीनेच पाहत होते. आपल्या श्रेष्ठतेचा गाजावाजा करून शिवाजीकडून शक्य तितक्या फायद्याची कलमे मान्य करन घेणाचा प्रयत्न करीत होते. हा प्रयत्नही जितका व जसा या पत्रव्यवहारात दिला आहे तितक्या जोरकसपणे होत नव्हताच. उलट या प्रयत्नाने शिवाजीला दुखविण्याचे धारिष्ट त्याच्याजवळ नव्हते याचाच पुरावा देते. शिवाजी राज्यविस्ताराबरोबरच राज्याच्या वैभवाचाही विकास व्हावा यादृष्टीने राजकारणाकडे पहात होता;. परंतु सिद्दीच्या प्रकरणात इंग्रजांनी मोगली सत्तेची भीती धरून जी सिद्दीस मदत केली व शिवाजीच्या राज्यावर हल्ला करण्यास सवड दिली तिचा प्रतिहार करणे शिवाजीला फारसे कठीण वाटत नव्हते तरी ही प्रतिक्रिया नुकसानीची किंवा सुडाची न होता दहशतीनेच साधावी याकडेच त्यांचे लक्ष होते. डच, पोर्तुगीज यांना जवळ करून इंग्रजांची तात्पुरती खोड मोडणे तत्कालीन परिस्थिती अवघड नव्हती; परंतु डच व पोर्तुगीजांपेक्षा इंग्रज बरे, पण त्यांचा हिंदवी स्वराज्याच्या सामर्थ्याबाबत जो ग्रह झाला होता तो दूर करण्यास त्यांनी दहशतीचा मार्ग अवलंबिला होता. इतर राजकीय भानगडीतून मोकळे होताच सुरतमध्ये इंग्रजावर आक्रमण करावे तर इंग्रज मोगलांच्या सुरक्षितेत होते. मुंबईतील साम्राज्य विकासाला जरा नरमाईत आणावयाचे तर शिवाजीजवळ पुरेसे आरमार नव्हते. त्याशिवाय पाण्यातून छापा घालणे तितके सोपे नव्हते आणि जमिनीवरून रस्ते थोडेच होते आणि ते ही पोर्तुगीज हद्दीतून जात होते. मात्र मुबंईच्या इंग्रजांना शह देण्याचा उपाय खांदेरी ताब्यात घेऊन तोफा व दारूगोळा यांचा भरपूर साठा करून दडपण राहणे हा होता. इतर राजकीय घडामोडीतून वेळ मिळताच शिवाजीने हा मार्ग स्वीकारला आणि त्यामुळे इंग्रजी साम्राज्याच्या विकासाला फार मोठा पायबंद घातला. इंग्रजांना नंतर ५०-६० वर्षे मराठ्यांच्या इच्छेनुसार वागावे लागले. शिवाजी-संभाजीने आपल्या शक्तिसामर्थ्यावर खांदेरी मजबूत करून ठेविली आणि आगऱ्यांनी ब्रिटिश सत्तेला फारशी गडबड करू देण्यास वाव दिला नाही; परंतु

पेशव्यांनी केवळ आपल्या स्वार्थाकरिता इंग्रजांचीच मदत घेऊन व देऊन आगऱ्याचा व त्यांच्या आरमाराचा बळी घेतला आणि इंग्रजांना साम्राज्य विकासाचा मार्ग अनिर्बंध मोकळा करून दिला असे बेंद्रे सांगतात.[२००]

भारतीयांसाठी शिवाजीचे आरमार ही गोष्ट तितकी आवश्यक नव्हती तरी समुद्रापलीकडील आघात व व्यापार यामुळे धर्माचारांतही बदल घडवून आणून आरमारी नेतृत्व करण्यात आपल्या प्रजेला आवड निर्माण करून देण्यात शिवाजी महाराजांना यश आले असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, मोगल, आदिलशाहा यांना आरमारासंदर्भात जरी धर्म आडवा येत नव्हता तरी त्यांचे तिकडे फारसे लक्ष गेले नाही. उलट शिवाजी राजांना आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर ही अडचण दूर करून आरमाराचे कार्य साधावयाचे होते. २५-३० वर्षात ही उत्क्रांती त्यांनी करून दाखविली आणि आपले आरमार म्हणजे दुसऱ्याकडून घेतलेली कला नसून स्थानिक प्रदेशाला अनुरूप अशीच आरमाराची घडण घडविली आणि आपले आरमार युरोप आरमाराला यशस्वी रीतीने तोंड देण्याइतके सामर्थ्यवान बनविले. इंग्रजांशी मैत्री राखण्यात या कलेचाही अनुभव सिद्ध अभ्यास केला हे विशेष लक्षात घेण्यासारखे आहे.

४.२३ पोर्तुगीज व डच आणि शिवाजी महाराजांचे संबंध

१७ शतकाच्या सुरूवातीपासूनच मोगल दक्षिण काबीज करण्याचा प्रयत्न करीत होते. निजामशाहीतर्फे मलिक अंबरने स्थानिक लोकांच्या मदतीने या आक्रमणास थोपवून धरण्याचा प्रयत्न केला; परंतु मोगली सत्ता दक्षिणेत पुढे पुढे सरकू लागली तर ती आपला नाश घडवून आणेल या भितीने आदिलशाहा व कुतुबशाहा यांना मलिक अंबरला जसे साह्य दिले तसेच पोर्तुगीजांनीही मदत करून दक्षिणेतील शाह्यांशी मैत्री राखली होती. मलिक अंबरनंतर आदिलशाहा व पोर्तुगीज यांच्यात बारीक-सारीक संघर्ष होत होते; परंतु आदिलशाहाने पोर्तुगीजांना पश्चिम किनाऱ्यातून काढून लावण्याचा जरीही विचार केला नाही. त्यामुळे पोर्तुगीज निर्धास्त होते. डचांनी आदिलशाही सरदारांना गोव्यातून पोर्तुगीजांना काढून लावून आमची तेथे स्थापना करा म्हणून सागितले; परंतु आदिलशाही सरदारांनी तिकडे लक्ष दिले नाही. इ.स. १६५९ च्या अखेरच्या अफजलखानाच्या वधापर्यंतचा शिवाजी महाराजांचा लढा स्थानिक स्वरूपाचा म्हणून मानला गेला होता. त्यानंतर आदिलशाहाला जशी शिवाजी महाराजांच्या हालचालींना प्रतिबंध करण्याची आवश्यकता भासली तशीच मोगलांनी दक्षिणेत सत्ता विस्ताराच्या हेतूने

भासली. पोर्तुगीज मात्र हे स्थानिक स्वरूपाचे बंड असून शिवाजी महाराजांच्या शक्तिसामर्थ्या-बाबत त्यांना प्रथम नीटशी कल्पना आलेली दिसत नाही, असे बेंद्रे म्हणतात.

प्रथम शिवाजी महाराज व पोर्तुगीज यांच्यात विस्तुष्ट १६६३ च्या सुरूवातीला पोर्तुगीज शाहिस्तेखानाला अन्नसामग्री देत असल्याच्या संशयावरून आलेले दिसते. यावेळी शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांना बजावले होते की, जोपर्यंत तुम्ही मोगलांकडे अन्नसामग्री जाऊ देणार नाही तोपर्यंत तुमच्या प्रदेशास व किल्ल्यास उपद्रव दिला जाणार नाही; परंतु तसे त्यांच्याकडून घडले नसावेसे दिसते. तेव्हा शिवाजी महाराजांनी १६६३ च्या मे महिन्यांत गोव्याकडे येत असल्याचे ऐकून पोर्तुगीजांना चिंता वाटली आणि शिवाजी महाराज मे महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात वेंगुर्ल्यास गेल्याची बातमी लागताच गोव्याच्या व्हॉइसरायने २३ मे १६६३ ला पत्र लिहून मैत्री करण्याविषयी सुचविले होते. याचवेळेला लखम सावंतने पोर्तुगीजांच्या काही खेड्यात जाळपोळ केली होती.

या दरम्यान शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्याला वेढा घातल्याची बातमी ऐकून गोव्याच्या पोर्तुगीजांनी आनंदित होऊन मोठे नजराणे पाठवून शिवाजी महाराजांनी डचांना वेंगुर्ल्यातून हाकलून लावावे असे बोलणे लाविले. १५,००० होनांचे आमिषही दाखविले होते; परंतु शिवाजी महाराजांनी डचांची बाजू घेतल्याने भयभीत होऊन गोव्याच्या व्हॉइसरॉयने गोव्याच्या सरहद्दीवर सैन्य पाठविले होते. इतक्यात शिवाजी महाराजांनी मित्रत्वाचे पत्र पाठविल्याने त्यावरून त्यांना धीर येऊन रामाजी कोठारीबरोबर दोस्तीचे पत्र व ४३,००० अश्रफी नजराणा पाठविला. शिवाजी महाराज वेंगुर्ल्यास आपले २०० लोक ठेऊन निघून गेल्याचे वाटेतच कळून कोठारी परत फिरला. स्वराज्य रक्षणाकरिता गोवा व दंडाराजपुरी डचांच्या मदतीने जिंकण्याची शिवाजी महाराजांची तयारी आहे असा डचांचा अंदाज होता. पोर्तुगीजांनी जरी कोठारीबरोबर नजराणा पाठवून शिवाजीशी वरवर मैत्री ठेवण्याचा प्रयत्न केला तरी त्याच काळात कुडाळ प्रांतातून घालवून लावण्यासाठी लखम सावंत, केशव नायक, राम शेणवी व चंदराणा याचे आपापसात भांडण होते तरी त्यांची एकी करून पोर्तुगीजांनी त्यांना लढण्यासाठी तयार केले होते. १६६३ च्या डिसेंबरच्या सुरूवातीला डचांचा व पोर्तुगीजांचा तह झाला. त्यामुळे पोर्तुगीजांना हायसे वाटून आपल्या १० लढाऊ गलबतांचे आरमार तयार करून वसईकडे १६६४ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस पाठविण्याची तयारी केली. शिवाजी महाराजांशी लढणारे मोगली सैन्य वसईच्या आसपास असून

ते पोर्तुगीजांना उपद्रव देते. त्याच्या बंदोबस्ताकरिता ही तजवीज होती. ही कृती पोर्तुगीजांनी बहुधा शिवाजी महाराजांना सुरतेची लूट घेऊन जाण्यास विनाविरोध वाट दिली म्हणून होत होता असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

इ.स. १६६४ च्या फेब्रुवारी महिन्याच्या सुरूवातीला शिवाजी महाराजांचा मोगलांशी संघर्ष चालू असतांना त्यांनी गोव्याच्या व्हाइसरॉयला वकिलामार्फत आर्थिक मदतीची मागणी केली असता व्हाइसरॉयने वकिलाला ३-४ दिवस कैदेत ठेवून नंतर लोकांच्या विनंतीवरून सोडून दिले. यामुळे शिवाजी महाराज गोव्याला वेढा घालतील या भीतीने पोर्तुगीजांनी संघर्ष करण्याची तयारी केली. शिवाजी महाराजांनी ५० गलबतांचे आरमार तयार केले. ते ऑगस्टच्या शेवटी शेवटी बाहेर पडले; परंतु ते कोठे व कशाकरिता जात आहे याचा कोणालाच शेवटपर्यंत पत्ता लागू दिला नाही. कोणालाच पत्ता न लागल्यामुळे शिवाजी महाराजांची पहिली आरमारी मोहिम थोड्याच अवधित यशस्वी झाली. बेदनूरकरांनी आपल्या मदतीकरिता पोर्तुगीजांना होनावर बंदर सोडून बार्सिलूर, मंगलूर वगैरे बंदरे देण्याचे कबूल केले. त्याऐवजी त्यांना तोफा व दारूगोळा पाहिजे होता. होनावर बंदरासाठी पोर्तुगीज अडून बसले व प्रथम बार्सिलूर वगैरे ताब्यात दिल्याशिवाय करारास नकार दिला. इतकेच नाही तर ती बंदरे जबरदस्तीने जाऊन घेतली. ऑक्टोबरमध्ये ही जबरदस्ती केल्यामुळे बेदनूरकरांनी शिवाजी महाराजांची मदत मिळविण्यात यश मिळविले. आपल्या वडिलांनी जे हिंदू राज्य थोडेच दिवसांपूर्वी आदिलशाहीच्या ताब्यातून सोडवून स्वतंत्र राहू दिले ते सुखरूप राखण्याची हमी शिवाजी महाराजांनी घेतली आणि फेब्रुवारी १६६५ च्या प्रारंभी ८५ लहान व ३ मोठी गलबते घेऊन शिवाजी महाराज मालवणहून बाहेर पडले. बार्सिलूरपर्यंत जाऊन ते बंदर लुटून पोर्तुगीजांचा संपूर्ण मोड करून बेदनूरचा प्रदेश त्या राजाच्या ताब्यात देऊन राजे गोकर्णला परत आले. पोर्तुगीजांना हा मोठाच धक्काच बसला. बेदनूरकरांनी शिवाजी महाराजांना खंडणी देऊन तह केल्याने पोर्तुगीजांना कानडा राज्यातून आपला पाय मागे घ्यावा लागला.

शिवाजी महाराजांसोबत संबंध बिघडल्याने व्हाइसरॉयने २ मार्च १६६५ ला वसईच्या कॅप्टनला शिवाजी राजांच्या लोकांना पोर्तुगीज प्रांतात येऊ देऊ नका किंवा त्यांना कोणत्याही सवलती देऊ नका म्हणून कळविले. त्याचबरोबर शिवाजी राजांशी पुन्हा मैत्री ठेवण्याची व्हॉइसरॉयला आवश्यकता वाटत होती. हे ३ एप्रिल १६६५ च्या पत्रात स्पष्ट होते. ज्यात

व्हॉइसरॉयने शिवाजी महाराजांची जहाजे पकडून स्वतः सोडून दिली. तसेच मोगलांविरोधात मदत करण्याचेही आश्वासन गव्हर्नरने वसईच्या कप्तानाला लिहिलेल्या पत्रातून दिसते असे वा. सी. बेंद्रे दाखवून देतात.

शिवाजी महाराजांना मदत करण्यासंदर्भात मोगलांना माहिती होऊन त्यांचा राग आपल्यावर ओढवू नये म्हणून पोर्तुगीजांनी जयसिंगाकडे आपला एक वकील पाठवून मनधरणी करण्याचा प्रयत्न करतांना दिसतो. शिवाजी महाराज युरोपियन राज्यकर्त्यांना घाबरत नव्हते तर ते आपल्या आरमारी व शस्त्रास्त्रांची शक्ती जाणून वागत होते. शिवाय हे युरोपियन लोक स्वतःला व्यापारी म्हणून संबोधित होते. राज्याधिकारी म्हणून ते व्यवहार करीत नव्हते. या त्यांच्या व्यापारी कंपन्याच होत्या. जेव्हा हे व्यापारी अयोग्य कामे करीत तेव्हाच त्याच्या वखारी लुटल्या जात होत्या. मात्र तयारी नसतांना फुकट मनुष्यहानी करणे शिवाजी महाराजांना कधीच रूचले नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

इ.स. १६७० च्या अखेरपासून पोर्तुगीजांनी पुन्हा शिवाजी राजांशी विरोधी भूमिका घेतली. त्यांनी शिवाजी महाराजांची १३ गलबते व एक १२०० रूपये किंमतीचे मोठे जहाज सुरतेला जात असतांना वसईजवळ पकडली. त्यामुळे दोघांमध्ये चकमक उडाली आणि शिवाजी महाराजांनी आपले आरमार दाभोळकडे नेले. मोरो पंडितांच्या सैन्याने पोर्तुगीजांच्या प्रदेशात एवढा उपद्रव केला की वसई, चौल व इतर ठिकाणी घाबरून पळापळी झाली. शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांकडे चौथची मागणी केली. ती जर दिली गेली नाही तर मोरोपंत त्यांचा संपूर्ण भाग धुळीस मिळविल्याखेरीज राहणार नाही अशी मुंबईकरांकडे १९ जून १६७२ ला बातमी होती.

शिवाजी महाराजांचा फोंड्याविरूद्ध लढा सुरू होताच. पोर्तुगीजांना आपला शत्रू जवळ येत आहे. म्हणून आदिलशाही सुभेदाराला मदत करण्याची गरज पडली. याची माहिती राजापुरकर इंग्रजांच्या २० एप्रिल १६७५ च्या पत्रात येते. हे जेव्हा शिवाजी महाराजांना कळाले तेव्हा त्यांनी पोर्तुगीजांच्या सिबान नावाच्या किल्ल्यासमोर दोन गढ्या बांधण्यास सुरूवात केल्याने दोघांत युद्ध सुरू झाले, पण नंतर शिवाजी महाराजांच्या आजारामुळे हालचाल मंदावली होती. त्यानंतर पोर्तुगीजांनी मैत्रीसाठी प्रयत्न करायला सुरूवात केली. याचा पुरावा आपला ३१ डिसेंबर

१६७७ च्या पत्रात मिळतो. तसेच ५ जानेवारी १६७८ च्या पत्रातसुद्धा मिळतो असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

१० मार्च १६७९ च्या पत्रामध्ये गोव्याच्या गव्हर्नरने तक्रार केली आहे की, "मैत्रीपूर्ण संबंध असतांना आमचे निशाण घेऊन जाणारी जहाजे त्यावरील मालासह संकेश्वर नदीवर गेली असता शिवाजी महाराजांच्या लोकांनी पकडली. ही शिवाजी राजांच्या लोकांनी चूक केली. मी आपणास या बाबतीत पत्र पाठवीले, पण आपणास चुकीची माहिती मिळून आपले भलते उत्तर पाठविले. आमची जहाजे तुमच्या बंदरात शिरली हे म्हणणे खोटे आहे. कारण समुद्रात अरबांची जहाजे वावरत होती. त्या ठिकाणी तुमची सत्ता नव्हती किंवा पोर्तुगीज व अरब लोकांवरही तुमची सत्ता नाही." त्यानंतर मराठा सैन्य बलसाड इत्यादी प्रांतात अनेक ठिकाणी जाळपोळ केल्याचे पाहून दमणचे पोर्तुगीज लोक घाबरून गले असल्याची बातमी मुंबईकरांनी ४ एप्रिलला दिली आहे.

डचांचा ५ एप्रिल १६७९ च्या बाबतीत, "शिवाजीने मी स्वतः व माझे अनुयायी यांना ख्रिस्ती धर्म स्वीकारावयाचा आहे म्हणून गोव्यात येऊ देण्याची परवानगी मागितली. ती व्हॉइसरॉयने नाकारली. तेव्हा खुशीने आम्हाला दीक्षा देत नसाल तर आम्ही जबरदस्तीने गोव्यात प्रवेश करू. अशी शिवाजीने धमकी दिली; परंतु तिचाही काही उपयोग झाला नाही." शिवाजी महाराजांचा गोव्यात प्रवेश करून दंगल उडविण्याचा बेत होता. तसेच इंग्रजाबरोबर खांदेरीच्या लढ्यातांनी मदत करण्यास होकार दिला होता असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

सारांश सांगतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, पोर्तुगीजांच्या हालचालीचा विचार करता असेच दिसून येते की, त्यांनी बार्सिलोर प्रदेशात पुरा मार खाल्यानंतर त्यांनी आपल्या सुरूवातीच्या गर्वाला बराच आळा घालून स्वतःच्या रक्षणाचाच ते अधिक विचार करू लागले. शिवाजीने त्यांच्या प्रदेशात कित्येकदा शिरून लुटालूट व जाळपोळ केली असतांनासुद्धा नेहमी मिटते घेण्याचाच पवित्रा घेतला. शिवाजी महाराजांनाही तोफांच्या व चांगल्या सुसज्ज आरमाराच्या अभावी, दंडाराजपुरीच्या अनुभवावरून, गोवा बेटावर समुद्रातून हल्ला करून पोर्तुगीजांना भारतातून काढून लावण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले नव्हते. आरमारी तयारी होईपर्यंत त्याच्या बलाची क्षिणता दूर करण्यावरच जोर द्यावा लागला होता. पोर्तुगीजांनाही जमिनीवरील लढ्यात शिवाजी महाराजांना तोंड देण्याचे सामर्थ्य नव्हते असे वा. सी. बेंद्रे सांगतात. पुढे ते

लिहितात की, डचांनाही स्वतःचा असा कोठे थारा नसल्याने त्यांना कोणालाच लढ्याची भीती दाखवून आपला शिरजोरपणा व्यक्त करणे शक्य नव्हते. शिवाय त्यांच्या आपआपसांतील भांडणांतच त्याना पोर्तुगीज व इंग्रज यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारी क्षेत्रातून उठवून लाविले होते. शिवाजी महाराज बंडखोर म्हणून त्यांची तमा बाळगण्याचे कारण नाही. या भमिकेवरून वेंगुर्ल्याची जाळपोळ होताच त्यांना खाली यावे लागले व मैत्रीची व मदतीची झुलवाझुलवी करावी लागली; परंतु शिवाजी महाराजांनी ते ओळखून त्यांना या किनाऱ्यावरील राजकाराणांत काही एक महत्त्व दिले नाही.

४.२४ शिवाजी महाराजांचा मृत्यू

शिवाजी महाराजांच्या मृत्युसंदर्भात बखरकारांना वस्तुस्थितीचा बोध झाला नसल्याने त्यांनी हा प्रसंग कल्पनेनेच विपर्यस्त स्वरूपात वर्णन केलेला दिसतो. या कल्पनांमध्ये नंतरच्या लोकांनी भर घालून परस्पर भिन्न कारणपरंपरा जोडल्या आहेत. सभासद बखरीत मृत्युच्या तपशिलात सभासदाने उगीचच राज्याच्या वाटणीचा अवास्तव मजकूर 'भविष्य'खाली शिवाजी महाराजांच्या तोंडी घातला आहे.[२०१] कदाचित हा मजकूर कट करणाऱ्या माणसांच्या संबंधित चेल्यांनी त्यात नंतर जोडला असावा असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

यानंतर वा. सी. बेंद्रेंनी मराठी साम्रज्याची छोटी बखर, ९१ कलमी बखर व जेधे शकावलीतील माहिती दिली. त्यानंतर मासिर-इ-अलमगिरीतील आलेली माहिती देऊन कागदोपत्रांतील पुराव्याचा तपशील दिला आहे.[२०२] याच्या संदर्भातील विस्तारित चिकित्सा "संभाजी महाराजांविषयीचे लिखाण" या प्रकरणात करण्यात येणार आहे. म्हणून येथे फक्त वा. सी. बेंद्रे यांनी बखरीमध्ये जी शंकास्पद महत्त्वाची विधाने आलेली आहेत त्यांची चिकित्सा केली ती येथे देत आहे. संभाजी जेव्हा मोगलांकडून परत आले तेव्हा शिवाजी महाराजांनी भेटीनंतर त्यांना पन्हाळगडावर कैद करून ठेविले होते असा बखरकारांनी समज पसरविला आहे. त्यामुळे संभाजीबद्दल बराच विपर्यस्त मजकूर त्यांनी कल्पनेतून दिला आहे; परंतु खरी वस्तुस्थिती तशी नव्हती हे तत्कालीन पुराव्यावरून सिद्ध होत आहे. तसेच शिवाजी महाराजांनीच मोगलांकडून संभाजीस परत स्वराज्यात आणण्याचे प्रयत्न केले होते. हे शिवाजी महाराजांनी जे एंकोजीला पत्र लिहिले त्यामध्ये आले आहे. "चिरंजीव राजश्री संभाजीराजे मोगलाईत गेले होते. त्यास आणावयाचा उपाय बहूत प्रकारे केला, त्यासहि कळो आले की, ये पातशाहीत अगर विजापुर

पातशाहीत अगर भागानगरकर पातशाहीत आपले मनोदयानुरूप चालणार नाही. ऐसे जाणोन आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीने जैसे समाधान करून (करू) ये तैसे केले. हे सविस्तर वर्तमान तुम्हास कळावे म्हणोन लिहिले." या महाराजांच्या पत्रांतील उल्लेखावरून दोन गोष्टी येथे स्पष्ट होतात असे सांगून पहिली म्हणजे राजकारणात सभांजी राजांना विरोध झाला म्हणून ते निघून गेले होते. दुसरी म्हणजे संभाजी राजांना परत आल्यावर शक्य तितकी समाधानकारक व चांगली वागणूक दिली गेली. असा बेंद्रे प्रश्न उपस्थिती करतात की, जर संभाजी राजे परत आल्यानंतर व वडिलांच्या भेटीनंतर पन्हाळ्यावर कैदेत असतो आणि त्यामुळे त्यांना राजारामाच्या लग्नातही जाता आले नसते तर शिवाजी महाराजांच्या वरील शक्यांतील मनोदयावर कोणी विश्वास ठेविला असता? उलट संभाजींना दिलेले सेनापतीत्व स्वीकारून त्यांनी जे शौर्य व धैर्य दाखवून मोगली सत्तेला धक्का दिल्यामुळे साहजिकच त्यांच्या लग्नाच्या अनुपस्थितीलबद्दल समाधानच सर्वांना होणे साहजिक होते. तसे झाले नसते तर शिवाजी महाराजांनी पुत्रप्रेमाचा जो जिव्हाळा खास आपल्या भावाला लेखी दाखविला त्याची काय गरज होती? याला खाफीखानाच्या लिखाणातूनही पुष्टी मिळते असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[२०३]

शिवाजी महाराजांनी संभाजीला कैदेत ठेविल असते तर अण्णाजी पंताला मोरोपंताशी तहाची खटपट करण्याची आवश्यकता भासण्याचे कारण नव्हते. पन्हाळ्याच्या हवालदाराशी गुप्त संगनमत करून संभाजीला अटक करण्यासाठी अवाहन करण्याचे कारणच पडले नसते; परंतु संभाजी कैदेत नव्हते इतकेच नव्हे तर शिवाजीचे खास सैन्यही पन्हाळ्यावर त्यांच्या सेनापतीत्वाखाली राहत होते आणि अण्णाजीने मोरोपंताशी तह करून संभाजीवर चालून जाण्याचा धीर केला; परंतु हंबीररावने त्याला पकडून पन्हाळ्यास संभाजीकडे पाठविले. त्याच्या बरोबरील सैन्यास आपल्या ताब्यात घेतले. सारांश संभाजी राजे कैदेत असते तर अण्णाजीला असली कारवाई करून ससैन्य पन्हाळ्यास जाण्याचे कारणच पडले नसते. तसेच जेधे शकावली प्रमाणे "२१ एप्रिल १६८० रोजी राजारामास अनाजीपंत सुरनीस यांनी मंचकी बसविले." नंतर मोरोपंत आल्यावर "संभाजी राजे यास कैद करून (करू) यैसा तह करून मोरोपंत व आपण पनालियावर चालोन गेले." ही नोंदही संभाजी कैदेत नव्हते हेच सूचित करिते असे बेंद्रे स्पष्ट करतात.[२०४]

वा. सी. बेंद्रे म्हणतात दुसरा प्रश्न उद्‌भवतो तो म्हणजे, मृत्युपूर्वी आजारात किंवा तत्पूर्वी राज्याची विभागणी दोन पुत्रात करण्याची कल्पना शिवाजी महाराजांनी कोणाला सांगितली असेल का? ही कल्पना राजारामकालीन स्वार्थी मंत्र्यांच्या मेंदूतून निष्पन्न झाली असे तत्कालीन इतिहासावरून दिसते. असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, जेव्हा शिवाजी महाराजांना आपल्या अकाली मृत्युची कल्पना नव्हती व आजारात शुद्धच नव्हती तेव्हा ही कल्पना, इतर स्नान आणि योगाभ्यासाची वगैरे बाबी लबाडीने प्रचारित केली असली पाहिजे. शिवाजी महाराजांच्या मृत्युपूर्वी जरा हा विचार लोकांस माहित असता तर अण्णाजीला आल्यावर इतकी खटपट करण्याची जरूरत पडली नसती आणि सुभेदार व हवालदाराच्या झुंडी पन्हाळ्यास न जाता रायगडालाच गेल्या असत्या असे बेंद्रे सांगतात.

शिवाजी महाराजांच्या मृत्युपूर्वीच्या आजाराची कल्पना बखरकारांना नव्हती असे दिसते. शिवाजी महाराजांना रक्तातिसार झाला होता असे वखारवाले इंग्रज लिहितात. त्यांच्या आजारांत रक्ताच्या ओकाऱ्या व ताप ३३ दिवस होता. नंतर मृत्यू आला. प्रवाशांच्या लिहिण्याप्रमाणे हा आजार प्रवासांतील सूर्यतापाचा परिणाम होता असे दिसते. इंग्रजांच्या वर्णनाप्रमाणे हे शक्यही दिसते. त्यामुळेच ते प्रथमपासूनच बेशुद्धावस्थेत होते. गुढगी रोगाने इतक्या थोड्या अवकाशात माणूस गमावेल असे वाटत नाही असे बेंद्रे सांगून स्पष्ट करतात की, जर महाराजांना शुद्ध असती तर त्यांनी योग्य ती काळजीपूर्वक व्यवस्था लावून दिली असती. शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० ला झाला. श्राद्धपक्ष मोजणीप्रमाणे अपऱ्हाव्हकालाची तिथीही नोंदून ठेवण्याचा परिपाठ होता, तसाही उल्लेख केलेला आढळतो. इंग्रजांच्या पत्रांतून शिवाजीच्या मृत्युची बातमी मिळाल्याचीच तारीख आली आहे.

संदर्भग्रंथ सूची

१. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ०३

२. कित्ता, पृ. क्र. ०४-०५

३. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. २६३

४. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. १९

५. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. १८६

६. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. १९

७. कित्ता, पृ. क्र. १९

८. कित्ता, पृ. क्र. २०

९. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. २६९

१०. कित्ता, पृ. क्र. १८७

११. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. २१-२२

१२. कित्ता, पृ. क्र. २३

१३. कित्ता, पृ. क्र. २३

१४. कित्ता, पृ. क्र. २३

१५. कित्ता, पृ. क्र. २२३-२४

१६. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. २५३

१७. कित्ता, पृ. क्र. २५३

१८. बेंद्रे वा. सी., 'संभाजी राजे भोसले', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, पृ. क्र. १२

१९. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. २५२

२०. कित्ता, पृ. क्र. १८९

२१. कित्ता, पृ. क्र. २५७

२२. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज',मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ६५

२३. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज', साहित्य सहकार मुद्रणालय, १ मे १९७२, पृ. क्र. ३१

२४. कित्ता, पृ. क्र. ३२

२५. कित्ता, पृ. क्र. ३४

२६. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ४२

२७. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. २६३

२८. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ३८

२९. कित्ता, पृ. क्र. ३९

३०. कित्ता, पृ. क्र. ३९

३१. कित्ता, पृ. क्र. ३९

३२. कित्ता, पृ. क्र. ४०

३३. कित्ता, पृ. क्र. ४०, ४१

३४. कित्ता, पृ. क्र. ४१

३५. कित्ता, पृ. क्र. ४२

३६. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ३९५

३७. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ४६, ४७

३८. कित्ता, पृ. क्र. ४७, ४८

३९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ४८, ४९

४०. कित्ता, पृ. क्र. ४९

४१. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४१०

४२. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ५१, ५२

४३. कित्ता, पृ. क्र. ५४, ५५

४४. कित्ता, पृ. क्र. ५७, ६१

४५. कित्ता, पृ. क्र. ६२, ६३

४६. कित्ता, पृ. क्र. ६७, ६८

४७. कित्ता, पृ. क्र. ६९

४८. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ३९५

४९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ७४, ७५

५०. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४४४

५१. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. १००

५२. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४४४

५३. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. १०१

५४. कित्ता, पृ. क्र. १०१

५५. कित्ता, पृ. क्र. १०२

५६. कित्ता, पृ. क्र. १०२

५७. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४६०, ४६१

५८. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. कित्ता, पृ. क्र. १३१

५९. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४०६

६०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. १४६, १४७

६१. कित्ता, पृ. क्र. १४६, १४७

६२. कित्ता, पृ. क्र. १५१

६३. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४०७, ४०८

६४. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. १८५

६५. कित्ता, पृ. क्र. १८६, १८७

६६. कित्ता, पृ. क्र. १५७

६७. कित्ता, पृ. क्र. १८६

६८. कित्ता, पृ. क्र. १८७

६९. कित्ता, पृ. क्र. १८९

७०. कित्ता, पृ. क्र. १९५, १९६

७१. कित्ता, पृ. क्र. २८६, २८७

७२. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ५२२

७३. कित्ता, पृ. क्र. ५२६

७४. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ३०१

७५. कित्ता, पृ. क्र. ३०३

७६. कित्ता, पृ. क्र. ३०४

७७. कित्ता, पृ. क्र. ३०७

७८. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ५३

७९. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ५०२

८०. कित्ता, पृ. क्र. २०२, २०३

८१. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ५३

८२. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४१५

८३. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशिबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. २३८, २३९

८४. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४५५

८५. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. २४१, २४२
८६. कित्ता, पृ. क्र. २४२
८७. कित्ता, पृ. क्र. २४२
८८. कित्ता, पृ. क्र. २४२, २४३
८९. कित्ता, पृ. क्र. २४३, २४४
९०. कित्ता, पृ. क्र. २५३ ते २५५
९१. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४३६ ते ४३८
९२. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. २६४
९३. कित्ता, पृ. क्र. २६०
९४. कित्ता, पृ. क्र. ३११ ते ३१५
९५. कित्ता, पृ. क्र. ३२७
९६. कित्ता, पृ. क्र. ३२७
९७. कित्ता, पृ. क्र. ३२८
९८. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४४०
९९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ३७९, ३८०
१००. कित्ता, पृ. क्र. ३८०
१०१. कित्ता, पृ. क्र. ३४१, ३४२
१०२. कित्ता, पृ. क्र. ३४४, ३४५
१०३. कित्ता, पृ. क्र. ३४७ ते ३५३
१०४. कित्ता, पृ. क्र. ३५९ ते ३६३
१०५. कित्ता, पृ. क्र. ३५८
१०६. कित्ता, पृ. क्र. ३७६
१०७. कित्ता, पृ. क्र. ३७६
१०८. कित्ता, पृ. क्र. ३७८
१०९. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४४२

११०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ३७६
१११. कित्ता, पृ. क्र. ४०१
११२. कित्ता, पृ. क्र. ४०२
११३. कित्ता, पृ. क्र. ४०३
११४. कित्ता, पृ. क्र. ४०४
११५. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. २
११६. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ४४७
११७. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ४४९
११८. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. ३
११९. कित्ता, पृ. क्र. ३, ४
१२०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र., पृ. क्र. ४५१
१२१. कित्ता, पृ. क्र. ४५२, ४५३
१२२. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. ११, १२
१२३. कित्ता, पृ. क्र. १३
१२४. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ४८३, ४८४
१२५. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', पृ. क्र. १००
१२६. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. २३ ते २७
१२७. कित्ता, पृ. क्र. ३३
१२८. कित्ता, पृ. क्र. ३८
१२९. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. ६१, ६२

१३०. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४४५ ते ४७१
१३१. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ५४०, ५४१
१३२. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. ६९, ७०
१३३. कित्ता, पृ. क्र. ७३, ७४
१३४. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ५४९, ५५०
१३५. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. ८४
१३६. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', पृ. क्र. १०१
१३७. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ७२, ७३
१३८. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. १५८
१३९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ६१०, ६११
१४०. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७, पृ. क्र. १६२, १६३
१४१. कित्ता, पृ. क्र. १६४
१४२. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशीबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र., पृ. क्र. ६५९, ६६०
१४३. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ५८
१४४. कित्ता, पृ. क्र. ५८
१४५. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ८९१ ते ८९४
१४६. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ५८, ५९

१४७. कित्ता, पृ. क्र. ५९

१४८. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ४९८

१४९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ९२२

१५०. कित्ता, पृ. क्र. ९१३, ९१४

१५१. कित्ता, पृ. क्र. ९१६, ९१७

१५२. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ५००

१५३. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ८७८, ८७९

१५४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. १०९ ते १११

१५५. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ७२२, ७२३

१५६. कित्ता, पृ. क्र. ७२३

१५७. बेंद्रे वा. सी., 'श्री शिवराज्याभिषेक', पृ. क्र. ५, ६

१५८. कित्ता, पृ. क्र. ६, ७

१५९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ७२६ ते ७३२

१६०. बेंद्रे वा. सी., 'श्री शिवराज्याभिषेक', पृ. क्र. ७

१६१. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ७३७, ७३८

१६२. बेंद्रे वा. सी., 'श्री शिवराज्याभिषेक', पृ. क्र. १४

१६३. कित्ता, पृ. क्र. १४, १५

१६४. कित्ता, पृ. क्र. १५, १६

१६५. कित्ता, पृ. क्र. १६ ते १८

१६६. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ७४२

१६७. कित्ता, पृ. क्र. ७४५

१६८. कित्ता, पृ. क्र. ७४७

१६९. कित्ता, पृ. क्र. ५४८

१७०. कित्ता, पृ. क्र. ७४९

१७१. बेंद्रे वा. सी., 'श्री शिवराज्याभिषेक', पृ. क्र. ३२

१७२. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ७५३

१७३. कित्ता, पृ. क्र. ७५५ ते ७५७

१७४. कित्ता, पृ. क्र. ७५७ ते ७५९

१७५. कित्ता, पृ. क्र. ९२९ ते ९३२

१७६. कित्ता, पृ. क्र. ९३३

१७७. कित्ता, पृ. क्र. ९४२

१७८. कित्ता, पृ. क्र. ९३४, ९३५

१७९. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', पृ. क्र. १२०

१८०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ९६१

१८१. कित्ता, पृ. क्र. ९७१

१८२. कित्ता, पृ. क्र. ६९१

१८३. कित्ता, पृ. क्र. १०१८, १०१९

१८४. कित्ता, पृ. क्र. १०२३, १०२४

१८५. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ८५

१८६. कित्ता, पृ. क्र. ८५

१८७. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. १०४४

१८८. कित्ता, पृ. क्र. १०३१

१८९. कित्ता, पृ. क्र. ८१८

१९०. कित्ता, पृ. क्र. ८१९

१९१. कित्ता, पृ. क्र. ८२०, ८२१

१९२. कित्ता, पृ. क्र. ८२३, ८२४

१९३. कित्ता, पृ. क्र. ८२५, ८२६

१९४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ८५, ८६

१९५. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. ८२९ ते ८३२

१९६. कित्ता, पृ. क्र. ८३७

१९७. कित्ता, पृ. क्र. ८३९, ८४०

१९८. कित्ता, पृ. क्र. ८५०

१९९. कित्ता, पृ. क्र. ८६३, ८६४

२००. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. १७४, १७५

२०१. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', पृ. क्र. १०५० ते १०५७

२०२. कित्ता, पृ. क्र. १०५७

२०३. कित्ता, पृ. क्र. १०५७

२०४. कित्ता, पृ. क्र. १०५८

प्रकरण पाचवे
छत्रपती संभाजी महाराजांविषयीचे लिखाण

प्रकरण पाचवे

छत्रपती संभाजी महाराजांविषयीचे लिखाण

प्रस्तावना :

संभाजी महाराजांचे खरे चरित्र प्रकाशित करून वा. सी. बेंद्रे यांनी महत्तम कामगिरी केली आहे. पूर्वीच्या ऐतिहासिक नाटकांचा विचार करता ती बहुतांशी बखर वाङ्मयाच्या आधारे, ऐकीव व परंपरागत चालत आलेल्या माहितीच्या आधारे सजवलेली होती. यातील बहुतेक नाटकात संभाजी व्यसनाधीन, बदफैली, व्यभिचारी, दुवर्तनी असाच नाटककारांनी उभा केला होता. संभाजी महाराजांचे चरित्र संशोधित केले पाहिजे हा विचार त्यांच्या मनात बरेच दिवस घोळत होता. मंडळातील त्यांचे स्नेही श्री पाटोबा पटवर्धन यांनी या विषयाच्या संशोधनासाठी त्यांच्याकडे विशेष आग्रह धरला होता. या विषयाकडे वा. सी. बेंद्रे यांचे लक्ष इ.स. १९१८ पासून वेधले गेले होते. या विषयासंबंधिची हजारो साधने त्यांनी एकत्रित केली आणि त्यावर आधारित असा संभाजी महाराजांचा चरित्रग्रंथ इ.स. १९५८ मध्ये लिहून पूर्ण केला. हा ग्रंथ इ.स. १९६० मध्ये प्रसिद्ध झाला.[१] ह्या ग्रंथाने समाजात विलक्षण खळबळ उडवून दिली. त्यातून संभाजी महाराजांची व्यक्तिरेखाच बदलली गेल्यामुळे आधीचे वाङ्मयीनलेखन त्याज्य ठरले. श्री. वा. सी. बेंद्रे यांनी सर्व विवेचन साधार आणि संशोधनाच्या पायावर उभे केले. या चरित्रामुळे स्वाभिमानी, धर्मनिष्ठ, पराक्रमी, संस्कृत जाणकार अशा संभाजीराजाबद्दलचे सर्व गैरसमज दूर झाले आणि यामुळे संभाजी महाराजांची पराक्रमी संकटाला धीरोदात्तपणे तोंड देणारी, धोरणी, मुत्सद्दी अशी तेजस्वी प्रतिमा उंचावली गेली. अभ्यासकांना पुनराभ्यास करण्यास त्याने प्रवृत्त केले. याचा परिणाम म्हणजे वा. सी. बेंद्रे खऱ्या अर्थाने इतिहाससंशोधक झाले. प्रस्तुत प्रकरणात श्री. वा. सी. बेंद्रे यांनी संभाजीराजांच्या चरित्राची कशी खरी पुर्नमांडणी केली त्याचा विचार करण्यात आला आहे.

५.१ संभाजी महाराजांचा जन्म व बालपण

शिवाजी महाराजांचा पहिला विवाह वणगोजी नाईक निंबाळकर पवार यांची नात सईबाई यांच्याशी इ.स. १६४१ मध्ये झाला. सईबाईला सुरुवातीला तीन मुली झाल्या. त्यांची नावे

अनुक्रमे सकवारबाई, राणुबाई व आमाणिका किंवा अंबिकाबाई अशी होती. त्यांचे चौथे व शेवटचे अपत्य म्हणजे युवराज संभाजी होते. युवराज संभाजीराजांचा जन्म 'शके १५७९ हेमलंबी संवछरे जेष्ठ शुद्ध द्वादशीस गुरूवारी घटिका दहा' म्हणजेच १४ मे १६५७ रोजी झाला. संभाजीराजांचा जन्म पुरंदर येथे झाला. संभाजीराजांच्या जन्माच्या दोन वर्षानंतर म्हणजे सोमवार ५ सप्टेंबर १६५९ रोजी सईबाईंचा मृत्यू झाला. सईबाई संभाजीराजांच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांत आजारी झाल्याचे उल्लेख गाडे करीण्यात आढळतात. सईबाई आजारपणामुळे पुरंदरावरून आपल्या माहेरी प्रतापगडावर आल्या. याच ठिकाणी वारल्या. संभाजीराजे पुढे काही दिवस आपल्या आजोळीच होते. शिवाजीमहाराजही ११ जुलै १६५९ नंतर आपल्या मातेसह येऊन राहिले असले पाहिजे असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. संभाजीराजांना आपल्या मातेचा सहवास फारसा मिळाला नाही. परंतु त्यांची आजी जिजाबाईसाहेब यांनी त्यांचा अधिक जिव्हाळ्याने सांभाळ केला. शिवाय त्यांच्या बालपणी इतर सापत्न मातांचाही लळा त्यांचेकडे असणे स्वाभाविक होते. इ.स. १६७० पर्यंत म्हणजे त्यांना चौदावे वर्ष लागेपर्यंत, शिवाजी महाराजांना दुसरा मुलगा नव्हता व कदाचित संभाजी राजे इतर बहिणींपेक्षा लहानही होते. जिजाबाईंचे त्यांच्यावर विशेषच प्रेम होते. परंतु १७ जून १६७४ रोजी जिजाबाईंचा मृत्यू झाल्याने संभाजीराजांचा आधार नाहीसा झाला.[२]

५.२ संभाजी महाराजांचे शिक्षण :

शिवाजी महाराजांनी व जिजाबाईंनी संभाजीराजांच्या शिक्षणाची व्यवस्था तत्कालीन पद्धतीने उत्तम प्रकारे राखली असेल यात शंका नाही असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे लिहितात, संभाजीराजास शिक्षण कसे मिळाले व त्यांचे कोण गुरू होते याचे निश्चित उल्लेख मिळाले नाहीत. परंतु त्यांच्याच लिहिण्यावरून त्यांच्या सुविद्यतेचा चांगलाच अंदाज बांधता येण्यासारखा आहे. संभाजींनी शिवराज्याभिषेकानंतर व आपल्या पित्याच्या मृत्युपूर्वी बहुधा रागावून जाण्यापूर्वी म्हणजेच ऑक्टोबर १६७७ पूर्वीच 'बुधभूषणम्' नावाचा ग्रंथ रचण्यास सुरुवात केली. त्यावेळी ते १६ ते १७ वर्षाचे होते. या ग्रंथाच्या सुरुवातीच्या प्रास्ताविकात ते काव्यालंकार, शास्त्रे, पुराणे, संगीत आणि धनुर्विद्या यांचा सखोल अभ्यास केला असल्याचे व आपल्या पुस्तकातील साधनसामग्री पुरातन लेखकांच्या ग्रंथाचा बारीक अभ्यास करून घेतली असल्याचे स्पष्ट सांगतात. या ग्रंथाची तीनच प्रकरणे उपलब्ध झाली असून हा ग्रंथ लिहिण्यात केशवभट्टाचे

पुष्कळ साह्य झाले असले पाहिजे. परमानंदाचा नातू गोविंद याने केशवभट्टाबद्दल लिहिलेल्या माहितीवरून केशवपंडित संभाजीराजास त्यांच्या १४ व्या वर्षांपासूनच गुरूजी होते असे दिसते.[३] संभाजीराजांच्या 'बुधभूषणात', 'स्तुतिअन्योक्तयः, राजनीतिः व प्रकीर्णनीतिः' ही प्रकरणे उपलब्ध आहेतच. केशवभट्टाप्रमाणे 'दण्डनीती'चेही एक प्रकरण होते.[४] शिवाय आणखीही 'धनुर्विद्या, संगीत, पुराणेतिहास व काव्यालंकार' यावर प्रकरणे असणे प्रास्ताविकांतील उल्लेखावरून शक्य आहे. तसेच केशवपंडिताचा मुलगा रामचंद्रभट्ट यांस दिलेल्या १४ मे १७२४ च्या सनदपत्रावरून केशवभटाने संभाजीस रामायण ऐकवीले होते यात शंका नाही. शिवाय कृष्णपंडित उर्फ कवी कलशला संभाजीराजे आपला गुरू मानीत होते असे हरिकवीच्या 'शंभुविलास' आदी काव्यातील उल्लेखांवरून स्पष्ट दिसते. संभाजीराजांनी शास्त्रांचा अभ्यास केला होता याबद्दल एक महत्त्वाचा उल्लेख राहूजीपंताविरूद्ध केलेल्या एका तक्रारीत आला आहे. त्यात वादी संभाजीराजास लिहितो की, 'साहेब सर्वज्ञ, शास्त्रार्थचा अर्थ स्वतः पंडिताचा निशा होय ऐसा करिताती. ऐसे असोन माझे पारिपत्य होत नाही.' ही तक्रार संभाजीराजांनी हे भांडण प्रल्हाद नीराजी व कवी कलशकडे सोपविल्याचे सांगितल्यावरून केली आहे हे लक्षात घेतले तर संभाजीराजांना शास्त्राचे ज्ञान होते असे इतर सर्वही जाणत होते यात शंका धरण्याचे कारणच राहात नाही. एकूण संभाजीराजांना पाच विद्या अवगत होत्या हे स्पष्ट आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतांना आपल्याला दिसतात.[५] संभाजीराजांना शिवाजी महाराजांनी गड-कोट-दुर्ग बांधण्यासाठीचे आवश्यक ते खास शिक्षण दिले होते हे आपल्याला संभाजीराजांनी लिहिलेल्या 'बुधभूषणम्' या ग्रंथातील 'राजनीति' प्रकरणात आलेल्या सुत्रांच्या नोंदीवरून स्पष्ट होते असे वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात.[६]

५.३ कौटुंबिक जीवन :

संभाजीराजाचे पहिले लग्न शिर्के घराण्यातील पिलाजीराजे शिर्के यांच्या मुलीशी म्हणजे येसूबाईशी झाले. हे लग्न इ.स. १६६१ नंतर व १६६५ पूर्वी झाले. येसूबाई व संभाजीराजे यांच्या वयातील फरक फार तर चार-पाच वर्षांचा असेल. श्रृंगारपूरला असतांना भवानीबाई नावाची मुलगी येसूबाईला झाली (२९ जानेवारी १६७९) भवानीबाईचा विवाह पुढे शंकराजी महाडिकाशी झाला. हे लग्न संभाजीराजांनीच करून दिले. भवानीबाईला दुर्गोजी व अंबाजी असे दोन मुले होती. येसूबाईला १५ जानेवारी १६८२ रोजी पुत्र झाला त्याचे नाव शिवाजी (शाहू) ठेवले.

संभाजीराजांना चंपा उर्फ दुर्गा नावाची कच्छवाह घराण्यातील दुसरी एक बायको होती. ही येसूबाईपेक्षा सात-आठ वर्षांनी लहान असावी. हिला दोन मुले व एक मुलगी होती. मुलांची नावे अनुक्रमे मदनसिंह व उधोसिंग होती. अशा प्रकारची संभाजीराजांच्या कौटुंबिक जीवनाविषयीची माहिती वा. सी. बेंद्रे येथे देतात.[७] परंतु कच्छवाहाचे रजपूत घराणे सामवेदी व भोसले यजुर्वेदी असल्याने हा विवाह अनुलोम होऊ शकेल. या कच्छवांस रजपूत कमी दर्जाचे मानीत होते. त्यामुळे मराठी बखरकार संभाजीराजांच्या या दुसऱ्या बायकोचा नाटकशाळा म्हणून उल्लेख करितात[८] असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

५.४ लहानपणापासूनचे राजनीतिचे धडे :

शिवाजी महाराजांनी १२ जून १६६५ रोजी राजे जयसिंहाशी करार केला ज्यानुसार आपण स्वतः मोगलांचा नोकर होण्याचे टाळण्यासाठी संभाजीराजांच्या नावाने पंचहजारी मनसब घेण्याचे कबूल केले. यावेळी संभाजीराजे अवघे आठ वर्षाचे होते.[९]

या करारानुसार १४ जूनला शिवाजीराजे संभाजीराजासह राजा जयसिंहाला जाऊन भेटले तेव्हा राजा जयसिंहाने आपला मुलगा किरतसिंह यासह कोंडाण्यास पाठविले. तेथे शिवाजी महाराजांची आई व बायका-मुले होती. तो किल्ला ताब्यात दिल्यानंतर शिवाजीराजे संभाजीराजांसह १५ जूनला रायगडला गेले व १५ जूनला ठरल्याप्रमाणे शिवाजीराजांनी संभाजीस राजा जयसिंहाच्या हवाली करण्याकरिता त्यास उग्रसेन कछवाबरोबर राजा जयसिंहाच्या छावणीत पाठविले.

१८ जूनला ८ वर्षांचे संभाजीराजे मोगलांच्या छावणीत आले. तेव्हा त्यास राजा जयसिंहाने आपल्यातर्फे पोशाख व रुप्याच्या हौद्यासह हत्ती देऊन गौरविले. बादशाहाच्या फर्मानानुसार ३० सप्टेंबरला शिवाजी महाराजांना वस्त्रे मिळाली आणि संभाजीराजे बादशाही मनसबदार झाले. पुढे मोगलांची आदिलशाही प्रदेशांवर स्वारी झाली. त्यात शिवाजीराजे व नेताजी पालकर यांनी कराराप्रमाणे मोगलांना साह्य केले. परंतु या दोघांनी लवकरच आपले अंग काढून घेतले व नंतर नेताजी आदिलशाहास मिळाला. शेवटी राजा जयसिंहाला विजापूरचा वेढा उठवून माघारी यावे लागले. हा सर्व काळ संभाजीराजास राजा जयसिंग जवळच राहावे लागले ते मोगलांकडे ओलीसच म्हणून ठेवले गेले होते. अशा पद्धतीने संभाजीराजांना लहानपणापासूनच

सरदारकीचा मानमरातब घेणे देणे वगैरे चालचलणुकीची शिकवणूक मिळण्यास सुरुवात झाली[१०] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

शिवाजी महाराजांनी १५ मे १६६६ रोजी संभाजीराजांसह औरंगजेबाची भेट घेतली व नंतर शिवाजी महाराजांना कैद झाली तेव्हा पंचहजारी मनसबदार संभाजीराजे मात्र रामसिंहाबरोबर दरबारी जात-येत व आपला रूबाबही राखीत. या संकटात त्यांनी दोन-तीन महिने काढले. "आगऱ्याहून परत राजगडास येईपर्यंत संभाजीराजांनी जसा एक-दीड वर्षाचा काळ गृहसौख्यविरहीत काढला तसेच त्याकाळात जगाचे व राजकारणाचे अनुभव घेतले; राजा जयसिंहाच्या डेऱ्यातील सांस्कृतिक वातावरण व युद्धविषयक हालचाली त्यांनी प्रथम पाहिल्या; नंतर त्यांनी मनसबदारी राजशाही थाटाच्या आगऱ्यापर्यंतच्या प्रवासातील सुखदुःखे अनुभवली; पुढे मोगली दरबाराचा थाट पाहिला व शत्रूच्या गोटातील अविश्वासार्ह व भयपूर्ण अशा परिसरात सावधगिरीचा काळ कंठला; सुटकेनंतर अतिकष्टाचा जिवापाड प्रवास केला; ब्राम्हण कुटुंबात ब्राम्हण मुलाची भूमिका उत्तम तऱ्हेने वठवून आपले भूमिगत माणसाचे सोंग किंवा अज्ञातवास उत्तमप्रकारे पार पाडला व शेवटी परत प्रवासात कष्टसाहसाचा अनुभव घेतला. अवघ्या दहा वर्षे वयाच्या आतच हा जो प्रत्यक्ष अनुभव मिळाला तो त्यांच्या उत्तर आयुष्यातील काटक व निग्रही वृत्तीला चांगलाच पोषक झाला असल्यास नवल नाही." असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, संभाजीराजे राजगडावर परत आल्यानंतर शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला पत्र पाठवून मैत्रीची व संभाजीराजांना सातहजारी मनसब मिळण्याची मागणी केली. औरंगजेबानेही ९ मार्च १६६८ च्या पत्रात शिवाजी महाराजांना 'राजा' हा किताब दिला. मागील करारात राजा जयसिंहाने मनसबची रक्कम शिवाजी महाराजांनी द्यावयाच्या खंडणीतून घ्यावयाची होती. यावेळी ही मनसब मोकासा हक्कातून मिळवयाची होती. एकूण संभाजीराजांचे मोगली दरबारातील 'पंचहजारी मनसबदार' म्हणून झालेले वर्तन शिवाजी महाराजांना व मोगलांकडील मंडळींना समाधानकारक व योग्य वाटले पाहिजे यात शंका नाही.[११]

"संभाजीराजांनी आपल्या बारा वर्षांच्या वयातच प्रथम 'पंचहजारी'चा व नंतर 'सप्तहजारी सुभेदारी'चा अनुभव तीन-चार वर्षे घेतला. अशातऱ्हेने त्यांच्या बालपणातील काळ इतर नैमित्तिक व राजनैतिक शिक्षणाबरोबर प्रत्यक्ष अनुभवाचाही लाभ घेण्यात गेला. हा काळ संघर्षाचा असल्याने संभाजीराजांच्या कानांवर येणाऱ्या शिवाजी महाराजांच्या अनेक हालचाली

व यशापयश यांचा त्यांच्या मनावर सारखा संस्कार होत राहिला. मोगली दरबारातील सरदारांच्या तरतम हुद्यांचा व त्यास प्राप्त झालेल्या कमीअधिक मानमरातबाचाही त्यांच्या बालमनावर परिणाम झाला. त्यामुळे संभाजीराजांचा आत्मविश्वास दृढतर होऊ लागला. तसाच त्याबरोबर त्यास स्वयंनिर्णयाने कारभार आटोपण्याचे वळणही आपोआप लागू लागले. हीच संभाजीराजांची वृत्ती कारभाऱ्यांस किंचित जाचक वाटू लागल्यास नवल नाही. शिवाजी राजांनी स्वसामर्थ्यांने मिळविलेल्या राज्याचा युवराज व राज्याबाहेरही मोगली दरबारासारख्या साम्राज्यात मिळालेल्या मानसन्मानाचा धनी या भूमिकेत ज्यांच्या आयुष्याच्या बालपणास सुरुवात झाली व ज्यांनी सर्व मंत्री वगैरेच्या मुलांबरोबर शिक्षण घेऊन जे युद्धविद्येत कुशल व शास्त्र आणि राजविद्येत तरबेज होत होते. त्या संभाजीराजांनी आपले वर्तन अधिकारपूर्ण व खंबीर राखणे अगदी साहजिक व संयुक्तिकही होते." असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.[१२]

मोगलांशी झालेला करार तुटल्यामुळे 'मोगली सप्तहजारी' व 'खानदेश वऱ्हाडची सुभेदारी' संभाजीराजांकडून गेली. शिवाजी महाराजांना मोगली प्रदेशावर चढाई करून गेलेले सर्व किल्ले व प्रदेश परत काबीज करावयाचे होते. शिवाजी महाराजांच्या गैरहजेरीत राजधानीत (रायगडावर) राज्यकारभार पाहणारी राजमाता वृद्ध झाल्याने राज्याचा कारभार २६ जानेवारी १६७१ रोजी शिवाजी महाराजांनी संभाजीराजांना दिला. जिजाबाईंना पाचाडाजवळ एक मैलावर स्वतंत्र गढी बांधून ठेविली होती. संभाजीराजे व निवडक किल्ल्यावरील नोकर खजिन्यासह रायगडावर असत. याचवेळी संभाजीराजांना स्वतंत्र लेखकही दिले गेल. यानंतर ज्याप्रमाणे शिवाजी महाराज रायगडावरून राज्यकारभार पाहत होते व जो शिष्टाचार होत असे तसाच शिष्टाचार संभाजीराजांसोबत होत असे. याचे अनेक उल्लेख आढळतात. हेन्री ऑकिस्डन व फ्रायर सांगतात की, "ज्या ज्या वेळी इंग्रज वकील व शिवाजीराजे यांच्यात बोलणी झाली त्या त्या वेळी संभाजीराजे शिवाजी महाराजांजवळच बसले होते व ते शिवाजी महाराजांबरोबरच निघून जात असत."[१३]

राज्यभिषेकप्रसंगी संभाजीराजे शिवाजी महाराजांच्या सिंहासनाच्या पायथ्याशी बसले होते. ४ फेब्रुवारी १६७५ राज्यभिषेकानंतर पहिल्याच मुहुर्तावर संभाजीराजे यांची मुंज झाली. १३ मार्च १६७५ रोजी एका सेट्यापणाचा (पुरंदर येथील) वादात महजर झाला, 'याबद्दल संभाजी राजेसाहेबास भेटी ठेविली होन ५ ते मुक्काम रायगडचे पोता जमा' झाले आहेत. हा करार

संभाजीराजांनी केला. नंतर '४ मे १६७५ ला संभाजींनी राघो बल्लाळ सुभेदार जुन्नर व राघो भास्कर सरहवालदार व कारकून परगणे पुणे' यास पत्रे लिहिली आहेत. त्यात 'मिरासपटी घातली नसता उगेच आपले भातेने पैके मागता हे कोण रवेश.... तसवीस न देणे' म्हणून ताकीदपूर्ण लिहिण्याइतका संभाजीराजास अधिकार प्राप्त झालेला दिसतो. तसेच संभाजीराजे राज्यभिषेकापासून सप्टेंबर १९७५ पर्यंत रायगडास आपल्या कारभारावर होते असे स्पष्ट दिसते असे बेंद्रे पुराव्यासह स्पष्ट करतात.[१४]

५.५ संभाजी महाराज मोगलांकडे जाण्यासंदर्भात वा. सी. बेंद्रे यांची चिकित्सा

संभाजी राजे श्रृंगारपूरला असतांना शिवाजी महाराजांना मोगल व आदिलशाही सैन्यांच्या मोठ्या हालचालींना तोंड द्यावे लागले, त्यामुळे त्यांना संभाजीराजांकडे लक्ष देण्यास अवसर मिळाला नाही किंवा त्यांना तशी गरजही भासली नसेल. असे बेंद्रे सांगून पुढे म्हणतात की, एकतर संभाजीराजे कठीण प्रदेशात होते व पाऊसही सुरू झाल्याने रस्तेही अवघड झाले होते. उलट मंत्र्यांच्या जुलै-ऑगस्ट १६७८ मध्ये भेटी झाल्या. तेव्हा त्यांनी पुन्हा संभाजीराजाबद्दल गाऱ्हाणी केली. त्यात त्यांच्या नेहमीच्या तक्रारीबरोबर तो 'आतताई जो यवन त्या आपल्या ऐश्वर्याचीही उपेक्षा करून त्याचे अनुसरण करतो' असे सांगून त्याची ताबडतोब बंदोबस्त करण्याची विनंती केली. त्यानंतर परमानंदाच्या म्हणण्यानुसार शिवाजी महाराजांनी स्वहस्ते पत्र लिहून संभाजीस श्रृंगारपूर सोडून सज्जनगडला जाण्याची आज्ञा केली. संभाजीराजे विश्वनाथाबरोबरील सैन्य व नोकरांसह परळीला गेले. ते आपल्या सर्व लवाजम्यानिशी परळीला आले. याठिकाणी लवाजम्यानिशी म्हणजे संभाजी महाराज आपली पत्नी येसूबाईसह गेले असा अर्थ घेतात. तो चुकीचा आहे असे वा. सी. बेंद्रे सांगून येसूबाईंना श्रृंगारपुरातच ठेवण्यात आले होते व नंतर दिड महिण्यांनी म्हणजे २९ जानेवारी १६७९ रोजी तीला भवानीबाई नावाची मुलगी झाली होती असे स्पष्ट करतात.[१५]

संभाजीराजे परळीगडावर जुलै १६७८ नंतर व निंबच्या सदानंदाच्या बाबतीत पत्र लिहिण्यापूर्वी म्हणजेच नोव्हेंबर १६७८ पूर्वी आले. त्यानंतर संक्रातीच्या मुहुर्तावर संभाजीराजे माहुलीवरून दिलेरखानाकडे गेले. संभाजीराजे मोगलांकडे जाण्याच्या संदर्भात बेंद्रे सांगतात की, तत्कालीन लेखक संभाजीराजे मोगलांकडे जाण्याला शिवाजी महाराज व संभाजीराजे यांच्यातील असंतोषाचे कारण देतात व काही विशेषतः १७ व्या शतकातील बखरकार 'संभाजी राजियावर

(शिवाजीवर) रूसून गेले' हेच कारण देतात. परंतु उत्तरकालीन लेखक अशा प्रसंगाने उठणाऱ्या बाजारगप्पांवर विश्वास ठेवून 'संभाजीने थोर ब्राम्हणांच्या मुलीशी बदकर्म केले, त्यामुळे शिवाजी त्यास ठार करणार हे समजून तो पळून गेला', असे लिहितात. अर्थात अशा कथाख्यानी लेखनावर विश्वास ठेवण्याइतकी ती पात्र नाहीत. कारण संभाजीराजे वर्षे दिड वर्षे रायगडावर नव्हते. असे सांगून बेंद्रे पुढे लिहितात की, संभाजीराजे परळीगडावरून बहुधा संक्रातीची पर्वणी साधून पूर्वनियोजित बेताप्रमाणे वेण्णा व कृष्णा नदी ओलांडून पलीकडे क्षेत्र माहुलीला गेले. तेथून जवळच त्यांना नेण्यासाठी मोगली सरदार व सैनिक आले होते. त्यांच्यासोबत ते मोगली गोटात गेले. ही योजना त्यांनी आपला दुसरा अपमान झाला त्यांनतर आखली. त्यांचा शाहाआलम यांचे दक्षिणेत आगमन हेच त्यांना या कामी उद्युक्त करण्यास अधिक कारण झाले असावे. शाहाआलमच्या हुकुमाशिवाय दिलेरखानाने इतकी तयारी आखली नसती. शिवाय शाहाअलम औरंगाबादला येईपर्यंत संभाजीराजे थांबले याचे मुख्य कारण हेच की, त्यांचा शाहाआलमच्या मैत्रीवर अधिक विश्वास होता. तसेच एकदा तह मोडल्याचे औरंगजेबाने सांगितले असता हेच फर्मान व वस्तु उपयोगाला आणून ही नवीनच घटना स्वीकारण्याचे दिलेरखानास धैर्य झाले नसते. श्रृंगारपुरास संभाजीराजांच्या बरोबर असलेला विश्वनाथ परळीसही त्यांच्याबरोबर राहिल्याने संभाजीराजांनी आपला बेत गुप्त ठेवून आपल्या मनस्तापापासून मुक्त होण्यासाठी शत्रुच्या गोटात जाऊन तेथील धोका किंवा दगाफटका सहन करण्याची मनाची तयारी केली. 'शिवाजी महाराजांना संभाजी मोगलांकडे गेल्याची बातमी समजल्यानंतर त्यास कृतकर्माचा खेदही झाला व आपल्या दुष्ट मंत्र्यांच्या सल्ल्याने आपण फसलो गेलो' अशी त्यांना खात्री झाली. असे परमानंदाच्या लिखाणाचा आधार घेऊन वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.[१६]

संभाजीराजांना प्रवासात कोणताही अडथळा झाला नाही. औरंगजेबाने इ.स. १६७५ मध्ये पाठविलेले फर्मान बिरूदे वगैरे पडून होती. ती मोठ्या सन्मानाने संभाजीराजांच्या स्वाधीन केली. त्याचबरोबर संभाजीराजांना खानदेश व वऱ्हाडचा सुभाही पुन्हा मिळाला. पुढे दिलेरखान व संभाजी एका हौद्यातून बरोबर जात.

५.६ संभाजीराजांना श्रृंगारपूरला ठेवण्यासंदर्भातील शिवाजी महाराजांच्या निर्णयाची वा. सी. बेंद्रे यांनी केलेली चिकित्सा

शिवाजी महाराज कर्नाटकचे राजकारण साधून परत येईपर्यंत संभाजीराजांनी रायगडास न राहता श्रृंगारपुरी जाऊन रहावे म्हणून आदेश दिला. तेथे संभाजीराजांना प्रभावली सुभ्याचा कारभार देऊन ठेविले. दक्षिण कोकणचा सुभा फार मोठा होता, हे जरी खरे असले तरी युवराज म्हणून जो सर्वाधिकार होता तो जात होता. बारमाईंच्या आणि त्यातल्या त्यात ज्या मंत्र्याविषयी त्यांच्या मनात तिटकारा उत्पन्न झाला होता अशांच्या हाताखाली वावरणे भाग पडणार होते. हे जर संभाजीराजांना असह्य झाले असते तर त्यात काही नवल नाही असे बेंद्रे सांगतात. ते पुढे सांगतात की, काही मंत्री अप्रामाणिक व प्रजेवर जुलूम करणारे होते. या संभाजीराजांच्या उघड आरोपात शिवाजी महाराजांना असत्यता दिसली म्हणून त्यांना रायगडाहून दूर ठेवणे भाग पडले असे नसून शिवाजी महाराजांना आपण परत येईपर्यंत ही भांडणे विकोपास जाऊ नयेत व जमल्यास ती कालगतीने समोपचाराने मिटवायची होती. कारण शिवाजीराजे यांची ब्रम्हनिष्ठत्वाची हळुवार परंपरागत वृत्ती अशा मंडळींना कठोर शासन देण्यास तयार होत नव्हती. म्हणून शिवाजी महाराजांनी संभाजी महाराजांची समजूत घातली.

राजारामास राहूजी सोमनाथाच्या ताब्यात रायगडावर ठेवले आणि मोरोपंतांनाही या कलहस्थानापासून दूर ठेवण्यासाठी त्यांना मोगली सैन्याच्या प्रतिकारार्थ म्हणून उत्तर भागात रवाना केले. सारांश सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, संभाजीराजे बापावर रागावून आपल्या सासऱ्यांच्या आश्रयाने जाऊन राहिले होते. ही जी कल्पना काही बखरकारांनी केलेली आहे ती अवास्तव आहे. शिवाजी महाराज संभाजीराजांवर नाराज झाले होते असे मानण्यास जागा नाही. उलट आपल्या गैरहजेरीत आपल्या कर्तृत्ववान मुलाला दुष्ट मंत्र्यापासून दगाफटका होऊ नये म्हणून संभाजीराजांच्या मनाविरूद्धही शिवाजी महाराजांनी आपल्या मुलाला दुर्घट व त्याच्याच बाजुच्या लोकांनी परिवेष्टित अशा सुरक्षित प्रदेशात नेऊन ठेवले होते यात शंका नाही.[१७]

संभाजीराजे श्रृंगारपूरला एकटे असल्याचे समजताच दिलेरखानाने पत्रव्यवहार करून संभाजीराजांना आपल्याकडे येण्यासाठी सुचविले. या दिलेरखानाच्या पत्राला संभाजीराजांनी जे उत्तर लिहिले त्याचा सारांश वा. सी. बेंद्रे सांगतांना लिहितात, "जरी संभाजीराजांनी मोगलांकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली असली तरी ते आपल्या बापास दिलेल्या वचनाप्रमाणे शिवाजी

महाराज परत येईपर्यंत तरी तेथून हालता येत नाही असे कळवितात. हा व यानंतरही जो थोडासा पत्रव्यवहार झाला तो संभाजीराजांनी गुप्त राखल्याचे सांगतो. शिवाजी महाराजांनी इतरत्र हालचालीसाठी मोगलांबरोबरील केलेली तहाची बोलणी संभाजीराजांनी मोडू दिली नाही व युक्तीने मोगलांच्या हाती न पडण्याचा कार्यभाग पार पाडला. दिलेरखानाला दिलेल्या उत्तरावरून संभाजीराजांची आपल्या वडिलांवर किती निष्ठा होती व ते आपल्या पित्याची अवज्ञा करण्यास कसे तयार नव्हते याचे येथे प्रत्यंतर पाहावयास मिळते."[१८]

५.७ शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतरच्या घडामोडी व संभाजी महाराज

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर सोयराबाईची संमती मिळो न मिळो अण्णाजीने राजारामास मंचकरोहण करण्याचे, आपला सहकारी राहूजी सोमनाथाशी संगनमत करून ठरविले होते. बहुधा मोरोपंत राजधानीस येण्यापूर्वीच अण्णाजीने अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर राजारामाला मंचकरोहण करविले. बेंद्रे सांगतात की, ज्या अर्थी पुरावे मंचकारोहणाचे कार्यकर्तृत्व मोरोपंताकडे न देता अण्णाजीला देतात, त्याअर्थी या कटाचा सूत्रधार अण्णाजी दत्तोच होता यात शंका नाही. उलट मोरोपंत संभाजीराजांचाच पुरस्कार करीत असल्याचेच तत्कालीन उल्लेख आहेत. मोरोपंत दूर त्र्यंबकेश्वराचे बाजुला असल्याने त्यांना बातमी मिळून रायगडावर येण्यास कालावधी लागणे अपरिहार्य होते. शकावलीतील नोंदीप्रमाणे रायगडावरील तत्कालीन परिस्थितीमुळे अण्णाजीला संभाजीराजास कैद करण्याचा 'तह' मोरोपंताशी करिता आला. एकूण सोयराबाई सारखाच मोरोपंत आपल्या सर्वस्वाचा नाश होईल या भीतीने अण्णाजीच्या कटात अडकला गेला. अण्णाजीने गडागडांवर हुकूम पाठविले. पन्हाळ्याच्या किल्ल्यावर जासूद पाठविले. शिवाजी महाराजांच्या मृत्युची बातमी कोणालाही एक-दोन दिवसांपेक्षा अधिक काळ दाबून ठेवणे अशक्यच होते. रायगडच्या बंदोबस्ताकरिता जरी गडाची द्वारे बंद ठेवली होती तरी सर्व कारकून वगैरेंची कुटुंबे पाचाडात राहात असल्याने तेथून बातमी सर्वत्र जाणे साहजिकच होते. संभाजीराजांना ही बातमी दहा दिवसाच्या आतच कळाली होती.[१९]

इतर तत्कालीन बातमीवरून संभाजीराजांनी आपले लोक पाठवून १९ एप्रिलच्या आतच राजापूर व इतर ठिकाणचे धान्य पन्हाळ्यावर नेऊन ठेवण्याचा व सर्व सुभेदार, हवालदार वगैरेंनी पन्हाळ्यावर भेटण्यास सांगितले होते, ते लोक सारखे पन्हाळ्याकडेच जात होते. संभाजीराजांकडे लोक जाऊ लागल्याने त्यांची पन्हाळ्यावर जय्यत तयारी होत होती.

संभाजीराजांनी हंबीररावास पत्र लिहिले. परमानंदाच्या सांगण्यानुसार हंबीररायाने उत्तर पाठविले की, 'तुम्ही जेथे जेथे जाल तेथे तेथे मी मागे आहेच.'[२०]

परमानंदाच्या लिखाणात कटातील मुख्य मंत्र्यांची नावे आली आहेत, ती - अण्णाजी, मोरोपंत, प्रल्हाद व राहूजी अशी चारच मंडळी आहेत. अण्णाजी दत्तो सोडून बाकीच्या मंत्र्यांना नाईलाजाने या कटात सामील व्हावे लागले होते. नंतर यांनी अण्णाजींची सोबत सोडून संभाजीराजांकडेच जाणे पसंत केलेले दिसते, असे बेंद्रे स्पष्ट करतात. राज्य विभागणीचा निर्णय शिवाजी महाराजांचा नसून या कुमंत्र्यांचा आहे असे हंबीररावाला कळल्यावर त्याने या मंत्र्यांना भेटीसाठी बोलाविले व कैद करून पन्हाळ्यास पाठविले. पन्हाळगडावर अण्णाजीस शृंखलाबद्ध करून ठेविले. मोरोपंतासही कैदेत ठेवले.

याआधी मोरोपंत व अण्णाजी आपल्या लोकांसह पन्हाळ्याकडे निघाल्यानंतर लवकरच रायगडावरील सरनौबत व नायकवाडी यांनी १६ मे रोजी किल्ला ताब्यात घेऊन फितूर लोकांना कैद केले व आपले चौकी पहारे बसविले. ही बातमी संभाजीराजांना कळविण्यात आली. नंतर मोरोपंतादि सरकारकुनांच्या घरी चौक्या बसविल्या. नंतर संभाजीराजांचा सासरा पिलाजी शिर्के हा मोठे सैन्य (५००० लोक) घेऊन संभाजीराजांच्या आज्ञेने रायगडाचा बंदोबस्त करण्यास आला. सर्व बंदोबस्त झाल्यावर संभाजी महाराज पन्हाळगड्याहून निघाले.[२१]

५.८ संभाजीराजांनी रायगडावर गेल्यावर काय केले यासंदर्भात वा. सी. बेंद्रेंचे लिखाण

संभाजीराजे १८ जून १६८० ला रायगडावर आल्यावर त्यांनी भयंकर आकांत केला असा समज उत्तरकालीन बखरींनी रूढ करून दिला आहे असे सांगून बेंद्रे स्पष्टीकरण देतात की, यावेळी सोयराबाई मारली गेली नव्हती. ती नंतर सव्वा वर्षाने मेली. हे तत्कालीन कागदपत्रावरून स्पष्ट होते. 'सोयराबाईचे व दुसऱ्या तीन मातांचे त्याने येताच सांत्वन केले' असे परमानंद स्पष्ट लिहितो. राजाराम महाराज यावेळी फक्त १० वर्षाचे होते. ३ जूनच्या पत्रात 'राजारामाला मंत्र्यांच्या घरी चौक्या बसविल्या गेल्या तरी कोणत्याही प्रकारचा त्रास दिला जात नाही.' असाच मजकूर आहे. इतकेच नव्हे तर संभाजीराजे त्याला फार प्रेमानेच वागवतात, अशीच रायगडावरील माणसांनी माहिती दिली आहे. १२ जुलैच्या मुंबईच्या पत्रात 'His young brother he used with all kindness and continues as yet so to do...' असाच उल्लेख आहे. हे म्हणणे परमानंदाच्या लिहिण्यास दुजोराच देते. संभाजीने राजारामाला

वस्त्रेप्रावरणे देऊन त्यांची प्रेमाने संभावना केली हीच खरी वस्तुस्थिती दिसते. अण्णाजी व मोरोपंत यांच्या राजद्रोही वर्तनाचे सूत्र चरित्रलेखक सोयराबाईकडे नेतात; परंतु त्यात तथ्य नाही. अण्णाजीने प्रल्हादपंतादि लोकांना जसे संकटात घातले तसेच तिलाही आपल्या कटात अडकवीली. तिला हंबीररायाचा सल्लाही घेण्याची संधी दिली नाही. अण्णाजीला आपल्या मदतीस शिवाजी महाराजांचा द्वेष्टा व आदिलशाहीचा नोकर सावंत याला आणावे लागावे. शिवाजी महाराजांचे आप्त मराठा मंडळ व ब्राम्हण आणि प्रभु कारकूनांनी संभाजीला राजा समजावा आणि चुकूनही तलवार उचलण्याचा प्रसंग न येताच या कुमंत्र्यांना नाक घासून क्षमेची याचना करावी लागावी यात राष्ट्रीय राजकारण किंवा सापत्नभावाचा पुरस्कार नसून तो केवळ वैयक्तिक स्वार्थाकरिता केलेला स्वामीद्रोह होता हे स्पष्ट होत आहे. पुढेही राजारामास जी वागणूक मिळाली त्यावरूनही संभाजी महाराजांनी भावाशी दुष्टावा केला असे होत नाही. येसूबाईचेही राजारामावर जसे प्रेम होते तसेच राजारामाचेही तिच्यावर सादर प्रेम होते. संभाजी महाराजांना त्याला भाऊपणाने वागवावयाचा नसता तर जे थोर सरदार 'येसाजी दाभाडे त्यांच्या खासा तैनातीस होते त्यास गडावर येताच राजाराम महाराज यांचे तैनातीस दिले गेले' नसते. संभाजीराजांनी त्यांची आणि तीन लग्ने आणि तीही राज्यातील शक्तिमान सेनापती व सोयराबाईचा भाऊ त्याच्या आणि तुरुंगवास पत्करून राजारामाला आपल्या नवऱ्याच्या मर्जीतील अष्टप्रधानांच्या व सेनापतींच्या हाती सोपवून हिन्दवी राज्यांचे संरक्षणार्थ बाहेर काढून देऊन लोकांना आदेश दिला नसता. रामचंद्रपंत आपल्या स्वामीशी बेईमान होऊन खुशाल आपल्या स्वार्थासाठी राज्याच्या विभाजनाचा पाठपुरावा करो; परंतु राजारामाने आपल्या तेजची भाऊ-भावजईशी चुकूनही बेईमान होण्याचे मनात आणले नाही. राजारामाच्याच खास पत्रातील (१० ऑगस्ट १६९७) उल्लेख यांची साक्ष देतो. हे पत्र शंकराजी नारायण पंडित सचिव यांसच दादाजी नरस प्रभूचे इनाम जबरदस्तीने घेतले त्याबद्दल ताकीद आहे. या पत्रातून कौटुंबिक जिव्हाळा किती होता हे यावरून स्पष्ट दिसून येईल.

सांराश, सापत्नभावाचे भूत अण्णाजी व मोरोपंत यांनी आपल्या बचावार्थ पहिली गुर्मी उतरल्यावर उभे केले आणि हीच काल्पनिक विचारसरणी सत्यस्थितीच्या ज्ञानाच्या अभावी कथा बखरकारांनी लोकरंजनार्थ उठाव देऊन आपल्या चरित्रांतून गुंफली आहे असे बेंद्रे स्पष्ट करतात.[२२]

बखरकार पन्हाळा व रायगड वगैरे ठिकाणची मंडळी, कारकून, सरकारकून, हवालदार वगैरे मारल्याचा तपशील देतात तो संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतरचा आहे. अण्णाजी दत्तोने संभाजीराजांस पन्हाळगडावर विष घालून मारण्याचा व अकबराच्या हाती राज्य देण्याचा जो कट रचला होता व नंतर जो उघडकीस आला त्यात काही माणसे शासनास पात्र व काही माणसे संबंध आल्याने मारण्यात आली त्या प्रसंगाचा आहे[२३] असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

५.९ संभाजी महाराजांनी सोयराबाईला भिंतीत चिणून मारले का?

यासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, मल्हार रामराव चिटणीस हा एकटाच लेखक सोयराबाईला भिंतीत चिणून मारली असे सांगतो आणि हा प्रसंग संभाजी महाराज १८ जून १६८० रोजी रायगडावर येताच घडला असे सांगतो. परंतु सोयराबाई पुढे सव्वा वर्षे जिवंत होती यात शंका नाही.[२४]

मुंबईच्या इंग्रजांच्या पत्रव्यवहारातील मजकुरावरूनही हे सिद्ध होते की सोयराबाईला रायगडावर येताच भिंतीत चिणून मारली हा आरोप पूर्णतः खोटा आहे. तो फक्त मल्हाळ रामराव बखरीतच प्रथम आला आहे. कदाचित 'मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरी' प्रमाणे तीने संभाजीच्या खुनाच्या कटाशी आपला संबंध जोडला गेल्याचे पाहताच आत्महत्या करून घेतली असेल. बाळाजी आवजी संभाजीच्या बाजूचा असला तरी त्यांनी अण्णाजीच्या आग्रहास बळी पडून चिटणिसी दरखाची पत्रे आपल्या मुलाकडून करवून दिली हे मल्हाररावच कबूल करतात आणि चिटणिसाच्या मुलास खोटी फितुरांची पत्रे लिहिल्याबद्दल व बाळाजीस तसे करवून घेण्यास चोरून संमती दिल्याबद्दल संभाजीराजांनी अण्णाजी दत्तोस, त्याचा भाऊ सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जंद यांच्याबरोबर हत्तीच्या पायाखाली घालून मारविले. ही घटना शकावलीतसुद्धा आली आहे.[२५]

५.१० संभाजीराजांचा मंचकारोहण व राज्यभिषेक

[अ] मंचकारोहण :

राजाराम महाराज हे ज्येष्ठ पुत्र नसल्याने व ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज दूर असल्याने शिवाजी महाराजांच्या मृत्युसमयी हा विधी होऊ शकला नाही. हा मंचकारोहणविधी राजाराम महाराजास नंतर १७ दिवसांनी करविला. अर्थात हे राजनीतिशास्त्रास धरून झाले नव्हते. संभाजीराजे १८ जूनला रायगडावर येताच, बहुधा अस्थींच्या दर्शनापूर्वीच 'राज्य करू लागले'

असा उल्लेख आहे. नंतर अस्थींचे दर्शन घेऊन 'उपरांतीक संभाजीराजे याणी पुनः मागती विधिपुरस्सर क्रिया केली'. बहुधः १८ तारखेपासूनच सुतक पाळले. २७ व्या तारखेला अशुंचाचा दहावा दिवस होता. त्यादिवशी पुतळाबाईने सविध अग्निप्रवेश केला. तिलाही सहगमन केल्याचे पुण्य लाभले. 'धर्म बहुत केला' पिता मेल्यानंतर त्यांच्या मृतदेहास अग्निसंस्कार किंवा मेल्याची निश्चित बातमी मानून क्रियाकर्मास सुरुवात केल्यापासून पुत्राने पित्याचे सुतक पाळावयाचे व क्रियाकर्म करावे असा सामान्य शास्त्रार्थ मानला जातो. त्याप्रमाणे संभाजीराजांनी केले; परंतु रायगडावर येताच पित्याच्या अस्थीचे दर्शन होताच, ज्याप्रमाणे मृत्युची बातमी खोटी ठरून पुन्हा काही काळाने सत्य ठरली तर पुनर्विधीची सांगता करितात त्याप्रमाणे अस्थींचा विधी अपूर्ण राहिला हे पाहून संभाजीराजांनी पुनः विविधपुरस्सर क्रिया केली असल्यास ते शास्त्रालाच धरून केले गेले यात शंका नाही; परंतु त्यामुळे संभाजीराजांना आपले मंचकारोहण करून घेण्यास आणखी १३ दिवस म्हणजे जून अखेरपर्यंत थांबणे भाग पडले. पण यापूर्वीच म्हणजे २७ जूनला विष्णुसुप्तीचा काल सुरू झाल्याने पुढील चातुर्मासात सामान्य अपवाद म्हणून मानलेल्या 'ललितांपंचमी'च्या (२९ जुलै १६८० बुधवार) खेरीज दुसरा शुभ दिवस नव्हता. तो साधून संभाजीराजांनी आपणास मंचकारोहण सविध करून घेतले. परंतु या घालमेलीच्या वातावरणात झालेल्या राज्याभिषेकात त्यांला व त्याच्या सहकारी मंत्र्याधिकाऱ्यांना तितके समाधान व शास्त्रार्थाला दृष्टीने निर्दोषत्व वाटले नाही. त्यामुळे संभाजीराजांवर ऐन्द्रयाभिषेक करवून हिंदवी राजसिंहासनाची कायम प्रतिष्ठा करणे इष्ट वाटले आणि त्यांनी तो महाराज्याभिषेक नंतर माघ शुद्ध ७ रविवार १६ जानेवारी १६८१ रोजी करण्याचे निश्चित करून तयारी केली.[२६]

[ब] संभाजीराजांचा राज्याभिषेक

१. राज्याभिषेक का करावा लागला?

शिवाजीराजांचे क्रियाकर्म दोनदा करावे लागल्याने व 'प्रथमाभिषेक' हा विष्णुसुप्तीतच करून घ्यावा लागल्याने या मंचकारोहणाचा संस्कार तितकासा समाधानकारक वाटला नाही. उलट राजारामासही तसाच संस्कार होऊन गेल्याने शास्त्राच्या व धर्माच्या अडचणी उपस्थित झाल्या होत्या. त्यामुळे ह्या सर्व अडचणी दूर करून राजसिंहासनाचा निर्वेध भोक्ता होण्यास जसा शिवाजी महाराजास संस्कार करून घ्यावा लागला तसाच संभाजीराजांसही ऐन्द्रयाभिषेकाचा संस्कार करून घेणे व दुहीचे मूळ काढून टाकणे गरजेचे झाले होते. या ऐन्द्रयाभिषेकासाठी

गागाभट्टास आणावे असा संभाजी महाराजांचा प्रयत्न झाला असावा. परंतु वाटेत सर्वत्र युद्धे चालू असल्याने गागाभट्टांनेही प्रत्यक्ष येण्याचे टाळले असावे व आपण तयार केलेल्या प्रयोगाप्रमाणेच राज्याभिषेक करा असा आदेश दिला असावा. ही जी मंडळी गागाभट्टास आणावयास गेली त्यांचेबरोबर संभाजीराजांच्या विनंतीवरून 'समयनय' हा ग्रंथ तयार करून पाठविला. या ग्रंथात गागाभट्टांनी संभाजीराजांसंदर्भातील काढलेल्या उद्‌गारावरून तत्कालीन पंडित शास्त्री संभाजीराजांना कसा मान देत होते याची सहज कल्पना करता येण्यासारखी आहे असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, संभाजीराजे गादीवर येताच या 'व्रतनिर्णया' करिताच माणसे पाठविली होती असे नाही गागाभट्टांना राज्याभिषेकार्थ घेऊन येण्याचा संभाजीराजांचा मुख्य उद्देश होता; परंतु तत्कालीन भीषण आणि विशेषतः औरंगजेबाच्या हिंदुविरूद्ध दंगलीच्या परिस्थितीत गागाभट्ट, दक्षिणेत येऊ शकले नाही.[२७]

२. राज्याभिषेक विधी :

राज्याभिषेकवीधी संदर्भात वा. सी. बेंद्रे यांनी तत्कालीन पुराव्यांची चिकित्सा केली. त्यामध्ये मल्हार रामराव चिटणीसची बखरी, मराठी साम्राज्याची छोटी बखर त्यानंतर परमानंदाचे लिखाण यांचा समावेश होतो. या साधनांच्या आधारे बेंद्रेंनी पुढीलप्रमाणे राज्याभिषेकवीधी संदर्भात विवेचन केलेले आहे.

बेंद्रे सांगतात की, मल्हार रामराव चिटणीसाने मूळ विधी समजून न घेता केवळ त्याच्या नावावरून मल्लीनाथी केली आहे. तुळा केल्या व ब्राम्हण मेले. शिवाजीनेही तुळा केल्या होत्या व ब्राम्हण मेल्याचे काही बखरकारांनी अज्ञानाने लिहिले आहे; परंतु तत्कालीन लेखकांचे लिहिण्यावरून व तुळादानविधीच्या प्रयोगावरून हे तुळाद्रव्य सर्व ब्राम्हणांना वाटायचेच नसते. फक्त विधिसाठी उपयोजिलेल्या थोड्या ब्राम्हणांना त्यांच्या अधिकारपरत्वे वाटून द्यावयाचे असते. शिवाय तुळादानविधी १५ दिवस पूर्वीच झाला होता. निऋतियागानंतर नव्हे असे सांगून पुढे लिहितात की, प्रथम एक गोष्ट लक्षात घेणे जरूर की, हा साताऱ्यातील शहरी उत्सव नव्हता. तसेच २० व्या शतकातील इंग्रजी राज्यारोहण विधीही नव्हता. हा धार्मिक विधी असल्याने मंत्राने व तंत्राने नियंत्रित होता. ठरावीक मंडळीच गडावर होती व बाकीची कामापुरती वरती येत. जेवन-भोजन समारंभास पाचाडात योजना होती.

मराठा साम्राज्याच्या बखरीत तर संभाजीराजे २० व्या शतकाच्या सुरुवातीचे कुणब्याचे पोर समजूनच भरमसाट विधाने केलेली आहेत. संभाजीराजांना राज्याभिषेकवीधीचे तसेच धर्म, नीतिचे उत्तम ज्ञान होते. इतकेच नव्हे तर योग्य व्रताचारांचे दर्शन व्हावे म्हणून गागाभट्टांकडून 'समयनय' ग्रंथ तयार करवून आणिला होता. खास ऐद्रयाभिषेकापुरताच विचार करावयाचा तर गागाभट्टाने तयार करून दिलेला प्रयोग संभाजीराजांच्या ज्या कुलोपाध्यायांनी इ.स. १६७४ मध्ये पार पाडला त्यांच्या घराण्यात व पंडितरावाजवळ तो होताच. असे हे बखरकारांचे विकृतपणे चित्र रंगविले जाण्याचे कारण म्हणजे रामचंद्रपंताने आपल्या स्वार्थासाठी कोल्हापूरचे राज्य स्वतंत्र म्हणून राखण्यासाठी केलेला कुप्रचार होय. संभाजीराजांचा वारसा राज्यावर नाही, कारण संभाजीराजांनी राज्य 'विध्वसिले' वगैरे मिथ्यारोप त्यांनी राजपत्रांतून प्रसृत केल्याने विपर्यस्त दंतकथांना जन्म मिळाला असे बेंद्रे स्पष्ट करतात.[२८]

वा. सी. बेंद्रे पुढे लिहितात की, संभाजीराजांच्या राज्याभिषेकाचा समारंभ पंचमी, षष्ठी व सप्तमी (१४ ते १६ जानेवारी १६८१) या तीन दिवसात संपला. या विधीशिवाय तुळादानविधी व प्रथम प्रतापगड येथील कुलस्वामीनीचे पूजन व शेवटी भोजनसमारंभ झाले. यातील तुळादानविधी ३० डिसें. १६८० रोजी झाला. कारण हा प्रायश्चित्तविधी राज्याभिषेकाच्या मंगलोत्सव विधीपूर्वीच व्हावा लागतो. नंतर १३ जानेवारीस राज्याभिषेकवीधी सुरू झाल्याचे वृत्त गोपाळ दादाजीच्या पत्रावरून इंग्रजाने आपल्या मार्चच्या सुरुवातीस लिहिलेल्या पत्रात नमूद केलेले आहे. ३० डिसेंबरास पौष वद्य पंचमी होती. हे समकालीन पुरावे पाहिले म्हणजे उत्तरपेशवेकालीन लेखकांना राज्याभिषेकवीधी म्हणजे काय याची नीटशी माहिती नसावीशी दिसते. विशेषतः शाहूनंतर राज्याभिषेक होऊ शकला नाही. त्यामुळे या विधीबद्दल अज्ञान वाढले आणि त्या अज्ञानामुळे कल्पित कथानके सांगण्यात आली आहेत.

राज्याभिषेकसमयी जमलेल्या शास्त्रीपंडितांना या समारंभप्रसंगी युवराजांची उणीव भासली. राज्याभिषेकसमयी राजा, युवराज, मुख्य प्रधान व सेनाध्यक्ष यांनाच पटबंधन करावयाचे असते. संभाजीराजांना पहिली मुलगीच होती त्यामुळे त्यांचे मत संभाजीराजांनी 'पुत्रकामेष्टि यज्ञ' करावा असे ठरले. संभाजीराजांनी हा पुत्रकामेष्टि यज्ञ बहुधा नंतर दोन तीन महिन्यातच केला असावा. या पुत्रकामेष्टि यज्ञाचे वर्णन परमानंदाचा नातू व देवदत्ताचा मुलगा गोविंद कवीन्द्र याने केले आहे.

३. संभाजीराजांच्या राज्याभिषेकासंबंधी पुरावे कमी का आहेत?

वा. सी. बेंद्रे याचे स्पष्टीकरण देताना लिहितात की, हिंदू किंवा आर्यांचा हा राज्याभिषेक विधी केवळ धार्मिक स्वरूपाचा असल्याने त्यासाठी विधी करणारे सर्व वेदांचे व शाखांचे पढिक ब्राम्हण कुलोपाध्याय व मंत्री व श्रेष्ठाधिकारी यांचाच मुख्यतः संबंध असल्याने त्यासच मुद्दाम आमंत्रण असते. त्याशिवाय सहस्त्रभोजनास व दक्षिणेसाठी किंवा दानासाठी भिक्षूक ब्राम्हण लागतात ते वेगळे. या दुसऱ्या कार्यासाठी आलेल्या मंडळींना यज्ञशाळेत घेत नाहीत आणि रायगडावरील आकुंचित जागेत घेणे शक्यही नव्हते. याखेरीज महोत्सव म्हणून आमंत्रणे देण्याची पद्धत नसल्याने स्थानिक मंडळीपेक्षा अधिक जमावाचे कारण नसते. यामुळे आपणास या अभिषेकप्रसंगाचे पत्रव्यवहारातून पुरावे मिळू शकत नाहीत. शिवराज्याभिषेकासमयी सहज कामासंबंधीने इंग्रज चौकस प्रवासी जॉन फ्रायर व वकील ऑक्सिंडन आल्यामुळे त्यांच्या पत्रांतून बातमी मिळू शकली. संभाजीराजांच्या राज्याभिषेकासमयी इंग्रज मराठे यांचे तसेच डच-मराठे व पोर्तुगीज-मराठे यांचे संबंध मैत्रीचे नव्हते. सिद्दी व मोगल यांच्याशी चालू असलेल्या लढ्यामुळे इतर लोकांचे संबंधही तुटले होते.[२९]

५.११ संभाजी महाराज व अकबर संबंध

वा. सी. बेंद्रे सांगतात की, बखरकारांना अकबराविषयीची व्यवस्थित माहिती नव्हती म्हणूनच त्यांचे अभिप्राय पूर्वग्रहदुषीत व चुकीचे आहेत. मल्हार रामराव चिटणिसाने संवाद वगैरे घालून तत्कालीन वस्तुस्थितीच्या ज्ञानाचेअभावी ते वर्णन काल्पनिक व कथेकरी थाटाचे कसे रंगविले आहे त्याचा तत्कालीन पुराव्यावरून चांगलाच बोध होतो.[३०]

शहजादा अकबर याचा मोगलांना शह देण्यात संभाजीराजांनी पुरेपूर उपयोग करून घेतला; आणि असे करतांना हिंदवी स्वराज्याचा स्वतंत्र राजा म्हणून आपला मानमरातब राखून आपल्या कर्तृत्वाची व शक्तीची चांगलीच जाणीव मोगली सत्तेला करून दिली. दोघांचा संबंध पाच-सहा वर्षे आला; आणि शेवटी ठरलेल्या संकेताप्रमाणे अकबर शाह अब्बासची मदत घेऊन दिल्लीवर चढाई करण्यासाठी येण्यास उशीर लागला नसता व संभाजीराजांचा दुर्दैवी अंत अकस्मात घडून आला नसता तर त्यांचे राजकारण निष्फळ होण्याचे काहीच कारण नव्हते; परंतु अकबर हिंदच्या सरहद्दीवर उशिरा आल्याने ते निष्फळ झाले. दुर्गादासालाही त्याच्याकडे सोपविलेल्या कार्यभागात संभाजीराजांच्या आकस्मिक मृत्युमुळे त्याची पाठराखी तुटल्याने

नामोहरम होऊन राहावे लागले. सारांश, दुर्गादास अकबर-संभाजीराजे यांच्या युती संभाजीराजांच्या इतिहासातील एक महत्त्वाचा भाग आहे.[३१]

[अ] अकबरचे दक्षिणेत आगमन, संभाजी भेट व हालचाली :

वा. सी. बेंद्रे सांगतात की, अकबराचा दक्षिणेत येण्याचा बेत बहुधा १६८१ च्या सुरुवातीस झाला असावा. तोपर्यंत रजपुतांच्या साहाय्याने आपल्या बापाच्या तख्तावर बसण्याच्या प्रयत्नात होता. मार्च १६८१ नंतर मात्र तो अगदी हताश होऊन दक्षिणेकडे निघाला असला पाहिजे; परंतु खास अकबराचे संभाजीराजांना ११ मे १६८१ रोजी लिहिलेले पत्र त्याच्या हालचालीची व आकांक्षेची पूर्ण कल्पना देते. या पत्रातून असे स्पष्ट होते की, अकबराने दुर्गादास राठोड व जयसिंग यांच्या विनंतीवरून संभाजीराजांकडे जाण्याचा निर्णय घेतला तसेच अकबर दि. ३१ मे ला बऱ्हाणपुरावरून गेल्याची व नंतर संभाजी महाराजांच्या राज्यात त्याला सन्मानाने आश्रय दिल्याची बातमी बहादुरखानाने औरंगजेबास कळविली. त्याअर्थी अकबर संभाजीराजाकडे १८ मे १६८१ पूर्वीच जाऊन पोहचला असावा. पुढे तो तेथून ७-८ दिवसांमध्येच पालीस गेला. म्हणजेच अकबर मे महिन्याच्या अखेरपर्यंत (परली) पाली येथे होता.[३२]

अकबराची व संभाजीराजांची पहिली भेट १३ नोव्हें. १६८१ रोजी पातशाहीपूरी (पाली व परली यांच्यामध्ये) झाली. नंतर काही दिवसांनी तो संभाजीराजांबरोबर दंडाराजपुरीच्या वेढ्यात सामील झाला. परंतु ते तेथून ४ फेब्रु. १६८२ पूर्वीच परतल्याचे मुंबईचे इंग्रज सांगतात. त्याप्रमाणे अकबर व संभाजी दंडाराजपुरीच्या वेढ्याचेप्रसंगी तेथे होते. मात्र ते तेथून मुंबईकर इंग्रज सांगतात त्याप्रमाणे पळून गेले नसून दुसरे तातडीचे राजकारण आले म्हणून कल्याण-भिवंडीकडे गेले, हे इतरत्र आलेल्या माहितीवरून सिद्ध आहे. नंतर ते दोघे सैन्याची जमवाजमव करून खानदेश सुरतकडे जाणार अशी वदंता होती. बहुधा मोगलांचे सर्वच आरमार दंडाजराजपुरीवर येऊ नये व बरेच सुरतेत अडकून पडावे म्हणून सुरतेवर जाऊन स्वारी करण्याची तयारी केली असावी. तसेच सुरतकर इंग्रजांच्या यावेळच्या पत्रावरून समजते की, यावेळी संभाजीराजांना मोगली सरदारांशी अन्यत्र लढा द्यावा लागतच होता. अकबराला मात्र मोगली सैन्याच्या आसपास जाऊ न देण्याची ते सारखी काळजी घेत होते.

सुरतकरांच्या २३ एप्रिल १६८३ च्या पत्रावरून समजते की, १६८३ च्या पावसाळ्यापूर्वी औरंगजेबाची वृत्ती बरीच हताश झाली होती. यात शंका नाही. त्यात जी आपल्या कर्तृत्वाची

घमेंड होती ती पूर्ण जिरली होती. त्याने दक्षिणेतील लढायात व कारभारात आपल्या मुलांना व सरदारांना शिवशाहीच्या बाबतीत अपयशाबद्दल दुषण दिले होते त्यापेक्षाही अधिक फजिती त्याच मंडळीपुढे होत आहे हे पाहून त्याचे मन साहजिकच अवमानाने त्रस्त झाले होते; आणि अशी परिस्थिती एका संभाजीराजांनी - लहान तरूणाने - केलेली पाहून तर त्याला आपल्या मुलांच्या बाबतीतील आतताईपणाची जाणीव जशी होऊ लागली होती तशीच त्याबरोबर त्याची वृत्तीही अधिकाधिक चिडखोर बनू लागली होती. हे त्याच्या विजापूर व गोवळकोंडा येथील लढ्यांतील हालचालींवरून स्पष्ट होत आहे असे बेंद्रे सांगतात व पुढे लिहितात की, कल्याण-भिवंडी व मुंबई या आघाडीवरील औरंगजेबाच्या चढाईचा प्रतिकार करण्यातून संभाजीराजांना थोडीशी सवड मिळाली परंतु मोगलांनी पोर्तुगीजांशी सख्य करून त्यांच्या बंदरातून सैन्य व दाणागोटा उतरविण्याची कारवाई केल्यामुळे तेथील राजकारण बळावू लागले होते. पोर्तुगीजांनी तयारी करून हल्ला करण्यापूर्वीच स्वतः संभाजीराजांनीच पोर्तुगीज प्रदेशावर स्वारी केली. अकबर संभाजीबरोबर होता ही बातमी समजताच औरंगजेबाने सिद्दीस तिकडे जाण्यास फर्माविले.[३३]

अकबराने संभाजीद्वारे पोर्तुगीज व डचांसोबत तह केलेत. याच सुमारास अकबर दिल्लीला जाणार अशी बातमी उठली होती. परंतु त्यातील तपशिलात चुका किंवा गैरसमज होता. मुख्य उद्देश असा होता की, अकबराने समुद्रमार्गे जहाजातून इराणमध्ये जाऊन तेथील शहाची मदत घेऊन दिल्लीवर स्वारी करावयाची व दुर्गादासने संभाजीच्या लोकांबरोबर जाऊन राजपुतान्यातील रजपूत मिळवून दिल्लीला जाऊन अकबरास मिळावयाचे त्याकरिता जहाज बांधण्याची खटपट चालू होती, पण सिद्दीने आरमाराबरोबर येऊन अकबराचे हे जहाज घेतले. बेंद्रे म्हणतात की, संभाजीराजे व पोर्तुगीज यांचे सख्य असतानाच अकबराने पोर्तुगीजांशी संगनमत करून गोव्यास जहाज बांधण्यास सुरवात केली व ते जहाज संभाजीराजांची पोर्तुगीजांशी लढाई सुरू होण्यापूर्वीच तयार झाले. नंतर ते वेंगुर्ल्यास नेले; परंतु पोर्तुगीजांकडे शेख महमंद मोगली पत्रे घेऊन जात आहे हे पाहून अकबराला इराणला जाण्याचा बेत रद्द करावा लागला. तो व कलश जैतापूरच्या खाडीवर येऊन राहिले. बहादुरखानाला मात्र तो इराणला ठरल्याप्रमाणे गेला असे वाटून त्याने ती बातमी १६८३ च्या फेब्रुवारीतच दिली असली पाहिजे.[३४]

अकबराने कवी कलशला दि. २० फेब्रुवारी १६८४ ते १४ नोव्हेंबर १६८५ या काळात आठ पत्रे लिहिली. सर पत्रव्यवहारातील मोगली सैन्याच्या हालचालीविषयी माहिती मिळते तसेच

खास अकबराचा कवी कलश व संभाजी उपयोग करून घेत असले तरी ते त्याच्या तंत्राने वागत नव्हते, इतकेच नव्हे तर सर्वच सल्लामसलतीत त्यास घेत नसावेत हे स्पष्ट दिसते असे सांगून बेंद्रे स्पष्ट करतात की, अकबराचे रजपूत व मुसलमान नोकर त्याचा अखिल भारताचा सूत्रधार सम्राट म्हणून जरी सर्व देखावा करीत होते, तरी संभाजीराजांनी आपल्या हिंदवी स्वराज्याच्या स्वातंत्र्याला व स्वतंत्र राष्ट्र म्हणून मानाला धक्का लागू दिला नव्हता. इतकेच नव्हे तर अकबराला संभाजीराजांनी आपल्या स्वातंत्र्याची जाणीव करून दिल्याने अकबर व त्याच्या साहाय्यक रजपुतांना आपला सम्राटपदाचा मानसन्मानाचा देखावा संभाजीराजांपुढे नमता घ्यावा लागला होता.[३५]

संभाजीराजांनी अकबराची गुजरातेत पाठवणी केली. त्यानंतर अकबर पुन्हा खाली आला नाही. अकबर जहाजात नक्की केव्हा व कोठे बसला हे समजत नाही; परंतु बहुधा ही जहाजे जरी डच-फ्रेंच मंडळींनी संभाजीच्या कोकण किनाऱ्यावरून जरूर त्या सामुग्रीनिशी नेली असली तरी अकबर भडोच किंवा गुजरातमधील कुठल्या तरी बंदरात त्या जहाजात बसला असावा. त्यामुळे औरंगजेबाला तो पार्शियात जाऊन पोहोचेपर्यंत त्याची बातमी लागली नव्हती. अकबर उत्तर हिंदुस्थानात आहे अशीच सर्वांची कल्पना असावी असे बेंद्रे सांगतात. तसेच इ.स. १६८६ तील अकबराच्या हालचालींचा उल्लेख मिळाला नाही; आणि त्यानंतरचे जे उल्लेख मिळतात ते मोघम स्वरूपाचे आहेत. त्यामुळे अकबर त्या त्या प्रसंगी हजर होताच असे निश्चितपणे मानता येत नाही. सुरतकरांच्या १० फेब्रु. १६८७ मधील व २५ फेब्रुवारीच्या मुंबईकरांच्या पत्रावरून त्यावेळी अकबर राजापूर येथून निघणाऱ्या जहाजातून जाणार अशी बातमी असावी; परंतु फ्रेंच व डच लोकांनी अकबराला आपल्या जहाजात गुजरातमधील बंदरात घेतल्याने तो राजापुरास सापडला नाही. या जहाजाची व्यवस्था वचन दिल्याप्रमाणे संभाजीराजांनीच केली होती; परंतु अकबराच्या बातम्या उत्तर हिंदुस्थानातून येतच होत्या. अकबराला समुद्रमार्गेही पाठवणे सिद्दीच्या व मोगली आरमाराच्या हालचालींमुळे जवळजवळ अशक्य झाले होते. तरीदेखील संभाजीराजांनी त्यांची यशस्वीपणे रवानगी केली.

संभाजीराजांच्या व अकबराच्या संकेताप्रमाणे येथपर्यंत जरी गोष्टी जुळून आल्या तरी प्रथम वादळामुळे अकबराची दाणादाण झाली व तो मस्कतच्या इमामाच्या हद्दीत उतरल्याने तेथे त्यास काही काळ अडकून राहावे लागले. शाहाच्या मदतीने त्याने आपली सुटका करून घेतली.

तेथे जरूर ती मदत मिळवून तो तेथून काही सैन्यानिशी निघाला. परंतु अफगाणिस्थानच्या हद्दीवर येताच त्याला संभाजीराजांना पकडल्याची व नंतर तो मारला गेल्याची बातमी लागली. उत्तर हिंदुस्थानात घुसलेले सैन्यही परत फिरले उलट औरंगजेबाने शहा अलम वगैरे सरदार उमराव अकबराच्या प्रतिकारार्थ उत्तर हिंदुस्थानात पाठविले. अकबर योग्य संधीची तेथेच वाट पाहात बसला. औरंगजेबाच्या मृत्युने ती संधी त्याला मिळाली. आणि त्याने हालचाल करताच सर्व पातशाहाशाह्यांना पादशाही पदासाठी एकमेकांबरोबर भांडण्यासाठी उत्तर हिंदुस्थानात जावे लागले आणि ज्या हेतूने संभाजीराजांनी अकबराला इराणमध्ये पाठविला होता तो हेतू औरंगजेबाच्या मृत्युनंतर सफल झाल्याने शाहूला पुन्हा मोगली परचक्राचा नायनाट करून राज्यावर येता आले.[३६] हे सर्व संभाजीराजांच्या अकबरासंदर्भात घेतलेल्या धोरणामुळे शक्य झाले असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

[ब] अकबराला मदत केल्याने संभाजी महाराजांनी काय साध्य केले? :

यासंदर्भात सांगताना वा. सी. बेंद्रे म्हणतात की, अकबराला आपल्या संरक्षणाखाली ठेवून घेण्यात संभाजीराजांनी दोन राजकारणी डाव साधले. यामुळे संभाजीने अकबराची व बादशाही सैन्याची गाठ पडू दिली नाही. अकबराचा उपयोग मोगली सैन्यात फाटाफूट करण्यासाठी करावयाचा आणि ज्या रजपूत राजांनी, अकबराला आपल्या उठावात ओढले त्यांच्याकडून उत्तरेकडे बंडाई माजवून औरंगजेबाचे काही सैन्य उत्तरेकडे हलवावयाचे. हा संभाजीराजांचा डाव होता. औरंगजेबाच्या दहशतीमुळे सैन्यात फाटाफूट व्हावयाची तशी चिन्हे दिसेनात. कारण हे सैन्य मुसलमान अधिकाऱ्यांच्याच ताब्यात असल्याने त्यांना काफिराकडे जाण्याचे धैर्य होत नव्हते आणि रजपुतांची तर बंडाला प्रवृत्त होण्याची तयारी नव्हती. तेव्हा शक्य ते प्रयत्न करून यशाची आशा न राहिल्याने अकबरालाच आपल्या ३०-४० हजार सैन्यानिशी गुजरातमध्ये पाठवून तिकडील प्रदेश ताब्यात घेऊन रजपुतांना प्रत्यक्ष मदत करण्याची तयारी संभाजीराजांनी दाखविली. भडोच घेतले तेथून रजपुतांच्या प्रदेशात जाण्याचा मार्ग मोकळा होता; परंतु रजपूत राजांनी या संधीचा फायदा घेतला नाही.

संभाजीराजांची व रजपुतांची आपसातील पत्रे पाहिल्यास समजते की, रजपुतांची बंडरूपात मदत संभाजी महाराजांनी प्रथमपासूनच मागितली होती आणि हिंदवी स्वराज्याच्या संरक्षणार्थ सर्व हिंदवी जनतेला आवाहन केले होते असे स्पष्ट होते असे सांगून वा. सी. बेंद्रे पुढे

स्पष्ट करून सांगतात की, आतापर्यंतच्या इतिहासकारांची अशी समजूत झालेली होती की, अकबरास इराणकडे पाठविण्यात केलेला विलंब संभाजी महाराजांच्या राजकारभारावरील दुर्लक्षपणामुळे झाला; पण तसे दिसून येत नाही. कारण संभाजी महाराजांनी शाहा अलमच्या एक लक्ष सैन्यातील पाऊणपट सैन्य धुळीस मिळविले होते आणि औरंगजेबाच्या आकांक्षेला चांगलाच धक्का दिला होता. इतकेच नव्हेत तर थेट गुजरात प्रांतातील भडोचपर्यंतचा प्रदेश काबीज करून बुंदेलखंडात धामधूम उडविण्यापर्यंत आघाडी मारली होती. अशा आशादायक परिस्थितीत आपले प्यादे दुसऱ्यांच्या हातात जाऊ देणे केव्हाही दूरदर्शीपणाचे आणि हिंदवी स्वराज्याच्या राजकारणाच्या दृष्टीने फायद्याचे ठरले नसते.[३७]

असे सांगून बेंद्रे पुढे लिहितात की, "राजपुतान्यातील अनुभवी राण्यांच्या मेळाव्याने केलेला अकबराचा खेळखंडोबा आणि अल्पवयीन तरूण संभाजीने आपल्या छत्रपतीपदाची मान्यता ढळू न देता अकबरास केलेल्या साहाय्यातील धूर्तता, या घटनांची चित्रे डोळ्यांसमोर आणली तर संभाजीच्या राजकारणपटुत्वाची खरी महती सहजच प्रकर्षाने पटल्याशिवाय राहणार नाही."[३८]

५.१२ मंत्र्याचा संभाजीराजांविरोधात कट

वा. सी. बेंद्रे मनुचीचे लिखाण, इंग्रजांची पत्रे यांचा आधार घेऊन सांगतात की, संभाजीराजांना विष घालून ठार मारण्याचा कट पन्हाळ्यावर झाला होता व अकबरास हिंदवी राज्याची सूत्रे देऊन संभाजीराजास दूर करावयाचे किंवा संभाजीराजांचा खून केल्यावर उद्‌भवणाऱ्या संकटाच्या पारिपत्यार्थ अकबराची मदत घ्यावयाची असा दुसरा राजद्रोही कट पालीस ठेवलेल्या व रायगडावर असलेल्या काही मंडळींनी केला होता हे स्पष्ट झाले असून त्यात कोण कोण मारले गेले याचीही माहिती आली आहे. ही सर्व मंडळी मारली गेली तेव्हा संभाजीराजे पन्हाळ्यास होते या पत्रव्यवहारात पन्हाळ्यावर किती धरपकड झाली याची बातमी नाही. शकावलीत फक्त एवढीच नोंद आहे की, 'शके १६०३ दुर्मति संवछर भाद्रपदमासी (४ ऑगस्ट ते २ सप्टेंबर १६८१) संभाजीराजे याणी कवी कलशाचे बोल मागती आणाजी दत्तो सचीव याजवर इतराजी करून मार दिल्हा. त्या माराने राजश्री अनाजीपंत व बाळप्रभू व सोमाजी दत्तो व हिराजी फर्जंद परळीवाले (अर्थात ही परळी पालीजवळील, परळी सज्जनगड नव्हे) कैद करून मारले. कर्नाटकात शामजी नाईक यास कैइद करविले.'

बेंद्रे म्हणतात बखरकारांना जशी या कटाची तत्कालीन माहिती मुळीच नाही तसेच त्यांना कोण, केव्हा व का मारले गेले याची निश्चित माहिती नसल्याने त्यांच्या लिखाणात कालक्रमाचा गोंधळ झाला आहे. अर्थात हेच अज्ञान व हाच गोंधळ त्यांच्या संभाजीराजांच्या विकृत चरित्रकथनकास कारण झाला आहे. बखरकारांचा मजकूर नीट कालक्रम लक्षात घेऊन वाचला तर त्या विकृतावस्थेला किंवा त्यामुळे वाचकांच्या मनात सहज उद्‌भवणाऱ्या दुर्विकल्पांना अवसर राहात नाही.

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीतील लिखाणावरून असे दिसते की, सोमाजी नाईक व त्याच्या मुलामाणसांचा पन्हाळ्यावरील कारस्थानात भाग होता व त्यास बापूजी माळी व सूर्या निकम सहकारी होते. अकबराच्या कटात अण्णाजी, हर्बाजी (हिरोजी) फर्जंद, राघो वासुदेव व बाळाजी आवजी होते व त्यात शिक्षा झाली ती ऑगस्ट १६८१ मध्ये झाली.[३९]

मराठा साम्राज्याची बखर व मल्हार रामराव चिटणीस या दोन्ही बखरीतील मजकूर पाहिला तर पन्हाळ प्रकरणी जे लोक मारले गेले ते या फितव्यात होते. तो फितवा राजारामास गादी देण्याचाच असला पाहिजे असे समजून लिखाण केले आहे. दुसरा प्रसंग नवरात्रीपूर्वीचा तोही याच फितव्याचा भाग म्हणून समजला गेला आहे. सारांश, तत्कालीन पत्रव्यवहाराच्या अस्सल पुराव्यावरून जे दोन कट (१) संभाजीस विषप्रयोगाचा व (२) अकबरास राज्य देण्याचा अगर कारभार सांगण्याचा, आज उघडकीस झाले तसे ते त्यावेळी बखरलेखनकाली माहीत नसावेत. या पत्रव्यवहारावरून बखरकार नावे देतात त्यापेक्षा अधिक, परंतु मल्हार रामराव जो आकडा देतो त्यापेक्षा पुष्कळच कमी म्हणजे एकंदर २५-३० माणसे मारली गेली होती. अशा राजद्रोहाच्या कटात कदाचित एखाद दोन माणसे चुकून अथवा हेव्यादाव्याचे संबंध जोडल्याने फुकट बळी पडली असतील. परंतु या सर्व शासनात संभाजीराजांना दोष देण्यासारखा काहीच मजकूर नाही असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात व पुढे सांगतात की, काही चरित्रकार शिर्क्यांचे 'शिर्काण' हेही याच वेळी झाले असे सुचवितात. पिलाजी शिर्के हा येसूबाईचाच बाप. त्याने प्रथम रायगडी येऊन संभाजीच्या रायगडावरील प्रथमागमनाची तयारी केली होती. ही शिर्केमंडळी संभाजीराजांजवळ इ.स. १६८८ पर्यंत होती. गणोजी शिर्के त्यानंतर मोगलास फितूर झाला. त्याचे पारिपत्य करण्यास संभाजीराजे खेळण्यास गेले; परंतु तो मुलामाणसांसह आधीच मोगलांकडे गेला. शिर्क्यांच्या इनामाबाबतच्या कागदपत्रावरून शिर्क्यांची मुलेमाणसे सर्व शाहूच्या

कारकिर्दीपर्यंत जिवंत होती असे स्पष्ट आहे. 'शिर्काण' शब्दाचा अर्थ 'शिर कापणे' म्हणून जो मल्हार रामरावने ध्वनित केला आहे व कै. सानेंनी दिला आहे तो मुळातच झाला आहे. 'शिरकाण' म्हणजे 'शिर्के यांचे राज्य किंवा जहागिरी' हा शब्द खास गणोजी व इतर शिर्क्यांच्या तकरीरात वगैरे स्पष्टार्थाने वापरण्यात आला आहे.[४०]

५.१३ हिंदवी स्वराज्यातून फितूर झालेल्या सरदार व अधिकाऱ्यांसंदर्भात वा. सी. बेंद्रे यांनी केलेली चिकित्सा

वा. सी. बेंद्रे सांगतात की, स्वराज्यातून कोणी सरदार फुटून औरंगजेबाकडे जाऊन मिळाल्याचे बखरकार सांगत नाहीत. याबाबतीत फक्त शिर्के यांचाच उल्लेख करतात. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत शिर्केसंदर्भात सांगितलेला प्रसंग इ.स. १६८८ मधील आहे. तोही केवळ शिर्काण म्हणजे शिर्क्यांच्या प्रांताजवळच मोठे मोगली सैन्य येऊन ठेपल्यामुळे ओढवला. गणोजी शिर्के यांनी आपल्या लोकांनिशी केवळ भीतीमुळे व जहांगिरीस धक्का लागू नये म्हणून मोगलास मिळण्याचे ठरविले. बेंद्रे पुढे सांगतात की, फक्त गणोजी शिर्के हा एकटाच फितूर झाला नसून सीमेवरील बऱ्याच नातलग मंडळींनीही आपल्या जहांगिरीच्या लोभास्तव हिंदवी राज्याविरूद्ध मोगली शत्रूची गुलामगिरी पत्करली होती.

शकावलीत खेम सावंताबद्दल पहिली नोंद आहे व दुसरी इ.स. १६८८ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबरात 'कवी कलश याजवरि सिरके पारखे झाले', अशी आहे. पहिली नोंद अशी - '१६८५ च्या जानेवारी महिन्यात : कुडाळचा देसाई खेम सावंत पारखा जाला. त्यासी फिरंगी यांनी आसरा दिल्हा'. बेंद्रे सांगतात, मोगलांची स्वारी विजापूरावर झाल्याने हा भाग असुरक्षित होता. खेम सावंताची शिवकाळापासून अशीच धरसोड चालू होती. त्याने शहा अलमच्या स्वारीच्या वेळी (इ.स. १६८४ सुरुवात) जी धरसोड केली व पोर्तुगीजांच्या लढाईच्यावेळी त्यास मदत केली त्यावरून संभाजीराजांनी शासनार्थ त्याच्या प्रदेशात उपद्रव केला. खेम सावंत पळून गोव्यास जाऊन राहिला. शिर्के व सावंताखेरीज इतर उल्लेख मराठी कागदपत्रात येतात, ते संभाजीराजास पकडून नेल्यानंतरचे.

मासिर-इ-अलमगिरी किंवा औरंगजेबनाम्यात काही उल्लेख येतात व खाफीखानाने फक्त साल्हेरच्या किल्लेदाराचाच उल्लेख केला आहे. यातील माहितीचा विचार करिता इ.स. १६८२ तील औरंगजेबास मिळणारे चिमणाजी, कान्होजी (भोसले?) व जगदेवराव जाधव हे

नाशिक-बागलाण-खानदेश बाजूचे होते. शिवाजीराजांनी तो प्रांत घेईपर्यंत ते मोगलांचेच सरदार होते. औरंगजेब एवढ्या मोठ्या सैन्यानिशी त्याच्या प्रदेशात उतरताच त्यांनी मोगली नोकरीत जाऊन आपल्या जहांगिरी सांभाळल्या असल्यास नवल नाही असे बेंद्रे सांगून कारण देतात की, त्या प्रांतात शिवाजीराजांचा अंमल बसण्यापूर्वीच मोगली परचक्र तेथे येऊन ठेपले होते. इ.स. १६८३ तील एकच नोंद आहे. ती काजी हैदरची, हा मुनशीच होता. याच्या मोगलांकडे जाण्याने काही महत्त्वाची माहिती मोगली दरबारात जाणे शक्य होते.[४१]

जेव्हा शहा अलमची स्वारी झाली तेव्हा संभाजीराजांचे ११२ नोकर पकडले गेले. त्यांची कत्तल नंतर म्हणजे १७ एप्रिल १६८४ मध्ये केली आहे. अशी कडक शिक्षा त्यांनी मोगलांस न मिळण्याचा निर्धार ठेवल्यामुळे झाली असावी. असे बेंद्रे नमूद करून पुढे सांगतात की, या कत्तलीस तयार होणाऱ्या सैनिक किंवा नोकरांचा विचार केला तर त्यावेळी संभाजीराजांबद्दल किंवा हिंदवी स्वराज्याबद्दल हिंदू जनता किती राजनिष्ठ होती याची कल्पना येते. शहा अलमच्या स्वारीने कोकणात बरेच नुकसान झाले होते. तसेच सिद्दी व मोगली आरमारही किनाऱ्यावर बरेच छापे घालून प्रदेश हैराण करीत होते. ऑक्टोबर १६८३ मध्ये शहाबुद्दीनखान पुण्यास येऊन बसल्याने पुण्याजवळील मावळा प्रांतातील देशमुख-देशपांड्यांची चलबिचल होणे साहजिकच होते. त्यांना आपल्या घरादाराची वगैरे धास्ती वाटू लागली तेव्हा कानदखोरे, कारी वगैरेंचे देशमुख आपल्या गुराढोरांनिशी मोगली हद्दीतील शिरवळ येथे जाऊन राहिले. मोगल ताबडतोब मावळ प्रांत ताब्यात घेईल असे त्यांना वाटले होते; परंतु पावसाळ्यापर्यंत तशी हालचाल झाली नाही हे पाहून ते पुन्हा संभाजीराजांचा कौल मागू लागले. यावरून कशामुळे फितूर होत व कसा फितूर होत याविषयी समजते.

एकाकी माणसे फितूर होऊन अगर स्वार्थासाठी किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी जाण्याने फारसे नुकसान नव्हते. हाच हिंदवी स्वराज्याच्या नुतन घटनेतील विशेष होता. विजापूर व गोवळकोंडा घेतल्यावर साहजिकच भीतीचे वातावरण उत्पन्न झाले. त्यामुळे व विशषेतः इ.स. १६८४ नंतर रायगडाच्या आसपास मोगली सेना येऊ लागल्याने लोकांमध्ये थोडीसी चलबिचल होणे साहजिकच होते. इ.स. १६८६ मध्ये संभाजीचा चुलतभाऊ अर्जुनजी (भोसले) आणि शिवाजीचा जावई अंचलोजी हे मोगलास जाऊन मिळाले. इ.स. १६८७ मध्ये माणकोजी मोगलांकडे गेला. त्या काळाच्या परिस्थितीचा विचार केला तर आणि औरंगजेबाच्या चौफेर

उठावाचे चित्र डोळ्यांसमोर आणले तर त्या मानाने फितुरांचे प्रमाण अगदी अल्प आहे यात शंका नाही असे वा. सी. बेंद्रे स्पष्टपणे सांगतात.

हिंदवी स्वराज्याची संघटना शास्त्रशुद्ध राष्ट्रीयत्वाच्या तत्वावर आधारली गेल्याने राजनिष्ठा व स्वामिनिष्ठा यांचा अंकूर सर्वत्र जोर धरून होता. याला अपवाद म्हणजे कुडाळ-कर्नाटकचा प्रांत असे बेंद्रे सांगून त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देतात. शिवाजी महाराजांनी द.स. १६७५-७६ मध्ये हा प्रांत घेतल्यापासून दत्ताजी व अण्णाजीचा कारभार तेथेच होता. त्यांनी त्या प्रांतात लूट जबरदस्ती अधिक केली होती. अण्णाजीनंतर रामचंद्रपंतास तिकडे पाठविले. रामचंद्रपंतावर कोणाचे नियंत्रण न राहिल्याने हा परगणा मराठा राज्यावर प्रथमपासूनच नाखूष होता. तेथील तत्कालीन परिस्थितीला बंड म्हणून संबोधण्यापेक्षा अंदाधुंदी माजली होती हे म्हणणे जास्त संयुक्तिक होईल. कारण तेथील सुभे व देसाई हे लोकांना लुटीत होते इतकेच. ही मंडळी औरंगजेबाला प्रत्यक्ष मिळाली नव्हती.[४२]

५.१४ संभाजी महाराजांच्या काळातील दक्षिणेतील संघटन

[अ] दक्षिणेतील स्वराज्याअंतर्गत संघटन :

शिवाजी महाराजांनी बांधून दिलेली सर्वच राज्यव्यवस्था संभाजीच्या कारकीर्दीत चालू राहिली. सेना व सेनाधिकारी यांस बत्तीस वर्षे लावून दिलेली शिस्त त्यांच्या कारवाईत नवीन पिढीतील लोक आले असतानासुद्धा कोणत्याही प्रकारे उत्साहात कमतरता आली नाही. उलट ही नवीन मंडळी आपल्या हिंमतीवर स्वतंत्रपणे छापे घालणे वगैरे गोष्टी दक्षतेने करू लागली. शिवकाळात फार तर दोन आघाड्यांवर झगडावे लागे; परंतु औरंगजेब दक्षिणेत उतरल्यापासून मोगली आघाड्या पाच-सहापर्यंत वाढल्या, त्यामुळे -

(१) संभाजीराजांनी युद्धतंत्र स्वतःकडे ठेवून घेऊन सर्व सेनापतींना युद्धाबाबतचे रणांगणावरील सर्व अधिकार दिले. जे सरकारकून युद्धात भाग घेऊ इच्छित होते त्यांना फक्त त्यांच्याच दळभाराचा अधिकार राहिला. त्यामुळे बिनलढवय्ये सरकारकुनांची लुडबूड युद्धक्षेत्रातून उठल्याने युद्धतंत्र सुव्यवस्थित राहून ते जबाबदारीने वागू लागले. तसेच युद्धतंत्र सरकारकुनाखेरीज इतर सरकारकून कचेरीकारभार सांभाळीत होते.

(२) संभाजीराजांनी राज्यावर येताच आपला शिक्का तयार केला. संभाजीराजांचे दोन शिक्के आढळतात. एक शिक्का असा - "श्रीमच्छिवभक्त्युद्रेका दधिगतधरणी समस्तसाम्राज्य

शंभोः। छत्रपतेर्मुदा मोदप्रदा जयति।। बेंद्रे म्हणतात हा शिक्का ऐकीव आहे. कागदपत्रात अद्यापि तो सापडला नाही. परंतु संभाजीराजांचा पुढील शिक्का मात्र सर्व राजपत्रांवर आढळतो. तो शिक्का असा - "श्रीः शंभोः शिजातस्थ मुद्रा द्योरिव राजते।। यदंकसेविनो लेखावर्तते कस्य नो परी।।"

(३) संभाजीराजांनी युद्धाचे सर्वच काम आपल्याकडे घेतल्याने त्यांची सारखी धावपळच चालू होती. त्यामुळे संभाजीराजांनी आपला सर्व मुलकी राज्यकारभार आपली पत्नी येसूबाई हिच्याकडे सोपविला होता. इतकेच नव्हे तर सर्व राजपत्रे वगैरे देण्याची व राज्यव्यवस्थेचे जरूर ते हुकूम काढण्याची तिला परवानगी होती. हे हुकूम जरी संभाजीराजे यांच्या नावाने निघत असले तरी त्यात 'आज्ञा' या शब्दाऐवजी 'राजाज्ञा' अशी शब्दयोजना होत असे. संभाजीराजांनी येसूबाईला स्वतःचा शिक्काही दिला होता. तो ती कौलनामा, अभयपत्रे वगैरेवर वापरी. हा शिक्का असा : 'श्रीसखी राज्ञी जयति।' व येसूबाईच्या पत्राचा मायनाही बेंद्रे देतात तो असा : 'ई कौलनामे सौभाग्यवती राजश्री बाईसाहेब दामदौलतहु...' सारांश सांगताना बेंद्रे लिहितात की, संभाजीराजांनी आपल्या पत्नीवर पूर्ण विश्वास ठेवून सर्व अंतर्गत व्यवस्थेचा राज्यकारभाही तिच्यावर टाकला होता. पुढे संभाजीराजांनंतर शाहू लहान व औरंगजेबाच्या नजरकैदेत असताना त्याच्या 'सप्तहजारी' मोकाशाचा कारभार येसूबाईने 'येसूबाई वालिदा इ साहू राजा' या पार्शियन लिपीतील शिक्क्यानिशी केला. हा एक शिवाजीच्या राज्यव्यवस्थेत कारणपरत्वे मोठाच बदल करून जबाबदार 'राणी' पद प्रत्यक्षात निर्माण केले. त्यामुळे संभाजीराजांच्या गैरहजेरीत सर्व अंतर्गत राज्यकारभार पूर्ण जबाबदारीने पाहिला गेला.

(४) संभाजीराजे स्वतः सुसंस्कृत व स्मृतिशास्त्र जाणणारे होते. त्यांनी 'कामंदकी' चा अभ्यास चांगला केला होता हे त्यांनी आपल्या 'बुधभूषणा'त[४३] घेतलेल्या विपूल अवतरणांवरून सिद्धच आहे. त्यांना ज्ञानाची आवड होती. त्यांच्या दरबारातील किंवा राजसभेतील लोकांचे वर्णन कविंद्र गोविंद याने केले आहे. त्यावरून त्यांच्या पदरी सर्व तऱ्हेचे लोक होते असे दिसते. ज्या कवी, पंडित, नीतिवेत्ते वगैरे लोक त्यांच्या संग्रही होते यात शंका नाही. तसेच संभाजी महाराजांच्या मराठी पत्रव्यवहारात या संतसाधुंच्या क्षेमकल्याणार्थ

दिलेल्या देणग्यांचा भरणा फार मोठा आहे. अशा साधुंना जाति-वर्ण-धर्म-भेदाचा विचार न करता ह्या देणग्या दिलेल्या आहेत. त्यात मुसलमानांचे पीरदर्गेही वगळले नाहीत.

(५) अंतर्गत राज्यकारभार नीट सुरळीत चालावा म्हणून सुभ्यांचे लिहिणे, हिशेब राखणे, वगैरे कामे व्यवस्थित चालण्यासाठी जो खर्च लागे. तो जर त्या सुभ्यास झेपण्यासारखा नसेल तर त्याची भर सरकारातून केली जाई. परंतु कामात ढिलाई होऊ देत नसत.

(६) जबरदस्तीने बाटविलेल्या हिंदुंचे पतितपावन करून घेण्यासाठी संभाजीराजांनी बरेच हुकूम काढले आहेत. जरूर तर पतितपावन करून घेण्यास भोजनखर्चास सरकारी तिजोरीतून पैसेही दिले आहेत.

(७) स्वराज्यातील लोकांना कारवार बाजुला गुलाम म्हणून दोन ते तीन पगोड्याला इंग्रज व इतर युरोपियन विकत घेत. शिवाजीराजांनी अशा विक्रीस पायबंद घालवण्यासाठी कर बसविला. संभाजी महाराजांनी तो कर जबरदस्त करून या व्यवहारास पायबंद घातला व गुलाम मिळविणे तितकेच दुरापास्त करून ठेवले. सारांश, शिवाजीराजे व संभाजीराजे हिंदी प्रजेबद्दल कशी आस्था बाळगीत होते हे कारवारकरांच्या ५ जून १६८५ च्या पत्रातून दिसून येते. हीच आस्था प्रजेतील श्रेष्ठ दर्जाच्या राजनिष्ठेला कारण झाली आणि संघटनेला स्थैर्य आणण्यास सहाय्यभूत झाली.

(८) प्रांताप्रांताच्या सुभेदार वगैरे अधिकाऱ्यांच्या दुर्वर्तनाला संभाजीराजे ताबडतोब पायबंद घालीत असत. गैरवागणुकीच्या तक्रारीवरून अधिकाऱ्यांना जाणारे समज कोणत्या प्रकारचे असत हे त्यांच्या राजाज्ञा व आज्ञावरून समजते.

(९) उचित शासनाप्रमाणे राजकार्यात प्रोत्साहन हे एक चांगल्या राज्यव्यवस्थेचे मोठे लक्षण असते त्याप्रकारे संभाजीराजे बालपणापासून गुणग्रहण व गौरव करण्यात दक्ष होते याचे वर्णन अबे करेने केलेले आहे. तसेच ३ जानेवारी १६८४ च्या आज्ञेवरून चाकरीतील माणसांची कशी आस्था बाळगली जाई व राजकारणांस कसे प्रोत्साहन मिळे हे दिसून येते. तसेच लढाईत पडलेल्या किंवा कामी आलेल्या माणसांच्या कुटुंबाची कशी व्यवस्था लावली जाई त्याबाबतची माहिती संभाजीराजांच्या २३ जून १६८५ च्या वेतनपत्रातून दिसून येते.

(१०) संभाजीराजांनी वेळोवेळी निर्वासितांना दिलासा दिलेला दिसतो. २२ ऑगस्ट १६८५ मध्ये संभाजीने नवलगुंदच्या ब्राम्हणास एक सनद दिली आहे. इ.स. १६८४ मध्ये सुलतान तारा याने तेथील वाडे, पेठा वगैरे जाळून देवालये पाडली व मूर्ती फोडल्या. तेव्हा संभाजीराजांनी देवाची पुन:स्थापना करून पूजा व पुराणश्रवणार्थ ३६ बिघे जमीनशेत त्यास दिले आहे. तसेच सिद्दी याने राजापूर शहर इ.स. १६८५ मध्ये छापा घालून लुटले व जाळले म्हणून दोन वर्षे ओस पडले होते. त्याची पुनर्वसाहत करण्याकरिता सराफ, गावकरी वगैरे लोकांना कराच्या व कर्जाच्या वसुलीची माफी दिली होती.

(११) संभाजीराजांच्या कारकिर्दीत शत्रूच्या परचक्राबरोबर दुष्काळ व प्लेग यांचाही उपसर्ग होता. त्यातही संभाजीराजांनी पूर्वीच मोठमोठ्या गडावर साठे करून ठेवल्याने व मोगली गोट व कबिले लुटल्याने आपली जनता, सैन्य चांगल्या स्थितीत ठेविले होते ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे. या पद्धतीचे संभाजीकालीन दक्षिणेतील स्वराज्यांतर्गत संघटन होते.[४४]

[ब] संभाजीराजांच्या काळातील दक्षिणेतील स्वराज्याबाहेरील संघटन :

औरंगजेबाच्या दक्षिणेतील स्वारीला जर सुरुवातीपासूनच दक्षिणेतील राजांनी एकजुटीने तोंड देण्याचे ठरविले असते तर औरंगजेबाला आपला दक्षिण सुभाही थोड्याच काळात सोडून परत जावे लागले असते. परंतु विजापूरची पठाणी राजसत्ता शिवाजीराजांच्या उत्कर्षाकडे तितक्या सख्यत्वाने पाहात नव्हती. तसे होणेही साहजिकच होते. शिवाजीने निजामशाहीपेक्षा आदिलशाहीतीलच मुलूख आपल्या राज्यात अधिक सामिल करून घेतला होता. भागानगर अथवा कुत्बशाहीची सूत्रे आकण्णमादणाच्या हाती असल्याने कुत्बशाहीचा ओढा शिवाजी, संभाजीराजांकडे असणे साहजिकच होते.

औरंगजेब प्रथम दक्षिणेत आला तेव्हा त्याच्या स्वारीचा एकमेव उद्देश संभाजीराजे व अकबरापुरताच मर्यादित होता. त्यामुळे कुत्बशाहाला व आदिलशाहाला या भांडणात पडण्याचे कारण नव्हते. परंतु संभाजीराजांना सर्व राज्यांची एकजूट करून मोगलांविरूद्ध उभे राहणे आवश्यक होते. म्हणून संभाजीराजांनी त्या दिशेने प्रयत्न केले. औरंगजेबाने या एकजुटीला घाबरून प्रथम सहजसाध्य वाटणाऱ्या संभाजीराजांवरच सर्व बाजुंनी हल्ला चढविला. तो निष्फळ

झाल्याने विजापूरवर स्वारी करून एकजुटीचा डोलारा तयार होण्यापूर्वीच तो मोडून निरुपयोगी करण्याचा घाट घातला; परंतु त्याचे सर्व प्रयत्न फसले.

डच, फ्रेंच : औरंगजेबाने सुरतेच्या वखारीचे नुकसान केल्याने इंग्रजांशीही त्याचे शत्रुत्व झाले तसेच डच व फ्रेंच यांच्याशीही औरंगजेबाचे वैर झाले होते. दक्षिणेतील सर्व राज्ये जरी औरंगजेबाचे द्वेष करीत होती तरी त्यांच्यात एकजूट नव्हती आणि हीच असंघटीत वृत्ती दोन्ही दक्षिणी शाह्यांच्या संपूर्ण नाशास कारण झाली.

अरबांशी मैत्री : संभाजीराजांनी आपल्या आरमाराची व दर्यावर्दी व्यापाराची सोय करावी म्हणून अरब आरमारांशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो तितका यशस्वी झाला नाही. उत्तरेकडील हिंदू राजांना एकत्र करून खास औरंगजेबावर छापा घालण्याचा प्रयत्न संभाजीराजांनी अकबराच्या मदतीने केला; परंतु त्यास अपेक्षेप्रमाणे यश आले नाही.

पोर्तुगीज : शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांशी भांडण सुरू केले होते; परंतु संभाजीराजे गादीवर येताच मैत्रीपूर्ण संबंधासाठी बोलणी सुरू झाली. दोघांनीही काही काळ स्नेह राखला; परंतु मोगली सरदारांना ठाण्याच्या खाडीतून कल्याणच्या स्वारीसाठी दाणागोटा साहित्य पुरविण्यात मदत केल्याने संभाजीराजांनी त्यांच्या विरूद्ध शस्त्र उचलले. हे नमूद करून पुढे वा. सी. बेंद्रे सांगतात की, यामुळे पोर्तुगीज मोगलांविरूद्ध केलेल्या उठावात सामील झाले नाहीत.[४५]

इंग्रज : सिद्दी व मोगली आरमाराला इंग्रज प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहाय्य करीत होते. तरीही शिवाजीराजांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले होते. संभाजीराजांना इंग्रजांशी सख्य पाहिजे होते; परंतु त्यांना इंग्रजांचे दुटप्पी राजकारण मान्य नव्हते. इ.स. १६८४ नंतर शेवटपर्यंत इंग्रजांनी संभाजी महाराजांशी मैत्री राहिली. ही मैत्री टिकवण्याबाबत लंडनहूनही सूचना येत राहिल्या.[४६]

दक्षिणेतील राज्यांची मोगलांविरूद्ध एकजूट करण्यात संभाजीराजांना जरी तितके यश येण्याची शक्यता नव्हती तरी त्यांनी प्रयत्न केले आणि त्या राज्यांना मोगलांविरूद्ध भांडावयास लावले. तसे करितांना त्यांनी त्यांना शक्य तितकी मदतही केली. संभाजीराजांच्या राज्यातील संघटना, प्रजेला राजनिष्ठ आणि स्वामिनिष्ठ ठेवण्यात दाखविलेली तत्परता, सैन्याची तयारी व शिस्त तशीच सैनिकांची निर्भयता व चपळाई. ऐन दुष्काळातही सैन्यासाठी ठेवलेल्या सामुग्रीची विपुलता वगैरे गोष्टी हिंदवी स्वराज्याच्या सामर्थ्याची जाणीव करून देत होत्या. सतत तीन-चार वर्षे मोगलांवर छापे घालून आपल्या साहसाने औरंगजेबाचा पाणउतारा करून शत्रूंमध्ये उत्पन्न

केलेली अनिश्चितता व भीती, आपल्या सैन्याचे नुकसान होऊ न देता गनिमीकाव्याने मोगली हल्ल्याचा केलेला प्रतिकार हे सर्व विक्रम दक्षिणेतील लोकांच्या मनातून मोगली सामर्थ्यांची भीत दूर करीत होते, तसेच त्यांना संभाजीराजांच्या कर्तृत्वावर व त्यांच्या शब्दांवर विश्वास धरण्यास लावीत होते असे वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतात.

५.१५ संभाजी महाराज व पोर्तुगीज संबंध आणि गोवा लढाई

वा. सी. बेंद्रेंनी देशी व विदेशी साधनांचा अभ्यास करून संभाजी-पोर्तुगीज संबंधाची चिकित्सा केली व संभाजीराजांचे पोर्तुगीजांसोबतचे संबंध कसे होते? त्यांच्यात संघर्षांची कारणे काय होती? संभाजीराजांची पोर्तुगीज नीती कशी होती, संभाजी महाराज व पोर्तुगीज धोरणाचे स्वराज्यास काय फायदे झाले यासंदर्भात सविस्तर चर्चा केली आहे. सुरुवातीला वा. सी. बेंद्रे संभाजी महाराजांनी यातून कोणते उद्देश साध्य केले ते सांगतात.

(१) संभाजीराजांनी केवळ क्रोधास बळी पडून पोर्तुगीजांवर स्वारी केली असे दिसत नाही. तर पोर्तुगीजांच्या बंदरांची नाकेबंदी करून मोगलाविरूद्ध एक आघाडी सांभाळावयाची व सिद्दी व मोगली आरमाराशी तोंड देतांना जो या युरोपिअन आरमारी सत्तांचा उपद्रव होत होता तो दूर करावयाचा आणि असे करितांना विनाकारण सैन्यास धक्का न लागू देता आवश्यक ती द्रव्यसंपत्ती व दाणागोटा मिळवायची.

(२) पोर्तुगीजांना संभाजीराजांनी पूर्णपणे दुर्बल केले व त्यांच्या बंदराभोवतालील भाग आपल्या ताब्यात घेऊन मोगलांस समुद्रमार्गे आवश्यक असणारे साहित्य बंद केले होते. हा महत्त्वाचा विजय मिळविल्याने मोगलांच्या युद्धसामर्थ्यास बराच धक्का बसला होता.

(३) याशिवाय संभाजीराजांनी अजून एक उद्देश्य साध्य केला तो म्हणजे पोर्तुगीजांच्या धर्माच्या नावाखाली ऊत आलेल्या त्यांच्या बुवाबाजीला आणि विशेषत: रूढ केलेल्या त्यांच्या धर्मपुंगवांच्या दैविक श्रेष्ठतेला व सामर्थ्याला मातीमोल करून टाकले. यामुळे हजारो लोक त्यांच्या धार्मिक छळापासून मनाने व शरीराने मुक्त झाले.

(४) संभाजीराजांनी हिंदुची मंदिरे जाळणाऱ्या, स्वराज्यातील जनतेला बाटविणाऱ्या, न बाटल्यास त्यांना उभे जाळणाऱ्या, त्यांची घरेदारे लुटणाऱ्या वगैरे भीषण प्रकार करणाऱ्या 'कादर्सची कंपनी'[४७] ला वठणीवर आणले व त्यांच्या त्रासापासून जनतेला सोडविले.

[अ] संभाजी महाराज पोर्तुगीज संघर्षाची कारणे :

(१) इ.स. १६८१ च्या सप्टेंबरच्या ११ तारखेला फ्रान्सिस्को द तव्हेरा याने गोव्यात व्हाइसरॉयचा कारभार हाती घेतला. अकबर प्रकरणी मोगलांचा वकील तव्होराला भेटला. अकबरास पकडल्यास किंवा मारल्यास औरंगजेब पोर्तुगीजास अधिक सवलती वगैरे देईल व संभाजीच्या राज्यातील कोणताही भाग घेतल्यास तो त्यांच्या राज्यात सामील करता येईल आणि असे करताना युद्धात जी मदत लागेल ती देण्यात येईल. असे आश्वासन मोगल वकीलाने दिले.

(२) मोगलांची मदत मिळत आहे हे पाहून इ.स. १६८१ च्या अखेरीस हिंदवी स्वराज्य आणि आपल्यामध्ये तटबंदी असावी म्हणून त्याने कोळवलला किल्ला बांधला.

(३) अंजदीव बेट गोव्याच्या बंदरापासून दूर ओसाड पडले होते ते ताब्यात घेऊन आपल्या आरमाराला चांगली मदत होईल म्हणून ताब्यात घेण्यासाठी संभाजीराजांनी आपली माणसे पाठविली होती. हे बेट इंग्रजांचे होते व ते त्यांनी मुंबई मिळताच ओसाड टाकून दिले होते. परंतु ही बातमी गोव्याला समजताच तव्होराने आपली माणसे पाठवून ते ५ मे १६८२ ला ताब्यात घेतले.

ही मुख्यतः संघर्षाची कारणे होती.[४८]

[ब] संघर्षाच्या घडामोडी :

फ्रान्सिस्को द तव्होरा याने अंजदीव बेट आपल्या ताब्यात घेतल्यानंतर तेथील देऊळ पाडून चर्च केले. याशिवाय त्याने आणखी बरीच पावले उचलली. तसेच पोर्तुगीजांच्या उत्तर भागात मोगल वकील तेथील जनरलला भेटला. त्याला पोर्तुगीजांनी त्याच्या आरमाराला कल्याणप्रांतात लढणाऱ्या फौजांसाठी दाणागोटा नेण्यास परवानगी दिली. याशिवाय खास सिद्दीला आपल्या चौलातून संभाजीराजांच्या चौलावर हल्ला करण्यास सवड दिली. संभाजीराजांवर तिन्ही बाजुंनी मोगली सैन्याने स्वारी केल्याने व समुद्रातून सिद्दी व मोगली आरामाराने लढा दिला असल्याने पोर्तुगीजांकडे तक्रार किंवा मदत मागण्यापेक्षा संभाजीराजांस अधिक काही करण्यासारखे नव्हते; परंतु मोगली सैन्य व आरमार औरंगजेबाने परत काढून घेतले. तेव्हा पावसाळ्यास सुरुवात होण्यापूर्वीच संभाजीराजे मोकळे झाले व मोगली मदत

पावसाळा संपेपर्यंत तरी येत नाही हे पाहून त्यांनी उत्तरेच्या पोर्तुगीज भागात धुमाकुळ घालण्यास सुरुवात केली.

संभाजीराजांनी पावसाळा संपेपर्यंत करंजा वगैरे काही किल्ले व दमनपर्यंतचा प्रदेश लुटून जाळून फस्त केला. चौलच्या वेढ्यासही जुलैअखेर सुरुवात केली; परंतु तो शेवटपर्यंत अनिर्णितच राहिला. ही बातमी व्हाईसरॉयला लागली. संभाजीराजांची निर्वाणीची पत्रेही त्यास गेली होती. अकबर व कवी कलश यांना जैतापुरीस ठेविले होते. संभाजीराजांने प्रदेश लुटण्याची व फोंडा किल्ला घेण्याची तयारी चालविली. कल्याण वगैरे बाजूची मराठा सैन्य परत आल्याने संभाजीराजेही दंडारापुरीवरील मामल्यातून मोकळे झाले होते. संभाजीराजांनी उत्तरेतील स्वारी बरीचशी सफल झालेली पाहून निळोपंत वगैरेंना वेढ्यावर ठेवून आपण निवडक लोकांना घेऊन गोव्याच्या स्वारीवर जाण्याची तयारी केली.[४१]

[क] फोंडा किल्ला संघर्ष :

संभाजी राजे गोव्यावर चालून जात आहेत अशी बातमी औरंगजेबास लागली तेव्हा त्याने १५ सप्टेंबर १६८३ ला शहा अलमला दक्षिण कोकणच्या स्वारीवर पाठविले. एवढ्या मोठ्या सैन्यासह गोव्याला जाण्यास बरेच दिवस लागतील असा अंदाज त्याने बांधला होता. व्हाईसरॉय तव्होराने मोगली सैन्याची अपेक्षा केली नाही. आपण सहज फोंडा घेऊ या खात्रीने आपल्या लोकांवर विश्वास ठेवून संभाजीराजे येण्यापूर्वीच सर्व कारवाई करून घेण्याच्या कल्पनेने तो ससैन्य निघाला. संभाजीराजांची कल्पना होती की, व्हाईसरॉय शहा अलम तिकडे गेल्यावर स्वारीसाठी बाहेर पडेल; परंतु संभाजीराजांचा तो अंदाज चुकला आणि स्वारीची बातमी येताच त्यांना घाईने जावे लागले. अर्ध्या रस्त्यात अकबराला ठेवून त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी कवी कलशला आपल्या काही लोकांसह जैतापुरला ठेवले.

याचे कारण सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, मोगली सैन्य संभाजीच्या किनाऱ्यावर तेथून उत्तरेस किंवा दक्षिणेस उतरलेच तर त्याचा बंदोबस्त व्हावा. संभाजीराजांनी अकबरांशी मैत्री केली होती. परंतु त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवला नव्हता. मोगली सैन्याची व त्याची शक्य तो भेट होऊ द्यावयाची नाही याची खबरदारी संभाजीराजांनी घेतली होती. अर्थात मोगलांशी मैत्री केलेल्या पोर्तुगीजांवर अकबराला एकट्याला ससैन्य जाऊ देणे धोक्याचे होते. त्यामुळे कवी कलशने गोव्याची बातमी अकबरापर्यंत जाऊ न देण्याची खबरदारी घेतली होती.

संभाजीराजे जैतापूरला आले ते सैन्य ठेवून व कवी कलशला सोबत घेऊन फोंड्यास १ नोव्हेंबरला पोहोचले. वेढ्याला दहा दिवस झाले म्हणून व्हाईसरॉय आधीच अस्वस्थ झाला होता. संभाजीराजास मोगली सैन्याला मैदानी प्रदेशात कोठेच तोंड द्यावयाचे नव्हते. याकरिता शहा अलम येण्यापूर्वीच गोव्याचे राजकारण संपवायचे होते. संभाजीराजांना गोवा नको होता. त्याभोवतालील प्रांत पाहिजे होता. पोर्तुगीजांचा संपूर्ण नाश करून किनारा सांभाळण्याची जबाबदारी त्यांना घ्यावयाची नव्हती. मोगली हल्ले कमकुवत कसे करता येतील याकडेच त्यांचे लक्ष होते. त्यासाठी दारूगोळा, धान्यसामुग्री वगैरे समुद्रमार्गाने न येऊ देण्याची काळजी घेणे इतकेच संभाजीराजांचे स्वारीमागील उद्दिष्ट होते असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.[५०]

संभाजीराजे फोंड्याजवळ येताच ९ नोव्हेंबरला व्हाईसरॉयने वेढा काढून माघार घेतली. संभाजीराजांच्या काही सैन्याने पाठलाग केला. पाणउताराजवळ एका टेकडी शेजारी जाताना पोर्तुगीजाचा बंदोबस्त असल्याचे दिसले. त्यांच्या हाती बंदुका व पिस्तुले भरून सज्ज होती. ही शस्त्रे मराठ्यांजवळ नव्हती. संभाजीराजांस पोर्तुगीजांवर सरशी करण्यासाठी गोवेकरांच्या सैन्यातील एक उणीव दिसून आली आणि ती म्हणजे घोडदळाची. संभाजीराजांनी याचा फायदा घेऊन पोर्तुगीजांच्या सैन्याला आपल्या घोडदळाच्याच साहाय्याने नामोहरम केले; आणि पहिल्याच चकमकीत संभाजीराजांना जो या शस्त्रांचा लाभ झाला त्याचा उपयोग नंतर त्यांनी सांता एस्तावाच्या लढाईत करून घेतला. या लढाईत संभाजीराजांना पोर्तुगीजांच्या दोन सैन्य तुकड्यांच्या बंदुकी मिळाल्या.[५१] बेंद्रे पुढे सांगतात, यावेळी संभाजीराजांनी सैन्याच्या आणि विशेषतः घोडेस्वरांच्या हालचाली चपळाईने करून पोर्तुगीज सैनिकांच्या बंदुकीच्या फेऱ्यातून सैन्य वाचविले व हातघाईच्या लढाईत पोर्तुगीजांचा बराच नाश केला. एकंदरीत मोगलांच्या चिथावणीने गोव्याच्या व्हाईसरॉयने केलेली ही स्वारी यशस्वी झाली नाही. उलट त्यामुळे पुष्कळ मनुष्यहानी करून घेऊन त्यास परतावे लागले होते.

[ड] सेंट स्टिफेनवर संभाजीराजांचा कब्जा :

फोंड्याच्या वेढ्यानंतर दुसरा युद्धाचा किंवा महत्त्वाचा प्रसंग म्हणजे सेंट स्टिफेन बेटावरील चकमकीचा. फोंड्याच्या लढ्यापेक्षाही हा प्रसंग पोर्तुगीजांना जड गेला. १४ नोव्हेंबर १६८३ ला रात्री संभाजीराजांनी सेंट स्टिफेन घेतले. व्हाईसरॉय १४ नोव्हेंबरला रात्रीच शेजारच्या गावात येऊन राहिला व दुसऱ्या दिवशी १५ नोव्हेंबरला सकाळी सात वाजता सेंट स्टिफेनवर

चढला. सेंट स्टिफेनवर संभाजीराजांचे ४० एक लोक होते. पोर्तुगीजांचे दिडशे लोक व बरेच खाली बंदुकधारी लोक पाहून संभाजीराजांचे लोक पळाले. इतक्यात संभाजीराजांचे सैन्य पायथ्याशी आले. घोडेस्वार मदतीस आले. पळालेले चाळीस लोक स्वारांसह परतले. थोडे गोळीबाराला बळी पडले; परंतु पोर्तुगीजांचे सैन्य सर्वच मारले गेले. व्हाईसरॉय व जनरल घोड्यावर होते व चार बारी पिस्तुलातील बार काढीत गेले म्हणून वाचले. व्हाईसरॉय व जनरल आपले घोडे सोडून देऊन छातीभर पाण्यात जाऊन होडीत चढले व पैलतीराला गेले. व्हाईसरॉयच्या आज्ञेनुसार दोन बटॅलिअन्स त्यांच्या मदतीस आल्या होत्या. त्यानंतर संभाजीराजांचे मोठे सैन्य घसरले त्याचा पूर्ण मोड केला. बहुतेक मारले गेले. काही चिखलात रुतून मेले. काही रुतलेल्या स्थितीत भरती आल्याने पाण्यात बुडून मेले. काही पोहण्याचा प्रयत्न करून वाचतांना मेले.

या पाणउताराचे जागी पोर्तुगीजांच्या अडकलेल्या सैन्याची धुळधाण उडवितांना संभाजीराजांच्या सैन्यातील काही लोकही चिखलात रुतले व पाण्याच्या ओघात सापडले. स्वतः संभाजीराजांचा घोडाही पोहणीस लागला व खंडो बल्लाळने आपल्या घोड्यावरून पाण्यात उडी टाकून संभाजीराजांच्या घोड्यास जोर देऊन त्यास बाहेर काढले. यावेळी खाडी ओलांडून जाण्याचे धाडस का केले नाही हे या परिस्थितीवरून स्पष्टच होते असे वा. सी. बेंद्रे टीका करणाऱ्यांना स्पष्ट करून देतात. एक तर खाड्यांतील चिखल चिकट व अतिशय खोलवर असतो. भरती ओहोटीचे जोरही तीव्र असतात. शिवाय पैलतीरावर तोफा, बंदुकांच्या माऱ्यांची भीती त्याशिवाय पोर्तुगीजांस स्थानिक आरमारांचे साहाय्य होते. अशा परिस्थितीत मनुची संभाजीराजांच्या वकिलाला घेऊन गेला. परंतु मोगली सैन्य येत असल्याची बातमी लागल्याने व्हाईसरॉयने खंडणीची अट मान्य केली नाही. दुर्गादास परत गेला. अशा विविध साधनांची कारणमीमांसा करून विस्तारीत माहिती वा. सी. बेंद्रे देतात.[५२]

[इ] संभाजी महाराजांचे सालसेत व बारदेस प्रातांवर आक्रमण :

पोर्तुगीज अहवालाप्रमाणे दुर्गादास वकील २२ नोव्हेंबरला परत गेला. संभाजीराजांनी त्यानंतर पोर्तुगीजांस अधिक शासन देण्याच्या विचाराने सालसेत व बारदेस हे प्रांत लुटण्याचा व जाळण्याचा सपाट लावला. कारण शहा अलमच्या स्वारीमुळे संभाजीस गोवा राज्य घेणे शक्य नव्हते व लुटमार व जाळपोळ केल्याखेरीज या प्रदेशातील पोर्तुगीजांची शहा अलमला होणारी

मदत व प्रतिकारशक्ती नाश करण्याचे अन्य साधन नव्हते. या आक्रमणाचा तपशील वा. सी. बेंद्रे विविध साधनांच्या आधारे खालीलप्रमाणे देतात.

संभाजीराजांनी कुंभारजुवे बेट सोडून सैन्याची एक तुकडी १ डिसेंबरला सालसेत प्रांतात व दुसरी बारदेश प्रांतात प्रदेश जाळून लुटून फस्त करण्यास पाठविली. या संहारात फोंड्यास जातांना पोर्तुगीजांनी ज्या गावांचा अमानुषपणे छळ केला होता त्यांनी व नंतर खंडणी देऊन सुटका करून घेतलेल्या परंतु पोर्तुगीज फादर्सच्या जुलूम जबरदस्तीस कंटाळलेल्या लोकांनी भाग घेऊन चर्चस व आतील मूर्ती वगैरे मोडून-तोडून फादर्सवर सूड उगवून घेतला. यानंतर संभाजीराजे व त्यांच्याबरोबरील बरेच सैन्य माघारी गेले व अकबर व कवीकलश पुन्हा जैतापूरला छावणी करून राहण्यास निघाले. संभाजीराजे २३ डिसेंबर १६८३ ला रायगडाला आले व तहाच्या अटी वगैरे ठरवून घेण्याच्या कामासाठी कवी कलाला सर्वस्वी अधिकारासह पाठविले. शहा अलम गोव्याला ५ जानेवारी १६८४ रोजी आला. येथे फक्त हालचालींचाच आराखडा दिला आहे. बेंद्रे पुढे म्हणतात याठिकाणी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे संभाजीराजांचे या स्वारीत फारच कमी नुकसान झाले. चर्चमधील अमाप धान्य व संपत्ती यांची लूट करता आली. त्यामुळे संभाजीराजांस यांनतरच्या दुष्काळाच्या काळात तेवढी गरज भासली नाही. पोर्तुगीज मात्र चार-पाच कोटांशिवाय सर्व प्रांत गमावून बसले आणि शहा अलमने आपल्या धान्यांतून काही दिले नसते तर त्यांची दुष्काळी स्थिती त्यांना फारच जाणवली असती. असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात व पुढे सांगतात संभाजीराजांनी रणातून निवृत्ती स्वीकारली याचे कारण त्यांना आपले सैन्य व दौलत शिरसलामत रायगडी आणावयाची होती. अनेक कारवाया करून शहा अलम तेथे पोहोचण्यास वेळ लावील असे करण्यात आले होते. त्यामध्ये संभाजीराजास यश आले. शहा अलमच्या मोठ्या सैन्याचा दबदबा आहे तोपर्यंत तहाला काळ फायदेशीर नव्हता. त्यामुळे तहाच्या वाटाघाटी अनिर्णितच ठेवल्या गेल्या. शहा अलमच्या सैन्याची आपोआपच धुळधाण होऊन तो कसाबसा माघारी गेला. तोपर्यंत बोलणी चालू ठेवण्यास व वेळीच तह करण्यासाठी संपूर्ण अधिकार कवी कलशला दिला होता. त्याप्रमाणे कवी कलश उपयुक्त संधी येताच अकबराला बरोबर घेऊन भीमगडाच्या झाडीत गेला व तेथे कुलयेख्त्यार म्हणून पोर्तुगीजांशी ७ जानेवारी १६८४ रोजी प्रथम करार केला. ज्यानुसार मॅनुअल सराव्हिआ द

अलबुकर्क गोव्याहून निघाला व तह संपादून व सर्व सालसेत व बारदेस येथील फादर्स व ख्रिश्चन मिशनरी यांना कैदेतून सोडवून परत घेऊन गेला.[५३]

वा. सी. बेंद्रे संभाजीराजांच्या पोर्तुगीजासोबतच्या धोरणाचे फलीत सांगताना लिहितात की, शहा अलम असेपर्यंत पोर्तुगीजांनी स्वराज्याच्या प्रदेशाशी शांततेचे संबंध वरवर ठेवले होते त्यामुळे शहा अलम जाताच संभाजीराजांच्या सैन्याने पुन्हा त्या भागात शिरकाव केला. खंडणी मोठी व सर्व प्रदेश हातचा जाऊन लुटून नासधूस झाल्याने ही खंडणीबाबतची आणि त्यामुळे तहांची अनिश्चितता शेवटपर्यंत राहिली. मात्र पोर्तुगीजांनी त्यानंतर मोगली सैन्यास व आरमारस त्यांच्या प्रदेशातून संभाजीराजांच्या प्रदेशात जाण्यायेण्याची सवलत दिली नाही. संभाजीराजांनी उडविलेली दैना पाहून इंग्रजांनी आपले धोरण संपूर्ण बदलले व सिद्दी आणि मोगली आरमारला आपल्या मुंबई बेटावर येऊ दिले नाही.

५.१६ शहा अलमची स्वारी

[अ] वा. सी. बेंद्रेंनी केलेली शहा अलमच्या स्वारीची मीमांसा :

वा. सी. बेंद्रे सांगतात की, शहा अलमच्या या स्वारीची दखल कोणत्याही मराठी बखरकार व इतिहासकारांनी घेतलेली नाही.[५४] इतर साधनांच्या आधारे या स्वारीविषयी माहिती मिळते. मागील तीन वर्षात संभाजीविरूद्ध विजयाचा लवलेशही पदरात न पडल्याने संभाजीराजांचा प्रत्यक्ष पाडाव करण्यापूर्वी त्यांच्या सभोवतालील प्रदेशाचा बंदोबस्त करून त्यांना घेरणे हाच एक मार्ग औरंगजेबासमोर राहिला होता. असे केल्याने दुसरा फायदा म्हणजे त्यांची प्रत्यक्षाप्रत्यक्ष मिळणारी मदत तोडणे हा होय. या विचाराने विजापूरवर स्वारी करण्याचे ठरवितांना त्यांनाही संभाजीची मदत न मिळेल अशी व्यवस्था करणे व दूरवर दाणागोटा नदीनाल्यातून नेण्यापेक्षा समुद्रातून नेणे अधिक उपकारक होईल हे जाणून औरंगजेबास तशी योजना करणे आवश्यक होते.

उत्तर कोकणची योजना दोन वर्षांच्या प्रयत्नानंतर निष्फळ झाल्यावर दक्षिण कोकणसंदर्भात योजना बनविणे गरजेचे झाले. या योजनेमागील हेतू,

(१) आदिलशाही सरदारांना धाक दाखवून त्यांना आपल्या अंकित करणे.

(२) पोर्तुगीजांनी धान्य वगैरेस परवानगी जरी दिली असली तरी मध्यंतरीचा संभाजीराजांचा प्रदेश घेण्याचे नाकारले तो घेऊन पोर्तुगीज व मोगल हद्दीतील संकट दूर करणे.

(३) आदिलशाही व संभाजीराजांचा दक्षिण कोकणचा भाग जाळून उद्ध्वस्त करून लोक फोडणे व हेतू निर्बल करणे. हे हेतू ठरविण्यात आले होते.

आदिलशाहीवर स्वारी करण्याकरिता सरदार भागानगरकरांची प्रत्यक्ष मदत इतरांना न मिळण्याची प्रथम खबरदारी घेतली गेली. नंतर विजापूरकरांशी सामदामाची बोलणी सुरू केली. सरदार पाठविले व शहा अलम, त्याची मुले वगैरेही विजापूरी प्रदेशावर चालून गेले. त्यांनी धारवाड वगैरे ठाणी घेतली. पोर्तुगीजांकडे धान्य वगैरे रवाना करण्यापूर्वी शहा अलमला संभाजी महाराजांच्या प्रदेशात पाठविले. पोर्तुगीजांनी जरी प्रथम संभाजीविरूद्ध हत्यार उचलणार नाही म्हणून सांगितले तरी त्यांची व संभाजीराजांची लढाई सुरू झालीच होती. अशा परिस्थितीत संभाजीराजांचा प्रदेश, विशेषतः किनाऱ्यालगतचा भाग, काबीज करून विजापूरांकडील लढाईस धान्यसामुग्री वगैरे थोड्या त्रासाने व कमी धोक्याने पुरवणे आता शक्य व सोपे झाले होते.

[ब] शहा अलमची प्रत्यक्ष स्वारी :

वा. सी. बेंद्रे सांगतात की, मोगली दरबारी नोंदीनुसार ही स्वारी १५ सप्टेंबर १६८३ ते २४ मे १६८४ या काळात झाली. शहा अलमच्या स्वारीची व्याप्ती फार मोठी होती. हिंदवी स्वराज्यावर केलेला हा फार मोठा आघात होता. परंतु या प्रसंगाची मराठी इतिहासकारांनी दखल घेतली गेली नाही. कदाचित संभाजीराजांनी या आघाताच्या जखमा प्रजेला होऊ दिल्या नाहीत म्हणून तो प्रसंग त्यांच्या स्मरणातून गेला असेल असे बेंद्रे सांगतात.

औरंगजेबाची योजना : औरंगजेब हा कसलेला योद्धा व मुत्सद्दी होता. त्याने भारतात, इराणमध्ये आपली राजकारणपटुता पटवून दिली होती. उत्तर कोकणातील संभाजीराजांच्या राज्यावरील स्वारीचा आपला डाव फसला हे पाहून त्याला सखेद विस्मय वाटला होता. आपल्याच सैन्यात गडबड आहे म्हणून त्या स्वारीत गुंतवलेले सैन्य व आरमार त्याने माघारी बोलाविले. संभाजीराजास पैशाची व माणसांची मदत बाहेरून होत आहे हा त्याचा ठाम ग्रह झाला होता. वैतागून दिल्लीना परज जाण्याचा विचार त्याच्या मनात असला तरी तो तसे करणे शक्य नव्हते. आता पुढे काय याचा विचार त्याच्यापुढे होता. संभाजीच्या गनिमी काव्याला पावसाळा लाभदायक असला तरी मोगली सैन्याला सर्व तऱ्हेने नाशकारक होता. अर्थात पावसाळ्यानंतरच्या युद्धाचा डाव औरंगजेबाने पूर्ण विचाराने ठरविला.

(१) अजमशाह पन्नास हजारी मनसबदार त्याला औरंगजेबाने आणखी सरदार, उमराव बरोबर देऊन आदिलशहाच्या सरहद्दीवर ठेवले व गोवळकोंडा[५५] व विजापूर[५६] यांचे संभाजीराजांना साह्य न होईल असा बंदोबस्त केला.

(२) आदिलशाही व संभाजीराजांचे राज्य यांच्यामधील दक्षिण कोकणचा आणि जमल्यास वेंगुर्ला ते गोव्यापर्यंतच्या किनाऱ्यासह मुलूख घेऊन दक्षिणी राज्ये व मराठी मुलूख यामध्ये जबरदस्त पाचर ठोकावयाची या उद्देशाने (५० हजारी मनसबदार) शहा अलम बरोबर इतर ४०-५० हजारी मनसबदार उमराव देऊन त्यास त्याचवेळी रामघाटातून उतरविले.

(३) शाहाबुद्दीनखान देवाघाटातून पुढे गेला व ताराला कल्याणकडे पाठविले.

(४) सिद्दीला वेंगुर्ला व मोगली आरमाराला आचरा, वेंगुर्ला व गोवा या भागात अन्नधान्य पुरविण्याच्या कामावर नेमले.

(५) दंडाराजपुरी आणि चौल व दक्षिणेत गोवेकर यांच्या साह्याची प्रथम व्यवस्थाही लावून ठेवली होती इतकेच नव्हे तर वेंगुर्ल्यासाठी डचांशीही बोलणी केली. औरंगजेबाने चौफेर हल्ले चढवून संभाजीराजास कोंडीत धरण्याची योजना बनविली. अकबराचे राजकारण औरंगजेबाला त्रास देत असल्याने मुद्दाम शहा अलमला अकबराच्या मागे पाठवून त्याचा उपयोग करून घेण्याची युक्ती लढविली होती. यात पोर्तुगीज व इंग्रज मोगलांना मिळते तर हे औरंगजेबाचे राजकारण गुणानुक्रमे श्रेष्ठच ठरले असते[५७] असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

[क] वा. सी. बेंद्रे यांची चिकित्सा :

इ.स. १६८२ व १६८३ तील कल्याणवरील स्वाऱ्या निष्फळ झाल्याने, औरंगजेब जोराचा हल्ला करील हा संभाजीराजांचा अंदाज होताच. त्यात पोर्तुगीजांचा काटशह जाचेल असे समजून उत्तरेकडील पोर्तुगीज प्रदेश शक्य तो ताब्यात घ्यावयाचा व इंग्रजांना निदान अलिप्त राखावयाचे ह्या दोन्हीही बाबी संभाजीराजास पावसाळा संपण्यापूर्वी साध्य करता आल्याने मोगली आरमारांच्या हालचालींना फारसा वाव राहिला नाही. गोव्याकडील पोर्तुगीजांनी आपण होऊनच हालचाली केल्याने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजीराजे स्वतः गेले व

संभाजीराजांनी पोर्तुगीजांना पूर्णपणे नामोहरम केल्याने पोर्तुगीजांना मोगलास प्रत्यक्ष मदत करण्याची कुवतच राहिली नाही असे बेंद्रे सांगतात.

शहा अलम प्रतिकारार्थ आदिलशाही हद्दीवर येऊन बसला होता. त्याला तेथे इतक्यात लढा सुरू करावयाचा नव्हता. शहा अलमची आघाडी मोठी व जबरदस्त होती. परंतु तो रामघाट उतरून येईपर्यंत दोन महिने गेले. ज्यावेळी शहा अलम गोव्याजवळ आला तेव्हा संभाजीराजे आपले बहुतेक कार्य संपवून परत रायगडास गेले होते. गोव्यास येईपर्यंत संपगावचा किल्लाच काय तो शहा अलमच्या सैन्याने घेतला होता. बाकी सर्व प्रदेश तो जाळीत आला.

मोगली आरमारही गोव्यास येताच त्याने पोर्तुगीज सत्तेला डावलून त्यांच्या किनाऱ्यावर लुटमार केल्याने पोर्तुगीजांना साहजिकच मोगलाबद्दल अविश्वास वाटू लागला आणि मोगली सैन्याच्या येथपर्यंतच्या कामगिरीवरून संभाजीराजांचा त्रास कायमच जाईल असे त्यांना वाटेनासे झाले. यामुळे पोर्तुगीजांच्या साह्यामध्ये कुचराई होणे साहजिक होते. यामुळे मोगलांना पोर्तुगीज व इंग्रज यांची सहानुभूती गमवावी लागली. कारण संभाजीराजांच्या राज्याचे लचके तोडण्यासाठी सांगतांना त्यांना आवश्यक असलेल्या घोड्यांची गरज भागविण्यासाठी त्यांना ते लष्करातही विकत घेऊ शकले नव्हते. पोर्तुगीजांचे व अरबांचे संबंध चांगले नसल्याने गोवेकरांना जमिनीवरील युद्धाच्या बाबतीत हाती अव्वल अस्त्रे असतानाही दुर्बल होऊन राहावे लागले. त्यामुळे त्यांना संभाजीराजांशी तहाची बोलणी चालूच ठेवावी लागली असे बेंद्रे सांगून हे मोगलांची योजना फसण्यास एक कारण ठरले. दोन आघाड्याऐवजी चार आघाड्या झाल्याने तूट भासणे स्वाभाविक होते[५८] असे बेंद्रे स्पष्ट करतात.

[ड] संभाजीराजांची नीती :

संभाजीराजांच्या नीतीसंदर्भात सांगतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, संभाजीराजांनी सैन्यभरती करण्यासाठी अंमलदार पाठवून सैन्यदल उभारण्याचे प्रयत्न केले. बऱ्हाणपूर, औरंगाबाद, धरणगावसारख्या शहरांवर धाडसी छापे घालून धनसंपत्तीची भर टाकली होती व औरंगजेबाच्या पुरवठ्याच्या काफिल्यावर घोडे घालून मुबलक अन्नपुरवठाही गडोगडी करून ठेवला होता. औरंगजेब संभाजीराजांची सेना मैदानात खेचण्याचा प्रयत्न करी, तर संभाजी नुकसान झाले तरी ते सोसूनही गनिमी काव्यापलिकडे सैन्याला मैदानात जाऊ देत नसे. मोगली सैन्य आपल्या प्रदेशात शिरताना व बाहेर जाताना त्यांना हैराण करावयाचे; परंतु समोरासमोर

प्रतिकार टाळावयाचा हे संभाजी महाराजांनी मोगलाबरोबरील लढाईचे आपले सूत्र ठरविले होते. त्यामुळे शत्रुचे डोंगरदऱ्यात मोठे नुकसान संभाजीराजे करीत असे. शत्रुला माघारी जाण्याशिवाय दुसरा मार्गच उरत नसे. सारांश सांगताना बेंद्रे सांगतात की, मोठा संघर्ष करण्याऐवजी लहान लहान क्षुल्लक भांडणातच संभाजी मोगलांचे फार नुकसान करीत असे. मराठे दाणागोटा मारून व वाटेतील पाण्यात विष घालून कसे हाल करीत त्याचे वर्णन मनुची वगैरेंनी केलेले आहे.[५९]

[इ] शहा अलमच्या सैन्याला संभाजीराजांनी दिलेल्या लढा :

वा. सी. बेंद्रे वर्णन करतात की, गोवा ते वेंगुर्ला किंवा सर्वच समुद्र किनाऱ्याजवळील भाग जमिनीवरील युद्धाच्या बाबतीत फार वाईट होता. कारण या खाड्यांची पात्रे नुसतीच रुंद आहेत असे नाही तर भरती आहोटीमुळे चिखलही फार खोल असतो. मनुष्य जशी हालचाल करेल तसा तो त्या रबडीत रुतत जातो. दुसरा आणखी अडचणीचा प्रकार म्हणजे भरतीचे पाणी दूरवर वाढल्याने सर्वत्र दलदल राहाते. त्याशिवाय पाच-दहा मैलांत एखादीच मचुळ विहीर आढळते. त्याखेरीज इतर पाणी पिण्याजोगे नसते, खारट व मलिन असते. वाटेवरील विहिरीचे पाणी झाडे वगैरे टाकून दुषविले किंवा बुजविले तर पाणी पिण्याजोगे नसते. खारट व मलिन असते. पाणी पिण्यापुरतेही मिळणे कठीण जाते. कल्याणच्या लढ्याच्यावेळी संभाजीराजांनी पाण्यात विष कालविल्याने मोगली सैन्याचे जसे हाल झाले होते तोच प्रयोग केल्याने मोगल सैन्यास फार हाल सोसावे लागले. त्यात शहा अलमने येतांना केलेल्या जाळपोळीनेही भर टाकली. ही सर्व त्याच्या अफाट सैन्याला त्याच वाटेने परत जातांना अधिक जाणवली. विषारी पदार्थ फार दिवस पाण्यात पडल्याने ते त्यात समरस झाले होते. त्यामुळे आजार वाढला व विषाने माणसे व जनावरे पुष्कळ मेली. शिवाय धान्यसाठा सर्व लुटण्याने खाण्याचीही त्यात कमतरता पडली. वेंगुर्ला व गोवा प्रांतात बंदोबस्त करण्याइतका वेळ शहा अलमला मिळाला नाही. त्यामुळे गोव्यास माणसे पाठवून धान्य आणण्याची व्यवस्था करावी तर प्रदेश परत संभाजीराजांच्या ताब्यात गेलेला होता. त्यामुळे पिछाडीवरून काही मदत यावी ती आली नाही; आणि कोणी तसे करण्याचा प्रयत्न केला असता तर संभाजीराजांच्या लोकांनी त्याच्यावर छापे टाकले असते.

ज्या ज्या गावात मोगली सैन्य वाटेवर जाळपोळ करणार त्या त्या गावातील लोकांना संभाजीराजांनी मदतीची अभिवचने देऊन त्यांना पुनर्वसाहतीसाठी मदतही केली. त्यामुळे या

लोकांचे साह्य संभाजीराजांना मिळाले. अशा बिकट परिस्थितीत शहा अलमने आपले सैन्य वेंगुर्ल्यापर्यंत नेले. परंतु पुढे कूच करावयाची तर पावसाळ्यामध्ये मराठ्यांकडून सर्वनाश होण्याची भीती होती. कारण पायउतार मिळणे कठीण व धान्यसामुग्रीची वाहतूक अशक्य होती. शहा अलमने वेंगुर्ल्याहून माघार घेतली होती तसेच जी नासधूस करावयाची ती केली होती. तितक्यावरच संतुष्ट राहणे त्याला भाग होते. कारण अकबरही वेंगुर्ल्यांहून पूर्वीच रायगडाकडे निसटला होता.

[ई] शहा अलमचा परतीचा प्रवास व दैन्यावस्था :

शहा अलमच्या सैन्याने आपल्याला परत पुन्हा त्याच वाटेने जावे लागणार आहे याची जाणीव न ठेवून जाळपोळ केल्याने त्याला माघार घेतांना बऱ्याच अडचणी आणि विशेषत: पाण्याच्या बाबतीतील अडचणींना तोंड द्यावे लागले. रामघाटांतून पार पडण्यास सात दिवस लागले. त्याचे मुख्य कारण म्हणजे शत्रूने त्याच्या वाटेवर झाडे वगैरे टाकून वाटा बुझविल्या होत्या. त्या साफ करणे व नाईलाजास्तव उन्हाळ्यात तान्हेसाठी मिळेल ते पाणी पिणे भाग पडल्याने त्याला आपल्या सैन्याच्या मोठ्या भागाला व घोडे, हत्ती, उंट, खेचरे, गुरेढोरे यांना मृत्युमुखी पडावे लागले. जनावरे अधिक मरण्याचे हेच कारण की, त्यांना पाण्यापाण्यात फरक जाणून तहान मारण्याइतका विवेक नव्हता. शत्रू रामघाटात हा सर्व अनर्थ पेरीत असताना शहा अलमने त्यास आडकाडठी करील अशी काहीच व्यवस्था राखली नव्हती. कदाचित त्याला या वाटेने परत न जावे लागता आणखी थोडे उत्तरेस जाऊन पन्हाळा कोल्हापूरची वाट सुधारू असा विश्वास वाटला असावा. असे एकमत वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. संभाजीराजांच्या लोकांनी एकनिष्ठेने वागण्यात जी एक शिस्त दाखविली तिच्याबद्दल सर्वत्र गौरव झाला. त्याशिवाय युरोपिअन व इतर तत्कालीन लोकांच्या समजुतीप्रमाणे पादशहाच्या बहुतेक मोठमोठ्या सरदार-उमरावांना व खास पुत्रपौत्रांना जर आर्थिक लाभालाभाने पातशहाच्याविरूद्ध वळविले असले तर त्यात संभाजीराजांच्या राजकारणकुशलतेची तारीफच केली पाहिजे. १६८४ च्या फेब्रुवारीत शहा अझम व शहा अलम यांना संभाजीराजांकडे वकील पाठविणे भाग पडावे यावरून संभाजीराजांचा कारभार कोणत्या योग्यतेचा असला पाहिजे हे सहज दिसून येण्यासारखे आहे[६०] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

[ड] शहा अलमच्या स्वारीचे परिणाम :

औरंगजेबाने आपली दोन मुले व इतर मोठमोठे उमराव या स्वारीवर पाठविले होते. या स्वारीचे राजकारण २० ऑगस्ट १६८३ ते २४ मे १६८४ पर्यंत चालले. यामध्ये प्रत्यक्ष लढाईचे प्रसंग फारसे आलेच नाहीत. लढाईच्या शेवटी सर्व राज्याची परिस्थिती कायमच राहिली. निजामपूर व रामघाट ते वेंगुर्ला यामधील फक्त रस्त्यावरील प्रदेशाची नासधूस झाली. यावेळी पिके नसल्याने लुटीचा प्रश्नच नव्हता. स्वारी येण्यापूर्वीच गावे ओस पडल्याने मालमत्तेचे फारसे नुकसान झाले नाही. याशिवाय बेंद्रे यांनी या स्वारीचे खालीलप्रमाणे राजकीय परिणाम झाले असल्याचे सांगतात -

१. **पोर्तुगीज-संभाजीराजांशी मैत्री :** संभाजीराजांच्या स्वारीमुळे पोर्तुगीज जे मोगलांकडे झुकलेले होते ते शहा अलमच्या लोकांनी केलेली बारदेशची लूट व मोगली आरमारी काफिल्याने केलेली नासधूस व बायकापोरांची लूट अनुभवून नाराज झाले व मोगली आरामाराची वर्तणूक आणि शहा अलमच्या एकंदर स्वारीचा कारभार पाहून मोगलाचा आपल्या संरक्षणास काहीही उपयोग व्हावयाचा नाही व आरमार त्रासदायक होईल हे जाणून त्यांनी संभाजीराजांशी तह करण्याची खटपट केली. संभाजीराजांवरच अवलंबून राहाणे हिताचे, असा त्यांचा ग्रह झाल्याने मोगलांशी एक मित्र गमावला.

२. **इंग्रज-संभाजी तह :** पोर्तुगीजांची झालेली दैन्यावस्था पाहून व मोगली उमरावांच्या तकलादी राजनिष्ठेचा विचार करून संभाजीराजास जवळ करणे हिताचे आहे हे जाणून इंग्रजांनीही संभाजीराजांशी तह केला व सिद्दी व मोगली आरमार यांच्या जुलूम जबरदस्तीपासून आपली मुक्तता करून घेतली. तसेच संभाजी राजांच्या मुंबईजवळील प्रदेशातील त्यांची जाळपोळ व लुटमार थांबली.

३. **संभाजीराजे-अरब मैत्री :** पोर्तुगीज व अरब यांच्या वैमनस्याचा फायदा घेऊन संभाजीराजांनी अरबांशी मैत्री संपादन केली व त्याच्या घोड्यांची खरेदी-विक्री संभाजीराजांच्या प्रदेशात होऊ लागली व अरबी आरमाराचा पाठिंबा मिळाल्याने संभाजीराजांचे आरमार अधिक प्रबळ झाले.

४. **आदिलशाही, कुत्बशाही व हिंदवी स्वराजाचा गट :** शहा अझमच्या वकिलाचा बाऊ करून आदिलशाही सरदारांना आपल्या बाजूस वळवता आल्याने संभाजीराजांना आपल्या

मनासारखा तह घडवून आणता आला. त्यामुळे आदिलशाही, कुत्बशाही व हिंदवी स्वराज्य या तिघांचा गट होऊन तो औरंगजेबाविरूद्ध लढण्यास तयार झाला.

५. **शहा अलमच्या सैन्याचे अती नुकसान :** शहा अलमच्या सैन्याचे इतके नुकसान झाले होते की, जो आपल्या उमरावांसह शेक्स येथे एप्रिलअखेर येऊन बसला व औरंगजेबाकडून प्रवासासाठी हत्ती, घोडे केव्हा येतात याची वाट पाहात राहिला. २१ एप्रिल १६८४ ला औरंगजेबान रुहुल्लाहखानाबरोबर खर्चासाठी २० हजार अश्रफी आणि वाहतुकीसाठी १०० घोडी, ५०० ऊंट व २५ खेचरे पाठविली तेव्हा २४ मे १६८४ ला शहा अलमला प्रवास करून अहमदनगरला जाऊन बादशहास भेटता आले. अर्धा अधिक लाख मोगली सैन्य आणि अगणित घोडे, हत्ती, ऊंट वगैरेचे नुकसान झाले.

६. **औरंगजेबाची योजना फसली :** जाळपोळ केलेला प्रदेश ताब्यात ठेवता न आल्याने दक्षिणी सुलतान व संभाजीराजे यांच्या राज्यात संकल्पित पाचर मारावयाची ती मारता आली नाही. उलट मैत्री दृढ झाली त्यामुळे औरंगजेबाची योजना फसली.

७. **मोगली आरमाराचे धान्य वाहतुकीसाठी बरेच नुकसान झाले :** मोगली आरमाराचे केवळ धान्य वाहतुकीसाठी बरेच नुकसान झाले. बराच धान्यपुरवठा संभाजीराजांच्या हाती पडला व काही समुद्रात बुडाला त्यामुळे शहा अलमला परतरणे भाग पडले व सुरतकडे दुष्काळ पडला.

वा. सी. बेंद्रे शेवटी सांगतात की, लाख दीड लाख सैन्यानिशी चालून जाऊन आणि शेकडो मैल धावाधाव करून प्रत्यक्ष शत्रुची गाठ न पडताच मोगलास हार खावी लागली. जाळपोळीच्या श्रेयाखेरीज लुटालुटीत निराशाच झाली. धान्याचा साठा आपल्या सैन्यापेक्षा शत्रुच्या सैन्याच्याच हाती पडला. स्वराज्यातील सुपीक प्रदेश मोगलांनी दुष्काळी केला. एकूण या तंत्राने औरंगजेबाने पूर्वी युद्धे करून सर्वत्र विजय मिळविला होता व पराजयाचा डाग लागू दिला नव्हता ते तंत्र दक्षिणेतील डोंगराळ, जंगली व खारपाटणाच्या प्रदेशात परिणामकारक होणार नाही हे जाणून त्याने आपले पुढील युद्धविषयक धोरण बदलण्याचा निर्णय घेतला.[६१]

५.१७ संभाजी महाराजांचा सिद्दी आणि मोगली आरमारांशी संघर्ष

[अ] इ.स. १६८० च्या अखेरीस घडामोडी :

शिवाजी महाराजांच्या मृत्युच्यावेळी सिद्दी कासम हा स्वराज्याच्या प्रदेशास त्रास देत होता. सिद्दी कासमचे खांदेरी व उंदेरी घेण्याचे प्रयत्न चालू होते. सिद्दीने ८ मार्चला पेणच्या

खाडीत लुटमार केली होती. या लुटमारीत इंग्रजांनी सांगितल्याप्रमाणे त्याने पेण खाडीवरील चार मोठी गावे लुटली, बरीच जाळली आणि पुष्कळ माणसे धरून नेली. ही लूट करण्यापूर्वीच मागे जखमी झालेला दौलतखान ५ मार्चला राजापुरास येऊन राहिला होता. मुंबईकरांनी तक्रार केली असता सिद्दी कासमने लिहिले की, जोपर्यंत खांदेरी शिवाजी राजांकडे आहे तोपर्यंत संभाजीराजांच्या प्रदेशात जाळपोळ व लुटालूट करेल. कारण तो मोगली सरदार आहे. तेव्हा इंग्रजांना हे ऐकूण घ्यावे लागले. सुरतकरांनी २४ मार्चच्या पत्रात सिद्दीला ताकीदी करून सर्व बंद करण्यास मुंबईकरांना परवानगी दिली. सिद्दी हल्ले करीतच होता. शेवटी सिद्दी कासम मुंबई बंदरात आला व त्याला इंग्रजांना माजगावात राहू द्यावे लागले. शिवाजी महाराजांच्या मृत्युने मराठे सरदारानांही सिद्दीकडे एप्रिल व मे महिन्यात लक्ष देणे शक्य झाले नाही. त्यामुळे सिद्दी यावेळी पेण नागोठणे वगैरे भागात सारखी लुटमार व जाळपोळ करीत राहिला; परंतु मुंबईकरांनी त्याला सर्व प्रकारची मदत देणे बंद केले. तेव्हा त्याचेच लोक त्याच्याविरूद्ध गेले. त्यामुळे सिद्दी कासमने नागोठणा, पेण, आपटे व बट्टी या भागात लुटालूट न करण्याचा तह लिहून दिला. तेव्हा इंग्रजांनी त्याच्या लोकांना निःशस्त्र करून त्याला मुंबईत येऊ दिले व त्याच्या आरमाराच्या रक्षणार्थ काही लोकांना माजगावला राहण्याची परवानगी दिली. यानंतर सिद्दीने आपले आरमार ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात बाहेर काढले. सिद्दीला इंग्रजांनी मदत केल्याबद्दल संभाजीने इंग्रजांना जाब विचारला आणि १८ ऑगस्टपूर्वी संभाजीराजांनी रात्री उंदेरीवर २०० माणसे पाठविली व तेथे लढाई झाली. ज्यात ८० लोक मारले गेले. त्याची शिरे कापून मुंबईस लोकांना दाखविण्याकरिता सिद्दीनी आणली.[६२] वा. सी. बेंद्रे म्हणतात कदाचित मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीतील मायनाईक भंडाऱ्याच्या मुलाच्या ३०० माणसांनिशी धावून गेल्याचा प्रसंग हाच असावा आणि याच ८० शिरात मायनायकाच्या मुलाचे शिर असावे. संभाजीराजांचा वकील मुंबईत असल्याने इंग्रजांनी ती शिरे व कैदी मुंबईत उतरविण्यास मज्जाव केला. राजापूरकर २५ ऑक्टोबरला सुरतेला कळवितात की संभाजीराजांनी सिद्दीला मदत न करण्याचे सांगितले आहके व असे न केल्यास शिवाजी महाराजांसोबत झालेल्या तहाच्या अटी माणण्यास नकार दिला. तसेच संभाजीराजांनी राजापुरात ५० गुराबे व गलबते आरमारी हल्ल्यासाठी जय्यत तयारीत ठेलिी आहेत. आरमारात ४ ते ५ हजारांची भरती करून ते आरमार दौलतखानाच्या हवाली केले आहे. मुंबईकरांच्या २४ डिसेंबरच्या पत्रात उल्लेख येतो की, सिद्दीचे आरमार वेंगुर्ला बंदराकडे लुटालूट

करण्यास गेले असून त्याच्या प्रतिकारार्थ दौलतखानही आपले आरमार घेऊन त्यांच्या मागोमाग गेला आहे.

सिद्दीचा बंदोबस्त व्हावा म्हणून संभाजीने इंग्रजांशी बोलणी करण्यासाठी आवजी पंडितालाही मुंबईला पाठविले. इंग्रजांनी संभाजीराजांची आरमारी तयारी पाहून इंग्रजांनी सिद्दीकडे वकील पाठवून त्याला ताकीद देण्याचे ठरविले. सिद्दी मुंबईतून निघून त्याच्या आरमारातील एका जहाजावर गेला. अशा परिस्थितीचा विचार करून इंग्रजांनी कॅ. गॅरी व रॉबर्ट थारविन यांना २० डिसेंबरला सिद्दीकडे काही सूचना देऊन पाठविले. सिद्दी इ.स. १६८१ च्या १७ एप्रिल नंतर सुरतला गेला. उंदेरीला त्याने ५०० माणसे ठेवली होती. त्याशिवाय लहान होड्या वगैरे मुंबईला होत्या आणि त्यांच्या रक्षणार्थ इतर माणसे ठेविलीच होती. सिद्दीच्या हालचालींवर देखरेख ठेवण्याच्या गुप्त हेतूने व वरकरणी बोलणे लावण्यास आलेला आवजी पंडित, सिद्दी सुरतला पोहचल्याचे समजताच, इंग्रजांच्या एकंदरीत वागणुकीबद्दल समाधानी होऊन २३ मे १६८१ नंतर रायगडास परत गेला.[६३]

[ब] इ.स. १६८१ मधील घडामोडी :

मुंबईच्या इंग्रजांकडे १६ जुलैपूर्वी बातमी होती की संभाजीराजाने युद्धाची संपूर्ण तयारी केली पण ही तयारी नेमकी कोणाविरोधात केली याबद्दल स्पष्टता नव्हती. वा. सी. बेंद्रे सांगतात की, ही तयारी बखरकार सांगतात त्याप्रमाणे 'दादाजी देशपांड्यासोबत जे आरमाराचे सुभे दौलतरखान, मायनायक, कावजी महमद व गोविंदजी कान्हो सरंजामनिशी दिले' त्यांची ही हालचाल असावी. मुंबईकरांच्या ४ ऑगस्टच्या पत्रावरून असे दिसते की, '१८ जुलैला संभाजीराजांच्या लोकांनी पहाटे उंदेरीवर हल्ला चढवला. ४ तास भांडण झाले. पुष्कळ जखमी झाले व काही मारले गेले. सिद्दीच्या लोकांनी हल्ला परतवला.' सिद्दी संबंळचा मुलगा सिद्दी अहमद हा आरामारात सामील झाल्याची बातमी सुरतला गेली होती आणि त्यावरून मुंबईकरांना त्याला तसे न करू देता त्याला मुंबईतच ठेवून घेण्यास किंवा त्याला पसंत पडत असेल तर सुरतेला पाठविण्यास ऑगस्ट १६८१ च्या सुरुवातीला सांगण्यात आले होते. 'सिद्दी अहमद १६ ऑगस्ट १६८१ पर्यंत तरी माहिमला आपल्या घरात राहात होता.'

मुंबईकरांनी १६ ऑगस्टच्या पत्रात सुरतला कळविले की, सिद्दीच्या लोकांनी पेण खाडीवरील एका शहरातील चार मुसलमान सावरकारांना सिद्दीच्या नावावर फसवून उंदेरीस नेले

त्यांना अमानुषपणे मारले. १८००० अश्रफी द्या तर सोडतो असे सांगितले. १३ ऑगस्टला सिद्दी मराठ्यांचे एक भात भरलेले गलबत चोरले. सिद्दीच्या लोकांनी लुटमार केली म्हणून संभाजीराजांच्या सुभेदारांनी इंग्रजांची गलबते अडवली होती. पण इंग्रजांनी सिद्दीचा बंदोबस्त केल्याचे कळविल्यावर सिद्दी मिस्त्रीने (संभाराजांचा सरदार) ने त्यातील काही सोडली असे मुंबईकर १२ ऑक्टोबरला लिहितात; परंतु २७ ऑक्टोबरच्या सुमारास सिद्दी कासम मुंबई बंदरात आला व ७ डिसेंबरला त्याने संभाजीराजाच्या हद्दीत शिरून आपट्यात जाळपोळ केली.[६४]

[क] इ.स. १६८२ मधील घडामोडी :

सिद्दी कासमने आपट्यामध्ये जाळपोळ केल्याने संभाजीराजांचा रोष आपल्यावर होऊ नये म्हणून इंग्रजांनी सिद्दीची ३ गलबते पकडली. नागोठाणा व आपटा येथे जाळपोळ केलयानंतर सिद्दीने चौल प्रांतात जाऊन जाळपोळ व मारहाण केली. कैद करून बरीच माणसे व लूट नेली. त्यामुळे संभाजीराजांनी दंडाराजपुरीला वेढा दिला. संभाजीराजांच्या आरमारास अरब आरमारही मदत करीत आहे तसेच संभाजीराजांनी पोर्तुगीजांनाही मदत करण्यास सांगितले होते; परंतु याचवेळी हसन अल्लीखान कल्याणला जानेवारीमध्ये आला त्यामुळे त्याचा प्रतिकार करणे आवश्यक असल्याने संभाजीराजे व अकबर आपल्या खास सैन्यानिशी दंडापुरीहून मोगलांना तोंड देण्यासाठी घाईने निघून गेले व वेढ्याचे काम दादाजी रघुनाथकडे सोपविले. एप्रिल-मे अखेरपर्यंत वेढा चालूच होता. मनुष्यहानी यावेळी फार झाली व पावसाळा लागताच वेढ्याचे काम थांबवून परत जाणे भाग पडले. तसेच मोगलांच्या स्वारीनंतर संभाजीराजांना स्वतः कल्याणच्या आघाडीवर जावे लागले होते. दादाजीला रिकाम्या असलेल्या अमात्यपदाचे आमिष लाविले असे एक बखरकार देऊ केली असे लिहितो. ज्या संभाजीराजांनी आपल्या वडिलांच्या आज्ञा अक्षरशः पाळण्यात कसूर होऊ दिली नाही. अशा संभाजीराजांना जातीजातीच्या वैमनस्याचे खूळ आड येण्याचे कारण नव्हते. संभाजीराजांच्या पूर्वीपासूनच आरमारावर व लष्करांवर ब्राम्हण सरकारकूनांची सत्ता राहिलीच नव्हती. ब्राम्हण प्रभु वादाचे उत्तर पेशवाईतील खूळ मल्हाररावची चिटणीशीबाबतची कल्पित कथा बखरकारांनी आपल्या वर्णनात तत्कालीन वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळे घुसडून दिली आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

१९ जानेवारी १६८२ पूर्वीच सिद्दी कासमचे आरमार जंजिऱ्याच्या मदतीस न जाता मुंबई बंदरामध्ये निवाऱ्यास येऊ लागले. बहुधा अरब व मराठे यांच्या जोड आरमारास तोंड देण्याची

तयारी नसावी असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे सांगतात की, सिद्दीला मदत न करण्यासंदर्भात संभाजीराजांनी मुंबईकरांना सूचना दिलेल्या होत्या पण सुभेदाराने त्या ऐकल्या नाहीत. त्यामुळे मुंबईकरांना सिद्दीला मुंबईत राहू देणे भाग पडले. मात्र त्यांनी सिद्दी संभाजीराजांच्या प्रदेशात लुटालूट करणार नाही असे आश्वासन घेतले.

सुरतेचे इंग्रज, मुंबई इंग्रजांना कळवितांना लिहितात, '...जर सुभेदार व सिद्दी केलेला करार पाळतील तर सिद्दीचे आरमार मुंबईस राहिले तरी संभाजीराजे तिकडे फारसे लक्ष देणार नाहीत. सुभेदारांनी आणाशपथा घेऊन कोळेगाव, नागोठाणे, आपटे, बट्टी व सालीर भागात उपद्रव न देण्याबद्दल अभिवचन दिले आहे...' सिद्दी कासम आपल्या आरमारासह हा हुकूम आल्यानंतर ९ मे रोजी मुंबईत आला. 'हे पाहून मराठ्यांच्या आरमारातील ४० गलबते १५ मे ला दुपारी २ वाजता खाडीतून बाहेर आलेली दिसली. सिद्दी २ जहाजे व ८ गलबते घेऊन बाहेर पडला. परंतु मराठ्यांची गलबते त्यापूर्वीच खांदेरीवर गेल्याने सिद्दी १६ मे ला परत आला.' मुंबईकर पुढे लिहितात त्यावरून संभाजीराजांकडील आरमाराची कल्पना येते ते लिहितात, 'संभाजीराजांजवळ ८५ गलबते व ५००० माणसे मायनायकाचा मुलगा व सिद्दी संबळचा मुलगा यांच्या हाताखाली आहेत. ती उंदेरी, चौल किंवा मुंबईतील सिद्दीच्या आरमारावर झडप घालण्यास टपून बसलेली आहेत. सिद्दी संबंळचा मेव्हणा सिद्दी मिस्त्री हा ही संभाजीराजांच्या नोकरीत आहे.'

मराठ्यांच्या आरमाराने यावेळी एक शिबीर खांदेरीजवळ लुटले व लाकडांनी (जळण) भरलेली एक होडी १ जूनपूर्वी जाळून टाकली. जूनच्या अखेरीस (२७ जून ते २ जुलै) संभाजीराजांनी आपले ५००० लोक थळच्या आसपास ठेवले होते. त्यातील काही आरमारासह उंदेरीवर छापा घालण्याच्या उद्देश्याने थळच्या किनाऱ्यावर रात्री जमले. सिद्दीने ते पाहून उंदेरीहून तोफा झाडल्या. दोन होड्या बुडाल्या. मराठ्यांचे एकदोन लोक मेले अधिक नुकसान झाले नाही. मात्र मराठ्यांनी इंग्रजांच्या लोकांचे रु. ४५०० चे नुकसान केले. शिवाय संभाजीराजांनी आपल्या जवळच्या आणखी एका खडकाळ बेटावर तटबंदी कण्यास सुरुवात केली. हे ठिकाण म्हणजे चौलच्या बखरीतील उल्लेखाप्रमाणे अलिबाग किनाऱ्याजवळ मैल दोन मैलावर असलेला 'कुलाबाकोट' असावा असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

ऑगस्टच्या शेवटी सिद्दीने लुटालूटीस सुरुवात केली व लूट उंदेरीला नेऊ लागला; परंतु २८ ऑगस्टला त्याने नागोठण्यास जाऊन नासधूस केली तेव्हा दौलतखानाचे आरमार नागोठण्यास आले. भात वगैरे गोळा करण्यासाठी सिद्दी मिस्त्री ३० गलबतांसह ४ ऑक्टोबरला कोरीस (कार्लेस) आला. ही बातमी इंग्रजांनी सिद्दीला दिल्याने सिद्दी कासम १६ गलबतांसह त्याच्यावर चालून गेला. कोलगावजवळ संघर्ष झाला ज्यात सिद्दी मिस्त्री जखमी झाला व नंतर ५ ऑक्टोबर रोजी तो वारला.

यानंतर इंग्रजांना अशी बातमी लागली की, संभाजीराजांनी दौलतखान व हाजी साला यांना मोगली आरमार येण्यापूर्वी जाळपोळीचा हुकूम दिला आहे. त्यामुळे इंग्रजांनी संभाजीराजांशी मैत्री ठेवण्याचा प्रयत्न केला. २० डिसेंबरला प्रल्हादपंत व मुंबईचा वकील हेन्री स्मिथ हे संभाजीराजाकडे जावयास निघाले; परंतु त्यांची होडी पकडल्याने त्यांना परत मुंबईस यावे लागले. दुसऱ्या दिवशी (२१ डिसें.) एक शिबार बरोबर देऊन बलूनमधून करंजाला पाठविले परंतु बलून करंजाला न जाता एकदम नागोठण्याकडे गेले. सिद्दीने आपल्या बरोबर ४ गलबते घेऊन जाऊन ते वाटेत अडवले. प्रल्हादपंत सिद्दीच्या हाती न लागल्याने शिबार व त्यातील प्रल्हादपंताचे समान व राजांस दिलेले नजराणे होते ते सिद्दी उंदेरीस घेऊन गेला.[६५]

[ड] इ.स. १६८३ मधील घडामोडी :

मोगली आरमाराने सुरतेवरून येतांना वसईच्या खाडीत पोर्तुगीजांना तंबी देऊन ठाणा खाडीतून मोगली सैन्यास दाणागोटा पुरविण्याची सोय करून दिली. या आरमारी लोकांची वर्तणूक सुरुवातीपासून जशी तापदायक होती तशीच ती शेवटपर्यंत राहिली; परंतु एप्रिलमध्ये औरंगजेबाने सर्व सैन्य व आरमार मागे घेण्याचा निर्णय घेतला आणि त्याचप्रमाणे आरमाराचा मोठा भाग सुरतला २३ एप्रिलपूर्वीच जावून पोहचला व राहिलेला काही दिवसात परतेल असा त्यावेळी समज होता. त्यानुसार बाकीचे आरमार ५ जूनपूर्वीच सुरतला गेले. सिद्दी मात्र मागे राहिला. पोर्तुगीजांनी मोगलास केलेल्या मदतीबद्दल त्यास शासन करण्यास अवसर संभाजीराजांना मिळाला. सिद्दीच्या हालचाली पूर्ववत चालू होत्या. त्याशिवाय सिद्दीच्या सैनिकांनी मुंबईच्या बाजारात दोन इंग्रज जखमी केले. त्यातील एक मे ला ज्या पठाणाने हा खून केला त्याला सिद्दीने इंग्रजांच्या ताब्यात न देता सुरतेला पाठविला. 'बर्कले कॅसल' च्या इंग्रज खलाशांची व सिद्दीच्या गलबतांवरील नाखव्यांची मारामारी झाली त्यामध्ये काही मेले व बरेच जखमी झाले.

परंतु सिद्दीने याबाबत केलेली तक्रार मध्येच मिटवून टाकली; परंतु या दोन्ही भांडणांविषयी वाद मात्र अखेरपर्यंत चालू होता म्हटले तरी चालेल. त्याशिवाय सिद्दीने तक्रार केली की, त्याला इंग्रज दाणागोटा घेऊन देत नाहीत व समुद्रात उतरूही देत नाहीत. उलट इंग्रजांनी तक्रार केली की, सिद्दी ५० रुपये घेऊन परवाना देतो व तो न घेतल्याशिवाय कोणी व्यापारी मुंबई बंदरात मचवा आणिल तर तो पकडतो. सिद्दी इ.स. १६८३ ह्या सर्व वर्षभर संभाजीराजांच्या प्रदेशात चोरून मारून आगळीक करीत राहिला.

संभाजीराजे पोर्तुगीजांच्या गोव्यावर चालून गेल्याने व सिद्दीलाच ऑक्टोबरमध्ये वेंगुर्ल्यांकडे जावे लागल्याने मुंबईकरांच्या व त्या सभोवतातील संभाजीराजांच्या प्रदेशातील त्याचा उपद्रव कमी झाला.[६६]

[इ] इ.स. १६८४ मधील घडामोडी :

मोगली आरमार गोव्याला १९ जानेवारी १६८४ रोजी पोहोचले; परंतु मार्चच्या सुरुवातीस मोगली सैन्य मागे फिरले आणि त्याचबरोबर आरमार व सिद्दीही परत फिरला. सिद्दीला इतक्या निग्रहाने बाहेर काढण्यास मुंबईच्या बंडखोर गव्हर्नरला केजविनला जो आत्मविश्वास वाटला त्याचे मुख्य कारण म्हणजे यापूर्वीच त्यांनी संभाजीराजांशी केलेली मैत्री होय असे बेंद्रे सांगतात. केजविनने बेट ताब्यात घेताच मोगली सरदाराने बेटावर पकडलेल्या संभाजीराजांच्या वकिलाला सोडवून घेऊन संभाजीराजांकडे पाठवून दिले. यावेळी सिद्दी विरोधात इंग्रज व संभाजीराजे यांच्यात एकमेकांना सिद्दीविरोधात मदत करण्यासंबंधीचा करार झाला हे आपल्याला संभाजीराजांच्या पत्रावरून[६७] दिसून येते.

[ई] इ.स. १६८५ मधील घडामोडी :

सिद्दी कासम १६८५ चा पावसाळा संपेपर्यंत मुंबईकडे न आल्याने काही काळ शांततेचा गेला. त्यामुळे संभाजीराजांचे आरमार बाहेर पडू शकले. संभाजीराजांच्या आरमारास दक्षिणेत शत्रू नव्हता. परंतु मुंबई बेटावर सुरतकरांचा ताबा आलेला पाहताच सिद्दी आपल्या माणसांना मुंबईला राहू देण्याबद्दल दबाव आणू लागला. सुरतकरांनी सिद्दी कासमच्या सांगण्यावरून महमद बेगला मुंबईस त्याच्या घरात राहू देण्यास ८ मे ला आणि १६ व १९ जुलैला लिहिले. या काजी अब्दुल्लाच्या मुलानंतर काजी अल्लीचा मुलगा काजी अनवरूद्दीनबद्दल २९ मे ला लिहिले. सिद्दी कासम पावसाळ्यात सुरतेला असला तरी दंडाराजपुरीचे लोक मुंबईच्या व्यापारी गलबतांना त्रास

देत होतेच. इ.स. १६८५ मध्ये सिद्दी कासम मुंबईकडे आला नसला तरी दंडाराजपुरीचा सिद्दी खैरातखान त्याचे काम पाहात होता. खैरातखान संभाजीराजांच्या हद्दीत शिरून लुटमार करील इतकी त्याच्याजवळ आरमारी शक्ती नव्हती. त्यामुळे याही वर्षात सिद्दीचा विशेष त्रास झाला नाही.

[उ] इ.स. १६८६ मधील घडामोडी :

इ.स. १६८६ मध्ये दुर्भिक्ष्य वाढल्याने फारशी हालचाल झाली नाही. सिद्दी कासम मोगली आरमार परत घेऊन गेला तो मागे आलाच नाही. मुंबईच्या पाठबळाशिवाय त्यास समुद्रात फक्त चाचेगिरी करू देण्याइतकी मोगलाची परिस्थिती नव्हती. त्यात त्याना फ्रेंच, डच, पोर्तुगीज व इंग्रज यांच्या सुसज्ज आरामाराशी तोंड द्यावे लागले असते. त्यामुळे सिद्दी कासमचा सर्व अधिकार जंजिऱ्याच्या सिद्दी खैरातखानाकडे गेला असावा असे दिसते असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[६८]

[ऊ] इ.स. १६८७ मधील घडामोडी :

इ.स. १६८७ ला लंडनहून आलेल्या पत्रातून समजते की, मुंबई इंग्रजांना संभाजीराजांशी मैत्री दृढ करण्यासंदर्भात सांगितले होते. त्यामुळे मुंबईकरांना मोगली आरमार व सिद्दी यांना थारा न देण्याचा आदेश पाळणे भागच होते. मोगलांना विजापूरासंदर्भात यश मिळाले त्यावरून त्यांनी संभाजीराजांवर सर्व बाजुंनी हल्ला करण्याचे ठरविले. परंतु गोवळकोंड्याचा वेढा, शहा अलम व अझमवरील नाराजी, दुर्भिक्ष्य व रोगराई यामुळे मोगली हल्ला तितकासा परिणामकारक होऊ शकला नाही. यावेळी खैरातखानाशिवाय पश्चिम समुद्रात आणखी आरमार व सरदारांची नेमणूक झाली. मोगली आरमार सिद्दी मिरझा यांच्या अधिपत्याखाली सुरतेहून आले व उंदेरी अगर दंडाराजपुरीला जाण्यासाठी सिद्दी कासमच्या आरमाराची वाट पाहात होते असे इंग्रज सांगतात. सिद्दीचे आरमार १४ जानेवारीला उंदेरीला गेले व नंतर १७ जानेवारीला उंदेरीहून हे मोगली आरमार सुरतकडे पळून जायला लागले याचे खरे कारण म्हणजे डच व मोगल यांचे वैमनस्य झाले होते व डचांनी सुरतेची ४ गलबते बुडविली, २ जाळली, एक त्यांनी त्यांच्या उपयोगासाठी ठेवले आणि एक लुटीच्या मालासह व त्या आरमाराधिपतींसह बंदरात आणले होते सात हजार रुपये दिल्याशिवाय त्याची सुटका न करण्याचा निर्धार आहे. ही बातमी ऐकून मोगल सिद्दीचे आरमार १७ जानेवारीला घाबरून पळून गेले असे इंग्रजांच्या १८ जानेवारीच्या पत्रातून

कळते. यामुळे इंग्रजांनीही सिद्दीचा विरोध करण्याचे ठरविले त्यामुळे संभाजीराजांच्या प्रदेशातील त्रास थांबला शिवाय खैरातखानाचे व सिद्दी कासमचे भांडण होते. सिद्दी कासमने जंजिऱ्याच्या वेढ्याच्या वेळी खैरातखानाला मदत केली नव्हती व कासम दंडाराजपुरीला जाऊन राहिला नव्हता. त्यामुळे सुरतेचे आरमार निघून जाताच सिद्दी खैरातखान खांदेरीवर आला. सिद्दी खैरातखान दंडाराजपुरीहून उंदेरीस आला व त्याने नागाव खाडीच्या तोंडावरील कळवण्याच्या कोटाला वेढा दिला. सिद्दीला त्यात यश आले तर खांदेरीचा किनाऱ्याशी संबंध तुटल्याने धान्यसाहित्यविना उपासमार होऊन खांदेरी सिद्दीच्या हातात येईल असे वाटत असताना दोन-तीन दिवसाच्या वेढ्यानंतर सिद्दी वेढा उठवून सुलतान अकबराच्या शोधार्थ राजापूरच्या बाजूला गेला. अकबर जैतापूरला राहात होता म्हणून सिद्दी तिकडे गेला. जैतापुरच्या खाडीत सिद्दी खैरातखान व संभाजीराजांच्या सैन्यात संघर्ष झाला या संघर्षात सिद्दीचे ४०० लोक ठार झाले व सिद्दीस चार मोठ्या जखमा झाल्या. परंतु तो मुष्किलीने वाचला. मराठ्यांनी त्याची चार गलबते धरली. बाकीची घेऊन तो दंडाराजपुरीकडे गेला असे मुंबई इंग्रजांच्या ४ मार्चच्या बातमीवरून समजते.[६९]

[ए] इ.स. १६८८-८९ मधील घडामोडी :

यानंतर सिद्दी कासम पावसाळ्यानंतर आरमारासह उंदेरीवर आला. पण डचांबरोबर इंग्रजांशीही वैमनस्य झाले म्हणून हे आरमार इंग्रजांची व डचांची लढाऊ गलबते बंदरात येताच सुरतेकडे निघून गेले. नंतर हे आरमार पुन्हा पावसाळ्यानंतर म्हणजे इ.स. १६८८ च्या ऑक्टोबरात उंदेरीला आले व त्याने तेथून मुंबईवर हल्ला केला. या मुंबईवरील हल्ल्याची माहिती मुंबईकर लंडनला ९ मे १६८९ ला लिहिल्या पत्रात देतात की, १५ फेब्रुवारी १६८९ रोजी पहाटे सिद्दी आपल्या बऱ्याच लोकांनिशी बेटावर आला नंतर तो माजगावात आला. लेफ्टिनंन्ट ऑर्थरने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला पण अपयश आले. जनरलने आणखी मदत पाठविली दोघांत बराच संघर्ष झाला. नंतर पकडलेली धान्याची गलबते परत करा तर जातो असे सिद्दीने सांगितल्यावरून त्याची मागणी जनरलने मान्य केली व गलबते स्वाधीन केली. पण सिद्दीने जाळपोळ चालूच ठेवली. या संघर्षात इंग्रजांचे खूप नुकसान झाले. सिद्दी ६ एप्रिलला जमीनमार्गे दमणजवळील बलसाडला गेला; परंतु पोर्तुगीजांनी त्यांच्या राज्यातून जाण्यास मज्जाव केला.

यावेळी औरंगजेबाने इंग्रजांसोबतचा संघर्ष थांबविण्याचा आदेश दिल्याने सिद्दी २५ जून १६८९ ला सुरतला गेला.

वा. सी. बेंद्रे सांगतात की, जर संभाजीराजे ही स्वारी होण्यापूर्वी मोगलाच्या हाती लागले नसते तर इंग्रजांना त्यांचे तात्काळ साहाय्य मिळाले असते व सिद्दीच्या हातून उंदेरी व जंजिरा तेव्हाच सर करून सिद्दीचा कायमचा बंदोबस्त करता आला असता. असो. इ.स. १६८९ च्या अखेरीस कोकणातील रायरी व इतर गड मोगलांच्या ताब्यात गेले होते. मुंबईसभोवतालील सर्व भागही मोगलांच्या ताब्यात आला होता. फक्त खांदेरी, कुलाबा व पद्मदुर्ग मात्र मराठ्यांच्या ताब्यात राहिले होते. सिद्दीच्या लढ्यात जरी अपयशाचे धनी व्हावे लागले तरी मराठ्यांची त्यामुळे आरमारक्षेत्रात व्याप्ती व प्रगती होऊ शकली. याच धकाधकीत अनुभवाने तयार झालेले कान्होजी आंग्रे यांनी आपल्या चिकाटीने व मेहनतीने पुढे याही आरमारी युद्धकलेत मराठ्यांच्या आरमारास श्रेष्ठत्व प्राप्त करून दिले व या युद्धकलेत निष्णांत व जगातील अनुभवांनी सिद्ध असलेल्या युरोपीय व अरब नाविक सरदारांनासुद्धा आपल्या पराक्रमाने ते पटवून दिले.[७०]

५.१८ संभाजी महाराज व इंग्रज संबंध

शिवाजी महाराजांच्या अखेरच्या काळात इंग्रजांनी आपली राजापुरची वखार बंद करण्याचे ठरवून तेथील माल व नोकर आणण्यासाठी माणसे पाठविली होती. ही माणसे पोहचण्यापूर्वी वखारीला शिवाजी महाराजांचा हुकूम नसल्याने काही माणसे तेथे ठेवून बाकी नोकर व इतर लोक थोडी मालमत्ता घेऊन परत आले होते. पुढे शिवाजीराजांचा मृत्यू झाल्याने राहिलेली मालमत्ता संभाजीराजे राज्यावर येऊन परवानगी देईपर्यंत अडकून राहिली होती. संभाजीराजांनी आपला सुभेदार चौलास नेमल्यानंतर राजापूरच्या इंग्रजांनी आपल्या मालमत्तेसह परत जाण्यास मे १६८० च्या सुरुवातीस परवानगी मागितली; परंतु संभाजीराजांच्या नवीन हुकूमाशिवाय परवानगी देता येत नाही. म्हणून सांगितल्यावर इंग्रजांनी आपली माणसे संभाजीराजांची परवानगी घेण्यासाठी पन्हाळ्यावर पाठविली; परंतु सध्या अन्य कामात गुंतल्याने तुमच्या विनंतीचा नंतर विचार करीन म्हणून सांगून त्यास संभाजीराजांनी परत पाठविले. संधी साधून इंग्रजांनी दोन वेळेला संभाजीराजांशी बोलण्यासाठी आपली माणसे पाठविली; परंतु काही उपयोग झाला नाही. यानंतर इंग्रजांनी सिद्दीला व त्याच्या मंत्र्याशी बोलणी करणे टाळले असे वा. सी. बेंद्रे दाखवून देतात व सांगतात की, यानंतर १८ ऑगस्टला संभाजीराजांनी उंदेरीवर हल्ला

केला पण तो तितका यशस्वी झाला नाही. यापूर्वी २६ जूनला संभाजीराजांकडे जी इंग्रजांची माणसे गेलेली होती ती २५ ऑक्टोबरला परत आली. त्यांनी संभाजीराजांची पत्रे आणली ज्यामध्ये संभाजी राजांनी म्हटले होते की, जोपर्यंत इंग्रज सिद्दीला मुंबईच्या बाहेर पाठविणार नाही व मुंबईतून सिद्दीला जी माणसांची मदत मिळते ती थांबणार नाही. तोपर्यंत इंग्रजांशी कोणतेही बोलणे होणार नाही उलट त्यांच्या विरोधात कडक उपाय योजून दिले गेलेले बक्षीस परत वसूल केले जाईल. यानंतर संभाजीराजांनी मुंबईच्या भोवती व राजापूरला आरमार सुसज्ज करण्यास सुरुवात केली परिणामी मुंबईकरांनी सिद्दीला तात्पुरते दूर केले.[७१]

[अ] इ.स. १६८१ मधील संबंध :

११ फेब्रुवारीला संभाजीराजांनी धरणगाव लुटले. ज्यामध्ये इंग्रजांचे थोडे नुकसान झाले. काही तक्रारीवरून मुंबईकरांनी मुंबईत हिंदुंच्या मालकीची गुरे न मारण्याचे हुकूम दिले आणि संभाजीराजांचा वकील आवजी पंडित मुंबईत राहिल्याने सर्वत्र शांततामय वातावरण निर्माण झाले. सिद्दी आपल्या सर्व आरमारासह वेंगुर्ल्याच्या बाजूला गेला होता तो पावसाळा लागणार म्हणून मुंबईत परत येत असल्याच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. सिद्दी मार्चच्या सुरुवातीस किंवा थोडा पूर्वी परत मुंबईकडे आला असे बेंद्रे सांगून लिहितात की, याचवेळी लंडनचा हुकूम आला की कोणाशी भांडण करू नये कोणी स्वतःहून त्रास दिला तरच प्रतिकार करावा. अर्थातच सिद्दी व संभाजीराजे यांच्यामधील शत्रुत्वाच्या विशिष्ट परिस्थितीत कसे वागावे हा मोठा प्रश्न मुंबईकरांना पडला. सिद्दीची मदत थांबविण्यासाठी मुंबईकरांनी जाहीरनामा काढला की, कोणी सिद्दीची नोकरी केल्यास त्याचे घरदार जप्त करून त्यांना मुंबईबाहेर काढून दिले जाईल; परंतु या जाहिरनाम्याचा अंमल करण्यास उशीर झाला. सिद्दीच्या लोकांनी कोर्ले भागात पुन्हा लुटालूट केली. तेव्हा संभाजीराजांच्या लोकांनी कोर्लेला आलेल्या १० होड्या पकडल्या. तेव्हा मुंबईकरांनी सिद्दीचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्या होड्या १२ ऑक्टोबर १६८१ पूर्वी सोडल्या. तसेच बेटावरील मूळचा पुजारी ख्रिश्चन झाल्यामुळे गलीझीर (?) नावाचे देऊळ हिंदूच्या मागणीवरून हरभटाच्या ताब्यात पूजाअर्चेसाठी दिले.

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सिद्दीने पुन्हा आपटे, कोर्ले वगैरे भागात जाळपोळ केली. त्यामुळे अन्नधान्य मिळविण्यात इंग्रजांना त्या भागात अडथळा केल्याने त्यांची बिकट परिस्थिती झाली. विशेषतः संभाजीराजांनी पुष्कळ तांदूळ वगैरेचा साठा आपल्या किल्ल्यात

करून ठेवल्याने इतरत्र सहज धान्य मिळणे कठीण झाले होते. शेवटी मुंबईकरांनी सिद्दीचा बंदोबस्त करीत असल्याचे सांगितल्यानंतर डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात इंग्रजांना कोर्ले खुले करण्यात आले.[७२]

[ब] इ.स. १६८२ मधील संबंध :

सिद्दीला मुंबईकर त्याच्या प्रदेशात राहू देतात म्हणून इ.स. १६८२ मध्ये संभाजीराजांनी अरब आरमारांशी संगनमत करून 'एलिफंटा' जवळील एक बेट घेऊन तेथे किल्ला बांधण्यास सुरवात केली व स्वत: जंजिऱ्यास जाऊन वेढा घातला. त्याचवेळी धान्यासाठी गेलेल्या मुंबईकरांच्या तीन होड्या पकडल्या. मुंबई इंग्रजांनी संभाजीराजांचा वकील सुंदरजी बाजी याच्यामार्फत इ.स. १६८२ च्या सुरुवातीस त्या सोडवून नेल्या.

१९ जानेवारी १६८२ ला मुंबईकरांनी सुरतेला मुंबईच्या परिस्थितीची स्पष्ट कल्पना दिली ती वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात- मुंबईकर लिहितात, "समुद्र किनाऱ्यावरून इंग्रज व पोर्तुगीज या दोघानांही घालवून देणे भाग आहे असे संभाजीराजे म्हणत असल्याचे कळविले. धान्य महाग झाले आहे. सर्वत्र संभाजीराजांनी आपले लोक ठेवले आहेत. चोरून मारून धान्य मिळविण्याची शिकस्त करीत आहोत. फार तर अन्न आपल्या नोकरचाकरांना पुरविता येईल. इतर लोकांची काय वाट होईल न कळे. सिद्दी कासम तर जंजिऱ्याच्या मदतीस न जाता गलबते आणून पावसाळ्याच्या निवाऱ्यास येथेच राहणार म्हणतो." पुढे ते शेवटी लिहितात की, "जर सिद्दी येथेच पावसाळा काढणार असेल तर आपणांस चौकीपहारा वाढविला पाहिजे. सर्वत्र जागता पहारा ठेवून संभाजीराजांकडून सिद्दीवर केव्हा छापे येतील याजवर लक्ष ठेवावे लागेल. संभाजीराजे सिद्दीवर अतिशय चिडलेले आहेत. शिवाय आम्ही त्याच्या माणसांस धान्य नाही. तेव्हा काहीतरी करून सिद्दी पावसाळ्यात मुंबई बंदरात न राहील असे करणे जरूर आहे तरच आम्हाला संभाजीराजांशी शांततेने व मैत्रीने राहाता येईल." परंतु सुरतकरांनी मोगलांच्या भीतीने सिद्दीबाबत थंड राहण्याचे ठरविले होते. उलट मोगलांचा हुकूम होताच महमुद रझाक नावाच्या एका सरदाराची मुंबईत तो राहील तितका वेळ ठेवण्यासाठी १२ मार्च १६८२ ला लिहिले होते.

मुंबईकरांनी २८ मार्चला पुन्हा सुरतकरांना लिहिले की, "...अवघे १३६ इंग्रज व १५७ टोपासी जवळ आहेत. त्यापैकी तुमच्या जवळील 'हंटर'वर २४ गेले. बेटावर चढाई करण्यास उतार तर निरनिराळ्या जागी बरेच आहेत. अशा स्थितीत राजासारख्या बलवान शत्रुपासून

आपल्या बंदराचा बचाव करणे कठीण आहे. ते दंडाराजपुरी घेण्याच्या बेतात आहेत. ती त्यांचे हाती आली म्हणजे ते या किनाऱ्याचे मालकच होतील... सर्व परिस्थितीचा पूर्ण विचार करून तुम्हास पुन्हा एकदा विनंती करतो की पावसाळ्यात सिद्दी येथे न राहील असे करा..." सारांश सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, सुरतकर वाटेल ते समर्थन करून मुंबईकरांना व सुरतकरांच्यामधील द्वेषास वाढीस लावीत होती. परंतु शेवटी काहीही उपयोग न होता मुंबईकरांना ९ मे रोजी सिद्दीस बंदरात घेणे भाग पडले. सारांश, आपली कातडी वाचविण्याकरिता सुरतकरांनी मुंबईकरांचा बळी देण्याचा प्रयत्न केला होता. असे त्यांच्या याकाळातील झालेल्या पत्रव्यवहारावरून कळते. या वर्षाच्या शेवटपर्यंत मुंबईकर सुरतकरांना सिद्दीच्या वास्तव्यामुळे होणाऱ्या नुकसानीची कल्पना देत राहिले व सुरतकर त्यांना टाळत राहिले.[७३]

[क] इ.स. १६८३ मधील संबंध :

इ.स. १६८३ च्या फेब्रुवारीपूर्वी संभाजीराजांच्या आरमाराची व इंग्रजांच्या 'प्रेसिडेंट' महागिरीची लढाई झाली. नंतर २६ फेब्रुवारीला सुरतला अशी बातमी आली की, ४ जानेवारीला कारवारला जाऊन तेथून सुरतला येत असतांना संभाजीराजांच्या राजापुरावरून निघालेल्या सहा गलबतांची व त्या महागिरीची गाठ पडली. संभाजीराजांच्या लोकांनी महागिरीत चढून ११ लोक ठार व ३५ जखमी केले. शिवाय वाटेत ११ लोक मेले व एक पंगू होता. त्यामुळे पुढे प्रवास झेपणे कठीण म्हणून 'प्रेसिडेंट' महागिरी गोव्यात शिरला. संभाजीराजांच्या ६ गलबतापैकी ३ बुडली गेली. हेन्री स्मिथ संभाजीराजांकडून परत आल्यानंतर संभाजीने अपेक्षित अशी पावले उचलली नाही हे पाहून सुरतकरांची निराशा झाली. 'प्रेसिडेंट' महागिरी सुरतला गोव्यातून परस्परच गेली व तेथे ७ मार्चला पोहोचली. प्रेसिडेंटच्या लढ्याची बातमी त्याला वार्डकडून समजली व तिची राजापुरात आलेली बातमी पाहून संभाजीराजांच्या मारल्या गेलेल्या लोकांबाबतचे शासन त्यालाच भोगावे लागेल की काय अशी भीती त्यालाच नव्हेत तर राम शेणव्यालाही वाटल्याने तेथे नावाला एक माणूस ठेवून ती सर्व मंडळी लवकर पळून गेली. त्यामुळे स्मिथने तेथून निघून जाण्याच्या केलेल्या घाईमुळे संभाजीराजांची स्मिथसोबत चर्चा होऊ शकली नाही असे वा. सी. बेंद्रे त्यावेळच्या प्रल्हादपंतांची, हेन्री स्मिथची व चार्लस् वार्डच्या पत्रांच्या आधारे सांगतात.

वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात की, इंग्रजांनी जरी वकील पाठवून संभाजीराजांशी मैत्री संपादण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यांनी सिद्दीस मुंबईत राहायला देऊन स्वराज्यावर

अत्याचार करण्यास मोकळीक दिलीच होती. इतकेच नव्हे तर मोगली आरमार आल्याने तर सिद्दीच्या लोकांनी व मोगली आरमाराने इंग्रजांची बेटावरील सत्ता धुडकावून लावून तेथे वाट्टेल तसे वागण्यास सुरुवात केली. एक दोन इंग्रजही मारले; परंतु मोगली सेना व आरमार मुंबईच्या आजुबाजूस असल्याने सुरतकरांच्या हुकूमावरून हे सर्व सहन करणे मुंबईकरास भाग होते. प्रल्हादपंतास नेणारे शिबार व त्यातील सामान लुटल्याबद्दल सुरतच्या सुभेदाराचा हुकूम मिळवून मुंबईकरांनी ती लूट परत मिळवण्याचा प्रयत्न केला; परंतु सिद्दीने काहीच भरपाई करून दिली नाही. उलट मुंबईकर संभाजीराजांना दारूगोळा व तोफा देतात म्हणून तक्रार करून सुरतहून मुंबईकरास समज देवविली.

मुंबईकर २२ सप्टेंबर १६८३ ला लंडनला कळवितात, "मोगली आरमार एवढ्या मोठ्या माणसांच्या जमावानिशी इतका दीर्घ काळ राहिले व सिद्दीचे आरमार पावसाळ्यासाठी नेहमीच राहात असल्याने आमचा सर्व धान्याचा साठा संपतो व दुर्भिक्ष्य वाढते. हे आरमाराचे काफिले यापुढे येथे राहणार नाहीत. अशी जर त्वरित काही योजना न झाली तर आपल्या सैनिक वगैरेंना येथे त्यांच्या पगारात राहणे दुष्कर होईल. पूर्वीप्रमाणे संभाजीराजे व पोर्तुगीज आम्हास गुरेढोरे आणू देत नाहीत. जे काही आम्ही मिळवितो ते चोरून आणतो. त्याबद्दल आम्हाला दोन तृतीयांश अधिक किमंत द्यावी लागते... २८ मे ला सिद्दीच्या लोकांचे व आपल्या दोन इंग्रजांचे भर बाजारात भांडण झाले व त्यात त्यांनी दोघांना उर्मटपणाने जखमी केले."

याशिवाय सिद्दीने या वर्षात नवीनच उपक्रम सुरू केला होता. संभाजीराजांच्या प्रदेशातून मुले पळवून आणून मुंबईत तो विकत असे. मुंबईकरांनी तक्रार केल्यावरून अशी मुले विकत घेण्याची सक्त मनाई करा म्हणून सुरतकरांनी हुकूम दिला. हा उपक्रम चालू दिला असता तर जी चोरून-मारून धान्य सामग्री मिळत होती तीही लोकांनीच बंद केली असती. याच सुमारास संभाजीराजांनी पोर्तुगीजांचे माहिम, केळवे, धंतुरा, सारगाव, सोपारा घेतले व सायबाग (सागाव) जाळले. परंतु जेव्हा संभाजीराजांनी करंजा घेतला तेव्हा मुंबईकरांचा धीर सुटला व त्यांनी सुरतकरांना २३ डिसेंबर १६८३ ला निर्वाणीचा खलिता पाठविला व संभाजीराजांच्या आक्रमक धोरणाची जाणीव करून दिली. पण सुरतकरांचे उत्तर येईपर्यंत सुरतकर व त्यांचे धनी ईस्ट इंडिया कंपनी यांच्या हातून मुंबई गेली होती; आणि मुंबईच्या जनतेने त्यांचे बेजबाबदार जूं

झुगारून दिले होते. जनतेने मुंबई ताब्यात घेतली होती व केजविनला गव्हर्नर निवडून २७ डिसेंबर १६८३ ला मुंबई बेट व कोट हे स्वतंत्र राज्य म्हणून जाहीर केले होते.[७४]

[ड] इ.स. १६८४ मधील संबंध :

मुंबईत जनतेने जे बंड केले होते त्यासंदर्भात सुरतकरांनी यांना मदत मिळू नये व गलबते मुंबई बंदराज जाऊ नये म्हणून सिद्दीच्या संगनमताने उंदेरीवर कंपनीची दोन इंग्रज माणसे व पोर्तुगीजाशी सख्य करून वर्सोव्हाला काही इंग्रज अधिकारी ठेविले होते. तरीसुद्धा काही लंडनची जहाजे मुंबई बंदराज गेलीच व बंडखोरांस त्यावरील लोकांनी मदत केली. केजविनने २६ एप्रिलपूर्वीच कॅ. गॅरीला संभाजीराजांकडे तह करण्याकरिता पाठवले होते. त्यापूर्वी आणखी एक वकील संभाजीराजांकडे जाऊन आला होता. वा. सी. बेंद्रे म्हणतात, बहुधा १६ फेब्रुवारीचे प्रल्हादपंताचे पत्र आल्यानंतर कोणीतरी वकील पाठविला गेला असावा. त्याने संभाजीराजांची भेट मार्च-एप्रिलमध्ये बिरवाडीस घेतली. त्यानंतर कॅ. गॅरी, थॉमस विल्किन्स व राम शेणवी हे जाऊन राजांना भेटले व एप्रिलमध्ये (जास्तीतजास्त १६ मे पूर्वी) तह घडवून आणिला.

संभाजीराजांनी याबाबत एक पत्र लिहिले होते. त्याचा इंग्रजी मसुद्याचा सारांश वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "सन्मान्य (राजश्री) कॅप्टन गॅरी, थॉमस विल्किन्स आणि राम शेणवी यांनी आम्हास जाहीर केले की, तुम्ही आम्हाशी मैत्री व सामोपचाराचा पत्रव्यवहार ठेवू इच्छिता. आमची तशीच फार इच्छा आहे. तुमचा एक वकील आम्हास विखाडीस भेटून गेला. त्याने तुमचा मनोदय कळविला व त्याबरोबर आम्ही आमची मान्यता पाठविली. आता तुम्ही तुमचा मनोदय तपशीलवार लिहून पाठविला. त्या तहाच्या अटीस आम्ही संमती पाठविली आहे ती मिळेलच. तरी तुम्ही त्या अटींचे परिपालन करावे. आम्हीही त्या पाळू. आमच्या वचनावर विश्वास ठेवून वागणे. दिवसेंदिवस आपल्या मैत्रीचे संबंध दृढ होत जातील असे करणे. ज्या ज्या वेळी आमचे प्रतीतील कवी कलश किंवा आमचे वकील तुम्हास लिहितील त्या त्या वेळी आपण त्याची नीट दखल घ्यावी. कॅप्टन गॅरींनी आम्हास सांगितले की तुमचे व सिद्दीचे वितुष्ट आले आहे. त्यास्तव आपण त्याला काढून लावण्यासाठी आमच्या साह्याची अपेक्षा करिता. तरी सिद्दी आमचा दुष्मन आणि तुम्ही मित्र म्हणून सर्वतोपरी साह्य करणे आम्हास आवश्यक आहे. तुमचा मित्र तो आमचा मित्र व तुमचा शत्रु तो आमचा शत्रू हे जाणून तुमचे परी तुम्ही सिद्दीचा नाश करण्याचा प्रयत्न करा आणि आम्हीही तसेच करीत आहोत. तुमच्या शत्रुचा तुम्हास नाश करणे सोपे जावे

म्हणून आम्ही तुम्हास सर्वतोपरी मदत करू. आपली मैत्री वृद्धिंगत होवो. अधिक काय लिहिणे."[७५]

तीस कलमी तहाचा मसुदा मुंबईसाठी व अकरा कलमी कर्नाटकासाठी ठरून ती कलमे संभाजीराजांनी मान्य केली. ती वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात. सर्वप्रथम कर्नाटकचा तह इंग्रजी मसुद्यावरून भाषांतर करून देतात -

'संभाजीराजांचा छत्रपती राजशक १० (१५ मे १६८४ पर्यंत) मुंबईच्या गव्हर्नरने (कॅ. रिचर्ड केजविन) कॅप्टन हेन्री गॅरी आणि थॉमस विल्किन्स यांस वकील म्हणून व राण शेणवी यास दुभाषा म्हणून पाठविले. त्यांनी कर्नाटकमध्ये वखारी काढण्याबद्दल मनसुबा सांगितला. त्यावरून त्यांच्या विनंतरीचा विचार करून पुढील अटी करार करून देत आहोत. त्या -

(१) इंग्रजांनी वाटेल त्या ठिकाणी वखारी स्थापाव्यात. सांप्रत ते तिवेनापट्टम, कुडालोर आणि कोनिमेर येथ काढीत आहेत त्या काढाव्यात व नंतर जेथे त्यांस वाटतील तेथे त्या काढाव्यात. त्यांस वखार बांधण्याकरिता ६० कोविद लांब व १५ कोविद (Covids) रुंद जमीन द्यावी. वखारीची उंची २ १/२ कोविंद कोविद व भिंतीची रुंदी अर्धा कोविद राहील. त्यापेक्षा अधिक नाही. आणि त्यांना अधिक जागेची जरूर भासली तर व्यापारी जशी बाजारात दुकाने बांधतात त्याप्रमाणे दुकाने बांधावीत.

(२) इंग्रजांशी व्यापार करण्यासाठी जे व्यापारी, रंगारी आणि विणकर येतील आणि ज्यांच्याजवळ इंग्रजांचा माल असेल त्यास हवालदार किंवा सुभेदारांनी त्रास देऊ नये. उलट त्यास शक्य ती मदत करावी.

(३) मालाची ने-आण करताना तो सांभाळण्यासाठी इंग्रजांनी मजूर किंवा रखवालीसाठी इतर लोक नोकरीत घ्यावेत. अशी माणसे मालाच्या दृष्टीने जरूर तेवढीच ठेवावीत आणि तसे केल्यास सुभेदार किंवा इतर अधिकारी त्यांना अडवणार नाहीत; परंतु ते जर जरूरीपेक्षा अधिक ठेवतील तर त्यास परवानगी मिळणार नाही.

(४) माझ्या राज्यात इंग्रजांची किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांची व्यापार करतांना जर चोरी झाली तर त्या चोराला सुभेदार किंवा हवालदारापुढे नेऊन त्याचेकडून न्याय करून चोरांकडून भरपाई करून मिळेल.

(५) जो माल इंग्रज आयात करीतील त्यावर २ १/२ टक्के जकात देतील आणि निर्यात करतील त्यावर जकात नाही व इतर काही ताप होणार नाही.

(६) माझ्या राज्यातील एखादा व्यापारी किंवा रहिवासी काही जिन्नस किंवा व्यापारी माल घेऊन इंग्रजांचे किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांचे देणे लागत असेल व ते देत नसेल तर त्याला सुभेदाराकडे किंवा अधिकाऱ्याकडे नेले जाईल व तो खरेच देणे लागत असेल तर त्याच्या मानइतमामाकडे न पाहता कर्जफेड करावयास लावली जाईल.

(७) इंग्रजांना माझ्या राज्यातील कोणाही माणसास गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यास विकत घेता येणार नाही.

(८) वादळामुळे किंवा अन्य उत्पातामुळे जर एखादे जहाज, गुरब किंवा होडी माझ्या राज्यातील एखाद्या बंदरात लागली तर ती जप्त करून सरकार जमा होऊ नये, हा रिवाज इतर ख्रिश्चन लोकांच्याबाबत रूढ असेल तर ती सवलत इंग्रजांनाही देण्यात येईल.

(९) इंग्रजांची सूचना की माझ्या राज्यातील कोणी सुभेदार यांना जो माल लागेल तो ते देतील; परंतु राजांचे किंवा वरील अधिकाऱ्यांच्या विनंती व्यतिरिक्त जो माल घेतील तो देणे किंवा न देणे इंग्रजांच्या इच्छेवर राहावे. तरी माझ्या सरकारकुनांचे पत्र असेल तर माल दिला पाहिजे. परंतु त्याविना माल देणे किंवा न देणे इंग्रजांच्या मर्जीवर अवलंबून राहील.

(१०) इंग्रजांनी सुचविले की त्यांच्या नोकरांवर डोईपट्टी होऊ नये. जर इतर ख्रिश्चन लोकांबाबत असाच रिवाज असेल तर इंग्रजांनांही त्याचा फायदा मिळेल.

(११) इंग्रजांची सूचना की, इतर इंग्रज व्यापाऱ्यांना वर निर्देशित केलेल्या सवलतीपेक्षा अधिक सवलती मिळत असतील तर त्या त्यांनाही मिळाव्यात. तरी अशा सर्व सवलती इंग्रजांना मिळतील.

सेंट फोर्ट जॉर्ज येथील इंग्रजांच्या लिहिण्यावरून वरील तहाची अकरा कलमे इंग्रज वकीलांनी संभाजीराजांकडून मान्य करून घेतली. शिवाजी महाराजांच्या वेळी विकत घेतलेल्या माणसांमागे कडक जकात द्यावी लागत असे. परंतु संभाजीराजे यांनी गुलामांच्या व्यापाराला संपूर्णतः बंदी घातली होती. ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे असे वा. सी. बेंद्रे निदर्शनास आणून देतात.[७६]

इंग्रज वकिलांनी मुंबईसाठी मुख्य कलमे ठरविली ती तीस (३०) असून त्यात जुन्या भांडणाचा कायमचा निकाल लावण्यात आला होता ती तहाची कलमे वा. सी. बेंद्रे पुढील प्रमाणे देतात-

"संभाजी राजा, छत्रपती राजशक १० ... करार करून देत आहेत व पुढील सुरुवातीचा मजकूर वरील तहाप्रमाणे-

१. माझ्या नोकरांकडून जो त्रास इंग्रजांस दिला गेला किंवा माझ्याशी जे त्यांचे भांडण झाले ते त्यांनी विसरून जाऊन त्याचा विचार काढू नये किंवा त्याबद्दल आकस ठेवून नये. मीही तसेच करावे. हा करार झाल्यानंतर जर काही कमी जास्त चुकून घडले तर त्याचाही विचार न करता एकमेकांशी बोलून मैत्री राखावी हा मुद्दा मान्य आहे.

२. इंग्रजांना व त्यांच्या व्यापाऱ्यांना माझ्या राज्यात व बंदरात येण्याची मुभा असावी. व्यापारार्थ माल आयात करणे व निर्यात करणे तो नेहमीची ठरीव जकात देऊन करावा. जकातीवरील अधिकाऱ्यांनी इतर निष्कारण त्रास देऊ नये. अशी सवलत माझ्या व्यापाऱ्यांना व प्रजेला इंग्रजांच्या बंदरात मिळेल. करार मान्य.

३. (प्रथम भाग कर्नाटकाच्या कलम ४ प्रमाणे) माझ्या राज्यात... भरपाई करून मिळेल. माझ्या प्रजेच्या बाबतीतही इंग्रज हीच व्यवस्था पाळतील.

४. इंग्रजांची जहाजे, गुराबे किंवा होड्या व्यापारी माल आणण्या नेण्यास रवाना झाल्या असता त्यातील एखादे वादळी हवेमुळे जर राज्यातील बंदरात शिरले तर त्याला हवा निवळताच परत जाण्यास विना त्रास किंवा जकात न घेता परवानगी द्यावी. परंतु एखादे जहाज वगैरे वादळाने फुटून जर किनाऱ्यास लागले व माझ्या सुभेदारांनी वगैरे पकडले तर त्यांनी त्यास शक्य ती मदत करून त्यातील जो माल आयात होईल त्यावर नेहमीप्रमाणे जकात द्यावी. माझ्या वडिलांच्यावेळी जो शिरस्ता होता तोच मी पाळीन व इतर व्यापाऱ्यांना ज्या सवलती मिळतील त्या माझ्याही बंदरात मिळतील. करार मान्य.

५. माझा व इंग्रजांचा जो तह झाला आहे त्यात जर कोणी मतभेदाचा प्रश्न काढला तर तो दोघांनी विचारविनिमय करून मिटवावा. तहास कोणत्याही प्रकारे बाधा आणून देऊ नये. दोघांस मान्य.

६. माझे व मोगलांचे सारखे युद्ध चालू आहे. त्यात माझ्या लोकांनी मोगली प्रदेशात लुटमार करिताना जर इंग्रजांच्या वखारीचीही लूट केली व माल नेला तर तो माल सुभेदारांना किंवा हवालदारांनाही परत करावा. तसेच एखादे वेळी जर आमच्या वखारीचे लोक किंवा अडते कैद केले गेले तर त्यांस त्रास न देता सोडून द्यावे.

७. माझी व मोगलांची अनेक गलबते समुद्रात वावरतात. तरी मोगलांचे एखादे जहाज माझ्या लोकांनी धरिले आणि त्यात जर इंग्रजांचा माल असला व त्यावर खुणा वगैरे असल्या तर त्या खुणा वगैरे पटवून दिल्यास त्यांना त्यांचा माल परत मिळावा. इंग्रजांनीही धरलेल्या जहाजात, होड्यांत वगैरे माझ्या प्रजेचा माल आढळल्यास तो त्यांनी माझ्या प्रजेस परत द्यावा. दोघास करार मान्य.

८. फोर्ट सेंट जॉर्जच्या कलम ५ प्रमाणे.

९. इंग्रजांनी सुचविले की, राजापुराहून बालाघाटकडे जाणाऱ्या त्यांच्या मालावर आदिलशाहीत जशी जकात घेतली जाई तशी घ्यावी. तरी जी जकात आज रूढ असेल तीच घेतली जाईल.

१०. इंग्रजांना व त्यांच्या व्यापाऱ्यांना माझ्या राज्यात व बंदरात माझ्या रहिवाश्यांकडून व व्यापाऱ्यांकडून न्याय्य किंमतीस वाटेल तो माल विकत घेण्यास मुभा असावी. सुभेदार किंवा इतर अधिकाऱ्यांनी रीतसर जकात घ्यावी. त्याखेरीज आकसाने किंवा इतर कारणाने अडवू नये.

११. पोर्तुगीज, डच व इंग्रजांमध्ये लढा चालू आहे. तरी आम्ही इंग्रजांना किंवा त्यांना लढ्यात मदत करणार नाही. इंग्रज व माझ्यात झालेला हा तह बिनविरोध दोघांकडून पाळला जावा.

१२. फोर्ट सेंट जॉर्जचे कलम ६ प्रमाणे. शेवटी पुस्ती : आणि इंग्रजही हाच करार माझ्या प्रजेच्या वगैरे बाबतीत पाळतील.

१३. एखादे इंग्रज किंवा त्यांचा अधिकारी गुन्हा करून माझ्या हद्दीत पळून आला आणि त्याबाबत माझ्या अधिकाऱ्याकडे मागणी केली तर त्याला पकडून इंग्रजांच्या ताब्यात देण्याची माझे अधिकारी खबरदारी घेतील. असाच करार माझ्याही माणसांबाबत इंग्रज पाळतील.

१४. माझ्या प्रजाजनांपैकी कोणी जबरदस्तीने इंग्रजांच्या वखारीत शिरेल व भांडण करील तर त्याच्या गुन्ह्याचे पारिपत्य सुभेदार चौकशी करून करतील; आणि दोष इंग्रज माणसाकडे असेल तर त्याला सुभेदार शृंखलाबद्ध करतील व मुंबईस कळवितील. त्यांचे उत्तराप्रमाणे त्याला शासन करतील किंवा सोडून देतील.

१५. मुंबई बेटावर जळणाची वाण असल्याने इंग्रजांना माझ्या प्रदेशात ते विकत घेण्यास व जकातीविना नेण्यास परवानगी असावी. मागील प्रघात पुढे चालू राहील. जकात मागे घेतली जात होती. यापुढेही ती त्याचप्रमाणे घेतली जाईल.

१६. इंग्रजांची राजापुराला एक वखार होती. त्यावेळी राजापूरच्या व्यापाऱ्यास माल विकला होता. त्याबाबत इंग्रजांचे लेणे आहे. तरी त्याबाबत सुभेदार व हवालदार यांनी चौकशी करून न्याय्य तो वसूल करून देणे.

१७. इंग्रजांनी नागोठणे व पेण येथे वखारी काढाव्यात; परंतु त्यांना घाटावरून आयात निर्यात केलेल्या सर्व मालावर राजापूरला जशी जकात देत होते तशी द्यावी लागेल. त्यांना इतर त्रास होणार नाही.

१८. फोर्ट सेंट जॉर्जच्या ७ व्या कलमाप्रमाणे.

१९. इंग्रजांकडून खुदाबंदपूर व इतर ठिकाणांहून जो माल घेतला होता त्याबाबत माझे बडील शिवाजीराजे यांनी १० जहार पाछाई होन देण्यास संमती दिली होती. त्या रकमेतून राजापूरची वखार बांधण्यास जो खर्च आला तो व त्यावर आणखी होणार तो आणि जी रक्कम आतापर्यंत दिली गेली. ती वजा जाता जी बाकी राहील ती इंग्रजांना नारळ व सुपारी यांच्या रूपाने मी देईन.

२०. फॅक्टरी बांधकामाच्या तपशिलाचा मजकूर सेंट फोर्ट जॉर्जच्या कलम ९ प्रमाणे. शेवटी अधिक मजकूर असा : 'मात्र अशी वखार बांधण्यास परवानगी फक्त ज्या इंग्रजांना कॅ. रिचर्ड केजविन यांनी मान्यता दिली असेल त्यालाच द्यावी. इतर इंग्रजांना देऊ नये.'

२१. फोर्ट सेंट जॉर्जच्या कलम २ ऱ्या प्रमाणे.

२२. इंग्रजांनी फक्त टाकसाळीतच नाणी पाडण्याकरिता सोने व चांदी आणावी, इतरत्र नाही. अशा सोन्याचांदीवर नेहमीचे व्याज द्यावे लागेल.

२३. फोर्ट सेंट जॉर्जच्या ३ ऱ्या कलमाप्रमाणे.

२४. फोर्ट सेंट जॉर्जच्या ९ व्या कलमाप्रमाणे.

२५. इंग्रजांनी सूचना केली की, सुभेदारांनी मुंबईस वकील पाठवू नयेत. माझ्याशिवाय कोणीही वकील पाठविणार नाही. मोठा व महत्त्वाचा प्रश्न असेल तर मीच वकील पाठवीन. परंतु इतर वेळी सामान्य बाबतीत सुभेदार एखाद्या माणसाबरोबर पत्र पाठवतील व उत्तर नेतील.

२६. फोर्ट सेंट जॉर्जच्या ११ व्या कलमाप्रमाणे.

२७. इंग्रजांनी असे सुचविले की त्यांचे सिद्दीशी वाकडे झाले आहे. तेव्हा जर अशा परिस्थितीत माझी मदत लागली तर ती मी देईन.

२८. इंग्रजांनी सुचविले की ते ज्या ठिकाणी माल विकत घेतात तेथे एकदाच जकात घ्यावी. नंतर तो नेत असता वाटेत अटकाव होऊ नये; परंतु जी जी चाल माझ्या बापापासून चालत आहे तीच यापुढे चालेल. ती सुरुवातीपासूनच लागू आहे.

२९. फोर्ट सेंट जॉर्जच्या २० व्या कलमाप्रमाणे.

३०. इंग्रजांनी असे सुचविले की त्यांच्या फत्तेमारीस जाण्यायेण्यास संपूर्ण मुभा असावी. त्यांनी आणलेली व नेलेली पत्रे विनाविरोध जाऊ द्यावी असल्या फत्तेमारींशी इंग्रजांच्या सिलासह जी पत्रे आणली असतील तेवढीच फक्त सील तपासल्यानंतर आवडली जाणार नाहीत.

या करार केलेल्या कलमाप्रमाणे काहीही भानगड न काढता वागू कलमे पाळू."[७७]

तहाच्या अटीप्रमाणे इंग्रजांनी ज्या ज्या गोष्टीबाबत नुकसान भरपाई मागितली त्याबाबतच्या आज्ञा संभाजीराजांनी ताबडतोब काढल्या आहेत व मुंबईकरांनाही नकला पाठवून कळविल्या आहेत. यामधून मराठ्यांच्या लुटीबाबत ज्या अवास्तव कल्पना आहेत त्या निदान शिवाजी-संभाजी काळाला तरी कशा लागू पडत नाहीत याची साक्ष देतात. त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीत बिनचूक नोंद करण्याबाबत कशी खबरदारी घेतली जात असे व न्यायान्याय पाहाण्याच्या कामी राज्यतंत्र कसे दक्ष असे याची कल्पना येते.[७८]

केजविन आल्यानंतर त्याला संभाजीराजांचा राग शांत करणे गरजेचे होते. सिद्दीला मुंबईत राहू न दिल्यामुळे नवे सरकार त्रयस्थपणे राहू इच्छिते याची त्याने साक्ष पटवून दिली. सिद्दीशी शत्रुत्व स्वीकारल्याने संभाजीराजांशी मैत्री पाहिजे या त्यांच्या म्हणण्याला महत्त्व आले.

तसे पाहिले तर संभाजीराजांची इंग्रजांकडून अपेक्षा एवढीच होती की, त्यांनी मुंबईत सिद्दीला थारा व साहित्य पुरवून संभाजीराजांच्या प्रदेशात उपद्रव देण्यास मदत करू नये. केजविनने कॅ. गॅरीला पाठविले व तह घडून आला.

१५ सप्टेंबरला लंडनला जाणाऱ्या जहाजाबरोबर केजविन पत्र लिहून कळवितो की, 'आम्ही शंभुजीकडे कॅ. गॅरी व ले. विल्किन्स पाठविले होते. त्यांनी तह मुक्रर करून आणला. संभाजीराजांनी त्याबरोबर १२००० बक्षिसाच्या पगोड्याची रक्कमही देण्याचा हुकूम दिला आहे. आतापर्यंत कोणासही ही रक्कम वसूल करणे शक्य झाले नव्हते ती मी कंपनीकरिता वसूल करून दिली आहे. इतकेच नव्हे तर त्याच्या राज्यात कोठेही वखारी काढण्यास, घरे बांधण्यास, वाहतूक व पत्रव्यवहार करण्यास परवानगी मिळविली आहे.' वा. सी. बेंद्रे सांगतात की, तसे पाहिले तर संभाजीराजांनी कोणत्याही अधिक सवलती दिल्या नव्हत्या व जे काही निष्कारण किंवा चुकीने अथवा जबरदस्तीने घेतले होते तितकेच परत देण्याचा हुकूम दिला होता. असे हुकूम देतांना राजापूरच्या वखारीवर केलेला सर्व खर्चही वसूल केला. शिवाय इंग्रजांच्या मैत्रीमुळे सिद्दीचा परस्पर बंदोबस्त होऊन त्याचा राज्यातील भागात होणारा उपद्रव व त्या प्रीत्यर्थ होणारा खर्च व प्रजेचा त्रास वाचला. त्या मानाने संभाजीराजांनी ठरलेली व रीतसर देणे असलेलीच भरपाई केली. ती अगदी क्षुल्लक होती.

सुरतकरांनी केजविन व मुंबईतील बंडखोरांविरूद्ध लंडनला कळविले. त्यामुळे जॉन चाइल्ड मुंबईजवळ फेब्रुवारीत आला व त्याने बंडखोरांची समजून घालण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याला अपयश आले. शेवटी थॉमस ग्रॅन्थॅम सुरतेहून ३० ऑक्टोबरला निघाला. ३ नोव्हेंबरला मुंबई बंदरात येऊन त्याने केजविनची भेट घेतली. वाटाघाटी करून सर्वांना माफी देऊन १० नोव्हेंबरला त्याने बेटाचा ताबा घेतला. परंतु त्याने केलेल्या करारात फक्त बंडखोरांच्या नेत्यांचाच माफीचा उल्लेख असल्याने इतरांनी तो अमान्य करून पुन्हा थोडी धांदल केली. शेवटी कराराच्या अटी ठरून १९ नोव्हेंबरला मुंबईच्या बंडाची समाप्ती होऊन ग्रॅन्थॅमने पैसा वगैरे सर्व ताब्यात घेतला. एकंदरीत केजविनने मुंबईची बंदिस्ती वगैरे सर्व खर्च बेटाच्या उत्पन्नातून भागवला असल्याने नंतर जरी सुरतकरांनी आपली गेलेली अब्रू परत मिळवण्यासाठी वाटेल ती विधाने केली असली तरी लंडन व मुंबईच्या सर्व लोकांना केजविनच्या राजकारभार कौशल्याचे सरसत्व पटले होते.

**[इ]	इ.स. १६८५ मधील संबंध :**

वा. सी. बेंद्रे सांगतात की, फेब्रुवारी १६८५ च्या सुरुवातीला संभाजीराजांनी पुन्हा धरणगाव वगैरे सुसंपन्न प्रांतावर धाड घातली. त्यात इंग्रजांचे थोडे नुकसान झाले. या काळात सुरतकरांनी संभाजीराजांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पुढे मुंबईकरांकडून कारवारला सांगून संभाजीराजांनी एका व्यापाऱ्याचे जहाज पकडले होते ते परत मिळवण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे ते सोडविण्याबाबत संभाजीराजांचे व पेशव्यांचे हुकूम मिळाले. मुंबईकरांनी नंतर केजविनने केलेल्या तहाच्या आधारे संभाजीराजाच्या प्रदेशात वखारी काढण्याच्या आवश्यकतेबद्दल लिहिले. पण सुरतकरांनी तात्पुरते वखारी बांधण्यास थांबण्यास सांगितले. शेवटी मराठ्यांनी कोर्ले भागातील भात व जळण नेण्यावर जकात बसविली. तेव्हा इंग्रजांनी रिचर्ड स्टॅनलेला पाठविले. १२ ऑक्टोबरला त्यांची प्रथम भेट झाली. तेथे प्रल्हाद निराजीचीही भेट झाली सुभेदार, हवालदार इंग्रजांपासून Boon व Canalarian घेतात. ती माफ केली असली तरी घेतात, अशी निळोपंताकडे तक्रार केली. निळोपंतानी उत्तर दिले की, कराराप्रमाणे तुम्ही कोठे वखारी काढल्यात? शिवाय ही जकात व्यापाऱ्यांपासून घेतो. तेव्हा स्टेनले म्हणाला, आम्हाला सुरक्षितता वाटली नाही म्हणून वखारी काढल्या नाहीत. तेव्हा निळोपंत म्हणाले, अद्यापपर्यंत सिद्दीला लुटालूटीस तुम्ही येऊ देत आहात. तेव्हा स्टॅनलेने उत्तर दिले की, सिद्दी मुंबईहून येत नाही, उंदेरीहून येतो. निळोपंतानी सांगितले की ठीक आहे. हे खरे की नाही हे पाहण्यास आम्ही मुंबईस वकील ठेवतो. तुमचाही वकील इकडे ठेवा. तेव्हा स्टॅनलेने वेळ मारून मुंबईस विचारून सांगतो म्हटले. ऑक्टोबरच्या महिन्यात अकबराच्या मदतीस गेलेल्या संभाजीराजांच्या सैन्याने भडोच ताब्यात घेतले. तेथे बरीच जाळपोळ केली; परंतु इंग्रजांच्या वखारीला उपसर्ग दिला नाही.[७९]

**[ई]	इ.स. १६८६-८७ मधील संबंध :**

इ.स. १६८६ मध्ये मुंबईकरांचे सर्व लक्ष मुंबई बेटावरील कोट वगैरे बांधणे यातच गेले. यावर्षी सिद्दीची माणसे बंदरात येऊन राहिली होती. सिद्दीलाही आता मुंबईच्या बाजूला लुटमार करण्याची गरज राहिली नव्हती. कारण त्याला इतरत्र मोगलांचे साह्य मिळाल्याने तो तिकडेच गुंतला होता. सिद्दीने आपल्या हस्तकांकडून ४ 'हाउजर्स', २ 'सुर्नेस' (Sirnes) आणि मोठ्या तोफांसाठी मोठे ओंडके उसणे मागितले. इंग्रजांनी टाळाटाळी केली. नंतर 'दंडाराजपुरीचा सिद्दी'

याने खांदेरी घेण्याची तयारी चालविली होती. इंग्रजांना ते समजले. मुंबईकरांनी ऑक्टोबर १६८६ मध्ये सुरतकरांना लिहून सांगितले की, 'जर आपण संभाजीराजांकडे माणूस पाठविला व त्याजकडून त्यास सिद्दीबरोबर भांडण देण्यास सवड होईपर्यंत खांदेरी आपल्याकडे मागून ती आपण सांभाळली तर आपल्या बेटास सिद्दीचा उपद्रव होणार नाही. हे जर करणे असेल तर ते ताबडतोब केले पाहिजे. कारण सिद्दीने पेण घेतल्यासारखेच आहे.' संभाजीरांचा वकील मुंबईस स्टॅनलेच्या भेटीनंतर आला होता; परंतु तो आजारी पडून गेल्याने त्याच्याऐवजी कोणाला तरी पाठविण्याची गरज भासली होती. शिवाय संभाजीराजांना दारूगोळ्याचीही मदत करण्याबाबत सुरतकरांना लंडनहून आदेश आला होता. आजारी होऊन गेलेला वकील लवकरच मेला. दुसरा वकील १ मार्च १६८७ पूर्वीच आला होता. त्याला मुंबईत घेऊन जाण्याची व्यवस्था करावयाची होती. वकील नंतर आला. परंतु सुरतकरांची मान्यता उशिरा आली. सप्टेंबरमध्ये जॉर्ज वेल्डन व रॉबर्ट ग्रॅहम संभाजीराजांकडे गेले. त्यांनी संभाजीराजांशी बोलणे करून काय निष्पत्ती केली ते मुंबईकरांनी ३० नोव्हेंबरच्या दिग्दर्शित केले आहे. त्यातील संबंधित भाग असा : '...सध्या आपण धान्यसामुग्रीच्या शोधात आहोत. हल्ली ते येथे दुप्पट महाग झाले आहे. आम्ही संभाजीराजे याजजवळ कोर्लेबद्दल बोललो. त्यात आम्ही त्याच्याशी करार केला की, त्याने आम्हांस २० खंडी भात (तांदुळ) व ५०,००० रूपये रोख द्यावे आणि आम्ही त्याचा कोर्लेभाग शत्रुपासून समुद्राच्या बाजुने रक्षण करावा. त्याने आमच्याशी आणखीही काही करार केला असता. परंतु आम्ही सध्या एव्हढ्यावरच आवरते घेतले आहे.[८०] या कराराची युक्तता जाणून आम्ही मचवा व होड्या पाठविल्या आहेत. परंतु अद्याप धान्य किंवा पैसा काहीच आला नाही. मात्र या कराराने पोर्तुगीज व सिद्दी यांना काळजी वाटत आहे आणि ते जरा आढ्यतेनेच बोलत आहेत; परंतु आम्ही त्यांनी काही हालचाल केली तर त्यांस कणखरपणा दाखविण्यास समर्थ आहोत.' यावरून या काळात इंग्रज संभाजी संबंध मैत्रीपूर्ण प्रस्थापित झाले होते असे दिसते.

[उ] इ.स. १६८८-८९ मधील संबंध :

इ.स. १६८८ मध्ये सर्वत्र बरीच गडबड उडाली. पुढे सिद्दीने मुंबईवरच हल्ला केला. त्यामुळे इंग्रज व संभाजीराजे आपापल्या आघाड्या सांभाळण्यात गुंतले होते. इ.स. १६८८ च्या अखेरीस सिद्दीने मुंबईतच उतरून गडबड केली. तो काळ व संभाजीराजांविरूद्ध शिर्क्यांनी

केलेला फितूर व त्यातच संभाजीराजांच्या दुर्दैवी कैदेचा प्रसंग ओढवल्याने इंग्रजांना सिद्दीशी एकाकीच लढा द्यावा लागला. अशा प्रकारे वा. सी. बेंद्रे यांनी इंग्रज संभाजी संबंध स्पष्ट केले.

इंग्रज संबंधासंदर्भातील संभाजीराजांच्या निर्णय कौशल्याविषयी सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, इंग्रजापासून स्वराज्याचे संरक्षण करण्यासाठी सैन्यबळाच्या अभावामुळे संभाजीराजांनी इंग्रजांना २०० खंडी भात व ५० हजार रुपये देऊ केले. यावरून हा भाग संरक्षित ठेवण्यासाठी हा मनुष्यबळाचा व्यय संभाजीच्या इतरत्र आवश्यक असणाऱ्या सैन्यबलावर किती ताण पाडीत होता व तो किती त्रासदायक व खर्चाचा होता याचा बोध होऊ शकेल. सिद्दीच्या हातात एकच अजिंक्य जंजिरा असता तर हे नुकसान वर्षभर होत राहिले नसते; परंतु खांदेरीच्या लढ्यात उंदेरी सिद्दीच्या ताब्यात गेल्याने आणि उंदेरी ही केवळ इंग्रजांच्या तटस्थ पक्षपाती वृत्तीचा फायदा मिळवून टिकवीता येत असल्याने संभाजीराजांच्या मुलुखावरील त्यांच्या चाचेगिरीचे संकट अधिक तीव्रतर झाले आणि त्यात त्यांच्या ज्यात्याच क्रूर स्वभावाची भरत पडली होती.

जोशिया चाइल्डने मुंबईतील उठावानंतर जे नवे धोरण अंमलात आणण्याचा नंतर आटोकाट प्रयत्न केला; परंतु सुरतच्या सर जॉन चाइल्डने त्याला सारखा पायबंद देत राहून जोशिया चाइल्डच्या महत्त्वाकांक्षेस बरीच मुरड घातली. हा इंग्रजांच्या साम्राज्यवादाचा पाया हिंदुस्थानात घालण्याचा प्रयत्न इ.स. १६८४ मध्ये विचारात व इ.स. १६८८ मध्ये आचारात आणण्यात आला. वा. सी. बेंद्रे येथे स्पष्ट करतात की, संभाजीराजांनी मात्र हा इंग्रजांचा डाव ओळखून त्यांच्या वखारबांधणीवर व मनुष्यबलावर नियंत्रण घालण्याचा निर्बंध घालून साम्राज्याची कल्पना तात्काळ साकार होऊ दिली नव्हती. संभाजीराजांवरील संकट व त्यास अत्यंत आवश्यक असणाऱ्या व देऊ केलेल्या अन्नसामुग्रीचा लाभ तेवढा त्यांच्या फलेच्छेस पोषण झाला नाही. त्याचबरोबर संभाजीराजांच्या न्यायी; परंतु जातीने करीत असलेल्या शीघ्र व काटेकोर अंमलबजावणीने इंग्रजांनाही शिवकाळातील सरकारकुनांच्या लाचलुचपतखोर वर्तणुकीसारखे कारण देत राहून लपंडावी राजकारण खेळता येणे शक्य झाले नाही. सुभेदार सरकारकून राजांच्या पूर्ण आज्ञेत आहेत यांचीही इंग्रजांना जाणीव झाली होती. शिवाय इंग्रजांच्या सर्व पत्रव्यवहारात चुकूनही संभाजीराजांच्या व्यक्तिदोषाचा उल्लेख येत नाही, ही देखील विशेष लक्षात घेण्यासारखी बाब आहे[८१] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

५.१९ संभाजी महाराज व आदिलशाही संबंध

वा. सी. बेंद्रे सांगतात की संभाजीराजे व आदिलशाहा यांच्या परस्परांतील वैर, मैत्री किंवा संबंध याबद्दल मराठी बखरकारांनी काहीही माहिती दिलेली नाही अथवा उल्लेखही केलेला नाही. यासंदर्भात शकावलीमध्ये नोंदी येतात त्या बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात - जानेवारी-फेब्रुवारी १६८३: सुलतान अजमशाह येऊन कोल्हापुरापोवेतो धाविला. त्यास हंबीररायाने फिरावून भवरे (भीमे) पलीकडे लाविले. ११ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर १६८३: दरम्यान दिलेरखानाने विश घेऊन देह सोडला. एप्रिल १६८४: शहा आलम विजापूराजवळ शेक्स म्हणून गाव आहे तेथे बैसला. विजापूरकरांनी मोगलासी बिघाड केला. मे १६८५: बबुंरखान रणमस्तखान येऊन विजापूरास वेढा घातला. मे १६८६: भागानगरकरी विजापूरास मदतीस तीन हजार स्वार तीन लक्ष होन खर्चास दिल्हे. शहा अजम व बहादुरखान यैसे जाऊन भागानगर लुटिले. याच महिन्यात (मे १६८५) मादणावरी हाल करून मारले. त्याचा भाऊ अकंणा मारिला. क्रोड रुपये देऊन मोलासी सला केला. जून १६८५ त औरंगजेब अहमदनगरीहून कूच करून सोलापूरास आले. विजापूरावरी मोहिम केली. जून-जुलै १६८५ त राजे (संभाजी राजे) यांनी विजापूरच्या मदतीस कबजीस पाठविले. ते जाऊन पन्हाळा राहून फौजा रवाना केल्या. नंतर जून-जूलै १६८६ त अवरंगजेबे सोलापुरीहून येऊन विजापूरासी लगट केला. १३ सप्टेंबर सोमवारी विजापूर अवरंगजेबे घेतले. सुलतान सिकंद भेटला. यासी नजरबंद केले. सरजाखान व बहलोलखानाचा लेक यासी पंचहजारी दिल्ही.[८२] जेधे शकावलीलुसार विजापूरचा संघर्ष तीन-साडेतीन वर्ष चालला आणि त्यात संभाजीने भाग घेतला होता असे समजते असे बेंद्रे सांगतात.

परमानंदाच्या मुलाने आपल्या लिखाणात कालनिर्देश दिला नाही पण या संघर्षाचा तपशील जरा अधिक विस्ताराने दिला आहे. तो लिहितो : "आदिलशाही व कुत्बशाहीच्या सीमेवरील गुलबर्ग्याजवळ मादण्णाच्या साह्याने विजापूरकरांनी मोगली सैन्याशी फार मोठा लढा दिला. त्यात मोगली सैन्याची दुर्दशा केली. नंतरही भांडण चालूच राहिले. संभाजीराजांचेही मदतीबद्दल अभिवचन मिळाल्याबद्दल विजापूरकरांस धीर आला. त्यांनी विजयदुर्ग लढविण्याची जोरात तयारी केली आणि संभाजीराजे इतरत्र मोगलांच्या मोठ्या सैन्याशी झुंजत असतांनादेखील शंभूनेही आपले मोठे सैन्य त्यांच्या मदतीस पाठविले. शत्रुच्या सैन्याशी तुमुल युद्ध झाले. तेव्हा मोगली सैन्य भयभीत झाले. त्यांची पुष्कळ मनुष्यहानी झाली. दिवसेंदिवस मोगली सैन्यास मदत

आल्याने भांडण वाढू लागले. शंभू त्यास तोंड देत राहिला. यावेळी संभाजी कुत्बशाह व आदिलशाह यांची संधी होऊन एकजूट झाल्याने मोगलास जयाची आशा नव्हती. मोगलाने कुत्बशाहीवर हल्ला चढविला. भेद करून मादण्णाचा खून करविला आणि सला केला. तेव्हा कुत्बशाहाची प्रत्यक्ष मदत बंद झाली. औरंगजेबाने लढ्याची सुत्रे आपल्या हाती घेतली. भेद करून आदिलशाही सरदारांस फोडले. सर्जाखान व बहलोलखानादी यवन सरदार मोगलास फितूर होऊन मोलाचे हवाली केला. शिकंदरला संरक्षक न राहिल्याने मोगली सैन्यास किल्ल्यात प्रवेश करून किल्ला व शिकंदर औरंगजेबाच्या हाती पडले. मोगली सैन्याने आनंदाने जयघोष करीत किल्ला ताब्यात घेतला. या शेवटच्या काळात संभाजीराजांचा सुमंत्री राजदूत म्हणजे वकील थोड्या लोकांनिशी व सपत्निक किल्ल्यात होता. तो या फितुराने ओढावलेल्या आपत्तीस न भिता आपल्या माणसांनिशी तेथून निसटला व स्वराज्यात आला. संभाजीराजांनी त्याच्या या कार्याचा गौरव केला." वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की, शकावली व परमानंदाच्या मुलाने केलेल्या या युद्धवर्णनाचा काहीही उल्लेख बखरीतून येत नाही. यावरून शंका येते की संभाजीच्या महत्त्वाच्या हालचालींकडे जाणूनबुजून रामचंद्रपंताची बाजू सजविण्यासाठी दुर्लक्ष केले असावे. पेशवे उत्तरकालीन बखरकार यांच्या या कारवाईला नंतर बळी पडले.[८३]

इ.स. १६७९ च्या शेवटी जरी शिवाजीराजे व आदिलशाहा यांच्या मैत्रीसंदर्भात करार झाला असला तरी हा करार फार काळ टिकला नाही. महिना पंधरवाड्यातच मोगल व आदिलशाहा यांच्या जोड सैन्यांनी शिवाजीराजांच्या पन्हाळ्यावर हल्ला करण्याचे ठरविले; परंतु शिवाजी-संभाजीराजांनी जी जालना-धरणगावच्या बाजूस १६७९ च्या अखेरीस लुटमार केली. त्यामुळे दिलेरखानाला उत्तरेत जावे लागले. पुढे शहा अलम अकबराच्या बंदोबस्तासाठी ससैन्य गेल्याने सन १६८० अखेरपर्यंत जशा मोगलांचया दक्षिणेत हालचाली होऊ शकल्या नाही तशाच त्या आदिलशाहाच्याही अंतर्गत भांडणामुळे झाल्या नाहीत.[८४] संभाजी महाराज तर घरच्या राजकारणात गुंतले होते.

इ.स. १६८१ मध्ये आदिलशाहा व मोगल बादशाहा यांच्यामध्ये मैत्रीसंबंध प्रस्थापित करण्यासाठी आपसात प्रयत्न झाले. यासाठी दोघांत अनेक पत्रव्यवहार झाले ज्यात एकमेकांच्या मैत्रीसंदर्भात विश्वास दाखविण्यात आला व संभाजीचे साम्राज्य संपविण्यासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. यानंतर औरंगजेब नोव्हें. १६८१ मध्ये बऱ्हाणपुरास आला. पुढे थोड्याच दिवसात

आदिलशाहा व कुत्बशाहा यांचे मोठमोठे व नामांकित उमराव येऊन औरंगजेबास भेटले. त्यास योग्य तो मानमरातब मिळाले. याचवेळी औरंगजेबाच्या फर्मानाप्रमाणे आदिलशाही सरदारांनी मोगलांच्या मदतीने संभाजी राजाविरूद्ध हालचाली केल्या.[८५]

इ.स. १६८२-८३ मध्ये औरंगजेबाने आदिलशाहाला संभाजीविरूद्ध आक्रमक हालचाली करण्यास सांगितल्या पण आदिलशाहीत अंतर्गत अस्थिरता निर्माण झाल्याने आदिलशहा तसे करू शकला नाही. औरंगजेबाला खूष करण्यासाठी आदिलशाही सरदारांनी संभाजीराजांबरोबर लढाईही दिली असती. परंतु तेथील राज्यकारभार विसकळीत झाल्याने व पैसाही हाती नसल्याने त्यांना तसे करता आले नाही. तसेच शहा आलम अडचणीत सापडला असताना विजापूरकरांनी त्याला कोणतीही मदत दिली नव्हती. त्यामुळे औरंगजेबाचा समज झाला होता की, आदिलशाहा संभाजीराजांनाच मदत करीत आहे.

वा. सी. बेंद्रे सांगतात की, विजापूरकरांना संभाजीराजांच्या विरूद्ध जाण्याची ताकद नव्हती आणि संभाजीस मदत करून मोगलाचा क्रोधही सहन करण्याची तयारी नव्हती. अशा त्यांच्या निकृष्ट परिस्थितीत ते जे द्वैधीकरणभावाचे राजकारण खेळत होते ते सर्व त्यांच्या अंगावर आले आणि शेवटी आदिलशाहीलाच मोगलांच्या क्रोधास प्रथम बळी पडावे लागले. मोगल व आदिलशाही यांचा प्रत्यक्ष संघर्ष सुरू झालेला दिसताच संभाजीराजांनी आदिलशाहीला मदत करण्यास सुरुवात केली. कारवारकर १५ जूनला लिहितात, "....बिचारा आदिलशहा मात्र पेचात सापडला आहे. शेवटी त्याला आपल्या मनाविरूद्ध वागावे लागले. संभाजीराजे मात्र त्याला पैशाची व माणसांची फुकट मदत करीत आहेत..." याचा संदर्भ दिल्यानंतर बेंद्रे सांगतात की, आदिलशहास संभाजीराजांच्या मदतीची आशा वाटू लागली. त्याचवेळी शहा अजमने आदिलशहास सामोपचाराने मिळविण्यासाठी त्यास वस्त्रे पाठविली. ती ३ जुलैला आदिलशहाने समारंभाने घेतली. नंतर अजमचे पत्र आले. ते आदिलशहाच्या हाती २२ ऑगस्टला पडले. त्यातील मजकुराचा तपशील समजत नाही; परंतु बहुधा त्यामध्ये विजापूरला वेढा घालण्याची धमकी दिली असावी असे बेंद्रे सांगतात व पुढे सुरतकरांच्या २२ ऑगस्टच्या पत्रातील मजकूर देतात, "मोगली फौजा विजापूरावर चालून जात आहेत. अशी बातमी आहे की शत्रुने त्यास पळवून लाविले. त्यांचा पराभव करून अगदी दाणादाण उडविली. शहाजादा अजम तारा यास दोन जखमा झाल्या. परंतु तो थोडक्यात बचावला" कारवारकरांच्या १५ सप्टेंबरच्या पत्रात जो

उल्लेख आला तो बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "मोगली फौजा विजापूरच्या तटाभोवती वेढा देऊन आहेत. गोवळकोंड्याचा राजा, संभाजीराजा व आदिलशाहा यांचा एक गट झाला आहे. ते त्रिकूट मोगलांशी संगर करण्याच्या तयारीत आहे. या वर्षी भांडणाचा निकाल लागेल आणि हे या प्रांताचे धनी होतील..." औरंगजेबाने ९ ऑक्टोबरला शहा अलमला फार मोठी मदत पाठविली व २८ डिसेंबरला चार तोफा रुहुल्लाखानाच्या मदतीस पाठविण्यात आल्या. या हालचालीतच १६८४ हे वर्ष निघून गेले.[८६]

संभाजीराजांच्या सैन्याने मोगलांनी घेतलेल्या कर्नाटकातील भागामध्ये लुटालूट करण्यास सुरुवात केली. मोगलांचे सरदार या प्रांताचा बंदोबस्त करण्यास असमर्थ होते. २ जानेवारी १६८५ ला सर्जाखान विजापूरला आला. ९ जानेवारीला सर्जाखान तोगला गेला. तेथे शाहाजादा अजम आपल्या फौजेसह आला. सर्जाखान व अब्दुल रौफखान हे फौज घेऊन युद्धासाठी चालून गेले. अशा पद्धतीने मोगलांचे सैन्य सारखे कर्नाटकात येत आहे हे पाहून संभाजीराजांनी फेब्रुवारीच्या सुरुवातीला निळोपंताना पाठवून धरणगाव वगैरे पेठा लुटण्यास सांगितले. त्यामुळे औरंगजेबाला सुलतानबक्षला १२ हजार स्वारांसह त्या बाजूला पाठविणे भाग पडले. उलट मोगली सैन्याने बंकापूर, गोकाक, हुबळी, कारवार वगैरे घाटावरील ठाणी याच सुमारास घेतली. धारवाडचा किल्लाही शहाअलमच्या हसन अलीखान व मीरखान या सरदारांनी याचवेळी घेतला. फेब्रुवारीमध्ये शेवटीशेवटी संभाजीराजांनी आपला वकील किंवा दिवाण मेलगिरी पंडित याला आदिलशाहीला मदत करण्यासाठी पाठविले त्यामुळे आदिलशाहीला धीर आला.

औरंगजेबाने जय्यत तयारी करून २८ मार्चला विजापूरच्या वेढ्यास सुरुवात केली आणि खानजहां बहादूर जाफरजंगने जुहूरापुरच्या बाजुने अर्ध कोसावर व कासिमखानाने पाव कोसावर मोर्चे नेले. दुसऱ्या दिवशी म्हणजे २९ मार्चला रुहुल्लाखान विजापूरच्या किल्ल्यावर हल्ला करण्याकरिता दौलतपुऱ्याकडे येऊन किल्ल्यावर हल्ला करून पुन्हा परत गेला. ३ एप्रिलला तुंगभद्रा नदीवर सर्जाखान विजापूरी याने अजमशहाच्या लष्कराशी जोराची लढाई देऊन पुष्कळ लोकांची कत्तल करून पळून गेला. सर्जाखानाने दिलेल्या लढाईचे वर्णन कारवारकरांनी आपल्या ३० एप्रिलच्या पत्रात केले आहे. "सर्जाखान व बहलोलखान यांनी २० हजार स्वारांनिशी कोपलजवळ मोगली सैन्याशी लढाई दिली. तेथे मोगलांचे बरेच लोक मारले

गेले. शहजादा सुलतान अजम तारा जखमी झाला." याबद्दल सत्यता किती हे स्पष्टपणे सांगता येत नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात. तसेच ते पुढे लिहितात की जेव्हा औरंगजेबाला कळाले की, कुतुबशाहा, संभाजी व आदिलशाहा एकत्र आले आहे तेव्हा त्याने शहाआलमला कुतुबशहाविरोधात पाठविले तेव्हा कुतुबशाहाने शहाआलमशी तह केला व मादण्णा व अकण्णा यांना ठार मारविले. त्यामुळे विजापूरास कुतुबशाहाची प्रत्यक्ष मदत होण्याची आशा मावळली.[८७]

"जूनला खानजहां बहादूर सोलापुरला जाऊन औरंगजेबाला भेटला व नंतर विजापूरला आला व त्याने बेगमच्या हौदावर आपल्या लष्कराचे डेरे ठोकले. ३० जूनला किल्ला घेण्याचे लढाऊ सामान सरंजाम बरोबर घेऊन शाहाजादा पुढे चालून गेला व किल्ल्याजवळ जाऊन मोर्चे कायम करणे, चोरवाटा बांधणे, भुयारे खोदणे, तोफा डागणे, गोलंदाज व बंदुकी निवडून त्यांची योजना करणे वगैरे कामे शाहाजाद्याने लवकर आटपली. जुलैच्या शेवटी अजमशहाच्या दारूच्या कोठारास आग लागून ५०० लोक व बरेच बंदुखची मेले. २५ ऑगस्टला औरंगजेबाने ख्वाजा हमीदखांबरोबर खजिना पाठविला. सप्टेंबर १६८५ मध्ये विजापूरजवळ कुतुबशहा व संभाजीराजे यांच्या सैन्याच्या साह्याने आदिलशाही सरदारांनी मोगली फौजेशी लढा दिला. त्यामध्ये मोगलांचे बरेच सैन्य मारले गेले व जखमी झाले. सुलतान अजम तारा कैद झाला व त्याने विष खाऊन आत्महत्या केली.

औरंगजेबाला ही बातमी लागताच ५ ऑक्टोबरला पुष्कळ रसद व नव्या दमाचे बरेच सैन्यही पाठविले. वा. सी. बेंद्रे म्हणतात जरी मोगलाची रसद तोडण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला तरी शेवटी मोगली सैन्याला फार मोठी रसद येऊन पोहचल्याने त्या सैन्यास पुन्हा बराच जोर आला; परंतु याचवेळी संभाजीराजांची फौज मोगली प्रदेशात लुटमार करण्याकरिता १९ डिसेंबरला रवाना झाली व हंबीरराव त्यापूर्वी म्हणजे १० डिसेंबरला मोगलाच्या पिछाडीवर हल्ले करण्यासाठी विजापूराजवळ आला. एकूण संभाजी व आदिलशाही यांना इ.स. १६८५ मध्ये कुतुबशाहाच्या प्रत्यक्ष मदतीला मुकावे लागले. तरीही त्यांनी मोगलांना जोरदार तोंड दिले होते यात शंका नाही.[८८]

इ.स. १६८६ मध्ये वेढाचे काम सुरूच होते. १७ मार्च १६८६ रोजी विजापूरमध्ये लढाई झाली. एकीकडून हसनखान बहादूर वगैरे अमीर उमराव व दुसरीकडून रुहुल्लाखान, कासमखान बहादूर वगैरे युद्धात प्रयत्न करीत होते. त्यानंतर अजमशहाला शेवटची लढाई देण्याकरिता नेमले.

तेव्हा मोठे युद्ध झाले. आदिलशाहीत जशी बेदिली होती तशीच ती मोगली सरदारांत व त्यांच्या पुत्रपौत्रात वाढत होती. त्याचे वर्णन बुसातिनकार व काफिखानाने केलेले आहे.

औरंगजेबाने आपला मुक्काम रसुलपुरातच केला. दुसऱ्याच दिवशी म्हणजे ४ जुलैला मोर्चे चढविण्यास व तोफांच्या माऱ्याने बुरूज उडविण्यास व तटाखाली खोदून सुरुंग लावण्यास बादशाहाने हुकूम दिले. विजापूरचा किल्ला ज्या जमिनीत बांधला आहे. ती जमीन अर्धा गज खोदली हे पाहून शिकंदर पादशाहाने दयेची याचना केली. अशा पद्धतीने निराशा झाल्याने १० सप्टेंबरला अबुल रौफचा मुनशी सय्यदखान व सैय्यद मखदूम सर्जाखानाचा मुनशी शेख हुसेन हे हाफीज अफजलच्या बरोबर सख्य करण्याकरिता जाऊन गाजीउद्दीनखानाला भेटून रात्री किल्ल्यात परत आले. ११ सप्टेंबरला अबुल रौफने जाऊन गाजीउद्दीनाची भेट घेतली. सख्य करण्याबाबत करारमदार करून रौफ परत किल्ल्यात गेला. शिकंदरशहाशी बोलून १२ तारखेला पुन्हा मोगली छावणीमध्ये येऊन बादशाहाची भेट घेतली. १३ सप्टेंबरला विजापूरचा किल्ला औरंगजेबाच्या हाती आला. बादशाहाने शिकंदरची विनंती मान्य केली. त्यास माफी दिली व बादशाहाने त्याला दरबारात बोलावून त्याला शिकंदरखान असा किताब देऊन वर्षाला एक लाख रुपयांची तैनात दिली. त्याचा डेरा गुलालबादेस देण्याची आज्ञा दिली. सिकंदर आदिलशाहाचा सिकंदरखान करून औरंगजेबाने आदिलशाहीला कायमची मूठमाती दिली. सिकंदर पुढे १४ वर्षे कैदेत राहिला व इ.स. १६९९ मध्ये त्यास औरंगजेबाने विष देऊन मारले. अबु रौफ व सर्जाखान पातशहाकडे ताबडतोब गेले. अबुल रौफला दिलेरखां व सर्जाला रुस्तूमखां असे किताब व ६ हजारी व ६ हजार स्वारांची मनसब मिळाली. इतर मुसलमान सरदारांनाही मानमरातब मिळाले व ते त्याच दिवसापासून मोगली नोकरीत दाखल झाले.[८९]

संभाजीराजांनी आदिलशाहीला मोगलांविरूद्ध जी मदत केली त्याची चिकित्सा करताना वा. सी. बेंद्रे म्हणतात की, "जो आदिलशाहा मोगलांच्या सांगण्यावरून व त्यांच्याकडून लाच घेऊन संभाजीराजावर हल्ला करतात तोच आदिलशाहा त्याच्यावर औरंगजेबाचीच स्वारी होताच भयग्रस्त होतो; परंतु संभाजी महाराज मोठ्या राजकारणावर लक्ष देऊन आपली व मादण्णाच्या मदतीने कुतुबशाहाची मदत त्याला मिळवून देतो व दुर्बळ आदिलशाहाला दोन-अडीच वर्षे मोगली प्रचंड सामर्थ्याशी तोंड देण्याइतकी परिस्थिती निर्माण करून देतात. औरंगजेबाने आदिलशाही घेतली. परंतु त्याने या मोहिमेत बहुसंख्य हिंदुविषयी जो तीव्र द्वेष दाखविला त्यामुळे

या बहुसंख्य प्रजेत औरंगजेबाबद्दल तिटकारा उत्पन्न झाला. हा जो बहुसंख्य प्रजेत भयंकर तिटकारा उत्पन्न होत होता तोच हिंदवी स्वराज्याच्या ध्येयवादाला अधिकाधिक तेजस्वी करीत होता. आदिलशाही सरदारांनी जरी संभाजीराजांच्या राज्याला त्रास दिला असला तरी तो सहिष्णुतेने विसरून बहुसंख्य हिंदू प्रजेच्या स्वास्थ्यासाठी शक्य ती मदत संभाजीराजांनी आदिलशाहीला दिल्याने, मोगलांना आदिलशाही प्रांत काही काळ हाती ठेवता आला होता. तरीदेखील त्या प्रांतातील समाज मोगलापासून दूर राहिला. संभाजीराजांनी हिंदवी स्वराज्याची व्याप्ती प्रदेश मर्यादेत संकुचित न ठेवता अखिल हिंदवी समाजापुरती विस्तृत ठेविली होती हेच हिंदवी स्वराज्याच्या संघटनेच्या दृष्टीने मोठे कार्य होते आणि संभाजीराजांनी आपला मनःक्षोभ होऊ न देता ते शांतपणे केले."[९०]

५.२० छ. संभाजी महाराज व कुतुबशाहा संबंध

छ. संभाजी महाराज व कुतुबशाहा यांच्या संदर्भातील साधनांचा विचार करीत असताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, मादण्णा व संभाजीराजे यांच्या परस्पर संबंधांची बखरकारांनी दखलही घेतलेली नाही. यासाठी त्यांच्या माहितीच्या अज्ञानापेक्षा बखरकारांची अनैतिहासिक संकुचित मनोवृत्तीच कारणीभूत आहे.

इ.स. १६८१ च्या उत्तरार्धात औरंगजेब दक्षिणेत येत असल्याची जेव्हा बातमी आली तेव्हा त्या संदर्भात मद्रासकरांच्या डायरीतील त्यांनी २९ डिसेंबरला जी नोंद केली आहे ती वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "त्यांस गोवळकोंड्याहून ताजी बातमी अशी आली आहे की, मोगलाने मोठ्या सैन्यानिशी स्वारी केली. त्यावरून कुत्बशाहाने हरजीराजाचा धनी संभाजीराजे यांस चार लक्ष पगोडे पेशकस म्हणून पाठविले असून संभाजीराजांच्या मदतीची व मैत्रीची अपेक्षा केली आहे. मादण्णा आणि आकण्णा यांनी तर संभाजीराजांस सध्याच्या सुलतानानंतर राज्यच देऊ केलेले आहे..."[९१]

इ.स. १६८२ वर्षांमध्ये कुतुबशाहीमध्ये आकण्णा व माकण्णाचे वर्चस्व वाढले होते व वीर राघव याने आपल्या लिखाणात याचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो की, "आता आण्णाच राज्याचा मुख्य कारभारी आहे..." या वर्षात औरंगजेबाने आपले सर्व सैन्य संभाजीराजांचा मोड करण्यासाठी त्याच्याकडे पाठविले होते व संभाजीराजांना कुतुबशाहाकडून छुपी मदत मिळत होती.

इ.स. १६८३ या वर्षात कुतुबशाहा वाटेल तो पैसा व अटी मान्य करून विनासंघर्ष राज्य टिकवीण्याच्या प्रयत्नात राहिला. यासंदर्भात माहिती मासिरीमध्ये ती पुढीलप्रमाणे, '८ मे : सैयद मुसाफर कुत्बशाहाच्या कैदेत, त्याच्या मादण्णाच्या चिथावणीने ठेवला होता त्यास बादशहाच्या हुकूमावरून सोडला. तो बादशाहास भेटला. बादशहाने त्याला जडाऊ खंजीर वगैरे बक्षिस दिला. त्याच्या मुलांस असालतखां व निजाबतखां असे किताब मिळाले.' नंतर २७ जुलैला 'कुत्बुलमुल्कने जडाऊ हार, मोतीयाची आरसी आणि दोन हत्ती बादशहास पाठविले होते ते बादशहाकडे गुजरले.' हा जो सख्य राखण्याचा प्रयत्न झाला त्याबद्दल कांजिवरम येथील १९ व ३०जुलैच्या लुकसच्या पत्रात अधिक माहिती येते. ज्यात मोगल कुतुबशाहीवर चालून हल्ला करण्यास येत असल्याचे व त्यामुळे योग्य ती खबरदारी घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती येते. नंतर लुकसच्या ३० जुलैच्या पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख येतो, "कुत्बशाहाने मोगलाची मैत्री ६० लाख रुपयात विकत घेतली आहे. मिरजाफर व मुसाखानास पुन्हा त्यांच्या जागांवर नेमावयाचे असे ठरले. मिरजाफर गोवळकोंड्यास येत असल्याने मोगली सेना परत गेली. त्यांनी लिंगाप्पाला एक लाख पगोडे देऊन अधिक घोडदळ व पावलोक चाकरीत घेण्यास सांगितले आहे." याप्रकारे कुतुबशाहाने मोगलांशी वाटेल त्या पद्धतीने मैत्री राखण्याचा प्रयत्न केला पण यावर्षी मादण्णाने संभाजीराजांनी मदत केली किंवा नाही याचा उल्लेख कोठेही आलेला नाही असे बेंद्रे सांगतात.[१२]

इ.स. १६८४ च्या वर्षात औरंगजेबाने कुतुबशाहाला हुकूम करून मादण्णा व आकण्णाला राजदरबारातून काढण्यास सांगितले. पण वा. सी. बेंद्रे सांगतात की, कुतुबशाहाला औरंगजेबाच्या सूचना अंमलात आणण्यास संभाजीराजांची भीती वाटत होती. त्यामुळे मादण्णा व आकण्णा कुतुबशाहीत टिकून होते. असा त्यावेळी समज झाला होता; परंतु कुतुबशाहाचा कारभार यांच्याशिवाय चालणेही शक्य नव्हते. कारण लष्कर व सुपीक प्रांत यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात होता. आदिलशाहीवर मोगलांचे संकट आलेले पाहताच संभाजीराजे, आदिलशाह व कुतुबशाह यांची एकजूट करून दक्षिणीयांची राज्ये मोगलांच्या कचाट्यातून सोडविणे मादण्णाला जरूरी होते. त्याने तिघांची तशी मैत्री घडवून आणली होती आणि जोपर्यंत ही मैत्री टिकून होती तोपर्यंत मोगली सैन्यालाही आदिलशाही राजाधानीच्या वेढ्यात रखडतच बसावे लागले होते. ह्या मैत्रीचे कारस्थान संभाजीराजांनी रामचंद्रपंत मुतालिक यांना

कुतुबशाहाकडे पाठवून केले होते. यामध्ये प्रथम मसुदखान सामील होता या कारस्थानाधी कल्पना कुतुबशाहाने इ.स. १६८४ च्या सुरवातीस लिहिलेल्या पत्रावरून येते[९३] असे वा. सी. बेंद्रे सांगतात व पुढे लिहितात की, ही दक्षिणियांची मैत्री फार काळ टिकली नाही. संभाजीराजांनी जरी शेवटपर्यंत आदिलशाहीस प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत केली असली तरी कुतुबशाहाला प्रत्यक्ष मदत करता येण्यासारखी त्यांची परिस्थिती नव्हती. कारण त्यांनी मोगलांशी उघड शत्रूत्व स्वीकारण्याची हिम्मत कधीच केली नव्हती.

इ.स. १६८५ च्या मे महिन्यात भागानगरकरांनी बहुधा संभाजीराजांकडे विजापूरकरांच्या मदतीसाठी तीन हजार स्वार व तीन लक्ष होन पाठविले. त्याचवेळी सुलतान अबुल हसनने मूळ संकेताप्रमाणे गुलबर्ग्याकडे सैन्यही पाठविले होते. त्याबद्दल त्यांनी आपल्या मोगली दरबारातील हेजिबास सूचनार्थ लिहिले होते ते पत्र २७ जून रोजी अलमगीरच्या हाती पडले होते त्या पत्रातील मजकूर वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात - "आमच्या पूर्वजांचे मोगलांशी असलेले पूर्वीचे संबंध जाणून आम्ही मोगलांविरूद्ध हत्यार उचलले नव्हते. परंतु आता शिकंदर आदिलशाहा अनाथ व दुर्बळ आहे असे पाहून मोगलाने विजापूरास वेढा दिला आहे व आदिलशाहास पेचात पकडले आहे. अशा प्रसंगी हे रास्तच आहे की, विजापूरकरांच्या सैन्यास एका बाजूने संभाजीराजांनी आपल्या अगणित लोकांनिशी अनाथ राजास मदत करावी व मी ही खलिलुल्लाखानाच्या सेनापतित्वाखाली चाळीस हजार घोडस्वार देऊन दुसऱ्या बाजूने मोगलास तोंड देण्याकरिता पाठवावे. याउपर मोगल सर्व शत्रुंशी कसा मुकाबला करू शकतो ते पाहू." हे पत्र औरंगजेबाच्या हाती २७ जूनला पडले. त्यामुळे औरंगजेबाने या तिन्हीही सैन्यांना एकत्र न येऊ देण्याचा प्रयत्न केला. यानंतर औरंगजेबाने कुतुबशाहावर दबाव टाकून आदिलशाहा व संभाजीराजे यांना मदत न करण्यास भाग पाडले व कुतुबशाहाने पण औरंगजेबाशी पुष्कळ जुळते घेण्याचा प्रयत्न केला.[९४]

औरंगजेबाने लढाई करण्याचे ठरविले व कुतुबशाहाचे सैन्य व मोगली सैन्य यांच्यात लढाई झाली (८ ऑक्टो.). या स्वारीत अबुल हसनचा पराभव झाला. शाहा अलमने मध्यस्थी करून करार केला. ज्यामध्ये अबुल हसनने दोन लाख होन खंडणीखेरीज एक कोटी वीस (काही ठिकाणी पन्नास) लक्ष रुपयांची पेशकश ताबडतोब भरावी. मोगली सैन्याने घेतलेला सेरम व कोहीर वगैरे प्रांत मोगलांकडे राहू द्यावा आणि मादण्णा व आकण्णा यांना कामावरून दूर करावे. अबुल हसनने बहुतेक सर्व अटी मान्य केल्या. शाहा अलमच्या स्वारीच्या यशाची बातमी

औरंगजेबाला १९ ऑक्टोबरला मिळाली. त्यांच्या तहास त्याने संमती दिली. याच वेळी मादण्णा व आकण्णा यांचा खून झाला. मादण्णा व आकण्णा यांच्या खुनाबद्दल विविध वेगवेगळे विचार आहेत त्यामुळे मादण्णा व आकण्णा यांचा खून कोणी केला याबद्दल निश्चित आधार नाही असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, अकस्मात १० ऑक्टोबर नंतर मादण्णा व त्याच्या साथीदारांना मारण्यात आल्याने सर्वत्र गोंधळ उडाला. कारण कोणी कोणावर विश्वासावे हे समजण्यासारखी परिस्थिती राहिली नाही.[९५] अशा परिस्थितीत संभाजीराजांना कुतुबशाहीकडून अधिक मदतीची आशा राहिली नाही आणि मसुदखानाच्या हट्टवादीपणामुळे आदिलशाही सामर्थ्यांचा नीटसा उपयोग करून घेता आला नाही. शेवटी विजापूराचा किल्लाही फितुरीने मोगलांच्या ताब्यात गेला. मात्र औरंगजेबाने आपले सर्व शक्तिसामर्थ्य संभाजीराजांवर केंद्रित न करता गोवळकोंडा सहज घेता येईल अशा आशेने आपला मोर्चा तिकडे वळविला. कुतुबशाहाच्या लोकांनी केलेल्या ब्राम्हणांच्या अमानुष कत्तलीमुळे त्याला प्रजेची साथ मिळण्याची आशा राहिली नव्हती. सभाजी राजेही दक्षिणेत लक्ष देता उत्तरेतील रजपुतांच्या प्रदेशात त्यांचे लक्ष वेधले होते.

औरंगजेबाने गोवळकोंड्याला वेढा दिला पण याचवेळी पावसाळा, दुष्काळ, प्लेगची साथ याची भर पडली व मोगली सैन्याचे अतोनात नुकसान झाले हे खाफीखान, मासिरीतील नोंदी व मुंबईकरांच्या पत्रावरून वा. सी. बेंद्रे नमूद करतात.[९६]

यावेळची संभाजीराजांची भूमिका सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, गोवळकोंड्याच्या किल्ल्यात सर्व प्रकारची सामुग्री सहज वर्ष दीड वर्ष पुरेल इतकी होती. परंतु कुतुबशाहाला बाहेरून मदत हवी होती आणि कुतुबशाही सरदारांच्या अमानुष हिंदुहत्येच्या अपराधाकडे दुर्लक्ष करून संभाजीराजांनी केवळ मोठ्या राजकारणावर लक्ष ठेवून त्यास मदत केली. इतकेच नव्हे तर दक्षिणेत उठावाच्या बाबतीत आशा न दिसल्याने त्यांनी शक्य तर मोगली सैन्य उत्तरेत खेचले जावे म्हणून रजपुतांच्या साह्याने खास मोगली हद्दीतच लढा सुरू केला होता व त्यांनी तो यशस्वीपणे चालविला होता. वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की कोणाकडून तरी व काहीही करून संभाजीराजांना औरंगजेबाच्या दिल्लीच्या तख्तालाच धक्का द्यावयाचा होता. याकरिताच संभाजीराजांनी दुर्गादास व धनाजी जाधव यांच्या हाताखाली आपले सैन्य देऊन अकबराच्या नावाने ते मेवाड-बुंदेलखंडापर्यंत नेऊन भिडविले होते. अकबराला इराणमध्ये पाठवून त्याचे

इराणी सैन्य घेऊन दिल्लीवर येण्याची ते वाट पाहत होते. संभाजीराजे स्वतः मोगलांवर बाहेरून हल्ले चढविण्याकरिता व सर्वत्र रसद मारून मोगली सैन्य जेर करण्याकरिता स्वतः आपल्या लोकांसह गोवळकोंड्याभोवती फिरत होते. त्यांचे कर्नाटकातील सैन्यही नाकेबंदी करण्याचा प्रयत्न करीत होते.

५.२१ संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील राज्यकारभारविषयक घडामोडी

हिंदवी स्वराज्यावर संभाजीराजे अधिष्ठित झाले त्या वेळच्या राज्याचा भौगोलिक विस्तार बराच मोठा होता. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक झाला तेव्हा कल्याण ते फोंड्यापर्यंतचा कोकणपट्टीचा भाग हिंदवी स्वराज्यात होता. त्यामुळे रायगड हे मध्यवर्ती ठिकाण मानले गेले. सिंहासनही तेथेच स्थापन केले; परंतु त्यानंतर राज्याच्या विस्तारामध्ये उत्तरेस दमण बागलाण व दक्षिणेस अदोनी फोंड्यापर्यंतचा व दक्षिण कर्नाटकातील चंदीचंदावरा सभोवतालचा स्वतंत्र प्रदेशही सामील झाला होता. रायगड ही राजधानी मुलकी व इतर कारभाराला व संरक्षणाच्या दृष्टीने सोईची होती तरी विस्तारासाठी फौजेच्या संग्रहास व परराज्याच्या आक्रमणास पायबंद देण्याच्या दृष्टीने राजमार्ग व सरहद्दी यांचा फायदा रायगडाला मिळत नव्हता. असे सांगून वा. सी. बेंद्रे सांगतात की, यामुळे पन्हाळगड मध्यवर्ती ठिकाणी असल्याने संभाजीराजांना व हंबीरराव यांना पन्हाळ्याच्या आसपासच राहणे गरजेचे होते म्हणून रायगडला संभाजीराजांनी आपली पत्नी येसूबाई ह्यांना ठेवले. सरकारकुनाच्या निष्ठेवर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या पत्नीस सर्वाधिकार दिल्याने त्यांना हा एक राज्याचा बोजड गाडा हाकणे निश्चितपणे सोपे गेले. येसूबाईंच्या सुनियंत्रित कारभारामुळे युद्धाच्या राजकारणाकडे पूर्णपणे लक्ष देण्यास संभाजीराजांना मोकळीक मिळाली. आतापर्यंत शिवाजी महाराज असा कारभार आपल्या मातेकडे किंवा युवराज पुत्राकडे अडीअडचणीत किंवा अनुपस्थितीत प्रतिनिधी म्हणून सोपवीत असत. एकदा तो कारभार मंत्र्याकडे दिल्याने कशी आपत्ती ओढवली हे संभाजीराजे पूर्णपणे जाणत होते. त्यामुळे युद्धखात्याचे काम वाढल्याने व स्वतःलाच पुष्कळ वेळा त्यात अडकून राहावे लागत असल्याने संभाजीराजांनी आपल्या पत्नीला 'राजाज्ञा' म्हणून सर्व मुलकी बाबतीत निर्णय देण्यास व आपल्या अधिकारात राज्यकारभारातील ताकिदपत्रे काढण्यास सर्वाधिकार दिले होते. 'श्री सखि राज्ञीजयति' असा शिक्कामोर्तबही दिला होता. पत्नीला दिलेला अधिकार व शिक्क्यातील लेख पाहिला म्हणजे संभाजीराजांच्या प्रगत मनाची व त्यांच्यावरील भारत-

रामायणातील तत्त्वज्ञानाची व आर्यसंस्कृतीच्या उत्तम संस्काराची पडलेली छाप किती दृढ होती याची सहज कल्पना येते असे स्पष्टीकरण वा. सी. बेंद्रे देतात.[१७]

[अ] कर्नाटक राज्याची व्यवस्था :

वा. सी. बेंद्रे सांगतात की, चंदीचंदावरचा प्रदेश स्वतंत्र व मुख्य राज्यापासून वेगळा होता. या दोन राज्यांच्या सरहद्दी विजापूर व भागानगरकर यांच्या प्रदेशांनी दुभंगल्या होत्या. कुतुबशाहीच्या मैत्रीमुळे त्या राज्यास प्रत्यक्ष मदत देणे घेण शक्य होते. त्यामुळे अशा स्वतंत्र राज्यविभागावर कुटुंबातील जबाबदार कर्ता पुरूष सर्वाधिकार देऊन नेमणे आवश्यक होते. आपल्या हयातीत संभाजीराजांना तेथे आपला जबाबदार प्रतिनिधी म्हणून ठेवण्याचा शिवाजीराजांचा बेत असणे शक्य होते. इतका तो महत्त्वाचा व नाजूक राज्यकारभाराचा भाग होता. परंतु बखरकारांनी या विचाराचा राज्य विभागणी म्हणून केलेल्या विपर्यासाला त्या विचारात तथ्य नव्हते. हा विचार शिवाजीराजांना आपण लवकरच मरणार म्हणून सुचलेला नव्हता. तसा विचार करण्याचा त्यांना वेळही मिळाला नाही. उलट शिवाजी महाराज कर्नाटकातून परतल्यानंतर जो गैरकारभार तेथे पुढील दोन वर्षात दिसून आला व वसुलीचा भरणाही झाला नव्हता त्यामुळे शिवाजीराजांना अशा अलिप्त असलेल्या प्रदेशात आपल्या भरोशाचा माणूस असणे आवश्यक वाटले असल्यास नवल नाही.

वा. सी. बेंद्रे पुढे लिहितात, राजकारणाच्या दृष्टीने कर्नाटकात आपला कर्तबगार युवराज असावा. असे वाटणे साहजिकच होते आणि वडिलांच्या अनुभवाचा फायदा घेऊन संभाजीराजासही गादीवर आल्यानंतर तेथील व्यवस्था त्याच दृष्टीने लावणे आवश्यक होते. त्यामुळे संभाजीराजांनी कर्त्या युवराजाच्या किंवा बंधुच्याअभावी आपली बहीण अंबिकाबाई व वडील मेव्हण हरजी राजे महाडिक, आपल्या जिव्हाळ्याचा म्हणून त्यास सर्वाधिकार देऊन कर्नाटकात पाठविले. अंबिकाबाईचे तिकडे बरेच प्रस्थ निर्माण झाल्याचे विविध पत्रव्यवहारावरून दिसून येते असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[१८]

[ब] रघुनाथपंत नारायण हणमंते प्रकरण :

शिवाजी महाराजांच्या सर्व मोहिमात विशेष यशस्वी व कीर्ती गाजविणारी अशी मोहीम म्हटली तर ही कर्नाटकाची मोहीम होय. महाराजांनी राज्याभिषेक करवून घेऊन छत्रपतीपद मिळविले; परंतु त्या पदाची मान्यता याच कर्नाटकाच्या राजकारणामुळे जगाला जाहीरपणे

पटविण्याचे कार्य हिंदुस्थानातील तीन प्रमुख शाह्यांतील एका शाहीला आपण होऊन पत्करावे लागले हे कुतुबशाही प्रकरणात शिवाजीराजांनी घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते.[९९] तसेच या मोहिमेचा उद्देश मुख्य पठाणी आदिलशाही सत्तेला कायमचा पायबंद घालावयाचा होता, हे ही त्या पत्रात स्पष्ट केलेले आहे.

आदिलशाही सत्तेला कायमचा पायबंद घालण्याचे राजकारण पुष्कळ दिवसापासून शिजत होते. मुख्यतः हे राजकारण निराजी रावजी, प्रल्हाद निराजी, व शामजी नाईक पुंडे यांनीच मादण्णा व आकण्णा यांच्या साह्याने सिद्ध केले होते. रघुनाथपंतांचा यांच्याशी मुळीच संबंध नाही. रघुनाथपंताची असले राजकारण शिजविण्याइतकी पात्रता त्यांच्या इतर वागणुकीवरून असल्याचे मुळीच सिद्ध होत नाही असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

शिवाजी महाराजांनी जिंजीचा सुभा आपल्या भावाच्या म्हणजे संताजी राजांच्याच (नरसाबाईचा मुलगा) ताब्यात देऊन सैन्यही त्याच्याच हवाली केलेले होते. रघुनाथपंत जिंजीचा दिवाणीचा कारभार पाहत होता एवढेच.

चिकित्सा - बखरीतील भरमसाठ विधानास तत्कालीन आधार नाही. धन्याचा पडता काळ पाहून त्याच्याविरूद्ध उठणे हा रघुनाथपंताचा स्वभाव दिसतो. संभाजीराजास रघुनाथपंताने हिशोब देण्याचे नाकारले; संभाजीराजांची मनधरणी करून व मागील तीन वर्षांच्या हिशोबाची झडती करून दिल्यावर संभाजीराजांनी त्याला पूर्वीची वंशपरंपरागत दिवाणी पद दिले; परंतु कारभार दिला नाही.

सारांश, अस्सल कागदपत्रामध्ये रघुनाथपंताचा या राजकारणात उल्लेख येत नाही, इतरांचा येतो. यावरून रघुनाथपंताने मादण्णा, आकण्णा यांच्यासोबतच राजकारण केलेले नाही, यात शंका नाही. जर मादण्णाचा व त्यांचा स्नेह असता तर एंकोजीचे राज्य त्यापूर्वीच कुतुबशाही छत्राखाली नेऊन ठेविले असते. इतकेच नव्हे तर एंकोजी व त्यांची शहाजी राजांपासून नोकरीत असलेली कारकून मंडळी आदिलशाहीचेच नोकर म्हणून शिवाजी राजांवरच प्रत्यक्ष हल्ले चढवीत होती हे विसरता येत नाही. रघुनाथपंताना विनाविरोध कैद करण्यात गोपाळ दादाजीचीच मदत झाली होती. गोपाळ दादाजीची व संभाजीराजांची ओळख होण्याची शिवकाळात संधीच आली नव्हती. रघुनाथ नारायण हणमंते यांना इ.स. १९८० च्या ऑगस्टच्या सुमारास कैद झाली असावी व इ.स. १६८१ च्या जानेवारीत थोडीशी स्थिरस्थावर झाल्यावर संभाजीराजांनी हरजीराजे

महाडिक यांची सरसुभेदार म्हणून शामजी नाईक पुंडे यांची दिवाण म्हणून नेमणूक केली; परंतु मार्चच्या सुरुवातीनंतर म्हणजे १६ जानेवारीला संभाजीराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर या दोघांची रवानगी करण्यात आली. जे काम रघुनाथपंताकडे होते ते म्हणजे मजमूचे किंवा कर्नाटकाच्या दिवाणीचे, ते काम शामजी नाईक पुंडे यास दिले. हरजीराजे व शामजी नाईक यांची थोड्याच दिवसात नाराजी झाली. यासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, शामजी नाईकांनी रघुनाथपंताच्या बंदोबस्तात ढिलाई केली असावी किंवा ते स्वतः अण्णाजी दत्तोच्या राजकारणात अडकले असावेत. परंतु त्याबद्दल नक्की काहीच सांगता येत नाही. मात्र हरजीराजे कर्नाटकात येण्यापूर्वी भांडण झाल्याचे दिसते.

संभाजीराजांनी रघुनाथपंताना कैद करून व आपली बहीण व मेव्हणा पाठवून कर्नाटकातही राज्यनियंत्रण हिंदवी स्वराज्याच्या आस्थेने करविले. जे रघुनाथपंत दोन वर्षे कैदेत होते ते पाच हजार स्वार व दहा हजार पायदळ बाळगून होते व ते जेव्हा मोगली सैन्य वाटेत लढत होते तेव्हा कर्नाटकातून येतांना एखादी सेना घेऊन आले व हजरीराजे यांनी येऊ दिले हे सांगताना बखरकार कसे पूर्ण अज्ञानांधकारात वावरत होते व त्यांची भौगोलिक व इतर माहिती कशी निकृष्ट पातळीवर होती. याची पूर्णपणे साक्ष पटते. 'रघुनाथ नारायण एप्रिल १६८२ त कर्नाटकातून येऊन भेटले.' हे शकावली सांगते ते बरोबर आहे असे वा. सी. बेंद्रे सांगून पुढे लिहितात की, बखरकारांनी सांगितलेले समारंभाचे नाटक मात्र असत्य आहे.

हणमंते घराण्यातील पूर्वापार असलेली मजमु (दिवाणी) मध्यंतरी शिवाजीराजांनी निळो सोनदेव यांना दिली होती. ती त्यांच्या मृत्युनंतर शिवाजी राजांनी परत हणमंत्याकडे चालू केली. ती तशीच चालू राहिली होती. रघुनाथपंताना वडील म्हणून दिवाणी चालविण्यास संभाजीराजांनी परवानगी दिली इतकेच. परंतु त्यापूर्वी त्यांचा पुतण्या व मुलगा नारायण हे प्रतिनिधी म्हणून चालवीत होते आणि रघुनाथपंत पुढे वर्षाने म्हणजे २ मे १६८३ ला वळणीस वारल्यानंतर नारायणची ती चालवीत राहिला असे वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतात.[१००]

[क] एंकोजीराजे व संभाजीराजे यांचे परस्परसंबंध कसे होते यासंदर्भात बेंद्रेंचे लिखाण:

एंकोजीराजे व संभाजीराजे यांचे परस्परसंबंध कसे होते याबाबत वा. सी. बेंद्रे लिहितात की, याबाबत एका जेसुइटाचा एक बराच अतिशयोक्तीपूर्ण व केवळ पूर्वग्रहदुषित असा वृत्तांत त्यावेळची परिस्थिती कशी अनिश्चित असावी याची कल्पना देतो. त्यावरून हरजीराजे यांना

रघुनाथपंत व एंकोजी, संतोजीच्या कारभाराचे खरकटे कसे काढावे लागले असावे याचा बोध होऊ शकेल. जेसुइट एंकोजीबद्दल इ.स. १६७९-१६८१ च्या आपल्या अहवालात नोंद करतो की, "तंजावरचे राज्य तशाच दु:खद परिस्थितीत एकोजीच्या जुलूमाखाली काल कठित आहे. एकोजी तंजावरचा राजा आहे... कोणाही पाखंडी माणसाने तथाकथित देवांच्या देवळांचा याच्याइतका अनादर केला नसेल. त्याच्या पूर्वजांनी या देवळांना पूजाअर्चानैवेद्याकरिता दिलेल्या देण्ग्या त्याने आपल्या स्वार्थासाठी जप्त केल्या आहेत... आणि तोही याच देवांची पूजा करतो. यावरून तो आपल्या जहांगिरदार वगैरेंची कशी जुलूमाने पिळवणूक करीत असेल याची कल्पना करणे बरे. ते गुलामांपेक्षाही वाईट स्थितीत आहेत. त्यांना खाण्यापिण्यालाही मोताद केली आहे..." याच पत्रात संभाजीराजांबद्दलचा आलेला मजकूर बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "शिवाजीचा मुलगा संभाजी हा आपल्या बापाच्या राज्याचा व जुलुमांचा वारस झाला आहे. असे म्हणतात की, हा वारस आपल्या बापापेक्षाही वाईट आहे. हा या पूर्व प्रदेशातील मोठा अट्टल चोर आहे. हा एक पिशाच्च कोटीतील असल्याचे मानतात. त्याला एक पिशाच्च वश झाले आहे आणि ते त्याला अचूक राज्यकारभार चालवण्याबद्दल वेळीच सूचना देते आणि हल्ली जे घडत आहे त्याचा विचार केला तर हे खरे दिसते. या भागात लुटालूट, चोऱ्यामाऱ्या होत होत्या. खास सरकारी अधिकारीच या चोरांना साथीदार असत. ते असली लूट वाटून घेत. कोणी न्यायनीती पाहातच नसे. परंतु या संभाजीने आपल्या बापाने नेमलेल्या ब्राम्हण सुभेदाराला पकडून कैदेत टाकले आणि आपला मेव्हणा सरसुभेदारीवर पाठविला. तो आल्यापासून रस्त्यारस्त्याने होणाऱ्या चोऱ्या, खून, दरोडे ऐकू येईनासे झाले. मात्र अद्याप न्याय मिळू लागला नाही... तसेच वेलूरचे राज्य अर्धे संभाजीचे व अर्धे कुत्बशाहीचे आहे. तेथे जिंजी भागासारखाच अन्याय चालू आहे..." यावरून हरजीराजे जाण्यापूर्वी कर्नाटक भागात शिवाजीराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण न राहिल्याने या राज्याची कशी दैना उडाली होती आणि ती ही रघुनाथपंत हणमंत्याच्याच काळात उडाली होती हे स्पष्ट होते. शिवाजीराजास म्हणूनच संभाजीराजांसारखा शूर प्रतिनिधी तिकडे ठेवावयाची आवश्यकता भासली असल्यास नवल नाही. परंतु जे शिवाजी महाराजांच्या मृत्युमुळे घडून आले नाही ते संभाजीराजांनी नंतर हरजीराजे यांना पाठवून यशस्वीपणे करून दाखविले,[१०१] असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

[ड] दक्षिण कर्नाटकमधील संभाजी महाराजांची कामगिरी :

कर्नाटकातील संभाजीकालीन लढायांची हकिकत सांगताना वा. सी. बेंद्रे प्रथम कन्नड भाषेतील ग्रंथांचा उल्लेख करून त्यात आलेल्या माहितीची चिकित्सा करतात. प्रथम बेंद्रे 'केळदिनृपविजयम्' या ग्रंथासंदर्भात सांगतात की, यामध्ये केवळ वंश सांगण्यापुरतीच माहिती आलेली आहे. तर 'अप्रतिमवीरचरितम्' मध्ये ओघानेच एक दोन गोष्टींचा उल्लेख येतो तो 'चिक्कदेवरायाच्या (१६७२ ते १७०४ इ.स.) अवतारामध्ये... दानवंशाने जन्म घेतलेले जैतजी, दादाजी, हरजी, शाहजी, शंभूजी इत्यादी मराठ्यांचे समूळ उच्चाटन केले. आघाडीवर तुटून पडलेला जैतजी काटकर याला चिक्कदेवरायाने कापून फेकून दिले...' 'चिक्कदेवराजविन्नृपम्' यामध्ये 'चिक्कदेवरायाने युद्धात त्याला हतबल केले. त्याचा सेनापती जैतजी काटकर यास घोड्याच्या टाचाखाली खूप तुडविले. त्याचे नाक, कान, मान, हात, पाय तोडून त्या तुकड्यांनी भूताप्रेताना संतुष्ट केले. तसेच दादाजी काकडे याचा गळा चिरून त्याच्या ओल्या शिराची मिरवणूक काढिली. पुढे त्याने आवेशाने शंभोजी यास कीर्तीच्या समुद्रात बुडविले. त्यांच्या साह्यार्थ आलेल्या कोजीला जन्म नकोसा केला. त्याचा महाप्रधाना असा जो यसवंतराव त्याचे नाक कापले...' याच्या उलट शकावलीमध्ये नोंद येते ती बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, 'एप्रिल १६८२: कर्नाटकात श्रीरंगपट्टणकरांत व हरजी महाडिक व जइतजी काटकर व दादाजी काकडे त्रिचनापल्लीस मदतीस गेले होते. तेथे भांडण झाले. दोन हजार घोडी पाडाव केली. श्रीरंगपटणकराचा सरदार कुमार यास पाडाव केला.' याबाबतीत विश्वनाथ व चोक्कनाथनायक यांचे एक पत्र ८ मार्च १६८२ चे उपलब्ध आहे. त्यात व्होलमचा किल्ला एंकोजीस दिल्याचा व रूस्तुमखान ह्या त्यांच्या एकुलत्या एक सेनापतीचा मोड करून म्हैसूरच्या नायकाशी मैत्री केल्याचा उल्लेख येतो. बेंद्रे सांगतात हा चोक्कनाथ १६ जून १६८२ च्या सुमारास वारला. त्याचा लहान मुलगा रंग कृष्ण भूतू विराप्पा नायक तिसरा हा गादीवर आला. हा ही १६८९ च्या सुमारास मेला. अर्थात याच्याकडे मदुरा नव्हते व राज्याचा बराच भागही गमावला होता. याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीस लढाई चालू होती. या लढाईची हकीकत जेसुइटच्या पत्रव्यवहारात येते. इ.स. १६७९ ते १६८१ च्या अहवालात या लढाईचे कारण येते: 'म्हैसूरचा नायक म्हणतो की, मृत नायकाचा मुलगा या (मदुराच्या) राज्यावर बसवावयाचा याकरिता त्याने एकोजी व त्याचा पुतण्या संभाजी यांच्याविरूद्ध लढाई पुकारली आहे. खरे म्हणावयाचे तर दोघेही मदुरा नायकावर चालून

गेले असून त्यांचा उद्देश मदुरेच्या नायकाकडून तो आदिलशाहीला खंडणी देत होता तशी मांडलिक म्हणून खंडणी उपटावयाचा आहे... परंतु मदुरेचा नायकाचा ज्या रूस्तुमखानाने त्याचा राज्यकारभार बळकाविला होता त्याला ठार मारल्यानंतर नायक त्रिचिनापल्लीच्या किल्ल्यात जाऊन बसला तेव्हा त्यास तेथे निरनिराळ्या सैन्यानी वेढा घातला होता. यातील एक (रामनाडचा सेतुपती) मरव नायक हा त्याच्या मदतीस आला होता. म्हैसूरच्या नायकाने दोन बाजुंनी वेढेले होते. तिसरा संभाजी यांचा सेनापती हरजी महाडिक संभाजीचा मेव्हणा याला नायकानेच म्हैसूरकरांच्याविरूद्ध मदतीस आला होता. चौथा संभाजीचा चुलता एकोजी. तो आपल्या पुतण्याच्याच मदतीस आला होता. दोघेही मराठे जुलमी राजे आहेत. एक तंजावरच्या राज्यावर आहे व दुसरा जिंजीचे राज्य बळकावून आहे. यावेळी ते आपल्या मुलुखाच्या बंदोबस्ताखेरीज म्हैसूरच्या नायकाला पळावयास लावून नंतर मदुरेच्या नायकाचा किती प्रदेश लुबाडता येईल हे पाहण्याच्या उद्देश्याने आलेले आहेत.'[१०२]

हरजीराजेने म्हैसूरचा यावेळी पराभव केला नंतर म्हैसूरकरांनी मदुरेच्या नायकाचा जो प्रदेश घेतला होता तो सोडविण्याला सुरुवात केली. त्याला फार थोडा विरोध केला. हरजीराजांनी मदुरेकरांचा जिंकलेला प्रदेश नायकास देण्याचे कबूल केले. वा. सी. बेंद्रे सांगतात की, ही भांडणे चालूच राहिली. श्रीरंगपटणकर व संभाजीराजे यांचा तह होऊन स्थिरस्थावर होईल असे वाटत होते. परंतु इ.स. १६८२ च्या १४ नोव्हेंबरच्या पूर्वीच दोन्ही सैन्याच्या एकमेकांविरूद्ध हालचाली सुरू झाल्या. हरजीराजे यांनी म्हैसूरकारांच्या प्रांतात ५००० घोडेस्वारासह जाऊन लुटालूट केली. ती लूट घेऊन परत येत असतांना म्हैसूरकरांच्या सैन्याशी गाठ पडली. संघर्ष झाला त्यामध्ये हरजीराजे यांचे ३०० स्वार ठार अगर जखमी व एक सेनापतीही जख्मी होऊन शत्रुच्या हाती लागला. म्हैसूरकरांचेही बरेच नुकसान झाले.[१०३] हरजीराजांनी येथपर्यंत मदुराराजांचा म्हैसूरकरांनी घेतलेला प्रदेश सोडविला व काही म्हैसूरकरांचाही घेतला. मोठमोठी नामांकित शहरे हरजीराजे यांना मिळाल्याने मराठ्यांची स्थिती मोठमोठी नामांकित शहरे हरजीराजे यांना मिळाल्याने मराठ्यांची स्थिती जरी सावरली असली तरी मदुरा व म्हैसूर येथील दोन्हीही नायक मोगलास मिळाल्याने व कुत्बशाहीचीही मदत मिळण्याची आशा वाटू लागताच मदुरेच्या नायकाचे सरदार व किल्लेकरी हरजीराजे यांना मानीनासे झाले. इ.स. १६८६ च्या नोव्हेंबरमध्ये मोगली सैन्य मराठ्यांच्या कर्नाटकमध्ये उतरत असल्याच्या बातम्या येत होत्या.

१० जानेवारी १६८८ ला मद्रासकर लिहितात, "...संभाजीराजांच्या स्वारीमुळे या बाजूच्या प्रदेशातील सर्व राज्ये विस्कळीत झालेली आहेत व त्यांच्या घबराट व लुटालुटीने सर्वत्र भिती पसरली आहे. त्याने पुष्कळ किल्ले व शहरे घेतली आहेत आणि आणखी घेण्याची खटपट चालू आहे. त्याला प्रतिकार करण्यास फारसे कोणी धजत नाही. त्याच्या पारिपत्यार्थ मोगली सेनाही आलेली नाही."[१०४] वा. सी. बेंद्रे म्हणतात अशा परिस्थितीत कुत्बशाहास दक्षिणेतून मदत पोहचविण्याची, निदान कुत्बशाहीचा प्रदेश मोगलांच्या हाती न पडू देण्यासाठी, मदत देणे संभाजीराजांना आवश्यकच होते.

पण संभाजीराजांना या प्रांतात कर्नाटकातील सुभेदार व सरदार वगैरेंकडून मदत मिळण्याची आशा नव्हती. अर्थात अशा अनिश्चित वातवारणाचा कुत्बशाहीचा मिळेल तो गड व मुलूख घेणे हेच उपयुक्त होते; परंतु दुर्दैवाने याचवेळी मोगलांच्या स्वारीमुळे कर्नाटकातील वातावरणाचा फायदा घेऊन व हरजीराजे संकटात पाहून केसोपंतानी आपल्याच व श्रेष्ठाधिकाराची ईर्ष्या धरली व कर्नाटकात बेबनाव करण्यास सुरुवात केली. सेनापती व कारकून अथवा सुभेदार व दिवाण यांची भांडणे होती आणि मुख्य प्रधानाचा प्रतिनिधी आणि कर्नाटकचा सेनापती सुभेदार यांच्या या भांडणात कारकूनी स्वार्थच कारणीभूत होता. विशेषतः युद्धाच्या काळात असल्या कारकूनी स्वार्थाला नियंत्रित असणे आवश्यक असते. हे संभाजीराजांनी ओळखून मोगली परचक्राच्या सुरुवातीसच महाराष्ट्रातील रणक्षेत्रातील हे तंत्र सुधारले होते; परंतु कर्नाटक प्रांत मोगली स्वारीने तुटला गेल्याने तेथील बंदोबस्त होण्यास विलंब झाला. यावेळी केसोपंतामुळे बेशिस्त वाढत चालली. राज्याच्या हितापेक्षा स्वतःच्याच स्वार्थाकडे या कारकुनांचा अधिक ओढा होता. एकमेकांबद्दल संशय घेऊन अधिकाऱ्यांच्या कार्याबद्दल शंकाकुशंका पसरवून राज्याचा नाश होऊ देण्याची दुचिन्हे इ.स. १६८७ च्या वर्षाअखेर स्पष्ट दिसू लागली होती[१०५] असे वा. सी. बेंद्रे येथे नमूद करतात.

मद्रासकरांच्या बातमीत अशी नोंद येते की, "इ.स. १६८८ च्या जानेवारीत हरजी राजे यांनी शत्रुच्या मुलुखातील जवळजवळची शहरे लुटण्याचा सपाटा लावला होता. २ जानेवारीस कोनिमेरच्या उत्तरेकडील ९ मैलांवरचे मराकण लुटले. तेथून गुरे, हिरे व द्रव्य बरेच लुटून आणले. तेथील ५ लोकांना कैद करून आणले." याबद्दल बेंद्रे सांगतात, मराठ्यांच्या एका सैन्याच्या तुकडीने आपली आघाडी कंजिवरमच्या बाजूस रेटली होती. मद्रासच्या ६ जानेवारीच्या

बातमीत म्हटले आहे की, 'मराठ्यांनी दोन किल्ले हस्तगत केल्यानंतर कावेरीपटण व चिंगलपुट यांस वेढा घालून सभोवतालील प्रदेशात बरीच घबराट उडवून दिली आहे आणि त्यास तोंड देण्यास मोगली सेना आलेली नाही.' परंतु १३ जानेवारीच्या बातमीत 'संभाजीच्या सैन्याने कंजीवरम लुटले व सुमारे ५०० लोक ठार मारले आणि चिंगलपुटच्या बातमीप्रमाणे २ हजार घोडेस्वार व ५ जहार पायदळ मद्रासकडील भाग लुटण्यास पाठवीले जात आहे', असे होते.

वा. सी. बेंद्रे मद्रासकरांच्या लिखाणाचा संदर्भ देऊन सांगतात की, संभाजीराजांनी आतापर्यंत (२१ जाने. १६८८) कुत्बशाहीतील १४० शहरे व किल्ले वगैरे घेतले होते. याच महिन्यात रुहुल्लाखान व कासीमखान यांची कर्नाटक तेलंगण भागावर नेमणूक झाली व त्यांनी तिमण्णानायकाबरोबर पाच हजार घोडदळ व दहा हजार पायदळ घेऊन जंजीकडे पाठविले. ते १६ जानेवारीला जिंजीच्या मार्गावर कूच करीत होते परंतु ते २८ जानेवारीपर्यंत तरी मराठ्यांच्या आघाडीपर्यंत पोचले नव्हते. परंतु मोगली सेना अद्यापि दुरच होती. मराठ्यांचे वीस हजार लोक मात्र कंजीवरमला तळ देऊन राहिले होते व काही सैन्याच्या तुकड्या आसपासच्या बारा मैलात लुटमार करीत होत्या. ९ फेब्रुवारीच्या बातमीप्रमाणे 'एक दोन दिवसापूर्वी संभाजीच्या तीनशे घोडदळ व सातशे पायदळाने पुल्लीमल्ली घेण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यास यश आले नाही. थोडे लोक मारले गेले. महमद सादिक सेनापती, मक्का इस्मायलखान, रुस्तमखान आणि याचमनायक हे चार-पाच हजार घोडदळ व सात हजार पायदळासह कंजीवरमला येत असल्याची बातमी १३ फेब्रुवारीलाच आली. परंतु ते पुढे २५ फेब्रुवारीला कंजीवरमला येऊन दाखल झाले. तेव्हा तेथील संभाजीराजांच्या सैन्याने कंची सोडून उत्रमलोरच्या पलिकडे जाऊन बराच मुलूख लुटला. गुरे, मालमत्ता वगैरे नेली. मोगली सैन्य चेतपुटकडे गेले.' कोनिमेरपासून बारा मैलावर एक भांडण झाले. त्यात दहा-बारा लोक दोन्ही बाजूचे मारले गेले. नंतर मार्चच्या सुरुवातीस याचप्पा नाईक दोन हजार घोडदळ व चार हजार पायदळ बरोबर घेऊन कंजीवरहून निघाला. संभाजीराजांच्या सैन्याची व त्याची वांदिवाशला गाठ पडली. झगडा झाला. दोघांची सारखीच परंतु बरीच नुकसानी झाली तेव्हा महंमद सादिक बाकीच्या सैन्यानिशी त्याच्या मदतीस गेला.'

'महंमद सादिकच्या मदतीस मोगली सैन्य सारखे येत राहिल्याने मराठा सैन्य चंजीस येऊ लागले.' नंतर मार्चच्या अखेरीस 'हरजीराजे, केसोपंत आणि इतर सर्व सरदार तयारी करून बाहेर

पडले. गोवळकोंड्याचे मोगली सैन्यही १०-१२ मैलांवर तयारीत होते' असे कोनिमेरकरांनी ११ मार्च च्या लिखाणात वर्णन केले आहे.

यावेळी मद्रासकर लंडनला लिहितात की, "येथील परिस्थिती मागील पत्रात लिहिली आहे त्याचप्रमाणे चालू आहे. दुष्काळ व युद्ध याच्या आपत्तीत सर्व देश सापडला आहे. मोगली सैन्य कंजीवरमला आले आहे. शिवाजी (संभाजी) च्या लुटमारीतून जे काही वाचल होते ते त्यांनी नासधूस करून टाकले आहे. सुमारे १२ मैलाच्या या परिघातच दोन्ही सैनयाच्या चकमकी उडत आहेत. परंतु मोगली फौज दुर्बळ असल्यामुळे मोगल धडा देत नाही. सर्वत्र लुटमार मात्र चालू आहे..." बेंद्रे येथे स्पष्ट करतात की, बरीचशी फौज औरंगजेबाबरोबर व काही संभाजीराजाच्या प्रदेशात गेल्याने कर्नाटकातील राजकारण बरेचसे शिथिल झाले होते. सरलष्कराचा कारभारी गिरमोजी पंडित कोनिमेरला येऊन जुलैमध्ये गडबड करू पाहात होता. परंतु ज्या कृष्णाजी शिद्यांचा टिंडीवरमला पराभव करून तो पुढे आला होता. त्याच्या हाताखाली जिंजीवरून संभाजीराजांची एक तुकडी तिकडे जाताच तो पुन्हा परत गेला. मात्र पावसाळ्याचा जोर कमी होताच दोन्ही सैन्यांनी भांडण टाकून प्रदेशात लुटमार मात्र चालू ठेवली होती.

मद्रासकरांच्या ३० सप्टेंबरच्या लंडनला लिहिलेल्या पत्रातील वर्णन बेंद्रे पुढीलप्रमाणे देऊन संभाजीराजांनी कर्नाटकात कसा प्राक्रम गाजविला होता ते निदर्शनास आणतात, "कुत्बशाहीच्या मुलुखात सर्वत्र जुलुमजबरदस्ती व अस्थिरता चालू आहे. चिंजीपासून पोर्टो नोव्हापर्यंत प्रदेश संभाजीच्या सैन्याच्या ताब्यात आहे आणि त्यांनी सेंट थॉमेपर्यंतचा मुलूख लुटून फस्त केला आहे. त्यांच्या सत्तेचे चिन्ह म्हणून हिरवी पाने सर्वत्र रस्त्यात टांगलेली आहेत. ते गडकिल्ल्यात बंदोबस्ताने असून मोगली फौजांशी टक्कर देऊन शकतील. मोगलाने आपल्या फौजा विजापूरजवळील बंडखोर राजांच्या पारिपत्यार्थ व हिंदुस्थानातील बंडे मोडण्यास आणि विशेषतः संभाजीराजांचा नाश करण्याकरिता रवाना केल्या आहेत.."[१०६] या पद्धतीने विविध साधनांचा आधार घेऊन व त्यांची चिकित्सा करून वा. सी. बेंद्रे संभाजीराजांच्या दक्षिण कर्नाटकातील कामगिरीचे वर्णन करतात.

संभाजीराजांच्या कारकिर्दीत इ.स. १६८८ नोव्हेंबर नंतर फार मोठ्या लढाया झाल्या नाहीत. एक-दोन लहान-सहान भांडणे झाली इतकेच. डिसेंबरच्या सुरुवातीला कोनिमेरच्या आसपास मोगली व मराठ्यांचे सैन्य वावरत होते व त्यांनी पुष्कळ व्यापाऱ्यांचा माल लुटून नेला

होता. असे कोनिमेरच्या बातमीवरून समजते असे बेंद्रे सांगतात व लिहितात की, मोगल व मराठे यांच्यात किरकोळ भांडणे चालूच राहिली. १२ जुलै १६८९ ला अशी बातमी आली की डचांनी मद्रासहून औरंगजेबासाठी पाठविलेला फार मोठा नजराणा वाटेत संभाजीराजांच्या लोकांनी लुटला.

या भांडणात जरी मोगलाची सेना सारखी वाढत होती तरी दोघांपैकी कोणताही निश्चित असा विजय मिळत नव्हता. याठिकाणी हरजीराजे यांची कारकीर्द संपते. कारण नंतर ते आजारी झाले व सप्टेंबर १६८९ अखेर वारले. पुढे त्यांची बायको व मुलगा वगैरे राजाराम चंदीस जाईपर्यंत तेथेच होते. शिवाजी महाराजानंतर कर्नाटकात रघुनाथ पंडित, संताजी व त्रिंबकजी भोसले आणि एकोजी भोसले यांनी जी अंदाधुंदी माजविली होती ती दूर करून हरजीने राज्य वृद्धीस नेले. उलट संताजी, त्रिंबकजी व एकोजी यांनी आपल्या राज्यातील बराचसा भाग मदुरेचा नायक किंवा म्हैसूरकर यांना घेऊ दिला. याच मंडळींनी केसोपंत व दुसऱ्या ब्राम्हण सुभेदारांनी जो अंतस्थ कलह पेटविला होता त्यालाही नियंत्रित ठेवून संभाजीराजांचे कर्नाटकातील राज्य संभाजीराजांच्या मृत्युपर्यंत जवळजवळ दुप्पट वाढवून पूर्ण सुरक्षित ठेवले. संभाजीराजांनीही आपल्या मेव्हण्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्यांना तसे करण्यास प्रोत्साहन दिले. हे राज्य राखले गेले नसते तर हिंदवी राज्याची संभाजी राजानंतर लवकरच इतिश्री झाली असती. नाहीतर राजारामाला ठावच मिळाला नसता. अंबिकाबाई व हरजीराजे महाडिक यांची ऐन संकटकाळातील ही कामगिरी फारच महत्त्वाची आहे यात शंका नाही[१०७] असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

[इ] केसो त्रिमळला संभाजीराजांद्वारे कर्नाटकात पाठविणे अफवा व सत्यता यासंदर्भात बेंद्रेंचे लिखाण :

मराठ्यांच्या कर्नाटकात हरजीराजे आपला जम बसवीत असतांना आणखी एक घरगुती संकट उपस्थित झाले ते म्हणजे केसो त्रिमळला संभाजीराजांनी कर्नाटकात पाठविल्यानंतर उठलेल्या अफवा होय. या संदर्भात वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतात की 'नोव्हेंबर १६८६ त केसो त्रिमळ यास कर्नाटकात संभाजीने रवाना केले व ते कर्नाटकात ११ फेब्रुवारीस गेले.' असा शकावलीत उल्लेख आला आहे. शामजी नाईकांना कैद केल्यानंतर कोणी कारकून पाठवावा म्हणून बहुधा केसोपंतास पाठविले असावेसे दिसते. कदाचित गोवळकोंड्याच्या वेढ्यानंतर

कुत्बशाहीत मोगलांची स्वारी उद्‌भवेल तेव्हा त्यांचा प्रतिकार करण्याकरिता केसोपंतास पाठविले असेल आणि हरजी नायक यांनी इतर आघाड्या सांभाळून कर्नाटकाचा कारभार करण्यासाठी केसोपंताच्या खर्चासाठी कर्नाटकचा अर्धा वसूल त्यांना दिला असेल. हरजीराजे यांच्याऐवजी केसोपंतास पाठविले असे म्हणण्यास पुरावा नाही. परंतु केसोपंत येणार म्हणून जी बातमी आली ती बरीच विपर्यस्त होती. ती तशी मुद्दाम पसरविली की कसे ते समजण्यास पुरावा नाही, असे बेंद्रे येथे सांगतात. यावेळच्या लिखाणात इंग्रजांचे मार्च १६८७ चे पत्र व ५ एप्रिलच्या पत्रात[१०८] जो मजकूर आला त्या कशा खोट्या होत्या त्याची चिकित्सा बेंद्रे पुढीलप्रमाणे करतात.

वा. सी. बेंद्रे सांगतात की, म्हैसूरचे सैनिक आपल्या शत्रूला घाबरविण्यासाठी एक उपाय योजित तो म्हणजे आपल्या प्रतिस्पर्ध्याचे नाक विशिष्ट शस्त्राने कापून टाकावयाचे हा त्या भागातील नेहमीचा अनुभव पाहून कोणीतरी दाढी-मिशी उतरण्याची मानहानीकारक क्लृप्ती काढून घबराट निर्माण करण्याचा प्रयत्न केला असेल. मिशी उतरून धिंड काढणे ही शिक्षा शिवपूर्वकाळी तरी चालू होती. असो. ही सारी घबराट लवकरच दूर झाली आणि उठवलेल्या अफवांची सोडवून होऊ लागली. हरजीराजे हेच कर्नाटकचे सरसुभेदार असून केसोपंत हे त्यांच्या हाताखालीच दिले आहेत याची जाणीव झाली. मद्रासकरांना तिमाजीपंताविरूद्ध तक्रार करावयाची ती हरजीराजे सरसुभेदार जिंजी प्रदेश म्हणून करावी लागली. इतकेच नव्हे तर हाही बदल केला गेला तो ही कुडालुरकरांच्याच सूचनेवरून.

सारांश, केसो पंडिताचा अधिकार अधिक का हरजीराजे सरसुभेदाराचा अधिक, हा प्रश्न लोकांमध्ये चर्चिला गेला असावा. त्यामुळे नाना तर्कवितर्क केले गेले; परंतु त्यामध्ये विशेष तथ्य नव्हते. कारण संभाजीराजांनी सरकारकुनांना सेनापती सरसुभ्यांवर मुलकी हिशेबी कामापेक्षा अधिक अधिकार किंवा नियंत्रण पूर्वीप्रमाणे ठेविले नव्हते. सरकारकुनांना फक्त त्यांना दिलेल्या सैन्यापुरते व युद्धविषयक कामगिरीपुरतेच अधिकार होते. शामजी नाईकानंतर सरसुभेदार हरजीराजे महाडिक यांना कर्नाटकातील सुभेदरांचे हिशेब देईल असा वजनदार माणूस नव्हता. त्यामुळे हे सुभेदार या वसुलीबाबत बरीच गडबड करीत असत, हे इंग्रजांच्या अनेक पत्रांवरून स्पष्ट आहे. हजार-दिडहजार पगोड्याच्या बक्षिसाच्या आशेने इंग्रजांना संभाजीराजांनी ठरवून दिलेल्या तहातील अटीविरूद्ध विस्तृत कोट व मोठ्या तोफा ठेवण्यास कारकून मखलाशीच्या परवानग्या देत. अर्थात अशा सुभेदारांस केसोपंताचे संकट वाटले असल्यास नवल नाही. असे

सांगून वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात शिवाजी, संभाजीच्या मृत्युबद्दलच्या बातम्या उठवून हिंदवी राज्याची प्रजा नेतृत्वहीन पोरकी झाली असे भासवून दूरवरचे सरदार व सैन्य यांच्यात गोंधळ उडविण्याचे मुसलमान शाह्यांचे प्रयत्न अनेक वेळा झाले होते व होतही होते. त्यालाच हा एक होता. परंतु या अफवेतही राजारामास संभाजीबद्दल अनादर होता हे दाखविणाऱ्या रामचंद्र पंडितकालीन प्रवृत्तीस अद्यापपर्यंत (ऑगस्ट १६८७) अंकुर फुटला नव्हता, हे मात्र येथे लक्षात ठेवण्यासारखे आहे.[१०९]

[ई] उत्तर कर्नाटकांतील संभाजीराजांची कामगिरी :

संभाजीराजांची कारकीर्द सुरू होण्यापूर्वीच आदिलशाही सरदारांत भांडणे सुरू झाली होती. ती आदिलशाहीचा नाश होईपर्यंत कायमच राहिली. त्यामुळे आदिलशाहांच्या कर्नाटकात फारशा हालचाली होऊ शकल्या नाहीत. संभाजीराजे आपल्या राजधानीतील गाडा नीट मार्गावर लावण्यात यशस्वी होत आहेत न आहेत तोच त्यास मोगली परचक्राला तोंड देण्याच्या तयारीला लागावे लागले. त्यामुळे मोगली सैन्याचा उपद्रव उत्तर कर्नाटकात पोहोचेपर्यंत तेथील देसाई पुंड पाळेगार आपआपल्या प्रदेशाचा बंदोबस्त करीत राहिले. म्हणजेच बेंद्रे सांगतात शहा अलमची स्वारी दक्षिण कोकणात जाईपर्यंत उत्तर कर्नाटकात महत्त्वाच्या अशा उलाढाली झाल्या नाहीत. काही किरकोळ प्रसंग उद्भवले इतकेच.

संभाजीराजे आपल्या कारखान्यांतून तोफेची दारू तयार करून गलबताने निरनिराळ्या ठिकाणी नेत असत; परंतु पोर्तुगीजांनी त्यास अडथळा केला. तेव्हा इ.स. १६८२ च्या जुलैमध्ये संभाजीराजांनी गोव्याच्या व्हॉईसरॉयकडे येसाजी गंभीरराव यास वकील म्हणून पाठविला. त्याने तक्रार केली तेव्हा व्हॉईसरॉयने संभाजीराजांच्या लिहिण्याप्रमाणे हुकूम काढले; परंतु त्याचबरोबर 'पोर्तुगिजांच्या तारवांनाही संरक्षण मिळावे अशी मागणी केली. पोर्तुगीजांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात आला नसल्याबद्दल व्हॉईसरॉयने पुढे रामचंद्र पंडितास १७ फेब्रु. १६८३ रोजी लिहिलेल्या पत्रात तक्रार केली की, कुडाळच्या सुभेदाराने कबूल केल्याप्रमाणे उत्तरेस पकडलेले मचवे व गलबते अद्याप मुक्त केली नाहीत. पोर्तुगीज हद्दीतील लुटमार केलेल्या गावांस नुकसानभरपाई दिली नाही. याच वेळचा एक प्रसंग म्हणजे सोंद्याच्या राजावर संभाजीराजांनी काही अटी लादल्या होत्या, त्या जर पूर्ण केल्या नाहीत तर सोंद्यावर स्वारी

करण्याचा इशारा संभाजीराजांनी दिला होता. परिणामी संभाजीराजे व पोर्तुगीज यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली. ज्यात संभाजीराजांनी पोर्तुगीजांचा बराच मुलूख जाळला व धान्यासाठी लुटला.

अशातच मोगली सैन्य कर्नाटकात उतरू लागले. तेव्हा घाटातील सर्व वाटा संभाजीराजांनी बंद केल्याने तिकडून कोणालाही मालाची ने-आण करणे दुरापास्त झाले होते. याच सुमारास मुंबई बंडखोरांच्या ताब्यात गेली होती. त्यावेळी तेथील इंग्रज नाखवांना संभाजीराजांनी आपल्या नोकरीत घेऊन कारवार बाजूकडील किनाऱ्यावर मोगली आरमार लुटण्याचे काम दिले होते. रॉबर्ट जॉन्सन हा त्यापैकीच एक होता. त्यास कारवारच्या कंपनीच्या लोकांनी पकडून तुरुंगात टाकला व लंडनला परत पाठविला होता. कारवारच्या वखारीला तेथील सुभेदार त्रास देतात अशी इंग्रजांची तक्रार होती. परंतु मुंबईच्या बंडखोर सरकारने जो संभाजीराजांशी तह केला होता त्यानुसार संभाजीराजांनी कारवार प्रांतातील सुभेदारास पत्रे लिहिली व त्यापुढे इंग्रज मित्र व व्यापारी समजून त्यांना त्रास देऊ नये असे सांगितले.

इ.स. १६८४ पासून कर्नाटकात मोगलांच्या हालचाली सुरू झाल्या याचा फायदा घेऊन आपलाही हात धुवून घ्यावा म्हणून देसाई वगैरे गडबड करू लागले. याची माहिती कारवारकरांच्या १९ फेब्रुवारी १६८५ व ८ एप्रिल १६८५ च्या पत्रातून व इतर पत्रांतून येते.[११०] याचा सविस्तर विचार औरंगजेबाच्या हालचाली या पुढील मुद्याअंतर्गत घेण्यात आलेला आहे.

[उ] कर्नाटकामध्ये संभाजीराजांचे व्यापारास प्रोत्साहन :

संभाजीराजांच्या राज्यकारभारातील आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची बाब म्हणजे व्यापारास उत्तेजन ही होय. संभाजीराजांच्या राज्यात इंग्रजांच्या राजापूर, कारवार, पोर्टो, नोव्हो, कोनिमेर व कुडालूर अशा पाच ठिकाणी वखारी होत्या. त्याशिवाय संभाजीराजांनी इतर तीन ठिकाणी सुचवून वखारी स्थापण्यास इ.स. १६८४ च्या करारान्वये परवानगी दिली होती आणि त्याने जकातीचे दरही मोगलांपेक्षा फायद्याचे ठेविले होते. इंग्रजांशिवाय डच व फ्रेंच यांनाही व्यापारार्थ पुष्कळ सवलती देऊन मैत्री राखली होती.

डचांची वखार शिवाजीराजांच्या कारभाराच्या सुरुवातीपासूनच वेंगुर्ल्यास होती. त्यांचे पूर्ण लक्ष पूर्व किनाऱ्यावर असल्याने त्यांचा व्यापार कोकणात फारसा वाढला नाही. त्यांनी पोर्टो नोव्होला एक वखार काढली होती. त्यांना रघुनाथपंत हणमंते व एकोजीराजे यांनी सर्व व्यापार करण्याबाबतची परवानगी दिली. त्यात वखार ६० गजांपेक्षा अधिक नसावी असा एक निर्बंध

होता. सुभेदार या व्यापारांपासून द्रव्यप्राप्तीची आशा धरून अधुनमधून त्यांस त्रास देत; परंतु व्यापारास मात्र क्वचित अडथळा आणित. डचांनी कारवारला एक वखार काढण्याची खटपट चालविली होती. परंतु त्या भागात मोगली सेनेचा उठाव झाल्याने डचांनी आपला विचार बदलला. पुढे पुष्कळ मोठी पेशकश देऊन डचांनी इ.स. १६८८ च्या अखेरीस मोगलांचे फर्मान मिळविले होते व व्यापार चालू ठेवला होता. या व्यापारातून संभाजीराजांना शेकडा अडीचप्रमाणे जवळजवळ पाऊण टन सोने किंवा तीन साडेतीन लाख फ्लॉरिन्स जकात फक्त पोर्टो नोव्होच्या वखारीतून मिळाली.

फ्रेंचांची एक वखार राजापुरास व दुसरी पाँडेचेरीला होती. फ्रेंचांचा डच व इंग्रज यांच्याशी संघर्ष चालू असल्याने त्यांना व्यापार वाढविण्यास चांगला वेळ मिळाला नव्हता. त्यांच्या राजापूरच्या वखारीबद्दल एक तत्कालीन फ्रेंच लेखक लिहितो की, 'फ्रेंचांची एक वखार राजापूरला आहे; परंतु तेथे फार मोठा व्यापार चालत नाही. कारण सर्वच व्यापार डचांशी जी लढाई चालू आहे त्यामुळे कुंठीत झाला आहे. ते आम्हाला काहीही करू देत नाहीत. तसेच शिवाजीच्या (संभाजीराजांच्या) प्रदेशातही सैन्याची सारखी धावपळ होत असल्याने व्यापारास स्वतंत्रता व सुरक्षितता वाटत नाही... परंतु जर तह होऊन शांतता झाली तर... राजापूरच्या फ्रेंचांच्या वखारीत वार्षिक ७-८ लाख लिव्हचा व्यापार करू शकेल... तो राजा (संभाजी प्रिंस) आपला मोठा दोस्त आहे... त्यामुळे राजापूरला आपणास सुरतेपेक्षा अधिक स्वातंत्र्य मिळत आहे. सर्व युरोपिय राष्ट्रांपेक्षा आपल्या राष्ट्रावर त्याचे अधिक प्रेम आहे...' पाँडेचेरीस घोडा बक्षीस दिला नाही म्हणून तेथील व वखारवाल्यांचे व सुभेदाराचे भांडण झाले. परंतु ते नंतर सरसुभेदाराने मिटविले. सारांश सांगताना वा. सी. बेंद्रे म्हणतात की, पैशासाठी असली किरकोळ दमदाटी कर्नाटकातील खालचे अधिकारी करीत असत. राजापूरला राजाची गाठ घेता येणे शक्य असल्याने भांडणे विकोपाला जात नव्हती इतकेच.[१११]

५.२२ इ.स. १६८४ ते १६८९ मधील औरंगजेबाच्या हालचाली

वा. सी. बेंद्रे इ.स. १६८४ ते १६८९ पर्यंतच्या औरंगजेबाच्या हालचालीची चर्चा करतांना सांगतात की, संभाजीराजांनी आपल्या राज्याबाहेर आदिलशाहा व कुत्बशाहा यांना मदत करतांना आपल्या राज्यावरील आक्रमणास शेवटपर्यंत यशस्वीपणे तोंड दिले होते हे तत्कालीन

कागदपत्रांवरून सिद्ध आहे; परंतु बखरकार मात्र या हालचालींबद्दल अवाक्षरही काढत नाहीत. जो काही पाल्हाळ लावतात तो कैदेचा व नंतर त्यांना हालचाल करून मारल्याचा.[११२]

शकावलीत मात्र काही नोंदी येतात त्या वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, "ऑक्टोबर-नोव्हेंबर १६८३: शाहादीखान पुणियासी येऊन बैसला. २ डिसेंबर १६८३: शाहदीखानाने देवघाटे उतरून निजामपूर मारिले. १८ मे १६८४: कबजी रायगडास आले. २० ऑक्टोबर १६८४: मानाजी मोरे व गंगाधरपंत वासुदेवपंत, राहूजी सोमनाथ यांसी संभाजीराजे यांनी कैद केले. ७ नोव्हेंबर १६८४: कोथळागड मोगलांनी घेतला. १४ जानेवारी १६८५: शाहीदखान पुण्याहून दऊड करून बोरघाटे उतरोन गागोली आला. कवी कलशे जाऊन भांडण दिले. फिरोन घाटावरी घातला. मार्च-एप्रिल १६८६: मिरज मोगली घेतली. जानेवारी १६८७: अवरंगजेब विजापूरास आला. शाहादीखानास गाजदीखानी दिली. अदवानी पाठविले. तेथे जाऊन वेढा घातला. सर्जाराव जेधे समेत भाऊ व लोक राजमाचीस राजश्री नीळोपंत प्रधान याजजवळ सेवेसी होते. मार्च १६८८: अजमशाहा याणी बेळगाव घेतले व कित्येक किले घेतले."[११३]

वा. सी. बेंद्रे सांगतात की, इ.स. १६८३ च्या पावसाळ्यापूर्वी औरंगजेबाने आपले सर्व सरदार व सैन्य संभाजीच्या प्रदेशातून माघारी नेले. सुलतान ताराला विजापूरकडे पाठविल्याची बातमी ९ मार्च १६८३ ला सुरतेला होती. परंतु नंतर धरणगावच्या ५ ऑक्टोबरच्या पत्रात सुलतान तारा बहादुरखानाच्या गोटातून पळून गेला व त्याने बंड पुकारले अशी बातमी असल्याचा उल्लेख आहे. परंतु ही बातमी बहुधा तारा विजापूराकडे न जाता कल्याण-भिवंडीला गेला त्यामुळे काही गैरसमजाने निर्माण झाली असावी. असे सांगून बेंद्रे स्पष्ट करतात की, बहुधा शहा अलम, सुलतान तारा व शाहाबुद्दीनखान हे बरोबरच ऑक्टोबरच्या शेवटी शेवटी बाहेर निघाले असावेत. सुलतान तारा कल्याणकडे गेला, शाहाबुद्दीनखान पुण्यास जाऊन बसला आणि शहाअलम रामघाटाकडे गेला. १८ डिसेंबरला रुहुल्लाखानाला नीरा नदीच्या बाजुकडे पाठविला. त्याचप्रमाणे बहरामंदखानास आष्टीकडे ससैन्य पाठविला. मनवरखानास दिल्लीरखान असा किताब देऊन पूर्वीच पाठविला होता. त्याने एका छाप्यात विजय मिळविला म्हणून त्यास पोषाख वगैरे देऊन त्याचा गौरव केला. २४ डिसेंबरला शाहाबुद्दीनखानास गादीउद्दीनखाँ असा किताब देऊन सिपाहसालार केले. त्याने २७ डिसेंबरास देवघाटाने जाऊन निजामपूर मारिले. शिवाय अलम शाहाबरोबर मोठे सैन्य विजापूरकडे रवाना झालेच होते. मोगली सैन्याशी इ.स. १६८३

मध्ये प्रत्यक्ष चकमकी किती झाल्या त्यांची माहिती उपलब्ध नाही; परंतु या निरनिराळ्या सैन्यांचा संभाजीराजांच्या प्रदेशात बराच उपद्रव झाला असणे साहजिक आहे[११४] असे बेंद्रे स्पष्ट करतात.

[अ] इ.स. १६८४ मधील हालचाली :

इ.स. १६८४ मधील मोगली सैन्याच्या हालचालीसंदर्भात सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, विजापूरकडे गेलेले सैन्य घाटमाथ्यावरच राहिले. क्वचितप्रसंगी खाली उतरून लुटमार करून जात असे. कारवारकर १३ फेब्रुवारी, १६८४ ला लिहितात :'मोगली सैन्य सर्वत्र लुटमार व जाळपोळ करीत आहे. डच लोकांना त्यांनी फार वाईटरीतीने वागविले...तेथील मुख्याने आम्हास सांगितले की, कसाबसा त्यांच्या तावडीतून सुटला...' पुढे सुरतकर १५ एप्रिलला लिहितात :'मोगली सैन्य तुमच्या (कारवारच्या) बाजूचा सर्व प्रदेश उद्ध्वस्त करून टाकतील... आम्हास बातमी आहे की ते आता उत्तरेकडे जात आहेत.' नंतर एप्रिलमध्ये स्वत: संभाजीराजेच कारवारजवळ असल्याचे कारवारकर २० एप्रिलला लिहितात. पुढे सुरतकर १ मे ला लिहितात :'बादशाहाने आपले सर्व सैन्य त्याचा मुलगा सुलतान अकबर व संभाजीराजा यांचेवरच केंद्रित केले आहे; परंतु बादशहावर मात्र जनतेची मुळीच निष्ठा राहिलेली नाही...' या लिखाणाचा उल्लेख केल्यावर सांगतात की, पावसाळ्याच्या पूर्वी सुलतान तारा कल्याणहून उठून कारवारच्या बाजूस मुख्य सैन्याकडे गेलेला दिसतो. कारण औरंगजेबाने त्यापूर्वीच आदिलशाही राजधानीला वेढा देण्याचा निर्णय निश्चित केला होता. जूनच्या सुमारास दोनदा संघर्ष झाला होता आणि त्यामध्ये सुलतान अझम ताराला दोन जखमाही झाल्या होत्या.[११५]

इ.स. १६८४ पूर्वीपासून शहाबुद्दीनखान उर्फ गजीउद्दीनखान पुण्यास तळ देऊन गेला होता. वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतांना लिहितात की, '३१ मार्च १६८४ रोजी गाजीउद्दीनखान बहादुर पुण्यावरून कोंडाणागडाकडे रवाना झाला. (गढ नमुना की तर्फ रुकसत हुवा) त्यास दहा हजार रूपये व दोन मण सोने बक्षीस दिले.' १७ एप्रिलला संभाजीराजांचे ११२ नोकर कैद झाले होते. त्यांची कत्तल केली. मोहमद अजम व बेदरबस्त १४ फेब्रुवारीस बहादुरगडाकडे रवाना झाले होते. त्यानंतर बहुधा संभाजीराजांच्या दोन बायका, दोन मुली व त्यांच्या तीन दासी यांच्यासाठी जाणारी रसद पकडली होती. ती बहादुरगडाचा किल्लेदार अब्दुल रहिमानाने बादशहाकडे पाठविली. ती छावणीत २ ऑगस्टला पोहोचली. यापूर्वी मोगली सरदारांनी सरहद्दीवरील लहानसहान ठिकाणे घेतली होती. यावरून संभाजी महाराजांच्या राज्यात किती

सरदार पाठविले होते याची कल्पना येते. या सर्वांशी संभाजीराजांना तोंड द्यावे लागत होते. पुढे २१ सप्टेंबर १६८४ ला गाजीउद्दीनखानाला पोषाख, पाच घोडी वगैरे बक्षीस देऊन त्यास रायगड घेण्यास पाठविले होते. त्याच्याबरोबर त्याचा मुलगा कमरुद्दीनखाँ व इतर उमराव होते. गाजीउद्दीनखानाने पद्मजी, अंगुजी किंवा एकोजी, मल्हारराव व सुजानंद यांना बादशाहाकडे पाठविले होते. त्यास त्यांनी पोशाख वगैरे दिला. यानंतर मोगलांनी ९ नोव्हेंबरला कोथळागड घेतला. यावेळेला भितीपोटी अनेक सरदार संभाजीराजांना सोडून मोगलांकडे जाण्याचा प्रयत्न करीत होते असे धरणगावकरांच्या १८ नोव्हेंबरच्या पत्रावरून[११६] समजते. तसाच उल्लेख शकावलीतदेखील आहे तो बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, '३० ऑक्टोबर १६८४: मानाजी मोरे व गंगाधरपंत वासुदेवपंत राहूजी सोमनाथ यांसी संभाजीराजे यांनी कैद केले' हा कट उघडकीस आल्याने दोन हजार स्वारांसह गंगास्नानाच्या नावाने नाशिक त्र्यंबकेश्वराच्या ऐवजी औरंगाबादला पळून जाणाऱ्यांचा डाव उघड होऊन तो त्याच्या साथीदारासह मारला गेला. अशा पद्धतीने मोगली सत्ता स्वीकारणाऱ्यांच्या कटाचे निर्मूलन करण्यात आले.

संभाजीराजे उत्तरेत छापे घालून हिंदवी स्वराज्यात घुसलेले सैन्य पुन्हा उत्तरेत पाठविण्यासाठी काही तरी कारवाई करण्याच्या तयारीत होते. संभाजीराजांनी नोव्हेंबरमध्ये संगमेश्वराकडे दादाजी प्रभूची रवानगी केली होती.

[ब] इ.स. १६८५ मधील हालचाली :

इ.स. १६८५ मधील हालचालीची माहिती देतांना सर्वप्रथम वा. सी. बेंद्रे १४ जानेवारी १६८५ ची शकावलीतील नोंद देतात, 'शाहाबुद्दीन उर्फ गाजीउद्दीनखान पुण्याहून दउड करून बोरघाटे उत्तरेस गागोलीस आला. कवी कलशे जाऊन भांडण दिले. फिरोन घाटावरी घातला.' कारवारकर १९ फेब्रुवारी १६८५ ला लिहितात :'...आम्ही असे ऐकतो की मोगलाची चार हजार घोडदळ फोज रायरीच्या पायथ्याशी गेली आहे...' पुढे बेंद्रे सांगतात की, बादशाहाकडे बातमी मात्र रायगडावरच जाळपोळ केल्याची गेली. अशीच बातमी मासिरीत २२ जानेवारी १६८५ ची आली आहे. गाजीउद्दीनखानास कलशने नंतर पळवून लावल्याची बातमी दरबारात समजल्यावर रायगड म्हणून त्या बातमीला महत्त्व प्राप्त झाले होते. सत्य नसल्याचे दिसून आल्यावर दु:ख झाले. या बातमीचे स्पष्टीकरण वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, गागोली हे नदीवरील गाव रायगडाच्या पायथ्यापासून ५-६ मैल दूर आहे. येथे राजघराण्यातील मंडळीही राहात असत.

येथेच शाहूचा जन्म झाला होता. गोगोलीला त्यामुळे महत्त्व होते. बहुधा जाळपोळ केली तीच राजधानी असे समजून बातमी दिली गेली इतकेच. जेथे पाचाडलाही धक्का लागला नव्हता तेथे रायगडावर चढून जाळपोळ करणे तितके सहज शक्य नव्हते.[११७]

पुणे व शिवापूर मोगलांच्या ताब्यात गेल्याने भोरमार्गे कोकणात उतरणे सोपे झाले होते. त्या बाजुच्या जेधे वगैरे देशमुख यांचा हिंदवी राज्याकडे जरी ओढा होता तरी ते आपली सुरक्षित राहावी म्हणून मोगलांकडे जावू लागले होते. मुंबईकरही कोकण भागातील मोगलांच्या हालचालीबद्दल आपल्या २२ जानेवारीच्या पत्रात लिहितात : 'मोगली फौजा आमच्या आसमंतातील भागात फिरत आहेत. काही काल तरी लढाईचे वातावरण चालू राहिल.' शिवापूरच्या बाजूने मोगली सैन्याची हालचाल कशी होत असावी व तिचा प्रतिकार वेळोवेळी कसा केला जात असे हे शंकतराजी नारायण सचीव (मावळचे सरसुभेदार) यांनी कृष्णाजी दादाजी प्रभु, देशपांडे, सबनीस व जामनीस निसबत लोक हशम दिमत हुजूरात मौजे कारी वडतुंबी कोरळ चौकी कोरळखिंड तर्फ रोहिडखोरे यांस ३० मे १६८५ रोजी लिहिलेल्या पत्रावरून समजून येईल. अशा अनेक चकमकी झाल्या असतील परंतु असल्या प्रसंगाच्या नोंदी उपलब्ध नाहीत इतकेच असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. शंकराजी लिहितात : 'मावळ प्रांती गनिमांनी चाल केली आहे म्हणोन समजले. त्या कोरळखिंड व ढवळाघाट व मांडरदेवचा सडा येथील जागा चौक्या घालून गनिमांची खबर ठेवून कमकसूर खास बातमी पावती करणे (तुम्ही) राजगडी कळविताच तुमची कुमक रौहिड वगैरे जागांहून होईल. तुम्ही सिरवली (शिरवळ) मदर्मु चांगली केली ही खबर येथे समजली. यावेळी गनीम नामोहरम सर्वांनी करावा. तुम्ही जमेदार व सरचालक महाराजाचे वेळेचे... करोन दाखवितील हा भरंवसा आहे...' यावरून जशी मोगली हालचालीची कल्पना येते तशीच संभाजीराजांनी मोगलांस तोंड देण्याची तयारीही कशी राखली होती हे समजू शकेल[११८] असे वा. सी. बेंद्रे म्हणतात.

संभाजीराजे मोगली सैन्याला परत उत्तरेत कसे पाठविता येईल या प्रयत्नात होते. त्यासाठी त्यांनी निळोपंतास (कल्याण खानदेश प्रांतांचा मोरोपंताकडील सुभा नीळो मोरेश्वरकडे ठेवला होता) सहा ते सात हजार घोडेस्वारांसह खानदेशात लुटालूट करण्यास पाठविले होते. त्या प्रदेशात धुमाकूळ घालीत असता ५ फेब्रुवारी १६८५ ला धरणगाव जाळून लुटून नष्ट केले. संभाजीराजांच्या कारवाईला यश आले आणि बारा हजार घोडेस्वार दक्षिणेतून काढून वर

औरंगाबाद-बऱ्हाणपुराकडे अडकवून ठेवावे लागले. पुढे पावासाळ्यानंतर संभाजीराजांनी असाच आणखी एक प्रयत्न केला. धनाजी जाधवाच्या व दुर्गादासाच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य देऊन भडोच ताब्यात घेतले व तेथून राजस्थानात बंड घडवून आणले आणि त्यामुळे औरंगजेबाला तिकडे लक्ष देण्यास भाग पाडले. असे सांगून वा. सी. बेंद्रे पुढे स्पष्ट करतात की, संभाजीराजांच्या युद्धनीतीत जयपराजयापेक्षा किंवा धारातीर्थी पडण्यापेक्षा शत्रुला विविध मार्गाने निर्बळ करून हिंदवी स्वराज्याचे संरक्षण करण्याच्या कार्यालाच अधिक महत्त्व प्राप्त झाले होते हे स्पष्ट आहे.[११९]

या वर्षात संभाजीराजांनी उत्तर हिंदुस्थानात आगऱ्याच्या दिशेने पाठविलेल्या सैन्याने केलेल्या बंडामुळे त्यांना तोंड देण्यासाठी औरंगजेबाला आपले सैन्य पाठविणे भाग पडले. यावरून संभाजीराजांनी धनाजी जाधवास राजस्थानात पाठविण्याचे जे कारस्थान केले होते त्यातही थोडेबहूत यश आले होते यात शंका नाही.

[क] इ.स. १६८६ मधील हालचाली :

इ.स. १६८६ मधील हालचालींची व विजापूर व भागानगर यांच्या वेढ्याबद्दलची माहिती इतरत्र आलीच आहे. विशेष संभाजीराजांच्या प्रदेशात तळ देऊन बसलेल्या लोकांच्या हालचालींची माहिती उपलब्ध झालेली नाही. संभाजीराजांची सेना विजापूरचा वेढा चालू असतांना मोगली सैन्याला हरप्रकारे सतावित होती. आदिलशाहा हाती पडताच औरंगजेबाने १९ ऑक्टोबर १६८६ रोजी एतिकदखानाला संभाजीराजांना शिक्षा करण्यासाठी पाठवून मंगळवेढ्याच्या बाजूला सैन्यासह ठेवला होता.

[ड] इ.स. १६८७ मधील हालचाली :

वा. सी. बेंद्रे सांगतात, इ.स. १६८७ हे वर्ष सर्वांनाच फार कठीण गेले. दुष्काळ, प्लेग, व महामारी यांनी विशेषतः मोगली सैन्याचा फार मोठा बळी घेतल्याने गोवळकोंड्याचा वेढा चालू ठेवणे बरेच अवघड झाले. त्यानंतर अतिवृष्टीनेही पुष्कळ वाताहात केली.[१२०] त्यामुळे इतर ठिकाणची सैन्यही तेथे न्यावी लागली. धनाजी जाधवाच्या सैन्याने मात्र राजस्थानमध्ये बराच धुडगूस घातला. त्यामुळे औरंगजेबाने शाहा अजम व सुलतान बेदरबख्त याला तिकडे पाठविले. परंतु ते बऱ्हाणपुरास पोहोचण्याच्या आधीच त्यांना गोवळकोंड्याच्या मदतीस परत आणणे भाग पडले. दरम्यान संभाजीराजांनी विजापूराजवळ बरीच लुटमार करून औरंगजेबाच्या हवालदार,

सुभेदरांना भंडावून सोडले होते. मच्छलीपट्टणच्या ४ एप्रिल १६८७ च्या पत्रात मजकूर येतो की, "...सुभेदार महंमद रफी... कळवितो की, रात्री बऱ्याच वेळाने गोवळकोंड्याहून त्यास पत्र आले. त्यातील महत्त्वाचा मजकूर की, भिण्याचे कारण नाही, कारण संभाजीराजांनी मोगलांपासून विजापूर निश्चित घेतले ओ. सिद्दी मुसा चालून जात आहे आणि तो गोवळकोंड्यापासून चार-पाच मुक्कामाच्या वाटेवर गेला आहे. त्याच्याबरोबर १२ हजार स्वार व पन्नास हजार पायदळ असून तो कुत्बशाहाच्या साह्यार्थ जात आहे." यावरून सिद्दी मुसाखान व संभाजीराजे एक होऊन आदिलशाहाचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात असलेले दिसतात. विजापूरची मात्र बरीच हलाखी करून टाकली होती यात शंका नाही. कारण काफीखान व मासिर-इ-अलमगिरी औरंगजेबाचे १६८७ अखेरीस जे घाईने विजापूरास प्रयाण झाले त्याचे कारण म्हणजे अनावर झालेल्या संभाजीराजांच्या सैन्याचा बंदोबस्त करणे हेच देतात. याचवर्षी गोवळकोंडाही औरंगजेबाच्या ताब्यात आला होता. या वर्षाच्या उत्तरार्धात दुष्काळाचा जोरही कमी झाला होता. प्लेगची साथही निवळली होती. परंतु विजापूरात मात्र पाण्यामुळे महामारी वाढली होती त्यामुळे औरंगजेबाला आपल्या हालचाली जलद करण्याला वेळ मिळाला.[१२१]

औरंगजेबाने विजापूर व गोवळकोंडा या राज्यांच्या सरहद्दीवर असलेला सक्करचा किल्ला घेण्यास खानाजादखानाला पाठविले. किल्लेदार बंडनायकाजवळ १२ हजार स्वार, एक लाख पायदळ व दोन मोठे किल्ले होते. बंडनायकाने स्वतःच्या व कुटुंबाच्या संरक्षणाच्या बदल्यास २८ नोव्हेंबर १६८७ ला सक्करचा किल्ला मोगलांच्या हवाली केला. सक्करचे नाव नुसरताबाद ठेवले. अशी माहिती वा. सी. बेंद्रे देतात.

[इ] इ.स. १६८८ मधील हालचाली :

वा. सी. बेंद्रे शकावलीचा उल्लेख करून सांगतात की, "इ.स. १६८८: २५ जानेवारी - अजमशाहाला संभाजीवर रवाना केला. बहुत इनामे दिली. तैनातीस ४० हजारी स्वार बरोबर दिले. नंतर अजमशाहा व फिरूजजंग संभाजीवर चालून जात असता त्यांनी वाटेत बेळगावच्या किल्ल्यास वेढा दिला. हा एक मजबूत असा आदिलशाहीतील किल्ला होता. तेथील लोकांनी त्याच्या ३ वर्षांच्या मुलाच्या नावाने किल्ला लढविला. परंतु तुरुंगाचा जोर व सरबत्तीमुळे हताश होऊन किल्ला पादशहाजाद्याचे हवाली केला. त्या मुलाला माफी देवविली. थोडी मनसबही दिली." बेळगावचे नाव अजमनगर ठेवले. काफिखानही अशीच माहिती देतो. मात्र मासिरीत

किल्ल्याचे नाव मलगाव व काफिखान मलगावन असे देतो. ही वाचण्याची अगर नकलकारांची चूक असावी असे बेंद्रे सांगून दोन्ही उल्लेखामध्ये किल्ला कधी हाती आला ती तारीख दिली नाही. शकावलीत फाल्गुन हे मासाचे नाव देऊन 'अजमशाहा याणी बेलगाव घेतले व कित्येक किल्ले घेतले' अशी नोंद आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात व स्पष्ट करतात की, जानेवारीच्या अखेरीस जाऊन अजमशाहाने वेगळगावपर्यंतची मजल मार्चच्या सुमारास मारली होती असे समजण्यास हरकत नाही. आदोनीच्या बाबतीत काफीखान लिहितो : 'अदोनीवर चालून जाताना अजमशाहाच्या सैन्याची हेरावळ म्हणजे आघाडी फिरुज-जंगकडे दिली होती.' हे शकावलीतील मुख्य नोंदीशी जुळते आहे. अदवनीचा किल्ला मसुदखानाकडे होता.[१२२]

वरील माहितीवरून औरंगजेबाने संभाजीराजांच्या प्रदेशातील आघाडीचे सैन्य १६८७ मध्ये काढून नेले होते. त्यामुळे या प्रदेशात आक्रमणाच्या फारशा हालचाली होऊ शकल्या नाहीत. घेतलेल्या प्रदेशाच्या बंदोबस्तासाठी किंवा संरक्षणासाठी ज्यांना ठेवले होते ते संभाजीराजांच्या प्रदेशावर आक्रमण करतील इतके सामर्थ्यवान नव्हते. सारांश सांगताना वा. सी. बेंद्रे सांगतात अजमशहा व त्याचे सरदार कर्नाटकातून पन्हाळ्यापर्यंत यावयाचे होते. संभाजीचे सैन्यही कुतुबशाहाच्या व विजापूरच्या सरदारांच्या साह्याला गेले होते तेही परत येऊन त्यानंतर येणाऱ्या आघाडीस तोंड देण्याच्या तयारीत गुंतले होते. संभाजीराजांना प्रत्यक्ष साहय्यक असा कोणी राहिला नव्हता. संभाजीराजांचा एक आधार म्हणजे राजस्थानातील उठावणीचा व अकबराच्या इराणी सैन्यानिशी दिल्लीवरील तख्तासाठी योजलेल्या स्वारीचा होता.

वा. सी. बेंद्रे सारांश सांगतात की, अशा संघर्षात राजकारण कौशल्य व राजव्यवस्था अधिक तत्पर व जागरूक असावी लागते आणि ज्याअर्थी हे राजकारण सतत आठ-नऊ वर्षे अंमलात राहू शकले त्याअर्थी आवश्यक ती जागरूकता हिंदवी राज्यात होती यात शंका नाही. तत्कालीन राजव्यवस्था पाहिली तर आर्थिक जबाबदारी व हुकूमत एक राजा या व्यक्तीतच असणे साहजिक होती आणि ती केंद्रीत झालेली जबाबदारी संभाजीराजांनी सांभाळली हे तत्कालीन पत्रव्यवहार स्पष्टपणे सांगत आहे.[१२३]

५.२३ संभाजी महाराजांची कैद व मृत्यू

वा. सी. बेंद्रेंनी संभाजीराजांच्या कैद व मृत्यू संदर्भात अतिशय चिकित्सकपणे अभ्यास करून आपले विचार मांडले आहे. त्यात संभाजीराजांच्या कैदसंदर्भात व मृत्युसंदर्भातील विविध

घटनांचा व लेखकांच्या लिखाणाचा त्यांनी खरपूस असा समाचार घेतला आहे. ते संभाजीराजांच्या कैद व मृत्युच्या संदर्भात सुरुवातीलाच सांगतात की, "संभाजीराजांच्या मृत्युच्या हकिकतीत फारसा मतभेद नाही; कारण त्यांने तो मृत्यू जाहीरपणे भोगला होता. या मृत्युबद्दलच्या तपशिलातील अतिशयोक्तीत व सजावटीत मात्र पुष्कळ मतभेद किंवा भेदाभेद दृष्टीस पडतो. कैदेचा प्रसंग मुळातच आकस्मितपणे घडून आल्याकारणाने शेवटी संभाजीराजांची कैद कोठे व कशी झाली हे समजण्यास मार्ग म्हणजे शत्रू सैन्यातील प्रत्यक्ष भाग घेणार लोक. त्यामुळे कैदेबद्दलच्या कथा निरनिराळ्या स्वरूपात दृष्टीस पडतात. संकुचित व स्वार्थी वृत्तीच्या कथा-नाटक लेखकांनी दिलेले या कथानकाचे हिडीस स्वरूप संभाजीराजांच्या कालाच्या उज्ज्वल इतिहासाला कलंकित करीत आले आहे. या त्यांच्या कथेकरी थाटाच्या आख्यानाला नेहमीच्या त्यांच्या प्रकृतीप्रमाणे एखाद्या अबलेच्या व्यभिचारवृत्तीचे दुकान सजविण्यासाठी 'झेबुनिसा' प्रकरण जोडून आपल्या चंचल मनाची शांती करून घेतली आहे. या कथानकांना अनिष्ट वळण रामचंद्रपंडित आणि मंडळींनी शाहूच्या वारसाहक्काविरूद्ध जी बाष्कळ प्रचार मोहीम केली व आपला नाकर्तेपणा लपविण्यासाठी संभाजीराजांनी राज्य घालविले, आम्ही नवीन मिळविले म्हणून असत्य ग्वाही देण्याचे जे भाबडे व दुष्ट प्रयत्न केले त्यामुळे लागले आहे. मल्हार रामरावने आपल्या कबजीबद्दलच्या द्रोहामुळे त्यास आणखी थोडी आपली भर टाकिली आहे व आपली नालायकता अधिक स्पष्ट केली आहे."[१२४] यावरून आपल्याला असे दिसते की, स्वराज्यातील काही स्वार्थी मंडळींना आपले स्थान वाचविण्यासाठी संभाजीराजांना जाणुनबुजून बदनाम करण्याचा कट रचला व हे सत्य वाटावे म्हणून विविध कथा त्यासाठी आपल्या लिखाणात रचल्या.

[अ] संभाजी महाराजांच्या मृत्युसंदर्भात दंतकथा, बाजार बातम्या कशा निर्माण झाल्या यासंदर्भात वा. सी. बेंद्रेंचे लिखाण :

मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत शिर्केने, कवी कलशवर नाराज होऊन त्याच्यावर हल्ला करण्यासाठी तयारी केली. तेव्हा महाराजांनी शिर्केवर हल्ला केला तेव्हा शिर्के मोगलांकडे गेले व नंतर औरंगजेबाने गाजीउद्दीनखाँ यास दक्षिणेच्या बंदोबस्तासाठी पाठविले व त्याने संभाजीराजांना पत्र लिहून मोगलांकडे येण्याचे सुचविले, अशी चुकीची माहिती आली आहे. कारण औरंगजेब स्वतः ६-७ वर्षांपासून दक्षिणेत संभाजीराजांशी संघर्ष देत होता. यापुढे

संभाजीराजे दिल्ली दरबारात गेले तेव्हा औरंगजेबाने संभाजीराजांना मुसलमान होण्यास सांगितले, संभाजीराजांनी "जहापंहा, तकसी माफ अपनी बेटी बेगम पातशाहाजादी इनायत होय तो मय कबूल." असे उत्तर दिल्याचे सांगितले व नंतर औरंगजेबांनी संभाजीराजांचे डोळे काढून त्यांना चिणून टाकल्याचे व हे वर्तमान बेगमला समझल्यावर बेगम बोलली की, 'राजाने माझी इच्छा केली तो माझा भ्रतार झाला. आता दुसरा करावयाचा नाही. त्याचा पुत्र आहे तो माझा पुत्र, त्याची दिलभराई जलदी करून रवाना करून द्यावे... मी आपला प्राण देईल... बोलून बेगम महालात गेली...' या मजकुरावरून व या बखरीतील इतर सर्व उल्लेखांवरून बादशाहा दिल्लीवरून दक्षिणेत स्वतः आल्याची बातमी बखरकाराला नव्हती. इतकेच नव्हे तर कल्याणच्या पहिल्या स्वारीखेरीज इतर मोगली हालचालींचा तो उल्लेखही करीत नाही. तसेच संभाजी दारूच्या धुंदीत सापडले ही उत्तरकालीन कल्पना त्याच्यापर्यंत पोहोचली नव्हती असे बेंद्रे स्पष्ट करतात.[१२५]

मल्हार रामरावाने बखरीतदेखील[१२६] मराठी साम्राज्याच्या छोटी बखरप्रमाणे मजकूर येतो फक्त यामध्ये संभाजी पकडले गेले त्यावेहळी बेहोष व उद्दाम होते असे लिहिले आहे. मल्हार रामरावाने 'बेहोष व उद्दाम' हे शब्द कोणत्या अर्थाने वापरले हे नीटसे समजत नाही असे बेंद्रे सांगून पुढे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करतात की, येथील सरळ अर्थ घेतला तर मल्हार रामरावदेखील संभाजी तत्कालीन पर्शियन लेखकांप्रमाणे संभाजीच्या 'सत्तामदाचा कैफा'चाच अनुवाद करतो आहे असे दिसते.[१२७]

वा. सी. बेंद्रे मराठी दप्तर रूमाल पहिला किंवा शेडगावकर बखरीतील[१२८] मजकुरासंदर्भात सांगतात की, यातील थोडीसुद्धा माहिती ऐतिहासिक मूल्य देण्याइतकी विश्वसनीय नाही. तसेच निकृष्ट बखरकारांचा हा एक अजब नमुना आहे. हे बखरकार चरित्र सांगताना काही जबाबदारीची जाणीव ठेवली होते असे दिसत नाही. भरमसाठी विधाने करून कथा सजविने एवढाच उद्देश त्यांचा होता असे स्पष्ट दिसते.

यानंतर वा. सी. बेंद्रे पंत प्रतिनिधीच्या बखरीतील माहिती देतात, "संभाजी कारभार चित्त ठेवीत नव्हता. तो विशाळगडास अथवा पन्हाळा किंवा संगमेश्वरी राहात असे... तकरीबखाँ सर्व ठिकाणची बातमी घेत असे. त्यास आता समजले की, संभाजी थोडकेसे लोक बरोबर घेऊन केवळ असावधपणे संगमेश्वरी राहिला आहे. त्यास धरून आणावे असा बेत करून जाणे.

आपला मुलगा इकलासखान, मोठे अत्यंत विश्वासू असे लोक बरोबर घेऊन कोल्हापुराहून मोठे धैर्याने निघाला. तो संभाजीच्या लोकांस वर्तमान कळले की, मार्गे जवळ आला. ते समयी तो मद्यपान करून भूल झाला होता. यास्तव त्यास काही एक बोलावयाचे न होई.... मग कलुशा तीराची जगख लागताच पळोन गेला. ते समयी आपला वेश बदलून तेथून जावयाशी निघाला; परंतु त्याचे अंगावर अलंकार होते ते त्याजला टाकवेनात. त्यामुळे संभाजी असे समजून त्याजला व त्याचबरोबर कलुशा आणि दुसरे चोवीस असामी धरले गेले... तेव्हा बादशाहा अकलुजेहून निघोन इंद्रायणी भीमेचे संगमाजवळ जाऊन उतरला होता. तिकडे तकरीबखानाने त्यास नेला... मोगलाईत मोठे श्रेष्ठ माणूस होते. त्यांनी बादशाहास असे समजाविले की, संभाजीचा जीव रक्षावा. तेणे करून त्याच्या राज्यातील अवघड किल्ले सर्व आपले हाती येतील. ही मसलत औरंगजेबाचे मनास येऊन त्याने संभाजीस निरोप पाठविला की, 'तू मुसलमान हो. म्हणजे तुझा जीव वाचेल.' त्यावर त्याने उत्तर दिले की, 'बादशाहाला सांगावे, जर तू आपली कन्या देशील तर मी बाटेन. तुम्ही दुष्ट मुसलमान लोक. त्यातून तुमची पहिल्यापासून आचरणे दुष्ट आहेत.' असे अनेक प्रकारे भाषणे करून पाठविली व जवळ बंदोबस्तास मोगल लोक होते त्यास शिव्या देऊ लागला. ते उत्तर औरंगजेबास समजताच त्याला बहुत राग येऊन त्याने अशी आज्ञा केली की, संभाजीस बाजाराचे लष्करात नेऊन, बाजारात उभा करून त्याचे प्रथम डोळे लोखंडाचे डागणीने भाजावे, नंतर जीभ कापावी. मग डोके मारावे. अशी आज्ञा करण्याचे कारण केवळ पातशाहाचा राग नव्हे. असे केले असता दुसऱ्यात दहशत पडेल याकरिता असा हुकूम केला.'[१२९]

पंत प्रतिनिधीच्या बखरीतील माहितीची चिकित्सा करतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, येथे दारूचा आरोप प्रथम आला आहे. कारण ही बखर रामचंद्रपंताच्या गटातील असून ती फारच उशिरा म्हणजे इंग्रजी काळात लिहिलेली आहे. भूल येऊन लोळागोळा झालेल्या व्यक्तीला जवळचे कोणीही पळवीत नाहीत. उलट तो आपल्या दागिन्यांच्या अभिलाषा पुरता शुद्धीवर असतो! सत्य आणि काल्पनिक कथानकांत चुकून जे घोटाळे होतात ते असे. असे बेंद्रे दाखवून देतात.

मनूचीने कवी कलश मोगलांना फितूर झाला होता व त्याने संभाजीला पकडण्यासाठी मदत केली... संभाजीला पकडल्यावर सर्वप्रथम औरंगजेबाने कवी कलशला मारले कारण त्याने विश्वासघाताचा कट कसा पार पाडला याची वाच्यता करू नये म्हणून... यानंतर औरंगजेबाने

संभाजीराजांना उंटावर घट्ट बांधण्यास प्रथम सांगितले. त्याच्या डोकीवर घुंगूर अगर घंटा लावलेली उंच टोपी घातली. हे त्याने हिंदु राजे व ब्राम्हण नुसती अणकुचीदार पगडी घालतात तिची थट्टा करण्याकरिता घुंगर बांधून त्यास घालण्यात आली होती. त्या बेफाम वृत्तीच्या माणसास बांधल्यानंतर त्याला छावणीत घुंगुरनाद ऐकून लोक बाहेर पाहण्यात येत. त्या उंटाला इतका चालवीत की त्यामुळे बसणारा माणूस पडलाच असता परंतु त्याला घट्ट बांधला असल्याने तो पडला नाही. परंतु दोर घट्ट आवळल्याने त्यास वेदना होत. त्यामुळे तो त्रासला मात्र होता. सर्वत्र हिंडविल्यानंतर त्या जुलमी राजाला पादशाहासमोर पुन्हा आणले. तेव्हा औरंगजेबाने त्याच्या बरगड्या कुऱ्हाडीने फोडण्यास व आतील ऱ्हदय-काळीज बाहेर काढण्यास हुकूम दिला. नंतर तुकडे तुकडे केलेले त्याचे शरीर उकिरड्यावर कुत्र्यांच्या हवाली केले. अशा रीतीने त्या बेफाम वृत्तीने वागणाऱ्या संभाजीचा दुसऱ्याच्या कारस्थानात ढवळाढवळ करण्यावरून शेवट करण्यात आला.[१३०]

वा. सी. बेंद्रे सांगतात, मनुची यावेळी मद्रास येथे होता. संभाजीराजांच्या मृत्युच्या बाजारबातमीने मद्रासपर्यंत पल्ला गाठीपर्यंत वरीलप्रमाणे विपर्यस्तरूप धारण केले होते. येथेपर्यंत बेंद्रे संभाजीराजांच्या मृत्युबाबतच्या बाजारबातम्या किंवा दंतकथा व कल्पनाचित्रे कशी विविध प्रकारे रंगविली गेली होती त्याचे चित्रण करतात. यानंतर संभाजीराजांच्या मृत्यू संबंधिची सत्यता तत्कालीन पुराव्याच्या आधारे सांगतात.

[ब] तत्कालीन पुराव्याआधारे संभाजीराजांच्या मृत्युसंदर्भातील सत्यता :

सर्वप्रथम वा. सी. बेंद्रे शकावलीतील नोंदी देतात, "१५ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर १६८८: कवी कलश याजवरी सिरके पारखे जाले. कलश पळोन खिळण्यावर गेला. संभाजीराजे रायगडाहून कलशाचे मदतीस आले. समगे (समागमे) स्वारी सिरकियांसी युद्ध करून त्यास पलऊन खेलणियास आले. १३ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर १६८८: संभाजीराजे यांनी कलशाच्या बोले प्रल्हादपंत व सरकारकून व कित्येक लोकांस धरिले. औरंगजेब विजापूरीहून तुलापूरनजिक भीमातीर येथे आले. १ फेब्रुवारी १६८९ शुक्रवार: संभाजीराजे व कवी कलश रायेगडास जावयास संगमेश्वरास आले असता सेक निजाम दौड करून येऊन उभयेतास जीवंतच धरून नेले. वरकड लोक रायगडास गेले. ९ फेब्रुवारी १६८९: येसजी व सिदोजी फर्जंद यांस कडेलोट केले. ११ मार्च १६८९: अवरंगजेबे तुळापुरी संभाजीराजे व कवी कलश यांस जिवे मारून सिरच्छेद केले."[१३१]

यानंतर बेंद्रे मोगली लेखकांच्या नोंदीतील हा प्रसंग देतात, "इ.स. १६८८ च्या अखेरीस औरंगजेबाच्या सैन्यात व विजापूरच्या बाजूस महामारी झाली. महामारीने एक लाख तरी लोक मेले. खान फिरूजजंगचे डोळे गेले. त्यामुळे त्याची संभाजीवर जी योजना केली होती ती बदलून शहाजादे अजमशाहाला संभाजीवर जाण्याचा डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवाड्यात हुकूम झाला."[१३२] तर खाफीखान हा प्रसंग १६९० ला झाल्याचे देतो. तारखा वगैरे देत नाही; परंतु बुसातिन-इ-सलातिनमधील माहिती उपयुक्त आहे असे सांगून वा. सी. बेंद्रे ती पुढीलप्रमाणे देतात, 'तारीख ३ माहे रबिलावल (२८ डिसेंबर १६८७) रोजी लढाईस निघण्याकरिता तयारी करून विजापूर येथून (बादशाहा) निघाले. आकलुजकडे जाते जाहाले. आठ रोजानंतर त्या महामारीचे (प्लेग) पळ्याचा अठनी व पटकीची (कॉलेरा) गर्दी निखालस शांत जाहली. परंतु तो उपद्रव तीन वर्षेपर्यंत सारखा गावोगाव चालला होता. त्या महामारीचे उपद्रवात हजारो घरे व महाल वोसाड जाहाले... ता. १६ जमादिलावल (९ मार्च १६८८) रोजी मौजे बिदरी या गावावर श्रीकृष्णातीरी पोहोचून तेथेच दोन महिनेपर्यंत राहिले. तारीख १९ माहे साबान (८ जून १६८८) रोजी बिदरी येथून कूच करून गुल्गुल्यास येऊन पोहोचले. याच महिनियात शेख निजाम दख्खनी सर्वांत प्रसिद्ध व आदिलशाही राजधानीतील चाकर मंडळीपैकी होता. तो त्या राजधानीत बखेडा झाल्यानंतर कुत्बुद्दीन मुल्क अबुल हसन याचे चाकरीत दाखल जाहला. कित्येक दिवसानंतर तेथून निघाला. अलमगीर पातशाहाचे दरबारात येऊन चाकर मंडळीत दाखल जाहला व मुखरबखान असा किताब मिळवून पन्हाळ्याचा किल्ला हस्तगत करण्याचे कामावर नेमिला गेला होता. इतक्यामध्ये संभाजी हे त्याच दिवसांत राहेरी येथून खेलण्याचे किल्ल्यास जाऊन तेथील बंदोबस्त करून संगमनेर (संगमेश्वर) येथे संभाजीचा दिवाण कब कलस याने हवेली व बाग बांधली होती, तेथे राहून संतोषात व सुखात (ऐषोइश्रतमे मशगुल रहा) निमग्न जाहला व यानंतर खान फिरूजजंग याला संभाजीचा निर्मूक फडशा करण्याचे कामावर नेमिले होते... त्याचे डोळे गेले होते. यास्तव महमद अजमशहा याजचा त्याचे बदलीवर नेमिले आणि अद्यापि शोधातच होते व संभाजी हाती लागला नव्हता. तोच येकायेकी संभाजीची खबर शेख निजाम यांजला समजली.'[१३३]

यानंतर वा. सी. बेंद्रे काफीखानाच्या ग्रंथाचा इलियट डॉसनने केलेल्या भाषांतरातील प्रसंग घेतात त्यात काफीखान लिहितो की, "Prince Muhamed Azam Shah was sent with an army and some experienced Amirs to punish the infidels about

Bahadurgarh and Gulshanabad. Firoz Jang, with another army, was sent to reduce the fort in the neighbourhood of Rajgarh Mukarrob Khan, otherwise called Shaikh Nizam Haiderabadi, was sent against the infidel Sambha...... After satisfying himself to the estate of its stones, and the settlement of the country round, under the guidance of adverse fortune, which kept im ignorant of the approah of the imperial forces, he went to bathe in the wathers of the Ban Ganga, on the boarders of the district of Sanamnir (Sangameshwar), one day's journey from the seashore. The place was situated in the valley surrounded by high mountains of difficult passage. Here Kab Kalas, the filthy dog, had built a house, embellished with paintings and surrounded with a garden full of fruit trees and flowers. Sambha, with Kab Kalas, and his wives, and his son sahu, went there, accompanied with a force of two or three thousand horse, entirely unaware of the approach of the falcon destiny. After bathing, he lingered there, viewing the lofty hills, the ardouous roads full of ascents and decents, and the thick wood of thorny trees. Unlike his father, he was addicted to wine, and fond of the society of handsome women, and gave himself up to pleasure. Messengers brought him intelligence of active movements of Mukarrab Khan; but he was absorbed in the pleasure which bring so many men of might to their rain"[१३४]

वा. सी. बेंद्रे सांगतात यामध्ये कवी कलशच्या हवेलीचे वर्णन व शेवटची दारू व बायकांबाबतीची वाक्ये इतरत्र व दुसऱ्या कोणत्याही जुन्या प्रतीत नाही. असली माहिती खाफीखानाने नंतर अधिक जोडली असावी आणि तीही त्याच्या शेवटच्या इ.स. १७०० नंतरच्या मुक्कामात. कदाचित ती कोणी इतरानेही घातली असण्याचा संभव आहे. काफीखानाच्या 'सत्तामदाचा कैफ' हा नेहमीचा मूळ शब्द कदाचित पूर्वग्रहदोषाने 'दारूचा कैफ' म्हणून विकृतीने

इलियट डॉसनच्या प्रतीत भाषांतरीत केला गेला असणेच अधिक संभवनीय आहे. कारण तो तसा सर्व प्रतीत नाही.[१३५]

[क] कवी कलश व शिर्के प्रकरण :

कवी कलश व गणोजी शिर्के यांच्यातील वितुष्टाविषयी वा. सी. बेंद्रे सांगतात की, 'ऑक्टोबर १५ ते नवंबर १२, १६८८ चे दरम्यान कवी कलश याजवरि सिरके पारखे जाले व कवी कलश पळोन खेळणियावर गेले.'[१३६] अशी शकावलीतील नोंद आहे. यामध्ये कवी कलश कोठून पळाले याचा उल्लेख नाही. कवी कलश पन्हाळा व खेळणा येथे आघाडीवर रहात होता. कलशच्या ताब्यात खेळण्याजवळील मलकापूर येथील पागा होती, असा उल्लेख येतो. असाच एक उल्लेख कवी कलशने सिराळे प्रांताचा तुळाजी देसाई याला २७ मे १६८८ रोजी लिहिलेल्या पत्रात पुढीलप्रमाणे आला आहे. कलश लिहितो, 'तुजकडे ह्या वारणाकढेतपैकी... बाकी ओढत आहे. त्यापैकी बदल देणे ऐवज दाणा पागा सरसुभा राजश्री सेनापती याला कैली नवसरी सोळुले माप खंडी १० दाहा रास देविली असत. खुद निसबतपैकी आदा करून पावलियाचा कागद घेणे... मलकापुरी पागा मारनिलेकडील छावणीस आहे तेथे देणे. पावलियाचा कागद खुद माचा घेणे...' यानंतर तुलाजी देसाईला १ सप्टेंबर १६८८ ला कलशने आज्ञापत्र लिहिले आहे. त्यात पुढीलप्रमाणे माहिती येते, 'तुजकडे बाबती कर्ज सरदेशमुखी देऊ आहे. गला खंडी २० पैकी बदल देणे खर्चास मिरबातखान दिलेरखानाचा भाऊ हुजूर आहे. त्यास तकदीम होन पाा ४० चाळीस होन रास देविले असेत...' यावरून कवी कलशकडे पन्हाळा किंवा प्रभावतीचा सरसुभा असावा असे दिसते.[१३७]

यामुळे कवी कलश पन्हाळ्याला राहात होता व तेथून तो शिर्केशी संबंध बिघडल्याने म्हणजे शेख निजामाचे सैन्य शिर्क्यांच्या भागात येताच त्यास फितूर होऊन मिळाल्याने व त्याच्याजवळ २५००० सैन्य असल्याने पळून खेळण्यास गेला असे दिसते. संभाजीराजे पारिपत्यास आले तेसुद्धा पन्हाळ्यासच गेले होते. महमंद अझमशाहाने आपल्या शेख निजाम आदि सरदारांच्या साह्याने पन्हाळा फितूर करून घेण्याचा प्रयत्न केला तो थोडाबहुत यशस्वीही झाला. येथून कवी कलशला हुसकावून लावले व तो खेळण्यास गेला; परंतु संभाजीराजांनी फितूर लोकांस कैद करून किल्ला ताब्यात घेतला. याबद्दल शकावतीत नोंद येते, '१३ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर १६८८, संभाजीराजे यांनी कलशाचे बोले प्रल्हादपंत व सरकारकून व कित्येक

लोकांस धरिले.' ही मंडळी पन्हाळ्यातच अटकेत होती. त्यांची सुटका १२ फेब्रुवारी १६८९ ला झाली हे सांगताना शकावलीत नोंद येते की, 'मानाजी मोरे व वरकड सरकारकून धरिले होते ते सोडिले... येसाजी व सिदोजी फर्जंद यास कडेलोट केले.'[१३८]

हे फर्जंद पन्हाळ्यात होते. मागे संभाजीराजांस विषप्रयोग झाला तेव्हा यांचा वडील भाऊ हिरोजी फर्जंद मारला गेला. आता या दोघांना संभाजी राजानंतर लोकांनीच कडेलोट करून मारिले. यावरून इतर लोक जरी पकडले होते तरी त्यांचा प्रत्यक्ष हात या फितुरीत नव्हता. या फितुरीस मुख्य जबाबदार म्हणजे हे फर्जंद बंधू व गणोजी शिर्के होते असे दिसते असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

यानंतर वा. सी. बेंद्रे मराठी साम्राज्याची छोटी बखर शकावली, २० एप्रिल १६८९ ची राजाराम महाराजांची सनद यातील मजकूर देऊन सांगतात की, संभाजी महाराजांनी पन्हाळ्याच्या बंदोबस्तानंतर शिर्क्यांचा बंदोबस्त केला व नंतर ते खेळण्यास आले असे दिसते. शिर्क्यांचे पारिपत्य म्हणून 'शिर्काण' हा प्रदेश मारणे व त्यास त्या भागातून काढून लावणे इतकेच होते. संभाजीराजांनी शिर्क्यांच्या प्रदेशाची बरीच नासाडी केली होती यात शंका नाही. त्यांची सरदेशमुखीही नंतर दूर केली.[१३९]

वरील शिर्के प्रकरणाचे स्पष्टीकरण देताना वा. सी. बेंद्रे सांगतात की, "शिर्के मारला गेल्याचा जो अतिशयोक्तीने उल्लेख करतात तो मात्र पूर्णपणे चुकीचा आहे. गणोजी शिर्के व त्याचे सर्व कुटुंब व जवळचे भाऊबंद हे सर्व नंतर हयात असल्याचे त्यांच्या नंतरच्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते. इतकेच नव्हे तर 'शिर्काण' म्हणजे रायरी सभोवतालचा शिर्क्यांचा मुलूख, असा निर्देश सर्वत्र कागदपत्रांत पहावयास मिळतो. रिकामे झालेले शिर्क्यांचे राजकीय अस्तित्व त्या भागातून नाहिसे झाले होते हे खरे. परंतु सर्व, इतकेच नव्हे तर बरेच शिर्के मारले गेले. असा उल्लेख कोठेही नसून ते मोगली चाकर झाल्याचाच उल्लेख करतात. सारांश, शिर्के मंडळी व संभाजीराजे यांचा बेबनाव पूर्वी नव्हता. शाहा अजमचे सैन्य मुकर्रबखानाच्या बरोबर कोल्हापूर भागात येऊन ठेपल्यानंतर शिर्क्यांचा धीर सुटून ते आपल्या वतनाच्या बचावार्थ मोगलांकडे गेले. त्याचा फायदा मुकर्रबखानाने घेऊन शिर्क्यांचा पन्हाळ्याच्या राजाकारणात उपयोग करून घेतला. त्याचा परिणाम संभाजीराजे व शिर्के यांच्या भांडणात होऊन शिर्क्यांना सर्वस्वी मोगलाचे चाकर म्हणून राहण्याची वेळ आली."

गणोजी शिर्के यांच्या कारवाई खालील गोष्टी वा. सी. बेंद्रे यांनी उघडकीस आणल्या त्या म्हणजे -

(१) पन्हाळ्याच्या किल्लेदारास लाचलुचपतीस उद्युक्त करून पन्हाळा मोगलांच्या हवाली करणे.

(२) संभाजीची बायको चंपा उर्फ दुर्गा हिला पकडून मोगली कैदेत पाठविणे.

(३) संभाजीराजांचा नाश करण्यात शक्य ती मदत करावयाची, या होत्या.

आपली जहांगिरी संभाजीराजांनी दूर केली ती मोगली सरदार बनून परत मिळवावयाची. यावेळी कवी कलश खेळण्यात होता. हा राजद्रोह खास संभाजीराजांच्या जवळच्या नातलगाने केला असल्याने कवी कलश त्यांचा बंदोबस्त करण्यास समर्थ नव्हता. त्याने संभाजीराजांना कळवून पारिपत्यार्थ बोलाविले; परंतु संभाजीराजे येण्यापूर्वी संभाजीराजांची दुसरी बायको चंपा उर्फ दुर्गा हिला अकस्मात छापा घालून कैद केली व ताबडतोब दौलताबादच्या किल्ल्यात नेऊन कैदेत ठेवली होती. संभाजीराजे नंतर पन्हाळ्यास आल्यानंतर पन्हाळ्याचा बंदोबस्त केला, राजद्रोह्यांना शिक्षा करून शिर्के व मोगली लोकांस पळवून लावले आणि दुर्गाबाईचा शोध लावून तिला परत आणण्यासाठी हुकूम दिले.[१४०]

[ड] संभाजी महाराज संगमेश्वरला जाण्यासंदर्भातील बेंद्रेंचे लिखाण :

संभाजी महाराज संगमेश्वरला कधी दाखल झाले त्या दिवसाचा उल्लेख नाही. शकावलीतील नोंद अशी की, "माघ वद्य, ७ शुक्रवारी (१ फेब्रुवारी १६८९) संभाजीराजे व कवी कलश रायगडास जावयास संगमेश्वरास आले असता सेक निजाम दौड करून येऊन उभयेतांस जीवंतच धरून नेले. वरकड लोक रायेगडास गेले." इ.स. १७११ तील तकरीरीतही 'संभाजीराजे रायेगडास चालिले. संगमेश्वराचे मुकामी शेक निजाम गनीम आला.' हा उल्लेखही शकावलीतील नोंदीला दुजोरा देणारा आहे. त्यामुळे ही शकावलीतील या नोंदीवरून व शिर्के प्रकरणातील तत्कालीन पुराव्यावरून कवी कलशचे वास्तव्य संभाजीराजे संगमेश्वरी येण्यापूर्वी ४-५ महिने तरी, पन्हाळा व खेळणा येथेच होते. हे सिद्ध आहे. शिवाय शकावलीप्रमाणे ते दोघे व बरोबरीचे खास पथक रायगडास जाण्यासाठी निघाले होते. संगमेश्वरी छावणीसाठी नव्हते हेही स्पष्ट आहे. रायगडास जाण्याची आवश्यकताही तत्कालीन परिस्थितीवरून स्पष्ट होते. शहा

अजम पुण्याच्या बाजूला जाऊन त्याने रायगडाला वेढा दिला होता. कोकणातील लहानमोठे गडकोट घेतल्यावाचून मराठ्यांचे राज्य बुडविणे शक्य नाही असे औरंगजेबाला वाटत होते.[१४१]

डॉ. सेंट जॉनने इंग्लंडला आपल्या राजाला पाठविलेल्या १८ जुलै १६८८ च्या पत्रावरून[१४२] स्पष्ट होते की, औरंगजेब पन्हाळ्याच्या लढ्यासाठी फारसा उत्सुक नव्हता. त्याला विजापूर, भागानगरसारखा रायगड घ्यावयाचा होता. त्यामुळे शहा अझम व औरंगजेब विजापूरवरून परस्परच त्या बाजूस जात होते. याच प्रकारची नोंद मासिरीतही येते. औरंगजेब पश्चिमेस पन्हाळ्याकडे न वळता वायव्येकडे अकलुजला गेला. अकलुजवरून तो बहादूरगडला १५ फेब्रुवारी १६८९ पूर्वीच गेला. यावरून औरंगजेब पन्हाळ्याकडे न येता रायगडच्याच बाजूने जात आहे ही बातमी जानेवारी अखेरीस लागताच व मुकर्रबखानाचे सैन्य पन्हाळ्याबाबत फारशी हालचाल करीत नाही हे पाहून संभाजीराजे खेळण्यावरून वेगाने निघाले आणि तेही रायगडास जाण्यासाठी. असे सांगून बेंद्रे पुढे सांगतात संभाजीराजे खेळण्यावरून १ फेब्रुवारी १६८९ रोजी निघाले असे म्हणता येते.

संभाजीराजांच्या हालचालीची नक्की बातमी मलकापुरास होतीच आणि तेथीस खास शिर्के व सभोवतालची मंडळी शत्रुच्या अंकीत झालेली होती. त्यामुळे संभाजीराजांनी खेळण्यावरून ३०-४० मैलांची ४००-५०० लोकांनिशी केलेल्या दौडीची व संगमेश्वरी मुक्कामास जाण्याची बातमी कदाचित संभाजीराजे तेथे पोहोचण्यापूर्वीच मुकर्रबखानास मिळाली असल्यास आश्चर्य करण्यासारखे काही नाही. अर्थात तातडीने निघालेले संभाजीराजे पुढे चाल करून निसटून जातील या भीतीने कोल्हापूर-मलकापूर-खेळण्यावरील रस्ता सोडून शिर्के मंडळीच्या साहाय्याने मुकर्रबखान आडवाटेने झटपट संभाजीराजांवर जाऊन छापा घालणे आवश्यक होते आणि ते तसे शक्यही झाले. जर संभाजीराजे पुष्कळ काळ संगमेश्वरी वास्तव्य करीत असून आणखीही काही काळ राहाण्याचा संभव असल्याची बातमी असती तर मुकर्रबखानाने घाईगर्दीने न येता तो आपल्या सैन्याच्या पोटापाण्याची नीट व्यवस्था करून उतरता व संभाजीराजाच्या मलकापूरच्या पागेची भीती अंगावर ठेवून त्याच पावली कोल्हापूरास परत जाण्याची निकड न राखता.

तसेच जर संभाजीराजे कलशासह संगमेश्वरास दीर्घ काळ असते तर कलशाचा कारभारी कृष्णाजी कोन्हेरे यानेही त्याचा सहज फायदा घेतला असता व जो कागद वेळेअभावी

खेळण्यास होऊ शकला नाही तो संगमेश्वरी करून घेतला असता. परंतु संभाजीराजे संगमेश्वरी १-२ दिवसांपेक्षा (आणि तेही बहुधा देसाईच्या कामाच्या अहवालासाठी) अधिक राहाणार नसल्याने कृष्णाजी कोन्हेरने आपले प्रकरण उलगडून घेतले नाही. कोतळूजवरून आलेला देसाई संभाजीराजांची भेट घेऊन शिर्क्यांची सरदेशमुखी सरकारात जप्त करून घेतल्याची पत्रे घेऊन गेला.

बेंद्रे म्हणतात अचानक पडलेल्या मोगली छाप्याची माहिती बाहेर पडलेली दिसत नाही. मात्र खानाचे सैन्य वाटेवर दिसताच बातमी आली असली पाहिजे. संभाजीराजांच्या दृष्टीने विचार केला तरी जेव्हा संभाजीराजे इतके दिवस खास खेळणा व आसपासच्या भागात शिर्क्यांच्या पारिपत्यार्थ हिंडत होते तेव्हा मुकर्रबखानाच्या सैन्याने त्यांच्यावर हल्ला करण्याचे धाडस केले नाही. ते सैन्य आडवळणाने व दुर्घट व जंगली भागातून आणि विशेषत: मलकापूरच्या स्वारीची मोठी तुकडी तयार असताना, शत्रू शिरेल ही कल्पना येण्यासारखी नव्हती, आणि कदाचित त्यांनी ते प्रथम खोटेही मानले असेल. परंतु बातमी आल्यानंतर संभाजीराजांनी प्रतिकाराची तयारी केली नाही हे विधान सत्याला धरून नाही.[१४३]

[इ] मुकर्रबखानाने छापा कधी घातला :

मुकर्रबखानाने संभाजीराजांवर १ तारखेनंतर २-३ दिवसात छापा घातला असावा आणि संभाजीराजेही देसाईच्या कामासाठी संगमेश्वरास फार तर १-२ दिवस राहिले असावेत इतकेच. शिवाय कैद्यांना नीट बंदोबस्तात परंतु शक्य तितक्या लवकर आणण्याचा औरंगजेबाचा हुकूम तिकडे बातमी गेल्यानंतर आला होता. खान हुकूम येईपर्यंत थांबला. त्यात काही दिवस गेले. संगमेश्वर ते कोल्हापूर ७०-८० मैल व कोल्हापूर ते बहादूरगड १५० मैल इतका मार्ग आक्रमण्यास मोठ्या सैन्यास आणि विशेषत: कैदी बंदोबस्ताने नेण्यास ६-७ दिवस खात्रीने लागणार. ज्याअर्थी मुकर्रबखान संभाजीस घेऊन १५ फेब्रुवारीस बहादुरगडास जातो त्याअर्थी संभाजी महाराजांवरील छापा १ फेब्रुवारी नंतर १-२ दिवसामधील असावा व तो ४ फेब्रुवारीस किंवा त्यापूर्वीच पडला असावा.[१४४]

[ई] मुकर्रबखानाचे सैन्य किती होते :

वा. सी. बेंद्रे सांगतात मुकर्रबखानाकडे नक्की किती लोक होते ते समजत नाही. चिटणीस २००० स्वार बरोबर व मागे १००० स्वार मिळून ३००० असल्याचे सांगतात. बुसातिन

४-५ हजार स्वार बरोबर होते असे सांगतो. काफीखान म्हणतो, 'त्याने आपल्याबरोबर निवडक २००० स्वार व १००० पावलोक घेतले.' मासिरी स्वारांचा आकडा न देता 'मानमरातब मिळविण्याच्या आकांक्षा धरणारे एकनिष्ठ अनुयायी होते.' इतकेच लिहितो. उलट संभाजीराजांजवळ २ ते ३ हजार स्वार असल्याचे काफीखान लिहितो तर मारिस ४-५ हजार दक्षिणी भालाईतांनी मुकर्रबखानावर हल्ला चढविला असे सांगतो. सारांश सांगाताना वा. सी. बेंद्रे म्हणतात, मुकर्रबखानाजवळ २-३ हजार स्वार (म्हणजे दखनी भालाईत व तिरंदाज) असावेत व संभाजीजवळ फक्त त्याच्या बरोबरचेच (गावातील उपरे लोक सोडले तर) ४००-५०० भालाईत स्वार होते. त्याचा इतका सहजपणे डोंगरी भागात पाडाव होतो त्याअर्थी मुकर्रबखानाचे त्याच्या सैन्यापैक्षा ७-८ पटीने तरी लोक असलेच पाहिजेत.[१४५]

[ड] मुकर्रबखानाच्या छाप्यासंदर्भातील तपशील :

मुकर्रबखानाच्या छाप्यासंदर्भातील तपशील देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, मुकर्रबखान आपले मुलगे, पुतणे व दहा-बारा खास शूर लोक यांनी दोन-तीनशे स्वारांनिशी संभाजीवर हल्ला चढविला. बातमी लागताच कलश वगैरे सर्व मोगली सैन्याचे पुढे आघाडीस आलेले थोडे लोक पाहून त्यांच्यावर मैल दीड मैल गावाबाहेर चालून गेले. संघर्ष झाला. तोच मोगली दोन-तीन हजार स्वारांची सेना यांच्या ५००-६०० लोकांवर तुटून पडल्याने घोरपडेचे निम्मे अधिक ठार झाले व बाकीचे पळू लागले. मल्होजी सरनोबत मारले गेले. कवी कलशचा तीराने उजवा हात निकामी झाला. हतबल झाल्याने तो पळाला. या मल्होजीबाबाच्या धुमश्चक्रीत संभाजीराजेही पळाले. वाड्यातील तळघरात लपून बसले. परंतु त्यांना वाड्यात जातांना हेरांनी पाहिल्यामुळे ती बातमी खानास मिळाली. इतर सैन्याशी व गावातील लोकांशी भांडत न बसता खानाने आपल्या खास लोकांसह वाड्यालाच वेढा घातला. त्यांच्या मुलांनी वाड्यात शिरून धरपकड केली. वाड्यातील सर्व मुले-माणसे पकडली. शोधाशोध करून संभाजीराजे व कवी कलश यांनाही पकडले. वाड्यातील मुले-माणसे संभाजीराजांचीच म्हणून प्रथम समजली जाऊन धरली होती. त्यांना नंतर सोडून दिले. परंतु इतर सर्वांना शेख निजामाने तातडीने कोल्हापूरास आल्या वाटेनेच नेले. तोपर्यंत सैनिकांनी मोडतोड, लुटालूट केली. मलकापूरच्या पागेस किंवा खेळणा-पन्हाळ्याच्या सैन्यास बातमी लागून ते साहाय्यार्थ येण्यापूर्वीच शेख निजाम आपल्या लोकांनिशी त्याच दुर्घट व जंगली प्रदेशातून निसटून गेला.[१४६]

[ऊ] संभाजीराजांना तुळापुरास नेण्याचा तपशील :

संभाजीराजांस पकडून तुळापुरास नेण्यासंदर्भातील बातमीचा तपशील बखरकार वगैरेंनी दिलेला नाही. काफीखानाच्या व डॉसनच्या प्रतीत जो मजकूर येतो तो शत्रूपक्षीय समकालीन लेखकाच्या सजावटीचा मजकूर जरी अतिशयोक्तीचा असला तरी त्यामागील शत्रुपक्षाला वाटणारे संभाजीराजांचे महत्त्व व भय किती व कसे वाटत असावे याची कल्पना येते. त्यांना संभाजीराजे पकडले जाताच 'हायसे' कसे वाटले असावे याचा चांगला अंदाज बांधता येतो यात शंका नाही. असे सांगून बेंद्रे मासिरीतील तपशील देतात जो सत्य परिस्थितीशी जुळतो. तो लिहितो, "ही (पकडण्याची) बातमी पादशहाला अकलूज येथे मिळाली. ती ऐकून त्याने अकलूजचे नाव आसदनगर म्हणून ठेवले. त्याने छावणीचा शहूआ (Provost marshal) सरदारखानाचा मुलगा हमीदुद्दीनखान यास मुकर्रबखानाकडे ताबडतोब जाऊन कैद्यांस शृंखलाबद्ध व हातकड्या घालून आणण्यास सांगितले. त्या विजयी खानाने दक्षता राखल्यामुळे तो त्या प्रदेशातून सुरक्षितपणे आला. अलमगीरच्या चांगल्या नशिबामुळे वाटेत कैद्यांस सोडविण्यासाठी पाखंड्यांनी एकही हल्ला चढविला नाही. शुक्रवार १५ फेब्रुवारी १६८९ (५ जमादिलावल) रोजी जेव्हा बादशाही छावणी आसदनगरहून बहादूरगडला गेली तेव्हा संभाला दरबारात आणले. पुढे नोंद अशी येते की, 'The Emperor out of his devotion to Islam ordered that from two kos before the camp the disgraced and unlucku Sambha should be made to wear a wooden cap (the badge of condemned criminal) and his comrodes should be clad in a dress of buffoons, punished in various ways, mounted on camels, and brought to the encampment and the Durbar with drums beating and trumpets pealing, - so that the Muslims might be heartened and the infedels disheartedned by seeing it.'[१४७]

खास वयोवृद्ध औरंगजेबाने आपल्या इभ्रतीवर धर्मावर, साम्राज्याच्या सामर्थ्यावर ओढवलेल्या संकटाच्या परिहाराबद्दलच्या तीव्र पण निकृष्ट भावनांचे असे अपूर्वपणे जाहीर प्रदर्शन करणे व आपला इस्लामी बांधवही तितकाच समभागी आहे हे दर्शित करणे, ही सारी घटनाच संभाजीराजांच्या प्रभावी राजाकारणाची व सुप्रभावी प्रतिकाराची साक्ष देते.

संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वातील श्रेष्ठत्व या शत्रुपक्षीय भावनेच्या पार्श्वभूमीवर अधिकच प्रकर्षाने उठून दिसते असे बेंद्रे स्पष्ट करतात.

[ए] संभाजीराजांना ठार मारण्यासंदर्भातील वा. सी. बेंदे यांची चिकित्सा :

औरंगजेबाने संभाजीराजांना हाल हाल करून ठार मारले. या प्रसंगाच्या वर्णनातील तपशिलात बरीच भिन्नता आढळते. बखरकारांनी कथानकासाठी काही कल्पित कथाही त्यात घुसडल्या आहेत. ही भिन्नता महाराष्ट्रीय चरित्रकारांच्या लेखनात विशेष आली आहे. कारण त्यांना वस्तुस्थितीचे ज्ञान होण्यासारखी त्यांची परिस्थिती नव्हती.

[ऐ] झेबुन्निसा - संभाजी प्रकरण :

बेंद्रे बखरीतील इतर वर्णनांची चर्चा करण्याचे टाळतात; परंतु बेगमचा संभाजीराजांशी जोडलेल्या वावदुकपणाच्या संबंधाबद्दल बेंद्रे लिहितात की, बखरीमध्ये बेगमचे नाव दिलेले नाही. परंतु नंतरच्या इंग्रज मराठी लेखकांनी तिचे नाव झेबुन्निसा असे दिले आहे. ही कथा मासिर, काफीखान वगैरेत दिलेली नाही. औरंगजेबास एकूण ५ मुली होत्या. त्यापैकी तिसरी बदरुन्निसा ९ एप्रिल १६७० रोजी वारली. चवथी झुब्दतुन्निसा व पाचवी मिहिरुन्निसा यांची लग्ने झाली होती. पहिली झेबुन्निसा ही १६३८ इ.स. मध्ये जन्मली व इ.स. १७०२ मध्ये मेली. ती अकबराच्या प्रकरणात गोवली गेल्याने तिला दक्षिणेत यावयाच मिळालेच नाही. राहता राहिली दुसरी मुलगी झिअतुन्निसा. हिचा जन्म ५ ऑक्टोबर १६४३ चा. संभाजीस मारले त्यावेळी ही ४६ वर्षाची म्हणजे संभाजीपेक्षा १३-१४ वर्षांनी मोठी होती. लग्नासंबंधिचे तिचे वय उलटून गेले होते. इतकेच नव्हे तर तिच्या धाकट्या तीन बहिणींची लग्ने झाली तरी तिने लग्न न करण्याचा निग्रह पाळला होता. ती चांगली शिकलेली होती. अशा परिस्थितीत कोणी एकाने क्रोधाने अगर उपहासाने उच्चारलेल्या पोकळ शब्दांचा इतका भरवसा धरून ती आपणास मागणीच म्हणून विचार करील इतकी ती क्षुद्र मनाची खात्रीनेच नसली पाहिजे.

संभाजीराजेही आपल्या क्रोधावेषातही असली बाष्कळ बडबड करतील इतके ते असंस्कृत व हे कथाख्यानी बखरकार समजतात तसे ते क्षुद्र बुद्धीचे नव्हते. हे त्यांच्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यातील वागणुकीवरून स्पष्ट होते.

वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की, बखरकारांनी केवळ झिअतुन्निसेने येसूबाई व शाहू यांस, संभाजीराजांची खास खाजगी कारभारीण म्हणून, जरा आदराने वागविले म्हणून हे तर्कवितर्क

बखरीत समाविष्ट केलेले आहेत. ज्या बखरकारांना मृत्युच्या जागेचा किंवा दिवसाचाही उल्लेख करता येत नाही, त्यांना ही औरंगजेबाच्या मुलीची जनानखान्यातील संवादासह गुप्त बातमी कल्पनेशिवाय किंवा कुंभाड रचण्याच्या मनोगताशिवाय कळणेच शक्य नाही. एकंद परिस्थितीचा विचार करता झिअतुन्निसा बेगमेला ४६ व्या वर्षानंतर अविवाहित राहण्यास संभाजीच्या भाषणाची आवश्यकता नव्हती.

[ओ] संभाजीराजांच्या मृत्युसमयीच्या प्रसंगाविषयी बेंद्रेचे लिखाण :

काफीखान, मासिरी, जेधे शकावली तिन्हीही समकालीन साक्षीदार संभाजीराजास अमानुषपणेच ठार केल्याचे सांगतात.[१४८] औरंगजेबाचा मुक्काम बहादुरगडला असताना तेथे १५ फेब्रुवारीला ही कैद केलेली सर्व मंडळी आणली. नंतर मुक्काम कोरेगाव म्हणजे कोरेगाव-तुळापूरच्या प्रदेशात ३ मार्चला गेला. पुढे ११ मार्चला संभाजीराजास हाल हाल करून ठार मारले. शिर कापून त्याचे प्रदर्शन करून हिंदुत भिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला असावा. अमानुषपणे जरी मारण्यात मुसलमान सरदारांनी सूडबुद्धी दाखवून औरंगजेबास खूष करण्याचा प्रयत्न केला असला तरी त्याचा परिणाम मोगली सैन्याच्या हालचालीस पोषक झाला नाही. उलट त्यांनी जे भावनांचे प्रदर्शन केले त्यामुळे संभाजीराजांच्या उज्ज्वल चारित्र्याची जाणीव झाली. तत्कालीन परिस्थितीच्या सत्य ज्ञानाच्या अभावी दारूचा कैफ, कलशाचे मंत्रप्रयोग व बेगमेची कथा, संभाजीबरोबर येसूबाई, शाहू आदि झाल्याच्या वार्ता यासारख्या भाकडकथांना जन्म मिळाला. जरी अशा कथा चिकित्सेवर उतरत नव्हत्या तरी वस्तुस्थितीचा शोध लागेपर्यंत त्या जनमनात टिकून राहाणे स्वाभाविक होते.

[औ] संभाजीराजांच्या खऱ्या समाधीचा शोध :

संभाजीराजांच्या दहनभूमीबद्दलही तत्कालीन वस्तुस्थितीच्या ज्ञानाभावी वादप्रवाद निर्माण झाले. इतिहास ग्रंथात औरंगजेबाचा मुक्काम कोरेगाव किंवा तुळापूर येथे होता असे सांगितले आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. औरंगजेबाचा खास डेरा तुळापूरसंगमाच्या उत्तरेकडील दोन नद्यांच्या मध्यावरील मैदानात होता व सैन्याची छावणी तुळापूरच्या पूर्वेस नदीपलिकडच्या भागात थेट कोरेगावपर्यंत पसरली होती. यात आपटी व वडू खुर्द ही दोन गावे येतात. अर्थात तुळापूरहद्दीच्या नदीकिनाऱ्याचा त्याच्याशी संबंध नाही. बखरीतील शिर कापले व

ते हिंडवले वगैरे उल्लेख खास पर्शियन लेखांतही आले असल्याने संभाजीची समाधी तुळापुरास होती असा दृढ समज होता.

नंतर महाराजांचे वृंदावन वडू बुद्रुक येथे आहे असे कागदोपत्री आढळल्याने ते वृंदावन शोधून काढून इ.स. १९३४ साली तेथेही त्या वर्षापासून उत्सव करून तेथील पालखी संगमाला (तुळापुरी स्मारकाजवळ) आणावी असा कार्यक्रमही तीन चार वर्षे बेंद्रेंनी पार पाडला, ज्या ठिकाणी वृंदावन आहे तो भाग गावाच्या वेशीवरील मरिआईलगतच्या माळावर आहे. संभाजीस वडूस मारल्याचा उल्लेख १४ जानेवारी १७१९ च्या धनकवडीच्या कुलकर्णीच्या कागदात आला आहे. तो असा, 'पातशाहा वडू कोरेगावी येऊन मुक्काम केला. तेथून लष्कर पाठवून, शिवाजीराजे पहिलेच गेले होत, त्याचा लोक संभाजीराजे धरून आणिला आणि (काो किंवा मौज) वढू कोरेगावात मारिला. मग त्याचा लेक शाहूराजा व बाईका आपल्या जालीत ठेविली...' परंतु संभाजी महाराजांचे वृंदावन वडूसच बांधिले होते याचाही प्रत्यक्ष पुरावा पेशवे दप्तरात सापडतो. पहिला कागद १८ जानेवारी १७१५ चा आहे.[१४९] यावरून वडूला संभाजीचे वृंदावन इ.स. १७१५ पूर्वीच बांधले गेले होते यात शंका नाही. बेंद्रे म्हणतात संभाजीराजांचा छिन्नविछिन्न झालेला देह वडू बुद्रुकातच पडला व नंतर बहुधा येसूबाईनेच त्या जागेवर नजरकैदेत असताना वृंदावन बांधले. त्या वृंदावनाची पूजाअर्चा, निगा वगैरे शाहू कारकिर्दीच्या अखेरपर्यंत तरी चालू असावी यात शंका नाही.

५.२५ सारांश

छत्रपती संभाजी महाराजांविषयी इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी लिखाण केल्याने संभाजी महाराजांची जी पारंपरिक प्रतिमा बखरकारांनी, त्यांच्या पठडीतील इतिहासकारांनी व साहित्यिकांनी महाराष्ट्रात निर्माण केलेली होती, ती प्रतिमा पुसून एका तेजस्वी, पराक्रमी व कर्तबगार संभाजी प्रतिमेची स्थापना करण्याचे श्रेय आपोआपच त्यांच्याकडे गेले. वा. सी. बेंद्रे यांचे संभाजीचरित्र हा संभाजी चरित्रसंशोधन क्षेत्रातील एक युगप्रवर्तक टप्पा आहे. महाराष्ट्रामध्ये शे-दीडशे वर्षे रूढ असलेली संभाजी महाराजांची 'दुराचारी व दुर्वर्तनी' प्रतिमा बेंद्रे यांनी आपल्या ग्रंथाने नष्ट करून मराठी माणसास एका 'पराक्रमी, शूर, मत्सुद्दी, दूरदर्शी व कर्तव्यदक्ष' अशा राजाचे दर्शन घडविले. त्यामागे बेंद्र्यांचे ४०/४२ वर्षांचे अथक परिश्रम म्हणजे महाराष्ट्र संशोधन

क्षेत्रातील एका साधनेची गाथाच आहे. एखाद्या योग्यास शोभावी अशी ही ध्येयसाध्यासाठी केलेली एका संशोधकाची ती तपश्चर्या होती.[१५०] असे डॉ. जयसिंगराव पवार लिहितात.

सर्वच बाजुंनी औरंगजेब संभाजीराजांपेक्षा वरचढ असतांनाही सतत तीन वर्षे चौफेर हल्ले चढवूनही खाफीखान म्हणतो त्याप्रमाणे मोगली सैन्यात 'सवाई शिवाजी' म्हणून ओळखला जाणारा व केशवपंडिता प्रमाणे 'ज्वलज्ज्वलनतेजस' अशा संभाजीराजांच्या कर्तृत्वापुढे त्या सम्राटाला हार खावी लागली. हा इतिहास महाराष्ट्राच्या इतिहासलेखकांना जरी महत्त्वाचा वाटला नसला, तरी अनुभवी सम्राटाला व तत्कालीन सर्व शूरवीर, देशी आणि परदेशीय राजनेत्यांना तसा तो वाटला होता हे पुराव्यांवरून सिद्ध आहे. अवघ्या वर्ष सहा महिन्यांच्या काळात जुन्या आणि समर्थ अशा आदिलशाही व कुतुबशाही राज्यांचा बळी घेणाऱ्या अवाढव्य इस्लामी साम्राज्यसत्तेला सतत नऊ वर्षे झुलवीत ठेवून व तिच्या शक्तिसामर्थ्याचा अतोनात नाश करून तिला हिंदवी स्वराज्यापासून दूर ठेवणारा, केवळ डोंगराळ व जंगली कोकणपट्टीचा असमृद्ध अल्पवयीन तरूण राजा, संभाजी युद्धकुशल आणि कर्तबगार असल्याची साक्ष तत्कालीन हिंदू-मुसलमान, फ्रेंच, पोर्तुगीज, अरब व इंग्रज या सर्वांनाच पटली. मोगली सम्राटाला छोट्या हिंदवी स्वराज्याच्या या राजधुरिणाची यशस्वी कारवाई असंभाव्य कोटीतील वाटावी व त्यावरून त्यांनी आपल्याच एकनिष्ठ मुले-नातवंडे अमिरउमराव यांचा संशय घ्यावा इतकी ती अद्वितीय कोटीतील असताना दुर्दैवाने खास महाराष्ट्राला याच कारकिर्दीबद्दल आतापर्यंत मान खाली घालण्याची वेळ आली होती, ही घटनाही इतिहासातील विपर्यासाचे असे एक विलक्षण परंतु अद्वितीय उदाहरण त्याच संभाजीराजांच्या कारकिर्दीने अनुभवास येत आहे. याचे संपूर्ण श्रेय इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांच्या या संभाजीराजांच्या चरित्रालाच द्यावे लागते. बेंद्रेंनी हे चरित्र लिहून व्यक्तिस्वार्थ देशाच्या संस्कृतीलाही कसा बाधक ठरतो हे दाखवून दिले.

संभाजीराजांनी सैन्यभरतीमध्ये केलेली चपळ व मजबूत अधिकाऱ्यांची योजना जशी आवश्यक मनुष्यसंपत्तीची जोड करून देत होती. तशीच या मनुष्यसंपत्तीची हानी होऊ न देण्यासाठी त्यांनी आपल्या सैनिकांना उघड युद्धात सामील न करता गनिमी काव्यावरच पूर्ण भर देऊन मोगलांचा प्रतिकार करण्याच्या युद्धनीतीचा प्रामुख्याने अवलंब केला होता, हे त्यांच्या अनेक युद्धप्रसंगावरून स्पष्ट दिसते.

राज्याच्या संरक्षणासाठी दारूगोळा करण्याचे कारखाने दक्षिण कोकणात चालविणे व तेथून ती युद्धसामग्री गलबताने आवश्यक त्याठिकाणी अडथळ्याविना पोहोचविणे वगैरे बाबत संभाजी महाराजांनी घेतलेली खबरदारी व त्यानुसार केलेला पत्रव्यवहार संभाजीराजांच्या दक्षतेची व दूरदर्शित्वाची चांगलीच ओळख करून देत आहे.

युद्ध तयारीसाठी संभाजी महाराजांनी जसे जागरूकतेने प्रयत्न केले होते. तसाच त्यांनी कठीणप्रसंगी आघाडीवर राहून स्वतः पराक्रम राबवून आपल्या सेनापतींचे धैर्य व त्यांचा महाराजांच्या नेतृत्वावरील व संरक्षणावरील विश्वास अधिकाधिक दृढावत राहील याची काळजी घेतली होती.

शिवाजी महाराजांची संधिविग्रहाची परंपरा संभाजीराजांनी पूर्णपणे अंमलात आणल्याचाही निर्वाळा मिळत आहे. पावसाळ्यात चढाई आणि चांगल्या ऋतुकाळात प्रतिकार हा नेहमीचा क्रमही चालू होता हे संभाजी महाराजांच्या आठही वर्षांच्या हालचालींवरून स्पष्ट आहे.

संभाजीराजांना आयुष्याचा आणि विशेषतः कारकिर्दीचा बराच काळ रणक्षेत्रांवर काढावा लागला. म्हणून अंतर्गत व्यवस्थेचे अशा धामधुमीच्या काळातील विशेष महत्त्व ओळखून त्यांनी आपल्या पत्नीला 'राज्ञिपणा' चा पूर्ण मान व स्वतंत्र सहीशिक्यानिशी 'राजाज्ञे' चा सर्वाधिकार देऊन राज्याचा अंतर्गत सर्व कारभार येसुबाईसाहेबांच्या स्वाधीन केला होता; आणि या 'राजाज्ञा' च्या उपलब्ध पत्राच्या प्रमाणावरूनही संभाजीराजांचे राजधानीतील वास्तव्य फारच थोडे असल्याची खात्री पटते.

संभाजीराजांनी अकबर प्रकरणात अकबराच्या माध्यमातून उत्तरेत मोठाली साम्राज्याविरोधात उठाव घडवून दक्षिणेतील अर्धापाऊण लाख मोगली सैन्याला उत्तरेत परत पाठवावे लागले व स्वतः औरंगजेबाला आपली छावणी भीमेच्या पलीकडे नेऊन बसावे लागले होते. याचबरोबर औरंगजेब स्वतः चालून येत आहे हे पाहून संभाजीराजांनी दक्षिणेतील मोगली राजधानीवर व राजसंपत्तीवर यशस्वी छापे घालून लूट केली हे डाव यशस्वी झाले होते.

मोगली वकिलाने पोर्तुगीजांना अनेक सवलती देऊन संभाजीराजांच्या प्रदेशास धक्का देण्याचा वगैरे कट केला. तो कट मूर्त स्वरूप घेत आहे असे पाहताच संभाजीराजांनी पावसाळ्याची संधी साधून पोर्तुगीजांचा प्रदेश जाळून लुटून उद्‌ध्वस्त करण्यास सुरुवात केली व

खास गोव्यावर चालून जाऊन त्यांना पूर्ण नामोहरम करून पोर्तुगीजांना मोगली सैन्याला मदत करण्याच्या विचारांतून कायमचे परावृत्त केले.

काव्यालंकार, शास्त्रे, पुराणे, संगीत व धुनर्विद्या यांचा संभाजीराजांनी सखोल अभ्यास केला होता. नीतिशास्त्रातील त्यांची पारंगतता तर सर्वतोमुखी झाली असल्याचे दिसते. अशी विविध प्रकारची महत्त्वाची माहिती इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी समोर आणल्यानेच खरे संभाजीचरित्र समाजाला समजले.

संदर्भग्रंथ सूची

१. लोकसत्ता (वृत्तपत्र), मुंबई, मंगळवार, दि. २६/०८/१९८६

२. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ६५, ६६

३. कित्ता, पृ. क्र. ६७

४. बेंद्रे वा. सी., 'गड-कोट दुर्ग', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालययाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, क्र-५, मुंबई, २५ जाने. १९६५, पृ. क्र. ३७

५. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६८

६. बेंद्रे वा. सी., 'गड-कोट-दुर्ग', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालययाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, क्र-५, मुंबई, २५ जाने. १९६५, पृ. क्र. ३७

७. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ७३९, ७४०

८. कित्ता, पृ. क्र. ११३ ते ११५

९. कित्ता, पृ. क्र. ६८

१०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ.क्र. ४९७ ते ५०२

११. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ७१ ते ७९.

१२. कित्ता, पृ. क्र. ८३

१३. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ.क्र. ७५२

१४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ८७, ८८

१५. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ.क्र. ९२४, ९२५

१६. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. १०५, १०६

१७. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ. क्र. ९२५

१८. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. १०२

१९. कित्ता, पृ. क्र. १८८, १८९

२०. कित्ता, पृ. क्र. १९३
२१. कित्ता, पृ. क्र. १९७ ते १९९
२२. कित्ता, पृ. क्र. २००, २०१
२३. कित्ता, पृ. क्र. २०७
२४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. १२
२५. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. १८०, १८१
२६. कित्ता, पृ. क्र. २०४, २०५
२७. कित्ता, पृ. क्र. २०९, २१०
२८. कित्ता, पृ. क्र. २११ ते २१३
२९. कित्ता, पृ. क्र. २१३, २१४
३०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ. क्र. ८९० ते ८९६
३१. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. २२२
३२. कित्ता, पृ. क्र. २३५
३३. कित्ता, पृ. क्र. २४८ ते २५२
३४. कित्ता, पृ. क्र. २५३, २५४
३५. कित्ता, पृ. क्र. २५७
३६. कित्ता, पृ. क्र. २५९ ते २६४
३७. कित्ता, पृ. क्र. २६४ ते २६८
३८. कित्ता, पृ. क्र. २७०
३९. कित्ता, पृ. क्र. २४१, २४२
४०. कित्ता, पृ. क्र. २४३, २४४
४१. कित्ता, पृ. क्र. ३१५ ते ३१७
४२. कित्ता, पृ. क्र. ३२१, ३२२
४३. बेंद्रे वा. सी., 'गड-कोट-दुर्ग', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालययाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, क्र-५, मुंबई, २५ जाने. १९६५, पृ. क्र. ३७
४४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ३०८ ते ३२७
४५. कित्ता, पृ. क्र. ३३३,३३४
४६. कित्ता, पृ. क्र. ३३५, ३३६
४७. कित्ता, पृ. क्र. ३८५ ते ३८९

४८. कित्ता, पृ. क्र. ३९३, ३९४

४९. कित्ता, पृ. क्र. ३४५ ते ३५६

५०. कित्ता, पृ. क्र. ३९५, ३९६

५१. कित्ता, पृ. क्र. ३६० ते ३६९

५२. कित्ता, पृ. क्र. ३७० ते ३७६

५३. कित्ता, पृ. क्र. ३७७ ते ३९९

५४. कित्ता, पृ. क्र. ४०३

५५. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९३४, पृ. क्र. १३०

५६. बेंद्रे वा. सी., 'विजापूरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयय, मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ५९४ ते ५९६

५७. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ४१४

५८. कित्ता, पृ. क्र. ४१५

५९. कित्ता, पृ. क्र. ४०७ ते ४१०

६०. कित्ता, पृ. क्र. ४१८, ४१९

६१. कित्ता, पृ. क्र. ४१९, ४२०

६२. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ. क्र. १०११

६३. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ४४३ ते ४४५

६४. कित्ता, पृ. क्र. ४४५ ते ४४७

६५. कित्ता, पृ. क्र. ४४७ ते ४५२

६६. कित्ता, पृ. क्र. ४५४

६७. कित्ता, पृ. क्र. ४५७

६८. कित्ता, पृ. क्र. ४५९

६९. कित्ता, पृ. क्र. ४६१, ४६२

७०. कित्ता, पृ. क्र. ४६५, ४६६

७१. कित्ता, पृ. क्र. ४९२ ते ४९५

७२. कित्ता, पृ. क्र. ४९५ ते ४९७

७३. कित्ता, पृ. क्र. ४९७ ते ५०३

७४. कित्ता, पृ. क्र. ५०४ ते ५०८

७५. कित्ता, पृ. क्र. ५११

७६. कित्ता, पृ. क्र. ५१२, ५१३

७७. कित्ता, पृ. क्र. ५१३ ते ५१७
७८. कित्ता, पृ. क्र. ५१७ ते ५१९
७९. कित्ता, पृ. क्र. ५२३, ५२४
८०. कित्ता, पृ. क्र. ५२४, ५२५
८१. कित्ता, पृ. क्र. ५३६, ५३७
८२. कित्ता, पृ. क्र. ५४२
८३. कित्ता, पृ. क्र. ५४३
८४. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ. क्र. ८८३ ते ८८६
८५. बेंद्रे वा. सी., 'विजापूरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयय, मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ५८९, ५९०
८६. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. १०५, १०६
८७. बेंद्रे वा. सी., 'विजापूरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ५९८, ५९९
८८. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९३४, पृ. क्र. १३१ ते १३६
८९. बेंद्रे वा. सी., 'विजापूरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ६०५ ते ६०८
९०. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. १०५, १०६
९१. कित्ता, पृ. क्र. ५६३
९२. कित्ता, पृ. क्र. ५७२
९३. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९३४, पृ. क्र. १३१, १३२
९४. कित्ता, पृ. क्र. १३२, १३३
९५. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ५७६ ते ५७९
९६. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिल आवृत्ती, नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. २७
९७. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ५९२, ५९३
९८. कित्ता, पृ. क्र. ५९३, ५९४

९९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', ग्रंथकार प्रकाशन, इ.स. १९७२, पृ. क्र. ९७८, ९७९

१००. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६०० ते ६०३

१०१. कित्ता, पृ. क्र. ६०२, ६०३

१०२. कित्ता, पृ. क्र. ६०४, ६०५

१०३. कित्ता, पृ. क्र. ६०६, ६०७

१०४. कित्ता, पृ. क्र. ६०९

१०५. कित्ता, पृ. क्र. ६१३ ते ६१७

१०६. कित्ता, पृ. क्र. ६२० ते ६२३

१०७. कित्ता, पृ. क्र. ६२६ ते ६२७

१०८. कित्ता, पृ. क्र. ६११

१०९. कित्ता, पृ. क्र. ६१२, ६१३

११०. कित्ता, पृ. क्र. ६३४ ते ६३८

१११. कित्ता, पृ. क्र. ६४०, ६४१

११२. कित्ता, पृ. क्र. ६४७

११३. कित्ता, पृ. क्र. ६४७

११४. बेंद्रे वा. सी., 'विजापूरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ५९२, ५९३

११५. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६४८, ६४९

११६. कित्ता, पृ. क्र. ६५०, ६५१

११७. कित्ता, पृ. क्र. ६५२, ६५३

११८. कित्ता, पृ. क्र. ६५३

११९. कित्ता, पृ. क्र. ६५५

१२०. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९३४, पृ. क्र. १४१, १४३

१२१. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६५७, ६५८

१२२. कित्ता, पृ. क्र. ६५९, ६६०

१२३. कित्ता, पृ. क्र. ६६२

१२४. कित्ता, पृ. क्र. ६६५, ६६६

१२५. कित्ता, पृ. क्र. ६६६ ते ६६८

१२६. कित्ता, पृ. क्र. ६६८ ते ६७१

१२७. कित्ता, पृ. क्र. ६७१
१२८. कित्ता, पृ. क्र. ६७२
१२९. कित्ता, पृ. क्र. ६७३, ६७४
१३०. कित्ता, पृ. क्र. ६७५, ६७६
१३१. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. १६
१३२. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६७६
१३३. कित्ता, पृ. क्र. ६७६, ६७७
१३४. कित्ता, पृ. क्र. ६७७, ६७८
१३५. कित्ता, पृ. क्र. ६७९
१३६. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. १६
१३७. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६८१, ६८२
१३८. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. १६
१३९. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, पृ. क्र. ६८४
१४०. कित्ता, पृ. क्र. ६८५, ६८६
१४१. कित्ता, पृ. क्र. ६८७
१४२. कित्ता, पृ. क्र. ६८७, ६८८
१४३. कित्ता, पृ. क्र. ६९१
१४४. कित्ता, पृ. क्र. ६९२
१४५. कित्ता, पृ. क्र. ६९२, ६९३
१४६. कित्ता, पृ. क्र. ६९७
१४७. कित्ता, पृ. क्र. ६९७, ६९९
१४८. कित्ता, पृ. क्र. ७०३, ७०४
१४९. कित्ता, पृ. क्र. ७०७, ७०८
१५०. पवार जयसिंगराव भाऊसाहेब, 'छत्रपती संभाजी - एक चिकित्सा', सुमेरू प्रकाशन, डोंबिवली पूर्व, प्रथमावृत्ती, २४ एप्रिल २००५, पृ. क्र. ३४

प्रकरण सहावे

छत्रपती राजाराम महाराजांविषयीचे लिखाण

प्रकरण सहावे

छत्रपती राजाराम महाराजांविषयीचे लिखाण

प्रस्तावना :

राजाराम महाराजांना इतर छत्रपतीच्या तुलनेत स्वराज्याचा कारभार चालविण्यासाठी फार कमी वेळ मिळाला होता. मुळातचराजाराम महाराजांची शरीरयष्टी नाजूक होती. तसेच त्यांना राजकारणाचा संभाजी महाराजांसारखा अनुभवही मिळालेला नव्हता. तसेच त्याच्यावर राजनीतीशास्त्राचे, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संस्कार घडविणारी जिजाबाईसारखी स्त्रीपण मिळाली नव्हती. त्यांचे बालपण हे बदिस्त अवस्थेत गेल्याने त्यांनाही स्वतः काही शिकता आलेले नव्हते. म्हणून राजाराम महाराजांच्या राज्यकारभारात मंत्र्यांचेच वर्चस्व आपल्याला पाहायला मिळते. परंतु राजाराम महाराज जिंजीला जाऊन व राहून आल्यानंतर त्यांना राजनीतीचे ज्ञान प्राप्त झाले व त्यांनी पंतप्रतिनिधीमध्ये व अष्टप्रधानामध्ये अनेक बदल घडवून आणले. कमी कालावधीसाठी का होत नाही पण मोगली सैन्यापासून स्वराज्याचे यशस्वी रक्षण केले. यासाठी त्यांनी वतने वाटायलाही सुरूवात केली याचे स्वराज्यावर चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम झाले. अशा छत्रपती राजाराम महाराजांच्या कार्याची माहिती अतिशय चिकित्सकपणे वा. सी. बेंद्रे यांनी आपल्या "श्री छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा" या ग्रंथात दिली आहे. ती माहिती प्रस्तुत प्रकरणात देण्यात आलेली आहे. ज्यामध्ये राजाराम महाराजांची गुण वैशिष्ट्ये, या काळातील कट कारस्थाने, त्याचे स्वराज्यावरील परिणाम व राजाराम महाराजांचे एकत्रित कार्य इत्यादी बाबींचा विस्ताराने विचार करण्यात आलेला आहे.

६.१ जन्म व बालपण

जन्म - जुन्या उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक साधनांमध्ये राजाराम महाराजांचा जन्मकाळ व बालपणाविषयी फारशी माहिती आलेली नाही. सर्वच बखरीत राजाराम महाराजांचा जन्मतिथीबाबतचा मजकूर अवास्तव आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात की, कोणत्याही बखरीत राजाराम महाराजांच्या जन्मकाळाचा बोध होईल असा प्रसंग वर्णिलेला नाही. शिवाजी

महाराजांच्या राज्यभिषेकाच्या वर्णनात मात्र "या धाकट्या साहेबास डोंबाऱ्याचा खेळ दाखवून हुजरे मंडळी राज्यभिषेक विधीसमयी (म्हणजे इ.स. १६७४ मध्ये) सांभाळ करीत होती." असे म्हटले आहे. त्यावरून राजाराम महाराज राज्यभिषेकावेळी चौदा-पंधरा वर्षांचे नसून पाच-सहा वर्षांचे होते असे म्हणावे लागते. शिवाजी महाराज बसनूरच्या स्वारीवर चालून जावू लागले तेव्हा सोयराबाईस ऋतु प्राप्त झाला असे बऱ्याचजणांनी लिहिले आहे. ही बसनूरची स्वारी जानेवारी १६६५ ची आहे. तेव्हा राजाराम महाराजांचा जन्म त्यानंतरचा म्हणजे इ.स. १६६६-१६६७ किंवा त्यानंतरचा मानावा लागतो.

राजाराम महाराजांचे मौजीबंधन शिवाजी महाराजांनी मोठ्या थाटाने इ.स. १६८० मध्ये केले. याचवेळी त्यांचे लग्नही लावून दिले. त्याकाळात मुलींचे लग्ने सातव्या वर्षाच्या सुमारास व मुलाची दहा-बारा वर्षाच्या सुमारास होत होती. वधुवरांच्या वयातही तीन-चार वर्षांचाच फरक असे. या प्रसंगाचा विचार करिता राजाराम महाराजांची जन्मतिथी शकावलीतील नोंदीप्रमाणे "शके १५९१ सौम्य नाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध १५ म्हणजे २४ फेब्रुवारी १६७० वार गुरूवार" ही मानणे योग्य आहे.[१]

बालपण - राजाराम महाराजांच्या बालपणांविषयी फारशी माहिती आपल्याला ऐतिहासिक साधनात मिळत नाही. राजमाता जिजाबाईसाहेब राजाराम महाराजांच्या वयाच्या ५व्या वर्षी वारल्यामुळे त्यांना संभाजी महाराजांसारखी त्यांची शिकवण लाभली नाही. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर जी राजकारणी लोकांनी देशद्रोही धामधूम केली त्यामुळे राजारामांचा राजकारणाशी किंवा इतर बाहेरील व्यवहाराशी संपर्क तुटला होता. नंतर जरी राजराम महाराज येसुबाईंजवळ वाढले आणि त्यांनी राजराम महाराजांना फार लळा लावला व शेवटपर्यंत त्यांनी येसुबाईसाहेबांना मातेसमान मान दिला असला तरी राजाराम महाराजांचा याकाळात बाहेरच्या लोकांशी संपर्क येसुबाईनी राहू दिला नव्हता. शिवाय युद्धविषयक धावपळींमुळे संभाजी महाराजांचा मुक्काम रायगडास फारसा होऊ शकला नव्हता.

६.२ राजाराम महाराजांचे वैवाहिक जीवन व राजकारणाशी संबंध

राजाराम महाराजांचा पहिला विवाह प्रतापराव गुजरांच्या मुलीशी म्हणजे जानकीबाईशी १५ मार्च १६८० रोजी झाला. त्यांचा दुसरा विवाह मोहिते घराण्यातील ताराबाईंशी झाला तर तिसरा विवाह घाटगे घराण्यातील राजसबाई हिच्याशी झाला आणि चौथा विवाह बारसी

पारगावकर निंबाळकर यांच्या घराण्यातील अहिल्याबाई (अंबिकाबाई) यांच्यासोबत झाला होता. ही सर्व मंडळी येसुबाईजवळ रायगडास वेढा पडेपर्यंत राहात होती. ताराबाईस ९ जून १६९६ रोजी शिवाजी (दुसरा) झाला आणि २१ मे १६९८ रोजी राजसबाईस संभाजी (दुसरा) झाला. यावरून संभाजी महाराजांनी राजाराम महाराजांची दुसरी लग्ने इ.स. १६८६ नंतर लाविली असावीत[२] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

काही साधनांमध्ये राजाराम महाराजांची पहिली बायको जानकीबाई वारल्याचा उल्लेख येतो पण तो उल्लेख चुकीचा आहे असे तत्कालीन पुराव्यावरून दिसून येते. राजाराम महाराज जिंजीस झुल्फीकार खानाशी बोलणी करीत असतांना (इ.स. १६९६-१६९७) त्यांचा जो तह झाला त्यातील अटींवरून जानकीबाई येसुबाईबरोबर मोगली कैदेत होती, तिच्या सुटकेची मागणी केली होती. इतकेच नव्हे तर ती येसुबाईसाहेब बरोबर इ.स. १७१८ मध्ये परत आल्याचाही उल्लेख खास शाहू महाराजांच्या यादी आला आहे. तेव्हा संभाजी महाराजांनी राजाराम महाराजांची जी आणखी दोन लग्ने करून दिली ती जानकीबाईच्या मृत्युनंतर करून दिली असे म्हटले आहे ते चूक आहे.[३] याशिवाय राजाराम महाराजांची सगुणाबाई व आणखी एक अशा दोन नाटकशाळा होत्या.[४]

शिवाजी महाराजांचा ३ एप्रिल १६८० रोजी मृत्यू झाल्यानंतर २१ एप्रिल १६८० रोजी राजारामांना अण्णाजीपंत सुरनीस यांनी मंचकी बसवून त्यांचा मंचकारोहण विधी आटपून घेतला होता. १८ जून १६८० रोजी संभाजी राजे रायगडावर आले व राज्य करू लागले. तेव्हा त्यांनी राजाराम महाराजांना चागली वागणूक दिली व त्यांची रायगडालाच राहण्याची व इतर संपूर्ण व्यवस्था करून दिली होती.

६.३ संभाजी महाराजांच्या कैदेनंतरचे राजकारण

संभाजी महाराजांच्या कैदेनंतरच्या राजकारणाविषयी माहिती देताना वा. सी. बेंद्रे चिटणीस बखरीचा व इतर बखरींचा उल्लेख करून सांगतात की, चिटणीसाने संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत 'हिंदवी स्वराज्याचा' विध्वंस झाल्याचे म्हटले आहे. बेंद्रे चिटणीसाच्या वरील मतामागील दोन कारणे सांगतात. एक तर चिटणीसाच्या मनात बाळाजी आवजी मंडळींना मारल्याबद्दलचा राग होता. व दुसरे म्हणजे ताराबाईंच्या शिवाजी दुसरा यांच्या काळात जो संभाजी महाराजाबद्दल रामचंद्रपंताकडून घाणेरडा प्रचार केला गेला होता तो. त्यामुळे लोकांमध्ये

द्वेषाची भावना अधिक बळावली. त्याचा परिणाम नंतरच्या बखरकारांवर झाला व संभाजी महाराजांच्या विरोधी लेखन बखरकारांनी केले.[५]

वा. सी. बेंद्रे पुढे सांगतात, संभाजी महाराजाविरूद्ध रायगडच्या ब्राम्हण मंत्र्यांनी मोगल सरदारासोबत संभाजीराजांना पकडून देण्याचा कट केला होता. पण या राजद्रोही व राष्ट्रद्रोही मंत्र्यांनी व त्यांच्या साह्यकांनी आपल्या पापाचे खापर कवित कलसच्या मृत्यू झालेला पाहून त्याच्यावर फोडले. राजाराम महाराजांचा या कटाशी थोडासुद्धा संबंध नव्हता. या राजद्रोही कटाची बातमीही पसरली होती. परंतु बखरकारांनी मात्र राजद्रोही मंत्र्यांच्या प्रचारावरच भर दिला आणि हा कट गणोजी शिर्केनी केला असे भासविले. हा कट संभाजीराजे पन्हाळ्यास गेले असतांना उघडकीस आला होता. संभाजी महाराजांनी पन्हाळ्यावरील फितुरी लोकांना शासन केलेच. परंतु कट रायगडीच म्हणजे राजधानीत शिजला गेला होता. म्हणून त्यात जबाबदार असणाऱ्या प्रल्हादपंतादि सरकारकून वगैरेस येसुबाईकडून कैद करविले होते. त्याचप्रमाणे केसो त्रिमळ यालाही हरजी राजे महाडिकांकडून कैद करविले होते. या कटात धनाजी जाधव व शंकराजी नारायण सामील झाले नव्हते.

राजाराम महाराज जरी यावेळी वयाने १८-१९ वर्षाचे होते तरी ते शरीरयष्टीने फार कोमल व निर्बल होते. राजाराम महाराजांना राज्यकारभार व इतर व्यवहार यांचा अनुभव मिळालेला नव्हता. त्यामुळे राजाराम महाराज या गटाच्या जाळ्यात सापडले. जिंजीस अनुभव मिळाल्यानंतर राजाराम महाराजांनी कारकून सरकारकूनांच्या आहारी न जाता किंवा मर्जीवर न विसंबता आपल्या शक्तिसामर्थ्याच्या जोरावर मोगलांशी लढा देण्यास सुरूवात केली व राज्यकारभारातील गफलतीही दूर केल्या.

पन्हाळ्यावरील फितुरी प्रकरण प्रल्हाद निराजीला नोव्हेंबर १६८८ मध्ये अटक झाली होती आणि याच कटाचा एक परिणाम म्हणून १ फेब्रुवारी १६८९ ला संभाजी राजांना कैद केले गेले. राजाराम महाराजांना ९ फेब्रुवारीला मंचकी बसविले. कटातील जे लोक गडावर कैद झाले होते त्यांना सोडून दिले. या कारवाईस येसुबाईसाहेबांचा कौल होता असे मानणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. संभाजी महाराज जिवंत असतांना राजारामाच्या नावाने राज्यकारभार चालवणे म्हणजे राजद्रोही व देशद्रोही अधिकाऱ्यांचे बंडच समजले पाहिजे. संभाजीराजांना कैदेतून सोडविण्याकरिता धनाजी जाधव व संताजी घोरपडे मोगली सैन्याशी मुकाबला

करण्यासाठी गेले होते. या संधीचा या कटवाल्या लोकांनी फायदा घेतला. त्यानंतर जवळ जवळ एका महिन्याने म्हणजे ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांना मारण्यात आले. यानंतर पंधरवाड्यात म्हणजे २५ मार्चला झुल्फिकारखानाने रायगडाला वेढा घालण्यासाठी कूच केली. राजारामाने मोगली सरदारांच्या भीतीने योग्याचा वेष देऊन रायगडावरून पळविले. परंतु हे राजद्रोही लोक वेढा येताच राजाराम महाराजांना गाठण्यासाठी रायगडावरून सुखरूप पळून गेले व ही मंडळी ५ एप्रिलला प्रतापगडास गेली. परंतु औरंगजेबाला मराठ्याचा कार्यकर्ता राजा नको होता. दिलेली वचने न पाळली गेल्याने त्याने या मंडळीच्या पाठलागास सुरूवात केली. त्यामुळे ही राजद्रोही मंडळी आपल्या गटाची कारवाई त्यांच्या अंगाशी आली व त्यांना मनुष्यबळ व द्रव्यबलाच्या अभावी 'मोगली सैन्याच्या पाठलागातून वाचण्याकरिता' सतत पळत राहण्याचा मार्ग पत्कारावा लागला.

रायगडाला मोगलांनी वेढा घातला असता राजधानी न सोडता वेढ्यास तोंड देण्याचे प्रयत्न येसुबाई साहेबांनी केले व हा लढा आठ नऊ महिने लढविला. परंतु राजाराम महाराज आणि राजद्रोही मंडळी पन्हाळा सोडून कर्नाटकात पळून गेल्याचे समजताच बाहेरून मदतीची अपेक्षा करणे शक्य न राहिल्याने ३ नोव्हेंबर १६८९ रोजी सल्ला करून रायगड मोगलांच्या हवाली केला.[६]

६.४ राजाराम महाराजांच्या सुरूवातीलच्या हालचाली

राजाराम महाराजांच्या सुरूवातीपासूनच्या हालचाली अर्थातच त्यांच्या मनाविरूद्ध; परंतु दुर्दैवाने आडवळणात सापडलेल्या परिस्थितीत झाल्या होत्या. कारण महाराज अनभिज्ञपणे गणोजी शिर्के व प्रल्हादपंतादींच्या देशद्रोही व राजद्रोही कूटील कारस्थानाच्या जाळ्यात अडकले होते; परंतु गणोजी शिर्के हा त्यांनी मोगली सरदारांना दिलेल्या वचनांचा भंग केल्यामुळे प्रल्हाद निराजीच्या गटातून बाहेर पडला व मोगली सेवेत रूजू झाला. त्यामुळे राजाराम महाराजांच्या शक्तिसामर्थ्याला प्रल्हाद निराजीच्या गटातून सुटका करून घेणे शक्य नसल्यामुळे त्यांना मनाविरूद्ध चाललेल्या राजकारणात सामिल होऊन रहावे लागले.

[अ] रामचंद्रपंत व शंकराजी नारायण यांच्यात अधिकाराची वाटणी :

संभाजी महाराजांच्या इतर विरोधी मंडळीचा फायदा होऊन रामचंद्रपंताने शकराजी नारायणाकडील सचिवपद आपल्याकडे घेऊन शंकराजीवर सूड उगविला; परंतु शंकराजी

नारायणाकडील सैन्य नवीन सचिवाकडे जाण्यास तयार नव्हते म्हणून रायगडाच्या वेढ्यावेळी बाहेरून सैन्याची मदत जाऊ शकली नव्हती असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. शिवाय राज्यात दुफळी निर्माण होण्यास हेच मोठे कारण झाले. परंतु ही परिस्थिती फार काळ टिकली नाही. इ.स. १६९० च्या अखेरपूर्वीच म्हणजे वर्षभरात राजाराम महाराजांकडून शंकराजी नारायणकडे पुन्हा सचिवपद सुपुर्त केले गेले आणि अधिकाराची वाटणी केली. शंकराजी नारायणकडे मोठा व महत्त्वाचा आणि मोगली संपर्काचा लढाऊ भाग दिला आणि रामचंद्रपंताकडे फक्त महाराष्ट्राच्या अमात्यपदाची कामगिरी व दक्षिणेतील भाग दिला.[७]

[ब] सेनापती पदात बदल :

रामचंद्रपंतानी राजाराम महाराजांकडून धनाजी जाधवाकडील सेनापती पद काढून ते संताजी घोरपडेला द्यायला लावले. परंतु धनाजी जाधव भेटीला आल्यानंतर सेनापतीपदाबद्दल त्यांना डावलले गेल्यामुळे राजाराम महाराजांना पश्चाताप झाला तेव्हा धनाजीला 'जयसिंगराव' हा किताब व इतर तऱ्हेने म्हणजे सरलष्कर पदे देऊन सत्कार करून भूषविले. त्याचे समाधान झाले पण यामुळे युद्धविषय कारभारात कायमची दुही माजली असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

[क] इनामे देण्यास सुरूवात केली :

मोगली सैन्याच्या आक्रमणामुळे व भीतीमुळे अनेक सरदार व स्थानिक कार्यकर्ते मोगलाकडे जाऊ लागले; परंतु मोगलांनी केलेल्या अन्याय अत्याचारामुळे स्थानिक राज्यकर्त्यांची मने बदलली व ते मोगलांचा प्रतिकार करू लागले. राजाराम महाराजांनीही त्याच्या खर्चासाठी त्यांना इनामे देण्यास सुरूवात केली. त्यामुळे मोगलांकडे गेलेले लोकही स्वराज्यात येऊ लागले.

[ड] राजाराम महाराजांचे कर्नाटकात प्रस्थान :

राजाराम महाराजांनी प्रतापगडाहून पन्हाळा येथे जाऊन पावसाळा काढला. मोगलांनी पन्हाळ्याला वेढा दिला; परंतु त्यांना पावसाळ्यापर्यंत काही आघाडी मारता आली नाही. राजाराम महाराजांनी विजयादशमीला म्हणजे २६ सप्टेंबर रोजी कर्नाटकला निघाले. सोबत खंडो बल्लाळ, केशव पंडित यांनी राजकारणाबाबत बराच इतिहास त्यांना समजविला. ही बातमी मोगल व पोर्तुगीजांना पावसाळ्ययापूर्वीच कळाली होती. वा. सी. बेंद्रे येथे स्पष्ट करतात की, महाराजांना केवळ मोगली जबरदस्तीमुळे कर्नाटकात जावे लागले असे नसून कटवाल्यांच्या

राजकारणाच्या परिपूर्ततेसाठी दूर जाऊ आपल्या कारभार स्थिरस्थावर करणे हा त्यांचा मुख्य हेतू होता.[८]

६.५ राजाराम महाराजांचा जिंजीचा प्रवास

चिटणीस बखरीत जी माहिती आली आहे[९] ती अवास्तव आहे ती देवून वा. सी. बेंद्रे सांगतात की, धनाजी जाधव व संताजी घोरपडे राजाराम महाराजांबरोबर प्रवासास गेले नव्हते, त्यांना स्वराज्यातील व्यवस्थेस रामचंद्रपंतांजवळ ठेविले होते. त्याच प्रमाणे जाणाऱ्या मंडळींनी लिंगायत वाण्याचे वेषही अगदी शेवटच्या टप्प्यातच घेतले होते. सुरूवातीपासून नव्हे.

राजाराम महाराजांच्या या जिंजीच्या प्रवासाचा तपशील केशव पंडित[१०] व माआसिर-इ-अलमगिरीत[११] पूर्णपणे वास्तवबोधी स्वरूपात आला आहे. त्याचे स्पष्टीकरण बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात, ते लिहितात की, "जिंजीला जाण्याचा निर्णय रायगडी असतानाच झाला होता. कारण त्याची माहिती मे पूर्वीच मोगलांना मिळाली होती. महाराष्ट्रातील वातावरणात राहण्यापेक्षा जिंजीला शांतता आहे. तेथे गेल्याने आपणास तयारी करिता येईल व तेथील द्रव्याचाही वापर करण्यास मिळेल या उद्देश्याने राजद्रोही गटाने जिंजीचा निर्णय घेतला होता; परंतु तेथे गोवळकोंडेकरांच्या हद्दीतून जिंजी प्रदेशावर हल्ले होतच होते. मात्र ते छोट्या प्रमाणावरील हल्ले होते. जिंजीच्या प्रवासाचे प्रस्थान पावसाळ्यानंतर विजयादशमीच्या दिवशी ठेविले व प्रवासास २६ सप्टेंबर १६८९ ला सुरूवात केली आणि २८ ऑक्टोबर १६८९ ला वर्सुरास येऊन पोहोचले. राजाराम महाराज पन्हाळ्यावरून निघण्यापूर्वी १०-१२ दिवस म्हणजे १४ सप्टेंबरला मोगली सैन्याने पन्हाळ्यास वेढा घालण्यास सुरूवात केली. ही मंडळी घोड्यावर बसूनच वेढा पडत असताना बाहेर पडली. त्यांचा प्रथम कृष्णातीरावर मुक्काम झाला. कृष्णा उतरून पुढील प्रवास वर्धा नदीपर्यंत आला. येथे मोगली सैन्य पाठलागावर आल्याची चाहूल लागली, म्हणून राजाराम महाराजांची ३०० ची टोळी बेदनूरच्या राणीच्या राज्यात शिरली. हे समजताच अब्दुल्लाखान बहरा, रुहुल्लाखानाचा मदतनीस, याने आपला वडील मुलगा हसन अली यास घाईने पाठविले. त्याचे मागून तीन दिवस प्रवास करून ते तुंगभेद्रवरील सुभानगड व जारागड येथे जाऊन पोहोचले. तेथे राजारामाच्या लोकांनी मुक्काम केला होता. तेथे लढाई झाली. राजारामाकडील बरेच लोक मारले गेले आणि शंभराहून अधिक लोकांना पकडून कैदे केले. या गडबडीत राजारामाने आपले कपडे, जोडे, शस्त्रे वगैरे टाकून पलायन केले. त्याची कोणालाच दाद नव्हती.

त्याचप्रमाणे हिंदुराव बहिरजी घोरपडे आणि काही कैदी त्या कैदखान्यातून निसटले. ही बातमी बादशहास कळताच बादशाने ८० कैद्यास ठार मारण्याचा हुकूम दिला. या लढाईला तोंड देण्याचे कार्य संताजी जगताप (घोरपडे नव्हे) व रूपसिंह भोसले यांनी केले. त्यामुळे बऱ्याच लोकांची सुटका झाली व राजारामाचा तुंगभद्रेनंतरचा प्रवास सुकर झाला. नंतर लोकांनी निरनिराळे वेष घेऊन पुढील प्रवास केला.

राजाराम महाराज हे आपल्या कर्नाटक राज्याच्या हद्दीतील अमूर गावी येऊन एका देवळात उतरले व बहिरजीला पाठवून आपण आल्याची वर्दी बाजीराव काकडे यास दिली. काकडे यांनी महाराजांची सत्कारपूर्वक भेट घेतली व त्याने महाराजांना मोठ्या इतमामाने घरी नेले. कर्नाटकातील सुभेदार हरजी राजे महाडिक वारल्याने सुभ्याचा साहित्य संग्रहानिशी ताबा महाराजांच्या सावत्र बहिणीने म्हणजे हरजी राजे महाडिक यांच्या पत्नीने दिला.

वा. सी. बेंद्रे पुढे लिहितात राजराम महाराजांचा जिंजीचा ६०० मैलाचा प्रवास २६ सप्टेंबर १६८९ ला सुरू झाला; पण तो केव्हा नक्की संपला याची नोंदी अद्यापि मिळाली नाही. त्यामुळे या प्रवासाला किती महिने लागले ते समजत नाही. पण वर्सुराज म्हणजे बार्सीलूर की बेदनूरच्या राणीच्या हद्दीतील तवारे गाव असेल तर त्यास तेथपर्यंत जावावयास जवळ जवळ महिना लागला असावा. मार्टिनच्या माहितीनुसार राजाराम महाराज नोव्हेंबरात वेलूरला गेले होते. त्यावरून या प्रवासास दोन महिन्यापेक्षा थोडा कमी काळ लागला असावा. या काळात त्यांना पन्हाळा रायगडशी किंवा जिंजीशी संपर्क साधता आला नाही. मार्टिनने प्रल्हादपंताच्या कारभाराची माहिती दिली आहे ती विचारात घेण्यासारखी आहे. कारण नंतरही लाचलुचपतीचे प्रकारात त्याचे नांव नोंदित झाले आहे. या प्रवासानंतर थोडेच दिवसांनी मोगली सैन्य पाठीवर गेले त्यामुळे त्यांना जी शांतता प्राप्त होऊन जमावादी तयारी करावयाची होती तीला फारसा अवधी मिळाला नाही."[१२]

या पद्धतीने बेंद्रेंनी अतिशय क्रमवार पद्धतीने राजराम महाराजांच्या जिंजी प्रवासाची माहिती दिली आहे.

६.६ कर्नाटकातील युद्धविषयक व इतर हालचाली - पूर्वार्ध (इ.स. १६९० ते १६९३)

राजाराम महाराज जिंजीला आल्यानंतरच्या हालचालीविषयीचे स्पष्टीकरण देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, राजाराम महाराज जिंजीला आले तेव्हा त्यांना राज्य देण्यासाठी हरजीराजे

महाडिक जिवंत नव्हते. तसेच हरजीराजे महाडिकांच्या मदतीला दिलेला काशीपंत हा कटात सापडल्याने कैद केला गेला होता. त्याला राजाराम महाराजाकडून जिंजीस येताच कैदेतून मुक्त करून घेतला होता. पण त्याचे स्थान तेथील जनतेत व सैन्यात ढासळलेले होते. सारांश, राजाराम महाराज व मंत्री यांना जिंजीस येताच आपल्याच कर्तृत्वावर अवलंबून राहण्याची वेळ आली होती. अशा परिस्थितीत त्यांना द्रव्य आणि सैन्याची चनचन विशेष भासू लागली. त्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविले. त्यांच्या या प्रयत्नांची माहिती तत्कालीन व इतर साधनसामुग्रीत बरीच मिळते. यामध्ये चिटणीस बखर, बुंदेल्याची बखर, गिरजोजी यादव याची माहिती, फ्रेंचांचा गव्हर्नर मार्टिन याची रोजीनिशी, शकावली, तारिख-इ-दिलकाश, मासिर-इ-आलमगिरी, खाफीखानाचे लिखाण, इंग्रजांचा पत्रव्यवहार, राजाराम महाराजांचा पत्रव्यवहार, मनुचीचे लिखाण, मराठी कागदपत्रांतील नोंदी, इत्यादी विविध साधनांची चिकित्सा करून वा. सी. बेंद्रे कर्नाटकातील युद्धविषयक व इतर हालचालींविषयीची विविध कागदपत्रे आपल्या 'महराष्ट्रेतिहासाच्या साधने -भाग २' मध्ये देतात.[१३] पुढीलप्रमाणे हालचालींचे स्पष्टीकरण करतात.

[अ] संपत्ती मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न :

राजाराम महाराजांनी संपत्तीची कमी भरून काढण्यासाठी अनेक प्रयत्न केले; पण ते शिवाजी-संभाजी महाराजांच्या काळातील राज्यकारभाराला धरून नव्हते असे बेंद्रे स्पष्ट करून माहिती देतात की, जिंजीला आल्यावर सर्वप्रथम एक हुकूम काढण्यात आला व सर्व नोकरचाकर व सरदार, पालेगारांना फर्मावण्यात आले की, त्यांनी राजाराम महाराजांचे दर्शन घ्यावे व दर्शनाच्या वेळी राजाच्या चरणी मोठा नजराणा ठेवावा.

हरजी राजांच्या पत्नीने, म्हणजे राजराम महाराजांच्या सावत्र बहिणीने, तीन लाखाचा ऐवज दिला. संताजी राजाने एक हजार नजर केले. फ्रेंच आणि डचांनी प्रत्येकी चौदाशे पगोड्यांचा ऐवज नजराणा म्हणून दिला. इंग्रजांनी मात्र सहाशे पगोडे किंमतीचा नजराणा दिला. तरी देखील फ्रेंचांकडून अधिक नजराण्याच्या इच्छेने पुलचरीवर हल्ला केला; परंतु हल्ला चढविणाऱ्याला लाच देऊन तो परतविला. इतकेच नव्हे तर व्यापाऱ्यांकडून हजार-पाचशेचे कर्ज म्हणून उकळण्याचे प्रयत्न केले. त्याशिवाय राजाराम महाराजांनी दर्या-किनाऱ्यावर सहल काढून नजराण्याच्या रूपाने पैस गोळा करण्याचा प्रयत्न केला.[१४]

[ब] राजाराम महाराजांचे परकीयांशी संबंध :

वा. सी. बेंद्रे राजाराम महाराजांचे यावेळचे परकियांचे संबंध स्पष्ट करतांना सांगतात की, ज्याप्रमाणे शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांनी युरोपीय परकियांची सत्ता स्वदेशात वाढवू नये म्हणून डच व इंग्रज यांना त्यांच्या वखारीभोवती मर्यादित स्वरूपाचीही तटबंदी उभारण्यास बंदी केली होती. त्याबाबत खलिते काढले व अंमलबजावणीचे प्रयत्नही केले, असे असतांना राजाराम महाराजांचा प्रतिनिधी प्रल्हादपंताने मात्र फ्रेंच, डच व इंग्रज यांना त्यांच्या वखारीभोवती तट उभारण्यास, इतकेच नव्हे तर मजबूत किल्ले व त्यांच्या सभोवतालील २-३ मैलांतील परिसरातील शहरे व खेडी खास मालकीची म्हणून लाच खाऊन करून दिली. इतकेच नव्हे तर मूळ मागितलेल्या किंमतीत अधिक लाच मागून घेऊन एक चतुर्थांशापर्यंत सरकारी खजिन्याला घट स्वीकारावयास लावली. फ्रेंचांकडून ६००० चक्रांच्या कर्जासाठी पुलचरीला तटबंदी करू देण्यास परवानगी दिली. ती यापूर्वी नाकारण्यात आलेली होती. डचांच्या देणगीवरून पांडेचरीतून फ्रेंचांना जबरदस्तीने काढून लावण्यास डचांना सहकार्य दिले.

तेग्नापटमसारखा मजबूत व सुरक्षित गड विकत देण्यासाठी प्रथम मागणी दोन लाखांची केली होती. त्याचे एक चतुर्थांश म्हणजे ५०००० चक्रें घेऊन गड व सभोवतालचा प्रदेश, कुडालूरसारखे शहर व इतर बरीच खेडी व सवलती केवळ लाचेची रक्कम वाढवून मिळताच दिली. यात प्रल्हादपंताने ८००० चक्रे, त्यांच्या बंधूस ५००० चक्रे व इतर अधिकाऱ्यांस ७००० चक्रे मिळविली. सुंदर बालाजी हा त्यावेळी कोनिमेरचा सुभेदार होता. त्याला सौदा ठरविण्यास राजाच्या हुकूमाने पाठविले. त्याने प्रल्हादपंताच्या अनुमतीने तो सौदा दोन लाखांऐवजी ५१ हजार चक्रास निश्चित केला व त्याबद्दल मराठा राज्यात इंग्रजांच्या मालावरील जकात माफ करून देण्याचे आश्वासन दिले. मात्र हा सौदा करण्यास सुंदर बालाजीने प्रल्हादपंतास सहा हजार चक्रे व आपणास पाचशे चक्रे अधिक व मुलास मासिक पाच पगोड्यांवर इंग्रजाकडे नोकरी निश्चित केली. काही अटी राजाराम महाराजांना मान्य नव्हत्या; परंतु इंग्रज लिहितात की, अगदी शेवटच्या दिवशी : "with a small bribe to the Chief Minister (Pralhad Pant) brought the young king to allow us what towns and villagrs our guns could command..."

इंग्रजांच्या प्रेसिडेंटने प्रल्हाद निराजीला पत्राने त्यांच्या या प्रकरणातील मैत्रीसाठी २००० चक्रे पिशकश देऊ केली. इंग्रज आपल्या लंडन येथील मालकांना कळवितात की : "The merchants, weavers, etc. beginning to flock to our protection which makes it the hope fullest settlement of India."

सारांश, तेग्नापटमचा गड, तेवनापटण शहर, कुडालूर व काही खेडी जिंजीच्या अमलातून वेगळी झाली. त्याशिवाय सर्व राज्यांतील व्यापारावर कस्टमही माफ करून घेतली. या उपकाराबद्दल इंग्रजांनी मोगलांची भीती पुढे करून राजाराम महाराजांना कोणत्याही प्रकारची युद्धात मदत केली नाहीच पण उलट हा गडाचा सौदा चालू असताना व नंतर इंग्रजांनी मोगली सरदारांना दारूगोळा, शॉटस, तोफची वगैरे वेळोवेळी पुरविले व मोगली सरदारांना व त्यांच्या कुटुंबियांना आपल्या हद्दीत आरसा दिला.[१५]

[क] राजकीय घडामोडी :

१. राजाराम महाराजांकडील सैन्य :

राजाराम महाराज चंदीला गेले त्यापूर्वी हरजीराजे महाडिकांनी मोगली सरदारांशी लढा देऊन कुतुबशाहीचा प्रदेश जिंजीच्या राज्यात सामावून घेतला होता. कुतुबशाही मोगलांनी घेतल्यामुळे दक्षिणेतील आणि विशेषतः कर्नाटकातील राजे-पाळेगार यांच्यात भीतीचे वातावरण पसरले होते. राजाराम महाराज कर्नाटकात आल्यामुळे एक प्रकारे आधार वाटला व सर्व हिंदुनी एकत्रितपणे मोगली सत्तेला पायबंद घालावा असे ठरविले.

तंजावरच्या शहाजी राजाने आपल्या जवळच्या भाऊबंदास मदत म्हणून सैन्य व द्रव्यही पुरविले. राजाराम महाराजांनी मोगलांकडून फुटून ससैन्य येणाऱ्या मराठे सरदारांस म्हणजे नागोजी माने, अमृतराव निंबाळकर, शंकराजी घाटगे वगैरे सरदारांना आपल्या चाकरीत घेतले. त्याशिवाय पाटणकर वगैरे सरदारांचीही मदत चंदीस घेतली.

मोगलांचा नोकर झालेला अरसोमा नयाक हा अलमगीर बादशाहने दक्षिणेतील मंदिरे पाडण्याचा हुकूम दिल्यावरून मोगली चाकरी सोडून राजाराम महाराजांना येवून मिळाला. त्याने मोगलांच्या मंदिरे पाडण्याच्या हुकूमाविरूद्ध स्थानिक लोकांत बरीच चळवळ केली आणि मोगलांशी झगडा देण्याविषयी दहा-बारा हजार सैनिक उभे केले.

राजाराम महाराजांकडे महाराष्ट्रात सैन्य आले नव्हते; परंतु हरजी राजे महाडिक वारले तरी त्यांची माणसे राजाराम महाराजांच्या चाकरीत आली होती. पैशाच्या टंचाईमुळे या जमावात घट येऊ लागली ही बाब वेगळी. परंतु सुरूवातीच्या काळात राजाराम महाराजांजवळ त्याच प्रदेशात वावरलेले सैन्य होते. त्यात ही नवीन भर पडल्याने औरंगजेबाला या बाजूला आवर घालण्यासाठी जिंजीकडे बरेच मोठे सैन्य कामबक्ष व आसदखान यांच्याबरोबर पाठविणे भाग पडले[१६] असे बेंद्रे स्पष्ट करतात.

२. मोगली सैन्य :

ऑक्टोबर १६९० मध्ये झुल्फिकारखानाच्या नेतृत्वाखाली मोगली फौज जिंजीला आली होती. मार्टिनच्या अंदाजाप्रमाणे या फौजेत बारा-पंधरा हजार उत्कृष्ट स्वार तसेच बारा-पंधरा हजार रजपूत बरकंदाज व लुटारू पेंढरींची एक चांगली फलटण होती. या मोगली फौजेशी लढणारी हिंदू फौज जिंजीचे मैदान राखून बसली होती. मार्च १६९१ मध्ये मोगली फौजेस मदत म्हणून आणखी पंधराशे स्वार, दोन हजार रजपुत, युद्धसामग्री व पैसा आला होता. त्यानंतर १६९२ च्या सुरूवातीला सुलतान कामबक्ष व मुख्य वजीर असादखान आपल्या सैन्यांसह जिंजीच्या मोगली फौजेत येऊन दाखल झाले. यातील आसदखान १२ नोव्हेंबर १६९० ला कृष्णेच्या परिसरातील दंगल शमविण्यासाठी पाठविला होता व महंमद कामबक्ष याला २७ मे १६९१ ला वीस हजारी करून जिंजीला पाठविला. त्याच्याबरोबर बक्षी उलमूल्क बहरामंदखान व इतर सरदार दिले. १६९१ च्या ४ ऑक्टोबरला आसदखान व कामबक्ष यांची कडाप्प्यात भेट झाली व ते जिंजीला १६ डिसेंबर १६९१ ला पोहोचले.[१७]

[३] जिंजीचा संघर्ष :

कामबक्ष मोठ्या सैन्यानिशी येणार म्हणून मराठ्यांमध्ये उडालेल्या घबराटीचा फायदा घेऊन १६९१ च्या नोव्हेंबरमध्ये झुल्फिकारखानाने राजाराम महाराजांना वेलोर स्वतःकडे ठेवून जिंजी देण्याची मागणी केली. एकदा कामबक्ष आल्यावर माझ्या हाती काही सत्ता राहणार नाही असेही सांगितले. परंतु राजाराम महाराजांनी आपल्या कारभाऱ्यांशी चर्चाविमर्श केला व जिंजी लढविण्याचा निर्णय घेतला.

झुल्फिकारखान जिंजीला येताच दोन्ही बाजुंनी संघर्षाला सुरूवात झाली. फेब्रुवारी १६९१ ला राजाराम जिंजीला आले व त्यांनी महाराष्ट्रातील फौजांना मदतीसाठी बोलाविले. जिंजीस मोर्चे

बसवून १६९१ च्या मे महिन्यात वेढा दिला. दररोज दोन्ही सैन्यात लहानमोठ्या लढाया चालू राहिला. परंतु याच काळात जिंजीवरील मराठी फौजेत अंतर्गत कलह झाला. मुख्य प्रधान ब्राम्हण कारभारी खाण्यापिण्याबाबत मजा करून राहत, पण फौजांना पोटास न मिळाल्याने उपास पडत. यामुळे उभयतांत तेढ उत्पन्न झाली होती. कित्येक सरदार राजारामास सोडून गेले. असे बेंद्रे सांगून पुढे लिहितात, तसे पाहिले तर मोगली सैन्याला दाणागोट्याची जी चणचण भासत होती तशी परिस्थिती जिंजीच्या वेढ्यात नव्हती. जिंजीच्या वेढ्यात लढाया चालू होताच झुल्फिकारखानाकडील मराठा सरदार आपल्या लोकांसह राजारामकडे आले. नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे व नागोजी माने हे दोन हजार स्वारांसह २३ नोव्हेंबर १६९० मध्ये राजारामकडे येऊन मिळाले होते. परंतु झुल्फिकारखानाला आणखी मदत मिळाल्याने त्याने लढा चालू ठेवला.[१८] त्याने अल्ली मर्दनखानास बोलावून तंजावरचे राज्य व त्रिचनापल्ली यांच्यावर दडपण आणण्यास पाठविले. त्याचप्रमाणे आपला मुलगा हिंमतखान बहादुर यास धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांना वश करून मोगली चाकरीत येण्याबद्दल खटपट करण्यास सांगितले, परंतु त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. इस्माइलखान मका झुल्फिखानास मिळाला. जोराच्या पावसामुळे जिंजीच्या आसमंतातील तलाव तुडुंब भरले. मोगली छावणीजवळच एक मोठा तलाव फाटून नाश झाला. त्यात मोगलांकडील माणसे, जनावरे, गाडे, तंबू, धान्यसामुग्री पुष्कळ गमावली.

तंजावरकरांनी राजाराम महाराजांकडे मोठी रक्कम पाठविली, त्यामुळे जिंजीच्या बचावास बरीच मदत झाली. कृष्णा अंताजीने जानेवारी १६९२ मध्ये लढाई करून व्हिलेनुरातून मोगलास काढून लावून ते ठाणे काबीज केले. कामबक्ष जिंजीत आल्यावर वेढ्याला बळकटी मिळाली. तो वेढा फेब्रुवारी १६९२ मध्ये बराच कडक बनला. त्रिनोपल्ली घेतल्याबद्दल झुल्फिकारखानाला चार हजारीचा मान ४ जानेवारी १६९२ मध्ये पादशाहाकडून मिळाला. याच महिन्यात झुल्फिकारखान तीन हजार सैन्यासह लूट करण्यास गेलेला पाहून मराठा सरदारांनी मोगलांचे घोडे दारूसामान वगैरे पुष्कळशी सामग्री पकडून घेतला. झुल्फिकारखानानेही जनावरांचे कळप पकडून आणिले. एप्रिल १६९२ मध्येही मराठे-मोगल झटापटी चालू होत्या. जिंजीच्या दक्षिण बाजुंनी मोगलांनी किल्ल्यावर जोराचा मारा चालविला होता. मराठ्यांची रसद बंद करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. परंतु ते निष्फळ झाले. जुलैमध्ये मोगलांनी एका बुरूजास खिंडार पाडले व गडात प्रवेश करण्याच प्रयत्न केला; परंतु तो सफल झाला नाही. सप्टेंबर १६९२

मध्ये मराठ्यांनी दोनदा मोगलांवर हल्ल चढवून यश मिळविले. एक तीन हजारी मोगलांच्या उमरावाकडून चांदीचा नगारखाना व पाच हजार बैल सामुग्री लादलेले होते. त्यापैकी तीन चार हजार मराठ्यांच्या हाती पडले. पुष्कळसे सामान व पैसा मराठ्यांनी बाहेरच्या जिंजीच्या लोकांना पोहोचविला. ऑक्टोबर १६९२ पर्यंत मोगलांच्या सेना जिंजीच्या दरवाजापर्यंत पोहोचल्या. त्यांचे हल्ले चालूच होते.[१९]

[४] धनाजी जाधव संताजी घोरपडेचे आगमन :

राजाराम महाराज महाराष्ट्रात पत्रे पाठवून धनाजी जाधव व संताजी घोरपडेला बोलावून घेतले. धनाजी जाधव आल्याची बातमी २२ डिसेंबरला आली. येताच त्याने पश्चिम द्वाराजवळ आपल्या आठ हजार स्वारांनिशी झुंज दिली. मोगलांचे खंदक काबीज केले. इस्माइलखान जखमी होऊन धनाजीने त्याला पकडले. किल्ल्यात प्रवेश मोकळा होताच बरीच लूट आत पोहोचविली. दोन हत्ती, पाचशे घोडे, सामान व कैदी मराठ्यांनी पकडून घेतले. नंतर धनाजी जाधव आपल्या सैन्यासह दोन-जीन दिवस किल्ल्यात राहिला. नंतर त्याने मोगलांवर हल्ला चढविला ज्यात मराठ्यांनी मोगलांच्या १४ पितळी तोफा, दोन हत्ती व समस्त दारूगोळा हस्तगत केला व ही लूट किल्ल्यात नेली.

मोगली सैन्याला रसद पोहोचविण्याच्या कामावर अली मर्दनखान याची नेमणूक झाली होती. तो डिसेंबर १६९२ मध्ये पुष्कळसे सामान आणत असतांना संताजी घोरपडेने त्याच्यावर लक्ष ठेवून आपल्या दहा-बारा हजार स्वारांनिशी अवघड ठिकाणी गाठून २४ डिसेंबर १६९२ रोजी त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात मराठ्यांच्या हाती पुष्कळसे सरदार, व्यापाऱ्यांचा माल तसेच पाच हत्ती, तीनशे घोडे, मोगलांच्या सर्व वस्तू, त्यांचे सर्व काही वित्त व सामान व जनावरे लागली व ही सर्व लूट बिनविरोध जिंजीच्या किल्ल्यात पोहोचविली.[२०]

[५] तह :

नवीन आलेल्या मदतीमुळे मराठ्यांचे सैन्य तीस हजारावर गेले. त्यामुळे मोगली सैन्यालाच वेढ्याचा धोका निर्माण झाला. शिवाय धान्य, सर्पण, जनावरांचा चारा या संबंधिचीही टंचाई त्यांना तीव्रपणे भासत होती. माघारही घेता येत नव्हती. तेव्हा उपासमारीमुळे मोगली फौज तेथून निघून जाऊ लागली. मोगलांनी जिंजीचा वेढा जानेवारी १६९३ मध्ये उठविण्याचे ठरविले. झुल्फिकारखान व आसदखान यांनी आपले वकील राजराम महाराजांकडे पाठविले व आपणाला

बिनविरोध परत जाऊ देण्याची मागणी केली. संताजी घोरपडे आल्यावर जबाब देऊ असे सांगण्यात आले. परंतु झुल्फिकारखानाने राजाराम महाराजास एक लाख रूपये भरून विनाविरोध परत जाऊ देण्याची परवानगी मिळविली. शिवाय ६० हजार पगोडे किंमतीचे जडजवाहिर खानाने राजारामास दिले. उलट राजाराम महाराजांनी खानास पंधरा हजार पगोड्यांचे जवाहीर, एक हत्ती, दोन घोडे, पुष्कळशी उंटे आणि दोन हजार बैल सामानाकरिता असा नजराणा देऊन खानास निरोप दिला.[२१]

२२ जानेवारी १६९३ रोजी झुल्फिकारखान तह करून (बेंद्रे सांगतात या तहामध्ये लढाई थांबविण्याचे कोणतेही कलम नव्हते. तसे करणे पादशाहाच्या कक्षेत होते.) चंदीचा वेढा काढून वांदिवाशला गेला. आसदखान व कामबक्ष ही गेले. मोगलांचे राहिलेले सामान मराठ्यांनी घेतले व पिछाडीचे दोन तीन हजार लोक वांदिवाशला जाऊ शकले नाहीत. कारण त्यांना मराठ्यांनी पकडून घेतले. मार्टिनच्या कल्पनेप्रमाणे[२२] झुल्फिकारखानास चंदी ताबडतोब घेण्याचे सामर्थ्य होते; पण तसे न करता त्यांनी वेढा लांबणीवर टाकला. हा उपकार लक्षात घेऊन राजारामाने त्याला युद्धतहकुबीची सवलत दिली. याला मनुचीच्या लिखाणातनसुद्धा दुजोरा मिळतो. [२३]

[६] तहाच्या परिणामाची वा. सी. बेंद्रे यांनी केलेली चिकित्सा :

१. या तहापासून दूर असलेल्या मराठा सरदारांना जेव्हा या तहाची बातमी मिळाली तेव्हा ते राजाराम महाराजांवर नाराज झाले व आपल्याला न विचारता हा तह करून त्यांनी मिळविलेल्या यशापासून त्यांना दूर ठेवले अशी त्यांची भूमिका झाली.

२. हा तह एका प्रधानाच्या सांगण्यावरूनच घेण्यात आला, त्या प्रधानाबाबतच्या त्याच्या वागणुकीवरून उत्पन्न झालेला राग अधिक तीव्र झाला. परिणामी मार्च १६९३ मध्ये बहिर्जी घोरपडे व याचप्पा नायक राजारामावर नाराज होऊन निघून गेले.

३. संताजी घोरपडे त्रिचनापल्लीच्या वेढ्यावर गेले होते. त्यांनी २३ एप्रिलला त्रिचनापल्लीकरांशी तह केला. नंतर ते ही राजाराम महाराजांना सोडून परत देशास गेले. राजाराम महाराजांनी संताजीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. संताजीस त्यांनी कळविले की, झुल्फिकारखानाचा व माझा गुप्त करार झाला आहे की, बादशाहा आता फार काळ टिकत नाही. त्यांचे पश्चात गोवळकोंड्याचा प्रदेश झुल्फिकारखानाने घ्यावा

व विजापूरचा राजारामाने घ्यावा. संताजीस भेटून व त्यास बक्षीस देऊन राजाराम महाराजांनी त्यांचे समाधान केले.

४. या काळात नजराण्यामुळे लाचखोरी प्रवृत्तीला उत्तेजन मिळाले. राज्यधुरिणाच्या असामर्थ्यत्वाचा फायदा घेऊन सरदारमंत्र्यांची वागणूक, स्वार्थासाठी राजकारणात वाढलेली भांडणे बघायला मिळाली. याचा अनिष्ट परिणाम तात्काळ भोगावा न लागता जिंजीच्या वेढ्यातून यशस्वीपणे तात्पुरती सुटका झाली असली तरी त्याचे परिणाम नंतर भोगावे लागलेच.

५. झुल्फिकारखानाला तिकडील स्थानिक राजे पाळेगारांना राजाराम महाराजांपासून दूर करण्यासाठी वेळ मिळाला. पुन्हा जिंजीवर हल्ला चढविला तेव्हा त्याला तोंड देण्याचे सामर्थ्य मराठ्यांमध्ये राहिले नाही आणि राजाराम महाराजांना शत्रुशी लढा न देताच आपला घरचा मार्ग शत्रुच्याच साह्याने स्वीकारावा लागला.

या सर्व नुकसानीला प्रल्हाद निराजी व रामचंद्रपंत यांचेच राजकारणांतील डावपेच कारण ठरले. हे दोन्हीही अधिकारी युद्धसंग्रमापासून दूर राहणारे असल्याने त्यांच्यात या काळातील युद्धविषयक परिस्थितीला तोंड देण्याची कुवत नव्हती.[२४]

६.७ राजाराम महाराजांच्या जिंजीतील हालचाली व जिंजीचा वेढा - उत्तरार्ध (इ.स. १६९४ ते १६९८)

झुल्फिकारखानाने १६९३-९४ मध्ये जो जिंजीचा तह करून लढा वाढविला होता त्यामुळे बादशाहाचा राग वाढतच होता. परंतु बादशाहाने झुल्फिकारखानाबाबत जो संयम ठेवला होता तो केवळ झुल्फिकारखानाने राजाराम महाराजांची स्थानिक हिंदू जमीनदारांची मदत तोडण्याचा व त्यांना मांडलिकत्व स्वीकारावयास लावण्याचा यशस्वी व महत्त्वाचा प्रयत्न सुरू केला त्यामुळे होय. कारण हे प्रयत्न जिंजीच्या वेढ्याचाही एक भाग होता व मूळ हिंदुच्या प्रभुत्वाला डावलण्याच्या मुख्य हेतूचाही एक भाग होता. त्यामुळे झुल्फिकारखानाच्या कारवायांना औरंगजेबाने मान्यता दिली. त्याशिवाय सैन्यात व अन्नधान्याच्या पुरवठ्यातही भर पडण्याची आवश्यकता होती.

[अ]   झुल्फिकारखानाच्या हालचाली व जिंजीचा ताबा :

झुल्फिकारखानाने इंग्रजांशी मैत्रीकरून त्यांच्याकडून दारूगोळा व तोफचींची मदत मिळविली. त्याचप्रमाणे दारूगोळाही मिळविला.

मोगलांनी इ.स. १६९४ च्या फेब्रुवारीत अगदी सुरूवातीला परमव्होलच्या गडाला वेढा दिला व शहर लुटले. गडाच्या संरक्षणासाठी अडीच हजार मराठे स्वार पाठविले गेले. १३ फेब्रुवारी १६९४ ला आर्सोमा नायक व नबाब यांनी करार करून वालदोरचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. सर्वत्र लुटालूट झाली. तेव्हा मोगल त्रिवालूरकडे वळले. परंतु बहिर्जी घोरपडे तीन हजार स्वारानिशी त्याने त्या सैन्याला २८ फेब्रुवारी पूर्वी उधळून लावले. मराठ्यांचे मोठे सैन्य येत असल्याची बातमी लागल्यावर मोगली सैन्य त्रिवालूर वरून वालडोर व तेथून वांदिवाशला जाण्याच्या तयारीत फेब्रुवारी अखेर होते. मोगली सैन्याने पालमकोटावर हल्ला चढविण्याची तयारी केली; परंतु मराठ्यांनी तो गड सोडून मोगलांना घेऊ दिला. मोगली फौज मार्चच्या मध्यावर वर्धा चरमकडे गेली. चेलामवरम व बुंगेरीपटम येथे लुटालूट केली.

जूनच्या दुसऱ्या आठवड्यात चंदीवरून तंजावरला जाणाऱ्या मोगली सैन्याने वाटेत बरीच लुटालूट व जाळपोळ केली. याच सुमारास राजाराम महाराज मोगलांच्या काही अटींवर मांडलिकत्व स्वीकारण्यास तयार होते; परंतु बादशाहाने तहास मान्यता दिली नाही. तंजावरकरांनी याचवेळी मोगलांसोगत तहासाठी बोलणी केली होती. शेवटी १२ मे ला आपल्या अटी नबाबाला कळविल्या त्यानुसार तंजावरकराने मोगलांना ३ लक्ष रुपये खंडणी द्यावयाची, जिंजीवर स्वारी करण्यासाठी १००० स्वार व ४००० फौज द्यावयाची, पालमकोटा वगैरे तीन किल्ले द्यावयाचे व राजाराम महाराजांशी कसलाही संबंध ठेवायचा नाही.

जुलैच्या शेवटी मोगली फौज टागादुर्गमजवळ आली होती. तेथे बांबू तोडून चंदीचा किल्ला घेण्यासाठी बऱ्याच शिड्या तयार केल्या. नबाबाने असोंमा नायकाला सप्टेंबरमध्ये मारला आणि जिंजीवर हल्ला चढवून गड घेण्याचा निर्णय घेतला. जिंजीवळ तळ दिला. परंतु मराठ्यांनी संपूर्ण तळ्यांमध्ये विष टाकल्यामुळे पुष्कळ सैनिक मारले गेले म्हणून माघार घेतली. मोगली सैन्य डिसेंबरमध्ये वेलूरपासून दोन मैलावरील ठिकाणी आले. गुझफरखान पातशाहाकडून एक लाख सोन्याच्या मोहरा, ४०० घोडे वगैरे घेऊन आला. कारण सैन्याचा १८ महिन्याचा पगार देणे बाकी राहिले होते.

नबाब जिंजीच्या सभोवतालचा भाग काबिज करून एप्रिल १६९५ च्या सुरूवातीला वेलोरला जाण्याच्या तयारीत होता. राजारामांनी होत असलेल्या वाटाघाटी केवळ वेळ काढण्याकरिता केल्या आहेत. असे समजून आल्यावर नबाब तह मोडण्याच्या तयारीला लागला. नबाबाने वेलोरला वेढा देण्यासाठी त्वरेने कूच केली. परंतु डोडेरीला संताजीने कासिम खानाचा मोड केल्याचे ऐकून ते मराठा सैन्य जिंजीकडे येत असल्याचे पाहून नबाबास माघारी यावे लागले. धनाजीने १६९५ च्या डिसेंबरमध्ये झुल्फिकारखानाला अर्काटपर्यंत हटविले व त्रिवालूरला वेढा घातला. परंतु ५ फेब्रुवारी १६९६ रोजी मोगलांचे मोठे सैन्य आले तेव्हा वेढा उठविला. दाउदखानानेही आपल्या तीन हजार स्वारांनिशी येऊन मराठ्यांना त्रिवादीवरून हटविले. १६९६ च्या सुरवातीला नबाबाने मोगल व राजाराम यांच्यात कर्नाटकचा प्रदेश वाटून घ्यावा म्हणून प्रल्हादपंताबरोबर बोलणे चालू केले. परंतु ते मराठ्यांनी धुडकावून लावले. उलट मराठ्यांच्या सैन्याने नबाबाच्या सैन्यावर हल्ला केला. मोगली सैन्य विस्कळीतपणे अर्काटला परतले. मराठा सैन्य सर्वत्र हल्ले चढवित होते.

मार्च १६९६ च्या सुरूवातीला धनाजी जाधव पुलीचरीला येऊन बसला. मराठ्यांकडे बरेचशे सैन्य जमू लागलेले पहाताच मोगलाकडील सरदार राजारामाकडे येऊन मिळू लागले. त्यामुळे मराठा सैन्य बरेच वाढले. परंतु संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यातील भांडणामुळे मराठा सैन्याचा जोर एकदम ढासळला. कारण हे दोन्हीही सरदार कर्नाटकाची रणभूमी सोडून परत मायदेशी गेले. परंतु संताजीची समजूत काढल्याने तो ३१ ऑगस्ट १६९६ मध्ये त्रिणामल्लीस गेला. त्याच्यावर मोगलांनी आक्रमण केले. परंतु दाणागोटा संपल्याने मोगली सैन्याला सप्टेंबरमध्ये परत अर्काटला यावे लागले. ऑक्टोबरमध्ये नबाब संताजीवर चालून गेला. संताजी निसटून कृष्णा नदीच्या प्रदेशात शिरला. नबाबाने त्यांचा पुलिकतपर्यंत पाठलाग केला. संताजीने जातांना प्रदेशात लुटालूट केली. ऑक्टोबरमध्ये संताजी कावेरीपाकवर जाण्याचा बेतात होता. संताजी कडाप्प्याकडे गेला. तेथे मोगलांकडून जिंजीस खर्चासाठी आलेला खजिना होता. नबाब हे समजताच आर्काटहून तिकडे गेला. परंतु संताजी कडाप्प्यास न जाता दुसरीकडे पुलिकतगडाकडे गेला. तेव्हा नबाब परत आर्काटला आला.

१६९७ च्या फेब्रुवारीच्या सुरूवातीला नबाब आर्काटला परत आला. मार्चमध्ये संताजी कर्नाटकातून परतून साताऱ्याला इ.स. १६९७ च्या एप्रिलच्या सुरूवातीला आला. धनाजी जाधव

व संताजी घोरपडे यांचे सैन्य कर्नाटकातून गेलेले पहाताच झुल्फिकारखानाने मार्चच्या अखेरीस राजारामाला चंदी नबाबास देऊन राजारामाला वेलुरला जाण्यास सांगितले होते. नबाबाने आपल्या सैन्याचा तळ त्रिमलवाडहून अमालोरला आणला.[२५]

[ब] झुल्फिकारखानाची राजाराम महराजांना मदत :

झुल्फिकारखानाने राजाराम महाराजांना त्रिमलवाडहून अमालोरला आल्यावर कळविले की, दाऊदखानाबरोबर मला जिंजी घेणे व मराठा सैन्याचा ऱ्हास करणे भाग पडेल तरी तुम्ही धनाजीला ताबडतोब आणावा. दाऊदखान आता माझे ऐकणार नाही. त्याने बादशाहाची मर्जी मिळविण्याकरिता लढा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तेव्हा धनाजीला येण्यास थोडा तरी वेळ मिळाला पाहिजे म्हणून राजाराम महाराजांनी जुलैच्या सुरूवातीस तहाचा मसुदा तयार केला व त्यात राजाराम महाराजांनी आपला मुलगा राजा कर्ण ओलीस पाठवावा, त्याला वार्षिक एक लाख चक्रीचा मामला देण्यात यावा, राजारामाने नबाबाच्या हवाली चंदी द्यावी व त्याने बेलूरच्या कोटामध्ये जाऊन राहावे, मोगली कैदेत बराच काळ राहिलेल्या राजाराम महाराजांच्या जेष्ठ पत्नीची जानकीबाईची सुटका करून राजाराम महाराजांकडे पाठवावी आणि निळोपंताने राजा कर्णाजवळ शिक्षक म्हणून रहावे, इत्यादी गोष्टींचा समावेश होता. हा करार राजाराम महाराजांनी केवळ आपणास रामचंद्रपंताकडून धनाजी जाधव ससैन्य येण्याची वाट पाहण्यायाठी केला होता. असे वा. सी. बेंद्रे सपष्ट करतात व पुढे सांगतात, त्याप्रमाणे रामचंद्रपंताला पत्रे गेली; परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मदत वेळीच आली नाही. उलट खानाल बादशाहाचे करार अमान्य केल्याचे व जिंजी घेण्यासंबंधी कडक ताकीदपत्र आले.

ऑक्टोबर १६९७ च्या दुसऱ्या पंधरवाड्यात राजा कर्णाला परत जिंजीकडे पाठविले व बादशाहा करार मानण्यास तयार नसल्याने व वेढा घालण्याचाच आदेश दिल्यामुळे आपण जिंजीस वेढा घालणार असल्याचे खानाने राजाराम महाराजांना कळविले. १६९७ च्या शेवटच्या आठवड्यात खानाने राजा कर्णाला परत पाठविले व राजारामाने खानास दिलेल्या जुन्या जिंजीतून खानाने आपले लोक मागे घेतले. राजाराम महाराजास मदत म्हणून खानाने द्रव्यही पाठविले. खानाचे सैन्य जिंजीपासून एका कोसांवर गेले. नंतर दाऊदखान जिंजीवर कसा लढा देणार याचीही माहिती राजारामास कळविली. त्यामुळे दाऊदखान चालून गेला तेव्हा मराठा सैन्य वटवालच्या जंगलात होते. त्यांनी तेथील पाळेगारांच्या साह्याने दाऊदखानावर छापा घालून त्याचे

२०० लोक मारिले. त्याचा हत्ती जखमी केला. तेव्हा दाऊदखानाने आपला तळ माघारी दूर अंतरावर नेला. तरीही त्याच्या तळावर छापे घालून घोडे नेणे, लुट करणे हा क्रम नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यातसुद्धा चालू होता.

१० डिसेंबर १६९७ रोजी खानाने आपला तळ कृष्णागिरीजवळ नेला. राजाराम महाराज तेथून निघून जाण्याची खटपट करीत होते. २६ डिसेंबरला राजाराम महाराज किल्ल्याबाहेर गेले. त्यापूर्वीच झुल्फिकारखानाने आपले निशाण एका टेकडीवर चढविले. आठ दिवसांच्या वेढ्यांनतर खानाने सहा गडांचा ताबा घेतला. सातवा गड अद्याप घ्यावयाचा असल्याची ३१ डिसेंबरची बातमी होती. दाऊदखानाने जिंजीचा किल्ला घेतला. राजाराम महाराज, त्यांचा मुलगा, मानाजी मोरे व इतर मिळून २० लोक डिसेंबरच्या रात्री जिंजीतून वेलोरगडावर गेले. वेलोरगडावर मराठ्यांचा जमाव तीन चारशे होता. हे कळल्यावर खानाने जिंजीवरून वेलोरला छापा घालण्याचे ठरविले. नबाब वेलोरला जाण्यासाठी वांदिवाशला गेला; परंतु फेब्रुवारी १६९८ च्या अखेरीस राजाराम महाराजांना वेलोरहून नेल्याचे कळाले. तेव्हा खान घाईने त्यांच्यामागे पाठलागार्थ गेला. ३ मार्च १६९८ च्या बातमीप्रमाणे खानाने राजारामांचा पाठलाग केला. खान गुरमकोंड्यापर्यंत गेला. खान सिरापर्यंत जाऊन वापस आला. मात्र रस्त्यात राजाराम महाराजांना कोठेच मोगली सैन्याला तोंड देण्याची गरज पडली नाही. यामुळे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की, राजाराम महाराज निघून गेल्यावर त्यांचा पाठलाग करून खानाने बादशाहाला हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, त्याने राजाराम महाराजांना पकडण्याचे पूर्ण प्रयत्न केले.

बादशाहाने जिंजी सर केलयाची बातमी ऐकताच झुल्फिकारखानाच्या संरजामान एक हजाराची वाढ करण्यात आली. एक हत्ती, घोडा व तलवार बक्षीस दिली. राजाराम महाराज एप्रिल १६९८ च्या मध्यात राजापुरास पोहोचले. महाराजांबरोबर धनाजी जाधवाचे ४०,००० सैन्य होते. राजाराम महाराजांनी आपल्या गडास भेट देण्यासाठी अडीच महिने घालविले व नंतर पन्हाळ्यास आले.[२६]

[ड] बेंद्रेंची चिकित्सा :

वा. सी. बेंद्रे या संपूर्ण संघर्षाची चिकित्सा करताना सांगतात की,

१. राजाराम महाराजांना सैन्याच्या अभावामुळे जिंजीचा किल्ला रक्ताचा एक थेंबही न सांडू देता मोगलांच्या ताब्यात देण्याची वेळ आली. खानानेही फारसी दुर्बुद्धी न धरता तो

कब्जात घेतला. राजाराम महाराजांनी आपल्या सोबत २० लोक नेले. त्यामध्ये मुलगाही नेला अशी बातमी होती; परंतु गिरजोजीच्या सांगण्यावरून मुलाला व राण्यांना गड मोगलांनी घेतल्यानंतर नेण्यात आले. गणोजी शिर्के व खान यांच्या आश्वासनावर त्यांना मागे ठेवण्यात आले होते. रात्रीच्या वेळी निसटून जातांना खानाच्या प्रतिस्पर्ध्यांकडून धोका होण्याची भीती होती. धनाजी जाधवाचे सैन्य येऊन पोहचल्यामुळे राण्यांदीना त्या सैन्याबरोबर सुरक्षित जाता आले.

२. राजा कर्ण हा राजारामाच्या नाटकशाळेचा मुलगा होता. राजाराम महाराजांची पहिली बायको वारली म्हणून संभाजी महाराजांनी त्यांची आणखी दोन लग्ने करून दिली असा समज होता तो चुकीचा दिसतो. रायगडच्या वेढ्यातून गिरजोजी बावास जानकीबाईला पाठविण्यात न आल्यामुळे तिला येसुबाई साहेबाबरोबर मोगलांच्या अटकेत राहावे लागले. तिला सोडविण्याचा करार खानाच्या इ.स. १६९७ च्या शेवटच्या मसुद्यात आहे. ताराबाई, राजसबाई व अंबिकाबाई यांना खंडो बल्लाळांच्या मामाने जलमार्गे चंदीस आणून पोहोचविले. ताराबाईने धाकट्या शिवाजीस जून १६९६ रोजी जन्म दिला. बखरीची १६९१ ही तारीख चुकीची आहे. कदाचित हे वर्षे राजा कर्णाच्या जन्माचे असू शकेल. त्याचप्रमाणे राजा संभाजीचा जन्म चंदीस झाला हे ही म्हणणे समकालीन कागदपत्रांवरून चुकीचे दिसते.

३. रामचंद्रपंताने धनाजी जाधवास पाठविण्यात वेळ केल्यामुळे वेढा लांबविण्याचा खानाचा बेत फसला व जिंजीचे राज्य हरविल्याचा दोष राजाराम महाराजांवर येऊन पडला. संताजीच्या मृत्युनेही मोगलांस तोंड देण्याची मराठ्यांची ताकद कमी झाली. या सर्व नुकसानीला राजकारणी कारभाऱ्यातील भांडणे व द्वेषच कारणीभूत ठरला.[२७]

६.८ राजाराम महाराजांच्या जिंजीच्या वास्तव्यात असताना झालेल्या महाराष्ट्रातील हालचाली

राजाराम महाराजांच्या जिंजीच्या वास्तव्यात असतांना महाराष्ट्रात कशाप्रकारे मराठा सरदार, जनता व मोगल यांच्यात हालचाली चालू होत्या त्या विषयी वा. सी. बेंद्रे पुढीलप्रमाणे माहिती देतात. ते सांगतात की, मोगलांनी जेव्हा महराष्ट्राचा बराच प्रदेश व्यापून घेतला. जनतेचा हा प्रदेश जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या स्वराज्यातील राजकारणाने जिंजीच्या

राजकारणापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारला त्यांनी वैयक्तिक मेहनतीच्या जोरावर मोगली सत्तेतून आपला प्रदेश सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या हालचालीची माहिती देतांना वा. सी. बेंद्रे यांनी चिटणीस बखर, जेधे शकावली, खाफीखानाचा वृत्तांत, इंग्रजांचा पत्रव्यवहार, मराठी कागदपत्रे, सरदारांची व सरदारांना लिहिलेल्या राजाराम महाराजांच्या विविध पत्रांचा[२८] अभ्यास करून दिली आहे. त्याचबरोबर वा. सी. बेंद्रेंनी विविध सरदारांची पत्रे, राजाराम महाराजांचे पत्र त्यांच्या 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - भाग दुसरा' मध्ये दिलेली आहेत.[२९] यावरून महाराष्ट्रातील यावेळच्या हालचालीविषयी बेंद्रे पुढीलप्रमाणे देतात.

[अ] सरदार अधिकाऱ्यांत संभ्रम व राजाराम महाराजांची भेट :

स्वराज्याचा राजा व राजधानी जेव्हा महाराष्ट्रातून निघून गेली हे जनतेला कळले तेव्हा सुरूवातीला त्यांचा धीर खचला. त्यामुळे मोगलांना मराठा सरदारांना फोडून आपल्याकडे घेण्यात बरेच यश आले. परंतु उरलेल्या सरदारांनी आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवहारात येणारी संकटे व गुलामगिरी टाळण्यासाठी मोगलांना तोंड देण्याचे ठरविले; परंतु यासाठी त्यांना आर्थिक अडचण भासली. शिवाय यात सरकारी मदत मिळण्याचीही आशा राहिली नव्हती. शिवाय रामचंद्रपंताकडे सर्व कारभार सोपविल्यामुळे मनात नाराजीही होती. कारण रामचंद्रपंताच्या कार्यकर्तेपणावर त्यांचा विश्वास नव्हता.

त्यामुळे बऱ्याचश्या देशमुख आदि अधिकाऱ्यांनी रामचंद्रपंताशी संपर्क न साधता सरळ चंदीला जाऊन राजाराम महाराजांची भेट घेतली व त्यांना आपला विचार सांगितला. राजाराम महाराजांनी ताबडतोब मान्यता देऊन इनामाची जी माहिती दिली त्याआधारे सनदाही ताबडतोब करून दिल्या आणि त्यांना त्यांच्यापद्धतीने कार्य करण्यास संमती दिली. त्याचबरोबर रामचंद्रपंताकडून सचिवपद काढून शंकराजी पंडिताकडे दिल्याने त्यांना आवश्यक ती सरकारी सहाय्यता मिळण्याची खात्री झाली.[३०]

[ब] मराठ्यांच्या शक्तीत वाढ :

महाराष्ट्रातील जनता व अधिकाऱ्याद्वारे मोगलांकडून प्रदेश घेण्यास सुरूवात केली व त्यात त्यांना यशही मिळाले हे पाहून जी मंडळी मोगलांना जावून मिळाली होती, त्यांनाही आपला प्रदेश घेता येणार याची खात्री वाटू लागली. त्यामुळे ते पण मोगलांची साथ सोडून मराठा लढ्यात सामील होऊ लागले. त्यामुळे मोगलांची ताकद कमी होऊ लागली. महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने

लोकशाही राज्य लोकांनीच परत मिळविले व इतिहासात फार मोठा आदर्श उत्पन्न करून ठेवला असे बेंद्रे सांगतात.

[क] महाराष्ट्रातील हालचालींचा तपशील :

जेधे यांनी सुरूवातीला प्रचंडगडाचा मोगली वेढा उठविण्यात मदत केली. त्याचप्रमाणे याच काळात पन्हाळ्यास पडलेला मोगली वेढा उठविण्यात कासी रंगनाथ वोपेंनी प्रयत्न केले म्हणून त्यांना इनामे देण्यात आली.

सर्जाखानाने जेव्हा साताऱ्याला वेढा घातला तेव्हा शंकराजी पंडित सचिव, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी जाऊन ४०० घोडी व आठ हत्ती पाडाव केले व वेढा उठवून सर्जाखानाकडून लाख रूपये घेऊन २४ मे १६९० ला सोडून दिले.

मोगल बादशाहने १० जुलै १६८९ मध्ये रुहुल्लाखानाला रायचूरचा किल्ला घ्यावयास पाठविले तर १९ ऑक्टोबर १६८९ रोजी इरदतखानाने रायगड घेतला. तर २९ नोव्हेंबर १६८९ मध्ये रुहुल्लाखानाने रायचूरचा किल्ला घेतला.

२३ नोव्हेंबर १६९० रोजी नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे, नागोजी माने मोगलांकडून निघून आले व दोन हजार स्वारांसह राजाराम महाराजांना भेटले. यापूर्वी २४ सप्टेंबर १६९० रोजी कसबा नांदगज परगणे कडेवलीत हा मराठ्यांनी लुटला व एक लक्ष रुपयांची लूट केली व पाच हजार पाचशे रुपयांचा करार केला. परंतु त्यापूर्वी कसबा व कोट लूटला गेला होता असे वा. सी. बेंद्रे सांगून पुरंदर गड घेण्याचे काम तेथील कोळी लोकांकडे सोपविण्यात आले होते व ते त्यांनी घेऊन देण्याचे आश्वासन १६९० च्या अखेरीस दिले होते असे स्पष्ट करतात.

इ.स. १६९१ च्या पावसाळ्यापूर्वी मुस्तफाखान मीर आतिष याला मराठ्यांच्या पारिपत्यार्थ रायबाग हुकेरीकडे पाठविण्यात आले. यावेळी साताऱ्यांचा वेढा उठल्याने मराठा सैन्य वाईला गेले होते. तेथे त्यांनी किल्ला पाडून टाकून किल्लेदाराला लुटले व सोडून दिले. जागो जागी जी ठाणी होती ती घेतली होती व मराठे वंदनाखाली येऊन राहिले. तेव्हा त्याच्या आजुबाजूच्या ठाण्यातील मोगल सरदार ठाणी सोडून निघून गेले. ठाणी खाली दिसताच मराठ्यांनी आपली फौज घेऊन वर्धनगडाखाली नेरीमध्ये मुक्काम केला. याकाळात परगणे मजकुरास फौज पाठवून लुटून वेगळा केला. किल्ला पाडीत होते पण इतक्यात पादशाही फौजा मसुरावरून औंधास आल्याचे कळाल्याने किल्ला पाडण्याचे काम रद्द करून नेरीमध्ये आले व

तेथून पादशाही फौजेचा सामना करण्यासाठी औंधला आले. पातशाही फौज खटावास गेल्याचे कळाल्यावर मराठा फौजही त्यांच्या पाठीशी गेली. खटावाला जाऊन वेढा घातला. दहा बारा दिवस हा वेढा पडला असतांना रणमस्तखान मदतीस आला. पण त्याला बादशाहने बोलाविल्याने तो ही परत गेला. मोगली फौज खटाव सोडून निघून गेली. मराठ्यांनी त्यानंतर दहा बारा दिवस लूट करून किल्ला पाडून ते निघून गेले. यानंतर १७ मार्च १६९१ च्या सुमारास हा किल्ला मोगलांनी परत घेतला.

इ.स. १६९२ च्या सुरूवातीला राजश्री आबाजी सोनदेव यांना रायगड घेण्याची आज्ञा केली आणि त्यांनी १३ मे १६९२ रोजी मदत करण्यासाठीही जऊळकर, दरेकर, साबळे, कासुर्डे व गोळे येथील संपूर्ण लोकांनाही आज्ञापत्रे काढली. इ.स. १६९२ च्या पावसाळ्यापूर्वी कोरी गड कुलाबेकरांनी व राजश्री सोनजी फर्जंद यांच्या लोकांनी घेतला. तेव्हा पंचसहस्त्री सावंत यांनी सिंदगड घेतला. परंतु गडावर दीड मण नागलीशिवाय काहीच साठा शिल्लक नव्हता. ही हलाखीची परिस्थिती जाणून जुन्नराहून अली बेग जमावानिशी येऊन वेढा घालून बसला. सावंत सिंदगडावरून कोरीगडाला गेला. मदत मागितली पण मिळाली नाही. दरम्यान गडावरील लोकांना अली बेगने पाचशे रूपये देऊन गड सोडावा म्हणून बोलणे केले. गडावरील लोकांनाही अन्न खाण्यास नसल्यामुळे किल्ला अली बेगच्या स्वाधीन केला. ८ मे १६९२ ला बादशाहाने महमद मुझुद्दीनला दहा हजारी मनसब देऊन अकलुजला, जो मराठ्यांनी धुमाकूळ घातला होता त्यासाठी पाठविले. त्याच्या मदतीला लुतफुल्लाहखान व असालतखान यांनाही पाठविले.

सिंहगड, पुरंधर व लोहगड परत घेण्याची प्रयत्न इ.स. १६९३ पासून सुरू झाला होता. २७ मे १६९३ पासून सिंहगड घेण्यासाठी प्रयत्न सुरू झाला व शेवटी नावजी बलकवडे यांनी १ जुलै १६९३ रोजी सिंहगड घेतला. याच सुमारस संताजी घोरपडे व रामचंद्रपंत यांच्यामध्ये बेबनाव उत्पन्न झाला. त्यांच्यामधील द्वोषभावना वाढीस लागली.

प्रचंडगडचा किल्ला शाहादिखानाने वेढा घालून तो घेतला. इ.स. १६९५ च्या सुरूवातीला आबाजी विश्वनाथ प्रभू यांनी हा गड पुन्हा हस्तगत केला; परंतु त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. इ.स. १६९६ च्या सुरूवातीला संताजी घोरपडे यांनी बसवापटण जवळ हिमंतबहादुरास ठार मारले.[३१]

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यानंतर १ ऑक्टोबर १६९६ रोजी काढलेल्या एका इनामपत्रांतील माहिती देतात, ज्यामध्ये यावेळच्या हालचालींची माहिती येते. ती अशी "...महाराज कर्नाटक प्रांती गेले. पुढे बुवाजी पवार वगैरे सरदारांस यथायोग्य मानसन्मान देऊन सांगितले की, तुम्ही देशी माघारी जाऊन... मोगलाईत धामधूम करून पल्लेगारीने मुलूख मारून चौथ सरदेशमुखी घासदाणा घेऊन अंमल बसवावा. स्वामींचे आज्ञेप्रमाणे बुवाजी पवार वगैरे सरदार चंदीहून देशी येऊन बावडेकरांशी मसलत करून मोगलाईत सर्वत्र धामधूम करू लागले. रामचंद्र बावडेकर यांनी धनगरांचे भारी जमावाने किल्ले विशाळगड, रांगणा, गगनगड, बावडा, वगैरे स्थाने, पाटणकरांनी पाटणखोऱ्यात राहून कऱ्हाड व वाई प्रांती जमागर्दीने स्वाऱ्या करून किल्ले कोट कबिज करू लागले. सिदोजीराव निंबाळकर यांनी आटोले बरोबर गंगाखोऱ्यात, परसोजी भोसले यांनी देवगड चांदेपासून गोंडवणपावेतो, खंडेराव दाभाडे यांनी बागलाणपासून गुजरातपावेतो धुमाकूळ घातला. बुवाजी पवार यांनी भारी जमाव जमवून गंगधडीपासून खानदेश तापीवर पावेतो मोगलास तोंड दिले. रात्रंदिवस छापा घालून पाठलाग करून मोगलाचा पाडाव केला. त्यांचे डेरे लुटून हत्ती, घोडे व खजिना मालमत्ता घेऊन तापी तीरापर्यंत स्वराज्याचा अंमल बसविला. मोगल घाबरून किल्ल्यात शिरून बसले. इतक्यात बुवाजी पवार यास मोगलांनी भारी जमावाने दगा करून पकडून अशीर मुक्कामी घेऊन गेले. त्यास सांगितले की, तुम्ही बादशाहाचे चाकरीत आलेत तर तुम्हास इतर मराठे सरदारांप्रमाणे खुदावंत भारी मानमरातब व मोठा सरंजाम देतील, बुवाजी पवार यांनी आवजी आघाल, रामचंद्र खटावकर, नागोजी माने, सटवाजी व बाजीराव डफळे, बहिरजी पांढरे, अमृतराव निंबाळकर, महादजी नारायण वगैरे मराठे सरदार व स्वामींचे आप्तवर्गीय अचलोजीराव व कान्होजी शिर्केप्रमाणे स्वामींची सेवा सोडून हरामखोरी करून, बादशाहाची मनसबदारी करणेबद्दल नकार दिला. उपरांत मोगलांनी बुवाजी पवार यास किल्ल्याचे बुर्जात टाकून गोदाखोऱ्यापासून खानदेश तापीपर्यंत मुलूख कबजा केला... स्वामींनी (बुवाजी पवाराचा भाऊ) संभाजी पवार... आज्ञा करून चंदीहून स्वदेशी भावाचा सूड घेणेबद्दल मोगलाचा पाडाव करावयास पाठविले... चंदीहून निरोप घेऊन स्वदेशी येऊन पुतणे कालोजी व संभाजी यास बरोबर घेऊन भारी जमावाने चारपाच वर्षेपर्यंत रात्रंदिवस छापे घालून लुटालूट व जाळपोळ करून गंगातीरापासून खानदेश तापीतीरापावेतो मोगलाचा पाडाव करून पल्लेगारीने मुलूख मारून चौथ सरदेशमुखी घासदाण बळजबरीने घेऊन स्वामींचा अंमल बसविला..."[३२]

यानंतर वा. सी. बेंद्रे सुरतच्या ब्रिटीशाचे १८ जुलै १६९६ च्या पत्रातील माहिती देतात की, संताजी घोरपडेंनी राजाराम महाराजांना कैद केले हे कळताच झुल्फिकारखानाने बादशाहाच्या नावाने, संताजीने राजारामास मोगलाच्या ताब्यात दिल्यास मोठे बक्षिस व मानमरातब देण्याचे जाहीर केले होते. परंतु झुल्फिकारखान व राजाराम महाराज यांच्यात समेट झाल्यामुळे संताजीने राजाराम महाराजांना सोडले. मुंबईकरांनाही ही बातमी होती, असे २८ जुलैच्या पत्रात लिहिले आहे. सुरतेच्या ७ ऑगस्टच्या बातमीप्रमाणे राजाराम महाराजांची सुटका केल्याची निश्चित बातमी आली होती असे सांगून कारवारकरांच्या पत्रातील माहिती देतात की, ८ मार्च १६९७ ला मराठा सैन्य एकलापुरला आल्याची बातमी देतात व या सैन्याने सर्वत्र लुटालूट केल्याचेही सांगतात. नंतर ७ डिसेंबर १६९७ च्या बातमीत मराठा सैन्याने मंगलोर, कंबाला व मुंगेश्वर लुटून पुष्कळ मालमत्ता नेल्याची बातमी देतात. नंतर १३ एप्रिल १६९८ च्या बातमीत मराठ्यांची २२ गॅलव्हेटस बंदरात आली. त्यात ३०० सैनिक आले व या सैनिकांनी पुष्कळ मालमत्ता नेल्याचे वृत्त येते. या लुटीनंतर मराठे नदीतून पुढे गेले व नदीकाठच्या शहरांची लुटालूट केली.

वरीलप्रमाणे महराष्ट्रातील घडामोडींची माहिती वा. सी. बेंद्रे देतात व चिकित्सा करतांना लिहितात की, स्वराज्यनिष्ठेवर व स्वराज्यातील सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याला भुकेले लोक होते. त्यांनी राजाराम महाराज जिंजीला जाताच, रामचंद्रपंतावर विश्वास नसल्याने, सरळ जिंजीला जाऊन राजाराम महाराजांची भेट घेऊन स्वतंत्रता मिळविली व जमावाच्या मदतीने जुनी इनामे परत घेतली. राजाराम महाराजांनी ती दिली इतकेच नव्हे; तर त्यांना अधिक प्रोत्साहित करण्यासाठी त्यांनी केलेली लुटही राजाने बक्षिस म्हणून घेण्यास सांगितले. ही मंडळी देशी येऊन मोगली सत्ता संपवू लागली. यामध्ये यश येते आहे असे पाहून मोगली नोकरीत गेलेले सरदार परत येऊन राजाराम महाराजांच्या सेवेत येऊ लागले. या स्थानिक लोकांच्या हालचालीने राजद्रोही कटवाल्यांचे प्राबल्य कमी झाले. रामचंद्रपंताकडील सचिवपद दूर होऊन कारभाराचे क्षेत्रही मर्यादित केले गेले. उलट शंकराजी नारायणला पुन्हा सचिवपद मिळाल्याने व मोठे दगदगीचे क्षेत्र त्याच्या ताब्यात दिल्याने त्याने स्वराज्याचा फार मोठा भाग मोगली सत्तेखालून लोकसाह्याने सोडविला. मात्र जिंजीचे राज्य बिनालढा मोगलांच्या हवाली करून राजाराम महाराजास महाराष्ट्रात परतावे लागले व आपल्या कारभारातील पद्धतीत योग्य असा फेरबदल करणे भाग पडले.[३३]

६.९ स्वराज्यात परत आल्यानंतर राजाराम महाराजांच्या शेवटच्या हालचाली

[अ] राजाराम महाराजांच्या हालचाली :

वा. सी. बेंद्रे सांगतात की मोगलांनी जिंजी घेतली आणि राजाराम महाराजांना स्वराज्यात परत यावे लागले. राजाराम महाराजांच्या मदतीस येत असलेल्या सैन्यास अडविण्याकरिता व राजाराम महाराज निघून गेले म्हणून त्यांच्या पाठलागार्थ झुल्फिकारखानाने २६ फेब्रुवारी १६९८ ला जिंजीहून कूच केली. यानंतरच्या राजाराम महाराजांच्या हालचालींची माहिती बेंद्रे तारीखीनुसार पुढीलप्रमाणे देतात, "झुल्फिकारखान मागे येत असल्याची माहिती कळताच राजाराम महाराज आपल्या कुटुंब व साथीदारांसह धनाजीबरोबर स्वराज्यात जाण्यास फेब्रुवारीच्या अखेरीस निघाले. खानाने गुरमकोंड्यापर्यंत त्यांचा पाठलाग केल्याचे नाटक केले. राजाराम आणि मंडळीचा हा प्रवास कोपल भूघरगडावरून पन्हाळ्यास व तेथून २२ फेब्रुवारी १६९८ ला खेळणा गडापर्यंत येऊन संपला. नंतर राजारामांनी निरनिराळ्या गडांवर जाऊन पहाणी केली. एप्रिल १६९८ मध्ये राजाराम महाराज राजापुरला जाऊन राहिले. २३ मे १६९८ रोजी राजाराम महाराजांना संभाजी नावाचा पुत्र झाला म्हणून ते जून महिन्यात मुलाच्या बारशासाठी पन्हाळा गडावर आले. नोव्हेंबर १६९८ च्या सुरूवातीला राजाराम महाराज खेळण्याहून जिंजीला गेले. त्यांच्या पाठलागावर बादशाहने बेदरबस्तास रवाना केले. मार्च १६९९ च्या सुरूवातीला राजाराम महाराज चंदीहून खेळण्यास परत आले. रस्त्यात गदकजवळ बेदरबस्तासोबत लढाई झाली. ऑक्टोबर १६९९ च्या शेवटी राजाराम महाराज ब्रम्हपूरीकडे गेले; मोगली तळावर हल्ला केला व आसपास लुटालूट केली. यावेळी त्यांच्याबरोबर धनाजी जाधव होते. त्यांचा मुख्य हेतू शाहूला पळवून आणणे हा यशस्वी झाला नाही. राजाराम महाराज परत आले; परंतु बेदरबख्त झुल्फिकारखान पादशाहाच्या आज्ञेने महाराजांच्या पाठलागार्थ गेले. त्यांना धनाजी जाधव बरोबर लढा द्यावा लागला. १६९९ च्या डिसेंबर मध्ये राजाराम महाराज रायगडास गेले. परंतु मोगलामुळे परत आले. मार्गात आजरी पडले रस्त्यात सिंहगडावर मुक्काम करावा लागला. तेथेच त्यांचा २ मार्च १७०० रोजी मृत्यू झाला."[३४]

[ब] औरंगजेबाच्या हालचाली :

औरंगजेबाच्या हालचालींची चर्चा वा. सी. बेंद्रे देतांना सांगतात की, "औरंगजेब गडकोट घेण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर १६९९ रोजी स्वारीवर निघाला. हे बादशाही सैन्य मिरजला २०

दिवसांनी येऊन पोहोचले. याच सुमारास राजाराम महाराज जालनापुराकडे स्वारीकडे गेले होते. पादशाह कऱ्हाड प्रांतात आला असता त्याला एक मोगली ठाणे मराठ्यांनी उध्वस्त केलेले आढळले. तेथे पुन्हा वसाहत करण्यात आली व नंतर ती फौज वसंतगडाजवळ आली. २५ नोव्हेंबर १६९९ ला मोगलांनी वसंतगड घेतला व गडाचे नाव खिलत-इ-फत असे ठेविले.

डिसेंब १६९९ मध्ये मोगली फौज साताारागडाजवळ आली आणि गडापसून दीड कोसावर सैन्याचा तळ उभारला. दोन्ही बाजुंनी तोफखान्याचे मारे चालू झाले. त्याशिवाय किल्ल्यावरील लोक मोठमोठाले दगड खाली ढकलू लागले. मोगलांनी सुरक्षिततेसाठी गडाखालील कातळात भुयारे खणण्याचे काम चालू केले. नंतर या भुयारात सुरुंग लावण्यात आले. १४ एप्रिल १७०० रोजी हे दोन्ही सुरुंग उडविण्यात आले. पहिल्या चार वारी सुरुंगाने किल्ल्यावरील चारशे लोक मारले गेले. परंतु दुसऱ्या मोठ्या सुरुंगाने भला मोठा भाग उडाला तो सर्व मोगली सैन्यावर पडल्याने तयार ठेवलेले सैन्यही हजारोंच्या संख्येने मारले गेले. त्यातच गडावरील लोकांनी तोफेचा व दगडांचा मारा जोरात चालू केला. यामुळे मोगली सैन्याचे फार मोठे नुकसान झाले. ह्या घटना घडत असतांना ५ मार्च १७०० ला राजाराम महाराज जालनापुराहून परत येताना वाटेत सिंहगडावर वारल्याची बातमी आली. पादशाहाला मोठा आनंद झाला. मराठ्याचे झालेले नुकसान व राजाराम महाराजांच्या मृत्युमुळे परशरामपंताने व सुमानजी भांडवलकर किल्लेदाराने मोगलांशी तहाच्या बोलणीला सुरूवात केली व किल्ला मोगलांच्या हवाली केला. किल्ल्याचे नाव अजमतारा असे ठेवले. २४ एप्रिलला हा किल्ला मोगलांच्या हाती आला.

साताऱ्याच्या वेढाचा असा निकाल लागताच बादशाहाने परळीला वेढा घालण्याच्या तयारीला फतुल्लाहखानाला पाठविले. आणि तीन दिवसानंतर बादशाहाही परळीच्या किल्ल्याजवळ पोहोचला. निरनिराळ्या सरदारांना किल्ल्याभोवती तळ देण्यास लावून वेढ्यास सुरूवात केली. ४ जून १७०० ला शिड्या लावून हल्ला चढविला, आपल्या लोकांना गडासमोरील टेकडीवर नेले व दारूगोळाही पोहोचविला. फतुल्लाहखान तोफा टेकडीवर आणण्यासाठी गडाखाली गेला. इतक्यात मराठ्यांना टेकडीवरील दारूगोळ्याची बातमी लागताच त्यांनी तो पेटवून दिला. पावसाळ्याने मोगली सैन्य हैराण झाले. जनावरे दाणागोटाविना मरू लागली तेव्हा तहाची खटपट चालू झाली. तह बादशाहाने मान्य करून किल्ल्यावरील लोकांस

सुखरूपपणे जाऊ देऊन, किल्ला आपल्या ताब्यात घेतला. परळीगडास 'नौरसतारा' असे नाव दिले. बादशाहाने २१ जून १७०० रोजी सैनयासह माघार घेतली.

बादशाहाचे सैन्य २५ जुलैला भूषणगडाजवळ मोठ्या कष्टाने येऊन पोहोचले. येथे बादशाहाने आपल्या पादशाहाजाद्याला व इतर सरदारांना सैन्यासह निरनिराळ्या शहरात जाऊन विश्रांती घेण्यास पाठविले. त्यांनी त्याप्रमाणे केले त्यामुळे त्यास व त्यांच्या घोड्यास वगैरे भरपूर दाणागोटा मिळाल्याने ते आनंदित झाले. या लोकांच्या ऐवजी पादशाहाने निरनिराळ्या परगण्याकडून सैन्य पाठविल्यास हुकूम काढले. बादशाहा ३० ऑगस्ट १७०० ला खवासपूरी जाऊन राहिला. तेथे गेल्याने मुक्काम असतांना माण नदीला अचानक मोठा पूर आल्याने चारपाच हजार लोक, हत्ती, घोडे वगैरे वाहिले व लष्कराचे फार नुकसान झाले. नंतर १६ डिसेंबर १७०० ला बादशाहाने मिरजेला जाण्यासाठी आपला तळ हलविला व १ जानेवारी १७०१ ला बादशाही सैन्य वगैरे मिरजेला गेले."[३५]

[क] मोगल व मराठा सरदारांच्या हालचाली :

मोगल व मराठा सरदारांच्या हालचालीची माहिती देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, भाऊ कृष्ण याने १५००० स्वारानिशी नर्मदेपलीकडे जाऊन मोगली प्रातांत बरीच धामधूम केली. राजाराम महाराज याचवेळी 'सैन्यानिशी' वऱ्हाडकडे धामधूम करीत होते. त्यांच्या मागे बेदरबख्त व झुल्फिकारखान रवाना झाले होते. ते कळताच राजाराव महाराज स्वराज्यात परतले व वाटेत राजारामाच्या सैन्याने सातारागडानजीक असलेल्या मोगली सैन्याचा दाणागोटा लुटण्याचा प्रयत्न केला. परंतु मोगली सैन्य येत आहे हे पाहताच माघारी आले. नसरत जंग सोलापुराकडे मराठ्यांच्या पाठलागार्थ गेला. तुळजापुरी जाऊन नंतर मराठी राज्यात शिरला. तेथे चकमकी उडाल्या. खान व धनाजी जाधव यांची मोनिलाजवळ मोठी लढाई झाली. परंतु मोठ्या मोगली सैन्यापुढे आपला निभाव लागणार नाही हे पाहून मनुष्यहानी वाचविण्यासाठी राणूजी घोरपडे वऱ्हाडाकडे व धनाजी जाधवराव वाकिनखेड्याकडे निघून गेले. झुल्फिकारखानही ब्रम्हपुरीकडे दंगल उडाल्याची बातमी कळाल्यावरून तिकडे गेला.

१६९६-९७ मध्ये नेमाजी शिंदे व इतर सरदार सैन्यासह नंदुरबारकडे गेले. आणि आसपास बरीच लुटालूट व जाळपोळ केली. तेव्हा धालेरीहून हुसेन अली खान लढा देण्यात आला. थालेरपासून दोन कोसावर लढाई झाली. हुसेन खानाचे बरेच लोक मारले गेले आणि तो

ही फार जखमी झाला. त्याने १ लाख ४० हजार रुपये देऊन सल्ला केला. या धांदलीमुळे मराठा सैन्य सुरतेची लूट करण्यास येणार या बातमीने सुरतकर हैराण झाले.

१६९८ च्या ऑगस्ट महिन्यात वर्धनगडाजवळ लढाई झाली. दोन्ही बाजुंचे बरेच लोक मृत्युमुखी पडले. फेब्रुवारी १७०० मध्ये नांदगज येथे जोराची चकमक उडाली. नांदगज येथील मोगली फौजेकडून तीन हजार घेऊन करार करून मोगली फौज वापस आली.

ऑक्टोबर १६९८ मध्ये ६००० स्वरानिशी जाऊन मराठ्यांनी फोंड्यास वेढा घातला व तो गड मोगलांकडून घेतला. डिसेंबर १६९८ मध्ये रामनगर वगैरे सुरतच्या जवळच्या प्रदेशात मराठ्यांनी लुटालूट चालविली. त्यामुळे सुरतेत जास्तच घबराट उडाली. १६९९ च्या जानेवारीत मुताबरखानाने कर्नाळा किल्ला घेतला.[३६]

६.१० वा. सी. बेंद्रे यांनी राजराम महाराजांची केलेली चिकित्सा

१. वा. सी. बेंद्रे म्हणतात राजाराम महाराजांना राजकारणात शेवटपर्यंत कटू अनुभव भोगावा लागला. रामचंद्रपंतानी सैन्य त्वरित पाठविण्याची काळजी न दाखविल्यामुळे जिंजीचे राज्य गमवावे लागले. स्वराज्यात आल्यावर महाराजांनी स्वारी शिकारीवर अधिक उपयुक्त म्हणून शंकराजी नारायण यांना जवळ केले व रामचंद्रपंताना दूर कारभार करायला पाठविले. त्यांच्या कामात वागण्यातील तेढ ओळखून त्यांना सर्व राज्याची मुजमू दिलीव हणमंतेकडे प्रतिनिधीपद दिले. वडिलकीचा मान मात्र कायम राखला. रामचंद्रपंतास थोरल्या शिवाजी महाराजांनी त्यांची वंशपरंपरेची मुजमू दिली नव्हती. संभाजी महाराजांनी त्यास सचिवपद दिले; परंतु ते ही संभाजी महाराजांनी काढून ते त्यांचे हाताखालील शंकराजी नारायणाकडे सोपविले. संभाजी महाराजांविरूद्धच्या राजद्रोही गटात सामील होऊन शंकराजीकडील सचिवपद रामचंद्रपंतांनी आपलेकडे घेतले. परंतु त्यांच्याकडून कारभार नीट होत नाही हे पाहून राजाराम महाराजांनी ते वर्षभरातच परत शंकराजीपंताकडे दिले.

पन्हाळ्यावरून राजाराम महाराजांच्या गैरहजेरीत राज्याचा कारभार पाहण्याची परवानगी होती. परंतु राजाराम महाराज स्वराज्यात परत आल्याने ती त्यांच्याकडे राहिली नाही. उलट त्यांना एका बाजूला रत्नागिरीकडे पाठविण्यात आले. रामचंद्रपंतांच्या

कारभारावर शिवाजी, संभाजी व राजाराम हे तीघेही खुष नव्हते. कारण त्याच्याकडून राज्यकारभार व्हावा तसा होत नव्हता.

२. प्रल्हाद निराजीही युद्धकारभारात तितकासा जाणकार ठरला नाही. उलट लाच घेऊन युरोपियनांना ज्या सवलती शिवाजी-संभाजी राजांनी नाकारल्या होत्या त्यापेक्षाही अधिक हानिकारक सवलती दिल्या. सेनापतींना न पटणाऱ्या व त्यांच्या कार्यात बाधा आणणाऱ्या अटी शत्रूस मान्य करून दिल्या. त्यामुळे मराठा सरदारांचा त्यांच्यावर फारच रोष झाला होता. राजारामांनी सरदारांची समजूत घातली व त्यांना कामाला लावले पण प्रल्हाद निराजी महाराष्ट्रात आल्यावर सरदार सुभेदरांनी त्यांच्यावर आरोप केले. तेव्हा प्रल्हाद निराजींनी पंढरपूरला जाऊन तेथे आत्महत्या करून घेतली.

३. राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी राजाराम महाराजांवर येऊन पडली आणि त्यांनी युद्धविषयक हालचाली फार जोरात चालू केल्या. परशरामपंत व धनाजी जाधव यांनी महाराजांच्या आज्ञेवरून पुष्कळ धामधूम केली व लढायाही केल्या. धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांचा एकमेकांवरील राग हातघाईवर येऊन धनाजी परदेशी पळून आला व संताजीचा नंतर खून झाला; परंतु हा वाद संताजीचा मुलगा राणोजी व भाऊ बहिरजी यांनी पुढे चालविला. दोन्ही सेनापतींची एकमेकांना मदत होत नव्हती. इतकेच नव्हे तर ते एकमेकांपासून दूर वावरत होते. धनाजीला मिळणारा रामचंद्रपंतांचा आधार गेल्याने; धनाजीने राणोजीशी एकोपा करण्याचे प्रयत्न केले व ते थोडे बहुत यशस्वीही झाले होते. त्यामुळे राज्यातील अधिकारी-अधिकारी यांच्यात वाढणारा द्वेष राजाराम महाराज देशी आल्यावर व राज्यसुत्रे रामचंद्रपंतापासून आपले हाती घेतल्यावर बराच कमी झाला. त्यामुळे मोगलांशी तोंड देण्यात यश प्राप्त होऊ लागले.

४. महाराष्ट्रात मोगलांचा हस्तक्षेप वाढल्याने इंग्रज व मराठे संघर्ष होण्याची वेळी आली नाही. पोर्तुगीजांना मात्र या आणीबाणीच्या काळात कसे वागावे हे कळत नव्हते. त्यांना मोगलांपेक्षा मराठ्यांशी संबंध फायद्याचे वाटत होते; परंतु मराठ्यांना मोगलांविरूद्ध उघड उघड मदत देण्याची हिंमत होत नव्हती. अटल मोगलांनी मदत मागितल्यास ती देण्याची ते तयारी ठेवीत होते व आपण मराठ्यांच्या विरूद्ध आहोत असे दाखवीत होते. तोफचीही पाठवीत; परंतु हे करिताना ते मोगलानंतर मराठ्यांशीच संबंध येणार म्हणून

आतून गुप्तपणे मराठ्यांशी मैत्रीचा भाव दर्शवीत असत. तसे त्यांना करणे भागच पडत असे त्यामुळे पोर्तुगीज मराठे संघर्ष झाला नाही.[३७]

५.११ राजाराम महाराजांचे स्मारक

राजाराम महाराजांच्या स्मारकाविषयी सांगतांना वा. सी. बेंद्रे लिहितात की, "राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर त्यांच्या अस्थीवर वृंदावन उभारण्यात आले व त्यांची पुण्यतिथी पूजाअर्चा वगैरेची व्यवस्थाही लावण्यात आली. या वृंदावनाजवळ शिवाजी महाराज ज्या जागरूक बाणाची पूजा करीत असत तो बाण ठेवण्यात आला. हा बाण जागरूक होता व पुढेही तो तसाच द्रवत होता. हा खास शिवाजी महाराजांच्या पूजेतील बाण वृंदावनाजवळ ठेवण्यापेक्षा जवळच एखादे निराळे मंदिर उभे करून ठेवला जाणे योग्य झाले असते. परंतु शिवाजी-संभाजी राजांबद्दलच्या रामचंद्रपंतांच्या मनात रुजलेला द्रोह लक्षात घेता शिवाजी महाराजांच्या महत्त्वाच्या स्मारकाकडे पाहण्याचा विचार त्यांच्या मनात येणे साहजिकच शक्य नव्हते."[३८]

सारांश सांगतांना वा. सी. बेंद्रे लिहितात की, शत्रुंच्या हालचाली कर्तृत्ववान राजा शत्रुला कसा डावलतो हे संभाजीच्या कारकिर्दीत दिसून आले. तर राजारामाने कारकिर्दीत सरकारी संघटना हतबल निष्क्रिय होताच, स्वातंत्र्याने जागृत झालेली जनता लोकराज्याच्याच ध्येयासाठी शत्रूला कसे नामोहरम करू शकते हे दिसून येते. राजसंपन्न झाल्यावर राज्यकर्ते नोकर लाचखोर व निष्क्रिय ठरल्याने आपले पाप ओळखताच मानहानी सहन न झाल्याने आत्महत्येकडे कसे प्रवृत्त होतात ते प्रल्हादपंतांच्या व नंतर शंकराजी नारायणांच्या उदाहरणांवरून कळून येते. सरकारी नोकरांची केलेल मानहानी राज्याच्या कमकुवतपणाला कशी कारण होते याचीही साक्ष या काळात मिळते. जनता सुदृढ राहिली तर राजाला राज्य सांभाळता येते हे अवघ्या सहा महिन्यात गेलेले राज्य त्या राज्यातील लोकसेनेने पुन्हा कसे घेऊन दाखविले यावरूनही पहावयास मिळते.

६.१२ राजा शाहुच्या आगमनापूर्वीच्या महाराष्ट्रातील हालचाली

वा. सी. बेंद्रे सांगतात की, "राजाराम महाराज जिंजीकडे गेल्यानंतर अष्टप्रधनामध्ये फाटाफूट झाली. प्रतिनिधी मोरोपंत पेशव्यासारखी राज्यकारभाराची धुरा चालविण्याइतके लायक व एकनिष्ठ सरदार नसल्याने कारभार 'राज्यमंडळा'तर्फे करण्याची प्रथा पडली. राजारामाच्या अनुपस्थितीत दोन राजमंडळे काम करीत होती. एक जिंजीस व दुसरे पन्हाळगडावर जे प्रधान

जिंजीच्या 'राजमंडळा'वर हजर नसत त्यांच्याऐवजी त्यांचे कारभारी प्रतिनिधित्व करीत व महाराष्ट्रातील राज्यमंडळावर 'जिंजी येथील प्रधानांच्या सुभ्यावरील अमंलदार 'सभासद' म्हणून हजर राहून काम पूर्ण करीत. राजाराम महाराज परत आल्यावरही हा राजमंडळाचा कारभार चालू राहिला. तो पुढे शाहूच्या कारकिर्दीतही चालू होता."[३९]

राजारामांच्या मृत्युनंतर शिवाजीचे १० मार्च १७०० मध्ये म्हणजे वर्षप्रतिपदेच्या मुहुर्तावर परंतु पित्याच्या अशौच्याच्या नववे दिवशी छत्रपती राजे म्हणून घोषित केले गेले. यावेळी त्यांचे वय अवघे तीन साडेतीन वर्षाचे होते. त्यांच्या नावाने म्हणजे श्री राजा शिवछत्रपती म्हणून १९ एप्रिल १७०० चे सरकारी पत्र आलेले आहे. त्यापूर्वीपासून पत्रव्यवहार धाकट्या शिवाजीच्या नावाने झाला असावा असे वा. सी. बेंद्रे म्हणतात. कारण शिवाजीच्या नावाची राजपत्रे २४ ऑगस्ट १७११ पर्यंतची उपलब्ध झाली आहेत. त्यावरून शिवाजीने इ.स. १७१२ पर्यंत राज्य भोगले असे दिसते. नंतर त्याचा सावत्र भाऊ संभाजी राज्यकारभार पाहू लागला. इ.स. १७१४ मध्ये शिवाजीराजे मृत्यु पावले असावेत. त्यांना तीन मुली व एक मुलगा झाला.[४०]

शिवाजी राजाचे वय यावेळेला तीन साडेतीन वर्षाचेच असल्याने हा ताराबाईचा धाकटा शिवाजी फक्त नाममात्र राजा झाला. राज्यकारभार त्याची मातोश्री ताराबाईसाहेब व मंत्री यांच्याकडे गेला. रामचंद्रपंत अमात्य सर्वात वडील म्हणून त्यांना बहुमान देऊन त्यांच्या संमतीने कारभार चालावा अशी व्यवस्था अंमलात आणली.

[अ] औरंगजेबाच्या हालचाली :

औरंगजेब ९ मार्च १७०१ ला पन्हाळ्याला आपल्या सैन्यासह आला. मोठ्या तोफांच्या माऱ्याने गड घेतला. कामबक्षच्या तर्फे बोलणी होऊन १८ मे १७०१ ला तो कामबक्षच्या हातात देण्यात आला. कामबक्षने तो बादशाहाच्या २५ मे १७०१ ताब्यात दिला. द्रव्य ५५ हजार कामबक्षाने देऊन किल्ला घेतल्याचे शकावली सांगते. पावगडाला मोगली सरदारांनी ३ फेब्रुवारी १७०१ ला वेढा दिला होता तो ही बादशाहाच्या ताब्यात गेला.

औरंगजेब २९ मे १७०१ ला पन्हाळ्याहून खटावकडे छावणी करण्यास निघाला. वाटेत वर्धनगड, नांदगीर व चंदन वंदन हे गड घेण्यासाठी फौज रवाना केली. ६ जून १७०१ ला वर्धनगडावरील लोकांनी गड खाली करून पादशाहाची छावणी २३ जून १७०१ ला निघून नांदगीरजवळ आली. नांदगीरच्या किल्लेदाराने तो गड हवाली केल्यानंतर बादशाहाचा मुक्काम

चंदन वंदनजवळ गेला. ६ ऑक्टोबर १७०१ ला ह्या ही गडवाल्यांनी गड खाली करून मोगली सैन्यास घेऊ दिला.

औरंगजेब ७ नोव्हेंबर १७०१ ला सादिकगडाजवळून नंतर मुलकापुरला जाऊन नंतर ६ डिसेंबर १७०१ ला खेळणा गडाजवळ येऊन पोहोचला. ११ जानेवारी १७०२ ला चरभुयारांच्या व्यवस्थेची पाहणी करून आपली छावणी १६ जानेवारी १७०२ ला किल्ल्यासमोर अर्धा कोसावर आणली. खेळणा २७ एप्रिल १७०२ रोजी घेतला. मात्र हा गड परशरामपंताला दोन लाख रूपये देऊन घेतला. बादशाहाने कोंडाणागड घेण्यासाठी आपल्या फौजेची रवानगी पावसाळा संपताच ३ डिसेंबर १७०२ ला केली.

बादशाही छावणी २७ डिसेंबर १७०२ रोजी कोंडाणा उर्फ सिंहगड यांच्या पायथ्याशी आला. तेथे अनेक हाल सोसावे लागले. कोंडाणा तह करून १४ एप्रिल १७०३ रोजी घेतला. पन्नास हजार रुफर दिले. नंतर १ मे १७०३ ला पुणे येथे छावणी केली.

जरी अन्नधान्याची टंचाई होती तरी बादशाहाने राजगड आणि तोरणा हे दोन गड घेण्यासाठी १० नोव्हेंबर १७०३ रोजी पुण्यावरून कूच केली. १८ फेब्रुवारी १७०४ ला बादशाहाने करार करून राजगड घेतला व नंतर मार्च महिन्यात तोरणाही बादशाहाच्या हाती आला. येथून निघून एप्रिल १७०४ बादशाहाने खेडकडूस व नंतर १४ नोव्हेंबर १७०४ रोजी कूच करून पेडगावरून जाऊन बागिनखेरियास वेढा घातला. १ मे १७०५ रोजी बागिनेखेरे घेतले. नंतर मे च्या दुसऱ्या पंधरवाड्यात पातशाहाने येऊन कृष्णातीरी छावणी केली. नंतर ६ डिसेंबरला पेडगावला रमजान साजरा केला. येथून निघून ७ फेब्रुवारी १७०६ ला अहमदनगरला येऊन मुक्काम केला. नंतर २१ फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला.[४१]

[ब] मोगल व मराठा सरदारांच्या हालचाली :

सैन्याची मन:स्थिती - यावेळेला मोगली सैन्यात बराच तुटवडा पडला होता आणि पैशाच्या अभावामुळे मोगली सरदार अपेक्षेपेक्षा फारच कमी सैन्यभरती करीत. झुल्फिकारखानाचे सैन्य सर्वत्र मदतीसाठी पाठविले जाई. मराठी सैन्यात महसुलाची कमतरता झाल्याने राज्याच्या खर्चासाठी लुटीच्या साधनांवरच अवलंबून राहावे लागे. त्यामुळे मराठ्यांच्या हालचाली लुटालुटीसाठी होत. मोगली सैन्याचा नाश करण्यासाठी नसत. मराठे आपली मनुष्यहानी व वित्तहानी होऊ नये म्हणून सुरक्षितपणे दुसरीकडे निघून जात. स्थानिक जनतेचा

पाठिंबा असल्याने मराठा सैनिकांना अन्नटंचाई तेवढी भासत नसे. उलट मोगली सैनिकांना आपले अन्नधान्याचे साठे बरोबर न्यावे लागल्याने मराठे ती लुटून घेत आणि मोगली सैन्याच्या हालचालींना पायबंद घालीत. सारांश पुष्कळ वर्षे दूर अडचणीत काढावी लागल्याने त्यांची काम करण्याचा उत्साह खच्ची झाला होता. याउलट मराठा सैन्याला यशाची खात्री वाटत गेल्याने व लुटीचा फायदा मिळत गेल्याने त्यांची लढण्याचा उत्साह वाढत होता.

धनाजी जाधवच्या पारिपत्यार्थ झुल्फिकारखानाला पाठविले होते. तो इ.स. १७०१ च्या सुरूवातीला परत आला व त्याच्याबरोबर गेलेल्या दाऊदखान, दलपतराय, रामसिंग व इतर यांना बादशाहनी खवासपूरच्या छावणीत बक्षिसे देऊन गौरव केला.

फत्ताउल्लहखानाला वर्धनगड घ्यावयास पाठविला. त्याने तो ६ जून १७०१ ला घेतला. या गडाजवळ बादशाहाने येऊन आपली छावणी केली. नंतर बहरामंदखानाला नांदगीरचा किल्ला घेण्यास पाठविला. किल्लेदाराने जुलैच्या सुरूवातीला खाली करून दिला. चंदनवंदनही तसेच ऑक्टोबर १७०१ रोजी मोगली सैन्याच्या हाती आला.

राणोजी घोरपडेने कुलबर्ग्याच्या आसपास धुमाकूळ चालविला होता. गाझी उद्दीनखानास राणोजीवर बादशाहाने पाठविले. धनाजी जाधवाने ब्रम्हपरीकडे व इतर मराठे सरदारांनी खानदेश व माळवा या भागात लुटालूटीला प्रारंभ केला. झुल्फिकारखानावर धनाजीवर पाठविले. तो तिकडे गेल्यावर धनाजी तिकडून निघून गेला. झुल्फिकारखाने रस्त्यात परेंडाच्या असापास मराठ्यांना त्रास दिला. मराठ्यांनी वऱ्हाड प्रांतात धुमाकूळ मांडला. मराठ्यांना खानदेश व वऱ्हाड येथील जमीनदार मिळाले. झुल्फिकारखान तिकडील बंदोबस्तास गेले; परंतु खानाचे सैन्य थोडे असल्याने त्याने एलिचपुराहून अलि मर्दान खानाची मदत मिळविली. मराठे त्यामुळे तिकडून निघून गेले.

इ.स. १७०१ सुरूवातीला सिद्दी व मराठे यांच्यात लढा चालू झाला. कुलाब्याला सिद्दीने वेढा दिला. त्याने त्याचे बरेच नुकसान केले. तेव्हा सिद्दीला वापस जावे लागले. यावेळी सिद्दीचे ४०० लोक मारले गेले व बरेच जखमी झाले. हा लढा एप्रिलपर्यंत चालू होता.

इ.स. १७०२ च्या सुरूवातीपासून मराठ्यांनी औरंगाबाद ते दमणपर्यंतच्या भागात लुटालूट चालविली होती. कारवारमध्येही पावसाळ्यात लुटमार दोन तीन महिने चालू होती.

फोंड्याचा किल्ला ऑक्टोबर १७०२ मध्ये मराठ्यांनी घेतला. नंतरही कारवारच्या नायकाच्या भागात लुटालूटीचे प्रकार चालूच होते.

इ.स. १७०३ मध्ये सुरूवातीपासून नंदुरबार ते सुरत भागात मराठ्यांनी लुटालूटीचे सारखे छापे घातले. त्यामुळे सुरतेतील लोकांची बरीच गडबड उडून धावपळ झाली.

इ.स. १७०४ च्या सुरूवातीला दिदरखानाचा पराभव करून मराठ्यांनी त्याचे तीन चार हजार लोक मारले व बऱ्हाणपुरचा नाश केला. आणखी त्याजजवळील गांवाचा फडशा पाडला. १७०४ च्या शेवटी मराठ्यांनी लोहगड परत घेतला.

इ.स. १७०५ च्या सुरूवातीला नेमा सिद्दीने जहानाबादला वेढा घातला. फौजदारास कैद करून गाव भस्मसात करून टाकले. मार्च १७०५ मध्ये सिंहगड हस्तगत केला व देवसिंगाचा पराभवही केला. मे १७०५ मध्ये गुणाजी सावंताने राजमाचीचा किल्ला हस्तगत केला.

इ.स. १७०६ च्या सुरूवातीला केशव नायक व सोमाजी नायक सरदेसाई यांनी विशाळगड तांब्राकडून हस्तगत करून घेतला.

इ.स. १७०७ च्या सुरूवातीस गुणाजी सावंत यानी राजगड हस्तगत करण्यात पंताजी शिवदेव यांना फार मदत केली.[४२]

औरंगजेबाने दक्षिणेत येऊन पंचवीस वर्षात जर काही श्रेय मिळविले असेल; तर ते दक्षिणेतील टिकाव धरून राहिलेल्या दोन इस्लामी शाह्या बुडविल्या. धर्मासाठी चालविलेल्या सर्व हालचाली त्याला सोडून घ्याव्या लागल्या.

६.१३ शाहू राजांचे आगमन व राज्यसंपादन

औरंगजेब बादशाहाचा २० फेब्रुवारी १७०७ रोजी मृत्यू झाला. त्यानंतर आजमशाहा २ मार्च १७०७ रोजी सिंहासनारूढ झाले; परंतु दिल्ली किंवा आग्रा येथील तख्तावर आरूढ झाल्याशिवाय संपूर्ण हिंदुस्थानचा बादशाहा म्हणून मान्यता मिळणार नाही म्हणून त्याने दिल्ली गाठण्यासाठी ६ एप्रिल १७०७ ला प्रयाण केले. सोबत औरंगाबादेत जनानखान्यात व कैदेत असलेली सर्व मंडळी घेतली. नंतर शहा अलम व आजमशाहा यांच्या लढाई घडून आली व शेवटी १० मे १७०७ ला शहा अलम पादशाही तख्तावर बसला.

शहाजादे अझम यांनी दिल्लीकडे जाण्यासाठी कूच केले तेव्हा त्यांच्याबरोबर शाहूराजे व त्यांची मंडळीही होती. वाटेत नर्मदा नदी ओलांडताच शहा अझमने आपण दक्षिणेतून गेल्यावर

दोन्हीकडे वेढे पडल्यास दक्षिणेच्या बंदोबस्तासाठी झुल्फिकारखानाच्या सल्ल्याने व शाहूकडून वचन घेऊन त्याला पेशजी प्रमाणे राज्य, कदीम चौथाई व सरदेशमुखी वगैरेच्या सनदा देऊन पाठविले. शाहू महाराज सर्व कबूल करून निघाले. यासाठी राणी ताराबाईनीही बालणे लावले होते पण बादशाहाने व झुल्फिकारखानाने शाहूलाच हे अधिकार दिले.

शाहू महाराजांनी येतांना वाटेत लोकांची सहानुभूती मिळविली. शाहू महाराज मे महिन्याच्या शेवटी लंबकर्णीवरून पुढे आले. जूनच्या सुरूवातीला नंदुरबारवरून निघाले. जुलैच्या सुरूवातीला खानदेशातील उतराण प्रांतात मुक्काम केला. खानदेशातील प्रवासात त्यांना परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर सेनेसह येऊन मिळाले व इतरही सरदार येऊन मिळाले. खानदेशातून निघून आले तेव्हा शाहू महाराजांनी ताराबाई, शिवाजी, प्रधान, अमात्य वगैरेंना पत्रे पाठविली व कैदेतून सुटून आल्याची बातमी दिली; परंतु ताराबाईंनी आपले राज्य आपणच चालावो असा हट्ट धरून शाहू महाराजांविरूद्ध प्रचार करण्यास सुरूवात केली. तेव्हा आईसाहेबानी दुर्बुद्धी धरली, आपल्याशी लढाई करणार असे जाणून शाहू महाराज शिवनेर प्रांतात आले. नंतर खेडकडू जवळ आले. ताराबाईने शाहू राजांना तोंड देण्यासाठी परशुराम प्रतिनिधी व जाधवराव सेनापतींना चाळीस हजार सैन्यानिशी पाठविले. त्यांच्यात लढाई झाली. त्यामध्ये प्रतिनिधींचा पराभव झाला. शाहूंनी राहिलेल्या सैन्यानिशी साताऱ्याला जाऊन किल्ला ताब्यात घेतला. धनाजी जाधवांनीही शाहू महाराज तोतया नसून खरे आहेत हे कळाल्यावर त्यांची बाजू घेतली. शाहूंनी धनाजी जाधवांना सेनापती व खंडो बल्लाळ यांना चिटणीस पदे दिली. यानंतर शाहू महाराज पुणे येथे मुक्कामास गेले. चंदनवंदन किल्ले घेतले. मराठा राज्यातील सरदार अधिकारी शाहू राजांकडे आल्याने मराठा राज्याचा फार मोठा भाग त्यांच्या कब्ज्यात आला. जेजुरीला देवदर्शन करून चंदनवंदनजवळ येऊन मुक्काम केला व साताऱ्याला पत्रे व प्रतिनिधीस पत्रे पाठविली.

सातारा शाहुंच्या ताब्यात :

साताऱ्यातील प्रतिनिधीनीं शेख मिरा वगैरेंच्या मदतीने लढा देण्याची तयारी केली. बरेच दिवस शाहू राजांनी लढा न देताच किल्ला देण्यास सांगितले; परंतु परशुरामपंताने लढ्याचाच हट्ट धरला. तेव्हा शाहू महाराजांनी वाईला जाऊन शेख मिराचे कबिले धरून आणले व सातारगडावर हल्ला चढवितो म्हणून निरोप पाठविला. त्यामुळे शेख मिरा व इतरांनी परशुरामपंतास किल्ला

महाराजांच्या ताब्यात देण्याची विनंती केली; परंतु ती त्यांनी नाकारताच शेख मिराने त्यास कैद केले व किल्ला सातारगड महाराजांच्या ताब्यात दिला.

ताराबाईंनी केलेला शाहू महाराजांविरूद्ध प्रचार व वैर यांची अधिकारी व जनता यांनी यत्किंचितही तमा न बाळगता शाहू राजांना जाऊन मिळाले. संभाजी महाराजांबद्दल जी या प्रचारात मानहानीपर व निंदात्मक माहिती दिली गेली ती अवास्तव असल्याने नोकर चाकर शाहू महाराजाना जाऊन मिळाले. इतकेच नव्हे तर शेवटी खास ताराबाईंनी आपल्या सावत्र पुत्रावर किंवा राजसबाईजवळ राहण्यास नकार देऊन शाहू महाराजांकडेच जाऊन राहिल्या. राजाराम महाराजांच्या राज्याचा वारसा खास शाहू महाराजांनी पाळला होता, असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.[४३]

इतिहासकार वा. सी. बेंद्रे सारांश सांगताना स्पष्ट करतात की, ताराबाईंनी शत्रुत्व दाखविले आणि शाहू महाराजांनी मुद्दाम भेट घेऊन आपण खरे शाहू महाराज असल्याचे सिद्ध केले; परंतु ताराबाईंच्या मनातील राजकारणातील बहुमानाची आकांक्षा जाणून शाहू महाराजांनी १६ जानेवारी १७०८ ला तह लिहून दिला. त्या तहाप्रमाणे ताराबाई व मुलगा शिवाजी यांना आपल्या राज्याचा एक भाग दिला म्हणून अवमानित होऊन राहण्याची वेळ ताराबाईंवर आली नाही. परंतु शिवाजीला वेड लागल्याने इ.स. १७१२ मध्ये संभाजी राजाने हा कारभार आपल्या हाती घेतला. मात्र हिंदवी स्वराज्याचे दोन तुकडे पडल्याने राज्यात दुहीचे बीज पेरले गेले. पुढे संभाजीने ऊदाजी चव्हाणाकडून शाहूच्या भागात धामधूम करण्यास सुरूवात केली; परंतु शाहूने ती मोडून काढली. नंतर शाहू महाराजांनी ३० डिसेंबर १७२५ च्या तहाने राज्याचा भाग संभाजीला दिला.

संदर्भग्रंथ सूची

१. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, १ नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. १२

२. कित्ता, पृ. क्र. १३

३. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ७४१, ७४२

४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, १ नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. १६०

५. कित्ता, पृ. क्र. २६, २७

६. कित्ता, पृ. क्र. २९ ते ३२

७. कित्ता, पृ. क्र. ५०

८. कित्ता, पृ. क्र. ५२

९. कित्ता, पृ. क्र. ६२, ६३

१०. बेंद्रे वा. सी., 'राजारामचरितम् अथवा जिंजीचा प्रवास', भारत इतिहास संशोधन मंडळ स्वीय ग्रंथमाला, पुणे १९३१, पृ. क्र. १४ त २३

११. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, १ नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. ६७, ६८

१२. कित्ता, पृ. क्र. ७०, ७१

१३. बेंद्रे वा. सी., 'महाराष्टेतिहासाची साधने, भाग - २', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पृ. क्र. २०५ ते २५४

१४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, पृ. क्र. १४९, १५०

१५. कित्ता, पृ. क्र. १४९, १५०

१६. कित्ता, पृ. क्र. १५१

१७. कित्ता, पृ. क्र. १५२

१८. बेंद्रे वा. सी., 'विजापुरची आदिलशाही', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९६८, पृ. क्र. ६२४, ६२५

१९. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, पृ. क्र. १५२, १५३

२०. कित्ता, पृ. क्र. १५३, १५४

२१. कित्ता, पृ. क्र. १५४

२२. कित्ता, पृ. क्र. ८१, ८२

२३. कित्ता, पृ. क्र. १४०, १४१

२४. कित्ता, पृ. क्र. १५५, १५६

२५. कित्ता, पृ. क्र. २१८ ते २२०

२६. कित्ता, पृ. क्र. २२१, २२२

२७. कित्ता, पृ. क्र. २२३

२८. कित्ता, पृ. क्र. २३१ ते २५९

२९. बेंद्रे वा. सी., 'महाराष्टेतिहासाची साधने, भाग - २', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पृ. क्र. २०५ ते २५४

३०. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, पृ. क्र. १२

३१. कित्ता, पृ. क्र. २६५, २६६

३२. कित्ता, पृ. क्र. २६७, २६८

३३. कित्ता, पृ. क्र. २६९, २७०

३४. कित्ता, पृ. क्र. ३१६

३५. कित्ता, पृ. क्र. ३१७, ३१८

३६. कित्ता, पृ. क्र. ३१८

३७. कित्ता, पृ. क्र. ३१८ ते ३२०

३८. कित्ता, पृ. क्र. ३२०

३९. बेंद्रे वा. सी., 'महाराष्टेतिहासाची संशोधनक्षेत्रे व साधनसंपत्ती', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पहिली आवृत्ती, १ नोव्हेंबर १९६६, पृ. क्र. ५०

४०. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, पहिली आवृत्ती, १ नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. ४११

४१. कित्ता, पृ. क्र. ४१२, ४१३

४२. कित्ता, पृ. क्र. ४१४, ४१५

४३. कित्ता, पृ. क्र. ४७९ ते ४८२

प्रकरण सातवे

उपसंहार

प्रस्तावना :

भारत देशाला विस्तीर्ण आणि रोमहर्षक इतिहास लाभलेला आहे. हा विस्तीर्ण आणि रोमहर्ष इतिहास घडविण्यात भारतातील वेगवेगळ्या प्रांतानी फार मोलाची भूमिका बजावलेली आहे. या विविध प्रांतामध्ये महाराष्ट्र राज्याचे स्थान हे अनन्यसाधारण आहे. विशेषतः मध्ययुगीन कालखंडात संपूर्ण भारत देश इस्लामी राजवटीत असतांना इस्लामी राजवटीतील अत्याचाराविरूद्ध व राजवटी विरूद्ध महाराष्ट्राला व पर्यायी देशाला वाचविण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याने यशस्वीपणे केलेला दिसतो. अशा या मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा सर्वप्रथम प्रयत्न युरोपियनांनी केलेला दिसतो. कारण मुळातच इतिहास लिहिण्यात भारतीयांना रूची नव्हती; परंतु कालांतराने पाश्चात्य शिक्षणामुळे समर्थ बनलेल्या साने, किर्तने, पारसनीस, वासुदेवशास्त्री खरे, राजवाडे, टिळक, रानडे या संशोधक वर्गाने मराठ्याचा इतिहास लिहिण्यास सुरूवात केली. वास्तवादी दृष्टिकोणातून मराठ्यांच्या इतिहास लिहिण्यास जदुनाथ सरकार, एस. पी. सेन, गो. स. सरदेसाई, ग. ह. खरे, दत्तो वामन पोतदार, शेजवलकर, न. र. फाटक, वा. सी. बेंद्रे या इतिहासकारांनी सुरूवात केली. या इतिहासकारांमध्ये इतिहासकार, संशोधक वा. सी. बेंद्रे यांचे स्थान अनन्यसाधरण आहे.

इतिहासकार वासुदेव सीताराम बेंद्रे यांचा जन्म दि. १३ फेब्रुवारी १८९४ रोजी रायगड जिल्ह्यातील पेण येथे एका सर्वसाधारण कुटुंबामध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पेण येथे तर चौथी ते दहावीपर्यंतचे शिक्षण मुंबईतील विल्सन हायस्कूलमध्ये झाले, पण घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडून नोकरी पत्करावी लागली. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी नोकरी करण्यास सुरूवात केली. त्याचवेळी शीघ्र ध्वनीलेखन पद्धती व लघुलेखन पद्धती ते शिकले. १९१३ मध्ये म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी शीघ्रध्वनीलेख स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले. त्यामुळे त्यांना नोकऱ्या सहज मिळत गेल्या. १९१८ मध्ये ब्रेंद्रे भारत इतिहास संशोधन मंडळात काम करू लागले. महाराष्ट्राचा १७ व्या शतकाचा इतिहास हे संशोधनाचे क्षेत्र बेंद्रे यांनी

निवडले. एक साधन संग्राहक, साधन संपादक, साधन चिकित्सक, संशोधक व इतिहासकार या विविध भूमिका त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. सन १९२८ मध्ये शिवशाहीच्या इतिहासाचा प्रास्ताविक खंड "साधन चिकित्सा" हा त्यांचा पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ प्रसिद्ध करून विशेषतः नवीन अभ्यासक आणि संशोधक ह्यांना त्यांनी बहुमोलाचे मार्गदर्शन केले. त्याच्या लिखाणाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी मालोजी-शहाजी राजांपासून राजाराम महाराजांपर्यंतचा मराठ्यांचा इतिहास लिहिला. त्यामध्ये त्यांनी मालोजी राजे व शाहाजी महाराज यांचे चरित्र, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज यांची चरित्रे तसेच विजापुरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, महाराष्ट्रेतिहासाची साधने, मुस्लीम, युरोपीय साधनांची चिकित्सा इत्यादी त्यांच्या लिखाणात विविधता आढळते.

वा. सी. बेंद्रे यांनी १९३४ मध्ये 'सतराव्या शतकातील गोवळकोंड्याची कुतुबशाही' हा दुसरा ग्रंथ त्यांनी इंग्रजीत लिहिला. १९३८ मध्ये मुंबईचे माजी गव्हर्नर लॉर्ड ब्रेबॉन यांच्या इच्छेवरून श्री खेर यांनी खास शिष्यवृत्ती देऊन बेंद्रेंना सरकारी "हिस्टॉरिकल रिसर्च स्कॉलर" म्हणून इतिहास संशोधनासाठी युरोप व इंग्लंडला पाठविले. दोन वर्षात इंडिया हाऊस व ब्रिटिश म्युझियममधून ऐतिहासिक साधनांचे २५ खंड होतील एव्हढी कागदपत्रे आणली. त्याचबरोबर लंडनमधून त्यांनी शिवाजी महाराजांचे खरे चित्र प्राप्त गेले. तोपर्यंत इब्राहीम खान नावाच्या एका परकीय व्यक्तीचे चित्र "शिवाजी महाराजांचे" चित्र म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासविषयक पुस्तकातून छापले जात होते. बेंद्रे यांचा ऐतिहासिक कागदपत्राचा गाढा अभ्यास पाहून सरकारने त्यांना १९४८ मध्ये पेशवे दप्तरात संशोधन अधिकारी म्हणून नेमले असता त्यांनी पेशवे दप्तरातील विस्कळीत ४ कोटी ऐतिहासिक कागदपत्रांचे कॅटलॉगिंग करून त्याची विषयवार विभागणी केली. इ.स. १९५२ मध्ये तंजावरच्या दप्तरखान्याचीही तपासणी करून तेथील कागदपत्रे व्यवस्थित लावली. त्यानंतर त्यांनी इ.स. १९६० मध्ये 'संभाजी' महाराजांचे खरे चरित्र सर्वांसमोर प्रसिद्ध केले. इ.स. १९६३ मध्ये ते मुंबई-मराठी ग्रंथ संग्रहालयाचे डायरेक्टर झाले. इतिहास संशोधन मंडळातर्फे त्यांनी एप्रिल १९६४ पासून "भारतीय इतिहास आणि संस्कृती" या नावाचे त्रैमासिक सुरू केले. हे इतिहास संशोधन लेखनास वाहिलेले महाष्ट्रातील एकमेव त्रैमासिक आजही चालू आहे.[२]

१९७२ साली त्यांनी 'शिवचरित्र' व १९७५ साली त्यांनी 'राजाराम महाराजांचे चरित्र' लिहिले. इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांना १९७८ साली मुंबईमध्ये वयाच्या ८४ व्या वर्षी "Maharashtra Literary Award" श्री सादिक अलींच्या हस्ते देण्यात आला. आतापर्यंत वा. सी. बेंद्रे यांची एकूण ६० पुस्तके छापून झालेली आहे. अशा इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांचे निधन १६ जुलै १९८६ साली मुंबईत चेंबूर येथे झाले.[३]

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांसंदर्भात भरपूर लिखाण केले. तसेच विविध महत्त्वाच्या कागदपत्रांचा शोध घेऊन जमा केली. ज्यामुळे मराठ्यांचा इतिहास लिहिला गेला. इतिहासलेखनासंदर्भातील वा. सी. बेंद्रे यांची भूमिका सांगायची झाली तर ते सांगतात की, खरा इतिहास लिहायचा असेल तर देशी व विदेशी दोन्ही प्रकारच्या संपूर्ण साधनांचा एकत्रित विचार करावा लागेल. फक्त देशी साधनांद्वारे किंवा फक्त विदेशी साधनांद्वारे लिहिला गेलेला इतिहास हा खरा किंवा परिपूर्ण इतिहास नसतो. महाराष्ट्राच्या शास्त्रशुद्ध व वास्तवबोधी इतिहास रचनेसाठी इतिहास लेखन कलेची कोणतीही जुनी परंपरा स्वीकारून चालणार नाही तर नवीन परंपरा व पद्धती स्वीकारावयास हवी ही जाणीव बेंद्रे यांना होती. यासाठी प्रथम साधने जुळविणे 'साधन-निष्पत्ती' करणे आवश्यक आहे, हे त्यांनी सांगितले. साधन-निष्पत्ती नंतर उपलब्ध झालेल्या पुराव्यांचे चिकित्सक पद्धतीने परीक्षण करून इतिहास लिहिण्याची पद्धती त्यांनी सुरू केली. जुन्या कागदपत्रांचे परीक्षण करून कोणती खरी, खोटी आहेत. याकडे त्यांनी विशेष महत्त्व दिले. यातूनच "शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रस्ताविक खंड) साधन चिकित्सा" नावाचा ग्रंथ तयार झाला.

१९ व्या व २० व्या शतकात उपलब्ध होणाऱ्या सांधनांविषयी, संग्रहाकाविषयी, इतिहास लेखकांविषयी बेंद्रेंचे मत होते की, या काळात प्रकाशित होत असलेल्या साधनांमध्ये व प्रयत्नांमध्ये शास्त्रशुद्धतेचा अभाव होता. याचे मुख्य कारण म्हणजे इतिहास विचार व इतिहास लेखन याकडे एक शास्त्र म्हणून पाहण्याची वृत्ती मुठभर लोकांकडेच होती. महाराष्ट्रेतिहासाच्या क्षेत्रासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, मराठ्यांचे कार्यक्षेत्र व राज्यक्षेत्र सतत बदलत राहिल्याने इतिहासकारांना मराठ्यांचा इतिहास लिहितांना या गोष्टींची काळजी घ्यावी लागते.

महाराष्ट्र इतिहासाच्या विभागाविषयी लिहितांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, महाराष्ट्राच्या इतिहासाचे स्थलनिर्देशाने, कालनिर्देशाने विषयवारीने असे तीन विभाग पाडता येतील.[४]

महाराष्ट्रातील इतिहासलेखन प्रगतीवर का नाही तर तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे नाही असे बेंद्रे म्हणतात.[५] इतिहासकार वा. सी. बेंद्रे ऐतिहासिक पुराव्याचे मुख्यतः दोन प्रकार पाडतात (१) प्रत्यक्ष पुरावे (२) अप्रत्यक्ष पुरावे. प्रत्यक्ष साधने म्हणजे संबंधित काळातील संपूर्ण साधने होय तर अप्रत्यक्ष साधने म्हणजे जे नंतरच्या काळात लिहिली गेली ती साधने होय. कोणत्याही पुराव्यांचे परीक्षण करतांना पुढील सहा प्रश्न पुढे उभे राहतात -

(१) आपला साक्षीदार ज्या विषयाबद्दल पुरावा सांगतो त्या विषयातील सत्य किंवा खरी परिस्थिती माहित असल्याची संधी किंवा साधने त्याला प्राप्त होती किंवा कसे?

(२) जर त्यानेच ती माहिती प्रत्यक्ष पाहून दिली असेल तर ती त्याने पूर्णपणे बिनचूक व पूर्णपणे पाहिली आहे का?

(३) माहिती देतांना जी गोष्ट पाहिली अगर ऐकली ती गोष्ट त्याला पूर्णपणे बिनचूक समजली आहे काय?

(४) साक्षीदार खरे सांगणारा आहे काय?

(५) साक्षीदार मुद्दाम खोटे सांगण्याचा संभव आहे काय?

(६) साक्षीदाराचा त्यात बरा-वाईट हितसंबंध आहे काय?

वा. सी. बेंद्रे सांगतात प्रत्यक्ष साधनांपेक्षा अप्रत्यक्ष साधनांचे परीक्षण करणे अवघड असते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साधनांचे परीक्षण कसे करावे याची माहिती मराठ्यांच्या इतिहासाची साधने प्रकरणात विस्ताराने आपण पाहिली आहे. उपलब्ध झालेली माहिती नवीन आहे किंवा त्या माहितीने एखादी अनिश्चित गोष्ट निश्चित होऊ शकेल किंवा काय? माहितीचा काळ व स्थळ कोणते? तसेच ती माहिती ज्या भाषेत सापडेल त्या भाषेचे ज्ञान संशोधकाला असावे लागते. तसेच त्या भाषेचे वर्तमानकालीन व भूतकालीन स्वरूपही जाणले पाहिजे. अंतर्गत परीक्षणात आलेली माहिती खरी की खोटी? हे पहावे लागते. साक्षीदार असेल तर त्याचे परीक्षण करावयाचे असते. असे परीक्षण करतांना साक्षीदाराची योग्यता, त्याला प्रत्यक्ष माहिती असल्याची शक्यता, त्याची ती साधने लिहिण्यावेळची मन:स्थिती वगैरेचा विचार करावा लागतो. अशा पद्धतीने साधनांची फेर तपासणी करणे याला अंतर्गत परीक्षण असे म्हणतात[६] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

ऐतिहासिक वाङ्मय निर्मिती संदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, "जनता इतिहास व ललित वाङ्मयातील कथानके यातील सत्यासत्येचा शोध लावण्याइतकी परीक्षकबुद्धी विकास पावलेली नाही. त्यामुळे जनतेतील गैरेसमज दूर करण्याकरिता शक्य तो प्रयत्न प्रथम झाला पाहिजे. इतिहासाचे वाचन व कादंबरी-नाटकांचे वाचन यातील भेदाभेद त्यांना स्पष्ट करून दिला पाहिजे. स्वदेशाच्या इतिहासाची मुळातच म्हणजे बालवयातच शिकवण न दिली गेल्यामुळे ही परिस्थिती उत्पन्न झाली आहे. ती दूर करण्याचेही प्रयत्न प्रथम झाले पाहिजेत."[७]

वा. सी. बेंद्रे यांनी लेखणीचे स्वरूप, शाईचे प्रकार, कागदपत्रांचे प्रकार, पत्रे लिहिण्याच्या विविध पद्धती, ज्यात दफे, दफाते, कत, महजर इत्यादी विषयी स्पष्टीकरण दिले. लिखाणाचा काळ निश्चित करण्यासाठी (१) कागदाचा जुनेपणा, (२) शाईचा जुनेपणा, (३) लिपीच्या मोडीतील वैशिष्ट्यांचा काळ, (४) भाषा-प्रघात, (५) लेखकाचा काळ, (६) मजकुरांतील निरनिराळ्या प्रसंगाचा इतर साधनांवरून ठरलेला काळ, (७) मजकुरांतील विविध परंपरेचा काळ वगैरे बाबी आवश्यक ठरतात. अंतरंग परीक्षणात लेखकाच्या विश्वसनीयतेची चौकशी महत्त्वाची ठरते असे बेंद्रे सांगतात. प्राथमिक साधनांप्रमाणे इतिहास लिहिण्यासाठी दुय्यम साधनेही महत्त्वाची असतात. फक्त त्यांचे परीक्षण योग्य पद्धतीने केले गेले पाहिजे. यामध्ये दंतकथांचा शक्यतो उपयोग करूच नये.[८]

एखाद्या लेखाच्या नकलेसंदर्भात बेंद्रे सांगतात की, पहिली, दुसरी किंवा कोणतीही नकल ही बरोबर असू शकते. म्हणून पहिल्यांदा लिहिली गेलेली आहे म्हणून मूळ नकल किंवा शेवटी लिहिली गेलेली नकल आहे म्हणून परिपूर्ण असे समजू नये तर त्या सर्वांची चिकित्सा केल्यावर आपल्याला त्यातील मूळ घटना लक्षात येऊ लागतात. म्हणून कोणत्याही नकलेला दुय्यम समजू नये. यानंतर बेंद्रे लेखकाच्या पात्रतेसंदर्भात त्याच्या सामान्य दोषासंदर्भातही माहिती देऊन त्याचे लिखाण शास्त्रशुद्ध सत्य आहे किंवा नाही हे कसे ओळखावे ते ही सांगतात. एवढेच नव्हे तर इतिहास लेखनासंदर्भात इतिहास संशोधकांची दृष्टी कशी असावी हेही सांगून आपल्याला इतिहास लेखनाची कोणतीही जुनी परंपरा स्वीकारून चालणार नाही. इतिहास रचनेसाठी साधनसामग्री जुळविण्याचेच काम मोठ्या जोराने झाले पाहिजे. या साधनाद्वारेच इतिहास लिहिता येईल.

साधनांच्या बहिरंग परीक्षणाचा विचार करताना शिवशाहीच्या विविध साधनांचा तपशीलवार विचार बेंद्रे करतात. सरकारी पत्रे, जमाखर्च, शकावल्या यासारख्या साधन प्रकारांचे विशेष महत्त्व ते सांगतात. 'शकावली' या साधन प्रकारांवर स्वतंत्र तपशीलवार विवेचन ते करतात. शिवशाहीच्या शास्त्रीय इतिहास लेखनामध्ये ऐतिहासिक म्हणी, पोवाडे यांचे महत्त्व ते पटवून देतात. तत्कालीन समाजवास्तव व जनप्रवृत्ती समजावून घेण्यासाठी तत्कालीन वाङ्मयाचा आपण अभ्यास केला पाहिजे हे ते आवर्जुन सांगतात.

शिवशाहीच्या बहिरंग परीक्षणानंतर ते अंतरंग परीक्षणाकडे वळतात. लिखित साधनांच्या लेखकाचे अंतरंग प्रथम तपासण्याशिवाय साधनाचा आशय व मजकूर समजणार नाही असे ते म्हणतात. संशोधक जे साधन वाचणार आहेत त्या साधनाच्या लेखकाची पात्रता, त्याचा लिहिण्याचा हेतू समजणे आवश्यक असते. पुढे ते सांगतात की, प्रसंग एकत्र गुंफून वर्णनात्मक इतिहास रचला म्हणजे इतिहासाचे कार्य संपत नाही तर त्यांचा अन्वयार्थ लावणे, त्यातून निर्णयात्मक तत्वे शोधणे हा मूलमंत्र ते नव्या संशोधकांना देतात. आधारभूत ग्रंथाची यादी देणे आवश्यक कसे आहे. आधारभूत ग्रंथाची यादी देतांना या संदर्भात संशोधकांना ते सूचनाही देतात. नवीन संशोधकांसाठी मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित साधनांची उपलब्धताही आपल्या लिखाणाद्वारे विविध ग्रंथाच्या माध्यमातून करून देतात.

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी आपल्या संशोधनाचा व अभ्यासाचा कालखंड मुळातच १७ वे शतक निवडल्याने त्यांनी आपले लिखाण भोसले वंशाच्या सुरूवातीपासून केलेले दिसते. शिवाजी महाराज व त्याच्या स्वराज्याविषयी लिखाण करण्यापूर्वी ते त्यांच्या पूर्वजांविषयी लिहितात. 'शिवपूर्वकाळातील मराठ्यांच्या इतिहासाविषयी' बेंद्रे लिहितांना सांगतात, "मालोजी व शाहाजी राजांच्या कार्यकर्तृत्वाचे धडे गिरवूनच शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना केली म्हणून मालोजी व शाहाजी राजांचा इतिहास महत्त्वाचा ठरतो. सुरूवातीला शिवपूर्वकालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीची चर्चा करून ते 'मराठा' नावाची उत्पत्ती सांगतात. महाराष्ट्रिकांचा व नागाचा दक्षिणेत मिलाफ होऊन मराठी भाषा जन्मास आली व महाराष्ट्रिकांची संस्कृती नाग लोकांच्या संस्कृतीहून किंचित श्रेष्ठ असल्यामुळे नाग-महाराष्ट्रिकोत्पन्न नव्या लोकांना मराठे नाव पडले."[१] तर उत्तरेतील सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव महाराष्ट्रात काही काळ येऊन राहिले. त्यांना क्षत्रीय मराठा म्हटले जाऊ लागले.

चाळके, यादव, जाधव, पालवे, भोसले हे शब्द चालुक्य वगैरे संस्कृत शब्दांचे मराठी अपभ्रंश होत. यांच्याच वंशात शाहाजी व शिवाजी आले असे कै. वि. का. राजवाडे यांचे मत बेंद्रे यांनी स्वीकारले आहे. भोसले घराण्याची वंशावळ वा. सी. बेंद्रे शुभकृष्ण (इ.स. १४२७) पासून सांगतात. भोसले वंश इ.स. १४७० पर्यंत 'राणा' ही पदवी लावीत, पण नंतर ते 'राजे' लावू लागले. 'राणा' या शब्दाऐवजी त्यांना 'राजा' हा शब्द अधिक सोईस्कर वाटला असावा असे इतिहासकार वा. सी. बेंद्रे सांगतात.[१०]

बाबाजीराजे व मालोजीराजे संदर्भात बखरकारांनी फार गफलत केल्याचे बेंद्रे सिद्ध करतात, "बाबाजी व परसोजी हे दोघे सख्खे चुलत भाऊ एकत्रित कुटुंबात राहत असत. पण या दोघांच्या कौटुंबिक संबंधाबाबत बखरकारांनी बराच गोंधळ घालून परसोजीस बाबाजीचा बाप दाखविले आहे; परंतु शेडगावकर बखरीत बाबाजी हा मालकर्णचा पुत्र म्हणून लिहिले आहे. ते वस्तुस्थितीनिदर्शक आहे हे पैठणच्या राजोपाध्ये यांच्या खतावणींतील नोंदीवरून सिद्ध होते." परसोजीचा जन्म इ.स. १५४५ ते १५४८ व बाबाजीचा जन्म इ.स. १५४९ ते १५५१ चा मानावा लागेल तर मालोजी राजांचा जन्म हा इ.स. १५७० नंतरचा मानने वस्तुस्थितीला धरून होईल असे बेंद्रे सांगतात.[११] मालोजी राजाकालीन स्थिती, त्याचा निजामशाहीत प्रवेश व पराक्रमाची माहिती देऊन त्यांच्या कार्यक्षेत्राची सुरूवात दीड हजार मनसब स्वीकारून दौलताबादच्या प्रदेशात म्हणजे खडकी शहरातील मालोजीपुऱ्यात किंवा दौलताबादेजवळील वेरूळ, घृष्णेश्वरला राहावयास आल्यापासून होते तर शेवट श्रीगोंद्यात मकरंदपेठ किंवा पुरा बसवून होते असे बेंद्रे सांगतात. मालोजी राजांचा मृत्यू इंदापूरला इ.स. १६०६ ला झाला. हे वा. सी. बेंद्रे यांनी चौकशी केली असता त्यांना कळाले की, मालोजीराजांच्या घुमटाचे रुपांतर मुस्लीमकाळात दर्ग्यात झाले होते. इंदापूर तहसीलदारांना भेटून ज्या जागी घुमटी आहे त्या जागेची जुन्यात जुनी नोंद जुन्या रेकॉर्डस वरून पाहिली व मालोजी राजांच्या घुमटीचा शोध लावला. त्याचबरोबर मालोजी राजांनी घृष्णेश्वरच्या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचेही सिद्ध करतात. तसेच त्यांनी मालोजीराजाने शिखर शिंगणापूरला, दौलताबादला तळे बांधण्याचेही पुरावे मिळविले आहे.

शहा शरीफच्या संबंधाविषयी वा. सी. बेंद्रे सांगतात की, बखरकारांनुसार शहा शरीफच्या दर्ग्यांची भक्ती केल्याने त्यांना मालोजी राजांची शहा शरीफ सुफी अवलियावर भक्ती होती अस म्हणावे लागेल. कारण शाहा शरीफच्या दर्ग्याला शाहाजीच्या काळापासून देणग्या मिळत गेलेल्या

दिसतात. मालोजी राजांच्या भेटीच्यावेळी शाहा शरीफ पीर होऊन बसला असता तर त्या दर्ग्यालाही मालोजीकडून चांगलीच देणगी मिळाली असती; परंतु ती तशी मिळालेली दिसत नाही. तशा पद्धतीचा उल्लेखही येत नाही. दुसरी गोष्ट बेंद्रे स्पष्ट करतात की, शाहा व शरीफ असे दोन अवलिये नसून शाहा शरीफ हा एकच अवलिया आहे. शाहा हे त्यांच्या गुरूपरंपरेचे द्योतक असे विशेषण असून ते नावाच्या आधी किंवा नंतर जोडले जाते. तसेच शरीफजी हे नाव भोसले घरण्यात यापूर्वी आलेले होते.[१२]

शाहाजी राजांचा जन्म ३० मार्च १५९९ ला झाला असावा असे बेंद्रे पुराव्यानिशी सिद्ध करतात व सांगतात की, मालोजीची पत्नी उमाबाई हिने शाहा शरीफला पुत्र व्हावा म्हणून नवस करणे शक्य नाही.[१३] तसेच मालोजी राजे जरी शिवभक्त होते तरी त्यांचा ओढा अवलियाकडे असू शकतो असेही सांगतात. मालोजी राजांना दोन बायका नव्हत्या असे ही बेंद्रे सिद्ध करतात.

मालोजी जाधवरावजवळ दारावर बारगिरी करीत होते हे चुकीचे आहे. तसेच लग्नाच्या भांडणावरून मालोजीला जहांगिरी दिली हे पण चुकीचे आहे असे बेंद्रे सांगतात. तसेच निजामशाहीची राजधानी इ.स. १६०६ तील मालोजीच्या मृत्युपर्यंत तरी दौलताबादला नव्हती. हेही बेंद्रेनी ऐतिहासिक पुराव्यानिशी सिद्ध केले. त्यामुळे बखरकारांच्या सांगण्यानुसार दौलताबादेतील मालोजीच्या जिवंतपणी लग्नाशी निजामशहाचा संबंध येणे शक्य नव्हते.

मालोजीकडे गोमाजी नाईक मकरंदपुरी १५९६ तच असल्याने कागदोपत्री सिद्ध असल्याने त्याला जिजाबाईसोबत जाधवरावाने दिले असे ९१ कलमी बखर म्हणते ते चुकीचे आहे. शाहाजी-जिजाबाई यांच्या विवाहासंदर्भातील असे विविध गैरसमज बेंद्रेंनी पुराव्यानिशी खोडले आहे.[१४] व त्यांचा विवाह १६१०-११ ला झाल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे खंडागळे प्रकरण घडले त्या काळात (इ.स. १६२१ ते १६२४) जाधवरावांचा निजामशाहीत फारच थोडा म्हणजे २-३ महिन्याचा मुक्काम झाला होता आणि त्या थोड्या काळात भोसले व जाधव यांचे भांडण झाले. ज्यात संभाजी भोसले व दत्ताजी जाधव यांचा बळी गेला. भातवडीच्या लढाईत शाहाजी शरीफजी निजामशाहीकडून तर जाधवराव व त्याचे पुत्र शाहाजीच्या विरोधात मोगली सैन्याची मदत करीत होते असे का? याचे स्पष्टीकरण पुराव्यानिशी वा. सी. बेंद्रे यांनी केले आहे.

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी शाहाजी राजांच्या निजामशाहीतील व आदिलशाहीतील व मोगलांकडील कार्याचे विश्लेषण चिकित्सकपणे विविध साधनांचा आधार घेऊन स्पष्ट केले

आहे. हे करीत असतांना निर्माण झालेल्या परिस्थितीचे व शाहाजी राजांच्या त्यावेळच्या परिस्थितीचे व शाहाजीराजांच्या त्यावेळच्या योग्य निर्णयाची चिकित्सा करून माहिती दिली आहे असे आपल्याला दिसते.

वा. सी. बेंद्रे विविध पुराव्यांच्या आधारे सांगतात की, शिवाजी महाराज व जिजाबाई ही शिवनेरीवरून खेडशिवापूरला बापूजी मुग्दल यांच्या वाड्यात इ.स. १६३७ च्या पूर्वी काही दिवस येऊन राहिले व इ.स. १६३७ च्या पावसाळ्यानंतर विजापुरकडे गेले. दादाजी कोंडदेव याच काळात शिवापूरला आले व पेठ बसविली व नंतर आपल्या सुभ्याच्या मुख्य जागी म्हणजे कोंडाण्याला गेले.[१५]

दादाजी कोंडदेव यांचा मृत्यू कर्नाटकातून परत आल्यानंतर ९ मार्च १९४७ रोजी झाला असे बेंद्रेंनी स्पष्ट केले आहे.[१६] २५ जुलै १६४८ ला आदिलशाहाद्वारे कैद केल्यासंदर्भात बेंद्रे चिकित्सा करतांना सांगतात की, शाहाजी महाराजांच्या कैदेचा संबंध शिवाजी महाराजांच्या हालचालींशी जोडता येत नाही. शिवाजी महाराजाने भाऊबंदकीचा फायदा घेऊन पुरंदर ९ ऑक्टोबर १६४७ ला आपल्या ताब्यात घेतला व तो ही शाहाजी महाराजांच्या अटकेच्या ९-१० महिने पूर्वी. आदिलशाहाला यावेळी स्वारी करण्यासाठी काही अडचण नव्हती. या काळात सहज बंदोबस्त करता आला असता; परंतु त्याने तसे न करता पावसाळा सुरू होताच हा गडप्रांत परत घेण्याची आज्ञा केली. याचाच अर्थ असा की ऑगस्ट १६४८ च्या पूर्वी थोडेच दिवस काही तरी वेगळी घटना घडली असावी की, ज्यामुळे आदिलशाहाला शत्रुची भीती अधिक वाटली असावी. मुरूमगड, पुरंगधर व कोंडाणा शिवाजीने घेतला म्हणून शाहाजीला कैद केले असे अनुमान तत्कालीन परिस्थितीवरून काढता येत नाही.[१७] तर शिवाजी महाराजाचे काबक्षसोबत होत असलेल्या चांगल्या संबंधासाठी शाहाजीनेच बोलणे केले असावे असा आदिलशाहाचा समज झाला असावा. हे याचाच परिणाम शाहाजीला कैद करण्यामध्ये झाला आणि सोडण्यातही मोगलाची भूमिका महत्त्वाची होती.[१८]

शिवाजी महाराज व जिजाबाई यांना मावळा भागात पाठविण्यामागे शाहाजी राजांची 'स्वराज्य स्थापनेची' नीती होती. यासाठी त्यांनी शिवाजी महाराजांना मदत व्हावी म्हणून मावळ प्रातांतील देशमुख सरदारांची व्यवस्था करून ठेवली होती असे बेंद्रे सांगतात. तसेच जेव्हा आदिलशाहाने अफझलखानाला पाठविले तेव्हा आपल्या मुलांविरूद्ध असल्या दुष्ट हालचालीची

बातमी अचानक येताच शाहाजी अल्ली आदिलशाहावरच चालून येऊ लागले असे बेंद्रे सांगतात व पुरावा म्हणून तत्कालीन हेन्री रेव्हिंगटन चे १० डिसेंबर १६५९ चे पत्र[१९] देतात. शाहाजी महाराज २३ जानेवारी १६६४ रोजी घोड्यावरून पडून होद्दीगिरीत मरण पावले. तेथे त्यांची छत्री बांधली ती अद्यापही आपल्याला पहायला मिळते.

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांचे जे महत्त्वाचे ग्रंथ आहेत त्यातील एक म्हणजे "श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र" हा त्यांचा सर्वांत मोठा ग्रंथ जो जवळपास १२०० पृष्ठांचा आहे व दोन खंडामध्ये आहे. बखरकारांनी शिवाजी महाराजांना जी ईश्वरी अवताराची उपमा दिली त्याबद्दल बेंद्रे सांगतात की, बखरकारांचा असा दृष्टिकोण तो केवळ सध्याच्या क्रांतियुगातील महान सामाजिक अगर राष्ट्रीय क्रांतियुगातील 'तारक' अथवा 'श्रेष्ठ देशसेवक' याच अर्थाने उपयोगात आणला आहे आणि तो बरोबरही आहे.[२०]

मराठ्यांना स्थानिक राजकारणात प्रवेश का मिळाला? कारण बहामनीचे विभाजन झाल्यानंतर परदेशीय इस्लामियांची म्हणजे पठाणांची कमतरता पडू लागली. त्यामुळे मराठ्यांना स्थानिक राजकारणात प्रवेश मिळाला.

शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीसंदर्भात ज्या अडचणी येतात त्याचे कारण बेंद्रे सांगतात की, पूर्वी राजाच्यांही घराण्यात 'वाढदिवस' साजरा करण्याची प्रथा नव्हती. उलट श्राद्धपक्ष मात्र होत होते. त्यामुळे मृत्युतिथी पाच सात पिढ्यापर्यंत तरी लक्षात ठेवणे आवश्यक होते तसे जन्मतिथीचे नव्हते. शिवाजी महाराजांच्या जन्मतिथी संदर्भात बेंद्रेंनी बखरींची चिकित्सा केली व लिहिले की, सभासद व चित्रगुप्त बखरीने जन्मतिथी दिलेली नाही. यावरून १७५० पर्यंत तरी जन्मतिथीबद्दल सामान्य जनता अज्ञानात होती असे दिसते. यानंतरच्या बखरीत मतभेद असलेले दिसतात. अनेक पुरावे देऊन वा. सी. बेंद्रेंनी शिवाजी महाराजांचा जन्म फाल्गुन वद्य ३, शके १५५१ (१९ फेब्रुवारी १६३०) शुक्रवार रोजी शिवनेरीवर झाला. बखरकारांनी शिवाजी महाराजांच्या बालपणातील ज्या एक दोन हकिकत सांगितल्या आहेत त्या वा. सी. बेंद्रे यांनी पुराव्यानिशी खोडल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

(१) दादोजी कोंडदेव शिवाजी महाराजांचा विद्याभ्यास घेत होते - बेंद्रे स्पष्टीकरण देतात की, दादोजी कोंडदेव हे शिवनेरीस नव्हते. त्यांची शिवनेरी भागात नेमणूक इ.स. १६३६ नंतर झाली. इ.स. १६३७ मध्ये शिवाजी महाराज खेड शिवापुरला होते; परंतु दादोजी कोंडदेव

आदिलशाही तर्फे शाहाजी राजाचे प्रतिनिधी म्हणून आपल्या सुभ्यावर म्हणजे कोंडाण्यात रहात होते. इ.स. १६३८ ते १६४२ अखेरपर्यंत शिवाजीराजे कंपिलीला होते. तेथे शहाजी महाराजांसोबत इतर पंडितासोबत राहत होत. यावेळी दादोजी कोंडदेव मावळा प्रांतात होते. त्यामुळे दादोजी कोंडदेव हे शिवाजीचा विद्याभ्यास घेणारे पंतोजी नव्हते.

(२) कसायावरील रोष, यवनांचा द्वेष व आदिलशाहाचा अपमान याविषयी स्पष्टीकरण कंपिली हे गावच शाहाजी राजांचे होते. तेथे संभाजी पुढे अनेक वर्षे काम करीत असल्याचे कागदोपत्री पुरावे असल्याने शिवाजीला बादशाहाकडे नेण्याचे कारण नव्हते. स्वतः शाहाजी महाराज रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकामध्येसारखे गुंतल्याने त्यांचीही बादशाहाशी महिनेच्या महिने भेट होण्याची शक्यता नव्हती. पावसाळ्यात निवाऱ्यास आल्यावर बादशाहाच्या भेटीस जाणे शक्य नाही. त्यामुळे गोवध, विरोध व मुसलमानांच्या रागाला कंपिलीत तरी कारण नव्हते असे स्पष्टीकरण देतात. शिवाजी महाराजांचे महादेवभट विद्यागुरू होते, गुरूमंत्र देणारे महाबळेश्वरचे प्रभाकरभट उपाध्याय हे होते. याखेरीज राजाभिषेकाचा मंत्र देणारे गागाभट हे राजगुरू होते. बाकीचे साधुसंत वगैरे उपदेशक होते. पुण्यात परत येण्यापूर्वीच शिवाजी महाराजांनी लिपिग्रहण केले होते हे परमानंदाच्या लिखानातून स्पष्ट होते.

शिवाजी महाराजांना सहा बायका व्यतिरिक्त दोन उपस्त्रिया किंवा नाटकशाळा होत्या. बायकांची नावे अनुक्रमे सोयराबाई, सगुणाबाई, सकवारबाई, काशीबाई, पुतळाबाई, पण बाकी राहिलेले एक लग्न व दोन उपस्त्रियाबद्दल विश्वसनीय पुरावा नाही.

शिवाजी व जिजाबाई यांना पुण्यामध्ये पाठविण्यामागे तोंड पाहण्याची शहाजीराजांची इच्छा नव्हती. म्हणून पाठविले असे म्हणणे चुकीचे आहे. असे सांगून बेंद्रे स्पष्ट करतात की, दुसरी बायको तुकाई केली म्हणून जिजाबाईचा त्याग केला असे म्हणणेही चुकीचे आहे. कारण त्यांना आणखीही दोन बायका होत्या. फक्त एकीचाच त्याग करण्याचे कारण नव्हते. खरे कारण म्हणजे शाहाजी व आदिलशाही यांचे संबंध बिघडल्याने त्यांना पुण्याकडे पाठविण्यात आले होते.

इ.स. १६३३ मध्ये मुऱ्हार जगदेवाने पुणे लुटून गाढवाचा नांगर फिरविला होता. त्यामुळे शिवाजी-जिजाबाईला त्या जमिनीची विधियुक्त शुद्धी झाल्याशिवाय तेथे जाऊन राहाणे अशक्य होते. म्हणून शिवाजी-जिजाबाईला खेड शिवापूरी पाठविले. यावेळी दादोजी कोंडदेव कोंडाणा

गडावर राहात होते. यांची सुभेदार म्हणून दादाजी कोंडदेवाने व्यवस्था केली; परंतु शाहाजीने कंपिलीस वाडा, बाग वगैरे केल्यावर एका वर्षात म्हणजे १६३७ च्या उत्तरार्धात तिकडे नेले. त्यानंतर शाहाजी व महमुद आदिलशाहा यांचे संबंध बिघडताच इ.स. १६४० नंतर शाहाजीने दादोजीला पुण्यास शांती करून तेथे पुन्हा वस्ती व लाल महाल वगैरे बांधण्यास सांगितले व तो तयार झाल्यावर इ.स. १६४२ च्या उत्तरार्धात शिवाजी-जिजाबाईला पुण्यास पाठविण्यात आले असे स्पष्टीकरण बेंद्रे देतात.[२१]

बखरकारांना इ.स. १६४८ पर्यंतच्या शिवाजी व शाहाजी राजे यांच्या हालचालींची फारशी माहिती नसल्याने ते ज्या काही प्रसंगाची माहिती देतात त्या प्रसंगाच्या काळाविषयी त्यांच्यात अज्ञान असल्याने त्यात नंतरच्या प्रसंगांची सरमिसळ केलेली आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात. इ.स. १६४२ मध्ये शिवाजी महाराजांना पुण्याला पाठवून स्वराज्य निर्मितीसाठी प्रयत्न करण्यासच सांगितले होते असे बेंद्रे सांगतात. शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे स्वरूप हे हिंदुचे राज्य न मानता स्थानिक राज्य असेच होते.

फत्तेखानाचा पराभव केल्याने शिवाजी महाराजांना अनेक प्रकारे फायदे झाले. ज्यामध्ये (१) शिवाजी महाराजांना आदिलशाही विरूद्ध मोगलांची मैत्री मिळाली. (२) शिवाजी महाराजांनी घेतलेला दादोजी कोंडदेवच्या प्रदेशाला आदिलशाहाने शिवाजी महाराजांचा प्रदेश म्हणून मान्यता दिली. (३) आणखी मोठा फायदा म्हणजे शाहाजीने आपले विश्वासू व शूर सेनापती त्यांच्या सैन्यासह शिवाजीची मदत करण्यासाठी पाठविले. (४) आदिलशाहाने शाहाजीस नोकर न मानता 'फर्जंद' म्हणून मान्यता दिली.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या विस्तारासंदर्भात बेंद्रे सांगतात की, शिवाजी महाराजांनी १२ मावळ प्रांत घेतले. कारण तो त्यांचा अधिकारच होता. हे स्पष्ट करतांना बेंद्रे सांगतात १२ मावळ प्रांत रणदुल्लाखानाकडून सुभेदार म्हणून दादोजी कोंडदेवाकडे व पर्यायी शाहाजीराजांकडे आला होता तर शिवाजी महाराज वारस म्हणून त्यांना तो अधिकार प्राप्त झाला होता.

मोरे प्रकरणा संदर्भातही बखरकारांनी विपर्यास केला आहे. मुलींच्या मागण्या नाकारल्यावरून शिवाजी महारजांनी मोरेंना शासन केल्याचे सांगितले आहे; परंतु हे खरे नाही. बेंद्रे सांगतात, मोरे भावामध्ये भांडण लागले होते. त्या भांडणात शिवाजी महाराजांनी सुभेदार या

नात्याने लक्ष घातले व भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला; पण चंद्रराव मोरेंनी शिवाजी महाराजांचे म्हणणे ऐकले नाही परिणामी शिवाजी महाराजांनी मोरेवर आक्रमण करून त्याचा प्रदेश काबिज केला.

सुपे प्रकरणाबाबतही बेंद्रे सांगतात की, सुपे प्रकरणात तत्कालीन साधनांच्या कार्यकारणभावात विपर्यास केल्याने गुन्हेगारांचीच बाजू उचलून धरली आहे. खरे पाहता सुपेचा कारभार गैरहिशोबी चालला होता. मोहितेच्या अन्यायी वर्तनाबाबत शाहाजी राजांकडे तक्रारी गेल्या होत्या. शाहाजीने संभाजी मोहितेला अन्यायी वर्तनामुळे बडतर्फ करून सुपे परगणा शिवाजी महाराजांच्या ताब्यात देण्यास सांगितले होते व शिवाजी महाराज सुपे परगणा घेण्यासाठी सुप्यात गेले असतांना संभाजी मोहितेने तो देण्याचे नाकारल्याने शिवाजी महाराजांनी त्याला कैद करून शाहाजी राजांकडे पाठविल्याचे सिद्ध होते.

तळकोकणच्या संदर्भातही औरंगजेबाने आगऱ्याकडे वापस जातांना शिवाजी महारजांना निजामशाही राज्याच्या सर्व भागाची सरदेशमुखी दिली होती. त्यामुळे ह्या हालचाली शिवाजीने आपला हक्क वसूल करण्याकरिता केल्या होत्या. परराज्यात आक्रमण म्हणून त्या नव्हत्या असे मानावे लागेल असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

अफजलखानाच्या स्वारीसंदर्भात माहिती देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात, सभासद बखरीमध्ये सभासदाने अफजलखानाच्या वकिलाचे नाव कृष्णाजी भास्कर ऐवजी पंताजी गोपीनाथ असे दिले आहे.

बेंद्रे कृष्णाजी भास्करबद्दल स्पष्टीकरण देतात की, कृष्णाजी भास्कर हा आदिलशाही सुभेदार होता आणि त्या सुभेदराने नोकर म्हणून अफजलखानाला मदत करणे शक्य होते. सहजच कृष्णाजी भास्करने शिवाजीची बाजू संभाळली आणि त्या कृष्णाजी भास्कराने महाराजांवर तलवार उगारली याबद्दल विशेष पुरावा नाही. कदाचित त्याने आपण शिवाजी महाराजांच्या गटात नसल्याचा देखावा केला असावा. तसे जर नसते तर शिवाजी महाराजांनी त्याला पुढे सुभेदारीवर ठेवलेच नसते असे बेंद्रे स्पष्टीकरण करतात.[२२]

अफजलखानाच्या स्वारीत तुळजापूर व पंढरपूरच्या मूर्तीचे नुकसान झाले नव्हते कारण तेथील गावकरी व पुढारी यांनी स्वारीची बातमी लागताच त्या मूर्ती वेळीच सुरक्षित ठिकाणी लपवून ठेवल्या होत्या व नंतर त्यांची पुनर्स्थापना करण्यात आली होती असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट

करतात.[२३] तसेच बखरकारांच्या मते शिवाजी महाराजांनी वाईवरून जावळीखोऱ्यात आणले हे मत बेंद्रे खोडतात व सांगतात की, अफजलखान वाईवरून जावळीखोऱ्यातच जाण्यासाठी निघाला होता. बखरकारांनी शिवाजी महाराज आपल्या वडील भावाचा म्हणजे संभाजीराजे यांचा सूड घेण्याच्याच तंद्रित होते असे वर्णन केले. ते वा. सी. बेंद्रेंनी पुराव्यानिशी चुकीचे असल्याचे सिद्ध केले.

शिवाजी महाराज अफजलखानाच्या भेटीच्या वेळी प्रतापगडावर का येऊन राहिले होते? याचे स्पष्टीकरण वा. सी. बेंद्रे देतांना सांगतात की, मोरेंचा पाडाव करून प्रतापगड नुकताच पुन्हा बांधला होता. तेथे देवी भवानीची स्थापना केली होती. ही जागा उत्तम हवेशीर निंबाळकर पवारांची म्हणजे राणी सईबाईंच्या भावाची पूर्वार्जित तेव्हा त्या आजारपणामुळे भावाकडे गेल्या होत्या. सईबाई ५ सप्टेंबर १६५९ रोजी वारल्या. साहजिकच शिवाजी महाराज व जिजाबाईंना तत्पूर्वी तेथे जावे लागले. सईबाईचा आजार वाढल्याने राजे ११ जुलै १६५९ रोजी तेथे गेले होते. पत्नीच्या मृत्युनंतर अंत्यसंस्कार करण्याकरिता तेथे मुक्काम करून राहणे क्रम प्राप्तच होते.[२४]

अफजलखानावर वापरण्यात आलेल्या शस्त्राविषयी बेंद्रे माहिती देतात की, अफजलखानाच्या पोटात वार केला. त्याअर्थी शिवाजीचा खांद्यवरील भाग पकडीत असला पाहिजे. यात शंका नाही. विशेषतः हा वार पोटाच्या खालच्या बाजूने झाल्याकारणाने कोथळा बाहेर लोंबू लागला. बेंद्रे चिकित्सा करताना सांगतात, वाघनखांनी एवढी खोल व मोठी जखम होऊ शकणार नाही. कमरेला म्यानात ठेवलेली 'कृपाणिका' (म्हणजे एक धारी लहान व शेवटच्या एकतृतीयांशापर्यंतचा भाग चंद्रकोर असलेली तलवार) किंवा बिचवा उपसतानाच असा वार होऊ शकतो. तत्कालीन कागदपत्रात कृपाणिका किंवा बिचवा म्हणजे कृपाण असाच उल्लेख आढळतो.

औरंगजेबाने शिवाजी व आदिलशाहा यांच्यातील भांडणाला प्रोत्साहित करून आपला दख्खनमधील प्रांताचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला होता. हे २४ फेब्रुवारी १६५८ रोजी शिवाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रातून समजते असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

शाहिस्तेखानाच्या स्वारी संदर्भातील मजकूर सभासद बखरीत कमी आला आहे. तसेच शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर प्रत्यक्ष हल्ला केला त्यापूर्वीची माहिती सभासदाला मुळीच नव्हती असे दिसते. ९१ कलमी बखरीतील मजकूर अर्धवट व अवास्तव आहे. चिटणीस बखरीत

निरनिराळ्या प्रसंगाचा मजकूर एकत्रित गुंतागुंत करून दिल्याने त्यात बरीचशी अवास्तवता आली आहे. परमानंदाची माहिती ही विस्तारपूर्वक वास्तव आहे. चित्रगुप्ताने व शेडगावकर भोसले बखरीतील माहिती सभासदाचीच जशीच्या तशी दिली आहे. शिवचरित्रप्रदीप बखरीत शाहिस्तेखानाच्या स्वारीबद्दल थोडीच माहिती आली आहे. परमानंदाने आपल्या अणुपुराणात विस्तारीत माहिती दिली आहे. यानंतर बेंद्रे मनुची, विविध पत्रे, युरोपीयन लिखाणाचा आधार देऊन शाहिस्तेखानाच्या स्वारीचे विवेचन करतात. ते सांगतात, "शाहिस्तेखान अहमदाबादेत सुभेदार होता. शाहिस्तेखानाला दक्षिणेचा सुभेदार नेमून ३ जुलै १६५९ ला दौलताबादकडे पाठविले व नंतर त्याने शिवाजी महाराजांविरूद्ध मोहिम काढली. शाहिस्तेखानाने चाकणगड ९ ऑक्टोबर १६६० ला घेतला. नंतर तो भीमा नदी उतरून पुण्यास आला. नंतर तो कोकणाकडे निघाला. शिवाजी राजांनी त्याला उंबराखिंडीत जाऊ दिले व नंतर त्याच्यावर छापा घातला व मोगली सैन्याचा पराभव केला."[२५]

शाहिस्तेखानावरील छापा म्हणजे एक डाव होता असे वा. सी. बेंद्रे सांगतात. ज्यामध्ये आपल्याकडील कमी सैन्याच्या जोरावर शत्रुकडे असलेल्या मोठ्या सैन्याला तोंड देण्यास समर्थ नसल्यामुळे त्या शत्रुच्या नेत्यालाच दूर करून त्या सैन्याला दुर्बळ करून टाकण्याचा हा प्रयत्न होता. तसेच हा छापा ५ एप्रिल १६६३ रोजी घातला. तेव्हा मोगली सर्व सैन्य पुण्यात होते असे मानने चुकीचे आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

सुरतेच्या लुटीसंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, यामुळे स्वराज्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली. शिवाय या स्वारीमुळे मोगली लष्कराला शिवाजीच्या प्रदेशात पाठविण्याबरोबरच बरेच लष्कर स्वदेश संरक्षणासाठी ठिकठिकाणी ठेवावे लागल्याने मोगली आक्रमणाची आक्रमकता बरीच कमी झाली. वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की, सुरतेची लूट होती ते आक्रमण नव्हते. शिवाजी महाराजांनी लूट करून लवकरात लवकर सुरत सोडल्याने व सुरतमध्ये शिवाजी महाराजांनी संघर्ष टाळल्यामुळे डच व इंग्रज नोकरांना शिवाजी महाराज घाबरले होते असे म्हटले आहे; पण असे म्हणता येणार नाही.

शिवाजी महाराजांनी १६६५ नंतर आदिलशाहीत जे आक्रमण केले त्याविषयी सांगताना लिहितात की, हिंदवी स्वराज्यासाठी आदिलशाहीत केलेले आक्रमण हे वस्तुतः आक्रमण नसून

आपली मायभूमी व देशबांधव यांना परकीय इस्लामी सत्तांच्या पारतंत्र्यातून स्वतंत्र करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा असा प्रयत्न होता.

शिवाजी महाराजांना मिर्झा राजे जयसिंहाद्वारे आगऱ्याला नेण्याचे कारण सांगताना बेंद्रे लिहितात की, जयसिंहाला शिवाजी महाराज आदिलशाहाी, कुतुबशाही यांच्या युतीत मिळविण्याची भीत वाटत होती. तसेच डोंगरदऱ्यात लढा देणेही जयसिंहाला अवघड झाले होते. म्हणून त्याने औरंगजेबाला 'शिवाजीचे मन वळवून घेतले पाहिजे. त्याला तिकडे बोलवणे जरूर आहे' असे सांगितले.

शिवाजी महाराज ५ मार्च १६६५ ला औरंगजेबाकडे जाण्यास निघाले व ११ मे ला आगऱ्याजवळ आले. शिवाजी महाराजांचा निघून जाईपर्यंत बराच खर्च झाला होता. शिवाजी महाराजांना औरंगजेबाने अटक करविली तरीही औरंगजेब शिवाजी महाराजांवर तितका नाखुष नव्हता. त्यांना बादशाहा परत पाठविण्याच्या तयारीत होता; परंतु दरम्यान राजा जयसिंहानी आदिलाशाही सरदाराकडून मार खाल्याने राजा जयसिंहाला शिवाजीराजे दक्षिणेत येऊ नये असे वाटल्याने त्याने औरंगजेबाला कळवून शिवाजी महाराजांना आगऱ्यातच अडकविण्याचे आणखी एक कारस्थान केले. संभाजी राजांना रामसिंहाबरोबर ठेवले ते दरबारात जात येत असत असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

शिवाजी महाराज आगऱ्याहून निघाल्यानंतर कोणाकडे जाऊन न थांबता सरळ स्वराज्यात निघून आले होते. त्याचा परतीचा प्रवास मथुरा-यमुना-अलाहाबाद-बनारस-चांदा-हैद्राबाद-रायगड असा असावा असे वा. सी. बेंद्रे सांगतात व स्पष्ट करतात की, रोज ५० मैलापेक्षा अधिक प्रवास केल्याशिवाय २५ दिवसात हा प्रवास संपविणे शक्य दिसत नाही. बखरकारांनी शिवाजी महाराजांच्या तीर्थप्रसादासंदर्भात रचलेल्या गोष्टी काल्पनिक आहेत. तसेच शिवाजी महाराज आपल्या स्वराज्यात केव्हा जाऊन पोहोचले याबद्दल निश्चित पुरावा नाही; परंतु ते ११-१२ सप्टेंबर १६६६ ला रायगडावर आले असावे असे बेंद्रे सांगतात.

संभाजी राजाच्या वास येण्यासंदर्भात वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतात की, काशीपंत हा ओतुरच्या केशव चैतन्याचा पणतु मोगली चाकरीत होता. तो ज्या मोगली सरदाराच्या हाताखाली होता त्याच्याबरोबर तो निजामशाही मोगली संघर्ष मिटल्यानंतर उत्तरेत गेला. काशी केशव हा मथुरेत होता. काशी केशवचा मुलगा कृष्णाजी याला विश्वासराऊ कदाचित उपनाम असेल किंवा

विश्वास हा त्याचा दुसरा मुलगा असेल. काशी केशवची बायको लक्ष्मीबाई ही मोरो त्रिमळ व काशी त्रिमळ यांची बहिण होती. त्यामुळेच काशी त्रिमळला शिवाजी महाराजांनी संभाजी राजांना आणण्यासाठी पाठविले होते. संभाजीला रायगडी आणतांना काशीपंत, त्याची बायको लक्ष्मीबाई, कृष्णाजी व त्याची बायको पार्वतीबाई आणि मामा काशी त्रिमळ सोबत होते. काशी केशव याने एका दिवशी संभाजीस वाटेत मोगलांच्या ताब्यात देण्याचे मनात आणले; परंतु लक्ष्मीबाई व काशी त्रिमळने त्याला या विचारापासून परावृत्त केले. काशी केशव व कृष्णाजी यांनी सह्याद्रीच्या हद्दीत पोहचताच संभाजीला काशी त्रिमळ व शिवाजीच्या लोकांच्या ताब्यात देऊन शिवाजी राजांकडे पोहोचले व ती मंडळी वापस ओतुरला गेली.[२६]

वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की, संभाजी राजांची व्यवस्था काय करावयाची ती कवी कलशला कैद होण्यापूर्वी व शिवाजी महाराजांची सुटका होण्यापूर्वीच करण्यात आलेली होती. संभाजीराजे दमले, फोड आले वगैरे सर्व काल्पनिक विस्तार आहे. तो चुकीचा आहे. ५-६ वर्षांच्या संभाजीच्या बायकोने सती जाण्याचा वगैरे जो वर्णन आलेले आहे ते सर्व लेखकांच्या तर्कातील तपशील दिसतो असे बेंद्रे सांगतात.

इ.स. १६६९ ते १६७९ मधील शिवाजी महाराज व मोगल संबंध स्पष्ट करताना सांगतात की, औरंगजेबाने शफतखानाला ससैन्य शिवाजीराजांवर पाठविल्याची बातमी इंग्रजांच्या २५ एप्रिल १६६९ च्या पत्रात मिळते. यावरून मोगलांनी केवळ तहच मोडला नव्हता तर शिवाजी महाराजांच्या विरूद्ध लष्करी कारवाई करण्यास प्रथम सुरूवातही केली होती हे स्पष्ट आहे. शिवाजी महाराजांनीही तह मोडल्याचे पाहताच अक्रामक धोरण स्वीकारले. यासाठी त्यांनी शहाजाद्याची मदत घेतली नाही. यावरून शहाआलमच्या बंडाचे स्वरूप स्वयंपूर्ण होते हे स्पष्ट होते.[२७] याकाळात शिवाजी महाराजांनी स्वराज्यापासून लांब न जाता मोगलांचे सैन्य येईपर्यंत आपले गेलेले किल्ले मिळविले. मुआइझम औरंगजेबावर नाराज असल्याने त्याने शिवाजी महाराजांच्या पारिपत्यार्थ काहीही प्रयत्न केले नाही. ३-४ ऑक्टोबर १६७० ला शिवाजी महाराजांनी सुरत पुन्हा लुटली. परत येतांना अनेक गडावर कब्जा केला. १६७२ च्या पावसाळ्यात मोगली सैन्य दिलेरखानाच्या नेतृत्वाखाली आले. अनेक घडामोडी घडल्या. यातच शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ ला राज्याभिषेक विधी करून घेतला. या सर्व घडामोडीत मोगल संघर्षात शिवाजी महाराजांची राजनीती वैशिष्ट्यपूर्ण होती. ज्यामुळे आदिलशाही शिवाजी

महाराजांच्या आश्रयाला आली होती. हा संघर्ष सतत शिवाजी महाराजांच्या मृत्युपर्यंत चालतच राहिला. ज्यात संभाजीचे मोगलांकडे जाणे पुन्हा वापस येणे. स्वराज्यातील सरदारांचे कट, आदिलशाहीशी संघर्ष अशा विविध पातळीवर शिवाजी राजांना आपले लक्ष द्यावे लागले; परंतु या सर्व संकटांना त्यांनी समर्थपणे तोंड दिले व स्वराज्याला वाचविले. यातच शिवाजी महाराजांची राजनीती किती शास्त्रशुद्ध झाली हाती याची कल्पना येते असे बेंद्रे सांगतात.

राज्यभिषेकासंदर्भात काही महत्त्वाच्या गोष्टी वा. सी. बेंद्रे यांनी स्पष्ट केल्या आहेत. (१) बखरकारांनी एकाच प्रकारच्या, पण निरनिराळ्या वेळी घडलेल्या प्रसंगाची गल्लत केलेली आहे. (२) शिवाजी महाराज रजपूत कुळातील असल्याबद्दल स्थानिक लोकांत काहीही शंका नव्हती. (३) शिवाजी महाराज व गागाभट्ट यांचे संबंध राज्यभिषेकापूर्वी पासूनचे होते म्हणून भोसले घराणे क्षत्रीय आहे. हे पटविण्यासाठी त्यांना धावपळ करण्याची गरज नव्हती. (४) जे स्वार्थी मंत्री वर्णाश्रमधर्माच्या नावाखाली शासनात असल्याचे माणून स्वैराचार करीत होते त्यांना आपल्या जन्मजात स्वातंत्र्याला धोका उत्पन्न होत असल्याची जाणीव झाली. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या प्रचलित आचारधर्मातील वैगुण्यांवरून तांत्रिक अडचणी उभ्या करण्याचा प्रयत्न केला असणे संभवनिय आहे, पण गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांनी शास्त्राच्या आधारे सर्व अडचणी दूर केल्यात.[२८]

राज्याभिषेकाची आवश्यकता का होती? हे सांगताना बेंद्रे स्पष्ट करतात की, (१) छत्रसिंहासनाच्या धर्मसिद्ध प्रतिष्ठेने हिंदवी राजसंस्थेला सांस्कृतिक, राजकीय आणि नैतिक अथवा सामाजिक श्रेष्ठ दर्जा व स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी (२) यामुळे वर्णाश्रमाच्या आचारवैशिष्ट्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या अडचणी दूर होणार होत्या (३) ब्राह्मण गुन्हेगारांना शिक्षा देण्याचा अधिकार राजांना प्राप्त होणार होता.[२९]

राजाभिषेक विधी शुक्रवार, २९ मे १६७४ ते बुधवार, १७ जून १६७४ पर्यंत चालला. शिवाजी महाराजांना राजाभिषेक विधीने 'छत्रपतीपद' प्राप्त झाले. तेव्हा आपल्या अविरोध विक्रमाची आठवण म्हणून आपला राजशक चालू केला व आपल्या नावाची नाणी पाडली.[३०]

राजाभिषेक विधी संस्कारातील तपशिलाबाबत थोडा वाद प्रवाद निर्माण झाला होता. सामाजिक दृष्ट्या या किरकोळ प्रवादाची कोणीही दखल घेतली नाही. हा प्रवाद वाराणसीच्या

निश्चळपुरी याने निर्माण केला होता. परिणामी शिवाजी महाराजांनी २४ सप्टेंबर १६७४ ला तांत्रिक सिंहासनारोहण विधि करून घेतला.

शिवराजाभिषेकाचे महत्त्व सांगताना वा. सी. बेंद्रे लिहितात की, शिवाजी महाराजांच्या ज्या संघटनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक व परमार्थिक संस्कृतीची मूल्ये खोलवर रूजली गेली. त्याच महाराष्ट्राच्या ऱ्हदयपटलावर राजसंस्थेच्या उत्क्रांत संस्कृतीचे प्रतिबिंब चिरंजीव करण्याचे कार्य या शिवराजाभिषेकाचे आहे. शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्विजयासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, राजाभिषेकासाठी झालेला खर्च भरून काढण्यासाठी किंवा केवळ लूट मिळविण्यासाठी शिवाजी महाराजांनी ही कर्नाटक मोहिम केली असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही असे स्पष्ट होते. शिवाजी महाराजांना आदिलशाही आणि विशेषतः पठाणी मुस्लिमांचे प्राबल्य मोडून टाकावयाचे होते व त्यासाठी पठाणेत्तर सिद्दी वगैरे मुस्लिमांनी साहाय्यही केले. कर्नाटकात एक मोठी राज्यसंस्था स्थापन करून तिच्या मार्फत आदिलशाहाला पंगू करून ठेवायचे होते. तो हेतू यातून पूर्ण सफल झालेला दिसतो. कर्नाटकात शाहाजीराजांनी जी मराठी राज्याची स्थापना केली होती व एंकोजीने वाढविली होती. ती शिवाजी महाराजांनी इतकी मजबूत करून ठेवली की, कोणतीही मुस्लीम सत्ता तिला सहज मोडू शकली नाही.

शिवाजी महाराजांनी जेव्हा इ.स. १६५५-५६ मध्ये जावळीच्या मोऱ्यांचे पारिपत्य केले व रायगड सर केला. तेव्हा स्वराज्याची सीमा समुद्रला जाऊन भिडली व शिवाजी महाराजांचा सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, डच व फ्रेंच यांच्याशी संबंध आला. यातील सिद्दी याचे प्रमुख आरमारी ठाणे जंजिरा बेटावर असून किनाऱ्यावरील दंडाराजपुरी व त्याच्या आसपासचा प्रदेश त्याच्या ताब्यात होता. शिवकाळात सिद्दी प्रथम विजापुरकरांकडे व नंतर मोगलाकडे नोकरीला होता. त्याच्याजवळ चांगले आरमार होते. सिद्दी समुद्रात चाचेगिरी करी आणि कोकण किनाऱ्यावर धाडी घालून जाळपोळ, लुटालूट व बाटवाबाटवी करीत असे. शिवाजी महाराजांनी इंग्रज, पोर्तुगीज, डच व फ्रेंच यांच्याशी संबंध प्रस्थापित करून सर्व प्रथम आपले आरमार तयार केले व वाढविले. सिद्दीला धडा शिकविण्याचा प्रयत्न केला. यामध्ये मराठे सिद्दीची ठाणी मिळवायचे ती ठाणी पुन्हा सिद्दी काढून घ्यायचा वगैरे संघर्ष चालू राहिला. तोफा व मोठी जहाजे यांच्या अभावी जंजिरा जिंकण्याचे शिवाजी महाराजांचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. मराठ्यांच्या नाविक सत्तेला आव्हान देत जंजिरेकर सिद्दी कायम राहिला. शिवाजी महाराजांनी सर्व परकियांसोबत

सामोपचाराचे धोरण ठेवले व वेळ आल्यास त्यांच्याशी संघर्षही केला व स्वराज्यातची आरमाराची प्रगती करून घेतली.

शिवाजी महाराजांच्या मृत्युसंदर्भात बखकरकारांना वस्तुस्थितीची माहिती नव्हती. संभाजी महाराज मोगलांकडून परत आले तेव्हा शिवाजी महाराजांनी त्यांना कैद केली नव्हती. तसेच शिवाजी महाराजांनी मृत्युपूर्वी आजारात किंवा तत्पूर्वी राज्याची विभागणी दोन पुत्रात केली नव्हती. असे बेंद्रे स्पष्ट करून सांगतात की, बखरकारांना मृत्युपूर्वीच्या आजाराची कल्पना नव्हती. शिवाजी महाराजांना रक्तातिसार झाला होता असे इंग्रज लिहितात. त्यांच्या आजारात रक्ताच्या ओकाऱ्या व ताप ३३ दिवस होता. नंतर मृत्यू झाला. प्रवाशांच्या लिखाणानुसार हा आजार प्रवासातील सूर्यतापाचा परिणाम होता असे दिसते. इंग्राजांच्या वर्णनाप्रमाणे हे शक्यही वाटते, त्यामुळे ते प्रथमपासूनच बेशुद्धावस्थेत होते. म्हणून त्यांनी मृत्युपूर्वी राज्याची विभागणी करून दिली हे चुकीचे आहे असे स्पष्ट होते. शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० रोजी झाला. याचे उल्लेख आढळतात. तसेच इंग्रजांच्या पत्रातूनही शिवाजी महाराजांच्या मृत्युची तारीख मिळते.

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी चार तपापेक्षा अधिक काळापर्यंत जी तपश्चर्या केली आहे. तिचे साफल्य म्हणजे त्यांनी लिहिलेले संभाजी महाराजांचे चरित्र होय. या चरित्रामुळेच खरा संभाजीराजा जगासमोर आला. संभाजी राजांना व्यसनाधीन, बदफैली, व्यभिचारी, दुर्वतनी असेच समजले जात होते. अशा संभाजी राजाचा जन्म १४ मे १६५७ रोजी म्हणजेच 'शके १५७९ हेमलंबी संवधरे जेष्ठ शुद्ध द्वादशीस गुरूवारी घटिका दहा' से झाला. संभाजी राजांच्या जन्माच्या दोन वर्षानंतर म्हणजे सोमवार ५ सप्टेंबर १६५९ रोजी त्याची माता सईबाई यांचा मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू प्रतापगडावर झाला. शिवाजी महाराजही जिजाबाईसोबत ११ जुलै १६५९ ला प्रतापगडावर आले होते. हे बेंद्रे पुराव्यानिशी सिद्ध करतात. इ.स. १६७० पर्यंत शिवाजी महाराजांना दुसरा मुलगा नसल्याने जिजाबाईंचे त्याच्यावर विशेषच प्रेम होते; परंतु १७ जून १६७४ रोजी जिजाबाईचा मृत्यू झाल्याने संभाजीराजांचा आधार नाहिसा झाला.[३१]

संभाजी राजांनी 'बुधभूषणम्' नावाचा ग्रंथ लिहिला त्याच्या प्रस्तावनेतूनच आपल्या संभाजी महाराज हे शिक्षित विद्वान असल्याचे समजते असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात व पुढे सांगतात की, संभाजी राजांना वयाच्या ८ व्या वर्षांपासूनच म्हणजे शिवाजी महाराजांनी

जयसिंहाशी करार केला तेव्हापासून राजनीतीचे शिक्षण मिळत गेले व ते पंचहजारी मनसबदार बनले व नंतर सातहजारी मनसबदार बनले. हा सर्व अनुभव त्यांना १२ वर्षाच्या वयातच आला. राजदरबारात शिवाजी महाराजांसोबतच संभाजी राजे राहत असत. राजाभिषेकानंतर संभाजीराजांची मुंजही झाली होती. अशा पद्धतीने संभाजी महाराज शिवाजी महाराजांच्या व जिजाबाईंच्या सहवासात शिकत होते.

संभाजी महाराज मोगलांकडे का गेले? याचे स्पष्टीकरण देताना बेंद्रे सांगतात की, संभाजी राजांच्या विरोधात सतत कट कारस्थाने होत होती व शिवाजी महाराजांना आदिलशाही व मोगल यांच्या आक्रमणाला सतत तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे ते त्यांना संभाजी राजांकडे लक्ष देण्यास सवड मिळाली नाही. तसेच संभाजी महाराज श्रृंगारपूरला असताना मंत्र्यांनी शिवाजी महाराजांकडे पुन्हा संभाजी महाराजांविरोधात तक्रार केली आणि याच वेळी शहाआलम औरंगाबादला आला. संभाजी राजांचा शहाआलमच्या मैत्रीवर अधिक विश्वास होता म्हणून संभाजी राजे त्यांच्याकडे निघून गेले.

संभाजी महाराज श्रृंगारपुराहून सज्जनगडला गेले तेव्हा त्यांनी आपल्यासोबत येशूबाईला नेले नव्हते व नंतर दिड महिन्यांनी म्हणजे २९ जानेवारी १६७९ रोजी येशूबाईला श्रृंगारपुरला भवानीबाई नावाची मुलगी झाली होती असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.[३२] संभाजी महाराज मोगलांकडे जाण्याचे कारण शिवाजी महाराज व संभाजीराजे यांच्यातील असंतोषाला देतात व शिवाजी महाराजांवर रागावून गेले असे सांगतात. तसेच संभाजीने श्रेष्ठ ब्राह्मणाच्या मुलीशी बदकर्म केले. त्यामुळे शिवाजी महाराज ठार करणार हे समजून संभाजीराजे पळून गेले असे सांगतात. ते पूर्णपणे चुकीचे आहे असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

शिवाजी महाराजांनी संभाजी राजांना श्रृंगारपुरला का ठेवले? याचे स्पष्टीकरण देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, रायगडावर त्यांच्या विरोधात होणाऱ्या कट कारस्थानापासून दूर ठेवण्यासाठी असे पाऊल उचलले होते. चिटणीसाने संभाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्याचा' विध्वंस केल्याचे म्हटले आहे. याचे कारण सांगताना बेंद्रे लिहितात, चिटणीसाच्या मनात बाळाजी आवजी मंडळींना मारल्याचा राग होता व ताराबाईचा शिवाजी दुसरा याच्याकाळात संभाजी महाराजाबद्दल रामचंद्रपंताकडून घाणेरडा प्रचार झाला होता. त्यामुळे लोकांत द्वेषाची भावना निर्माण होऊन त्याचा परिणाम नंतरच्या बखरकारांच्या लिखाणावर झाला.[३३]

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर सोयराबाईची संमती मिळो अथवा न मिळो अण्णाजीने राजारामास मंचकारोहण करण्याचे कारस्थान आपला सहकारी राहूजी सोमनाथासोबत करून ठेवले होते. मोरोपंत राजधानीस येण्यापूर्वीच अण्णाजीने राजारामाचे मंचकारोहण करून घेतले होते. म्हणजे या कटाचा सुत्रधार अण्णाजी दत्तोच होता असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

संभाजी महाराज रायगडावर आल्यावर त्यांनी राजारामाला चांगली वागणूक दिली तर सोयराबाई व दुसऱ्या तीन मातांचे सांत्वन केले व सांभाळले. कारण सोयराबाईनंतर सव्वा वर्षानंतर वारली होती, हे बेंद्रे विविध पुराव्यानिशी सिद्ध करतात व जे संभाजीला सोयराबाईला मारल्याचे व राजारामाला कैद केल्याचे सांगतात त्यांचे मत नाकारतात.

संभाजी राजांनी २९ जुलै १६८० रोज बुधवारी आपला मंचकारोहण विधी करून घेतला व नंतर म्हणजे माघ शुद्ध ७ रविवार १६ जानेवारी १६८१ रोजी महाराजाभिषेक करून घेतला. असे का केले याचे उत्तर बेंद्रे देतात की, राजारामाचाही तसाच संस्कार होऊन गेला असल्याने शास्त्राच्या व धर्माच्या अडचणी उपस्थित झाल्या होत्या म्हणून महाराजाभिषेक करून घेतला.

अकबराला मदत करून संभाजी राजाने काय साध्य केले? याचे स्पष्टीकरण देताना बेंद्रे लिहितात की, अकबराला आपल्या ३०-४० हजार सैन्यासह गुजरातमध्ये पाठवून तिकडील प्रदेश ताब्यात घेऊन राजपुतांना मदत करून उत्तरेत बंडाळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला; पण रजपुतांनी याचा फायदा घेतला नसला तरी दक्षिणेतील मोगली सैन्याला औरंगजेबाने उत्तरेत पाठवावे लागल्याने दक्षिणेतील आक्रमकता कमी झाली.

संभाजी राजाविरोधात दोन कट झाले, (१) संभाजीवर विष प्रयोगाचा व (२) अकबराला राज्य देण्याचा किंवा कारभाराविषयी माहिती देण्याचा होय. या कटात सामिल असणाऱ्याला संभाजी महाराजांनी मारले असेल तर याचा दोष संभाजी राजांना देता येणार नाही, असे वा. सी. बेंद्रे सांगतात. याचवेळी काही चरित्रकार शिर्क्यांचे 'शिरकाण'ही झाल्याचे सांगतात; पण शिर्क्यांच्या इनामाबाबतच्या कागदपत्रावरून शिर्क्यांची मुले माणसे सर्व शाहूच्या कारकिर्दीपर्यंत जिवंत असल्याचे सिद्ध होते. म्हणून वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात की, 'शिर्काण' शब्दाचा अर्थ 'शिरकापणे' म्हणून मल्हार रामरावाने घेतला आहे. तो चुकीचा असून 'शिर्काण' म्हणजे 'शिर्के यांचे राज्य किंवा जहांगिरी' होय असा अर्थ घ्यायला हवा.[३४]

संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या संघटनेसाठी युद्धतंत्र स्वतःकडे ठेवून घेऊन सर्व सेनापतींना युद्धाबाबतचे रणांगणांवरील सर्व अधिकार दिले. संभाजीराजांनी राज्यावर येताच आपला शिक्का तयार केला. एक शिक्का असा : "श्रीमच्छिवभक्त्युद्रेकादधिगत धरणी समस्तसाम्राज्य शंभोः। छत्रपतेर्मुदा मोदप्रदाजयति।।" बेंद्रे सांगतात हा शिक्का ऐकीव आहे. कागदपत्रात अद्याप तो सापडला नाही; परंतु संभाजीराजांचा "श्रीः शंभोः शिवजातस्य मुद्रा द्योरिव राजते।। यदंकसे विनो लेखावर्तते कस्य नो परी।।" हा शिक्का मात्र सर्व राजपत्रांवर आढळतो.

संभाजीराजांनी आपल्या पत्नीला येशुबाईला हुकूम काढण्याची परवानगी दिली होती. तसेच येशुबाईंना स्वतःचा शिक्काही दिला होता. तो ती कौलनामा, अभयपत्रे वगैरेवर वापरत असे. हा शिक्का 'श्रीसखी राज्ञी जयति।' असा होता. संभाजीराजांनी आपल्या पत्नीवर पूर्ण विश्वास ठेवून सर्व अंतर्गत व्यवस्थेचा राज्यकारभारही तिच्यावर टाकला होता.

संभाजीराजांनी दानधर्महीं मोठ्या प्रमाणात केला होता. तसेच दुष्काळाचा सामना करण्यासाठी पूर्वतयारी करून ठेवलेली असे. संभाजीराजांनी पोर्तुगीजासोबत जे धोरण अवलंबले त्यानुसार स्वराज्याची ताकत बळकट झाली. तसेच त्यांनी हिंदुची मंदिरे जाळणाऱ्या, स्वराज्यातील जनतेला बाटविणाऱ्या, न बाटल्यास त्यांना उभे जाळणाऱ्या, त्यांची घरेदारे लुटणाऱ्या वगैरे भीषण प्रकार करणाऱ्या 'फादर्सची कंपनी'ला वठणीवर आणले व त्यांच्या त्रासापासून सोडविले. संभाजीराजांच्या पोर्तुगीजासोबतच्या धोरणामुळे पोर्तुगीजांनी मोगली सैन्याला व आरमाराला त्यांच्या प्रदेशातून संभाजीराजांच्या प्रदेशात जाण्या-येण्यास कधीही परवानगी दिली नाही.

शहाआलमला संभाजीराजांनी यशस्वी तोंड दिले. यावेळी संभाजीराजांने पोर्तुगीज, इंग्रज, अरब यांच्याशी मैत्री प्रस्तापित करून घेतली. आदिलशाही, कुतुबशाही यांना एकत्र घेतले. त्यामुळे शहाआलमच्या सैन्याचे मोठे नुकसान होऊन औरंगजेबाची योजना फसली. ही शहा आलमची स्वारी १५ सप्टेंबर १६८३ ते २४ मे १६८४ या काळात झाली.

संभाजी राजांनी सिद्दी व मोगलांशी इ.स. १६८० ते १६८९ या काळात यशस्वी लढा दिला. जर संभाजीराजे मोगलांच्या हाती लागले नसते तर इंग्रजांना त्यांचे तात्काळ साहाय्य मिळाले असते. सिद्दीच्या हातून उंदेरी व जंजिरा घेऊन सिद्दीचा कायमचा बंदोबस्त करता आला असता. असो. इ.स. १६८९ च्या अखेरीस कोकणातील रायरी व इतर गड मोगलांच्या ताब्यात

गेले होते. मुंबईभोवतालील सर्व भागही मोगलांच्या ताब्यात आला होता. फक्त खांदरी, कुलाबा, व पद्मदुर्ग मात्र मराठ्यांच्या ताब्यात राहिले होते. सिद्दीच्या संघर्षात जरी अपयश आले असले तरी मराठ्यांनी त्यामुळे आरमार क्षेत्रात व्याप्ती व प्रगती केली होती.

संभाजी महाराजांनी इंग्रजांची साम्राज्यवादाची नीती ओळखून त्यांनी इंग्रजांच्या वखारबांधणीवर व मनुष्यबळावर नियंत्रण घालण्याचा निर्बंध घालून दिला. संभाजीराजांनी इंग्रजांना त्यांना लागणाऱ्या धान्याची सोय करून दिल्याने इंग्रजांनी स्वराज्याला त्रास दिला नाही. इंग्रजांना सुभेदार व सरकारकून संभाजी राजांच्या पूर्ण आज्ञेत आहेत याचीही जाणीव झाली होती. शिवाय इंग्रजांच्या सर्व पत्रव्यवहारात चुकूनही संभाजीराजांच्या व्यक्तिदोषाचा उल्लेख येत नाही. ही देखील लक्षात घेण्यासारखी बाब आहे.[३५] असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

वा. सी. बेंद्रे सांगतात की, संभाजीराजाच्या आदिलशाही संबंधाविषयी बखरी काहीही माहिती देत नाही. यावरून शंका येते की, संभाजीच्या महत्त्वाच्या हालचालींकडे जाणून बुजून रामचंद्रपंताची बाजू सजविण्यासाठी दुर्लक्ष केले असावे. पेशवे उत्तरकालीन बखरकार यांच्या या कारवाईला नंतर बळी पडले. आदिलशाहाने संभाजी-मोगल आक्रमणात नि:पक्षपाती भूमिका बजावल्याने संभाजी महाराज कुतुबशाहीला मदत देऊ शकले. औरंगजेबाने आदिलशाही घेतांना तेथील जनतेवर जो अन्याय केला व संभाजी महाराजांनी त्या जनतेला मदत दिल्याने व सहिष्णुतेची वागणूक दिल्याने, जनता ही मोगलांपासून दूर राहिली. हिंदवी स्वराज्याची व्याप्ती प्रदेशमर्यादेत संकुचित न ठेवता अखिल हिंदवी समाजापुरती विस्तृत ठेविली होती. हेच हिंदवी स्वराज्याच्या संघटनेच्या दृष्टीने मोठे कार्य होते.

चंदीचंदावरचा प्रदेश स्वतंत्र व कर्नाटक राज्यापासून वेगळा होता. या दोन राज्यांच्या सरहद्दी विजापूरकर व भागानगरकर यांच्या प्रदेशांनी दुभंगल्या होत्या. कुतुबशाहीच्या मैत्रीमुळे त्या राज्यास प्रत्यक्ष मदत देणे घेणे शक्य होते. त्यामुळे अशा स्वतंत्र राज्य विभागावर कुटुंबातील जबाबदार कर्ता पुरूष सर्वाधिकार देऊन नेमणे आवश्यक होते. शिवाजी महाराजांना संभाजीराजे त्यासाठी योग्य वाटत होते असे वा. सी. बेंद्रे सांगतात. संभाजीराजे यांनी आपल्या काळात आपली बहिण अंबिकाबाई व वडील मेव्हणा हरजीराजे महाडिक यांना कर्त्या युवराजाच्या किंवा बंधुच्या अभावी पाठवून सर्वाधिकार दिले.

शिवाजी महाराजांच्या काळात त्यांनी कर्नाटकचा कारभार संताजीच्या ताब्यात दिला होता तर रघुनाथपंत हणमंते दिवाण होता. यावेळी कर्नाटकात बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. अराजक, अन्यायकारी परिस्थिती निर्माण झाली होती. याला रघुनाथपंत हणमंतेच जिम्मेदार होते. शिवाजीराजांना संभाजीला तिकडे ठेवायचे होते; परंतु शिवाजी महाराजांचा मृत्यू झाल्याने ते शक्य झाले नाही. ते संभाजीराजांनी नंतर हरजीराजे महाडिकांना पाठवून यशस्वीपणे करून दाखविले.[३६] यानंतर केसो त्रिमळला हरजी महाडिकांच्या जागी संभाजीने पाठविले अशी जी माहिती येते ती चुकीची आहे असे वा. सी. बेंद्रे सांगतात.[३७]

संभाजी महाराजांच्या कैद व मृत्यू संदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, संभाजी महाराजांच्या मृत्यूच्या पद्धतीत मतभेद नाहीत; पण कैदेचा प्रसंग अकस्मात घडून आल्याने त्याबद्दल मतभेद आहेत. कवी कलश व शिर्के यांच्यात भांडण झाल्यानंतर कवी कलश आपल्या सैन्यासह खेळण्याला गेले. यावेळी संभाजी महाराज पन्हाळ्याला होते. डॉ. सेंट जॉनच्या १८ जुलै १६८८ च्या पत्रावरून स्पष्ट होते की, औरंगजेब पन्हाळ्याकडे न येता रायगडावर स्वारी करण्यासाठी निघाला व इकडे मुकरबखानही पन्हाळ्याबाबत फारशी हालचाल करीत नव्हता हे पाहून संभाजीराजे खेळण्यावरून १ फेब्रुवारी १६८९ रोजी निघाले. संभाजीच्या हालचालीची नक्की बातमी मलकापूरला शिर्के व शत्रू मंडळीला होती. त्यामुळे संभाजीराजे खेळण्यावरून ३०-४० मैलांचा प्रवास करून ४००-५०० लोकांनीशी संगमेश्वरी मुक्कामी असल्याचे कळताच ही बातमी मुकर्रबखानाला मिळाली. संभाजी राजे देसाईच्या कामासाठी संगमेश्वराला १-२ दिवस राहिले असावेत. मुकर्रबखानाने संगमेश्वरावर छापा घातला. हा छापा १ फेब्रुवारीनंतर १-२ दिवसामधील असावा व छापा ४ फेब्रुवारीस किंवा त्यापूर्वीच पडला असावा.

बहादुरगडला १५ फेब्रुवारी १६८९ सर्व कैद केलेली मंडळी आणली. नंतर मुक्काम कोरेगाव-तुळजापूरच्या प्रदेशात ३ मार्चला गेला. पुढे ११ मार्च १६८९ रोजी संभाजीराजांना हाल हाल करून मारण्यात आले. वा. सी. बेंद्रे सांगतात की तत्कालीन परिस्थितच्या सत्य ज्ञानाच्या अभावी दारूचा कैफ, कलशाचे मंत्रप्रयोग व बेगमेची कथा, संभाजीराजांबरोबर येसुबाई, शाहू आदिंना कैद केल्याच्या बातम्या यासारख्या भाकड कथांना जन्म मिळाला.

इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांनी संभाजी महाराजांचे खरे चरित्र लिहिल्यानंतर त्यांच्या वडू बुद्रुक येथील वृंदावनाचाही शोध लावला व इ.स. १९३४ पासून उत्सव साजरा करण्यास

सुरूवात केली. राजाराम महाराजांचा जन्म 'शके १५९१ सौमय नाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध १५ म्हणजेच २४ फेब्रुवारी १६७० वार गुरूवार रोजी झाला.[३८] असे वा. सी. बेंद्रे सांगून सर्वच बखरीमध्ये राजाराम महाराजांच्या जन्मतिथीबाबत अवास्तव मजकूर आलेले आहेत. राजाराम महाराजांच्या बालपणाविषयी फारशी माहिती आपल्याला ऐतिहासिक साधनात मिळत नाही. त्यांच्या वयाच्या ५ व्या वर्षी जिजाबाईंचा मृत्यू झाल्याने त्यांना संभाजी महाराजांसारखी शिकवण लाभली नाही. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर जी राजकीय लोकांची देशद्रोही नीती सुरू झाली. त्यामुळे राजारामाचा राजकारणाशी किंवा इतर बाहेरील व्यवहाराशी संपर्क तुटला. राजाराम महाराज येशुबाईजवळ जरी राहिले तरी त्यांच्या ज्ञानात फारसी भर पडेल अशा गोष्टी घडल्या नाहीत. संभाजी महाराजांचा मुक्कामही रायगडास फारसा झाला नाही. त्यामुळे संभाजी महाराजांकडूनही त्यांना शिकायला फारसे मिळाले नाही.

वा. सी. बेंद्रे काही साधनाचा पुरावा देऊन सांगतात की, त्यामध्ये राजाराम महाराजांची पहिली पत्नी जानकीबाई वारल्याचा उल्लेख येतो; पण तो उल्लेख चुकीचा आहे. कारण तत्कालीन पुराव्यावरून दिसून येते की, राजाराम महाराज जिंजीस झुल्फिकारखानाशी बोलणी करीत असताना (इ.स. १६९६-९७) त्यांचा जो तह झाला त्यातील अटींवरून जानकीबाई येसुबाई बरोबर मोगली कैदेत होती. तिच्या सुटकेची मागणी केली गेली होती. इतकेच नव्हे तर ती येसुबाई साहेबारोबर इ.स. १७१८ मध्ये परत आल्याचाही उल्लेख खास शाहू महाराजांच्या यादीत आला आहे.[३९]

रायगडावर १६८० मध्ये संभाजी महाराजांविरोधात जो कट रचऱ्यात आला होता त्यामध्ये येसुबाईची संमती होती असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही असे बेंद्रे सांगतात. राजाराम महाराजही स्वखुशीने या कटात सामिल झाले नव्हते. अण्णाजीने त्याचा मंचकारोहणविधी करून घेतला होता. जेव्हा संभाजी महाराज रायगडावर आले तेव्हा त्यांनी राजाराम महाराजांना चांगली वागणूक दिली होती व त्याची व्यवस्था चांगल्या पद्धतीने केली होती.

संभाजी महाराजांविरूद्ध रायगडच्या ब्राह्मण मंत्र्यानी मोगल सरदारासोबत संभाजीराजांना पकडून देण्याचा कट केला होता; पण या राजद्रोही व राष्ट्रद्रोही मंत्र्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी

कवी कलशचा मृत्यू झाल्याचे समजताच या कटाचे खापर कवी कलशवर फोडले होते. राजाराम महाराजांचा या कटाशी थोडासुद्धा संबंध नव्हता.[४०]

इ.स. १६८९ मध्ये संभाजी राजांना मोगलांनी पकडल्याचे समजताच रायगडावर कटवाल्यांनी राजाराम महाराजांना मंचकी बसविले. याला येसुबाईंचा पाठींबा होता असे मानणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

राजाराम महाराजांना जिंजीला का जावे लागले? याचे स्पष्टीकरण देतांना बेंद्रे सांगतात की, रायगडावरील ब्राह्मण मंत्र्यांनी मोगलांना संभाजी महाराजांना पकडण्याच्या मोबदल्यात काही वचने दिलेली होती. ती त्यांनी नंतर पाळली नाही. परिणामी मोगलांनी या मंडळीचा पाठलाग करण्यास सुरूवात केली. परिणामी यांना सतत पळत राहण्याचा मार्ग पत्करावा लागला.[४१]

शिवाजी महाराजांनी मृत्युपूर्वी राज्याची वाटणी संभाजी व राजाराम महाराज यांच्यात केली होती असे मानने चुकीचे आहे असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात. संभाजीविरूद्धच्या रायगडावरील कटाचा प्रमुख सुत्रधार प्रल्हाद निराजी व अण्णाजी दत्तो होते असे वा. सी. बेंद्रे सिद्ध करतात. रायगडाला मोगलांनी वेढा घातला असता येसुबाईंनी आठ नऊ महिने किल्ला लढविला; परंतु राजाराम महाराज व राजद्रोही मंडळी कर्नाटकला गेल्याचे समजताच बाहेरून मदत येण्याची शक्यता नसल्याने ३ नोव्हेंबर १६८९ रोजी सल्ला करून रायगड मोगलांना दिला.

रायगडावर सैन्याची मदत का गेली नाही? याचे स्पष्टीकरण देतांना बेंद्रे सांगतात की, रामचंद्रपंताने शंकराजी नारायणकडील सचिवपद काढून घेतल्यामुळे शंकराजी नारायणकडील सैन्य नवीन सचिवाकडे जाण्यास तयार नव्हते. म्हणून रायगडाच्या वेढ्यावेळी सैन्याची मदत जाऊ शकली नाही.[४२]

रांमचंद्रपंताने धनाजी जाधवकडील सेनापतीपद काढून ते संताजी घोरपडेला राजाराम महाराजांना द्यायला लावले; परंतु राजाराम महाराजांना नंतर पश्चाताप झाला. त्यांनी धनाजीला 'जयसिंगराव' हा किताब दिला व इतर पद्धतीने सरलष्कर पदे देऊन सत्कार करून भूषविले. यामुळे धनाजीचे समाधान झाले; परंतु यामुळे युद्धविषयक कारभारात कायमची दुही माजली गेली असे बेंद्रे स्पष्ट करतात.

मोगलांच्या अत्याचाराविरोधी स्थानिक राज्यकर्ते त्यांचा प्रतिकार करू लागले. हे पाहून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजाराम महाराजांनी त्यांना वतने देण्यास सुरूवात केली. यामुळे या

लोकांची एकनिष्ठता स्वराज्याबद्दल न राहता त्यांच्या वतनापुरतीच मर्यादित राहू लागली. हे स्वराज्यासाठी पुढे मारक ठरले असे वा. सी. बेंद्रे स्पष्ट करतात.

राजाराम महाराजांनी जिंजीच्या प्रवासात धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांना सोबत घेतले नव्हते. कर्नाटकात गेल्यावर कर्नाटकचे सुभेदार हरजीराजे महाडिक वारल्यामुळे सुभ्याचा साहित्य संग्रहासह ताबा महाराजांच्या सावत्र बहिणीने म्हणजे हरजीराजे महाडिक यांच्या पत्नीने दिला.

वा. सी. बेंद्रे लिहितात की, राजाराम महाराजांचा जिंजीचा ६०० मैलाचा प्रवास २६ सप्टेंबर १६८९ ला सुरू झाला; पण तो केव्हा नक्की संपला याची नोंद अद्यापि मिळाला नाही. तर दोन महिन्यापेक्षा कमी काळ लागला असावा.

युरोपियाना संदर्भातील राजाराम कालीन धोरणासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, ज्याप्रमाणे शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांनी युरोपियनांची सत्ता स्वदेशात वाढू नये यासाठी डच व इंग्रज यांना त्यांच्या वखारीभोवती मर्यादित स्वरूपाचीही तटबंदी उभारण्यास बंदी केली होती. त्याबाबत खलिते काढले होते व अंमलबजावणीचे प्रयत्नही केले होते. असे असतांना राजाराम महाराजांचा प्रतिनिधी प्रल्हादपंताने मात्र फ्रेंच, डच व इंग्रज यांना त्यांच्या वखारीभोवती तट उभारण्यास, इतकेच नव्हे तर मजबूत किल्ले व त्यांच्या सभोवतालील २-३ मैलातील परिसरातील शहरे व खेडी खास मालकीची म्हणून लाच खाऊन करून दिली होती.[४३]

जिंजीच्या संघर्षासंदर्भात वा. सी. बेंद्रे सांगतात की, मोगली सेना कामबक्ष, झुल्फिकारखान, इस्माइलखान, आसदखान यांच्या नेतृत्वाखाली जिंजीकडे निघाली. झुल्फिकारखानाने जिंजीला वेढा दिला. हा वेढा १६९१ ते १६९३ पर्यंत चालला. या वेढ्याच्यावेळी राजाराम महाराजांना सगळीकडून सैन्याची मदत येत होती. अनेक मराठा सरदार त्यांच्या मदतीला आले होते. कही मोगलांना सोडून राजारामाच्या बाजूने झाले होते. त्यामध्ये नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे व नागोजी माने यांचा समावेश होता तर राजारामसोबत हरजीराजे महाडिकाचे अनुभवी सैन्य होते. तसेच नंतर धनाजी जाधव व संताजी घोरपडेही पोहोचल होते. परिणामी मोगलांची स्थिती बिकट झाली होती. त्यामुळे झुल्फिकारखानाने राजाराम महाराजांशी तह करून घेतला. हा तह २२ जानेवारी १६९३ रोजी झाला; पण या तहात युद्ध बंदीचे कोणतेही कलम नव्हते. कारण तसे बादशाहाच्या भीतीने करता येणारे नव्हते.[४४]

या तहाचे परिणाम सांगताना बेंद्रे स्पष्ट करतात की, अनेक सरदार राजाराम महाराजांवर नाराज झाले व त्यांना सोडून गेले. कारण हा तह त्यांनी एका प्रधानाच्या सांगण्यावरून केला होता. त्याचप्रमाणे याकाळात नजराण्यामुळे लाचखोरी प्रवृत्तीला उत्तेजन मिळाले. झुल्फिकारखानाला स्थानिक राजे पाळेगारांना राजाराम महाराजांपासून दूर करण्यास वेळ मिळाला. ज्यामुळे जेव्हा झुल्फिकारखानाने जिंजीला दुसऱ्यांदा वेढा दिला तेव्हा राजाराम महाराजांना त्याच्या मदतीने स्वराज्यात जावे लागले होते.

याचे स्पष्टीकरण देतांना वा. सी. बेंद्रे सांगतात की, या सर्व नुकसानीला प्रल्हाद निराजी व रामचंद्रपंत यांचेच राजकारणातील डावपेच कारण ठरले. हे दोन्हीही अधिकारी युद्धापासून दूर राहणारे असल्याने त्यांच्यात या काळातील युद्धविषयक परिस्थितीला तोंड देण्याची पात्रता नव्हती.[४५] १६ डिसेंबर १६९७ रोजी झुल्फिकारखानाने जिंजीचा किल्ला घेतला. राजाराम महाराजांना सैन्याच्या अभावामुळे जिंजीचा किल्ला सहज द्यावा लागला.

राजाराम महाराज जिंजीला असतांना महाराष्ट्रातील नेत्यांनी व्यक्तिगत मेहनतीच्या जोरावर मोगलाविरूद्ध लढा चालू ठेवला होता. तसेच राजारामांनी सर्व कारभार रामचंद्रपंताकडे ठेवल्याने नाराजीही होती. कारण रामचंद्रपंताच्या कार्यकर्तुत्वावर त्यांचा विश्वास नव्हता. त्यामुळे त्यांनी राजारामाची भेट घेतली तेव्हा राजारामांनी या सर्वांना आपआपल्या पद्धतीने कार्य करण्यास परवानगी दिली. जिंजीवरून राजाराम महाराजांना महाराष्ट्रात जाण्यासाठी झुल्फिकारखानाने प्रत्यक्ष मदत केली होती असे वा. सी. बेंद्रे सांगतात.

राजाराम महाराज जिंजीला असताना इ.स. १६८९ ते १६९८ या कालावधीतील महाराष्ट्रातील हालचाली विषयीची चिकित्सा करताना बेंद्रे सांगतात की, स्वराज्यनिष्ठेवर व स्वराज्यातील सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याला भूकेले लोक होते. त्यांनी राजाराम महाराज जिंजीला गेल्यावर त्यांना भेटून स्वतंत्रता मिटविली व लोकांना सोबत घेऊन मोगली सत्तेला लढा दिला. यासाठी राजारामांनी त्यांना संघर्षात केलेली लुटही बक्षीस म्हणून ठेवण्याची परवानगी दिली. यांना यश आहे असे पाहून मोगलांकडे गेलेले सरदार परत येऊन राजाराम महाराजांकडे सामिल होऊ लागले. या स्थानिक लोकांच्या हालचालींमुळे राजद्रोही कटवाल्यांचे प्राबल्यही कमी झाले. रामचंद्रपंताकडील सचिवपद दूर करून कारभाराचे क्षेत्र ही मर्यादित केले गेले. उलट

शंकराजी नारायणाला पुन्हा सचिवपद मिळाल्याने व मोठे दगदगीचे क्षेत्र त्यांच्या ताब्यात दिल्याने त्याने स्वराज्याचा फार मोठा भाग मोगली वर्चस्वाखालून लोकांच्या साह्याने सोडविला.

राजाराम महाराजांच्या स्वराज्यात परत आल्यानंतरच्या हालचालीविषयी बेंद्रे सांगतात की, राजाराम महाराजांना सारख फिरावे लागले. त्यांना कोणत्या एका ठिकाणी बेदरबख्त व झुल्फिकारखान यांनी थांबू दिले नाही. या सर्व काळात म्हणजे फेब्रुवारी १६९८ ते त्यांच्या मृत्युपर्यंत म्हणजे २ मार्च १७०० पर्यंत त्यांच्या सोबत धनाजी जाधव होते व त्यांनी महाराजांसोबत मोगलांना अनेक ठिकाणी प्रतिकार दिला. १६९९ मध्ये राजाराम महाराज रायगडावर गेले; परंतु मोगलांमुळे ते परत आले. मार्गात ते आजारी पडल्याने सिंहगडला मुक्काम करावा लागला. तेथेच त्यांचा २ मार्च १७०० मध्ये मृत्यू झाला.[४६]

राजाराम महाराजांच्या कारकिर्दीची चिकित्सा करताना बेंद्रे सांगतात की, रामचंद्रपंताला विनाकारण जास्त महत्त्व दिल्याने बाकी जनता व सरदार नाराज झाले. कारण त्यांना राज्यकारभार निट करता येत नव्हता. त्यामुळे शिवाजी महाराज, संभाजी महाराज त्यांच्यावर नाखुष होते. प्रल्हाद निराजीनेही युरोपियनांना अनावश्यक सवलती दिल्या. त्यामुळे त्यांच्यावर सर्वांचा राग ओढवला व परिणामी त्यांना पंढरपूरला जाऊन आत्महत्या करावी लागली. त्याचप्रमाणे याकाळात सरदारांमधील द्वेषाचे परिणाम स्वराज्यावर झालेले आपल्याला दिसतात. केवळ शिवाजी महाराज व संभाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्याची जाणीव जनतेत प्रबळ असल्याने स्वराज्याचे रक्षण होऊ शकले एवढेच सांगता येईल.

राजा शाहूच्या आगमनापूर्वीच्या महाराष्ट्रातील हालचालीविषयी बेंद्रे सांगतात की, राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर १० मार्च १७०० मध्ये शिवाजीला छत्रपती राजे म्हणून घोषित केले गेले. यावेळी त्यांचे वय अवघे तीन साडेतीन वर्षाचे होते. म्हणून सर्व राज्यकारभाराची सुत्रे ताराबाईंच्याच हातात होती. या काळातील मराठ्यांच्या हालचाली ह्या लुटालूटीसाठी होत, मोगली सैन्याचा नाश करण्यासाठी नव्हे असे बेंद्रे सांगतात. या काळातही मराठी सरदारांचाच दबदबा पाहायला मिळतो. औरंगजेबाला या काळातही मराठा साम्राज्याला मोगलाईत सामिल करता आले नाही. त्यानंतर मोगलांनी शाहूला सोडून त्यांना स्वराज्यात पाठविले व शाहू स्वराज्यात जाऊन भांडणे करतील अशी आशा बाळगली. तसेच झाले. सत्तेसाठी ताराबाई व शाहू यांच्यात संघर्षाला सुरूवात झाली; पण बरेच सरदार शाहूची सत्यता पटताच ताराबाईंची

सोबत सोडून शाहूला येऊन मिळाली. खेडच्या युद्धाने ताराबाईंचा निर्णायक पराभव झाला. नंतर शाहू राजांनी ताराबाई व शिवाजी यांना चांगली वागणूक दिली. स्वतः ताराबाईही नंतर शाहू महाराजांकडे येऊन राहिल्या.[४७]

शेवटी वा. सी. बेंद्रे स्पष्टीकरण देतात की, ताराबाईने शत्रुत्व दाखविले; परंतु शाहूने मुद्दाम भेट घेऊन १६ जानेवारी १७०८ ला तह लिहून दिला. त्या तहाप्रमाणे ताराबाई व मुलगा शिवाजी यांना आपल्या राज्याचा एक भाग दिला म्हणून अपमानिक होऊन राहण्याची वेळ ताराबाईंवर आली नाही. मात्र हिंदवी स्वराज्याचे दोन तुकडे पडल्याने राज्यात दुहीचे बीज पेरले गेले.

अशा पद्धतीने मराठ्यांच्या इतिहासाविषयीचे महत्त्वपूर्ण इतिहासलेख वा. सी. बेंद्रे यांनी केले. त्यांनी हे करीत असताना संपूर्ण साधनांचा अभ्यास करून त्यांची मीमांसा करून अथक परिश्रमाने मराठ्यांचा त्यातल्या त्यात मालोजी, शाहाजी, शिवाजी, संभाजी महाराजांचे खरे चरित्र अभ्यासकांपुढे व संशोधकांपुढे आणले. इतिहासकार वा. सी. बेंद्रे यांचे मराठा इतिहासलेखनातील योगदान खालील मुद्यांच्या आधारे एकत्रितपणे थोडक्या सांगता येईल.

१. बेंद्रे हे पेशवे दप्तरखान्याचे अधिकारी असताना पेशवे दप्तरातील सुमारे ४ कोटी विस्कळीत कागदपत्रांचे कॅटलॉगिंग करून, विषयवार विभागणी करून ते संकलित करून ठेवले. तसेच 'वन लाईन कॅटलॉग कसा करावा' याची विस्तृत माहिती देणार 'Alienation Office Records and Poona Dafter' नावाचे पुस्तक लिहिले. जे आजही वस्तुसंग्राहलय आणि अभ्यासक ह्यांना उपयुक्त ठरत आहे. असेच कार्य बेंद्रे यांनी बिकानेर व तंजावरच्या दप्तरखान्या संदर्भात केली आहे. ज्यामुळे मराठ्यांच्या इतिहासलेखनाला कागदपत्रांची उपलब्धता झाली.

२. वा. सी. बेंद्रे यांनी स्वतः केलेल्या व्यासंगावरून मिळालेली माहिती, सुचलेले नियम व पटलेली अनुमाने सांगणारा व ऐतिहासिक साधनांची शास्त्रीय दृष्टीने व समग्रपणे चिकित्सा करणारा "शिवशाहीच्या इतिहासाचा प्रास्ताविक खंड साधन चिकित्सा" हा मराठीतील पहिला ग्रंथ इ.स. १९२८ मध्ये प्रसिद्ध केला. जो आज इतिहास संशोधकांना व अभ्यासकांना मराठ्यांचा इतिहास लिहितांना उपयोगी पडत आहे.

३. वा. सी. बेंद्रे यांनी मालोजी राजांच्या घुमटाचे मुस्लीम काळात दर्ग्यात रुपांतर झाल्याचे सिद्ध करून तेथील तहसीलदाराची भेट घेऊन, पेशवे दप्तरातील कागदपत्राचा शोध घेऊन इंदापूर येथील मालोजी राजांच्या घुमटाचा शोध घेतला.

४. इ.स. १९३८ मध्ये बेंद्रे इतिहास संशोधनासाठी इंग्लंडला गेले असताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे चित्र शोधून काढले. शिवाजी महाराजांचे हे खरे चित्र मिळण्या अगोदर 'इब्राहीम खान' नावाच्या मुस्लीम व्यक्तीचे चित्र शिवाजी महाराजांचे म्हणून इतिहासविषयक पुस्तकातून छापले जात होते.

५. संभाजी महाराजांचे चरित्र प्रकाशित करून श्री. वा. सी. बेंद्रे यांनी महत्तम कामगिरी केली आहे. बखरकारांचा व ऐतिहासिक नाटकांचा विचार करता संभाजी व्यसनाधीन, बदकैफी, व्यभिचारी, दुवर्तनी होते असेच वर्णन केले आहे; पण बेंद्रेच्या या चरित्र लिखानाने संभाजी महाराजांची पराक्रमी, संकटाला धीरोदात्तपणे तोंड देणारी, धोरणी मुत्सद्दी अशी तेजस्वी प्रतिका उंचावली गेली.

६. प्रारंभी संभाजी महाराजांची समाधी तुळजापूरमध्ये आहे असा समज होता. कालांतराने व विषयसंदर्भ मिळाल्यानंतर ही मूळ समाधी वडू बद्रुक येथे असल्याचे बेंद्रे यांनी सिद्ध केले.

७. वा. सी. बेंद्रे यांचे कार्यक्षेत्र हे १७ वे शतक राहिले. त्यात त्यांनी शिवशाहीच्या अंतरंगात प्रवेश केला आणि ते अतिशय खोलवर गेले. मालोजी राजे, शाहाजी राजे, शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज यांची चिकित्सक चरित्रे लिहिली.

यामुळे वा. सी. बेंद्रे यांच्या योगदानाचा विचार केल्यावर आपल्याला वा. सी. बेंद्रे यांच्या कार्यासंदर्भात डॉ. हे. वि. इनामदार यांनी काढलेले उद्गार "The man decided not to Live but to Know" आठवल्याशिवाय राहात नाही.

संदर्भग्रंथ सूची

१. लोकसत्ता (वृत्तपत्र) मधील डॉ. वि. गो. खोबरेकर यांचा लेख, 'व्यासंगी इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे', मुंबई आवृत्ती, दि. १७.०८.१९८६
२. इतिहास संशोधन मंडळ, मुंबई यांचा सुवर्ण महोत्सवी वर्षे वर्धापन दिन विशेष अंक, २ ऑक्टोबर २०११, पृ. क्र. २४, २५
३. पूर्वोक्त, लोकसत्ता (वृत्तपत्र) मधील डॉ. वि. गो. खोबरेकर यांचा लेख
४. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय प्रा. लि., आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. क्र. ४
५. बेंद्रे वा. सी., 'महाराष्ट्रेतिहासाची साधने -विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, ऑक्टोबर १९६७, पृ. क्र. १
६. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय प्रा. लि., आवृत्ती दुसरी, १९७६, पृ. क्र. ३८, ३९
७. कित्ता, पृ. क्र. २६, २६
८. कित्ता, पृ. क्र. १८९
९. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्र', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ११
१०. कित्ता, पृ. क्र. ४४ ते ४७
११. कित्ता, पृ. क्र. ७४
१२. कित्ता, पृ. क्र. १२८ ते १३०
१३. कित्ता, पृ. क्र. १४८
१४. कित्ता, पृ. क्र. १७०
१५. कित्ता, पृ. क्र. ४२१
१६. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र - पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ७८
१७. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्र', पहिली आवृत्ती, १९६७, पृ. क्र. ४४७
१८. कित्ता, पृ. क्र. ४६०
१९. कित्ता, पृ. क्र. ५१८, ५१९
२०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र - पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ३
२१. कित्ता, पृ. क्र. ३९
२२. कित्ता, पृ. क्र. १८६, १८७
२३. कित्ता, पृ. क्र. १८६

२४. कित्ता, पृ. क्र. १८९
२५. कित्ता, पृ. क्र. ३७९, ३८०
२६. कित्ता, पृ. क्र. ६११, ६१२
२७. कित्ता, पृ. क्र. ६५९, ६६०
२८. बेंद्रे वा. सी., 'श्री शिवराजाभिषेक', पी. पी. एच. प्रकाशन, पृ. क्र. १४, १५
२९. कित्ता, पृ. क्र. १६ ते १८
३०. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र - उत्तरार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ७५५
३१. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. ६५, ६६
३२. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र - उत्तरार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२, पृ. क्र. ९२५
३३. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, १ नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. २५, २६
३४. कित्ता, पृ. क्र. २४३, २४४
३५. कित्ता, पृ. क्र. ५३६, ५३७
३६. कित्ता, पृ. क्र. ६०२, ६०३
३७. कित्ता, पृ. क्र. ६११
३८. कित्ता, पृ. क्र. १२
३९. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१, पृ. क्र. १३
४०. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, १ नोव्हेंबर १९७५, पृ. क्र. २९
४१. कित्ता, पृ. क्र. ३०
४२. कित्ता, पृ. क्र. ५०
४३. कित्ता, पृ. क्र. १५०
४४. कित्ता, पृ. क्र. १५२, १५४
४५. कित्ता, पृ. क्र. १५६
४६. कित्ता, पृ. क्र. ३१६
४७. कित्ता, पृ. क्र. ४८२

0 *संदर्भग्रंथ सूची* 0

मराठी संदर्भग्रंथ सूची :

१. बेंद्रे वा. सी., 'गोवळकोंड्याची कुत्बशाही', भारतीय इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९३४.

२. बेंद्रे वा. सी., 'गड-कोट दुर्ग', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालययाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, क्र-५, मुंबई, २५ जाने. १९६५.

३. बेंद्रे वा. सी., 'महाराष्टेतिहासाची संशोधनक्षेत्रे व साधनसंपत्ती', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, पहिली आवृत्ती, १ नोव्हेंबर १९६६.

४. वा. सी. बेंद्रे, 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे', प्रथम आवृत्ती १९६७.

५. बेंद्रे वा. सी. (संपा), 'विजापूरची आदिलशाही', बुसातिन-उल-सलातीन या फारसी ग्रंथाचे नरसिंहराव विठ्ठल पारसनीसकृत मराठी भाषांतर, मु. म. ग्र. सं. मुंबई, आवृत्ती पहिली, नोव्हें. १९६८.

६. बेंद्रे वा. सी., 'श्री शिवराजाभिषेक', पी. पी. एच. प्रकाशन.

७. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज', साहित्य सहकार मुद्रणालय, १ मे १९७२.

८. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपति शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-पूर्वार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशिबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२.

९. बेंद्रे वा. सी., 'श्री छत्रपति शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र-उत्तरार्ध', साहित्य सहकार मुद्रणालय, अशिबाग, जि. कुलाबा, प्रथमावृत्ती १ मे १९७२.

१०. बेंद्रे वा. सी., 'संभाजी राजे भोसले', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला.

११. बेंद्रे वा. सी., 'शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास (प्रास्ताविक खंड) साधन चिकित्सा', लोकवाङ्मय गृह प्रा. लि. आवृत्ती दुसरी, १९७६.

१२. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती संभाजी महाराज', मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती, १ मार्च २००१.

१३. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज', लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिल आवृत्ती, नोव्हेंबर १९७५.

१४. बेंद्रे वा. सी., 'छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन 'हिंदवी स्वराज्या'चा मोगलांशी झगडा', लोकवाङ्मयगृह मुंबई, १ नोव्हेंबर १९७५.

१५. बेंद्रे वा. सी., 'राजारामचरितम् अथवा जिंजीचा प्रवास', भारत इतिहास संशोधन मंडळ स्वीय ग्रंथमाला, पुणे १९३१.

१६. बेंद्रे वा. सी., 'राणा जयसिंग आणि शिवाजी महाराज यांची राजकारणी चढाओढ', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला-७.
१७. बेंद्रे वा. सी., 'मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रें', पहिली आवृत्ती, १९६७.
१८. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग पहिला', मुंबई मराठी ग्रंथसग्रहालय, ऑक्टोबर १९६७.
१९. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग दुसरा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय.
२०. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहासाची साधने - विभाग तिसरा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, फेब्रुवारी १९६७.
२१. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहास परिषद' (अधिवेशन पहिले), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६७.
२२. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहास परिषद' (अधिवेशन दुसरे), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
२३. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहास परिषद' (अधिवेशन तिसरे), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
२४. बेंद्रे वा. सी. (संपा): 'महाराष्ट्रेतिहास परिषद' (अधिवेशन चौथे), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
२५. इतिहास संशोधन मंडळ, मुंबई यांचा सुवर्ण महोत्सवी वर्षे वर्धापन दिन विशेष अंक, २ ऑक्टोबर २०११.
२६. पवार जयसिंगराव भाऊसाहेब, 'छत्रपती संभाजी - एक चिकित्सा', सुमेरू प्रकाशन, डोंबिवली पूर्व, प्रथमावृत्ती, २४ एप्रिल २००५.

मासिके :

१. एकता मासिक (मे २०००)- माधव गडकरी यांचा लेख.
२. एकता मासिक (मे २०००)- लक्ष्मीदास बोरकर यांचा लेख.
३. समाजसेवा (मासिक), वर्षे १४ वे, मार्च १९६०, संपादकीय पृष्ठ

वृत्तपत्रे :

१. दैनिक लोकसत्ता (वृत्तपत्र) मधील डॉ. वि. गो. खोबरेकर यांचा लेख, 'व्यासंगी इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे', मुंबई आवृत्ती, दि. १७.०८.१९८६
२. दैनिक लोकसत्ता (वृत्तपत्र), मुंबई, मंगळवार, दि. २६/०८/१९८६
३. दैनिक लोकसत्ता मधील दि. २६.०८.१९८६ ची श्रद्धांजलीपर बातमी

संकेतस्थळे :

१. anuradhavelankar.globalmarathi.com/BlogDetails.aspx?Blogid=48901734992032181 34&old=4818382155966403373&TName=शिवाजी

२. anuradhavelankar.globalmarathi.com/BlogDetails.aspx?Blogid=48901734992032181 34&old=4818382155966403373&TName =शिवाजी, By Sadhana da, on 01 Nov. 2011 Date 13.03.2013

३. file:E:/Globalmarathi - एका परकीय व्यक्तीचे चित्र शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून, By Sadhana da, on 01 Nov. 2011 Date 13.03.2013

४. globalmarathi.blogspot.com, चि. न. परचुरेंचा लेख, Date: 16.03.2013

५. historianbendrey.blogspot.com,myvishwa.com/PublicBlog Details.aspx?BlogPostid=5335195515112772650&profileid =4818382155966403373&Groupid=0

६. historianbendrey.blogspot.in/2012/02/drsumitra-kulkarni university of pune.html, posted 24th Feb 2012 by Sadhana

७. http://globalmarathi.com, on 22 Oct. 2011, Date 15.03.2013

८. http://historianbendrey.blogspot.in/2012/12/blog-post21.html, Date:16.03.2013

९. myvishwa.com/PublicBlogDetails.aspx?BlogPostid=5395793991134275426&profileid=4818382155966403373&Groupid=0, on 27 Oct. 2011, Date 15.03.2013

१०. myvishwa.com/PublicBlogDetails.aspx?BlogPostid=5472571416065664738&profileid=4818382155966403373&Groupid = 0, 21 Oct. 2011, Date 18.01.2013

११. myvishwa.com/PublicBlogs/PublicBlogDetails.aspx?BlogPost=5395793991134275426&profileid=4818382155966403373&Groupid=0

१२. कायस्थ प्रबोधन (ऑगस्ट 1986) मधील संपादकीय, www.google.co.in/search?a=vtctbendre&hl-en &source=Inms & tbm=isch & sa=x & ei=lbxOUY-fEaX.

१३. www.globalmarathi.com - एका परकीय व्यक्तिचे चित्र शिवाजी महाराजांचे चित्र म्हणून..., डॉ. चि. न. परचुरे, दि. १८/०३/२०१३.